GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

Mar

Class No. 294.2

Book No. Bh 153 bha V.1

N. L. 38.

MGIPC—S8—21 LNL/59—25-5-60—50,000.

श्रीमद्भगवद्गीता

भाग - पहिला

चिंतामण गंगाधर भानु

१९०९

भट आणि मंडळी; यशवंत;
पुणें;

किंमत: ३

4+14+21+494p

अनुक्रमणिका.

अध्याय पहिला. ....
अध्याय दुसरा. ....
अध्याय तिसरा. ....

श्रीगजाननाय नमः ।

प्रस्तावना.

या प्रस्तावनेंत (१) भारतीय युद्धाच्या प्रसंगाची त्रोटक हकीकत, (२) अर्जुनास उत्पन्न झालेली शंका, (३) पुरुषार्थांची अवश्यकता, (४) निरनिराळे मोक्षमार्ग, (५) श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलेला मार्ग, व इष्टहेतु साध्य करून देणारे कर्तव्याचें स्पष्टीकरण, (६) प्रस्तुत पुस्तक काढण्याचा उद्देश, (७) आणि शेवटीं या पुस्तकांत योजिलेली व्यवस्था, इतक्या विषयांचा अंतर्भाव केला आहे. विषयबाहुल्यामुळें माझ्या उद्देशापेक्षां हा लेख जास्त वाढला, तथापि इतका विस्तार अवश्य आहे असें वाटल्यावरून लांब होत जाणाऱ्या प्रस्तावनेला मीं होऊनच हात आंखडला नाहीं.

भारतीय युद्धाच्या प्रसंगाची त्रोटक हकीकत.

पूर्वी द्वापारयुगामध्यें भरतकुलोत्पन्न शंतनु या नांवाचा राजा कुरुक्षेत्रामध्यें राज्य करित असे. त्याला गंगा नामक एका स्वर्गस्थ देवीचें दर्शन झालें. उभयतांचें एकमेकांवर प्रेम जडलें. पुढें त्यांचा शास्त्रोक्त विवाह झाला. गंगा ही स्वर्गांतील नदी होय. तिला शाप झाल्यामुळें ती या मृत्युलोकांत आली होती. लग्नाच्या वेळीं उभयतांमध्यें असा करार ठरला होता कीं, लग्नापासून उत्पन्न होणाऱ्या मुलांवर सर्वस्वीं गंगेचा हक्क असावा, व तिच्या मताविरुद्ध कांहीं झाल्यास तिनें राजाचा त्याग करून जावें. पुढें गंगेस सात पुत्र झाले. सातांसही तिनें नदीमध्यें सोडून दिलें! आपल्यास होणाऱ्या प्रत्येक पुत्राची अशी वाट लागते, हें पाहून शंतनूस अत्यंत खेद होई. परंतु करितो काय! गंगेचें अप्रतिम सौंदर्य आणि विवाहसमयींचा करार या दोन कारणांनीं त्याला कांहीं बोलतां येईना. आठवा मुलगा झाला. त्यालाही जेव्हां गंगा पाण्यांत सोडून देऊं लागली तेव्हां राजाचा शोक अनावर होऊन त्यानें 'हा तरी मुलगा टाकूं नकोस, माझ्यानें हा शोकभार सहन करवत नाहीं' अशी तिची करुणास्वरानें विनंति केली. गंगेनें पुत्रास मारिलें नाहीं; पण ती स्वतः निघून गेली. या पुत्राचें नांव भीष्म होय. लहा-

नपणापासून भीष्मानें आपल्या शौर्यानें, आपल्या बुद्धीनें व आपल्या सदाचरणानें सर्व प्रजाजनांचीं मनें आकर्षण करून घेतलीं. पितृप्रेमानें तर त्यानें राजास आपलेसें करून ठेविलें व राजानें लवकरच भीष्माला **युवराज** पदवी दिली, आणि आपण मृगया करित राहिला. पुढें एके दिवशीं **सत्यवती** नामक एक कुलीन परंतु गरीब स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. गंगेच्या विरहानें वेडा झालेला राजा सत्यवतीचें आपण पाणीग्रहण करावें अशी इच्छा करूं लागला. सत्यवतीच्या बापास ही हकीकत कळल्यावर राजास त्यानें एकच गोष्ट सांगितली; ती ही कीं 'माझ्या मुलीच्या पोटीं जो पुत्र होईल त्यास संपुर्ण राज्य देईन, असें वचन देत असशील तर तुला मी आपलें कन्यारत्न देतों.' राजास हें अर्थातच कबूल करवेना. भीष्म हा थोरला मुलगा; त्याच्यावर राजाचें व लोकांचें प्रेम फार; म्हणून राजास ही अट कबूल करवेना. परंतु सत्यवतीचा ध्यासही त्यास सुटेना! येणेंप्रमाणें तो अत्यंत चिंताक्रांत झाला. युवराज भीष्मासही ही वार्ता कर्णोपकर्णीं कळली. तेव्हां या महात्म्यानें आपल्या सर्व सुखांवर पाणीं सोडून वडिलांस 'मी लग्नच करित नाहीं, आपण आपली इच्छा मोकळ्या मनानें परिपूर्ण करून घ्यावी' अशा अर्थाची आग्रहपूर्वक विनंति केली व राजानेंही पुत्राचा निष्कपट आग्रह पाहून सत्यवतीशीं लग्न लाविलें. सत्यवतीस दोन पुत्र झाले. त्यांचीं नांवें **चित्रांगद व विचित्रवीर्य** होत. हीं मुलें लहान असतांनाच शंतनु मरण पावला म्हणून भीष्मानें यांच्या नांवावर राज्यकारभार चालविला. प्रतिज्ञेप्रमाणें भीष्मानीं आपलें ब्रह्मचर्य शेवटपर्यंत सोडिलें नाहींच. पुढें चित्रांगद व विचित्रवीर्य हेही अल्पवयांत मरण पावले. विचित्रवीर्यास दोन बायका होत्या, त्यांस अनुक्रमें **धृतराष्ट्र** व **पंडु** असे दोघे पुत्र झाले. धृतराष्ट्र वडील, परंतु जन्मापासून अंधळा म्हणून पंडूस राज्यावर बसवून भीष्मानीं राज्यकारभार चालविला; पंडूस **कुंती** आणि **माद्री** अशा दोन स्त्रिया होत्या. पंडु हा भीष्मांच्या अनुमतानें राज्य करित असतां कांहीं कारणानें त्यास वनामध्यें जाऊन तपश्चर्या करणें भाग पडलें. तेथंच कुंतीस तीन आणि माद्रीस दोन असे पांच पुत्र झाले. **धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव** हीं त्यांचीं नांवें होत. यांसच **पांडव** म्हणतात. हीं मुलें लहान होतीं

तोंच पंडूही मरण पावला व त्याच्याबरोबर माद्री सती गेली. पुढें कुंती आपल्या पांचही मुलांस बरोबर घेऊन **हस्तिनापुरास** दाखल झाली. इकडे जन्मांध धृतराष्ट्राचेंही लग्न होऊन त्याला शंभर मुलगे व एक मुलगी झाली, **दुर्योधन, दुःशासन, विकर्ण** इत्यादि या शंभर भावांस **कौरव** अशी सामान्य संज्ञा आहे. शंभर कौरव व पांच पांडव या सर्वांचा विद्याभ्यास भीष्मांनीं यथासांग करविला. कौरवपांडवांचे प्रथमगुरु **कृपाचार्य** होत. पुढें धनुर्विद्येमध्यें पारंगत अशी ख्याति असलेल्या गुरु **द्रोणाचार्यांनीं** कौरवपांडवांस युद्धकलेमध्यें निष्णात केलें. तथापि पांडवांची आणि त्यांतही भीमार्जुनांची विलक्षण ग्राहकशक्ति पाहून शिष्यवत्सल गुरुद्रोणांनीं त्यांस धनुर्वेदाचें **रहस्यसर्वस्व** सांगितलें. पांडवांचें हें युद्धप्राविण्य पाहून कौरवांच्या मनांत मत्सरबुद्धि उत्पन्न झाली. शिवाय पंडूचीं हीं सद्गुणीं मुलें भीष्माच्या, व धृतराष्ट्रखेरीज इतर सर्व वडील माणसांच्या, प्रेमातिशयासही पात्र झालीं; यामुळें तर कौरवांच्या मत्सराग्नीला दुप्पटच भर पडली. शेवटीं पांडवांस राज्य मिळेल, निदान राज्याचा अर्धा वांटा तरी द्यावा लागेल, ही भीति कौरवांच्या मनांत उत्पन्न झाली; व तिला **शकुनि**मामांनीं जास्तीच चेतवून 'पांडवांचा नाश करावा' अशीही मसलत त्यांस दिली. ही मसलत ठरल्यावर कौरवांनीं भीमास विष तर घातलें, पांडवांचे राहण्याचे ठिकाणास आग तर लाविली, भीमास पाण्यांत बुडविण्याचा प्रयत्न तर केला, पांडवांनीं आपल्या सामर्थ्यानें अपार संपत्ति मिळविली, तेव्हां त्यांचे दुष्मान जे कौरव त्यांच्या पोटांत विशेषच दुखूं लागून त्यांनीं धर्मास द्यूत खेळावयास तर लाविलें, पांडवांची संपत्ति तर हिरावून घेतली, त्यांच्या महासाध्वी व महापतिव्रता **द्रौपदीनामक** पत्नीचा असह्य अपमान तर केला व शेवटीं या पापभीरु, सत्त्वशील, पांडवांस वनवासांतही पाठविलें ! इतका दुर्धर छल झाला असतांही पांडवांनीं आपलें ब्रीद सोडिलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर कौरवांवर आलेल्या संकटांचा वनवासी पांडवांनीं यथाशक्ति परिहारही केला ! असल्या पुण्यश्लोक साधूंस कांहीं दिवस अज्ञातवासही भोगावा लागला. अज्ञातवास संपला व सर्व संकटांतून मुक्त झालेल्या पांडवांनीं जगास असा एक धडा घालून दिला कीं, "सद्वर्तन हाच मृत्युलोकांतील प्राण्यांचा

मुख्य पुरुषार्थ आहे. संकटें येवोत, वा जावोत, सुख असो वा नसो, धीर पुरुषांनीं न्याय्य वर्तनाचा मार्ग कधींही सोडूं नये, असा उपदेश ध्रुव, प्रल्हाद वगैरे साधूंच्या वर्तनावरून प्राप्त होतोच; परंतु एकवचनी रामचंद्र आणि सत्त्वशाली पांडव यांच्या चरित्रांनीं हा वरील बोध जसा दृढ होतो, तसा अन्य चरित्रांनीं होत नाहीं, हें रामायण व महाभारत ग्रंथांच्या लोकमान्यतेवरून स्पष्ट होत आहे. असो; पांडवांनीं पुन: 'राज्याचा अर्धा वांटा, निदान वडिलोपार्जित पांच गांवें तरी द्या,' अशी कौरवांजवळ मागणी केली. भीष्म, द्रोण, धृतराष्ट्राचा भाऊ विदुर यां सर्वांनीं दुर्योधनादि कौरव, त्यांचे मंत्री शकुनिमामा, अद्वितीय धनुर्धर व पांडवांशिवाय इतर सर्व लोकांशीं उदार वृत्तीनें वागणारा कर्ण—यांचें मन वळविण्यासाठीं आपली शर्थ केली. न्यायानें वागावें अशी इच्छा धारण करणारा परंतु पुत्रमोहानें वेडा झालेला धृतराष्ट्रही मंद व शिथिल औत्सुक्यानें दुर्योधनाचें मन वळवूं लागला. पण नाहीं; दुर्योधनानें आपला दुष्ट दुराग्रह सोडिला नाहीं. सामाचे सर्व उपाय थकले. प्रत्यक्ष श्रीकृष्णही हताश होऊन परत आले! तेव्हां काय होईल तें होवो, तहच करावयाचा असें ह्मणणाऱ्या धर्मराजाचा निरुपाय होऊन त्यानें लढाईस अनुमोदन दिलें व उभयपक्षांची सिद्धता झाली. कौरवांचा पक्ष अन्यायमूलक होता तरी त्यांच्या पक्षास अकरा अक्षौहिणी लोक मिळाले. पांडवांकडे सारें सात अक्षौहिणी सैन्य होतें. एकंदर १८ अक्षौहिणी सैन्य होतें.

महाभारतांत अठरा हा आंकडा विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. महाभारताचीं पर्वें अठरा, सैन्य अक्षौहिणी अठरा, भारतयुद्ध झालें दिवस अठरा; श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीता सांगितली अध्याय अठरा, अशी 'अष्टादश' आंकड्यांची पुनरावृत्ति महाभारतांत अनेक वेळ होते. असो; दोन्हीं सैन्यें लढाईच्या तयारीनें उभीं राहिलीं आहेत, गुरुद्रोणास नमस्कार करून दुर्योधन पांडवांच्या व आपल्या सैन्याचें बलाबल आचार्यांस सांगत आहे, इतक्यांत युद्धनैपुण्यांमध्यें अद्वितीय ह्मणून प्रसिद्ध असलेल्या भीष्म सेनापतींनीं सिंहनाद करून आपला जो दिव्य शंख तो वाजविला. त्याबरोबर कौरवपांडव—सैन्यांत नौबती, भेरी, डंके, शिंगें, शंख इत्यादि वाद्यांचा वीरश्रीजनक घोर महारव उत्पन्न होऊन युद्धा-

सच सुरुवात होणार व नमनाचे बाण सुटणार इतक्यांत कोणकोणते भट (योद्धे) रणांगणांत सज्ज होऊन उभे राहिले आहेत हें पाहण्या-साठीं अर्जुनानें श्रीकृष्णसारथ्यास आपला ' रथ दोन्हीं सैन्यांच्या मध्यें उभा करावा ' असें सांगितलें. मध्यस्थानावर रथ पोहोंचला. दोन्हीं सैन्यांत नजर फेंकून अर्जुन पहावयास लागला, तों सर्वत्र, कोणी आजे, कोणीं चुलते, मामे, बंधु, मित्र, पुतणे, मुलगे, आप्त, गुरु वगैरे सर्व आपलाच गोतावळा त्याच्या दृष्टीस पडला. आंतड्याची माया द्वेषापेक्षां जास्त बलवत्तर आहे, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आपला सर्व परिवार व गोतावळा दोन्ही सैन्यांत भरपूर भरला आहे असें पाहून दुष्ट, अन्यायी व आपमतलबी कौरवांचा समूळ निःपात करावयाची अशी उत्कट इच्छा रात्रंदिवस बाळगणारा वीरशिरोमणी अर्जुन व्याकुळ झाला. त्याचें अमानुष धैर्य अस्तंगत झालें, त्यास जबरदस्त मोह उत्पन्न झाला, आणि केवळ राज्यलोभाकरितां, राज्यसुखासाठीं; व कीर्ति मिळवावयाची म्हणूनच, आपण कुलक्षयकारी अशा युद्धास आरंभ करीत आहोंत, हें चांगलें नव्हे, हें आचरण पापमूलक आहे, अशी त्याची खात्री झाली. त्यानें आपलें दिव्य धनुष्य, अखंड भाते व अमोघ बाण खालीं टाकून दिलें; आणि बंधुबांधवांचा, भीष्मद्रोणांसारख्या महापूज्य गुरुजनांचा, वध करण्याचा विचार सोडून देऊन ' भिक्षा मागण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर पण आपण ह्या कुलविध्वंस करणाऱ्या युद्धामध्यें प्रवृत्त होणार नाहीं,' असा निश्चय केला. श्रीकृष्णांनीं 'भेकडासारखें काय करितोस!' असें म्हणून चिडविण्याचा प्रयत्न केला तेव्हां 'कृष्णा ! सदोदित आमचा पाणउतारा करून आमचा नाश करूं इच्छिणाऱ्या दुष्ट व अधम कौरवांचा नाश करावयासाठीं युद्ध करावें अशी मनाची एकदां प्रवृत्ति होते व त्याचवेळीं भीष्मद्रोणादिक पूज्य व वंदनीय सत्पुरुषांचा व एकाच पूर्वजाच्या वंशांत उत्पन्न झालेल्या बंधुबांधवांचा, वध करण्याचा प्रसंग येतोसें पाहून युद्ध न करितां आपणच अन्यत्र निघून जावें असेंही वाटूं लागतें; तेव्हां काय करूं ? व जें करावयाचें तें कां करूं ? या दोन्ही प्रश्नांचें शास्त्रोक्त व सयुक्तिक उत्तर मला सांग, नाहींतर मी युद्ध करीत नाहीं.' असें म्हणून अर्जुन स्तब्ध झाला. त्याला उत्तर म्हणून जें कृष्णांनीं सां-

गितलें ती सर्वप्रसिद्ध **भगवद्गीता** होय. ह्या अनुपम भगवद्वचनास इतकें महत्त्व कां आलें याचें समाधानकारक उत्तर देण्यापूर्वी गीतेंत काय सांगितलें आहे व त्यापासून आपल्यासारख्या सर्व प्राकृत मनुष्यांनीं कोणता बोध घ्यावा हें संक्षेपानें सांगतों. वाचकांनीं कृपा करून इतकेंच ध्यानांत ठेवावयाचें आहे कीं आतां संक्षिप्तरूपानें जें गीतारहस्य मी सांगणार आहें, तें आपणां सर्वांस समजेल व ग्राह्य करितां येईल इतक्याच बेतानें सांगत आहें समग्र ग्रंथ वाचन होऊन तो ग्रंथ आपल्यास यथास्थित समजला ह्मणजे जें आपण गीतासार काढूं तें कदाचित् प्रस्तुतच्या साररूपेक्षां विशेष रुचिकर व पथ्यकर होईल! नाहीं कोणीं ह्मणावें?

पुरुषार्थनिश्चय.

हिंदुस्थानांत तत्त्वज्ञानाकडे विचारी पुरुषांची दृष्टि वेदकालानंतर वळली असावी. वेदकाळांत यज्ञयागादि कर्में करणें व त्यापासून प्राप्त झालेल्या फलाचा उपभोग घेणें हाच काय तो प्रवृत्तिपर निवृत्तिमार्ग असे. सत्कर्माचें फल व दुष्कर्माची शिक्षा या लोकीं नेहमींच मिळते असें होत नाहीं ह्मणून स्वर्गनरकादि लोकांचें वास्तव्य व पुनर्जन्मांचे सिद्धांत ठरवून कर्माचें फल येथें अगर इतरत्र, ह्या जन्मीं अगर अन्यजन्मीं मिळत असतें, असा कर्मकाळीं एक महासिद्धांत प्रस्थापित झाला पुढें कालांतरानें कर्म करणें व उपभोग घेणें हाच मानवीजन्माचा पुरुषार्थ नव्हे, नुसत्या इंद्रियांनीं दिलेल्या ज्ञानावर, त्यांनीं केलेल्या कर्मावर व त्यांनीं पुढें आणलेल्या विषयांच्या उपभोगावर संतुष्ट न राहतां ह्मणजे पशुप्राणेंच आयुष्ययात्रा न घालवितां, मनुष्यास असलेल्या शुद्ध ज्ञानशक्तीचा त्यानें उपयोग केला पाहिजे, असा पंथ निघाला. ह्या लोकांनीं कर्म ह्मणजे काय व तें प्राण्याच्या मागें कां लागलें याचा शोध करून ठरविलें कीं, कर्म हें विषयलोभापासून उत्पन्न होतें व लोभ आहे तों तें कर्म सुटत नाहीं; पुनर्जन्म तरी कर्मामुळेंच होतो; आणि आत्मा हें तत्त्व शिवाय करून बाकीचे सर्व पदार्थ प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत, प्रकृतीच सर्वकर्त्री आहे, सुखःदुख देणारी तीच, देवांकडे कसलाच संबंध नाहीं ह्मणून ते नाहींत! मनुष्यानें इच्छेचा त्याग करून कर्म करण्याचें सोडून द्यावें, ह्मणजे त्यास सुखदुःखें बाधणार नाहींत, पुनर्जन्म येणार नाहीं; आणि

त्याचा आत्मा शुद्ध होईल अगर त्यास मोक्ष मिळेल. हा **सांख्यमार्ग** हा नास्तिकपंथ आहे. या पंथांत कर्मच नाहीं व कर्मेच्छा नाहीं ह्मणून यांत नीतिमार्ग नाहीं. याचें कृष्णानीं परीक्षण केलें आहे तें कसें, तें पुढें सांगीतलेंच आहे. **डेका** नामक फ्रेंच तत्त्ववेत्ता आणि जगप्रसिद्ध स्पायूनोझा यांचें व **कपिलमहामुनि** यांचें तात्त्विकदृष्टीनें बरेंच विचारसाम्य आहे.

दुसरा नास्तिकपंथ **बृहस्पति, चार्वाक** इत्यादि लोकांचा. या पंथाचे लोक ह्मणतात कीं ' राजा हा आमचा ईश्वर, सुखोपभोग हा श्रेष्ठ पुरुषार्थ, प्रत्यक्ष प्रमाण हा आमचा ज्ञानमार्ग, देह हा आत्मा आणि मरण आमचा मोक्ष होय ! ' इंग्लिश तत्त्ववेत्ता **हाब्स** हा या लोकांची उत्कृष्ट प्रतिमा होय.

पतंजली नामक योगमार्गसंस्थापकानें सांख्यांची बरीच पद्धति स्वीकारून त्यांच्या मतांच्या कोंदणांत पूर्ण ज्ञानी परब्रह्माचें व आत्माचिंतनानें परब्रह्माशीं एकतानता करण्याचें अशीं दोन रत्नें बसविलीं आहेत. कर्मत्याग योग्यांसही कबूल आहेच. त्यांनाही पुनर्जन्म नको आहे आणि मोक्ष हवा आहे. योगाभ्यासानें आपल्या देहासच काय पण सर्व चराचर वस्तूंसही मनुष्य आपल्या ताब्यांत आणूं शकेल असें मानवी आत्म्याचें महत्त्व या योगशास्त्र–प्रवर्तकांनीं प्रथमतःच प्रकट केलें. युरपियन मेस्मर वगैरे शोधकांस हें आत्मसामर्थ्य एकोणिसाव्या शतकांत गवसलें आहे. भगवंतांनीं ह्याही मताचें परिक्षण केलें आहे; त्याची दिशा खालीं दाखविलीच आहे.

ह्या तिन्ही चार्‍ही मार्गप्रवर्तकांनीं वैदिककर्मास झुगारून देण्याची खटपट केली; तरी चार्वाकाशिवाय इतरांस पुनर्जन्माचा महासिद्धांत कबूल होता आणि कर्म टाकून दिलें ह्मणजे पुनर्जन्म सुटून मोक्ष मिळेल असें वाटत होतें. पुनर्जन्माची समजूत वैदिककाळचीच होती. पुढें वेदान्तमत अगर अद्वैतमत या आर्यभूमींत प्रकट झालें, तेव्हां वेद, सांख्य, योग इत्यादि सर्व सिद्धांतांची एकवाक्यता होऊन अद्वैतसिद्धांतांची स्थापना झाली. वैदिक कर्मानें चित्तशुद्धि, सांख्यमार्गानें ज्ञान, योगानें ब्रह्मचिंतन व समाधीचा अभ्यास, उपासनेनें भक्ति, साध्य होतात असें **ब्रम्हसूत्रकार व्यास** महामुनी यांनीं ठरवुन प्रकृतीला मिथ्या केलें, हें जग व आपलीं सर्वं विषयज्ञा

इंद्रियें असत्य आहेत, शुद्ध ज्ञानस्वरूपी ब्रह्म एकच आहे आणि तेंच ब्रह्म आपण आहोंत, मायेच्या योगानें अगर प्रकृतीच्या साहचर्यामुळें आपलें खरें स्वरूप आपल्यास कळत नाहीं, वगैरे सिद्धांतांची व्यास ऋषींनीं स्थापना केली. या सिद्धांतांवर अत्युत्कृष्ट तऱ्हेचें भाष्य लिहून **शंकराचार्यांनीं** अद्वैतसिद्धांत सर्वमान्य केलें आहेत. या सिद्धांतांचा विचार करण्याचा प्रसंग आपल्यास नेहमींच येणार आहे. **प्लेटो, मालिब्रॉंच, बर्कले, हेगेल, शोपेनहार** हे युरपियन अद्वैतवादी तत्त्ववेत्ते होत.

ज्ञानमार्गांत श्रद्धामूलक स्वतंत्र मनोवृत्तीस मुळींच अवकाश नव्हता. ही उणीव दूर करण्यासाठीं **शांडिल्य व नारद** यांनीं निरनिराळीं सूत्रें लिहिलीं आहेत. ह्या भक्तिमार्गाचें पूर्ण स्वरूप कृष्णमुखानेंच प्रकट होणार असल्यामुळें त्याविषयीं मी येथें कांहीं लिहित नाहीं.

असो; इतक्या सामग्रीवर आतां आपण निरनिराळया मोक्षमार्गांच्या व त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या नीतिमार्गांच्या कृष्णकृत परीक्षणाकडे वळूं. अर्जुन हा कर्मवादी होता हें सांगावयास नकोच.

मोक्षमार्गांचें परीक्षण.

मोक्षाचे जे अनेक मार्ग भारतीयुगांत प्रचलित होते, त्यांपैकीं महत्वाच्या मार्गांचें श्रीकृष्णानें गीतेमध्यें परीक्षण करून त्या सर्वांची एकवाक्यता केली आहे व सर्व प्रकारच्या विचारी लोकांस मोक्ष मिळविण्याचा उत्कृष्ट मार्ग दाखवून दिला आहे. हा प्रकार कसा कसा झाला आहे तें आतां संक्षेपानें सांगतों. दुसऱ्या अध्यायामध्यें भगवंतांनीं सांख्यमताचें परीक्षण केलें आहे. पंचवीस तत्त्वांवर ही सर्व चराचर सृष्टि झाली आहे असें सांगणाऱ्या कपिलमहामुनींच्या मतास सांख्यमत असें म्हणतात. कोणी सम्यक् (चांगलें, खरें) ख्यायते (सांगितलें ज्यांत त्यास) सांख्य म्हणतात. असो; सांख्यमताप्रमाणें एकंदर २५ मूलतत्त्वें आहेत व यांपैकीं चोवीस तत्त्वें स्थिरचर व्यापून नित्य व निरामय असणाऱ्या (कारण येथें सत्त्वादि गुण समासमान असतात) प्रकृतिनामक अव्यक्तापासून उत्पन्न झालीं आहेत, अगर व्यक्तस्थितींत येऊन पोंहोचलीं आहेत. या प्रकृतीलाच वेदांती लोक माया

असें म्हणतात. सांख्यांच्या मताप्रमाणें प्रकृति हीच या विश्वाच्या उत्पत्तीचें, स्थितीचें व प्रलयाचें कारण असून सर्व जें काय स्थित्यंतर होत आहे ते प्रकृतीच्या सांमर्थ्यानें होत आहे. असो; आतां सांख्यांचीं चोविस तत्त्वें प्रकृतीपासून उत्पन्न झालीं आहेत तीं सांगतों. व्यक्त, (दृश्य जग) पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार (*consciousness* याला अहंप्रत्यय हा शब्द चांगला आहे, कारण अहंकार याचा हल्लीं सामान्येंकरूंन गर्व असा अर्थ होतो) पांच तन्मात्रा (गंध, रस, रूप, स्पर्श आणि शब्द यांस तन्मात्रा ह्मणतात) पंचमहाभूतें (पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें आहेत.) आणि पंचविसावें तत्त्व आत्मा हें होय. आत्मा स्वयंभू आहे. तो कांहीं करित नाहीं. आत्मा एकच नाहीं. ते अनंत आहेत, पण ते सर्व स्वयंभू आहेत. आत्मे नित्य आहेत. आत्म्यांचा व बुद्धीचा संयोग झाल्यामुळें व पुढें प्रकृतीच्या इतर तत्त्वांचाही संयोग झाल्यामुळें सुखदु:खादि सर्व भोग आत्म्यास भोगावें लागतात. या भोगांपासून सुटण्याचा उपाय एकच आहे तो हा कीं, कर्म करण्याचा त्याग करावयाचा. सत्त्व, रज आणि तम या गुणांनीं युक्त जें ‘ प्रकृति ’ नामक तत्त्व त्याच्या अखंड सामर्थ्यानें जें स्थित्यंतर होत असतें त्याचा, आत्मा हा साक्षी असून सुखदु:खांचें भोक्तृत्वही त्याच्याकडे आलें आहे. तें भोक्तृत्व सोडवून घ्यावयाचें ह्मणजे त्रिगुणात्मक प्रकृति आणि निर्विकार आत्मा यांचें ज्ञानेंद्रियांनीं पूर्ण ज्ञान करून घेऊन कर्म करण्याची इच्छा टाकावयाची; म्हणजे कर्म कमी होईल, पुनर्जन्मांची संख्या कमी होईल आणि शेवटीं शुद्ध आत्म्याची सुटका होऊन, तो अव्यक्तास जाऊन मिळेल. हा सांख्यमताचा व तद्गत नीतीचा त्रोटक सारांश आहे. श्रीकृष्णानीं सांख्यमतापैकीं एक दोन भाग गृहीत केले; ते असे कीं, उपाधींच्या योगानें कर्म उत्पन्न होतें व निरामय आत्म्यास जीवदशा प्राप्त होते. या दोन्हीं गोष्टी कबूल केल्या तरी एक गोष्ट भगवंतास संमत नाहीं; ते म्हणतात कीं मुक्त होण्यासाठीं आत्मा एकदम सांख्यांच्या अव्यक्ताकडे जातो हें खरें नाहीं. सांख्यांच्या अव्यक्ताकडे अगर वेदांत्यांच्या मताप्रमाणें परब्रम्हस्वरूपाकडे जाण्यास एकच मार्ग आहे आणि तो साध्य होण्यास ईश्वराच्या स्वरूपाची ओळखच करून घेतें पाहिजें;

नुसत्या अव्यक्तस्वरूपाचें यथार्थ ज्ञान सोपाधिक (उपाधिसहित असणाऱ्या) आत्म्यास होणें अत्यंत दुर्घट आहे. ह्मणून सांख्यमत जरी मोक्षाच्या मार्गाचें अवलंबन करितें, तरी तें निरीश्वर आहे व अशक्य आहे ह्मणून जीवास त्याचा फारसा उपयोग होत नाहीं; मात्र सांख्यमतानें प्रतिपादन केलेलें कर्म, त्यामुळें आलेली सोपाधिक स्थिति व जन्ममरणाचा फेरा, इतक्या गोष्टी खऱ्या आहेत, परंतु सांख्यमताचे उपाय साध्य नाहींत; व ह्मणून तें मत मुमुक्षूंनीं घेण्यासारखें नाहीं असें सर्वज्ञ व भगवान श्रीकृष्ण यांचें मत भगवद्गीतेंत प्रकट झालें आहे.

पुढें **तिसऱ्या अध्यायांत** श्रीकृष्णानीं कर्मयोगाचें परीक्षण केलें आहे. कर्मयोगी ह्मणजे कर्मानें आपलें इष्टकार्य सिद्ध होईल असें म्हणणारे तत्त्ववेत्ते ह्मणतात कीं, कर्माची उत्पत्ति उपाधींपासून झाली आहे हें खरें व जन्ममरणरूपी संसारामध्यें प्राणी पडतो तो कर्माच्या योगानें पडतो, हेंही खरें आहे. पण कर्माचा उगम व परिणाम वर सांगितल्याप्रमाणेंच आहेत, म्हणून कर्माचा त्याग करणें श्रेयस्कर होणार नाहीं. पहा कीं जर आपण कर्म अजीबातच टाकून दिलें तर आपली शरीरयात्रा चालणें दुर्घट होऊन आपल्यास उपाशी तरी मरावें लागेल अगर देहाचा अंत तरी जाणून बुजून करावा लागेल. शिवाय हस्तपादादिक कर्मेंद्रियांचें कर्म आपण तोडून टाकिलें तरी श्वासोच्छ्वास करणें, शरीरांत रुधिराभिसरण होणें, यदृच्छेनें मिळालेल्या अगर तोंडांत पडलेल्या अन्नाचें पचन होणें व निरुपयोगी झालेल्या पदार्थांचें शरीरांतून निःसारण करणें इत्यादि गोष्टी आपण जिवंत आहोंत, तोंपर्यंत आपण ' होऊं नका ' ह्मणून म्हटलें तरी चालणारच. आणखी समजा कीं आपण सर्व शारीरिक कर्मांचा त्याग केला आणि जिवंतही राहिलों तरी मनाची विचार करण्याची क्रिया चालणारच. मनाचा व बुद्धीचा धर्म, विचार करण्याचा आहे व या उभयतांनीं दृश्य जगाचा विचार बिलकूल करावयाचा नाहीं असा निश्चय केला तरी आत्मविचार सोडणें त्यांस अशक्य आहे. एतावता विचाररूपी कर्म होणारच. शिवाय कर्माचा त्याग केला म्हणजे चांगल्या वाईट कर्माचाही त्याग झालाच. यापासून काय निष्पन्न होतें तें पहा: अपकर्म होतें म्हणून हिंसा करावयाची नाहीं अगर कर्मच

करावयाचें नाहीं असें ठरविलें म्हणजे आईबापांचें, बायकामुलांचें, सारांश आपल्यावर अवलंबून असणाऱ्या जीवांचेंही पालनपोषण थकतें; म्हणजे त्यांची उपासमार होऊन ते मरतात! एतावता कर्मत्याग केला तरी आपल्या हातून कर्म झालेंच! तात्पर्य हें कीं जोंपर्यंत या शरीरांत जीव आहे व तो जीव समाजांत राहत आहे, तोंपर्यंत स्वतःसाठीं अगर इतरांसाठीं कर्म होणें चुकत नाहीं; म्हणून कर्म हें अवश्य आहे. आतां कोणतें कर्म विहित आहे, कोणतें निषिद्ध आहे, हें आपल्या स्वतःच्या विवेकबुद्धीनें, ईश्वरप्रेरित महापुरुषांनीं वेदशास्त्रांत जे नियम घालून दिले त्याच्या साहाय्यानें आणि ज्या समाजांत आपण राहतों, ज्या कालीं राहतों, त्या समाजाच्या अगर त्या कालाच्या देशस्थितिवर्तमानाप्रमाणें आपलें कर्म आपण ठरविलें पाहिजे; आणि जें सत्कर्म ठरेल त्याप्रमाणें आचरण ठेविलें पाहिजे. हें ठरवून आपण विवेकबुद्धीनें सदाचरण करूं लागलों म्हणजे सत्कर्मामुळें प्रसन्न होणारे देव आपल्यास साहाय्य करितात, सर्वत्र सुबत्ता असते व आपल्यास कर्मफलाप्रमाणें स्वर्गादि उत्कृष्ट लोकांमध्यें वास करावयास सांपडून अत्यंत सुख मिळतें. सारांश कर्म हें प्राण्याच्या पाठीमागें लागलेलें आहे; म्हणून कर्म करावयाचेंच तर तें सत्कर्म तरी असावें आणि या सत्कर्माच्या सामर्थ्यानें सुखप्राप्ति करून घ्यावी असें कर्मवादी लोकांचें म्हणणें आहे. श्रीकृष्ण म्हणतात कीं कर्म केलें पाहिजे; प्राण्याच्या मागचें कर्म सुटत नाहीं; लोकांपुढें उत्कृष्ट उदाहरण असावें म्हणून मला कर्म करण्याची अवश्यकता नसतांही मी कर्म करितों; मीच कर्म केलें नाहीं तर सर्व लोकांचा उच्छेद होईल; सारांश कर्म करणें आवश्यक आहे हें मला कबूल आहे. परंतु तुम्हीं कांहीं थोड्या कालपर्यंतच राहणाऱ्या इंद्र चंद्रादि देवतांवर मात्र विश्वास ठेवून त्यांस प्रिय होईल तेंच कर्म करितां, देवतांच्याही पलीकडे असणारा जो नित्य, निरामय, परमात्मा त्याकडे दृष्टि पोहोंचवीत नाहीं, यामुळें जन्ममरणाचा फेरा तुम्हांस चुकत नाहीं; सारांश तुम्ही मुक्त होत नाहीं ह्याचा विचार करा. कर्म करणें आवश्यक आहे. पण तें कर्म असें केलें पाहिजे कीं ज्याच्यायोगानें प्राण्याचें जन्ममरण चुकेल. फार काय सांगावें? ज्या देवतांचें तुम्ही यजन करितां त्या देवतांस सुद्धां जन्ममृ-

त्यूनें सोडिलें नाहीं; म्हणून त्यांचाही संसार सुटला नाहीं! संसार सुटावा, उपाधींपासून मुक्त व्हावें अशी जर तुमची इच्छा असेल तर त्या निर्विकार, निरंजन अशा परमात्मस्वरूपाचा जेणेंकरून लाभ होईल अशा तऱ्हेचें कर्म तुम्हांस निष्कामबुद्धीनें व फलाची आशा न धरितां केवळ कर्तव्य म्हणूनच केलें पाहिजे. सुख होवो वा दुःख होवो, आपलें कर्तव्य आपण निर्लोभ मनानें करावयाचें व तें कर्म परमेश्वरास अर्पण करावयाचें असा निग्रह केला तरच मोक्षाचा मार्ग सुलभ होईल. येथें खरा पुरुषार्थ कोणता व नीतीची दिशा कोणती, हें ठरविलें.

कर्मसंन्यासनामक मोक्षमार्गाचें परीक्षण करण्याचें फारसें कारण उरलें नाहीं. कारण कर्मयोग व सांख्ययोग (ज्ञानयोग) यांतच त्या मताचा निकाल झाला आहे व कर्मसंन्यास अगर कर्मत्याग अशक्य आहे असें ठरविलें आहे; म्हणून श्रीकृष्णानीं त्या मार्गाचा स्वतंत्र असा फारसा विचार केलेला भगवद्गीतेंत आढळत नाहीं.

सांख्यमत जोरावर झालें असें पाहून **जैमिन्यादि** कर्मयोग्यांनीं ज्ञानमार्गाचा आश्रय केला व वेदविहित व शास्त्रविहित जीं जीं कर्में आहेत, त्यांचें स्वरूप, त्यांचीं अंतःस्थ कारणें, त्यांच्या योगानें प्राण्यांच्या मनांवर होणारा सत्परिणाम, यांचा शोध करण्यास आरंभ केला. या मार्गाचे अनुयायांस **पूर्वमीमांसानुयायी** असें म्हणतात. वेदविहित कर्मांनीं चित्तशुद्धि होते, सबब तीं कर्में केलींच पाहिजेत व मुक्त होण्यासाठीं कर्मफलाची आशा टाकलीच पाहिजे; असें या ज्ञानकर्मयोगीसंन्याशांचें म्हणणें आहे. जप व तप इत्यादिकांचे साहाय्यानें व अनेक प्रकारचे ज्ञानपूर्वक अंतर्यज्ञ व प्राणयज्ञ यांच्या साहाय्यानें इष्टसिद्धि होईल असें हे लोक म्हणतात. या ज्ञानमार्गी कर्मिष्ठ लोकांच्या जिज्ञासेबद्दल श्रीकृष्ण भगवान त्यांची स्तुति करतात व त्यांस सांगतात कीं, केवळ जपतपांच्या मार्गें न लागतां व केवळ अंतःकरणांतील वृत्तीचा मात्र शोध करून तेथेंच न थांबतां, या लोकांनीं परमेश्वरापर्यंत पोहोंचण्याचा मार्ग शोधून काढावा. नुसत्या ज्ञानमार्गाच्या पाठीमागें लागलें तर ईश्वराचा शोध लागावयाचा नाहीं आणि तो शोध लागला असतां जें इंद्रियातीत ज्ञान मिळतें व जें अनिर्वाच्य सुख मिळतें, त्यांचाही बोध व अनुभव

संपादन होणार नाहीं. हल्लींच्या काळींही जे शास्त्री सृष्टीचें निरीक्षण करून भौतिकशास्त्रांतील सिद्धांतामध्यें भर घालीत आहेत व मानसिक-जगाचा शोध लावून मनाच्या अलौकिक शक्तींस सूर्यदर्शन देण्याच्या खटपटी करीत आहेत, सारांश, जे असल्या ज्ञानयोगाच्या अभ्यासांत निमग्न आहेत, त्यांनींही श्रीभगवंताच्या वाक्यापासून बोध घ्यावा आणि केवळ वरील शोधांवरच संतुष्ट न होतां परमेश्वराचें स्वरूप विचारानें तरी कळून येईल असें त्यांच्या श्रमांचें धोरण असावें; असें केलें तरच जन्माचें सार्थक्य होऊन अमरत्व प्राप्त होईल आणि मोक्षसिद्धि आपल्या घरीं चालत येईल.

योगाचा अभ्यास करून आपलें शरीर व आपलें मन आपल्या ताब्यांत आणिलें असतां कर्मयोगामध्यें ज्या अडचणी आल्या होत्या त्या नाहींशा होऊन सांख्ययोगाचा इष्टहेतु साध्य करितां येईल असें पातंजलमतानुयायी योगी लोकांचें म्हणणें आहे. प्राणायाम, समाधि, इत्यादिकांच्या योगानें मनाचें आकलन करितां येतें व पद्मासन, मयूरासन इत्यादि हठयोगांत निर्णीत केलेल्या शारीरिक तंत्रांच्या योगानें शरीरासह मन आपल्या स्वाधीन होतें; याप्रमाणें हठयोगानें व राजयोगानें शरीर व मन या दोहोंस आपल्या ताब्यांत आणल्यावर शरीरांत व मनांत गुप्त असलेले सर्व ज्ञानमार्ग आपल्यास अवगत होऊन सर्व कर्मांचा संन्यास करितां येतो असें योगशास्त्रांत सांगितलें आहे. श्रीकृष्ण म्हणतात कीं मोक्ष मिळण्यासाठीं या मार्गांत सांगितलेला मनोनिग्रह व प्राणायाम, समाधि वगैरेंचा अभ्यास, ह्या गोष्टी चांगल्या आहेत. तथापि अभ्यासयोग एकाच जन्मांत साध्य होणें कठिण आहे. शिवाय योगमार्गांत अनेक मोह व अनंत अडचणी येतात व येण्याचा संभव आहे. सबब श्रीकृष्ण म्हणतात कीं, समाधीमध्येंच परमेश्वराचें ध्यान भक्तिपूर्वक करितां यावें अशा तऱ्हेची योगमार्गानें सवड काढली तर एका जन्मांतच मोक्षाचा लाभ होण्याचा संभव आहे. शरीराचा मनावर व मनाचा शरीरावर जो परिणाम होतो तो परिणाम भगवंतास कबूल असून तो शोधून काढल्याबद्दल योगी लोकांची भगवंतानीं स्तुति केली आहे.

जातां जातां भगवंतानीं देहात्मवादी अगर नास्तिक लोकांच्या मतां-

थाही थोडक्यांत विचार करून मरण हाच मोक्ष नव्हे व सुख हाच पुरुषार्थ नव्हे, असें सांगितलें आहे.

याप्रमाणें त्या वेळीं प्रचलित असलेल्या श्रेष्ठ अशा मोक्षमार्गांचें निःपक्षपातबुद्धीनें परीक्षण करून सृष्टीच्या सुस्थितीसाठीं व सर्व प्राण्यांस मोक्ष मिळवितां यईल असा, एक उत्कृष्ट मार्ग कृष्णानीं प्रकट केला आहे. ह्या मार्गाचें स्पष्टीकरण करीत असतां वर जे कित्येक मार्ग सांगितले आहेत, त्यांत जेथें जेथें सत्याचा भाग दिसला, तो तो भाग आदरानें स्वीकारून उज्ज्वल आणि उदात्त अशा भक्तिमार्गाचें सातव्या तें बाराव्या अध्यायापर्यंत भगवंतानीं सुंदर विवरण केलें आहे. सांख्ययोगांत सांगितलेली प्रकृतिपुरुषाची जोडी श्रीभगवंतानीं घेतली आहे व दृश्य जगाचें अपूर्णत्व व क्षणभंगुरत्व आणि प्रकृतीचें व पुरुषाचें चिरस्थाईत्व ह्यांचा व निष्कामकर्माचा अंगीकार करून, ब्रह्मानुभव घ्यावयाचा असेल तर परमेश्वराचे मार्गानें गेलें पाहिजे असें सिद्ध केलें आहे. नंतर कर्म करणें अवश्य आहे असें गृहीत करून जें जें कर्म करावयाचें तें ईश्वरबुद्धीनें केलें पाहिजे असें ठरविलें. नंतर ज्ञानकर्मयोगांपैकीं चिकित्सामूलक आत्मशुद्धीचा अंगीकार करून तें ज्ञान परमेश्वराच्या चरणापर्यंत नेऊन पोहोंचवावें असें ठरविलें आहे. शेवटीं योगाभ्यासाला परमेश्वरदृष्टीचा मार्ग दाखवून त्यांत सांगितलेल्या मनोनिग्रहाचा व नित्याभ्यासाचा स्वीकार केला आहे. सारांश उपाधींच्या योगानें अवश्य झालेल्या कर्मांस परमेश्वरचरणीं अर्पण करावें आणि आपल्या ज्ञानशोधाची व समाधीची तंद्री परमेश्वरस्वरूप ओळखण्याकडे मात्र लावावी; आणि पुढें निरुपद्रवी झालेल्या उपाधींसहवर्तमान आत्म्याचें नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त असें जें स्वरूप तें ओळखून घेऊन उपासनेच्या साहाय्यानें परमेश्वराशीं एकवट होऊन जावें व शेवटीं परब्रह्मस्वरूपांत लीन होऊन प्राण्याचा मुख्य पुरुषार्थ जो मोक्ष त्याची प्राप्ति करून घ्यावी असा सरळ, सोपा व सुलभ मार्ग मनुष्यांस दाखवून दिला आहे. म्हणजे ज्ञानपूर्वक केलेलीं सर्व विहित कर्में परमेश्वराला समर्पण करून योगाभ्यासाच्या द्वारानें परमेश्वरचिंतन रात्रंदिवस चालू ठेवावयाचें हा भगवंताचा सोपा मार्ग आहे हें मुमुक्षूंस समजून येईलच. असो; हा मार्ग

विस्तारानें सातव्यां अध्यायापासून बाराव्या अध्यायापर्यंत सांगितला आहे. सातव्यामध्यें विज्ञानयोगाचें लक्षण सांगून परब्रह्माच्या पर व अपर अशा ज्या दोन प्रकृति त्यांचीं लक्षणें प्रतिपादित केलीं आहेत; आणि नंतर जगांत जेथें उत्कृष्टपणा दिसेल तेथें तेथें परमेश्वराची विभूति आहे असें कथन केलें आहे. ज्ञानीभक्तांच्या भक्तीचाही येथें निर्देश करून निरनिराळ्या सात्त्विक, राजस व तामस भक्तांस काय काय लाभ होतात त्यांचें वर्णन व ज्ञानपूर्वक केलेल्या मूर्तिपूजेचें मंडन याच अध्यायांत केलें आहे. आठव्या अध्यायांत भक्तीशीं योगाचा संयोग झाला असतां ती कशी फलप्रद होते, आणि मरणसमयीं मनाची व विचाराची स्थिति कशी असावी; यांचें वर्णन आहे. नवव्यामध्यें राजगुह्य योगाचा प्रस्ताव करून परब्रह्माच्या स्वरूपाचें, मायेच्या स्वरूपाचें व धर्माचें यथार्थ विवेचन केलें आहे, त्याचप्रमाणें परमेश्वराचें स्वरूपही या अध्यायांत सांगून त्याचें सर्वव्यापित्व कसें आहे ह्याचें प्रतिपादन केलें आहे; आणि शेवटीं भक्तिपुरःसर आणि ज्ञानपुरःसर सत्कर्म करणाऱ्या भक्तांस मुक्ति कशी मिळते याचेंही सुंदर वर्णन आहे. दाहाव्यामध्यें परमेश्वराच्या अनंत विभूतींचें दिग्दर्शन केलें आहे. अकराव्यामध्यें विश्वरूप दाखवून परमेश्वरानें अर्जुनास, दुर्योधनादि दुष्टांचा संहार त्यांच्या त्यांच्या दुर्वर्तनानें पूर्वीच कसा झाला होता, हें प्रत्यक्ष दाखविलें आहे. आणि बाराव्यामध्यें परब्रह्माची उपासना कठिण आहे, व परमेश्वराची उपासना सुसाध्य आहे, असा विषय आणून खऱ्या व निष्काम भक्तीचें माहात्म्य वर्णिलें आहे.

येथपर्यंत कोणत्या तत्त्वांच्या आधारावर मोक्षमार्गाची आंखणी होणें शक्य आहे असें सांगून नंतर श्रीकृष्ण भगवान मनुष्याचें वर्तन कसें असतें व तें कसें असावें याविषयीं विचार करितात. हा विचार कसा केला आहे तें आतां थोडक्यांत सांगतों. तेराव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत प्रकृति आणि पुरुष यांच्यामधील फरक; सत्त्व, रज, हा गुणत्रयींचें लक्षणांसह स्वरूपवर्णन; संसाराचें क्षणभंगुरत्व आणि परम पुरुषाचें महत्त्व; गुणत्रयीच्या कमी अधिक प्रमाणानें उत्पन्न होणारे निरनिराळे स्वभाव; श्रद्धा, आहारविहार, यज्ञ, दान इत्यादिकांचे सात्त्विक,

राजस व तामस असे निरनिराळे प्रकार; कर्मत्यागाचा निषेध; सात्त्विक, राजस व तामस कर्तव्यकर्मे; तीन प्रकारचीं ज्ञानें, बुद्धि आणि सुखें; आणि शेवटीं कर्तव्यकर्मापासून प्राप्त होणारा पुरुषार्थ; इत्यादि अनेक रमणीय व नीतिशिक्षक विषयांचा सयुक्तिक व समंजस असा ऊहापोह झाला आहे. आणि गीतेच्या शेवटीं निष्कामबुद्धीनें, एकनिष्ठेनें, ज्ञानपूर्वक आणि परमेश्वरास समर्पण करण्याच्या हेतूनें स्वतःस योग्य अशा स्वधर्माचें परिपालन केलें असतां कोणत्याही स्थितींतील सुज्ञ प्राणी ब्रह्मपदाला पोहोंचतो असा सिद्धांत सांगून विषयाची परिसमाप्ति केली आहे. अठराव्या अध्यायांत भगवान म्हणतात:—

' अर्जुना !

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।
मद्रूपीं मन मद्भक्त यजीं वंदी मलाच तूं। मातेंचि पावसी सत्य प्रतिज्ञा करितों सख्या॥

वामन पंडित '

हें वाक्य भगवद्गीतेच्या वाचकांनीं जर ज्ञानपूर्वक आणि भक्तिपूर्वक लक्षांत वागवून त्याप्रमाणें यथासांग आचरण केलें तर इहलोकींचे व परलोकींचे सर्व पुरुषार्थ साध्य होऊन अंतीं भगवान म्हणतात त्याप्रमाणें मोक्ष मिळेल यांत संदेह नाहीं.

याप्रमाणें मोक्षाचे निरनिराळे मार्गींची यथार्थता पाहून खरा मोक्षमार्ग कोणता व तो साध्य होण्यासाठीं आपल्यापाशीं जीं साधनें उपलब्ध आहेत त्यांचा उपयोग कसा करावयाचा, वगैरे महत्त्वाच्या गोष्टी भगवद्गीतेंत सांगितल्या आहेत इतकें झालें.

गीतेचें महत्त्व.

येथपर्यंत गीतेंत काय सांगितलें आहे याचा विचार झाला. गीता हा ग्रंथ केवळ तत्त्वज्ञानाचा मात्र नसून गीतेमध्यें मनुष्यानें हरएक प्रसंगीं कसें वागावें व वागण्याचे नियम कोणत्या तत्त्वांच्या आधारा र घालून ठेवावे याचा विचार सांगितला आहे, म्हणून या निरुपम ग्रंथास इतकें महत्त्व आलें आहे. ' ज्ञानाचें पर्यवसान मोक्ष ' असा हिंदुतत्त्ववेत्त्यांचा सिद्धांत आहे म्हणून कोणत्याही विषयाचा हिंदुलोक तात्त्विक व गंभीर दृष्टीनें विचार करूं लागले म्हणजे त्या विषयाच्या ज्ञानापासून

मनुष्याच्या पाठीशीं लागलेल्या उपाधिजन्य कर्मांचा विनियोग मोक्षप्राप्तीकडे कसा होईल हें बघण्याकडे त्यांचें लक्ष असतें. गीताशास्त्रांत ही, तत्त्वदृष्टीच्या द्वारानें मोक्षाचा विषय आला आहे म्हणूनच त्या भगवत्प्रणीत ग्रंथास इतकें महत्त्व आलें आहे. या विषयाचा ऊहापोह करण्याचा प्रसंग इतका मनोहर आहे; उपदेष्ट्याचें काम सर्व जगाचें कल्याण निष्कामबुद्धीनें करणाऱ्या परमेश्वरस्वरूपी श्रीकृष्णाकडे आल्यामुळें या ग्रंथाविषयीं इतकी श्रद्धायुक्त पूज्यबुद्धि होते, विषयाची मांडणी इतकी सुबोध झाली आहे, एकंदरीनें सर्वगुणसंपन्नत्व या ग्रंथाचे ठायीं इतकें परिपूर्ण रीतीनें भरलेलें आहे, कीं त्या वेळच्याचशा काय परंतु त्या कालानंतर उत्पन्न झालेल्या व होणाऱ्या सर्व लोकांस व विशेषतः सुविचारी तत्त्वज्ञांस या बिनमोल ग्रंथानें तल्लीन करून सोडलें आहे; व सोडीलही. हिंदुस्थानांत जे कांहीं अत्युत्कृष्ट ग्रंथ झाले त्यांतच तीन ग्रंथ पहिल्या पायरीचे आहेत अशी समजूत आहे **उपनिषदें, ब्रह्मसूत्रें** आणि **भगवद्गीता** हे ते तीन ग्रंथ होत. न्यायमूर्ती तेलंग यांचें असें म्हणणें आहे कीं हा ग्रंथ उपनिषत्कालींच किंवा थोडा आगेमागें असा झाला असावा. हें मत खरें किंवा तदितर आहे हें बघण्याचें हें स्थळ नव्हे. मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, अतिप्राचीनकाळापासून तों आजपर्यंत या ग्रंथाची महती अव्याहत चालत आलेली आहे. वर जी ग्रंथत्रयी सांगितली तीस **प्रस्थानत्रयी** म्हणतात. या प्रस्थानेत्रयीवर ज्यानें स्वतंत्र भाष्य लिहिलें त्यासच **आचार्य**त्वाची पदवी मिळत जावी असा पूर्वकाळीं संप्रदाय असे. या कारणानें **जगद्गुरु-शंकराचार्य**, विशिष्टाद्वैती **रामानुज**, द्वैतवादी **मध्व**, त्याप्रमाणें **वल्लभाचार्य** इत्यादि अनेक बुद्धिकुशल महापुरुषांनीं आपलें चातुर्यसर्वस्व ही प्रस्थानत्रयी स्पष्ट करण्यामध्यें खर्च केलें आहे. अलीकडेही **ज्ञानेश्वर** महाराजांनीं आपल्या प्रासादिक वाणीनें गीतारहस्याची फोड करून सांगितली आहे; महापंडित **वामन** यांनींही आपली भगवद्गीतेविषयींची प्रेमबुद्धि **यथार्थदीपिकेच्या** द्वारानें प्रकट केली आहे; भक्तिपंथाचे अध्वर्यू **तुकाराममहाराज,** कविवर्य **मोरोपंत** यांनींही गीतेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं अभंग व आर्या इत्यादि मनोहरवृत्तांनीं

महाराष्ट्रीय सरस्वती देवीस प्रेमानें आळविलें आहे; आणि दोहानामक मनोहरवृत्तामध्यें रामभक्त प्रसिद्ध **तुलसीदास** महाराजानीं गीतिच्याद्वारें हिंदुस्थानी भाषेस गौरव आणिलें आहे. असो; अगदीं अलीकडे रा. ब. **पाळंदे** वगैरे कवींनीं साकीवृत्तास गीतेच्या अर्थानें सुशोभित केलें आहे. सारांश ज्याला म्हणून बुद्धि आहे व त्या बुद्धीचा मुमुक्षु लोकांस उपयोग व्हावा अशी ज्याची इच्छा आहे त्यानें गीताग्रंथ स्पष्ट करण्याचा प्रयत्न अद्यापीही चालविला आहे. गुजराथेंतील प्रसिद्ध भाषाज्ञानी **द्विवेदी**—जे आपल्या राष्ट्राच्या नष्टचर्यामुळें नुकतेच कैलासवासी झाले—त्यानीं गीतेवर उत्कृष्ट पुस्तक गुजराथी भाषेंत लिहिलें आहे. तसेंच बंगाल्यांत, मद्रासेकडे, किती ग्रंथ झाले आहेत यांचा अंदाजही बरोबर करवत नाहीं. शिवाय **मधुसूदनी, शंकरानंदी, श्रीधरी, नीलकंठी, परमार्थप्रपा** इत्यादिकांचा मीं उल्लेख केला नाहींच आहे! आणि शेवटीं इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, इटालियन, ग्रीक व लॅटिन भाषांत या ग्रंथाचीं भाषांतरें झालीं आहेत त्या संबंधानेंही मीं येथें अवाक्षर काढीत नाहीं! तात्पर्य हें आहे कीं, हा ग्रंथ सर्व बुद्धिमान् पुरुषांच्या बुद्धीला विषयच होऊन बसला आहे. शिवाय आपल्या या लहानशा महाराष्ट्र देशांत गीतेचा पाठ भक्तिपुरःसर करणारे किती तरी भाविक लोक सांपडतील! शेवटीं सांगावयाचें हें कीं फार प्राचीन काळापासून सर्वांच्या भक्तीला व पूज्यतेला विषय होऊन बसलेला जो गीताग्रंथ त्याची जी ही इतकी महती झाली आहे ती या भगवत्प्रणीत ग्रंथांत अनंत काळपर्यंत अबाधितत्वानें अखंड राहणाऱ्या सत्य सिद्धांताचा व नीतिमीमांसेचा उत्कृष्ट विचार झाला आहे, म्हणूनच झाली आहे. हें तत्त्व जर निर्मळ मनाचे वाचकांस पूर्णपणें अवगत होईल व या ग्रंथाविषयीं ज्ञानपूर्वक भक्ति उत्पन्न होईल तर वरील त्रोटक विवेचनाचें सार्थक्य झालें असें मी समजेन.

प्रस्तुत प्रयत्नाचा उद्देश.

असल्या सर्वतोपरी महत्त्वाच्या ग्रंथाचें व त्यावरील अद्वैतमत प्रतिपादक शांकरभाष्याचें यथामति भाषांतर करून हा ग्रंथ लिहितां वाचतां येणाऱ्या सर्व महाराष्ट्रीय मुमुक्षूंच्या हातीं पडावा या इच्छेनें मीं हें महत्प्रया-

साचें, परंतु मनास आनंद देणारें काम पत्करिलें आहे. हें काम पत्करण्याचा उद्देश काय हें थोडक्यांत सांगतों. कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें याविषयीं सद्यःकाळीं सर्वत्र घोंटाळा झालेला दिसत आहे. पूर्वीं जीं कर्तव्यें म्हणून मानलीं जात असत त्यांच्याविषयीं अनेक कारणांनीं अश्रद्धा उत्पन्न होऊन अमुक गोष्ट कां करावी व अमुक गोष्ट कां करूं नये याबद्दल प्रत्येक समंजस मनुष्य आपल्या मनाशीं व इतर लोकांबरोबर वादविवाद करण्यास सिद्ध झाला आहे. पूर्वसंस्कारांच्या योगानें कांहीं गोष्टी जरी तो हौसेनें करितो, कांहीं राजभयास्तव व लोकभयास्तव करितो, तथापि त्या त्या कर्तव्याचें स्वरूप, गुणधर्म व उत्पत्तिमीमांसा न कळल्यामुळें केवळ समाजाचा क्षोभ होऊं नये म्हणून तो समाजप्रणीत कर्तव्यें करितोसा दिसतो; म्हणजे त्याचें आचरण सामान्यतः समाजास क्षोभ उत्पन्न होईल असें बाह्यतः तरी नसतें. पण अंतर्यामामध्यें प्रत्येक विचारी मनुष्याचा घोंटाळा होऊन गेलेला आहे; कोणता पुरुषार्थ साध्य करावयाचा त्याचा निश्चय न झाल्यामुळें मनास एक करावेसें वाटत आहे व समाज अन्य मार्गानें जा म्हणून सांगत आहे. शिवाय कांहीं कारणामुळें पण विशेषतः हिंदुधर्माचें व हिंदु तत्त्वज्ञानाचें पूर्ण अज्ञान उत्पन्न झालें असल्यामुळें व मनामध्यें त्यांवर अश्रद्धा उत्पन्न झाल्यामुळें आर्यकालीन लोकांच्या समूहास जें समाजाचें संघटित स्वरूप प्राप्त झालें होतें, तें आजमित्तीस प्रायः नाहींसें होऊन—निदान समाजस्वरूप लुप्त तरी होऊन—बसलेलें आहे. हल्लींच्या जमावांत प्रत्येक व्यक्ति मानसिकरीत्या निरनिराळी झाली असून ती ती व्यक्ति आपल्या मात्र सुखाच्या पाठीमागें लागलेली दिसते. समाजाच्या विरुद्ध कोणी फारसें जात नाहीं, याचें कारण फक्त जमावांतील अनेक व्यक्तींची भीति हें होय. खरी निष्कपट प्रीति आज हिंदुसमाजांत वास्तव्य करीत आहे असें दिसत नाहीं. दुसऱ्याचें नुकसान बिनबोभाट करितां येईल तर आपल्या फायद्यासाठीं—आपल्या मनाच्या तरी, समाधानासाठीं—तें करण्यास आज किती लोक तयार होतील याचा अंदाज सुद्धां करवत नाहीं! आपण आपला धर्म पाळतोंसें दिसतें, आपण पूर्वजांविषयीं केव्हां केव्हां अभिमान प्रकट करितोंसेंही दिसतें,

तें दैवावर अगर पूर्वजांवर अतिरिक्त भक्ति आहे म्हणून नव्हे, तर ती भक्ति जिव्हेनें प्रकट केली असतां सद्यःकालीं आपल्यास कोणता फायदा होईल या धोरणावर सामान्यतः प्रकट केली जात आहे!

वर केलेलीं विधानें सर्वांशीं खरीं आहेत असें मी म्हणत नाहीं. पण लिहिण्यास दुःख वाटतें कीं, हीं विधानें सामान्यतः खरीं आहेत, असें म्हणण्याचा अप्रिय प्रसंग माझ्यावर येऊन पडला आहे. • दुःखांत सुख इतकेंच आहे कीं, हिंदुजातीच्या जीवज्योतीचा उगम उत्तम पायावर स्थापित झाला असल्यानें ती जाति कधीं नाहींशी होईल अशी शंका-सुद्धां येत नाहीं. हें विधान अवास्तव नाहीं; याचें प्रत्यंतर पहावयाचें झाल्यास हल्लींच्या सर्वतोपरी दीन झालेल्या स्थितींत सुद्धां कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें ह्याबद्दल प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक रणांगणावर जें प्रखर युद्ध चाललें आहे तेंच होय. आज या युद्धाला कोठें आरंभमात्र झाला आहे. आणि अशी आशा करण्यास सबळ कारणें आहेत कीं जसजसा ज्ञानाचा प्रकाश विशेष फांकत जाईल तसतशी कर्तव्यसीमा वाढत जाऊन पुरुषार्थस्वरूप यथास्थित कळूं लागेल, व निष्कामबुद्धीनें सात्त्विक कर्तव्य करण्याविषयीं उत्साह उत्पन्न होईल; हल्लींच्या-ह्यावास समाजस्वरूप येऊन सर्व व्यक्ति प्रेमाकर्षणानें बद्ध होऊन जातील, आणि शेवटीं आमची जाति सुरक्षित ठेवून तिचे हातून विश्वाच्या उद्धाराचें महत्कार्य घडून यावयाचें आहे तेंही सफल होईल. ही आशा सृष्टिक्रमावरून उघड रीतीनें दिसून येणाऱ्या ईश्वरी संकेतानुरूप आहे असें मला वाटतें. ‘ इहलोकीं मनुष्यानें कोणता पुरुषार्थ साध्य करावयाचा, तो साध्य करण्याची सर्वांस सुलभ सुसाध्य अशी नीति कोणती व हीच नीति सर्वांत श्रेष्ठ कां आहे. ? ’ इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या विषयांचा या ईशप्रणीत ग्रंथांत सोपपत्तिक विचार आहे; म्हणून या ग्रंथाचें रहस्य, या ग्रंथाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं अनेक बुद्धिमान महापुरुषांनीं केलेलीं भाष्यें व टीका आणि या ग्रंथांतील सिद्धांतांस इतर देशांतील कांहीं महापुरुषांच्या विचारांचा पुरावा, इत्यादि विषय प्रस्तुतच्या मासिक पुस्तकांत आणावे आणि खऱ्या पुरुषार्थाचें स्वरूप ठरवून व कर्तव्यबुद्धि जागृत करून तीं निश्चित व दृढ करावी या उद्देशानें

मीं हा प्रयत्न करण्याचा संकल्प केला आहे. ' आपण कोण, आपण आलों कोठून, आपल्या सभोंवतीं दिसतें हें काय आहे आणि आपल्यास जावयाचें कोठें ?' इत्यादि अनेक गूढ प्रश्न प्रत्येक विचारी मनुष्याच्या मनांत घोळत असतात. ह्या प्रश्नांस सयुक्तिक व समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं तर त्या मनुष्याची रात्रंदिवस तळमळ होत असतें. ' कैस्त्वं ' (तूं कोण ?) ' कुत आयातः ' (कोठून आलास ?) *whence oh whither* (कोठून आलों आणि कोठें जावयाचें ?) ह्या प्रश्नांस जर हल्लींच्या माझ्या प्रयत्नानें कांहीं सयुक्तिक उत्तर मिळेल तर मनाची वरील तळमळ नाहींशीं होऊन गाढ निद्रेमध्यें घोरत पडलेली आपली कर्तव्यबुद्धि जागृत होईल असें मला वाटत आहे; म्हणून या कष्टमय दुस्तर महासागरामध्यें परमेश्वराच्या दयाळुत्वावर पूर्ण भरंवसा ठेवून मीं उडी घातली आहे; आणि फलाची विशेषशी अपेक्षा न ठेवतां केवळ आपलें कर्तव्य म्हणून ही गोष्ट आपल्या अल्पमतीनें साध्य करावयाची खटपट चालविली आहे. असो; ज्या परमेश्वरानें केवळ इच्छामात्रेंकरून हें अखिल जग निर्माण केलें व कांहीं प्रयोजन नसतांहीं जो या जगाची सुस्थिति असावी म्हणून मुमुक्षुजीवांस अनेक प्रकारें साहाय्य करित आहे असें स्पष्ट दिसतें, त्या सर्वज्ञ प्रभूच्या कृपाळुत्वावर समग्र भिस्त ठेवून व त्याचें अनन्यभावानें स्मरण करून मी आपलें कर्तव्य करावयास लागतों.

चिं. गं. भानु.

या पुस्तकांतील व्यवस्थेचें स्पष्टीकरण.

प्रसिद्ध केल्याप्रमाणें, मूळश्लोक, व अन्वयसुद्धां पदांचा अर्थ हें प्रथमतः देण्याचें योजिलें आहे व अर्थ लवकर लक्ष्यांत यावा म्हणून शब्दार्थांच्या भोंवतीं कंस घालून अर्थ निराळ्या पद्धतीनें छापला आहे. तसेंच जेथें शब्दार्थ देऊनही अर्थ लवकर लक्ष्यांत येणार नाहीं असें मला वाटलें तेथें सारांश दिला आहे. शंकराचार्यांचें समग्र भाष्य संस्कृतांत देण्याविषयीं बरेच लोकांच्या सूचना आल्या त्यांस मान देऊन तेंही देण्याचें योजिलें आहे, आणि पुढें होता होईल तितका शब्दशः अर्थ सरळ भाषेंत देण्याची योजना केली आहे. जेथें असें करूनही अर्थ स्पष्ट न होईल असें वाटलें, तेथें—असे डॅश किंवा ( ) कंस घालून आचार्यांचा अर्थ स्पष्ट करण्याची खटपट केली आहे. नंतर **रामानुजाचार्य, मध्वाचार्य** इ० मतांतरें प्रकट करणाऱ्या महापुरुषांचे अभिप्राय अवश्य ठिकाणीं द्यावयाचे व त्यानंतर इंग्लिश ग्रंथांतरीं असलेले दाखले मराठींत त्या त्या ग्रंथकारांचा नामनिर्देश करून द्यावयाचे व श्लोकाची परिसमाप्ति करावयाची अशी एकंदरीनें योजना केली आहे. इतकी योजना केली तरी कांहीं स्थळें दुर्बोध राहतील अशी शंका व भीति 'भ्रांति धर्म मनाचा' या न्यायानें उत्पन्न होतातच; म्हणून समंजस मुमुक्षुवाचकांस प्रांजल बुद्धीनें अशी एकवार विनंति करून ठेवितों कीं असा एकादा घोंटाळा क्वचित् उत्पन्न झाल्यास त्यांनीं ताबडतोब कळविण्याची कृपा करावी; म्हणजे पुढील अंकांत स्पष्टीकरण येऊन एकंदर विषयाची उत्तम व्यवस्था लागेल. पूर्ण ज्ञानाच्या अभावानें किंवा नजरचुकीनें दोषरूपी चोर कधीं कधीं आंत शिरणारच; तेव्हां त्यांचाही समाचार ग्रंथ पुरा होण्याच्या आधीं घेतां यावा म्हणूनच मासिकपुस्तकाची योजना केली आहे. असो; समग्र ग्रंथ तीन वर्षांत पुरा होईल, असा आजचा अदमास आहे. मग निदानीं काय होणार असेल तें एका सर्वज्ञ परमेश्वरास मात्र ठाऊक !

तारीख ९ नोव्हेंबर १८९८.
४३४ शनवार पेठ, पुणें. — चिं. गं. भानु.

गीताशास्त्रांतील

श्रीकृष्णमुखोद्गत

सिद्धांतभूतश्लोक.

माझे चुलत बंधु ती० रावसाहेब भानु मिरजकर यांनीं सिद्धांतभूत ह्मणून कांहीं श्लोक मजकडे पाठवून दिल्यास बरेच दिवस झाले. हे एकंदर ७९ श्लोक आहेत, ते सर्व येथें प्रसिद्ध करितों. आतां हे श्लोक सिद्धांतभूत आहेत कीं नाहींत, याचा विचार शेवटच्या अध्यायाच्या उपसंहाराचे वेळीं करूं. आकर (?) नामक ग्रंथांत हे श्लोक आहेत. मला हा ग्रंथ पाहण्यास मिळाला नाहीं; म्हणून विनंति करून ठेवितों कीं या पुस्तकाच्या वाचकांपैकीं कोणा दैववान् गीताभक्तास हा ग्रंथ उपलब्ध होऊन तो त्यांनीं मजकडे पाठविल्यास अगर मला कळविल्यास पुष्कळ उपकार होतील. इतका प्रस्ताव करून हे उपलब्ध झालेले श्लोक व अग्निपुराणांतील गीतासाराध्याय प्रकट करतों.

अध्याय दुसरा.

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥
अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्तिपण्डिताः ॥ ११ ॥
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥
अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥
य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥१९॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽय सनातनः ॥ २४ ॥
अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥
अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥
आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित् ॥
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवाऽऽत्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥
या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ६९

अध्याय तिसरा.

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेण योगिनाम् ॥ ३ ॥
मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥
काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।
महाशनो महापाप्मा विद्धयेनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

अध्याय चवथा.

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥
बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥
अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥
न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्धयते ॥ १४ ॥
कर्मण्यकर्म यः पश्येदकर्माणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

अध्याय पांचवा.

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥
न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

अध्याय सहावा.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥
योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥
यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ १९ ॥
सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्रसमदर्शनः ॥ २९ ॥
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥
असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥
पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

अध्याय सातवा.

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ १४ ॥
अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥

अध्याय आठवा.

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥
अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥
अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥
सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥
परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥
पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

अध्याय नववा.

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥
न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥
अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥

अध्याय दहावा.

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥
यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

अहमात्मा गुडाकेश: सर्वभूताशयस्थित: ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥ २० ॥

अध्याय अकरावा.

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रश: ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥
इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥
कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्त:
ऋतेऽपित्वानभविष्यन्तिसर्वेयेऽवास्थिता:प्रत्यनीकेषुयोधा:
सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिण: ॥ ५२ ॥

अध्याय बारावा.

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मता: ॥ २ ॥
ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥
क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दु:खं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

अध्याय तेरावा.

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद: ॥ १ ॥
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥
प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥
समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं य: पश्यति स पश्यति ॥ २७ ॥
अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्माऽयमव्यय: ।
शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

अध्याय चवदावा.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥
नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥
प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥ २२ ॥

अध्याय पंधरावा.

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययं ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥
न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥
ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥
यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥
द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

अध्याय सोळावा.

दैवीसंपद्विमोक्षाय निबन्धायाऽऽसुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥
यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥

अध्याय सतरावा.

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

अध्याय अठरावा.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥
यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबद्ध्यते ॥ १७ ॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥
विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ६६ ॥

श्रीगणेशाय नमः

अग्निपुराणान्तर्गत

गीतासार.

अग्निपुराणामध्यें गीतासार दिलें आहे त्याचा उतारा येथें घेतला आहे.

गीतासारं प्रवक्ष्यामि सर्वगीतोत्तमोत्तमम् ।
कृष्णो यमर्जुनायाऽऽह पुरा वै भुक्तिमुक्तिदम् ॥ १ ॥
गतासुरगतासुर्वा न शोच्यो देहवानजः ।
आत्माऽजरोऽमरोऽभेद्यस्तस्माच्छोकादिकं त्यजेत् २
ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
सङ्गात्कामस्ततः क्रोधः क्रोधात्संमोह एव च ॥ ३ ॥
संमोहात्स्मृतिविभ्रंशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।
दुःसङ्गहानिः सत्सङ्गान्मोक्षकामी च कामनुत् ॥ ४ ॥
कामत्यागादात्मनिष्ठः स्थिरप्रज्ञस्तदोच्यते ।
या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ॥ ५ ॥
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ ६ ॥
नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ॥ ७ ॥
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यति ॥ ८ ॥
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ॥९॥

लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।
सर्वभूतेषु चाऽऽत्मानं सर्वभूतानि चाऽऽत्मनि १०॥
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्रसमदर्शनः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ११ ॥
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ॥ १२ ॥
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १३ ॥
चतुर्विधा भजन्ते मां ज्ञानी चैकत्वमास्थितः ।
अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥ १४ ॥
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ।
अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ॥ १५ ॥
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ।
अन्तकाले स्मरन्मां च मद्भावं यात्यसंशयः ॥ १६ ॥
यं यं भावं स्मरन्नन्ते त्यजेद्देहं तमाप्नुयात् ।
प्राणं न्यस्य भ्रुवोर्मध्ये अन्ते प्राप्नोति मत्परम् ॥ १७॥
ओमित्येकाक्षरं ब्रह्म वदन्देहं त्यजंस्तथा ।
ब्रह्मादिस्तम्बपर्यन्ताः सर्वा मम विभूतयः ॥ १८ ॥
श्रीमन्तश्चोर्जिताः सर्वे ममांशः प्राणिनः स्मृताः ।
अहमेको विश्वरूप इति ज्ञात्वा विमुच्यते ॥ १९ ॥
क्षेत्रं शरीरं यो वेत्ति क्षेत्रज्ञः स प्रकीर्तितः ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २० ॥
महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥ २१ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ २२ ॥
अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ २३ ॥
इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ २४ ॥
आसक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ २५ ॥
मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ २६ ॥

अध्यात्मज्ञाननिष्ठत्वं तत्त्वज्ञानानुदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ २७ ॥
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादि परमं ब्रह्म सत्त्वं नाम तदुच्यते ॥ २८ ॥
सर्वतःपाणिपदं तत्सर्वतोक्षिशिरोमुखम् ।
सर्वतश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ २९ ॥
सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ ३० ॥
बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिकेऽपि यत् ॥ ३१ ॥
अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तृ च विधेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ ३२ ॥
ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञायं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य संस्थितम् ॥ ३३ ॥
ध्यानेनाऽऽत्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेण चापरे ॥ ३४ ॥
अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते ।
तेऽपि चाऽऽशु तरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ ३५ ॥
सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ ३६ ॥
गुणा वर्तन्त इत्येवं योऽवतिष्ठति नेङ्गते ।
मानावमानमित्रारितुल्यस्त्यागी स निर्गुणः ॥ ३७ ॥
ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ ३८ ॥
द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
अहिंसादिः क्षमा चैव दैवी संपत्ततो नृणाम् ॥ ३९ ॥
न शौचं नापि वाऽऽचारो ह्यासुरी संपदोद्भवः ।
नरकत्वात्क्रोधलोभकामांस्तस्मात्त्रयं त्यजेत् ॥४०॥
यज्ञस्तपस्तथा दानं सत्त्वाद्यैस्त्रिविधं स्मृतम् ।
आयुः सत्त्वं बलारोग्यसुखायान्नं तु सात्त्विकम् ॥ ४१ ॥
दुःखशोकामयायान्नं तीक्ष्णरूक्षं तु राजसम् ।
अमेध्योच्छिष्टपूत्यन्नं तामसं नीरसादिकम् ॥ ४२ ॥

यष्टव्यो विधिना यज्ञो निष्कामाय स सात्त्विकः ।
यज्ञः फलाय दम्भाय राजसस्तामसः क्रतुः ॥ ४३ ॥
श्रद्धामन्त्रादिविध्युक्तं तपः शारीरमुच्यते ।
देवादिपूजाऽहिंसादि वाङ्मयं तप उच्यते ॥ ४४ ॥
अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं वाध्यायसञ्जपः
मानसं चित्तसंशुद्धिमौनमात्मविनिग्रहः ॥ ४५ ॥
सात्त्विकं च तपोऽकामं फलाद्यर्थं तु राजसम् ।
तामसं परपीडायै सात्त्विकं दानमुच्यते ॥ ४६ ॥
देशादौ चैव दातव्यमुपकाराय राजसम् ।
अदेशादावज्ञातं तामसं दानमीरितम् ॥ ४७ ॥
ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
यज्ञदानादिकं कर्म भुक्तिमुक्तिप्रदं नृणाम् ॥ ४८ ॥
अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ४९ ॥
तामसः कर्मसंयोगान्मोहात्क्लेशभयादिकात् ।
राजसः सात्त्विकोऽकामात्पञ्चैते कर्महेतवः ॥ ५० ॥
अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
त्रिविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥ ५१ ॥
एकं ज्ञानं सात्त्विकं स्यात्पृथग्ज्ञानं तु राजसम् ।
अतत्त्वार्थं तामसं स्यात्कर्माकामाय सात्त्विकम् ॥ ५२ ॥
कामाय राजसं कर्म मोहात्कर्म तु तामसम् ।
सिद्ध्यासिद्ध्योः समः कर्ता सात्त्विको राजसो ह्यपि ५३
शठोऽलसस्तामसः स्यात्कार्यादिधीश्च सात्त्विकी ।
कार्यार्थं सा राजसी स्याद्विपरिता तु तामसी । [illegible] ॥
मनोधृतिः सात्त्विकी स्यात्प्रीतिकामेति राजसी ।
तामसी तु प्रशोकादौ सुखं सत्त्वात्तदन्तगम् ॥ ५५ ॥
सुखं तद्राजसं चाग्रे अन्ते दुःखं तु तामसम् ।
अतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ॥ ५६ ॥
स्वकर्मणा तमभ्यर्च्य विष्णुं सिद्धिं च विन्दति ।
कर्मणा मनसा वाचा सर्वावस्थासु सर्वदा ॥ ५७ ॥
ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तं जगद्विष्णुं च वेत्ति यः ।
सिद्धिमाप्नोति भगवद्भक्तो भागवतो ध्रुवम् ॥ ५८ ॥

भगवद्गीतेतील

श्रीकृष्णमुखोद्गत

सिद्धांतभूतश्लोक,

व

अग्निपुराणांतील

गीतासार.

श्रीगणेशाय नमः ॥

श्रीमद्भगवद्गीता.

आचार्यांचा उपोद्घात.

श्रीवासुदेवाय नमः

श्रीवासुदेवास नमस्कार असो.

ॐनारायणः परोऽव्यक्तादण्डमव्यक्तसंभवम् ॥
अण्डस्यान्तस्त्विमे लोकाः सप्तद्वीपा च मेदिनी ॥ १ ॥

श्रीपरब्रह्म नारायण जो आहे तो अव्यक्ताच्या (स्पष्ट न झालेले विश्वाचें आदि*तत्त्व; यालाच कोणी माया ह्मणतात.) पलीकडचा आहे. अव्यक्ताहून नारायण श्रेष्ठ आहे. तें एकच तत्त्व सर्व विश्व भरून राहिलेलें आहे. त्या अव्यक्तापासून हिरण्यगर्भ नांवाचें अंड (ब्रह्मांड) उत्पन्न झालें. या अंडामध्येंच सप्तस्वर्ग, सप्तपातालें व जिच्यावर जंबू आदिकरून सात द्वीपें आहेत अशी पृथ्वी, हीं उत्पन्न झालीं—सारांश सर्व ब्रह्मांडाचा उत्पादक व नायक श्रीनारायण त्याचें स्मरण करून आचार्यांनीं हें मंगलाचरण केलें आहे. मंगलाचरण केलें असतां सर्व विघ्नांचा निरास होऊन शास्त्रोक्त अशा इष्ट कार्याची सिद्धि होते.—

स भगवान्सृष्ट्वेदं जगत्तस्य च स्थितिं चिकीर्षुर्मरीच्यादीनग्रे सृष्ट्वा प्रजापतीन्प्रवृत्तिलक्षणं धर्मं ग्राहयामास वेदोक्तम् । ततोऽन्यांश्च सनकसनन्दनादीनुत्पाद्य निवृत्तिलक्षणं धर्मं ज्ञानवैराग्यलक्षणं ग्राहयामास ।

---

* *Homogeneous matter*

त्या भगवंतानें हें अखिलब्रह्मांड उत्पन्न केलें. नंतर ह्या ब्रह्मांडाची व्यवस्था चांगल्या प्रकारची राहावी या हेतूनें प्रथमतः **मरीच्यादिक** प्रजापती उत्पन्न करून त्यांस वेदप्रणीत प्रवृत्तिधर्माची (कर्ममार्गाची) दीक्षा दिली. आणि कर्ममार्ग पृथ्वीपर सुरू करावा अशी आज्ञा केली. नंतर दुसरें **सनकसनंदनादिकांस** उत्पन्न करून त्यांस निवृत्तिमार्गाचा (ज्ञानमार्गाचा, आत्मानात्मविचार करितां येतो अशा अध्यात्मज्ञानाच्या धर्माचा) उपदेश केला. आत्मस्वरूपाचें ज्ञान होणें आणि इच्छाजन्य कर्मापासून मागें फिरणें अशीं या निवृत्तिधर्माचीं लक्षणें आहेत.—हा वैराग्य उत्पन्न करणारा ज्ञानमार्ग शिकवून परमेश्वरानें सनकादिकांच्या करवीं निवृत्तिपंथ पृथ्वीवर सुरू करविला.

द्विविधो हि वेदोक्तो धर्मः। प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च। जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुर्यः स धर्मो ब्राह्मणाद्यैर्वर्णिभिराश्रमिभिश्च श्रेयोर्थिभीरनुष्ठीयमानः। दीर्घेण कालेनानुष्ठातृणां कामोद्भवाद्धीयमानविवेकविज्ञानहेतुकेनाधर्मेणाभिभूयमाने धर्मे प्रवर्धमाने चाधर्मे जगतः स्थितिं परिपिपालयिषुः स आदिकर्ता नारायणाख्यो विष्णुर्भौमस्य ब्रह्मणो ब्राह्मणत्वस्य रक्षणार्थं देवक्यां वसुदेवादंशेन किल संबभूव। ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्याद्वैदिको धर्मस्तदधीनत्वाद्वर्णाश्रमभेदानाम्।

वेदामध्यें दोन प्रकारचा धर्म सांगितला आहे. एक प्रवृत्तिमार्ग व दुसरा निवृत्तिमार्ग; (म्हणजे कर्ममार्ग पहिला व ज्ञानमार्ग दुसरा असे दोन प्रकारचे धर्म वेदानें प्रणीत केले आहेत, किंवा सांगितले आहेत.) —आतां धर्म म्हणजे काय याचें आचार्य उत्तर सांगतात.—जगाची व्यवस्था जेणेंकरून उत्तमप्रकारची चालते व ज्याच्या योगानें प्राण्यांस उत्तमप्रकारचें साक्षात् सुख मिळून शेवटीं मोक्ष मिळतो तो धर्म होय. या धर्माचें परिपालन कल्याणेच्छु ब्राह्मणादि चारही वर्णीनीं व ब्रह्मचारी गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या चारही आश्रमांतील लोकांनीं

चालविलें होतें. परंतु पुष्कळ काळ लोटल्यानंतर वर्णाश्रमांतील लोकां-मध्यें कामविकार अगर स्वार्थाची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें त्यांची विचारशक्ति व अनुभवज्ञान हीं दोन्हीं कमी कमी होत जाऊन अज्ञानानें धर्माचा ऱ्हास होत चालला व अधर्माचा प्रसार होऊं लागला. ही स्थिति पाहून जगाची स्थिति व पोषण हीं दोन्ही उत्तम असावीं अशी इच्छा सदोदित बाळगणाऱ्या व सर्वांचें आदिकारण असणाऱ्या जगन्नायकनारायणाला अवतार घ्यावा अशी इच्छा झाली. आणि त्या नारायण नामक विष्णूनें वसुदेवापासून देवकीच्या उदरांत जन्म घेतला. हा अवतार नारायणाच्या एका अंशानें मात्र झाला. अवतार घेण्याचें कारण वर सांगितलेंच आहे कीं मोठ्या व अतिविस्तृत ब्रह्माचें म्हणजे ब्राह्मणत्वाचें रक्षण करण्यासाठीं परमेश्वरानें जन्म घेतला. ब्राह्मणत्वाचें रक्षण केलें म्हणजे अर्थातच दोन्ही प्रकारच्या वेदप्रणीतधर्मींचें रक्षण केल्यासारखें होतें. ब्राह्मणत्वामध्येंच सर्व वर्णांच्या व आश्रमांच्या धर्माचा अंतर्भाव होत असतो व त्याच्या स्वाधीनच वर्णाश्रम असतात म्हणून ब्राह्मणत्वाचें रक्षण करण्याविषयीं परमेश्वराचा संकल्प झाला.

स च भगवाञ्ज्ञानैश्वर्यशक्तिबलवीर्यतेजोभिः सदा संपन्नस्त्रिगुणात्मिकां वैष्णवीं स्वां मायां मूलप्रकृतिं वशीकृत्याजोऽव्ययो भूतानामीश्वरो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावोऽपि सन्स्वमायया देहवानिव जात इव लोकानुग्रहं कुर्वन्निव लक्ष्यते । स्वप्रयोजनाभावेऽपि भूतानुजिघृक्षया वैदिकं हि धर्मद्वयमर्जुनाय शोकमोहमहोदधौ निमग्नायोपदिदेश । गुणाधिकैर्हि गृहीतोऽनुष्ठीयमानश्च धर्मः प्रचयं गमिष्यतीति। तं धर्मं भगवता यथोपदिष्टं वेदव्यासः सर्वज्ञो भगवान्गीताख्यैः सप्तभिः श्लोकशतैरुपनिबबन्ध ।

जो सदासर्वदा, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ति बळ, तेज व वीर्य या सहा गुणांनीं ओतप्रोत भरलेला आहे, त्या भगवंतानें आपल्या स्वाधीन असणारी जी मूळप्रकृति (इलाच आदिमाया म्हणतात) तिला वश करून घेतलें. ही माया त्रिगुणात्मक म्हणजे सत्त्व, रज व तम या तिन्ही गुणांनीं भरलेली आहे, ह्याप्रमाणें त्रिगुणात्मक आदिमायेला वश

करून घेऊन परब्रह्म भगवान मनुष्याप्रमाणें देह धारण केल्यासारखें दाखवून व जन्म घेतल्यासारखें करून लोकांवर अनुग्रह करण्याचीं कृत्यें केल्यासारखें दाखविते झाले ! असें ह्मणण्याचें कारण उघड आहे. पहा; ज्याला जन्म नाहीं, मरण नाहीं, जो सर्वांचा कर्ता व करविता, जो नित्य, शुद्ध, बुद्ध, आणि मुक्त आहे; म्हणजे जो सर्वकाल राहणारा आहे, जो सर्वज्ञ आहे, जो स्फटिकासारखा निर्मळ आहे व निर्लेप आहे आणि जो सदाच मुक्त आहे, व पुनः षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा भगवंतानें जन्म घेऊन व देह धारण करून लोकांवर अनुग्रह करावा, वगैरे गोष्टी संभवत नाहींत. म्हणून मायेच्या साहाय्यानें देह धारण केल्यासारखें करून वगैरे म्हटलें आहे. जन्म न असणाऱ्यानें जन्म घेतला असा भास होणें, ही माया होय. (मायेलाच भ्रांति वगैरे नांवें आहेत.) असो; या भगवंताला स्वतः कर्म करण्याचें कांहीं कारण नसतांही केवळ प्राणीमात्रांवर दया करण्याच्या हेतूनें वैदिक धर्मद्वयाचा उपदेश श्रीकृष्णानीं अर्जुनास केला. यावेळीं अर्जुन हा शोक व मोह यांच्या समुद्रांतच जणूं काय बुडून गेला होता. त्याला तारण्यासाठीं व त्याच्या अनुषंगानें सर्व त्रैलोक्यांतील लोक तरतील या बुद्धीनें हा उपदेश केला आहे. अर्जुनासच उपदेश करण्याचें कारण हें कीं, चांगल्या गुणी माणसाला धर्माचा उपदेश केल्यावर तो त्यास समजला व त्याप्रमाणें तो चालायला लागला म्हणजे धर्माचा प्रसार लवकर होतो.- उच्चस्थानीं दिवा लावला म्हणजे जसा सर्वत्र प्रकाश पडतो त्याप्रमाणेंच बुद्धिमान् मनुष्यास उपदेश केला म्हणजे तो उपदेश पुष्कळांस केल्याचें श्रेय येतें.—असो. सर्वज्ञ. व भूत—भविष्य—वर्तमान जाणणारे वेदव्यासांनीं, अर्जुनास कृष्णानीं जो ह्या धर्माचा उपदेश केला त्याचेच सातशें श्लोक केलें आहेत; व भगवंताच्या उपदेशाचें सर्व सार आणिलें आहे.—त्या श्लोकांस गीताशास्त्र असें म्हणतात.

तदिदं गीताशास्त्रं समस्तवेदार्थसारसंग्रहभूतं दुर्विज्ञेयार्थम् । तदर्थाविष्करणायानेकैर्विवृतपदपदार्थवाक्यार्थन्यायमप्यत्यन्तविरुद्धानेकार्थत्वेन लौकिकैर्गृह्यमाणमुपलभ्याहं विवेकतोऽर्थनिर्धारणार्थं संक्षेपतो विवरणं करिष्यामि ।

ह्या गीताशास्त्रांत सर्व वेद व वेदांत यांच्या रहस्याचा (वेदांत साराचा) संग्रह झाल्यामुळें तें शास्त्र समजण्यास अति कठिण झालें आहे. या शास्त्राचा अर्थ स्पष्ट करावा म्हणून आजपर्यंत अनेक प्राचीन *व्याख्यानकारांनीं गीतेच्या श्लोकांतील पदें (शब्द) शब्दार्थ वाक्यार्थ सांगून व असा अर्थ कां, असा कां नाहीं, असल्या शंकांचें समाधान करून जरी एकंदर ग्रंथाचें हृद्गत उत्तम तऱ्हेनें सांगितलें आहे, तथापि सामान्य लोकांच्या समजुती अज्ञानानें व खोट्या ज्ञानानें मलीन झालेल्या असल्यामुळें त्यांच्या मनांत एकाच श्लोकाचे अनेक अर्थ किंवा एकाच ग्रंथांतील श्लोकांचे परस्परविरुद्ध अर्थ येतात व त्यामुळें एकंदर ग्रंथाचें रहस्य त्यांस समजत नाहींसें झालें आहे, हें मला माहित असल्यामुळें मी आतां थोडक्यांतच संगतवार आणि एकाच तत्त्वावर स्थापित केलेलें असें, अर्थ स्पष्ट करणारें एक भाष्य करावयास लागतों.—हें भाष्य वाचल्यावर सामान्य वाचकांचा गोंधळ होतो तो नाहींसा होऊन गीतारहस्य त्यांस उत्तम प्रकारें समजेल.

तस्यास्य गीताशास्त्रस्य संक्षेपतः प्रयोजनं परं निःश्रेयसं सहेतुकस्य संसारस्यात्यन्तोपरमलक्षणम् । तच्च सर्वकर्मसंन्यासपूर्वकादात्मज्ञानांनिष्ठारूपाद्धर्माद्भवति । तथेममेव गीतार्थधर्ममुद्दिश्य भगवतैवोक्तम्—

'स हि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः पदवेदने' इत्यनुगीतासु। तत्रैव चोक्तम्—

"नैव धर्मी न चाधर्मी न चैव हि शुभाशुभी ।
यः स्यादेकासने लीन स्तूष्णीं किंचिदचिन्तयन्" ॥

"ज्ञानं संन्यासलक्षणम्' इति च ।

इहापि चान्त उक्तमर्जुनाय—'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' इति । अभ्युदयार्थोऽपि यः प्रवृत्तिलक्षणो धर्मो वर्णाश्रमांश्चोद्दिश्य विहितः स देवादिस्थानप्रा-

---

* व्याख्यान म्हणजे–' पदच्छेदः पदार्थोक्तिर्विग्रहो वाक्ययोजना ।
आक्षेपस्य समाधानं व्याख्यानं पंचलक्षणम्' ॥

·प्तिहेतुरपि सन्नीश्वरार्पणबुद्ध्याऽनुष्ठीयमानः सत्वशुद्धये भवति फलाभिसंधिवर्जितः। शुद्धसत्त्वस्य च ज्ञाननिष्ठायोग्यताप्राप्तिद्वारेण ज्ञानोत्पत्तिहेतुत्वेन च निःश्रेयसहेतुत्वमपि प्रतिपद्यते। तथा चेममेवार्थमभिसंधाय वक्ष्यति-· 'ब्रह्मण्याधाय कर्माणि' 'योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये' इति।

ह्या गीताशास्त्राचा उद्देश थोडक्यांत सांगावयाचा म्हणजे अत्युत्कृष्ट जो मोक्ष तो मिळावा व सहेतुक संसार म्हणजे पापपुण्यात्मक कर्मांच्या योगानें उत्पन्न होणारा जो संसार त्याचा समूळ विनाश व्हावा असा आहे. ह्या इष्ट हेतु अगर पुरुषार्थ साध्य करून घ्यावयाचा असेल तर आपण जीं जीं कर्मे करितों तीं तीं निष्कामबुद्धीनें व ईश्वराला अर्पण करण्याच्या हेतूनें करून, नंतर आत्मज्ञानाचे ठायीं अनन्य निष्ठा ठेवावयास पाहिजे. गीताशास्त्रांत हेंच तत्त्व सांगितलें आहे. ह्या तत्त्वास अनुलक्षून प्रत्यक्ष भगवानच '*अनुगीता' नामक गीतेमध्यें बोलले आहेत:—

'ब्रह्मपदाची प्राप्ति करून देण्याला हाच एक धर्म कायतो समर्थ आहे.

पुनः अनुगीतेमध्येंच म्हटलें आहे:—

'जो धर्माप्रमाणें वागत नाहीं, किंवा अधर्माप्रमाणेंही वागत नाहीं; ज्याला शुभाशुभ (चांगलें अगर वाईट) असें कांहींच नाहीं; जो एकासनावर बसून वाचा, नेत्र, कर्ण इत्यादि इंद्रियांचे व्यापार नष्ट करितो व जे अंतःकरणाचेही सर्व व्यापार नाहींसे करितो तोच ब्रह्मस्वरूपामध्यें अंतर्भूत होऊन जातो' (म्हणजे जो रात्रंदिवस ब्रह्मचिंतनाचे पाठीमागें लागला त्याचे सर्व प्रकारचे व्यापार बंद होतात, त्याला धर्माची किंवा अधर्माची गरज न राहून चांगलें वाईट हें निवडीत बसण्याचीही आवश्यकता राहात नाहीं. असा ज्ञानी मनुष्य जिवंत असतांनाच मुक्त होतो व देहत्याग झाल्यानंतर जेथें अत्यंत आनंद आहे

* ही गीता भगवंतानीं अर्जुनास भारतीयुद्ध आटपल्यावर सांगितली.

अशा ब्रह्मस्वरूपामध्यें जाऊन मिळतो.)

आणखी एकदा म्हटलें आहे. 'कर्माच्या फळाची अपेक्षा न ठेऊन उत्पन्न झालेलें जें ज्ञान तें ब्रह्मज्ञान,' (त्याच्या योगानें मोक्ष प्राप्ति होतें. कर्म टाकून देणें यालाही संन्यास म्हणतात. कर्म न करणें व कर्मफलाची अपेक्षा न ठेवणें, यांत पुष्कळ फरक आहे; तरी दोहोस संन्यास म्हणतां येतें.)

येथेंही गीताशास्त्राच्या शेवटीं शेवटीं श्रीभगवंतानीं अर्जुनास (अध्याय १८ श्लोक ६६ मध्यें) सांगितलें आहे कीं, 'सर्व प्रकारचे धर्मांचा त्याग करून मला मात्र अनन्यभावानें शरण ये. ' तसेंच ब्राह्मणक्षत्रियादि चार वर्ण आणि मागें सांगितलेले चार आश्रम, या सर्वांचें कल्याण होण्यासाठीं स्थापन केलेला जो प्रवृत्तिधर्म (कर्मयोग) सांगितला आहे, त्याच्या योगानें स्वर्गलोकाची प्राप्ति होते व होईल हें खरें. तथापि फलाची अपेक्षा (इच्छा) न ठेवतां सर्व कर्म ईश्वरास अर्पण केलें तर याच कर्ममार्गाचे योगानें अंतःकरणाची शुद्धि होते. (आपलें मन निर्मळ होतें) चित्तशुद्धि झालेल्या मनुष्यास आत्मज्ञानाचे ठिकाणीं निःसीम भक्ति उत्पन्न झाल्यावर तें समजण्याची योग्यता प्राप्त होऊन त्या ज्ञानरूपी भक्तीच्या व अधिकाराच्या द्वारानें आत्मज्ञान प्राप्त होतें; आणि आत्मज्ञानाचें संपादन झालें म्हणजे अत्यंत आनंदाचें स्थान जो मोक्ष तोही प्राप्त होतो. (सारांश, मी अमुक कर्म करीत आहें, त्याचें मला अमुक फल मिळावें, ही आशा सोडून देऊन आपण सर्व कर्में परमेश्वरास समर्पण केलीं म्हणजे आपलें मन निष्पाप होऊन व आत्मज्ञान मिळण्याचा अधिकार प्राप्त होऊन तेंही (आत्मज्ञान) होतें व पुढें मोक्ष मिळतो. एवंच कर्ममार्ग अनुसरला असतांही वर सांगितल्याप्रमाणें निष्काम कर्मीही मोक्षास अधिकारी होतो.) हाच अर्थ दृढ करण्यासाठीं भगवान म्हणतातः—' सर्व कर्में ब्रह्माला अर्पण करून' (भ. गी. अध्याय ५ श्लोक १०) ' सर्व प्रकारची आसक्ति सोडून देऊन योगी लोक आत्मशुद्धीसाठीं कर्म करितात. (भगवद्गीता अध्याय ५ श्लोक ११)

इमं द्विप्रकारं धर्मं निःश्रेयसप्रयोजनं परमार्थतत्त्वं च

वासुदेवाख्यं परं ब्रह्माभिधेयभूतं विशेषतोऽभिव्यञ्जयद्वि- शिष्टप्रयोजनसंबन्धाभिधेयवद्गीताशास्त्रम् । यतस्तदर्थे वि- ज्ञाते समस्तपुरुषार्थसिद्धिरित्यतस्तद्विवरणे यत्नः क्रि- यते मया ।

याप्रमाणें हा दोन प्रकारचा वेदोक्त धर्म (प्रवृत्तिमार्ग व निवृत्ति-मार्ग) अत्युत्तम रीतीनें सांगणारें हें गीताशास्त्र आहे. याच्या योगानें वासुदेव नामक उत्कृष्ट सत्यवस्तूचा लाभ होऊन शेवटीं मोक्ष मिळतो. असो, या गीताशास्त्राचा विशेष उद्देश काय आहे, संबंध कसा आहे, व नांव काय इत्यादि सर्व सांगितलें. (कोणताही ग्रंथ लिहितांना तो लिहिण्याची आवश्यकता, त्याचा संबंध, त्याचें नांव व तो वाचण्यास अगर ऐकण्यास अधिकारी कोण, हें सांगण्याचा प्रघात आहे. या चतुष्टयास 'अनुबंधचतुष्टय' असें नांव आहे. हें गीता-शास्त्र ऐकण्याचा सर्वांसच अधिकार आहे म्हणून अधिकाऱ्यांचा आचार्यांनीं उल्लेख केला नाहीं.) आतां धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ, ह्या गीताशास्त्राचा अर्थ समजला असतां साध्य होतात म्हणून त्या उत्तमोत्तम शास्त्राचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न मी करित आहे.

अथ प्रथमोऽध्यायः ।

धृतराष्ट्र उवाच—

धर्मक्षेत्रें कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ॥
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

पदांसह अन्वय व अर्थ

धृतराष्ट्र विचारतो. **संजय** (संजया) **धर्मक्षेत्रे** (पवित्र आहे जेथील स्थल, धर्माचरण करण्यास जी उत्तम जागा, अशा) **कुरुक्षेत्रे** (कुरुक्षेत्रामध्यें) **समवेताः** (जमलेले असे) **युयुत्सवः** (युद्ध करण्याची इच्छा धारण केलेले) **मामकाः** (दुर्योधनप्रभृति माझे पुत्र व त्यांचे स्नेही) **पांडवाश्चैव** (आणि धर्मादि पंडूचे मुलगे व त्यांचे स्नेही हे) **किं अकुर्वत** (काय करिते झाले बरें ?)—कौरवपांडवांची गांठ पडल्यावर त्यांनीं काय केलें ?

संजय उवाच—

---

१. कौरवपांडवांच्या भारती युद्धाचा वृत्तांत व्यासाच्या आज्ञेनें संजय नामक सूतपुत्रानें जन्मांध धृतराष्ट्रास सांगितला आहे. जसजशी हकीकत झाली, तसतशी दिव्यदृष्टिसंजयानें धृतराष्ट्रास निवेदन केली आहे. भारतांतच गीतेचा अंतर्भाव होतो म्हणून गीतावृत्तांतही संजयानेंच धृतराष्ट्रास सांगितला आहे.

२ कुरुक्षेत्र हें यमुना व सरस्वती या दोन नद्यांच्या मध्यें आहे. आर्यलोकांची वसति येथें पुष्कळ दिवसांपासून आहे. जगाच्या-निदान-हिंदुस्थानच्या इतिहासाची उलथापालथ करणाऱ्या अनेक लढाया येथें झाल्या, त्या इतिहासज्ञांस विदित आहेतच.

३ **मामकाः** (माझे) असें धृतराष्ट्रानें म्हटलें आहे. त्यावरूनच पुष्कळ टीकाकार असा तर्क काढतात कीं, पांडवांस तो शत्रुप्रमाणेंच लेखीत असे. त्याचप्रमाणें धर्मक्षेत्र या शब्दावर व्याख्यान देतांना ' धर्मक्षेत्रामध्यें गेल्यामुळें दुर्योधनानें राज्याचा अर्धा वांटा धर्मास दिला कीं काय अशी भीति व धर्मराजानें आपला वारसाईचा हक्क सोडून दिला कीं काय अशी शंका धृतराष्ट्रास उत्पन्न झाली असावी, व या संशयानें घेरला गेल्यामुळें त्यानें हा प्रश्न विचारला असावा!' असेंही कित्येक टीकाकार म्हणतात. या असल्या टीका म्हणजे निवळ पांडित्याचें प्रदर्शन होय, तेव्हां असल्या ओढून ताणून आणलेल्या अर्थाला मान न देतां जेथें संदर्भास अनुकूल असा अर्थ असेल व जेथें मनास विशेष चटका लावणारा अर्थ दिसेल तेथील स्थलांचा मात्र उल्लेख करण्याचें योजिलें आहे.

संजय म्हणालाः—

दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ॥
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

तदा (त्यावेळीं) **पांडवानीकं** (पांडवांची सेना॰) **व्यूढं** (युद्धासाठीं *व्यूह बांधून उभी राहिली आहे, अशी) **दृष्ट्वा तु** (मित्रेपणानें पाहून) **राजा दुर्योधनः** (दुर्योधन राजा) **आचार्यं उपसंगम्य** (गुरु द्रोणाजवळ जाऊन) **वचनं** (बोलणें, पुढील शब्द) **अब्रवीत्** (बोलता झाला.)

पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ॥
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

दुर्योधन म्हणालाः—आचार्य! तव (तुझ्या) **धीमता** (बुद्धिमान् अशा) **शिष्येण** (शिष्य अशा) **द्रुपदपुत्रेण** (द्रुपदाचा पुत्र धृष्टद्युम्न त्यानें) **व्यूढां** (युद्धासाठीं व्यूह रचून तयार केलेली) **एतां** (ह्या) **पाण्डुपुत्राणां** (पांडवांच्या) **महतीं** (मोठ्या) **चमूं** (सेनेला) **पश्य** (पहा.) दुर्योधनानें गुरुद्रोणास पांडवांची ती मोठी सेना दाखवून त्या सेनेचा अधिपति तुझाच शिष्य धृष्टद्युम्न आहे असें सांगितलें. तुझा शिष्यच सेनापति आहे यावरून आपल्यास जय मिळणें सुकर आहे असें दुर्योधन सुचवित आहे. **मधुसूदनी**टीकाकार असा गूढार्थ काढतात कीं ‘ हे पांडवांच्या गुरो! ही तुझ्या प्रिय शिष्याची सेना पहा. हिचा अधिपति, तुला मारण्यासाठीं उत्पन्न झालेला तुझा शिष्य धृष्टद्युम्न आहे! तो बुद्धिमान् आहे; कारण तुझ्या वैऱ्याचा पुत्र असूनही त्यानें तुझ्याकडून विद्या संपादन केली! परंतु आपला वध करणारा जो द्रुपदपुत्र त्यास तूं विद्या शिकविलीस त्या तुला काय म्हणावें बरें!’ हा अर्थ येथें देण्याचें कारण इतकेंच आहे कीं आमचे विद्वान टीका-

---

* सैन्याची जी एक विशेष व्यवस्था असते तिला व्यूह म्हणतात. युद्धशास्त्रांत नानाप्रकारचे व्यूह सांगितले आहेत. पांडवांनीं यावेळीं वज्रव्यूह रचिला होता असें महाभारतांत सांगितलें आहे.

कार शब्दांची छाननी करून किती खोल अर्थ काढतात हें दाखवावयाचें आहे. स्वार्थासाठीं तक्षकासारखी धडपड करणारा व शकुनी-मामाच्या शाळमींत तयार झालेला आणि सर्वकपटविद्येंत निष्णात असा राजा दुर्योधन जीव जाणार किंवा राहणार अशा आणीबाणीच्या वेळीं गुरु द्रोणाचें मन प्रसन्न करून घेण्याच्या ऐवजीं त्यास या वेळेला वरील मर्मभेदक शब्द बोलला असेल तर त्याच्या सारखा मूर्ख कोणीच नसेल असें मला वाटतें. तात्पर्य ध्यावयाचें इतकेंच कीं बहुधा सरळ अर्थ घेणें हेंच अनेक प्रसंगीं इष्ट असतें.

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ॥
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥

पुढें दुर्योधन पुनः सांगतोः—

अत्र (या शत्रुसैन्यामध्यें) **शूराः** (शूर) **महेष्वासाः** (मोठीं आहेत इष्वास म्हणजे धनुष्यें ज्यांचीं असे) **युधि** (व रणांगणामध्यें) **भीमाऽर्जुनसमाः** (भीम व अर्जुन यांच्या तोडीचे)—असे वीर पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहींचीं नांवें सांगतों.—**युयुधानः** (सात्यकी) **विराटःच** (विराट) **द्रुपदः** (द्रुपदराजा) **महारथः*** (दहा हजार धनुर्धाऱ्याबरोबर एकदम युद्ध करणारा व धनुर्विद्येमध्यें प्रवीण असणारा त्यास महारथ म्हणतात. येथें द्रुपदराजालाच हें विशेषण लावलें आहे असें नाहीं. सात्यकी, विराट वगैरे सगळ्यांकडेच ह्या विशेषणाचा संबंध लावावा.)

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।
पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥

धृष्टकेतुः (चेदि राजा) **चेकितानः** हेराजा, **काशीराजाः** हे वीर्यशाली राजे, **पुरुजित्** व **कुंतिभोज** हे उभयतां बंधु, **शैब्यराजा** हे सर्व नरश्रेष्ठ महावीर;

---

* एको दश सहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम् ।
शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥

युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान्
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

महापराक्रमी **युधामन्यु** व **उत्तमौजा**, त्याचप्रमाणें **सुभद्रातनय** अभिमन्यु, **द्रौपदीचे प्रतिविंध्यादि** पांच पुत्र हे **सर्व महारथी** —पांडवसेनेमध्यें दृष्टीस पडत आहेत.—

दुर्योधनानें पांच पांडवांचीं नांवें सांगितलीं नाहींत, कारण तीं जगद्विश्रुतच होतीं. शिवाय त्यांच्या प्रीत्यर्थ व त्यांनीं उपस्थित केलेलें हें युद्ध होतें. पांड्य, घटोत्कचादि वीरांचा अंतर्भाव' च ' शब्दांत होतो.

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥७॥

आणखी दुर्योधन म्हणतोः—

द्विजोत्तम! (ब्राह्मणश्रेष्ठा !) **अस्माकं** (आमच्याकडचे) **तु** (ही) **विशिष्टाः** (जे विशेष नांव घेण्यासारखे आहेत) **तान्** (त्यांना) **निबोध** (जाण. त्यांपैकीं कांहीं नांवें सांगतों तीं ऐक) **मम** (माझ्या) **सैन्यस्य** (सेनेचे) **नायकाः** (जे सेनापती आहेत) **तान्** (त्यांना) **ते** (तुझ्या) **संज्ञार्थं** माहितीसाठीं; (संज्ञार्थ याचा अर्थ ' आमच्या सेनेंत अनेक महावीर आहेत, त्यांपैकीं कांहींचीं नांवें भासल्याकरितां, उदाहरणासाठीं, असाही करावा.) **ब्रवीमि** (बोलतों, सांगतों.)—आपण सर्वज्ञच आहांत; पण मी माझ्या समाधानासाठीं हीं नांवें सांगतों. असा द्विजोत्तम या शब्दापासून परंपरेनें अर्थ निघूं शकतो.

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥८॥

दुर्योधन सांगतोः—

भवान् (आपण) **भीष्मश्च** (आणि पितामह भीष्म) **कर्णश्च** (आणि अंगराजा कर्ण) **समितिंजयः कृपः** (रणामध्यें नेहमीं जय मिळविणारा कृपाचार्य) **अश्वत्थामा, विकर्णः तथैव च** (त्याचप्रमाणें) **सौमदत्ति, भूरिश्रवा बाल्हिकराजा असे महावीर**

आपल्या सैन्यांत आहेत. '**तथैव च**' या ठिकाणीं '**जयद्रथ**' असाही कोठें पाठ आहे.

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

अन्ये च (आणखीही दुसरे) **शूराः** (शूर) **मदर्थे त्यक्तजीविताः** (माझ्यासाठीं प्राण देण्यास तयार झालेले म्हणजे प्राणांपेक्षांही माझें हित जास्त पाहणारे अगर प्राण देऊन माझें हित साधणारे) **नानाशस्त्रप्रहरणाः** (अनेक प्रकारचीं शस्त्रें धारण करणारें; शस्त्र म्हणजे ज्यानें जखम होतें तें. प्रहरण म्हणजे ज्यानें धक्का बसतो असें गदेसारखें आयुध.) **बहवः** (पुष्कळ आहेत.) **सर्वे**(हे सर्वजण) **युद्धविशारदाः** (युद्धाच्या शास्त्रामध्यें निष्णात, पंडित, आहेत.)

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

दुर्योधन आचार्यास सांगतोः—

अस्माकं (आमचें) **इदं** (हें—अकरा अक्षौहिणी सैन्य–) **पर्याप्तं** (शत्रूचा पराभव करण्यास समर्थ आहे व) **भीष्माभिरक्षितं** (भीष्मासारख्या महाधनुर्धरानें रक्षण केलेलें असें हें सैन्य आहे.) **एतेषां** (ह्या शत्रूंचें) **तत्** (तें; मागें सांगितलेलें) **बलं** (-सात अक्षौहिणी-सैन्य) **अपर्याप्तं** (आमचा पराभव करण्यास असमर्थ आहे व पुनः)**भीमाभिरक्षितं** (भीमासारख्या जडबुद्धीनें त्याचें आधिपत्य स्वीकारलें आहे.)

ह्या श्लोकाचे अनेक अर्थ अपर्याप्त व पर्याप्त यांच्या अर्थांतरांप्रमाणें होतात. अपर्याप्त याचें अपुरतें, अशक्त व अनियामित, अमर्याद असे अर्थ होतात. याच्याच उलट पर्याप्त याचे अर्थ होतात. शिवाय तत् म्हणजे काय, 'अपर्याप्त' कोणीकडे घ्यावें, वगैरे वाद पंडितांस योग्य आहेत. तात्पर्य घ्यावयाचें तें इतकेंच आहे कीं 'आमचें बल पांडवांचा पराभव करण्यास समर्थ असून आमच्या सैन्याचा नायक सकळ

धनुर्धरांत श्रेष्ठ आहे.'

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ॥११॥

दुर्योधन शेवटची विनंति करितोः—

सर्वेषु (सर्व, सगळ्या) **अयनेषु** (उभे राहण्यासाठीं नेमून दिलेल्या स्थानावर) **यथाभागं** (आपआपल्या नेमलेल्या जागीं) **अवस्थिताः** (उभे राहिलेले असे) **भवन्तः सर्व एव हि** (आपण सर्वही जणांनीं) **भीष्ममेव** (भीष्म सेनापतीलाच) **अभिरक्षन्तु** (रक्षण करण्यासाठीं सर्व प्रकारें झटावें.)

याचा इत्यर्थ इतकाच आहे कीं सेनेच्या सर्व उपनायकांनीं आपापल्या नियमित स्थानांवर खबरदारीनें उभें राहून भीष्म सेनापतीचें प्रथम रक्षण करावें. कारण उघडच आहे कीं सेनापतीचें रक्षण झालें म्हणजे आपल्यासारख्या तेजस्वी ब्राह्मणांच्या आशीर्वादानें आमचें सर्वांचें व आमच्या सेनेचें रक्षण होईल.

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥१२॥

राजा दुर्योधन भ्यालेल्यासारखा दिसत आहे असें पाहूनः—

तस्य (दुर्योधनास,) **हर्षं संजनयन्** (हर्ष, आनंद, धीर व उत्साह उत्पन्न व्हावा अशी इच्छा करणारा) **कुरुवृद्धः** (सर्व कौरवकुलामध्यें वयानें वडील असणारा) **पितामहः** (व सर्व कौरवांचा अजोबा, भीष्म) **प्रतापवान्** (शत्रूस ताप देण्यामध्यें अति कुशल जो भीष्म तो) **उच्चैः** (मोठ्यानें) **सिंहनादं विनद्य** (सिंहासारखी गर्जना करून) **शंखं** (रणवाद्य विशेष, शंख) **दध्मौ** (फुंकिता वाजविता झाला.)-सिंहगर्जना करणें व शंख वाजविणें ह्या युद्धांतील विशेष चाली होत.—

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।

सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् १३॥

ततः (तदनंतर) शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः (हजारों शंख, भेरी, झांजा, शिंगें हीं सर्व) सहसैव (एकदम, एककालींच) अभ्यहन्यन्त (वाजविलीं गेलीं. हजारों रणवाद्यांचें एकच रणघोर वादन सुरू झालें.) सः शब्दः (तो शब्द) तुमुलः (फार मोठा, कानठळ्या बसविणारा व भयंकर) अभवत् (झाला.)— सेनापतींनें शंख वाजवून सूचना केल्याबरोबर सर्व कौरवसैन्यांत रणवाद्यांची महाघोर गर्जना सुरू झाली; हें नीटच झालें.—

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः॥१४॥

इकडे पांडव सैन्यांतः—

ततः (तदनंतर) श्वेतैर्हयैः (पांढऱ्या शुभ्र घोड्यांनीं) युक्ते (युक्त असणाऱ्या) महति (मोठ्या व बळकट) स्यंदने (रथामध्यें) स्थितौ (बसले आहेत दोघेजण) माधवः (लक्ष्मीपती श्रीकृष्ण) पाण्डवश्च (आणि पंडुकुमर अर्जुन हे उभयतां) दिव्यौ (दिव्य, अमानुष, स्वर्गींच्या लोकांस शोभणारे) शंखौ (शंख) प्रदध्मतुः (वाजविते झाले.)

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौण्ड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः॥१५॥

हृषीकेशः (इंद्रियांचा स्वामी श्रीकृष्णपरमात्मा,- कुरळे केश असणारा असाही हृषीकेश याचा अर्थ आहे.-) पाञ्चजन्यं (पंचजन नामक राक्षसाच्या अस्थीपासून निर्माण केलेला पांचजन्य नांवाचा शंख) धनंजयः (सर्व राजेलोकांस जिंकून धन आणणारा अर्जुन) देवदत्तं (अग्नीनें प्रसन्न होऊन दिलेला देवदत्त नामक शंख) वाजविता झाला. भीमकर्मा (राक्षसांचा नाश करण्याचें भयंकर काम करणारा) वृकोदरः (लांडग्यासारखें आहे खाणें अचाट म्हणून बलवान् आहे जो भीम तो) पौण्ड्रं (पौंड्र नांवाचा शंख

वाजवूं लागला.

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

कुन्तीपुत्रः (देवांपासून वर घेऊन जिनें पुत्रांस जन्म दिले अशा कुंतीचा पुत्र) **युधिष्ठिरः अनन्तविजयं** (स्थिरपणानें युद्ध करणारा धर्मराजा यानें अनंतविजय नांवाचा) **नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ** (व नकुल सहदेव यांनीं सुघोष आणि मणिपुष्पक नांवाचे) शंख वाजविले.

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥

परमेष्वासः (अति मोठें आहे धनुष्य ज्याचें असा) **काशिराजा,** महारथ **शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट,** अजिंक्यपत्रें मिळविलेला **सात्यकी.**—

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥

द्रुपदराजा, द्रौपदीचे पांच मुलगे, मोठे लांब हात आहेत ज्याचे असा आजानुबाहु, सुभद्रातनय, अभिमन्यु, ह्या सर्वांनीं **पृथिवीपते** 'हे पृथ्वीच्या राजा' (धृतराष्ट्रा !)-निरनिराळे शंख वाजविले.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

सः (तो) **घोषः** (गंभीर आवाज) **धार्तराष्ट्राणां** (धृतराष्ट्राचे मुलगे दुर्योधन दुःशासनादिक त्यांचीं व त्यांच्या सैनिकांचीं) **हृदयानि** (अंतःकरणें) **व्यदारयत्** (फाडून टाकिता झाला.) **तुमुलः** (तो महाघोर आणि कर्कश आवाज) **नभश्च पृथिवीं चैव** (-आकाश आणि पृथिवी ह्या दोन्हींमध्यें) **व्यनुनादयन्** (आवाज भरून त्याचा भयंकर प्रतिध्वनि उठे असें करणारा —तो

घोष होता).—सर्व पृथ्वीमंडल आणि नभोमंडल दणाणून सोडणारा तो पांडवसैन्यांतील शंखांचा आवाज दुर्योधनपक्षीयांचीं अंतःकरणें भयानें घाबरून सोडता झाला. कौरव भ्याले, पांडव भ्याले नाहींत इतकें येथें सांगावयाचें आहे.

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवः।
हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते। २० ॥

अथ (यानंतर) **धार्तराष्ट्रान्** (धृतराष्ट्राच्या पुत्रांचे सैनिक) **व्यवस्थितान्** (भीतिदर्शक शंखनाद झाला असतांही आपआपल्या स्थानीं युद्धासाठीं उभे आहेत) **दृष्ट्वा** (असें पाहून) **कपिध्वजः** (मारुति आहे ध्वजावर ज्याच्या असा) **पाण्डवः** (अर्जुन) **शस्त्रसंपाते** (शस्त्रांचा प्रहार) **प्रवृत्ते** (करण्याची तयारी झाल्यावर) **धनुः** (आपलें धनुष्य) **उद्यम्य** (उचलून,) **महीपते** (हे धृतराष्ट्रराजा !) **हृषीकेशं** (इंद्रियप्रवर्तक जो परमात्मा श्रीकृष्ण त्याप्रत) **इदं** (हें) **वाक्यं** (बोलणें) **तदा** (त्यावेळीं) **आह** (अर्जुन-बोलला)

अर्जुन उवाचः—

अर्जुन म्हणालाः—

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत। २१।

अच्युत (केव्हांही विकार न पावणाऱ्या व नित्य आणि अव्ययरूपानें राहणाऱ्या, कृष्णा !) **उभयोः** (दोन्हीही) **सेनयोः** सैन्यांच्या) **मध्ये** (मध्यभागाचे ठायीं) **मे** (माझा) **रथं** (रथ) **स्थापय** (नेऊन ठेव).

अर्जुन पुढें ह्मणालाः—

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान्।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥

यावत (म्हणजे:—किंवा तोंपर्यंत ठेव कीं जोंपर्यंत, असाही

अर्थ आहे.- पहिला चांगला.) **एतान्** (ह्या) **योद्धुकामान्** (युद्धाची इच्छा धारण करणाऱ्या) **अवस्थितान्** (युद्धासाठीं सिद्ध होऊन उभे राहिलेल्या -वीरांस -) **अहं** (मी) **निरीक्षे** (पाहतों)—आणि—**अस्मिन्** (ह्या) **रणसमुद्यमे** (युद्धाच्या तयारींत, समरसमारंभांत) **कैः मया सह** (कोणाबरोबर मला, किंवा माझ्याबरोबर कोणाला) **योद्धव्यं** (लढावयाचें आहे—तेंही पहातों—).

आणखी म्हणालाः—

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ।२३।

ये एते (जे हे) **अत्र** (येथें) **समागताः** (एकत्र जमले आहेत)—आणि—**युद्धे** (लढाईमध्यें) **दुर्बुद्धेः** (दुष्टबुद्धीच्या) **धार्तराष्ट्रस्य** (धृतराष्ट्रपुत्र जो दुर्योधन त्याचें) **प्रियचिकीर्षवः** (हित करण्याविषयीं इच्छा धारण करणारे, मर्जी सुप्रसन्न करून घेणारे आहेत, अशा) **योत्स्यमानान्** (युद्धाची इच्छा धरून आलेल्या—वीरांस—) **अहं** (मी) **अवेक्षे** (पहातों).

संजय उवाच—

संजय धृतराष्ट्रास सांगता झाला:—

एवमुक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥२४॥
भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।

'**भारत** (भरतकुलामध्यें उत्पन्न होऊन त्याच कुलामध्यें बंधुवधाचें पाप होत आहे हें पाहणाऱ्या—नव्हे—ऐकणाऱ्या धृतराष्ट्रा !) **गुडाकेशेन** (गुडाका = निद्रा तिचा ईश—स्वामी, निद्रास्वामी, स्वाधीननिद्र, निरलस अशा अर्जुनानें, पिंगट-वर्णाचे केश होते ज्याचे अशा अर्जुनानें, असाही अर्थ आहे.-पहिलाबरा.) **एवं** (याप्रमाणें) **उक्तः** (बोललेला) **हृषीकेशः** (श्रीकृष्ण.) **उभयोः सेनयोः मध्ये** (दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं) **भीष्मद्रोणप्रमुखतः** (भीष्म व द्रोण यांच्या

समोर) **सर्वेषां च महीक्षिताम्** (व सर्व राजांच्याही समोर) **रथो-त्तमम्** (उत्तम, अग्निदेवतेनें दिलेला दिव्य, रथ) **स्थापयित्वा** (नेऊन, स्थापन करून).

उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥

उवाच (–श्रीकृष्ण–बोलला) **पार्थ** (पृथेच्या मुला-अर्जुना!-) **एतान्** (हे) **समवेतान्** (सैन्यासह एकत्र मिळालेल्या) **कुरून्** (कौरवांस) **पश्य** (पहा) **इति** (याप्रमाणें–श्रीकृष्ण बोलला–).

तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ॥२६॥

अथ (हें श्रीकृष्णांनीं सांगितल्यावर.–) **पार्थः** (अर्जुन) **तत्र** (तेथें) **स्थितान्** (आपआपल्या जाग्यावर उभे राहिलेले) **पितॄन्** (पित्याच्या योग्यतेचे भूरिश्रव्यासारखे चुलते) **पितामहान्** (भीष्म, सोमदत्तादि आजोबा) **आचार्यान्** (द्रोण, कृपाचार्य प्रभृति गुरु) **मातुलान्** (शल्य शकुनि वगैरे मामा) **भ्रातॄन्** (दुर्योधनादि बंधु) **पुत्रान्** (दुर्योधनाचा मुलगा लक्ष्मण वगैरे पुत्रासारखे पुतणे) **पौत्रान्** (लक्ष्मण वगैरेचे मुलगे, नातू) **सखीन्** (अश्वत्थामादि स्नेही) **तथा श्वशुरान्** (त्याचप्रमाणें दुर्योधनाचे सासरे वगैरे, तसेच) **सुहृदः** (कृतवर्मा, भगदत्तप्रभृति मित्र)–याचप्रमाणें आपल्या सैन्यांतीलही नातेवाईक–**उभयोः सेनयोरपि** (दोन्ही सैन्यांत)–आपले नातेवाईक व इष्टमित्र–**अपश्यत्** (पाहता झाला.)–अर्जुनास सर्वत्र आपला गोतावळा दृष्टीस पडला.—

तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान् ।
कृपया परयाऽऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ॥२७॥

तान् (त्या) **सर्वान्** (सगळ्या) **अवस्थितान्** (उभे राहिलेल्या) **बन्धून्** (बंधु वगैरे बांधवास) **समीक्ष्य** (काळजीपूर्वक

पाहून) **सः** (तो) **कौन्तेयः** (कुंतीपुत्र अर्जुन) **परया** (अत्यंत) **कृपया** (दयेनें) **आविष्टः** (पूर्ण भरला जाऊन, कृपेनें वश करून घेतला आहे, असा झाल्यामुळें) **विषीदन्** (खेदयुक्त होत्साता) **इदं** (हें) **अब्रवीत्** (बोलता झाला.)—आपला सर्व गोतावळाच येथें आला आहे त्याची या युद्धांतील मृत्युकुंडांत आहुति पडणार असें पाहून अर्जुन कृपेनें व्याकुळ झाला आणि म्हणाला.—

अर्जुन उवाच—

अर्जुन बोलला.—

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति २८ ॥

कृष्ण (हे कृष्णा !) **इमं** (हा) **युयुत्सुं** (युद्ध करावयाची इच्छा धरून सिद्ध झालेला) **स्वजनं** (बांधववर्ग) **समुपस्थितं** (एकत्र रणांगणामध्यें उभा राहिलेला) **दृष्ट्वा** (पाहून) **मम** (माझीं) **गात्राणि** (गात्रें, अवयव) **सीदन्ति** (विकल होतात) **मुखं च** (आणि तोंडही) **परिशुष्यति** (सुकून जातें.)—अंगांत ग्लानता येणें व तोंडचें पाणी पळणें हीं चिन्हें भय आणी शोक यांचीं आहेत. आणखी कांहीं चिन्हें खालच्या श्लोकांत सांगितलीं आहेत.—

वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥
गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ॥ २९॥

च (आणि) **मे** (माझ्या) **शरीरे** (अंगावर, अंगाला) **वेपथुः** (कंप—उत्पन्न होतो—) **रोमहर्षश्च जायते** (रोमांचही उत्पन्न होतात, उभे राहतात.) **हस्तात्** (हातांतून) **गाण्डीवं** (अग्नीनें दिलेलें हें गांडीव धनुष्य) **स्रंसते** (खालीं गळून पडतें) **त्वक्चैव** (अंगाचें कातडेंही) **परिदह्यते** (तापून भाजतें आहे; माझें सर्व अंग भाजतें आहे.)

न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ।

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ३०॥

अवस्थातुं (उभें रहावयाला) **न च शक्नोमि** (माझ्या. अंगांत शक्ति नाहीं) **मे मनश्च** (माझें मनही) **भ्रमति इव** (जसें कांहीं फिरायालाच लागलें आहे.) **केशव** (केशीराक्षसाला मारणाऱ्या कृष्णा !) **च** (आणि) **विपरीतानि** (विलक्षण, अशुभ अमंगल) **निमित्तानि** (चिन्हें, शकुन) **पश्यामि** (मला दिसत आहेत.)— सारांश या युद्धामध्यें हजारों भाऊबंद मरणार असें पाहून अर्जुनास फार खेद झाला:—

अर्जुन पुनः म्हणतो:—

न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ३१।

च (आणि) **स्वजनं** (आमच्या आप्तइष्टमित्रांस) **आहवे** (युद्धामध्यें) **हत्वा** (मारून) **श्रेयः** (कल्याण) **न अनुपश्यामि** (उत्पन्न होईल असें मला दिसत नाहीं,)—येथें अगर परलोकीं आमचें कांहीं कल्याण होईल असें मला वाटत नाहीं, हा भावार्थ. याचें स्पष्टीकरण पुढील श्लोकांत आहे.—

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ३२

कृष्ण (भक्तांस आकर्षण करण्याऱ्या कृष्णा !) **न विजयं, न राज्यं, न सुखानि च काङ्क्षे** (मला जय नको, राज्य नको व सुखोपभोगही नकोत.) **गोविन्द ! नः** (आम्हांला) **राज्येन** (राज्य मिळवून) **किं** (काय) —उपयोग आहे ?--आम्हांला त्याचा काय उपयोग ?—**वा** (अथवा) **भोगैः जीवितेन किं** (सुखोपभोग अगर आयुष्य तरी काय कामाचें आहे ?)

—जय मिळाला म्हणजे राज्यप्राप्ति, राज्यलोभानें सुख आणि सुखानें आयुष्यवृद्धि ह्या गोष्टी (ह्या आशा) मनुष्याला कर्म करण्यास प्रवृत्त करितात. सर्व मनुष्यांचा यच्चयावत् व्यापार अगर उद्योग या सुखाकरितां व विशेषतः आयुष्यवृद्धीसाठीं होत असतो. सर्वांसच ल-

ढाया मारावयाच्या नाहींत, किंवा राज्यही मिळवावयाचीं नाहींत हें खरें आहे; तेव्हां जय म्हणजे आपल्या कामांत सिद्धि मिळवून यश संपादणें आणि राज्य म्हणजे संपत्तीचा लाभ करून घेऊन उपभोग घेणें असे अर्थ केले म्हणजे सामान्य मनुष्याला कर्म करण्याची प्रवृत्ति होते ती वरील कारणांनींच होते, हें उघड दिसून येईल. अर्जुनानें ह्या सर्व गोष्टी, हीं सुखें, मला नकोत असें म्हटलें आहे. तेव्हां आयुष्यही ज्याकरितां पाहिजे म्हणजे ज्यासाठीं जगावयाचें असें कांहीं तरी बलवत्तर कारण शोधून काढल्याशिवाय अर्जुनाच्या मनाची शांति होणारी नव्हती व तो युद्धास प्रवृत्तही होणारा नव्हता. याउपर भगवान् श्रीकृष्ण काय कारण शोधून काढतात तिकडे आपण सावधानचित्तानें लक्ष देऊं या. भगवंताच्या उत्तराला दुसऱ्या अध्यायाच्या अकराव्या श्लोकापासून सुरुवात व्हावयाची आहे.—

हे सर्व कां नकों याचें कारण अर्जुन सांगतो:—

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ३३

येषां (ज्याच्या) **अर्थे** (साठीं) **राज्यं भोगाः** (**सुखानि च** (राज्य, पुष्कळ प्रकारचे भोग, व सुखें) **काङ्क्षितं नः** (आम्हांला हवीं अशीं वाटतात) **ते इमे** (ते हे सर्व—आप्तइष्टमित्र—) **प्राणान्** (पंचप्राण) **धनानि च** (आणि धनसंपत्ति) **त्यक्त्वा** (सोडून देऊन **युद्धे** या समरभूमीमध्यें) **अवस्थिताः** (येऊन उभे राहिले आहेत.)

ते कोण म्हणशील तर ऐक:—

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबन्धिनस्तथा ३४

आचार्याः (गुरु) **पितरः** (वडिल पुरुष) **पुत्राः** (मुलगे वगैरे) **तथैव च** (त्याचप्रमाणें) **पितामहाः** (आजोबा) **मातुलाः** (मामा) **श्वशुराः** (सासरा) **पौत्राः** (नातू,) **श्यालाः** (मेव्हणे,) **तथा**

(तसेच) **संबन्धिनः** (इतर आप्त व इष्टमित्र) —हे येथें लढण्यासाठीं आले आहेत. हे सर्व मेले तर आम्हांला राज्याचा काय उपयोग? सुख कसलें? किंवा जिवंत तरी कशाला रहावयाचें? आपण सुख भोगिलें तेव्हां आपल्यास आनंद होतोच; पण तें आपलें सुख पाहून सुखी होणारे निदान आपण सुखी आहोंत असें पाहणारे लोक असल्याशिवाय सुखाचा खरा उपभोग घ्यावयास सांपडत नाहीं, हा सामान्य अनुभव आहे.—

अर्जुन जोरानें म्हणतो:—

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥३५॥

मधुसूदन (मधु राक्षसाचा नाश करणाऱ्या कृष्णा!) **घ्नतः अपि** (यांनीं मला ठार मारिलें तरी) **एतान्** (ह्यांस) **त्रैलोक्यराज्यस्य हेतोः अपि** (त्रैलोक्याचें सर्व राज्य मिळत असलें तरी) **हन्तुं** (ठार मारण्याला) **न इच्छामि** (मी इच्छा करीत नाहीं.) **महीकृते किं नु** (मग पृथ्वीच्या राज्यासाठीं तर नाहींच ठार मारणार.)—मी मेलों तरी हरकत नाहीं; इतकेंच काय? पण त्रिलोकीचें राज्य मिळालें तरी मी आपल्या बंधुबांधवांस ठार मारणार नाहीं. कारण त्यांस मारून आम्हांस ह्या लोकीं सुख होणार नाहीं.—

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाऽऽश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥३६॥

जनार्दन (पापी पुरुषांस दंड करणाऱ्या व शत्रूंस त्रास देणाऱ्या कृष्णा!) **धार्तराष्ट्रान्** (धृतराष्ट्राच्या दुर्योधनादिक मुलांस) **निहत्य** (मारून) **नः** (आम्हांला) **का** (कोणतें) **प्रीतिः** (समाधान; आनंद) **स्यात्** (होईल बरें?)—मूर्खजनांस उचित जो क्षणभंगुरसुखाचा भोग त्याच्यासाठीं बंधुवर्गास मारून आम्ही चिरकाळ नरकवास भोगण्याचें साधन मात्र करून ठेवूं! समाधान तर नाहींच; पण दुःख मात्र अत्यंत होईल.—**एतान्** (ह्या) **आततायिनः** (घरें

जाळणें विष घालणें, खून करणें, चोरी करणें, दुसऱ्याची जमीन अगर बायको लाटणें, हीं कर्में करणाऱ्या लोकांस आततायी म्हणतात. सारांश अघोर व समाजविध्वंसाचीं कर्में करणाऱ्या दुष्टांस) **हत्वा** (मारून) **अस्मान्** (आम्हांला) **पापमेव** (पाप मात्र) **आश्रयेत्** (लागेल.)-ह्या पापी पुरुषांस मारून त्यांचें पातक मात्र आम्हीं आपल्या शिरावर घेतल्यासारखें होईल. किंवा आपल्या बांधवांस मारून आम्ही मात्र वर सांगितलेलीं अघोर पापें करून दुराचरणाचें श्रेय घेऊं!–' **आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्** ' (आततायी भेटला असतां त्यास एकदम मारावा ') असें अर्थशास्त्र सांगतें. पण ' **अहिंसा परमो धर्मः** ' (अहिंसा हा उत्कृष्ट धर्म आहे) असें **धर्मशास्त्र** म्हणतें; शिवाय ' **अर्थशास्त्राच्च बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः** (अर्थशास्त्रापेक्षां,—व्यवहारशास्त्रापेक्षां—धर्मशास्त्र हें जास्त महत्वाचें आहे.) म्हणून मी यांस मारीत नाहीं.—

म्हणून अर्जुन म्हणतोः—

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ३७॥

तस्मात (म्हणून) **स्वबान्धवान्** (आमचे बंधु) **धार्तराष्ट्रान्** (धृतराष्ट्राचे पुत्र, त्यांस) **हन्तुं** (मारण्यास) **वयं** (आम्ही) **अर्हाः** (योग्य) **न** (नाहीं.)-आम्हाला असें करणें योग्य नाहीं.-**माधव** (लक्ष्मीच्या, जें चांगलें आहे त्याच्या, धवा, स्वामी ! **हि** (म्हणून) **स्वजनं** (आमचेच भाऊबंद जे त्यांस) **हत्वा** (मारून) **सुखिनः** (सुखी) **कथं स्याम** (कसे होऊं बरें ?) आपला संबंध नाहीं अशा सामान्य पापी मनुष्याला सुद्धां मारणें योग्य नाहीं; मग दुर्योधनादि बंधु आमच्याच कुळांतले आहेत; त्यांस मारून आम्हांला कसें बरें सुख होईल ?—

अर्जुन आणखी म्हणतोः—

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।

कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥३८॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

हे जनार्दन! **यद्यपि** (जरी) **एते** (हे) **लोभोपहतचेतसः** (लोभानें नष्ट झाली आहे विवेकबुद्धि ज्यांची असे दुर्योधनादिक) **कुलक्षयकृतं** (कुलाच्या क्षयानें उत्पन्न होणारा, कुलाचा क्षय केला असतां लागणारा) **दोषं** (दोष) **च** (आणि) **मित्रद्रोहे** (मित्रमंडळीचा द्वेष केल्यानें) **पातकं** (होणारें पाप) **पश्यन्ति न** (पाहत नाहींत, जरी यांना हें किती मोठें पातक आपण करितों अहों हें समजत नाहीं)—तथापि—**कुलक्षयकृतं** (कुलक्षयानें लागणारें-**दोषं** (पाप) **प्रपश्यद्भिः** (समजणाऱ्या) **अस्माभिः** (आमच्या कडून, आम्हांला) **अस्मात्** (ह्या) **पापात्** (पापापासून) **निवर्तितुम्** (पाठीमागें होण्याला, परावृत्त होण्याला) **कथं न ज्ञेयं** (कसें बरें समजूं नये?)—त्यांना समजलें नाहीं म्हणून ते वेड्यासारखे वागतात; ते क्षम्य आहेत. पण हें पाप समजणारे जे आम्हीं, त्या आम्हींसुद्धां या अघोर कृत्याला पराङ्मुख होऊं नये कीं काय?—अज्ञ मनुष्यापेक्षां ज्ञानी पुरुषासच दुष्कर्माचें शासन उग्र असावें असें नीतिशास्त्र सांगतें ना?—

—कुलक्षयाचे दोष पहा.—

अर्जुन कुलहत्येच्या पातकांची परंपरा सांगतोः—

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥४०॥

कुलक्षये (कुलक्षय झाला असतां, कुलधर्म—चालविणाऱ्या लोकांचा संहार झाला असतां,—) **सनातनाः** (पुराणकालापासूनं चालत आलेले) **कुलधर्माः** (कुळाचे धर्म, मूळ पुरुषापासून चालत आलेले कुळाचार) **प्रणश्यन्ति** (नष्ट होतात;) आणि **धर्मे नष्टे** (धर्म नाहींसा झाला म्हणजे) **अधर्मः** (अधर्म, धर्मभ्रष्टता) **उत**

(ही) **कृत्स्नं** (सगळ्या) **कुलं** (कुळाला) **अभिभवति** (जिंकून टाकतो, सर्व कुलामध्यें भ्रष्टाकारही सुरूं होतो.)

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥४१॥

हे **कृष्ण! अधर्माभिभवात्** (अधर्म जोरावला असतां,) **कुलस्त्रियः** (कुलीन स्त्रिया) **प्रदुष्यन्ति** (–पुरुषांचें दुराचरण पाहून त्याही–अमंगल आचरण करूं लागतात)–आणि–**वार्ष्णेय** (वृष्णि-कुलांत जन्म पावलेल्या कृष्णा !) **स्त्रीषु दुष्टासु** (स्त्रिया अनाचारी, पतित झाल्या म्हणजे) **वर्णसकंरः** (जातीची भेसळ) **जायते** (उत्पन्न होते).

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ४२।

संकरः (ही भेसळ, कालवाकालव–) **कुलघ्नानां** (कुल-क्षय करणाऱ्यांचें) **च** (आणि) **कुलस्य** (त्या कुळांतील लोकांचें) **नरकायैव** (नरकाकडे–गमन करविते.)–सारांश या दोघांसही नरकप्राप्ति होते.–**हि** (कारण) **एषां** (ह्या दोघांचेही) **पितरः** (मेलेले पूर्वज) **लुप्तपिण्डोदकक्रियाः** (लुप्त, नाहींशा, झाल्या आहेत पिंड-दान आणि तर्पण इत्यादि क्रिया ज्यांच्यासंबंधानें असे) **पतन्ति** (नरकांत जाऊन पडतात).—म्हणजे कुलक्षय व वर्णसंकर झाल्या-कारणानें व श्राद्धपक्षादिक क्रिया करावयास कोणी नसल्यामुळें, पूर्वज नरकास जातात आणि मग कुलहत्या करणारे व कुलभ्रष्ट झालेले लोक हे सर्वही नरकास जातात.

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः४३।

वर्णसंकरकारकैः (वर्णसंकर उत्पन्न करणाऱ्या) **एतैः** (ह्या) **कुलघ्नानां दोषैः** (कुलक्षय करणाऱ्या लोकांच्या पातकांनीं) **शाश्वताः** (सनातन चालत आलेले) **जातिधर्म** (जातीचे धर्म) **च**

(आणि) **कुलधर्माः** (कुलधर्म) **उत्साद्यन्ते** (नाहींसे होतात).

—एकें कुलालाच करावयास लागणाऱ्या विधीस कुलधर्म म्हणतात. आणि सर्व जातीला आवश्यक अशा नित्यनैमित्तिकांस जातिधर्म म्हणतात. म्हणजे प्रत्येक कुलांतील पुरुषांस जातीचे व वर्णाश्रमाचे धर्म पाळून शिवाय कुलधर्मही पाळावे लागतात —

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥

हे—**जनार्दन**—**उत्सन्नकुलधर्माणां** (नष्ट झाले आहेत कुलधर्म ज्यांचे अशा) **मनुष्याणां** (मनुष्यांचें) **वासः** (वास्तव्य, गृहण्याचें ठिकाण) **नियतं** (निश्चयानें अर्थातच, अवश्यक रीतीनें) **नरके** (नरकामध्यें) **भवति** (होतें) **इति** (ह्याप्रमाणें) **अनुशुश्रुम** (आम्हीं गुरूपासून ऐकिलें आहे.)

—कुलक्षयाच्या पातकाविषयीं आमच्या पूर्वजांच्या मनांत केवढी जबरदस्त भीति होती बरें ? ग्रीस, रोम इत्यादि जुन्या आर्य लोकांत हीच समजूत दृष्टीस पडते. समाजाला स्थैर्य देण्याला ह्या समजुतींचा फारच मोठा उपयोग होतो.—

अर्जुन पश्चात्ताप पावून शेवटीं म्हणतोः—

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः॥४५॥

अहो (अरेरे !) **बत** (पहा) **वयं** (आम्हीं) **महत्पापं** (महापातक, अघोर पातक) **कर्तुं** (करण्यास) **व्यवसिताः** (प्रवृत्त झालों आहोंत) **यत्** (म्हणजे) **राज्यसुखलोभेन** (राज्य मिळाल्यावर जें सुख मिळेल त्याच्या आशेनें.) **स्वजनं** (आपल्याच) बंधुबांधवांस) **हन्तुं** (मारण्यासाठीं) **उद्यताः** (—आम्ही—तयार झालों आहोंत !)—काय सुखाची ही जबरदस्त तृष्णा कीं जिच्या पाठीमागें लागून सुख मिळविण्यासाठीं आम्ही आपल्याच कुळगोताला मारायाला तयार झालों ! धिक्कार असो, या सुखतृष्णेला !—

शेवटीं विरक्तीचें भाषण अर्जुन करित आहे तें पहाः—

यदिमामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥४६॥

यदि (जर) **शस्त्रपाणयः** (शस्त्रें आहेत हातांमध्यें ज्यांच्या असे) **धार्तराष्ट्राः** (धृतराष्ट्रपुत्र) **अप्रतीकारं** (उलट शस्त्र न उगारणाऱ्या, सूड न उगविणाऱ्या) **अशस्त्रं** (–व–शस्त्रच धारण न करणाऱ्या) **मां** (मला) **रणे** (या समरभूमीवरच) **हन्युः** (मारून टाकतील) **तत्** (तर) **मे** (माझें) **क्षेमतरं** (अधिकच कल्याण) **भवेत्** (होईल).

—मीं आतां निःशस्त्र होतों. स्वतःचा प्राण वांचविण्याची देखील मी खटपट करणार नाहीं. मला जरी दुर्योधनादिकांनीं ठार मारिलें तरी उत्तमच होईल.—

संजय उवाच—

संजय धृतराष्ट्रास सांगतोः—

एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः॥४७॥

एवं (याप्रमाणें) **उक्त्वा** (बोलून)–आणि–**सशरं** (बाणासहित असलेलें जें) **चापं** (धनुष्य तें) **विसृज्य** (हातांतून खालीं टाकून) **शोकसंविग्नमानसः** (शोकानें व्यापून टाकिलें आहे चित्त ज्याचें, शोकमोहानीं पराभव झाला आहे ज्याचे बुद्धीचा असा,) **अर्जुनः** (अर्जुन) **संख्ये** (युद्धामध्यें, युद्धभूमीवर,–दोन्ही सैन्यें पहात असतां–) **रथोपस्थे** (रथाच्या मध्यें, रथांतील आसनावर) **उपाविशत्** (बसला; सैन्य पाहण्यासाठीं उभा राहिला होता तो खालीं बसला.)

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः॥ १ ॥

15.6.60

(याप्रमाणें श्रीमद्भगवद्गीता नामक उपनिषदांमधील श्रीकृष्णार्जुन-संवादांत उत्पन्न झालेल्या वेदांतांतील योगशास्त्रांत ' अर्जुनास झालेला विषाद ' या नांवाचा **प्रथम अध्याय संपला.**)

अथ द्वितीयोऽध्यायः ।

संजय उवाच.

अर्जुनास अशा तऱ्हेचें वैराग्य उत्पन्न झालेलें ऐकून हर्षमुख झालेल्या धृतराष्ट्राचा मोह घालविण्यासाठीं संजय म्हणाला:—

तं तथा कृपयाऽऽविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

तथा (आप्त, इष्टमित्रांचा नाश होत असल्यामुळें) **कृपयाऽऽविष्टं** (कृपा म्हणजे ' हे माझे ' अशी जी माया किंवा स्नेहविशेष किंवा करुणाविशेष, त्यानें आविष्ट म्हणजे व्याकुळ झालेल्या अशा) **अश्रुपूर्णाकुलेक्षणं** (अश्रूंनीं भरून गेल्यामुळें दिसत नाहीं ज्याच्या डोळयांस, किंवा चंचल झाले आहेत डोळे ज्याच्या अशा,) —आणि—**विषीदन्तं** (माझ्या हातून हा एवढा वध होऊन कुलक्षय होणार म्हणून खिन्न झाला आहे अशा) **तं** (त्या अर्जुनाला) **मधुसूदनः** (मधु राक्षसाचा नाश करणारा श्रीकृष्ण) **इदं** (पुढील) **वाक्यं** (वाक्य) **उवाच** (बोलता झाला.)

***श्रीभगवानुवाच**— (श्री भगवान् म्हणाले:—)

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

---

*' ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
वैराग्यस्याथ मोक्षस्य षण्णां भग इतीङ्गना ॥

(समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, संपत्ति, वैराग्य आणि मोक्ष ह्यांस ' भग ' असें म्हणतात.) तें ज्यांस आहे तो **भगवान् होय.**— **ह्याचप्रमाणें**—

अर्जुन (हे गौरवर्ण अर्जुना!) **अनार्यजुष्टं** (आर्य म्हणजे श्रेष्ठ, मुमुक्षु, मोक्षास जाऊं इच्छिणारे, त्यांनीं ज्याचा स्वीकार केला नाहीं असें, किंवा अनार्य लोकांनीं ज्यांचा स्वीकार केला आहे असें) **अस्वर्ग्यं** (स्वर्गलोकांस न नेणारें, किंवा स्वर्गास जाऊं इच्छिणाराला अयोग्य)—आणि—**अकीर्तिकरं** (अपकीर्ति उत्पन्न करणारें) **इदं** (हें) **कश्मलं** (कृष्णवर्ण पातक किंवा मोह) **त्वा** (सर्व क्षत्रियांत श्रेष्ठ व शंकराबरोबर युद्ध करणाऱ्या तुला) **विषमे** (ऐन लढाईच्या अति भयंकर प्रसंगीं, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं) **कुतः** (कोठून) **समुपस्थितं** (उत्पन्न झालें?)

—या तुझ्या वेडगळ मोहानें व भीतीनें तुला मोक्ष मिळणार नाहीं, स्वर्ग मिळणार नाहीं व कीर्तिही मिळणार नाहीं; असलें वेड तुझ्यासारख्या धीर पुरुषाच्या डोक्यांत कोठून शिरलें? हा भाव.—

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

पार्थ (इंद्रप्रसादानें कुंतीच्या पोटीं झालेल्या अर्जुना!) **क्लैब्यं** (धैर्य, ओज आणि तेज ह्यांचा भंग करणारा हा भित्रेपणा त्याला) **मा गमः स्म** (जाऊं नको—म्हणजे भेकडपणाला वश होऊं नको.) **एतत्** (हा असला नेभळेपणा) **त्वयि** (निवातकवच, कालखंज वगैरे राक्षसांस मारणाऱ्या तुला) **न उपपद्यते** (शोभत नाहीं, योग्य नाहीं.)—म्हणून—**क्षुद्रं** (अधोगतीस नेणारी किंवा कमीपणा आणणारी) **हृदयदौर्बल्यं** (अंतःकरणाची दुर्बळता) **त्यक्त्वा** (टाकून देऊन) **परंतप** (शत्रूंस जर्जर करून त्रास देणाऱ्या हे अर्जुना!) **उत्तिष्ठ** (तूं उठ) श्रेष्ठ असें आपलें कर्तव्यकर्म करित असतां किरकोळ गोष्टींकडे लक्ष्य न देणें हें शाहण्या माणसाचें काम आहे, असें श्रीकृष्ण

'उत्पत्तिं च विनाशं च भूतानामागतिं गतिम् ।
वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो 'भगवानिति' ॥
(प्राणिमात्रांची उत्पत्ति आणि नाश. भावि संपत्ति आणि विपत्ति, ज्ञान आणि अज्ञान ह्या सर्वांचीं कारणें जो जाणतो त्यास भगवान म्हणावें)

सुचवितात.—

अर्जुन उवाच—

या भगवंताच्या बोलण्याला अर्जुन प्रत्युत्तर देता झाला:—

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

हे **मधुसूदना ! अहं** (मी) **भीष्मं द्रोणं च** (ज्यांनीं माझ्यावर अनंत उपकार केले आहेत त्या भीष्मद्रोणांशीं) **संख्ये** (युद्धामध्यें) **कथं** (कसा) **इषुभिः** (बाणांनीं) **प्रतियोत्स्यामि** (उलट युद्ध करूं, त्यांच्यावर बाण कसे टाकूं ?) **अरिसूदन** (अरि—सुदर्शनचक्र त्याच्या योगानें शत्रूंचा नाश करणाऱ्या कृष्णा !) **पूजार्हौ** (हे उभयतांही मला वंदनीय, पूज्य,—आहेत.—) पुष्पादिकांनीं पूजा करावयाची सोडून भीष्मद्रोणांवर माझ्यानें प्रखर बाण कसे टाकवतील ? हा भाव.—

अर्जुन आपला अभिप्राय सांगतो:—

गुरूनहत्वा हि महानुभावा-
ञ्श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वाऽर्थकामांस्तु गुरूनिहैव
भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥५॥

महानुभावान् (मोठे आहेत आत्मे ज्यांचे अगर श्रुत, अध्ययन तप, आचरण वगैरे मान्य आहे ज्यांचें अशा) **गुरून् हि** (आचार्यांस, श्रेष्ठ पुरुषांस) **अहत्वा** (न मारतां, न मारल्यामुळें, मारलें नाहीं म्हणून) **इह लोके** (ह्या लोकींच) **भैक्ष्यं भोक्तुमपि** (आमच्यासारख्या क्षत्रियांस निषिद्ध जी भिक्षावृत्ति ती चालविण्याची पाळी आल्यास तीही) **श्रेयः** (चांगली आहे; तीही मला पत्करेल) **अर्थकामान्** (द्रव्याचा लोभ ज्यांस उत्पन्न झाला आहे अशा) **गुरून्** (गुरूंस,) **हत्वा** (मारून) **इहैव** (येथें सुद्धां—परलोकाची तर गोष्ट राहूंदेच. पण येथें मृत्युलोकीं सुद्धां—) **रुधिरप्रदिग्धान्** (रक्तानें माख-

लेलीं अशी) **भोगान्** (सुखें—सुख कसलें दुःखच —) **भुञ्जीय** (भोगा-वयास लागतील नाहीं बरें ?) येथील सुखें मिळविण्याला सुद्धां आम्हाला, अत्यंत रक्तस्राव करावा लागेल. मग स्वर्गांतील शुद्ध सुख कोठून मिळणार ? हा भाव. कसाही गुरु झाला तरी तो वंदनीयच होय. त्याला मारून दुःखच पैदा होणारना ? म्हणून मी भिक्षावृत्ति पत्करितों; पण गुरूंबरोबर लढत नाहीं.—

(**आर्थकामन्** हें कोणी ' **भोगान्** ' याचें विशेषण करितात आणि असा अर्थ सांगतात कीं 'भीष्मद्रोणादिकांस मारून फार तर येथें अर्थ आणि काम साधतील म्हणजे पैसे मिळतील व चैन करावयास सांपडेल हें खरें, पण धर्म आणि मोक्ष हे मुळींच साध्य होणार नाहींत' असें अर्जुनाचें म्हणणें आहे. **शंकरानंद** ' अर्थकामान् ' हें ' गुरून् ' या पदाचेंच विशेषण करून धर्मोपदेशक असा त्याचा अर्थ करितात. स्कंदरीनें पहिला अर्थच चांगला दिसतो.)

आणखी पुनः—

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो
यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषाम-
स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

च (आणि) **नः** (आम्हाला) **कतरत्** (कोणतें) हिंसाशून्य भिक्षा-वृत्ति, किंवा क्षत्रियधर्मानें विहित असें युद्ध, यांपैकीं कोणतें) **गरीयः** (मोठें, योग्य आहे) **एतत्** (हें) **न विद्मः** (समजत नाहीं.)—शिवाय युद्धाला आरंभ केला तरी—**यद्वा जयेम** (आम्हाला जय मिळेल) **यदि वा नो जयेयुः** (किंवा—आमचे शत्रु आम्हांस जिंकितील हेंही समजत नाहीं ! बरें जय झाला तरी तो पराजयासारखाच, दोहोंची फल-श्रुति एकच आहे.) कारण—**यानेव** (ज्यांना मात्र) **हत्वा** (मारून) **न जिजीविषामः** (आम्हाला जगण्याची इच्छा नाहीं) **ते धार्तराष्ट्राः** (तेच धृतराष्ट्राचे पुत्र, आमचे भाऊबंद) **प्रमुखे** (युद्धासाठीं आम-च्या समोर) **अवस्थिताः** (उभे राहिले आहेत !).

याप्रमाणें युद्ध करावें कीं नाहीं, केलें तर जय मिळेल कीं नाहीं आणि जय मिळाला तरी सुख मिळेल कीं नाहीं, असा जबरदस्त संशय अर्जुनास प्राप्त झाला आहे.

सारांश अर्जुन सांगता झाला:—

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः (कार्पण्य म्हणजे स्वजनाविषयीं अनुकंपा व दोष म्हणजे त्यांच्या वधानें उत्पन्न होणारें पाप, या दोहोंच्या योगानें उपहत म्हणजे दूषित अगर झांकून गेला आहे स्वभाव म्हणजे अंतःकरण ज्याचें असा)—आणि म्हणून—**धर्मसंमूढचेताः** (धर्म म्हणजे आपलें कर्तव्य, ज्याच्या संबंधानें घोंटाळा झाला आहे मनाचा ज्याच्या असा मी) **त्वां** (तुला) **पृच्छामि** (विचारतों). **यत्** (जें) **श्रेयः** (कल्याणदायक कर्तव्य) **स्यात्** (असेल) **तत्** (तें) **मे** (मला) **निश्चितं** (निश्चित करून, खास ठरवून) **ब्रूहि** (सांग) **ते** (तुझा) **अहं** (मी) **शिष्यः** (शिष्य आहें) **त्वां** (तुझ्याकडे) **प्रपन्नं** (आलेल्या) **मां** (मला) **शाधि** (शिकीव)

—मी घोंटाळून गेलों आहें, म्हणून माझें कल्याण ज्यानें होईल असें माझें खरें कर्तव्य मला सांग, मी तुला शरण आलो आहे. हा भाव.—

कार्पण्य म्हणजे आत्मवस्तूचें अज्ञान असें उपनिषदांत सांगितलें आहे. '**यो वा एतदक्षरमविदित्वाऽस्माल्लोकात्प्रैति स कृपणः**' (अक्षर असा जो परमात्मा याला न जाणतां जे. या लोकांतून जातो तो कृपण होय.) धर्म म्हणजे परब्रह्म. 'श्रेय' म्हणजे निःश्रेयसपद (मोक्षपद) असे या शब्दांचे अर्थ घेऊन वेदांतपर अर्थ कित्येक टीकाकारांनीं केला आहे. चवथ्या ओळींतील अर्थान्वयेंच '**अधीहि भगवो ब्रह्मेति**' असें वरुणाला भृगुऋषि म्हणाला आहे. हा वेदांतपर

अर्थ इतक्यांतच घ्यावा कीं नाहीं हा वादग्रस्त विषय आहे; सबब याचा विचार येथें करितां येत नाहीं.

सारांशः—

न हि प्रपश्यामि ममापनुद्या-
द्यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाऽऽधिपत्यम् ॥ ८ ॥

यत् (जें) **इन्द्रियाणां** (इंद्रियांचा) **उच्छोषणं** (शोषण करणारा, ताप देणारा जो) **मम** (माझा) **शोकं** (शोक, दुःख) **अपनुद्यात्** (निवारण करील, नाहींसें करील. असें कांहीं) **न प्रपश्यामि** (मला तर दिसत नाहीं). **भूमौ** (पृथ्वीवर) **असपत्नं** (निर्वैर) —व— **ऋद्धं** (समृद्ध, संपन्न) **राज्यं** (राज्य) **अवाप्य** (मिळाल्यावर, मिळालें तरी) आणि **सुराणां** (देवांचें) **आधिपत्यमपि** (स्वामित्वहि मिळालें तरी)—सुद्धां माझा शोक हरणारा उपाय मला दिसत नाहीं—**हि** (म्हणून) कृष्णा ! मला तूं निश्चित उपाय सांग, असा पाठीमागच्या श्लोकाशीं अन्वय करावा.—अर्जुनास खरें वैराग्य बाणलें होतें असा तिसऱ्या व चवथ्या ओळीवरून **मधुसूदनी** टीकाकार गूढार्थ काढितात. भावार्थ स्पष्ट आहे कीं 'या युद्धांत जय मिळाला व त्रैलोक्याचें राज्य मिळालें तथापि कुलहत्येपासून होणाऱ्या पापाचें क्षालन करील असा मला उपाय दिसत नाहीं.'—

संजय उवाच—

संजय धृतराष्ट्रास सांगता झालाः—

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ।९।

एवं (याप्रमाणें) **हृषीकेशं** (इंद्रियस्वामी व सर्वशक्तिमान् परमेश्वराशीं) **उक्त्वा** (बोलून) **परंतप** (शत्रूस ताप देणाऱ्या धृतराष्ट्रा !) **गुडाकेशः** (निद्रास्वामी, निरलस अर्जुन) **'न योत्स्ये'** (मी युद्ध करीत नाहीं) **इति** (असें) **गोविन्दं** (गो म्हणजे वाणी

तिचा प्रवर्तक जो सर्वज्ञ कृष्ण त्याला) **उक्त्वा** (सांगून) **ह** (खरो-खर) **तूष्णीं** (स्तब्ध) **बभूव** (झाला).

मधुसूदनीकार या श्लोकाचा वैराग्यपर अर्थ लावून अर्जुन निष्क्रिय झाला असें म्हणतात.

आनंदगिरी 'अर्जुन शोकातिशयानें स्तब्ध झाला' असें म्हणतात. —'गोविंद आणि हृषीकेशी' या नांवांवरून सर्वज्ञ परमेश्वराचें सामर्थ्य सांगून अर्जुनास तोच उपदेशक श्रेष्ठ आहे असें सुचविलें.—

संजय म्हणता झाला:—

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः॥ १०॥

भारत (धृतराष्ट्रा!) **उभयोः सेनयोः मध्ये** (दोन्हीं सैन्यांच्या मध्यें असून) **विषीदन्तं** (युद्ध करण्याच्या उत्साहानें ऐन आयत्या वेळेस खिन्न झालेल्या) **तं** (अर्जुनाला) **प्रहसन्निव** (थट्टा, उपहास केल्यासारखें दाखवून, अनुचित आचरण करणारा जो अर्जुन त्याला लज्जासागरांत ढकलण्याच्या हेतूनेंच उपहासपूर्वक हंसणारे) **हृषीकेशः** (श्रीभगवान्) **इदं वचः उवाच** (याप्रकारें [खालीं सांगितल्याप्रमाणें] बोलते झाले.)—येथें संगति लावण्याकरितां जोडलेली प्रस्तावना संपली आणि येथून **गीतेस** आरंभ झाला.—

श्रीभगवानुवाच—

आचार्यांची *विशेष प्रस्तावना.

अत्र च—'दृष्ट्वा तु पाण्डवानीकं' इत्यारभ्य 'न योत्स्य

---

* लढाईची तयारी होऊन आतां शस्त्रास्त्रांच्या विसर्जनास सुरुवात होणार, इतक्यांत अर्जुनास उपरति होऊन तो युद्धापासून पराङ्मुख झाला. हें पाहून भगवंतांनीं अठरा अध्याय गीता सांगितली अशी पौराणिक आख्यायिका आहे. सिंहनाद होऊन शंख भेरी इत्यादिकांचा घोर आणि प्रचंड रव सुरू झाला आहे, शस्त्रास्त्रें खणाणूं लागलीं आहेत अशावेळीं अर्जुनासारख्या युद्धशास्त्रकुशल आणि

इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूवह' इत्येतदन्तः प्राणि-

युद्धापासून होणारे परिणाम उत्कृष्ट रीतीनें समजले आहेत, असें उद्योगपर्वातच दाखविणाऱ्या महावीराला उपरति व्हावी हें आश्चर्यकारक आहे; आणि उभय सैन्यांतील वीर भांडण्यास तयार झाले असतांही ते स्तब्ध झाले, श्रीकृष्णानीं स्वस्थ मानसें करून परमार्थविषयाची फोड करून सांगितली आणि अर्जुनानें ती शांतमनानें ऐकिली, हें तर विशेषच आश्चर्यकारक आहे असें कोणासही वाटण्याचा संभव आहे. अठरा अध्याय गीता सांगणें व ऐकणें संभवतात कशीं हा प्रश्न लहानपणापासून निराळेंच कांहीं ऐकण्याच्या संवयीमुळें सोपासा वाटतो, परंतु निसर्गतः तो अतिशय महत्वाचा आहे. अर्थातच या प्रश्नाचें कांहीं निराकरण होईल असें कित्येक वाचकांस वाटलें असावें इतकेंच नव्हे, तर एक दोन सद्गृहस्थांनीं अशाप्रकारचे उद्गारही काढलें आहेत. इतरांप्रमाणेंच मलाही ह्या प्रश्नाचें गूढ होतें व अद्यापिही अंशतः आहे, तथापि कै० वा० रघुनाथशास्त्री पर्वते यांनीं आपल्या सुंदर 'भाषाविवृत्तित' दुसऱ्या कोणा करवीं ध्वनित करविल्याप्रमाणें दाखविलें आहे असें दिसतें. त्यावरून केवळ ग्रंथाच्या स्तुत्यर्थ ह्या उत्कृष्ट व सर्वव्यापी गीताशास्त्रामध्यें कृष्णार्जुनसंवादाची योजना केली असावी, किंवा युद्धकालीं श्रीकृष्णांनीं आपल्या योगसामर्थ्यानें कुशाग्रबुद्धीच्या अर्जुनास थोडक्या शब्दांमध्यें शास्त्राचें रहस्य समजावून दिलें असावें व पुढें ह्या रहस्याचा विस्तार व्यासऋषींनीं केला असावा; किंवा कृष्णार्जुन हे बोलण्यामध्यें गुंतलें आहेत म्हणून व सकल वीरांमध्यें श्रेष्ठत्वानें वागणारा जो अर्जुन त्याच्यावर आपणच होऊन एकाएकीं हल्ला केला असतां क्षत्रियधर्मास कलंक लागेल आणि अर्जुन क्रोधसंतप्त झाला असतां सर्व वीरांचें एका पाशुपत अस्त्रानेंच कंदन करून टाकील, या भीतानें कौरवसेनासमूह चित्रासारखा तटस्थ उभा राहिला असावा; अशांपैकीं कोणता तरी एक भाग झाला असावा अशी कल्पना करून गेल्या अंकांतील प्रस्तावनेमध्यें या चमत्कारिक परंतु मनोरंजक प्रश्नाचा उलगडा करण्याच्या कामीं मीं तटस्थपणाचें व्रत पत्कारिलें होतें. लढाईची तयारी झाली असतांही उभयपक्षांकडील सेनानीं वादविवाद करीत होते म्हणून दोन्ही सैन्यें तटस्थ राहिलीं व लढाई झाली नाहीं असा प्रसंग ग्रीसच्या इतिहासांत एकदां आला आहे; तसेंच पर्शिआच्या सैन्याविरुद्ध लढाई करण्यासाठीं अथीनियन व स्पार्टन लोक आपापल्या सैन्याचे व्यूह बांधून उभे राहिलें असतां एक चमत्कारिकच प्रश्न निघून लढाईच्या जागेवरून ग्रीक लोकांचें सैन्य मागें हटलें असा प्लाटियाच्या लढाईंतही चमत्कार घडून आला होता. तात्पर्य, लढाईला सज्ज झालेले व सेनानीचे वीरश्रीजनक भाषणानें प्रोत्साहन पावलेले वीर नेहमीं लढाई ठोकतातच असा नेम नाहीं, हें रोमच्या विरुद्ध तिळांजळी घेतलेल्या हानिबाल नामक जगद्विजयी वीराशीं ल-

नां शोकमोहादिसंसारबीजदोषोद्भवकारणप्रदर्शनार्थत्वेन व्याख्येयो ग्रन्थः* ।

ढताना रोमन लोकांच्याही अनुभवास आलेलें होतें. हा सर्व प्रकार ध्यानांत अ-सल्यामुळें व भारती युद्धांतील अलौकिक स्तब्धतेचा सयुक्तिक उलगडा अद्यापपर्यंत सांपडला नसल्यामुळें मी स्तब्ध राहिलों होतों. आतां लिहिण्यास आनंद वाटतो कीं सर्व भगवद्गीता सुमारें एकुणऐशीं श्लोकांत भगवंतांनीं अर्जुनास सांगितली व त्यांतील मुख्य सिद्धांतांस अनुलक्षून त्रिकालज्ञ व्यास ऋषींनीं सर्व गीताशास्त्र निर्माण केलें, असा आकर (?) नामक ग्रंथांत उल्लेख असल्याविषयीं माझे चुलत बंधु ती. रा. नरसो गणेश ऊर्फ रावसाहेब भानु पेन्शनर मामलेदार मिरज हे कळवितात. रावसाहेब भानु ह्यांची शोधकबुद्धि आणि संग्रहलालसा, इंग्लिश भाषा शिकल्यामुळें आपण सर्व तऱ्हेनें विद्वान झालों असें समजणाऱ्या आधुनिक पंडितांनीं लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. असो; रावसाहेब भानूंनीं गीतेंतील सर्व सिद्धांतभूत श्लोकांचें टिप्पण माझ्याकडे पाठवुन दिलें आहे व ते श्लोक मुख्य सिद्धांतासारखे आहेत असें आज दिसत आहे. हे असे सिद्धांतभूत श्लोक कोणते ते यथाप्रसंगीं सांगण्यांत येतीलच. हे श्लोक सांगितल्यावर शोधक लोकांच्या विचारास एकप्रकारचें वळण लागेल. सारांश, अशा तऱ्हेनें या गूढ प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीनें झाल्यास एक आनंदाची गोष्ट झाली, आणि प्रस्तुतचें मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचे जे अनेक हेतु आहेत, त्यांतील एक सिद्धीस गेला म्हणून या मासिक पुस्तकाच्या संपादकास एक प्रकारचा अभिनव आनंद उत्पन्न होईल. हें निराळें सांगावयास नकोच आहे. ह्या कामीं सर्व वाचकांनीं शोध करण्याचें मनांत आणून खटपट केल्यास व त्या खटपटीचे फळाचा आस्वाद मला चाखूं दिल्यास एकंदरानें जो सत्परिणाम घडून येईल त्याचें आजच विवरण करीत बसत नाहीं.

* गीतेमध्यें काय सांगितलें आहे त्याच्या, वेदांतमतांस अनुसरून असणाऱ्या सारांशाचें आचार्यांनीं ह्या प्रस्तावनेंत निरूपण केलें आहे. ह्या निरूपणांत काय सांगितलें आहे त्याचें तात्पर्य वाचकांच्या सोईसाठीं येथें देतों. हें तात्पर्य वाचलें असतां आचार्यांचें रहस्य स्थूलमानानें समजेल असें वाटतें. आचार्यांनीं प्रथमतः अर्जुनास शोक व मोह कसे प्राप्त झाले व त्यांचा परिणाम स्वकर्तव्य करण्यामध्यें पराङ्मुखता उत्पन्न करण्याकडे कसा झाला; हें सांगून प्राणिमात्रास संसारामध्यें शोक मोह उत्पन्न झाल्यामुळें सर्व जीव स्वकर्तव्यापासून कसे परावृत्त होतात याचेंही दिग्दर्शन केलें आहे. ही कर्तव्यपराङ्मुखता नाहींशी व्हावी म्हणून अर्जुनास निमित्तमात्र पुढें उभा केला व सर्व प्राण्यांस संसारतापापासून मुक्त करण्या-

ह्या गीताशास्त्रांत 'पांडवांची सेना पाहून' (अध्याय १ श्लोक २) येथपासून आरंभ करून 'गोविंदा! मी युद्ध करीत नाहीं, असें म्हणून —अर्जुन—स्तब्ध राहिला.' (अध्याय २ श्लोक ९) येथपर्यंत झालेल्या ग्रंथाचा मथितार्थ असा काढावयाचा कीं, प्राण्यांस जे शोक, मोह (शोक म्हणजे मनास होणारा संताप आणि मोह म्हणजे तारतम्यशून्यता) वगैरे दोष (विकार) उत्पन्न होतात तेच दुःखमय असणाऱ्या संसाराला उत्पन्न करितात आणि या दोषांचें कारण अविद्या (अज्ञान

साठीं भगवंतांनीं ही गीता सांगितली असें आचार्य म्हणतात. आतां गीतेंत काय सांगितलें आहे असा प्रश्न निघतो; त्याचें उत्तर आचार्य असें देतात. मोक्ष मिळण्याची ज्याला इच्छा असेल, त्यानें सर्व कर्मांचा संन्यास करावा. (कर्म आपल्या हातून झालें तरी त्याच्या फलाविषयीं कोणत्याही प्रकारची आशा न ठेवितां तें तें कर्म परमेश्वराच्या ठायीं समर्पण करावें असा संन्यास या शब्दाचा अर्थ आहे.) याप्रमाणें कर्मसंन्यास करून ब्रह्मज्ञान मिळविण्याची खटपट केली व तें ज्ञान प्राप्त होऊन स्वानुभव मिळाला म्हणजे मुक्ति मिळते. कर्म करावें व ज्ञानही मिळवावें म्हणजे मुक्ति साध्य होइल, असें कर्मठ लोकांचें म्हणणें आहे तें विरोधात्मक आहे. फलप्राप्तीच्या आशेनें कर्म करणें आणि फलाशा न ठेविता निष्क्रिय अशा परब्रह्माचें ज्ञान संपादन करून घेणें; (अथवा कर्मयोग आणि ज्ञानयोग) या परस्परविरोधी गोष्टी आहेत असें गीतेचाच आधार दाखवून आचार्यांनीं, श्रौतस्मार्त कर्म केलें पाहिजे, असा आग्रह धरणाऱ्या कर्मठांच्या मताचें सयुक्तिक खंडन केलें आहे; आणि कर्मठ लोकांचेंच मत खरें आहे असें धरल्यास गीतेंतील सिद्धांतवाक्यास कसा विरोध येतो हेही दाखविलें आहे. शेवटीं जनकादिक राजर्षी व कृष्णासारखे पूर्ण ज्ञानी हे कर्म करितात तें चित्तशुद्धिसाठीं अगर लोकोपकारार्थ करितात असें गीतेंतील आधार दाखवून सिद्ध केलें आहे; आणि असा सिद्धांत काढला आहे कीं मोक्षप्राप्ति होते ती केवळ शुद्धज्ञानानें मात्र होते.

ह्या आचार्यकृत प्रस्तावनेचा सारांश सांगितला. आचार्य हे वेदांतमताचे उत्कृष्ट प्रस्थापक होते व त्यांनीं सर्वमतांचें शास्त्रानें व युक्तीनें खंडन करून मोक्ष मिळवून देणाऱ्या सर्व धर्मांचें व तत्वज्ञानाचें एकीकरण केलें आहे, इतकेंच नव्हें, तर मानवी प्राण्याचें ज्ञान वाढून त्यानें आणखी कितीही नवीन मतें काढलीं किंवा धर्म निर्माण केले, तथापि त्या सर्वांचा अंतर्भाव वेदांताच्या आचार्यसिद्धान्तांमध्यें करितां येईल इतक्या विस्तृत पायावर वेदांतमताची स्थापना आचार्यांनीं केली आहे. पुढील ज्ञानानें वेदांतसिद्धांताची मांडणी फार तर निराळ्या तऱ्हेनें करावी लागेल; पण त्यांतील सिद्धांताला बाध येणार नाहीं अशी वेदांताची योग्यता आहे. अशा सर्वव्यापी व देश, स्थल प्रसंगांनीं अबाधित राहणाऱ्या वेदांतमताची वाच-

अगर माया) आहे; हें दाखविण्यासाठीं ह्या भागाची योजना केलेली आहे.—म्हणजे संसार (जन्ममरण) उत्पन्न होण्याला कारण शोक आणि मोह होत. या शोकमोहांचें कारण अविद्या आहे. सारांश, मायेच्या योगानें जीवास शोक आणि मोह होतात आणि शोकमोहामुळें जीव संसारांत पडतो; असें पूर्वग्रंथावरून सांगण्याचा उद्देश आहे.—

तथा ह्यर्जुनेन राज्यगुरुपुत्रमित्रसुहृत्स्वजनसंबन्धिबान्धवेष्वहमेषां ममैत इत्येवं प्रत्ययनिमित्तस्नेहविच्छेदादिनिमित्तावात्मनः शोकमोहौ प्रदर्शितौ 'कथं भीष्ममहं संख्ये' इत्यादिना। शोकमोहाभ्यां ह्यभिभूतविवेकविज्ञानः स्वत एव क्षत्रधर्मे युद्धे प्रवृत्तोऽपि तस्माद्युद्धादुपरराम। परधर्मं च भिक्षाजीवनादिकं कर्तुं प्रववृते।

त्याचप्रमाणें येथेंही पहा कीं, 'हें माझें राज्य, हे माझे गुरु, हे पुत्र, मित्र, स्नेही, भाऊबंद, आप्त वगैरे माझे' व 'मी यांचा,' अशा प्रकारच्या मायेनें उत्पन्न झालेले जे शोक, मोह वगैरे विकार (संयोग

कांस ओळख करून देणें व या सिद्धांताची आणि पाश्चिमात्यांच्या आधुनिक वेदांताची एकवाक्यताच आहे, हें सविस्तर रीतीनें दाखवून देणें आगत्याचें काम आहे. परंतु भगवद्गीते सारख्या छोटेखानी मासिकपुस्तकांत वेदांतमताची उत्पत्ति कशी व केव्हां झाली, त्याचा इतर मतांशीं काय संबंध आहे, अद्वैत मतानें सृष्टीमध्यें दिसणाऱ्या अनंत चमत्कारांचा उलगडा कसा होतो, तसेंच मनुष्याच्या चंचल मनाला ह्या मताच्या परिशीलनानें कसें स्थैर्य येतें, यच्चयावत ज्ञानाचें पर्यवसान अद्वैतामध्येंच कसें होतें, आणि अद्वैतमताचा स्वीकार केल्यावर आचरणाचे मार्ग कोणते वगैरे अति महत्वाच्या विषयांवर विस्तारानें लिहिणें किंवा लिहितां येणें अत्यंत अवघड आहे, म्हणून ह्या विषयावर निराळें व एक पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे. अर्थातच आचार्यांच्या गीतेवरील भाष्यामध्यें जे जे विषय येतील त्यांची फोड प्रस्तुत मासिकपुस्तकांत होईलच; पण ज्यांना या विषयांवर विस्तृत विवेचन पाहिजे आहे; व असे पुष्कळ जिज्ञासु व मुमुक्षु गृहस्थ आहेत हें मला माहीत आहे—त्यांच्या सोईसाठीं व माझ्या मनाच्या समाधानासाठीं वर लिहिल्याप्रमाणें मी प्रयत्न करणार आहे. हा प्रयत्न केव्हां व कसा प्रकट करावयाचा याची सूचना योग्यवेळीं करीन इतकें सांगून हें अगत्याचें विषयांतर आटोपतों.

झाला असतां सुखप्राप्ति होणें, वियोग झाला असतां शोक होणें, बंधूस मारण्याचें आपल्या कपाळीं आलें म्हणून आपण पातक करितों असें वाटणें–) व 'भीष्मास मी युद्धामध्यें कसें बाण मारूं?' असें म्हणून अर्जुनानें आपलें मनोविकार प्रकट केले. भीष्माला मारण्यासाठीं माझ्या हातून कसे बाण सुटतील? (हे माझे आजोबा, मी यांचा नातू, वगैरे प्रश्नावरून अर्जुनास 'हें माझें व मी यांचा' अशा प्रकारची माया उत्पन्न झाली होती व तिच्या योगानें त्यास शोक मोह उत्पन्न झाले होते, हें स्पष्ट दिसत आहे.) तसेंच या प्रस्तुतच्या शोकमोहांनीं त्याच्या विवेकबुद्धीवर (तारतम्यशक्तीवर) इतका पगडा बसविला होता किंवा चांगलें वाईट निवडून काढणाऱ्या बुद्धीला इतकी दडपून टाकिली होती कीं, क्षत्रियधर्मास विहित (योग्य) जें युद्ध, त्याला आपण स्वतः होऊनच सिद्ध झाला असतांही.—क्षात्रधर्माप्रमाणें योग्य जो कौरवांचा नाश, तो करण्याला आपण होऊनच प्रवृत्त झाला असतांही—ह्या युद्धापासून तो परत फिरला. भाऊबंद आणि वडील माणसें, गुरु वगैरे आपल्या हातून मरणार, असें पाहून त्याला युद्धाचा तिरस्कार उत्पन्न झाला व मी युद्ध करीत नाहीं असें तो म्हणूं लागला. इतकेंच नव्हे, तर भिक्षेनें आपलें पोट भरून जिवंत रहावयाचें हा जो दुसऱ्या जातीचा धर्म, तो परधर्म घेण्यासही (भिक्षेचा अंगीकार करण्यासही) तयार झाला!—सारांश स्वतः योग्य कर्तव्य न करितां भलतीच गोष्ट करूं लागणें ह्याला मोह म्हणतात. वरील शोक आणि हा मोह यांच्याचमुळें प्राणी संसारांत पडून जन्ममरणादिक दुःख पावतात, असें सांगून आचार्य मुख्य विषयाकडे वळतात.—

तथा च सर्वप्राणिनां शोकमोहादिदोषाविष्टचेतसां स्वभावत एव स्वधर्मपरित्यागः प्रतिषिद्धसेवा च स्यात्। स्वधर्मे प्रवृत्तानामपि तेषां वाङ्मनःकायादीनां प्रवृत्तिः फलाभिसंधिपूर्विकैव साहंकारा च भवति। तत्रैवं सति धर्माधर्मोपचयादिष्टानिष्टजन्मसुखदुःखसंप्राप्तिलक्षणः संसारोऽनुपरतो भवतीत्यतः संसारबीजभूतौ शोकमोहौ।

तयोश्च सर्वकर्मसंन्यासपूर्वकादात्मज्ञानान्नान्यतो निवृत्ति-रिति तदुपदिदिक्षुः सर्वलोकानुग्रहार्थमर्जुनं निमित्तीकृत्याऽऽह भगवान्वासुदेवः—अशोच्यानित्यादि।

ह्याचप्रमाणें शोकमोहादिक विकारांच्या योगानें ज्यांचीं मनें व्याकुळ झालीं आहेत, शोकमोहांनीं ज्यांचीं अंतःकरणें सर्वस्वी आपल्या स्वाधीन करून ठेविलीं आहेत असेच सर्व प्राणी आहेत; म्हणून स्वाभाविकपणानेंच त्यांच्या हातून स्वधर्माचा त्याग (कर्तव्यपराङ्मुखता) आणि अधर्माचा अंगीकार (निषिद्धाचरण) हीं होतात. स्वधर्माप्रमाणें जरी ते कांहीं अंशीं चालत असले, तथापि त्यांच्या जिव्हेंची, मनाची व शरीराची (तनुमनवाणींची) प्रवृत्ति (व्यापार) फलाच्या आशेनें उत्पन्न झालेली असते—म्हणजे धर्माप्रमाणें चालणारे लोकसुद्धां शास्त्रोक्त आचरण करितात त्याचें मूळ कारण शोधूं गेल्यास आपल्यास 'अमुक फळ मिळावें' 'आपल्यावर अमुक संकट येऊं नये' अशा आशाळभूतपणाच्या बुद्धीनें ते—शास्त्रोक्तमार्गानें चालतात.—शिवाय 'मी हें कर्म करितों' अशी अहंकारबुद्धि (मीपणा) ह्या लोकांत पूर्णपणानें भरलेली असते ती निराळीच. याप्रमाणें फळाची आशा आणि मीपणा या दोन गोष्टींचा प्राण्यांच्या मनावर पूर्ण पगडा बसला असल्यामुळें त्यांच्या शुभ किंवा अशुभ कर्मानुसार त्यांस देवलोकांत, मनुष्यलोकांत अगर पशुपक्ष्यादि कोटींत सुखदुःखांच्या उपभोगासाठीं (केलेलें कर्म भोगण्यासाठीं) अनेक जन्म घ्यावे लागतात, म्हणजे त्यांस अनंत काळपर्यंत जन्ममरणांच्या फेऱ्यांत पडावें लागतें. आणि त्यांच्या मागचा संसार कधींच सुटत नाहीं. हें असें आहे म्हणून शोकमोहादि विकार हे संसारास कारण आहेत. (शोकमोह झाले असतां आपलें दुःख नष्ट व्हावें या हेतूनें मनुष्य कर्म करितो, त्या कर्माचें फल त्याला पुढच्या जन्मीं भोगावें लागतें, पुनः कर्म करितो, पुनः जन्म घेतो, असा चौऱ्यायशींचा फेरा त्याच्या पाठीमागें अनंतकालपर्यंत लागतो असें सांगण्याचा भाव आहे.) असो. ह्या शोकमोहांचा नाश करावयाचा असेल तर त्याला एकच मार्ग आहे तो हा कीं, जें काय आपण कर्म करितों, आपल्यास करावें

लागतें, अगर जें करणें आपलें कर्तव्य आहे, तें सर्व कर्म व त्याचें फल या दोन्हींचाही संन्यास केला पाहिजे. म्हणजे तें सर्व कर्म व त्याचें फल हीं ब्रह्मार्पण करावयाचीं; आणि नंतर आत्मज्ञान (ब्रह्मज्ञान) करून घ्यावयाचें—हाच एक मार्ग आहे.—ह्या मार्गाचाच उपदेश करण्याच्या हेतूनें भगवान वासुदेवानीं अर्जुनास निमित्तासाठीं मात्र पुढें केलें; आणि सर्व लोकांस हें पुरुषार्थाचें मुख्य तत्त्व कळावें यासाठीं बोलण्यास आरंभ केला कीं, 'ज्यांचा शोक करणें योग्य नाहीं त्यांचा तूं शोक करीत आहेस वगैरे' (अर्जुनासच उपदेश केला असें नव्हे, तर सर्व प्राणीमात्रांस हा उपदेश केला आहे असें सांगण्याचा उद्देश आहे.)

तत्र केचिदाहुः, सर्वकर्मसंन्यासपूर्वकादात्मज्ञाननिष्ठामात्रादेव केवलात्कैवल्यं न प्राप्यत एव किं तर्ह्यग्निहोत्रादिश्रौतस्मार्तकर्मसहिताज्ज्ञानात्कैवल्यप्राप्तिरिति सर्वासु गीतासु निश्चितोऽर्थ इति। ज्ञापकं चाऽऽहुरस्यार्थस्य—'अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि' 'कर्मण्येवाधिकारस्ते' 'कुरु कर्मैव तस्मात्त्वम्' इत्यादि।

आतां कांहीं—टीकाकार—असें म्हणतात कीं, सर्व कर्मांचा व कर्मफलांचा संन्यास करून नुसतें आत्मज्ञान मिळविलें तरच मोक्ष मिळतो, कैवल्यप्राप्ति (ब्रह्मप्राप्ति) होते असें नाहीं; तर मग मोक्षाला साधन काय म्हणून विचारलें तर तें सांगतात कीं, अग्निहोत्र वगैरे श्रौत व स्मार्त कर्में करून आत्मज्ञान मिळविलें म्हणजे मोक्ष मिळतो, असें हें खरें तत्त्व सर्व गीतांमध्यें सांगितलें आहे. 'असें कशावरून?' असें विचारल्यास ते आपल्या अर्थाचें समर्थन करण्यासाठीं हे श्लोक पुढें आणितात; 'जर तूं हें धर्मोक्त युद्ध केलें नाहींस' (अ. २ श्लोक ३३) 'कर्म मात्र करण्याचा अधिकार तुला आहे' (अ० २ श्लोक ४७) 'म्हणून तूं कर्मच कर' (अ० ४ श्लोक १५). आणखीही पुष्कळ श्लोक ते दाखवितात;—पण हे वरील श्लोक त्यांचें म्हणणें काय आहे तें समजण्यास पुरे आहेत.—

हिंसादियुक्तत्वाद्वैदिकं कर्माधर्मायेतीयमप्याशङ्का न

कार्या, कथं क्षात्रं कर्म युद्धलक्षणं गुरुभ्रातृपुत्रादिहिंसालक्षणमत्यन्तक्रूरमपि स्वधर्म इति कृत्वा नाधर्माय, तदकरणे च 'ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि' इति ब्रुवता यावज्जीवादिश्रुतिचोदितानां पश्वादिहिंसालक्षणानां च कर्मणां प्रागेव नाधर्मत्वमिति सुनिश्चितमुक्तं भवतीति ।

—हेच लोक आणखी असें म्हणतात कीं:—वैदिक धर्मामध्यें यज्ञयागादिक क्रिया करतांना पशूंची हिंसा करावी लागते म्हणून ह्या वेदोक्त कर्माच्या योगानें अधर्म होईल अशीही शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण क्षत्रियाचा धर्मच युद्ध करण्याचा आहे. त्या युद्धांत आपले गुरु, भाऊ, पुत्र यांची हिंसा होते व एकंदरीनें क्षत्रियास क्रूर कर्में करावीं लागतात तरी तो त्यांचा स्वधर्म आहे ह्मणून त्याच्या पासून अधर्म (पाप) उत्पन्न होत नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपला स्वधर्म जें युद्धकर्म तें क्षत्रियानें केलें नाहीं 'तर तुझा स्वधर्म आणि कीर्ति या उभयांचा नाश होऊन तुझ्या पदरांत पापाचें गांठोडें मात्र पडेल' (अध्याय २ श्लोक ३३) असें भगवंतांनींच सांगितलें आहे. तेव्हां हें सांगितलें ह्मणून आह्मी असाही सिद्धांत काढितों कीं 'जोंपर्यंत जीव आहे तोंपर्यंत अग्निहोत्राचें पालन करावें' वगैरे वेदोक्तवचनांवरून ज्या कर्मांत पशूंची हिंसा होणार अशीं कर्में अधर्माचीं नाहींत, —असें भगवंताच्या वरील वाक्यावरूनच—हें स्पष्ट होत आहे. स्वधर्माप्रमाणें आचरण केलें असतां पाप नाहीं असें भगवंतांनीं सांगितलें' यावरूनच यज्ञासाठीं पशूंची हिंसा करणें अधर्माचें नाहीं असाच सिद्धांत निघतो. —हें कर्मठ लोकांचें ह्मणणें आहे व हिंसा झाली तरी वेदोक्त कर्में पापजनक नाहींत असें त्यांनीं ठरविलें आहे.—

यावर आचार्य ह्मणतातः—

तदसत्, ज्ञानकर्मनिष्ठयोर्विभागवचनाद्बुद्धिद्वयाश्रययोरशोच्यानित्यादिना भगवता यावत् 'स्वधर्ममपि चावेक्ष्य' इत्येतदन्तेन ग्रन्थेन यत्परमार्थात्मतत्त्वनिरूपणं

कृतं तत्सांख्यं, तद्विषया बुद्धिरात्मनो जन्मादिषड्विक्रिया-भावादकर्ताऽऽत्मेति प्रकरणार्थनिरूपणाद्या जायते सा सांख्यबुद्धिः सा येषां ज्ञानिनामुचिता भवति ते सांख्याः ।

या कर्मयोगी लोकांचें हें म्हणणें खोटें आहे.—हे लोक अज्ञानामुळें म्हणतात कीं कर्म आणि ज्ञान यांच्या योगानें मोक्ष मिळतो; पण:—ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा या दोन्हींस दोन निरनिराळ्या बुद्धींची आवश्यकता आहे. ज्ञाननिष्ठा सांख्यज्ञानामुळें सिद्ध होते आणि कर्मनिष्ठा योगाच्या ज्ञानानें सिद्ध होते. भगवंतांनीं अध्याय २ श्लोक ११ पासून अध्याय २ श्लोक ३१ पर्यंत आत्म्याचें जें परमार्थतः आत्मतत्त्वनिरूपण केलें आहे (आत्म्यासंबंधानें जे शेवटचे खरे सिद्धांत सांगितले आहेत,) त्यास **सांख्यज्ञान** असें म्हणावें;—आणि हें सर्व प्रकरण उत्कृष्ट समजून घेतलें म्हणजे या प्रकरणांतील अर्थाच्या अनुरोधानें 'आत्म्याला जन्ममरण, क्षयवृद्धि वगैरे षड्विकार नाहींत, आत्मा हा अकर्ता (कर्म न करणारा, कांहींएक न करणारा असा) आहे' अशी जी सांख्यज्ञानविषयक बुद्धि उत्पन्न होते तिला **सांख्यबुद्धि** म्हणतात आणि हें ज्ञान ज्या विवेकीपुरुषांस होतें त्यांस **सांख्य** असें म्हणतात.

एतस्या बुद्धेर्जन्मनः प्रागात्मनो देहादिव्यतिरिक्तत्व-कर्तृत्वभोक्तृत्वाद्यपेक्षो धर्माधर्मविवेकपूर्वको मोक्षसाधनानुष्ठाननिरूपणलक्षणो योगः, तद्विषया बुद्धिर्योगबुद्धिः । सा येषां कर्मिणामुचिता भवति ते योगिनः ।

ही वर सांगितलेली बुद्धि उत्पन्न होण्यापूर्वी आत्मा हा शरीरापासून निराळा आहे, आत्म्यालाच **कर्तृत्व** (कर्म करण्याचें सामर्थ्य) **भोक्तृत्व** (उपभोग घेण्याचें किंवा सुख दुःख भोगण्याचें सामर्थ्य) वगैरे आहेत अशी समजुत ज्यांत अवश्य आहे असा जो मार्ग, त्याचप्रमाणें धर्म कोणता, अधर्म कोणता (शास्त्रविहित काय, शास्त्रामध्यें निषिद्ध काय आहे) यांविषयीं तारतम्यानें विचार करणें ज्यांत अवश्य आहे, आणि मोक्षप्राप्त करून देणारीं जीं साधनें आहेत तीं अनुकूल करून घेण्यासाठीं कोणतीं कोणतीं कर्में केलीं पाहिजेत हें

ज्यांत सविस्तर रीतीनें सांगितलें आहे, असा जो मार्ग त्यास योग किंवा कर्ममार्ग म्हणावें, याला लागणारी जी बुद्धि तिला योगबुद्धि म्हणावें, आणि ही बुद्धि ज्यांस बरी वाटते असे जे कर्मठ त्यांस योगी म्हणावें.—ह्याप्रमाणें दोन प्रकारची ज्ञानें, आणि दोन प्रकारच्या बुद्धि असतात, असें भगवंताच्या सांगण्यावरूनच सिद्ध झालें मग ज्ञान व कर्म यांचा समुच्चय कसा होईल?—पुनः—

तथा च भगवता विभक्ते द्वे बुद्धी निर्दिष्टे—' येषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु' इति । तयोश्च सांख्यबुद्ध्याश्रयां ज्ञानयोगेन निष्ठां सांख्यानां विभक्तां वक्ष्यति—'पुरा वेदात्मना मया प्रोक्ता' इति । तथा च योगबुद्ध्याश्रयां कर्मयोगेन निष्ठां विभक्तां वक्ष्यति—कर्मयोगेन योगिनाम्' इति । एवं सांख्यबुद्धिं योगबुद्धिं चाऽऽश्रित्य द्वे निष्ठे विभक्ते भगवतैवोक्ते ज्ञानकर्मणोः कर्तृत्वाकर्तृत्वैकत्वानेकत्वबुद्ध्याश्रययोरेकपुरुषाश्रयत्वासंभवं पश्यता ।

त्याचप्रमाणें भगवंतानीं सांगितलें आहे कीं, ह्या दोन बुद्धि परस्परांहून निराळ्या आहेत.—' याप्रमाणें हें तुला सांख्यज्ञान सांगितलें; आतां योगज्ञान सांगतों तें एक' (अ० २ श्लोक ३९). हा श्लोक पाहिला म्हणजे भगवंतांचा अभिप्राय स्पष्ट दिसेल व ज्ञानबुद्धि व कर्मबुद्धि या निराळ्या आहेत हें स्पष्ट होईल. या दोन साधनांपैकीं सांख्यज्ञानानें साध्य होणारें सांख्यांचें विज्ञानरूपी आत्मचिंतन वेगळें आहे व तें कर्मयोगापासून निराळें आहे असें पुढील श्लोकांत भगवान दाखवितात.—हे पापशून्य अर्जुना!—मीं—वेदस्वरूपी सर्वज्ञ ईश्वरानें मागेंच सांगितलें आहे कीं, या लोकांत ब्रह्मसाधनाचे दोन निराळे मार्ग आहेत. पहिला सांख्यांचा. यांत ज्ञानरूपी जो आत्मा त्याचें चिंतन करून मोक्ष मिळवावा असा मार्ग आहे (अ. ३ श्लो. ३) तसेंच योगबुद्धीच्या (कर्मज्ञानाच्या) आश्रयानें राहणारें जें कर्ममार्गाचें निराळें साधन तें दुसरें साधन आहे. यांत कर्मरूपी योगानें आत्मस्वरूपाचें चिंतन करावयाचें (आत्मनिष्ठ व्हावयाचें) व पुढें मोक्ष मिळवावयाचा असा क्रम

आहे.—याप्रमाणें सांख्यज्ञान आणि योगज्ञान अशीं दोन निरनिराळीं ज्ञानें सांगून दोन्ही साधनें (निष्ठा) निरनिराळीं आहेत,' असें भगवंतांनींच सांगितलें आहे. कारण भगवंतास असें स्पष्ट दिसलें कीं, 'आत्मा कर्ता आहे,' 'आत्मा कर्ता नाहीं,' 'आत्मा एक नाहीं,' 'आत्मा एक आहे' अशीं दोन्ही परस्परविरुद्ध ज्ञानें एका पुरुषाला एकेच वेळीं असूं शकणें संभवनीय नाहीं.—म्हणजे कर्मकांडामध्यें आत्मा कर्ता आहे व आत्मा एक नाहीं अशी बुद्धि असते व ज्ञानमार्गांत आत्मा कर्ता नाहीं व आत्मा एकच आहे अशी बुद्धि असते. म्हणून कर्मज्ञान व सांख्यज्ञान हीं एकमेकांशीं विरुद्ध आहेत. असें पाहूनच भगवंतानीं या ज्ञानांचा विभाग केला. उघडच आहे कीं, हीं एकमेकांस विरुद्ध असणारीं ज्ञानें एका मनुष्याला एकाच वेळीं असणें संभवत नाहीं; म्हणून मोक्षमार्ग सांगतांना विरुद्ध ज्ञानांचें स्पष्टीकरण करणें अवश्य होतें. ज्ञानकर्मांचा समुच्चय होणें शक्य नाहीं, हें उपनिषद्वाक्यांवरूनही सिद्ध करून दाखवितात.—

यथैतद्विभागवचनं तथैव दर्शितं शातपथीये ब्राह्मणे—'एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्तो ब्राह्मणाः प्रव्रजन्ति' इति सर्वकर्मसंन्यासं विधाय तच्छेषेण 'किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्माऽयं लोकः' इति । तत्रैव च—'प्राग्दारपरिग्रहात्पुरुष आत्मा प्राकृतो धर्मजिज्ञासोत्तरकालं लोकत्रयसाधनं पुत्रं द्विप्रकारं च वित्तं मानुषं दैवं च तत्र मानुषं वित्तं कर्मरूपं पितृलोकप्राप्तिसाधनं विद्यां च दैवं वित्तं देवलोकप्राप्तिसाधनं सोऽकामयत' इत्यविद्याकामवत एव सर्वाणि कर्माणि श्रौतादीनि दर्शितानि। 'तेभ्यो व्युत्थाय प्रव्रजन्ति' इति व्युत्थानमात्मानमेव लोकमिच्छतोऽकामस्य विहितम् । तदेतद्विभागवचनमनुपपन्नं स्याद्यदि श्रौतकर्मज्ञानयोः समुच्चयोऽभिप्रेतः स्याद्भगवतः ।

—हा येथें जसा ज्ञानमार्गाचा आणि कर्ममार्गाचा भेद सांगितला आहे; तसाच भेद शतपथ ब्राह्मणामध्येंही सांगितला आहे—पहा—कर्मफलाविषयीं उदासीन असणारे व आत्मज्ञान मिळविण्याविषयीं

इच्छा करणारे मुमुक्षु ब्राह्मण कर्मांचा संन्यास करितात.' याप्रमाणें सर्व कर्मांचा संन्यास सांगून पुनः त्याचें पुष्टीकरण करण्याच्या हेतूनें शतपथ ब्राह्मणांतच असें म्हटलें आहे. 'बाह्यविषय जे पुत्र वगैरे ते घेऊन आह्माला काय करावयाचें आहे? यांच्या योगानें आह्माला आत्मज्ञान होणार नाहीं व ब्रह्मप्राप्तिही होणार नाहीं'—यावरून स्पष्ट दिसेल कीं ज्ञानाचा शेवट कायतो मोक्ष आहे.—(बृहदारण्यक उपनिषद ६।४।२२) —याच उपनिषदांत दुसऱ्या ठिकाणीं सांगितलें आहेः—'अज्ञानी मनुष्य लग्न होण्याच्या पूर्वी व धर्माधर्म काय हें समजून घेतल्यानंतर, आपल्यास पुत्र असावा व दोन प्रकारचें धन असावें अशी इच्छा धारण करितो. पुत्र असला म्हणजे देव, पितृ व मनुष्य असे तिन्ही लोक साध्य होतात आणि मानवी व दैवीधन असले म्हणजे मानवी धनानें शास्त्रोक्त कर्म करून पितृलोक साध्य होतो आणि दैवी धन असलें म्हणजे देवलोक साध्य होतो.—म्हणजे तर्पण, श्राद्धपक्ष इत्यादि मानवी कर्म केलें म्हणजे पितृलोक मिळतो व अग्निहोत्र, यज्ञयाग केले म्हणजे इंद्रलोक वगैरे मिळतात असें प्राकृत पुरुषास वाटतें.'—म्हणून—'मला बायको असावी, पुत्र असावे, अशी इच्छा तो धारण करितो.' (बृ० ३।४।१७)—याप्रमाणें जो अज्ञानी आहे व म्हणूनच ज्याला कर्मफलाची आशा आहे; (म्हणजे त्यास आत्मज्ञान झालें नाहीं व हें मिळावें, ते मिळावें, अशी इच्छा व अशा नष्ट झाल्या नाहींत;) त्या अज्ञ आणि कामी पुरुषालाच—चित्तशुद्धीसाठीं—श्रौतस्मार्त कर्में सांगितलीं आहेत असें स्पष्ट झालें. तसेंच 'कर्मफलाविषयीं उदासीन असल्यामुळें देवलोक, मनुष्यलोक, पितृलोक ह्यांच्या प्राप्तीचीं जीं दैववित्त, मानुषवित्त व पुत्रप्राप्ति हीं साधनें त्यांविषयीं पूर्ण निरपेक्ष होऊन ते लोक कर्में टाकून देतात व संन्यासी होतात (अरण्यांत जातात)' ह्यावरून आशाशून्य व ब्रह्मज्ञान मिळवून मोक्षप्राप्तीची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूस कर्म करणें हें सांगितलें नाहीं हेंही उघडच झालें.

या मागील विवरणावरून हें स्पष्ट होईल कीं गीताशास्त्रामध्यें कर्म

आणि ज्ञान हीं दोन्ही प्रत्येक पुरुषानें एक काळींच साध्य करून घ्यावीं, असा जर भगवंताचा अभिप्राय (इष्ट हेतु) असता तर कर्मनिष्ठा व ज्ञाननिष्ठा अशा दोन निष्ठा विभक्त करून सांगितल्या हा विभाग अयोग्य (वेड्यासारखा) झाला असता.—सारांश कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग निराळे आहेत असें सांगणेंच भगवंतास इष्ट असल्यामुळें त्यांनीं या दोन मार्गांचें निरानिराळे विभाग करून दाखविले आहेत. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग ह्या दोन्ही मार्गांचे अनुसरण मनुष्यांनीं एककाळींच करावें असें त्यांस इष्ट असतें तर त्यांनीं कर्मज्ञान आणि सांख्यज्ञान असे दोन विभागच केले नसते. पण त्यांनीं हे विभाग केले आहेत म्हणून ज्ञानआणि कर्म हीं एकत्र व्हावींत असा त्यांचा हेतु नाहीं हें स्पष्ट झालें.—पुनः—

न चार्जुनस्य प्रश्नः उपपन्नो भवति 'ज्यायसी चेत्कर्मणस्ते' इत्यादिः। एकपुरुषानुष्ठेयत्वासंभवं बुद्धिकर्मणोर्भगवता पूर्वमनुक्तं कथमर्जुनोऽश्रुतं बुद्धेश्च कर्मणो ज्यायस्त्वं भगवत्यध्यारोपयेन्मृषैव 'ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिः' इति।

ज्ञान आणि कर्म एकत्र करावयाचीं असा भगवंताचा भाव होता असें म्हटलें तर 'कर्मापेक्षां ज्ञान मोठें आहे, असें जर तुझें मत असेल तर कृष्णा! मला घोर कर्म करावयास कां लावतोस ?' (अ० ३ श्लोक १) असा जो अर्जुनानें प्रश्न केला तो सुसंगत दिसत नाहीं. ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही एका पुरुषाचे ठायीं संभवत नाहींत. असें जर भगवान बोललेच नाहींत व अर्जुनानेंही तसें ऐकिलें नाहीं तर 'कर्मापेक्षां बुद्धि मोटी असें तुझें मत आहे.' असा खोटा व भलताच आरोप अर्जुनास तरी कसा करितां येईल?—ज्ञान आणि कर्म यांचे विभाग करून आणि ज्ञान व कर्म एका पुरुषास साध्य होणार नाहींत असें सांगून कर्मापेक्षां ज्ञान मोठें आहे असें जर भगवंतानीं सांगितलेंच नसेल तर अर्थातच अर्जुनाचा तिसऱ्या अध्यायांतील प्रश्न विसंगत होतो या अर्जुनाच्या प्रश्नावरूनही भगवंतास ज्ञान आणि कर्म यांचा विभागच इष्ट आहे असें सिद्ध झालें.—

आचार्य पुनः प्रतिपक्षाचें खंडन करितातः—

किंच यदि बुद्धिकर्मणोः सर्वेषां समुच्चय उक्तः स्यादर्जुनस्यापि स उक्त एवेति-' यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्' इति कथमन्यतरविषय एव प्रश्नः स्यात्। न हि पित्तप्रशमार्थिनो वैद्येन मधुरं शीतं च भोक्तव्यमित्युपदिष्टे तयोरन्यतरत्पित्तप्रशमनकारणं ब्रूहीति प्रश्नो भवति।

आणखी; ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही साध्य करून घ्यावीं असा सर्वांसच भगवंतांनीं गीतेमध्यें उपदेश केला असेल तर अर्जुनासही तोच उपदेश केला असला पाहिजे. आतां हें जर खरें असेल, म्हणजे ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही करावयाचीं असा जर अर्जुनास उपदेश झाला असेल तर ' या दोहोंपैकीं मोक्षदायक खरा मार्ग कोणता तो मला निश्चित करून सांग ' (अ० ५ श्लो० १) असा अर्जुनानें भगवंतांस कसा प्रश्न केला असता ? आपलें पित्त नाहींसें व्हावें अशी इच्छा करणाऱ्या रोग्याला वैद्यानें जर ' गोड आणि थंड पदार्थ खा म्हणजे तुझें पित्त बसेल ' असें सांगितलें तर कोणी रोगी वैद्यास फिरून असें विचारितो काय कीं, ' या दोन्हींपैकीं कोणत्यानें पित्त बसतें तें मला सांगा' ?

—सारांश दोहींतून चांगला मार्ग कोणता असा अर्जुनाचा प्रश्न आहे. यावरूनच भगवंतांस ज्ञानमार्ग व कर्ममार्ग निराळे दाखवावयाचे आहेत व ज्ञानकर्मांचा समुच्चय त्यांस अभीष्ट नाहीं हें स्पष्ट आहे.—

अथार्जुनस्य भगवदुक्तवचनार्थविवेकानवधारणनिमित्तः प्रश्नः कल्प्येत, तथाऽपि भगवता प्रश्नानुरूपं प्रतिवचनं देयं, मया बुद्धिकर्मणोः समुच्चय उक्तः किमर्थं त्वमित्थं भ्रान्तोऽसीति । न तु पुनः प्रतिवचनमननुरूपं पृष्टादन्यदेव ' द्वे निष्ठे मया पुरा प्रोक्ते ' इति वक्तुं युक्तम् ।

आतां कदाचित् कोणी आक्षेपक (कर्मठ) असें ह्मणतील कीं भगवंतांनीं सांगितलेल्या उपदेशांच्या रहस्याकडे अर्जुनाचें चांगलेंसें लक्ष

नसल्यामुळें त्यानें हा असा प्रश्न केला असेल. बरें, असेंही गृहीत धरूं. पण पुढें काय होतें तें पहा. हा प्रश्न ऐकून भगवंतांनीं तरी अर्जुनाच्या प्रश्नास योग्य असें ह्मणजे 'अरे! ज्ञान आणि कर्म ह्यांचा समुच्चय मीं सांगितला असून तूं असला चमत्कारिक प्रश्न विचारतोस तेव्हां तुला भ्रांति वगैरे झाली आहे कीं काय?' असें अर्जुनाच्या प्रश्नास योग्य असें उत्तर द्यावयाचें होतें. (त्याच्या प्रश्नास योग्य असा ताशेरा झाडावयाचा होता.) पण तसें तर कांहीं नाहीं. आणि आक्षेपक ह्मणतो त्याच्या अगदीं विरुद्ध व त्याला अप्रस्तुत असें— 'मीं पूर्वीं दोनप्रकारच्या निष्ठा सांगितल्या आहेत' असें भगवंतांनीं ह्मणणें योग्य आणि सयुक्तिक नव्हतें.—सारांश अर्जुनाचा प्रश्न व भगवंतांचें उत्तर हीं दोन्ही विसंगत नाहींत व ह्या दोहोंवरूनही ज्ञान आणि कर्म यांचा विभागच ईश्वरास इष्ट आहे असें सिद्ध होतें.—

नापि स्मार्तेनैव कर्मणा बुद्धेः समुच्चयेऽभिप्रेते विभाग-वचनादि सर्वमुपपन्नम्।

आतां कोणी ह्मणेल कीं वेदोक्त कर्म राहूंद्या, पण स्मृतीनें सांगितलेल्या कर्मांचें (क्षत्रियानें युद्ध करावें वगैरे नियमांचें) व ज्ञानाचें एकीकरण करणें तरी निदान भगवंतांच्या मनांत असेल. कारण त्यांनीं 'अर्जुना जर तूं हा धर्म्यसंग्राम करणार नाहींस' (अध्या० २ श्लोक ३३) असें अर्जुनास ह्मटलें आहे.—आचार्य ह्मणतात पण तसाही भगवंताचा अभिप्राय दिसत नाहीं. कारण ज्ञान आणि कर्म यांचा भेद भगवंतांनीं स्पष्ट केला आहे तो या तुमच्या ह्मणण्यावरून बाधित होईल. ह्मणून मोक्ष मिळविण्याचे वेळीं स्मार्तकर्मही ज्ञानयोगाबरोबर येऊं शकत नाहीं.

किंच क्षत्रियस्य युद्धं स्मार्तं कर्म स्वधर्म इति जानतः 'तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव' इत्युपालम्भोऽनुपन्नः। तस्माद्गीताशास्त्रे ईषन्मात्रेणापि श्रौतेन स्मार्तेन वा कर्मणाऽऽत्मज्ञानस्य समुच्चयो न केनचिद्दर्शयितुं शक्यः।

आणखी; युद्ध करणें हा स्मृतीनें सांगितलेला क्षत्रियाचा स्वधर्म आहे असें अर्जुनास माहीत असतांही ' केशवा ! मला घोर कर्म करण्याला (लढाई करण्याला) कां उत्तेजन देतोस ? ' (अ० ३ श्लो० १) असा अर्जुनानें कृष्णाचा उपदेश ऐकल्यावर जो प्रश्न केला आहे तोही वेड्यासारखा होत नाहीं काय ? यावरून ज्ञान प्राप्त झालें असतां स्मार्तकर्माची आवश्यकता नाहीं व स्मार्तकर्म आणि ज्ञान हीं दोन्ही एकाच मुमुक्षु पुरुषांचीं कर्तव्यें नाहींत असें सिद्ध होतें.– ह्मणून मुमुक्षूनें कर्मफलत्याग करावा असेंच भगवंतांनीं सांगितलें असलें पाहिजे.

सारांश—या वरील प्रतिपादनावरून लक्षांत येईल कीं—या गीताशास्त्रामध्यें आत्मज्ञानाचा आणि श्रौतस्मार्तादि कर्माचा समुच्चय सांगितला आहे असें कोणालाही सयुक्तिक रीतीनें दाखवितां येणें शक्य नाहीं.

आत्मज्ञान प्राप्त झालें असतांही कांहीं ज्ञानी लोक कर्म करितांना दिसतात, त्याचा उलगडा आचार्य करितात:—

यस्य त्वज्ञानाद्रागादिदोषतो वा कर्मणि प्रवृत्तस्य यज्ञेन दानेन तपसा वा विशुद्धसत्त्वस्य ज्ञानमुत्पन्नं परमार्थतत्त्वविषयमेकमेवेदं सर्वं ब्रह्माकर्तृ चेति, तस्य कर्मणि कर्मप्रयोजने च निवृत्तेऽपि लोकसंग्रहार्थं यत्नपूर्वं यथा प्रवृत्तस्तथैव कर्मणि प्रवृत्तस्य यत्प्रवृत्तिरूपं दृश्यते न तत्कर्म येन बुद्धेः समुच्चयः स्यात् ।

आतां ज्या एखाद्या पुरुषानें आपल्या स्वतःच्या अज्ञानामुळें अगर कामक्रोधादि विकारांस वश झाल्यामुळें श्रौतस्मार्त कर्में करण्यास आरंभ केला, व पुढें यज्ञाच्या, दानाच्या किंवा तपाच्या सामर्थ्यानें ज्याची चित्तवृत्ति शुद्ध झाली (अंतःकरणांतील पापरूपी मळ नाहींसा होऊन सद्वस्तूच्या, ब्रह्माच्या ज्ञानाची इच्छा झाली) व ' हें सर्व एकच ब्रह्म आहे आणि तें कर्मशून्य आहे ' असें शेवटचें खरें ज्ञान ज्यास झालें, त्या पुरुषाला ब्रह्मज्ञान झाल्यावर कर्म कर-

ण्याचें जरी कारण उरलें नाहीं व जरी त्याची कर्मफलाशा नष्ट झाली (फलाच्या आशेनें आपण सामान्य पुरुष कर्म करितों ह्मणून फलाशेस कर्मप्रवर्तक असें ह्मटलें आहे.) तरी लोककल्याणासाठीं तो पुरुष कर्म करित राहील. पूर्वीं—आस्थापूर्वक—जसें हा सर्व कर्म यथासांग करित असे, तसेंच ज्ञान झाल्यावरही त्यानें कर्म चालूं ठेविल्यामुळें तो कर्ममार्गांत आहे असें जरी दिसतें, तथापि त्याच्या ह्या कर्माला तुह्मी ह्मणतां त्या अर्थानें कर्म ह्मणतां येत नाहीं.—तुह्मी कर्म करितां तें पुढें चांगली गति मिळावी ह्मणून करितां; अशा आशेनें ज्ञानी पुरुष कर्म करित नाहीं.—ह्मणून ह्या ज्ञानी पुरुषामध्यें ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय दिसला, तथापि वर जो आह्मीं सिद्धांत केला आहे त्यास बाध येत नाहीं. कारण येथें या पुरुषाचें कर्म फलाशारहित आहे.

यथा भगवतो वासुदेवस्य क्षात्रकर्मचेष्टितं न ज्ञानेन समुच्चीयते पुरुषार्थसिद्धये तद्वत्तत्फलाभिसंध्यहंकाराभावस्य तुल्यत्वाद्विदुषः। तत्त्ववित्तु नाहं करोमीति मन्यते न च तत्फलमभिसंधत्ते। यथा च स्वर्गादिकामार्थिनोऽग्निहोत्रादिकामसाधनानुष्ठानायाऽऽहिताग्नेः काम्य एवाग्निहोत्रादौ प्रवृत्तस्य सामिकृते विनष्टेऽपि कामे तदेवाग्निहोत्राद्यनुतिष्ठतोऽपि न तत्काम्यमग्निहोत्रादि भवति।

भगवान् वासुदेवानें युद्धकर्म केलें तरी पुरुषार्थसिद्धीसाठीं (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. जन्मास येऊन हे चारही पुरुषार्थ साध्य झाले तर मनुष्याच्या जन्माचें सार्थक्य होतें. ह्मणून ‘ पुरुषार्थसिद्धीसाठीं ’ असें ह्मटलें.) भगवंतांनीं ज्ञानाचा आणि कर्माचा समुच्चय केला असें ज्याप्रमाणें होत नाहीं, कारण षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवंताला कर्म करण्याची जरूरी नाहीं; त्याचप्रमाणें फलाविषयीं ज्याचा अभिलाष नष्ट झाला व त्याबरोबरच अहंकार नष्ट झाला, त्या विद्वान् पुरुषानें ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय केला असेंही ह्मणतां येणार नाहीं. तत्त्ववेत्ता जो आहे,—ज्यास ज्ञान झाल्यामुळें खरें काय आहे हें समजलें आहे,—

तो ' मी कांहीं करीत नाहीं ' असें मानतो व फलाची आशाही सोडून देतो. याचप्रमाणें आपल्यास स्वर्ग प्राप्त व्हावा या आशेनें एखाद्यानें अग्नीची प्रतिष्ठापना करून स्वर्गप्राप्तीसाठीं अग्निहोत्र घेतलें आणि हेंच काम्य (स्वर्ग मिळावा या इच्छेनें आरंभिलेलें) कर्म करित असतां व अर्धेंअधिक तें कर्म झाल्यावर त्याची स्वर्गप्राप्तीची इच्छाच नष्ट झाली तरीही त्यानें अग्निहोत्राचें वगैरे अनुष्ठान पुढें तसेंच चालूं ठेविलें ह्मणून त्याचें तें कर्म काम्य आहे असें आपणांस ह्मणतां येत नाहीं. तसेंच तत्त्ववेत्त्याचें आहे.—सारांश ज्ञानी पुरुषाला कर्म करण्याची जरूरी नाहीं. परंतु त्यानेंही जर कर्म निष्कामबुद्धीनें केलेंच तर तें कर्म त्याच्या पुरुषार्थसिद्धीच्या ह्मणजे मोक्षाच्या आड येत नाहीं.—

तथा च दर्शयति भगवान् ' कुर्वन्नपि ' ' न करोति न लिप्यते, ' इति तत्र तत्र । यच्च ' पूर्वैः पूर्वतरं कृतम् ' ' कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ' इति तत्तु प्रविभज्य विज्ञेयम् । तत्कथम्, यदि तावत्पूर्वे जनकादयस्तत्त्वविदोऽपि प्रवृत्तकर्माणः स्युस्ते लोकसंग्रहार्थं ' गुणा गुणेषु वर्तन्ते ' इति ज्ञानेनैव संसिद्धिमास्थिताः, कर्मसंन्यासे प्राप्तेऽपि कर्मणा सहैव संसिद्धिमास्थिता न कर्मसंन्यासं कृतवन्त इत्येषोऽर्थः ।

आह्मी ह्मणतों याला आधार भगवंतांचीं हीं वाक्येंच पहाः— ' करित असतांही ' ' करित नाहीं व बद्ध होत नाहीं ' (अ० ५ श्लोक १०) आणखीही पुष्कळ वाक्यें योग्यस्थळीं दाखवितां येतील. आतां ' ज्याप्रमाणें पूर्वींच्या लोकांनीं कर्म केलें तसेंच तूं कर ' (अ० ४ श्लो० १५) ' जनकादिक राजे मोक्षाची अगर शुद्ध स्वरूपाच्या ज्ञानाची सिद्धि कर्मानेंच करिते झाले ' (अ० ३ श्लो० १९) इत्यादि जीं वाक्यें आहेत, त्यांचा पुढील विभागानें अर्थ करून तीं समजून घ्यावींत. हा विभाग कसा करावयाचा तें सांगतों. पूर्वकालिक जनकादि राजे ब्रह्मज्ञानी होते असें समजूं. ब्रह्मज्ञानी असूनही जर ते कर्माला प्रवृत्त झाले असतील तर ' केवळ

ज्ञानेंद्रियें जीं आहेत तींच आपआपल्या विषयांकडे वळतात' (डोळा हें ज्ञानेंद्रिय पदार्थ पाहण्याचें काम सहज करीत आहे, आत्म्याचा त्यांत कांहीं संबंध नाहीं, ह्मणजे आत्म्याला ह्या इंद्रियांच्या पाहण्याशीं अगर पाहिलेल्या पदार्थाशीं तात्त्विक दृष्टीनें कांहीं एक कर्तव्य नाहीं.) असें समजून व केवळ लोककल्याणासाठीं (लोकांस आपआपल्या धर्माप्रमाणें चालण्याला उत्तेजन देण्यासाठीं) आपल्यास कर्म केलें पाहिजे असें ध्यानांत ठेवून राहिले.—इंद्रियांचा विषयाशीं संबंध घडून कर्म घडतें तें मिथ्या आहे, सद्वस्तूचा (ब्रह्माचा) त्यांत संबंध नाहीं, असें ज्ञान त्यांस प्राप्त झालें ह्मणूनच ते मोक्षपदाला गेले, अथवा पूर्णत्वाला पावले.—कर्माचा संन्यास करावयाची वेळ प्राप्त झाली असतांही निष्काम कर्म करून ते मोक्षपदाला गेले, कर्माचा त्याग त्यांनीं केला नाहीं इतकाच याचा अर्थ आहे.—सारांश, मोक्षपद प्राप्त करून घेण्याला कर्माची ह्या ज्ञानी पुरुषांना आवश्यकता नसतांनाही त्यांनीं कर्म केलें इतकाच अर्थ आहे.—

अथ न ते तत्त्वविद ईश्वरसमर्पितेन कर्मणा साधनभूतेन संसिद्धिं सत्त्वशुद्धिं ज्ञानोत्पत्तिलक्षणां वा संसिद्धिमास्थिता जनकादय इति व्याख्येयम् ।

आतां ते ब्रह्मज्ञानी नव्हते असें समजलें तर या जनकादि राजांनीं जीं श्रुतिस्मृतींनीं सांगितलेलीं कर्मे केलीं तीं ईश्वराचे ठायीं समर्पण केल्यामुळें व ह्या ईश्वरार्पित कर्मांच्या साधनानें, त्यांस संसिद्धि, ह्मणजे चित्तशुद्धिद्वारा ब्रह्मज्ञान उत्पन्न करणारी सिद्धि, प्राप्त झाली असा अर्थ करावा.—तात्पर्य हें:—जनकादिक ज्ञानी असतील तर त्यांचें कर्म लोकांसाठीं होतें व निष्काम होतें असें आपण समजावें; ते ज्ञानी नसतील तर त्यांनीं सर्व कर्मे ईश्वरास समर्पण करून अंतःकरणशुद्धिद्वारा ब्रह्मज्ञान मिळविलें असें आपण समजावें. एवंच मोक्ष मिळवावयाला कर्माची गरज नाहीं व ह्मणून ज्ञान व कर्म यांचा समुच्चय होणें अशक्य आहे असा सिद्धांत ठरला.—

एतमेवार्थं वक्ष्यति भगवान्सत्त्वशुद्धये कर्म कुर्वन्तीति । 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः' इत्यु-

क्त्वा सिद्धिं प्राप्तस्य च पुनर्ज्ञाननिष्ठां वक्ष्यति ' सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म ' इत्यादिना ।

'योगीलोक चित्तशुद्धीसाठीं कर्मे करितात' (अ.५श्लो.११) हा आह्मीं सांगितलेला दुसरा अर्थ भगवान् सांगतात: ' आपण स्वधर्मोक्तमार्गानें परमेश्वराचें भजन करून नंतर केलेलीं कर्मे परमेश्वरास समर्पण करून ज्ञान प्राप्त होण्यास योग्य अशी सिद्धि मिळवितात.' (ज्ञान मिळविण्यास ते योग्य होतात. अ० १८ श्लोक ४६), असें सांगून पुन: 'ही सिद्धि प्राप्त झालेल्या मनुष्यानें ज्ञान मिळवावें.' (अ० १८श्लोक ५०) हें भगवंतांचेंच प्रतिपादन आहे.—यावरून सिद्धि प्राप्त झालेल्या-मनुष्यास ज्ञाननिष्ठा (ब्रह्मचिंतन) अवश्य आहे असें भगवंतांनींच सांगितलें आहे.—तात्पर्य संसिद्धि याचा, एकंदरीनें जनकादिकांच्या कर्माचा व संसिद्धीचा बरोबर अर्थ झाला; हाच अर्थ आहे, दुसरा नाहीं असें सहजच सिद्ध झालें.—

तस्माद्गीतासु केवलादेव तत्त्वज्ञानान्मोक्षप्राप्तिर्न कर्मसमुच्चितादिति निश्चितोऽर्थः । यथा चायमर्थस्तथा प्रकरणशो विभज्य तत्र तत्र दर्शयिष्यामः ।

वरील विवेचनावरून या गीताशास्त्रांत सांगितलेल्या सिद्धांतांचा असा निश्चित अर्थ (सिद्धांत) झाला आहे कीं, मनुष्यास मोक्ष मिळविणें आहे तो केवळ तत्त्वज्ञानानेंच (ब्रह्मज्ञानानेंच) मिळवायाचा आहे; ज्ञान आणि कर्म यांच्या समुच्चयानें तो मिळणें अशक्य आहे, हें ठरलें. असो; आह्मीं ठरविलेला हा अर्थ खरा आहे हें निरनिराळ्या प्रकरणांमध्यें जेथें जेथें प्रसंग येईल तेथें तेथें सिद्ध करूनही दाखवूं.

येथें आचार्यांची विशेष प्रस्तावना संपली. आतां आचार्य मुख्यं विषयाकडे वळतात.

तत्रैवं धर्मसंमूढचेतसो महति शोकसागरे निमग्नस्यार्जुनस्यान्यत्राऽऽत्मज्ञानादुद्धरणमपश्यन्भगवान्वासुदेवस्ततोऽर्जुनमुद्दिधारयिषुरात्मज्ञानायावतारयन्नाह—

अर्जुनाला धर्माच्या (कर्तव्याच्या) संबंधानें भ्रांति पडली आहे व शोकसागरांत तो निमग्न झाला (बुडाला) आहे असें पाहून त्याचें कल्याण व्हावें व त्याचा उद्धार व्हावा अशी इच्छा धारण करणाऱ्या—अनुकंपी—भगवंतांनीं पाहिलें कीं, आत्मज्ञानाचा उपदेश केल्याशिवाय त्या दीन व शोकमोहग्रस्त अर्जुनाचा उद्धार होणें शक्य नाहीं; ह्मणून त्यांनीं आत्मज्ञानाचा अवतार करण्यासाठीं अर्जुनाला ह्मटलें:—

श्रीभगवानुवाच—

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ॥
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः॥११॥

श्रीभगवान् ह्मणालेः—

त्वं (तूं) **अशोच्यान्** (शोक करण्यास योग्य नाहींत अशांविषयीं) **अन्वशोचः** (शोक करिता झाला आहेस) **च** (आणि) **प्रज्ञावादान्** (शहाण्या माणसांचीं वचनें) **भाषसे** (म्हणतो आहेस, सांगतो आहेस.) **पण्डिताः** (शहाणे लोक, तत्त्वज्ञानी) **गतासून्** (गेले आहेत प्राण ज्यांचे अशांविषयीं) **च** (आणि) **अगतासून्** (गेले नाहींत प्राण ज्यांचे अशांविषयीं, जिवंत माणसांविषयीं) **अनुशोचन्ति न** (शोक करीत नाहींत.)—ज्यांविषयीं शोक करणें उचित नाहीं, अशांविषयीं शोक करून पुनः शहाणपणाच्या व नीतीच्या गोष्टी सांगत आहेस! अरे ! पंडित असतात ते मेलेल्या माणसांबद्दल किंवा जिवंत माणसांबद्दल कधीं रडत बसलेले पाहिले नाहींत.—

शांकरभाष्य.—अशोच्यानित्यादि । न शोच्या अशोच्या भीष्मद्रोणादयः सद्वृत्तत्वात्परमार्थरूपेण च नित्यत्वात्, तानशोच्यानन्वशोचोऽनुशोचितवानसि ते म्रियन्ते मन्निमित्तमहं तैर्विनाभूतः किं करिष्यामि राज्यसुखादिनेति । त्वं प्रज्ञावतां बुद्धिमतां वादांश्च वचनानि च भाषसे । तदेतन्मौढ्यं पाण्डित्यं च विरुद्धमात्मनि दर्श-

यस्तुन्मत्त इवेत्यभिप्रायः । यस्माद्गतासून्गतप्राणान्मृता-नगतासूनगतप्राणाञ्जीवतश्च नानुशोचन्ति पण्डिता आत्मज्ञाः पण्डाऽऽत्मविषया बुद्धिर्येषां ते हि पण्डिताः "पाण्डित्यं निर्विद्य" इति श्रुतेः । परमार्थतस्तु नित्यानशोच्याननुशोचस्यतो मूढोऽसीत्यभिप्रायः ॥ ११ ॥

भाष्यार्थः—भीष्मद्रोणादि जे आहेत त्यांच्याविषयीं शोक करण्याचें कारण नाहीं. कारण त्यांचें आजपर्यंतचें आचरण वेदशास्त्रोक्त आहे व त्यांच्याविरुद्ध एक ब्रसुद्धां काढितां यावयाचा नाहीं. दुसरें कारण असें कीं परमार्थदृष्टीनें पाहिलें असतां (आत्मानात्मविचार करून पाहिलें असतां) ते नित्यच आहेत.—हें कसें तें बाराव्या श्लोकांत स्पष्ट होईल.—एतावता आचरणानें शुद्ध असल्यामुळें व परमार्थदृष्टीनें ते अमर असल्यामुळें त्यांविषयीं शोक करणें तुला शोभत नाहीं. पण अशांविषयीं तूं शोक करितोस कीं 'ते माझ्यासाठीं (माझ्या हातून) मरतील, त्यांच्याशिवाय मी राज्यादिक सुखें कशीं भोगूं ?' शिवाय बुद्धिमान लोकांप्रमाणें लांब लांब नीतीच्या गोष्टीही सांगतो आहेस (पहा अ० १ श्लो० ३६ ते ४५). सारांश येणेंप्रमाणें तूं मूर्खपणा आणि त्याच्याच विरुद्ध असणारा शहाणपणा एकाच वेळीं आपल्यामध्यें दाखवितो आहेस. (एकदम शहाण्यासारखें व वेड्यासारखें बोलतो आहेस.) यावरून उन्मत्तासारखी (वेड्यासारखी) तुझी वृत्ति झाली आहे हेंच खरें. कारण पंडित ह्मणजे आत्म्याविषयीं ज्यांना पूर्ण ज्ञान झालें आहे ते लोक मेलेल्यांचा आणि जिवंत लोकांचा शोक करीत नाहींत. बृहदारण्यकामध्यें (पहा ५।५।१) 'पण्डा ह्मणजे आत्मज्ञानविषयक बुद्धि. ही ज्यांस आहे ते पंडित होत.' असा पंडित शब्दाचा अर्थ आहे तो माझेंच ह्मणणें समर्थन करितो. खरोखरच पाहिलें असतां नित्य जे आहेत (ज्यांना जन्ममरण वगैरे कोणताही विकार नाहीं.) त्यांच्याविषयीं शोक करून तूं आपला मूर्खपणा मात्र प्रकट करित आहेस, सारांश 'तूं मूर्ख आहेस' असें ह्मणण्याचा भगवंतांचा अभिप्राय आहे. ॥ ११ ॥

रामानुज—गतासून्=देहान् (ज्यांत प्राण नाहीं किंवा आत्मा नाहीं असे, देहांविषयीं व) **अगतासून् आत्मनः** (आत्म्याविषयीं) असा अर्थ करून पुढें '**आत्मा हि न जन्माधीनसद्भावो न मरणाधीनविनाशश्च तस्य जन्ममरणयोरभावात्**'—आत्मा हा जन्म घेऊन उत्पन्न होणारा, किंवा मरण पावून विनाश पावणारा नाहीं, कारण त्याला जन्ममरण दोन्ही नाहींत, तो नित्य आहे ह्मणून त्याविषयीं शोक करण्याचें कारण नाहीं असें ह्मणतात. तसेंच '**देहस्त्वचेतनः परिणामस्वभावस्तस्योत्पत्तिविनाशयोगः स्वाभाविक इति सोऽपि न शोकस्थानमित्यभिप्रायः**'—देह हा अचेतन (जड) असून तो विकारवश (बदलणारा) असतो ह्मणून उत्पत्तिविनाश (जन्ममरण) हे त्याला सहजच आहेत. यास्तव देहाविषयींही शोक करण्याचें कारण नाहीं असा अर्थ आहे असें ह्मणतात.

मध्वमतानुसारी सत्यानंद स्वामी—प्रज्ञावादान्=केवलं स्वमनीषोत्थवादान् (केवळ आपल्या मनामधूनच उत्पन्न झालेलें तर्काडंबर असा अर्थ करितात. ॥ ११ ॥

शांकरभाष्य—

कुतस्तेऽशोच्या यतो नित्याः, कथं?—

न त्वेवाहं जातु नाऽऽसं न त्वं नेमे जनाधिपाः॥
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतःपरम् ॥ १२ ॥

पदान्वयार्थः—

अहं (मी) **तु एव जातु** (कधीं देखील) **न आसं न** (न होतों असें नाहीं, नव्हतों असें नाहीं) **त्वं** (तूंही व) **इमे जनाधिपाः** (हे राजे) **न** (नव्हतां असें नाहीं)—आपण सगळे पूर्वीं कधीं नव्हतों असें नाहीं, ह्मणजे आपण अनादि आहोंत.—**सर्वे वयं** (आपण सगळे) **अतःपरं न भविष्यामः न चैव** (पुढें असणार नाहीं असेंही व्हावयाचें नाहीं.—तात्पर्य—पुढेंही सर्वकाल जिवंत राहूं ह्मणजे आपण सर्व अनंत आहोंत.—अनादि व अनंत असे आपण सर्व आहोंत.

न त्वेव जातु कदाचिदहं नाऽऽसं किंत्वासमेवातीतेषु देहोत्पत्तिविनाशेषु नित्य एवाहमासमित्यभिप्रायः। तथा न त्वं नासीः किंत्वासीरेव। तथा नेमे जनाधिपा नाऽऽसन्किंत्वासन्नेव। तथा न चैव न भविष्यामः किंतु भविष्याम एव सर्वे वयमतोऽस्माद्देहविनाशात्परमुत्तरकालेऽपि त्रिष्वपि कालेषु नित्या आत्मस्वरूपेणेत्यर्थः। देहभेदानुवृत्त्या बहुवचनं नाऽऽत्मभेदाभिप्रायेण ॥ १२ ॥

भाष्यार्थ:--ते शोकास्पद कां नाहींत? नित्य आहेत ह्मणून. कशावरून नित्य आहेत?--प्रत्यक्ष भगवान् सांगतात:--मी कधीं नव्हतों असें कधींच झालें नाहीं, ह्मणजे मी नेहमींच होतों.--माझ्या पूर्वींच्या शरीरांचा जरी उत्पत्तिविनाश झाला तथापि, ह्मणजे मला अनेक शरीरें आलीं व गेलीं तरी, मी नित्य असल्यामुळें नेहमींच असता झालों हा आभिप्राय.--तसेंच तूं नव्हतास किंवा हे राजे नव्हते असें कधींच झालें नाहीं.--ह्मणजे सगळे तुह्मीही अनादि काळापासून आहांतच.--ह्याचप्रमाणें आपण पुढें कधीं नाहींसे होऊं असेंही व्हावयाचें नाहीं.-- ह्मणजे पुढेंही सर्वकाल आपण असूंच. ह्या देहाचा नाश झाल्यावर पुढें सुद्धां आपण असूं. सारांश, भूतभविष्यवर्तमान ह्या तिन्ही काळांमध्यें आपण आत्मस्वरूपानें सर्वकाळ नित्य (अविनाशी असे) राहूं.--आचार्य ह्मणतात.--येथें बहुवचनी सर्व आपण असें जें ह्मटलें आहे तें देह पुष्कळ ह्मणून अनेकवचन परमेश्वरांनीं योजिलें आहे; आत्मे निरनिराळे आहेत अशा भावानें योजिलें नाहीं. ॥ १२ ॥

रामानुजांनीं ह्या शेवटच्या वाक्यावर पुष्कळ खरमरित टीका केली आहे. ते ह्मणतात:--' सर्वेश्वर भगवान श्रीकृष्ण यानें आपला आत्मा व इतरांचे जीवात्मे यांच्यामध्यें जो फरक केला आहे तो पारमार्थिक ह्मणजे खरा आहे. कारण (१) अज्ञानानें वेडा झालेल्या अर्जुनास परमार्थज्ञानाचा उपदेश करण्याचे वेळीं ' मी, तूं, हे सगळे' असा भेद करून दाखविणें हें बरोबर जुळत नाहीं. कारण अशा वेळीं परमेश्वरानें खोटा भेदाभेद निर्माण केला नसता. पण भेद

केला आहे यावरून परमात्मा आणि जीवात्मा यांमध्यें नित्य भेद आहे, असें सिद्ध होतें. श्रुतिही अशीच आहे: **नित्यो 'नित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान्'** (पुष्कळ असे जे नित्य जीवात्मे आहेत त्या सर्वांच्या इच्छा, एक व नित्य असा परमात्मा पूर्ण करितो.) (२) सर्वज्ञ भगवंतानें हा भेद अज्ञानाला वश होऊन केला असेल असेंही संभवत नाहीं. (३) ह्या ' मिथ्या ' उपदेशानें अर्जुनाच्या मनांत भलताच सिद्धांत शिरणें संभवनीय आहे. याप्रमाणेंच आणखी चारपांच कारणें देऊन परमात्मा व जीवात्मा हे भिन्न आहेत असें सिद्ध केलें आहे ॥ १२ ॥

तत्र कथमिव नित्य आत्मेति दृष्टान्तमाह—

आत्मा नित्य कसा तें एका दृष्टांतानें सांगतात.—

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ॥
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१३॥

पदान्वयार्थः—

देहिनः (ज्याला देह आहे अशा आत्म्याच्या) **अस्मिन्** (ह्या) **देहे** (देहामध्यें) **कौमारं** (बालपण) **यौवनं** (तरुणपण) **जरा** (म्हातारपण) **यथा** (ज्याप्रमाणें)—असतात—**तथा** (त्याप्रमाणेंच) **देहान्तरप्राप्तिः** (—आत्म्याला—निरनिराळ्या देहाची प्राप्ति—होते—) **तत्र** (तेथें—असें झालें ह्मणून—) **धीरः** (शहाणा माणूस) **न मुह्यति** (मोह पावत नाहीं.)

देहिन इति । देहोऽस्यास्तीति देही तस्य देहिनो देहवदात्मनोऽस्मिन्वर्तमाने देहे यथा येन प्रकारेण कौमारं कुमारभावो बाल्यावस्था यौवनं यूनो भावो मध्यमावस्था जरा वयोहानिर्जीर्णावस्थेत्येतास्तिस्रोऽवस्था अन्योन्यविलक्षणास्तासां प्रथमावस्थानाशे न नाशो द्वितीयावस्थोपजनेने नोपजननमात्मनः किं तर्ह्यविक्रियस्यैव द्वितीयतृतीयावस्थाप्राप्तिरात्मनो दृष्टा

यथा तथा तद्वदेव देहादन्यो देहान्तरं तस्य प्राप्तिर्देहान्तर-प्राप्तिरविक्रियस्यैवाऽऽत्मन इत्यर्थः। धीरो धीमांस्तत्रैवं सति न मुह्यति न मोहमापद्यते ॥ १३ ॥

भाष्यार्थः—

ज्याला देह आहे तो देही; असा देह असणारा देही जो आत्मा, त्याला या चालू (प्रकृत) देहामध्येंच ज्याप्रमाणें कुमारभाव (बाळपण) यौवन (मध्यावस्था, तारुण्य) जरा (शक्तीची हानि होऊन आलेला ह्मातारपणा) अशा तीन निरनिराळ्या व एकाहून एक अत्यंत भिन्न अशा अवस्था प्राप्त होतात. त्यांत बाळपण ह्मणजे पहिली अवस्था, संपते तेव्हां आत्म्याचा नाश होत नाहीं व दुसऱ्या ह्मणजे मध्यावस्थेचा जन्म झाला ह्मणून आत्म्याचा नवीन जन्म होतो असेंही नाहीं. तर आपल्यास काय दिसतें ? आपणांस असें स्पष्ट दिसतें कीं आत्म्याला जें दुसरें व तिसरें अवस्थांतर प्राप्त होतेंसें दिसतें (वास्तविक तीं देहालाच प्राप्त होतात, पण आत्मा तोच आहे अशी आपली खातरी असते.) त्यांत तो आत्मा ज्याप्रमाणें अविक्रिय (विकार अगर फेरबदल न झालेला असा) राहतो, त्याचप्रमाणें दुसराही देह आत्म्यास प्राप्त झाला तरी तो आत्मा अविक्रियच राहिला पाहिजे; अथवा अविक्रिय आत्म्यालाच ती अन्यदेहाची प्राप्ति झाली पाहिजे असा अर्थ होय. असें झालें असतां (अन्य देह प्राप्त झाला असतां) बुद्धिमान् मनुष्य मोह पावत नाहीं.—खरेंच आहे. मुख्य वस्तु आत्मा आहे. तो आत्मा जशाचातसाच राहतो असें समजल्यावर शहाणा मनुष्य क्षणभंगुर देहासाठीं कशाला शोक करील ?—॥ १३ ॥

रामानुज यावरून असा सिद्धांत काढतातः—आत्मा नित्य आहे, तथापि पूर्वजन्मांतील कर्माकर्मांच्या संचयानें त्यास देहबंध झालेला असतो; तो सुटावा यासाठीं आपआपल्या वर्णाश्रमास युक्त अगर उचित असें शास्त्रोक्त कर्म निष्कामबुद्धीनें करावें व हें शास्त्रोक्त कर्म करित असतां जीं सुखदुःखें प्राप्त होतील तीं कर्मसमाप्तीपर्यंत अगर देहपात होईपर्यंत मुकाट्यानें सहन करावीं.—शंकराचार्य ज्ञान-

मार्ग सांगत आहेत व गीतेचा उद्देशही तसाच आहे अशी ज्यांची खातरी आहे, त्यांस हें ज्ञानशून्य कर्माचें ह्मणणें कबूल होणार नाहीं हें उघडच आहे.—

मधुसूदनी टीकेंत–' देहमात्रं चैतन्यविशिष्टमात्मा ' (देहाच्या आकाराचा व ज्ञानयुक्त असें आत्म्याचें लक्षण आहे) असें ह्मणणारे **लौकायतिक** यांचें खंडन करून आत्मा हा विभु (सर्वव्यापी) आहे असें या श्लोकांत सिद्ध केलें आहे. सर्वव्यापी असणें ह्मणजेच नित्य असणें असा वेदांती लोकांचा सिद्धांत आहे.—आत्मा नाश पावत नाहीं हें सिद्ध करण्यास ते पुष्कळ प्रमाणें आणितात, त्यांतील एकच येथें सांगतों, तें हें. जन्म पावल्याबरोबर मूल स्तनपान कराव्यास लागतें; त्याला कोणी शिकवीत नाहीं आणि दुग्धपान तर तें करितें. यावरून पूर्वदेहामध्यें खाण्यापिण्याची क्रिया करित असणारा आत्माच नवीन देहांत आला असला पाहिजे; ह्मणून तो जन्म पावत नाहीं व मरत नाहीं. यावरूनच वेदांती आत्मा नित्य आहे, असें ठरवितात. -

या प्रमाणासंबंधानें आलीकडील अनुभवजन्यप्रमाणशास्त्रानुयायी (अनुभवानें सिद्ध झालेल्या प्रमाणांच्या नियमान्वयें शोध करणारा तत्त्ववेत्ता) इतकेंच ह्मणेल कीं मुलास खाण्यापिण्याची जी क्रिया करितां येते ती शक्ति उदरामध्यें जन्म होतांनाच मातापितरांकडून मिळालेली असते. दोघांचेही ह्मणण्यांत खरा अंश हा आहे कीं पूर्वजन्मामुळें ही शक्ति आपल्यास प्राप्त होते. आतां पूर्वजन्म ह्मणजे आत्म्याचा देहांतरांतील अनुभव अगर पूर्वजांचा अनुभव हा कायतो प्रश्न आहे. ' आत्मा वै पुत्रः ' (पुत्र हा आपलाच आत्मा होय) हा सिद्धांत आत्म्याचें नित्यत्व व बापापासून पुत्राकडे येण्याचें त्याचें आनुवंशिकत्व (Heredity) दाखवितो ! मूळच्या खऱ्या सिद्धांताचें हें आधुनिक स्पष्टीकरण होय.—दोहींमध्यें आत्माच नित्य आहे. पूर्वींचे लोक पूर्वकर्मासह आत्मा प्रगट होतो असें ह्मणत व हल्लीं, आनुवंशिक संसंस्कारासह (आई बापांचे गुण घेऊन) वंशजाचा आत्मा प्रकट होतो असें ह्मणतात; हाच कायतो भेद आहे. ॥ १३ ॥

यद्यप्यात्मविनाशनिमित्तो मोहो न संभवति नित्य आत्मेति विजानतस्तथाऽपि शीतोष्णसुखदुःखप्राप्तिनिमित्तो मोहो लौकिको दृश्यते। सुखवियोगनिमित्तो दुःखसंयोगनिमितश्च शोकं, इत्येतदर्जुनस्य वचनमाशङ्क्याऽऽह–

जरी आत्म्यांचा नाश होईल असा 'आत्मा नित्य आहे'. असें जाणणारास मोह (तारतम्याचा अभाव) उत्पन्न होणार नाहीं, तरी थंडी, ऊन, सुख दुःख प्राप्त झालें असतां मोह उत्पन्न होतो असें व्यवहारांत नेहमीं दिसतें. सुखाचा वियोग झाला ह्मणजे व दुःखाचा संयोग (प्राप्ति) झाली ह्मणजे प्रत्येकाला शोक होतो असें. लौकिकांत (व्यवहारांत) दिसतें.–सारांश आत्म्यासंबंधानें नाहीं तरी इतर कारणांनीं शोक हा मनुष्याचे पाठीमागें लागलाच आहे व भीष्मादिकांच्या समागमसुखाचा वियोग झाल्यामुळें शोक व अधर्मरूपी दुःखाची जोड होणार ह्मणून शोक होत आहे अशी अर्जुन शंका घेईल ह्मणून ह्मणतात.–

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ॥
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत १४

पदासह अन्वयार्थ–

–कारण–**कौन्तेय** (हे कुंतिपुत्रा!) **मात्रास्पर्शाः** (मात्रा=इंद्रियें त्यांचे स्पर्श = विषयांशीं जवळ येणें–इंद्रियांचे विषयांशीं संयोग–) **शीतोष्णसुखदुःखदाः** (थंडीचें, उष्णाचें, सुखाचें व दुःखाचें भान उत्पन्न करणारे आहेत.) **तु** (खरोखर) **आगमापायिनः** (–तेयेणारे व जाणारे आहेत.) **अनित्याः** (–ह्मणून–क्षणभंगुर आहेत). **भारत** (अर्जुना !) **तान्** (त्यांस) **तितिक्षस्व** (सहन कर.)— आपल्यास शीतउष्णांचें अगर सुखदुःखांचें भान होतें तें विषयांचा इंद्रियांशीं संयोग होतो तेव्हां होतें. ह्मणजे एकादी सुंदर वस्तु डोळ्यानें पाहिली किंवा सुंदर गाणें कानानें ऐकिलें तर सुख होतें, वाईट वस्तु पाहिली किंवा ऐकिली तर दुःख होतें.–तात्पर्य, हें सुखदुःख होतें तें इंद्रियांस होतें. आत्म्यास होत नाहीं. शिवाय हीं सुखदुःखें

चिरकाळ रहाणारीं आहेत असेंही नाहीं. केव्हां येतात व केव्हां जातात ! तेव्हां केवळ इंद्रियांस मात्र स्पर्श करणारीं आणि तींही चिरकाल स्पर्श करणारीं नव्हेत, अशीं सुखदुःखें आहेत, त्याबद्दल शहाण्या माणसानें शोक करूं नये. जें येईल तें सहन करावें हाच तत्त्वज्ञांचा मार्ग आहे.–

शांकरभाष्य.—

मात्रास्पर्शा इति । मात्रा आभिर्मीयन्ते शब्दादय इति श्रोत्रादीनीन्द्रियाणि,मात्राणां स्पर्शाःशब्दादिभिः संयोगास्ते शीतोष्णसुखदुःखदाः शीतमुष्णं सुखं दुःखं च प्रयच्छंतीति । अथवा स्पृश्यन्त इति स्पर्शा विषयाः शब्दादयः, मात्राश्च स्पर्शाश्च शीतोष्णसुखदुःखदाः शीतं कदाचित्सुखं कदाचिद्दुःखं तथोष्णमप्यनियतरूपं, सुखदुःखे पुनर्नियतरूपे यतो न व्यभिचरतोऽतस्ताभ्यां पृथक्शीतोष्णयोर्ग्रहणम् । यस्मात्ते मात्रास्पर्शादय आगमापायिन आगमापायशीलास्तस्मादनित्या अतस्ताञ्शीतोष्णादींस्तितिक्षस्व प्रसहस्व, तेषु हर्षं विषादं च मा कार्षीरित्यर्थः ॥ १४ ॥

भाष्याचा अर्थ—

ज्यांच्या योगानें आपण शब्दादि (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे विषय) मोजतों (समजतों) त्या मात्रा ह्मणजे इंद्रियें होत. यीं इंद्रियांचे विषयांशीं जे संयोग होतात त्यांच्या योगानें आपल्यास अमुक थंड आहे, अमुक ऊन आहे, अमुक सुखकारक आहे, दुसरें दुःखकारक आहे असें भान होतें. किंवा स्पर्श याचा अर्थ विषय (इंद्रियांनीं जाणण्याचे पदार्थ) असा करून इंद्रियें आणि त्यांचे विषय आपल्यास सुखदुःख वगैरे देतात असाही अर्थ करावा. आतां थंड पदार्थानें कधीं (उन्हाळ्यांत) सुख होतें, कधीं (हिंवाळ्यांत) दुःख होतें; उष्णाचाही असाच प्रकार आहे; सारांश, शीत आणि उष्ण यांपासून सुखच होईल किंवा दुःखच होईल असें, अगर तीं सुखरूपीं अगर दुःखरूपीं आहेत असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण सुखदुःखांचें तसें नाहीं. त्यांचें स्वरूप ठरलेलें आहे.

ह्मणून शीत, उष्ण व सुखदुःख हीं निरनिराळींच घ्यावीं.–हा केवळ समास कसा सोडवावयाचा याचा प्रश्न आहे.–आतां, इंद्रियें आणि त्यांचे विषय वगैरे आतां आहेत, घटकेनें नाहींत, आतां, नाहींत, घटकेनें येतील असे येणारे जाणारे आहेत, ह्मणजे ते चिरकाल राहणारे नाहींत. ह्मणून शीतोष्णादिकांस सहन कर. शीतोष्ण किंवा सुखदुःखें प्राप्त झालीं असतां हर्ष शोक करूं नकोस, हा अर्थ होय.॥१४॥

मधुसूदनीकार 'नित्य जो तूं त्या त्वां अनित्याचा शोक करणें उचित नाहीं' असें ह्मणतात.

ज्ञानेश्वराची एकच ओंवी स्पष्टीकरणार्थ देतों.–' देखे शब्दाची व्याप्ति। निंदा आणि स्तुति। तेथ द्वेषाद्वेष उपजती। श्रवणद्वारें॥ आणखी एक–! ' हे विषय तरी कैसे। *रोहिणीचें जळ जैसें। कां स्वप्नींचा आभासे। भद्रजाती॥ १४॥

शीतोष्णादीन्सहतः किं स्यादिति शृणु–

शीतोष्ण जो सहन करितो त्याचें काय होतें तें सांगतों, ऐकः–

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ॥
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते॥१५॥

प० अ० अर्थ.—

पुरुषर्षभ (हे पुरुषांमध्यें ऋषभा, श्रेष्ठा! अर्जुना!) **समदुःखसुखं** (सम ह्मणजे सारखीं आहेत दुःखसुखें ज्याला अशा, अथवा सुखदुःखें प्राप्त झालीं असतां ज्याला हर्ष शोक उत्पन्न होत नाहींत अशा) **यं** (ज्या) **धीरं** (धी ह्मणजे बुद्धि आहे ज्याला अशा बुद्धिमान्) **पुरुषं** (पुरुषाला) **एते** (शीतोष्णादि विषय) **न व्यथयन्ति** (व्यथा उत्पन्न करित नाहींत, विकार उत्पन्न करित नाहींत;) **सः** (तो–पुरुष–) **अमृतत्वाय** (अमरत्व प्राप्त होण्यास) **कल्पते** (योग्य आहे.)–ज्याला शीतोष्णादि विषयांपासून सुखदुःखादि विकार उत्पन्न होत नाहींत, तोच धीर पुरुष मोक्षाला योग्य आहे असा भाव आहे.–

---

* रोहिणीचें जळ = मृगजळ.

शांकरभाष्य-

यं हीति । यं हि पुरुषं समदुःखसुखं समे दुःखसुखे यस्य तं समदुःखसुखं सुखदुःखप्राप्तौ हर्षविषादरहितं धीरं धीमन्तं न व्यथयन्ति न चालयन्ति नित्यात्मदर्शनादेते यथोक्ताः शीतोष्णादयः स नित्यात्मदर्शननिष्ठो द्वंद्वसहिष्णुरमृतत्वायामृतभावाय मोक्षाय कल्पते समर्थो भवति ॥१५॥

शांकरभाष्यार्थ.-

ज्या पुरुषाला सुखदुःखें सारखींच वाटतात अथवा सुखदुःखें प्राप्त झालीं असतां हर्ष, खेद, आनंद, शोक उत्पन्न होत नाहींत, अशा ज्या बुद्धिमान् पुरुषाला नेहमीं अविनाशी अशा ब्रह्मसुखाचा, स्वस्वरूपाचा समागम होत असल्यामुळें वर सांगितलेले थंडी, ऊन वगैरे विकार उत्पन्न करणारे विषय वश करित नाहींत.-सारांश नेहमीं अविकारी स्वस्वरूपाच्या अनुभवाचा लाभ होत असल्यामुळें जगांतील विषयांच्या योगानें ज्या बुद्धिमान्, ज्ञानी मनुष्याला सुखदुःखांपासून विकार उत्पन्न होत नाहींत,-तो पुरुष सदैव आत्मनिष्ठ आणि शीतोष्णाद्विकांस सहन करणारा असतो; ह्मणून जेथें मरणाचें अस्तित्व नाहीं अशी मोक्षपदवी प्राप्त होण्यालाही समर्थ होतो.-तात्पर्य, अशा आत्मनिष्ठ पुरुषाला मोक्ष मिळविण्याची योग्यता प्राप्त होते. 'एतदमृतमयमेतद्ब्रह्म' (छांदोग्य ४।१.५) अमृत ह्मणजे ब्रह्म असा अर्थ ठरविण्यालाही आधार आहे.- ॥ १५ ॥

मधुसूदनीकार-'पुरुष' शब्दाची 'पूर्णत्वेन पुरि शयानं' (पूर्णपणानें पुरि, देहनामक नगरामध्यें, निजणारा म्हणजे सर्व शरीरभर पसरलेला) अशी व्युत्पत्ति देऊन 'पुरुषः स्वयंज्योतिर्भवतीति श्रुतेः' (पुरुष हा स्वयंप्रकाश आहे अशी श्रुति सांगते.) असें पुरुष शब्दावर व्याख्यान देतात. तसेंच 'स वा अयं पुरुषः सर्वासु पूर्षु पुरिशयो नैतेन किंच नानावृत्तं नैतेन किंच नासंवृतमिति श्रुतेः' (सर्व पुरीमध्यें शयन करणारा हा पुरुष होय, याला कोणतीही गोष्ट माहित नाहीं, ठाऊक नाहीं असें नाहीं असाही श्रुतीचा आधार दाखवितात. पुरुष शब्द एकवचनांत आहे; ह्मणून त्याच्यायोगानें

अनेक आत्मे आहेत असें ह्मणणाऱ्या सांख्यमताचा भगवंतांनीं निरास केला हा गूढार्थ होय ! 'धीरं' शब्दाची व्याख्या पहा, **'धियमीरयतीति स धीरः, धीप्रेरकः, धीसाक्षी** (बुद्धिशक्तीला प्रेरणा करणारा, बुद्धीचा साक्षी ह्म० धीर होय). मोक्षाचें थोडक्यांत लक्षण पहा:— **'स्वस्वरूपभूतब्रह्मात्म्यैक्यज्ञानेन सर्वदुःखोपादानतदज्ञाननिवृत्त्युपलक्षितो निखिलद्वैतानुपरक्तस्वप्रकाशपरमानंदरूपः'** (आपल्या स्वस्वरूपाच्या अनुभवानें ब्रह्म आणि आत्मा एकच आहे असें ज्ञान झाल्यामुळें सर्व अज्ञान आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुःखांचा जेथें लय होतो आणि द्वैतभावाचा विकार पूर्णपणानें नाहींसा झाल्यामुळें स्वस्वरूपज्ञानाच्या श्रेष्ठ आणि नित्य अशा आनंदाचें रूपच होऊन बसतो तो मोक्ष होय.)

शंकरानन्द ' विषयग्रहणापासून बुद्धीला मागें वळविणारा, परावृत्त करणारा तो धीर असें ह्मणतात.

रामानुजाचार्य ह्मणतात:—**अवर्जनीयदुःखं सुखवन्मन्यमानोऽमृतत्वसाधनतया स्ववर्णोचितं युद्धादिकर्मानभिसंहितं फलं कुर्वन्'** (अपरिहार्य दुःखाला सुखाप्रमाणेंच मानून मोक्ष मिळविण्यासाठीं आपआपल्या वर्णाश्रमास विहित असें फलाशा न ठेवतां युद्धादिक कर्म करणारा तो धीर पुरुष होय असें ह्मणतात !

मध्वाचार्यांनीं 'पुरु (ब्रह्म) सरति (जानाति) स पुरुषः' (ब्रह्म जाणतो तो पुरुष) अशी व्युत्पत्ति दिली आहे !

वामन पंडित ह्मणतात:—देहींच उठला फोड । तो खाजवितां वाटे गोड । खाजवितां उठती मोड । तिडिकांचे त्यांतुनि ॥ ऐसें भोग सुखीं सुख । भोग दुःखीं दुःख । मानितो तों आणिक । कोटी दुःखें उपजती ॥ फोडा खाजवूं हे असोशी । धैर्य धरून जो सोशी । व्यथा न देती तयासी । बरा होय ॥ ऐसा सुखदुःखीं सम । धैर्यें राहे साधकोत्तम । त्यास विषयेंद्रियसमागम । व्यथा न करी ॥ १५ ॥

इतश्च शोकमोहावकृत्वा शीतोष्णादीसहनं युक्तं, यस्मात्—

या शिवाय आपल्या मनांतून शोक आणि मोह टाकून देऊन शीतोष्ण सहन करणें तुला योग्य आहे; कारणः—

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः॥१६॥

प० अ० अर्थ—

असतः (जें मिथ्या आहे त्याला, देहासारखें किंवा सुखदुःखासारखें दृश्य आहे त्याला) **भावः** (असणेपणा, सत्ता, अस्तित्व) **न विद्यते** (असत नाहीं) **सतः** (जें खरें आहे त्याला, आत्म्याला किंवा ब्रह्माला) **अभावः** (नाहींपणा, नास्तित्व) **न विद्यते** (असत नाहीं)–सारांश, दृश्याला अस्तित्व नाहीं आणि सद्वस्तूला नाश नाहीं.–**तत्त्वदर्शिभिः** (सत्यच पाहणारे ब्रह्मज्ञान्यांनीं) **अनयोः उभयोः अपि** (या दोहोंचाही) **अन्तः** (सत्यसिद्धांत) **दृष्टः**, (पाहिला आहे).–तात्पर्य हें कीं, ब्रह्मनिष्ठ पंडितांनीं या दृश्याचा आणि सद्वस्तूचा पक्का शोध करून कायमचा सिद्धांत काढिला आहे कीं दृश्य सत्य (नित्य) नाहीं आणि सद्वस्तु असत्य (नाशवंत) नाहीं.–

शांकरभाष्यः—

नासत इति । नासतोऽविद्यमानस्य शीतोष्णादेः सकारणस्य न विद्यते नास्ति भावो भवनमस्तिता । न हि शीतोष्णादि सकारणं प्रमाणैर्निरूप्यमाणं वस्तु संभवति ।

भाष्यार्थ—

शीत आणि उष्ण इत्यादि जीं कार्यें आहेत म्हणजे ज्यांची उत्पत्ति कारणापासून झाली असे जे सर्व दृश्यपदार्थ त्यांना व त्यांच्या कारणांना कायमचें अस्तित्व नाहीं.–हें कसें त्याचा निकाल आचार्य आतांच (६१ व्या पृष्ठांत) करतील:—कारण, ज्याला ज्याला ह्मणून कारण आहे ते ते सर्व कार्यरूपी दृश्य पदार्थ व त्यांचें स्वरूप हीं दोन्हीं (प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, ह्या) प्रमाणांनीं पाहूं गेल्यास–तीं सर्व–नाहींत असाच सिद्धांत ठरतो! किंवा हे सर्व दृश्यपदार्थ प्रमाणांनीं सिद्ध होणारे आहेत; म्हणून त्यांचें अस्तित्व संभवत नाहीं!

विकारो हि सः विकारश्च व्यभिचरति, यथा घटादि-संस्थानं चक्षुषा निरूप्यमाणं मृद्व्यतिरेकेणानुपलब्धेरसत्, तथा सर्वो विकारः कारणव्यतिरेकेणानुपलब्धेरसत् । जन्मप्रध्वंसाभ्यां प्रागूर्ध्वं चानुपलब्धेः । मृदादिकारणस्य च तत्कारणव्यतिरेकेणानुपलब्धेरसत्त्वम् । तदसत्त्वे च सर्वाभावप्रसङ्ग इति चेत् । न, सर्वत्र बुद्धिद्वयोपलब्धेः सद्बुद्धिरसद्बुद्धिरिति । यद्विषया बुद्धिर्न व्यभिचरति तत्सत्, यद्विषया बुद्धिर्व्यभिचरति तदसदिति सदसद्विभागे बुद्धितन्त्रे स्थिते सर्वत्र द्वे बुद्धी सर्वैरुपलभ्येते समानाधिकरणे ।

–हें सर्व दृश्य जगत् उत्पन्न झालें आहे म्हणजे उत्पन्न होण्या-पूर्वीं तें नव्हतें आणि प्रलय झाल्यानंतर तें असणार नाहीं.–मूळ स्थितीमध्यें विकार होऊन उत्पत्तिस्थितिलयाला पावणाऱ्या सर्व दृश्य वस्तूंला कायमचें अस्तित्व नसतें. पहा, घटासारखे–नामरूप असणारे–दृश्याची आपल्या नेत्रांनीं आपण आंत बाहेरून चौकशी केली तर आपल्यास आढळून येईल कीं घटाला कारण जी माती, ती नसली तर घटाची उत्पत्तीच होणार नाहीं; म्हणजे घटाला कायमचें अस्तित्व नाहीं. त्याचप्रमाणें कारण नाहींसें झालें असतां नष्ट होणारें सर्व दृश्य हेंही असत् असें आपल्यास म्हटलें पाहिजे.––कारण उत्पत्ति होण्याच्या पूर्वीं आणि नाश झाल्यानंतर या दृश्याला (कार्याला) अस्तित्व असत नाहीं.–ज्याला कायमचें अस्तित्व नाहीं, अगर जें सर्वकाळीं आणि सर्व देशीं असूं शकत नाहीं, तें सत्य नव्हे, मिथ्या आहे, असा वेदांताचा सिद्धांत आहेः–ह्याचप्रमाणें घटादिकांचें कारण मृत्तिका वगैरे त्यांचींहीं कारणें नाहींशीं झालीं म्हणजे मृत्तिका वगैरेचेंही अस्तित्व नष्ट होतें. याप्रमाणें कारणाचें कारण, त्या कारणाचें कारण अशी लांबच लांब माळका लाविली आणि सर्व कारणें व कार्यें नष्ट केलीं तर ज्याला कायमचें अस्तित्व आहे असें कांहींच राहणार नाहीं; अशी शंका कोणी घेईल तर ती बरोबर नाहीं.

कारण जें जें ह्मणून दृश्यजात आहे किंवा कल्पनेला गोचर आहे, त्या सर्व ठिकाणीं दोन प्रकारचीं चैतन्यवृत्ति (Consciousness) अस्तित्वांत येते. एक 'आहे' असें सांगणारी चैतन्यवृत्ति आणि दुसरी नाहीं असें सांगणारी चैतन्यवृत्ति. अशा ह्या दोन प्रकारच्या चैतन्यवृत्ति आहेत. म्हणजे एक सद्वस्तूचें ज्ञान करून देणारी व दुसरी मिथ्या वस्तूचें ज्ञान करून देणारी अशा ह्या वृत्ति आहेत. ज्या विषयापासून चैतन्यवृत्ति कधींही ढळत नाहीं तो विषय सत् आणि ज्या विषयापासून चैतन्यवृत्ति ढळते तो विषय असत् अगर मिथ्या असा दोहींमध्यें फरक आहे. याप्रमाणें दोन प्रकारच्या वृत्ति आणि सत्य व मिथ्या असे दोन प्रकारचे विषय सर्वत्र एका ठिकाणींच नेहमीं सर्वांस उपलब्ध होतात. चैतन्यामुळें हा भेद झाला आहे हें स्पष्टच आहे– आचार्यांच्या ह्मणण्याचें तात्पर्य थोडक्यांत असें आहे:–कोणतीही वस्तु आपण पाहिली असतां तेथें दोन प्रकारच्या स्थितींचें आपल्यास ज्ञान होतें. उदाहरणार्थ घट घेऊं. घटाचें नामरूप व त्याचें कारण हीं आपल्यास घट पाहिल्यावर व अमळसा विचार केल्यावर समजतात. पण या नामरूपाचें व घटाचें कारण जी मृत्तिका तिचें नामरूप व कारण यांचा विचार करूं लागलों व ह्या इंद्रियांस व बुद्धिगोचर होणाऱ्या स्थितींच्या मागें काय आहे याचाही शोध करूं लागलों ह्मणजे नामरूप आणि कारण या उपाधींसहित असणाऱ्या दृश्याच्या पलीकडे उपाधिशून्य, उपाधिरहित अगर निरुपाधि असें कायमचें राहणारें कांहीं असावें असें वाटूं लागतें. पुढें आपला आत्मा, जो इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार व चैतन्य यांच्या पलीकडे आहे व ज्या आपल्याच आत्म्याचें ज्ञान आपल्यास इंद्रियें वगैरेकडून न होतां केवळ स्वानुभवावरूनच तो आहे अशी आपल्यास ओळख पटते, त्याचप्रमाणें दृश्यजगताच्या पाठीमागें सत्स्वरूप अगर ब्रह्म आहे अशी आपल्या आत्मस्वरूपावरूनच आपली खातरी होते. तेव्हां घटाचें नामरूप व कारण हें दृश्य आणि याच्या पलीकडे असणारी स्थिति ती सत् किंवा ब्रह्म असे दोन विभाग सहजच झाले. दृश्याचें ज्ञान आपल्यास इंद्रियें, मन व बुद्धि यांच्या योगानें होतें व दृश्याचा आभास ज्यावर होतो त्या ब्रह्माचें ज्ञान–नव्हे ओ-

ळखच—आत्म्याच्या स्वस्वरूपाच्या अनुभवावरून होतें. ह्मणून एकंदरीनें सत् आणि असत् असे दोन विभाग झाले व त्या विभागांचें ज्ञान देणारीं साधनें हीं दोन प्रकारचीं झालीं. ज्याला वेदांती लोक माया, अविद्या, प्रकृति अशीं नांवें देतात त्याचें ज्ञान इंद्रियांच्या द्वारानें व मनाच्या द्वारानें बुद्धीस मिळतें; बुद्धीच्या दरबारांत त्या त्या विषयज्ञानाची व्यवस्था लागून त्याला व्यवस्थित स्वरूप येतें आणि विचारशक्तीच्या सामर्थ्यानें त्या ज्ञानाला सत्यत्व येतें असा भास होतो. हें ज्ञान सद्वस्तूचें नसतें ह्मणून खरें नाहीं असें वेदांत्यांचें मत आहे; हें ज्ञान अपूर्ण आहे असें युरपियन वेदांत्यांचें (अद्वैतवाद्यांचें) मत आहे. आत्मानुभवानें सद्वस्तूचा परिचय झाला ह्मणजे ज्ञानाची परमावधि होऊन आत्मा तीच सद्वस्तु अगर ब्रह्म, आणि ब्रह्म तोच आत्मा असा अनुभव येतो; आणि इंद्रियें, मन, बुद्धि, विचारशक्ति यांकडून मिळालेल्या दृश्य जगाच्या ज्ञानाला व दृश्य जगाला पूर्णता येते असें शोपेनहारनामक जर्मन अद्वैतवाद्याचें मत शांकरमताशीं पुष्कळच बरोबर जुळतें; हें ज्यांस ठाऊक नाहीं त्यांस कळविलें असतां एक प्रकारचा आनंद, समाधान व अभिमान उत्पन्न होतील असें जाणून ही विशेष माहिती दिली आहे. सांख्यमताचा अगर आचार्यांच्या मताप्रमाणें अद्वैतमताचा मुख्य विचार ३३ साव्या श्लोकांत आटपेल, त्या वेळीं स्पायनोझा कांट, हेगेल व शोपेनहार इत्यादिक तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा सारांश देण्याचें योजिलें आहे, तेथें हाच अभिमानजनक विषय अधिक दृढ होईल.—

न नीलोत्पलवत्सन्घटः सन्पटः सन्हस्तीति। एवं सर्वत्र। तयोर्बुद्ध्योर्घटादिबुद्धिर्व्यभिचरति। तथा च दर्शितम्। न तु सद्बुद्धिः। तस्माद्घटादिबुद्धिविषयोऽसन्व्यभिचारात्, न तु सद्बुद्धिविषयोऽव्यभिचारात्। घटे विनष्टे घटबुद्धौ व्यभिचरन्त्यां सद्बुद्धिरपि व्यभिचरतीति चेत्। न, पटादावपि सद्बुद्धिदर्शनात्। विशेषणविषयैव सा सद्बुद्धिः। सद्बुद्धिवद्घटबुद्धिरपि घटा-

न्तरे दृश्यत इति चेत् । न, पटादावदर्शनात् ।

—आतांच वर सांगितलें आहे कीं कोणताही पदार्थ पाहिला असतां तेथें दोन प्रकारच्या चैतन्यवृत्ति निर्माण होतात, किंवा त्यांचा उद्बोध होतो. या दोन चैतन्यवृत्तींचे विषय, एक पदार्थांतील सद्-वस्तू आणि दुसरे पदार्थाचें दृश्यस्वरूप हीं होत. ह्यांपैकीं एक खरें आणि दुसरें मिथ्या आहे. दोन्हीं खरीं नाहींत. दोन्हीही एकच असतील अशी शंका व्यर्थ आहे. कारण तीं एकच असतीं तर दोन ज्ञानें होणें अशक्य झालें असतें, दोहोंमध्यें कांहींच संबंध नसता तर दोहोंचें वास्तव्यही एका ठिकाणीं संभवलें नसतें. पण तीं दोन्ही एका ठिकाणीं असतात व दोन ज्ञानें आपल्यास होतात, ह्मणून तीं दोन आहेत हें उघड झालें. तसेंच एक असून भिन्न आहेत असें ह्मणणें विरोधात्मक आहे. दृश्य हें सद्वस्तूचें एक विशेषण आहे असाही प्रकार नाहीं. तर मग दृश्य आणि सद्वस्तु हीं दोन्ही एकच पदार्थांत राहतात, एक नाहींत, भिन्न नाहींत, एक दुसऱ्याचें विशेषणही नाहीं, तर यांचा संबंध तरी काय आहे? ह्याचें उत्तर आचार्य देतात.—नीलकमलामध्यें निळेपणा हा जसा कमळाचा गुण आहे त्याप्रमाणें असणारा घट, असणारा पट, असणारा हत्ती (घट आहे, पट आहे, हत्ती आहे,) यांत 'असणारा' किंवा 'आहे' हा शब्द घटपटादिकांचें विशेषण नाहीं. तर असणेपणा हा, नित्य असणारी सद्वस्तु आहे; हिच्यावर घटपटादि विशेष दृश्यांचा आभास आहे.—असणेपणा हें ब्रह्म किंवा सद्वस्तु होय. ह्या ब्रह्मावर दृश्याचा आभास मायेच्या योगानें उत्पन्न होतो असें वेदान्ती ह्मणतात; व इंद्रियें, मन, बुद्धि आहेत ह्मणून हा आभास अगर अपूर्णज्ञान होतें असें युरपियन वेदान्ती ह्मणतात. तात्पर्य एकच आहे तें हें कीं कोणताही पदार्थ पाहिला असतां दोन प्रकारची चैतन्यवृत्ति, दोन प्रकारचीं ज्ञानें एका ठिकाणींच अनुभवास येतात. एक सद्वस्तूचें ज्ञान आणि दुसरें नाम, रूप, कारण इत्यादि दृश्याचें ज्ञान अगर ज्ञानाभास. हीं ज्ञानें अगर चैतन्यवृत्ति एकस्वरूपींही नाहींत, अत्यंत भिन्नही नाहींत, एकमेकांचीं विशेषणें नाहींत, तर सद्वस्तूच्या ठिकाणीं व सद्वस्तूच्या ज्ञानाच्या ठिकाणीं दृश्याचा व दृश्यज्ञानाचा

आभास होतो, अशी खरी स्थिति आहे. दृश्य नाहींसें होतें ह्मणून दृश्यज्ञान नेहमीं एकसारखें रहात नाहीं.—असो; याप्रमाणेंच सर्वत्र पदार्थांचे ठिकाणीं सद्वस्तूचें व दृश्याचें ज्ञान होतें. ज्या चैतन्यवृत्तीं-च्या योगानें हीं भिन्न ज्ञानें होतात, त्यांपैकीं घटादिकरून दृश्य ते-वढें घेणारी चैतन्यवृत्ति चंचल होते, नाहींशी होते ती कशी हें मागें सांगितलेंच आहे. आतां सदबुद्धि किंवा सद्वस्तु पाहणारी चैतन्यवृत्ति स्थिर असते, कधींही नष्ट होत नाहीं. ह्मणून (१) घट वगैरेचें ज्ञान होतें त्या चैतन्यबुद्धीला (इंद्रिय, मन, बुद्धि वगैरेला) गोचर जे घट-पटादि पदार्थ, ते सर्व असत् ह्मणजे मिथ्या होत. कारण घट नष्ट झाला ह्मणजे घटबुद्धिही नष्ट होते.—आणि ज्या विषयासंबंधानें तो विषय घेणारी बुद्धि नष्ट होते, तो विषय मिथ्या असतो, असें आप-ण पूर्वींच ठरविलें आहे.—तसेंच (२) सद्बुद्धीचा विषय सद्वस्तु होय. सद्वस्तु नित्य असल्यामुळें व तिचा नाश होण्याचा संभव नसल्या-मुळें सद्बुद्धि स्थिर राहते. चंचल होत नाहीं, ह्मणून सद्वस्तु असत् ह्मणजे मिथ्या नाहीं. यावर अशी शंका घेण्यांत येते कीं, घट नष्ट झाला ह्मणजे घटबुद्धि चंचल किंवा नष्ट होते, तेव्हांच सद्बुद्धि सुद्धां चंचल किंवा नष्ट व्हावी. —आचार्य उत्तर देतातः— तसें नाहीं. कारण घट नष्ट झाला तरी पट वगैरे इतर पदार्थ अस-तात, तेथें सद्बुद्धि कायमच असते. सारांश सद्बुद्धीचे विषय वि-शेष पदार्थ नाहींत, तिच्या ज्ञानाचा विषय ‘ असणेपणा ’ हा आहे आणि तो असणेपणा पदार्थांच्या नाशानें नाहींसा होणें शक्य ना-हीं.—कारण सर्व पदार्थ नाहींसे झाले तथापि ‘ मी आहें ’ ही जी प्रज्ञा ती कधींही नष्ट होत नाहीं. शेवटीं ब्रह्मामध्यें ‘ आहे ’ ही प्रज्ञा राहणारच! प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता डेका यानें ‘ मी आहें ’ या अनुभवावरूनच आपले तत्त्वसिद्धांत तयार केले. ह्मणून सद्बुद्धि नष्ट होण्याचा संभव नाहीं.— यावर शंका येते ती अशीः—सद्बु-द्धि कायम असून असणेपणा हा जसा पट वगैरे वस्तूंमध्यें आढळ-तो, तसेंच एक घट नष्ट झाला तरी दुसरा घट असतो तेथें तर घट-बुद्धि उत्पन्न होते! तेव्हां सद्बुद्धि ‘ कायम आहे ’ असें ह्मणतां त्याप्रमाणेंच घटबुद्धिही ‘ कायम आहे ’ असें ह्मणा. आचार्य

ह्मणतात:—नाहीं; घटबुद्धि कायमची नाहीं, कारण पट वगैरे पदार्थांमध्यें घटबुद्धिला कोठें रिघाव होतो?—ह्मणजे पट पाहून पटबुद्धि झाली ह्मणजे घटबुद्धि नष्ट होते.— सारांश सगळे घट नाहींसे केले ह्मणजे घटबुद्धिही नाहींशीच झाली पाहिजे. तसें सद्बुद्धीचें नाहीं. हें सर्व दृश्य जग नाहींसें झालें तरी सद्बुद्धि राहणारच. कारण असणेपणा किंवा ब्रह्म याला नाश नाहीं, ह्मणून सद्बुद्धीलाही नाश नाहीं. तेव्हां सदबुद्धीला गोचर होणारा विषय मात्र नित्य आणि बाकीचे सर्व विषय अनित्य असा सिद्धांत आचार्यांनीं काढिला आहे.—

"सद्बुद्धिरपि नष्टे घटे न दृश्यत इति चेत् । न, विशेष्याभावात् । सद्बुद्धिर्विशेषणविषया सती विशेष्याभावे विशेषणानुपपत्तौ किं विषया स्यात्, न तु पुनः सद्बुद्धेर्विषयाभावात् । एकाधिकरणत्वं घटादिविशेष्याभावे न युक्तमिति चेत् । नेदमुदकमिति मरीच्यादावन्यतराभावेऽपि सामानाधिकरण्यदर्शनात् । तस्माद्देहादेर्द्वंद्वस्य च सकारणस्यासतो न विद्यते भाव इति ।

यावर शंका घेतात ती अशी:—घट नाहींसा झाला ह्मणजे सद्बुद्धि तरी कोठें असते? सारांश ती दिसत नाहीं ह्मणून नष्ट होते आणि ह्मणून तिचा विषय जें ब्रह्म तेंही नष्ट होतें. . आचार्य ह्मणतात तसें नाहीं. घट नष्ट झाल्यावर सदबुद्धि दिसत नाहीं याचें कारण दृश्य पदार्थाचा अभाव हें होय. सद्बुद्धिचा विषय असणेपणा हा होय. असणेपणा हा पदार्थामध्यें ज्ञानगोचर होतो. तेव्हां पदार्थच नष्ट झाल्यास त्याचें विशेषण जो असणेंपणा, त्या असणेंपणाचें ज्ञान होण्यास मार्ग नसतो. सदबुद्धीला गोचर होणारा विषय जो घटस्थित असणेंपणा तो नाहींसा झाला ह्मणून सद्बुद्धीचा उदय होत नाहीं असें नव्हे, तर तिचा विषय जो असणेंपणा तो दाखविणारा पदार्थच नसतो ह्मणून सदबुद्धीचा तेथें उदय होत नाहीं इतकेंच कायतें आहे. . आतां असा आक्षेप घेतां येईल कीं

घटादिकांचा नाश झाला असतां घटबुद्धि तर नष्ट होतेच आणि सद्बुद्धिही अंतर्धान पावते, तेव्हां दृश्य, मिथ्या अगर नाशवंत पदार्थांचा व सत्य आणि नित्य वस्तूचा एकाच पदार्थामध्यें संबंध लावणें हें योग्य नाहीं. कारण व्यवहारांत पाहिलें असतां दोन खऱ्या गोष्टींचाच संबंध असणें योग्य होतें. सबब सत्यत्व आणि मिथ्यात्व यांचा एकाच पदार्थावरून बोध होतो हें ह्मणणें सोडून द्या. . आचार्य ह्मणतातः—नाहीं. आह्मीं ह्मणतों असा संबंध व्यवहारांत अनेक वेळ घडून येतो. पहा. 'हें उदक नाहीं' असें मृगजळ वगैरे पाहिलें असतां व उदकाचा तेथें अभाव असतो तरी 'हें' ही सत्यवस्तु व 'उदक' ही मिथ्यावस्तु या दोहींचा आरोप एकाच मृगजळावर आपण नेहमीं करितों कीं नाहीं!—तात्पर्य एकाच वस्तूमध्यें दोन निरनिराळ्या बुद्धीस गोचर होणारे विषय असणें सहजच आहे. यांपैकीं एक विषय सद्बुद्धीला गोचर होणारा, सत् ह्मणजे खरा व 'असणेपणा' असणारा असतो व दुसरा विषय असद्बुद्धीला गोचर होणारा (नामरूपात्मक असून) तो नाशवंत असतो; असें आचार्यांचें ह्मणणें आहे.—ह्मणून ते ह्मणतात, शरीर वगैरे व सुखदुःख वगैरे विषय सकारण आहेत, सकारण वस्तु नाशवंत असतात; अतएव देह वगैरे नाशवंत आहेत ह्मणजे असत् आहेत, असताला असणेपणा नसतो. तेव्हां असताला असणेपणा नाहीं हें भगवंताचें ह्मणणें यथार्थच आहे. आचार्यांनीं येथें दिलेले सिद्धांत हे आहेत. जो पदार्थ सकारण आहे तो उत्पन्न होतो ह्मणजे तिन्ही काळीं असत नाहीं आणि ह्मणून त्याच्या संबंधानें तो 'सत्' आहे असें ह्मणतां येत नाहीं. ब्रह्माला जन्मस्थितिलय नसल्यामुळें तें तिन्हीकाळीं असतें आणि ह्मणूनच तें सत् आहे, व तें कधींही नाहींसें होत नाहीं. हे दोन्ही सिद्धांत कसें सिद्ध करावयाचे तें त्यांनीं दाखविलेंच आहे. हें सर्व सांगण्याचा उद्देश हा आहे कीं, देहादिक जें असत् आहेत, त्यांच्याविषयीं शोक करण्याचें कारण नाहीं आणि आत्मा सत् आहे तेव्हां त्याचा नाश होणें शक्यच नाहीं. ह्मणून 'ज्यांच्यासाठीं शोक करणें उचित नाहीं' वगैरे अ० २ श्लोक ११ मध्यें ह्मटलें आहे.—

तथा सतश्चाऽऽत्मनोऽभावोऽविद्यमानता न विद्यते सर्वत्राव्यभिचारादित्यवोचाम। एवमात्मानात्मनोः सदसतोरुभयोरपि दृष्ट उपलब्धोऽन्तो निर्णयः सत्सदेवासदसदेवेति त्वनयोर्यथोक्तयोस्तत्त्वदर्शिभिः। तदिति सर्वनाम सर्वं च ब्रह्म तस्य नाम तदिति तद्भावस्तत्त्वं ब्रह्मणो याथात्म्यं तद्द्रष्टुं शीलं येषां ते तत्त्वदर्शिनस्तैस्तत्त्वदर्शिभिः। त्वमपि तत्त्वदर्शिनां दृष्टिमाश्रित्य शोकं मोहं च हित्वा शीतोष्णादीनि नियतानियतरूपाणि द्वंद्वानि विकारोऽयमसन्नेव मरीचिजलवन्मिथ्याऽवभासत इति मनसि निश्चित्य तितिक्षस्वेत्यभिप्रायः ॥ १६ ॥

—ज्याप्रमाणें असताला (नाशवंताला) अस्तित्व नाहीं.—त्याचप्रमाणें सद्वस्तु जो आत्मा त्याचा अभाव होणें अगर तो नाहींसा होणें (सारांश त्याचा नाश होणें) हें शक्य नाहीं. कारण तो सर्वव्यापि आहे; त्याचा अभाव कोठें आहे असें नाहींच. आह्मी आत्मा अविनाशी आहे असें ह्मणतों त्याचें कारण आत्म्याचें सर्व व्यापित्व होय. याप्रमाणें आत्मा व अनात्मक गोष्टी (आत्मा नव्हे असें दृश्य जग) ह्या अनुक्रमें नित्य आणि अनित्य गोष्टींचा निर्णय तत्त्व जाणणाऱ्या तत्त्वज्ञांनीं स्वानुभवानें (श्रुति, स्मृति व युक्ति यांच्या साहाय्यानें असें मधुसूदनीकार ह्मणतात.) काढून ' सत् तें सत् ' व ' असत् तें असत् ' असा सिद्धांत काढिला आहे. ' तें ' हें सर्वनाम सर्व जें ' ब्रह्म ' त्याचें नांव आहे. त्या ब्रह्माचा भाव ह्मणजे ब्रह्माचें खरें स्वरूप; हें जाणण्याचें ज्यांचें शील आहे ते तत्त्वदर्शी अगर तत्त्ववेत्ते होत. ह्मणून हें अर्जुना ! तूंही ह्या तत्त्वज्ञांच्या दृष्टीचा आश्रय कर; आणि शोकमोहांचा त्याग करून शीतोष्णादि अस्थिरस्वरूपी विषयांस व सुखदुःखादि स्थिरस्वरूपी विषयांस(अ० २ श्लोक १४ व त्यावरील आचार्यांचें भाष्य पहा.) विकार आहेत,हे सर्व नाशवंत आहेत, मृगजळाप्रमाणें खरे भासणारे मात्र आहेत, असें मानून—असा मनाचा निश्चय करून— ह्या शीतोष्णादिकांस व सुख-

दुःखादिकांस सहन करण्याची शिक्षा घे,–संवय करून घे.–॥ १६ ॥

मधुसूदनी टीकाकार.—' असत् ' याचें थोडक्यांत पण सुंदर असें लक्षण देतात. ' यत्कालतो देशतो वस्तुतो वा परिछिन्नं तदसत् ' ज्याला ह्मणून काळाची, देशाची अगर पदार्थाची मर्यादा आहे तें सर्व असत् होय. कालाच्या योगानें, आकाशाच्या योगानें व दुसऱ्या वस्तूच्या योगानें ज्याला मर्यादा उत्पन्न होते तें असत् होय.

. आचार्यांनीं ' सत् व असत् ' यांवर जें विस्तृत व्याख्यान दिलें आहे, तें विशिष्टाद्वैती रामानुजास आवडलें नाहीं असें दिसतें ! ते ह्मणतातः–' असतः देहादेः ' (असताचें ह्मणजे देहादिकांचें–अस्तित्व नसतें–) पुनः ह्मणतातः–विनाशस्वभावो ह्यसत्त्वम् । अविनाशस्वभावश्च सत्त्वम् । अत्र सत्कार्यवादस्यासंगतत्वान्न तत्परोऽयं श्लोकः । देहात्मस्वभावाज्ञानमोहितस्य तन्मोहशांतये ह्युभयोर्नाशित्वानाशित्वरूपस्वभावविवेक एव वक्तव्यः । (असत्त्व ह्मणजे ज्याचा नाश होणें हा धर्म आहे तें. ज्याचा नाश होणें हा धर्मच नाहीं, जे अविनाशी आहे तें सत्त्व होय. या सोळाव्या श्लोकांत सत् ह्मणजे ब्रह्म, कार्य ह्मणजे दृश्यजग हा जो वाद उत्पन्न केला आहे तो अप्रस्तुत होय, देह आणि आत्मा यांच्या धर्मांविषयीं अज्ञान असल्यामुळें अर्जुनास मोह प्राप्त झाला त्याची शांति (समाधान) करण्यासाठीं देह नाशवंत आहे, आत्मा नाहीं, हा एवढा तारतम्याचा भाग येथें सांगितला असता ह्मणजे बस्स होतें.) रामानुजाचार्यांच्या ह्या आक्षेपाला उत्तर द्यावयाला आचार्य जिवंत नव्हते; नाहींतर आचार्यांनीं त्यांचा समाचार घेतला असता. असो; देहादिक नाशिवंत कां याचें समाधानकारक उत्तर द्यावयाचें ह्मणजे कार्यकारणाचा व सद्वस्तूचा विचार अवश्यच उत्पन्न होतो, म्हणून आचार्यांचें हें विषयांतर अप्रस्तुत नाहीं असें मला वाटतें.

ज्ञानदेवांनीं एक सुंदर उपमा दिली आहे तेवढी येथें घेतों:–
सलिलीं पय (दूध) जैसें । एक होऊन मिनलें (मिळालेलें)असे।
परि निवडून राजहंसें । बेगळें कीजे ॥ तत्त्वज्ञांस राजहंसाची उपमा कशी सुंदर शोभते आहे !

वामनपंडितांचा एकच उतारा:--माती जैशी घटीं ॥ कीं तंतु जैसा पटीं ॥ कारणें असतीं शेवटीं ॥ नसेचि कार्य ॥ ऐशी प्रपंचीं ब्रह्मसत्ता । उघडी देखती गा तत्त्वतां । तत्त्वदर्शी याकरितां । ह्मणिजे यांतें ॥ प्रपंच इंद्रियां भासे । बुद्धीस नुसतें ब्रह्म असे । मृगजळ दृष्टीं दिसे । उष्ण असे बुद्धीतें ॥ एवं प्रपंच दृश्य सविकार । हें असत्, यांत निर्विकार । ब्रह्म देखती, सार । असारींही ॥ १६ ॥

निष्काम कर्म आणि मुक्ति.

खिस्ती प्रेषित ह्मणतात:—अहंकार हाच सर्व प्रकारच्या पापांचें मूळ व मध्यस्थान आहे. स्वार्थत्याग केला, अहंकाराला जाळून टाकिलें, तरच ईश्वरापाशीं जाऊन आपल्यास सरूपता नामक मुक्ति मिळेल. निष्कामता, आशाशून्यता, तितिक्षा (जें जें प्राप्त होईल तें तें उत्साहबुद्धीनें सहन करण्याची शक्ति) आणि कर्तव्यजागरूकता (ईश्वराच्या ज्या आज्ञा आहेत त्या पाळण्याविषयींची दक्षता) इतके गुण अंगांत असून तदनुसार वर्तन झालें तरच नरजन्माचें सार्थक्य होतें.

कर्म केल्यानें मुक्ति मिळते असें पिलाजियस मत होतें. चांगलें दिसेल तेंच चांगलें, असेंच वरील गृहस्थाचें ह्मणणें असेल तर कांहीं ह्मणणें नाहीं. पण कर्म करण्याचा अंतस्थ हेतु पाहिला असतां आपल्यास दिसून येईल कीं कोणीही मनुष्य कर्म करितो त्यांत त्याचा स्वार्थसाधनाचा हेतु असतो. हाच एक हेतु धारण केला म्हणजे ईश्वराचें आपल्यास विस्मरण होतें; नंतर आपण पापी होतों व पुढें पतित होतों.—सारांश करावेंच लागतें म्हणून निर्लोभमनानें कर्म केलें व ईश्वरावर निष्ठा ठेविली तरच ईश्वराच्या पायांपाशीं आपल्यास जातां येईल. ईश्वरचरणीं दृढनिष्ठा हें मुख्य कर्तव्य आहे. कर्मानें, सकाम कर्मानें मुक्ति मिळत नाहीं:—(डाबिनकृत धर्मक्रांतीचा इतिहास भाग १).

खिस्तीशक सुरू होण्याच्या सुमारास जे ग्रीक तत्त्ववेत्ते विद्यमान होते त्यांपैकीं कांहींजणांचें मत वाचण्यासारखें आहे. ते ह्मणतात:—

ईश्वराची उपासना सात्त्विक आणि निष्ठाशुद्ध ज्ञानमार्गानेंच केली पाहिजे. केवळ कर्म करण्यानें ईश्वर प्रसन्न होत नाहीं. कर्मांचा व ऐहिक उपाधींचा संन्यास केल्याखेरीज, व चित्तशुद्धि होईल असें प्रायश्चित्त घेतल्याखेरीज मुक्ति नाहीं. शरीराच्या पिंजऱ्यांत कोंडला गेलेल्या आत्म्यास जर मुक्ति मिळवून द्यावयाची असेल तर दृश्य विषयांचा सर्वस्वी त्याग केला पाहिजे. (वुइंडलबाँडकृत तत्त्वज्ञानाचा इतिहास.)

प्लेटो नामक एक प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता होऊन गेला. हा एक प्रकारचा अद्वैतवादी होता. फिडियो नामक एका संवादरूपी ग्रंथांत त्यानें आत्म्याचें अमरत्व सिद्ध केलें आहे. त्याचा सारांश इतकाच आहे कीं, या जगामध्यें मनुष्याचा मुख्य पुरुषार्थ हा आहे कीं, 'ज्या एक आणि अद्वितीय' ब्रह्मापासून आपण उत्पन्न झालों तिकडे पुनश्च आपलें जाणें होईल अशी प्रत्येक मनुष्यानें खटपट केली पाहिजे. मर्त्यलोकांतील मृत्यु हा खरोखर आपल्या देहाचा व इतर दृश्यांचा मृत्यु आहे. पण वस्तुतः देहत्याग करण्याची वेळ आली व इतर दृश्य नष्ट झालें म्हणजेच आत्म्याचें खरें स्वरूप प्रकट होतें. ज्ञानी मनुष्याच्या आत्म्यानें आपलें स्वस्वरूप ओळखण्याचा हाच समय आहे. ही ओळख पटली म्हणजे आत्मा परब्रह्मस्वरूपाला जाऊन मिळतो (आत्मा हा ईश्वराच्या सांनिध नेहमीं राहण्यासाठीं जातो असाही अर्थ होईल. (प्लेटोकृत फिडियो व केर्डची धर्मोत्क्रांति पहा).

आत्मा अमर आहे हें द्वैतवादी ख्रिस्तास (ल्यूकचें व माथूचें शुभवर्तमान पहा) व निर्वाणवादी बुद्धासही कबूल आहे. मृत्यूचासुद्धां मृत्यु म्हणजे निर्वाण होय !

कांट हा तत्त्ववेत्ता १८ व्या शतकाचे अखेरीस व १९ व्या शतकाच्या अवलीस विद्यमान होता. यूरपमध्यें आलीकडे जे उत्तम तत्त्ववेत्ते होऊन गेले त्यांचा **कांट** हा मुकुटमणीच होय. तो म्हणतोः—

आपला आत्मा अमर आहे, असें मानल्याखेरीज कोणत्याही धर्माचें अस्तित्व स्थापन करितां यावयाचें नाहीं. कारण नीतीचें उत्कृष्ट स्वरूप मनुष्याच्या एका जन्मामध्यें साध्य होणें अत्यंत अशक्य

आहे. आपण दृश्य जगाचें ज्ञान नाहींसें करून टाकिलें तरी व आपला अहंकार, बुद्धि, ज्ञान व इंद्रियें यांस रजा दिली तरी आपल्याजवळ 'आत्मा' या नांवाची सद्वस्तु शिलक राहते आणि ती अदृश्य अशा ब्रह्माचा परिचय आपल्यास करून देते. हा परिचय होताक्षणींच ईश्वरत्व, स्वातंत्रता आणि अमरत्व या त्रयीचा आपल्यास साक्षात्कार होतो. (केर्डकृत 'धर्मोत्क्रांति' भाग १ व २ पहा).

स्पायनोझा हा सतराव्या शतकांतील अतिश्रेष्ठ द्वैतवादी होता. प्रधान आणि पुरुष यांपासून सर्व दृश्य जग झालें असें याचें मत आहे. तथापि याचे बरेच सिद्धांत अद्वैतमतास अनुलक्षून आहेत. असो; आत्मा नित्य आहे असें यानेंही ठरविलें आहे. ही ठरविण्याची पद्धति पहा:—आत्मा ही सद्वस्तु आहे. सद्वस्तूचा नाश होत नाहीं असें सृष्टीच्या नियमावरून आपल्यास दिसतें. सृष्टीचे नियम ईश्वरकृत आहेत; आणि म्हणूनच ते अविनाशी आहेत. आतां हें उघडच आहे कीं अविनाशी नियमांचें आकलन करणारें जें मन तेंही अविनाशीच असलें पाहिजे ! देहपाताबरोबरच कल्पनाशक्ति, स्मरणशक्ति, स्नेह, प्राण्याचे विशेष गुण हे सर्व नष्ट होतात; परंतु पुरुष व प्रधान समजण्याची ज्ञानशक्ति मात्र कायम रहाते. (मार्टिनोकृत नीतिमीमांसा भाग १ पहा.) *

---

*इंग्लिश विद्येचा आधुनिक पद्धतीनें शिक्षणक्रम सुरू झाल्यावर व संस्कृत भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथांचा अभ्यास विश्वविद्यालयामध्यें सुरू झाल्यावर जीं कांहीं विद्वद्रत्नें उदयास आलीं त्यांमध्यें संस्कृत भाषेमध्यें विशेष नैपुण्य मिळविलेल्या विद्वानांपैकीं कै० काशिनाथ त्र्यंबक तेलंग हे एक होते हें वाचकांस सांगण्याची जरूरी नाहीं. डा० भांडारकर, प्रो० काथवटे, वगैरेप्रमाणेंच नामदार तेलंग यांनीं संस्कृत ग्रंथांवर अत्यंत परिश्रम केले होते. न्यायमूर्ती तेलंग यांचा विद्याक्षितिजावर उदय होऊन ते स्वप्रकाशानें सर्व हिंदु लोकांस प्रकाशित करून त्यांस स्थैर्य देऊं लागणार तों निर्घृण मृत्यूनें तेलंग यांस आमच्यांतून काढून नेलें ! असो; या संस्कृत पंडितानें अनेक नामांकित ग्रंथ केलें आहेत त्यांतच एका ग्रंथानें भगवद्गीतेला इंग्लिश कवितेचा रमणीय पोषाख घातला आहे. व हा नेपथ्यविधि करित असतां एक भली मोठी प्रस्तावना लिहून त्यांत 'गीता हा ग्रंथ ख्रिस्तप्रणीत धर्माच्या प्रेरणेनें झाला आहे काय ?' पुढें चालू.

किं पुनस्तद्यत्सदेव सर्वदैवास्तीति, उच्यते–

सत् तें काय आहे कीं जें सदा सर्वकाळ असतें ? असें विचारशील तर ऐक:—

(अंक ३ वरून पुढें चालू.)

या प्रश्नाचा ऊहापोह यथासांग केला आहे. बाह्यप्रमाणांच्या व अंत:प्रमाणांच्या आधारांनीं गीता ग्रंथ खिस्त जन्माच्या पर्वी कैक शतकें रचला गेला असावा असा नामदार तेलंग यांनीं सिद्धांत ठरविला आहे. तेव्हां खिस्ती धर्मानें प्रणीत केलेलीं धर्मतत्त्वें व विशेषत: भक्तियोगाचीं तत्त्वें गीतेनें घेतलीं नाहींत इतकेंच नव्हें, तर कदाचित् 'गीता ग्रंथाच्या अध्ययनानेंच प्रेरित होऊन महासाधु खाइस्टनें भक्तियोग आपल्या शिष्यवर्गास सांगितला नसेलना ?' अशी जबरदस्त शंका मनामध्यें येते ! असो; हें खंडन सर्वमान्य होऊन बसल्यावर व गीताशास्त्र हें बायबल नामक पवित्र पुस्तकांतून निघणें शक्य नाहीं अशी खातरजमा झाल्यावर खिस्तीधर्माचा प्रसार करूं पाहणाऱ्या दीक्षितांपैकीं कांहीं सद्धर्मप्रेरित उपाध्यायांनीं असें बोलण्याचा घाट घातला आहे कीं, गीताशास्त्रांतील कांहीं तत्त्वें मानवी प्राण्याला दुराचरण करण्यास प्रवृत्त करणारीं आहेत ! हें त्यांचें तर्कावडंबर केवळ गीताशास्त्राच्या अज्ञानानें उत्पन्न झालें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या त्यांच्या वितंडवादाचा मी यथोचितस्थळीं विचार करणार आहेंच. प्रस्तुतच्या श्लोकावर बिशप काल्डवेल नामक धर्मोपदेशकाची पुढील टीका 'पौरस्त्यांचीं पवित्र पुस्तकें, त्यांचें वर्णन आणि परीक्षण' नामक मद्रास येथें निघणाऱ्या ग्रंथमालेंतील 'भगवद्गीता' नामक १८९५ सालीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत ५७ पृष्ठांवर आढळते. बिशप कॉल्डवेल ह्मणतात:––"समजा, एखाद्या आरोपीनें न्यायाधीशासमोर " आपण जाणून बुजून खून केला " असें सांगितलें आणि पुढें कृष्णानें सांगितलेल्या सिद्धांताचा आधार दाखवून ह्मणाला, "अहो ! पुढें चौकशी कसची करतां ? आत्मा मारीत नाहीं व मरत नाहीं. तो नित्य व अविनाशी आहेना ! शिवाय जो जन्माला आला तो मरणारच आणि मेला तो जन्मही पावणारच ! तेव्हां मीं कोणाला मारिलेंही नाहीं; तो मरणारच होता; व मीं त्याला मारलें असलें तरी तो पुन: जन्माला येणारच. ह्मणून मी तुह्मास सांगतों कीं ही चौकशी पुरे करा. आत्मा अमर आहे व जन्ममरण चुकत नाहीं असें माहीत असणाऱ्या पंडितांनीं अशी वेड्यासारखी चौकशी करीत बसूं नये ! " हा आरोपीतर्फे युक्तिवाद करून बिशप मजकूर एक महासिद्धांत ठरवितात कीं हा गीतेंतील तत्त्ववाद न्यायाधीशास, वादीच्या पक्षास, व , सर्व समाजास पसंत पडणार नाहीं इतकेंच नव्हें, तर त्यांची विवेकबुद्धि व सदाचारबुद्धि या दोन्ही संतप्त मात्र करील ! सारांश, या कृष्णकृत तत्त्ववादानें चोर, शिनळ आणि खुनी लोकांस दुराचरण कर-

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ॥
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति॥१७॥

ण्याची उत्तम संधि सांपडेल ! एवंच व्यवहारांत वेदांताचा उपयोग करूं लागलें कीं वेदांतमताचा पाया ढासळून सर्व समाजाची इमारत खालीं ढासळते ! बिशपसाहेबांच्या या एकपक्षी वकीलीस काय ह्मणावें हें मलाही समजत नाहीं. आचार्यांस काश्मीरच्या राजानें अशाच तऱ्हेचा कांहीं प्रश्न विचारला होता, डा. जान्सन यानें बर्कले नामक वेदांतमती तत्त्ववेत्याला खोटें पाडण्यासाठीं त्याचेंच मस्तक भिंतीवर आपटलें, वगैरे गोष्टी बहुश्रुत वाचकांस अवगत आहेतच. तात्पर्य काय आहे या स्थूल बुद्धीच्या लोकांस वेदांतमताचें अर्धवट ज्ञान झाल्यामुळें त्यांच्या हातून अशा चुका होतात. वरील उदाहरणांत आरोपीच्याच उपक्रमाप्रमाणें त्याला फांशीं देतां येईल असें बिशपमहशुफास कसें सुचलें नाहीं कोण जाणे? भगवंताच्या ज्या श्लोकांवर भिस्त ठेवून बिशपमजकुरांनीं खुनी मनुष्याची तरफदारी चालविली आहे, त्याच श्लोकांच्या आधारानें खुनी मनुष्याचा आत्मा ‘ अमर ’ च राहणार आहे, मग त्या बेट्याला फांशीं देण्याला काय हरकत आहे ? ‘ देह नाशवंत आहे.’ ह्मणून तो केव्हां तरी जाणारच ! मग या नाशवंत पदार्थाची इतकी कींव साहेबांस कां यावी बरें ? साहेबांच्या मनाचा ठाव मीं घेतला नाहीं हें खरें; पण वर दिलेल्या उताऱ्यावरून त्यांचा आशय बाहेर पडला आहे तो असा तर नसेलना कीं गीतेसारखा उत्कृष्ट ग्रंथ आपल्या ‘ पवित्र व अमोलिक ख्रिस्तीशास्त्रांतून ’ निघाला असें सिद्ध करितां येईना, तेव्हां आंबट द्राक्षासंबंधीं न्यायाप्रमाणें ‘ हा ग्रंथच भिकार आहे ’ अशी साहेबांनीं आपली समजूत करून घेतली आणि जगाच्या तारणासाठीं त्यांनीं ती प्रगट केली ! असो, वेदांतमताचें पूर्ण आकलन होण्यास चित्ताच्या उत्कृष्ट शुद्धतेची तयारी करावी लागते, नित्य कोणतें, अनित्य कोणतें हें समजून घ्यावें लागतें, पृथ्वीवरील व स्वर्गातील क्षणभंगुर सुखापासून मनाला पराङ्मुख करावें लागतें, स्वाभाविकरीतीनें वास करणारि जी अहंवृत्ति तिचा पूर्णत्वानें त्याग करावा लागतो, आणि शमदमांच्या योगानें मोक्ष मिळविण्याची इच्छा उत्पन्न करून घ्यावी लागते, (शंकराचार्यकृत ब्रह्मसूत्रावरील भाष्य अध्याय १ पाद १ सूत्र १ पहा) ह्मणजे इतकी तयारि प्रथमतः अवश्य करावी लागते, हें बिचाऱ्या संस्कृतानभिज्ञ बिशपसाहेबांस व त्यांच्या खुनी पक्षकारास काय ठाऊक ? गीतेप्रमाणें आचरण करणारा ज्ञानी मनुष्य वरील तिन्ही अगर पंचमहापातकें करणार नाहीं असें मी खातरीनें सांगतों. साहेबांची टीका वेदांतपद्धति चंगल्या रीतीनें न समजल्यामुळें अवतीर्ण झाली आहे ह्मणून ती विचारांत घेण्यासारखी नाहीं. असो; कोणत्याही पद्धतीवर किंवा सिद्धांतरूपी महावाक्यावर टीका करण्याचें धाडस कर-

येन (ज्यानें) इदं सर्वं (हें सर्व) ततं (व्याप्त केलें आहे) तत् तु (तें तर)' अविनाशि (नाश होणारें नव्हे, असें) विद्धि

ण्याच्या अगोदर ती पद्धति व ते सिद्धांत उत्कृष्ट समजून घेणें अत्यंत इष्ट आहे; हा सर्वमान्य सिद्धांत जर युरपियन आक्षेपक व एतद्देशीय आक्षेपक नेहमीं इमानानें लक्षांत ठेवतील, तर धर्मसंबंधीं अगर इतर विषयांवरील वादविवादास पुष्कळसा संक्षेप मिळेल असें मला वाटतें. असो; स्पेन्सरसाहेबांची **केवल**नीतींतत्त्वें आणि गीतेंतील सात्त्विक बुद्धिवाद या दोन्हींमध्यें अतिशय एकवाक्यता आहे असें साहेबमहसुफांस सांगून आरोपीतर्फेचें आपलें बोलणें त्यांनीं परत घ्यावें असें मी त्यांस व त्यांच्या प्रकाशकांस सविनय सुचवितों.

* वरील टीप लिहून गेल्यावर क्यापटन जेकबकृत 'वेदान्तसाराची' इंग्रजी* तिसऱ्या आवृत्तीची प्रत मला वाचण्यास मिळाली. त्यांत वेदांतसंबंधानें बऱ्याच गैरसमजुतीच्या वृथा कल्पना गोंवून दिलेल्या मला आढळल्या. परंतु प्रस्तुत त्या एकीकडे ठेवून देतों आणि कै. तेलंग यांनीं डा० लोरिंझर यांचें केलेलें जें सणसणित खंडन त्यावर प्रतिखंडन ह्मणून जेकब साहेब यांनीं प्रो. वेबर साहेबांचे विचार प्रकट केले आहेत तिकडे वळतों. प्रो. मजकुरास डा. लोरिंझरचें मत जरी 'अतिशयोक्तीचें' दिसतें, तथापि 'कृष्णभक्तीच्या उदयाचा उगम ख्रिस्तिधर्मामध्येंच असला पाहिजे' असा त्यांनीं आपल्या अभिप्रायाचा शेरा एकंदर प्रश्नावर ठोकून दिला आहे! साहेब महसुफांनीं पांच कारणें आपले मताचे पुष्ट्यर्थ दिलीं आहेत (पहा Hindu Panthiesm पृष्ठ ३६) त्या सर्वांचा मथितार्थ ह्मणून इतकाच आहे कीं 'शुद्ध भक्तीचें बीज पालेस्टाईन क्षेत्रांत ख्राईस्ट हस्तें प्रथमतः पेरलें गेलें व त्याचा विस्तार तदनंतर सर्व जगभर पसरला! कृष्णाची योग्यता वाढली ती ख्रिस्तप्रणीत धर्माचा उदय झाल्यानंतर वाढली, कृष्णाच्या आईचे जे सोहाळे सुरू झाले ते ख्राइस्टच्या मातृप्रभावामुळें होत!' भक्तीचें खरें रहस्य ख्राइस्ट मुखानें मात्र या कर्मभूमीवर अवतीर्ण झालें हें मत खरें मानलें ह्मणजे लागलींच आह्मी पतित होतों, निर्बुद्ध होतों, चांगल्या वस्तु दुसऱ्याकडून घेणारे होतों असें माझें मत नाहीं. तथापि जी गोष्ट होणें वस्तुगत्याच संभवनीय नाहीं, तिच्याविषयीं ह्मणजे भक्तिपंथ ख्रिस्तोक्तच आहे, असें मानण्याविषयीं युरपियन ख्रिस्ती पंडितांचा इतका आग्रहातिरेक कां असावा हें मला समजत नाहीं.

ख्रि. श. पर्वी पांचव्या शतकांत प्रकट झालेल्या सर्वगामी बौद्ध धर्माचें नांव सुद्धां जर त्यावेळीं प्रचलित असणाऱ्या सर्व प्रमुख पंथांचा विचार करणाऱ्या गीतेमध्यें नाहीं, तर गीताकथन ५ व्या शतकाच्या पूर्वी झालें असलें पाहिजे असें मानावयास नको काय? '**मासानां मार्गशीर्षोऽहं**' असें भगवान आपल्या विभूति सांगतांना दहा-

(जाण) अस्य (ह्या) अव्ययस्य (विकार होत नाहीं अशा–आत्म्याचा–) विनाशं (नाश) कश्चित् (कोणीही) कर्तुं (कर-

---

ल्या अध्यायांत ह्मणतात. ' हें ह्मणण्याचें कारण काय ?' असा प्रो. बा. गं. टिळक यांस प्रश्न येऊन त्यांनीं व पुढें कै. शं. बा. दीक्षित यांनीं (भारतीय ज्योतिःशास्त्र पृ. १२५ व १३३–१३६ आणि ओरिआन पहा.) निरनिराळ्या मार्गांनीं असें सिद्ध केलें आहे कीं शालीवाहन शकाच्यापूर्वीं सुमारें ४,००० वर्षीपूर्वीं मार्गशीर्ष मासालाच संवत्सराचा पहिला मास ह्मणत असावे! अर्थातच गीता झाली त्या काळांत वर्ष मोजण्याची हीच पद्धति असावी व वसंतही त्यावेळीं मार्गशीर्ष महिन्यांतच येत असावा, कारण भगवानच ' ऋतूनां कुसुमाकरः 'असें त्याच म्हणजे अ. १० श्लो. ३५ मध्यें ह्मणणात.—' **मार्गशीर्ष वसंतसंपात शकापूर्वी ४००० या कालीं** होता, ' असें कै० दीक्षित सप्रमाण सिद्ध करितात; तेव्हां वरील वेबरसाहेबांचें ह्मणणें खरें धरिलें तर भगवंतांच्या उक्तींची वाट काय लावावयाची ? शिवाय कर्म, उपासना आणि ज्ञान हे परमार्थसाधनाचे मार्ग आहेत असें उपनिषदांवरून दिसतें; आणि उपासना हा शब्द अत्यंत प्राचीन मानलेल्या उपनिषदांत शेंकडों वेळां आलेला दिसतो. आतां उपनिषदें वेदांगकालाच्या उत्तरमर्यादेंत ह्मणजे शकाच्यापूर्वीं निदान ५०० वर्षें या कालांत झालीं असावीं, असा दीक्षित यांचा अभिप्राय आहे (पहा भा. ज्यो. पृ. १३६). ह्मणून मला असा प्रश्न करणें इष्ट वाटतें कीं कै. तैलंग यांनीं दिलेल्या अंतःप्रमाणावरून, प्रो टिळक व दीक्षित यांच्या ज्योतिषीगणितांवरून, कै० कुंटे यांचे मतावरून (See Vicissitudes of Aryan Civilization P 448) व शेवटीं वे० रा० नंदुर्गीकर संस्कृत अध्यापक न्यू. इं. स्कूल यांच्या रघुसर्गांतील प्रस्तावनेवरून महाभारत व तदंतर्गत गीता हे ग्रंथ जर खिस्तीशकापूर्वीं निदान पांचव्या शकांत निर्माण झाले असावे असें सिद्ध होतें, तर गीता व कृष्णभक्ति खिस्तावतार झाल्यानंतर व ख्राइस्ट संस्कारांनींच अवतीर्ण झाल्या असाव्या असें आग्रहपूर्वक ह्मणण्यांत काय अर्थ आहे ? खिस्ती लोकांस खिस्तप्रणीत ' नवा करार ' जितका पूज्य वाटतो, तितकीच पूज्यता ' खिस्तमतानें संस्कृत झालेल्या गीतेसही आहे ' असें कांहीं आग्रही खिश्चियन्सनीं ह्मटलें तर तें हिंदुलोकांला व गीतेला दूषण नसून कै० प्रो० द्विवेदी ह्मणतात त्याप्रमाणें भूषणच आहे ! पण याविषयीं इतका आग्रह कां ? जन्ममरणाच्या तापत्रयांतून मुक्त होण्याविषयीं आतुर झालेला पुरुष सत्कर्म करून, उपासना करून अगर ज्ञानसंपादन करून मुक्त होण्याची खटपट करितो. हा प्रयत्न सर्वत्र आणि सर्वदा सुरू आहे. आतां असें तर नाहीं कीं असत्याचा प्रकाश पश्चिमेकडेच पाडावा आणि पूर्वेकडे बिलकूल पाडूं नये असा पक्षपात सर्वज्ञत्सल परमेश्वराच्या येथें आहे! तेव्हां कधीं कधीं

ण्यास) न अर्हति (योग्य नाहीं–समर्थ नाहीं.–). तात्पर्य हें आहे कीं, ज्या सद्वस्तूनें हें सर्व दृश्य विश्व व्यापून टाकिलें आहे, ती वस्तु नाश होण्यासारखी नाहीं. तिचा नाश होणें शक्य नाहीं. कारण अशी कोणतीही वस्तु या विश्वांत नाहीं, कीं जिच्या योगानें या अविकारी सद्वस्तूचा नाश होईल. सारांश ही वस्तु अविनाशी आहे.

शां० भा०—

अविनाशीति । अविनाशि न विनंष्टुं शीलमस्येति । तु शब्दोऽसतो विशेषणार्थः । तद्विद्धि विजानीहि । किं येन सर्वमिदं जगत्ततं व्याप्तं सदाख्येन ब्रह्मणा साकाश-माकाशेनेव घटादयः । विनाशमदर्शनमभावमव्ययस्य न व्येति, उपचयापचयौ न यातीत्यव्ययं तस्याव्ययस्य नैतत्सदाख्यं ब्रह्म स्वेन रूपेण व्येति व्यभिचरति निरवयवत्वाद्देहादिवत् । नाप्यात्मीयेनाऽऽत्मीयाभावाद्यथा देवदत्तो धनहान्या व्येति न त्वेवं ब्रह्म वेत्यतोऽव्ययस्यास्य ब्रह्मणो विनाशं न कश्चित्कर्तुमर्हति, न कश्चिदा-

---

कर्मसादृश्याचे, मनोवृत्तिसादृश्याचे व विचारसादृश्याचे चमत्कार अनेक ठिकाणीं दिसून येतात यांत काय नवल आहे ? पण हें न समजून एखाद्या अभिनव पंडितानें मृच्छकटिक नाटकांतील शकाराचें व सिंबलाइन नाटकांतील मुराररावाचें मूर्खत्वसादृश्य व लोभसादृश्य पाहून जर असा सिद्धांत काढिला कीं ' शूद्रकनामक लबाड कवीनें कविश्रेष्ठ शेक्सपीयरच्या अमोलिक नाटकांतून शकाराची भूमिका अजीबात चोरून घेतली असावी ! ' तर किंवा 'शोपनहार व हार्ट्मननामक आधुनिक जर्मन तत्त्ववेत्त्यांचा सगळ्याचा सगळा अद्वैतपर मजकूर सातव्या शकांतील शंकराचार्यानें लुबाडून घेतला असावा. ' तर आपण असल्या वावदूकास काय म्हणूं बरें ? असो; तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें कीं, कित्येक युरपियन पंडित ममत्वाभिमानाला वश होऊन तांबड्या समुद्राच्या पश्चिमेकडील देशांत उत्कृष्ट असें कांहींच नसावयाचें असा खोटा समज करून घेतात आणि सत्यप्रिय पंडितांच्या उपहासाचे विषय होऊन बसतात ! ' माता ' या शब्दांत किती गौरव सांठवून ठेविलें आहे याची कल्पना विदेशीयांस होणें कठिण म्हणूनच मेरीच्या अनुषंगानें देवकीपूजा सुरू झाली असें ते म्हणूं शकतात. असो.

त्मानं विनाशयितुं शक्नोतीश्वरोऽपि । आत्मा हि ब्रह्म स्वात्मनि च क्रियाविशेषात् ॥ १७ ॥

भाष्यार्थः—

नाश पावणें हा ज्याचा स्वभाव नाहीं तें अविनाशि होय. 'तु' शब्द श्लोकामध्यें घातला आहे त्याच्या योगानें असताचा परिहार होतो. त्याला वेगळें काढतां येतें.—अर्जुना !—ज्या 'सत्' नामक ब्रह्मानें हें सर्व जग व सर्व आकाश व्यापून टाकिलें आहे; आकाश जसें घटादि सर्व पदार्थांस व्यापून टाकितें, तसें ज्या ब्रह्मानें आकाशासहित सर्व जगास व्यापून टाकिलें आहे, तें ब्रह्म ओळखण्यास शिक.—अर्जुना !—ज्याच्यामध्यें जास्ती होत नाहीं व कमीही होत नाहीं, अशा या अव्ययाचा विनाश करण्याला प्रत्यक्ष ईश्वरसुद्धां समर्थ नाहीं.—मग इतराची तर कथा काय ?—तसेंच ह्या 'सत्' नांवाच्या ब्रह्माला आपल्या स्वरूपाच्या योगानेंही अगर दुसऱ्या एखाद्या अंगभूत अवयवाच्याही योगानें विकार उत्पन्न होत नाहीं, कारण त्या ब्रह्माला अवयवच नाहींत. एवंच बाहेरून व आंतून ब्रह्मामध्यें विकार होणें शक्यच नाहीं.—पदार्थामध्यें विकार उत्पन्न होतो तो पदार्थाचे जे निरनिराळे अवयव असतात त्यांत कांहीं कमीजास्ती होतें ह्मणून विकार उत्पन्न होऊन पदार्थ वाढतात किंवा कमी होतात. पण ब्रह्म नामक सद्वस्तूला अवयवच नसल्यामुळें विकार होण्याचा संभवच नाहीं:—आत्म्याला विकार होत नाहीं, कारण तो निरवयव आहे आणि निर्विकारी आत्मा आहे ह्मणून तो अमर आहे असा '**बटलर**' नामक एका प्रसिद्ध नीतितत्त्ववेत्त्याचा सिद्धांत आहे.—देहाला विकार होतो, कारण हात, पाय, वगैरे अवयव देहास आहेत. आतां कोणी असें ह्मणेल कीं देवदत्ताची धनावर सत्ता असते, तेव्हांचा असणारा देवदत्त धनहीन झाला असतां जसा निराळा होतो, तसेंच आत्म्याची स्वतःवर सत्ता असल्यामुळें केव्हांतरी आत्मस्वरूपांत फरक पडत असेल, विकार उत्पन्न होत असेल; तर तसेंही नाहीं; कारण आत्म्यावर कोणाचीच सत्ता नाहीं. सारांश, आत्मा सर्वव्यापी आहे, निरवयव आहे व त्यावर कोणाची सत्ता नाहीं; असा तो असल्यामुळें त्याचा नाश

करण्याला प्रत्यक्ष ईश्वरसुद्धां समर्थ नाहीं. आत्मा हेंच ब्रह्म होय. आतां आत्म्याचें कार्य आपल्या स्वतःवरच होईल असें ह्मणणेंही विरोधात्मक आहे. कारण आत्मा निष्क्रिय आहे. एवंच स्वतःकडून किंवा दुसऱ्याकडून आत्म्याला विकार होत नाहीं ह्मणून तो अव्ययच आहे; तो सर्वव्यापी आहे हें मागें सांगितलेंच आहे.

मधुसू०–' इदं ' दृश्यजातं (स्वतःसत्तास्फूर्तिशून्यं) ह्मणजे हा दिसणारा पदार्थमात्र–ज्याला स्वतः सत्तेची स्फूर्ति कधींही होत नाहीं, असें हें जग. असा 'इदं'चा अर्थ करितात. तसेंच ' अस्य ' ह्याचा 'प्रत्यक्ष, शून्यवादी वगैरे सर्वांस अनुभव असणाऱ्या चैतन्यस्वरूपाचा' असा अर्थ करितात; आणि ह्मणतात कीं आत्म्याचें सर्वव्यापित्व सिद्ध होतें.–यावरून शून्यवादी चार्वाकाचें–व आलीकडील शास्त्रीय नास्तिकांचें व क्षणभरसुद्धां कोणतीही वस्तु एका स्वरूपामध्यें असूं शकत नाहीं असें ह्मणणाऱ्या क्षणिकवादी बुद्धांचें व ग्रीस देशांतील हिराक्लीटसनामक तत्ववेत्त्याचें खंडन होतें.–

आत्म्याचें अमरत्व **रामानुजांनीं** सिद्ध केलें आहे त्याच मुद्यावर बटलरनें १७ व्या शतकांत केलें आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

ज्ञानेश्वरी टीका–' हा लोकत्रयाकार । तो जयाचा विस्तार । तेथ नाम, वर्ण, आकार । चिन्ह नाहीं ॥ १७ ॥

किं पुनस्तदसद्यत्स्वात्मसत्तां व्यभिचरतीति । उच्यते–

असें तें असत् काय आहे बरें कीं जें आपलें स्वतःचें अस्तित्वच सोडून देतें ? तें कायतें सांगतों. ऐक.

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥१८॥

पदान्वयार्थः–**नित्यस्य** (अमर, सदोदित राहणारा जो त्याचीं) **शरीरिणः** (शरीर धारण करणारा जो आत्मा त्याचीं) **इमे** (हीं) **देहाः** (शरीरें) **अन्तवन्तः** (नाशवंत, चिरकाळ न टिकणारीं अशीं) **उक्ताः** (सांगितलीं आहेत.)–आत्मा शरीरी (देहवान्) आहे खरें, पण त्याचीं शरीरें नष्ट होणारीं, नाशवंत अशीं आहेत.

आत्मा कसा आहे, तें फिरून सांगतात:-**अनाशिनः** (कधींही नाश न पावणारा त्याचीं) **अप्रमेयस्य** (-आणि-ज्याचें स्वरूप अगर लक्षण सांगतां येत नाहीं त्याचीं)-हीं-आभासरूपानें दिसणारीं, मिथ्या शरीरें नाशवंत आहेत. **तस्मात्** (ह्मणून) **भारत** (अर्जुना!) **युद्धस्व** (तूं युद्ध कर.)

शां. भा.—

अन्तवन्त इति । अन्तवन्तोऽन्तो विनाशो विद्यते येषां तेऽन्तवन्तो यथा मृगतृष्णिकोदकादौ सद्बुद्धिरनुवृत्ता प्रमाणनिरूपणान्ते विच्छिद्यते स तस्या अन्तस्तथेमे देहाः स्वप्नमायादेहादिवच्चान्तवन्तो नित्यस्य शरीरिणः शरीरवतोऽनाशिनोऽप्रमेयस्याऽऽत्मनोऽन्तवन्त इत्युक्ता विवेकिभिरित्यर्थः । नित्यस्यानाशिन इति न पुनरुक्तं नित्यत्वस्य द्विविधत्वाल्लोके नाशस्य च । यथा देहो भस्मीभूतोऽदर्शनं गतो नष्ट उच्यते, विद्यमानोऽप्यन्यथापरिणतो व्याध्यादियुक्तो जातो नष्ट उच्यते । तत्रानाशिनो नित्यस्येति द्विविधेनापि नाशेनासंबन्धोऽस्येत्यर्थः । अन्यथा पृथिव्यादिवदपि नित्यत्वं स्यादात्मनस्तन्माभूदिति नित्यस्यानाशिन इत्याह ।

भा. अर्थ.—ज्यांना अंत आहे, ज्यांचा शेवट होतो, ते अंतवंत अगर नाशवंत होत.-पहा. ज्याप्रमाणें मृगजळ हें आहे असा प्रथम ज्ञानाचा आभास होऊन नंतर प्रत्यक्ष, अनुमान इत्यादिकांच्या साहाय्यानें निश्चय करूं लागलें ह्मणजे मृगजलाच्या संबंधानें 'आहे' अशी बुद्धि (सद्बुद्धि) नाश पावते, त्याचप्रमाणें देहादिकांचा सप्रमाण विचार करावयास लागलें ह्मणजे हे नाशवंत आहेत अशी खातरी होते. स्वप्नामध्यें पाहिलेलीं शरीरें किंवा गारोड्यानें निर्माण केलेलीं शरीरें जशीं विचारप्रकाशामध्यें नाश पावतात, तद्वतच नित्य राहणारा, शरीरधारण करणारा, नाश न पावणारा आणि ज्याचें स्वरूप कसें आहे तें वाणीनें सांगतां येत नाहीं असा जो आत्मा त्याचीं हीं शरीरें नाशवंत आहेत, असें सुज्ञ ज्ञानी, व उपनिषदें

जाणणारे—लोक ह्मणतात असा अर्थ होय.—श्लोकामध्यें—नित्य व अविनाशी अशीं समानार्थकच (एकच अर्थ दर्शविणारीं) पदें घातलीं आहेत ह्मणून येथें द्विरुक्ति झाली असें ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण व्यवहारामध्यें नित्यत्व आणि नाश या दोघांचेही दोन दोन अर्थ करित असतात. पहा:—दहन होऊन रक्षा झाल्यामुळें अदृश्य झालेल्या देहास ' तो नाश पावला. ' असें ह्मणतात; व देह असला परंतु व्याधि वगैरे उत्पन्न झाल्यामुळें त्याचे स्वरूपांत विलक्षण फेरबदल वडला तर त्या देहालाही ' तो नाश पावला ' असें ह्मणतात. तेव्हां थोडासा नाश आणि पूर्णनाश या दोन्ही नाशांचा व आत्म्याचा संबंध नाहीं असें दाखविण्यासाठीं वरील दोन विशेषणें घातलीं आहेत. असें न करितां एकच विशेषण योजलें असतें तर पृथ्वी नित्य आहे तसाच आत्माही नित्य झाला असता, ह्मणजे नित्य दिसणाऱ्या पृथ्वीच्या स्वरूपांत जसे फेरफार होतात तसे आत्म्याच्या स्वरूपांत होतात, असा अर्थ झाला असता ह्मणून आत्मस्वरूपांत थोडा अगर सगळा,—कसलाच—नाश नाहीं. हें स्पष्ट करण्याकरितांच श्लोकांत वरील दोन पदें घातलीं आहेत.

अप्रमेयस्य न प्रमेयस्य प्रत्यक्षादिप्रमाणैरपरिच्छेद्यस्येत्यर्थः । नन्वागमेनाऽऽत्मा परिच्छिद्यते प्रत्यक्षादिना च पूर्वम् । न, आत्मनः स्वतःसिद्धत्वात् । सिद्धे ह्यात्मनि प्रमातरि प्रमित्सोः प्रमाणान्वेषणा भवति । न हि पूर्वमित्थमहमित्यात्मानं*मप्रमाय पश्चात्प्रमेयपरिच्छेदाय प्रवर्तते। न ह्यात्मा नाम कस्यचिदप्रसिद्धो भवति ।

ज्याचें स्वरूप अगर लक्षण प्रत्यक्षानुमानादिक प्रमाणांनीं ठरवितां येत नाहीं, असा अप्रमेय शब्दाचा अर्थ आहे. यावर कोणी शंका घेतात कीं, वेदवाक्यावरून व उपनिषदांवरून व त्याचप्रमाणें प्रत्यक्षादि प्रमाणांच्या योगानें आत्म्याचें स्वरूप प्रथमच ठरवितां येतें; तेव्हां आत्मा अप्रमेय आहे, असें कसें ह्मणतां ? '

आचार्य ह्मणतात:-ही शंका व्यर्थ आहे. आत्मा हा स्वतःसि-

* येथें ' आत्मानं प्रमाय ' असाहि कांहीं पुस्तकांत पाठ आढळतो. प्रमा या शब्दाचे निरनिराळे अर्थ केले असतां पुढें दिला आहे तसाच अर्थ निष्पन्न होतो.

द्धच आहे. याचें अस्तित्व अगर स्वरूप ठरविण्याला दुसऱ्या प्रमाणाची गरजच नाहीं. कारण–सर्वांचें स्वरूप ठरविणारा जो आत्मा– तो ' आहे ' अशी खातरी झाल्यावरच शोधकाची बुद्धि प्रमाणें शोधावयास लागते. उदाहरणार्थ: ' थंडी पडली आहे. ' ' कशावरून ' ' हातपाय गारठलेले आहेत म्हणून. ' 'हे कशावरून' 'मला अनुभव आहे म्हणून. ' ह्मणजे 'मी आहें' व ' मला असा अनुभव येतो म्हणून.' सारांश कोणताही पदार्थ घेतला तरी त्या पदार्थाला जाणणारा जो आत्मा तो आहे असें धरल्याखेरीज त्या पदार्थाचें ज्ञान होणें शक्य नाहीं,–'आत्मा असा असा आहे' असें स्वानुभवानें प्रथम ठरविल्यावांचून कोणीही जिज्ञासु ज्ञेय वस्तूचें स्वरूप प्रमाणांनीं ठरविण्याचा आरंभ करित नाहीं ! आत्मा ठाऊक नाहीं, असा मनुष्यच सांपडणें शक्य नाहीं.–सारांश आत्म्याचें लक्षण व स्वरूप प्रमाणांनीं ठरवितां येत नाहीं. कारण कोणतेंही प्रमाण घेतलें तरी तें लागूं करतांना ' आत्मा आहे ' हें गृहीतच घ्यावें लागतें. तेव्हां सर्व प्रमाणांच्या अगोदर जो आहे व ज्याशिवाय प्रमाण करणेंच संभवत नाहीं, त्या आत्म्याची अस्तित्वसिद्धि अगर स्वरूपसिद्धि प्रमाणांनीं कशी होणार ! पर्जन्याचे योगानें पाणी मिळतें अशी सामान्य समजूत आहे. पण पाण्याची वाफ झाली तरच ढग उत्पन्न होऊन ते धारारूपानें विशेष ऋतूंमध्यें विरघळतात, असें ज्याला समजलें आहे, तो पर्जन्यापासूनच पाणी मिळतें असें ह्मणणार नाहीं, त्याचप्रमाणें सर्व प्रमाणांस निश्चित स्वरूप देणारा जो आत्मा त्याचें स्वरूप व अस्तित्व हीं–आत्म्यापासून उत्पन्न झालेल्या–प्रमाणांनींच कळतात असेंही ह्मणणार नाहीं.–

शास्त्रं त्वन्त्यं प्रमाणमतद्धर्माध्यारोपणमात्रनिवर्तकत्वेन प्रमाणत्वमात्मनि प्रतिपद्यते, न त्वज्ञातार्थज्ञापकत्वेन। तथा च श्रुतिः–' यत्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म य आत्मा सर्वान्तरः ' इति। यस्मादेवं नित्योऽविक्रियश्चाऽऽत्मा तस्माद्युध्यस्व युद्धादुपरमं मा कार्षीरित्यर्थः। न ह्यत्र युद्धकर्तव्यता विधीयते। युद्धे प्रवृत्त एव ह्यसौ शोकमोहप्रतिबद्धस्तूष्णीमास्ते तस्य कर्तव्यप्रतिबन्धापनयनमात्रं भग-

वता क्रियते तस्माद्युध्यस्वेत्यनुवादमात्रं न विधिः ॥ १८ ॥
उपनिषदें वगैरे शास्त्रें हें शेवटचें प्रमाण आहे; पण आत्म्यावर–' मी गोरा आहें, हें माझें आहे. ' अशा प्रकारचे आरोप अज्ञानानें झालेले असतात, ते अज्ञानजन्य आरोप नाहींसे करण्यापुरतें मात्र हें प्रमाण आहे. ठाऊक नसलेली वस्तु दाखविणें हें प्रमाणाचें लक्षण आहे; तसलें काम हें शास्त्र प्रमाण करित नाहीं; तर केवळ अज्ञानाचा पडदा मात्र दूर करितें. श्रुतिही असेंच सांगते:— ' हें ब्रह्म स्वत:सिद्ध आणि सर्वांस प्रत्यक्ष असें आहे. हा आत्मा पदार्थमात्राच्या अंतर्यामीं आहे. ' (बृहदा० ३।४।१.) याप्रमाणें आत्मा नित्य असून विकृति न होणारा असा आहे ह्मणून हे अर्जुना! भीष्मादिकांविषयींचा शोक, मोह व वधाविषयींची पापबुद्धि टाकून देऊन युद्ध कर, युद्धापासून पराङ्मुख होऊं नको, असा अभिप्राय आहे. येथें भगवान् ' युद्ध करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे ह्मणून तूं युद्ध कर ' अशी अर्जुनास आज्ञा करित नाहींत, तर युद्ध करण्यास सिद्ध झालेल्या अर्जुनाला शोकमोहांच्या योगानें स्तब्धता प्राप्त झाली, तो थबकून बसला, हें नाहींसें व्हावें येवढ्यासाठीं कर्तव्य करण्याच्या आड आलेले जे शोकमोह त्यांचें निवारण मात्र भगवान् करित आहेत. सारांश 'युद्ध कर' हें वाक्य केवळ अनुवादक आहे; (तो करण्यास तयार झाला होता तेंच करावयास सांगत आहे;) ही आज्ञा नव्हे.—आत्म्याचा नाश कोणत्याही प्रकारें होत नाहीं, तो नित्य आहे. म्हणून 'भीष्मादिकांस मी मारीन' वगैरे मोहशोकांनीं स्तब्ध झालेल्या अर्जुनाला ' तूं युद्ध कर, तूं युद्ध केल्यानें त्यांच्या आत्म्यांस काडीमात्रही विकार होणार नाहीं म्हणून शोकमोह सोडून देऊन मनांत आणलेली युद्धाची गोष्ट करावयास लाग ' असें भगवान् सांगतात. 'ज्या कारणांसाठीं तूं युद्धपराङ्मुख झालास तीं कारणें खोटीं आहेत म्हणून तूं आपलें इष्ट कर्तव्य पूर्ण करून घे असा भगवंतांचा व आचार्यांचा अभिप्राय आहे.

मधु०—देह शब्द अनेकवचनी योजिला आहे यावरून गूढार्थ काढितात कीं अनेक वचनानें स्थूल शरीर, लिंगशरीर व कारणशरीर इत्यादिक देहांचा व विराट् स्वरूपाचा समावेश भगवंतांनीं केला आ-

हे. तसेंच आत्म्याचें एकवचन सार्थ आहे हें दाखविण्यासाठीं **'एको देवः सर्वभूतेषु गूढः '** (भूतमात्राचे ठायीं, अंतर्यामीं वास करणारा, व प्रकाशित असणारा देव एकच आहे) हा आधार देतात.

रामानुज.–देहाच्या अनेक वचनासंबंधें **'कर्मफलभोगार्थतया भूतसंघातरूपाः कर्मावसानविनाशिनः;'** (कर्मफलाचा उपभोग घेण्यासाठीं भूतद्रव्यांपासून झालेले व कर्म संपलें ह्मणजे नष्ट होणारे देहांचा) असा अर्थ करितात. **' अमृतत्वप्राप्तयेऽनभिसंहितफलं युद्धाख्यं कर्म आरभस्व '** (मोक्ष मिळविण्यासाठीं निष्काम युद्ध कर) असा भगवंताचा कर्मपर उपदेश आहे, असें सुचवितात. कर्मानें चित्तशुद्धि होते, मोक्ष मिळत नाहीं, हें अद्वैतमत वरचेवर सांगण्यास नकोच आहे !

सत्यानंदस्वामी–' **नित्यस्य**=प्रतिबिंबरूपजीवस्य ' (ईश्वर बिंब; त्याचें प्रतिबिंब जीव आहे त्या जीवाचा) असें सांगून **'जीवोपाधिर्द्विधा प्रोक्तः स्वरूपं बाह्य एव च । बाह्योपाधिर्लयं याति मुक्तावन्यस्य संस्थितिः । सर्वोपाधिविनाशे तु प्रतिबिम्बः कथं भवेत् ।...उपाधेश्चैव नित्यत्वान्नैव जीवो विनश्यति '** (जीवाला दोन प्रकारचे उपाधि आहेत. एक स्वरूपाचा–जीव असणें हा उपाधि आणि दुसरा बाह्य उपाधि. मुक्ति प्राप्त झाली ह्मणजे बाह्योपाधि नष्ट होतो; पण स्वरूपोपाधि राहतो. कारण सर्वच उपाधींचा नाश झाल्यावर प्रतिबिंबाचा ह्मणजे जीवाचा संभवच राहणार नाहीं: तात्पर्य, उपाधि नित्य आहे ह्मणून जीवही नित्य आहे; ह्मणजे मुक्ति मिळाली तरी जीव स्वस्वरूपानें राहतो, ब्रह्मस्वरूपांत जाऊन मिळत नाहीं; असें सांगण्याचा स्वामींचा अभिप्राय आहे. यांच्या मतें ईश्वर, माया (विश्व) आणि जीव अथवा God, Nature and Man यांचें अस्तित्व नित्य आहे असें आहे. सर्व भक्तिपंथांत ही त्रयी दृश्य होते. परंतु हे सर्व दृश्य पदार्थ आहेत, यांच्या पलीकडे अदृश्य, केवल, नित्य, बुद्ध, शुद्ध आणि परब्रह्म स्वरूप आहे हें या भक्तिपंथीयांस मान्य नाहीं. कारण सर्व ज्ञानेंद्रियांस अंतर्मुख करून आत्मस्वरूपाचा शोध करणें व ' अहं ब्रह्मास्मि ' हा साक्षात्परिचय करून घेणें याची गुरुकिल्ली यांस सांपडली नाहीं !

शंकरानंद ह्मणतात कीं प्रस्तुतचा श्लोक, '**अशोच्यानन्वशोचस्त्वं**' या श्लोकाचे स्पष्टीकरणार्थ घातला आहे. देह विनाशी आहेत कारण '**यदल्पं तन्मर्त्यमिति श्रुतेः** (जें थोडें मर्यादित आहे तें मर्त्य, नाशवंत आहे.) (छांदोग्य ७।२४।१)अशी श्रुति आहे. तसेंच आत्मा अविनाशी आहे, कारण '**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म**' (ब्रह्म हें सत्स्वरूपी, ज्ञानस्वरूपी आणि अनंतस्वरूपी आहे) (तैत्तिरीय २।१।१०) ह्मणून कोणतीही शंका न धरितां व शोकमोह सोडून देऊन ' अर्जुना ! तूं युद्ध कर ' हें स्पष्ट सांगण्यासाठीं ह्या श्लोकाची योजना केली आहे, असें शंकरानंद ह्मणतात. आत्मा अप्रमेय आहे कारण '**अशब्दमस्पर्शं**' (कठ २।१५) (तो ऐकावयास यावयाचा नाहीं, त्याला स्पर्श करितां येत नाहीं, सारांश इंद्रियगोचर ह्मणजे प्रत्यक्षप्रमाणानें सिद्ध होणारा नाहीं) '**नैव च तस्य लिङ्गं**' (त्याला अशी कोणतीही खूण नाहीं कीं जिच्या योगानें त्याचें आपल्यास अनुमान करितां येईल, ह्मणजे अनुमानप्रमाणाला तो अगोचर आहे. (श्वेताश्व० ६।९)—लिंग ह्मणजे चिन्ह यालाच इंग्रजी न्यायशास्त्री Mark ' चिन्ह ' असें ह्मणतात !); '**दृष्टान्तवर्जितं**' आत्म्यासारखी दुसरी वस्तूच नाहीं (ब्रह्मबिंदु ९) म्हणून उपमान प्रमाण Analogy ही लागूं पडत नाहीं.) '**यतो वाचो निवर्तन्ते**' (वाणी ही जेथून परत फिरते ह्मणजे जो शब्द प्रमाणालाही (Testimony) अगोचर आहे.) (तैत्ति० २।४।१०) सारांश सर्व प्रमाणांला अगोचर आत्मा आहे ह्मणून त्याला अप्रमेय ह्मटलें. शिवाय '**विज्ञातारमरे केन विजानीयात्**' (सर्वच जो जाणणारा त्यालारे कोणत्या प्रमाणानें जाणावें ! (बृहदा० ४।५।१५)' ह्मणूनही तो अप्रमेयच होय. सर्व दृश्य नाहींसें करून ज्ञानेंद्रियांस अंतर्मुख केलें असतां आत्मसाक्षात्कार होतो हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच.

ज्ञानाच्या सत्यत्वाविषयीं विचार करितां करितां डेक्का नामक तत्त्ववेत्त्यानें आपलें स्वतःचें अगर आत्म्याचें अस्तित्व स्थापित केलें तें I think therefore I am (मी विचार करितों ह्मणूनच मी आहें) ह्या महावाक्यावरून होय. हें महावाक्य आणि '**प्रमाणमप्रमाणं च प्रमाभासस्तथैव च । कुर्वन्त्येव प्रमां यत्र तदसंभावना कुतः** (प्र-

माण, अप्रमाण, प्रमाभास वगैरे जेथून ज्ञानाचा पुरवठा घेतात, त्याचे अस्तित्वाचा असंभव कसा उत्पन्न व्हावा?) हें मधुसूदनींतील महावाक्य हीं समानार्थक नाहींत असें कोण ह्मणेल? तरी आमचा वेदान्त रानटी स्थितींतून उत्पन्न झाला असें ह्मणणारे उपनिषद्विरोधी गो साहेब आहेतच!

परमार्थप्रपाकार–'नित्यस्य'='सर्वदैकस्वभावस्य' (सदा एकच स्वरूपामध्यें असणारा म्हणून अविनाशी) असा अर्थ करितात. घटामध्यें असणाऱ्या आकाशाचे (Space) जसे घट हीं शरीरें असतात तसेच आत्म्याचे हे सुखदुःखात्मक देह होत. घट फुटला तरी आकाश नष्ट होत नाहीं, तसेंच देह नष्ट झाला तरी आत्म्याला विकार होत नाहीं ॥ १८ ॥

शोकमोहादिसंसारकारणनिवृत्त्यर्थं गीताशास्त्रं न प्रवर्तकमित्येतस्यार्थस्य साक्षीभूते ऋचावानिनाय भगवान्। यत्तु मन्यसे युद्धे भीष्मादयो मया हन्यन्तेऽहमेव तेषां हन्तेत्येषा बुद्धिर्मृषैव ते, कथम्–

प्राण्याला शोक मोह उत्पन्न होतात व त्यांपासून संसारचक्रांत पडावें लागतें. त्या शोकमोहांचा नाश करणारें हें गीताशास्त्र आहे, 'अमुक गोष्ट कर' असें सांगून कर्माला प्रवृत्त करणारें हें शास्त्र नव्हे; हें समर्थन करण्यासाठीं भगवंतांनीं कठोपनिषदांतील दोन ऋचा अवतीर्ण केल्या आहेत. भगवान् ह्मणतात:–अरे भीष्मादिक माझ्या हातून मरणार, मी त्यांस मारणारा, वगैरे जी बुद्धि तुला झाली आहे, ती खोटी आहे, हा तुझा निवळ भ्रम आहे. कसा ह्मणशील तर सांगतों ऐक:—

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ॥
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते १९

पदार्थ.—**यः** (जो कोणी) **एनं** (ह्या–आत्म्याला–) **हन्तारं** (मारणारा आहे असें) **वेत्ति** (समजतो) **च** (आणि) **यः** (जो दुसरा कोणी) **एनं** (ह्या आत्म्याला) **हतं** (मेला आहे असें)

मन्यते (समजतो) तौ (ते) उभौ (दोघेही) न विजानीतः (जाणत नाहींत.)-कारण-अयं (हा-आत्मा-) न हन्ति (मारित नाहीं)-व-न हन्यते (मारलाही जात नाहीं.)-सारांश आत्मा मारितो, किंवा आत्मा मरतो अगर मारिला जातो असें जे समजतात ते लोक अज्ञ आहेत. कारण आत्मा मारित नाहीं आणि मरतही नाहीं.-

शां. भा.—

" य एनमिति । य एनं प्रकृतं देहिनं वेत्ति जानाति हन्तारं हननक्रियायाः कर्तारं, यश्चैनमन्यो मन्यते हतं देहहनने हतोऽहमिति हननक्रियायाः कर्मभूतं," तावुभौ न विजानीतो न ज्ञातवन्तावविवेकेनाऽऽत्मानमहंप्रत्ययविषयं, हन्ताऽहं हतोऽस्म्यहमिति देहहननेनाऽऽत्मानमहंप्रत्ययविषयं यौ विजानीतस्तावात्मस्वरूपानभिज्ञावित्यर्थः । यस्मान्नायमात्मा हन्ति न हननक्रियायाः कर्ता भवति, न हन्यते न च कर्म भवतीत्यर्थः, अविक्रियत्वात् ॥ १९ ॥

भा० अ०—

प्रस्तुतचा विचाराचा विषय-जो-देही (आत्मा) त्याला ' मारण्यांच्या क्रियेचा कर्ता आहे, ' असें जो समजतो. (गौतमादि तर्कशास्त्री व जैमिन्यादि कर्मयोगी आत्मा कर्ता आहे असें ह्मणतात.) तसेंच देह नष्ट झाला असतां ' आत्माच मारण्याच्या क्रियेचें कर्म झाला,-आत्माच मेला. ' असें जो समजतो; (चार्वाकादि शून्यवादी आणि प्राकृत लोक आत्माच मेला असें ह्मणतात.) ह्या दोघांसही कांहीं कळत नाहीं. अविवेकानें, अजाणतेपणानें जे लोक आत्म्याला-मी हा प्रत्यय ज्या निर्विकार वस्तूला लागतो त्याला-' मी मारणारा ' असें समजतात, किंवा देहनाश झाला असतां आत्म्याचाच-मी प्रत्यय ज्याला आहे त्या नित्य वस्तूचाच-नाश झाला असें समजतात. ते उभयतांही अज्ञानी आहेत, आत्मस्वरूपाची व त्यांची ओळख झाली नाहीं असें ह्मणण्याचा भगवन्ताचा हेतु आहे.

कारण हा आत्मा हनन क्रियेचा कर्ता होत नाहीं (मारीत नाहीं) किंवा त्या क्रियेचें कर्मही होत नाहीं (मारला ही जात नाहीं). आत्मा हा अविकारी आहे ह्मणून तो मारीत नाहीं व मरतही नाहीं.–सारांश मारणें व मरणें ह्या दोन्ही क्रिया. (तात्पर्य कोणतीच, क्रिया)–आत्म्याच्या हातून होत नाहीं. तेव्हां ' मी मारीन; ' ' ते मरतील ' याविषयीं शोकमोहाचें कारण ज्ञानी पुरुषाला उरतच नाहीं हें स्पष्ट झालें. आपल्या हातून पापकर्म होत आहे अशी जी अर्जुनाला शंका आली होती ती अर्थांतच निर्मूळ होती हेंही सिद्ध झालें. श्रीकृष्णांनीं नैयायिक, कर्मयोगी, शून्यवादी लोकांचेंही येथें खंडन केलें आहे. कै. प्रो. द्विवेदी यांनीं कठोपनिषद् अ. १ वल्ली २ श्लोक १९ चा उल्लेख केला आहे. **' हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतम् । उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते।**वरील श्लोक व हा उपनिषदांतील श्लोक समानार्थकच आहेत.

मधु०—अतिशूर (आपणच सर्व करितों असें मानणारे अभिमानी पुरुष) आणि अतिकातर (अत्यंत भित्रे पुरुष) यांसाठीं हा श्लोक योजिला आहे असेंही ह्मणतां येईल असें सुचवितात.

रामानुजाचार्य वरीलप्रमाणेंच अर्थ करितात. मात्र **' हन्तिधातुरप्यात्मकर्मशरीरवियोगकरणवाची '** (' हन ' ह्या धातूचा अर्थ आत्मा आणि कर्मशरीर यांची ताटातूट करणारा आहे) असें सांगून **' न हिंस्याद्भूतानि '** (प्राण्यांस ठार मारूं नये) **' ब्राह्मणो न हन्तव्यः '** (ब्राह्मणास मारूं नये) इत्यादि शास्त्रें सुद्धां **'अविहितशरीरवियोगकारणविषयाणि'** अयोग्य अशा शरीराचा वियोग करविण्याच्या हेतूनें सांगितलीं आहेत असें ह्मणतात.

सत्यानंदस्वामी, ' हंन्तारं ' (मारणारा) यावर पुढील व्याख्यान करितात:–जो मनुष्य असें समजतो कीं जीव हा **स्वतंत्रपणानेंच** जीवाचा किंवा देहाचा नाश करणारा आहे, तो मूर्ख होय. कारण जीव हा परमेश्वराचें प्रतिबिंब आहे ह्मणून प्रतिबिंबाच्या सर्व क्रिया बिंबाच्या (परमेश्वराच्या) स्वाधीन आहेत, ' केवळ परमेश्वर मात्र स्वतंत्र आहे', ह्या सिद्धांतांचें अज्ञान आणि ' जीवाला स्वातंत्र्य आहे' हें मिथ्या ज्ञान हीं दोन्हीही जीवाला कर्मबंधरूपी संसारांत ढकल-

तात. सारांश स्वतः कांहीं करित नसूनही ' आपणच सर्व करितों ' असें मानणारा जो जीव तोच संसारांत पडतो. ' कर्ता करविता परमेश्वर आहे ' या सत्यसिद्धांताचें अज्ञानच मनुष्यास संसारचक्रांत गुरफटून टाकतें असें जीव आणि शिव निराळे मानणाऱ्या स्वामींचें ह्मणणें आहे. वेदांत्यांस जीवशिव भेद संमत नाहीं हें सांगावयास नकोच.

शंकरानंद अद्वैतमतानुयायी आहेत. ते ' **न तदश्नाति किंचन, न तदश्नाति कश्चन** '–(बृहदा० ३।८।८) 'तो आत्मा कांहीं खात नाहीं, त्या आत्म्याला कोणी खात नाहीं'. अशी श्रुति आचार्यांच्या समर्थनार्थ पुढें आणितात.

वल्लभाचार्य ' माझ्या इच्छेनेंच सर्व कांहीं होतें ' असा या श्लोकाचा भावार्थ सांगतात. हे कट्टे भक्तिपंथानुयायी आहेत.

ज्ञानेश्वरः–तूं धरूनि देहाभिमानातें । दिठी (दृष्टि) सूनि (ठेवूनि) 'शरीरातें । मी मारिता, हे मरते'। ह्मणत आहासि (आहेस)॥ तरी अर्जुना ! तूं नेणसी ।....॥

वामनपंडितः–श्लोकाचा इतुकाच अर्थ । मतें दूषावीं तीं किमर्थ। ऐसें बोलती त्यांतें समर्थ । श्रीहरीच उत्तर देतसे ॥ जे ह्मणती साधारण । आत्मा देह त्यास मरण । देहें देहास मारण । त्यांलाच वाटे ॥ मरणार ह्मणे जो स्वयें । मारणारही ह्मणे निश्चयें । दों गोष्टींस दोघे, अन्ययें (परमेश्वरें) । नेणते वर्णिलें कांहो ॥ आतां *देहात्मवादी । ज्यांस विश्वास नाहीं वेदीं । आत्मदेह त्या मंदीं । 'मरे, मारी ही,'ह्मणावा ॥ प्रमाण ज्या मतीं वेद । तथापि मानिती भेद । आत्मा अकर्ता ह्मणतां खेद । ते मानिती ॥....एवं आत्मा मारणार । सकळ भेद² वादी ह्मणणार । आणि आत्मा-देह मरणार । चार्वाक ह्मणती ॥ भेदवादी पक्ष एक । आणि एक पक्ष चार्वाक । या दो गजभारावरी हांक । गीताश्लोकीं हरि³ची ॥....हे तो जैमिनी गौतम । जरी ऋषी दोघे उत्तम । तिहीं असत्यास, अधम । भेद

---

* देह हाच आत्मा असें ह्मणणारे.

२ आत्मा आणि परमात्मा निराळे आहेत, असें ह्मणणारे.

३ सिंहरूपी श्रीकृष्णाची.

पक्ष धरिला ॥....भेदवादी यांचे बोल । एथें ऐसेच तितुके फोल ।
साधारणांसि हेचि खोल । वाटति, उथळ अत्यंत जे ॥....सारांश–
यालागीं हे वेडे चार । हा नव्हे शुद्ध आत्मविचार । अहंप्रत्यय अ-
सार । टाकितां, स्फुरे शुद्ध आत्मा ॥ पंडितांनीं या श्लोकावर टीका
करितांना, चार्वाक, बृहस्पति, जैमिनी, गौतम इत्यादि लोकांचें स-
युक्तिक आणि सांगोपांग खंडन केलें आहे, तें अगत्य वाचण्यावि-
षयीं मी वाचकांस शिफारस करितों. ॥ १९ ॥

कथमविक्रिय आत्मेति द्वितीयो मन्त्रः–

आत्मा विकारशून्य कसा आहे हें सांगण्यासाठीं हा दुसरा मंत्र
भगवाँन् ह्मणतात:–

न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वाऽभविता वा न भूयः ॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे॥ ॥ २० ॥

प० अ० अ०—

अयं (हा–आत्मा) **कदाचित्** (केव्हांही) **न जायते** (जन्म
पावत नाहीं) **वा** (किंवा) **म्रियते** (मरतही नाहीं). **वा** (किं-
वा) **अयं** (हा–आत्मा–)–**भूत्वा** (असणें या स्थितींत असून)
भूयः (पुनः) **अभविता न** (नाहींसा होणारा नाहीं.)–सारांश
आत्म्यास कधींही जन्ममरण नाहीं, आणि नित्य असणारा जो आत्मा
तो कधींही नाहींसा होत नाहीं, तो नित्यच आहे.–कारण **अयं** (हा-
आत्मा-) **अजः** (न जन्मलेला), **नित्यः** (सनातन असणारा),
शाश्वतः (कोणत्याही प्रकारें कमी होण्याचा विकार न पावणारा),
पुराणः (जुना, अनादि)–असा आहे. आत्मा हा अनादि, अनंत,
अविकृत असा आहे. हा–**शरीरे हन्यमाने** (शरीराचा घात होत
असतां) **न हन्यते** (मारला जात नाहीं). सारांश आत्म्याचें शरीर
नाहींसें झालें म्हणून हा नाहींसा होतो असें नाहीं.–सापानें आपली

कांत टाकिली तरी त्याचा जसा नाश होत नाहीं, तद्वतच आत्म्यानें आपलें शरीर टाकून दिलें तरी त्याचा नाश होत नाहीं.—

शां० भा०—

न जायते नोत्पद्यते, जनिलक्षणा वस्तुविक्रिया नाऽऽत्मनो विद्यत इत्यर्थः । न म्रियते वा। वा शब्दश्चार्थे । न म्रियते चेत्यन्त्या विनाशलक्षणा विक्रिया प्रतिषिध्यते । कदाचिच्छब्दः सर्वविक्रियाप्रतिषेधैः संबध्यते, न कदाचिज्जायते न कदाचिन्म्रियत इत्येवम् । यस्मादयमात्मा भूत्वा भवनक्रियामनुभूय पश्चादभविताऽभावं गन्ता न भूयः पुनस्तस्मान्न म्रियते । यो हि भूत्वा न भविता स म्रियत इत्युच्यते लोके । वाशब्दान्नशब्दाच्चायमात्माऽभूत्वा भविता वा देहवन्न भूयः पुनस्तस्मान्न जायते । यो ह्यभूत्वा भविता स जायत इत्युच्यते, नैवमात्माऽतो न जायते । यस्मादेवं तस्मादजो यस्मान्न म्रियते तस्मान्नित्यश्च ।

भा० अ०—

जन्म पावत नाहीं, उत्पन्न होत नाहीं, ह्मणजे जन्म पावण्याचा जो दृश्य पदार्थाला विकार होत असतो तो आत्म्याला होत नाहीं असा अर्थ आहे. किंवा आत्मा मरतही नाहीं. येथें 'वा' (किंवा) याचा अर्थ 'आणि' असा करावा.—आत्म्याला जन्म नाहीं आणि मरणही नाहीं, असा अर्थ होय.—आणि मरत नाहीं म्हणजे शेवटचा विनाश नामक विकार, तोही आत्म्याला नाहीं असें निश्चितपणानें—येथें सांगितलें आहे.—श्लोकांत—जो 'कदाचित्' (कधींही, केव्हांही) शब्द आहे त्याचा संबंध, सर्व विकारांचा प्रतिषेध, निषेध, करण्याकडे घ्यावा, म्हणजे कोणत्याही प्रकारचे विकार आत्म्याला केव्हांही होत नाहींत, असें समजावें. सारांश तो केव्हांही जन्म पावत नाहीं व केव्हांही मरत नाहीं असा अर्थ होय. पहा कीं, ज्याअर्थीं आत्म्याला नित्यच असणेंपणाची सत्ता असते ह्मणून जन्म घेऊन पुनः नसणेंपणाची

सत्ता कधींही प्राप्त होत नाहीं, ह्मणजे सद्वस्तु जो आत्मा तो केव्हांही ज्याअर्थीं नाहींसा होत नाहीं, त्याअर्थीं त्याला मरण नाहीं, असेंच आपल्यास ह्मटलें पाहिजे.—कारण तो एकदां उत्पन्न होऊन पुढें नाहींसा होतो, अदृश्य होतो, तो मरतो असें व्यवहारांत आपण बोलतों. ह्याचप्रमाणें श्लोकांत जे 'वा' (किंवा) व 'न' (नाहीं) अशा शब्दाची योजना केली आहे, त्यावरूनही असा उद्देश दिसतो कीं, देहाप्रमाणें, हा आत्मा प्रथम नसून पुढें जन्म पावतो असेंही नाहीं—असें भगवंतांस सांगावयाचें आहे. ह्या सांगण्यावरून अर्थांतच आत्म्याला जन्म प्राप्त होत नाहीं, तो कधीं जन्मतो असें नाहीं, हें स्पष्टच झालें. जो प्रथम नसून पुढें उत्पन्न होतो तो जन्मला असें लोक बोलतात. अशा प्रकारचा आत्मा नाहीं ह्मणून त्याला जन्मच नाहीं हें सिद्ध झालें. ज्याअर्थीं आत्म्याला जन्म नाहीं, त्याअर्थींच त्याला 'अज' असें वरील श्लोकांत ह्मटलें आहे. आणि तसेंच तो मरत नाहीं ह्मणून त्याला 'नित्य' असें ह्मटलें आहे.—सारांश आत्म्याला जन्म नाहीं व मरण नाहीं ह्मणून तो अनादि आणि अनंत आहे हें सिद्ध झालें.

यद्यप्याद्यन्तयोर्विक्रिययोः प्रतिषेधे सर्वा विक्रियाः प्रतिषिद्धा भवन्ति तथाऽपि मध्यभाविनीनां विक्रियाणां स्वशब्दैरेव तदर्थैः प्रतिषेधः कर्तव्य इत्यनुक्तानामपि यौवनादिसमस्तविक्रियाणां प्रतिषेधो यथा स्यादित्याह शाश्वत इत्यादिना । शाश्वत इत्यपक्षयलक्षणा विक्रिया प्रतिषिध्यते, शश्वद्भवः शाश्वतः।नापक्षीयते स्वरूपेण निरवयवत्वान्निर्गुणत्वाच्च नापि गुणक्षयेणापक्षयः । अपक्षयविपरीताऽपि वृद्धिलक्षणा विक्रिया प्रतिषिध्यते पुराण इति । यो ह्यवयवागमेनोपचीयते स वर्धतेऽभिनव इति चोच्यते । अयं त्वात्मा निरवयवत्वात्पुराऽपि नव एवेति पुराणो न वर्धत इत्यर्थः । तथा न हन्यते न विपरिणम्यते हन्यमाने विपरिणम्यमानेऽपि शरीरे । हन्तिरत्र

विपरिणामार्थो द्रष्टव्योऽपुनरुक्ततायै, न विपरिणम्यत इत्यर्थः । अस्मिन्मन्त्रे षड्भावविकारा लौकिकवस्तुविक्रिया आत्मनि प्रतिषिध्यन्ते । सर्वप्रकारविक्रियारहित आत्मेति वाक्यार्थः । यस्मादेवं तस्मादुभौ तौ न विजानीत इति पूर्वेण मन्त्रेणास्य संबन्धः ॥ २० ॥

जरी पहिला (जन्माचा) व शेवटचा (मरणाचा) हे दोन्ही विकार आत्म्यास नाहीं असें सांगून कोणत्याही प्रकारचा विकार आत्म्यास होत नाहीं ह्मणून सांगितलें, तथापि मध्यें होणाऱ्या ह्मणजे जन्मापासून मरणापर्यंत होणाऱ्या सर्व विकारांचा निषेध प्रत्यक्ष शब्दांनीं व त्यांच्या अर्थांनीं केला नाहीं ह्मणून ते विकार आत्म्यास होत असतील असें कोणी ह्मणेल त्याची शंका निवारण करावी एतदर्थ 'जन्ममरणादि' शब्दांमध्यें अंतर्भूत होणारे परंतु प्रत्यक्ष शब्दांनीं न सांगितलेले तारुण्यादि विकारांचा निषेध करण्यासाठीं भगवंतांनीं शाश्वत इत्यादि शब्द योजून आत्म्याच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. 'शाश्वत' (कमी न होणारा) या शब्दानें क्षय नामक विकाराचा निषेध केला. जो नेहमींच राहणार त्यास शाश्वत ह्मणावें. आत्मा स्वतःच निरवयव आहे, अनेक भाग एकत्र करून झालेला नाहीं. म्हणून त्याच्या स्वरूपामध्यें फेरफार होत नाहीं, व तो स्वतः निर्गुण आहे, गुणशून्य आहे, म्हणून त्याचे गुणही कमी होत नाहींत. सारांश ज्याच्या स्वरूपांत फेरफार होत नाहीं व गुणांत कमी जास्ती होत नाहीं त्याला क्षयाचा विकार कसा होईल !–'पुराण' या शब्दानें क्षयाच्या उलट जो वृद्धि नामक विकार त्याचाही निषेध केला. कारण ज्याला नवे नवे अवयव (भाग) उत्पन्न होतात, तो नित्य नवा वाढतो असें आपण ह्मणतों. पण ह्या आत्म्याला मुळींच अवयव नसल्यामुळें तो पूर्वींपासून नेहमीं नवाच आहे म्हणजे पूर्वीं जसा होता तसाच आहे, तात्पर्य तो वाढत नाहीं. याचप्रमाणें शरीराचा नाश होत असला तरी याचा नाश होत नाहीं व यामध्यें कोणताही नाश करणारा विकार उत्पन्न होत नाहीं. येथें 'हन्ति' (मरतो किंवा मारतो) याचा अर्थ विकार होतो असा घेतला म्हणजे पुनरु-

क्तीचा दोष येत नाहीं.–पुनः पुनः तेंच सांगणें याला [^1]पुनरुक्ति म्हणतात.–या मंत्रांमध्यें दृश्यवस्तूचे ठायीं जे [^2]सहा विकार उत्पन्न होतात ते आत्म्याला होत नाहींत असें सांगून आत्मा पूर्णत्वानें अविक्रिय आहे असें शब्दार्थानें ठरविलें. सारांश आत्मा अविकारी आहे म्हणून 'मी मारीन, मी मरेन' असें म्हणणारे दोन्ही प्रकारचे जैमिनीप्रभृति व गौतमप्रभृति, कर्मयोगी, तार्किक (न्यायावर ग्रंथ लिहिणारे) हे उभयतांही अज्ञानी आहेत, असा पूर्वींच्या मंत्राशीं (१९ व्या श्लोकाशीं) संबंध लावावा. सारांश या मंत्ररूपी श्लोकद्वयांत आत्म्याला कोणताही विकार होत नाहीं म्हणून तो नित्य आणि शुद्ध आहे असें सांगून देहाभिमानी व कर्तृत्वाभिमानी लोकांचें खंडन केलें आहे.—

रामानुजाचार्य–' पुराण ' शब्दाची व्युत्पत्ति देतातः–"पुरातन आहे तरी सदा नव्यासारखा आहे असा अनुभवानें दिसणारा तो ' पुराण ' होय. "

सत्यानंदस्वामी—बिंबप्रतिबिंब न्यायानें श्लोकाचा अर्थ करितात. त्यांच्या मतें ' पुराण ' शब्दाची व्युत्पत्ति अशी आहेः ' पुराणि (देहान्) अणति प्राप्नोतीति पुराणः' म्हणजे ज्याला अनेक देह मिळतात तो पुराण होय! तसेंच ' शाश्वत ' शब्दावर त्यांची व्याख्या अशी आहेः ' शश्वदेकप्रकारः, न कदाऽपि जहात्यस्वातंत्र्यादिस्वस्वरूपं '(एक प्रकारचा व आपलें अस्वातंत्र्य वगैरेचें स्वरूप कधींही न सोडणारा तो शाश्वत होय.) जीवेश्वरांचा भेद ते सांगतात:– ' अल्पशक्तिरसार्वज्ञ्यं पारतन्त्र्यमपूर्णता । उपजीवकजीवत्वमीशत्वं तद्विपर्ययः ' (जीव हा अल्पशक्तीचा, किंचिज्ज्ञ, परतंत्र, अपूर्ण आणि आपल्या धन्याच्या जीवावर अवलंबून राहणारा असा आहे. ईश्वराचे गुण या गुणांच्या उलट आहेत.) डेक्कानामक एक फ्रेंच तत्त्ववेत्ता होऊन गेला, त्यानेंही जीवास वरीलच गुण आहेत,असें

[^1]: हा मंत्र काठकांतून घेतला आहे.

[^2]: ' जायते ' (उत्पन्न होतो)' अस्ति ' (असतो) ' वर्धते ' (वाढतो) ' विपरिणमते ' (विकार पावतो) ' अपक्षीयते ' (कमी होतो) ' विनश्यति ' नाश पावतो. हे सहा विकार आहेत.

गृहीत धरिलें आहे. परमेश्वराचे गुण सांगतांना सर्वशक्तिमत्त्व, सर्वज्ञत्व, स्वतंत्रत्व आणि पूर्णत्व हेच गुण डेक्कार्तेनें सांगितले आहेत. वेदांत्यांच्या मतें जीवेश्वर भेद नाहीं. म्हणून वरील शश्वत् शब्दाचा अर्थ त्यास मान्य होणार नाहीं.

शंकरानंद—हे आचार्यांच्या अर्थाला पुष्टि आणण्यासाठीं '**अविनाशी वा अरेऽयमात्माऽनुच्छित्तिधर्मा**' (बृहदारण्य० ४ ५।१५)' अरे हा आत्मा विनाशी नाहीं व विकारीही नाहीं.' अशा अर्थाची श्रुति देतात.

वल्लभाचार्य सांगतात कीं परमेश्वरानें स्वतःच्या क्रीडेसाठीं ही सृष्टि निर्माण केली आणि जो जो प्राणी ज्या ज्या भावनेसाठीं निर्माण केला तो तो प्राणी त्या त्याच भावनेनें वागला पाहिजे. असें केलें तरच जन्माचें सार्थक्य होईल! असा अर्थ काढण्याला वल्लभाचार्यांस फारच प्रयास पडलें आहेत. 'पुराण' शब्दाचा अर्थ ते 'सदासर्वदा माझ्या सेवेसाठीं दासत्वानें राहणारा' असा करितात. यावरूनच या आचार्यांस शब्दांशीं कशा झोंब्या खेळाव्या लागत असतील त्यांची कल्पना होण्यासारखी आहे. 'न हन्यते' वगैरेवर व्याख्यान देतांना 'भगवंताच्या इच्छेनुरूप वागल्यावर अति भ्रमाच्या योगानें केलेलीं कृत्येंसुद्धां दूषित होत नाहींत, 'कौरवांस मारिलें असतां पाप लागेल वगैरे कल्पना अज्ञानमूलक आहेत' अशीं विधानें या आचार्यांनीं केलीं आहेत. भगवंताच्या इच्छेप्रमाणें वागलें असतां पुण्य लागतें, त्याच्या इच्छेविरुद्ध वर्तन केल्यास पाप लागतें हे विचार ठीक आहेत. प्रश्न इतकाच आहे कीं भगवंतांची इच्छा तरी पापपुण्याच्या तारतम्यानेंच नियमित होतें कीं नाहीं! नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिणारे सिज्विक साहेबांनीं एक प्रश्न विचारला आहे, तो असा: अमुक गोष्ट चांगली व दुसरी वाईट असें जें तारतम्य ईश्वर करितो तें केवळ त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहे, किंवा चांगल्या वर्तनालाच ईश्वर 'चांगलें' असें ह्मणतो?' ह्मणजे, 'खरें बोलणें चांगलें आहे.' 'कां ह्मणून'? 'कारण ईश्वराची तशी आज्ञा आहे ह्मणून.' 'ईश्वर तरी खऱ्या बोलण्यास चांगलें कां ह्मणतो? तें स्वतः चांगलें आहे

ह्मणून, किंवा तें वाईट असूनही ईश्वराची इच्छा त्या वाईटालाच चांगलें ह्मणावें अशी आहे ह्मणून ?' 'अर्थात. खरें बोलणें चांगलें आहे ह्मणून ईश्वराची तशी आज्ञा आहे.' सारांश ईश्वराच्या इच्छेनुसार चांगलें वाईट ठरत नाहीं, चांगलें वाईटाच्या स्वरूपावरून ईश्वर आज्ञा करितो. तेव्हां चांगलें ह्मणजे काय हा प्रश्न राहिलाच. वल्लभाचार्य या प्रश्नावर काय उत्तर देते परमेश्वर जाणे! अद्वैतमताच्या वेदांताशिवाय असल्या गूढ प्रश्नाला समाधानकारक उत्तर इतर मतांतून मिळणें प्राय: दुर्घटच होय!

प्रपाकार—श्लोकाच्या दृढीकरणार्थ कठोपनिषदांतील श्रुति सांगतात ती समानार्थकच आहे ह्मणून मी येथें घेतों. "**न जायते म्रियते वा विपश्चिन्नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् । अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे**" ही श्रुति समान अर्थाचीच केवळ आहे असें नाहीं; तर येथें बहुतेक सर्वत्र शब्दही समानच आहेत. मागील एकोणीसाव्या श्लोकाचे व कठोपनिषदांतील मंत्राचें शब्दार्थसाम्य पुष्कळच आहे. याचेंच दृढीकरण पहा: '**अशरीरं शरीरेषु अनवस्थेष्ववस्थितम् । महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥**' 'शरीरांमध्यें राहून शरीररहित, नाशवंतामध्यें राहून अविनाशी, मोठा आणि सर्वगामी असा आपला आत्मा आहें असें समजून बुद्धिमान लोक शोक करीत नाहींत.' कारण आपणच विश्व झाल्यावर शोकाचें कारण कोठें राहिलें?

ज्ञानदेव—शोकमोहाचें निराकरण करण्यासाठीं मारणें व मरणें यासंबंधानें ह्मणतात:—'अर्जुना! तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासि (आहेस) वाया । शस्त्रें हाणीतलिया छाया । जैसी आंगीं न रूपे ॥ छायेवर घातलेले शस्त्राचे घाव आंगाला रूपत नाहींत हा दृष्टांत किती मनोहर आहे बरें!

वामनपंडितांचाही एक दृष्टांतरूपीमासला पहा:—देह उत्पन्न होतसे । त्या देहीं आत्मा वसे । त्यासवें उपजला दिसे । परि न उपजे उपजोनि ॥ राजा ह्मणती चालिला । तो तों सुखासनीं बैसला । चालोनि, नाहीं घडला । चालण्याचा प्रसंग! ॥ मूळश्लोकाचा

अर्थ मनामध्यें पूर्णत्वानें उतरण्याला पंडितांचा दृष्टांत किती खासा आहे! पंडितांनीं आपल्या टीकेंत आत्म्याचें अणुत्व प्रतिपादन करणारे मतवाल्यांचा उत्कृष्ट समाचार घेतला आहे, पण विस्तार-भयास्तव त्याचें अवतरण करवत नाहीं. वाचकांनीं मात्र अवश्य 'यथार्थदीपिका' पहावी ॥ २० ॥

'य एनं वेत्ति हन्तारम्' इत्यनेन मन्त्रेण हननक्रियायाः कर्ता कर्म च न भवतीति प्रतिज्ञाय 'न जायते' इत्यनेनाविक्रियत्वे हेतुमुक्त्वा प्रतिज्ञातार्थमुपसंहरति—

'जो या आत्म्याला मारणारा असें समजतो (अ० २ श्लोक १९)' या मंत्रानें आत्मा हा क्रियेचा कर्ता होत नाहीं व कर्म होत नाहीं—सारांश आत्मा कशावरही विकार उत्पन्न करीत नाहीं व आत्म्यावरही कोणाचा विकार होत नाहीं,—अशी—या मंत्रामध्यें—प्रतिज्ञा करून 'न जायते' (—हा—उत्पन्न होत नाहीं) या मंत्रानें आत्मा विकारशून्य कां व कसा आहे याचें कारण सांगितलें. आतां भगवान् केलेल्या प्रतिज्ञेचा उपसंहार करितात:—

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ॥
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम्॥२१॥

प० अ० अर्थ—

यः (जो—कोणी) **एनं** (ह्या—आत्म्याला) **अविनाशिनं** (नाश न पावणारा) **नित्यं** (सदैव असणारा) **अजं** (जन्म न पावणारा) **अव्ययं** (कोणत्याही प्रकारचे विकार न होणारा)—आहे असें—**वेद** (जाणतो)—सारांश आत्मा हा नित्य, अविनाशी, जन्ममरणातीत व अविकारी आहे, असें जो जाणतो—**स** (तो-पुरुष) **पार्थ** (पृथाकुमरा! अर्जुना!) **कथं** (कसा बरें?) **कं घातयति** (कोणाला मारवील?) **कं हन्ति** (कोणाला मारील?) सारांश आत्म्याविषयीं वरील ज्ञान ज्यास झालें तो पुरुष कोणाला मारील किंवा कोणाला मारण्याच्या कामीं प्रवृत्त करील?

शां० भा०—

वेदाविनाशिनमिति । वेद विजानात्यविनाशिनमत्यन्तभावविकाररहितं नित्यं विपरिणामरहितं यो वेदेति संबन्धः । एनं पूर्वेण मन्त्रेणोक्तलक्षणमजं जन्मरहितमव्ययमपक्षयरहितं कथं केन प्रकारेण स विद्वान्पुरुषोऽधिकृतो हन्ति हननक्रियां करोति । कथं वा घातयति हन्तारं प्रयोजयति । न कथंचित्कंचिद्धन्ति, न कथंचित्कंचिद्घातयतीत्युभयत्राऽऽक्षेप एवार्थः प्रश्नार्थासंभवात् । हेत्वर्थस्य तुल्यत्वाद्विदुषः सर्वकर्मप्रतिषेध एव प्रकरणार्थोऽभिप्रेतो भगवतः । हन्तेस्त्वाक्षेप उदाहरणार्थत्वेन । विदुषः कं कर्मासंभवे हेतुविशेषं पश्यन्कर्माण्याक्षिपति भगवान्कथं स पुरुष इति ।

आत्मा अविनाशी आहे ह्मणजे शेवटील मरणाचा विकार त्याला होत नाहीं व तो नित्य आहे ह्मणजे वाढणें वगैरे विकार त्याला होत नाहींत. त्या आत्म्याचें स्वरूप ज्याला समजलें तो कसा मारील व मारवील ? असा संबंध आहे. सारांश पूर्वींच्या विसाव्या श्लोकांत सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त असा आत्मा अज आहे (जन्मादिविकारशून्य आहे–जो नेहमींच अस्तित्वांत असतो ह्मणून त्याला जन्मादिविकार होणें शक्यच नाहीं) व अव्यय आहे (ह्मणजे ज्याच्या स्वरूपामध्यें बालाग्रही फरक पडून तो कमी होणारा नाहीं)–सारांश आत्मा हा जन्ममरणरहित आहे, असें ज्याला कळलें, तो जाणता किंवा मोक्षाला अधिकारी असणारा पुरुष मारण्याची क्रिया कशी बरें करील, किंवा मारण्याविषयीं दुसऱ्याला कसा प्रवृत्त करील ? याचें उत्तर स्पष्टच आहे कीं तो केव्हांही कोणालाही मारण्याविषयीं स्वतः प्रवृत्त होणार नाहीं, किंवा त्या कामीं दुसऱ्यालाही प्रवृत्त करणार नाहीं. वरील वाक्य प्रश्नासारखें दिसत आहे खरें, परंतु येथें 'नाहीं' असेंच उत्तर अपेक्षित आहे.–असा वाक्यरचनेचा प्रकार जेथें असतो, तेथें आक्षेपनामक रचनाप्रकार झाला आहे

असें समजावें—नुसता प्रश्नच घेतला तर येथें पूर्वापरसंबंधाला जुळत नाहीं. आतां ज्या अज, अविकृत वगैरे कारणासाठीं ' 'मारणें' व ' मारविणें ' या कर्मांचा निषेध प्रत्यक्ष शब्दांनीं केला त्याच कारणासाठीं शहाण्या माणसानें सर्व कर्मांचा परित्याग करावा असा हा श्लोक सांगतांना भगवंताचा अभिप्राय असला पाहिजे. मारण्याची क्रिया फक्त उदाहरणासाठीं, विषयाचें दिग्दर्शन करण्यासाठीं, घेतलेली आहे.—या क्रियेच्या निषेधानें भगवंतानीं सर्व क्रियांचा निषेध केला आहे, असें आचार्यांचें म्हणणें आहे.—मुमुक्षूच्या हातून कर्म होणें कांहीं कोणत्यातरी विशेष कारणामुळें अत्यंत असंभवनीय असतें असें पाहूनच भगवंतांनीं अपेक्षित उत्तराचा प्रश्न विचारला आहे कीं ' तो पुरुष कसा मारील ? वगैरे.

ननूक्त एवाऽऽत्मनोऽविक्रियत्वं सर्वकर्मासंभवकारणविशेषः,सत्यमुक्तो न तु सकारणविशेषोऽन्यत्वाद्विदुषोऽविक्रियादात्मन इति । न ह्यविक्रियं स्थाणुं विदितवतः कर्म न संभवतीति चेत्, न । विदुष आत्मत्वात् । न देहादिसंघातस्य विद्वत्ता । अतः पारिशेष्यादसंहत आत्मा विद्वानविक्रिय इति तस्य विदुषः कर्मासंभवादाक्षेपो युक्तः कथं स पुरुष इति । यथा बुद्ध्याद्याहृतस्य शब्दाद्यर्थस्याविक्रिय एव सन्बुद्धिवृत्त्यविवेकविज्ञानेनाविद्ययोपालब्धाऽऽत्मा कल्प्यते, एवमेवाऽऽत्मानात्मविवेकज्ञानेन बुद्धिवृत्त्या विद्ययाऽसत्यरूपयैव परमार्थतोऽविक्रिय एवाऽऽत्मा विद्वानुच्यते । विदुषः कर्मासंभववचनाद्यानि कर्माणि शास्त्रेण विधीयन्ते तान्यविदुषो विहितानीति भगवतो निश्चयोऽवगम्यते ।

पूर्वपक्षी—'अहो ! आत्मा अविक्रिय आहे, आत्म्याला कोणताही विकार होत नाहीं हें विशेष कारण आतांच सांगितलेंत ना ?'

सिद्धान्ती—होय सांगितलें खरें, पण तें विशेष कारण नव्हे. उघडच आहे कीं, विद्वान् पुरुष आणि अविक्रिय आत्मा हे जोंपर्यंत

निरनिराळे आहेत असें मानिलें जातें, तोंपर्यंत हें विशेष कारण आहे असें कसें ह्मणतां येईल ?

पूर्व०—कां नाहीं ह्मणतां येणार ? आत्मा अविकारी आहे व अचल आहे असें ज्यांस एकदां समजलें त्याच्या हातून क्रिया होण्याचा संभवच नाहीं. ह्मणून शहाण्याच्या हातून कर्म न होण्याचें हें विशेष कारणच होय.

सिद्धान्ती—तसें नव्हे. आत्मा अविकारी आहे एवढेंच समजलें म्हणजे कर्माचा असंभव होतो, असें नाहीं; तर आपलें मूळ ज्ञानस्वरूपच आत्मा आहे असें त्यास समजलें, ह्मणजे कर्मसंभव असत नाहीं, त्याच्या हातून कर्म होत नाहीं.—'एकच आहे' असें ज्ञानस्वरूप झालें ह्मणजे कर्ता कसला, कर्म कसलें आणि क्रिया कसली! हें ज्ञानस्वरूप कोणाचें ? असें विचाराल तर सांगतों. जड देहाला ज्ञान नसतें, आत्म्याशीं देहाचा संबंध झाला असें दिसलें तरी देह जड ह्मणून बाकी राहिलेला जो आत्मा तोच ज्ञानस्वरूप आहे हें उघड झालें. आत्मा कर्ता करविता नाहीं ह्मणून ज्ञानस्वरूपालाही कर्तृत्व, कर्मत्व, व क्रियात्व येत नाहीं. यावरून शहाण्या अगर ज्ञानी मनुष्याला कर्म कसें करितां येणार नाहीं हें ठरलें नाहीं काय ? ठरलें. तेव्हां कर्म करितां येणार नाहीं, असा भगवंतानीं साक्षेप प्रश्न विचारणें रास्तच होतें.

पूर्व०—बरें पण ज्ञानी पुरुषांस 'ज्ञान असणें' अगर 'ज्ञान उत्पन्न होणें' हा तरी विकारच आहे कीं नाहीं ?

सिद्धां०—अहो ! हा निव्वळ भ्रम अगर अविद्या आहे. स्वभावत: आत्मा अविक्रियच आहे. परंतु अविद्येनें त्यास आपण 'ज्ञान झालें' असें ह्मणतों. पहा; त्याला शब्द, स्पर्श इत्यादि विषयांचें जें त्याच्या बुद्धीनें त्याला ज्ञान झालेंसें दिसतें, तें ज्ञान नव्हे, तर, शब्दादि जे जे विषय असतात, तसलेंच स्वरूप बुद्धीला प्राप्त होतें ह्मणजे स्वत: बुद्धीच शब्दस्वरूपी होते. पण आपण मात्र आत्मा ज्ञानवंत झाला असें ह्मणतों. बुद्धि शब्दादि विषयरूप झाली असतां ती ज्ञानवंत झाली—नव्हे आत्माच ज्ञानवंत झाला असें आपण जसें अज्ञानानें म्हणतों, त्याचप्रमाणें बुद्धीमध्येंच राहणारें जें आत्मानात्मविवे-

कज्ञान (आत्मा कोणता व आत्मा कोणता नव्हे यांचें तारतम्य ज्ञान) तें प्राप्त झालें म्हणजे अविक्रिय आत्माच विद्वान झाला असें आपण ह्मणतों. हें ज्ञान सुद्धां असत् वस्तूचेंच असतें, तथापि आत्मानात्मविवेक झाला ह्मणजे आपण आत्माच विद्वान् झाला असें ह्मणतों. आत्मा स्वतःच ज्ञानस्वरूपी आहे. शिवाय वेदांत्याच्या मतें दुसरी वस्तूच नाहीं, तेव्हां आत्म्यास इतर वस्तूचें ज्ञान झालें असें म्हणणेंच संभवत नाहीं. तथापि बुद्धीला आत्मा म्हणजे काय हें समजलें ह्मणजे त्याच्या बुद्धीला हें ज्ञान झालें त्याला अथवा ज्याचें अज्ञान नष्ट झालें त्यालाच विद्वान् ह्मणण्याचा प्रघात पडला आहे.—याप्रमाणें स्वतःच ज्ञानरूपी जो आत्मा त्याला कर्म करणें संभवत नाहीं ह्मणून भगवंतांनीं असा सिद्धांत काढिला कीं शास्त्रानें जीं जीं कर्में करावयास सांगितलीं आहेत, तीं विद्वान् पुरुषास सांगितलीं नाहींत; तर जे अविद्वान् आहेत, ज्यांच्या बुद्धीला आत्मानात्मविवेक प्राप्त झाला नाहीं त्यांच्यासाठीं तीं कर्में सांगितलीं आहेत.

—थोडक्यांत तात्पर्य असें आहे. आत्मा अविक्रिय आहे, ह्मणून त्याकडून कर्म संभवत नाहीं. ज्ञानस्वरूप हेंही आत्माच आहे; तेव्हां ज्ञान्यालाही कर्म करणें शक्य नाहीं. तर कर्म कोणी करावें, असा प्रश्न येतो. याला उत्तर येवढेंच कीं ज्याच्या बुद्धीला आत्मानात्मविवेक होऊन प्रत्यक्ष ब्रह्मसाक्षात्कार घडला नाहीं, त्यानें कर्म करावें. सारांश आत्मा करित नाहीं आणि करवित नाहीं, आपणच आत्मा आहोंत असें ज्ञान ज्याच्या बुद्धीला झालें त्याचें बहुतेक कर्म सुटलें. पण ' ब्रह्मच आहे ' असा ज्याला साक्षात्कार झाला त्याचें सर्वच कर्म सुटलें व तो मुक्तही झाला.

ननु विद्याऽप्यविदुष एव विधीयते विदितविद्यस्य पिष्टपेषणवद्विद्याविधानानर्थक्यात् । तत्राविदुषः कर्माणि विधीयन्ते न विदुष इति विशेषो नोपपद्यते । न, अनुष्ठेयस्य भावाभावविशेषोपपत्तेः । अग्निहोत्रादिविध्यर्थज्ञानोत्तरकालमग्निहोत्रादिकर्मानेकसाधनोपसंहारपूर्वकमनुष्ठेयं कर्ताऽहं मम कर्तव्यमित्येवंप्रकारविज्ञानवतोऽविदुषो

यथाऽनुष्ठेयं भवति न तु तथा न जायत इत्याद्यात्मस्व-रूपविध्यर्थज्ञानोत्तरकालभावि किंचिदनुष्ठेयं भवति । किंतु नाहं कर्ता न भोक्तेत्याद्यात्मैकत्वाकर्तृत्वादिविषय-ज्ञानादन्यन्नोत्पद्यत इत्येष विशेष उपपद्यते । यः पुनः कर्ताऽहमिति वेत्त्यात्मानं तस्य ममेदं कर्तव्यमित्यवश्यं-भाविनी बुद्धिः स्यात्तदपेक्षया सोऽधिक्रियत इति तं प्र-ति कर्माणि । स चाविद्वान्–' उभौ तौ न विजानीतः' इति वचनात् । विशेषितस्य च विदुषः कर्माक्षेपवचना-त्कथं स पुरुष इति । तस्माद्विशेषितस्याविक्रियात्मदर्शिनो विदुषो मुमुक्षोश्च सर्वकर्मसंन्यास एवाधिकारः । अत एव भगवान्नारायणः सांख्यान्विदुषोऽविदुषश्च कर्मिणः प्रविभज्य द्वे निष्ठे ग्राहयति–' ज्ञानयोगेन सांख्यानां क-र्मयोगेण योगिनाम् ' इति । तथा पुत्रायाऽऽह भगवा-न्व्यासः–' द्वाविमावथ पन्थानौ ' इत्यादि ।

पूर्व०—कायहो ! विद्वानासाठीं विद्या आणि अविद्वानासाठीं कर्म असा तुह्मीं प्रपंच केला तो युक्तीला जुळत नाहीं. कारण जो अ-विद्वान् आहे त्यालाच विद्या शिकविली पाहिजे. विद्वानांस नको; आणि याप्रमाणेंच शास्त्राचीही आज्ञा असली पाहिजे. तुह्मी तर विद्वानाला विद्या सांगतां, ह्मणजे दळलेलेंच पीठ पुनः दळण्या-ची क्रिया करण्यास सांगण्यासारखें अप्रबुद्ध भाषण करितां ! सा-रांश अविद्वान लोकांसाठींच कर्में सांगितलीं आहेत, असा जो भेद तुह्मीं येथें काढिला आहे तो सयुक्तिक नाहीं.

सिद्धां०—तुह्मास माझा अभिप्राय समजला नाहीं. भेद कसा आहे तो तुह्मांस सांगतों. जें काय कर्म करावयाचें आहे तें कर्तव्य अगर अनुष्ठेय होय. हें कर्तव्य कांहीं लोकांस आहे आणि कांहींस नाहीं असा येथें भेद आहे. पहा कर्मकांडामध्यें जे विधि सांगितले आहेत त्यां-तच अग्निहोत्रादि नित्यकर्में सांगितलीं आहेत. त्यांचें ज्ञान आपल्या-स झालें ह्मणजे त्या त्या नित्य अगर नैमित्तिक कर्मास लागणारीं

सर्व याज्ञिक सामग्री जुळवून अग्निहोत्रादि कर्म करणें अवश्य असतें. ' मी कर्ता आहें, ' ' मला हें केलेंच पाहिजे ' अशा प्रकारचा अनुभव असणारा, अशा प्रकारचें ज्ञान असणारा जो अविद्वान् पुरुष, त्याला जशीं हीं कर्मे करावींच लागतात त्याप्रमाणें विद्वानालाहीं कर्मे करण्याची आवश्यकताच राहत नाहीं. कारण ' आत्म्याला जन्म नाहीं, मरण नाहीं ' अशा तात्पर्याचें आत्मस्वरूपज्ञान झालें, अथवा आत्मस्वरूपाची ओळख पटली, ह्मणजे त्या विद्वान् पुरुषाला कांहीं कर्तव्य उरत नाहीं. वेदांतील महावाक्यांनीं जें ज्ञान होतें तें हें कीं, 'मी कर्ता नाहीं.' ' मी भोक्ता नाहीं. ' वगैरे आत्मा व ब्रह्म यांचें ऐक्यपर, आत्म्याला कर्तव्य नाहीं अशा प्रकारचें आणि 'मी आत्म्याहून-परब्रह्माहून भिन्न नाहीं ' असें ज्ञान उत्पन्न होतें. सारांश ' मला कर्तव्य आहे कारण मी कर्ता आहें, ' आणि ' मला कर्तव्य नाहीं, कारण मी कर्ता नाहीं, ' असा अविद्वान् आणि विद्वान् यांच्यामध्यें भेद आहे. ह्मणजे **मीं कर्ता आहें,** असें आपलें स्वरूप आहे अशी जो भावना धरितो, त्याला **' हें माझें कर्तव्य आहे '** अशी बुद्धि आवश्यक रीतीनें उत्पन्न होते म्हणून त्याला कर्म करण्याचा अधिकारही पोहोंचतो आणि कर्मही त्यासाठीं सांगितलें आहे. (' त्यालाच कर्म संभवतें ' असें पाठांतर आहे.) या पुरुषालाच अविद्वान् असें भगवंतांनीं ' त्या उभयतांसही कांहीं समजत नाहीं ' (अध्याय २ श्लोक २०) या मंत्रवाक्यानें ह्मटलें आहे. ह्मणून ' आत्मा अविक्रिय आहे ' असें समजणाऱ्या ज्ञानविशिष्ट विद्वानांस व मुमुक्षु लोकांस मात्र कर्मसंन्यास करण्याचा अधिकार आहे. कर्मत्याग असल्या ज्ञानीं पुरुषांनींच केला पाहिजे. ह्मणूनच सर्वज्ञ भगवान् नारायणांनीं विद्वान सांख्य (ज्ञानमार्गी) आणि अविद्वान कर्ममार्गी यांचा भेद करून दोन प्रकारच्या बुद्धि सांगितल्या आहेत. ' ज्ञानमार्गानें सांख्याचे व कर्ममार्गानें योग्याचे ' इत्यादि अध्याय ३ श्लोक ३ पहा. भगवान् व्यासही आपल्या शुक नामक पुत्राला सांगतांना ह्मणतात ' यानंतर हे दोन मार्ग आहेत ' वगैरे.

सारांश कर्तृत्वबुद्धि ज्याला आहे तो कर्मयोगाला अधिकारी होतो व अकर्तृत्वबुद्धि ज्याला आहे तो कर्मत्यागाला अधिकारी होतो.

तथा च क्रियापथश्चैव पुरस्तात्पश्चात्संन्यासश्चेति। एतमेव विभागं पुनर्दर्शयिष्यति भगवान्। अतत्त्वविदहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते, तत्त्ववित्तु, नाहं करोमीति। तथा च सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्त इत्यादि।

याप्रमाणें प्रथम कर्ममार्ग आणि नंतर कर्मसंन्यास मार्ग (ज्ञान मार्ग) असे दोन विभाग झाले. भगवंतांनीं येथें केलेले हे दोन विभाग पुनः तेच एकदां प्रकट करितील. 'ज्याला तत्त्वज्ञान झालें नाहीं व ज्याला अहंकाराच्या योगानें मोह प्राप्त झाला आहे, तो 'आत्मा कर्ता' असें म्हणतो पण तत्त्वज्ञानी म्हणतो कीं 'मी कांहीं करित नाहीं.' (अ० ३ श्लो० २७। २८) त्याचप्रमाणें आपल्या मनानें तत्त्वज्ञानी सर्वकर्मांचा संन्यास करून स्वस्थ असतो. (अ० ५ श्लोक १३.) वगैरे ठिकाणीं हेंच तत्त्व प्रकट झालें आहे.

तत्र केचित्पण्डितंमन्या वदन्ति जन्मादिषड्भावविक्रियारहितोऽविक्रियोऽकर्तैकोऽहमात्मेति न कस्य चिज्ज्ञानमुत्पद्यते यस्मिन्सति सर्वकर्मसंन्यास उपदिश्यते। न, 'न जायते' इत्यादि शास्त्रोपदेशानर्थक्यात्। यथा च शास्त्रोपदेशसामर्थ्याद्धर्मास्तित्वविज्ञानं कर्तुश्च देहान्तरसंबन्धिज्ञानं चोत्पद्यते, तथा शास्त्रात्तस्यैवाऽऽत्मनोऽविक्रियत्वाकर्तृकत्वैकत्वादिविज्ञानं कस्मान्नोत्पद्यत इति प्रष्टव्यास्ते करणागोचरत्वादिति चेन्न, मनसैवानुद्रष्टव्यमिति श्रुतेः। शास्त्राचार्योपदेशशमदमादिसंस्कृतं मन आत्मदर्शने करणम्। तथा च तदधिगमायानुमान आगमे च सति ज्ञानं नोत्पद्यत इति साहसमेतत्। ज्ञानं चोत्पद्यमानं तद्विपरीतमज्ञानमवश्यं बाधत इत्यभ्युपगन्तव्यम्। तच्चाज्ञानं दर्शितं हन्ताऽहं हतोऽस्मीत्युभौ तौ न विजानीत इति। अत्र चाऽऽत्मनो हननक्रियायाः कर्तृत्वं कर्मत्वं हेतुकर्तृत्वं चाज्ञानकृतं दर्शितम्।

आतां कांहीं पंडित ह्मणवून घेणारे अभिमानी गृहस्थ प्रतिपादन करितात:—" जन्मादि सहाविकार ज्याला नाहींत, जो अविक्रिय आहे, जो अकर्ता असतो, व जो एक आहे अशा स्वरूपाचा आत्मा मीच आहें, असें ज्ञान उत्पन्न झालें म्हणजे विद्वान् पुरुषानें कर्मत्याग करणें योग्य आहे; पण असें ज्ञान उत्पन्न होणेंच अत्यंत असंभवनीय आहे; कारण आत्मा अविक्रिय आहे असें ज्ञान उत्पन्न होणें म्हणजेच आत्मा विकारी आहे असें ठरविण्यासारखें आहे.—आत्मा अविकारी आहे, असें ज्ञान तरी आत्म्यासच होणार ह्मणजे तो तेवढ्या ज्ञानानें व ज्ञानसाधनाच्या उपाधीनें विकृत होणार, ह्मणून आत्मा अविकारी आहे असें ज्ञान होणेंही शक्य नाहीं आणि ह्मणून कर्मसंन्यासाचा उपदेश करणें हेंही असमंजसच होय असें पूर्वपक्षियाचें ह्मणणें आहे.—

सिद्धां०—हें तुमचें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण तें बरोबर धरिलें तर ' आत्मा उत्पन्न होत नाहीं. ' (अ० २ श्लोक २०) वगैरे शास्त्रशुद्ध उपदेशाला बाध येईल, व त्या उपदेशांत अर्थ नाहीं, तो व्यर्थ आहे, असें ह्मणण्याचा प्रसंग प्राप्त होईल. तसेंच शास्त्राच्या उपदेशानें जर धर्म कोणता, अधर्म कोणता याचें व धर्माच्या अस्तित्वाचें स्वानुभवपूर्वक ज्ञान आत्म्याला (जीवाला) होतें, त्याचप्रमाणें कर्म करणाऱ्या पुरुषाला अन्यलोकीं सुखदुःख कसें मिळेल व पुढें कसला देह प्राप्त होईल याचेंही जर ज्ञान आत्म्याला (जीवाला) होतें, तर त्याच आत्म्याला शास्त्राच्या योगानें आपल्या स्वतःचें अकर्तृत्व, अविकारित्व वगैरे सानुभव ज्ञान कां होऊं नये याचें कारण सांगा बरें ?

पूर्व०—कारण इतकेंच आत्म्याजवळ ज्ञानेंद्रियाचें साधन नाहीं. आत्मा हा इंद्रियांना गोचर नाहीं असें सिद्ध झालें आहे.

सिद्धां०–तसें नाहीं. ' मनानें मात्र त्याला (आत्म्याला, सद्वस्तूला) पहावा ' अशी श्रुतीच आहे. तें मन मात्र शास्त्राच्या अभ्यासानें, आचार्याच्या उपदेशानें आणि शमदम वगैरे उपसाधनांच्या द्वारानें संस्कृत (संस्कारशुद्ध) झालें असलें पाहिजे. असें मन असेल तर तें आत्मस्वरूपाची ओळख करून घेण्याला उपयोगीं प-

डतें. त्याचप्रमाणें आत्मज्ञान होण्याला अनुमानप्रमाण 'व श्रुतिप्रमाण हींही साधनें आहेतच. इतकी सामुग्री असूनही आत्मज्ञान होत नाहीं असें ह्मणणें साहसाचें (अविचाराचें) आहे—नव्हे बरें ! जसजसें ज्ञान उत्पन्न होत जातें, तसतसें त्याहून विपरीत जें अज्ञान तें नाहींसें होतें हें तुह्मांसही कबूल आहेच. हें अज्ञान कोणतें तें तुह्मांस दाखविलेंच. 'मी मारणारा, मी मरणारा' वगैरे हें अज्ञान होय. अशा उभय प्रकारानें बोलणाऱ्या लोकांसच भगवंतांनीं अज्ञानी असें ह्मटलें आहे. सारांश आत्मा कर्ता आहे, कर्म आहे किंवा क्रिया आहे ह्मणजे आत्मा करितो अगर करवितो असें ह्मणणें अविद्येच्या योगानें होत असतें. सारांश आत्म्याला विकार होऊन ज्ञान उत्पन्न होत नाहीं, तर त्याच्याजवळ जो अज्ञानाचा पडदा असतो तो नाहींसा होऊन आत्म्याला स्वस्वरूपाची ओळख अज्ञानशून्य ह्मणजे आत्मस्वरूपीं तन्मय असणाऱ्या बुद्धीच्या योगानें होतें.—

तच्च सर्वक्रियास्वपि समानं कर्तृत्वादेरविद्याकृतत्वमविक्रियत्वादात्मनः । विक्रियावान्हि कर्ताऽऽत्मनः कर्मभूतमन्यं प्रयोजयति कुर्विति । तदेतदविशेषेण विदुषः सर्वक्रियासु कर्तृत्वं हेतुकर्तृत्वं च प्रतिषेधति भगवान्विदुषः कर्माधिकाराभावप्रदर्शनार्थं 'वेदाविनाशिनं—कथं स पुरुषः' इत्यादिना । क्व पुनर्विदुषोऽधिकार इत्येतदुक्तं पूर्वमेव 'ज्ञानयोगेन सांख्यानाम्' इति । तथा च सर्वकर्मसंन्यासं वक्ष्यति 'सर्वकर्माणि मनसा' इत्यादिना ।

—ज्याप्रमाणें 'मारणें' 'मरणें' 'मारविणें' या क्रियांचा निषेध केला त्याचप्रमाणें कर्तृत्वादि सर्व क्रिया (कर्में) अविद्याकृत (अज्ञानानें, मायेनें उत्पन्न झालेलीं) आहेत असें सांगावयाचें आहे. कारण आत्मा हा अविक्रिय आहे.—आत्म्यास ज्ञान होतें असें जें आपण ह्मणतों तें तसें न ह्मणतां जीवाचें अज्ञान नाहींसें होतें असें ह्मटलें ह्मणजे आत्म्याचें अविकारित्व स्पष्ट होईल.—जो कार्य करणारा व विकार पा-

वणारा कर्ता असतो, तो कर्म करण्याची योग्यता असणाऱ्या दुसऱ्याला '–हें–कर' असें ह्मणून कर्म करावयास लावतो. ह्मणून स्वस्वरूपाचें ज्ञान झालें आहे अशा पुरुषानें कोणतीही क्रिया करूं नये, अगर करवूं नये असा उपदेश (किंवा क्रिया करण्याचा निषेध) भगवान् दुसऱ्या अध्यायाच्या एकविसाव्या श्लोकांत करितात. कोणतेंही कर्म करण्यास विद्वान पुरुष योग्य नाहीं, असा एकूणएक सर्व कर्मांचा निषेध भगवंतांनीं केला आहे.

पूर्व०—मग ज्ञानी पुरुषानें करावयाचें तरी काय ?

सिद्धां०—त्यांनीं काय करावें हें पूर्वींच सांगितलें आहे. 'ज्ञानयोगानें सांख्यांनीं आत्मसाधन करावें (अ० ३ श्लो० ३).' या श्लोकांतच भगवंतांनीं ज्ञानी पुरुषांची व्यवस्था सांगितली आहे. तसेंच ' मनानें सर्व कर्मांचा त्याग करावा ' असें (अ० ५ श्लो० १३) यामध्येंही स्पष्ट सांगतील.

ननु मनसेति वचनान्न वाचिकानां कायिकानां च संन्यास इति चेन्न । सर्वकर्माणीति विशेषितत्वात् । मानसानामेव सर्वकर्मणामिति चेन्न, मनोव्यापारपूर्वकत्वाद्वाक्कायव्यापाराणां मनोव्यापाराभावे तदनुपपत्तेः । शास्त्रीयाणां वाक्कायकर्मणां कारणानि मानसानि वर्जयित्वाऽन्यानि सर्वकर्माणि मनसा संन्यसेदिति चेन्न । नैव कुर्वन्न कारयन्निति विशेषणात् । सर्वकर्मसंन्यासोऽयं भगवतोक्तो मरिष्यतो न जीवत इति चेन्न, नवद्वारे पुरे देह्यास्त इति विशेषणानुपपत्तेः । न हि सर्वकर्मसंन्यासेन मृतस्य तद्देह आसनं संभवति ।

पूर्व०—अहो ! मानसिक कर्मांचा मनानें त्याग करावा, कायिक (देहाचीं) व वाचिक (वाणीचीं) कर्में टाकण्याचें कारण नाहीं, असाच तुमच्या ह्मणण्याचा व भगवंताचा अभिप्राय नव्हे काय ?

सिद्धां०—नव्हे. सर्व कर्मांचा त्याग ह्मटलें आहे यावरून का-

यिक, वाचिक व मानसिक अशा सर्व कर्मांचा त्याग करावा असाच अर्थ होतो.

पूर्व०—सर्व कर्मांचा हें बरोबर. पण हीं सर्व मानसिक कर्में बरें!

सिद्धांतीः—अहो हें काय ? वाणीचे व शरीराचे व्यापार प्रथमतः काय करावयाचें यांचें चिंतन झाल्याखेरीज ह्मणजे मनोव्यापार झाल्याखेरीज होतच नाहींत. मनोव्यापार चालणार नाहीं तर कोणताही व्यापार चालणें अगर कर्म होणें अशक्यच आहेना ?

पूर्व०—बरें असो; शास्त्रानें सांगितलेलीं, शास्त्रास विहित, अशीं जीं कायिक व वाचिक कर्में मानसिक कारणांपासून उत्पन्न होतात, तीं शिवाय करून बाकींचीं सर्व कर्में टाकून द्यावीं असाच भगवंताचा अभिप्राय असला पाहिजे. ह्मणजे शास्त्रविहित कर्मांशिवाय बाकीच्यांचा त्याग करावा असेंच कीं नाहीं ?

सिद्धां०—नाहीं तसेंही नाहीं. 'कारण कांहीं एक न करितां' 'कांहींएक न करवितां' असे तेथें विशेष शब्द स्पष्ट आहेत. (अ० ५ श्लोक १३).

पूर्व०—ह्मणजे तात्पर्य असेंच ना कीं भगवंतांनीं हा जो सर्वकर्मसंन्यास सांगितला आहे तो मृत्यूच्या तोंडांशीं उभें राहिलेल्या मनुष्यास सांगितला आहे ? इतरांच्या (जिवंत मनुष्याच्या) हातून हा संन्यास होणें शक्यच नाहीं.

सिद्धां०—अरे असा शब्दच्छल कां ! असा तुझ्या ह्मणण्याप्रमाणें अर्थ केला तर 'हा देही (जीवात्मा) नऊ आहेत दरवाजे ज्याला अशा देहनगरीमध्यें सुखानें राहतो' या शब्दांची वाट कशी लावावयाची! हीं सर्व विशेषणें मग निरर्थक होतीलना !—निरर्थक शब्द वाक्यांत घालीत नाहींत.—शिवाय सर्व कर्मांचा संन्यास करून देहामध्यें सुखानें राहणें—मरणाऱ्या—किंवा मृत मनुष्याला संभवत नाहीं. मेल्यावर कर्मसंन्यास करणें अगर देहामध्यें राहणें या दोन्ही गोष्टी असंभवनीय आहेत. मेल्यावर प्राणी देहामध्यें राहतो असा अनुभव तरी आहे काय ?

अकुर्वतोऽकारयतश्च देहे संन्यस्येति संबन्धो न देह

आस्त इति चेन्न, सर्वत्राऽऽत्मनोऽविक्रियत्वावधारणात् । आसनक्रियायाश्चाधिकरणापेक्षत्वात्तदनपेक्षत्वाच्च संन्यासस्य। संपूर्वस्तु न्यासशब्दस्त्यागार्थो न निक्षेपार्थः। तस्माद्गीताशास्त्र आत्मज्ञानवतः संन्यास एवाधिकारो न कर्मणीति तत्र तत्रोपरिष्टादात्मज्ञानप्रकरणे दर्शयिष्यामः॥२१॥

पूर्व०—अहो ! आमचें ह्मणणें असें आहे कीं 'न करणारा व न करविणारा' असा जो विद्वान् तो देहाच्या स्वाधीन सर्व कर्मे करून आपण सुखानें राहतो, असा अन्वयार्थ करावा, देहामध्यें सुखानें राहतो, असा अन्वय करूं नये व अर्थही करूं नये ह्मणजे झालें. मग तर आत्म्याला सर्व कर्मांचा त्याग करावा लागत नाहीं!

सिद्धां०—असें कसें होईल ! स्वाधीन करणें हें सुद्धां कर्मच आहे. आणि सर्वत्र (श्रुतिस्मृतींमध्यें) आत्मा अविकारी आहे, असा सिद्धांत आहे. तुह्मी ह्मणतां त्या वाक्यांतही असेंच ह्मटलें आहेना ! शिवाय न्यास (ठेव) ठेवावयाचा त्याला ठेवावयास अधिकरणाची अपेक्षा असते. म्हणजे ठेव ठेवावयाची असेल तर ती ठेवण्याला जागा पाहिजे.पण आह्मी म्हणतो तो कर्मसंन्यास करण्याला जाग्याचीही अपेक्षा लागत नाहीं. आणखी तुमचा अर्थही पण चुकला आहे. न्यासशब्दाला 'सं'हा उपसर्ग लाविला ह्मणजे टाकणें असा अर्थ होतो, ठेवणें असा अर्थच होत नाहीं. सारांश या गीताशास्त्रामध्यें असाच सिद्धांत सांगितला आहे कीं आत्मस्वरूपाचें ज्ञान झालेल्या विद्वानास कर्मसंन्यासच योग्य आहे, कर्म करणें योग्य नाहीं. असाच अर्थ आहे हें आह्मी पुनः जेव्हां जेव्हां आत्मज्ञानप्रकरण पुढें येईल तेव्हां ही सिद्ध करून दाखवूं.–याप्रमाणें आचार्यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, जो विद्वान् पुरुष आहे त्याला कोणत्याही प्रकारचें कार्य करावें लागत नाहीं किंवा तो करतो अगर करवितो असें कांहींच नाहीं. प्रथमतः आत्म्यालाच स्वस्वरूपाचें ज्ञान होतें व अविद्यारूप जगाचा भासही नाहींसा होतो, असें सांगून नंतर हें स्वस्वरूपाचें ज्ञान कसें प्राप्त होतें, 'आत्मा एकच आहे, निष्कामी आहे, अविनाशी आहे, ज्ञानस्वरूप आहे,' अशी श्रुति, स्मृति, युक्ति आणि अनुभव या सर्वांची एक-

वाक्यता कशी होतें याचेंही थोडक्यांत दिग्दर्शन करून कर्मसंन्यास ह्मणजे काय याचें उत्कृष्ट स्पष्टीकरण केलें आहे. आत्मा आहे अशी खातरी होऊन स्वस्वरूपाची ओळख झाली म्हणजे कोणतेंही कर्तव्य उरत नाहीं असा वेदांतमताचा सिद्धांत आहे. 'मीच ब्रह्म आहें आणि ब्रह्म हें सत् चित् आनंद स्वरूपानें ओतप्रोत भरलेलें असून तेंच सर्वत्र आहे, तें अनादि आहे, अनंत आहे, पूर्ण आहे, दुसरें कांहीं नाहीं, ' असा ज्याचा एकदां कायमचा निश्चय झाला, त्याला कांहींच कर्तव्य उरत नाहीं हें सांगावयास नकोच. तेव्हां या सदैव विकार पावणाऱ्या दृश्य विश्वांत एकच वस्तु निर्विकार आणि निराश्रय अशी आहे, अशी संसाराचा वीट येऊन विरक्त झालेल्या मनुष्याला विचार करितां करितां ओळख पटली ह्मणजे तो वेदांतमार्गीचें ह्मणजे अद्वैतसिद्धांताचें अनुसरण करितो. श्रवण, मनन, निदिध्यास इत्यादिकांच्या साहाय्यानें व श्रुति, युक्ति आणि अनुभव यांच्या संगतीनें स्वस्वरूप कळलें, ओळख पटली, निश्चय झाला म्हणजे तो मुक्तच होतो. मुक्त झालेल्या जीवाला कोणतेंही कर्तव्य राहत नाहीं हें स्पष्टच आहे. बुद्धीच्या व अहंकाराच्या पलीकडे आत्मा आहे व त्याची ओळख झाली असतां ' सर्वच ' एकमय होऊन जातें असा ज्यांचा निश्चय झाला नाहीं त्यांस ही वेदांतपद्धति शब्दद्वारा अगर युक्तिद्वारा चांगलीशी समजून देतां घेतां येत नाहीं; असें असल्यामुळें वेदांती मनुष्य नास्तिक, दुर्वृत्त व अनाचारी असतो व असेल आणि असणारच असा आपला समज करून घेऊन व मला कांहीं कर्तव्य नाहीं, मला नीति, अनीति, कांहीं नाहीं, असें वेदांत्यानें ह्मटल्याबरोबर हा आळशी आहे, दुष्ट आहे, धर्मद्रोही आहे व ही वेदांताची पद्धति रानटी व वितंडवादाची आहे असें ठरवून टाकून तो मोकळा होतो व या पद्धतीचा नादच सोडून देतो. ख्राइस्टची भक्ति करून ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवणारे व तत्त्वज्ञानाचा शोध हिंदुपद्धतीनें करणारे कोल्ब्रुक, जेकब, गो वगैरे लोकांस वेदांतसिद्धांतांचा पत्ता लागला नाहीं असें जेकब गो वगैरेंच्या लेखांवरून स्पष्ट दिसतें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु पूर्ववयामध्यें षड्दर्शनांचें उत्कृष्ट अध्ययन करून ज्यांनीं ख्रिस्तीधर्माचें खंडन करण्या-

साठीं ख्राइस्टप्रणीत धर्माचें अध्ययन सुरू केलें व शेवटीं भक्ति विकारवश होऊन जे ख्राइस्टचे दास बनले अशा महाविद्वान गोरेशास्त्र्यांची बुद्धि सुद्धां वेदांतविषयासंबंधानें चकली व भ्रमण करूं लागली हें मोठेंच आश्चर्य आहे, असें मला मोठ्या कष्टानें ह्मणावें लागत आहे. ह्या शास्त्रीबोवांचें व युरोपियन शास्त्रवेत्त्यांचें पूर्ण ह्मणणें ऐकून घेऊन त्यांचें पूर्ण खंडन करण्याचें हें स्थळ नव्हे; तथापि या महान् आक्षेपकांनीं व सामान्य समजुतीच्या लोकांनीं विचार करावा एतदर्थ एकच प्रश्न त्यांच्यापुढें ठेवितों, तो हा: आपल्यास इंद्रियद्वारा व बुद्धिद्वारा जें ज्ञान होतें तें पूर्ण असतें कीं काय ? प्राचीन अगर अर्वाचीन असें कोणतेंही शास्त्र अगर कपिल महामुनीपासून तों आधुनिक स्पेन्सर साहेब महा तत्त्ववेत्ते यांच्यापर्यंत कोणताही शास्त्रकार घेतला असतां सरशेवटीं तो ' हें मला समजत नाहीं ' असेंच ह्मणतांना आढळतो कीं नाहीं ? ईश्वर (अथवा ब्रह्म) दृश्यविश्वे आणि मनुष्य, यांचा परस्पर संबंध काय आहे, निरुपाधिक परमेश्वरानें हें सोपाधिक जग कसें व कां निर्माण केलें, मनुष्याचें शेवटचें कर्तव्य काय, वगैरे प्रश्नांवर सोपपत्तिक आणि समाधानकारक अशीं उत्तरें आजपर्यंत मिळालीं आहेत काय ? व पुढें मनुष्याचें बुद्धिसामर्थ्यच जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत तरी निश्चयाचीं उत्तरें मिळण्याचा संभव आहे काय ? येथें जर ' नाहीं ' असेंच उत्तर येतें व स्पेन्सर साहेबांच्या मताप्रमाणें 'जसजसें बुद्धिद्वारा ज्ञान वाढत जातें, तसतसें त्या ज्ञानाच्या अनेकपट अज्ञानाचा प्रांत बुद्धीसच दिसूं लागतो ! ' हाच अनुभव बुद्धीला केव्हांही जर येणार तर असल्या सर्व दृश्य विश्वसंबंधीं प्रश्नाला वेदांत्यांनीं मायेचें स्वरूप दिलें तर त्यांत कांहीं त्यांची चूक आहे काय ? कायम नसतांना कायम आहे असें भासविणारी व अघटितघटनेनें मनुष्यास मोहांधकारामध्यें पाडणारी ती माया होय. अशा मायास्वरूपानें दृश्य विश्व समजूनही घेतलें व या दृश्यविश्वाच्या ज्ञानानें मानवी सुखाची व मानवी ज्ञानाची कितीही मोठी वृद्धि झाली तथापि ' मला हें सर्व कळावें ' अशी जी मनुष्याची वृकोदरी जिज्ञासावृत्ति असते, तिचें समाधान होण्याला फक्त एकच मार्ग आहे आणि तो ही कीं, ज्याच्या सत्तेनें

नेत्रादि ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें आपआपलीं कामें करितात, परंतु जो नेत्रादिकांस गोचर होत नाहीं, ज्याच्या सत्तेनें मन, बुद्धि, आदि अंतरिंद्रियें दृश्यसृष्टि कांहींशीं समजून घेतात परंतु जो बुद्धीलाही गोचर नाहीं, असा आपल्या सन्निकट सदैव असणारा जो नित्य आत्मा त्याची ओळख सांगितलेल्या मार्गानें करून घ्यावयाची आणि पूर्ण निश्चय करून घेऊन सर्वत्र ब्रह्मच आहे असा कायमचा सिद्धांत करावयाचा. हा एकच मार्ग आहे. ज्ञानाच्या शोधामध्यें आपलीं आयुष्यें खर्चें केलीं असें प्लेटो, प्लेटोनियस, कांट, हार्टमन, शोपेनहार वगैरे युरपियन तत्त्ववेत्ते याच मार्गास आले, आले आहेत, येत आहेत आणि येतील. जागृत अवस्थेमध्यें इंद्रियें, मन बुद्धि, अहंकार इत्यादिकांचे दृश्य जगाविषयींचे सर्व व्यापार बंद करून शून्यावस्था करण्यांचा प्रयत्न केला असतां व गुरुमुखानें महावाक्याचा खरा अर्थ समजून घेतला असतां मुमुक्षूस साक्षात्कार होतो असा तज्ज्ञांचा अनुभव आहे. असो; हें स्वस्वरूपाचें ज्ञान झालें म्हणजे विश्वाचें नित्य स्वरूप समजतें. आतां हें स्वरूप समजल्याबरोबर दृश्य विश्वाचा (मायेचा) उलगडा होतो हें एक पक्षानें खरें आहे. ह्मणजे दृश्यविश्व हें अनित्य आहे, येथें होणारीं सुखदु:खें व येथें होणारें ज्ञान हीं सर्वविकारास कालास व स्थलास वश आहेत, ह्मणून आत्मस्वरूपाचें नित्य ज्ञान झालेल्या वेदांत्यास दृश्यजग, सुखदु:खें व विषय ज्ञान हीं बहुमोल वाटत नाहींत इतकाच कायतो खरा भाग मायेच्या स्वरूपांत आहे. पण दुसऱ्या पक्षीं या ज्ञानानें व्यवहारांत कर्तव्यपूर्णता होत नाहीं. दिसतें आहे ही सर्व माया आहे, असें वेदांत्यांनीं अथवा त्याच्या अनुयायांनीं कितीही कंठशोष करून सांगितलें तरी व बुद्धीच्या नर्सीगकप्रभावानें या मायेचा शोध लागणार नाहीं असें समजलें तरी मनुष्यप्राणी तिचा शोध करित राहणारच; व कर्तव्याची सीमा वाढवून जगांतील सुख जास्त होईल व दु:ख कमी होईल असा प्रयत्न करित बसणार यांत तिळमात्र संदेह नाहीं. मात्र हें सुख कायमचें नाहीं, हें ज्ञान पूर्ण नाहीं व दृश्य विश्वाचें ज्ञान व उपभोग येवढाच पुरुषार्थ नाहीं असें त्यानें एकदां वेदांतमार्गानें समजून घेतलें पाहिजे. अशी वृत्ति झाली म्हणजे तो मनुष्य प्रपंचांत निर्लोभ-

मनानें राहून परमार्थ साधतो अथवा जीवन्मुक्त होतो. सारांश दृश्यजगांत व्यवहार आणि व्यावहारिक कर्तव्यें ज्ञानपूर्वक करावयाचीं आणि ब्रह्मदृष्टीनें आत्मस्वरूपाचें चिंतन करित बसावयाचें हे दोन भिन्न भासणारे पंथ एक होतील तर द्वैत, अद्वैत, ख्रिस्ती, हिंदु यांच्यामधील धार्मिककलहास शून्यत्व येऊन ' धर्म, अर्थ, काम, मोक्ष' हे चारही पुरुषार्थ ज्ञानी, व विचारी कर्तव्योन्मुख मनुष्यास साध्य होतील यांत शंका नाहीं. यावरून वेदांतमार्ग भक्तीच्या अगर कर्तव्यकर्माच्या आड येत नाहीं इतकेंच नव्हे, पण उलट तो त्या त्या पंथास पोषकच होतो, व सर्वकालीन व सर्वदेशीय धर्मांचा अंतर्भाव करण्यासारख्या अति विस्तृत पायावर याची इमारत रचलेला असा आहे असें स्पष्ट होतें, येवढें सांगून ह्या मनोरम विषयांतरास रजा देतों ॥ २१ ॥

मधुसूदनीकार–' अव्यय ' शब्दाची फोड करून सांगतात: ' ज्याच्या अवयवामध्यें अगर गुणामध्यें कधींही कमीपणा येत नाहीं त्यास अव्यय ह्मणावें ' विद्वान् शब्दाचा अर्थ पहा: ' मी विकारशून्य आहें, सर्वांवर प्रकाश पाडणारा आहें, माझ्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं, अत्यंत आनंदाचा अनुभव मला जाग्रदवस्थेमध्यें आहे ' असें जो जाणतो तो विद्वान् होय. ह्या श्लोकाच्या समर्थनार्थ ते एक आधारश्लोक देतात: **'आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः । किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ।** (मी तोच पुरुष आहे असें जर कोणाला आत्मज्ञान झालें तर कोणती इच्छा धारण करून तो शरीर आपल्यास असावें अशाबद्दल स्वतःला संताप करून घेईल ?) (बृहदारण्यक ४।४।१२.) हा श्लोक तेराव्या अध्यायाचें बीज आहे असें मधुसूदनीकार ह्मणतात.

रामानुज–' आत्मस्वरूपाचें खरें स्वरूप न समजल्यामुळें मी यांस मारितों असा शोक होतो.

सत्यानंद–' अविनाशी म्हणजे ज्याला नैमित्तिक नाश नाहीं (दुसऱ्यामुळें नाश होत नाहीं) तो. हे स्वामी हा श्लोक विष्णुपर लावतात. वल्लभ म्हणतात कीं विशेष विकार होत नाहींत तें अविनाशी!

शंकरानंद–' नित्य ' याचा अर्थ एकरस असा करितात. एकच

जेथें सर्वत्र भरलें आहे तें एकरस होय. अंतर्बाह्य ज्याचें स्वरूप एकच आहे असा जो मिठाचा खडा तो एकरसत्वाची थोडीशी साक्ष देतो. ' पुरुष ' म्हणजे 'सर्व मीच आहें, सर्वत्र आत्मा आहे' असें जाणणारा विद्वान् होय. प्रपाकार नित्य म्हणजे वृद्धिशून्य, असा अर्थ करून "शुद्धो निरंजनोऽनन्तो बोधोऽहं प्रकृतेः परः। चेट्मानमिदं देहं पश्याम्यन्यशरीरवत्" (मी शुद्ध आहें, दोषरहित आहें, अनंत आहे; ज्ञानस्वरूपी आहें, प्रकृतीहून निराळा व श्रेष्ठ आहें, आणि हा हालचाल करणारा, माझाच देह पाहून भला वाटतें कीं, माझा व या देहाचा कांहीं संबंध नसून तो दुसऱ्याचाच देह असावा !)

ज्ञानेश्वरांनीं एक दोन दृष्टांत फार सुरेख दिले आहेत, ते येथें घेतों:—' का पूर्ण कुंभ उलंडला (लवंडला, पालथा झाला) । तेथें बिंबाकार (प्रतिबिंबित सूर्य) दिसे भ्रंशला (नष्ट झाला) । परि भानु नाहीं नासला । तयासवें ॥ ना तरी मठीं (घरीं) आकाश जैसें । मठाकृती (घराच्या आकाराचें) अवतरलें असे । तो (मठ) भंगलिया आपैसें (आपल्या आपण) । स्वरूपाचि (घर मोडलें तरी आकाशास भंग होत नाहीं) ॥ तैसें शरीराच्या लोपीं । सर्वथा नाहीं नाश स्वरूपीं (आत्म्याला) । ह्मणवूनि तूं हे नारोपी । भ्रांति बापा ॥

वामनपंडितांची एकच ओंवी घेतों. ' ऐशा आत्मयातें जाणे । त्यास अकर्तृत्वही बाणे । तुज ऐसे लौकिकी शहाणे । ते हें कैसे जाणती ! ॥ २१ ॥

वरील श्लोकाचा अर्थ समर्थन करणारीं वाक्यें पहा:—

'ह्मणून सामान्य किंवा जातिमूलक जे पदार्थ आहेत ते नुसते द्रव्यरूपीच आहेत असेंच नव्हे, तर शारीरिक व्यक्तीपेक्षां या द्रव्यांमध्यें पदार्थत्व जास्त प्रमाणानें असतें, ते जास्त प्राचीन असतात आणि व्यक्तीस उत्पन्न करून त्यांचें नियमन करणारेही पदार्थ हेच असतात. उदाहरणार्थ गोत्व (गाइपणा) अगर मनुष्यत्व (माणुसपणा) ह्या जाती अनुक्रमें गाई व मनुष्यें यांपेक्षां प्राचीनतर असून त्यांच्याच योगानें ह्यांची उत्पत्ति व नियमन हीं होतात.... ह्याप्रमाणें विचार करीत गेलें असतां ईश्वर (—परब्रह्म—) ही केवळ सद्वस्तु सर्वगामी असून उपाधि विरहित अ-

प्रकृतं तु वक्ष्यामः, तत्राऽऽत्मनोऽविनाशित्वं प्रतिज्ञातं तत्किमिवेत्युच्यते—

—पाठीमागील श्लोकाचें स्पष्टीकरण करितांना केलेल्या वादाची समाप्ति करून आचार्य ह्मणतातः—असो; भगवान् सांगताताः—आतां प्रस्तुतच्या विषयाकडे आपण जाऊं या. मागें आत्मा अविनाशी आहे, असें सांगितलें आहे, अशी प्रतिज्ञा केली आहे, तें अविनाशित्व कशाप्रमाणें आहे असें अर्जुना! तूं विचारशील ह्मणून सांगतों.

सते. ईश्वरासंबंधें आपल्यास फक्त ' नेति, नेति (तो असा नाहीं, असा नाहीं.) इतकें कायतें ह्मणतां येतें.—सारांश ती वस्तु अनिर्वचनीय आहे.—ही सद्वस्तु अज असून–सर्व दृश्य विश्व–हिच्यापासूनच निर्माण होतें असें ठरतें. सारांश सर्व दृश्यजात हें परमेश्वराच्या विभूतींनीं निर्माण झालें आहे ह्मणून तें ईश्वरमयच आहे.... ईश्वरच हें सर्व नटून राहिला आहे. ईश्वर आणि जगत् हीं एकच आहेत... ....'

(पहा बुंडेलब्यांड कृत युरपियन तत्त्वज्ञानाचा इतिहास पृष्ठ २९०.

ब्रह्माविषयीं स्पेन्सर साहेब, आधुनिक तत्त्ववेत्त्यांचे मुकुटमणी यांनीं दृश्य विश्वाचा उलगडा केल्यानंतर ते ह्मणतातः—

... अंतःस्थ आणि बाह्य दृश्यजाताच्या पलीकडे एक अचिंत्य शक्ति आहे असें स्पष्ट होतें. ह्या अविज्ञेय शक्तीच्या स्वरूपांचें आकलन होणें जरी मानवीसामर्थ्याच्या बाहेर आहे, त्या शक्तीच्या स्वरूपाच्या शतांशाची सुद्धां कल्पना करितां येणें जरी अशक्य आहे,तथापि त्या अचिंत्य आणि अविज्ञेय शक्तीचें अस्तित्व कायमचें आणि निर्विवाद आहे असें वरील विवेचनावरून सिद्ध झालें आहे; सारांश केवल सद्वस्तूशिवाय दृश्य वस्तू प्रकट होणें अशक्यच आहे. प्रत्येक मनोवृत्ति आणि विचार हे अनित्य आहेत, त्या विकारांनीं व विचारांनीं आपलें जें आयुष्य घटतें तेंही अनित्य आहे आणि शेवटीं ज्या दृश्यविषयामध्यें ह्मणजे जगामध्यें आपल्यास आपलें आयुष्य कंठावयाचें असतें तें जग अथवा ब्रह्मांडही अनित्यच असून सावकाशपण नें आपल्या व्यष्टिपणांतून (भेदरूपानें निराळें असण्याच्या स्थितींतून) समष्टीकडे (सर्वच एक होण्याकडे) जात आहे; या सर्व गोष्टींवरून आपल्यास स्पष्ट समजून येतें कीं अव्यक्त, अचिंत्य, अविकार्य अशी एक सद्वस्तु आहे, ती नित्य आहे आणि विकार पावणाऱ्या सर्व दृश्यजाताच्या स्वरूपांमध्येंच ती गूढरूपानें स्थित झालेली आहे.

(स्पेन्सरकृत मानसशास्त्र तत्त्वें भाग २ पृ. ५०२ पहा.)

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥२२॥

प० अ० अ०—

यथा (ज्याप्रमाणें) **जीर्णानि** (जीर्ण झालेलीं, जुनीं) **वासांसि** (वस्त्रें) **विहाय** (टाकून देऊन) **नरः** (मनुष्य) **अपराणि** (दुसरीं) **नवानि** (नवीं) **गृह्णाति** (घेतो,) **तथा** (त्याचप्रमाणें) **जीर्णानि** (जुनीं झालेलीं, वृद्ध झालेलीं) **शरीराणि** (शरीरें) **विहाय** (टाकून देऊन) **अन्यानि** (दुसरीं) **नवानि** (नवीं) **संयाति** (प्राप्त करून घेतो.) तात्पर्य असें आहे कीं जीर्ण झालेलीं वस्त्रें ज्याप्रमाणें टाकून देऊन आपण नवीं वस्त्रें धारण करितों, त्याप्रमाणेंच निरुपयोगी झालेले देहांचा त्याग करून प्राणी नवीन शरीरांचा स्वीकार करितो. शब्दांच्याच अर्थाप्रमाणें पाहिल्यास नव्या देहांत जातो, असें भाषांतर करणें इष्ट आहे.

शां० भा०—

वासांसीति । वासांसि वस्त्राणि जीर्णानि दुर्बलतां गतानि यथा लोके विहाय परित्यज्य नवान्यभिनवानि गृह्णात्युपादत्ते नरः पुरुषोऽपराण्यन्यानि, तथा तद्वदेव शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति संगच्छति नवानि देह्यात्मा पुरुषवदविक्रिय एवेत्यर्थः ॥ २२ ॥

भा० अ०—

व्यवहारामध्यें मनुष्यें ज्याप्रमाणें दुर्बळ झालेलीं, फाटावयास लागलेलीं, वस्त्रें फेंकून देऊन नवीं, कोरीं अशीं दुसरीं वस्त्रें धारण करितात, त्याचप्रमाणें जीर्ण झालेल्या शरीरांचा त्याग करून आत्मा जो आहे तो नवीन देहाप्रत पावतो; नवीन देहाची संगति त्याला मिळते. तात्पर्य जुनीं टाकून नवीं वस्त्रें घेतांना पुरुष पूर्वीप्रमाणेंच कायम रहतो, त्यामध्यें कोणताही विकार होत नाहीं, त्याचप्रमाणें देहांतर

झालें म्हणूनें आत्म्यासही कसलाच विकार होत नाहीं.–तो मागें सांगितलेल्या पुरुषाप्रमाणें शुद्ध व निर्विकारच राहतो. भगवंताचा अभिप्राय असें सांगण्याचा आहे: देहाचा नाश झाला तरी शोक करण्याचें कारण नाहीं. कारण देहनाश झाला ह्मणून आत्म्याचा नाश होत नाहीं. आतां पुण्यकर्म करण्याचें स्थान जे भीष्मादिकांचे देह त्याचा नाश करणें योग्य नाहीं अशी अर्जुन शंका घेईल, म्हणून भगवान् दृष्टांताच्या साहाय्यानें अर्जुनाचें समाधान करितात कीं जीर्ण देह नष्ट होऊन देहांतर झालें म्हणूनहीं आत्म्यास विकृति होत नाहीं. **ज्ञानेश्वरांचें** मत असेंच आहे.

मधु०–' आत्मा अविनाशी असेल, पण शरीर तर विनाशी आहे, आणि भीष्मादिकांचे देह पवित्र आहेत, युद्ध केलें असतां या पवित्र दहांचा नाश केलासें होईल व ह्मणून पाप व शोक हीं होतीलच.' असा अर्जुनाकडून पूर्वपक्ष करवून उत्तर देतात:—' अर्जुना ! पाप न करितां तूं पुण्यच करशील. कारण भीष्मादिकांचीं शरीरें आतांच वृद्धत्वानें विगलित झालीं आहेत. युद्धामध्यें तूं यांस मारलेंस ह्मणजे यांस अन्य देह प्राप्त होतील. आणि हे सत्कर्मी आहेत म्हणून यांस आतांच्या देहापेक्षां अधिक चांगले देह प्राप्त होतील. सारांश तूं भीष्मादिकांवर व दुर्योधनादिकांवर सुद्धां उपकारच करशील.' ' अन्यानि नवानि' या शब्दांचा अर्थ–असाच आहे हें सिद्ध करण्यासाठीं–' **नवतरं कल्याणतरं रूपं कुरुते, पित्र्यं, गांधर्वं, दैवं, प्राजापत्यं वा ब्राह्मं** ' बृहदा० ४।४।४ श्रुति देतात. अर्थ स्पष्टच आहे कीं नवें कल्याणकारक व कल्याणमूलक रूप प्राप्त होतें तें पितरांचें, गंधर्वांचें, देवांचें, प्रजापतीचें अथवा ब्रह्माचें स्वरूप प्राप्त होतें. मग यांत वाईट तें काय? हा गूढार्थ काढून म्हणतात कीं असा बोध केल्यावांचून केवळ आत्मा अविनाशी आहे ' इतकेंच आचार्यांप्रमाणें सांगणें ह्मणजे नुसता वरवरचा अर्थ करणें आहे. भगवंताच्या मनांत वर सांगितलेला गूढार्थच असला पाहिजे.

रामानुजाचार्यांचा अभिप्राय वरीलप्रमाणेंच पडला आहे. ' धर्मयुद्धामध्यें व धारातीर्थीं मृत्यु आला असतां उत्तम शरीर प्राप्त होतें अशा अर्थाचे शास्त्राधार देऊन या आचार्यांनीं वरील गोष्ट सांगितली आहे. शां-

कराचार्यांस हे अर्थ अप्रस्तुतच वाटतील. कारण शरीर चांगले मिळेल कीं वाईट मिळेल हा प्रश्न नाहीं; आत्मा अविक्रिय राहतो कीं नाहीं हा वादविषय आहे. पूर्वापार संबंधही आत्म्याच्या अविनाशित्वाबद्दलच आहे. तेव्हां कर्माकर्माप्रमाणें आत्म्यास कोणत्याही शरीरांत प्रवेश करावा लागला तरी तो अविक्रियच राहतो हा मुख्यार्थ भगवंतांस सिद्ध करावयाचा आहे व तो जीर्णवस्त्राचा त्याग करणाऱ्या पुरुषाच्या दृष्टांतानें उत्तम रीतीनें सिद्ध झाला आहे असें मला वाटतें. शंकरानंदाचाही हाच अभिप्राय आहे.

श्रीधरस्वामी व प्रपाकार ह्मणतात कीं ' कर्मामध्येंच गुंतून राहिलेल्या जीवांस पुनः जन्म असतो ह्मणून जीर्ण देहांचा अगर कर्म करण्यास अशक्त झालेल्या देहांचा नाश झाला असतां शोक करणें योग्य नाहीं; किंवा पाप लागेल असें समजणेंही योग्य नाहीं. '

वल्लभाचार्य ' जीर्ण ' या शब्दाची ' माझ्या क्रीडेस अयोग्य, निरुपयोगी झालेलीं—शरीरें ' अशी व्याख्या देतात.

वामन—देहास अवांतर व्यय । क्षाण रोड होतां निश्चय । अविनाशी होऊनि अव्यय ॥ हा आत्मा ॥ .... थोडिया वयाचा देह । तोही जीर्ण निःसंदेह । लोक मूढ धरिती स्नेह । तत्त्व न कळे ॥ कणसाची नव्हाळी । परि मूषक लागला मुळीं । दाणा न येतां ते काळीं । वाळूनि जाय ॥ ज्यास आला काळ । तो देह होय फटकाळ ॥ (निरुपयोगी) । ज्यास डवसला महाव्याळ । तोचि जीर्ण ॥ हा उपदेश आमचे संसारी गृहस्थ काळजीपूर्वक वाचतील काय ?

पुनर्जन्माची वाटाघाट—

कर्म करून फलाची आकांक्षा धरणाऱ्या प्राण्यास पुनः जन्म येतो असें हिंदुधर्माचे प्रमाणभूत असणारे ग्रंथांत ह्मणजे श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणें वगैरे ग्रंथांत अनंत वेळां प्रतिपादन केलेलें आढळतें. फलेच्छाविरहित कर्म केलें असतां व स्वस्वरूपाची ओळख झाली असतां मुक्ति मिळते, आणि सकाम कर्म केलें तर जन्ममरणाच्या फेऱ्यांत प्राणी सांपडतो व कर्मनाश होईपर्यंत तो तसाच संसारसागरांत हेलकावे खात राहतो, असें हिंदुधर्माचें सांगणें आहे. ग्रीसमध्यें पायथॅगोरस व प्लेटोनामक महातत्त्ववेत्ते होऊन गेले त्यांचें-

ही मत असेंच होतें. समजत नाहींत अशा कारणांनीं प्रथमतः मनुष्य जन्मास येतो आणि येथील कर्माकर्मांप्रमाणें त्याला पुढें सुखदुःख मिळतें असें ख्रिस्ती लोकांचा पैगंबर ख्राइस्ट व मुसलमान लोकांचा पैगंबर महमद यांचें ह्मणणें आहे. खाल्डिया, इजिप्ट, आसिरिया वगैरे अत्यंत जीर्ण व सद्यःकालीं नामशेष झालेल्या धार्मिक लोकांचें ह्मणणें हिंदुलोकांसारखेंच ह्मणजे कर्मनाश व स्वस्वरूपज्ञान होईपर्यंत जन्ममरण सुटत नाहीं असेंच होतें. बुद्धाचेंही मत असेंच. सारांश या जगांत आजपर्यंत जे मोठमोठे धर्म होऊन गेले व त्यांपैकीं जे अद्यापि प्रखर अगर मंद तेजानें त्या त्या लोकांस उन्नतीचा मार्ग पात्रापात्रानुसार दाखवित आहेत त्या सर्वांचें ह्मणणें हें आहे कीं ' या लोकीं सत्कर्माचें अगर दुष्कर्माचें पूर्ण फळ मिळणें शक्य नाहीं, म्हणून येथील देह टाकल्यावर प्राणी अन्यत्र जातो, तेथें एकंदर कर्माकर्मांचा आढावा निघून नंतर त्यास सद्गति अगर यातनामय स्थिति प्राप्त होते. ' ख्रिस्ती धर्माप्रमाणें पुढील सुखदुःख देहास न मिळतां आत्म्यास मिळतें. म्हणून पुनर्जन्म मानणाऱ्या ' खुळ्या ' हिंदूंस ख्रिस्ती व मुसलमान लोक हंसतात. पण व्यावहारिक न्यायाच्या दृष्टीनें पाहिलें असतां हिंदुलोकांचीच समजूत विशेष समंजस आहे असें दिसून येईल. ॲडम नामक ईश्वराचा मानसपुत्र व प्रथम प्रजापति आपलें सर्व आयुष्य ईश्वराच्या भजनांत घालवितो काय आणि कोठें त्याच्या बायकोची जिज्ञासावृत्ति उच्छृंखळ होऊन ईश्वराची आज्ञा एकदां मोडल्याबरोबर सर्व मानवी प्राण्यांस—नव्हे सर्व प्राणीमात्रांस अथवा स्थावरजंगम वस्तुमात्रास—मृत्यूची शिक्षा होते काय ! एका अपराधाबद्दल येवढी जबरदस्त शिक्षा सर्वज्ञ आणि सर्वदयाघन प्रभूच्या दरबारीं व्हावी, तसेंच अमुक प्राणी पापमग्न आहेत असें न्यायाच्या दिवशीं ईश्वरास समजल्याबरोबर अनंतकालापर्यंत यमयातना त्या त्या प्राण्यास सरसकट भोगाव्या लागाव्या हेंही समंजस आणि तारतम्यशील मनुष्यास एकदम समजण्यासारखें नाहीं. या अभेद्य न्यायमालेपेक्षां आमची पुनर्जन्माची समजूत बरी असें माझ्यासारख्या स्थूलबुद्धि पुरुषास वाटतें. पूर्वजन्मींच्या कर्माप्रमाणें हा जन्म मिळतो व या जन्मांतील पापपुण्याच्या आढाव्यावर पुढील

जन्म येतो, व पुढें केव्हां कधीं काळीं साधुसंताची भेट झाल्यामुळें संसाराचा वीट आला, निष्कामवृत्ति झाली, गुरूच्या अनुग्रहानें ब्रह्मस्वरूपाची ओळख होऊन आपणच ब्रह्म असा साक्षात्कार झाला ह्मणजे मोक्ष मिळतो, अशी आमची खाशी व्यवस्था आहे. सुधारण्याचें मनांत आणण्यास भाविक हिंदुलोकांच्या मतें सर्व प्राणीमात्रांस याप्रमाणें ईश्वरानें पुष्कळ सौलत दिलेली आहे. त्याचप्रमाणें एकास चांगली स्थिति, दुसऱ्यास वाईट स्थिति असा पक्षपाती व्यवहार दिसतो त्यासही उत्तर द्यावयास सांपडतें कीं ज्याच्या 'त्याच्या कर्मानुसार प्रत्येकास सुख किंवा दुःख मिळतें. तेव्हां ख्रिस्ती किंवा इतर धर्मीयांनीं केवळ हंसण्यासारखा आमचा वेडसर धर्मपंथ नाहीं, निदान पुनर्जन्माचा विषय तरी नाहीं, असें वाटतें. सर्वमान्य भगवद्गीतेमध्येंही पुनर्जन्माच्या सत्यतेविषयीं अनेक वेळ उल्लेख आला आहे आमच्या लोकांचीही समजूत याच प्रकारची आहे. ज्याचें कर्म तो भोगतो व असें नसतें तर जगांत फार अनर्थ झाले असते असें आमच्यांतील श्रेष्ठ पुरुषांचें ह्मणणें आहे.

हा एकदृष्टीनें ह्मणजे भाविकधर्मदृष्टीनें विचार झाला. आधुनिक शास्त्रीय दृष्टीनें विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे विशिष्ट व्यक्तीस पुनर्जन्म येतो किंवा कसें हें पाहिलें पाहिजे. पूर्वजन्माचें स्मरण जाग्रदवस्थेमध्यें राहतें तर पुनर्जन्माचा उलगडा करण्यास धर्माची अगर शास्त्राची अपेक्षाच राहिली नसती. आपल्या सर्वांच्याच दुर्दैवानें अगर सुदैवानें तशी स्थिति नाहीं ह्मणून धर्मवचनांवर व अनुमानप्रमाणावर आपल्यास अवलंबावें लागत आहे. असो; अनुभवजन्य सिद्धांत सांगणाऱ्या शास्त्राचें असें एक प्रमेय आहे कीं जें जें ह्मणून कार्य आहे, तें घडवून आणण्यास या विश्वसृष्टींतील प्रत्येक गोष्ट कारणीभूत होत असते. दुसरें एक प्रमेय असें आहे कीं प्रत्येक प्राणी जन्म पावतो, तो आपल्या पितरांच्या, कुलाच्या, जातीच्या, देशाच्या व मानवी प्राण्यांच्या शारीरिक व मानसिक गुणधर्मानुसार अवतीर्ण होत असतो. मुलांच्या रंगरूपावरून व आवाजावरून जर सामान्यतः त्यांचे आईबाप व जाती ओळखितां येते, मनुष्याच्या पापपुण्यान्वयें एकवीस मागील व एकवीस पुढील पिढ्यांस दुःखसुख

भोगावें लागतें अशी जर समजूत आहे, व्यवहारांत व लग्नविधीचे-वेळीं जर आपण हिंदुलोक आईबापांच्या, कुलशीलावरूनच वधुवरांचे गुणधर्म सामान्यत: ठरवितों व 'जाती तशी पोती' असें ह्मणतों, आधुनिक प्रसिद्ध महाडकर ज्योतिषी हे जर मुलाच्या चेहऱ्यावरून बापाची व बापाच्या चेहऱ्यावरून मुलाची, जन्मपत्रिका बहुतकरून बिनचूक तयार करितात, व्यक्तीवरून देशांतील लोकांच्या गुणधर्मांचें व देशावरून व्यक्तींच्या गुणधर्मांचें संकीर्तन जर आपण पुष्कळ वेळां करितों, विद्येनें, विचारानें, संगतीनें, उपदेशानें व प्रपंचांतील अनेकविध प्रसंगांनीं मनुष्याची दानत सुसंस्कृत अगर अपकृत होते असें जर प्रत्यहीं आपण पाहतों तर आपल्यास असें म्हणावयास नको काय कीं मनुष्य जें जें कर्म करितो अगर जें जें फल इहलोकीं त्यास प्राप्त होतें, तें तें सर्व येथील उपाधींच्या नियमानुसार प्राप्त होतें व प्राप्त झालेंच पाहिजे. त्याचप्रमाणें आईबाप शरीर देतात हें प्रत्यक्ष अनुभवावरून जर आपल्यास स्पष्ट दिसतें, तर आईबापच मानसिक वृत्ति देत नाहींत हें सिद्ध करण्यास हल्लीं आहे त्यापेक्षां अनेकपट सबळ पुरावा प्रस्तुतच्या चौकसकाळांत असला पाहिजे. आतां मातापितरें सशक्त असलीं व मुलांची जोपासना त्यांनीं यथाशास्त्र केली ह्मणजे मुलें सशक्त होतात हा जसा अनुभव आहे, तसा आईबाप बुद्धिमंत व नीतिवंत असले तर मुलें तशींच निपजतात असा अनुभव नेहमींचा नाहीं, असें कोणी म्हणेल त्या आक्षेपकास आज मी इतकेंच म्हणतों कीं अमृततुल्य अन्न आपल्या सामर्थ्यापेक्षां जास्त खाल्लें तर तें जसें विषमय होतें, तद्वतच शरीराची काळजी न करितां आईबापांनीं विचाराचे श्रम अत्यंत केले तर मुलेंहीं शरीरानें व मनानें अशक्त होण्याचा संभव आहे; अथवा शारीरिक व मानसिक श्रमांचें व उपभोगांचें असें अद्यापि एक प्रमाण ठरलें नाहीं कीं ज्यांच्या योगानें शारीरिक श्रमांचा व उपभोगांचा मनावर व मानसिक श्रमांचा व उपभोगांचा शरीरावर उत्तम परिणाम होऊन पूर्वपिढीपेक्षां पुढची पिढी जास्त शक्तिवंत आणि जास्त विचारवंत निघेल; इतकेंच काय तें स्पेन्सरसाहेबांचे म्हणण्याप्रमाणें मला आज म्हणतां येतें. तथापि उलट पक्ष खरा धरूनही हेंच सिद्ध होतें

कीं आईबापांच्या कर्माप्रमाणें मुलें निपजतात. असा जर आजचा अनुभव आहे तर प्राण्यास पूर्वजन्म होता व त्यामध्यें केलेल्या कर्मानुसार त्याचें कर्म आहे व त्याला सुखदुःख मिळतें, असा पुरावा नसतां आग्रह कां धरावा ! पूर्वजन्माच्या कर्माप्रमाणें ह्या जन्मांतील उपाधि असतात असें धार्मिक लोकांचें म्हणणें आहे व येथील परिस्थितीच्या धोरणानें मनुष्य कर्म करितो व त्यास सुखदुःख मिळतें असें आधुनिक उत्क्रांतिशास्त्राचें म्हणणें आहे. पूर्वमताप्रमाणें व्यक्तीचें सुखदुःख व्यक्तीच्या पूर्वकर्माप्रमाणें उत्पन्न होतें असें आहे व हल्लींचें मत व्यक्तीचें सुखदुःख व्यक्तीच्या येथील कर्मावर, जातीच्या कर्मावर आणि आधिभौतिक स्थितीवर अवलंबून असतें असें आहे. पूर्वींच्या व हल्लींच्या मतांत आत्मा सारखाच कायम आहे पण तो विकारशून्य आहे म्हणून त्याचा विचार उभयपक्षींही करणें अवश्य नाहीं. तेव्हां पूर्वपक्षाप्रमाणें राहतांपैकीं वासनामय देह हा कायम असतो व तो वासनानुसार व कर्मानुसार जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो असें सिद्ध होतें. त्यांतही हल्लींचे थिआसोफिस्ट, महात्म्यांच्या आज्ञेवरून, असें ह्मणतात कीं वासनामय देह अगर लिंगदेह हा देहपात झाल्यावर थोड्या दिवसांच्या आंतच नष्ट होतो व कारणदेह अगर जीवाचें संचित मात्र कायम राहून कर्मोपभोग घेण्यासाठीं प्राण्यास पुनः देहप्राप्ति होते! आधुनिक पक्षाचें असें ह्मणणें आहे कीं, कांहींएक विशिष्ट प्रकारची रासायनिक क्रिया झाली, (हिलाच ते चैतन्यविशिष्ट रासायनिक क्रिया ह्मणतात.) म्हणजे पूर्वपिढीच्या इहलोकांतील शारीरिक व मानसिक कर्मानुसार जीव उत्पन्न होतो. सारांश ह्या लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें बाप आणि पूर्वपिढी हा मुलाचा पूर्वजन्म आणि त्या मुलाचीं मुलें व पुढील पिढी हा त्याचा पुढील जन्म होय. अशी ही परंपरा आहे. यांतील खरा पक्ष कोणता व खोटा कोणता ह्याचें तारतम्य पाहण्याचें हें स्थळ नव्हे, निदान सद्यःकालीं तसें करण्यास माझी तरी तयारी नाहीं. मात्र इतकें सांगून ठेवणें येथें अवश्य दिसतें कीं आधुनिक पक्षाच्या समर्थनार्थ उपनिषदांतील अनेक वचनें अवतीर्ण करितां येतील. त्यांपैकीं कांहींचा मात्र येथें उल्लेख करितों.

ऐतरेयोपनिषदामध्यें तीन जन्म सांगितले आहेत ते येणेंप्रमाणें:—

" पुरुषे ह वा अयमादितो गर्भो भवति । यदेतद्रेतस्तदेतत्सर्वेभ्यो-ऽङ्गेभ्यस्तेजः संभूतमात्मन्येवाऽऽत्मानं बिभर्ति तद्यदा स्त्रियां सिञ्चत्यथैनज्जनयति तदस्य प्रथमं जन्म ॥ तत्स्त्रिया आत्मभूयं गच्छति यथा स्वमङ्गं तथा, तस्मादेनां न हिनस्ति साऽस्यैत-मात्मानमत्र गतं भावयति ॥ सा भावयित्री भावयितव्या भवति तं स्त्री गर्भं बिभर्ति सोऽग्र एव कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयति स यत्कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयत्यात्मानमेव तद्भावयत्येषां लोकानां संतत्या एवं संतता हीमे लोकास्तदस्य द्वितीयं जन्म॥ सोऽस्यायमात्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते । अथास्या यमितर आत्मा कृतकृत्यो वयोगतः प्रैति स इतः प्रयन्नेव पुनर्जायते तदस्य तृतीयं जन्म " (ऐ० आ० २ अ० ५ ख० १)

हा उतारा प्रस्तुत प्रकरणास फार उपयोगी आहे. व या उताऱ्यांतही पुनर्जन्माचा निर्देश आहे; तथापि आपला मुलगा म्हणजे आपलेंच दुसरें जन्म असा जो तिसऱ्या मंत्रांत अर्थ आणिला आहे तोच विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. आचार्यंही भाष्य लिहितांना ह्मणतात: ' कोणत्या कारणासाठीं आपणच आपल्याला पुत्ररूपानें उत्पन्न करून घेऊन त्याचें संगोपन करितो ? ह्याचें उत्तर असें कीं, ह्या पुत्रपौत्रादि लोकांचा उच्छेद होऊं नये ह्मणून ! ' यावरून उपनिषत्काराचें ह्मणणें कोणत्या धोरणाचें आहे हें स्पष्ट दिसतें. ' आत्मा वै पुत्रनामासि ' हें वाक्य तर सुप्रसिद्धच आहे.

यापेक्षांही स्पष्ट अभिप्राय कौषीतकी उपनिषदांत आहे.—बाप मुलाला म्हणतो:—

अङ्गादङ्गात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा त्वं पुत्र माऽऽविथ...॥ ७ ॥

' माझ्या प्रत्येक अंगापासून तुझा संभव होत आहे, तुझी उत्पत्ति होत आहे. माझ्या हृदयापासूनच किंवा माझ्या सूक्ष्मदेहापासूनच तुझी उत्पत्ति पूर्ण होत आहे. पुत्रा ! यापुढें तूं माझें संरक्षण करणारा हो.' नंतर पित्याचें शरीर पुत्राच्या वाचेमध्यें, डोळे, कान, मन यांमध्यें शिरतें झालें असें सांगून पितापुत्रांच्या संवादाचें अवतरण करितात.

वाचं मे त्वयि दधानीति पिता। वाचं ते मयि दध इति पुत्रः

पिता—हे मुला, माझी वाणी मी तुझ्यामध्यें ठेवितों.

पुत्र—तुझी वाणी मी ग्रहण करितों.

अशाच प्रकारें प्राण, चक्षु, श्रोत्र, अन्नरस, कर्में, सुखदुःखें, आनंद, रति, उत्पादन शक्ति, चलनवलनशक्ति, धीशक्ति (बुद्धि, अंतःकरणवृत्ति) प्रज्ञा, मन, ज्ञानविषय आणि इच्छाविषय ह्या सर्वांचा न्यास व न्यासग्रहणविधि सांगितला आहे. तो इतका स्पष्ट आहे व आधुनिकशास्त्रांसही प्रमाणभूत होणारा आहे कीं हा भाग प्रत्येक समंजस आणि पूर्वजाभिमानी पुरुषानें निष्पापबुद्धीनें वाचावा असें सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं. या प्रकरणाला संप्रत्तिप्रकरण (संप्रदानप्रकरण) असें ह्मटलें आहे !

आतां बृहदारण्यक उपनिषद पहाः—

पुत्राला विद्यासंपन्न करून व त्यास संसारधुरेचा धुरंधर करून स्वतः मरणास तयार झालेला मनुष्य.

अस्माल्लोकात्प्रैत्यथैभिरेव प्राणैः सह पुत्रमाविशिति

'मनुष्य ह्या लोकास सोडून जातो, मरतो, तेव्हां ह्याच आपल्या प्राणासह (आचार्य ह्मणतात; आपली वाणी, मन व प्राण यांच्यासह) तो पुत्रशरीरांत प्रवेश करितो, त्यास व्यापून टाकितो ! आचार्य या ह्मणण्याच्या स्पष्टीकरणार्थ एक प्रमाणवाक्य घेऊन ह्मणतातः—ज्या पित्याला असा सुविद्यासुसंस्कृत पुत्र आहे तो पिता ह्या लोकामध्यें, पृथ्वीवर, पुत्ररूपानें राहतो, मरत नाहीं असेंच मानावें.' वर ऐतरेय उपनिषदांतील अवतरण घेतलें आहे त्यांतही 'तो त्याचा दुसरा आत्मा पुण्यकर्मासाठीं ह्या लोकामध्यें प्रतिनिधिरूपानें, पुत्ररूपानें, येथें राहतो.' पुत्राचें लक्षणच आचार्य सांगतात कीं 'वडिलांचें जें उणें असेल तें भरून काढून जो त्याचें संरक्षण करितो तोच खरा पुत्र होय. पुत्रत्वाची खरी कर्तव्यसीमा हीच होय.' आणखी पहाः—

"स पुत्रेणैवास्मिल्लोके प्रतितिष्ठति" (तो पुत्राच्या योगानेंच ह्या मनुष्यलोकास जिंकितो, वश करितो, असा आचार्यांनीं अर्थ केला आहे. 'तो ह्या कर्मभूमींत पुत्ररूपानें राहतो.' असा अर्थ होईल काय !)

आणखीही पुष्कळ उतारे देतां येतील, पण विस्तारभयास्तव इतकेच देतों.

ह्या वरील श्रुतिवाक्यांवरून असें दिसत नाहीं काय कीं अत्यंत प्राचीनकाळीं आमच्या पूर्वजांस आधुनिक उत्क्रांतितत्त्वाचा सुगावा लागला होता? सृष्टींतील लाखों वस्तूंचें एका दिशेनें परीक्षण केल्यानंतर उत्क्रांतितत्त्वाची कल्पना निघून तिनें विचारी पुरुषांचीं अंत:करणें आकर्षित केलीं व सहज उलगडा न करितां येण्यासारख्या ज्या अनंत गोष्टी आहेत, त्यांपैकीं पुष्कळांच्या स्वरूपाचें उद्‍घाटन उत्तम प्रकारचें केलें ही आनंदजनक सुवार्ता होय व ह्याबद्दल डार्विन, हक्सले, स्पेन्सर वगैरे आधुनिक महर्षींचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे; पण जगाचा अनुभव ज्या वेळीं बाल्यावस्थेंत होता, आज स्पष्ट झालेल्या गोष्टी ज्या वेळीं अत्यंत मुग्धावस्थेंत होत्या, आजचीं उपकरणें ज्यावेळीं अस्तित्वांत नव्हतीं, सामान्य पोरासोरांस जें आज समजतें, त्याची कल्पनासुद्धां ज्यावेळीं करितां येण्यासारखी नव्हती, अशा मानवी जातीच्या बाल्यावस्थेंतही ज्यांनीं आपल्या अद्वितीय आणि ह्मणूनच प्रासादिक बुद्धिप्रभावानें आजही कौतुक उत्पन्न करणारें उत्क्रांतितत्त्व शोधून काढून पुढील पिढीच्या हितासाठीं प्रकटही केलें, त्या उपनिषत्कारांस जर कोणी प्रेमभरानें अवतारी पुरुष ह्मटलें तर त्याला कां हंसावें! अवतारी पुरुषांचीच त्यांची खरी योग्यता होय!

असो; तेव्हां आधुनिक मतास उपनिषदांचा आधार आहे. व्यवहारांत या आधुनिकतत्त्वानें अनर्थ उत्पन्न होतील, पुढें जन्म नाहीं, आपण मेल्याबरोबर संसारयात्रा संपते, असें तत्त्व प्रगट झाल्यास लोक दुराचारी होतील अशी कांहीं पापभीरु सद्गृहस्थांस शंका येते, नव्हे—भीतिही वाटते. पण या सत्त्वस्थ संतांनीं मानवी वृत्तीचें परीक्षण यथार्थ केलें नाहीं असें मला कष्टानें ह्मणावें लागत आहे. माझ्या सत्कर्मानें बायकामुलांचें कल्याण होईल व माझ्या दुष्कर्मानें त्यांचा संसार बिघडेल, वंशाची उन्नति करणें अगर अवनति करणें ह्या दृश्य जगांत माझ्या कर्मावर पुष्कळच अवलंबून आहे, अशी मानवीमनाची समजूत व खातरजमा झाली तर मनुष्याची स्वार्थप-

रायणताच सदैव उच्छृंखल होत राहील असें निदान मला तरी वाटत नाहीं. पापकर्म केलें असतां आपल्यास यमयातना भोगाव्या लागतील असें धार्मिक बुद्धीनें समजत असतें तरी बायकामुलांसाठीं खोटें बोलणारे व चोऱ्या करणारे अनेक लोक सांपडणार नाहींत काय ! माझ्या प्रत्येक कृत्याचा परिणाम मुलावर व इतरांवर होत आहे व त्याचें फळ इहलोकीं मला व त्यांस भोगावें लागेल असें स्पष्टपणें समजलें असतां अनेक लोक पापापासून परावृत्त होतील असें मला वाटतें. आपल्या कृत्याबद्दलचा विचार आपल्यास प्रतिक्षणीं सुखदुःख देतोच, पण अंतकालाचा समय येऊन ठेपला असतां व आपण आतां निःशेष नाहींसे होणार असें समजलें असतां ह्मणजे अशा दारुण प्रसंगीं मनुष्य जेव्हां आपल्या कृत्यांचा झाडा आपल्या मनास देत असेल, जेव्हां प्रत्येक क्षण युगाप्रमाणें भासून आपल्या आयुष्याचें चित्र जसेंच्या तसें आपल्या समोर प्रत्यक्ष येऊन उभें राहत असेल, तेव्हांचें होणारें समाधान किंवा होणारी तळमळ अगर झालेला पश्चात्ताप हीं सर्व पापपुण्याच्या अढाव्याप्रमाणें अनंतकाळांत होणाऱ्या यमयातना किंवा अनंतकाळ होणारें स्वर्गसुख एका क्षणांत कशावरून एकवट होत नसेल ! आणि या परंतु मरणासन्न प्राण्यास युगाप्रमाणें भासणाऱ्या क्षणिक कालांत होणारें सुखदुःखच स्वर्गनरकादिवासाप्रमाणें आहे असें आमच्या पूर्वजांचें मत कशावरून नसेल !

असो; हे दोन्ही पक्ष सुज्ञ व समंजस वाचकांपुढें निष्पापबुद्धीनें मांडिले आहेत. उपनिषदांचे मंत्रद्रष्टे पुनर्जन्मावर विश्वास ठेवित होते यांतही शंका नाहीं. तथापि सभोंवार असणाऱ्या विश्वासचक्राचा भेद करून अनुभूत गोष्टींचा उलगडा स्वाभाविक रीतीनें करण्यासाठीं अनुमानाच्या निरामय आकाशांत जेव्हां ते सयुक्तिक कल्पनाशक्तीनें भराऱ्या मारूं लागले, तेव्हां त्या वरदी व असामान्य ऋषींच्या अलौकिक आणि प्रासादिक कल्पनासामर्थ्याला हे विचार सुचलेले आहेत व त्या विचारांस सार्थ करण्याचें श्रेय एकोणीसाव्या शतकांत साता समुद्रांच्या पलीकडे राहणाऱ्या तत्त्ववेत्त्यांनीं घेतलें आहे ! विधात्याची अघटितघटना ती हीच होय. याप्रमाणें

प्रस्ताव करून प्रस्तुत विषयाचा हा भाग आटपतों. मूळश्लोकाचें विवरण मागेंच झालें आहे. ॥ २२ ॥

कस्मादविक्रिय एवेति । आह–

'आत्मा अविक्रिय कां आहे ?' भगवान् सांगतात:—

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ॥
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

एनं (ह्या आत्म्याला) **शस्त्राणि** (शस्त्रें) **न छिन्दन्ति** (तोडीत नाहींत, याचे विभाग करूं शकत नाहींत.); **एनं** (ह्याला) **पावकः** (अग्नि) **न दहति** (जाळीत नाहीं) **च** (आणि) **एनं** (ह्याला) **आपः** (पाणी) **न क्लेदयन्ति** (ओलें करित नाहींत, भिजवित, किंवा कुजवित नाहींत); **मारुतः** (वायु) **न शोषयति** (सुकवित नाहीं)–सारांश पंचमहाभूतांपैकीं पृथ्वी, आप, तेज आणि वायु ह्या कोणालाही आत्मरूपी सद्वस्तूला विकार करण्याचें सामर्थ्य नाहीं. तोडणें, कुजणें, जळणें, सुकणें हीं नाशाचीं साधनें आहेत. परंतु यांपैकीं कोणताच विकार आत्म्याला होत नाहीं.

शां. भा.—

नैनं छिन्दन्तीति । एनं प्रकृतं देहिनं न छिन्दन्ति शस्त्राणि निरवयवत्वान्नावयवविभागं कुर्वन्ति शस्त्राण्यस्यादीनि । तथा नैनं दहति पावकोऽग्निरपि न भस्मीकरोति । तथा नैनं क्लेदयन्त्यापः । अपां हि सावयवस्य वस्तु न आर्द्रीभावकरणेनावयवविश्लेषापादने सामर्थ्यं तन्न निरवयव आत्मनि संभवति। तथा स्नेहवद्द्रव्यं स्नेहशोषणेन नाशयति वायुरेनं स्वात्मानं न शोषयाति मारुतोऽपि ॥२३॥

भा० अ०—

प्रस्तुतच्या ह्या आत्म्याला शस्त्रें तोडूं शकत नाहींत. कारण आत्मा अवयवशून्य आहे. खड्गासारखीं (तरवारीसारखीं) शस्त्रें असतात तीं ज्याला अवयव आहेत, भाग आहेत,

त्याला तोडतील. पण आत्म्याला मागच नाहींत.—युरपियन लोक व कणादप्रभृति नैयायिक परमाणु निरवयव आहेत असें ह्मणतात. तसाच आत्माही असल्यामुळें—शस्त्रांच्या हातून याचे विभाग कसे होणार? त्याचप्रमाणें व त्याच कारणास्तव अग्नीच्या हातूनही याला जाळवत किंवा भस्म करवत नाहीं. पाण्यानें हा भिजत नाहीं. ज्याला अवयव आहेत, भाग आहेत, अशा पदार्थाला पाणी भिजवितें आणि नंतर त्या पदार्थाचे अवयव निरनिराळे करून टाकितें. हें सामर्थ्य पाण्याला आहे. पण ह्या सामर्थ्याचा आत्म्यावर परिणाम घडत नाहीं. कारण तो निरवयवच आहे! तसेंच पदार्थामध्यें जी स्निग्धता असते, जो रस असतो, त्याचें शोषण वायु करितो. पण वायूचेंही येथें कांहीं चालत नाहीं. कारण आत्मा—आनंदैकरसघन,—एकच एक, अवयवशून्य—आहे.—सारांश ज्याप्रमाणें आकाश विभागरहित आहे, अवयवशून्य आहे, त्याचप्रमाणें आत्मा असल्यामुळें कोणत्याही भूताचा अगर महाभूताचा परिणाम आत्म्यावर घडत नाहीं. बटलरचें असेंच म्हणणें आहे व आत्म्याचें अमरत्व त्यानें असेंच सिद्ध केलें आहे, असें मागें एकदां सांगितलेंच आहे.

प्रपाकार ' मऊ करण्याच्या हेतूनें पदार्थ शिथिल करणें ' असा ' क्लेदन ' शब्दाचा अर्थ करितात.

वर सांगितलेल्या व इतर सर्व आधिव्याधींचा परिणाम शरीरावरच होत असल्यामुळें आत्मा अविकृत व अबाधित राहतो असें शंकरानंद ह्मणतात. पंडितांनींही हाच अनुवाद केला आहे. ' सनातनोऽनादिः । न तस्य कश्चिज्जनिता न चाधिपः ' श्वेताश्वतर ६।९. ' हा आत्मा सनातन आहे व अनादि आहे. याचा कोणी उत्पन्नकर्ता नाहीं किंवा स्वामीही नाहीं. ' ॥ २३ ॥

यत एवं तस्मात्—

असें आहे ह्मणून:—

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ॥
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥२४॥

प० अ० अ०—

अयं (हा—आत्मा—) **अच्छेद्यः** •(तोडला जाणारा नव्हे) **अयं** (हा) **अदाह्यः** (जळणारा नव्हे) **अक्लेद्यः** (कुजणारा नव्हे) **च** (आणि) **अशोष्यः एव** (सुकणाराही नव्हे.) **अयं** (हा-आत्मा.) **नित्यः** (नाश न पावणारा, अविनाशी) **सर्वगतः** (सर्वव्यापी) **स्थाणुः** (स्थिर) **अचलः** (गतिशून्य). आणि **सनातनः** (त्रिकाल राहणारा आहे—.) ह्याला कोणताच विकार होत नसून तो अविनाशी, सर्वस्थ, स्थिर, अचल आणि सर्वकाल राहणारा आहे. म्हणून तो अविक्रिय आहे.

शां० भा०—

अच्छेद्योऽयमिति। यस्मादन्योन्यनाशहेतूनि भूतान्येनमात्मानं नाशयितुं नोत्सहन्ते तस्मान्नित्यो नित्यत्वात्सर्वगतः सर्वगतत्वात्स्थाणुः स्थाणुरिव स्थिर इत्येतत्। स्थिरत्वादचलोऽयमात्माऽतः सनातनश्चिरंतनो न कारणात्कुतश्चिन्निष्पन्नोऽभिनव इत्यर्थः। नैतेषां श्लोकानां पौनरुक्त्यं चोदनीयम्। यत एकेनैव श्लोकेनाऽऽत्मनो नित्यत्वमविक्रियत्वं चोक्तं 'न जायते म्रियते वा' इत्यादिना। तत्र यदेवाऽऽत्मविषयं किंचिदुच्यते। तदेतस्माच्छ्लोकार्थान्नातिरिच्यते किंचिच्छब्दतः पुनरुक्तं किंचिदर्थत इति। दुर्बोधत्वादात्मवस्तुनः पुनः पुनः प्रसङ्गमापाद्य शब्दान्तरेण तदेव वस्तु निरूपयति भगवान्वासुदेवः कथं नु नाम संसारिणामव्यक्तं तत्त्वं बुद्धिगोचरतामापन्नं सत्संसारनिवृत्तये स्यादिति॥ २४॥

भा० अ०—

आतां ज्याअर्थीं परस्परांचा नाश करणारीं हीं चार पृथ्वी, जल, अग्नि, वायुनामक महाभूतें आत्म्याचा नाश करण्याला समर्थ होत नाहींत,—सारांश ज्या अर्थीं आत्म्याचा नाशच होत नाहीं, त्या अर्थीं तो नित्य (अविनाशी) आहे, नित्य आहे ह्मणून तो सर्व-

व्यापी आहे, सर्वच दृश्य त्यानें भरलेलें आहे ह्मणून तो स्तंभासारखा स्थिर आहे; आत्मा स्थिर आहे तेव्हां त्यांत कोठेंही हालचाल होत नाहीं हें ठीकच आहे. कोणचाच विकार आत्म्याला होत नाहीं, अत एव तो सनातन, त्रिकाल राहणारा, नेहमीं असणारा आहे म्हणजे तो कोणत्याही कारणापासून उत्पन्न झाला ह्मणून तो नवा आहे, असें कधींही ह्मणतां यावयाचें नाहीं.–' वाऱ्यासारखा उत्पन्न झालेला तो नाहीं.' असा एक पाठ आहे.–सारांश आत्मा नित्य, सर्वव्यापी, स्थिर, अचल, आणि चिरंतन राहणारा आहे.– **प्रपाकार** ह्या देहावर आत्म्याच्या व आत्म्यावर देहाच्या आभासांचे स्पष्टीकरणार्थ एक श्लोक देतात.–

" अयःपिण्डगते वह्नौ लोहकारस्य ताडनम् ।
आरोप्यते तथा लोहे दाहकत्वादिवह्निजम् ॥

'अग्नीमध्यें तापवून लाल झालेल्या गोळ्याला मारलें असतां जसें आपण अग्नीला मारलें असें ह्मणतों, त्याचप्रमाणें भाजणाऱ्या लोखंडावरच भाजणें आदिकरून अग्नीचें गुणांचाही आरोप करितों !' देह आणि आत्म्यावर असेच परस्परांचे धर्मांचा आरोप होत असतो.

पूर्वपक्षी—काय हो ! भगवंतांनीं तेंच तें पिष्टपेषण काय चालविलें आहे ? मागें २० व्या श्लोकांत आत्मा नित्य आहे, अविक्रिय आहे असें सांगून पुढेंही तोच सिद्धांत सांगत आहेत. तेथें आत्म्याच्या स्वरूपाविषयीं जें कांहीं सांगितलें आहे, त्याहून ह्या वरील श्लोकांत कांहीं निराळें सांगावयाचें नसून नुसती शब्दांची व कधीं अर्थाची पुनरुक्ति चालविली आहे याचा अर्थ काय ?

सिद्धान्ती—अरे बाबा ! येथें पुनरुक्ति झाली आहे खरी; पण तूं मानतोस त्या रीतीनें ही पुनरुक्ति दोषास मुळींच पात्र होत नाहीं. कारण आत्मवस्तूचें ज्ञान करून देणें व ज्ञान करून घेणें फार कठिण आहे, तें ज्ञान लवकर होत नाहीं ह्मणून कृपाघन वासुदेव हे पुनः पुनः निरनिराळे प्रसंग आणून–त्याच शब्दांनीं, अगर–शब्द फिरवून आत्मस्वरूपाचेंच वर्णन करित आहेत. बाबारे ! त्यांचा हेतु हा आहे कीं, संसारामध्यें–या दृश्य विश्वाच्या चक्रामध्यें–जे बापडे सां-

पडले आहेत, त्यांच्या बुद्धीला हें आत्म्याचें अव्यक्त स्वरूप(ज्याचें लक्षण पूर्णपणें देतां येत नाहीं, कारण तें मुळींच विलक्षण आहे, अनुद्भूत आहे.) कोणत्या तरी रीतीनें समजावून द्यावें, त्यांची खातरी पुनः पुनः त्याच त्याच किंवा अन्य शब्दांनीं सांगून करावी आणि त्यांस संसारापासून—संसाराच्या दुर्धर तापत्रयापासून—निवृत्त करावें, व संसारामधून त्यांची वृत्ति फिरवून आत्मविचाराकडे लावावी आणि त्यांस मोक्ष मिळवून द्यावा. समजलास ?—आचार्यांनीं येथें येणारा पुनरुक्तीचा दोष कशा सुंदररीतीनें निराकृत केला आहे, व त्या पुनरुक्तीचें समर्थन करून दयावत्सल भगवंताची काळजी कशी अभिव्यक्त केली आहे हें चाणाक्ष वाचकांस समजून सांगावयास नकोच. ज्यांना अद्यापि ही शंका असेल त्यांनीं मिल्ल अगर स्पेन्सर यांचे मानसिक विषयांवरील अभियुक्त ग्रंथ वाचावे ह्मणजे एकच सूक्ष्म सिद्धांताचें स्पष्टीकरण करण्यास ह्या लोकमान्य ग्रंथकारांनीं किती वेळ पुनरुक्ति केली आहे त्याचा परिचय होईल.—

पंडितांनीं या श्लोकांवर जें व्याख्यान केलें आहे, तें वाचकांनीं अवश्य वाचावें. विस्तारभयास्तव तें येथें घेतलें नाहीं.

मधुसूदनीकार ' **एव** ' (ही) या शब्दाचा अन्वय सर्वत्र घेतला आहे. ' **नित्य** ' याचा अर्थ ' ज्याला पूर्वींची निराळी स्थिति, पुढील निराळी स्थिति, आणि आतांची निराळी स्थिति असें नसतें. ' असा करितात. ' **स्थाणुः** ' (अविकारी); ' **अचल** ' (संस्कारशून्य) ' **सनातन** ' (कोणत्याही क्रियेचें कर्म नाहीं असा) असे या शब्दाचे निराळे अर्थ हे टीकाकार देतात. श्लोकाच्या समर्थनार्थ ' **यः पृथिव्यां तिष्ठन् पृथिव्या अन्तरो योऽप्सु तिष्ठन्नद्भ्योन्तरो यस्तेजसि तिष्ठंस्तेजसोन्तरो यो वायौ तिष्ठन्वायोरन्तरः** ' अशा (बृहदा० ३।७।३ वगैरे) श्रुति देतात. ' पृथ्वींत राहून जो पृथ्वीच्या अंतर्यामीं असतो, पाण्यांत राहून पाण्याच्या अंतर्यामीं असतो वगैरे ' असा यांचा अर्थ आहे. यावरून मधुसूदनीकार असा सिद्धांत काढितात कीं सर्वांच्या—अर्थांतच शस्त्रादिकांच्या अंतर्यामीं राहणाऱ्या आत्म्याला शस्त्रें कशीं तोडतील ! ज्याच्या योगानें शस्त्रास तोडण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें

त्यासच तें शस्त्र तोडूं शकेल कसें ! ह्मणून आत्मा अविकारी, नित्य वगैरे आहे. **रामानुजांचा** अशासारखाच अभिप्राय आहे.

वल्लभा०—' हाच शस्त्राचा प्रेरक आहे. ' असें ह्मणून **' येन सूर्यस्तपति '** (ज्याच्या सामर्थ्यानें सूर्य प्रकाशित होतो) अशी श्रुति देतात.

शंकरानंदांनीं दुसऱ्या चरणांतील विशेषणांचा निष्कर्ष काढून म्हटलें आहे. **' आनंदैकरसत्वं चाऽऽत्मनः सूचितं भवति '** यावरून आत्म्याचें आनंदैकरसत्व ' म्हणजे निरतिशयसुखस्वरूपत्व (अत्यंत सुखाचें स्वरूप असणें हें) व्यक्त होतें.

मध्व हे आचार्य ' **नित्य** ' हें ' सर्वगताचें ' विशेषण करितात. ' नेहमींच सर्वत्र पसरलेला ' असा यांचा अर्थ आहे. ' **स्थाणुः**' म्हणजे नैमित्तिक बाधा ज्याला नाहीं असा ' हा अर्थ यांनीं केला आहे. हा श्लोक हे आचार्य ईश्वरपर लावितात. प्रतिबिंबाचे ठायीं बिंबाचे धर्म असणें योग्य आहे. ' **रूपं रूपं प्रतिरूपो बभूव' 'आभास एव च'** (कठ ५।९।१०) ईश्वर प्रत्येक ठिकाणीं निरनिराळें रूप ग्रहण करिता झाला. जीव हा परमेश्वराचा आभास आहे. वासुदेवाची भक्ति केल्याव्यतिरिक्त मोक्ष नाहीं असें सांगून सर्व देवतांपेक्षां वासुदेव श्रेष्ठ आहे, असेंही यांनीं प्रसंगवशात् श्रुति, स्मृति पुराणांचे एकदेशी आधार देऊन सिद्ध केलें आहे. तसेंच ' याची शक्ति अनंत आहे, अनंत प्रकारची दिसते. आणि ज्ञान, बल आणि क्रिया या सामान्य रूपांनीं ही शक्ति प्रकट होते ' अशीं वाक्यें आहेत ह्मणून, हें जग मायामय आहे असें ह्मणतात तें असत्य आहे, असा यांनीं द्वैतसिद्धांत ठोकला आहे. या द्वैतमतधारी लोकांचें प्रतिक्षणीं खंडन करणें कंटाळवाणें आहे, तथापि द्वैत हें नेहमीं हट्टानें पुढें येत असतें ह्मणून पुनः पुनः तिकडे वळणें आवश्यक आहे. ' **एकमेवाद्वितीयम्** ' ' **तत्त्वमसि** ' हीं महावाक्यें प्रत्येक उपनिषदांत सांपडतात. आणि प्रत्येक उपनिषदाचा उपक्रम आणि उपसंहार ' तें एकच आहे, अद्वितीय आहे ' ' तेंच तूं आहेस ' असा होत असतो. तेव्हां उपनिषदें प्रमाण मानणाराला वरील वाक्यें नाहींशीं केल्याशिवाय, किंवा त्यांचे अर्थ बदलल्याशिवाय द्वैतपक्षाचें

किंवा शून्यवादाचें समर्थनच करितां यावयाचें नाहीं. दुसरें कोणतेंही महावाक्य नमून जर 'तेंच तूं आहेस', येवढें एकच वाक्य उपनिषदांतून सांपडतें तरीसुद्धां अद्वैताची पूर्ण सिद्धि झाली असती. युरपियन तत्त्ववेत्त्यांची विचारदिशा अद्वैताकडेच आहे. भक्तिपंथ अगर कर्मपंथ पृथ्वीवर पुष्कळ आहेत खरे; पण त्या पंथांची उत्पत्ति विषयवैराग्य झालें नाहीं किंवा ममता सुटली नाहीं अशा लोकांकरितां मात्र आहे. कर्म करून स्वर्गसुख भोगावयाचें आणि तें संपल्याबरोबर पुनः कर्मभूमींत जन्म घ्यावयाचा हा कर्मपंथाचा पुरुषार्थ आहे. याला जो कंटाळला तो विरक्त होतो. भक्ति अगर उपासनेमध्यें ईश्वरपरच सर्व कर्म करावें असा पुरुषार्थ वर्णिला आहे. निष्काम कर्म करून तें परमेश्वरचरणीं ज्ञानपूर्वक समर्पण केलें असतां ह्मणजे ममताशून्य होऊन सर्व विश्व परमेश्वरस्वरूपामध्येंच पाहूं लागलें असतां, मुक्ति मिळेल व मिळते. कारण अशा पुरुषाला सद्वस्तूचें ज्ञान होतें आणि स्वरूपसाक्षात्कार झाल्याबरोबर मुक्तिही मिळते. आतां ईश्वरास सर्वज्ञ समजून आणि प्राण्यास सर्वच स्थितीमध्यें किंचिज्ज्ञ समजून अथवा 'ईश्वर आणि मी निराळे आणि नेहमींच निराळे राहणार' अशी भावना करून जे भक्ति करितात ते चांगले आहेत, पूज्य आहेत, वंदनीय आहेत हें खरें; पण लिहिण्यास दुःख वाटतें कीं सर्वज्ञ परमेश्वरास 'सर्वव्यापी' ठरवूनही ते जीवास निराळा ठेवितात! परमेश्वरानें सर्व विश्व व्यापून टाकल्यावर व विश्वस्वरूपीच तो आहे हें समजल्यावर जीवास अस्तित्व कसें संभवतें हें त्यांचे तेच समजूं जाणत. 'दृश्यविश्वांत ईश्वर, जीव' असा भेदाभेद मनुष्यें करितात हें ठीक आहे; हा भिन्नभाव केल्याखेरीज चित्तामध्यें पूर्ण सात्विकता कधींही बाणावयाची नाहीं हें खरें. पण चित्तशुद्धि झाली, अभिमान सुटला, वैराग्य प्राप्त झालें, नित्य सद्वस्तू शोधून काढण्याचा ध्यास लागला, गुरुमुखानें, वेदांतपठनानें सत्स्वरूपाची दिशा समजली, आणि नित्य चिंतनानें 'मीच ब्रह्म आहें' असा साक्षात्कार झाला ह्मणजे 'एकच आहे' असा सत्स्वरूपाचा बोध होऊन सर्व अज्ञान निरस्त होतें; तेव्हांही ईश्वर व जीव असा भेद ठेवणें अगर भेद असतो अशी कल्पना करणें ह्मणजे सूर्यज्योति अंधकारमय

आहे असेंच प्रतिपादन करण्यासारखें होय! असो; द्वैतवाल्यांनीं या चा विचार करावा.

किंच—

आणखी पहाः—

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ॥
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥२५॥

प० अ० अ०—

अयं (हा—आत्मा—) **अव्यक्तः** (अस्पष्ट, अदृश्य आहे.) **अयं** (हा) **अचिन्त्यः** (कल्पनातीत, मनानें आकलन न करण्यासारखा आहे.) **अयं** (हा) **अविकार्यः** (विकाराला वश न होण्यासारखा आहे) **उच्यते** (असें म्हटलें आहे, असें ह्मणतात.) **तस्मात्** (ह्मणून) **एनं** (ह्या आत्म्याला-) **एवं** (याप्रमाणें, आतांच सांगितल्याप्रमाणें) **विदित्वा** (जाणून) **अनुशोचितुम्** (नंतर शोक करण्यास) **न अर्हसि** (तूं योग्य नाहींस,) सारांश, आत्मा हा अदृश्य, अविकारी आहे ह्मणून याचें पूर्ण स्वरूप समजल्यानंतरही अर्जुना! शोक करणें तुला उचित नाहीं.

शां० भा०—

अव्यक्तोऽयमिति । अव्यक्तः सर्वकरणाविषयत्वान्न व्यज्यत इत्यव्यक्तोऽयमात्मा । अत एवाचिन्त्योऽयम् । यद्धीन्द्रियगोचरं वस्तु तच्चिन्ताविषयत्वमापद्यतेऽयं त्वात्माऽनिन्द्रियगोचरत्वादचिन्त्यः । अविकार्योऽयम् । यथा क्षीरं दध्यातञ्चनादिना विकारि न तथाऽयमात्मा । निरवयवत्वाच्चाविक्रियः। न हि निरवयवं किंचिद्विक्रियात्मकं दृष्टम् । अविक्रियत्वादविकार्योऽयमात्मोच्यते । तस्मादेवं यथोक्तप्रकारेणैनमात्मानं विदित्वा त्वं नानुशोचितुमर्हसि हन्ताऽहमेषां मयेमे हन्यन्त इति ॥ २५ ॥

भा० अ०—

—आत्म्यास रंगरूप नाहीं, ह्मणून—मनुष्यास अगर इतर कोणाही

प्राण्यास प्राप्त झालेल्या सर्व इंद्रियांना जो आत्मा अगोचर असल्यामुळें कळत नाहीं तो अव्यक्त होय.——नेत्रादि ज्ञानेंद्रियें, अंतःकरण व बुद्धि यांचा आत्म्याचें स्वरूप ओळखणें हा विषय नसल्यामुळें हा सर्व ज्ञानेंद्रियांस अगोचर आहे व ह्मणूनच त्यांस अज्ञेय आहे.—तो इंद्रियांस अज्ञेय आहे ह्मणून तो चिंतन करण्यासारखा नाहीं; कल्पनातीत आहे. जी वस्तु इंद्रियांस कळते, त्या वस्तूचें चिंतन करितां येतें हा अनुभव आहे. "**प्रकृतिभ्यः परं यत्तु तदचिन्त्यस्य लक्षणम्** " (प्रकृतीच्यापेक्षां पलीकडचें असणें, हें कल्पनाऽगोचरत्वाचें लक्षण होय.) असा हा आत्मा कोणत्याच ज्ञानेंद्रियाला गोचर नाहीं ह्मणून अचिंत्य आहे. तसेंच हा विकार होण्यासारखा नाहीं. ज्याप्रमाणें दुधामध्यें दहीं अगर दुसरा कांहीं आंबट पदार्थ घातला असतां दुधास विकार होतो, तसा आत्म्यास होत नाहीं. कारण आत्मा हा निरवयव आहे.—निरनिराळे कण असल्यामुळें दुधास विकार होतो; आत्म्याचे विभागच नसल्यामुळें त्यास विकार होत नाहीं असा अनुभवच आहे.—यास्तव आत्म्याला अविकार्य असें म्हटलें. म्हणून अर्जुना ! अशा प्रकारच्या व आतांच सांगितलेल्या स्वरूपाच्या आत्म्याचें पूर्ण लक्षण जाणल्यानंतर ' मी यांस मारणारा, माझ्या हातून हे मरणारे' असा शोक करणें तुला अत्यंत अनुचित होय.

मधु०—' आत्म्यास शस्त्रानें मारितां येतें असें सिद्ध करणारें प्रमाणच नाहीं' असें या श्लोकांत सांगितलें आहे म्हणून पुनरुक्ति नाहीं. अर्थांतच मग शोकमोहाचें कारणही उरत नाहीं. **रामानुजाचार्य** व **श्रीधरस्वामींचा** असाच अभिप्राय आहे.

प्रो० द्विवेदी— अविकारीशब्दानें येथें सांख्यांच्या प्रधानाचा निरास केला. प्रधान अदृश्य व अचिंत्य आहे, पण अविकारी नाहीं.

शंकरानंद—' आत्मशोधनाच्या मीमांसेस २२ व्या श्लोकांत आरंभ करून ती येथें संपविली आहे. अव्यक्त हें प्रधानाचें व सृष्टीचें साक्षी आहे ह्मणून ह्या उभयतांहून तें निराळें आहे. या श्लोकाच्या समर्थनार्थ श्रुति पहा. ' **पुरस्तात्सिद्धं हि ब्रह्म, अस्ति विज्ञाता, शुद्धोऽबाध्यस्वरूपः । बुद्धः सुखस्वरूपः । असंस्कार्यः । अद्वय एवायमात्मा सन्मात्रो मुक्तो नित्यः शुद्धो बुद्धः सत्यो निरंजनो**

विभुरद्वय आनन्दः पर एकरसः, ब्रह्म हें पूर्वीपासूनच, अनादि कालापासूनच, सिद्ध झालेलें आहे. तें ज्ञानवंत, शुद्ध आणि अविकारी स्वरूपाचें आहे. तें चैतन्यस्वरूपी आणि आनंदस्वरूपी आहे. तें अविकार्य आहे. हा आत्मा अद्वितीय असून सत्स्वरूपी आहे. तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सत्य, निर्लेप, व सर्वव्यापी आहे. तो एकच आहे. तो आनंद आहे. तो श्रेष्ठ आहे आणि तो एकरसात्मक आहे.'

मध्व व सत्यानंद हे हा श्लोकही ईश्वरपरच लावितात.

ज्ञानेश्वर–' हा तर्काचिये दिठीं (दृष्टीनें)। गोचर नव्हे किरीटी !। ध्यान याचिये भेटी। उत्कंठी[1] वाहे । हा गुणत्रयारहित। अनादि अविकृत। व्यक्तीस(मनुष्यास) अतीत। सर्वरूप ॥ अर्जुना ऐसा हा जाणावा। सकळात्मक देखावा। मग सहजें शोक आघवा (सगळा)। हरेल तुझा ॥

वामनपंडितांच्या दोनच ओंव्या घेतों! ' ज्या सत्तेनें सचेतन। होऊनि, मन करी चिंतन। त्यास तें मन अचेतन। चिंतील काय?॥' म्हणून ' आकाराचें चिंतन। राहतां, आत्माकार मन । तें उन्मनीं (आत्माकार मन झालें असतां) तें उन्मन । जाणवेल परि चिंतवेना ! ॥ शोकपार होण्यासाठीं नारदांनीं सनत्कुमाराची प्रार्थना केली आहे व त्यांनीं आत्मशोधनाचा मार्ग सांगितला आहे, हा बहारीचा प्रसंग पंडितांनीं मोठ्या खुबीनें आणिला आहे. ॥ २५ ॥

आत्मनोऽनित्यत्वमभ्युपगम्येदमुच्यते—

–आत्मा नित्य आहे हें येथपर्यंत सिद्ध केलें:–आतां आत्मा अनित्य आहे असें वादासाठीं गृहीत धरून भगवान् ह्मणतात:–

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ॥
तथाऽपि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥२६॥

पदा० अ०—

अथ च (आतां आणखी-जर-) एनं (ह्या-आत्म्याला) नित्य-

---

१ आत्म्याची आपली भेट व्हावी ह्मणून ध्यान हें स्वतःच अत्यंत उत्सुक झालें असतें! पण भेट कोठन होणार ?

जातं (नेहमीं उत्पन्न होत आहे असा) **वा** (अथवा) **नित्यं** (नेहमीं) **मृतं** (मरत आहे असा) **मन्यसे** (मानशील, मानलेंस) **तथाऽपि** (तरी) **महाबाहो** (हे आजानुबाहु अर्जुना !) **एवं** (या प्रकारें) **त्वं** (तूं) **शोचितुं** (शोक करण्यास) **न अर्हसि** (योग्य नाहींस).–सारांश प्रतिदेहाबरोबर आत्मा जन्मास येतो व तसाच देहावरोबर मरतो असें जरी तुझ्या मताप्रमाणें कबूल केलें तरी हे पराक्रमी अर्जुना ! तुला शोक करण्याचें कारण नाहीं.

शां० भां०–

अथ चैनमिति । अथ चेत्यभ्युपगमार्थः । एनं प्रकृतमात्मानं नित्यजातं लोकप्रसिद्ध्या प्रत्यनेकशरीरोत्पत्ति जातो जात इति मन्यसे । तथा प्रतितद्विनाशं नित्यं वा मन्यसे मृतं मृतो मृत इति । तथाऽपि तथाभाविन्यप्यात्मनि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि जन्मवतो जन्म नाशवतो नाशश्चेत्येतावावश्यं भाविनाविति ॥ २६ ॥

शां०भा०

आतां वादसिद्धी करण्यासाठीं जर तूं या आत्म्याला, व्यवहारांत म्हणतात त्याचप्रमाणें प्रत्येक शरीराच्या उत्पत्तीच्या वेळीं ' आत्मा जन्म पावतो ' असें मानशील, व तसेंच प्रत्येक शरीराचा नाश होतो तेव्हां 'आत्म्याचा नाश होतो' असें प्राकृत मनुष्याप्रमाणें मानशील तरी सुद्धां म्हणजे आत्म्याला जन्म मरण आहे असें घटकाभर गृहीत धरिलें तरी सुद्धां हे शूरा, आजानुबाहो अर्जुना ! तुला शोक करण्याचें कारण नाहीं. कारण जो जन्म पावणारा आहे त्याला जन्म येणें व मरण पावणारा आहे तो मरणें, ह्या गोष्टी अवश्य रीतीनें झाल्याच पाहिजेत.–सारांश आचार्य म्हणतात कीं, नाशवंत वस्तूचा नाश झाला किंवा होणार याबद्दल शोक करण्याचें कारण नाहीं.

मधुसूदनीकारः—ह्या श्लोकामध्यें **सौगत, लौकायतिक, तार्किक, मीमांसक** इत्यादि लोकांच्या सिद्धांतांनुसार विचार भगवंतांनीं केला आहे. **' आत्मा ज्ञानस्वरूपः प्रतिक्षणविनाशी '** (आत्मा हा ज्ञानस्वरूपी आहे, पण प्रतिक्षणी त्याचा नाश होतो.)

असें **सौगत** म्हणतात. यांच्या मतें आत्मा क्षणैकजीवी आहे. '**देह एवाऽऽत्मा, स्थिरोऽप्यनुक्षणपरिणामी, जायते नश्यति प्रत्यक्षश्च** (देह हाच आत्मा आहे. तो स्थिर आहे ह्मणजे प्रतिक्षणीं त्याचा नाश होत नाहीं, तरी प्रत्येकक्षणीं, क्षणोक्षणीं, त्याच्यावर बाहेरचे संस्कार होत असतात व म्हणून त्याचें स्वरूप प्रतिक्षणीं बदलत असतें, व पुन: तो प्रत्यक्ष असतो. असें **लौकायतिक** म्हणतात. '**देहातिरिक्तोऽपि देहेन सहैव जायते नश्यति च** (देहाहून आत्मा भिन्न आहे, तथापि तो देहाबरोबरच जन्मास येतो व देहाबरोबरच मरतो) असे इतर वादी म्हणतात. '**सर्गकाले जायत आकाशवन्नश्यति प्रलयकाले च नित्य एवाऽऽत्मा जायते म्रियते च**' (जगाच्या उत्पत्तिकालीं आकाशाप्रमाणेंच आत्मा जन्म पावतो व प्रलयकालीं त्याचा लय होतो. आत्मा नित्य आहे पण तो जन्म पावतो व मरतो.) असे **तार्किक** व इतर लोक म्हणतात. ह्या मतांचा अभिप्राय लक्षांत आणून भगवंतांनीं हा श्लोक ह्मटला आणि ' तुला जर स्थूल स्वभावामुळें ही सूक्ष्म वस्तु (अव्यक्त, अचिंत्य, अविकारी आत्मा) कळत नसेल, तर निदान वर जीं मतें सांगितलीं किंवा पुढें केव्हां प्रगट होतील त्यांचा अभिप्राय ध्यानांत ठेऊन रहा. ह्या मतांचें अनुकरण केलेंस तरी तुला शोक करण्याचें कारण नाहीं. जी वस्तु स्वभावत: नाहींशीं होणार त्याचा शोक करणें उचित नाहीं. **श्रीधरस्वामी** व **प्रपाकार** म्हणतात:—पुण्य पापाच्या संस्कारांनीं आत्म्यास जन्म मृत्यु देहाबरोबरच येतात असें मानलेंस तरीही शोकाचें कारण नाहीं. **रामानुजाचार्य** ही ' विकार होणें हा ज्याचा धर्म अशा देहाला उत्पत्ति आणि विनाश हे होणारच. मग रडण्याचें कारण काय ? ' असें विचारतात.

शंकरानंद म्हणतात कीं ' येथपर्यंत आत्मयाथात्म्यज्ञान सांगितलें, परंतु अर्जुनाच्या मनांत आत्मप्रसादाचा उदय झाला नाहीं असें पाहून भगवंतांनीं त्याचें समाधान करण्यास्तव ही दिशा घेतली. व ' नार्हा वयं हन्तुम् ' असें अर्जुनानें ह्मटलें आहे तें कां असें या श्लोकांत त्याला विचारलें आहे.

वल्लभाचार्यः—' ज्ञानशून्य लोकांचा सिद्धांत घेतला तरी शोक करण्याचें कारण नाहीं. '

प्रो० द्विवेदीः—महाबाहो ! आजानुबाहु अर्जुना ! असें म्हणून भगवंतांनीं अर्जुनाचा उपहास किंवा उपरोध केला आहे असें ह्मणतात. व जोंपर्यंत कर्म संपलें नाहीं तोंपर्यंत जन्ममरणाचा विचार अद्वैतमतासही करावा लागतो असें प्रतिपादन करितात. '**यन्मन्यसे ध्रुवं लोकमध्रुवं वा न चोभयम् । सर्वथा न हि शोच्यास्ते स्नेहादन्यत्र मोहजात्** ' भागवत. (हा लोक कायमचा आहे, अगर क्षणिक आहे अथवा क्षणिक नसून कायमचा नाहीं, असें कांहीं मानलेंस तरी गेलेल्याचा शोक करणें योग्य नाहीं. शोक होतो तो केवळ मायेनें उत्पन्न झालेल्या मोहापासून होतो.)

ज्ञानेश्वराचें व्याख्यान फार चांगलें आहे. गुरुमुखानें समजून मात्र घेतलें पाहिजे. विस्तारभयास्तव मात्र या व्याख्यानावर मी भाष्य करित नाहीं ! जे आदि, स्थिति, अंत । हा निरंतर असे नित्य । जैसा प्रवाह अनुस्यूत (अखंड) । गंगाजळाचा ॥ तें आदि (उत्पत्ति) नाहीं खंडलें । समुद्रीं तरी असे मिनलें (मिळालें) । आणि जातांचि (जात असतांना, वाहत्या प्रवाहांत) मध्यें उरलें । दिसे जैसें ॥ इयें (हीं) तिन्ही तयापरी । सरसींच (सारखींच) सदा अवधारीं । भूतांसि कवणी अवसरीं (समयीं) । ठाकतीना (मिळतीना) ॥ ह्मणोनि हें आघवें । एथ तुज नलगे शोचावें । जे स्थितीच (हा सृष्टिक्रम) हें स्वभावें । अनादि ऐशी ॥ २६ ॥

तथा च सति—

असें असेल तर किंवा तूं ह्मणतोस तसें गृहीत धरिलें आहे ह्मणून—

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ॥
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥

प० अ० अर्थ—

हि (कारण) **जातस्य** (जन्मास येणाऱ्या) **मृत्युः** (मरण) **ध्रुवः** (निश्चयानें-येतोच.) **मृतस्य च** (आणि मेललेल्याला) **जन्म**

(जन्म) ध्रुवं (अवश्यच-प्राप्त होतें.) तस्मात् (ह्मणून) अपरिहार्ये (न टाळतां येणाऱ्या, स्वभावतःच होणाऱ्या) अर्थे (गोष्टीसाठीं—स्वाभाविकच होणाऱ्या परिणामाला) त्वं (तूं) शोचितुम् (शोक करण्यास) न अर्हसि (योग्य नाहींस.) तात्पर्य जन्मापाठीमागें मृत्यु आणि मृत्यूपाठीमागें जन्म हें चक्र सतत सुरू आहे. यापासून कोणीही—कर्ममार्गी—सुटला नाहीं.—आत्मा जन्मतो असें मानलेंस कीं तो मरतो असें तुला मानलेंच पाहिजे; ह्मणून आवश्यक रीतीनें होणाऱ्या ह्या गोष्टींबद्दल शोक करण्याचें कारण दिसत नाहीं.—अज्ञानी मनुष्याचें समाधान करण्यासाठीं हा श्लोक आहे.—

जातस्येति । जातस्य हि लब्धजन्मनो ध्रुवोऽव्यभिचारी मृत्युर्मरणं ध्रुवं जन्म मृतस्य च, तस्मादपरिहार्योऽयं जन्ममरणलक्षणोऽर्थस्तस्मिन्नपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥

ज्याचा ह्मणून जन्म झाला त्याला मृत्यु येणार हा सिद्धांत कधींही बाधित होत नाहीं. त्याचप्रमाणें मेला तो पुनः जन्माला यावयाचा ह्याही सिद्धांताला कधीं खंड पडत नाहीं. ह्मणून जन्ममरण प्राप्त करून घेणारी गोष्ट पुनः मरणजन्माप्रत पावणार हें अपरिहार्य आहे,—हें ब्रह्मदेवासही चुकावयाचें नाहीं—मग तुला शोक करण्याचें प्रयोजन काय ?

मधुसूदन, श्रीधर, द्विवेदीः—'प्रारब्ध कर्माचा क्षय झाला ह्मणजे मृत्यु येतो आणि त्या देहामध्यें असतांना केलेल्या कर्मामुळें पुनः जन्म प्राप्त होतो' असा शास्त्रनियम सांगतात. **मधुसूदनीकारः**—अध्याय ११ श्लोक ३२ मध्यें 'तुझ्याशिवाय कोणीच जिवंत राहणार नाहीं' या श्लोकान्वयें स्वतःच्या कर्मानें ते आधींच मेले आहेत, तुला शोक करण्याचें कारण नाहीं, असें प्रतिपादन करितात. व धर्म्ययुद्धामध्यें हिंसा झाली तरी पाप लागत नाहीं यास शास्त्राधार देतात.

शंकरानंदः—जन्ममृत्यूला दिवस आणि रात्रीची उपमा देतात. उपमा सरस आहे. ज्ञानेश्वर रहाटगाडग्याची उपमा देतात.

रामानुजः—' द्रव्याला उत्पत्तिविनाश असतात हें सिद्ध करून शून्यवाद्यांचें खंडन करितात. ॥ २७ ॥

कार्यकरणसंघातात्मकान्यपि भूतान्युद्दिश्य शोको न युक्तः कर्तुं, यतः—

कार्य आणि कारण यांच्या व्यापाराला वश असणारीं जीं शरीरादिक भूतें त्यांचा विचार केला असतांही शोक करण्याचें कारण दिसत नाहीं; कारणः—

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥२८॥

भारत (हे अर्जुना !) **भूतानि** (आत्मा नाहींत अशीं सर्व दृश्य द्रव्यें) **अव्यक्तादीनि** (अव्यक्त, अदृश्य, वस्तू आहे ज्यांच्या प्रारंभीं अशीं–आहेत.) **व्यक्तमध्यानि** (व्यक्त–दृश्य–आहे मध्य स्थितींत ज्यांच्या अशीं–आहेत.)–आणि–**अव्यक्तनिधनानि एव** (अदृश्यच आहे ज्यांच्या शेवटीं अशीं–आहेत.) **तत्र** (तेथें) **परिदेवना** (शोक) **का** (कसला ?)–तात्पर्य हें आहे कीं, दृश्यस्वरूपानें–नामरूपमात्र–असणारीं हीं सर्व देहादिक द्रव्यें अदृष्ट अशा मायाविशिष्टब्रह्मापासून उत्पन्न झालीं आहेत, पुनः तीं सर्व त्याच ब्रह्मामध्यें लय पावणार, कांहीं काळपर्यंत मात्र तीं दृश्य आणि म्हणून स्पष्टरूपानें भासतात; अशी जर वस्तुस्थिति आहे तर शोक करण्याचें कारण काय. तूं कां रडतोस ? जेथून आलें तेथेंच गेलें, तर रडण्याचें कारण नाहीं हें तुला समजावें.—

शां० भा०—

अव्यक्तादीन्यव्यक्तमदर्शनमनुपलब्धिरादिर्येषां भूतानां पुत्रमित्रादिकार्यकारणसंघातात्मकानां तान्यव्यक्तादीनि भूतानि प्रागुत्पत्तेः । उत्पन्नानि च प्राङ्मरणाद्व्यक्तमध्यानि । अव्यक्तनिधनान्येव पुनरव्यक्तमदर्शनं निधनं मरणं येषां तान्यव्यक्तनिधनानि । मरणादूर्ध्वमप्यव्यक्ततामेव प्रतिपद्यन्त इत्यर्थः । तथा चोक्तम्—

" अदर्शनादापतितः पुनश्चादर्शनं गतः ।
नासौ तव न तस्य त्वं वृथा का परिदेवना।" इति ।

तत्र का परिदेवना को वा प्रलापोऽदृष्टदृष्टप्रनष्टभ्रान्तिभूतेषु भूतेष्वित्यर्थः ॥ २८ ॥

भा० अ०—

ज्यांच्या प्रारंभीं—ज्यांच्या जन्म होण्याच्या अगोदर—अव्यक्त, अदर्शन किंवा अप्रत्यक्षता आहे,—ह्मणजे जन्माच्या अगोदर, जीं अस्पष्ट स्थितींत असल्यामुळें स्वरूपवंत नसतात व म्हणून प्रत्यक्ष होत नाहींत—अशीं कार्यकारणांच्या संघातानें स्वरूपास पावणारीं पुत्रमित्र कलत्रादि शरीरें जन्माच्या पूर्वीं अस्पष्ट असतात. हीं शरीरें उत्पन्न झाल्यापासून तों मरणकालपर्यंत मात्र स्पष्टरीतीनें दिसतात. आणि पुन: अव्यक्त किंवा अस्पष्टता हाच शेवट ह्मणजे मरण ज्यांचें अशीं हीं शरीरें होत. सारांश मरणानंतर तीं पुनः अव्यक्त स्थितींतच जातात. ह्मटलें आहे " ज्याचें स्वरूप दिसत नाहीं त्या अदृश्यापासून आला आणि पुन: अदृश्य स्थितीला गेला. ह्मणून तो तुझा कोणी नव्हे आणि तूंही त्याचा नव्हेस. मग तो गेला म्हणून रडतोस कां?' सारांश दिसत नाहीं, समजत नाहीं अशा स्थितींतून येणारीं, कांहीं दिवस दिसणारीं आणि पुन: अदृश्य होणारीं जीं हीं शरीरें आहेत यांच्यासाठीं तूं कां रडत बसला आहेस !—आचार्यांचें ह्मणणें थोडक्यांत असें आहे ! हीं शरीरें कोठून येतात हें ठाऊक नाहीं, शेवटीं जातात कोठें हेंही माहित नाहीं, मध्यें मात्र थोडा वेळ असतात, तेव्हां असल्या क्षणभंगुर शरीरांसाठीं शोक करण्याचें कारण नाहीं.

मधु०—सर्वव्यापी असणारें जें आकाश त्याचाही अंत होतो, मग इतर कार्यांची काय कथा ! ' ज्याचें होतें त्यानें नेलें । इथें कोणाचें काय गेलें ! ' ॥ याप्रमाणें अव्यक्तानें दिलेलें अव्यक्तानें परत नेलें यांत शोक करण्याचें काय कारण आहे !

" Death is the debt we owe to nature " (मरणें ह्मणजे सृष्टीचें जें आपण देणें लागत होतों, तें परत करणें होय ') हें इंग्रजी वाक्य तरी हाच अर्थ प्रगट करितें. 'स्वप्नांत मिळालेल्या द्रव्य-

नाशाचा शोक करित नाहीं, त्याचप्रमाणें या थोरल्या स्वप्नांत (जिवंत असतांना) मिळालेली वस्तु नाहींशी झाली ह्मणूनही शोक करूं नये असें श्रीधरस्वामी व **शंकरानंद** ह्मणतात. **'यथा स्वप्नप्रपञ्चोऽयं मयि मायाविजृंभितः। तथा जाग्रत्प्रपञ्चोऽयं मयि मायाविजृंभितः'**। याचाही तोच अर्थ आहे. ह्मणून शंकरानंद ह्मणतात कीं खोट्या गोष्टीसाठीं संताप करून घेणें योग्य नाहीं. अव्यक्त ह्मणजे नामरूप ज्याला नाहीं तें.

शंकरानंद स्वामींनीं या श्लोकाचा दुसरा अर्थ केला आहे. अव्यक्त ह्मणजे ब्रह्म; कारण कोणत्याही प्रमाणानें तें व्यक्त होत नाहीं. तें ब्रह्म न समजल्यामुळें ज्यांचा जन्म होतो तीं भूतें (शरीरें) होत. व्यक्त ह्मणजे अंतःकरण आहे मध्य स्थितींत ज्यांच्या अशीं तीं शरीरें आहेत. अंतःकरणाला जोंपर्यंत ब्रह्मज्ञान झालें नाहीं तोंपर्यंतच जातिभेद लिंगभेद, माझें, तुझें हे भेद असतात. **'मनोवृत्तिमयं द्वैतमद्वैतं परमार्थतः'** (मूळचें अद्वैतच. मनानें मात्र द्वैत उत्पन्न केलें आहे.) तें मन स्वस्वरूपीं लागलें ह्मणजे ब्रह्ममयच होतें. मग सर्वकाळ ब्रह्मच. या वेळीं कसला शोक ?

प्रो० **द्विवेदी** यांनीं–**'आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा'** जें आदिकालीं नव्हतें व अंतकालींही असणार नाहीं, तें वर्तमानकालींसुद्धां नसल्याप्रमाणेंच आहे. सारांश ज्याला जन्ममृत्यू आहे तें असत्य आहे.' हें **गौडपादाचार्यांचें** वाक्य उद्धृत केलें आहे. याच अर्थाचा पंचदशींतीलही एक श्लोक ते देतात.

ज्ञानेश्वरींतील दृष्टांत मात्र घेतों:–येर (दुसरें) मध्यें जें प्रतिमासे। तें निद्रिता स्वप्न जैसें। तैसा आकार हा मायावशें। सत्स्वरूपीं॥ नातरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे (भासे) तरंगाकार (लाटारूप)। कां परापेक्ष (दुसऱ्याच्या जीवावर होणारे) अलंकार। व्यक्ती कनकीं॥ तैसें सकळ हें मूर्त। जाण पा माया करीत। जैसें आकाशीं बिंवत। अभ्रपटळ॥ तैसें आदींचि जें नाहीं। तयासाठीं तूं रुदसी कायी ? । तूं अवीट (न विटणारें ब्रह्म) तें पाही। चैतन्य एक॥

पंडितांनीं या श्लोकावर बहार केली आहे ! एक दोन ओंव्याच घेतों. मूळ पहावें:—

आपुला अर्थ जातां मना । शोक वाटों, ये अर्जुना ! । परावा ने आपुल्या धना । धनंजया! कां शोक त्याचा ? ॥....अरे हीं सकल भूतें । पंचभूतांश निश्चितें । तीं अहंकाराचीं, त्यांतें । उत्पन्न करी महत्तत्त्व ॥ त्या महत्तत्त्वाची उत्पत्ति । ज्यापासूनि ते मूळप्रकृति । तें अव्यक्त, कीं नसे व्यक्ती । मूळ प्रकृतीला ॥....एवं अव्यक्तीं सकल लय । मरण नव्हे तो तों प्रलय । मरणार तों पंचभूतीं भूतलय। होतां, काय जाय आपुलें ? ॥...देखोनि धन आरसींचें (आरशांतील) । झुरे, आणि निजधन साचें । जें प्रकाशक मानसाचें । तें न पाहे ! ॥.... ! जें धन सोडितां सुटेना । जें निज धन तोडितां तुटेना । जें निजधन फोडितां फुटेना । अरे ! अनुभवाचें तें धन॥२८॥

दुर्विज्ञेयोऽयं प्रकृत आत्मा किं त्वामेवैकमुपालभे साधारणे भ्रान्तिनिमित्ते । कथं दुर्विज्ञेयोऽयमात्मेति । आह—

अरे! हा वादविषयक आत्मा समजायला अत्यंत कठिण आहे. सर्वांसच हा विषय भ्रांति उत्पन्न करणारा आहे, त्यांत तुला एकट्यालाच काय दोष देऊं ?

अर्जुन—कशावरून ? हा कसा समजावयाला कठिण आहे ?

कृष्ण—सांगतों ऐक.

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन-
माश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ॥
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥

प० अ० अ०—

कश्चित् (कोणीएक) एनं (ह्या आत्म्याला) आश्चर्यवत् (आश्चर्य आहे ज्यामध्यें असें) पश्यति (पाहतो) तथैव (त्याचप्रमाणें) अन्यः (दुसरा कोणी) आश्चर्यवद्वदति (मोठी आश्च-

यकारकं-ही वस्तु आहे असें-बोलतो) अन्यः (तिसरा) एनं (ह्या आत्म्याला) आश्चर्यवत् (मोठी आश्चर्याची गोष्ट आहे असें) शृणोति (ऐकतो) च (आणखी) श्रुत्वाऽपि (ऐकून सुद्धां) कश्चित् एव (कोणीही) एनं (ह्या आत्म्याला) न वेद (जाणलें नाहीं). तात्पर्य असें आहे कीं, आत्मा ही आश्चर्यकारक गोष्ट म्हणून पाहतात, बोलतात; ऐकतात, पण इतकें सर्व करूनही तो कोणासच समजला नाहीं !

शां० भा०-

आश्चर्यवदिति । आश्चर्यवदाश्चर्यमदृष्टमद्भुतमकस्माद्दृश्यमानं तेन तुल्यमाश्चर्यवदाश्चर्यमिवैवमात्मानं पश्यति कश्चित् । आश्चर्यवदेनं वदति तथैव चान्यः । आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति । श्रुत्वा दृष्ट्वोक्त्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित् । अथ वा योऽयमात्मानं पश्यति स आश्चर्यतुल्यो यो वदति यश्च शृणोति सोऽनेकसहस्रेषु कश्चिदेव भवति अतो दुर्बोध आत्मेत्यभिप्रायः ॥ २९ ॥

भा० अ०—

आश्चर्य म्हणजे तें होय कीं जें आपण कधींही पाहिलेलें नसतें किंवा अपूर्व असतें किंवा अकस्मात् आपल्या दृष्टीस पडतें.—सारांश सामान्य व्यवहारांत ज्याचा प्रत्यय येत नाहीं, तें आश्चर्यकारी होय. त्या आश्चर्यकारक गोष्टीसारखें असतें तें आश्चर्यवत् होय. ह्याप्रमाणें आत्मा ही आश्चर्यकारक गोष्ट आहे असें कोणास दिसतें. तसेंच दुसरा कोणी 'आत्मा ही आश्चर्यकारक गोष्ट आहे' असें सांगत असतो. तिसरा 'काय हें आश्चर्य !' असें म्हणून आत्म्याचें वर्णन ऐकत असतो. पण ऐकून, पाहून, बोलून देखील तो आत्मा कोणास समजत नाहीं !—हें केवढें आश्चर्य!—सारांश आत्मा ही न दिसणारी वस्तु आहे असें समजून प्रेक्षक तिच्याकडे आश्चर्यानें पाहत असतो, वाचेला अगोचर आहे असें ह्मणून आत्म्याचें आश्चर्यकारी वर्णन दुसरा देत असतो! ज्याच्या सत्तेनें ऐकण्यास येतें पण जो ऐकायला येत नाहीं असें आत्म्याचें स्व-

रूप समजून त्याचें आश्चर्यकारक स्वरूप तिसराच एक ऐकत असतो! पण जो अरूप, जेथून वाणी परत फिरते, जो ऐकावयाला येत नाहीं, तो इंद्रियांनीं पाहणाऱ्या, ऐकणाऱ्या व बोलणाऱ्या लोकांस —तो गोचर होत नाहीं यांत काय आश्चर्य आहे! अथवा शहाणे लोक आत्म्याला डोळ्यांनीं पहावयाला जातात हें केवढें आश्चर्य आहे!—आचार्य ह्मणतात:—अथवा ज्या पुरुषाला वर सांगितलेला आत्मा स्वानुभवानें पहावयास, ऐकावयास व बोलावयास सांपडला तो मूर्तिमंत आश्चर्य होय. कारण शेंकडों हजारांमध्यें असला स्वानुभवी पुरुष एखादा सांपडला तर भाग्यच होय! सारांश आत्मज्ञान होणें व आत्मानुभव येणें फार दुर्लभ आहे असा अभिप्राय आहे.—भगवान् ७ व्या अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकांत हाच अभिप्राय: पुन: दृढ करितील.

मधु०—आश्चर्यवत् याचा कर्त्याकडे, कर्माकडे आणि क्रियेकडे संबंध लाविला असतां तीन अर्थ होतात. पहिला अर्थ आचार्यांच्या दुसऱ्या अर्थाप्रमाणेंच आहे. मात्र आत्मज्ञ पुरुष व्यवहारामध्यें अज्ञ माणसासारखेंच कर्म करितो हेंही आश्चर्यच आहे असा अर्थ जास्त निघतो. (२) दुसरा अर्थ आचार्यांच्या पहिल्या अर्थासारखा आहे. आश्चर्य यासाठीं कीं आत्मा दिसत नसतांनाही 'असतो' असें ज्ञानी लोक ह्मणतात. (३) अव्यक्त असून व्यक्तास (पदार्थांस) प्रकाशित करणें, मायेपासून जन्म घेऊन मायेचा नाश करणें व निवळीप्रमाणें आपला नाश करणें ही आत्मज्ञानाची आश्चर्यकारक करणी आहे.

रामा०—मोठी तपश्चर्या केल्यामुळें ज्यांचीं पापें नष्ट झालीं व पुण्यसंचय झाला त्यांस आत्मावलोकनाचें सामर्थ्य येतें. कर्मक्षय केल्याशिवाय आत्मानुभव येणार नाहीं असें ह्मणणाऱ्या सिद्धांतवाद्यांस रामानुजाचार्यांचें वरील ह्मणणें अयुक्त वाटेल.

मध्व०—हा श्लोक ईश्वरपर लावितात. सत्यानंदस्वामी तर ईश्वर व जीव अगर बिंबप्रतिबिंबाकडे लावितात. ईश्वर बिंब आणि जीव हें प्रतिबिंब होय.

शंकरा०—एनं=आत्मानं=कूटस्थासंगचिद्रूपं, अद्वयं, अखंडा-

नंदैकरसं. 'आत्मा हा पदार्थांच्या अंतर्यामीं राहणारा, असंग, अद्वितीय, सर्वदा शुद्धानंदी असा आहे म्हणून आश्चर्य !

प्रो० चांदोरकर व प्रो० द्विवेदीः—कठोपनिषदांतील एक मंत्र ह्या श्लोकाचे समर्थनार्थ घेतात. "**श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः । शृण्वन्तोऽपि बहवो यं न विद्युः । आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धा । आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः** " 'जो अनेक लोकांस ऐकावयासही येत नाहीं, ऐकणारे अनेक लोकांपैकीं पुष्कळांस जो समजला नाहीं, त्या आत्म्याचें वर्णन करणारा अपूर्वच, अद्भुत गोष्टीप्रमाणें दुर्मीळच होय. तो आत्मा ज्याला सांपडला असा निपुण पुरुष क्वचितच आढळतो. कुशल आचार्यापासून वेदांतांचें अध्ययन केलेला असा अनुभवी पुरुष एखादाच आढळतो. ह्मणून आश्चर्य !' वादविषयक श्लोक आणि वरील मंत्र हे समानार्थकच नाहींत असें कोण ह्मणेल ? सारांश आत्मज्ञान हें सर्वत्र आश्चर्यकारकच आहे, आणि ज्यांचें कर्म आटपलें आहे, तेच लोक ब्रह्मज्ञानास अधिकारी आहेत.

ज्ञानेश्वरांनीं प्रतिपादन केलें आहे कीं ज्यानें आत्मा पाहिला, किंवा ऐकला, किंवा जे आत्मभजनीं लागले ते पुनः संसाराकडे परत येत नाहींत. कारण आत्मस्वरूप इतकें मनोहरच आहे. शेवटीं ह्मणतातः—जैसे सरिता ओघ समस्त । समुद्रामाजीं मिळत । परी माघौते (माघारे) न समात (न मावतां) । परतले नाहीं ॥ तैसिया योगीश्वरांच्या मती । मिळणीसवें (मिळाल्याबरोबर) एकवटती । परी जे विचारूनि पुनरावृत्ति । भजतीच ना (पावतच नाहींत.)—

वामनपंडितांनीं विवेचनाची दिशा निराळीच घेतली आहे. त्यांची एक ओंवी मासल्यासाठीं घेतों. पंडितांचें विवेचन मनन करण्यास योग्य आहे.—अनादि ज्याचा स्नेह । त्यास ह्मणत होता देह । तो सर्वदा असे विदेह ! । आश्चर्य हें ! ॥ एक देहच आपण । मानी धरूनि मीपण ! । त्यास सर्वत्र देखे ! निपुण । आश्चर्य हें— ॥ २९ ॥

अथेदानीं प्रकरणार्थमुपसंहरन्ब्रूते—

असो; यानंतर प्रस्तुतच्या प्रकरणाचा उपसंहार करून ह्मणतात.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ॥
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि॥३०॥

प० अ० अ०—

भारत (भरतकुलोत्पन्ना अर्जुना !) **सर्वस्य** (सर्वांच्या) **देहे** (शरीरामध्यें) **देही** (देह धारण करणारा, देहांतर्यामी असणारा) **नित्यं** (नेहमीं) **अयं** (हा आत्मा) **अवध्यः** (न मारण्यासारखा, न मरणारा)—आहे. **तस्मात्** (ह्मणून) **सर्वाणि** (सर्व) **भूतानि** (चराचर मात्रासंबंधें) **त्वं** (तूं) **शोचितुं** (शोक करण्यास) **न अर्हसि** (योग्य नाहींस.)—सारांश सर्व चराचर पदार्थांमध्यें राहून कधींही न मरणारा असा हा आत्मा आहे. ह्मणून प्रत्येक पदार्थ नष्ट होण्याचे वेळीं शोक करणें तुला उचित नाहीं. सर्व विश्वभर स्वस्वरूपाच्या स्थितीमध्यें राहून अनादि व अनंत असा आत्मा आहे; तेव्हां आत्म्याविषयीं कोणत्याही प्रकारचा शोक—कितीही प्राणी आले गेले तरी—करणें शक्य नाहीं व ह्मणून योग्यही नाहीं.

शां. भा.—*

सर्वस्य प्राणिजातस्य देहे वध्यमानेऽप्ययं देही न वध्यो यस्मात्तस्माद्भीष्मादीनि सर्वाणि भूतान्युद्दिश्य न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

---

* खालील मजकूर आनंदाश्रमांतील 'श्रीमद्भगवद्गीतेचे' पुस्तकांत वर घेतला नाहीं. परंतु इतर प्रतींत आढळतो, सबब तो खालीं घेतला आहे.

" देही शरीरी नित्यं सर्वदा सर्वास्ववस्थास्ववध्यो निरवयवत्वान्नित्यत्वाच्च। तत्रावध्योऽयं देहे शरीरे सर्वस्य सर्वगतत्वात्स्थावरादिषु स्थितोऽपि "

भा० अ०—

देहधारण करणारा हा आत्मा स्वतः नित्य आणि निरवयव असल्यामुळें कोणत्याही अवस्थेमध्यें याचा नाश होत नाहीं. असा हा सर्वव्यापी आणि ह्मणून सर्व चराचर पदार्थांच्या अंतर्यामीं राहणारा सुद्धां आत्मा.—

भा० अ०—

सर्व प्राणीमात्रांचे देह नष्ट झाले तरी आपण स्वतः नष्ट होत नाहीं. ह्मणून भीष्मादि सर्व प्राण्यांच्या संबंधानें शोक करणें तुला योग्य नाहीं. कारण सर्व प्राणी मेले तरी आत्मा कायमच राहणार आहे.—

मधुसू०—देही ह्मणजे लिंगदेहाचा उपाधि ज्याला आहे असा आत्मा ! स्थूल देह मरणारच, तेव्हां जी गोष्ट अवश्य होणार तिचा शोक करणें उचित नाहीं; आणि लिंगदेह तर आत्म्याप्रमाणेंच अवध्य आहे. ह्मणून लिंगदेहाविषयींही शोक करणें योग्य नाहीं. सारांश स्थूलदेह, लिंगदेह अगर आत्मा या कोणाविषयींच शोक करणें योग्य नाहीं ! मधुसूदनीकारांनीं हें लिंगदेहाचें प्रकरण कां उपस्थित केलें आहे हें समजत नाहीं !

रामानु०—देवांपासून तों स्थावरापर्यंत जीं कांहीं चराचर द्रव्यें आहेत तीं आकारवैषम्यानें भिन्न वाटतात, तथापि मागें द्रव्यांचे जे स्वभाव सांगितले आहेत त्यांवरून तीं सर्व समान असून नित्य आहेत. वैषम्य अनित्य आहे. मग वैषम्याविषयीं शोक कां !

सत्या०—'ईश्वरच सर्वत्र भरला आहे, तेव्हां शोक कां करितोस?'

शंकरानं०—' आपलें जसें प्रारब्ध असेल, ज्या कर्माच्या योगानें आपल्यास शरीर मिळालें असेल, त्या कर्मावर जगणें अगर मरणें हें अवलंबून असल्यामुळें या शरीराविषयीं आपण हर्षशोक वगैरे कां करावे ! ' ' पुनः जर आपल्यास जन्म नको असेल तर शरीरपोषणासाठीं सुद्धां आपल्यास कर्म करितां उपयोगी नाहीं. '! कर्मांपैकीं कांहीं भाग प्रारब्धाच्या वांट्यास जातो त्या योगानें जन्म प्राप्त होतो असें आमच्या लोकांचें ह्मणणें आहे. या ह्मणण्याचा विचार कर्मयोगांतच करूं.

प्रपाकार—'**सर्वे प्राणाः सर्वे लोकाः सर्वे देवाः सर्वाणि भूतानि सर्व एतदात्मनो व्युच्चरन्ति** ' (बृहदारण्यकोपनिषत्). सर्व प्राण, सर्व लोक, सर्व देव, सर्व भूतें, सारांश यच्चयावत् सर्व भूतें ह्या एका आत्म्यापासून उत्पन्न होतात.-व आत्म्यांतच लय पावतात.—

तेव्हां शोकाचें कारण नाहीं.–ज्ञानेश्वरांचें असेंच ह्मणणें आहे. वामनपंडित उपसंहार करितात. एवं मिथ्या भूतगणें । मिथ्या मारणें, मिथ्या मरणें । ह्मणोनि शोका न करणें । पाहणें आत्मा पूर्वोक्त ॥ पंडित पुढील श्लोकाचें अवतरण कसें करितात पहा:—संदेह (अर्जुनाचा संशय) गेला सकळ । परी कृपा उरली पुष्कळ । या कारणें मेघनीळ । उपदेशितो हा श्लोक ॥ ३० ॥

इह परमार्थतत्त्वापेक्षायां शोको मोहो वा न संभवती-त्युक्तं, न केवलं परमार्थतत्त्वापेक्षायामेव किंतु—

—याप्रमाणें—आतांपर्यंत परमार्थतत्त्वानुसंधानानें विचार केला असतां शोक किंवा मोह संभवत नाहीं, उत्पन्न होऊं शकत नाहीं असें सांगितलें. शोकमोह हे, परमार्थतत्त्वें समजलीं ह्मणजेच संभवत नाहींत असें नव्हे तर–

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ॥
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥

प० अ० अ०—

च (आणखी) **स्वधर्मं** (आपला क्षत्रियाचा धर्म) **अपि** (ही) **अवेक्ष्य** (लक्षांत घेऊन–सुद्धां–) **विकम्पितुं** (कंपित होण्यास) **न अर्हसि** (योग्य नाहींस). **हि** (कारण) **धर्म्यात्** (धर्मामध्यें सांगितलेल्या) **युद्धात्** (युद्धावांचून, युद्धाशिवाय, धर्मयुद्धाशिवाय) **क्षत्रियस्य** (शस्त्रधारण करणाऱ्या क्षत्रियाला) **अन्यत्** (दुसरें) **श्रेयः** (कल्याण) **न विद्यते** (नाहीं.) तूं आपला क्षत्रियाचा धर्म पाहिलास तरी, स्वधर्मानुसार विचार केलास तरी, तुला येथें कृपेनें किंवा भीतीनें कांपण्याची जरूरी नाहीं. कारण क्षत्रियाला धर्मयुद्धाशिवाय पुण्यसंपादक असें दुसरें साधनच नाहीं.

शां० भा०—

स्वधर्ममिति । स्वधर्ममपि स्वो धर्मः क्षत्रियस्य युद्धं तमप्यवेक्ष्य त्वं न विकम्पितुं प्रचलितुं नार्हसि, स्वाभाविकाद्धर्मादात्मस्वाभाव्यादित्यभिप्रायः । तच्च युद्धं

पृथ्वीजयद्वारेण धर्मार्थं प्रजारक्षणार्थं चेति धर्मादनपेतं परं धर्म्यं तस्माद्धर्म्याद्युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते हि यस्मात् ॥ ३१ ॥

भा० अ०—

क्षत्रियाचा धर्म युद्ध करण्याचा आहे. तो पाहून तर, तो शास्त्रपूर्वक लक्ष्यांत आणून तर, तुला येथून हालतांच येत नाहीं, अगर घाबरतां येत नाहीं—किंवा युद्ध हें हिंसाजनक आहे असें ह्मणतां येत नाहीं.—हें तुझें स्वाभाविकच कर्तव्यकर्म आहे; कारण तुझा जन्मच क्षत्रियकुलांत झाला आहे. शिवाय हें युद्धही सत्कर्ममूलक आहे. कारण या युद्धानें धर्माचें व प्रजेचें संरक्षण होणार आहे—दुर्योधनादि दुष्टांचा संहार झाला ह्मणजे पृथ्वीवर धर्मराज्य होईल व तेणेंकरून प्रजेचें रक्षणही होईल म्हणून हें युद्ध धर्म्य आहे, धर्मविहित आहे. शिवाय तुला हें माहीतच आहे कीं धर्मविहित युद्धावांचून क्षत्रियाला खरा पुरुषार्थ साध्य होणार नाहीं, नुसता स्वर्ग सुद्धां मिळणार नाहीं—सारांश हल्लींचें युद्ध शास्त्रोक्त असून तेणेंकरून धर्मसंरक्षण व संतानवृद्धि होणार आहे. क्षत्रियाचें हेंच कर्म आहे. ह्मणून शोकमोहांस वश होऊन आपलें कर्तव्यकर्म टाकून देणें हें तुला योग्य नव्हे:—(शांतिपर्व आणि मनुस्मृति अध्याय १२ पहा.)

मधु०—'संसार मिथ्या असूनही उपाधींच्या योगानें खरा भासतो; हा अर्जुनाचा भ्रम नाहींसा करून भगवान् आतां त्याचा विशेषभ्रम ह्मणजे युद्धांत हिंसा होईल, कुलक्षय होईल, पाप लागेल वगैरे—विशेषभ्रम (अध्याय १ श्लोक ४४ वगैरे पहा.) ह्या श्लोकांत शून्यवत् करितात. पराशर ह्मणतात:—

—'क्षत्रियो हि प्रजां रक्षञ्शस्त्रपाणिः प्रदण्डवान्। निर्जित्य परसैन्यानि क्षितिं धर्मेण पालयेत्' मनु—'संग्रामे त्वनिवर्त्यत्वं प्रजानां चैव पालनम्। शुश्रूषा ब्राह्मणानां राज्ञः श्रेयस्करां पराम्' अर्थ सामान्यतः एकच आहे कीं राजानें पळून न येतां शत्रुसैन्याचा पाडाव करावा आणि धर्मपूर्वक गोब्राह्मणांचा प्र-

तिपाल करावा. अध्याय १ श्लोक ३१ मध्यें अर्जुनानें पुरुषार्थ नाहीं असें ह्मटलें त्याचेंही खंडन या श्लोकांत केलें आहे.

प्रो॰ द्विवेदी—येथपर्यंत सांगितलेला प्रज्ञावाद अर्जुनास कळला नसेल ह्मणून चित्तशुद्धीसाठीं कर्म सांगतात. समजला असेल तर देहाचें प्रारब्ध आहे, तोंपर्यंत धर्मकर्म केलें पाहिजे असें म्हणून पुढील कर्म सांगतात.

शंकरानंद—ब्राह्मण चित्तशुद्धीसाठीं यज्ञयाग करितात, तसेंच क्षत्रियांनीं युद्ध करावें.

सरकारनामक एका वंगदेशस्थ विद्वच्छिरोमणीनें ‘ हिंदुलोकांची नीति ’ नामक एक अतिसुंदर पुस्तक लिहिलें आहे, त्यांत म्हटलें आहे ‘ नीतिदृष्टया चांगलें युद्ध कोणतें व वाईट कोणतें याचें तारतम्य भगवंतांनीं ‘ धर्म्य ’ या एका शब्दानेंच केलें आहे.

रामानुज व प्रपाकार.–क्षत्रियानें युद्ध करावें याच्या समर्थनार्थ दोन श्रुति देतात. वरील स्मृतींशी समानार्थक आहेत म्हणून येथें घेतल्या नाहींत.

ज्ञानेश्वर.—अर्जुना ! तुझें चित्त । जरी झालें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥ अगा ! गोक्षीर (गाईचें दूध) जऱ्ही जाहलें । तरी पथ्यासि नाहीं घेतलें । ऐसेनिही विष होय सुदलें (घातलें) । नवज्वरीं देतां ! ॥ तैसें आनीं आन करितां (एकानें दुसरेंच केलें तर) । नाश होईल हिता । ह्मणवूनि तूं आतां । सावध होई. ॥....जैसें मार्गेचि चालतां । अपायो (अपाय) न पवे सर्वथा । कां दीपाधारें वर्ततां । नाडळीजे (अडखळत नाहीं) ॥ तयापरी पार्था । स्वधर्मे राहटतां । सकळकाम पूर्णता । सहज होय ॥ दृष्टांत खासे आहेत कीं नाहींत ?

कुतश्च तद्युद्धं कर्तव्यमिति । उच्यते—

अ॰—हें युद्ध करावें, हें कर्तव्य आहे, असें कशावरून ?

श्रीकृष्ण—सांगतो ऐक.

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ॥
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम्॥३२॥

प० अ० अ०—

पार्थ (अर्जुना !) **ईदृशं** (अशा प्रकारचें) **यदृच्छया उपपन्नं** (आपोआप, आपण कांहींएक न करितां प्राप्त झालेलें, आपण उकरून काढलेलें नव्हे असें,—Defensive—) **च** (आणि) **स्वर्गद्वारं** (स्वर्गलोकांचे दरवाजे) **अपावृतं** (उघडले आहेत असें करणारें—हें—) **युद्धम्** (युद्ध) **सुखिनः** (भाग्यशाली) **क्षत्रियाः** (क्षत्रिय लोकच) **लभन्ते** (मिळवितात).—सारांश, आपण कांहींएक कुरापत न काढितां उत्पन्न झालेलें आणि स्वर्गलोकचे दरवाजे उघडणारें हें असलें युद्ध करायला सांपडणें हें क्षत्रियाचें उत्तम भाग्य होय. भाग्यवंतांसच असलें युद्ध खेळायला सांपडतें !—

शां० भा०—

यदृच्छयेति । यदृच्छया चाप्रार्थितयोपपन्नमागतं स्वर्गद्वारमपावृतमुद्घाटितं ये तदीदृशं युद्धं लभन्ते क्षत्रिया हे पार्थ, किं न सुखिनस्ते ।

भा. अ.

आपण प्रार्थना केल्याशिवाय, आपण बोलावल्याशिवाय, प्राप्त झालेलें आगंतुक युद्ध हें स्वर्गाचीं द्वारें खुलीं करितें. ज्यांना असलें युद्ध सांपडतें ते क्षत्रिय सुखी, भाग्यवंत नव्हेत काय! अर्जुना ! जय मिळाला तर पृथ्वी, मृत्यु आला तर स्वर्ग ! असलें हें युद्ध आहे.

मधु०—कीर्ति, राज्यलाभ, राज्यसुख, स्वर्गसुख इत्यादिकांचें साधन हें युद्ध होय. अ० १ श्लो० ३७ मधील अर्जुनाची शंका येथें निवारण केली; ती अशी कीं, स्वजन हे आततायी, घोरकर्में करणारे आहेत ह्मणून त्यानां मारणें अयोग्य होणार नाहीं आणि युद्ध करणें हा तर क्षत्रियधर्मच होय.

रामानु०—‘ अत्यंत सुखाचें साधन असें हें युद्ध आहे. ’

ज्ञाने०—क्षत्रियें बहुत पुण्य कीजे । तैं झुंज ऐसें लाहिजे । जैसें

मार्गे जातां आडळीजे (आढळावें) चिंतामणीसी ॥ नातरी जांभ-या पसरे मुख । तेथ अवचृटें (एकदम, अवचित) पडे पीयुख (अमृत) । तैसा हा संग्राम देख । पातला असे ॥

वामन—उभय लोक पुरुषार्था । हें युद्ध देणार गा पार्था ! । हें न करितां अनर्था । पावसी ह्मणूनि चौ श्लोकी (पुढें येणारे चार श्लोक)॥३२॥

एवं कर्तव्यता प्राप्तमपि—

याप्रमाणें कर्तव्याच्या पदवीस हें युद्ध आलें असूनही—

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ॥
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि॥३३॥

प० अ० अं०—

अथ चेत् (यानंतर जर, असें असतांही जर) **त्वं** (तूं) **इमं धर्म्यं संग्रामं** (हें धर्मोक्त युद्ध) **न करिष्यसि** (करणार नाहींस) **ततः** (तर, त्यापासून) **स्वधर्मं कीर्तिं च हित्वा** (आपला क्षात्रियधर्म आणि शौर्याबद्दलची कीर्ति हरवून) **पापं** (पाप मात्र) **अवाप्स्यसि** (संपादन करून घेशील). ही लढाई केली नाहींस तर तुझा धर्म नाहींसा होईल, कीर्ति बुडेल, आणि पाप मात्र येऊन पदरांत पडेल !—

शां. भा.—

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं धर्मादनपेतं सङ्ग्रामं युद्धं न करिष्यसि चेत्ततस्तदकरणात्स्वधर्मं कीर्तिं च महादेवादिसमागमनिमित्तां हित्वा केवलं पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

भा. अ.—

आतां जर धर्मविहित आणि प्राप्त झालेलें युद्ध—तूं मोहानें किंवा अज्ञानानें करणार नाहींस तर ह्या तुझ्या औदासीन्यामुळें तूं क्षात्रधर्मापासून पदच्युत होशील व शंकराबरोबर सामना ठोकून तूं त्यांच्यापासून पाशुपतास्त्र मिळविलेंस ती तुझी कीर्ति तुला सोडून जाईल, आणि पापाला मात्र अधिकारी होशील.—कर्तव्य केलें नाहीं तर काय

परिणाम होतो तो सांगण्यासाठीं पुढील चार श्लोकांची योजना आहे.–

मधु०–व प्रपा० अ. १ श्लोक ३१ मध्यें ' मला जय नको ' आह्मांला पाप मात्र लागेल, वगैरे अर्जुनाच्या शंकांचा येथें प्रतिकार केला. ' धर्म्यं '–हिंसा वगैरेंचा दोष लागत नाहीं असें. ' पापम् ' रणांतून पलायन केलें असतां लागणारें पाप. परलोकीं जाण्याच्या आड येतें तें पाप होय. ' राजा सुकृतमादत्ते हतानां विपलायिनाम् '–रणांत मेल्यामुळें मुक्त झालेल्या लोकांचें शिल्लक राहिलेलें पुण्य व पळालेल्या लोकांचें पुण्य राजास मिळतें !)

रामानुज–पापं=नित्याकरणं; नित्यकर्म न करणें ह्मणजे पाप.

शंकरानंद–तूं युद्ध केलें नाहींस तर तुला कर्मसंन्यासाचें पुण्य तर मिळणार नाहींच, पण कर्तव्यकर्म न केल्याचें पाप मात्र लागेल!

सरकार–' अनुष्ठानं निषिद्धस्य त्यागो विहितकर्मणः ' ' शास्त्रानें निषिद्ध केलेल्या गोष्टी करणें आणि शास्त्रविहित गोष्टी न करणें ह्मणजे पाप होय. ' महानिर्वाणतंत्र अ० १४ श्लोक १४।१९.

ज्ञाने०—जैसी भर्तारें हीन वनिता । उपहती (अपमान) पावे सर्वथा । मग तैसी दशा जीविता । स्वधर्में वीण ॥ ना तरी रणीं शव सांडिजे । चौमेरीं तें (चोहोंकडून) गिधीं (गिधाडांनीं) विदारिजे । तैसें स्वधर्महीना अभिभाविजे (त्रास दिला जातो,) । महादोषीं ॥ ३३ ॥

न केवलं स्वधर्मकीर्तिपरित्यागः––

या योगानें स्वतःचा धर्म आणि स्वकीर्ति यांचाच केवळ त्याग होतो असें नाहीं तर—

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

प० अ० अ०––

च (आणि) भूतानि (प्राणीमात्र) ते (तुझी) अव्ययाम (कधींही कमी न होणारी अशी–निरंतर असाही अर्थ होईल.–) अकीर्तिम् (अपकीर्ति) अपि (ही) कथयिष्यन्ति (सांगत ब-

सतील). **च** (शिवाय—आणखी असें ध्यानांत ठेव कीं—) **संभावितस्य** (संभाविताला, शिष्ट पुरुषाला) **अकीर्तिः** (अपकीर्ति, अपमान)—ही—**मरणात्** (मरणापेक्षां) **अतिरिच्यते** (जास्त असते—जास्त दुःख देते)—सारांश तूं स्वधर्मानें चालणार नाहींस तर तुझा लौकिक नष्ट होईल इतकेंच नाहीं,—तर सर्व प्राणीमात्र तुझी अपकीर्ति गात बसतील. आणि हा सामान्य अनुभव आहे कीं अपमान सोसणें हें श्रेष्ठ पुरुषाला मरणापेक्षांही जास्त संतापदायक होतें.—

शां० भा०—

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति ते तवाव्ययां दीर्घकालाम् । धर्मात्मा शूर इत्येवमादिभिर्गुणैः । संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते । संभावितस्य चाकीर्तेर्वरं मरणमित्यर्थः ॥ ३४ ॥

भा० अ०—

सर्व लोक दीर्घकालपर्यंत तुझी ‘ आपला धर्म सोडून परधर्म स्वीकारलास अशी ’ अपकीर्ति सांगत बसतील. ‘ मोठा धर्मशील आहे, शूर आहे ’ अशा गुणांनीं नांवालौकिकास आलेल्या पुरुषाला अपकीर्तिपेक्षां मरण येणें हें जास्त इष्ट असतें.—लढला नाहींस तर तुझी अपकीर्ति होईल आणि ती तुला सहन होणार नाहीं हा भावार्थ होय. ‘ **न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः** ’ ही चारुदत्तोक्ति समानार्थकच होय. ‘ Death before dishonor ’ (अब्रू जाण्यापूर्वीं मरण यावें ’ हें वाक्यही हाच अर्थ प्रकट करितें. अर्जुनाप्रमाणेंच आह्मांला हीं वाक्यें सात्विक बोध करूं शकतील काय ?

वल्लभ—‘ भूत ’ शब्दाच्या नपुंसकलिंगी प्रयोगावरून यःकश्चित् माणसेंसुद्धां तुझी बेअब्रू करतील असें सुचविलें आहे. मधुसूदनीकारांचें व रामानुजांचेंही असेंच मत आहे.

सरकार—येथें केलेला उपदेश स्वार्थमूलक आहे हें खरें, पण तमोगुणाला वश होऊन अज्ञानानें स्तब्ध बसण्यापेक्षां कर्मफलाशेनें तरी कर्तव्य करणें इष्ट आहे, हें सांगण्याचा आशय आहे, असें सुचवितात.

किंच--
आणखी—

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः॥
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५॥

प० अ० अ०—

महारथाः (हजारों वीरांशीं एक एकट्यानें लढणारे महावीर) **त्वां** (तुला) **भयात्** (भय उत्पन्न झाल्यामुळें) **रणात्** (रणभूमींतून) **उपरतं** (तूं परत फिरलास असें) **मंस्यन्ते** (मानतील.) **च** (आणि) **येषां** (ज्या वीरांच्या) **बहुमतो भूत्वा** (आजपर्यंत सन्मानाला पात्र असणारा) **त्वं** (तूं) **लाघवं** (तुच्छतेला) **यास्यसि** (जाशील.) सारांश मोठमोठे वीर ह्मणतील कीं, अर्जुन भ्याला ह्मणून रणभूमीवरून पळून गेला ! आजपर्यंत ज्यांनीं तुला बहुमान दिला, जे तुला चांगला असें ह्मणत आले, त्यांच्याच मतानें तूं यःकश्चित् आहेस असें ठरेल.—

शां० भा०—

भयादिति । भयात्कर्णादिभ्यो रणाद्युद्धादुपरतं निवृत्तं मंस्यन्ते चिन्तयिष्यन्ति न कृपयेति त्वां महारथा दुर्योधनप्रभृतयः । येषां च त्वं दुर्योधनादीनां बहुमतो बहुभिर्गुणैर्युक्त इत्येवं बहुमतो भूत्वा पुनर्यास्यसि लाघवं लघुभावम् ॥ ३५ ॥

भा० अ०—

तुझे दुर्योधनशकुनिप्रभृति पराक्रमी शत्रु असें समजतील कीं, तूं रणांतून परत फिरलास तें तुला आप्तइष्टांचा कळवळा आला ह्मणून नव्हे, तर तूं कर्णादिकांस भ्यालास ह्मणून पळालास ! 'तूं शूर, धीर, पराक्रमी आहेस ' असें जे दुर्योधनादिक व भीष्मद्रोणादिक तुझ्या संबंधानें ह्मणत असत, तेच लोक 'तूं तुच्छ ' ह्मणून तुझी निंदा करूं लागतील; तूं त्यांच्या तिरस्काराला—आतांपासूनच—पात्र होशील.

रामानुज—' लाघवम् ' याचा अर्थ ' लवकर धरण्यास योग्य, नेमळा, असा करितात.

प्रो॰ द्विवेदी—द्रोणादिक तुला 'बायको' समजतील. कर्णदुर्योधनादिक तुझ्या बायलेपणाबद्दलची द्वाही फिरवितील !

किंच—

आणखी पुनः—

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः ॥
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम्॥३६॥

प॰ अ॰ अ॰—

च (आणखी) तव (तुझें) सामर्थ्यम् (सामर्थ्य, युद्धकौशल्य, पराक्रम यांची) निन्दन्तः (निंदा करणारे, मत्सरदृष्टीनें बघणारे) तव (तुझे) अहिताः (शत्रु) बहून् (पुष्कळ) अवाच्यवादान् (बोलूं नये असे शब्द) वदिष्यन्ति (तुझ्या संबंधानें बोलतील.) ततः (त्यापेक्षां) दुःखतरं (जास्त दुःख देणारें) किम् नु (काय आहे बरें !) तुझ्या पराक्रमाविषयीं ज्यांना मत्सर उत्पन्न झाला आहे असे तुझे शत्रु, नाहीं नाहीं त्या बातम्या पिकवितील. यापेक्षां जास्त तापदायक काय आहे ? कांहीं नाहीं. हेंच अत्यंत दुःखदायक आहे.

शां॰ भा॰—

अवाच्यवादानिति । अवाच्यवादानवक्तव्यवादांश्च बहूननेकप्रकारान्वदिष्यन्ति तवाहिताः शत्रवो निन्दन्तः कुत्सयन्तस्तव त्वदीयं सामर्थ्यं निवातकवचादियुद्धनिमित्तम् । तस्मात्ततो निन्दाप्राप्तेर्दुःखाद्दुखतरं नु किम् । ततः कष्टतरं दुःखं नास्तीत्यर्थः ॥

भा. अ.—

निवातकवचादि राक्षसांचा तूं संहार केलास,–शंकरास युद्धामध्यें प्रसन्न केलेंस,–इत्यादि तुझे पराक्रम पाहून खिन्न झालेले मत्सरयुक्त तुझे दुर्योधनकर्ण प्रभृति शत्रु तुझ्या संबंधानें हजारों प्रकारचे कुतर्क

काढून वाटेल तें बहकत सुटतील.--तुझा कांहीं पराक्रम नसतां तुला उगीच्या उगीच कीर्ति मिळाली, बृहन्नटेचें काम करणें हेंच तुझें मूळचें स्वरूप असें बडबडत सुटतील.–असली निंदा झाल्यामुळें उत्पन्न होणारें दुःख–भीष्मादिकांच्या योग्य वधानें होणाऱ्या दुःखापेक्षां–अधिक कष्टतर नाहीं काय ? या अपकीर्तीनें होणाऱ्या दुःखापेक्षां अधिक तापदायक असें दुसरें कोणतें दुःख आहे ? अर्थात् नाहीं हा भावार्थ आहे.–सारांश अर्जुन हा भीष्मादिकांच्या वधानें होणारी निंदा चुकवावयास पहात होता तों त्याच्या गळ्यांत शत्रूंची उग्र आणि अवास्तव निंदा पडेल असें भगवंतांनीं त्यास दाखविलें! दोहींकडे त्यास पाशरज्जु आढळले, अथवा एकीकडे आड व दुसरीकडे विहीर असें झालें. मधुसूदनीकाराचें हें ह्मणणें यथार्थ आहे. जोंपर्यंत अज्ञान आहे, तोंपर्यंत शोक सुटत नाहीं. भगवंतास अर्जुनाला होणाऱ्या दुःखांचीं व शोकांचीं कारणेंच नष्ट करावयाची होतीं. असो, येथें भगवंतांचें वक्तृत्वकौशल्य दिसून येतें. त्यांनीं प्रथम अकीर्ति होईल म्हणून सांगितलें, नंतर अनादर होईल ह्मणून सांगितलें आणि शेवटीं तुझ्या तोंडावर तुझी निंदा होईल ह्मणून सांगितलें. एकापेक्षां एक वरचढ असे हेतु येथें आणले आहेत. याप्रमाणें, युद्ध न केलें असतां उत्पन्न होणारी दुःखपरंपरा व श्लोकचतुष्टयी आटपली.–॥ ३६ ॥

युद्धे पुनः क्रियमाणे कर्णादिभिः–

पुनः कर्णादिकांशीं युद्ध करीत असतां त्यांच्याकडून–

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

पदा० अ० अ०—

हतः वा (जर मेलास तर) **स्वर्गम्** (स्वर्गाप्रत) **प्राप्स्यसि** (प्राप्त करून घेशील, स्वर्गाला जाशील) **जित्वा वा** (तुला जय मिळाला तर) **महीम्** (पृथ्वी) **भोक्ष्यसे** (भोगशील, राज्यसुख भोगशील.) **तस्मात्** (म्हणून) **कौन्तेय** (हे कुन्तीपुत्रा अर्जुना !) **युद्धाय** (युद्धासाठीं) **कृतनिश्चयः** (केला आहे निश्चय ज्यानें

असा) **उत्तिष्ठ** (ऊठ. तयार हो.) सारांश युद्धांत मेलास तर स्वर्गलोक मिळविशील, आणि, जय मिळविलास तर पृथ्वीचें राज्यसुख भोगशील,–दोन्हीपक्षीं सुखच आहे. म्हणून युद्ध करावयाचें असा मनाचा निश्चय करून एकदम ऊठ.

शां. भा.—

हतो वेति । हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं हतः सन्स्वर्गं प्राप्स्यसि जित्वा वा कर्णादीञ्शूरान्भोक्ष्यसे महीम् । उभयथाऽपि तव लाभ एवेत्यभिप्रायः । यत एवं तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयो जेष्यामि शत्रून्मरिष्यामि वेति निश्चयं कृत्वेत्यर्थः ।

भा० अ०—

कर्णादिकांच्या कडून युद्धांत मेलास तर स्वर्गाप्रत जाशील अगर त्या शूर पुरुषांचा पराभव केलास तर पृथ्वीचें राज्य तुला मिळेल. दोन्ही बाजूंनीं तुला लाभच प्राप्त होणार आहे असा अर्थ आहे. असें आहे म्हणून हे कुंतीपुत्रा ! ' शत्रूंस मारीन, किंवा मरेन '–असा मनाचा निश्चय करून युद्ध करण्यास तयार हो.–प्रस्तुत अध्यायांतील सहाव्या श्लोकांत केलेल्या प्रश्नाला हें उत्तर आहे.–

शंकरा०—युद्ध केलें तर शिष्टलोक निंदा करतील, नाहीं केलें, तर शत्रु करतील ! तेव्हां काय करावें असा अर्जुनास गलेपाश Dilemma पडला. श्रीकृष्ण म्हणतात:–धर्म्ययुद्धाला शिष्टलोक नांवें ठेवणार नाहींत, शत्रूंना निंदा करण्याला सवड नाहींशी होईल आणि पापही लागणार नाहीं. सुटला गलेपाश!

द्विवेदी–' तूं धर्माप्रमाणें चालून निष्कामकर्म (युद्ध) केल्यास चित्तशुद्धि होऊन मोक्ष मिळेल.

प्रपा०—युद्धांत मेलास तर स्वाराज्य (स्वर्गाचें राज्य) आणि जगलास तर साम्राज्य मिळेल.

ज्ञानेश्वर—देखे स्वधर्म हा आचरतां । दोष नासे असता (असलेला) । तुज भ्रांती हे कवण चित्ता । पातकाची ? ॥ सांगे प्लवेंचि काय बुडिजे । कां मार्गीं जातां आडळीजे (आपटावें) । परी वि-

पार्यें (कदाचित्) चालों नेणिजे । तरी तेंही घडे ॥ अमृतें तरीच मरिजे । जरी विषेंसी सेविजे । तैसा स्वधर्मीं दोष पाविजे । हेतुकपणें (इच्छा ठेवून केला असतां) ॥ ह्मणोनि पार्था ! । हेतु सांडूनि सर्वथा । तुज क्षात्रवृत्ति झुंजतां । पाप नाहीं ॥ ३७ ॥

याप्रमाणें ' आत्मा अकर्ता आहे व आत्मा नित्य असून तोच सर्वव्यापी आहे ' हें ज्ञान अथवा स्वस्वरूपाचा स्वानुभव आणि ' आत्मा कर्ता आहे, भोक्ता आहे, आत्मे अनेक आहेत, कर्माप्रमाणें आत्म्यास सुखदु:ख प्राप्त होतें ' हें अज्ञान (म्हणजे ज्ञानबुद्धि आणि कर्मबुद्धि) निराळीं आहेत व त्यांच्यामध्यें अत्यंत विरोध आहे, उजेड आणि अंधकार यांमध्यें नित्य विरोध आहे, तसाच ज्ञान आणि कर्म यांमध्यें आहे. म्हणून मुमुक्षूला उपदेश करितांना ' ज्ञान व कर्म एकत्र ठेवून मोक्ष मिळीव ' असें भगवान् कधींही सांगणार नाहींत असा आचार्यांनीं सिद्धांत अगर असें गीतारहस्य प्रकट केलें आहे. इतर सर्व मार्ग वर्ज्य करून केवळ निष्कर्मस्वरूपी ज्ञानमार्गाचाच उपदेश भगवंतांनीं केला आहे असें आचार्यांचें म्हणणें आहे.

या आचार्यांच्या प्रतिपादनाविरुद्ध अनेक आक्षेप घेण्यांत येतात. (१) अर्जुनास युद्ध करण्याचें कर्म करावयास ज्या गीतेनें प्रोत्साहन मिळालें, त्या गीतेचें रहस्य कर्मशून्य व ज्ञानपर कसें असेल ? (२) ज्या गीतेंत सात्विक भक्तिमार्गाचें विवरण सहा अध्यायांमध्यें केलें आहे, त्या गीतेनें प्रबुद्ध झालेला अर्जुन हिंसापर युद्धकर्म करण्यास कसा प्रवृत्त झाला ? (३) गीता हा नीतिपर ग्रंथ आहे, व सर्वकालीं टिकणारी नीति आणि त्या नीतीवर प्रस्थापित होणारे सर्व धर्म गीतेंत अंतर्भूत होतात, असें शेवटच्या षडध्यायीवरून दिसतें, तेव्हां अर्जुनास शुद्ध नीतिपर व सार्वत्रिक धर्मपर उपदेश करणाऱ्या भगवंतांनीं आपला प्रिय शिष्य जो अर्जुन व सर्व मानवजाती या सर्वांस बंधुबांधवांची हत्या करणाऱ्या युद्धाकडे प्रवृत्ति कां केली, अशा अर्थाचे हे आक्षेप आहेत. या सर्वांवर यथास्थित उत्तर देणें हें सध्यांच्या प्रसंगीं अशक्यच होय. शिवाय गीतेमध्यें काय सांगितलें आहे त्याचें प्राथमिक अविष्करण मीं यथामती पहिल्या प्रस्तावनेंत केलेंच

आहे. तथापि वर निर्दिष्ट केलेल्या शंकांचे समाधानार्थ आपल्या मताचें दिग्दर्शन या अध्यायाचे शेवटीं करीन इतकेंच येथें सांगून ठेवितों.

तत्र युद्धं स्वधर्म इत्येवं युद्ध्यमानस्योपदेशमिमं शृणु—

युद्ध करणें हा आपला स्वधर्म आहे असें म्हणून युद्धास तयार होणाऱ्या वीरास योग्य असा उपदेश ऐक.

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ॥
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि॥३८॥

प. अ. अ.

सुखदुःखे (सुखदुःख हीं दोन्ही)—तसेंच—**लाभालाभौ** (लाभ व हानि) आणि—**जयाजयौ** (जय व अपजय)—हीं सर्व—**समे कृत्वा** (एकच आहेत असें समजून) **ततः** (तदनंतर) **युद्धाय युज्यस्व** (युद्ध करण्याची सिद्धता कर, युद्ध करूं लाग.) **एवं** (याप्रमाणें) **पापं न अवाप्स्यसि** (—तुला—पाप लागणार नाहीं.) सारांश, सुख किंवा दुःख कांहीं झालें तरी मनास विकार होऊं द्यावयाचा नाहीं असा मनाचा निश्चय कर आणि नंतर युद्धास सुरवात कर.—आपलें कर्तव्य आहे म्हणून युद्ध कर.—म्हणजे तुला पापाचा संपर्कसुद्धां लागणार नाहीं.

शां. भा.—

सुखदुःखे इति । सुखदुःखे समे तुल्ये कृत्वा रागद्वेषावकृत्वेत्येतत् । तथा लाभालाभौ जयाजयौ च समौ कृत्वा ततो युद्धाय युज्यस्व घटस्व । नैवं युद्धं कुर्वन्पापमवाप्स्यसीत्येष उपदेशः प्रासङ्गिकः ॥

भा. अ.

अर्जुन—युद्ध केलें असतां गुरुवध होऊन पाप लागेल असें मीं प्रथम (अ. १ श्लोक ३६ मध्यें) म्हटलें होतें त्याची वाट काय ?

श्रीकृष्ण—अरे! अर्जुन पापशंका तुझ्या मनांत राहिली आहे ? मित्र जगून शत्रु मेले किंवा मित्र मरून शत्रु जगले किंवा शत्रूचें धनसर्वस्व आपल्या हातीं लागलें किंवा आपलें सर्वस्व शत्रूनें नेलें

तरी दोन्ही गोष्टी समानच मानून अथवा हर्षद्वेष न करितां शांत राहावें; त्याचप्रमाणें आपण शत्रुचा पराजय केला किंवा त्यानें आपला केला, तथापि हर्षविषाद मानूं नये, अशी मनाची तयारी करून ठेवून युद्धास सिद्ध हो. सारांश, विकारशून्य मनानें व निष्कामबुद्धीनें कर्तव्य कर, याप्रमाणें स्वकर्तव्य जें युद्ध तें केलें असतां तुला बिलकुल पाप म्हणून लागावयाचें नाहीं.—स्वत:चा लोभ सोडून कर्तव्य केलें असतां पाप लागणें संभवनीयच नाहीं.—असो हा उपदेश केवळ पुढें येऊन उभें राहिलेलें कर्तव्य करण्यापुरताच आहे. ज्ञान आणि कर्म यांचा येथें समुच्चय झाला आहे व ज्ञानी पुरुषास कर्म करणें अवश्य आहे, असा या श्लोकांतून अर्थ काढणें शक्य नाहीं.

श्रीधर—जय मिळाला असतां लाभ व लाभानंतर सुख अशी कारणपरंपरा या श्लोकांत दाखवितात.

रामानुज—' **पापम्** ' ह्मणजे दु:खरूपी संसार असा अर्थ करितात. अर्थात हा अर्थ घेतल्यास स्वकर्तव्य केल्यावर ज्ञानी अर्जुनास मोक्ष मिळणार असें सुचवितात. हाच ज्ञान कर्मांचा समुच्चय!

सत्या०—'**समे**' लक्ष्मीसहित हरीचे ठायीं आहे कीं नाहीं पांडित्य!

शंकरानंदही याचा अर्थ ' माझ्या ' भक्तीनें विधिविधेय होऊन असा करितात.

हा वेळपर्यंत ह्मणजे ११ व्या श्लोकापासून ते १८ व्या श्लोकापर्यंत भगवंतांनीं अर्जुनास सांख्यविचार अगर आचार्यांचे मताप्रमाणें आत्मानात्मविचाराचा प्रथम भाग सांगितला. आत्मा अमर आहे व सर्वकालीन आहे, स्थूल देहापासून भिन्न आहे ह्मणून देहाचे वृद्ध तारुण्यादि कोणतेही विकार त्या आत्म्याला होत नाहींत, असें बाराव्या व तेराव्या श्लोकांत सांगून देहात्मवादी चार्वाक व क्षणिक विज्ञानवादी बौद्धांचें खंडन केलें. नंतर बुद्धि, इच्छा, द्वेष, प्रयत्न धर्म, अधर्म, संस्कार (भावना) सुखदु:ख हे नऊ विकार केवळ लिंगशरीरास होतात, आत्म्याशीं त्या विकारांचा कोणताही संबंध नाहीं, आत्मा केवळ साक्षीरूप आहे असें १४ व्या श्लोकांत निवेदन केलें. नंतर १५ व्या मध्यें सर्वसाक्षी व सर्वचेतनामय आत्मा

एकच असून निर्विकार असतो व त्याचा प्रत्यय प्रत्येक मनुष्यास झोंप आटपल्यावर ' मी सुखानें निजलों होतों ' असा प्रत्यहीं होत असतो असा ध्वनी प्रकट केला. सत् कोणतें आणि असत् कोणतें हा नित्यानित्यविवेक करून आत्मा नित्य आहे; आणि इतर सगळें अनात्मक, अनित्य अगर मायिक आहे; या अविनाशी अगर नित्य आणि सर्वव्यापी आत्म्याचा नाश होणें शक्यच नाहीं, व आत्म्याशिवाय इतर सर्व नाशवंत आहे असें १६,१७,१८ ह्या श्लोकांत सांगितलें व ह्मणून भीष्मादिकांच्या देहांतील आत्मा नित्य आहे, त्याविषयीं शोक करणें उचित नाहीं, सर्वांच्याच शरीरांचा नाश प्रकृतीच्या स्वभावानुसार होतो, तेव्हां भीष्मादिकांच्या शरीरांविषयींचाही शोक वृथा आहे असा उपदेश केला.–

पुढें ' आत्मा मरतो किंवा मारितो ' असें ह्मणणारे अनुक्रमें चार्वाक, मीमांसक व नैयायिक हे अज्ञानी आहेत, आत्म्याला सहा विकारांपैकीं कोणताही विकार होत नाहीं, तो अविनाशी, नित्य, अज आहे, तो कोणतीच क्रिया करित नाहीं, जीर्ण झालेलीं शरीरें जाऊन नवीं शरीरें मात्र त्यास प्राप्त होतात, त्याला पंचमहाभूतांकडून अगर इतर कोणाकडून कसलाच उपद्रव लागणें शक्य नाहीं, कारण त्याच्याच सत्तेनें सर्व जडद्रव्यें आपआपलीं नियतकर्मे करितात, असें मायेच्या योगानें आपल्यास दिसतें, पण वस्तुत: जड द्रव्यें नाहींत आणि कर्महीं नाहीं; तो नित्य, सर्वगत, स्थाणु, अचल व सनातन असून अव्यक्त, अचिंत्य व अविकारी आहे हें प्रतिपादन १९ ते २५ श्लोकापर्यंत झालें.

सारांश आत्मा नित्य व अविकारी आहे, तो सत् आहे, चित् आहे, बाकी सर्व मायिक, अनित्य, विकारी, असत् व जड आहे, इतका उपदेश येथपर्यंत झाला. पुन:, हा कठिण विषय अर्जुनास समजणार नाहीं असें गृहीत धरून, किंवा उलट कल्पना घेतली असतांही शोकमोहाचें कारण नाहीं हाच सिद्धांत कसा निष्पन्न होतो हें सांगण्याच्या बुद्धीनें, आत्मा क्षणजीवी आहे अशी कल्पना केली; नंतर क्षणजीवी वस्तु क्षणध्वंसी असतात, त्या कोठून येतात, कोठें जातात हें माहित नसतें, ह्मणून असल्या अनियमित वस्तूंचा शोक करणें

समंजस पुरुषास योग्य नाहीं असें ठरवून पुनः आत्म्याचें वृत्त आश्चर्यकारी आहे, तो एकच असून सर्व ब्रह्मांडामध्यें भरलेला आहे ह्मणून अवध्य आहे, तेव्हां त्याच्याविषयीं शोक करणें सर्वथा असमंजस आहे, असें २६ तें ३१ पर्यंत सांगितलें.

याप्रमाणें अर्जुनास झालेला जो शोकमोह तो नाहींसा करण्यासाठीं आत्मस्वरूपाची मीमांसा करून सामान्यतः असें ठरविलें कीं, कर्तव्याच्या आड येऊं पाहणारे शोकमोह हे अज्ञानजन्य आहेत, खरे नव्हत; नंतर क्षत्रियांनें स्वकर्तव्य केलें असतां लाभ कोणता, न केलें तर धर्मनाश, कीर्तिच्छेद, पापाधिगम, लोकनिंदा इत्यादि दोष कोणते हें स्पष्ट सांगून जयापजय—कांहीं—झालें तरी युद्ध कां करावें ह्याचें संकीर्तन केलें आणि शेवटीं जय येवो वा पराजय होवो, लाभ असो वा नसो, सुख मिळो वा दुःख जडो, कांहीं झालें तरी चित्ताची समता ठेवून निष्काम बुद्धीनें कर्तव्य केलें असतां कोणत्याही प्रकारचें पातक लागत नाहीं हा सर्व धर्मांस आणि प्राचीन व आधुनिक तत्त्ववेत्त्यांस मान्य असा उत्कृष्ट सिद्धांत सांगितला. हा झालेल्या विषयाचा सारांश आहे व यांतच सांख्यमताचें खंडन आहे.

सांख्यमताचे मुख्य आचार्य कपिलमहामुनी होत, असें म्हणतात. हे कपिल कोणते, ह्यांचा काळ कोणता, यांनीं प्रथमतः प्रणीत केलेलीं मतें कोणतीं, या सर्वांचा उलगडा यथासांग करणें हा मोठा मौजेचा व उपयोगाचा विषय आहे. सांख्यकारिका, सांख्यसूत्रें हे ग्रंथ मला वाचण्यास मिळाले, त्यांवरून पाहतां कपिलमुनी हे अतिप्राचीन कालांत झाले असूनही सर्वकालीन तत्त्ववेत्त्यांच्या पहिल्या वर्गांत या श्रेष्ठपुरुषास खुशाल बसवितां येईल असें मला वाटलें. प्रचलित धर्मास व शास्त्रास अमळ एकीकडे ठेवून ज्या महात्म्यानें सर्व सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयांची उत्कृष्ट मीमांसा एका बुद्धीच्या जोरावर करण्याचा प्रयत्न केला व अलीकडील स्पायनोझा, क्यांट, हेगेल, शोपनहार, हार्ट्मन्, स्पेन्सर, डार्विन, हक्सले इत्यादिक महामुनींच्या एकंदर प्रयत्नांस जें यश आलें आहे, तें यश आमच्या आर्यावर्तांतील महातत्त्वज्ञानें सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं ज्या एकट्यानेंच संपादन करण्याचें पुण्य घेतलें, हल्लीं जगांतील सन्माननीय धर्मांमध्यें मोड-

णारा बुद्धधर्म हा ज्याच्या खटपटीचा एक अंश, तो महापुरुष किती बुद्धिमान् असला पाहिजे याची वाचकांनींच कल्पना करावी. आमच्या पूर्वजांनींही ह्या अलौकिक पुरुषाचें कौतुक केलें नाहीं असें नाहीं. कपिल हा ईश्वरी अवतार असें भागवतांत वर्णन आहे कपिलाच्या दुर्धर शापानें सगराचे साठ हजार पुत्र एका क्षणमात्रांत भस्म झाले असें रामायण ह्मणतें. जीवन्मुक्त नारदानें दक्षाच्या मुलांस ' सांख्याचें अध्ययन करा ' असा उपदेश केला त्याचें वर्णन महाभारतांत आहे. असो; तेव्हां सर्व जगास आपल्या बुद्धिप्रभावानें थक्क करून टाकून जगाची व मानवी बुद्धिसामर्थ्याची महती वाढविणाऱ्या या थोर—अतिथोर पुरुषाचीं लागेल तितका शोध लावून त्याचीं तत्त्वें मराठी वाचकांस अर्पण करण्याचा प्रयत्न करणारा पंडित आह्मा सर्वत्रांवर अनेक उपकार करील असें मला वाटतें.

सांख्यतत्त्वाचे प्रतिपादक कपिलमहामुनी यांच्या संबंधानें इतकें स्तुतिपर लिहावयाचें कारण इतकेंच कीं हिंदुस्थानामध्यें पुढें जे तत्त्वविचार प्रसृत झाले त्यांचा मूळ पाया सांख्यतत्त्वामध्यें आहे. प्रथमतः सद्वस्तु दोन, पुरुष आणि प्रकृति; पुरुष म्हणजे आत्मा हा निर्विकार आणि निष्क्रिय असून साक्षी असतो. मूळ प्रकृतीमध्यें सत्व, रज व तम हे तिन्ही गुण सारखेच असतात ह्मणून ती साम्यावस्थेंत असते. पण पुरुष आणि प्रकृतीची गांठ पडली ह्मणजे आत्म्याचें शुद्ध आणि निर्विकार स्वरूप मूळ स्वरूपापासून भिन्न होतें तें प्रकृतीच्या संयोगानें होतें, आत्म्यास त्रिविधतापांपासून दुःख भोगावें लागतें तें प्रकृतीच्या संगतीमुळें होय आणि प्रकृतीची संगति तोडून टाकण्याची खटपट झाली, अगर कर्माचा सर्वथैव त्याग केला तर आत्मा पुनः पूर्व स्वरूपास जाऊन मिळेल, सर्वत्र भिन्नरूपानें दिसणारे पदार्थ एकाच प्रकृतीपासून झाले आहेत.ही सांख्यांची मूळ तत्त्वमालिका आहे. कपिल महामुनींनीं सर्व प्रकारचें कर्तृत्व आत्मसांनिध्यानें विकृत झालेल्या प्रकृतीकडेच आहे व विश्वाची उत्पत्ति, त्याची स्थिति व त्याचा लय हें सर्व प्रकृतीकरवींच होतें असें मत प्रकट केलें. आपली बुद्धि, अहंकार व सर्व इंद्रियें हीं प्रकृतीपासूनच उत्क्रांत झालीं असें कपिल ह्मणतात व अलीकडील क्लिफर्ड आदि तत्त्ववेत्ते ही हेंच ह्मणतात. स्पायनोझाचें सांख्यतत्त्वाशीं साम्य दिसतें तें सेश्वर सांख्य अगर योगतत्त्वांशीं होय असो; सांगावयाचें तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं सर्व विश्व प्रकृतीपासून, अव्यक्तापासूनच, उत्पन्न झालें असें जें ह्मटलें आहे, त्याच्या जवळ जवळच स्पेन्सरादि उत्क्रांतितत्त्वाचे पुरस्कर्ते यांचें ह्मणणें येत आहे ! ग्रीस देशांत आरिस्टाटल नामक तत्त्ववेत्त्यानें सुमारें दोन हजार दोनशें वर्षांपूर्वी सा-

आतां ह्या श्रेष्ठ पुरुषाच्या सिद्धांतापैकीं गीतेंत ओघानें आलेल्या तत्त्वांचें निदर्शन व खंडन यांचें दिग्दर्शन करून हा विषय आटपतों.

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

मान्य गोष्टी शास्त्राच्या चक्रामध्यें गंतवून ठेविल्या, तीनशें वर्षांपूर्वी बेकन नामक आंग्लभौमतत्त्ववेत्त्यानें पूर्वीच्या ज्ञानाचा आढावा घेऊन भौतिक शास्त्रांची सीमा कशी वाढवावी हें तत्त्व प्रकट केलें, आलीकडे या एकोणीसाव्या शतकांत स्पेन्सर नामक महापंडित आणि महातत्त्ववेत्त्यानें सर्व भौतिक व मानासिक गोष्टींचा कांहींसा उलगडा आपल्या उत्क्रांतितत्त्वानें केला, त्याचप्रमाणें आमच्या देशांत सुमारें चार हजार वर्षांपूर्वी सांख्यमुनीनें इहलोकामध्यें दिसणाऱ्या सर्व पदार्थांचें प्रत्यक्ष आणि अनुमान नें अवलोकन करून सर्व पदार्थ एका मूळप्रकृतीपासून निघाले आहेत असें ठरविलें! ही गोष्ट लहान सामान्य आहे काय? सांख्यांच्या नंतर जीं तत्त्वशास्त्रें उद्भूत झालीं तीं योग, वेदांत व इतर दर्शनें, व त्यांचे पुरस्कर्ते, यांनीं पुष्कळ अंशांनीं सांख्यमतांचेंच अनुसरण केलें आहे. सांख्य मतानें मूळपासूनच 'अनंत आत्मे निरनिराळे होते' ते एकाच महान् आत्म्यापासून निघाले आहेत असें योगानें ठराविलें; ह्मणजे निरीश्वर सांख्य मताला सेश्वर केलें. वेदांत्यांनीं प्रकृति व पुरुष हीं दोन तत्त्वें शुद्ध विचाराच्या कसोटीस उतरत नाहींत व दोन वस्तूंमध्यें सामान्य असें कांहीं तरी पाहिजे असें ठरविणें हा बुद्धीचा धर्मच आहे, असा विचार करून पुरुष आणि प्रकृति या दोहोंच्याही पलीकडे ब्रह्म ह्मणून खरी सद्वस्तु आहे व तिच्याच मात्र सत्तेनें सर्व दृश्य जग उत्पत्ति-स्थिति-लयाच्या चक्रांतून हिंडत आहेसें भासतें असा सिद्धांत करून अद्वैतमताची स्थापना केली. सारांश जे जे कोणी तत्त्ववेत्ते पुढें निर्माण झाले त्यांपैकीं कांहींनीं सांख्यांचें अनुसरण तरी केलें आहे व इतरांनीं सांख्यमताची सुधारणा केली आहे. हा संसार, हें जन्ममरण, हा ऐहिक वास हें सर्व दुःखमय आहे असें सांख्यमुनींनीं सांगितलें आहे, तेंच योग्यांस, अद्वैत्यांस, बुद्धास, व आगस्टाईनसारख्या ख्रिस्त भक्तांस, व हार्टमन, शोपेनहार नामक तत्त्ववेत्त्यांस मान्य आहे. असो; तेव्हां सांख्यमहामुनींची स्तुति करणें अवश्य आहे असें मीं ह्मटलें तें यथार्थ आहे असें यावरून दिसेल. वेदांतमताला जें अति उत्कृष्ट स्थैर्य प्राप्त झालें व दुःखी व अनाथ आणि तळमळणाऱ्या जीवांचें समाधान करण्याचें सामर्थ्य जें त्यास प्राप्त झालें त्याचा मूळपाया सांख्यांत आहे असें ह्मटलें असता अद्वैत मताची निंदा होत नसून उलट येवढ्या जबरदस्त सांख्यमताचाही पराभव करण्याचें सामर्थ्य त्याच्या अनुषंगानेंच उत्पन्न झालेल्या वेदांतांत आहे हें त्यास भूषणच आहे. शिवाय सन्मत जें स्थापित होतें तें प्रथमतः होत नहीं, दुर्मतांचा विध्वंस करून मग तें प्रस्थापित होत असतें हेंही आमच्या धार्मिक मुमुक्षूंनीं विसरतां कामा नये.

१ आत्मे व प्रकृति किंवा प्रकृति आणि पुरुष अशा दोन सद्वस्तु आहेत असा सांख्यसिद्धांत आहे.

,, येथपर्यंत झालेल्या प्रकरणांत—व पुढेंही—गीतेंत सांगितलें आहे कीं सद्वस्तु एकच आहे. प्रकृति (Nature) मायिक ह्मणजे मिथ्या आहे, सद्वस्तु मिथ्या नाहीं, असा गीतेचा उपनिषदानुसार सिद्धांत आहे. (पहा अ० २ श्लोक १७।१८।२०।२९).

२ सांख्याचे मतें आत्मे अनेक आहेत.

,, गीतेचा, उपनिषदांचा व वेदांताचा मथितार्थ 'आत्मा एकच आहे' असा आहे. (पहा अ० २ श्लोक १७ ते २९). १२ वा श्लोक संशयित आहे त्याचा विचार त्याच श्लोकामध्यें केला आहे.

३ सांख्यमतानें 'अव्यक्त' प्रकृतीच, श्रेष्ठ व चिंतनीय आहे.

,, गीतामतानें आत्मा अव्यक्त खरा पण तो अविकारी आहे. म्हणून अव्यक्त या शब्दानें प्रकृति घेतां येत नाहीं. आत्माच घ्यावा लागतो. (पहा अ० २ श्लोक २९).

४ कर्म न करणें हा सांख्यमतानें पुरुषार्थ ठरतो.

,, कर्तव्य केलेंच पाहिजे, निष्काम आणि निरहंकारबुद्धीनें मात्र कर्म केलें पाहिजे असें गीताशास्त्र सांगतें. ज्ञानोत्पत्तीपर्वी कर्म केलें नाहीं तर प्रपंचही होत नाहीं व परमार्थही साधत नाहीं. (पहा अ० २ श्लोक १८ व ३१ ते ३८.)

५ आत्मा सुखदुःखाचा अधिकारी आहे.

,, आत्मा अधिकारी नाहीं. (पहा अ० २ श्लोक १४।१५).

वरील विषयांत सांख्यमतखंडनपर जे जे श्लोक मला आढळले त्यांचें येथें निदर्शन केलें आहे. सुखदुःखाच्या विमोचनासाठीं तत्त्वज्ञानाचा व्यासंग केला पाहिजे, ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं, आत्म्याशिवाय 'माझें' असें दृश्य जगत काहीं नाहीं, विषय, इंद्रियें, मन, लिंगदेह, अहंकार बुद्धि, कारणदेह हीं सर्व प्रकृतीचीं कार्यें आहेत,

आत्मा निराळाच आहे, वगैरे पुष्कळ सिद्धांत कपिलसांख्य आणि गीतासांख्य ह्या दोन्ही शास्त्रांसही मान्य आहेत. मुख्य गोष्ट लक्ष्यांत ठेवावयाची ती ही कीं, तत्त्वविवेकानें आत्मानात्मविषयाचे सिद्धांत ठरवून ठेवून व त्याप्रमाणें आचरण करावयाचें असा निश्चय करून मनुष्यानें आपआपलें कर्तव्य करावें, दैहिक, मानसिक अगर नैतिक अडचणी येतील त्या एकीकडे सारून शास्त्रप्रणीत कर्तव्य निर्लोभमनानें केलेंच पाहिजे असें सांगण्याचा श्रीभगवंताचा हेतु आहे व तो हेतु वरील तात्त्विक, सयुक्तिक आणि समंजस प्रतिपादनाच्या योगानें सिद्धीसही गेला आहे. सारांश गीता सांख्यशास्त्र निष्काम कर्तव्याच्या आड येत नाहीं हें येथें सिद्ध झालें.

आतां या मासिक पुस्तकाचें काळजीपूर्वक पठन करणाऱ्या मुमुक्षूंपैकीं कांहीं सद्गृहस्थांस अशी शंका आली आहे कीं, हा तत्त्वोपदेश युद्धसमयींच कां केला? व तो अर्जुनासच कां केला? या प्रश्नांस आचार्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत उत्तरें दिलींच आहेत; पण त्यांचें थोडेंसें जास्त स्पष्टीकरण येथेंच करून घेतों. भारती युद्ध हें ऐतिहासिक युद्ध आहे अशी फारा दिवसांची समजूत आहे. पण प्रत्येक क्षणीं आपल्या मनांत भारती युद्ध चाललेलें असतें हें कदाचित् बऱ्याच लोकांस माहीत नसेल. आपण प्रपंचांत गुंतलों असतांना जेव्हां जेव्हां कर्तव्याचा प्रश्न पुढें येतो त्यावेळीं कामक्रोधादि षड्रिपु आणि सद्विचारादि मित्र यांमध्यें तुमुल रण जुंपून कधीं कौरवांचा जय व ईश्वर सारथी असेल व आपली निष्ठा चांगली असेल तेव्हां कौरवांचा अगर दुष्ट शत्रूंचा, दुर्विकारांचा, पराजय होत असतो; हा अनुभव व्यक्तिमात्रास यावा व येतो. अशा या प्रत्येक युद्धाच्या वेळीं युद्धांमध्यें तटस्थ राहणारा परंतु वेळोवेळीं सदुपदेश करणारा विवेकरूपी श्रीकृष्ण सारथी आपल्या हृदयांत वास करीत असूनही आपण त्याचा उपदेश ऐकत नाहीं! तर असें करूं नये, ईश्वरप्रेरित अगर पूर्वसंस्कारांनीं घटित जी विवेकबुद्धि ती काय ह्मणते तें सावकाशपणें ऐकावें, विकारवश होऊं नये, अज्ञानाला, मोहाला किंवा शोकाला आपल्या कर्तव्याच्या आड येऊं देऊं नये. कर्तव्य करावयाचें

वेळीं आपल्यास अत्यंत प्रिय अशा अनेक गोष्टी वर्ज कराव्या लागतील, इष्टमित्रांस, गणगोतास दुखवावें लागेल, कदाचित् आपल्यास व समाजास अत्यंत अप्रिय अशा एकाद्या वाईट गोष्टीचें सुद्धां सात्त्विकतेनें अवलंबन करावें लागेल, तेव्हां अशा कठिण प्रसंगीं धैर्य धरून आपलें शास्त्रप्रणीत कर्तव्य आपण करावें असा उपदेश अर्जुनासचसा काय पण आपणा सर्वांनाही हा उपदेश भगवंतांनीं अर्जुनास निमित्तमात्र पुढें उभा करून केला आहे. भारतीयुद्ध खरें असो वा नसो, आपल्या मनोभूमिकेवर जें तुमुल युद्ध अहर्निश चाललेलें आहे व ज्या ह्या युद्धविषयक गोष्टीला मार्टिनो आदि नीतितत्त्ववेत्त्यांची पूर्ण संमति आहे, त्या मानसिक युद्धाचा प्रत्येकानें अनुभव घ्यावा, विचार करावा ह्मणजे ईश्वरी गीतेमध्यें पूर्णत्वानें प्रतिपादन केलेल्या अमोलिक उपदेशाचें चीज होईल. आपण प्रत्येकजण अर्जुन आहों, व आपला विवेकसिंह हा श्रीकृष्ण होय. तेव्हां भारती युद्धांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास 'उपदेशिली स्वयें गीता' या गोष्टीचा वरील प्रमाणें अर्थ करून आपण गीतामृत वाचावयास लागलों ह्मणजे अर्जुनाचा जसा मोह नष्ट झाला, तसा आपलाही होईल आणि सद्बुद्धीच्या मात्र उपदेशाप्रमाणें आपण वागावयास लागूं. हें यावरील शंकांचें निवारण झालें. यापुढें आपलें कर्तव्य काय हा प्रश्न आहे, त्याचा विचार आणखी एखाद्या प्रसंगीं करीन असें अभिवचन देऊन हा विषयभाग आटपता घेतों.

शोकमोहापनयनाय लौकिको न्यायः स्वधर्ममपि चावेक्ष्येत्याद्यैः श्लोकैरुक्तो न तु तात्पर्येण । परमार्थदर्शनं त्विह प्रकृतं तच्चोक्तमुपसंह्रियत एषा तेऽभिहितेति शास्त्रविषयविभागप्रदर्शनाय । इह हि दर्शिते पुनः शास्त्रविषयविभाग उपरिष्टाज्ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेण योगिनामिति निष्ठाद्वयविषयं शास्त्रं सुखं प्रवर्तिष्यते श्रोतारश्च विषयविभागेन सुखं ग्रहीष्यन्तीत्यत आह—

'आपला धर्म काय आहे तो लक्ष्यांत ठेवून ही' वगैरे एकतिसाव्या श्लोकापासून तों येथपर्यंत जी उपदेशपद्धति भगवंतांनीं अर्जु-

नाचा शोक व मोह दूर करण्यासाठीं अंगीकृत केली ती व्यावहारिक व वर्णाश्रम धर्मास धरून चालणारी पद्धति होय. वेदांताची सरणी धरून सद्वस्तूचें प्रतिपादन करणारी ही पद्धति नव्हे. केवळ सामान्य मनुष्यास व्यवहारांत होणाऱ्या शोकमोहांचा निरास करण्यासाठीं श्रोत्याचा अधिकार पाहून ह्या लौकिकपद्धतीचा भगवंतांनीं स्वीकार केला आहे. भगवंतांस गीताशास्त्रांत मुख्यतः प्रतिपादन करावयाचें आहे तें सद्वस्तूचें, ब्रम्हाचें, ज्ञान होय. तें अकराव्या श्लोकापासून एकतिसाव्या श्लोकापर्यंत केलेंच आहे. आतां त्या सर्व उपदेशाचा उपसंहार प्रकृत श्लोकांत 'ही तुला सांख्यबुद्धि सांगितली' असें ह्मणून केला आहे. हा सारांश सांगितला तो गीताशास्त्रामध्यें 'ज्ञान आणि कर्म' असे जे दोन विभाग केले आहेत, त्यांचें स्पष्ट आकलन व्हावें, ते विभाग सहज लक्षांत यावे, एतदर्थ सांगितला आहे. येथें जे विषयाचे विभाग करून दाखविले आहेत, तेच पुनः, 'ज्ञानयोगानें सांख्यांची निष्ठा आणि कर्मयोगानें योग्यांची निष्ठा,–[पहा अ० ३ श्लोक ३] या श्लोकांतही तेच दोन निष्ठाविभाग स्पष्ट करून दाखवितील. उद्देश हा कीं असा विभाग केला ह्मणजे विषयाची मीमांसा स्पष्टतर व्हावी आणि श्रोत्यांसही हा विषय सुखानें, सौकर्यानें, समजावा. भगवान म्हणतातः—

एषा तेऽभिहिता सांख्ये
बुद्धि र्योगे त्विमां शृणु ॥
बुद्ध्या युक्तो यया पार्थ
कर्मबन्धं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

एषा (ही-आतांपर्यंत सांगितलेली-) **सांख्ये** (सांख्य—परमार्थशास्त्रांतील-) **बुद्धिः** (ज्ञान) **ते** (तुला) **अभिहिता** (सांगितलें आहे-). **तु** (आतां यापुढें—पण आतां-) **योगे** (योगशास्त्रांतील) **इमां** (ही–मी यापुढें सांगणार आहे ती बुद्धि-तें ज्ञान–) **शृणु** (ऐक). **पार्थ** (अर्जुना!) **यया बुद्ध्या युक्तः** (जी बुद्धि—जें ज्ञान, तुला

प्राप्त झालें असतां-) कर्मबन्धं (कर्म हाच एक बंध, ताप.) प्रहास्यसि (सोडून टाकशील). सारांश, आतां यापुढें तुला मी जें योगशास्त्राचें ज्ञान सांगणार आहे, त्याचें तुला पूर्ण ज्ञान झालें तर कर्मरूपी बंधापासून होणाऱ्या तापत्रयाची बाधा तुला बिलकूल होणार नाहीं. तूं कर्माचें कपाट फोडून बाहेर येशील.—

एषा त इति। एषा ते तुभ्यमभिहितोक्ता सांख्ये परमार्थवस्तुविवेकविषये बुद्धिर्ज्ञानं साक्षाच्छोकमोहादिसंसारहेतुदोषनिवृत्तिकारणम्। योगे तु तत्प्राप्त्युपाये निःसङ्गतया द्वंद्वप्रहाणपूर्वकमीश्वराराधनार्थे कर्मयोगे कर्मानुष्ठाने समाधियोगे चेमामनन्तरमेवोच्यमानां बुद्धिं शृणु। तां बुद्धिं स्तौति प्ररोचनार्थम्—बुद्ध्या यया योगविषयया युक्तो हे पार्थ कर्मबन्धं कर्मैव धर्माधर्माख्यो बन्धः कर्मबन्धस्तं प्रहास्यसीश्वरप्रसादनिमित्तज्ञानप्राप्तेरित्यभिप्रायः ॥ ३९ ॥

आतापर्यंत जें तुला ज्ञान सांगितलें त्याचा हेतु तुला परमार्थ वस्तूची, सद्वस्तूची, ओळख व्हावी हा होता. हें ज्ञान सांख्यशास्त्रांतील, अध्यात्मशास्त्रांतील, आहे. अर्जुना! सांख्यशास्त्राचें ज्ञान प्राप्त झालें असतां काय होतें असें म्हणशील तर सांगतों. 'आत्मा कर्ता आहे, आत्मा भोक्ता आहे' वगैरे ज्या अज्ञानामुळें प्राण्यास शोकमोहादिक विकार होतात तें अज्ञान अगर ती मायाच या सांख्यज्ञानानें समूळ नाहींशी होते. अज्ञान नाहींसें झालें म्हणजे मुक्ति मिळते, हें तुला विदितच आहे.-पण हा अवघड विषय तुला समजला नसेल, तुला ग्रहण करितां आला नसेल, अशी मला बळकट शंका आली आहे.—म्हणून तुला समजण्यास अत्यंत सोपें असें कर्मयोगाचें ज्ञान आतां सांगतों. कर्मयोग म्हणजे निष्कामबुद्धीनें, फलाची आशा न ठेवितां व लाभ हानि झाली तरी सुखदुःख न मानितां, कर्तव्यकर्म करून तें सर्व परमेश्वराच्या चरणाकडे लावावयाची निष्ठा होय. कर्मयोगाचें असें अनुष्ठान केलें म्हणजे चित्तशुद्धि होऊन तत्प्राप्ति म्हणजे वर सांगितलेल्या ज्ञानाची प्राप्ति,

होते.--सारांश कर्मयोग हा ज्ञानप्राप्तीचा एक उपाय आहे.--असो. तेव्हां आतां तुला कर्मयोगाचें ज्ञान सांगतों. हें ज्ञान प्राप्त झालें असतां इष्ट फल मिळतें, हें ऐकून तरी उदासीन झालेल्या तुला कर्म करण्याची स्फूर्ति होईल, असें जाणून कर्मयोगाची फलश्रुति सांगतों. 'हे पार्था ! ह्या कर्मयोगाचें जर तुला चांगलें ज्ञान झालें व तें तुझ्या आचरणांत दिसूं लागलें तर कर्म रूपी जो धर्म व अधर्म या नांवाचा बन्ध (पिंजरा) त्यापासून तूं मुक्त होशील.

अर्जुन---कर्म केल्यानें मुक्ति कशी मिळेल ?

भगवान्---अरे ! फलाची आशा सोडून देऊन सुखदुःखविरहित अशा मनाच्या स्थितीनें कर्तव्यकर्म केलें व तें परमेश्वरास समर्पण केलें म्हणजे त्याच्या कृपेनें 'मी कर्ता आहे' वगैरे अज्ञान नाहींसें होतें, व आत्मस्वरूप कळतें. आत्मस्वरूप कळलें व आपणच ब्रह्म आहों अशी वृत्ति होऊन ब्रह्मामध्यें सर्वांचा लय झाला म्हणजे मुक्तीच मिळाली ? नव्हे काय ?

या श्लोकावर **प्रपाकार, मधुसूदनीकार, भाषाविवृतीकार कै० रघुनाथशास्त्री पर्वते, कै० प्रो० द्विवेदी** या सर्वांचा आणि **शंकरानंदाचा** अभिप्राय एकच पडला आहे. हे सर्व टीकाकार **शंकराचार्योपजीवी** आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. या विशेषणानें सदरहू टीकाकारांचा अपमान होत नसून उलट त्यांस व आचार्यांस हा सर्व प्रकार भूषणास्पदच आहे असें म्हटलें पाहिजे. निष्काम व परमेश्वरास अर्पण केलेला कर्मयोग हा चित्तशुद्धि करितो म्हणजे क्रमाक्रमानें मनुष्याचा स्वाभिमान व अज्ञान घालवितो म्हणून ईश्वराचा असल्या कर्मयोग्यावरही अनुग्रह होतो. कर्मयोगानें ह्या गोष्टी साध्य होतात म्हणून त्याला ज्ञानमार्गाचा उपाय, ज्ञानमार्गाचें साधन, असें म्हटलें आहे. 'हा मी व हें माझें' असें ज्या पुरुषास अज्ञान असतें त्याच्यासाठीं निष्काम कर्मयोग सांगितला आहे. **मधुसूदनीकारांनीं** सांख्य शब्दाची व्युत्पत्ति देऊन असा अर्थ केला आहे कीं, 'ज्या उपनिषदामध्यें परब्रह्म हें निर्विकार आहे, निरुपाधिक

आहे, असें प्रतिपादन केलेलें असतें तें **सांख्योपनिषद्**; त्याचा तात्पर्यार्थ (उपनिषदांतील परमपुरुष) ज्यांत सांगितला असतो तें होय.' **पर्वते** व **द्विवेदी** यांस हाच अर्थ मान्य आहे. **सांख्य** म्हणजे निर्विशेष परब्रम्ह असें **शंकरानंद** म्हणतात. गीताशास्त्रतां ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय नाहीं असें **मधुसूदनीकार, शंकरानंद, पर्वते** आणि **द्विवेदी** यांचा आचार्यप्रमाणेंच अभिप्राय आहे. 'ज्ञानाचा प्रतिबंध करणाऱ्या कर्मानें ज्ञान कसें प्राप्त होईल?' अशा शंकेचें निवारण असें कीं निष्कामत्वानें, निरभिमानपणानें, ईश्वरार्पणबुद्धीनें आणि समवृत्तीनें कर्म केलें तर तेंच शुद्धीस कारण होऊन ज्ञानाचा मार्ग खुला करितें. '**धर्मेण पापमपनुदतीति श्रुतेः**' धर्मानें पापाचा, अज्ञानाचा, नाश होतो अशी श्रुति आहे.

वल्ल०—योग=भगवंताशीं एकरूपता करणारे कर्म. कर्मबंध=केलेल्या कर्माचें पातक.

मध्वा०—' सांख्य ' = शुद्धात्मतत्त्वविज्ञानं. योग = उपाय. **सत्यानंद** सांख्य आणि योग हे विष्णुकृत सांख्यशास्त्र व योगशास्त्र असें समजतात. **कपिलकृत** सांख्य निरीश्वर आहे व वेदबाह्य आहे म्हणून तें यांस संमत नाहीं. **विद्याधिराजभट्ट** सत्यानंदाचे अनुयायी आहेत. यांनीं असें कारण दिलें आहे कीं **कपिल** व **पतंजलीकृत** सांख्य व योग शास्त्रें घेतलीं तर त्यांच्या आधारावर ' युद्ध कर ' असें भगवंतास सांगतांच येणार नाहीं! शृणु = ऐक व त्याप्रमाणें कर.

रामा०—सांख्यं = बुद्धीनेंच आकलन करावयाजोगें ज्ञान. 'कर्मणा बन्धः कर्मबंधः' (कर्मानें उत्पन्न होणारा बंध तो कर्मबंध) असा समास सोडवितात. आचार्यांनीं कर्म हाच बंध असा विग्रह केला आहे. अद्वैतपंथास कर्म मुळींच नको आहे. कारण तें बंध करणारें आहे. इतर पंथीयांस सत्कर्म पाहिजे आहे व दुष्कर्मानें मात्र बंध होतो अशी त्यांची समजूत आहे. तसेंच या विशिष्टाद्वैताचार्यांनीं चालू श्लोकांतील योगास बुद्धियोग असें म्हटलें आहे व आपलें म्हणणें बरोबर आहे हें दाखविण्यासाठीं अ० २ श्लोक ४९ मधील ' बुद्धियोग '

शब्दाचा आधार दिला आहे. यांच्या मतानें बुद्धियोग ह्मणजे मोक्ष देणाऱ्या कर्माचें 'आत्मज्ञानपूर्वक अनुष्ठान' असा अर्थ आहे. आत्मज्ञान झाल्यावर कर्माची आवश्यकता नाहीं हें मागें अनेक वेळां सांगितलेंच आहे.

ज्ञानेश्वरांचा कर्मफलदर्शक दृष्टांत पहाः—जैसें वज्रकवच लेइजे। मग शास्त्रांचा वरिखाव (वर्षाव) साहिजे। परि जैतेंसीं (जयासह, जय प्रावून) उरिजे। अचुंबित (बाधारहित)॥ कर्मबंध सुटण्याला निष्कामकर्मरूपी कवच कसें उपयोगी पडतें हें ज्ञानेश्वरांनीं किती सुंदर रीतीनें दाखविलें आहे बरें?

• **वामन** पंडितांचा व **मधुसूदनीकारांचा** एकच अभिप्राय आहे. सांख्य ह्मणजे गणना। सकल तत्त्वांची अर्जुना। ज्या शास्त्रांत हे रचना। सांख्य म्हणावें तें शास्त्र॥ असत्पदें जड क्षेत्र। त्यांत गणिजे जडतत्त्वमात्र। क्षेत्रज्ञ जाणे जो हें विचित्र। तो सत्पदें वर्णिला॥ तें क्षेत्र नाशवंत। क्षेत्रज्ञ साक्षी शाश्वत। जाणोनी तो सर्वगत (सर्वव्यापी)। शोक टाकी, असें बोलिलों॥ हे सांख्य रीतीची बुद्धि। .... [पहा श्लोक २१ अध्या० २.]

किंचान्यत्—

आणखीही पहाः—

नेहाभिक्रमनाशोऽस्ति
प्रत्यवायो न विद्यते॥
स्वल्पमप्यस्य धर्मस्य
त्रायते महतो भयात्॥ ४०॥

इह (या आतांच सांगितलेल्या निष्काम कर्मयोगामध्यें) **अभिक्रमनाशः** (आरंभ झालेल्या कर्माचा नाश) **न अस्ति** (असत, होत, नाहीं;) **प्रत्यवायः** (अडचण, विघ्न) **न विद्यते** (प्राप्त होत नाहीं.) **अस्य धर्मस्य** (ह्या निष्काम अशा विहित कर्मरूपी धर्माचा)

स्वल्पमपि (थोडासा सुद्धां अंश) महतः भयात् (मोठ्या भयापासून) त्रायते (तारण करितो, तारितो, तारण्यास समर्थ होतो.) सारांश, निष्काम कर्माला आरंभ केला व मध्येंच तें थांबलें तरी त्याचा नाश होत नाहीं, तसेंच कर्म करितांना कसली अडचणही येत नाहीं. शिवाय एवढेंसें कर्म केलेलें असलें तर तें मोठमोठ्या संकटांपासून कर्मकर्त्याचें तारण करितें ह्मणजे मोठमोठ्या संकटांचा नाश करितें.

नेहाभीति । नेह मोक्षमार्गे कर्मयोगेऽभिक्रमनाशोऽभिक्रमणमभिक्रमः प्रारम्भस्तस्य नाशो नास्ति। यथा कृष्यादेः। योगविषये प्रारम्भस्य नानैकान्तिकफलत्वमित्यर्थः। किंच नापि चिकित्सावत्प्रत्यवायो विद्यते। किं तु भवति। स्वल्पमप्यस्य योगधर्मस्यानुष्ठितं त्रायते रक्षति महतः संसारभयाज्जन्ममरणादिलक्षणात् ॥ ४० ॥

पूर्व०—गुरुजी! कर्म केलें असतां फल आवश्यक रीतीनें मिळतेंच असें नाहीं, हें मागें आपणच सांगितलें असून आतां त्या तसल्या कर्माची स्तुति करून कर्म करावयास सांगतां व कर्मबंधांतून सुटशील म्हणतां हें काय?

सिद्धा०—कर्म सांग झाल्याशिवाय सकाम कर्माचें फल निराबाधत्वानें मिळत नाहीं हें बरोबर आहे. व सकामकर्मामध्यें विघ्न येऊन तें बंद पडलें तर केलेल्या कर्माचाही नाश होतो हें बरोबर समजलास. उदाहरणार्थ पहा; एखादी जमीन नांगरावयास आरंभ केला, किंवा खरेदीविकरीचा व्यापार आरंभिला, अगर ज्योतिष्टोमादिकास आरंभ केला आणि मध्येंच कांहीं कारणानें कर्म बंद पडलें तर शेती व्यर्थ जाते, व्यापार बुडतो आणि ज्योतिष्टोमादिक कर्म व्यर्थ होतें! म्हणजे प्रारब्ध कर्माचा नाश होतो. पण निष्काम कर्माचें तसें नाहीं. ब्रम्हज्ञानाची अगर मोक्षाची वाट दाखविणारा जो हा निष्काम आणि ईश्वरार्पित कर्मयोग, त्याचा आरंभ केला असतां जितकें कर्म घडतें, तितक्याचें फल प्राप्त होतेंच होतें; म्हणजे त्या त्या विहित कर्माच्या मानानें चित्तशुद्धि प्राप्त होते. तेव्हां येथें कर्म करावयास सांगितलें आहे, तें

सकाम कर्म नव्हे, निष्काम कर्म आहे व तें मोक्षाच्या उपयोगी पडणारें आहे. समजलें ?

पूर्व०—हें समजलें. पण हें निष्काम कर्म करतांनाच विघ्न आलें तर !

सिद्धां०—अरे ! विघ्न तें कसलें येणार ! ईश्वरास अर्पण करण्याच्या बुद्धीनें निष्काम कर्माला आरंभ केला असतां विघ्न येण्याची काय प्राज्ञा आहे ? आलेंच एखादें विघ्न, तरीही झालेल्या कर्माचें फल मिळतें हें मागें सांगितलेंच. आतां शास्त्रशुद्धरीतीनें कर्म झालें नाहीं, कोठें कांहीं चुकी झाली, तर सकाम कर्म फुकट जातें, पण निष्काम कर्म व्यर्थ जाण्याचें कारणच नाहीं. दुसरें, रोगाची परीक्षा करीत असतां कदाचित् परीक्षा चुकेल अथवा पापकर्मानें उद्भवलेला रोग दुःसाध्य किंवा असाध्य होईल, रोगी मरेल, वगैरे जशा अडचणी येऊन इष्ट हेतु साध्य होत नाहीं तसाही येथें संभव नाहीं. कारण हें निष्काम कर्तव्यकर्म आहे. असो; तेव्हां कोणत्याही प्रकारचें संकट येण्याचा संभव नाहीं व आलें तरी त्यापासून हानि होत नाहीं.

पूर्व०—मग असलें कर्म करून शेंवटीं साधावयाचें तरी काय ?

सिद्धां०—साधावयाचें काय ? अरे सर्व काळ त्रिविधतापामध्यें बुडवून टाकणाऱ्या व मनुष्यास अत्यंत दुःख देणाऱ्या संसाराचा व जन्ममरणाचा नाश करावयाचा आहेना ? शिष्या फार काय सांगावें ! या वर सांगितलेल्या सुलभ आणि सुगम अशा वेदोक्त अगर व्यावहारिक निष्काम कर्माचा थोडासा अंश जरी आपल्या हातून धार्मिक व ईश्वरार्पण बुद्धीनें सिद्धीस गेला, थोडेंसें कर्म जरी आपल्या हातून झालें, तरी त्यापासून चित्तशुद्धि होते आणि जन्ममरणाच्या भयापासून हें कर्म आपल्यास सोडवितें. ह्मणून हा उपदेश भगवंतांनीं अर्जुनास केला आहे, व त्यास स्मृतिधर्मविहित जें युद्ध तें करण्यास लाविलें आहे.

मधुसूदनीकार, प्रपाकार, शंकरानंद, द्विवेदी यांनीं वरीलप्रमाणेंच अर्थ केला आहे. प्रपाकार भागवतांतील एक श्लोक उदाहरणार्थ घेतात :—

> "त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः
> स्वौको विलङ्घ्य व्रजतां परमं पदं ते ।

नान्यस्य बर्हिषि बलिं ददतः स्वधर्मं
धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ "

आपलीं घरें दारें सोडून तुझ्या पदाला जाण्याची इच्छा करणाऱ्या भक्तांस देवादिक पुष्कळ विघ्नें करितात. कर्मठांस मात्र यांच्याकडून त्रास पोहचत नाहीं, कारण या लोकांकडून देवांस अवदानें मिळतात! पण तूंच विघ्नसंरक्षण करणारा आहेस ह्मणून देवांसारख्या बलिष्ठ विघ्नकर्त्यांसही न जुमानतां तुझे भक्त तुझ्या पदाप्रत बिनधोक जातात.

प्रपाकारः–प्रत्यवाय=पाप असें म्हणतात. निष्कामकर्म करितांना पाप नाहीं. '**अग्नीषोमीयं पशुमालभेत**' 'अग्नी व सोम यांच्यासाठीं तयार केलेल्या पशूंस मारावें.' या हिंसेंत पाप नाहीं. हे **टीकाकार** व **द्विवेदी** सकाम कर्मानें संसार उत्पन्न होतो अशा अर्थाची टीका करितात. '**यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवामुं पुण्यचितो लोकः क्षीयते**' [छांदोग्य] 'ज्याप्रमाणें कर्मानें मिळालेला येथील लोक अगर सुख नष्ट होतें, तसेंच पुण्यानें प्राप्त झालेलें स्वर्गसुखही नष्ट होतें.–सारांश पुनः जन्ममरण प्राप्त होतें.'–**मधुसुदनीकार** '**तद्यथेहेति या निन्दा सा फले न तु कर्मणि। फलेच्छां तु परित्यज्य कृतं कर्म विशुद्धिकृत्**' [येथें निंदा केली आहे ती फळाची आहे, कर्माची नव्हे. फलेच्छाविरहित कर्म केलें असतां चित्तशुद्धि होते.] असा निष्काम कर्माचा उपयोग दर्शवितात.

सत्यानंद–या कर्मयोगाला विष्णूद्दिष्ट (विष्णुप्रीत्यर्थ केलेला कर्मयोग) असें म्हणतात. **रामानुज** 'नाश होत नाहीं' हा अर्थ भग० गी० अ० ६ श्लोक ४. यानें समर्थन करितात.

ज्ञानेश्वर–कर्माधारें राहटिजे (वागावें)। परी कर्मफळा न निरीक्षिजे। जैसा मंत्रज्ञ (देवर्षि, देवरुषी) न बधिजे (बाधा पावत नाहीं, बाधत नाहीं)। भूत बाधा ॥

वामनपंडित–फुका सेवा करूं लागे। आणि फळ कांहीं न मागे। विहित आज्ञेमध्यें वागे। फुकाची ॥ पूर्ण होतां ही फळ। जो न इच्छीच केवळ। पूर्ण न होतां काय विकळ। होणार त्याचें! ॥४०॥

येयं सांख्ये बुद्धिरुक्ता योगे च वक्ष्यमाणलक्षणा सा—

आत्मज्ञान सांगणाऱ्या सांख्यामध्यें जी बुद्धि सांगितलेली ती व बुद्धियोगामध्यें सांगितलेली बुद्धि या दोन्ही एकस्वरूपात्मकच आहेत. आतां त्या योगबुद्धीचें लक्षण आतांच पुढें सांगावयाचें आहे. ती—

व्यवसायात्मिका बुद्धि-
रेकेह कुरुनन्दन ॥
बहुशाखा ह्यनन्ताश्च
बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

कुरुनन्दन (हे कौरवकुलोत्पन्न अर्जुना!) **इह** (या मोक्षमार्गामध्यें, किंवा मोक्षाची वाट दाखविणाऱ्या कर्मयोगामध्यें) **व्यवसायात्मिका बुद्धिः** (निश्चयच आहे स्वरूप जिचें अशी बुद्धि) **एका** (एकच ह्मणजे खरी आहे.) **च** (आणि) **अव्यवसायिनां** (सद्वस्तूचें ज्ञान नसल्यामुळें ज्यांस विवेक झाला नाहीं किंवा ज्यांचा निश्चय ठरला नाहीं अशांच्या) **बुद्धयः** (बुद्धि) **बहुशाखा** (पुष्कळ फांद्या आहेत, भेद आहेत अशा) **च** (आणि) **अनन्ताः** (अगणित) असतात.–सारांश ज्यांनीं आत्मानात्मविचार करून आपली बुद्धि कायमची ठरविली असते त्यांची निश्चयात्मक बुद्धि खरी असते. पण ज्यांनीं हा विवेक केला नाहीं त्यांच्या बुद्धीस अनेक फांटे फुटून त्या अगणित वांटांनीं धांवत असलेल्या दिसतात.–

व्यवसायेति । व्यवसायात्मिका निश्चयस्वभावैकैव बुद्धिरितरविपरीतबुद्धिशाखाभेदस्य बाधिका सम्यक्प्रमाणजनितत्वादिह श्रेयोमार्गे हे कुरुनन्दन। याः पुनरितरा बुद्धयो यासां शाखाभेदप्रचारवशादनन्तोऽपारोऽनुपरतः संसारो नित्यप्रततो विस्तीर्णो भवति, प्रमा-

णजनितविवेकबुद्धिनिमित्तवशाच्चोपरतास्वनन्तभेदबुद्धिषु संसारोऽप्युपरमते। ता बुद्धयो बहुशाखा बह्व्यः शाखा यासां ता बहुशाखा बहुभेदा इत्येतत् । प्रतिशाखाभेदेन ह्यनन्ताश्च बुद्धयः, केषामव्यवसायिनां प्रमाणजनितविवेकबुद्धिरहितानामित्यर्थः॥ ४१ ॥

त्या योगबुद्धीचें लक्षण ह्मणजे निश्चयात्मकता हें होय. आत्मतत्त्वाचा निश्चय केला आहे अशी किंवा परमेश्वराला सर्व निष्काम कर्म अर्पण करून त्याच्या प्रसादानेंच मला आत्मज्ञान होऊन मोक्ष मिळेल असें मानणारी बुद्धि तिला निश्चयात्मक बुद्धि ह्मणावें. अर्जुना! मोक्ष मिळविण्याचें मार्गक्रमण चाललें असतां शुद्ध अशीं प्रमाणभूत वेदांत वाक्यें ऐकून ऐकून उत्पन्न झालेली ही निश्चयात्मक बुद्धि एकच आणि म्हणून खरी असते. ही बुद्धि कायम झाली, ज्ञानबुद्धि व योगबुद्धि कायम झाल्या म्हणजे इतर अप्रमाण, स्वकपोलकल्पित अशा बुद्धि व त्याचे पोटभेद या सर्वांचा अस्त होतो.–ह्मणून ही बुद्धि संपादन करण्याचा सांख्यशास्त्रानें, निदान आत्मज्ञान करून देण्यास उपयोगीं पडणाऱ्या निष्काम कर्मयोगानें, प्रयत्न कर व मिळवून घे.–

पूर्व०–बरें मग कणादप्रभृति लोकांनीं सांगितलेल्या इतर बुद्धींचें काय?

सिद्धां०–अरे! वेदांतशास्त्र अगर त्यालाच अंगभूत असणारा कर्मयोग यांचे ज्ञान नसल्यामुळें समुद्राच्या लाटांप्रमाणें क्षणोक्षणीं भिन्नस्वरूपानें उत्पन्न होणाऱ्या चंचल बुद्धींचे काय विचारतोस? ह्या क्षणभंगुर अनंत बुद्धि, त्यांचे भेद, पोटभेद यांची सारखी वृद्धिच होत राहते. 'मी कर्ता' 'हा मी' 'हें माझें' 'मला हें हवें, तें मिळावें' वगैरे मायेनें उत्पन्न झालेले दोष, ह्या चंचलबुद्धि कायम असल्या म्हणजे, जसेच्या तसेच राहतात! त्यांच्या योगानें जन्ममरणरूपी संसाराचा कधींच अंत होत नाहीं; तो अमर्यादपणानें नित्यशः वाढत जातो; त्याची निवृत्ति होण्याचें, संसार आटपण्याचें, चिन्ह दिसत नाहीं, आणि अशा रीतीनें प्राणी 'पुनरपि जन्मा येऊनि मरती। मरुनि पुनरपि जन्मा येती।' या घोटाळ्यांत पडतो!

पूर्व०-मग ही संसाराची बेडी सोडविण्यास कांहींच मार्ग नाहीं कीं काय!

सिद्धां०-असें कसें होईल? संसारतापानें होरपळून जाऊन त्याचा वीट आल्यानंतर श्रुति, युक्ति आणि अनुभूति यांच्या नित्य आणि भक्तिपूर्वक साहचर्यानें निश्चय ठरतो, मग विवेकबुद्धि उत्पन्न होऊन नित्य कोणतें व अनित्य कोणतें हें कळूं लागतें; शेवटीं बुद्धीला निश्चयात्मकतेचें स्वरूप आलें म्हणजे ज्या कांहीं नाना प्रकारच्या अनंत वेडगळ कल्पना असतात त्या नष्ट होतात. त्या बुद्धी नाहींशा झाल्या, चित्तशुद्धि झाली, ब्रम्हस्वरूपावर कायमपणानें बुद्धि ठसली कीं तिच्या समोर उभा कशाला राहतो आहे संसार? अभेदबुद्धि झाली कीं जन्ममरण सुटलें अथवा मोक्ष मिळाला असेंच समजावें.

पूर्व०-पण या निश्चयात्मकबुद्धीशिवाय ज्या दुसऱ्या बुद्धि त्यांना अनेकत्व कसें येतें?

सिद्धां०-त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.-जाग्यावरून एखादा 'तारा' सुटला म्हणजे त्याचे शतधा तुकडे होऊन आधार नसल्या मुळें ते जसे सैरावैरा सर्व आकाशभर धांवत सुटतात,-त्याप्रमाणें मुख्य आधारस्तंभापासून एकदां बुद्धि चळली कीं जें सांपडेल तोच आश्रय असें मानून 'आतां हें केलें म्हणजे अमुक होईल' 'क्षणभरानें दुसरें केलें म्हणजे तमुक होईल' असे अनेकविध हेतु उत्पन्न होतात. या हेतूंस पुनः पारंब्या फुटतात, त्यांना आणखी प्रतिपारंब्या फुटतात, असे एकना दोन, अनंत हेतु निर्माण होतात व हेतूंप्रमाणें बुद्धीचीही संख्या अगणितच होते.-सर्व संसार सोडून देऊन अरण्यवास पत्करलेल्या एका अर्धवट साधूला लंगोटी हवी अशी इच्छा झाल्याबरोबर हळूं हळूं त्याच्या भोंवतीं पुनश्च सगळा संसार जमला ही गोष्ट तुला ठाऊकच आहेना?-सारांश श्रुतींतील महावाक्यांवरून, किंवा शुद्ध अनुमानानें अगर खऱ्या अनुभवानें ज्यांच्या मनाला विवेक झाला नाहीं, त्यांच्या बुद्धीस अनंतत्व येऊन त्यांचा संसार अखंड कायम राहतो; तसाच मला अमुक फळ मिळावें अशी इच्छा धारण करून कर्म अगर उपासना करणाऱ्या उपासकांचाही होतो.

प्रपाकार हेंच सिद्ध करण्यासाठीं 'जाया मे स्यात्, अथ प्रजायेयेति' ' मला बायको मिळाल्यानंतर मी प्रजा उत्पन्न करीन ' ही [बृह० १।४।१७] श्रुति देतात. ' बहुशाखाः '= कामात्कामान्तरजनकाः (एका इच्छेपासून अनेक इच्छा उत्पन्न करणाऱ्या त्या बहुशाखा होत.) मधुसू० सांख्य व योगविषयक बुद्धीचें अंतिम फल एकच (मोक्ष) आहे ह्मणून बुद्धिही एकस्वरूपीं असावी असें ह्मणतात. प्रपाकार, मधुसूदनीकार, शंकरानंद व द्विवेदी कर्मयोगांत ईश्वरार्पण बुद्धि कायम असेल तरच तीस व्यवसायात्मिका ह्मणतात. ही बुद्धि तत्त्वपरायण असते हेंही सर्वांस संमत आहे. शंकरानंद 'एकैव '=आंत बाहेर सद्रूपानेंच असणारी. द्विवेदी यांनीं दिलेला एक प्रमाणभूत श्लोक—

" ततोऽन्यथा किंचन यद्विवक्षतः पृथग्दशस्तत्कृतनामरूपभिः ॥
न कुत्रचित्कापि च दुःस्थिता मतिर्लभेत वाताहतनौरिवाऽऽस्पदम्"

(आत्मतत्त्वाशिवाय अगर निष्काम भगवद्भजनाशिवाय इतर गोष्टींचा विचार करणारे व नामरूपाच्या योगानें झालेलें जगच पाहत बसणारे लोकांची बुद्धि वादळाच्या सोसाट्यांत सांपडलेल्या होडग्याप्रमाणें झोके खात राहते !)

मध्वाचार्य, रामानुजाचार्य, सत्यानंद व विद्याधिराजभट्ट यांसही वरील श्लोकाचा अर्थ अमान्य नाहीं. रामानुजांनीं असें सांगितलें आहे कीं ' आत्मा व देह हे भिन्न आहेत असें माहित असूनही आत्मस्वरूपाचा शोध न करणारे बौद्धादि व आत्मा काय आहे हें कळलें असूनही स्वर्ग प्राप्तीची इच्छा करणारे कर्मठादि हे सर्व अव्यवसायी होत.

ज्ञानेश्वराचे दृष्टांत पहा :—जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रकटी । तैसी सद्बुद्धि हे थेकुटी (लहान अल्प) । ह्मणो नये ॥ ....आणिका सारिखा बहुवस । जैसा न जोडे परिस । कां अमृताचा लेश । दैवगुणें ॥ तैसी दुर्लभ सद्बुद्धि । जिथे परमात्माच अवधि (शेवटचा आधार) । जैसा गंगेसि उदधि । निरंतर ॥ ४१ ॥

तैसे ईश्वरावाचुनि कांहीं । जिये (ज्या बुद्धीला) आणिक लाहाणें (प्राप्त करून घेणें) नाहीं । ते एकचि बुद्धि पाही । अर्जुना जगी ॥

वामनपंडित अव्यवसायी लोकांसंबंधानें ह्मणतात :—एका एका मनोरथासाठीं । यत्न करिती कोटी कोटी । मागुती निश्चय पोटीं । कार्य सिद्धीचा असेना ! ॥ होईल कीं नव्हे फळ । या चिंतनेनें तळमळ । कधीं होईल ? हे हळहळ । सुख कैचें तयांतें ? ॥ ४१ ॥

*निश्चित बुद्धि कां होत नाहीं याविषयीं पुढील तीन श्लोकांनीं सांगतात.

येषां व्यवसायात्मिका बुद्धिर्नास्ति ते—

ज्या अविद्वान लोकांना ही निश्चयात्कम बुद्धि अगर ज्ञान नसतें ते—

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ॥
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः॥४२॥

पार्थ (अर्जुना !) **वेदवादरताः** (वेदाच्या नुसत्या बाह्य शब्दार्थालाच जे मोहित झाले आहेत) **न अन्यत् अस्ति इति वादिनः** (—शब्दार्थाच्या पलीकडे-कर्माशिवाय—दुसरें कांहीं नाहीं असें जे ह्मणणारे आहेत)—असे—**अविपश्चितः** (अविवेकी किंवा कामी व भोगरत अविद्वान लोक) **यां इमां** (जी ही) **पुष्पितां** (बाहेरून रमणीय दिसणारी) **वाचं** (वाणी) **प्रवदन्ति** (बोलतात;) सारांश, वेदाच्या नुसत्या अर्थवादामध्यें मग्न होऊन कर्माशिवाय व स्वर्गसुखाशिवाय दुसरें कांहीं मिळविण्यासारखें नाहीं, दुसरा पुरुषार्थच नाहीं असें म्हणणारे फलाकांक्षी कर्मठ लोक जी बाह्यरमणीय वेदवचनें म्हणत असतात;—संबंध पुढील श्लोकांशीं आहे.—

यामिति । यामिमां वक्ष्यमाणां पुष्पितां पुष्पितवृक्ष इव शोभमानां श्रूयमाणरमणीयां वाचं वाक्यलक्षणां प्रवदन्ति । केऽविपश्चितोऽल्पमेधसोऽविवेकिन इत्यर्थः । वेदवादरता बह्वर्थवादफलसाधनप्रकाशकेषु वेदवाक्येषु रता हे पार्थ नान्यत्स्वर्गप्राप्त्यादिफलसाधनेभ्यः कर्मभ्योऽस्तीत्येवंवादिनो वदनशीलाः ॥ ४२ ॥

पूर्व०–भगवन्! मग ही सांख्यानें अगर योगानें सिद्ध होणारी बुद्धि सर्वांसच कां उत्पन्न होत नाहीं ?

सिद्धां०–पार्था! मंदबुद्धिच ते! अनेक अर्थवादांचे फल काय मिळेल, तें फल मिळण्यास साधनें काय वगैरे गोष्टी प्रकट करणारे, जे वेदमंत्र आहेत त्यांच्या बाह्य अर्थामध्येंच अविद्वान लोक रममाण होतात; वेदांचे खरे व सद्वस्तू प्रकट करणारे अर्थ गुरुमुखानें समजून न घेतां केवळ स्वर्गसुख हें फल व कर्म हेंच साधन ह्याच अर्थामध्यें रममाण होतात. आणि स्वर्गसुख आणि तें मिळवून देणारें कर्म यांशिवाय दुसरा पुरुषार्थ (ईश्वर अगर ब्रह्म असें) कांहींच नाहीं असें हे अविद्वान लोक म्हणतात. असे हें अविद्वान लोक काय करतात तर· ऐकण्याला मात्र सुंदर अशीं नादमनोहर आणि म्हणून किंशुक पुष्पांप्रमाणें दिसण्याला सुंदर–परंतु वस्तुतः निष्फल अशीं–पुढील श्लोकांत स्पष्ट केलेलीं आणि राहटगाडग्याप्रमाणें जन्ममरण देणारी–जीं वाक्यें–अथवा वाक्यें तरीं कसलीं ?–नुसती कर्णमनोहर जी जल्पना आहे, त्या जल्पनेला वश होतात! ह्यामुळें अविद्वान् लोकांची बुद्धि निश्चयात्मक होत नाहीं.–

या श्लोकावर सर्व अद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैतवादी टीकाकारांची सामान्यतः एकच प्रकारची टीका आहे ही समाधानाची गोष्ट होय. कर्ममार्ग स्वर्गसुख देण्यासाठीं नाहीं, चित्तशुद्धीसाठीं आहे, कर्मानें मोक्ष नाहीं असा सर्व टीकाकारांचा सामान्यतः आशय आहे. 'परोक्षविषया वै वेदा' 'वेदाचा अर्थ बाहेरून दिसतो तसाच तो नसतो, आंत निराळाच खोल अर्थ असतो' असें मध्वाचार्यांनीं म्हटलें आहे तेंच सर्वांस मान्य आहे. केवळ उत्तानअर्थामध्येंच निमग्न होणाऱ्यांस शंकरानंदांनीं 'बहिर्मुख' असें म्हटलें आहे. मधुसूदनीकार यांनीं अविवेकी लोकांस 'विचारानें उत्पन्न होणाऱ्या तात्पर्यार्थाविषयीं ज्ञानशून्य' असें ह्मटलें आहे 'पुष्पितां ह्मणजे देवताज्ञान अगर उपासनाविषयक बोलणें; नुसती उपासनाविषयक; ज्ञान देणारी, ब्रह्म समजावून देणारी, वाणी नव्हे.' असा प्रपाकार अर्थ करितात. 'वेदवाद' = अर्थरहित पाठ, असा सत्या-

नंद अर्थ करितात. 'मनुष्यानें वेदाचें निरर्थक पठन करूं नये,' पाखंडमतानें करूं नये अगर सकाम करूं नये' असें विद्याधिराज म्हणतात. सारांश स्वर्गसुखाच्या आशेनें केलेलें कर्म अगर उपासना आणि निरर्थक वेदपठन यांची सर्व समंजस टीकाकारांनीं खरपूस निंदा केली आहे.

ज्ञानेश्वर—म्हणती संसारी जन्मिजे । यज्ञादिक कर्म कीजे । मग स्वर्गसुख भोगिजे । मनोहर ॥ एथ हें वांचूनि कांहीं । आणिक सर्वथा सुखचि नाहीं । ऐसें अर्जुना बोलती पाही । दुर्बुद्धी ते ॥

वामनपंडित—अर्जुना कर्म म्हणजे वेल । स्वर्गादि पुष्प मोक्ष फल । आधीं वेलास येतें फूल । फल शेवटीं ॥ फल आलियावरी । वेल वाळे ज्यापरी । ज्ञान जालिया उपरी । जळे कर्म ॥ जें ज्ञान तेची मुक्ति । तेची जागृती तेची स्वप्ननिवृत्ति । परि ते ब्रम्हात्मताप्राप्ती । चित्तशुद्धीनें ॥ चित्तशुद्धी कर्ममूळा । एवं परंपरेनें मोक्षफळ । तोचि मोक्ष केवळ । आत्मबोध ॥ फळ पक्क होतां वेल । वाळे, त्यांत नुरे ओल । परी फळाहूनि पूर्वीं येतें फूल । तें घेऊं नये ॥ ज्याणें तोडिलें फूल । त्यास कैचें होय फळ । परी बाळांस सद्यः (लागलींच), कोमळ । पुष्प तोडणें आवडे ॥ पंडितांनीं हा श्लोक व हें रूपक समर्पक रीतीनें जुळविलें आहे त्याचा रस सूज्ञ वाचक चाखतीलच ॥ ४२ ॥

ते च—

आणखी ते लोक कसे आहेत व त्यांचीं वचनें कशीं आहेत हें पहाः—

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ॥
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥४३॥

कामात्मानः (इच्छा हाच आत्मा आहे ज्यांचा, इच्छापूर्ण) **स्वर्गपराः** (स्वर्ग हाच आहे मुख्यपुरुषार्थ ज्यांचा)—असे ते ज्ञानशून्य लोक आहेत. ते जी फसविणारी वाणी बोलतात ती—**जन्मकर्मफलप्रदां** (जन्म, संसार, हेंच कर्मफल देणारी अशी),—तसेंच—**भोगैश्वर्यगतिं प्रति** (भोग आणि ऐश्वर्य मिळवून देण्यासाठीं) **क्रियाविशेषबहुलां**

(अनेक प्रकारचीं कर्मे जिच्या योगानें पुष्कळशीं सांगितलीं जातात अशी)-अशीं जीं भाषणें करितात,-सारांश वरच्या श्लोकांत सांगि-तलेले अपंडित लोक वासनेचे दास व स्वर्गसुखासाठीं हपापलेले असतात; आणि ह्मणून सकाम कर्म केल्यानें संसारांत पाडणारीं व पुष्कळ भोग आणि मोठी सत्ता मिळविण्याची इच्छा करणारांना अनेक प्रकारच्या क्रिया करण्यास सांगणारीं जीं भाषणें करितात;-पुढील श्लोकांत अन्वय पूर्ण होईल.—

कामात्मान इति। कामात्मानः कामस्वभावाः कामपरा इत्यर्थः। स्वर्गपराः स्वर्गः परः पुरुषार्थो येषां ते स्वर्गपराः स्वर्गप्रधानाः। जन्मकर्मफलप्रदां कर्मणः फलं कर्मफलं जन्मैव कर्मफलं जन्मकर्मफलं तत्प्रददातीति जन्मकर्मफल-प्रदा तां वाचं प्रवदन्तीत्यनुषज्यते। क्रियाविशेषबहुलां क्रियाणां विशेषाः क्रियाविशेषास्ते बहुला यस्यां वाचि तां स्वर्गपशुपुत्राद्यर्था यया वाचा बाहुल्येन प्रकाश्यन्ते। भो-गैश्वर्यगतिं प्रति भोगश्चैश्वर्यं च भोगैश्वर्ये तयोर्गतिः प्राप्ति-र्भोगैश्वर्यगतिस्तां प्रति साधनभूता ये क्रियाविशेषास्तद्ब-हुलां तां वाचं प्रवदन्तो मूढाः संसारे परिवर्तन्त इत्य-भिप्रायः॥ ४३॥

इच्छा अगर वासना हा ज्यांचा स्वभाव बनून गेला आहे, जे वासनांच्या सर्वथैव स्वाधीन झाले आहेत व ज्यांस स्वर्ग हाच प्रधान अगर मुख्य पुरुषार्थ वाटतो; अथवा ज्यांचें ' जन्म, कर्म आणि फल हाच पुरुषार्थ आहे म्हणजे जन्मास यावें, कर्म करावें, फलभोगण्यासाठीं पुनः जन्मास यावें असा पुरुषार्थ आहे आणि म्हणून जे मोक्षाची कथा ऐकत नाहींत किंवा तिचें नांव सुद्धां घेत नाहींत; तेच विषयभोगलंपट-मीमांसक आणि अज्ञानी जन्ममरणा-च्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें भाषणें बोलतात तीं कशीं असतात तें पहा :—ज्यांच्या सकाम कर्माचें फल जन्म मरण आणि संसार हेंच आहे तें फल देणारीं वेदवाक्यें ते लोक बोलत असतात आणि येथें

व स्वर्गामध्यें उत्तम प्रकारचें भोग्य पदार्थ व उत्तम प्रकारची सत्ता व ऐश्वर्य मिळण्यासाठीं, हाच पुरुषार्थ साध्य करण्यासाठीं, उपयोगीं जीं नानाप्रकारचीं कर्मे व स्वर्ग, पशु, पुत्र वगैरे भोग्य सुखाचीं साधनें मिळवून देणारीं अनेक कर्मे ज्यांत सांगितलीं आहेत अशा प्रकारचे वेदमंत्र व वेदवाक्यें पठन करणारे मूढ लोक जन्ममरण आणि मरण-जन्म या फिरकीच्या चक्रांत सांपडून दुःख भोगतात हा अभिप्राय आहे. तात्पर्य उपभोग मिळविण्याच्या हेतूनें केलेल्या सांग अगर व्यंग कर्मांचा विपाक जन्ममरणामध्यें होतो आणि त्यामध्यें वरील अविचारी कर्मठ सांपडतात !

इतर टीकाकारही कांहीं विशेष सांगत नाहींत.

वामनपंडित—कीं वासनानदीची धारा। जन्ममरण प्रवाही नरा। सहज वाहवी, विशेष वारा। सुटला काम्यवेदोक्तकर्मांचा॥ लागावया तीरा। यत्नही करूं नेदी नरा। .... ॥ ४३ ॥

तेषां च—

आणि असल्या—लोकांची—

भोगैश्वर्यप्रसक्तानां
तयाऽपहृतचेतसाम् ॥
व्यवसायात्मिका बुद्धिः
समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां (उपभोग आणि ऐश्वर्य यामध्यें मग्न झालेल्या) **तया** (त्या कर्मं सांगणाऱ्या वेदवाणीनें) **अपहृतचेतसां** (आकर्षून, आंखडून, आंवळून टांकिलीं आहेत मनें, ज्यांचीं-असे अविवेकी व मूढ लोकांच्या—) **समाधौ** (अंतःकरणामध्यें) **व्यवसायात्मिका बुद्धिः** (सद्वस्तूचा निश्चय केला आहे जिनें, निश्चयपूर्ण झाली आहे अशी जी बुद्धि अगर ज्ञान) **न विधीयते** (-तें-असत नाहीं, मिळत नाहीं,

प्राप्त होत नाहीं.) सारांश वरील दोन श्लोकांत सांगितलेले व भोग आणि ऐश्वर्य यांतच गढून गेलेले आणि त्या वेदवाक्यांच्या वरवरच्या अर्थानेंच मतिभ्रष्ट झालेले कर्मठांच्या अंतकरणांत सद्वस्तूचा निश्चय करणारी अगर करविणारी सांख्य अगर योगबुद्धि कधीं प्रवेशच करीत नाहीं. अर्थातच वैषयिक सुखांत दंग झालेल्या पुरुषाला आत्मस्वरूपाची ओळख करून देणारी बुद्धि कशी मिळणार?

भोगेति । भोगैश्वर्यप्रसक्तानां भोगः कर्तव्यमैश्वर्यं चेति भोगैश्वर्ययोरेव प्रणयवतां तदात्मभूतानां तया क्रियाविशेषबहुलया वाचाऽपहृतचेतसामाच्छादितविवेकप्रज्ञानां व्यवसायात्मिका सांख्ये योगे वा बुद्धिः समाधौ समाधीयतेऽस्मिन्पुरुषोपभोगाय सर्वमिति समाधिरन्तःकरणं बुद्धिस्तस्मिन्समाधौ न विधीयते न भवतीत्यर्थः॥४४॥

पूर्व०—भगवन्! कर्मानें चित्तशुद्धि होते तेव्हां या कर्मठांस शेवटीं तरी ज्ञान होऊन मोक्षप्राप्ति होत असेल?

सिद्धां—अर्जुना! अरे नांव कशाला घेतोस? सर्व जन्मभर कर्म करून भोग व ऐश्वर्य मिळविण्यामध्यें जे दंग झाले, भोग व ऐश्वर्याचे जे दास झाले—नव्हे तत्स्वरूपीच बनले, तात्पर्य सर्वथैव आसक्त झाले, त्या बहिर्मुख व विषयांकडेच चित्त असणाऱ्यांची चित्तशुद्धि कसली आणि त्यांना मोक्ष तरी कसला मिळणार?

पूर्व०—असें झालें तरी केव्हां ना केव्हां त्यास विवेकबुद्धि होऊन ते मोक्षमार्गास लागतील, नाहीं बरें भगवन्?

सिद्धां—विवेकापेक्षां तुझ्या अंतःकरणांत त्या अपंडित लोकांबद्दल दया जास्त दिसते. अरे असें पहा कीं यांचें सर्वच्या सर्व अंतःकरण त्या अनेक कर्मे कराव्यास नित्यशः सांगणाऱ्या बाह्यरमणीय वेदवाक्यांनीं आपलेंसें करून टाकिलेलें असतें, व यांची तारतम्यबुद्धि दडपून टाकिलेली असते. तेव्हां जोंपर्यंत वेदांचा कर्मपर अर्थ करून कर्मामध्येंच हे विषयलंपट कर्मठ गुंग झाले आहेत, तोंपर्यंत त्यांची

चित्तशुद्धि होणेंच नाहीं. ईश्वरप्रसाद किंवा गुरूचा अनुग्रह होऊन विषयपराङ्मुख चित्त झालें, तर यांस वेदवाक्यांचा गूढ अर्थ कळून चित्तशुद्धि व्हावयाची !--असो; सर्व पदार्थ पुरुषाच्या, ब्रह्माच्या उपभोगासाठीं मात्र आहेत असा, कर्मठांच्या अंतःकरणामध्यें परमार्थाचा, निश्चय करणारी सांख्यबुद्धि अगर योगबुद्धि कधींही प्रवेश करीत नाहीं. सारांश सकाम कर्म करणाऱ्या कर्मठांस अगर उपासकांस मोक्ष मिळणें अथवा चित्तशुद्धि होणें अत्यंत अशक्य आहे, असें सांगण्याचा भगवंताचा हेतु आहे. जितकें विषयासक्त अंतःकरण जास्त तितका मोक्ष लांब जास्त आणि जन्म मरण अधिक जवळ असा मथितार्थ* आहे.

शंकरानंद व रामानुज यांशिवाय बाकीचे मला उपलब्ध असलेले टीकाकार 'समाधौ' शब्दाचा अर्थ आचार्याहून भिन्न रीतीनें करितात. **प्रपाकार** 'परमेश्वराच्या आराधनेमधील ऐकाग्र्यांत' असा, **मधुसूदनीकार** 'मीच ब्रम्ह आहे अशा प्रकारची स्थिति होते ती समाधि आणि त्यांत' असा, **मध्वाचार्य** 'ईश्वरचिंतनांत' असा, **सत्यानंद** व **श्रीधर** 'चित्तैकाग्र्यतेमध्यें' असा, याप्रमाणें निरनिराळे अर्थ देतात. **सरकार** नामक नीतिशास्त्रज्ञ समाधि ह्मणजे मोक्ष असा अर्थ करितात ! **मधुसूदनीकारही** 'हे अर्थही रूढ आहेत' इतकें मात्र ह्मणतात. प्रस्तुत प्रकरणाला आचार्यांनीं दिलेला अर्थच उत्तम आहे असें विचारांतीं दिसेल. 'समाधि' शब्द प्राचीन उपनिषदांमध्यें फारसा दिसत नाहीं. भगवद्गीतेच्या वेळेस तो प्रचारांत येऊं लागला असावा असें दिसतें; ह्मणून योगशास्त्राचा जन्म होण्याच्या सुमारास व प्राचीन उपनिषदानंतर गीतावतार झाला असें दिसतें.

म्हटलें आहेः—

सोऽहं चिन्मात्रमेवेति चिन्तनं ध्यानमुच्यते ।
ध्यानस्याविस्मृतिः सम्यक्समाधिरभिधीयते ॥

* 'तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु' असें म्हणणाऱ्या परंतु आरोग्यासाठीं उदकशांति, ग्रहानुकूलतेसाठीं ग्रहमख, पुत्रासाठीं पुत्रकामेष्टी वगैरे कर्मे करणाऱ्या विषयलंपटांनीं वरील तीन श्लोकांचें नीट मनन करावें.

(तो जो चैतन्यरूपी परमात्मा तोच मी असें जें चिंतन त्यास ध्यान म्हणावें. आणि समाधि म्हणजे ध्यानाची उत्तम अविस्मृति होय.!)

या चुकलेल्या मूढांसंबंधें ज्ञानेश्वर म्हणतातः—' जैसा कर्पूराचा राशी कीजे । मग अग्नि लावूनि दीजे । कां मिष्टान्नीं संचराविजे (मिसळावें)। काळकूट (विष) ॥ दैवें अमृतकुंभ जोडिला । तो पायें हाणोनि उलंडिला । तैसा नासिती धर्म निपजला । हेतुकपणें ॥.... जैसी रांधवणी (स्वयंपाकीण) रससोय (स्वयंपाक) निकी (चांगली) । करूनिया मोलें विकीं ॥ तैसा भोगासाठीं अविवेकी । धाडिती (घालवून टाकतात) धर्म ! ॥

वामन—एकनिष्ठ जे बुद्धि । तेचि म्हणावी समाधि ।.... ॥ ४४ ॥

य एवं विवेकबुद्धिरहितास्तेषां कामात्मनाम्—

याप्रमाणें जे लोक सद्बुद्धिशून्य आहेत त्या वासनात्मक कर्मठांस-वेद त्रिगुणात्मक दिसतात असें सांगण्याच्या उद्देशानें म्हणतात—

त्रैगुण्यविषया वेदा
निस्त्रैगुण्यो भवार्जुन ॥
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो
निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

वेदाः (वेद) **त्रैगुण्यविषयाः** (सत्त्व, रज आणि तम यांच्या योगानें उत्पन्न होणारा जो संसार, त्या संसारास प्रकट करणारे आहेत.) ज्यांना वेदांचा परमार्थ कळत नाहीं त्या कर्मठ लोकांस वेदांच्या बाह्य अर्थामुळें वासनात्मक सत्त्वादि गुणांचा उद्भव होऊन संसारांत पडावें लागतें.—म्हणून—**अर्जुन** (अर्जुना !) तूं **निस्त्रैगुण्यः** (रजतमांनीं व्यापलेल्या सत्त्वगुणविरहित, निर्वासनात्मक, निष्काम)—तसाच—**निर्द्वंद्वः** (सुखदुःखादि विपरीत भाव टाकून दिलेला), **नित्यसत्त्वस्थः** (निरंतर सात्विक गुणाचा मात्र आश्रय केलेला)

निर्योगक्षेमः (नसलेला पदार्थ मिळविणें तो योग आणि मिळालेल्याचें संरक्षण करणें तो क्षेम, या योगक्षेमाक्रिरहित–होत्साता–)–आणि–**आत्मवान्** (स्वस्वरूपाचें चिंतन करणारा)-असा हो.–सारांश, वेदाचा बाहेरील विषयात्मक अर्थच समजून घेऊन वासनेच्या योगानें कर्म करणारे अविद्वान् लोकांच्या संबंधानें पाहिलें असतां वेदासारखा अद्वितीय ग्रंथही संसारपरच होतो! म्हणून तूं आपलें मन वासनाशून्य कर. सुखदुःखाविषयीं हर्षविषाद मानूं नको; अहंकार सोडून देऊन सात्त्विकगुणाचा मात्र आश्रय कर; आपल्यास मिळेल काय व मिळाल्याचें संरक्षण कसें होईल वगैरे चिंता सोडून दे आणि नेहमीं मनोजय करून आपलें जें मूळचें स्वरूप त्याचें चिंतन करीत रहा.—

त्रैगुण्येति । त्रैगुण्यविषयास्त्रैगुण्यं संसारो विषयः प्रकाशितव्यो येषां ते वेदास्त्रैगुण्यविषयास्त्वं तु निस्त्रैगुण्यो भवार्जुन निष्कामो भवेत्यर्थः । निर्द्वंद्वः सुखदुःखहेतू सप्रतिपक्षौ पदार्थौ द्वंद्वशब्दवाच्यौ ततो निर्गतो निर्द्वंद्वो भव । त्वं नित्यसत्त्वस्थः सदा सत्त्वगुणाश्रितो भव । तथा निर्योगक्षेमोऽनुपात्तस्योपादानं योगः, उपात्तस्य रक्षणं क्षेमः, योगक्षेमप्रधानस्य श्रेयसि प्रवृत्तिर्दुष्करेत्यतो निर्योगक्षेमो भव । आत्मवानप्रमत्तश्च भव । एष तवोपदेशः स्वधर्ममनुतिष्ठतः ॥ ४५ ॥

पूर्व०–श्रीकृष्णा! वेदांच्याच योगानें परब्रह्म जाणलें जातें, वेदोक्तकर्मप्रमाणें आचरण करावें असें सांगतात आणि आपण तर वेदांची निंदा करीत आहांत हें कसें?

सिद्धां–अर्जुना! निष्कामत्वानें, ममत्वशून्य होऊन, परमेश्वराप्रीत्यर्थ जे लोक कर्म करितात, त्यांच्या चित्ताची शुद्धि होऊन नंतर ज्ञानप्राप्ति होते व ज्ञानी लोक मोक्षास जातात हा सांगितलेला प्रकार व 'भला अमुक पाहिजे' म्हणूनच वेदोक्त कर्म ममत्वाभिमानानें करणारे लोक संसारांत पडतात, हा विशेष विसरलास वाटतें? या अज्ञानी लोकांनीं केलेल्या वेदार्थाची निंदा मीं केली व आणखीही

करणार आहे. अशा लोकांस वेदांपासून जें ज्ञान होतें तें संसार वाढविण्यास व कायम ठेवण्यास कारण होतें. सत्व रज आणि तम मिळून उत्पन्न होणारें कर्म आणि तदंगभूत जें जन्ममरण ह्यांचें मात्र ज्ञान या कर्मठांस वेदांपासून होतें. म्हणून वेदांस पर्यायानें संसार-प्रकाशक असें म्हटलें.–दीपाचा उपयोग ज्ञानी लोकांस होतो व ते दीपाच्या सहाय्यानें अंधकाराचा नाश करितात. पण हाच तमोनाशक दीप अज्ञान्यांच्या हातांत पडला तर ते लोक आपल्या घरास आगही लावितील! हाच प्रकार वेदांचा आहे व ह्मणूनच त्यांस संसाराचे साहाय्यकारी असें ह्मटलें. असो–आतां, तूं मायेचे तीन गुण जे सत्त्व,* रज आणि तम यांस टाकून देऊन निष्काम हो; फलाची अशा ठेवूं नको; सुखदुःख, जयापजय, लाभालाभ वगैरे कांहीं झालें तरी त्यास, त्या द्वंद्वापैकीं (जोडीपैकीं) कोणासही, विचारांत घेऊं नको; सुखदुःखास न जुमानतां समाधानानें रहा; नेहमीं लोभ आणि अज्ञान यांचा नाश करण्याचा यत्न करून सात्त्विकवृत्तीनें शुद्ध सत्वगुणाचा (–अचंचलधैर्याचा–) आश्रय करून रहा; शरीरयात्रेसाठीं द्रव्योपार्जन करणें, व मिळविलेल्याचें रक्षण करणें, हे व्यावहारिक लोकांचे जे योगक्षेमाचे मार्ग हे प्रबल झालें तर मोक्ष मिळणें दुर्घट होईल; एतदर्थ 'आपलें कसें होईल " ही चित्ताचा विक्षेप करणारी संसारचिंता सोडून दे, आणि अप्रमत्त रीतीनें (मनाला विषयांचें स्वाधीन न ठेवितां) सदासर्वदा–सांख्ययोगांत सांगितलेल्या-आत्मस्वरूपाचें चिंतन करीत ऐस. अर्थांतच हा उपदेश केला आहे, तो तूं आपलें क्षत्रियधर्माप्रमाणें कर्तव्य करीत असतांना ही ध्यानांत बाळगिला पाहिजे.

ह्या श्लोकावर स्पष्टीकरणाच्या टिप्पण्या लिहितांना बऱ्याच टीकाकारांची पुष्कळशी धांदल उडाली आहे. येथें वेदाची उघड निंदा आहे असें वाटून कित्येकांनीं व विशेषतः द्वैतमतप्रतिपादकांनीं 'त्रैगुण्यविषय' ह्या शब्दाच्या चमत्कारिक व्युत्पत्ति दिल्या आहेत.

---

* येथील सत्त्वगुण रज आणि तम यांनीं मिश्रित आहे. पुढें सांगितलेला सत्वगुण शुद्ध आहे.

'त्रैगुण्यविषं यापयन्तिते त्रैगुण्यविषयाः (सत्वरजस्तमादि जें विष त्याचा तिरस्कार करणारे, त्यास घालवून टाकणारें ते त्रैगुण्यविषय) अशी व्युत्पत्ति अद्वैतवादी **प्रपाकार** व **सत्यानंद** आणि **विद्याधिराज** देतात! 'सत्व, रज आणि तम ज्यांत पुष्कळ आहेत अशा पुरुषांचा उद्धार होणें शक्य नाहीं असें पाहून दयार्द्रदृष्टीनें त्या पुरुषांस हितोपदेश करणारे ते वेद' अशी किंवा अशा अर्थाची व्युत्पत्ति **रामानुज** व **श्रीधर** देतात. '**सर्वे वेदास्तत्पदमामनन्ति**' (सर्व वेदांचें महातात्पर्य परमात्मस्वरूप–विष्णुस्वरूप–प्रकट करितें) ह्मणून वेदांचा कामुक लोकांस दिसणारा अर्थ मात्र येथें निंदित केला आहे, असें **सत्यानंद**, **विद्याधिराजभट्ट** आणि **मध्वाचार्य** ह्मणतात. 'आत्मवान् याचा अर्थ **विद्याधिराजांनीं** 'अहं परमात्मा न, किंतु स मम स्वामीति ज्ञानवान् (मी परमात्मा नव्हे, तो माझा स्वामी आहे, असें ज्ञान) हा केला आहे' **मधुसूदनीकार**, **श्रीधर**, **पर्वते द्विवेदी**, **चांदोरकर** वगैरे अद्वैतवादी टीकाकार **आचार्यां**प्रमाणें 'कामुक लोकांच्या संबंधानें मात्र वेद त्रिगुणात्मक आहेत' असें निरनिराळ्या दिशेनें सांगतात. **शंकरानंद** मात्र 'त्रिगुणं अव्याकृतं तस्मादुत्पन्नं जगत् = त्रैगुण्यं तदेवप्रतिपादकत्वेन विषयो येषां' (त्रिगुणात्मक जी मूळ प्रकृति, तिच्यापासून झालेले जगत् तें त्रैगुण्य. तेंच सांगण्याचा हेतु आहे ज्यांचा ते वेद होत.) अशी व्युत्पत्ति देऊन '**वेदानिमं लोकममुं च परित्यज्याऽऽत्मानमन्विच्छेदिति** (वेद, हा व तो लोक–पृथ्वी व स्वर्ग–सोडून, त्यांचा त्याग करून, आत्मचिंतन करावें अशा अर्थाची) **श्रुति** देतात. '**द्वंद्व** ह्मणजे नामरूप होय असें यांचें ह्मणणें आहे, यावरून निर्द्वंद्व म्हणजे ब्रम्हरूप असा अर्थ झाला! **वल्लभ**–' गुणत्रय उत्पन्न केल्यावर जे जीव उत्पन्न केले त्यांस कर्माचें फल सांगणारे वेद आहेत' असें ह्मणतात.

असो; तात्पर्य इतकेंच आहे कीं वासना उत्पन्न करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा त्याग करावा.

ज्ञानेश्वरः–तिहीं गुणीं आवृत। हे वेद जाण निभ्रांत!। ह्मणोनि उपनिषदादि समस्त। सात्त्विकते॥ येर, रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक। जे केवळ स्वर्गसूचक। धनुर्धरा!॥

पंडितांचा अभिप्राय प्रपाकारांप्रमाणेंच आहे. तथापि यांचें स्पष्टीकरण अनेक कारणांनीं वाचण्यासारखें आहे, तें मुमुक्षूंनीं अवश्य वाचावें. ॥ ४५ ॥

सर्वेषु वेदोक्तेषु कर्मसु यान्यनन्तानि फलानि तानि नापेक्ष्यन्ते चेत्किमर्थं तानीश्वरायेत्यनुष्ठीयन्त इति, उच्यते शृणु—

सर्व वेदोक्त कर्मांपासून जीं अनंत फलें उत्पन्न होतात, ह्मणून सांगितलें आहे, तीं जर नकोशीं आहेत, तर मग असलीं कर्में व कर्मफलें ईश्वरार्पण केलीं तरी व्यर्थच होणार अशी शंका घेशील तर ऐक, सांगतों.

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ॥
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥४६॥

उदपाने (उदकाच्या निरनिराळ्या, लहान, संचयांमध्यें, कूप, तडाग, वगैरे मध्यें) **यावान्** (जितका) **अर्थः** (कार्यभाग—प्रत्येकीं होतो—) **तावान्** (तितकाच, सर्व, कार्यभाग) **सर्वतः संप्लुतोदके** (सर्वत्र जळमय असलेल्या महासागरामध्येंही—होतो.—)—त्याचप्रमाणें— **सर्वेषु वेदेषु** (सर्व वेदांमध्यें सांगितलेल्या—सर्व कर्मांपासून जी निरनिराळी सुखप्राप्ति होते ती—) **विजानतः** (परमार्थज्ञान झालेल्या) **ब्राह्मणस्य** (ब्रम्हज्ञानी पुरुषास—समग्रत्वानें, एकदम, होते.—) तात्पर्य असें दिसतें कीं विहीरीं, तळीं वगैरे निरनिराळ्या उदकसंचयांमध्यें कोठें स्नान, कोठें पान, इत्यादि क्रिया करून आपण आपले कार्यभाग आटपून घेतों, ते सर्व कार्यभाग एखाद्या अगाध व गोड समुद्रामध्यें सहज करून घेतां येतात. तसेंच निरनिराळ्या वेदमंत्रांनीं जीं कर्में व जी फलप्राप्ति सांगितली आहे, सुखप्राप्ति सांगितली आहे, तें सर्व सुख एकदम आणि एके ठिकाणींच ब्रम्हज्ञान झालेल्या विद्वानास मिळतें. वेदकर्मांपासून—अगर व्यावहारिक कर्मांपासून होणारें सुख क्षणजीवि असतें, पण ब्रम्हानंद हा अक्षय्य सुखाचा सांठा असतो.—

यावानिति । यथा लोके कूपतडागाद्यनेकास्मिन्नु-

दपाने परिच्छिन्नोदके यावान्यावत्परिमाणः स्नानपानादिरर्थः फलं प्रयोजनं स सर्वोऽर्थः सर्वतः संप्लुतोदके तावानेव संपद्यते तत्रान्तर्भवतीत्यर्थः। एवं तावांस्तावत्परिमाण एव संपद्यते सर्वेषु वेदेषु वेदोक्तेषु कर्मसु योऽर्थो यत्कर्मफलम्, सोऽर्थो ब्राह्मणस्य संन्यासिनः परमार्थतत्त्वं विजानतो योऽर्थो विज्ञानफलं सर्वतः संप्लुतोदकस्थानीयं तस्मिंस्तावानेव संपद्यते तत्रैवान्तर्भवतीत्यर्थः। * "सर्वं तदभिसमेति यत्किंच प्रजाः साधु कुर्वन्ति यस्तद्वेद यत्स वेद" इति श्रुतेः 'सर्वं कर्माखिलं' इति च वक्ष्यति। तस्मात्प्रागज्ञाननिष्ठाधिकारप्राप्तेः कर्मण्यधिकृतेन कूपतडागाद्यर्थस्थानीयमपि कर्म कर्तव्यम् ॥४६॥

ज्याप्रमाणें व्यवहारामध्यें विहिरी, तळीं इत्यादि लहान लहान निरनिराळ्या उदकसंचयांमध्यें कोठें आचमन, कोठें स्नान, कोठें पान इत्यादि निरनिराळे कार्यभाग आपण उरकून घेतो; ते सर्वच कार्यभाग अगाध अशा गोड महासागरामध्यें एके ठिकाणींच आपल्याला साध्य करून घेतां येतात; ह्मणजे निरनिराळ्या ठिकाणीं साध्य होणारीं प्रयोजनें एका गोड समुद्रामध्यें अगर सरोवरामध्यें आपल्यास सहज उरकून घेतां येतात; अर्थात् हीं सर्व कामें एका गोड पाण्याच्या सरोवरामध्यें अंतर्भूत होतात; त्याचप्रमाणें सर्व वेदमंत्रांनीं सांगितलेल्या कर्मांपासून जें कर्मफल प्राप्त होतें तें फल, परमार्थतत्त्वाचें ज्ञान झालें आहे अशा ब्रह्मज्ञान्यास जें ब्रह्मज्ञानाचें, स्वस्वरूपज्ञानाचें फल प्राप्त होतें, त्यांतच अंतर्भूत होतें.—"**एतस्यैवाऽऽनन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति,** इति श्रुतेः" (विषयांपासून होणारे आनंद ब्रम्हानंदाचा एक अंश मात्र आहेत. ह्या अंशावरच त्यांचें उपजीवन होत असतें.) असो; तेव्हां हा ब्रह्मानंद वर दिलेल्या दृष्टांतांतील गोड पाण्याचा समुद्र होय. आणि ह्मणूनच यांत बाकीचे सर्व आनंद

---

* 'येथें–यथा कृताय विजितायाधरेयाः संयन्त्येवमेनं' हा पाठ कांहीं प्रतींत अधिक आहे.

अंतर्लीन होतात. छांदोग्य उपनिषदांत असें ह्मटलें आहे कीं ‘ज्याला ब्रह्मज्ञान झालें त्या पुरुषाला, बाकीचे लोक जें काय चांगलें कर्म करितात त्या कर्मफलापासून उत्पन्न होणाऱ्या सुखाइतकें—त्याला सुख होतें.’ ‘अर्जुना! सर्व कर्मांचा अंतर्भाव ज्ञानामध्यें होतो’ असें भगवानच अ० ४ श्लोक ३३ मध्यें सांगतील. ह्मणून ज्ञाननिष्ठेचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वीं कर्माधिकाऱ्यानें दृष्टांतांतील विहिरी, तळी वगैरेचीं कार्यें करणारीं कर्मेंच निष्कामत्वानें करावीं. तात्पर्य गोड-पाण्याचें महासरोवर मिळालें नाहीं म्हणून स्नानपानादिक क्रिया जशा आपण कूप वगैरे निरनिराळ्या तडागादिकांवरच भागवून घेतों, त्या-प्रमाणें महानंद देणारें ब्रम्हज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत लहान लहान आनंद देणारीं सात्त्विक कृत्यें व कर्तव्यें निष्कामबुद्धीनें करून घ्यावीं.

प्रपाकार, श्रीधर, मधुसूदनीकार, शंकरानंद इत्यादि सर्व अद्वैतमती टीकाकारांच्या मतें या श्लोकांत निष्काम कर्म केल्यावर चित्तशुद्धि होऊन उत्पन्न होणारा ब्रम्हानंद हा प्रत्येक विषयोपभोगापासून होणाऱ्या आनंदापेक्षां अत्यंत अधिक आहे असें भगवंतांनीं सांगितलें आहे. ‘**स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा**’ आनंदस्वरूपच त्यास मिळाल्यामुळें ब्रम्हज्ञास अत्यानंद होतो’ ‘विषयसुखें हीं ब्रम्हानंदाचा एक अंश मात्र आहेत.’ अशा श्रुतिही समर्थनार्थ देतात. तात्पर्य वेदोक्तकर्में सकामत्वानें केलीं असतां जें फलजन्य सुख होतें त्यास आपण आंचवूं अशी शंका कोणास येईल तिचें निराकरण या श्लोकांत करून निष्काम कर्मानें चित्तशुद्धि व पुढें ज्ञानमार्गानें ब्रह्मज्ञान, हीं प्राप्त झालीं असतां अत्यंत आनंद होतो. किंबहुना आपण आनंदस्वरूपच होऊन जातों असें या श्लोकांत सांगितलें आहे, असें अद्वैतमतधारकांचें म्हणणें आहे. ‘पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा वगैरे **दर्शनामध्यें** निष्काम कर्म करावें असा जो अर्थ सांगितला आहे, तोच वेदतात्पर्य जाणणाऱ्या ब्रम्हज्ञ पुरुषासही साध्य होतो असें **प्रपाकार** म्हणतात. तात्पर्य वेदाचा खरा अर्थ ब्रम्हपरच आहे, वेद त्या ब्रम्हपदाचीच स्तुति करितात म्हणून वेदतात्पर्य समजून घेऊन कर्तव्यकर्म करावें. **वल्लभ** म्हणतातः—

'आनन्दं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कदाचन' ब्रह्मानंद जाणणाऱ्याला कसलीच भीति उरत नाहीं.' **'तमेव विदित्वाऽति मृत्युमेति'** ब्रम्ह जाणल्यानंतर मरण नाहीं.' अशा श्रुति अर्थ समर्थनार्थ देतात. **मध्व**:–'ब्राह्मण याचा अर्थ अपरोक्षज्ञानी असा करितात. **सत्यानंद** 'विजानतः' याचा अर्थ परोक्षज्ञानी जो त्याचे' असा करितात. दुसरा अर्थः 'सर्वतः संप्लुतोदके' ह्मणजे प्रलय; उदपान म्हणजे हरि, विष्णु; तेव्हां प्रलयकालींसुद्धा विष्णु प्रसन्न असतील तर जसे आपले इष्ट हेतु साध्य होतात त्याचप्रमाणें वेदतात्पर्य जाणणाऱ्याचेही सर्व अर्थ सिद्ध होतात! **विद्याधिराज** ही 'वेदफल' म्हणजे ज्ञान होय असें म्हणतात.

रामानुजांनीं या श्लोकाचा अर्थ केला आहे तो पहाः–ज्याप्रमाणें सर्व बाजूंनीं जलमय असलेल्या महासागरामधून आपल्यास हवें तितकेंच पाणी मनुष्य ग्रहण करितो, त्याप्रमाणें मुमुक्षू पुरुष आपल्यास हवें तेंच वेदामधून ग्रहण करितो. यांच्या अर्थसरणीनें 'जितका;' 'तितका' हे मूळ श्लोकांत शब्द आहेत ते दोन दोनदां घ्यावे लागत नाहींत. बाकींच्या टीकाकारांनीं हे शब्द दोन दोनदां घेतले आहेत. यांनीं वेदसंरक्षणासाठीं असा अर्थ केला हें उघड आहे.

प्रो० **द्विवेदी** खेरीज करून बाकी बहुतेक अद्वैती व सर्व द्वैती आणि विशिष्टाद्वैती टीकाकारांचा कटाक्ष वेदांचें प्रामाण्य कायम ठेवण्याचा आहे. प्रो० **द्विवेदी**प्रमाणें मीही असें म्हणतों कीं सकाम कर्मे करावयास सांगणाऱ्या वेदमंत्रांची भगवान् निंदा करीत आहेत हें प्रस्तुत प्रकरण आहे व चित्तशुद्धि करणाऱ्या निष्काम कर्माचा गौरव करावयाचा आहे; कारण चित्तशुद्धीनें मात्र ज्ञान–ब्रह्मज्ञान–साध्य होतें. म्हणून येथें वरवर तरी, सकृद्दर्शनींच, कर्मठांच्या मतें सकाम कर्म करण्यास सांगणाऱ्या वेदमंत्रांची निंदा आहे हें सिद्ध आहे.

ज्ञानेश्वर ही बहुतेक रामानुजाप्रमाणेंच अर्थ करितातः–जरी वेदें बहुत बोलिलें । विविध भेद सूचिले (सुचविले) । तऱ्ही आपण हित आपुलें । तेंचि घेणें (घ्यावें) ॥ जैसा प्रगटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती । तरी तेतुलेही (तितकेही) काय चालीजती (चा-

ळले जातात) ? । सांगे मज ॥ कां उदकमय सकळ । जऱ्ही जाहालें महीतळ । तरी आपण घेणें केवळ । आर्तीच जोगें (इच्छे पुरते) ॥ तैसे जे ज्ञानी होती । ते वेदार्थातें विवरिती (स्पष्ट करितात) । मग अपेक्षित ते स्वीकारिती । शाश्वत जें ॥

वामनपंडित मधुसूदनीकाराप्रमाणें म्हणततातः नाना क्षुद्रें जळें । जीं जीं साधितीं क्षुद्रफळें । कार्यें घडतीं सकळें । जळीं खोल एकाचीं ! ॥ नाना क्षुद्र कामना । सिद्ध होतां, जें सुख जना । तें अनुभवितां एका निरंजना । सकळ सुखें ब्रह्मनिष्ठातें ॥ विषय सुखें दुःखमय कशीं आहेत याचें विवरण पंडितांनीं फार चांगलें केलें आहे. अर्थ समर्थनासाठीं ‘ **सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म, यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान्कामान्सह ब्रह्मणा विपश्चिता ।** ’अशी श्रुति देतात. ब्रह्म हें सत्य आहे, ज्ञान आहे, अनन्त आहे, तें परम तत्त्व बुद्धिरूपी गुहेंत आहे हें ज्यास समजलें तो ब्रह्मानन्दासह सर्व विषयसुखांचा एकदम अनुभव घेतो. ॥ ४६ ॥

वरील श्लोकाष्टकांतील ३९ व्या श्लोकांत प्रथमतः अज्ञानी मनुष्याला, ज्या मनुष्याला ब्रम्ह आणि आत्मा यांचें ऐक्य समजत नाहीं व ह्मणून त्याच्यावर श्रद्धा नाहीं त्याला चित्तशुद्धि संपादन करावयास लागणाऱ्या कर्मांची स्तुति करून संसारनाश हें त्या कर्माचें फल आहे, असें सांगितलें आहे. दुसऱ्या म्हणजे ४० व्या श्लोकांत या निष्काम कर्माचा नाश होत नाहीं व संसारसागर सुखानें तरून जाण्यास हें कर्म म्हणजे उत्कृष्ट नौका आहे असें कथन केलें आहे. नंतर ४१ व्या श्लोकांत निष्काम कर्म करण्यास अवश्यक साधन जें निश्चयात्मक बुद्धि तिचें संकीर्तन केलें आहे. ‘ सर्वत्र परमेश्वर भरला आहे, व माझें सर्व कर्म मी त्यासच अर्पण करित आहे, माझें असें कांहींच नाहीं, ईश्वराचा अनुग्रह झाला तरच मला मोक्ष मिळण्याचा मार्ग म्हणजे चित्तशुद्धि हस्तगत होईल,’ असा जो निश्चय त्यास निश्चितबुद्धि म्हणावें. पुढें ४९ व्यां श्लोकापर्यंत वासनायुक्त बुद्धीनें वेदोक्त कर्म करणाऱ्या अज्ञानी लोकांचें निंद्य आचरण, त्यांचा घोंटाळा आणि असमाधानजन्य दुःख व जन्ममरण यांचें फारच सुरेख वर्णन

आलें आहे. नंतर निश्चय झालेला पुरुष कसा असावा व स्वस्वरूपाप्रत पावलेल्या जीवन्मुक्ताचा आनंद किती 'अमर्याद असतो या विषयांचें संकीर्तन ४९ श्लोकांचा उत्तरार्ध व ४६ श्लोक यांत अनुक्रमें केलें आहे. कर्मठ लोकांच्या कर्ममार्गाचें खंडनही तेथेंच आलें आहे.

कामना ठेवून वेदोक्तकर्में करणारे कर्मठ वेदांत 'कर्म करावें व कर्माचें फल स्वर्गसुखादि भोग व ऐश्वर्य यांत परिणत होतें' असें म्हणतांत. भगवंतांनीं यांस इतकेंच उत्तर दिलें आहे कीं असल्या कर्मानें कर्मनाश अथवा संसारनाश कधींही व्हावयाचा नाहीं; अंतःकरणास स्थिरता आणि समाधान प्राप्त व्हावयाचीं नाहींत; आणि चित्तशुद्धि झाल्यानंतर ज्ञानमार्गानें नित्य, निरंजन, निर्विकार अशा ब्रम्हसुखाचा आस्वाद घेण्याला व शेवटीं तद्रूप होण्याला तुम्हांस संधीच सांपडावयाची नाहीं! मार्टिनो नामक प्रसिद्ध नीतिमीमांसक म्हणतातः 'Self is the centre and essence of all Sin, and the *surrender of self,'* the one simple condition of union with God' (अहंकार, मीपणा, हा सर्व पापाचा उगम आणि मूलद्रव्य आहे. आत्मत्याग केल्याशिवाय ईश्वराशीं एकरूप होणें शक्यच नाहीं). ही पूर्वतत्वज्ञ ख्रिस्त भक्तांचीं वाक्यें आहेत. त्यांचा एक अर्थ प्रस्तुत प्रकरणास उपयोगी असा मार्टिनो साहेबांनीं केला आहे. ते म्हणतातः 'the Will, whenever it goes astray, follows the direction of *individual* tendency and wish,-the forces of the Ego unrestrained by reverence for a good that is not ours.' (जेव्हां जेव्हां इच्छा, कामना, मार्गभ्रष्ट होते, तेव्हां तेव्हां ती अहंकाराच्या कलास व इच्छेस पूर्णपणानें वश असते. हा कल व ही इच्छा हे अहंकाराचे वाहक आहेत. जें व्यक्तीचें सुख नव्हे, अथवा जें परमात्म्याचें सुख आहे, त्या सुखविषयीं अनादर उत्पन्न होऊन हे अहंकाराचे घोडे उच्छृंखल झाले म्हणजे मानवी वासनांचा रथ कसा मार्गभ्रष्ट होईल हें सांगावयास नकोच!) मार्गभ्रष्ट झालेल्या मनुष्याला हजारो वाटांनींही इष्ट देश सांपडत नाहीं हें सर्वानुभूतच आहे.

निश्चयात्मिका बुद्धि यांत बुद्धि=श्रद्धा असा अर्थ चतरजी नामक विद्वान ग्रंथकारानें केला आहे. ईश्वर एकच आहे, अद्वितीय आहे, त्याला सजातीय अगर विजातीय असा दुसरा कोणीच नाहीं असा जो दृढ निश्चय त्याचें नांव निश्चयात्मिका बुद्धि. या संबंधानें व ४२, ४९, ४६ श्लोकासंबंधानें बायबलमधील रोमन्स हा भाग वाचावा अशी यांची शिफारस आहे. 'ईश्वराचें पूर्ण ज्ञान व्हावें ह्मणून जीवास अमर केलें आहे' असें ख्राइस्ट म्हणतो [पहा जानचें शुभ-वर्तमान अ० १७] व पूर्णावस्था प्राप्त होते तेव्हां,-ईश्वराशीं प्रत्यक्ष परिचय होतो तेव्हां-अपूर्ण सृष्टीवरील प्रेम नष्ट होतें. [पहा कोरिंथिअन्स अ० १०] मनुष्यांस सात्त्विक गुणांची प्राप्ति झाली नाहीं, कारण निश्चयात्मकबुद्धि अगर विश्वास न ठेवितां केवळ कायद्याच्या शब्दार्थालाच ते मोहित झाले.' [पहा रोमन्स अ० ९]. 'बायबलच्या नियमाप्रमाणें कर्म केलें म्हणजे पुरुषार्थ साध्य होतो-जीव पवित्र होतो, असें नाहीं; नियमांनीं फक्त पापाचें ज्ञान होतें. नियमांनीं तामस गुणांस प्रकटता येते. विश्वास, निश्चयात्मकबुद्धि, उत्पन्न झाली ह्मणजे नियमांस अंधत्व येतें ह्मणजे आपण निश्चयात्मक विश्वासबुद्धीनें वागावें, नियमांच्या शब्दार्थाकडे लक्ष्य देऊं नये. जे आपण परमात्मभजनीं लागलों व विषयभजन सोडून देतें झालों त्यांच्यामध्यें ईश्वराचा पूर्ण सात्विकगुण अवतीर्ण होईल. [पहा रोमन्स अ. ३,४,७ व ८].

तव च—

आणि तुझा तर—

कर्मण्येवाधिकारस्ते
मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते
सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

ते (तुझा) कर्मणि एव (कर्म करण्याचा मात्र) अधिकारः

(अधिकार आहे); **कदाचन** (केव्हांही) **फलेषु** (फल मिळण्याच्या कामीं) **मा** (-अधिकार आहे असें समजूं-नको). **कर्मफलहेतुः** (कर्माचें फल मिळावें असा हेतु ज्याचा आहे असा) **मा भूः** (होऊं नको) **तु** (पण-तरी-) **ते** (तुझी) **अकर्मणि** (कर्म न करण्यामध्यें) **सङ्गः** (संगति, इच्छा भक्ति) **माऽस्तु** (-असूं देऊं-नको). -सारांश भगवान सांगतातः-तुझा अधिकार, केवळ, विहितकर्म करणें इतकाच आहे. आपल्यास फल मिळेल कीं नाहीं, मिळालें तर काय मिळेल, वगैरे विचार अगर आशा करण्याचें तुझें कामच नाहीं; म्हणून फलाच्या आशेनें केव्हांही कर्म करण्यास प्रवृत्त होऊं नको. ' फळच मिळावयाचें नाहीं. मग कर्म कशाला करूं?' असेंही विचारूं नको, विहित कर्म न करणें हें तुझें कर्तव्य नाहीं, व कर्मसंन्यास करण्याला तुला अधिकारही नाहीं.-

कर्मणीति । कर्मण्येवाधिकारो न ज्ञाननिष्ठायां ते तव । तत्र च कर्म कुर्वतो मा फलेष्वधिकारोऽस्तु कर्मफले तृष्णा मा भूत्कदाचन कस्यांचिदप्यवस्थायामित्यर्थः। यदा कर्मफले तृष्णा ते स्यात्तदा कर्मफलप्राप्तेर्हेतुः स्याः, एवं मा कर्मफलहेतुर्भूः । यदा हि कर्मफलतृष्णाप्रयुक्तः कर्मणि प्रवर्तते तदा कर्मफलस्यैव जन्मनो हेतुर्भवेत् । यदि फलं नेष्यते किं कर्मणा दुःखरूपेणेति मा ते तव सङ्गोऽस्त्वकर्मण्यकरणे प्रीतिर्मा भूत् ॥ ४७ ॥

पूर्व०—भगवंता ! ब्रम्हज्ञान्याला जर सर्व प्रकारचा संपूर्ण आनंद प्राप्त होतो तर कर्म करून चित्तशुद्धि करावयाची, मग ज्ञानसंपादन करावयाचें, ही यातायात मला कां सांगतां? मी ज्ञानमार्गाचेंच अवलंबन करितो.

सिद्धां०—छेः! अर्जुना ! ब्रम्हज्ञान मिळविण्याला तूं अद्यापि अधिकारी झाला नाहींस. कारण 'हा मी,' 'हा तूं,' 'हें माझें,' 'हें तुझें' असें अज्ञान तुझ्यामध्यें कायम आहे; म्हणून तुझी योग्यता कर्म करण्याचीच आहे. कर्ममार्गच तुला योग्य आहे.

पूर्व०—बरें तर मला कर्मफलाचा उपभोग तरी असूं दे; ब्रम्ह-सुखही नाहीं आणि कर्मसुखही नाहीं, असा मी सुखशून्यच राहणार, नाहीं कां ?

सिद्धां०—काय वेडा आहेस ? कर्माच्या फलाची आशा ठेवून तूं कर्म करणार म्हणजे निष्काम कर्मानें जी चित्तशुद्धि व्हावयाची तिला तूं मुकणार नाहींस काय ? चित्तशुद्धीनंतर महावाक्यांच्या श्रवणानें व निदिध्यासानें ज्ञान व ब्रह्म यांचा साक्षात्कार होऊन जो परमावधीचा आनंद व्हावयाचा त्यास तूं मुकणार वाटतें ?—असें करणें म्हणजे आंब्याचें फळ येण्याची व पिकण्याची वाट न बघतां झाडांस मोहोर पाहिल्याबरोबर तो तोडून खाण्यासारखें होय !—पार्था ! असें करूं नको. तुला कोणतीही अवस्था प्राप्त झाली तथापि कर्मफलाची आशा केव्हांही धारण करूं नको.—व वेदशास्त्रनिषिद्ध कर्म करूं नको.—कारण सकाम कर्म करावें आणि फळ मिळवावें, असें तुला वाटूं लागलें कीं त्या कर्मफलाचा उपभोग घेण्यासाठीं संसाराचें व जन्ममरणाचें चक्र तुझ्यापाठीमागें लागलेंच असें समज म्हणजे जन्मरणाला तुझा तूंच कारण झालास असें समज !—ही आपल्या हातानें आपल्या पायावर कशाला धोंड पाडून घेतोस ? कर्म करणारा मीच आहे असा अभिमान धरिला. त्याचें फलही मलाच मिळणार अशी आशा धरिली. म्हणजे जन्म प्राप्त होतें, जन्म झाल्यावर कर्म होतें, कर्मानें जन्म मिळतें ! हें रहाटगाडगें लोभ आहे तोंपर्यंत अखंड चालवायचेंच ह्मणून म्हणतों—बाबा ! बंध उत्पन्न करणाऱ्या कर्मफलाची आशा ठेवून कर्म करूं नको.

पूर्व०—फलाची आशा ठेवावयाची जर नाहीं तर मग कर्म तरी कशाला करूं ? ती कर्माची दुःखदायक यातायात तरी कशाला हवी ?

सिद्धां०—अशासाठीं कीं तुझ्या चित्तांतील अहंकारबुद्धि नष्ट व्हावी. परमेश्वराला सर्व क्रिया व सर्व क्रियाफळें अर्पण केलीं म्हणजे चित्तशुद्धि होते. तूं कर्मच करावयाचें नाहीं असें आळसानें अगर अविश्वासी झालेल्या बुद्धीनें म्हणूं नयेस. आळसानें कर्मच केलें नाहींस तर ज्याच्या साहाय्यानें चित्तशुद्धि, ज्ञान,

साक्षात्कार वगैरे होऊन तुला मोक्ष मिळणार त्या देहाचें संरक्षण व्हावयाचें नाहीं. कर्मत्याग करण्याइतकें सामर्थ्यही तुला अद्यापि प्राप्त झालें नाहीं म्हणून तुला श्रद्धेनें कर्म केलेंच पाहिजे. मात्र पुढचा जन्म टाळण्यासाठीं निष्कामबुद्धीनें तें केलें पाहिजे. एतावता तुला युद्ध केलेंच पाहिजे.

मधुसूदनीकार, प्रपाकार, श्रीधर, शंकरानंद द्विवेदी वगैरेंचा अर्थ वरीलप्रमाणेंच आहे. 'कर्म' म्हणजे युद्धच नव्हे, तर सामान्यतः सर्व कर्म असें **मधुसूदनीकार** म्हणतात तें नीटच आहे. ज्ञानाला अधिकार नाहीं अशा मुमुक्षूनें स्वधर्मानुष्ठान केलें नाहीं तर त्याला तें अकरण प्रतिबंधक होतें, सारांश ज्ञान होईपर्यंत कर्मत्याग इष्ट नाहीं असें **शंकरानंद** म्हणतात, वल्लभ म्हणतातः—

'तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता'

(जोंपर्यंत वैराग्य उत्पन्न झालें नाहीं तोंवर कर्म केलेंच पाहिजे.) आशेच्या तृप्तीसाठीं मात्र कर्म नको असें **प्रपाकार** सुचवितात.

मध्वाचार्य म्हणतातः—'येथें वासनेचा निषेध केला आहे वासनारहित कर्म केलें म्हणजे परमेश्वर प्रसन्न होतो. यावरून आत्मा व परमात्मा यांत ऐकात्म्य होणें शक्य नाहीं.' **सत्यानंद** हें सांगून आणखी विशेषतः म्हणतात कीं कर्म फलद्रूप होण्याचें ईश्वराधीन आहे आणि कर्म करणें मानवाचें कर्तव्य आहे. आंग्लभाषेंतील Man proposes and God disposes ही म्हण आणि **'मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्र नीयते'** (?) वगैरे हीं समानार्थकच आहेत. हे स्वामी 'जिवंत राहूं इच्छिणाऱ्या मनुष्यानें कर्म केलेंच पाहिजे' हा **ईशावास्यांतील** दुसरा मंत्र समर्थनार्थ देतात. कर्म करण्याचा अधिकार आहे तरी 'मी अकर्ता आहें असें मान' हें **रामानुजांचें** सांगणें आहे.

चतरजी नामक विख्यात बंगाली ग्रंथकारांनीं बायबल नामक ख्रिस्ती पवित्रपुस्तकांतील उतारे दिले आहेत. 'जेव्हां तूं सत्कर्म करशील तेव्हां डाव्या हाताला सुद्धां कळूं नये, इतक्या गुप्तपणें सत्कर्म कर.' 'जें काय कर्म करशील तें ईश्वराला प्रिय होईल असें

कर' ' आळशी राहूं नको ' ' ईश्वराची उपासना कर ' ' ईश्वरावर पूर्ण निष्ठा असल्यामुळें जो ईश्वरी तत्त्वांचा प्रसार करितो, तो संसारांत पडत नाहीं.'

ज्ञानेश्वरः—आम्ही समस्तही विचारिलें । तंव ऐसेंचि हें मना आलें । जें न सांडिजे तुवां आपुलें । विहित कर्म । ....हें सत्क्रियाचि आचरावी । हेतुविण ॥

पंडितांचें एक दोन दृष्टांत समर्पक आहेतः—समुद्र बुडवी खरा । तथापि जाती द्वीपांतरा । धनें मेळवून येती घरा । दृढ नौका आश्रयें ॥ कर्में करितां जन्ममरण । तथापि निष्कामपण । भवसमुद्रीं तारू जाण । पाववी ब्रह्मात्मतेसी ॥ राजसेवेविण । लभ्य नव्हे थोरपण । तेथें जें घातुक गुण । तास्कर्यादि (चोरटेपणा वगैरे) टाकावे ॥ हे गोष्टी आइकता । भिऊन आपल्या घाता । राजसेवाच टाकितां । पद प्राप्ति (मोठेपणा) न घडे ! ॥........**कर्मणा पितृलोकः** (कर्म केलें असतां मनुष्य पितृलोकास जातो) या श्रुतीचें विवेचन असें करितातः—कर्म (सकाम अगर निष्काम) न अर्पितां ईश्वरीं । तें अवश्य आपला गुण करी । जन्म मरण हें तरी । अढळचि कीं ॥ ह्याचें स्पष्टीकरण पुढील श्लोकांत आहे ॥ ४७ ॥

यदि कर्मफलप्रयुक्तेन न कर्तव्यं कर्म कथं तर्हि कर्तव्यमित्युच्यते—

अ०—कर्म फलाच्या आशेनें जर कर्म करणें अनिष्ट आहे, तर हें क्लेशात्मक कर्म करायचें तरी कसें?

भग०—सांगतों ऐक.—

योगस्थः कुरु कर्माणि
सङ्गं त्यक्त्वा धनंजय ॥
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा
समत्वं योगं उच्यते ॥ ४८ ॥

धनंजय (संपत्ति, स्वर्गादिसुख, यांस जिंकणारा, हीं तुच्छ म्हणून टाकून देण्याची योग्यता आहे ज्याला अशा अर्जुना !) **सङ्गं त्यक्त्वा** (मी कर्ता आहें व मलाच फल मिळेल असा अभिमान अगर लोभ टाकून देऊन)–आणि–**सिद्ध्यसिद्ध्योः समः भूत्वा** (आपलें कर्म फलद्रूप अगर निष्फळ झालें तरी मनाची समता कायम ठेवून)–व– **योगस्थः** (ईश्वराच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा ठेवून समतेनें व निर्लोभपणानें वागणारा–असा होऊन) **कर्माणि** (सर्व विहित कर्में) **कुरु** (कर)–सारांश कर्म करावयाचें तें परमेश्वरास वासना-शून्यत्वानें अर्पण करावयाचें, ' मी कर्ता असा अभिमान ठेवावयाचा नाहीं, लाभ, हानी झाली तरी चित्ताच्या समतेचा भंग होऊं द्यावयाचा नाहीं [अ० २ श्लोक ३८ पहा] अशी तुझी वृत्ति असूं दे.–**समत्वं** (समत्व–ठेवणें यालाच–) **योगः उच्यते** (योग असें म्हणतात.).

योगस्थ इति । योगस्थः सन्कुरु कर्माणि केवलमीश्वरार्थं, तत्रापीश्वरो मे तुष्यत्विति सङ्गं त्यक्त्वा, धनंजय । फलतृष्णाशून्येन क्रियमाणे कर्मणि सत्त्वशुद्धिजा ज्ञानप्राप्तिलक्षणा सिद्धिस्तद्विपर्ययजाऽसिद्धिस्तयोः सिद्ध्यसिद्ध्योरपि समस्तुल्यो भूत्वा कुरु कर्माणि। कोऽसौ योगो यत्रस्थः कुर्वित्युक्तमिदमेव तत्सिद्ध्यसिद्ध्योः समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥

सि०—हे धनंजया ! संपत्तीस व स्वर्गादिसुखांस तुच्छ मानणाऱ्या अर्जुना ! योगामध्यें राहून कर्में कर.

पू०—महाराज ! योग म्हणजे काय ?

सि०—योग म्हणजे कर्मफल प्राप्त होवो अगर न होवो, चित्ताचें समाधान व समता सोडून न देतां केवळ परमेश्वरास अर्पण करण्याच्या बुद्धीनें कर्में करणें यास योग म्हणतात. ईश्वर माझ्यावर प्रसन्न होईल असा सुद्धां लोभ व 'मी करणारा' असा अभिमान येथें असतां उपयोगी नाहीं. असो; तेव्हां फलाशाविरहित कर्म केलें असतां ज्ञानाच्या उत्पत्तीस उपयोगी पडणारी चित्तशुद्धि प्राप्त होते हें खरें. पण हें फल मिळालें किंवा–कांहीं कारणानें–मिळालें नाहीं, तरी मनाची समता

कायम ठेवून–सारांश हर्षखेदांनीं चित्ताचा भंग होऊं न देतां मुमुक्षूनें यज्ञयुद्धादि सर्व स्वकर्म केलें पाहिजे. असेंच तूंही कर. चित्ताच्या समतेचा भंग कालत्रयीं होऊं न देणें यालाच योग म्हणतात बरें! सारांश 'कर्म करणें' हेंच आपलें कर्तव्य आहे–दृष्ट अगर अदृष्ट–फळ मिळण्याची आशा न करणें व चित्ताचें समत्व ठेवणें हींही आपलीं कर्तव्यें आहेत असें समजून कर्म कर.

अद्वैतवादी टीकाकारांचा वरीलप्रमाणेंच अर्थ आहे. 'योग म्हणजे चित्तवृत्तीचा निरोध किंवा अमृतस्वरूपीं मग्नता' असें **पतंजलीकृत** लक्षण **द्विवेदी** देतात. 'सिद्धि' म्हणजे आत्मस्वरूपाची प्राप्ति असें **सरकार** समजतात. '**योगस्थ**'=भगवंताकडे ज्यांचें चित्त सर्वस्व आहे तो मनुष्य, असें **वल्लभ** म्हणतात. **शंकरानंद** 'सम' याचा अर्थ ब्रह्म आणि 'सिद्धि' याचा चित्तप्रसक्ति असा अर्थ करितात.

रामानुज.—'संगं'=राज्य बंधु वगैरे विषयींचें ममत्व. 'योग'= चित्ताचें समाधान. **मध्य, सत्यानंद** वगैरे 'योगस्थ'=ज्ञान प्राप्त-होण्यास साधन जें कर्म तें करण्यास अधिकारी व फलाविषयीं अन-धिकारी–सारांश ईश्वराच्या प्रसन्नतेसाठीं कर्म करणारा.

चतरजीः–योग=ईश्वराची अनन्यभक्ति. ईश्वर प्रसन्न होईल ही इच्छा. 'कर्तव्य केल्यावर असें म्हणावें कीं आम्ही निष्काम सेवक आहोंत व आम्ही कर्तव्य म्हणून कर्तव्य केलें.' **ल्यूक.**

निष्काम कर्म ईश्वरास समर्पिलें असतां तें बंध देणारें होत नाहीं याला **पंडितांचा** दृष्टांतः—बचनाग विष मारी। तो देतां वैद्याचे करीं। तो त्याचा रस करी। ज्या रसें आरोग्य देहासी॥ ईश्वरार्पित कर्में बंधप्रद होत नाहींत याचा विस्तार तिसऱ्या व नवव्या अध्यायांत येणारच आहे. ॥ ४८ ॥

यत्पुनः समत्वबुद्धियुक्तमीश्वराराधनार्थं कर्मैतस्मात्कर्मणः—

पू०–भगवंता! चित्ताची समता सदैव ठेवून ईश्वरार्पणबुद्धीनें निष्काम कर्म करणें अवघड आहे, सकाम कर्म करणें सोपें आहे नाहीं बरें? मग सकाम कर्मच कां करूं नये?

सि०—सकाम कर्मापेक्षां निष्काम कर्म फार श्रेष्ठ आहे. पहा. सांगतों कसें तें—

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ॥
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥४९॥

धनंजय (अर्जुना!) **बुद्धियोगात्** (बुद्धियोगापेक्षां, ईश्वरास अर्पण केलेल्या निष्काम कर्मापेक्षां) **कर्म** (सकाम कर्म) **दूरेण हिअवरं** (अतिशय अधम-आहे-)--ह्मणून-**बुद्धौ** (बुद्धियोगाला) **शरणं अन्विच्छ** (आपला आश्रय आहे असें मान-शरण जा- **फलहेतवः** (केलेल्या कर्माचें फळ मिळावें असा ज्यांचा हेतु असतो असे लोक) **कृपणाः** (नीच, अज्ञानी, पामर आहेत.-) सारांश बुद्धीनें मात्र कळणाऱ्या निष्काम आणि ईश्वरार्पित कर्मापेक्षां आशेला तृप्त करून जन्ममरण देणारीं सकाम कर्में अत्यंत नीच असतात. ह्मणून तूं बुद्धियोगाचा आश्रय कर. आशा ठेवून कामें करणारे लोक फारच अज्ञानी असतात.

दूरेणेति । दूरेणातिविप्रकर्षेण ह्यवरं निकृष्टं कर्म फलार्थिना क्रियमाणं, बुद्धियोगात्समत्वबुद्धियुक्तात्कर्मणो जन्ममरणादिहेतुत्वाद्धनंजय । यत एवं योगविषयायां बुद्धौ तत्परिपाकजायां वा सांख्यबुद्धौ शरणमाश्रयम-भयप्राप्तिकारणमन्विच्छ प्रार्थयस्व, परमार्थज्ञानशरणो भवेत्यर्थः। यतोऽवरं कर्म कुर्वाणाः कृपणा हीनाः फलहेतवः फलतृष्णाप्रयुक्ताः सन्तः 'यो वा एतदक्षरं गार्ग्यविदि-त्वाऽस्माल्लोकात्प्रैति स कृपणः' इति श्रुतेः ॥ ४९ ॥

अर्जुना! समत्वबुद्धि ठेवून निष्कामत्वानें कर्म करणाऱ्या व त्या-योगें आत्मज्ञानाचा मार्ग जवळ करणाऱ्या मुमुक्षूच्या निर्लोभ कर्मा-पेक्षां कामी ह्मणजे फलाची आशा ठेवून कर्म करणाऱ्या आणि ह्मणूनच बुद्धिशून्यत्वानें कर्म करणाऱ्या कर्मठाचे क्लेश उत्पन्न करणारे कर्म अतिशय कमी योग्यतेचें असतें, कारण ह्या सकाम कर्मामुळें

अभिमानी कर्त्यांच्या मागें जन्ममरणाचें चक्र लागतें. आणि मुक्तीला अवश्य अशा निष्काम कर्मापेक्षां, जन्ममरणाचें चक्र अत्यंत तापदायक आहे.–असें आहे ह्मणून चित्तवृत्ति शांत ठेवणारी व सर्व क्लेश चुकविणारी–जी योगबुद्धि किंवा तिच्या पूर्णत्वानें होणारी जी सांख्यबुद्धि तिला शरण जा. मुमुक्षूस अभय देणारी हीच बुद्धि आहे. सारांश परमार्थज्ञानाकडे तुझ्या कर्माची व शेवटीं चित्ताची वृत्ति असूं दे.–परमार्थ ज्ञानाला तूं शरण जा. कारण फलाच्या तृष्णेनें कर्म करण्यास प्रवृत्त झालेले लोक कृपण, दीन, पामर, अज्ञानी, असतात. ह्मणून त्यांच्या मार्गानें जाऊं नको. **बृहदारण्यक** श्रुतिही असेंच सांगतेः 'हे गार्गि! जो या अक्षरास (नित्य आणि निश्चित अशा सद्वस्तूस) न जाणतां या लोकांतून निघून जातो त्यालाच मूर्ख म्हणावें.'–उघडच आहे मनुष्यदेह प्राप्त झाला असूनही जो मोक्ष मिळण्याची, स्वस्वरूपास जाणण्याची खटपट करित नाहीं, तो मूर्खच होय.—

मधुसूदनीकार म्हणतात कीं मिळविलेलें धन दानधर्मामध्यें खर्च न करणारा कद्रू मूर्खच होय. कारण मृत्युसमयीं आपल्यापासून नष्ट होणाऱ्या धनाचाही तो आपल्या हातानें व्यय करित नाहीं! **शंकरानंद**–कर्म सांग झालें तर जन्ममरणाचें दुःख देतें आणि कोठें व्यंग पडलें तर नरकास नेतें. एतावता सकाम कर्म तापदायकच होय.

'दूरमेते विपरीते विषूची याऽविद्या या च विद्या इति'

(अविद्या आणि विद्या या एकमेकांपासून फार दूर आहेत, एकमेकांशी अत्यंत विरुद्ध आहेत आणि अत्यंत भिन्न आहेत.) अशी **कठ** श्रुति आहे.

एतच्छ्रेयो येऽभिनन्दति मूढाः । जरा मृत्युं ते पुनरेवापियन्ति ।
यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति रागात्तेनातुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते'॥

स्वर्गसुख हेंच अत्यंत कल्याण होय असें जे मानितात, ते मूर्ख लोक म्हातारपण आणि मृत्यु यांप्रत जातात. लोभाच्या योगानें कर्मठ लोकांस हें ब्रम्हतत्त्व न समजल्यामुळें हे धैर्यशून्य लोक जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात. (मुंडकोपनिषद्.)–'धीराचे लोक, बुद्धिमान् लोक, ब्रह्मतत्त्व जाणतात म्हणून येथील अत्यंत स्थिर गोष्टी-

विषयीं, स्वर्गसुखाविषयीं, सुद्धां ते लोलुप नसतात. (कठोपनिषद्)' ह्यावरून चित्तप्रसाद होईपर्यंत निष्काम कर्मयोगच केला पाहिजे असें दिसतें. **वल्लभ**–'बुद्धौ'' बुद्धीला मात्र समजणाऱ्या ईश्वराचे ठायीं.'

मध्व, सत्यानंद, विद्याधिराज व **राघवेंद्रयतिः**–' ज्ञान झालें तरी बाकीचे सर्व उपाय सोडून माझी उपासना कर' असा या श्लोकाचा द्वैतपर तात्पर्यार्थ आहे, असें सांगतात. ज्याचे गुण आणि इच्छा जीवाच्या गुण, व इच्छेहून अत्यंत निराळ्या असा जो परमेश्वर तो व आपण एकच आहों असें जे अद्वैती मानतात तेच कृपण होत. हे असले कृपण अत्यंत घनांधकारांत जाऊन पडत असतील यांत संशय नाहीं !' अद्वैतवादी हे परमेश्वर व आपण दृश्यसृष्टींत एक नाहींत असेंच मानतात; मग त्यांच्या विरुद्ध एवढा कडाका कां? मात्र शेवटीं अद्वितीय ब्रह्म एकच आहे; तेथें जीव शिव असा भेदाभेद नाहीं; व तेथें गुण अगर इच्छा यांचें वास्तव्य नाहीं हें त्यांचें म्हणणें सयुक्तिक आहेच.

रामानुजः—मुख्य फलांचा त्याग करणें व जयापजयाच्या योगानें उत्पन्न होणारीं अवांतर फळें, यांच्या संबंधानें समत्वबुद्धि ठेवून कर्म करणें हें इतर कर्मांहून श्रेष्ठ आहे.

चतरजीः—' ज्यांना ईश्वरीज्ञान झालें नाहीं, ते पापांतच मरतील' **जान. ईशावास्यांत** अज्ञानी लोकांचे हाल उत्तम रीतीनें वर्णन केले आहेत. ' संसारांत मग्न असणाऱ्या पापप्रियानो ! तुम्हांस धिक्कार असो. ' **माथ्यु.** ' ईश्वराचें पूर्ण ज्ञान झालेल्या मनुष्यानें शास्त्रविहित कर्में केलीं नाहींत, तरी हरकत नाहीं. ' **रोमन्स** अ० ३.

ज्ञानेश्वर—जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथि (आहे) ॥ तो बुद्धियोग विवरितां (विचार करितां); । बहुत पाडें (पुष्कळ परीनें) पार्था ॥ दिसे हा अरुता (अलीकडचा) । कर्मयोग ॥

पंडित कृपणांविषयीं म्हणतातः—तरी हे जाले दीन । काम्यकर्म फळभोगाधीन । नेत्र असोनि नेत्रहीन । जाले फळयोग हेतुनें ! ॥४९॥

समत्वबुद्धियुक्तः सन्स्वधर्ममनुतिष्ठन्यत्फलं प्राप्नोति तच्छृणु–

अशी वर सांगितलेली समबुद्धि ठेवून तटस्थ वृत्तीनें स्वधर्माचें आचरण करणाऱ्यास काय फळ मिळतें तें सांगतो ऐकः–

बुद्धियुक्तो जहातीह
उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व
योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

इह (ह्या लोकामध्येंच) उभे (दोन्हीं) सुकृतदुष्कृते (पुण्यें व पापें) बुद्धियुक्तः (समत्वाची बुद्धि प्राप्त झालेला साधक) जहाति (सोडून देतो) तस्मात् (म्हणून) योगाय (समत्व चित्तवृत्तीला) युज्यस्व (मिळवून घे) कर्मसु (कर्मामध्यें) कौशलं (कुशलता असणें) योगः (–हाच–योग–होय).—सारांश, समत्वाची शांतवृत्ति ज्याला प्राप्त झाली असा बुद्धियोगी पापपुण्यांचा या लोकींच त्याग करितो —आणि म्हणून जन्ममरणाच्या कचाट्यांतून सुटतो.—यासाठीं तूं या योगबुद्धीला साध्य करून घे. कर्म करूनही कर्माचा परिपाक म्हणजे जन्ममरण, ज्याच्या योगानें चुकतें तोच योग म्हणावा. कर्मामध्यें कौशल्य तें हें होय.

बुद्धीति । बुद्धियुक्तः समत्वविषयया बुद्ध्या युक्तो बुद्धियुक्तो जहाति परित्यजतीहास्मिँल्लोक उभे सुकृतदुष्कृते पुण्यपापे सत्त्वशुद्धिज्ञानप्राप्तिद्वारेण यतस्तस्मात्समत्वबुद्धियोगाय युज्यस्व घटस्व । योगो हि कर्मसु कौशलं, स्वधर्माख्येषु कर्मसु वर्तमानस्य या सिद्ध्यसिद्ध्योः समत्वबुद्धिरीश्वरार्पितचेतस्तया तत्कौशलं कुशलभावः । तद्धि कौशलं यद्बन्धस्वभावान्यपि कर्माणि समत्वबुद्ध्या स्वभावान्निवर्तन्ते । तस्मात्समत्वबुद्धियुक्तो भव त्वम् ॥ ५० ॥

चित्ताची समता कायम राहील अशा बुद्धीनें युक्त झालेला मुमुक्षु ह्या लोकांतच हजारों जन्मांचीं पुण्यें आणि पापें या दोहींचाही –जिवंत असतांनाच–त्याग करितो. हीं दोन्हीं त्यास बाधा करीत

नाहींत अगर त्यास जन्ममरणांत घालूं शकत नाहींत.-पापानें व तसाच पुण्यानेंही जन्ममरणाचा फेरा पाठीमागें लागतो म्हणून योगी लोक पुण्याचाही त्याग करितात;-ही गोष्ट द्वैतवाद्यांस कळत नाहीं.-

पूर्व०—भगवन्! जरा थांबा. समत्वबुद्धि झाली, हर्षविषाद थांबले, म्हणजे लागलीच पापपुण्यें नाहींशीं होतात हें म्हणणें मला समजत नाहीं. परमार्थज्ञान ज्याला झालें त्याचें पापपुण्य संपलें हें ठीक जुळतें; पण—

सिद्धां०—समजलों तूं काय म्हणणार तें. अरे! समत्वबुद्धीनें व ताटस्थ्यवृत्तीनें मनुष्य कर्म करूं लागला म्हणजे त्याचें चित्त शुद्ध आणि निर्मळ होतें. निर्मळ चित्त झाल्यावर ईश्वराच्या अगर गुरूच्या कृपेनें ज्ञानप्राप्ति होते; आणि ती झाल्याबरोबर पापपुण्यें अस्तंगत होतात. आतां समजला कीं नाहीं क्रम? बरें; आतां असें आहे म्हणजे समत्वबुद्धीनें स्वकर्म केलें म्हणजे जन्ममरण चुकतें म्हणून तूं यापुढें समत्वबुद्धि प्राप्त होईल असें कर. हा बुद्धियोग तुला साध्य करून घेतला पाहिजे.

पूर्व०—श्रीकृष्णा! स्वधर्मानें आचरण केल्यावर पुनः योगबुद्धीचा आश्रय करून घे म्हणून आपण सांगतां तें कशाला?

सिद्धां०—फिरून आपलेंच. अरे! स्वधर्मानें सांगितलेलीं कर्में करीत असतांना आपल्यास इष्टप्राप्ति व अनिष्टप्राप्ति होणार त्यांच्या संबंधानें आपल्या चित्ताची समता ढळूं द्यावयाची नाहीं हें व सर्व धर्मविहित कर्में व कर्मफळें ईश्वरास समर्पण करावयाचीं असतात हें, यालाच योगाचें कौशल्य म्हणतात. ही कर्मकुशलता अगर योगबुद्धि असल्याशिवाय कर्मांचा नाश कसा होईल? म्हणून योग पाहिजे, बरें!

पूर्व०—पण यांत कुशलता ती काय?

सिद्धां०—आतां मात्र कमाल केलीस! अरे! आपल्या स्वतःच्या स्वभावानें जीं सत्कर्में किंवा दुष्कर्में मनुष्यास जन्ममरणाच्या चक्रांत नेऊन बांधून घालतात, त्या कर्मांचा स्वभाव समूळच्या समूळ समत्वबुद्धीनें फिरविणें ही काय लहान सहान कुशलता आहे? सारांश

अर्जुना! स्वधर्माचरण करीत असतां तुला समत्वबुद्धीचा अंगीकार केलाच पाहिजे.

प्रपाकार एक श्रुति सांगतातः—

'पापमकरवमित्यतः कल्याणमकरवमित्युभे, एष एते तरत्यमृतः, साध्वसाधुनी नैनं कृताकृते तपतः,

(जो ज्ञानी झाला, प्रत्यक्ष अमृतच म्हणजे ब्रह्म झाला, तो 'मी पाप केलें' 'मीं पुण्य केलें' ह्या दोन्हीं अभिमानांमधून तरून जातो; ह्या दोन्ही वृत्ति सोडून देतो. पुण्य अगर पाप, कर्म किंवा अकर्म हीं कोणींच त्यास त्रास देऊं शकत नाहींत.) चित्तशुद्धीनें ईश्वरी साक्षात्कार झाल्यावर मुमुक्षु हा पापपुण्याची मुळींच परवा बाळगीत नाहीं. स्वधर्माप्रमाणें आचरण न केल्यामुळें आपले शत्रु दुर्योधनादि तूं जिवंत ठेविले आहेस, हें कौशल्य नव्हे असेंही **मधुसूदनीकार** म्हणतात. ईश्वर प्रेरणा करील तसें वागणारा मनुष्य योगी होय, असें **वल्लभ** म्हणतात. प्रायश्चित्तानें पापें जळतात, पण पुण्यें तशींच राहतात व वासनाही राहते; म्हणून या सर्वांचा नाश करण्यासाठीं समत्वबुद्धीच पाहिजे असें **शंकरानंद** म्हणतात. मंदाधिकाऱ्यास मोक्षप्राप्ति करून घेण्याला ह्या योगाशिवाय दुसरें साधनच नाहीं हा **द्विवेदीचा** अभिप्राय आहे.

मध्व०—'सुकृतं' मनुष्यजन्म देणारें फळ–उपासना वगैरे मोठें फळ–ज्ञानी मनुष्य टाकीत नाहीं; कारण ह्या महाफळाचा नाशच होत नाहीं व पापाचा मात्र नाश होतो असें हे टीकाकार म्हणतात. यांचे द्वैतपर व्याख्यान ह्या श्लोकापुरतें तरी वाचावें अशी सप्रेम विनंति आहे. 'कौशलं' अत्यंतसामर्थ्यानें साध्य होणारी वस्तु असा **रामानुजांचा** अर्थ आहे. पंडितांचें या श्लोकावर मोठेंच व्याख्यान आहे व त्यांत कर्म, कर्मनाश, माया, ब्रह्म वगैरे गहन विषयांचा चांगला ऊहापोह केला आहे. ॥ ५० ॥

यस्मात्—

पूर्व०—समत्वबुद्धि प्राप्त झाली व सर्व पापपुण्यांचा त्याग केला, त्यांचा क्षय झाला, तथापि जन्ममरणाचा नाश होऊन मोक्ष कसा मिळतो?

सिद्धां०—त्याचें कारण सांगतों; ऐक—

कर्मजं बुद्धियुक्ता हि
फलं त्यक्त्वा मनीषिणः ॥
जन्मबन्धविनिर्मुक्ताः
पदं गच्छन्त्यनामयम् ॥ ५१ ॥

हि (कारण प्रसिद्धच आहे कीं) **बुद्धियुक्ताः** (पापपुण्य अगर दुःखसुखाचे वेळीं निर्विकार बुद्धि अगर समबुद्धि झालेले अधिकारी) **मनीषिणः** (ज्ञानवंत होत्साते) **कर्मजं फलं** (कर्मापासून होणारें स्वर्गसुख, नरकयातना वगैरे सर्व फल) **त्यक्त्वा** (टाकून देऊन, परमेश्वरास अर्पण करून) **जन्मबन्धविनिर्मुक्ताः** (जन्ममरणाचें चक्र जो संसार त्यापासून—जिवंत असतांच—मुक्त—होतात आणि—) **अनामयं पदं** (जेथें कोणत्याही प्रकारचा उपद्रव नाहीं अशा पदाला, नित्य, बुद्ध, शुद्ध, मुक्त अशा परब्रह्मपदाला) **गच्छन्ति** (जातात.)—सारांश, कर्मफलाचा त्याग केल्यानंतर अगर तें ईश्वरास समर्पण केल्यानंतर चित्तशुद्धि झालेल्या मनुष्यास ज्ञान होतें व त्याच्या मागचें जन्ममरणाचें लोढणें तुटतें. अर्थातच हें सुटल्यानंतर तो ज्ञानी मनुष्य जिवंत असतांनाही मोक्षाच्या नित्य आणि निरतिशय सुखाचा अनुभव घेतो—नव्हे तो सुखस्वरूपच होतो!—

कर्मजमिति । कर्मजं फलं त्यक्त्वेति व्यवहितेन संबन्धः । इष्टानिष्टदेहप्राप्तिः कर्मजं फलं कर्मभ्यो जातं बुद्धियुक्ताः समत्वबुद्धियुक्ता हि यस्मात्फलं त्यक्त्वा परित्यज्य मनीषिणो ज्ञानिनो भूत्वा जन्मबन्धविनिर्मुक्ता जन्मैव बन्धो जन्मबन्धस्तेन विनिर्मुक्ता जीवन्त एव जन्मबन्धविनिर्मुक्ताः सन्तः पदं परमं विष्णोर्मोक्षाख्यं गच्छन्त्यनामयं सर्वोपद्रवरहितमित्यर्थः । अथवा 'बुद्धियोगाद्धनंजय' इत्यारभ्य परमार्थदर्शनलक्षणैव

सर्वतः संप्लुतोदकस्थानीया कर्मयोगजसत्त्वशुद्धिजनिता बुद्धिर्दर्शिता, साक्षात्सुकृतदुष्कृतप्रहाणादिहेतुत्वश्रवणात् ५१

'कर्मापासून होणारे' या शब्दांचा फलाकडे संबंध आहे. असो, कर्मापासून अवश्य उत्पन्न होणारें फल—म्हणजे इष्ट देह (देव शरीर), अनिष्ट देह (पशुपक्ष्यांदिकांचें शरीर) वगैरे फल, अथवा सुखदुःखांचा अनुभव देणारें फल—त्याचा धिःकार बुद्धिवंत लोक करितात; आणि चित्तशुद्धि होईपर्यंत कर्में करितात तीं सर्व ईश्वरास समर्पण करण्याच्या बुद्धीनेंच करितात. ज्यांस समत्वबुद्धि प्राप्त झाली, ज्यांचें चित्त विकारशून्य झालें तेच बुद्धिमान् लोक होत. असें विकारशून्य लोकांस ज्ञान प्राप्त होतें—तें 'ब्रह्म तूंच आहेस' वगैरे महावाक्यांच्या श्रवण, मनन, निदिध्यासानें होतें. हें ज्ञान झालें म्हणजे जन्मरूपी जी दुःखद शृंखला ती पूर्णत्वानें तुटून जाते; आणि हे ज्ञानी पुरुष जिवंत असतांनाच जन्मबंधांतून पार सुटून जाऊन विष्णूचें पद जो मोक्ष, त्याप्रत जातात.—विद्वानांचा अनुभव असाच आहे.—हें मोक्षपद असें आहे कीं येथें कोणत्याही प्रकारचा शारीरिक मानसिक अगर इतर कसलाही रोग, उपद्रव, (अगर अविद्या, आणि तिच्यापासून उत्पन्न होणारें कार्य यांचा उपद्रव) होणें शक्य नाहीं. **आचार्य** म्हणतात कीं ४९ व्या श्लोकांत जी बुद्धि सांगितली आहे ती सांख्यबुद्धीच होय असाही अर्थ करावा. तेथपासून पुढें जेथें बुद्धि शब्द आला आहे तेथें बुद्धीचा अर्थ परमार्थदर्शन देणारी व २६ व्या श्लोकांतील दृष्टांतांत—महासरोवराच्या स्थानीं असणारी व कर्मयोगापासून उत्पन्न झालेल्या चित्तशुद्धीची कन्या ज्ञानबुद्धि असाच करावा. कारण ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष सर्व कर्मांचा त्यागच सांगितला आहे.—सारांश, बुद्धि शब्दाचा अर्थ समत्वबुद्धि असा केला आहे, तसाच त्या शब्दाचा अर्थ 'ब्रह्मज्ञान' असा घेतला तरी चालेल असें आचार्य म्हणतात.

शंकरानंद—'ज्ञानी पुरुषाला कर्मफल बाधक होत नाहीं. कारण तेथें फलाचा रिघावच होत नाहीं.' **मधुसूदन** 'ह्या श्लोकानें अ० १ श्लोक ३१ यांतील शंकेस उत्तर दिलें.' असें म्हणतात

रामानुजः—कर्मफलाचा त्याग करितांच मोक्ष मिळतो.

द्वैतीः—कर्मफलवासनेची त्यागबुद्धि व ईश्वरार्पणबुद्धि प्राप्त झाल्यावर भगवंताचें ज्ञान करून घेणें हा योग होय. यानें परमेश्वराचा साक्षात्कार होऊन मोक्ष मिळतो.

ज्ञानेश्वरांचा सरळ अर्थ पहाः—ते कर्मीं तरी वर्तती । परी कर्मफळा नातळती (शिवत नाहीं) । आणि यातायाती (जन्ममरणाच्या येरझारा) लोपती । अर्जुना! तयां ॥ मग निरामयभरित । पावती पद अच्युत । ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ॥ येथें यातायाती आणि अच्युत हे शब्द किती समर्पक आहेत हें तज्ज्ञांसच कळेल!

पंडितांची एकच ओंवी देतों, त्याजवरून त्यांचा आशय कळेल. नित्यकर्में करितांही । फळ होतें जें कांहीं । तें ईश्वरार्पणें, होत नाहीं (ईश्वरार्पण केलें म्हणजे नित्यकर्माचें फळ नष्टच होतें.) । कृपा होते तयाची ॥ ....बुद्धियुक्त होती केवळ । ते परम पदातें पावती ॥ येथें त्याग सांगितला तो नित्यकर्मफळाचाच होय, काम्यकर्माचा नाहीं; असा पंडितांचा आशय आहे. ' अमुक एक फळ मिळणार असें ऐकिलें म्हणजे उत्पन्न होते ती कामना, व न ऐकलेलें फळ मिळावें अशी इच्छा असते त्यास वासना म्हणावें. ' असा कामना व वासना या शब्दांत पंडितांनीं विशेष काढला आहे तो चिंतनीय आहे. वासना व कामना या दोघींचाही त्याग करावा असा यांचा उपदेश आहे ॥ ५१ ॥

योगानुष्ठानजनितसत्त्वशुद्धिः कदा प्राप्यत इत्युचते—

योगबुद्धीच्या साहाय्यानें उत्पन्न झालेली चित्तशुद्धि केव्हां उत्पन्न होते, असें विचारशील तर सांगतों ऐक :—

यदा ते मोहकलिलं
बुद्धिर्व्यतितरिष्यति ॥
तदा गन्तासि निर्वेदं
श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

यदा (जेव्हां) **ते बुद्धिः** (तुझी बुद्धि) **मोहकलिलं** (मोहानें उत्पन्न झालेले अज्ञानाला) **व्यतितरिष्यति** (तरून जाईल, त्यांतून शुद्ध रीतीनें पार पडेल.) **तदा** (त्यावेळीं) **श्रोतव्यस्य** (जें ऐकावयाचें त्याचें) **च** (व) **श्रुतस्य** (जें ऐकलें आहे त्याचें) **निर्वेदं** (वैराग्य) **गन्तासि** (तुला प्राप्त झालेलें असेल, तुला प्राप्त होईल.) सारांश, तुझ्या बुद्धीवर जो अज्ञानाचा पडदा आला आहे तो दूर झाला म्हणजे तुला ऐकलेल्या ज्ञानाचा अगर वेदमार्गाचा व ऐकावयाच्या ज्ञानाचा अगर वेदमार्गाचा कंटाळा येईल; म्हणजे ऐकलेलें किंवा ऐकण्यासारखें असें कांहीं रहावयाचें नाहीं. आत्मज्ञान झालें, अद्वैत ठरलें म्हणजे ऐकण्यासारखें दुसरें काय राहणार ?

यदेति । यदा यस्मिन्काले ते तव मोहकलिलं मोहात्मकमविवेकरूपं कालुष्यं येनाऽऽत्मानात्मविवेकबोधं कलुषीकृत्य विषयं प्रत्यन्तःकरणं प्रवर्तते तत्तव बुद्धिर्व्यतितरिष्यति व्यतिक्रमिष्यति शुद्धिभावमापत्स्यत इत्यर्थः, तदा तस्मिन्काले गन्तासि प्राप्स्यसि निर्वेदं वैराग्यं श्रोतव्यस्य श्रुतस्य च, तदा श्रोतव्यं श्रुतं च निष्फलं प्रतिपद्यत इत्याभिप्रायः ॥ ५२ ॥

ज्या वेळीं तुझ्या बुद्धीला शुद्धभाव प्राप्त होईल, तुझी बुद्धि निर्विषय होईल, त्या वेळीं तुला परमार्थज्ञान प्राप्त होईल. पहा:—'मी आहें,' 'हें माझें आहे,' 'हें मला हवें' अशा प्रकारचें अहंतापूर्वक अज्ञान व वासना हीं असतात तीं एखाद्या गहन अरण्याप्रमाणें किंवा दुर्गाप्रमाणें दुर्गम असतात. तेथें अत्यंत घन व निबिड अंधकार भरला असल्यामुळें 'हा आत्मा,' 'हा आत्मा नव्हे' असा नित्यानित्यविवेक नाहींसा होऊन आपलें अज्ञानी अंतःकरण सदासर्वदां विषयांच्या उपभोगांचें चिंतन करीत असतें. असो, तेव्हां या निबिड अंधकारांतून व घाणींतून जेव्हां तुझी बुद्धि समत्ववृत्तीच्या साहाय्यानें व परमेश्वराच्या कृपेनें निष्कलंक बाहेर येईल, तात्पर्य जेव्हां ती अभिमान, वासना व कामना यांचा त्याग करून मायेचे सर्व विषय सोडून

दिल्यामुळें तुझी बुद्धि निर्विषय होईल, जेव्हां ती बुद्धि शुद्ध स्फटिकासारखी स्वच्छ आणि निर्विकार होईल, तेव्हां, ऐकिलेलें व ऐकावयाचें असें दोन्ही शास्त्रभागांचें फल सांगून विषयांत गुंतविणाऱ्या ग्रंथांचा तुला कंटाळा येईल; तुला वैराग्य प्राप्त होईल. कारण यांपासून मोक्षाचें ज्ञान मिळणें शक्य नाहीं असें तुला समजेल. सारांश मग तुला कर्म करण्याचें कारण राहणार नाहीं.

मधुसूद०—'श्रुतस्य' = कर्मफलाचा. '**परीक्ष्य लोकान्कर्मचितान्निर्वेदमायाति**' 'कर्मानें उत्पन्न होणाऱ्या नश्वरफलांची, अनेक भुवनांची विचारपूर्वक परीक्षा केल्यानंतर त्याला वैराग्य प्राप्त होतें.'—मुंडकोपनिषत्.—

शंकरानंद—'श्रोतव्यस्य श्रुतस्य च' = दृश्य जगाचा.

वल्लभ—'श्रुत' = सांख्यशास्त्र (हें ११ व्या श्लोकापासून ३८ व्या पर्यंत सांगितलें आहे). 'श्रोतव्य' = भक्तिमार्ग. याचें विवेचन पुढें होणार आहे.

प्रपाकार—'बुद्धीनें उत्पन्न केलेल्या सुखदुःखानें पुरुषास बंधन कां होतें? तो बुद्धीचा स्वामी आहे म्हणून तो बद्ध होतो. पुरुषार्थ (मोक्ष) प्राप्त होईपर्यंत बुद्धीच बंधास कारण असते. तिला शुद्ध करून पुरुषार्थ संपादन करणें याचेंच नांव मोक्ष होय' असें **पतंजलींचें** म्हणणें अवतीर्ण करितात.

मध्व आणि सत्यानंद—'निर्वेद' = अत्यंत मोठा लाभ. निर्वेद म्ह० वैराग्य नव्हे; कारण ज्ञानी पुरुष झाला तरी त्याची भक्ति सुटत नाहीं. **नारद, शुकादिकांची** भक्ति कायमच आहे. सारांश, 'कर्मफलाचा त्याग करावयाचा तो परमेश्वराची भक्ति हा जो मोठा लाभ तो मिळण्यासाठींच होय. हें भक्तिमाहात्म्य अनेक वेळ ऐकिलें आहे व पुष्कळ वेळ ऐकावयाचेंही आहे.'

चतरजी—'विषयानुराग उत्पन्न करून वासना वृद्धिंगत करणाऱ्या शास्त्रांच्या वाटेला सुद्धां जाऊं नको.' कोलोसिअन्स अ. २.

रामानुजांचा अर्थ आचार्यांप्रमाणेंच आहे.

ज्ञानेश्वरांचा 'श्रुतस्य च श्रोतव्यस्य' याचा अर्थः—तेथ आणिक

कांहीं जाणावें । कां मागील तें स्मरावें । हें अर्जुना! आघवें (सर्व)। पारुषेल (राहील, संपेल, नष्ट होईल) ॥

पंडितांचा याच शब्दांवरील अर्थः–तेव्हां श्रुतफळाची कामना । अश्रुतफळाची वासना । टाकोनि, बुद्धि तुझी अर्जुना! । निवळ वैराग्य पावेल ॥ केव्हां ?........मोह निरसे । अलंकारीं हेम समरसें, (एकरसानें) । तैसा चराचरी गवसे । आत्मा जेव्हां ॥ ९२ ॥

मोहकलिलात्ययद्वारेण लब्धात्मविवेकप्रज्ञः कदा कर्मयोगजं फलं परमार्थयोगमवाप्स्यामीति चेत्तच्छृणु–

अहंतापूर्वक अज्ञानगहनाचा निरास होऊन आत्मविवेकाचें ज्ञान प्राप्त झाल्यानंतर कर्मयोगाचें फल जो परमार्थयोग, परमार्थज्ञान व विज्ञान, तो मला केव्हां मिळेल असें म्हणशील तर ऐक–

श्रुतिविप्रतिपन्ना ते
यदा स्थास्यति निश्चला ॥
समाधावचला बुद्धि-
स्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

श्रुतिविप्रतिपन्ना (अनेक प्रकारचे वेदमंत्र, कर्मफळें सांगणारे वेदमंत्र ऐकल्यामुळें गोंधळून गेलेली) **ते बुद्धिः** (तुझी बुद्धि) **यदा** (जेव्हां) **निश्चला स्थास्यति** (निश्चल राहील, सद्वस्तूला सोडून इकडे तिकडे हिंडणार नाहीं)–आणि–**समाधौ अचला** (समाधीमध्यें अचल–राहील–) **तदा** (तेव्हां) **योगं अवाप्स्यसि** (–तुला–योगाची प्राप्ति होईल.): ज्या वेळीं तुझी बुद्धि कर्मफलाशेनें बावरणार नाहीं, आत्मचिंतनामध्यें स्थिर राहील तेव्हां तुला ज्ञानयोगाची प्राप्ति झाली असें समज; तेव्हां तुला आत्मब्रह्मैकज्ञान होऊन मोक्ष मिळाला असें समज.

श्रुतिविप्रतिपन्नेति । श्रुतिविप्रतिपन्नाऽनेकसाध्यसाधन-संबन्धप्रकाशनश्रुतिभिः श्रवणैर्विप्रतिपन्ना नानाप्रतिपन्ना

श्रुतिविप्रतिपन्ना विक्षिप्ता सति ते तव बुद्धिर्यदा यस्मिन्काले स्थास्यति स्थिरीभूता भविष्यति, निश्चला विक्षेपचलनवर्जिता सती समाधौ समाधीयते चित्तमस्मिन्निति समाधिरात्मा तस्मिन्नात्मनीत्येतत् । अचला तत्रापि विकल्पवर्जितेत्येतत्, बुद्धिरन्तःकरणम् । तदा तस्मिन्काले योगमवाप्स्यसि विवेकप्रज्ञां समाधिं प्राप्स्यसि ॥ ५३ ॥

पूर्व०—भगवंता ! आपण बुद्धीची शुद्धता, विवेक व वैराग्यप्राप्ति हें सर्व सांगितलें पण परमार्थबुद्धि केव्हां प्राप्त होईल तें अजून सांगितलें नाहीं.

सिद्धां०—अरे ! वत्सा ! विवेकानें वगैरे युक्त झालेल्या बुद्धीला आत्मस्वरूपामध्यें स्थिरता प्राप्त झाली म्हणजे परमार्थबुद्धीचें संपादन होतें.

पूर्व०—हें कसें ?

सिद्धां०—सांगतों ऐक. 'स्वर्ग पाहिजे असेल तर अमुक करावें,' 'पुत्र पाहिजे असेल तर तमुक करावें;' इत्यादि प्रकारें साध्य वस्तू अनेक आहेत व साधनेंही अनेक आहेत व त्या उभयतांचे संबंध अमुक प्रकारचे आहेत असें वेदस्मृतिवाक्यांवरून ऐकल्यामुळें जिला नानाप्रकारचीं स्वरूपें प्राप्त होतात, अथवा जी निश्चयात्मक होत नाहीं, अशी बिचारी बुद्धि (अंतःकरण) प्रथमतः गोंधळून जाते. पण पुढें दुःखमय संसारानें भाजून निवालेली बुद्धि—गुरूपदेशानें, श्रुतिस्मृतींतील वाक्यांनीं व चित्तशुद्धि झाल्यामुळें—स्वभानावर येऊन जेव्हां अनेक गौण पुरुषार्थ सोडून देते व हिकडे तिकडे भ्रमण करण्याचा त्याग करिते व एक ठिकाणीं स्थिर होते, जेव्हां चित्ताचा लय करणाऱ्या आत्म्यामध्येंच ती गतिशून्य व निश्चयात्मक होऊन स्वस्थ राहते, तसेंच सर्व प्रकारचे संशय सोडून देऊन जेव्हां त्या आत्म्यामध्यें—वारा न लागणाऱ्या दिव्याप्रमाणें—स्थिर होते, तेव्हां मात्र खरी योगबुद्धि (परमार्थबुद्धि, जीव परमात्म्याचें ऐक्यविषयक ज्ञान) साध्य होते—व मनुष्य कृतकृत्य होतो.

प्रपाकार०—' श्रुतिविप्रतिपन्ना ' याचा अर्थ फलश्रुतींचा अनादर करणारी, फलश्रुतींस टाकून देणारी, असा करतात. ' समाधि = परमेश्वररूपी योग = परमेश्वराचें सांनिध्य.

मधु०—' निश्चला ' = जागृति, स्वप्न वगैरेंमध्यें दिसणाऱ्या वस्तूंनीं न हलविलेली. (२) संकल्प विकल्प रहित. ' अचला ' = झोंप, मूर्छा, वायूचा झटका वगैरे येऊन आत्म्याशीं संबंध तुटला आहे अशी न झालेली.

शंकरा०—' योगं ' = प्रज्ञेची स्थिरता.

सत्यानंद—' निश्चला ' = खोट्या शास्त्रांस न बधणारी. ' अचला ' = कोणत्याही त्रासानें संतप्त न होणारी.

रामानुज–' अचला '= एकरूप.' श्रुतिविप्रतिपन्ना '=श्रुतींच्या श्रवणानें इतर सर्व सजातीय व विजातीय सूक्ष्म पदार्थांचा विवेक करणारी. या श्लोकांचा अर्थ करितांना हे आचार्य म्हणतात कीं, शास्त्राच्या योगानें आत्मज्ञान होऊन नंतर केलेला कर्मयोग स्थितप्रज्ञा नांवाची ज्ञाननिष्ठा उत्पन्न करितो. आणि ही स्थितप्रज्ञा योग नांवाचे आत्मावलोकन साध्य करतें.

ज्ञानेश्वरांनीं ' श्रुतिविप्रतिपन्ना ' याचा अर्थः—इंद्रियांचिया संगति । जिये पसर होतसे मती (जी बुद्धि विस्तृत होते, नानास्वरूपी होते.) ।

पंडितांनीं समाधि व योग यांत चमत्कारिक विशेष प्रकट केला आहे तो चिंतनीय आहे. मग ते आत्मबोधीं । एकाग्रता बुद्धि साधी । त्यास म्हणावें समाधी । अचळ समाधींत त्या होय ॥ आत्मसमाधींत बुद्धि । पावे जेव्हां अचलत्व सिद्धि । तेव्हां पावसी योगसमृद्धि । कर्में नासतीं ज्या योगीं ॥

प्रश्नबीजं प्रतिलभ्यार्जुन उवाच लब्धसमाधिप्रज्ञस्य लक्षणबुभुत्सया—

वर निश्चल व अचल बुद्धीचें वर्णन केलें तेव्हां समाधीमध्यें ज्याची बुद्धि स्थिर झाली आहे, त्याचें लक्षण कसें असतें, सारांश स्थिरबुद्धि

पुरुष कसा असतो हें जाणण्याच्या इच्छेनें अर्जुनानें संधी साधून भगवंतास प्रश्न विचारला:—

अर्जुन उवाच—

स्थितप्रज्ञस्य का भाषा
समाधिस्थस्य केशव ॥
स्थितधीः किं प्रभाषेत
किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

अर्जुन म्हणाला:—केशव (हे सर्वज्ञ केशवा!) **समाधिस्थस्य स्थितप्रज्ञस्य** (समाधीमध्यें परमात्म्याशीं लय लागलेल्या स्थितप्रज्ञाला) **का भाषा** (काय म्हणावें? त्याच्याशीं कसें बोलावें?) **स्थितधीः** (स्थिरबुद्धीचा पुरुष) **किं प्रभाषेत** (कसें बोलतो?) **किं आसीत** (तो असतो, बसतो, कसा?) **किं व्रजेत** —व—(जातो कोठें?) सारांश समाधीमध्यें लय लावून ऐक्यत्वाप्रत पावलेल्या महापुरुषाचें लक्षण काय, तो बोलतो, बसतो, चालतो, व्यवहार करितो कसा? हे प्रश्न अर्जुनानें विचारलें आहेत.

स्थितप्रज्ञस्येति । स्थिता प्रतिष्ठिताऽहमस्मि परं ब्रह्मेति प्रज्ञा यस्य स स्थितप्रज्ञस्तस्य का भाषा किं भाषणं वचनं कथमसौ परैर्भाष्यते समाधिस्थस्य समाधौ स्थितस्य केशव । स्थितधीः स्थितप्रज्ञः स्वयं वा किं प्रभाषेत । किमासीत व्रजेत किम् । आसनं व्रजनं वा तस्य कथमित्यर्थः । स्थितप्रज्ञस्य लक्षणमनेन श्लोकेन पृच्छति ॥ ५४ ॥

आपण सर्वांच्या अंतर्यामीं असतां म्हणून विचारतों: हे सर्वज्ञ केशवा! समाधीमध्यें एकचित्त होऊन ऐक्यत्वास पोहोंचलेला व 'मीच ब्रह्म आहें' अशी ज्याची बुद्धि झाली आहे असा सिद्ध

पुरुष दुसऱ्यांनीं कसा ओळखावा, अशा सिद्ध पुरुषांचीं लक्षणें काय तें मला कृपा करून सांगावें. समाधींतून उठल्यानंतर तो पुरुष बोलतो कसा, समाधींत असतांना तो राहतो कसा व समाधि विसर्जन केल्यानंतर त्याचा व्यवहार कसा असतो हेंही मला सांगावें. हे चार प्रश्न करून अर्जुनानें स्थितप्रज्ञाचीं लक्षणें विचारलीं आहेत.

येथें मतभेदास जागाच नाहीं. **मध्वाचार्य** मात्र ' कं ब्रह्माणं ईशं शंकरं वर्तयतीति केशवः ' = ब्रह्मा व शंकर यांच्यावरही सत्ता करणारा तो केशव अशी वैष्णवी व्युत्पित्ति करितात आणि अर्जुनानें हे प्रश्न लोकांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें विचारले असें सांगतात. ॥ ५४ ॥

यो ह्यादित एव संन्यस्य कर्माणि ज्ञानयोगनिष्ठायां प्रवृत्तो यश्च कर्मयोगेण तयोः स्थितप्रज्ञस्य प्रजहातीत्यारभ्याध्यायपरिसमाप्तिपर्यन्तं स्थितप्रज्ञलक्षणं साधनं चोपदिश्यते। सर्वत्रैव ह्यध्यात्मशास्त्रे कृतार्थलक्षणानि यानि तान्येव साधनान्युपदिश्यन्ते यत्नसाध्यत्वात्। यानि यत्नसाध्यानि साधनानि लक्षणानि च भवन्ति तानि—

(१) जो ब्रह्मचर्याश्रमींच कर्मसंन्यास करून आत्मानात्मविवेकानें शुद्ध होत्साता ज्ञाननिष्ठ झाला व (२) ज्यानें कर्म, उपासना निष्कामत्वानें करून चित्तशुद्धीनंतर ज्ञाननिष्ठ झाला त्या दोहोंपैकीं कोणत्याही अवस्थेच्या द्वारें जो स्थितप्रज्ञ झाला त्याचीं लक्षणें व स्थितप्रज्ञ होण्याचीं साधनें या ५५ व्या श्लोकापासून तो अध्यायसमाप्तीपर्यंत सांगितलीं आहेत.

पूर्व०—भगवन्! ज्ञानयोग आणि कर्मयोग असे दोन निरनिराळे मार्ग असतां दोघांसही एकच साधन कसें सांगितलें?

सिद्धां०—शाबास! उत्तम वेळीं शंका काढलीस. अरे वत्सा! वेदांतशास्त्रामध्यें ब्रह्मज्ञान्याची जीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं जिज्ञासू मुमुक्षूकरितां आहेत. सिद्ध पुरुष तीं लक्षणेंच असतात तेव्हां त्यांना कांहीं कर्तव्य नसतें. असोः ' हीं साधनें यत्नसाध्य आहेत. तेव्हां हीं

ब्रह्मज्ञाचीं लक्षणें व मुमुक्षूंचीं साधनें म्हणून जें मी आतां सांगणार तें ऐक—

श्रीभगवानुवाच—

प्रजहाति यदा कामा-
न्सर्वान्पार्थ मनोगतान् ॥
आत्मन्येवाऽऽत्मना तुष्टः
स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

श्रीभगवान म्हणतातः—**पार्थ** (अर्जुना!) **यदा** (जेव्हां) **सर्वान्, मनोगतान् कामान्** (मनामध्यें असलेल्या सर्व प्रकारच्या वासना व कामना) **प्रजहाति** (मनःपूर्वक सोडून देतो)—आणि **आत्मनि एव** (आत्मस्वरूपामध्येंच) **आत्मना** (आत्मस्वरूपानें) **तुष्टः** (संतुष्ट असतो) **तदा** (त्या वेळीं)—त्या पुरुषाला—**स्थितप्रज्ञः उच्यते** (स्थितप्रज्ञ असें म्हणतात.) सारांश मनामधील सर्व वासनांचें अहंकार वृत्तीसह जेव्हां ज्ञानी पुरुष उच्चाटन करितो आणि नेहमीं आत्मस्वरूपीं लय लावून आत्मानंदानें संतुष्ट असतो, ब्रह्म व आत्मा यांचें ऐक्य करून समाधानवृत्तींत असतो, तेव्हां त्या ज्ञानी पुरुषाला स्थितप्रज्ञ असें म्हणावें.–हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर होय. हेंच स्थितप्रज्ञाचें मुख्य लक्षण आहे.

श्रीभगवानुवाच—प्रजहातीति । प्रजहाति प्रकर्षेण जहाति परित्यजति यदा यस्मिन्काले सर्वान्समस्तान्कामानिच्छाभेदान्हे पार्थ मनोगतान्मनसि प्रविष्टान्हृदि प्रविष्टान् । सर्वकामपरित्यागे तुष्टिकारणाभावाच्छरीरधारणनिमित्तशेषे च सत्युन्मत्तप्रमत्तस्येव प्रवृत्तिः प्राप्तेत्यत उच्यते—आत्मन्येव प्रत्यगात्मस्वरूप एवाऽऽत्मना स्वेनैव बाह्यलाभनिरपेक्षस्तुष्टः परमार्थदर्शनामृतरसलाभेनान्य-

स्मादलं प्रत्ययवान्स्थितप्रज्ञः स्थिता प्रतिष्ठिताऽऽत्मानात्मविवेकजा प्रज्ञा यस्य स स्थितप्रज्ञो विद्वांस्तदोच्यते। त्यक्तपुत्रवित्तलोकैषणः संन्यस्याऽऽत्माराम आत्मक्रीडः स्थितप्रज्ञ इत्यर्थः ॥ ५५ ॥

श्रीभगवान सांगतातः अर्जुना! अंतःकरणामध्यें, हृदयामध्यें प्रवेश करून राहिलेल्या सर्व इच्छा व वासना, तशीच अहंकारवृत्ति —या सर्वांचा समूळ व सबीज त्याग ज्या वेळीं होतो त्यावेळीं ज्ञानी पुरुषाला स्थितप्रज्ञ असें म्हणतां येते, हें ऐक—

पूर्व०—भगवन्! अमळ थांबा. महाराज! सर्व कामनांचा त्याग केला तेव्हां अर्थातच सुखाचें व समाधानाचें कारण संपलें. सुख नाहीं तर कर्म करण्याचें कारण नाहीं. नव्हे?

सिद्धां०—नाहीं. त्याला शरीर धारण करावयाचें नाहीं का देहप्रारब्ध आहे तोंपर्यंत?

पूर्व०—बरें. शरीर धारण तर करावयाचें आहे व सुख आणि समाधान तर बिलकुल मिळवायाचें नाहीं, तेव्हां अर्थातच तो मनुष्य उन्मत्त म्हणजे विवेकशून्य आणि प्रमत्त म्हणजे मस्तक फिरलेला, वेडा झालेला असा होईल नाहीं काय?

सिद्धां०—नाहीं त्याला संतोषाचें अत्युत्तम स्थल आहे. तें कोणतें म्हणशील तर ब्रह्मस्वरूपीं लय लावणें हें होय. बाह्यवस्तूंचा, विषयांचा त्याग करून आत्मानंदामध्येंच तो रममाण होतो. परमार्थरस जो ब्रह्मानंद त्याच्या लाभामध्यें रममाण होऊन तो निमग्न झाला म्हणजे बाह्यविषयांविषयीं त्याला बळकट वैराग्य उत्पन्न होतें. समजलास. बाह्यविषयांचा सर्वथा त्याग करणें तो इतका कीं विषयाचें भानच सर्वस्वीं नाहींसें व्हावें व आत्मस्वरूपीं लय लावून राहणें हा त्याचा आनंद होय. वत्सा! आनंदाची ही पराकाष्ठा आहे. म्हणून म्हणतों कीं या असल्या शुद्ध, निर्मळ आणि नित्य आनंदामध्यें ज्याची बुद्धि स्थिर झाली, बाणून गेली त्या विद्वानालाच स्थितप्रज्ञ म्हणावें. बाबा! प्रपंचांत घालणाऱ्या ज्या पुत्र, मित्र, कलत्रादि वासना आहेत त्यांचा सर्वथैव त्याग करून, सर्व वृत्ति शून्य होऊन संन्यास

घेऊन ज्यानें परब्रह्मामध्यें विश्रांति घेतली, परब्रह्माबरोबरच क्रीडा करण्यास आरंभ केला, सारांश जो परब्रह्माशीं ऐकात्म्य पावला त्यालाच स्थितप्रज्ञ म्हणावें बरें! परब्रह्माशीं ऐक्य झालें, ब्रह्म व दृश्य जग मीच आहें असें झालें म्हणजे वासना किंवा संकल्प किंवा कामना ह्या बाया राहतात कशाला?

अद्वैतवाद्यांत एकवाक्यता आहे. मधुसू०, शंकरा०–व प्रपा०–एक मंत्र देतातः—'**यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि स्थिताः। अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते**'॥ ज्या वेळीं हृदयांतील सर्व वासनांचा क्षय होतो, तेव्हां मरणधर्मी मनुष्य अमर होतो! व ब्रह्मांत लीन होऊन जातो. ज्याचें ज्ञान स्थिर झालें तो स्थितप्रज्ञ असें **चतरजी** म्हणतात. तसेंच जीवन्मुक्ताची प्रवृत्ति वेड्यासारखी दिसते ती त्याचें भान दृश्यावर नसतें म्हणून होय असें सांगतात. 'ईश्वराकडे आम्हीं तनमन लाविलें म्हणून आम्ही मूर्ख झालों!' **पाल**.

या अवस्थेला **रामानुज** 'वशीकारसंज्ञा' असें म्हणतात. ही चवथी अवस्था आहे.

द्वैतवादी 'सर्वान्' याचा 'बहुतेक सर्व' असा अर्थ करितात. शुक, नारदादि ज्ञानी सुद्धां भक्तिरसाची वासना सोडीत नाहींत. अर्थातच ही ओढाताण आहे. आत्मनि = विष्णुदेवतेंत. यांचा म्हणण्याचा कटाक्ष हा आहे कीं जीवाला परमात्मस्वरूप ऐक्यत्वानें कधींही मिळणार नाहीं.

ज्ञानेश्वर व **पंडित** यांस वरील अद्वैतपर अर्थ मान्य आहे.॥५५॥

किंच—

आणखी पहाः—

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः॥
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥५६॥

दुःखेषु (शरीरसंबंधीं, मनसंबंधीं, आकस्मिक व दैविक संकटें प्राप्त झालीं असतां) **अनुद्विग्नमनाः** (ज्याचें मन उद्विग्न, खिन्न होत

नाहीं)–व–**सुखेषु** (शारीरादिक सुखें प्राप्त झालीं असतां) **विगतस्पृहः** (ज्याची भोगतृष्णा नष्ट झाली आहे)–व–**वीतरागभयक्रोधः** (लोभ, भय, संताप वगैरे सर्व मनोविकार ज्याचे नष्ट झाले आहेत) –असा–**मुनिः** (ब्रह्मचिंतनामध्यें मग्न झालेला सिद्ध पुरुष)–त्याला–**स्थितधीः** (स्थिर बुद्धीचा–असें–) **उच्यते** (म्हणतात.) सारांश कसलेंही दुःख प्राप्त झालें तरी जो खिन्न होत नाहीं, किंवा कोणतेंही सुख मिळालें तरी ज्याची भोगतृष्णा जिवंत होत नाहीं, ज्याचा लोभ, किंवा भय, किंवा क्रोध वगैरे सर्व विकार नामरूपासकट नाहींसे झाले, अशा सिद्ध पुरुषालाच स्थितप्रज्ञ म्हणावें. पाठीमागील श्लोकांत, या श्लोकांत व पुढें, जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं प्रयत्नसाध्य आहेत. मुमुक्षूनें ह्या लक्षणांचें श्रवण करून अभ्यास करावा; आणि वैराग्यानें तीं आपल्यामध्यें आलीं तरच त्याला ब्रह्मज्ञान होणार आहे हें साधकांनीं लक्ष्यांत ठेवावें.

दुःखेष्विति । दुःखेष्वाध्यात्मिकादिषु प्राप्तेषु नोद्विग्नं न प्रक्षुभितं दुःखप्राप्तौ मनो यस्य सोऽयमनुद्विग्नमनाः । तथा सुखेषु प्राप्तेषु विगता स्पृहा तृष्णा यस्य नाग्निरिवेन्धनाद्याधाने सुखान्यनु विवर्धते स विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधो रागश्च भयं च क्रोधश्च वीता विगता यस्मात्स वीतरागभयक्रोधः स्थितधीः स्थितप्रज्ञो मुनिः संन्यासी तदोच्यते ॥ ५६ ॥

शारीरिक, मानसिक, दैविक व आकस्मिक दुःखें प्राप्त झालीं असतां ज्याचें मन प्रक्षुब्ध होत नाहीं–'आतां मी काय करूं? माझ्यावरच कां हा प्रसंग आला? आतां मला कोण मदत करील? कोण तारील?' अशाप्रकारें हांसत कर्म करून मागाहून रडणारे मूर्ख लोक तमोगुणात्मक शोकानें ओरडत असतात, धीराचे लोक आंतल्या आंत जळत असतात, वगैरे कोणताच प्रकार ज्याच्या मनामध्यें होत नाहीं, किंवा शारीरिक वगैरे सुखें प्राप्त झालीं असतां जो हर्षाच्या उन्मादानें नाचावयास लागत नाहीं, म्हणजे सुखभोगाविष-

यींची ज्याची व ज्याच्या मन, जिव्हा, नेत्र इत्यादि इंद्रियांची, तृष्णाच नष्ट झाली;–तो मनुष्य श्रेष्ठच होय. अर्जुना! ही तृष्णा अनेक प्रकारची आहे. सुख प्राप्त झालें म्हणजे तें संपेल कीं काय ही भीति, सुख संपल्यानंतर चुकल्यासारखें होऊन पुनः तें सुख असावें अशी आशा व इतरांस सुख प्राप्त झालें म्हणून उत्पन्न होणारी असूया असे अनेक प्रकार तृष्णेचे आहेत.–असो, सुखाची तृष्णा नष्ट झाली म्हणून ती सर्पण न घातलेल्या अग्निज्वालेप्रमाणें वृद्धिंगत होण्याचें बंदच झालें; सारांश स्वानंदरसामध्यें निमग्न झाल्यामुळें त्याची सुखतृष्णा समूळ नाहींशी झाली, व प्रियवस्तूवर लोभ, मृत्यूचें भय, शत्रूविरुद्ध क्रोध, इत्यादि मनोविकारांनीं ज्याच्यापासून सोडचिठ्ठी घेतली तो ब्रह्मज्ञानी संन्यासी स्थितप्रज्ञ होय. [पहा अ० ५ श्लोक २०].

रामानुज या अवस्थेस ‘ एकेंद्रियसंज्ञा ’ म्हणतात.

या श्लोकावरील ‘ पंडितांचें व्याख्यान फार सुरस आहे इतकेंच सांगणें शक्य आहे.’

किंच—

आणखी पहाः—

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ॥
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५७॥

यः (जो–पुरुष) **सर्वत्र** (सर्व ठिकाणीं) **अनभिस्नेहः** (अत्यंत स्नेहशून्य, ममत्वशून्य–असतो)–तसेंच–**तत्तत्** (तें, तें) **शुभाशुभं** (सुख किंवा दुःख) **प्राप्य** (प्राप्त झालें असतां) **न अभिनन्दति** (–तो–हर्षभरित होत नाहीं) **न द्वेष्टि** (–किंवा द्वेषयुक्त व खिन्न होत नाहीं) **तस्य** (त्या पुरुषाची) **प्रज्ञा** (बुद्धि) **प्रतिष्ठिता** (स्थिर झाली –असें जाण–)–सारांश ज्या पुरुषाला ह्या दृश्य जगांत आपलें असें कांहींच न दिसल्यामुळें कोठेंच प्रीति उत्पन्न होत नाहीं, तसेंच नानाप्रकारचीं सुखदुःखें प्राप्त झालीं असतां ज्याला कधींही हर्षविषाद वगैरे कांहीं होत नाहीं, त्याची बुद्धि स्थिर झाली असें जाणावें.–

यः सर्वत्रेति। यो मुनिः सर्वत्र देहजीवितादिष्वप्यन-भिस्नेहोऽभिस्नेहवर्जितस्तत्तत्प्राप्य शुभाशुभं तत्तच्छुभम-शुभं वा लब्ध्वा नाभिनन्दति न द्वेष्टि शुभं प्राप्य न तुष्यति न हृष्यत्यशुभं च प्राप्य न द्वेष्टीत्यर्थः। तस्यैवं हर्षविषा-दवर्जितस्य विवेकजा प्रज्ञा प्रतिष्ठिता भवति ॥ ५७ ॥

ज्या सिद्ध पुरुषाची कोणत्याही दृश्य पदार्थावर—मग तो स्वतःचा देह असो, वा जीव असो-कोणत्याही पदार्थावर—अत्यंत किंवा अल्प आसक्ति नसते, प्रेम नसतें, सारांश जो उदासीन असतो, तसेंच प्रारब्धवशात् चांगलें झालें, सुखकारक वस्तु प्राप्त झाली किंवा वाईट झालें, दुःखकारक प्रसंग गुदरला, तर आनंददायक गोष्ट झाली म्हणून ज्याला हर्ष, आनंद, होत नाहीं, किंवा प्रतिकूल प्रसंग प्राप्त झाला म्हणून ज्याला त्वेष (दुःख), उत्पन्न होत नाहीं, त्या हर्षखेद-शून्य पुरुषाची ज्ञानजन्य बुद्धि स्थिर झाली, असें म्हणावें.—सारांश त्याच सिद्धपुरुषाला परमार्थ साध्य झाला असें समजावें.—

मधुसूदनीकार, शंकरानंद वगैरे सर्व अद्वैती टीकाकारांचा एकच अभिप्राय आहे.

मधुसूदनीकार हे स्नेह, हर्ष, विषाद वगैरे तामसवृत्ति आहेत असें सांगून त्यांचा उद्भव सिद्ध पुरुषांचे ठायीं होणारच नाहीं असें म्हणतात. **द्विवेदी** म्हणतात कीं दृश्य जगावरील आसक्ति नष्ट होऊन सर्वच ब्रह्ममय आलेल्या मुनीला हर्षखेद करण्यासारखें कांहींच दिसत नसल्यामुळें तो कोणाची स्तुतिनिंदा करीत नाहीं. त्याची वाणी नेहमीं ब्रह्मानुवाद, व मुमुक्षूंस उपदेश, करण्यामध्यें गढून गेलेली असते.

मध्वाचार्य रामानुज यांचाही अर्थ वरीलप्रमाणेंच आहे. **वल्लभ** यांनीं 'सर्व' या शब्दाचा संसारामध्यें असा अर्थ केला आहे.

चतरजी म्हणतातः येथें स्थितप्रज्ञ बोलतो कसा यास उत्तर असें दिलें कीं त्याचें सर्व भाषण स्वार्थशून्य, अहंकारशून्य असतें.

ज्ञानेश्वर—जो सर्वत्र सदा सरिसा (सारखा)। परिपूर्ण चंद्र का जैसा। 'अधमोत्तम,' प्रकाशा। (ब्रह्मज्ञानरूपप्रकाश फांकला

असतां त्यामध्यें) न म्हणे ॥ ऐसी अनवच्छिन्न (अखंड) समता। भूतमात्रीं सदयता। आणि पालट नाहीं चित्ता। कवणे वेळे ॥

वामन—अहंता ममता गुणें। मी, माझें म्हणावें ॥ तरी देही नसे अहंता। त्यास कैची अन्यत्र ममता?। स्नेहपाश नसे चित्ता। जो कांहीं दाटूनि बोलवी ॥....सारांश–भाव ऐसा निघाला। कीं जो 'नाहीं' ऐसा झाला। तों तो साधक बोलिला (म्हटला गेला.)। साधन करावें त्या नरें ॥ साधकानें कसें वागावें ह्याबद्दल पंडितांनीं उत्कृष्ट उपदेश केला आहे, तो मुमुक्षूंनीं अवश्य वाचावा. ॥ ५७ ॥

किंच—

आणखी—

यदा संहरते चायं
कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ॥
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्य-
स्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

यदा च (आणखी ज्या वेळीं) **अयं** (हा–सिद्धपुरुष–) **सर्वशः** (सर्व बाजूंनीं) **इन्द्रियाणि** आपली सर्व इंद्रियें) **इन्द्रियार्थेभ्यः** (त्या त्या इंद्रियाच्या विषयांपासून) **संहरते** (आंखडून घेतो, मागें घेतो) **कूर्मः अङ्गानि इव** (कूर्म, कांसव, ज्याप्रमाणें आपलीं अंगें आपल्या पोटाखालीं घेतें त्याप्रमाणें;) तेव्हां–**तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता** (त्याची बुद्धि स्थिर झाली–असें समज.–) सारांश एखादें भय प्राप्त झालें असतां ज्याप्रमाणें कांसव आपलीं सर्व अंगें एकदम आंखडून घेते, त्याप्रमाणें जो सिद्ध पुरुष प्रत्येक वेळीं आपलीं सर्व इंद्रियें विषयांपासून परावृत्त' करून घेतो, कोणताही बाह्यविषय प्राप्त झाल्याबरोबर जो आपल्या इंद्रियांचें व मनाचें दमन करतो, त्यालाच स्थितप्रज्ञ असें म्हणावें.–'संहरते' ह्या शब्दावरूनच असें व्यक्त होतें कीं या संन्याशांचीं इंद्रियें विषयोपभोग घेत

असतांनाही त्या उपभोगांत लिप्त होत नाहींत ! हा **चतरजींनीं** गूढार्थ काढला आहे.

यदा संहरत इति। यदा संहरते सम्यगुपसंहरते चायं ज्ञाननिष्ठायां प्रवृत्तो यतिः कूर्मोऽङ्गानीव सर्वशो यथा कूर्मो भयात्स्वान्यङ्गान्युपसंहरति सर्वत एवं ज्ञाननिष्ठ इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यः सर्वविषयेभ्य उपसंहरते। तस्य प्रज्ञा प्रतिष्ठितेत्युक्तार्थं वाक्यम् ॥ ५८ ॥

कोणतेंही भय कारण उत्पन्न झालें असतां ज्याप्रमाणें कांसव आपल्या सर्वांगाचा संकोच एकदम करून निर्भय होतें, त्याप्रमाणें ज्ञाननिष्ठेनें मुक्तिनामक पुरुषार्थ साध्य करणारा साधक पुरुष (संन्यासी) ज्या वेळीं स्वतःच्या मनास व इंद्रियांस रूप, रस, गंधादि सर्व सात्त्विक, राजस, व तामस (ही साधकाची स्थिति वर्णिली आहे, सिद्धाची नव्हे असें **चतरजी** म्हणतात. सिद्धपुरुषाला इंद्रियाची भीति असण्याचेंही कारण नसतें.)–विषयांपासून परावृत्त करण्याला समर्थ होतो व वस्तुतः निर्विषय होतो त्या वेळीं तो स्थितप्रज्ञ झाला, त्या वेळीं त्याची बुद्धि स्थिर झाली, त्या वेळीं त्याला समाधिभंगाची भीति राहिली नाहीं, असें समजावें.–सर्व इंद्रियें, मन, बुद्धि वगैरे निर्विषय झाल्यावर समाधिभंगाची भीति नाहींशी होते हें तज्ज्ञांस विदितच आहे. ज्ञाननिष्ठेला महद्वैराग्य, तीव्र मोक्षेच्छा व ब्रह्मपरत्व अवश्य असावीं लागतात हें खरें, पण प्रथम इंद्रियनिग्रह झाल्यावर मग हीं पुढचीं साधनें आहेत.

अद्वैत टीकाकारांचा हाच आशय आहे.

रामानुज—‘ विषयाचें दर्शन झाल्याबरोबर मुमुक्षु आपल्या विषयगामी इंद्रियांचा संकोच करितो.’ **मध्वाचार्य** व त्यांचे अनुयायी ‘ अनायासानें आपल्या इंद्रियांचा संकोच करितो ’ असें म्हणतात. कूर्माच्या दृष्टांतास अनुरूप हा अर्थ आहे.

ज्ञानेश्वर—तैसीं (कूर्मावयवासारखीं) इंद्रियें आपैति (आपल्या-आपण)। जयाचें म्हणितलें करितीं। तयाची प्रज्ञा जाण स्थिति। पावली असे ॥

पंडितांचा दृष्टांत:—चेंडू भूमीवरी पडे। तो भूमी स्पर्शतां उडे। परी त्या भूमीस न जडे। मृत्पिंड जैसा॥ प्रारब्धानें प्राप्त झालेले विषय साधक पुरुष कसे भोगतो व विषयाधीन कसा होत नाहीं यास हा दाखला फार चांगला आहे. पंडिताचें हेंही व्याख्यान वाचनीय आहे.

तत्र विषयाननाहरत आतुरस्यापीन्द्रियाणि निवर्तन्ते कूर्माङ्गाणीव संह्रियन्ते, न तु तद्विषयो रागः, स कथं संह्रियत इति। उच्यते—

शिष्य—महाराज! ज्यांना ज्ञान नाहीं असे मूर्ख लोक सुद्धां तपश्चर्या करण्यास बसले, किंवा रोगादिकांच्या योगानें पीडित झाले म्हणजे–ते लोक सुद्धां–विषयांचें ग्रहण करीत नाहीं, विषयपराङ्मुख होतात, म्हणून त्यांस हीं स्थितप्रज्ञ म्हणावयाचें काय?

गुरु—छेरे वेड्या! जोंपर्यंत वासना नष्ट झाली नाहीं, विषयतृष्णा नष्ट झाली नाहीं, तोंपर्यंत समाधिसिद्धि कोठून होणार? सारांश बाह्यविषयांची आसक्तीच नष्ट झाली पाहिजे.

शिष्य—ही आसक्ति कशी नाहींशी करावी?

गुरु—सांगतों, ऐक.

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥५९॥

निराहारस्य (इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करण्याचें टाकून दिलें आहे ज्याच्या अशा) **देहिनः** (देहधारण करणाऱ्या मूर्खापासून सुद्धां) **विषयाः** (रूप, रस, गंधादि विषय) **विनिवर्तन्ते** (पराङ्मुख होतात). पण कसे?-**रसवर्जं** (विषयावरील आसक्ति खेरीज करून!) —एखाद्या मूर्खानें नियमच केला तर त्याचीं इंद्रियें व मन, हीं विषयापासून परावृत्त होतात हें खरें, पण त्या पुरुषाची विषयभक्ति कमी झाली आहे म्हणून नव्हे, तर त्यानें नियमच केला आहे, त्याला विषय मिळतच नाहींत म्हणून त्याचें मन

व इंद्रियें विषयग्रहण करीत नाहींत!–असो; पण–**रसः अपि** (ती प्रीति, ती आसक्तिसुद्धां) **अस्य** (ज्ञानी पुरुषाची) **परं दृष्ट्वा** (परब्रह्मवृत्ति झाली आहे, असें पाहून) **निवर्तते** (परावृत्त होते). सारांश ज्याला आत्मज्ञान झालें व जो 'मीच परब्रह्म आहें' असें चिंतन करूं लागला, त्या पुरुषाची ती ब्रह्ममग्नतापाहून, विषयतृष्णा आपल्या आपणच नाहींशी होते. तात्पर्य ब्रह्मानंदी ज्याची टाळी लागली, त्याची विषयवासनाही नष्ट होते.— नुसते विषयच पराङ्मुख होतात असें नाहीं तर विषयवासनाही अस्तंगत होते.

विषया इति । यद्यपि विषयोपलक्षितानि विषयशब्दवाच्यानीन्द्रियाण्यथवा विषया एव निराहारस्यानाह्रियमाणविषयस्य कष्टे तपसि स्थितस्य मूर्खस्यापि विनिवर्तन्ते देहिनो देहवतो रसवर्जं रसो रागो विषयेषु यस्तं वर्जयित्वा । रसशब्दो रागे प्रसिद्धः स्वरसेन प्रवृत्तो रसिको रसज्ञ इत्यादिदर्शनात् । सोऽपि रसो रञ्जनरूपः सूक्ष्मोऽस्य यतेः परं परमार्थतत्त्वं ब्रह्म दृष्ट्वोपलभ्याहमेव तदिति वर्तमानस्य निवर्तते निर्बीजं विषयविज्ञानं संपद्यत इत्यर्थः । नासति सम्यग्दर्शने रसस्योच्छेदः । तस्मात्सम्यग्दर्शनात्मिकायाः प्रज्ञायाः स्थैर्यं कर्तव्यमित्यभिप्रायः ॥ ५९ ॥

येथें आपण विषय शब्दानें डोळे, जिव्हा वगैरे इंद्रियें व मन हीं घेतलीं किंवा विषय शब्दाचा अर्थ रूप, रस, इत्यादि बाह्यविषयपर घेतला तरी तात्पर्य एकच आहे. तेव्हां जरी एखाद्या मूर्खानें व्रत किंवा तप करावयाचें म्हणून विषयांचें इंद्रियाकरवीं ग्रहण केलें नाहीं तथापि त्या अज्ञ मनुष्यानें विषयत्याग केला किंवा इंद्रियदमन केलें असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण उपभोग घेण्याची जी वासना, जी आसक्ति, असते ती या मूर्खाच्या मनांतून नष्ट झालेली नसते.–तात्पर्य 'द्राक्षें आंबट' म्हणणाऱ्या कोल्ह्याप्रमाणेंच या अविद्वान् पुरुषाची स्थिति असते. विषयावरील प्रीति

उडाली म्हणून हे विषयत्याग करितात असें नव्हे, तर विषय मिळत नाहींत म्हणून किंवा विषय विषासारखे होतात म्हणून, किंवा कांहीं व्रत, नेम, केला आहे म्हणून हे लोक विषयग्रहण करीत नाहींत.--असो; रस शब्दाचा येथें प्रीति, आसक्ति, असाच अर्थ केला पाहिजे. रसिक, रसज्ञ इत्यादि शब्दांवरून रस शब्दाचा अर्थ प्रीति असाच होतो, गोड, आंबट, तिखट, रस असा होत नाहीं, हें उघड आहे. आतां परब्रह्माचें पूर्ण ज्ञान होऊन जो समाधीमध्येंच निमग्न झाला व मीच ब्रम्ह असें ज्याचें अनुसंधान लागलें त्या सम्यग्ज्ञानी पुरुषाची ब्रह्म-वृत्ति पाहिली म्हणजे विषयासक्ति किंवा सूक्ष्मरूपी व प्रियकर विषय-वासना विषयासुद्धां आपण होऊनच पराङ्मुख होते. त्या ब्रह्मज्ञ पुरुषाचा ब्रह्मानंद पाहिला म्हणजे वासना समूळ आणि सबीज नाहींशी होते. सारांश सम्यग्ज्ञानी पुरुषाच्या सर्व वासना नष्ट होतात; अथवा सम्यग्ज्ञान होतांक्षणींच वासनांचा क्षय होतो.

शिष्य—गुरुजी! पूर्णज्ञान अथवा सम्यग्ज्ञान झाल्याशिवाय वासनानाश होत नाहीं असें आपण म्हणतां आणि सामान्यतः आपण असें सांगत असतां कीं वासनानाश झाल्याविना सम्यग्ज्ञान होत नाहीं! तेव्हां हें मोठें कोडेंच झालें. सारांश कोणालाच सम्यग्ज्ञान व्हावयाचें नाहीं. परवानगीवांचून प्रवेश नाहीं आणि प्रवेशावांचून परवानगी नाहीं असाच हा प्रकार झाला म्हणावयाचा!

गुरु—वः तूं बरींच लांबलांब व्याख्यानें झोडायला लागलास! अरे, नुसतें येवढें ध्यानांत ठेव म्हणजे तुझें कोडें उकलेल. प्रथमतः नित्य कोणतें, अनित्य कोणतें याचा विवेक केलास म्हणजे विषया-संबंधी जी आसक्ति असते, तिच्यापैकीं स्थूलभाग नष्ट होईल. हा स्थूलभाग नष्ट झाला म्हणजे सम्यग्ज्ञान प्राप्त होईल आणि सम्यग्ज्ञान झालें म्हणजे स्थूल व सूक्ष्मरूपी विषयवासनेचा नाश होईल. सम-जलास? सारांश सम्यग्ज्ञान किंवा पूर्णज्ञान' झाल्याविना विषयास-क्तीचा उच्छेद व्हावयाचा नाहीं. म्हणून सम्यग्ज्ञान मिळवून देणारी जी सांख्यबुद्धि तिचें स्थैर्य कर.

अद्वैतीटीकाकारांचा हाच आशय आहे. श्रीधर निराहारी म्ह-

णजे भुकेलेला मनुष्य व रस म्हणजे अन्नतृष्णा असाही एक अर्थ करून दाखवितात. **शंकरानंद** म्हणतात कीं, प्रीतीचें अस्तित्व हें अज्ञानाचें लक्षण आहे. श्लोकांत 'अपि' हा शब्द आहे तो प्रज्ञास्थैर्याचें सामर्थ्य प्रकट करून रसास सुद्धां मागें हटवितो ! हठयोगानें इंद्रियदमन होतें पण वासनाक्षय होत नाहीं, राजयोगानें वासनेचा क्षय निर्मूळ होतो असें दाखविण्याचा भगवंताचा हेतु आहे असें **प्रो० द्विवेदी** म्हणतात.

रामानुज म्हणतात :—श्लोक ५५ तें ५९ पर्यंत ज्ञाननिष्ठेची प्रगति कसकशी होत जाते हें सांगितलें आहे. ह्या श्लोकांत ज्ञाननिष्ठा प्राप्त होणें दुर्घट आहे व वासना क्षय झाल्याविना ज्ञान उत्पन्न होत नाहीं असें सांगतात.

मध्वाचार्य भागवतांतील एक श्लोक समानार्थक देतात.

"इंद्रियाणि जयन्त्याशु निराहारमनीषिणः।
वर्जयित्वा तु रसनां, असौ रस्ये हि वर्धते "॥

यज्ञयागामध्यें व निराहार केला असतां विषयोपभोगाचें सामर्थ्य मात्र नष्ट होतें पण रसाची आकांक्षा नष्ट होत नाहीं. ब्रह्मपदीं (विष्णुपदीं) ज्याची वृत्ति लीन झाली त्याचीच विषयवासना नष्ट होते; शिवाय इंद्रियदमन सुद्धां महाप्रयत्नसाध्य आहे असें यांचें मत आहे.

सत्यानंद म्हणतात कीं, बाह्येंद्रियांचा निरोध निराहारानें होतोच मनोजय हा विष्णुसाक्षात्कारानें होतो. निराहार असला म्हणजे इंद्रियें विषयांचें ग्रहण करीत नाहींत. व विष्णुपदीं चित्तवृत्ति लीन झालेली असली म्हणजे मनांत विषयप्राप्तीचा अंकुर फुटत नाहीं व आत्माही क्षुब्ध होत नाहीं. **राघवें०**—बाह्येंद्रियांचा व वासनेचा क्षय झाल्याविना ज्ञाननिष्ठा नाहीं.

ज्ञानेश्वरांचा दृष्टांत:—जैसी वरिवरि पालवी खुडिजे। आणि मुळीं उदक घालिजे । तरी कैसेनि नाश निपजे । तया वृक्षा ? ॥ तो उदकाचेनि बळें अधिकें । जैसा आडवेनि अंगें फांके । तैसा मानसीं विषय पोखे (वाढत जातो, प्रवेश करितो)। रसनाद्वारें ॥ ब्रह्मसाक्षा-

त्कार झाल्यावर–तैं शरीरभाव नासती । इंद्रियें विषय विसरती । जैं सोहंभावप्रतीति । प्रगट होय ॥

पंडितांच्या व्याख्यानाचा मासला:–अमृत पिऊं लागे रसना । तरी कांजी कां निरस होईना ? । राग तो विराग झाला अर्जुना !। देखितां परमात्मयातें ॥ स्वरूप गोडी लागतां मना । सकळ जाती कामना । भोगेच्छा सर्वथा असेना । स्थितप्रज्ञासी ॥

चतरजी म्हणतात:–' विषयाची आवड नष्ट झाली म्हणजे समाधीची सिद्धता होते. विषय हे स्वतः सुख अगर दुःख देत नाहींत. आपल्या आवडीनुरूप अगर नावडीप्रमाणें विषय सुखकर किंवा दुःखकर होतात. गाणें सर्वांस सारखेंच आवडतें असें नाहीं व एका मनुष्यास एकच सूर नेहमीं आवडतो असें नाहीं. एवंच विषयांत सुख नाहीं, आपल्या आवडींत आहे. ती आवड नष्ट केली म्हणजे काम झालें ! ही आवड नष्ट करावयास समाधीचें साधन उत्कृष्ट आहे.' आपल्या आवडीवरच पदार्थांस सुखदुःख देण्याचें सामर्थ्य येतें, अगर पदार्थ सुखकारक (आयुष्य वाढविण्याचें साधन असणारे) आणि दुःखकारक (आयुष्याचा क्षय करणारे) आहेत म्हणून आवड नावड उत्पन्न होते हा वादग्रस्त प्रश्न आहे. याचा वादविवाद तिसऱ्या किंवा चवथ्या अध्यायांत करूं. **चतरजींचे** म्हणण्याप्रमाणें परमार्थस्वरूप समजलें म्हणजे सर्व इच्छा नष्ट होतात, व सर्व बाह्यसुखें कस्पटाप्रमाणें वाटूं लागतात, हें विचारी पुरुषांस मान्य होईल हें सांगावयास नकोच ! ॥ ५९ ॥

सम्यग्दर्शनलक्षणप्रज्ञास्थैर्यं चिकीर्षताऽऽदाविन्द्रियाणि स्ववशे स्थापयितव्यानि यस्मात्तदनवस्थापने दोषमाह—

शिष्य—गुरुजी ! मनुष्यानें आपलें मन मात्र आपल्या स्वाधीन करून ठेविलें म्हणजे झालें; मग इंद्रियांची इतकी प्रतिष्ठा आपण कां सांगावी ?–पेढीवरील मोहोर चांगली शाबूत आहे, असें पाहिल्यावर मग किल्ल्याचवगैरेची चौकशी कशाला ?—

गुरु—देवप्रियच तूं ! तुला काय म्हणावयाचें आहे ? वेड्या ! मन स्वाधीन ठेविलें आणि इंद्रियांस वाटेल तसें बहकूं दिलें तर काय

अनर्थ होतात ते पहा. तुझी युक्ति म्हणजे पुढच्या दरवाजावर चौकी पहारा ठेवून मागचें दार मोकळें ठेवण्यासारखीच चतुराईची आहे! असो, ऐकः—

यततो ह्यपि कौन्तेय
पुरुषस्य विपश्चितः ॥
इन्द्रियाणि प्रमाथीनि
हरन्ति प्रसभं मनः ॥ ६० ॥

कौन्तेय (कुन्तीपुत्रा अर्जुना!) हि (प्रसिद्धच आहे कीं) **यततः अपि विपश्चितः पुरुषस्य** (मोठा प्रयत्न करणाऱ्या बुद्धिवंत पुरुषाचें सुद्धा) **मनः** (मन) **प्रमाथीनि** (अत्यंत बळकट व नाश करण्यास समर्थ अशीं) **इंद्रियाणि** (इंद्रियें) **प्रसभं** (बलात्कारानें) **हरन्ति** (हरण करितात; खेंचून नेतात.) सारांश मोठमोठ्या बुद्धिवान पुरुषांचें वश केलेलें मन सुद्धां इंद्रियांच्या प्रचंड सामर्थ्यानें विषयाभिमुख होतें! म्हणून इंद्रियदमन करणें हें अत्यंत महत्वाचें आहे—

शिष्य—गुरुजी! विषयांचें दोषदर्शन झाल्यावर इंद्रियें आपसुखेंच त्या त्या दुष्ट विषयांपासून माघारीं परततात. मग प्रज्ञास्थैर्य मिळवूं पाहणाऱ्या साधकाला काय करायचें उरलें आहे इंद्रियांचे संबंधानें?

गुरु—काय उरलें? अरे तुला अद्यापि इंद्रियांचा सपाटा ठाऊक नाहीं वाटतें. हा त्यांचा जोर व त्याला काय करायला पाहिजे तें आतां पुढच्या दोन श्लोकांत सांगतात तें समजून घे:—

यतत इति । यततः प्रयत्नं कुर्वतोऽपि हि यस्मात्कौन्तेय पुरुषस्य विपश्चितो मेधाविनोऽपीति व्यवहितेन संबन्धः । इन्द्रियाणि प्रमाथीनि प्रमथनशीलानि विषयाभिमुखं हि पुरुषं विक्षोभयन्त्याकुली कुर्वन्ति । आकुलीकृत्य च हरन्ति प्रसभं प्रसह्य प्रकाशमेव पश्यतो विवेकविज्ञानयुक्तं मनो यतस्तस्मात् ॥ ६० ॥

अर्जुना! सर्व प्रकारचे बाह्य विषय दुष्ट आहेत असा नेहमीं अनुभव येणें याचें नांव प्रयत्न होय. अशा प्रकारें प्रयत्न करणाऱ्या विद्वान व बुद्धिवंत मनुष्याचें सुद्धां विवेकी व विज्ञानी मन हीं बलवान व नाशकारीं इंद्रियें खेंचून नेतात. आपलीं इंद्रियें अत्यंत सामर्थ्यवंत असून विवेकाचें उपमर्दन करणारीं आहेत. विवेकी पुरुषापुढें विषयाला येऊं दे मात्र कीं त्यांनीं त्याच्या मनाला क्षुब्ध व आकुल केलेंच म्हणून समजा. आत्मानात्मविवेकी मनुष्याचें मन व्याकुल झालेलें पाहिलें कीं त्या विचारशील व अनुभवी मनाला देखत देखत हीं इंद्रियें विषयाकडे बलात्कारानें ओढून नेऊन बुडवितात! म्हणून इंद्रियांचें दमन फार महत्वाचें आहे.

मधु०—'क्षणमात्र मन निर्विषय केलें तरी, मनाचा स्वामी जो पुरुष त्याच्या समक्ष व विवेकरूपी रखवालदाराच्या देखत हीं जोरदार इंद्रियें विवेकी मनाला दिवसाढवळ्या नेतात! मालकाच्या देखत रखवालदारास एकीकडे ढकलून देऊन डबोलेंच्या डबोलें उपटणाऱ्या दरवडेखोराचीच ही गत!' **श्रीधर**—'साधकावस्थेंत इंद्रियांस फारच जपलें पाहिजे. यततः = मोक्ष मिळविण्याची खटपट करीत असतां, प्रमाथीनि = प्रक्षोभ करणारीं.' '**शंकरानंदः**—रागद्वेषाची निवृत्ति, निष्प्रवृत्ति, (कर्मसंन्यास), विदेहमुक्ति आणि सम्यग्ज्ञानपूर्वक साक्षात्कार हीं सर्व मिळवायला इंद्रियनिग्रह अत्यंत आवश्यक आहे. यततः = समाधीविषयीं प्रयत्न करीत असतां. विपश्चितः = विषयाला अज्ञानी मनुष्य वश होतो हें ज्ञान ज्याला आहे तो. मनः = ब्रह्मविचार करण्याचें साधन.' **द्विवेदी** म्हणतात कीं, 'इंद्रियनिग्रह करून मनोजय केला म्हणजे साक्षात्कार होतो व स्थैर्य येतें. असा ज्यानें इंद्रियनिग्रह केला तोच खरा स्थितप्रज्ञ होय.'

चतरजीः—'या दृश्य विश्वांत काय दुःख भरलें आहे, उपाधिजन्य जीवाला कोण यातना भोगाव्या लागतात, निर्विकार सद्वस्तु कशी आहे हें ज्याला समजलें, आणि सर्व प्रकारचे विषयोपभोग नश्वर व दुःखदायक आहेत, सद्वस्तु मात्र शुद्ध आनंदस्वरूपी व नित्य आहे म्हणून नश्वराची वासना नष्ट करावी असा ज्यांचा निश्चय

झाला, तोच खरा विद्वान व खरा धार्मिक होय. बाकीचे धार्मिकंमन्य नुसते आडनांवाचे तरी आहेत कीं नाहीं ईश्वरास ठाऊक !'

रामानुज.—'आत्मदर्शन झाल्याविना विषयासक्ति नष्ट होत नाहीं. या श्लोकांतही इंद्रियजयाची प्राप्ति आत्मदर्शन झाल्यावांचून होत नाहीं असें सांगितलें आहे. पुनः इंद्रियजय, मनोनिग्रह व वासनाक्षय सिद्ध झाल्यावांचून आत्मदर्शन होत नाहीं ! एवंच ज्ञाननिष्ठा सिद्ध होणें अत्यंत कठिणच आहे !' या शंकेचें निवारण ५९ व्या श्लोकांत केलेंच आहे.

मध्व:—'विपश्चित् = ज्याला श्रीविष्णूचा साक्षात्कार झाला नाहीं तो. हा शरीराभिमानी मनुष्य साधारणच यत्न करितो म्हणून त्याचीं इंद्रियें उच्छृंखळ असतात; म्हणून शरीराभिमान सोडून विष्णुचरणीं लीन व्हावें म्हणजे मात्र इंद्रियनिग्रह, व मनोजय पूर्ण होऊन परमेश्वराचा साक्षात्कार होईल, इतर जे नुसते ज्ञानी आहेत व शरीराभिमानी आहेत, त्यांचीं इंद्रियें विषयाजवळ आलीं कीं तीं इंद्रियें मनास विषयाभिमुख करून विषयमग्न करितात. हाच अभिप्राय **सत्यानंद राघवेंद्रयति** व **विद्याधिराज** यांचा आहे.

ज्ञानेश्वर:—या इंद्रियांची प्रौढी ऐसी। जैसी मंत्रज्ञाते विवसी (भूत, विघ्नदेवता) । भुलवी कां ॥ देखे विषय हे तैसे । पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषे । मग आकळती स्पर्शें । इंद्रियांचेनि ॥ तिये संधि मन जाये । मग अभ्यासीं थोटावलें (निर्बळ होऊन) ठाये । ऐसें बळकटपण आहे । इंद्रियांचें ॥ पंडिताचा अभिप्राय आचार्यांप्रमाणेंच आहे ॥ ६० ॥

तानि सर्वाणि संयम्य
युक्त आसीत मत्परः ॥
वशे हि यस्येन्द्रियाणि
तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

तानि (तीं) **सर्वाणि** (सर्व इंद्रियें) **संयम्य** (वश करून घेऊन)

युक्तः (ज्यानें आपलें मन विकल्परहित केलें आहे, ज्याचें मन परमार्थ सोडून इतरत्र जात नाहीं, सारांश विक्षेपरहित असा होत्साता) **मत्परः** (माझे ठिकाणीं ममत्वशून्य चित्त स्थापित केलें आहे असा) **आसीत** (–होऊन बसावें) **हि** (कारण) **यस्य** (ज्याच्या) **वशे** (स्वाधीन) **इंद्रियाणि** (कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें)–आहेत–**तस्य** (त्याची) **प्रज्ञा** (बुद्धि) **प्रतिष्ठिता** (स्थिर झाली)–असें समजावें.–सारांश दोन्ही प्रकारचीं इंद्रियें म्हणजे ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें स्वाधीन करून घेऊन व अनन्यभावानें माझे ठिकाणीं आपलें ममताशून्य चित्त समर्पण करून मुमुक्षूनें असावें. अर्जुना! ज्याचें ताब्यांत वरील सर्व इंद्रियें आलीं त्याची बुद्धि स्थिर झाली, असेंच समजलें पाहिजे.–' स्थितप्रज्ञ बसतो कसा ह्या प्रश्नास प्रस्तुतच्या श्लोकांत उत्तर दिलें आहे.

तानीति । तानि सर्वाणि संयम्य संयमनं वशीकरणं कृत्वा युक्तः समाहितः सन्नासीत । मत्परोऽहं वासुदेवः सर्वप्रत्यगात्मा परो यस्य स मत्परो नान्योऽहं तस्मादित्यासीतेत्यर्थः । एवमासीनस्य यतेर्वशे हि यस्येन्द्रियाणि वर्तन्तेऽभ्यासबलात्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

त्या सर्व ज्ञान आणि कर्म उत्पन्न करण्यास साधनीभूत होणाऱ्या इंद्रियांची विषयाकडे जाण्याची प्रवृत्ति बंद करून--त्यांस आपल्या स्वाधीन करून घेऊन मुमुक्षूनें आपलें अंतःकरण स्थिर करावें, आणि सर्व विश्वाचा आत्मा जो मी वासुदेव, तोच परमात्मा सर्वापेक्षां श्रेष्ठ आहे, अशी भावना करून नंतर निर्विकल्प व्हावें आणि ' मी वासुदेवाहून भिन्न नाहीं ' असें चिंतन करीत बसावें. असा नित्य अभ्यास करणाऱ्या (मीच परमात्मा आहें असें जें निरंतर चिंतन त्याला अभ्यास म्हणावें, किंवा विषय दुष्ट 'आहेत असें नित्य समजणें व त्याप्रमाणें आचरण करणें यालाही अभ्यास म्हणावें.)–असा दृढ अभ्यास करणाऱ्या ज्या संन्याशाच्या स्वाधीन मनासुद्धां सर्व इंद्रियें अभ्यासबळानें असतात, त्याची बुद्धि स्थिर झाली असें समज.

मधुः—मत्परः = माझा अनन्य भक्त.

'न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित्' ॥

(वासुदेवभक्तांचें अकल्याण कधींही व्हावयाचेंच नाहीं.) राजसेवक पाहिल्यानंतर चोरांची वगैरे जशी तारंबळ होते व ते परत जातात, तसेंच वासुदेवभक्त दृष्टीस पडल्यावर इंद्रियें लज्जित होऊन परत फिरतात.

शंकरानंदः—युक्तः = चित्ताला ब्रह्माकार करून परब्रह्मच मी आहें अशी ज्याची बुद्धि झाली तोच ब्रह्मज्ञानी व तोच स्थितप्रज्ञ होय.

प्रपाकारः—

" यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सह ।
तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः " ॥

(मनोनिग्रह करून जो विज्ञानवान् झाला, त्याच्या मात्र स्वाधीन इंद्रियें राहतात. कशीं? तर ज्याप्रमाणें चांगले घोडे सारथ्याच्या ताब्यांत असतात त्याप्रमाणें होय) मनाला व इंद्रियास अश्वाची, शरीरास रथाची व आत्म्यास सारथ्याची उपमा प्लेटोनामक ग्रीसदेशस्थ महातत्त्ववेत्त्यानें दिली आहे ती व ही उपमा पाहून तत्त्वभक्तांस वरील कल्पनासादृश्याचें किती बरें कौतुक वाटेल?

द्विवेदीः—मत्परः = 'परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊन,' [पहा, भागवत स्कंध ३ अ० २७] दुष्ट मार्गाला लागलेलें मनाला हळूहळू अनन्यभक्तिभावानें व विरक्तबुद्धीनें आपल्या ताब्यांत आणावें.

पर्वतेः—ईश्वरच आहे अत्यंतप्रिय ज्यास तो मत्पर असें म्हणतात.

रामानुज—इंद्रियनिग्रह झाल्याशिवाय चित्तस्थैर्य मिळत नाहीं, व चित्तस्थैर्य झाल्याविना इंद्रियनिग्रह होत नाहीं, हा परस्पराश्रित दोष काढून टाकण्यासाठीं दयाळु परमेश्वरानें ह्या श्लोकांत युक्ति सांगितली आहे ती अशी कीं, प्रथमतः विषयलोलुप असणाऱ्या अनावर इंद्रियांस बद्ध करून आपलें मन ईश्वरविषयकच करावें. असें केल्यानें कल्याण होईल म्हणजे मन सद्विषयांचें ध्यान करूं लागेल. ह्याप्रमाणें मन शुद्ध व सात्त्विक झालें म्हणजे ईश्वरप्रसादानें त्याला

इंद्रियांचा पूर्ण निग्रह करितां येईल. इंद्रियनिग्रह झाला म्हणजे आत्मदर्शनाला काय उशीर?

" यथाऽग्निरुद्धतशिखः कक्षं दहति सानिलः ।
तथा चित्तस्थितो विष्णुर्योगिनां सर्वकिल्बिषम् "

(वायूचें साहाय्य असलें म्हणजे ज्वालायुक्त अग्नि तृणाचें जसें क्षणमात्रांत दहन करितो, त्याप्रमाणें ज्याच्या चित्तामध्यें श्रीविष्णुमूर्ति असेल त्या योग्याचें सर्व पातक एका क्षणांत भस्म होऊन जातें.) **मध्व, सत्यानंद, राघवेंद्रयति** व **विद्याधिराज** यांचा हाच अभिप्राय असून **हरियोग** असल्याविना नुसत्या अल्पाहार व एकांत या सामान्य गोष्टींनीं इंद्रियांचा निग्रह होणें शक्यच नाहीं असें ते म्हणतात. निराहारानें इंद्रियजय साध्य नाहीं, कारण निराहारी मनुष्य जगत नाहीं; ब्रह्मज्ञानानेंही साध्य नाहीं; कारण इंद्रियजय असल्यावांचून ब्रह्मज्ञान नाहीं! **आचार्यांचें** यावर काय म्हणणें आहे व कर्मयोगाचा मूळ उद्देश काय आहे हें मागें सांगितलेंच आहे. पुढेंही तिसऱ्या अध्यायांत याचा विचार व्हावयाचा आहे.

चतरजीः—आपण इंद्रियांच्या स्वाधीन न राहतां त्यांस आपलेंसें करणें म्हणजे खरें संयमन होय. नुसते इंद्रियव्यापार बंद केल्यानें त्यांचा निग्रह होत नाहीं. आपण सांगूं तसें त्यांनीं वागणें हा खरा इंद्रियनिग्रह. या संबंधानें **कोरिंथिअन्स** नामक अध्याय वाचण्यासारखा आहे असें म्हणतात. **बायबल** नामक ख्रिस्तीलोकांच्या पवित्र पुस्तकांत हा अध्याय आहे.

ज्ञानेश्वरः—तोचि तूं जाण । योग निष्ठेसि कारण । जयाचें विषय सुखें अंतःकरण । झकवेना (फसविलें जात नाहीं, ज्याचें मनाला विषयसुख फसवूं शकत नाहीं) ॥ जो आत्मबोध युक्त । होऊन असे सतत । जो मातें हृदया आंत । विसंबेना ॥ एऱ्हवी बाह्यविषय तरी नाहीं । परी मानसी होईल जरी कांहीं । तरी साद्यंतची पाही । संसार असे (मनांत विषय आला कीं संसार लागलाच पाठीमागें)! ॥ जैसा कां विषाचा लेश । घेतलिया होत बहुवस । मग निभ्रांत करी नाश ।

जीवितासी ॥ तैसी विषयाची शंका । मनीं वसती देखा । घात करी अशेखा । विवेकजाता ॥

पंडितांची 'मत्परा' ची व्याख्याः-अगा ! तीं इंद्रियें आवरुनि । स्वस्वरूपीं चित्त योजुनि । असतो मत्पर होऊनि । सगुण भजनीं सादर ॥ कीं इंद्रियांतें नेमुनि (इंद्रियनिग्रह करून) ॥ आणि स्वस्वरूपीं चित्त योजुनि । असतां, तिहीं (इंद्रियांनीं) मन हरुनि । न्यावेंचि, परी असे मत्पर ॥ मन ज्याचें मत्पर । तेथें मी सर्वेश्वर । प्रकटतां सगुण सुंदर । न हरती इंद्रियें मनातें ॥ मीचि आत्मा हा निश्चय । परंतु निर्गुण निर्विषय । मन उदक, नीच भूमी विषय ! । तें धांवें तिकडेची ॥ इंद्रियांच्या वृत्ती । त्या मनाच्याच शक्ती । विषय कांहीं कल्पिती । तेधवां लागे तिकडेची ॥ विवेकें विषय सोडी । तथापि निर्गुणीं न घे गोडी । म्हणूनि इंद्रियग्राम जोडी । मागुती गोडी विषयांची ॥ मी निर्गुणची अर्जुना । आकार कल्पूनि दावी जना । परी तो आकार, निरंजना । आत्मयासीं भेट करी ॥ ज्ञान झालिया हें, सगुण । स्मरतां, स्फुरेचि निखिल निर्गुण । सुवर्णमूर्तींत सुवर्ण । झांकेल काय ? ॥ सर्वांस सरसकट अद्वैताचा बोध करूं पाहणाऱ्या गुरूंनीं या वामनोक्तीचा विचार करावा. व सर्व मुमुक्षूंनीं आपल्या मनाला उदक करून व विषयास नीच भूमि करून पंडितांनीं मनाची सहज प्रवृत्ति कशी सांगितली आहे याचा रसज्ञानपूर्वक अनुभव घ्यावा. ॥६१॥

अथेदानीं पराभविष्यतः सर्वानर्थमूलमिदमुच्यते—

ज्याला विवेक नाहीं, विज्ञान नाहीं अशा अज्ञानी मनुष्यावर सर्व अनर्थाचा डोंगर—इंद्रियनिग्रह न केल्यानें—कसा येतो तो दोन श्लोकांत सांगतों.—

ध्यायतो विषयान्पुंसः
सङ्गस्तेषूपजायते ॥
सङ्गात्संजायते कामः
कामात्क्रोधोऽभिजायते ॥६२॥

विषयान् (रूप, रस, शब्द वगैरेंचें) **ध्यायतः** (ध्यान करणाऱ्या, मनानें चिंतन करणाऱ्या) **पुंसः** (पुरुषाची) **तेषु** (त्या विषयामध्यें) **सङ्गः** (प्रीति, आसक्ति) **उपजायते** (उत्पन्न होते). **सङ्गात्** (या प्रीतीपासून) **कामः** (इच्छा, तृष्णा) **संजायते** (उत्पन्न होते)–आणि–**कामात्** (तृष्णेपासून) **क्रोधः** (संताप) **अभिजायते** (उत्पन्न होतो, जन्म घेतो.)–सारांश विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या मनांत त्या विषयाविषयीं प्रीति उत्पन्न होते, प्रीतीमुळें तो विषय हवा अशी इच्छा होते आणि–ती इच्छा फलद्रूप झाली नाहीं तर संताप उत्पन्न होतो.–

ध्यायत इति । ध्यायतश्चिन्तयतो विषयाञ्शब्दादिविषयविशेषानालोचयतः पुंसः पुरुषस्य सङ्ग आसक्तिः प्रीतिस्तेषु विषयेषूपजायते । सङ्गात्प्रीतेः संजायते समुत्पद्यते कामस्तृष्णा । कामात्कुतश्चित्प्रतिहतात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥

शब्द, रूप, रसादि विषय प्रत्यक्ष नसले तरी मनानें त्यांचें चिंतन करणाऱ्या विषयी पुरुषांची प्रीति त्या त्या विषयावर बसते. प्रीति बसली म्हणजे अर्थातच तो आल्हाद देणारा पदार्थ आपल्यास असावा अशी जोराची इच्छा प्रकट होते;–हाच काम होय.–आणि ही इच्छा कांहीं कारणानें फलवती झाली नाहीं, फसली, म्हणजे संताप उत्पन्न होतो.–शांतिपर्वाच्या प्रारंभीं विषयी पुरुषांचें अत्यंत सुरस वर्णन आहे. तें तज्ज्ञांनीं वाचावें.

अद्वैत व द्वैत टीकाकारांत ऐकमत्य आहे. प्राक्तन संस्कारामुळें व चिंतनामुळें विषयासक्ति उत्पन्न होते असें **शंकरानंद** म्हणतात. विषय मिळविण्याच्या खटपटीस ' काम ' असें **मपाकार** म्हणतात. मनाला स्वातंत्र्य दिल्याचे हे दोष आहेत 'असे **श्रीधर** व **पर्वते** म्हणतात. **द्विवेदी** भागवतांतील श्लोक देतात त्याचा अर्थ हा आहेः– ' विषय नसले तरी विषयचिंतकाचा संसार सुटत नाहीं ! ' **रामानु०**– ईश्वरचरणीं चित्त लीन न झालेल्या पुरुषाच्या अनादिपापवासनेनें वि-

षयप्रीति उत्पन्न होते. इच्छा अनावर झाली व ती सफल होण्याचा रंग नसला म्हणजे जवळ असणाऱ्या पुरुषावर संताप होतो! मध्वः– कामाचे दोष सांगण्यासाठीं ह्या श्लोकांची योजना आहे. ज्ञानी पुरुषानें निष्काम असावें. सत्यानं०–विषय चांगले आहेत या बुद्धीनें विषयी पुरुष विषयचिंतन करितो! मूर्खच बेटा!! ॥ ६२ ॥

क्रोधाद्भवति संमोहः
संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो
बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

क्रोधात् (संतापापासून) **संमोहः** (अविवेक) **भवति** (उत्पन्न होतो). **संमोहात** (अविवेक उत्पन्न झाल्यानें) **स्मृतिविभ्रमः** (स्मरण शक्तीचा घोंटाळा–होतो–). **स्मृतिभ्रंशात्** (स्मरण शक्ति, नष्ट झाली म्हणजे) **बुद्धिनाशः** (मनाचा, बुद्धीचा नाश होतो)– आणि–**बुद्धिनाशात् प्रणश्यति** (मन नष्ट झाल्याच्या योगानें, बुद्धिभ्रंशामुळें, जीवाचा सर्वथैव नाश होतो.) सारांश क्रोधापासून अविवेक, अविवेकानें स्मरण नाहींसें होणें, स्मरणशून्यतेनें विवेकबुद्धीचा क्षय आणि या क्षयानें जीवाची सर्वथैव हानि अशी परंपरा आहे. क्रोधापासून इतका अनर्थ होतो. Anger is second madness (संताप हा वेडेपणाचा धाकटा भाऊ) असें इंग्रजींत म्हणतात तें खोटें नाहीं. हा संताप इच्छेपासून होतो. तेव्हां जीवाचा नाश करण्याला इच्छा कशी कारण होते हें या दोन श्लोकावरून स्पष्ट दिसणार आहे. ‘ जाऊं नकारे विषयाटवीची.... ’ ही जोशी बोवांची लावणी अवश्य वाचावी.—

क्रोधाद्भवति संमोहोऽविवेकः कार्याकार्यविषयः । क्रुद्धो हि संमूढः सन्गुरुमप्याक्रोशति। संमोहात्स्मृतिविभ्रमः शास्त्राचार्योपदेशाहितसंस्कारजनितायाः स्मृतेः स्याद्वि-

भ्रमो भ्रंशः स्मृत्युत्पत्तिनिमित्तप्राप्तावनुत्पत्तिः । ततः स्मृतिभ्रंशाद्बुद्धेर्नाशः कार्याकार्यविषयविवेकायोग्यताऽन्तःकरणस्य बुद्धेर्नाश उच्यते। बुद्धिनाशात्प्रणश्यति। तावदेव हि पुरुषो यावदन्तःकरणं तदीयं कार्याकार्यविषयविवेकयोग्यं तदयोग्यत्वे नष्ट एव पुरुषो भवत्यतस्तस्यान्तःकरणस्य बुद्धेर्नाशात्प्रणश्यति पुरुषार्थायोग्यो भवतीत्यर्थः ॥ ६३ ॥

इच्छा विफल झाली म्हणजे संताप उत्पन्न होतो. संतापयुक्त मनुष्याला कर्तव्य काय, अकर्तव्य कोणतें याविषयीं अज्ञान उत्पन्न होतें. तो इतका अविचारी होतो कीं आपलें कल्याण करणारीं वडील माणसें व आपले गुरु, यांचा सुद्धां अपमान करण्यास मागें पुढें पाहत नाहीं! या अविचाराच्या योगानें स्मरणशक्ति नष्ट होते. अर्जुना! वेदांतशास्त्रें व योग्य गुरु यांच्या उपदेशरूपी अनुग्रहानें 'मी कोण? व आलों कोठून, माझें कर्तव्य काय?' वगैरेविषयीं चर्चा झाल्यानंतर जें आत्मस्वरूपाचें भान जागृत झालेलें असतें, स्वस्वरूपाचें स्मरण झालेलें असतें, त्या स्मरणापासून सुद्धां हा अविचारी मनुष्य भ्रष्ट होतो!

अर्जुन—भगवंता! स्मरण हेंच मुळीं क्षणजीवि असतें. स्मरण होतें आणि लागलींच तें नाहींसें होतें. स्मरण हा नुसता विकार आहे व तो क्षणभंगुर असतो, असें मीं ऐकिलें आहे. आणि आपण तर अविवेकानें स्मरणनाश होतो असें म्हणतां हें काय?

श्रीकृष्ण.—अर्जुना! तूं समजला नाहींस. विषयाचें स्मरण क्षणभंगुर असतें हें ठीक आहे. पण ज्ञानी पुरुषाला स्वस्वरूपाचें स्मरण नित्य आणि अविनाशी असतें; कारण स्मरण उत्पन्न होण्याचें कारण जो आत्मा तो नित्य आणि अविनाशी असून ज्ञानी पुरुष आत्मचिंतनांत निमग्न असल्यामुळें, त्यास विस्मरण होत नाहीं. म्हणजे आत्मा त्याजजवळ असल्यामुळें, अथवा तोच आत्मा असल्यामुळें आत्मस्वरूपाचें विस्मरण होणें शक्यच नसतें. पण अविवेकी पुरुषाचें

तसें नाहीं. त्याच्या सन्निध नेहमीं आत्मा असतांही अथवा तोच आत्मा असूनही त्याला आत्म्याचा विसर पडतो! स्मरणाचें कारण हजर असूनही कार्य म्हणजे स्मरण न होणें यालाच विसरभोळेपणा म्हणतात. हा विसराळूपणा अविवेकानें, विषयचिंतनानें, उत्पन्न होतो हें कसें तें आतांच सांगितलें. झालें, स्मरण नष्ट झालें म्हणजे बुद्धिनाश होतो; कर्तव्य काय, अकर्तव्य काय हें तारतम्यानें समजून घेण्याचें अंतःकरणाचें सामर्थ्य नाहींसें झालें म्हणजे व्यवहारांत सुद्धां तो मनुष्य बुद्धिभ्रष्ट झाला असें आपण समजतों. वेदांत शास्त्रांतही असाच अनुभव आहे. स्वस्वरूपचिंतन करावयाचें कर्तव्य सोडून देऊन विषयाविषयीं चिंतन, भक्ति, संताप वगैरे अकर्तव्याच्या गोष्टी उत्पन्न करून घेऊं लागला म्हणजे तो बुद्धिभ्रष्टच झाला नव्हे काय? असो, विवेकभ्रष्ट झालेला पुरुष मेला, नष्ट झाला असेंच म्हटलें पाहिजे.

अर्जुन—भगवंता! पुरुष नित्य आहेना? तो मरेल कसा?

श्रीकृष्ण—अरे! मेला म्हणजे मेल्यासारखा झाला. पुरुषाचें अंतःकरण जोंपर्यंत चांगलें कोणतें, वाईट कोणतें त्याचें तारतम्य जाणण्यास समर्थ असतें तोंपर्यंतच त्याला पुरुष अथवा जिवंत पुरुष म्हणतातना? हें सामर्थ्य नष्ट झालें म्हणजे तो पुरुष मेल्यासारखाच नाहीं कां झाला? सारांश आत्मस्वरूप ओळखण्याचा जो मोक्षनामक परमपुरुषार्थ त्याला तो अयोग्य झाला–अंतरला–म्हणून मेला असें म्हटलें.

मधु०—बुद्धि = मी व ब्रह्म एकच अशी मनोवृत्ति. एका विषयध्यानानें हा अनर्थ गुजरतो म्हणून मनोनिग्रह अवश्य आहे. **शंकरा०**:—प्रणश्यति = पुनः पुनः संसारांत पडतो; अमृत म्हणून विषाचें प्राशन करितो!

प्रपाकारः—

'लोक एष विषयातुरअनं दुःखगर्भमपि मन्यते सुखम् ॥
आमिषं बडिशगर्भमप्यहो मोहतो ग्रसति यद्वदण्डजः' ॥

(दुःख ज्यांच्या आंत असतें अशा विषयांच्या चिंतनालाच सुख

म्हणून लोक भजतात! काय वेडेपणा हा? आंतमध्यें गळ आहे असलेल्या आमिषाला मूर्खत्वजन्य मोहानें गिळल्यामुळें बद्ध झालेल्या पक्ष्याप्रमाणेंच हे लोक मूर्ख होत!) **द्विवेदीः**–स्मृतिभ्रंशः = 'आपण कोण, आपली योग्यता काय, जाती कोण, ज्ञान काय वगैरेविषयीं विस्मरण.' बाकी सर्वत्र अद्वैतवाद्यांत एकवाक्यता आहे.

रामानुः—संमोहः = कृत्य, अकृत्य वगैरेविषयीं अविवेक. इंद्रियनिग्रहास आरंभ केला असतो तेथेंच विस्मरण म्हणजे स्मृतिभ्रंश. बुद्धिनाशः = आत्मज्ञानासाठीं जो उद्योग केला त्याचा नाश. बाकी अर्थ आचार्यांसारखाच.

मध्वः—संमोह = अकार्याविषयीं इच्छा, अधर्माची इच्छा अगर अधर्माचे ठायीं धर्मबुद्धि. **सत्यानंद** हे ह्या अर्थाच्या समर्थनार्थ

'अधर्मलक्षणं चैव नियतं पापकर्मसु।'

उपगीता.

हें वाक्य देतात. अर्थ स्पष्टच आहे. निषिद्धाचें विस्मरण किंवा भलतेंच स्मरण तो स्मृतिविभ्रम. बुद्धिनाशः = पूर्वीं झालेल्या ज्ञानाचा नाश, तारतम्यशक्तीचा नाश. प्रणश्यति = नरकास जातो. सारांश क्रोध उत्पन्न झाला म्हणजे अधर्मबुद्धि होते, त्यामुळें विधिनिषेधांचें विस्मरण होतें, या विस्मरणानें पूर्वीं झालेलें ज्ञान व तारतम्यशक्ति नष्ट होतात आणि धर्मबुद्धि सर्वथा नष्ट झाल्यामुळें प्राणी नरकास जातो, असा कर्मपर अर्थ द्वैताचार्यांनीं व त्यांच्या शिष्यांनीं केला आहे.

'अधर्मकामिनः शास्त्रे विस्मृतिर्जायते यदा।
दोषदृष्टेस्तत्कृतेश्च नरकं प्रतिपद्यते'॥

(अधर्मानें वागण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाला शास्त्रविस्मृति होऊन दुष्ट गोष्टीच दिसून त्या करण्याविषयीं तत्परता उत्पन्न होते, तेव्हां तो मनुष्य नरकाला जातो.)–सारांश विषयचिंतनानें नरकप्राप्ति होते!

वल्लभ—स्मृति = भगवंताचें स्मरण.

चतरजी—सद्वस्तु समजली तरी तिचें विस्मरण या दुष्ट क्रोधानें

होतें! पुढें तारतम्याचा नाश, नंतर मिथ्यानिश्चय आणि शेवटीं विवेकशून्यता हीं परंपरेनें येतात. विवेकशून्यता नष्ट झाल्यावर मनुष्याचें आणखी तें काय नाहींसें व्हायचें राहिलें! विवेकाभाव आणि विषयलंपटता या दोन शक्तीमुळें अमर आत्मा नष्टप्राय होऊन प्रकृतीमध्यें, जडमूलप्रकृतीमध्यें लीन होतो; अथवा चैतन्यास अचेतनत्व प्राप्त होतें; मनुष्य दगड होतो! मोक्ष मिळाला म्हणजे सर्वच मिळतें व आशा नष्ट होते. पुरुषाला जडत्व आल्यावर ही आशा नष्ट होते. पण मुक्तस्थितींतील समाधानानें आशानाश आणि जडस्थितींतील अज्ञानानें उत्पन्न झालेली निराशा यांमध्यें केव्हढें अंतर आहे बरें? प्रत्यक्ष लक्ष्मीला पायानें लाथडून देणारा बुद्ध आणि स्वप्नांतही कपर्दिकेचें दर्शन न झाल्यामुळें नुसतेच पाय झाडणारा भिकारी यांचाही दृष्टांत प्रस्तुत प्रकरणीं तोकडाच होतो!

ज्ञानेश्वर मोहाविषयीं म्हणतातः—संमोहा जालीया व्यक्ती । तरी नाश पावे स्मृती । चंडवातें (मोठ्या वाऱ्यानें) ज्योती । हत (विझते) जैसी ॥ कां अस्तमानीं निशी । जैसी सूर्य तेजाते ग्रासी । तैसी दशा स्मृतिभ्रंशी । प्राणीयासी ॥ मग ज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे (बुडविजे) सकळ । तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजी ॥ जैसें जात्यंधा (जन्मांधा) पळणी (धांवाधांव) पावे (प्राप्त होते)। मग तें काकुळती सैरा धांवे । तैसी बुद्धीस होतीं भवे (जन्ममरणें)। धनुर्धरा! ॥....सारांश....जैसा विस्फुलिंग (ठिणगी) लागे इंधना । मग तो प्रौढ झालिया त्रिभुवना । पुरो शके ॥ तैसें विषयाचें ध्यान । जरी विपायें (कदाचित) पावें मन। तरी येसणें (येवढें) हें पतन। गिंवसीत पावें (शोधीत येतें) ॥ ६२।६३ ॥

पंडित म्हणतातः–विषय चिंतन करणारा .... तो भरला विषयवासना रानीं । फाडूनि खादला लांडग्यांनीं । एवंच झाला देहाभिमानी । यथापूर्व ॥ ६३ ॥

सर्वानर्थस्य मूलमुक्तं विषयाभिध्यानमथेदानीं मोक्षकारणमिदमुच्यते—

शिष्यः—महाराज! विषयाच्या ध्यानानें जर इतका अनर्थपात

होतो, तर विषयांचा भोग घेऊन जिवंत राहणारे, किंवा जिवंत राहण्यासाठीं भोग घेणारे यांचा तर सर्वथा नाश व्हावा, नाहीं काय?

गुरुः—सांगतों; ऐक. आतांपर्यंत सर्व अनर्थांचें मूळ जें विषयचिंतन त्याचा परिणाम व परिहार सांगितला. यानंतर विषय भोगूनही संसारांत न पडण्याचा अगर मोक्षाचा उपाय सांगतों, ऐकः—

रागद्वेषवियुक्तैस्तु
विषयानिन्द्रियैश्चरन् ॥
आत्मवश्यैर्विधेयात्मा
प्रसादमधिगच्छति ॥६४॥

रागद्वेषवियुक्तैः (लोभ अगर द्वेष यांनीं वर्जित, राग—लोभशून्य अशीं) **आत्मवश्यैः** (आत्म्याच्या सर्वथा स्वाधीन आहेत अशीं) **इन्द्रियैः** (कर्म आणि ज्ञान इंद्रियें, त्यांच्या साहाय्यानें) **विषयान् चरन्** (रंग, रूप, राग, लोभ वगैरेंचा उपभोग घेणारा) **विधेयात्मा** (वश करून घेतलें आहे अंतःकरण ज्यानें असा पुरुष) **प्रसादं** (शांति, स्वस्थता) **अधिगच्छति** (मिळवितो). —सारांश, विषयाविषयीं आदरबुद्धि नष्ट झाल्यामुळें इंद्रियें व मन ज्याच्या ताब्यांत आलीं आहेत त्याला शांति अगर चित्ताची स्वस्थता मिळते. त्यानें विषयोपभोग घेतला तरी त्याचें चित्त भ्रष्ट होत नाहीं.

रागद्वेषेति । रागद्वेषवियुक्तै रागश्च द्वेषश्च रागद्वेषौ । तत्पुरःसरा हीन्द्रियाणां प्रवृत्तिः स्वाभाविकी तत्र यो मुमुक्षुर्भवति स ताभ्यां वियुक्तैः श्रोत्रादिभिरिन्द्रियैर्विषयानवर्जनीयांश्चरन्नुपलभमान आत्मवश्यैरात्मनो वश्यानि वशीभूतानि तैरात्मवश्यैर्विधेयात्मेच्छातो विधेय आत्माऽन्तःकरणं यस्य सोऽयं प्रसादमधिगच्छति । प्रसादः प्रसन्नता स्वास्थ्यम् ॥ ६४ ॥

अर्जुना! हें प्रसिद्धच आहे कीं इंद्रियांची स्वाभाविक प्रवृत्ति स्नेह-

पुरःसर किंवा द्वेषपुरःसर असते; म्हणजे सामान्यतः अज्ञानी मनुष्याचीं कर्मे, कांहीं तरी विषयप्राप्ति व्हावी म्हणून किंवा कांहीं अनर्थाचें निवारण व्हावें म्हणून,--कर्मे–होत असतात. परंतु मुमुक्षु जो आहे, तो आपल्या इंद्रियांस लोभ व क्रोध या दुष्टशत्रूंपासून अलिप्त ठेवितो; आणि प्रारब्धानें प्राप्त झालेल्या व शरीराचें रक्षण करण्यासाठीं अवश्य असणाऱ्या खाणें, पिणें इत्यादि शुद्ध विषयांचा मात्र उदासीनतेनें व इंद्रियांस मनद्वारा वश करून घेऊन, उपभोग घेत असतो. तसेंच त्याचें विकार व विचारात्मक अंतःकरण ही त्याच्या स्वाधीन पूर्णपणें असून तो सांगेल तसेंच वागत असतात. असो; असा जो मन आणि इंद्रियें यांस वश करणारा व त्यांस इतरत्र फिरकूं न देणारा मुमुक्षु, त्यालाच चित्ताची शांति, अगर मनःप्रसाद मिळतो; त्याच्या चित्तशुद्धींत व्याघात होत नाहीं. अथवा त्याचें चित्त विषयशून्य असल्यामुळें निर्मळ असतें.

अद्वैत टीकाकारांचाही असाच अर्थ आहे. विषय असत्य, तुच्छ आणि बंधकारी आहेत म्हणून त्यांविषयीं राग, लोभ धरीत नाहीं असें **शंकरानंद** म्हणतात.

प्रपाकारः— **'अग्निसंगाद्यथा लोहमग्नित्वमुपगच्छति ।**
आत्मसंगात्तथा गच्छत्यात्मतामिन्द्रियादिकम्' ॥

अग्नीच्या संसर्गानें लोह अग्नीरूपी होतें, त्याचप्रमाणें आत्मसान्निध्यानें इंद्रियादिकांसही आत्मता प्राप्त होऊन तीं निर्मळ होतात.

रामा०—ज्यानें ईश्वरचिंतनांतच आपल्या मनास गोंवून तें निर्मळ केलें आहे, अशा पुरुषासंबंधानें हा श्लोक आहे. विषयांचा तिरस्कार करून निर्मळ अंतःकरणाचा तो पुरुष जीवमान असतो. **मध्वांचा** अर्थ आचार्यांहून भिन्न नाहीं. मात्र ते असा गूढार्थ काढितात कीं ह्या पुरुषाचीं बाह्येंद्रियें नसल्यासारखींच होतात आणि म्हणून यत्न केल्यावर सुद्धां या पुरुषाची विषयाकडे प्रवृत्ति होत नाहीं ! आपल्या सारख्या जीवांची प्रवृत्ति सामान्यतःच विषयाकडे असते, व विषयापासून मनादिकांस पराङ्मुख करण्यासाठीं आपल्यास प्रयत्न करावा लागतो. सिद्ध पुरु-

याची स्वाभाविक प्रवृत्ति विषयपराङ्मुख असते! हाच त्याच्यामध्यें व आपल्यामध्यें फरक होय!

मध्व म्हणतातः–इंद्रियनिग्रहाचें प्रत्यक्षफल म्हणजे प्रसाद होय. ज्ञान हें व्यवहित, दूरचें (Remote) फल आहे. भगवंतास येथें साक्षात्फल म्हणजे प्रसाद ह्याविषयीं बोलावयाचें आहे.

ज्ञानेश्वरः—जैसा सूर्य आकाशगत। रश्मिकरें (किरणांनीं) जगातें स्पर्शत। तरी संगदोषें (संसर्गानें) काय लिंपत (लिप्त होतो काय?)। तेथिचेनी॥ तैसा इंद्रियार्थीं (इंद्रियें व विषय यांविषयीं) उदासीन। आत्मरसेंचि निर्भिन्न (परिपूर्ण)। .... तरी विषयांतही, कांहीं। आपणपेवांचूनी (आपल्या वाचून) नाहीं। मग विषय कवण कांहीं। बाधितील कवणा? ॥ जरी उदकें उदकीं बुडिजे। कां अग्नि आगी पोळिजे। तरी विषयसंगें आप्लविजे (बुडविजे)। परिपूर्ण तो!॥ दृष्टांत किती समर्पक आहेत?

पंडितः–विषय लागला गोड। तरी तो न मानी कोड (कौतुक)। कीं खाजवितां फोड। गोड वाटूनि दुःख दे॥

प्रसादे सति किं स्यादित्युच्यते—

शिष्य—चित्तप्रसन्नता मिळाली तर काय होतें?

गुरु—ऐक काय होतें तें:—

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते॥
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते॥ ६५॥

प्रसादे (चित्ताला स्वस्थता प्राप्त झाल्यावर) **अस्य** (ह्या–पुरुषाच्या–) **सर्वदुःखानां** (सर्व व सर्वप्रकारच्या दुःखांची) **हानिः उपजायते** (हानि उत्पन्न होते, सर्व, दुःखांचा नाश होतो.)–आणि–**प्रसन्नचेतसः** (शांतचित्त झालेल्या सिद्ध पुरुषाची) **बुद्धिः** (बुद्धि) **आशु** (लवकरच) **पर्यवतिष्ठते** (स्थैर्याला पावते.)–सारांश चित्ताला शांति प्राप्त झाली म्हणजे सर्वप्रकारच्या सर्व दुःखांचा नाश होतो।

आणि बुद्धि आपल्या स्वस्वरूपाचे ठायीं लवकरच जाऊन वसते, स्थिर होते.—

प्रसाद इति । प्रसादे सर्वदुःखानामाध्यात्मिकादीनां हानिर्विनाशोऽस्य यतेरुपजायते । किंच प्रसन्नचेतसः स्वस्थान्तःकरणस्य हि यस्मादाशु शीघ्रं बुद्धिः पर्यव-तिष्ठत आकाशमिव परि समन्तादवतिष्ठत आत्मस्वरूपे-णैव निश्चली भवतीत्यर्थः । एवं प्रसन्नचेतसोऽवस्थित-बुद्धेः कृतकृत्यता यतस्तस्माद्रागद्वेषवियुक्तैरिन्द्रियैः शास्त्रा-विरुद्धेष्ववर्जनीयेषु युक्तः समाचरेदिति वाक्यार्थः ॥६५॥

अर्जुन—भगवंता! चित्त स्वस्थ झालें तरी संसारांत प्राप्त होणाऱ्या त्रिविधतापानें पुनः तळमळ उत्पन्न होणारचना?

श्रीकृष्ण—नाहीं, अर्जुना! तसें नाहीं. एकदां या यतीच्या चित्ताला स्वस्थता उत्पन्न होऊन त्याचें अंतःकरण प्रसन्न झालें म्हणजे शारीरिक, मानसिक, किंवा दैविक इत्यादि सर्व प्रकारच्या दुःखांचा अंतच होतो;—म्हणजे त्याला या दुःखांचें भानच होत नाहीं.—इंद्रियें, अंतःकरण वगैरे सर्व ज्याच्या स्वाधीन झालीं त्याच्या, त्या आत्मज्ञ—व ब्रह्मचिंतन करणाऱ्या—पुरुषाच्या चित्ताचा भंग करण्याचें सामर्थ्य कोणत्याही दुःखामध्यें असत नाहीं.

अर्जुन—बरें प्रसन्नता मिळाली; पुढें काय? चित्तस्थैर्य कसें प्राप्त होणार?

श्रीकृष्ण—काय सांगावें? अर्जुना! कोणत्याही बाह्यविषयाला वश न होणारें चित्ताला प्रसन्नता प्राप्त झाली, अंतःकरण स्वस्थ झालें, म्हणजे लवकरच 'मीच ब्रह्म आहे' अशी वृत्ति होऊन 'कोठेंही माझ्या व्यतिरिक्त, ब्रह्मव्यतिरिक्त कांहीं नाहीं असा निश्चय होतो. आकाश जसें सर्वव्यापी आहे व म्हणून स्थिर आहे, तसेंच ब्रह्मवेत्त्याचें चित्तही निश्चल होतें. इतर सर्व बाह्यविषय नाहींसे होऊन ब्रह्मस्वरूपांत चित्त मग्न झालें अथवा आपलें चित्तच ब्रह्मस्वरूपी झालें म्हणजे स्थितप्रज्ञता मिळाली, मोक्ष मिळाला. सारांश याप्रमाणें प्रसन्न मनाच्या, स्वच्छ

मनाच्या पुरुषाचें चित्त स्थिर होतें व तो कृतकृत्य होतो म्हणून स्नेह किंवा द्वेष यांविरहित चित्त व इंद्रियें करून शास्त्रानें सांगितलेली नित्य व आवश्यक कर्मे उदासीनतेनें करावीं हा या दोन श्लोकांचा अर्थ आहे.

मधुः—बुद्धिस्थैर्यानें अज्ञाननाश होतो व म्हणून दुःख देणाऱ्या संसाराचाही नाश होतो.

शंकरानंदः—त्रिविधताप, त्यांचीं कारणें व त्यांपासून उत्पन्न होणारा चित्तविक्षेप हीं सर्वच चित्त प्रसन्न झालें म्हणजे नष्ट होतात आणि अंतःकरण निर्विषय अथवा विषयशून्य होतें.

प्रपाकारः—

> ' विज्ञानामृतनिर्झरावनिरिव स्वानन्दपूर्णोदधे-
> रूर्मिः शाश्वतसुप्रसादसदनं भूतानुकम्पाप्रसूः ॥
> निर्वातस्थितसुप्रदीपकलिका वैराग्यभाग्यास्पदं
> दृश्यातीतपरावलम्बरसिका स्वान्तस्थितिस्तद्विदाम्—' ॥

विचारगोचर जें ब्रह्म त्यांतच रममाण झालेल्या ब्रह्मवेत्ते पुरुषांची अंतःकरणस्थिति कशी आहे ? ती सांगतों ऐक. स्वस्वरूपी जो पूर्णानंद त्याची एक लाटच आहे, अथवा स्वानुभवरूपी अमृताचा एक झराच आहे किंवा प्रसन्नतेचें एक कायमचें वसतिगृहच आहे, अगर सर्वभूतीं दयेचें तें माहेरघरच आहे. फार काय सांगावें, ती निर्वात स्थळीं ठेवलेली एक शांत दीपज्योतिच होय; वैराग्याचें तें महाभाग्यस्थानच होय !

द्विवेदीः—मनोनिग्रह राखून निष्कामव्यवहार ज्ञान्यानें केला तर तो बाधक होत नाहीं.

रामानुजांचा अर्थ आचार्यांसारखाच आहे. मात्र बुद्धि स्थिर होते ती परमेश्वराच्या ठिकाणीं होते आणि म्हणून दुःखनाश होतो असें जास्त म्हणतात.

मध्वाचार्यांचा अभिप्रायही आचार्यांसारखा आहे. **सत्यानंदः**—मनःप्रसादानें दुःखहानी साक्षात् होत नाहीं, तर ज्ञान झाल्यावर होते. ' तरति शोकमात्मवित् ' (आत्मवेत्ता शोकसमुद्राला तरून

जातो.) छांदोग्य ७।१।३. मन प्रसन्न झालें म्हणजे ईशचरणीं निष्ठा उत्पन्न होऊन परमेश्वराचें दर्शन होतें; मग अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान होतें, व ज्ञानानें पूर्वीच्या सुकृताची व दुष्कृताची हानि होते.

चतरजींचा कांहीं अर्थ वर भाष्यांतच आला आहे. ज्ञानी पुरुषाविषयीं बायबलांतील एका वाक्याचा अर्थ हा आहेः ' तो ईश्वरासारखाच असल्यामुळें ईश्वराच्या बरोबरीचा होतो. ' [**फिलिपियन्स** अ० ३]

ज्ञानेश्वर—जैसा अमृताचा निर्झर (झरा) । प्रसवे जयाचा जठर । तया क्षुधेतृषेचा अडदर (भय) । कांहींच नाहीं ॥ तैसें हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैचें कें (कोठें) आहे ? ।....जैसा निर्वातीचा (निवाऱ्यांतला) दीप । सर्वथा नेणें कंप । तैसा स्थिर बुद्धि स्वस्वरूप । योगयुक्त ॥

बुद्धि स्थिर झाल्यावर जीवाचें भान राहत नाहीं हें दाखविण्यास **पंडितांचे** दृष्टांत पहाः—समुद्राचे तीरीं । दरडीच्या रूपें भूमीवरी । दरडीचें प्रतिबिंब नीरीं (पाण्यांत) । तें न दिसे ॥ जल स्पर्शतां दरडीतें ॥....दीप पहात होती । ते दृष्टि देखे सूर्याप्रति । सूर्य प्रभेनेंच जगती । पाहों लागे ॥ सूर्य प्रकाशें सृष्टि । देखतां दीप नाठवे दृष्टि । सर्वगतीं (परब्रह्मांशीं) चित्ताची मिठी । पडतां नाठवे प्रतिबिंब ॥ पंडितांनीं अव्यक्ताच्या (निर्गुणाच्या) उपासकांवर कडाका उडविला आहे, तो पाहण्यासारखा आहे. ॥ ६५ ॥

सेयं प्रसन्नता स्तूयते—

या चित्तप्रसादाची–अन्यप्रकारानें–स्तुति करितातः–

नास्ति बुद्धिरयुक्तस्य
न चायुक्तस्य भावना ॥
न चाभावयतः शान्ति-
रशान्तस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

अयुक्तस्य (चित्तस्थैर्य नाहीं, मनोनिग्रह नाहीं, त्याला) **बुद्धिः** (आत्मज्ञान) **न अस्ति** (असत नाहीं); **अयुक्तस्य च** (आणि मनोनिग्रहशून्याला) **भावना** (आत्म्याचें ध्यान) **न** (—करितां येत—नाहीं) **च** (आणि) **अभावयतः** (ध्यानशून्य पुरुषाला) **न शान्तिः** (चित्त स्वस्थता मिळत नाहीं); —आणि—**अशान्तस्य कुतः सुखम्** (चित्त स्वस्थ झालें नाहीं त्याला सुख कोठलें?)—सारांश हा वेळपर्यंत सांगितल्याप्रमाणें, योगाचा अभ्यास न करणाऱ्या पुरुषाला आत्मज्ञान नसतें व आत्मध्यानही करितां येत नाहीं. अर्थातच आत्मध्यान न करणाऱ्या पुरुषाला शांति काय असते हें ठाऊक नसतें आणि ज्याच्या चित्ताला शांति मिळाली नाहीं, तळमळ नाहींशी झाली नाहीं, त्याला सुखाची वार्ता तरी कोठून प्राप्त होणार?

नास्तीति । नास्ति न विद्यते न भवतीत्यर्थः । बुद्धिरात्मस्वरूपविषयाऽयुक्तस्यासमाहितान्तःकरणस्य न चास्त्ययुक्तस्य भावनाऽऽत्मज्ञानाभिनिवेशः । तथा न चास्त्यभावयत आत्मज्ञानाभिनिवेशमकुर्वतः शान्तिरुपशमः। अशान्तस्य कुतः सुखम्, इन्द्रियाणां हि विषयसेवा तृष्णातो निवृत्तिर्या तत्सुखं, न विषयविषया तृष्णा, दुःखमेव हि सा; न तृष्णायां सत्यां सुखस्य गन्धमात्रमप्युपपद्यत इत्यर्थः ॥ ६६ ॥

ज्याचें अंतःकरण हा वेळपर्यंत कथन केलेल्या योगाभ्यासानें स्थिर झालें नाहीं, ज्यानें मनोनिग्रह केला नाहीं, त्याचे बुद्धीला आत्मस्वरूपाच्या विषयाचें आकलनच व्हावयाचें नाहीं. निःसंग, निरंजन आत्म्याचा अनुभव, हाच विषय आहे जिच्या ज्ञानाचा अशी बुद्धि, त्याला कधींही होणार नाहीं; व त्याचमुळें त्याच्या बुद्धीला आत्मस्वरूपाचें ध्यानही कधीं करितां येणार नाहीं. सारांश बुद्धि स्थिर नसणाऱ्या पुरुषानें वेदांतश्रवण केलें तथापि मनन आणि निदिध्यास हे त्याला साध्य होणार नाहींत. झालें, ज्याला ब्रह्मज्ञान, ब्रह्मध्यान, साध्य झालें नाहीं त्याला शांति मिळत नाहीं हें उघडच आहे. आणि

ज्याला शांति नाहीं, ज्याची तळमळ गेली नाहीं त्या पुरुषाला सुखाचें नुसतें स्वप्न पडण्याची सुद्धां मारामार होते! म्हणजे तात्पर्य हें कीं विषयांचा उपभोग घेण्यापासून इंद्रियें परावृत्त झालीं तरच सुख आहे. विषयांच्या भोगाचा अभिलाष धरून सुख झालें आहे असें होणेंच नाहीं. विषयतृष्णेपासून दुःखच व्हावयाचें. सारांश मला अमुक हवें अशी तृष्णा जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत शुद्ध सुखाचा वास सुद्धां मिळावयाचा नाहीं, मग सुखदर्शनाची अगर सुखस्पर्शाची वार्ता तरी कशाला पाहिजे?

मधु०—शांति=अविद्या व तिचें कार्य जो संसार त्या उभयतांची निवृत्ति ज्या अवस्थेंत होते ती अवस्था. सुख=मोक्षसुख. बाकी एकवाक्यताच आहे. **शंकरानंद** आचार्यांप्रमाणेंच म्हणतात कीं रागद्वेषांचा निःशेष त्याग केला म्हणजे इंद्रियनिग्रह होतो, व त्यानें समाधि सिद्ध होते, समाधीनें सम्यग्ज्ञान (वस्तूचें यथार्थ ज्ञान) आणि ज्ञानानें मुक्ति मिळते. हें ६० तें ६९ श्लोकांचें सार आहे. विषयध्यानापासून काय अनर्थ होतात, तेही यांतच सांगितलें आहेत. समाधीचें माहात्म्य या स्वामींनीं उत्कृष्ट वर्णिलें आहे. विषयास अगर देहास किंवा इंद्रियांसच आत्मा मानणारा व द्वैत पाहणारा पुरुष शांतिशून्य असतो असें हे स्वामी म्हणतात. **श्रीधर** व **प्रपाकार** वरील अर्थाचेंच अनुसरण करितात. मनोनिग्रह हाच योग असें **द्विवेदी** म्हणतात. नुसतें देहदमन अथवा हठयोग विशेष उपयोगी नाहीं असें यांचें मत आहे. ब्रह्मस्वरूपाच्या प्रमाणांविषयीं येणाऱ्या शंकांचें निरसन न झाल्यामुळें अयुक्ताला बुद्धि होत नाहीं असें **पर्वते** म्हणतात.

रामानु०—ब्रह्मचिंतनाच्या ऐवजीं परमेश्वराचें चिंतन योजून पुढें श्लोकार्थ आचार्यांसारखाच करितात. **मध्व** व **तदनुयायांची** भिस्त मनःप्रसादावर आहे. मनःप्रसादानें योग, योगानें सम्यग्ज्ञान व ध्यान, ध्यानानें मोक्ष व मोक्षापासून परमसुख मिळतें अशी भजनपूर्वक परंपरा आहे. शांति=भगवंताची निष्ठा असा दुसराही अर्थ देतात.

राघवेंद्रयतिः—सुखं=मोक्ष. 'अशांत पुरुषाला सुख कोठून?' या वाक्यानें मुक्तस्थितींत दुःखहानि होते इतकेंच नव्हे, तर विषय-

चिंतन करणाऱ्या संसारी लोकांस दुर्लभ असें सुख मिळतें, असा गूढार्थ हे यति काढितात ! •

ज्ञाने०—जेथ शांतीचा जिव्हाळा (उद्भव) नाहीं । तेथ सुख विसरोनि न रिघे कही (केव्हांही) । जैसा पापीयाच्या ठायीं । मोक्ष न वसे ॥ देखें अग्नीमाजी धापती (घातलेली) । तिये बीजें जरी विरूढतीं (वाढतीं) । तरी अशांतता सुख प्राप्ती । घडो शके ! ॥

पंडितः– अयुक्ताला बुद्धि नसते असें नाहीं. ती गुप्त असते. इंद्रियसंयमनाचा वारा लागल्याखेरीज जीवकाष्ठांतील बुद्धयग्नी प्रकट होत नाहीं. ॥ ९६ ॥

• **अयुक्तस्य कस्माद्बुद्धिर्नास्तीत्युच्यते**—

अयुक्त पुरुषाला आत्मज्ञान कां होत नाहीं, तें सांगतातः—

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ॥
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ ६७ ॥

हि (कारण) **यन्मनः** (जें मन) **चरतां** (फिरणाऱ्या, भटकणाऱ्या) **इन्द्रियाणां** (इंद्रियांच्या) **अनुविधीयते** (मागें ठेवलेलें असतें, मागें धांवत असतें) **तत्** (तें-मन–) **अस्य** (या पुरुषाची, या साधकाची) **प्रज्ञा** (विवेकबुद्धि) **हरति** (हरण करितें, नाहींशी करितें).–सारांश आपआपले विषय शोधून काढण्यासाठीं भटकणाऱ्या इंद्रियांच्या मागें जें मन धांवत असतें, तें इंद्रियाधीन झालेलें मन साधक पुरुषाच्या बुद्धीचा नाश करितें. यास दृष्टांत.–**अम्भसि** (पाण्यावर तरंगत असलेल्या) **नावं** (नौकेला) **वायुः इव** (वारा ज्याप्रमाणें नष्ट करितो त्याप्रमाणें) म्हणजे पाण्यावर असलेल्या नावेला ज्याप्रमाणें वारा वाटेल तिकडे फिरवून शेवटीं तिला खडकावर वगैरे आपटतो व तिचा नाश करितो, त्याप्रमाणें विषयान्वेषी इंद्रियांच्या स्वाधीन झालेलें मन संन्याशाच्या–विवेक–बुद्धीचे शतशः तुकडे करितें. वारा जसा नावेला मूळ ठिकाणावर जाऊं देत नाहीं, तसेंच मनही बुद्धीला स्वस्वरूपाचें चिंतन करून देत नाहीं. दृष्टांत समर्पक नाहीं असें कोणता रसज्ञ म्हणेल ?–

इन्द्रियाणामिति । इन्द्रियाणां हि यस्माच्चरतां स्वस्वविषयेषु प्रवर्तमानानां यन्मनोऽनुविधीयतेऽनुप्रवर्तते तदिन्द्रियविषयविकल्पनेन प्रवृत्तं मनोऽस्य यतेर्हरति प्रज्ञामात्मानात्मविवेकजां नाशयति । कथं, वायुर्नावमिवाम्भस्युदके जिगमिषतां मार्गादुद्धृत्योन्मार्गे यथा वायुर्नावं प्रवर्तयत्येवमात्मविषयां प्रज्ञां हृत्वा मनो विषयविषयां करोति । यततो ह्यपीत्युपन्यस्तस्यार्थस्यानेकधोपपत्तिमुक्त्वा तं चार्थमुपपाद्योपसंहरति ॥ ६७ ॥

आत्मविषयक बुद्धि कां उत्पन्न होत नाहीं याचें कारण ऐकः—रूप, शब्द, स्पर्श इत्यादि आपआपल्या विषयामध्यें निमग्न होणाऱ्या नेत्र कर्ण वगैरे इंद्रियांच्या मागें जें मन लागलें, विषयमग्न इंद्रियांच्या स्वाधीन जें मन झालें, तें इंद्रियांस प्रिय असणाऱ्या विषयांचें निरनिराळेपणानें ग्रहण करण्यांत गुंतलेलें मन काय करितें पहा तें मन या साधकपुरुषाची प्रज्ञा नाहींशी करिते. प्रज्ञा म्हणजे आत्मा कोणता व अनात्मक कोणतें हें तारतम्यानें ओळखणारी बुद्धि होय.—म्हणजे विषयाभिलाषांत गुंग झालेल्या इंद्रियांच्या आधीन जें मन झालें तें मन 'हें रूप कसें आहे?' 'हा शब्द कसा आहे' वगैरे भिन्नभिन्न विषयांचें मात्र चिंतन करीत राहतें; सारांश, विषयमग्न झाल्यामुळें त्या मनाला आत्मचिंतन करण्याला अगर अनात्मक विषयांचा त्याग करण्याला सामर्थ्यच उरत नाहीं, म्हणून इंद्रियनिग्रह न करणाऱ्या पुरुषाची विवेकबुद्धि नष्टच होऊन जाते. कशी ती पहाः—जलमार्गानें प्रवास करणाऱ्या पुरुषांची नाव,—चांगला कर्णधार व नावाडी नसेल तर,—ज्याप्रमाणें वाऱ्याच्या जोरानें हेलकावे खाण्यास लागते, आपला मार्ग सोडून देते व भलत्या मार्गानें जाण्यास प्रारंभ करून बुडते, खडकावर आपटते, डोहांत शिरते,—सारांश भोंवऱ्यांत सांपडते; त्याप्रमाणेंच हें विषयलंपट मन विवेकबुद्धीस आत्मस्वरूपाकडे न नेतां, विषयांत, कर्मांत, उपासनेंत मात्र अडकवून ठेवितें आणि प्राण्याला संसारांत ढकलून शेवटीं त्यास जन्ममरणांच्या अमर्याद भोंवऱ्यांत फिरावयास लावितें!

६० व्या श्लोकांत ज्या अर्थाचा उपक्रम केला आहे तोच अर्थ दृढ व्हावा म्हणून अनेक वेळीं [पहा श्लोक ६२] भगवंतांनीं इंद्रियनिग्रहाचें फल व विषयमग्नतेचा दुष्परिणाम हीं निरनिराळ्या तऱ्हेनें सांगितलीं आहेत व पुढच्या श्लोकांत याच विषयाचा उपसंहार केला आहे. ॥ ६७ ॥

मधु०—' यत् ' = एकच इंद्रिय. एका इंद्रियाच्या लगामीं मन राहिलें तरी जर विवेकबुद्धि नष्ट होते, तर सर्वच इंद्रियांचें दास तें मन बनल्यावर काय काय अनर्थ होतील ? **आचार्यांनीं** ' यत् ' (जें) हें मनाचें विशेषण केलें आहे. भटकणाऱ्या इंद्रियांपैकीं एक असा **मधुसूदनीकारांचा** अर्थ आहे. फलश्रुति एकच; पण **मधुसूदनीकारांच्या** गूढार्थानें इंद्रियांचें अनर्थकारित्व स्पष्टतर होतें. आचार्यांचा अर्थ सरळ दिसतो. **श्रीधर, प्रपाकार** व **पर्वते** यांनीं **मधुसूदनीकारांप्रमाणेंच** अर्थ केला आहे. **शंकरानंद** व **पर्वते आचार्यांप्रमाणें** अर्थ करितात. **द्विवेदीसुद्धां** सर्वांचा कटाक्ष मनोनिग्रहावर आहे, तें ठीकच आहे. **रामानुजाचार्यही आचार्यांचाच** अनुवाद करितात. **मध्वाचार्यांचे** अनुयायी **सत्यानंद** व **राघवेंद्रयति** म्हणतात कीं इंद्रियाच्या लगामीं मन राहतें तें ईश्वरी इच्छेमुळें होय ! हरति = उत्पन्न होत असलेलें परोक्षज्ञान नाहींसें करितें. सारांश चित्तनिरोधाशिवाय श्रवण, मनन, निरुपयोगी होय ! एवंच चित्तनिरोध पाहिजे.

चतरजीही मधुसुदनीकारांप्रमाणेंच अर्थ करून ह्मणतात कीं इंद्रियें स्तब्ध झालींशीं दिसलीं तरी आपण दुर्लक्ष्य करितां कामा नये, व्यसन सुटलेंसें वाटतें तें पुनः जडतें म्हणून सावधपणा पाहिजे. एक इंद्रिय दुष्ट झालें तरी मुमुक्षूचा नाश होतो. **माथ्यूच्या** शुभवर्तमानांतही असेंच सांगितलें आहेः ' तुझ्या उजव्या डोळ्यानें किंवा उजव्या हातानें अपराध केला तर तो डोळा अगर हात उपटून टाक, नाहींतर त्या दुष्टाच्या संगतीनें तुला नरकांत जाण्याची पाळी येईल ! ' ॥ ६७ ॥

इन्द्रियाणां प्रवृत्तौ दोष उपपादितो यस्मात्—

समाधिनिष्ठ जो मनुष्य नाहीं त्याचीं मोकळीं व मनसोक्त वागणारीं

इंद्रियें विवेकबुद्धीचा नाश करितात हा दोष ज्याअर्थी सिद्ध झाला त्याअर्थी—

तस्माद्यस्य महाबाहो
निगृहीतानि सर्वशः ॥
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्य-
स्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

तस्मात् (म्हणून) **महाबाहो** (शारीरिक व मानसिक शत्रूंचा नाश करण्यास समर्थ असणाऱ्या अर्जुना!) **यस्य** (ज्या पुरुषाचीं) **इन्द्रियाणि** (इंद्रियें) **सर्वशः** (सर्वथा, सर्व बाजूंनीं) **इन्द्रियार्थेभ्यः** (विषयांपासून) **निगृहीतानि** (परावृत्त झालीं आहेत) **तस्य** (त्याची) **प्रज्ञा** (विवेकबुद्धि) **प्रतिष्ठिता** (स्थिर झाली.)—सारांश इष्ट पुरुषार्थ मिळविण्यास समर्थ असणाऱ्या अर्जुना! ज्यापुरुषानें आपलीं सर्व इंद्रियें सर्व विषयांपासून सर्व प्रकारांनीं परावृत्त करून घेतलीं, काढून टाकिलीं, त्याची बुद्धि स्थिर झाली; तोच खरा स्थितप्रज्ञ होय.—

तस्माद्यस्य यतेर्हे महाबाहो निगृहीतानि सर्वशः सर्वप्रकारैर्मानसादिभेदैरिन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यः शब्दादिभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

म्हणून सांगतों कीं हे अंतर्बाह्य शत्रूंचा पराभव करण्यास समर्थ असणाऱ्या पराक्रमी व आजानुबाहु अर्जुना! ज्या संन्याशानें आपलीं सर्व मन, नेत्र, कर्णादि इंद्रियें रूप, रस, गंध शब्दादि विषयांपासून सर्वथा परावृत्त करून घेतलीं, विषयपराङ्मुख केलीं, त्या पुरुषाची बुद्धि स्थिर झाली. तोच स्थितप्रज्ञ होय. सारांश इंद्रियनिग्रह हें स्थितप्रज्ञाचें लक्षण आणि स्थितप्रज्ञ होण्याचें साधन होय. ज्याला ब्रह्मचिंतन करण्यासाठीं बुद्धि स्थिर करावयाची असेल त्यानें मनासकट

सर्व इंद्रियांचें दमन केलेंच पाहिजे; अथवा इंद्रियें बाह्यमुख असतात तीं अंतर्मुख केलीं पाहिजेत. हा प्रस्तुत विषयाचा उपसंहार आहे.

अद्वैतटीकाकारांचें या अर्थाशीं सर्वत्र ऐकमत्य आहे. द्वैतटीका-कारही ह्याच अर्थाचा अनुवाद करितात. इंद्रियनिग्रहानें प्रसाद, प्रसादानें योग, योग आणि श्रवण, मनन यांच्या साहाय्यानें ध्यान आणि ध्यानानें परमेश्वराचा साक्षात्कार हीं द्वैतवादी टीकाकारांची परंपरा आहे. सर्वशः=सर्व इंद्रियें. आचार्य सर्वशः म्हणजे सर्वथा असा अर्थ करितात.

चतरजी म्हणतात जो आशाशून्य झाला व ब्रह्म तेवढें सुखमय आहे आणि विषय दुःखमयच आहेत असें ज्याला निश्चयपूर्वक समजलें, तो साधु मुक्त होय. त्याचा रागद्वेष संपला व फलेच्छाही अस्तंगत झाली. इंद्रियनिग्रह त्यालाच साध्य होतो. पुनः; नुसता इंद्रियनिग्रह असल्यास दांभिकपणा येतो, व नुसती फलाशा नसल्यास इंद्रियें पुनः संसारांत ओढितात; म्हणून कायमचा इंद्रियनिग्रह पाहिजे व फलाशेचें नष्टत्वही नित्य पाहिजे. मग चित्तस्थैर्य प्राप्त होण्यास उशीर नाहीं.

योऽयं लौकिको वैदिकश्च व्यवहारः स उत्पन्नविवेकज्ञा-नस्य स्थितप्रज्ञस्याविद्याकार्यत्वादविद्यानिवृत्तौ निवर्तते। अविद्यायाश्च विद्याविरोधान्निवृत्तिरित्येतमर्थं स्फुटी कुर्वन्नाह–

याप्रमाणें जो स्थितप्रज्ञ झाला, ज्याला आत्मानात्मज्ञान झालें, विवेकबुद्धि जागृत होऊन जो ब्रह्मपर झाला, त्या पुरुषाला सामा-जिक अगर धार्मिक व्यवहारांचा संबंधच राहत नाहीं; कारण हे दोन्ही व्यवहार अविद्येनें उत्पन्न केलेले असतात व ज्ञान झाल्यानंतर अज्ञानाचा अगर अविद्येचा अस्त होतो आणि त्याबरोबरच या उभ-यविध कर्मांचाही अस्त होतो. आतां अविद्या ही विद्या प्राप्त झाल्या बरोबर नष्ट होते; उजेड पडल्याबरोबर अंधकाराचा नाश होतो. कारण त्या उभयतांत तसाच विरोध आहे. असो, विद्येचा उदय झाल्यावर अविद्या अस्तंगत होते तें स्पष्ट करण्यासाठीं सांगतात:—

या निशा सर्वभूतानां
तस्यां जागर्ति संयमी ॥
यस्यां जाग्रति भूतानि
सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥

या (जी) **सर्वभूतानां निशा** (सर्वभूतमात्रांची रात्र असते) **तस्यां** (तीमध्यें) **संयमी** (मनोनिग्रही पुरुष) **जागर्ति** (जागत असतो)–आणि–**यस्यां** (जी मध्यें) **भूतानि** (प्राणीमात्र) **जाग्रति** (जागतात) **सा** (ती) **पश्यतः मुने** (विवेकदृष्टीनें पाहणाऱ्या ब्रह्मज्ञाची) **निशा** (रात्र–असते–) सारांश जी वेळ सर्व प्राणीमात्राला रात्र अशी वाटते, ती विवेकी पुरुषाला दिवस होते, आणि अविवेकी प्राण्यांस दिवसासारखी वाटणारी वेळ ब्रह्मज्ञास रात्री सारखी होते!

या निशेति। या निशा रात्रिः सर्वपदार्थानामविवेककरी तमःस्वभावत्वात्सर्वेषां भूतानां सर्वभूतानाम्। किं तत्परमार्थतत्त्वं स्थितप्रज्ञस्य विषयः। यथा नक्तंचराणामहरेव सदन्येषां निशा भवति तद्वन्नक्तंचरस्थानीयानामज्ञानां सर्वभूतानां निशेव निशा परमार्थतत्त्वमगोचरत्वादतद्बुद्धीनाम्, तस्यां परमार्थतत्त्वलक्षणायामज्ञाननिद्रायाः प्रबुद्धो जागर्ति संयमी संयमवाञ्जितेन्द्रियो योगीत्यर्थः ॥

आपल्या स्वतःच्या निबिड अंधकारानें सर्व पदार्थांमधील भेदाभेद नष्ट करणारी रात्र सर्व प्राण्यांस घोटाळ्यांत घालिते, ती सद्वस्तूचें ज्ञान झालेल्या स्थिरबुद्धि पुरुषास कशी वाटते, म्हणून विचारशील तर सांगतों. हा भेदाभेद नष्ट करणारा प्रसंग त्या विवेकी पुरुषास मात्र सद्वस्तु दाखविणारा होतो. पहा, रात्रीच्या वेळीं आपआपले व्यवहार करणारे राक्षस अगर उलूक पक्षी यांची रात्र कोणती ? तर जी वेळ दुस-

त्यांस दिवसाप्रमाणें असते ती ! म्हणजे जेव्हां इतरांस दिसतें, तेव्हां या रात्रिंचरांस गडद अंधेर असतो ! ह्याचप्रमाणें निशाचरासारखें वागणारे अज्ञानपूर्ण लोकांची दृष्टि सद्वस्तूच्या, ब्रह्माच्या, ज्ञानाकडे वळली नसल्यामुळें, त्यांस परमार्थतत्त्व, ब्रह्मतत्त्व, सद्वस्तूचें ज्ञान, समजत नाहीं, त्यांच्या अशुद्ध बुद्धीला सद्वस्तूच्या प्रखर ज्ञानाचें देदीप्यमान किरण सहन होत नाहींत म्हणून सद्वस्तूचें ज्ञान हें त्यांस गर्द अंधकाराप्रमाणें वाटतें. परंतु ह्या भेदबुद्धि नष्ट करणाऱ्या परमार्थतत्त्वाच्या ज्ञानाचे प्रसंगीं मनोनिग्रह केलेला योगी अज्ञाननिद्रेला झुगारून देऊन खडखडीत जागा असतो. सारांश वेदांत श्रवणाचे वेळीं व ब्रह्मानुभवाचे समयीं अज्ञ मनुष्यें झोंपेच्या डुकल्या घेत असतात, व ज्ञानी पुरुष ब्रह्मानंदांत मग्न होऊन डुलत असतो !

यस्यां ग्राह्यग्राहकभेदलक्षणायामविद्यानिशायां प्रसुप्तान्येव भूतानि जाग्रतीत्युच्यते, यस्यां निशायां प्रसुप्ता इव स्वप्नदृशः सा निशाऽविद्यारूपत्वात्परमार्थतत्त्वं पश्यतो मुनेः । अतः कर्माण्यविद्यावस्थायामेव चोद्यन्ते न विद्यावस्थायाम् । विद्यायां हि सत्यामुदिते सवितरि शार्वरमिव तमः प्रणाशमुपगच्छत्यविद्या । प्राग्विद्योत्पत्तेरविद्या प्रमाणबुद्ध्या गृह्यमाणा क्रियाकारकफलभेदरूपा सती सर्वकर्महेतुत्वं प्रतिपद्यते । नाप्रमाणबुद्ध्या गृह्यमाणायाः कर्महेतुत्वोपपत्तिः । प्रमाणभूतेन वेदेन मम चोदितं कर्तव्यं कर्मेति हि कर्मणि कर्ता प्रवर्तते नाविद्यामात्रमिदं सर्वं निशेवेति ।

तसेंच 'हा मी,' 'हें माझें,' 'हा तूं,' 'हें जग' वगैरे प्रकारची अहंप्रत्ययरूपी (Subjective) आणि इदंप्रत्ययरूपी (Objective) भेदबुद्धि कायम करणें हाच स्वभाव आहे ज्या अविद्यारूपी रात्रीचा, त्या रात्रींत गाढ झोंप लागलेल्या मनुष्यांसच जागणारीं माणसें असें म्हणतात ! म्हणजे अविद्येनें भेद पाहणारे मूर्ख लोकांस व्यवहारज्ञ व चतुर असें म्हणतात !—या अज्ञाननिद्रेंत घोरत पडलेले

लोक स्वप्नांतील व्यवहार करीत आहेत. म्हणजे त्यांचा व्यवहार खोटा आहे व बुद्धि अज्ञानाची आहे. असो, तेव्हां अज्ञानांत व्यवहार करणारे मिथ्या व्यवहारज्ञ लोकांचा जो दिवस त्याला आमचे परमार्थतत्त्व ओळखणारे मुनिराज रात्र असें म्हणतात ! कारण उघडच आहे कीं व्यवहार करणारे भेदबुद्धीचे लोक अज्ञानांत गुरफटलेले आहेत.

याप्रमाणें भेदशून्य दृष्टीनें सद्वस्तूचें स्वस्वरूपतः चिंतन करणाऱ्या आत्मज्ञानाचें जें श्रेष्ठ ज्ञान तें द्वैतवादी कर्मठाला अज्ञान वाटतें आणि भेदपूर्ण दृष्टीनें जें व्यवहाराचें, संसाराचें चिंतन, कर्तृत्व बुद्धीनें व फलाच्या आशेनें करणाऱ्या पुरुषाचें जें व्यवहारज्ञान, तें सर्व अद्वैत दृष्टि ज्ञान्याला अज्ञान वाटतें. यावरून फलितार्थ काय निघाला कीं कर्म करण्याची आवश्यकता अविद्यामग्न लोकांसच आहे, विद्यावंतांस नाहीं. अविद्येमध्यें कर्म करण्यास सांगण्याचा वेदशास्त्रांचा उद्देश हा आहे कीं त्यानें चित्तशुद्धि व्हावी. ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे व ज्याला ज्ञान प्राप्त झालें आहे त्याला कर्म करण्याचें कारणच नाहीं. पुनः, विद्या प्राप्त झाली, ज्ञान झालें, ब्रह्मसाक्षात्कार झाला, अथवा स्वयंप्रकाश ज्ञानसूर्य उगवला म्हणजे अज्ञानरूपी रात्र आणि काळोख हीं चटसारीं निघून जातात, नव्हे, नाशच पावतात ! पण हें सद्वस्तूचें ज्ञान होण्यापूर्वी मनुष्यमात्र अज्ञानामध्यें लिप्त झालेला असतो. 'मी कर्ता,' 'हें साधन अगर करण,' 'हें फल,' इत्यादि भेद उत्पन्न करणारें व हे भेद खरे आहेत असें भासविणारें अज्ञान म्हणजे अविद्या होय; आणि याच अविद्येच्या जोरावर अज्ञानी मनुष्य कर्म करण्यास प्रवृत्त होतो. आतां हें उघड आहे कीं या भेददर्शी अविद्येला जर आपण खरें मानिलें नसतें, तर अविद्येचें कार्य जें कर्म तें आपण केलेंच नसतें; व अविद्येलाही प्राण्याकडून कर्म करवून घेण्याचें सामर्थ्य उरलें नसतें. सारांश अज्ञानी मनुष्य म्हणत असतो कीं वेद हे प्रमाण आहेत व यांनीं आपल्यास कर्म करण्यास सांगितलें आहे; म्हणून मला वेदप्रतिपादित कर्म केलेंच पाहिजे ! पसुद्धां असें म्हणत नाहीं कीं हें संसारजन्य व संसारजनक

कर्म करण्यास सांगणारे वेद हे सर्व अविद्येचे, मायेचे, मायारूपी रात्रीचे खेळ आहेत. म्हणून वेदांचा वरवरचा अर्थ प्रमाण मानणारे अज्ञानी लोकांनींच कर्म करणें योग्य आहे. विद्वानांस कर्माची व कर्म करण्यास सांगणाऱ्या वेदांची आपेक्षाच नाहीं.

यस्य पुनर्निशेवाविद्यामात्रमिदं सर्वं भेदजातमिति ज्ञानं तस्याऽऽत्मज्ञस्य सर्वकर्मसंन्यास एवाधिकारो न प्रवृत्तौ । तथा च दर्शयिष्यति ‘ तद्बुद्धयस्तदात्मानः ’ इत्यादिना ज्ञाननिष्ठायामेव तस्याधिकारम् । तत्रापि प्रवर्तकप्रमाणाभावे प्रवृत्त्यनुपपत्तिरिति चेत् । न । स्वात्मविषयत्वादात्मज्ञानस्य । न ह्यात्मनः स्वात्मनि प्रवर्तकप्रमाणापेक्षताऽऽत्मत्वादेव तदन्तत्वाच्च सर्वप्रमाणानां प्रमाणत्वस्य । न ह्यात्मस्वरूपाधिगमे सति पुनः प्रमाणप्रमेयव्यवहारः संभवति । प्रमातृत्वं ह्यात्मनो निवर्तयत्यन्त्यं प्रमाणम् । निवर्तयदेव चाप्रमाणी भवति स्वप्नकालप्रमाणमिव प्रबोधे । लोके च वस्त्वधिगमे प्रवृत्तिहेतुत्वादर्शनात्प्रमाणस्य । तस्मान्नाऽऽत्मविदः कर्मण्यधिकार इति सिद्धम् ॥ ६९ ॥

आतां ज्या आत्मज्ञानी पुरुषाला कर्म व कर्मप्रवर्तक वेद हीं सर्व अविद्येपासून झालीं आहेत, अविद्यामयच आहेत, म्हणून रात्रींसारखीं निष्प्रकाश आहेत, असें ज्ञान झालें त्याला मात्र सर्व कर्मांचा त्याग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ‘ कर्म कर ’ असें त्याला सांगण्याचा कोणालाही अधिकार नाहीं. पांचव्या अध्यायाच्या सतराव्या श्लोकांतही भगवान असेंच सांगतील कीं असल्या पुरुषाला मात्र केवळ ज्ञाननिष्ठेचा अधिकार आहे.

शिष्य—गुरु महाराज ! अंमळ थांबावें. ज्ञाननिष्ठा तरी कर्मच आहेना ? शिवाय ‘ ज्ञाननिष्ठा तूं कर ’ अशा कर्मप्रवर्तक आधाराची,

प्रमाणाची, तरी अपेक्षा आहेना ? आणि हें प्रवर्तक प्रमाण अगर विधि नसेल तर ज्ञाननिष्ठा होणार कशी ?

गुरु—हा खुळ्या ! बाहेरचे व आंतील सर्व विषय नष्ट करून जो निर्विषय झाला म्हणजे ज्याचें अज्ञान समूळ नाहींसें होऊन आत्मस्वरूपाची ज्याला ओळख झाली, नव्हे, जो परब्रह्मस्वरूपच बनला, त्याची स्वस्वरूपांतच ज्ञानवृत्ति रहाणार नाहीं तर जाईल रे कोठें ? आत्मज्ञानाचा विषय आत्माच ! तेव्हां आत्मस्वरूपांत तो लीन होणार म्हणजे ज्ञाननिष्ठेंतच असणार नाहीं काय ? कांहीं दुसरी गोष्ट साध्य करून घ्यावयाची असली तर 'अमुक तऱ्हेनें ती साध्य करून घ्यावी' अशा प्रकारचा आधार अगर विधि लागत असतो; येथें ब्रह्मज्ञाला आत्मा मिळालाच आहे तेव्हां प्रमाणाची अपेक्षा नसते हें उघड आहे; पुनः, प्रमाणांचा खरेपणा किंवा प्रमाणांचा जोरा कोठपर्यंत ? आत्म्याचा लाभ झाला नाहीं तोंपर्यंत; आत्मलाभ झाला म्हणजे वेद, शास्त्र, मंत्र, तंत्र इत्यादिकांची मातब्बरी संपली; कारण सर्वप्रकारचा व्यवहारच संपल्यामुळें 'हें कर' 'तें करूं नको' 'हें खरें' 'तें खोटें' 'हा पुरावा' 'तो पुरावा नव्हे' असें सांगण्याला अवकाशच राहिला नाहीं, खरें कीं नाहीं ?

शिष्य—तें खरें, पण 'हें खरें आहे' असें मानण्याची शक्ति तर आत्म्यांत राहील ?

गुरु—वत्सा ! सर्व प्रमाणांस खरेपणा देणारा आत्मा हें शेवटचें प्रमाण आहे, पण जेव्हां आत्मज्ञान होऊन दुसरें असें कांहींच राहत नाहीं, विषय, इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार इत्यादि सर्व मापन करावयाच्या गोष्टीच जेव्हां नाहींशा होतात तेव्हां सर्वांचा मापक जो आत्मा त्याचें मापकपणही नाहींसें होतें.—जगांतील सर्व प्रकारचें धान्य व मोजावयाच्या वस्तु नाहींशा झाल्यावर शेराचें शेरपण जसें नष्ट होईल तसेंच येथें समज म्हणजे झालें.—

शिष्य—महाराज ! ज्ञानाच्या इच्छेनें प्रवृत्त झाल्यामुळें मी

निर्भीडपणानें विचारीत आहें आपण रागावूं नये, बालकावर अनुग्रह करावा—

गुरु—अरे इतकी लांब प्रस्तावना कशाला ! विचारावयाचें तें खुशाल विचार.—

शिष्य—आत्म्याजवळचें ' खरें, खोटें पाहण्याचें सामर्थ्यच, मापकपणच जर नाहींसें झालें तर अद्वैतज्ञानच खरें आहे हें कशावरून जाणावयाचें ? आत्मबोध झाल्यावरच अद्वैतज्ञान होणार आणि त्याच वेळीं आत्म्याजवळ खऱ्या खोट्याचा ताजवा नाहींसा होतो, म्हणून विचारितों.

गुरु—अरे ! असें पहाः तूं झोंपेंतून जागा झालास म्हणजे आपल्यास स्वप्नें पडत होतीं, त्याचीं अमुक प्रमाणें आहेत, असें म्हणालास तर त्या तुझ्या स्वाप्निक प्रमाणांची सत्यता मानणें रास्त होईल काय ? नाहीं; सारांश स्वप्नांतील प्रमाणें जशीं अप्रमाण ठरतात, त्याचप्रमाणें संसाररूपी स्वप्नांतून जागे झाल्यानंतर संसाररूपी स्वप्नांतील आत्म्याचें प्रमाणत्व प्रमाणशून्य होतें. झालें. आत्मा प्रमाणशून्य होतो, म्हणजे आत्म्याकडे ' अमुक कर ' किंवा ' करूं नको, ' ' अमुक खरें ' किंवा ' अमुक खोटें ' असें सांगण्याचें राहतच नाहीं. सारांश कोणतें कर्म करण्याचें उरत नाहीं. आतां अद्वैताचें प्रामाण्य तूं विचारलेंस तर तुला काय म्हणावें ? सर्व आत्मस्वरूप आहे अशी जागृति होऊन प्रमाण, प्रमेय वगैरे सर्वच व्यवहार नामरूपासुद्धां नष्ट झाला तेथें ' खरें खोटें ' हा प्रश्न तरी राहील कसा ? एकच राहिलें तेथें ' खरेंही नाहींसें झालें व खोटेंही उरलें नाहीं. असो, हा विस्तार फारच होईल. तात्पर्य ध्यावयाचें हें कीं मुमुक्षूचें कर्म, आत्मज्ञान झाल्याबरोबर संपतें. लोकांमध्यें तरी आपण हेंच पाहतोंना कीं कोणा मनुष्याला इष्ट वस्तु प्राप्त झाली म्हणजे ' अमुक केलें असतां ती वस्तु प्राप्त होते ' ह्या नियमाचें प्राबल्य त्या पुरुषाला राहत नाहीं व तो त्या नियमानुसार कर्मही करीत नाहीं. सारांश, जो म्हणून आत्मवेत्ता झाला त्याला कोणतेंही कर्म करण्याची आव-

श्यकता राहिली नाहीं, व कोणतेंही कर्म त्याच्या हातून होत नाहीं हें सिद्ध झालें.

मधु०—'या' शब्दाचा प्रज्ञा म्हणजे वेदांतमहावाक्यावरून 'मीच ब्रह्म आहें' अशी झालेली बुद्धि असा अर्थ करून ही बुद्धि सामान्यजनांस अंधकारमय वाटते असें ह्मणतात. समानार्थक श्लोकः—

"कारकव्यवहारे हि शुद्धं वस्तु न वीक्ष्यते।
शुद्धे वस्तुनि सिद्धे च कारकव्यापृतिस्तथा" ॥

(कर्तृत्वबुद्धि असली म्हणजे ब्रह्मज्ञान नाहीं, आणि ब्रह्मज्ञान सिद्ध झालें म्हणजे कर्तृत्वबुद्धिही नाहीं!) तसेंच—

"काकोलूकनिशेवायं संसारोऽज्ञात्मवेदिनोः"।

(अज्ञानी आणि विद्वान लोकांस संसार कसा भासतो? तर कावळा आणि घुबड यांस रात्र भासते त्याप्रमाणें; म्हणजे कावळ्याची रात्र तो घुबडाचा दिवस आणि घुबडाची रात्र तो कावळ्याचा दिवस!)

"यत्र वाऽन्यदिव स्यात्तत्रान्योऽन्यत्पश्येत्।
यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्" ॥

(जेथें दुसरें कांहीं आहे, द्वैत आहे, असा भास असतो, तेथें एक दुसऱ्याला पाहतो हें म्हणणें शोभेल. पण जेथें ज्ञानी पुरुषाला —आपल्यासुद्धां—सर्वच आत्ममय झालें तेथें पाहणारा कोण? पाहणें काय? पहावयाचें कशानें? आणि पहावयाचें तरी काय?) सारांश ज्ञानी पुरुषाला सर्वत्र आत्मसूर्य उगवला आहे असें दिसेल, अथवा शुद्ध रीतीनें बोलावयाचेंच तर ज्ञानी पुरुषच आत्मसूर्य होईल.!

श्रीधर—यांनीं 'सर्वभूतानां' चा अर्थ 'आत्मज्ञानाभावरूपी जो अंधकार त्यानें लिप्त झाल्या आहेत बुद्धि ज्यांच्या असे प्राणी' असा करून 'ब्रह्मज्ञानें डोळे उघडले तरी त्यास ब्रह्मच दिसतें, नामरूपात्मक विषय दिसत नाहींतः' असें म्हटलें आहे.

शंकरानंद ज्ञानी पुरुषाची स्थिति सांगतातः—

"आत्मरतिरात्मक्रीड आत्ममिथुन आत्मज्योति-
रात्मानन्दो भूत्वा सर्वदाऽऽस्ते" ॥

अर्थ स्पष्टच आहे. 'निशा'= (१) नेहमीं अत्यंत निद्रा ज्या अवस्थेंत असते ती; (२) नेहमीं ज्या अवस्थेंत अत्यंत 'शं' म्हणजे सुख असतें ती अवस्था! प्रपाकार एक समानार्थक श्लोक देतात.

" आत्मा नहि स्फुरति सर्वशरीरभाजां
तेषां निशा भवति सा खलु तत्र योगी ॥
जागर्ति जाग्रति च ते व्यवहारजाते
तत्र स्फुरत्युरुधियः क्षणदाऽस्य सा ते ॥ "

मूळ श्लोकाचें प्रतिबिंबरूपच हा श्लोक आहे. तात्पर्य शरीरभोग भोगणारांस आत्मस्फुरण होत नाहीं, व योग्यांस व्यवहाराचें स्फुरण होत नाहीं. संसारी लोकांस समाधिस्थिति झोंपेसारखी वाटते! **योगवासिष्ठां**त म्हटलें आहे.

" निद्रादौ जागरस्यान्ते यो भाव उपपद्यते ।
तं भावं भावयन्साक्षादद्वयानन्दमश्नुते ॥ "

(जागृतीच्या शेवटीं व निद्रा लागण्याच्या पूर्वीं मनाची जी विषयशून्यवृत्ति असते ती वृत्ति सर्वदा असून जो अद्वयाचा आनंद उपभोगितो तोच योगी होय.)

रामानुजांचाही वरीलप्रमाणेंच अर्थ आहे. निशा=प्रकाश न देणारी वेळ.

मध्वमतवादीः—' निशा '=योग्यास परमेश्वरस्वरूपानें भासमान होणारी अवस्था इतरांस अज्ञात असते म्हणून अंधकारमय होते. संयमी=परमेश्वरास प्रत्यक्ष पाहणारा. व्यावहारिकविषयाचे वेळीं योगी निद्रा घेतो म्हणजे मत्तासारखें आचरण करितो, तात्पर्य तो भानावर नाहीं असें सामान्य लोकांस दिसतें. हे एक श्लोक देतात त्याचें तात्पर्य हें आहेः-मदिरापानानें मदांध झालेल्या पुरुषाला जसें स्वतःचें वस्त्र आहे किंवा नाहीं याचें भान नसतें, त्याप्रमाणें ईश्वरचरणीं ज्या सिद्धाच्या मनाचा सर्वथैव लय लागला आहे, तो महायोगी शरीराची मुळींच फिकीर करीत नाहीं. देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ अशा पुरुषाला व्यवहाराची खबर नसते

यांत काय आश्चर्य आहे ? राघवेन्द्रयतिः—मुनेः पश्यतः=मनन करणाऱ्या स्वानुभवी पुरुषाला असा अन्वय सांगतात.

Lilly's Ancient Religion and Modern Thought P.184. Dark is the world to thee; thyself art the reason why; For is He not all but thou, that has power to feel I am I !

'तुला हें सर्व अंधकारमय दिसत आहे. त्याचें कारण तूंच आहेस. 'मी मी आहें' असें मानणाऱ्या तुझ्याशिवाय बाकी सर्व परमेश्वरमय आहे'!

चतरजी—कर्मनिषेधासंबंधानें आचार्यांचेंच अनुकरण करितात. वेद, नीतिग्रंथ वगैरेंची योजना ही मिथ्या जीवभाव, व कर्तृत्व, भोक्तृत्व मानणाऱ्या अज्ञानी लोकांसाठीं आहे. मुमुक्षूला एकच कर्तव्य आहे तें हें: मिथ्याजगताचा त्याग करणें व दृढनिश्चय ठेवून आत्मज्ञान संपादन करणें व नंतर ब्रह्मस्वरूपांत मिसळून एकरूप होणें; हेंच त्याचें कर्तव्य आहे. (पहा कलोसियन्स अ० ३) For the wisdom of this world is foolishness with God......But the natural man receiveth not the things of the spirit of God : for they are foolishness unto him : neither can he know *them* because they are spiritually discerned.

'कारण ह्या लोकांचें शहाणपण ईश्वराच्या दृष्टीला मूर्खत्वाचें दिसतें. परंतु व्यावहारिक मनुष्याला ईश्वरी वस्तु आवडत नाहींत; कारण या वस्तू त्याला मूर्खपणाच्या दिसतात; पुनः त्या वस्तु या संसारी व धर्मशून्य मनुष्याला समजतही नाहींत.' हा उतारा व गीतेंतील श्लोक यांचें अर्थसाम्य किती जवळ जवळ आहे हें दाखविण्यासाठींच हें विस्तृत अवतरण घेतलें आहे.

पंडित म्हणतातः—या भावे श्रीकृष्ण म्हणे। या निशा पश्यतो मुनेः। विषय देखोनि वासना नेणें। न दिसे तमीं जेवी कांहीं ॥....दृष्टींत वासना न राहे। आणि ब्रह्मभावें विषय पाहे। कीं मनन निदिध्यास घडला आहे। मुनि म्हणे हरी यास्तव ॥ सुवर्ण क्रयविक्रय करी।

अलंकार त्या सराफाच्या घरीं । वेश्यांची दृष्टि अलंकारीं । सराफ लक्षी सोनें ॥ वेश्या देखे सरी । गळां घालियाची इच्छा करी । कांकणें देखतां, करीं । लेऊं पाहे ॥ सराफ सोनेंच लक्षी । देखोनि आकारातें उपेक्षी । जन भोगची अपेक्षी । ज्ञानी पाहे ब्रह्मत्वें ॥.... भोगी वासनारहित । तो संयमींच जाणावा निश्चित । याप्रकारें अच्युत । समाधान करितो या श्लोकीं ॥ ६९ ॥

विदुषस्त्यक्तैषणस्य स्थितप्रज्ञस्य यतेरेव मोक्षप्राप्तिर्न त्वसंन्यासिनः कामकामिन इत्येतमर्थं दृष्टान्तेन प्रतिपादयिष्यन्नाह—

आतां ज्याला आत्मविद्या प्राप्त झाली व ज्यानें सर्वविषयांविषयींचा सर्वथा वासनात्याग केला अशा निश्चितबुद्धीच्या संन्याशालाच मात्र मोक्ष मिळतो, अहंताभिमानी व वासनाशील संसाऱ्याला मिळत नाहीं हें ६४ व्या श्लोकांत सांगितलेलें तत्त्व दृढ करण्यासाठीं एक दृष्टांत सांगतातः—

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ॥
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ ७० ॥

आपूर्यमाणं (चोहीं बाजूंनीं भरला जाणारा)–परंतु–**अचलप्रतिष्ठं** (आपलें स्थान, आपली सीमा, मर्यादा, न सोडणारा) **समुद्रं** (जो समुद्र त्यामध्यें) **यद्वत्** (ज्याप्रमाणें) **आपः** (नद्या, जलसंचय) **प्रविशन्ति** (प्रवेश करितात, शिरतात) **तद्वत्** (त्याप्रमाणें) **यं** (ज्या-संन्याशाच्या मनामध्यें–) **सर्वे कामाः** (सर्व प्रकारच्या, अनेक प्रकारच्या इच्छा) **प्रविशन्ति** (प्रवेश करितात). सारांश उदकानें पूर्ण असलेल्या महासागरामध्यें हजारो नद्यांनीं आपली विशाल पात्रें चोहींकडून जरी ओतलीं, तथापि तो शांत व गंभीर महासागर

ज्याप्रमाणें आपली मर्यादा उल्लंघन करीत नाहीं, त्याप्रमाणें हजारो प्रकारच्या इच्छा मनांत शिरल्या काय व मनांतून गेल्या काय, जो आमचा ब्रह्मज्ञ पुरुष नेहमीं शांत व अविकृत असा राहतो; **सः** (तो) **शान्तिं आप्नोति** (मुक्ति मिळवितो.) **कामकामी न** (वासनाधीन पुरुष, विषयांचें चिंतन करणारा पुरुष, मिळवीत नाहीं.)

आपूर्येति । आपूर्यमाणमद्भिरचलप्रतिष्ठमचलतया प्रतिष्ठाऽवस्थितिर्यस्य तमचलप्रतिष्ठं समुद्रमापः सर्वतो गताः प्रविशन्ति स्वात्मस्थमविक्रियमेव सन्तं यद्वत्तद्वत्कामा विषयसंनिधावपि सर्वत इच्छाविशेषा यं पुरुषं समुद्रमिवाऽऽपोऽविकुर्वन्तः प्रविशन्ति सर्वे आत्मन्येव प्रलीयन्ते न स्वात्मवशं कुर्वन्ति स शान्तिं मोक्षमाप्नोति नेतरः कामकामी काम्यन्त इति कामा विषयास्तान्कामयितुं शीलं यस्य स कामकामी नैव प्राप्नोतीत्यर्थः ॥ ७० ॥

चोहींकडून पाण्याच्या व नद्यांच्या प्रचंड प्रवाहांनीं भरत असणारा समुद्र ज्याप्रमाणें आपली मर्यादा सोडीत नाहीं इतकेंच नव्हे, तर स्वतः अविकृत राहून-मिळणाऱ्या नद्यांसही स्वस्वरूपच देतो आणि-ग्रीष्मऋतूंत नद्या आटल्या किंवा वर्षाऋतूंत फुगल्या तरी ज्या समुद्राचे स्वरूपांत फरक पडत नाहीं, त्याचप्रमाणें सर्व प्रकारचे विषय जवळ असतांनाही व त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या अनंत प्रकारच्या वासनाही ज्या स्थिरबुद्धि मुनीला विकारवश करण्यास असमर्थ होऊन नंतर त्याच्या मनांत शिरतात व तेथें त्या वासना स्वतः आत्मस्वरूपच होऊन जातात,—सारांश प्रारब्धवशतेमुळें आवश्यक भोग भोगूनही जो विषयाधीन होत नाहीं, शांतच राहतो, त्या विकारशून्य यतीला मात्र मोक्ष मिळतो. निरनिराळ्या विषयांची आराधना करण्याचें ज्याचें व्रत असतें अशा वासनापूर्ण व ममत्वाभिमानी अविद्वानाला मोक्ष मिळत नाहीं.

अद्वैत टीकाकारांचें ऐकमत्य आहे **प्रपा०**:—शांति = शमसुख. **द्विवेदीः**—**कामकामी**=बकासारखे ढोंगी संन्याशी ! **पर्वतेः**—आचार्यानु-

यायीच आहेत. **मधुः**–अर्थ आचार्यांप्रमाणेंच. शांति=लौकिक व अलौकिक, अथवा व्यावहारिक आणि धार्मिक, कर्मांच्या योगानें चित्तभ्रष्ट न होण्याची स्थिति. ज्ञानबलानेंही शांति मिळते. या शांतिब्रह्मालाच संन्यास योग्य! ही शांति ज्याला मिळाली तो जीवन्मुक्तच झाला.

श्रीधरः–'यं'=अंतर्दृष्टि प्राप्त झालेला मुनि. **शंकरानन्दः**–शांति=अविद्या व तिचें कार्य जो प्रपंच या उभयतांचा उपशम ज्या वृत्तींत होतो ती मनोवृत्ति. **सरकारः**–शांतिपर्व अ. २९७ हा अध्याय ह्यासंबंधानें वाचावा असें म्हणतात.

रामानुजाचार्य, मध्वाचार्य व राघवेंद्रयतिः—आचार्यांप्रमाणेंच अर्थ करितात. **सत्यानंदः**–एक समानार्थ श्लोक देतातः—

"भुञ्जानोऽपि हि यः कामान्मर्यादां न तरेत्क्वचित्।
समुद्रवद्धर्ममर्यां नासौ कामी स उच्यते" ॥

(भोग भोगीत असतांही जो आपली धर्ममर्यादा–समुद्राप्रमाणें–उल्लंघित नाहीं, त्याला कामी–निषिद्धाची इच्छा करणारा–असें म्हणूं नये.) यांचें मत असें आहे कीं इच्छा ही स्वभावतः मोक्षविरोधिनी नाहीं. दुष्ट इच्छा तेवढी मोक्षाच्या आड येते. इच्छा नष्टच केली तर, जिवंत राहणेंही अशक्य होईल! द्वैतपक्षाचा मोक्ष म्हणजे ईश्वरासन्निध वास होय. ह्या स्थितींत इच्छा असणें नीट आहे. पण मूळ श्लोकांत हा भाव दिसत नाहीं. विषयाची आशा करून भोग भोगिले म्हणजे शांति नष्ट होते. निरिच्छ असून विषय भोगणें प्राप्त झालें असतांही निर्विकार राहणें, नव्हे ! भोगवृत्तीसच ब्रह्मस्वरूप देणें हें शांतीचें खरें लक्षण आहे. आचार्यांच्या भाष्यांत हाच सरळ अर्थ आला आहे.

ज्ञाने०:—सांगे, सूर्याचे घरीं। प्रकाश काय वातीवेरी (वातीवरच!)। कां न लाविजे (दिवा लावला नाहीं तर) तरी अंधकारी। कोंडेल तो (सूर्य)?॥ मुळाच्यावर ताण आहे कीं नाहीं या दृष्टांताची? आणखी; जो आपुलेनी नागरपणें (आपल्या वरच्या सौंद-

यीनें)। इंद्रभुवनातें पावळें (तुच्छ) म्हणे । तो केंवि रंजे पालवणें (पर्णकुटीनें । भिल्लांचेंनि ॥ जो अमृतातें ठी (नांव) ठेवी । तो जैसा कांजी न सेवी। तैसा स्वसुखानुभवी (ब्रह्मज्ञ)। भोगी न ऋद्धि॥ ....सारांश....जेथ स्वर्गसुखा लेखणी (परवा, गणना) नाहीं । तेथ ऋद्धि सिद्धि कार्या । प्राकृता (सामान्य, अल्प) । होती! ॥

रंगनाथ स्वामींचे दृष्टांत पहाः–ज्याला सर्व विषय....परितयातें विकार उपजवूं न शकती । जैसे गगनीं हे षड्ऋतु येती, जाती । परी गगनास विकार उपजवूं न शकती ।·कीं जळसंगति पद्मपत्र ॥७०॥

यस्मादेवं तस्मात्—

शिष्य—गुरुमहाराज ! तर मग एखाद्या गृहस्थानें आपल्या मानसेंकरून मात्र सर्व प्रकारचा अभिमान टाकून दिला व तो स्वतःस ब्रह्मस्वरूपी असें मानावयास लागला म्हणून त्यालाही मोक्ष मिळणार अशी स्थिती प्राप्त झाली ! माझ्या समजुतीनें हा तर खुळ्याचा बाजारच झाला.

गुरु—कां बरें ? ज्यानें सर्व प्रकारच्या इच्छा मनानें व कृतीनें टाकून दिल्या तोच संन्याशी व त्यासच मोक्ष मिळातो असें आहे म्हणून—

विहाय कामान्यः सर्वा-
न्पुमांश्चरति निस्पृहः ॥
निर्ममो निरहंकारः
स शान्तिमधिगच्छति ॥ ७१ ॥

सर्वान् कामान् (।सर्व प्रकारच्या कामना) **विहाय** (टाकून देऊन) **यः पुमान्** (जो संन्यासी पुरुष) **निस्पृहः** (वासनाशून्य होत्साता उदासीन पणें) **चरति** (संचार करित राहतो)–तसेंच जो–**निर्ममः** (ममत्वशून्य. आहे)–व–**निरहंकारः** (अहंत्वशून्य आहे) **सः** (तो) **शान्ति** (निर्विकार अशी स्थिति, मोक्ष) **अधिगच्छति**

(मिळविता होतो) सारांश सर्वप्रकारच्या कामनांचा व वासनांचा त्याग करून उदासीनपणानें जो पृथ्वीवर संचार करितो, ' हें माझें ' ' हा मी ' ह्या प्रकारचें ममत्व आणि अभिमान हीं ज्याचीं नष्ट होतात त्याच पुरुषाला कायमची अशी निर्विकार स्थिति मिळते, त्यालाच मोक्ष मिळतो.

विहायेति । विहाय परित्यज्य कामान्यः संन्यासी पुमान्सर्वानशेषतः कार्त्स्न्येन चरति जीवन्मात्रचेष्टाशेषः पर्यटतीत्यर्थः, निस्पृहः शरीरजीवनमात्रेऽपि निर्गता स्पृहा यस्य स निस्पृहः सन्निर्ममः शरीरजीवनमात्राक्षिप्तपरिग्रहेऽपि ममेदमित्यभिनिवेशवर्जितः, निरहंकारो विद्यावत्त्वादिनिमित्तात्मसंभावनारहित इत्यर्थः, स एवंभूतः स्थितप्रज्ञो ब्रह्मविच्छान्तिं सर्वसंसारदुःखोपरमलक्षणां निर्वाणाख्यामधिगच्छति प्राप्नोति ब्रह्मभूतो भवतीत्यर्थः ॥ ७१ ॥

याप्रमाणें संन्यासी अथवा विद्वान पुरुष तिन्ही प्रकारच्या वासनांचा त्याग करितो.

शिष्य—मग वासनाशून्य झालेल्या व विषयत्याग केलेल्या संन्याशाला क्षणमात्रही जिवंत राहतां यावयाचें नाहीं.

गुरु—अरे देहप्रारब्ध आहे तोंपर्यंत त्यास देह जिवंत ठेवण्यापुरतीं कार्यें करावींच लागतात. तूं एक गोष्ट समजला नाहींस म्हणून अशी शंका विचारतोस. विषयत्याग करणें याचा अर्थ असा समजावयाचा कीं विषयापासून आपल्यास सुख मिळावें अशी जी इच्छा असते, त्या इच्छेचा त्याग करणें हा, खरा विषयत्याग आहे. आपल्यास देह प्राप्त झाला आहे, त्याबरोबरच मन, चित्त, बुद्धि हीं प्राप्त झालीं आहेत. यांची शुद्धि झाल्याशिवाय मोक्ष नाहीं. चित्तशुद्धि व्हावयास बराच काल लागतो, तसेंच श्रवण, मनन, निदिध्यासाचीही आवश्यकता असते. परंतु हें सर्व देह जिवंत आहे तोंपर्यंतच

होणार; म्हणून देह जिवंत ठेवणें आवश्यक आहे व देह जिवंत राहील अशीं कर्मे करणें अवश्य आहे–असो; तेव्हां हा योगी पुरुष देहयात्रा चालेल अशीं कर्मे करीत असतो.

शिष्य—मग ह्या कर्माला घरदार हवेंसें झालें व तो संसारांत पुनः पडलाच.

गुरु—नाहीं. तो एके ठिकाणीं राहतच नाहीं. असतो तेथें सुद्धां उदासीनपणानेंच वागतो, तो इतका कीं शरीर कोठेंही पडलें तरी तो त्याची क्षिती बाळगीत नाहीं. शरीराला लागणाऱ्या वस्तूवर सुद्धां 'ही माझी वस्तु' असें ममत्व किंवा अभिमान तो ठेवीत नाहीं.–सारांश प्रारब्ध कर्मवशात् तो भोग भोगीत राहतो.

शिष्य—निदान मी ब्रह्मवेत्ता आहे हा तरी अहंकार त्याला उत्पन्न होत असेल?

गुरु—नाहीं. हाही अभिमान तो नष्ट करून टाकितो; अथवा हा त्याचा अभिमान नष्ट होतो.–तसेंच 'हा मी आहें' हाही अभिमान नष्ट होतो.–ब्रह्ममय जो झाला त्याला 'मी अमुक आहें' असें भानच नसतें, मग अभिमान कोठील?–याप्रमाणें स्थितप्रज्ञ करितो काय या प्रश्नाचें उत्तर सांगितलें. असो; ही स्थितप्रज्ञाची स्थिति झाली, त्याला ब्रह्म समजलें, म्हणजे त्यास मोक्ष मिळतो. जन्ममरणरूपी संसार आणि त्यापासून होणारें दुःख–अथवा अविद्या व तिचें कार्य जो संसार–या सर्वांचा उपशम मोक्ष मिळाला म्हणजे होतो. या मोक्षालाच निर्वाण असें नांव आहे. सारांश पूर्वोक्त वासनात्याग, निस्पृहत्व, निर्ममत्व, निरहंकारत्व इत्यादिकांच्या साहाय्यानें व वेदांतवाक्यश्रवणानें ब्रह्मज्ञ होतो, व पुढें ब्रह्मच होतो.

मधु०—हाच अर्थ सांगतात. **श्रीधर**–आलेले भोग निरिच्छपणानें भोगितो व अप्राप्तभोगाविषयीं निस्पृह, इच्छाशून्य असतो. **शंकरा०**:–पुमान् = पुं म्हणजे मोक्ष तो मोठ्या प्रयासानें मिळविणारा पुरुष. कामान् = भोगान् = विषयान् "कामान्नी कामरूप्यनुसंचरन्" ही श्रुति वरील अर्थच समर्थन करिते.

प्रपा०—पुमान् = साध्य केला आहे पुरुषार्थ ज्यानें तो पुरुष. द्विवेदी म्हणतात कीं हा श्रेष्ठ पुरुष मोक्षमार्गानें जात असतां वाटेनें लागणारे जे गृह, दार, पुत्र, संपत्ति इत्यादि जे विषय त्यांचा तृणाप्रमाणें कस्पटाप्रमाणें, उपभोग घेऊन ब्रह्मनिष्ठा कायम ठेवितो. हाच खरा योगी व खरा त्यागी. ह्याप्रमाणें अर्जुनाचे प्रश्नांचा निकाल झाला व ज्ञानबुद्धि व योगबुद्धि यांचें कर्मसंन्यासासहित विवरण झालें.

रामानुज:—कामान् = शब्दादि विषय. अनात्मक जो देह त्यावरील आत्मत्वाचा अभिमान टाकून देऊन ज्ञानी वागतो.

मध्वाचार्य, सत्या०, विद्या०:—'निस्पृहः' याचा अर्थ निस्पृहतेनें असा करून तो शब्द विहाय (टाकून देतो) इकडे घेतात. म्हणजे सर्व विषयांचा त्याग हा भगवद्भक्त निस्पृहतेनें करून त्यांचा उपयोग घेतो. निषिद्ध वस्तूंविषयीं अभिलाषविरहित जो असतो तो निस्पृह. चरति = खातो, सेवन करितो. अहंकारः = अस्वरूपाचें ठिकाणीं स्वरूपाची मति, = जो मी नव्हे त्यावरच मी आहें अशी भावना होणें तो अहंकार होय.

'त्याज्या सर्वत्र ममता ज्ञात्वा सर्वं हरेर्वशम्'।

(सर्व कांहीं हरीच्या आधीन आहे असें जाणून मनुष्यानें 'हें माझें' हा अभिमान टाकून द्यावा.) सारांश हा योगी (भगवद्भक्त) निषिद्धाचा त्याग करितो, विहित भोगावरही इच्छा ठेवीत नाहीं, आणि यदृच्छेनें प्राप्त झालेले विषयांचा ममत्वशून्यतेनें उपभोग घेतो.

राघवेंद्रः—असा जो भगवद्भक्त आहे, तोच खरा पुरुष आहे. बाकींचे सर्व पशु होत !

ज्ञानेश्वर, पंडित, रंगनाथ कांहीं विशेष सांगत नाहींत. ॥७१॥

सैषा ज्ञाननिष्ठा स्तूयते—

असो; याप्रमाणें स्थितप्रज्ञ म्हणजे काय यावर व्याख्यान करितांना मुमुक्षूचें कर्तव्य काय आहे, व साधनें कोणतीं तें सांगून ज्ञाननिष्ठेचेंही विवरण येथपर्यंत केलें. आतां त्या ज्ञाननिष्ठेची फलश्रुति सांगितली असतां मुमुक्षूंचे कर्तव्यास म्हणजे कामनेचा नाश करण्यास दुजोरा येईल असा विचार करून ज्ञाननिष्ठेचें स्तवन करितात :—

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ
नैनां प्राप्य विमुह्यति ॥
स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि
ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

पार्थ (कुन्तीपुत्रा अर्जुना !) **एषा** (हा वेळपर्यंत वर्णन केलेली ही) **ब्राह्मी स्थितिः** (ब्रह्ममयच करणारी स्थितप्रज्ञाची स्थिति अथवा त्याचें ज्ञान, त्याचें कर्म, त्याच्या इच्छा, सारांश त्याचें शारीरिक, मानसिक व धार्मिक वर्तन)-सांगितलें.-सारांश विद्वान पुरुषाचें मन ब्रह्ममय झाल्यानंतर त्याच्या आचार, उच्चार, विचारांची स्थिति सांगितली.-अर्जुना !-**एनां** (ही स्थितप्रज्ञाची स्थिति) **प्राप्य** (प्राप्त झाली असतां) **न विमुह्यति** (कोणत्याही प्रकारचा मोह, अहंत्वाभिमान, उत्पन्न होत नाहीं.) **अस्यां** (ह्या वृत्तीमध्यें) **अन्तकालेऽपि** (देह जीवांचा वियोग होणार त्या वेळीं सुद्धां) **स्थित्वा** (राहिलें तर, त्या वेळीं ही स्थिति प्राप्त झाली तरी सुद्धां) **ब्रह्मनिर्वाणं** (जन्ममरणरहित अशा ब्रह्मसुखाप्रत) **ऋच्छति** (पावतो) सारांश ही स्थिति प्राप्त झाल्यावर ममत्वाचा मोह नष्ट होतो. आणि अंतकाळीं जरी एखाद्याचा ममत्वाभिमान नष्ट होऊन ब्रह्माकार वृत्ति झाली, तथापि तो मुक्त होतो.—

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

श्रीमहाभारतांतील व्यासमुनिप्रणीत शंभर हजार संहितेपैकीं भीष्मपर्वांतील श्रीमद्भगवद्गीतानामक उपनिषदांमधील श्रीकृष्णार्जुन संवादांत उत्पन्न झालेल्या वेदांतांतील योगशास्त्रांत **सांख्ययोग नामक** द्वितीय अध्यायाचें मूळ संपलें.

एषा ब्राह्मीति । एषा यथोक्ता ब्राह्मी ब्रह्मणि भवेयं स्थितिः सर्वं कर्म संन्यस्य ब्रह्मरूपेणैवावस्थानमित्येतत् । हे पार्थ नैनां स्थितिं प्राप्य लब्ध्वा न विमुह्यति न मोहं प्राप्नोति । स्थित्वाऽस्यां स्थितौ ब्राह्म्यां यथोक्तायामन्तकालेऽप्यन्ते वयस्यपि ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मनिर्वृतिं मोक्षमृच्छति गच्छति किमु वक्तव्यं ब्रह्मचर्यादेव संन्यस्य यावज्जीवं यो ब्रह्मण्येवावतिष्ठते स ब्रह्मनिर्वाणमृच्छतीति ॥ ७२ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ श्रीमद्भगवद्गीताभाष्ये सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

याप्रमाणें—स्थितप्रज्ञाचें लक्षण काय, तो बोलतो कसें, त्याचें कर्म कसें असतें, वगैरे जे चार प्रश्न, अर्जुना ! तूं विचारिले होतेस त्याचें उत्तर देण्यासाठीं म्हणून ही ब्रह्मज्ञाची, सर्व ऐहिक व पारलौकिक वासनांचा व सकाम कर्मांचा त्याग करून ब्रह्म रूपानेंच राहणाऱ्या अद्वैतज्ञाची, स्थिति तुला सांगितली. ही स्थिति प्राप्त झाली, नित्य सुखासाठीं अनात्मक विषयांची व विषयवासनांची आराधना करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं अशी समजूत दृढ झाली, म्हणजे त्या अधिकारी पुरुषाला कोणत्याही प्रकारचा मोह, कोणत्याही प्रकारचा ममत्वाभिमान, उरत नाहीं, व उत्पन्नही होत नाहीं. जड व अनात्मक विषयांविषयीं ज्याला बळकट तिरस्कार विचारपूर्वक उत्पन्न झाला तो पुरुष पुनः मायेच्या मोहजाळांत सांपडत नाहीं.—अर्जुना ! हा आत्मानात्मविवेक व हें आत्मचिंतन आणि हें विषयवैराग्य केव्हांही

उत्पन्न झालें, फार काय सांगावें ?—उतार वयांत—निदान अगदीं देहावसान समयीं—जरी झालें तरी मोक्षाप्रत—जन्ममरणरहित अशा ब्रह्मस्थितीप्रत तो अधिकारी पुरुष जातो ! मग ब्रह्मचर्याच्या आश्रमांतच म्हणजे अगदीं बालवयांतच विषयवैराग्य उत्पन्न होऊन त्यानें संन्यास घेतला, विषयत्याग, वासनात्याग, केला आणि देह आहे तोंपर्यंत ब्रह्मचिंतनांतच ब्रह्म होऊन राहिला तर देहावसान झाल्यानंतर तो पुरुष ब्रह्मच होतो हें सांगण्याची तरी आवश्यकता आहे काय ?

याप्रमाणें श्रीगोविंदपूज्यपादांचे शिष्य श्रीशंकराचार्य यांनीं केलेल्या द्वितीय सांख्ययोग नामक अध्यायाचें मूळ भाष्य संपलें. ॥ २ ॥

मधुः—स्थिति=निष्ठा, सांख्यनिष्ठा ही निष्काम कर्मयोगापासून निर्माण होते. यांनीं या अध्यायाचें तात्पर्य असें दिलें आहेः—

" ज्ञानं तत्साधनं कर्म सत्त्वशुद्धिश्च तत्फलम् ।
तत्फलं ज्ञाननिष्ठैवेत्यध्यायेऽस्मिन्प्रकीर्तितम् ॥ "

(प्रथम ज्ञान, मग तें प्राप्त करून देणारें कर्म, त्याचें साक्षात् फल चित्तशुद्धि, व तिचें फल ज्ञाननिष्ठा ह्या गोष्टी ह्या अध्यायांत सांगितल्या आहेत.)

श्रीधरः—कर्माच्या, परमेश्वराराधनेच्या योगानें सत्त्वशुद्धि होते असें म्हणतात. यांचें तात्पर्य.—

" शोकपङ्कनिमग्नं यः सांख्ययोगोपदेशतः ।
उज्जहारार्जुनं भक्तं स कृष्णः शरणं मम ॥ "

(शोकपंकांमध्यें बुडालेल्या, अडकलेल्या, अर्जुनास सांख्ययोगाचा उपदेश करून ज्या कृष्णानें आपल्या अर्जुन भक्तास बाहेर काढलें तो श्रीकृष्ण माझें आश्रयस्थान आहे व असो.)

शंकरा०—खट्वांग राजाला मरण समयीं ज्ञानमार्ग कळला व तो त्या ज्ञानानें ब्रह्ममय होऊन मुक्त झाला असा दाखला देतात.

मपा०ः—यांचें तात्पर्य.

" शोको देहात्मबुद्ध्या ननु भवति मृषा येन देहातिरिक्तो
देहद्रष्टैक आत्मा विभुरनुपहतो हन्तृहन्यत्वशून्यः ॥

तस्य ज्ञानान्न शोकस्तदिह निजमनःशुद्धितः सा स्वधर्मा-
द्वेदोक्तः स द्वितीये भृशमिममवदत्सांख्ययोगाधिकारम् "

देहापासून भिन्न असून देहाचा साक्षी असणारा आत्मा एकच आहे, सर्वव्यापी आहे, अविकृत व अविकार्य आहे, मरणारा व मारणारा नाहीं, असें ज्ञान झालें असतां देह हाच आत्मा आहे असें मानणाऱ्या अज्ञानी लोकांचा शोक व्यर्थ होतो, अर्थात शोक नष्ट होतो. वरील लक्षणांनीं युक्त असणाऱ्या आत्म्याचें ज्ञान चित्तशुद्धीनें होतें. ही चित्तशुद्धि स्वधर्माचरण निष्काम बुद्धीनें केलें असतां उत्पन्न होते आणि स्वधर्माचें ज्ञान वेदाध्ययनानें होतें. असो; हें व सांख्य आणि त्यांचा अधिकार हीं सर्व प्रकरणें संक्षेपानें दुसऱ्या अध्यायांत सांगितलीं आहेत.

द्विवेदी—अंतकाले = मरणाच्या वेळीं. हाच अर्थ **पंचदशीकारांस** मान्य आहे. हें ज्ञान परिपक्व झालें तर याच जन्मीं मोक्ष मिळतो, परिपक्व नाहीं झालें तर पुढील जन्म चांगला येतो व तेथें ज्ञानदशा पूर्ण होऊन मोक्ष मिळतो. (पहा अध्याय २ श्लो० ४० व अध्याय ६ श्लो० ३७ ते ४७.) **पर्वते** यांचा असाच अभिप्राय आहे.

रामानुज.-एषा स्थितिः = आत्मा नित्य आहे असें ज्ञान प्राप्त झाल्यावर निष्काम कर्मामध्यें असणारी जी निश्चयात्मक व ब्रह्म मिळवून देणारी स्थिति. कर्म करीत असतां मनाची ही स्थिति असली म्हणजे मनुष्य संसारांत पडत नाहीं; तर आनंदच आहे लक्षण ज्याचें अशा आत्म्याप्रत जातो.' दुसऱ्या अध्यायाचें तात्पर्य सांगतातः— 'याप्रमाणें आत्म्याचें यथार्थ ज्ञान आणि युद्ध नामक स्मार्त व निष्काम कर्मापासूनच तें उत्पन्न होत असतें ही गोष्ट, ह्या दोन्ही माहित नसणाऱ्या व शरीर हाच आत्मा आहे अशा अज्ञानानें मूढ होऊन युद्धापासून पराङ्मुख झालेल्या अर्जुनाचें समाधान करण्यासाठीं सांख्यज्ञान (यांत आत्मा नित्य आहे असें ज्ञान होतें) व निष्कामकर्मापासून उत्पन्न होणारी व पुढें आत्मज्ञान करून देणारी स्थित-

प्रज्ञता,—म्हणजे आत्मा नित्य आहे हें ज्ञान आणि हें ज्ञान मिळविण्याचा उपाय (निष्काम कर्मयोग व स्थिरबुद्धि) हे दोन विषय या अध्यायांत सांगितले आहेत. याच अर्थी श्लोकः—

" नित्यात्मासंगकर्मेहागोचरा सांख्ययोगधीः ।
द्वितीये स्थितधीलक्ष्या प्रोक्ता तन्मोहशान्तये " ॥

मध्वाचार्य व सत्यानंद म्हणताततः—मरणकालीं जर ब्रह्माची, विष्णुपदाची स्मृति असेल तर मात्र ब्रह्मनिर्वाणाला म्हणजे अशरीर जो विष्णु त्याच्या पदाला जातो. म्हणजे मरणसमयीं जर भगवत्स्मरण होईल तरच मोक्ष आहे. नाहीं तर नाहीं. ज्ञानी असो वा कर्मठ असो, अंतकालीं जर त्याला भगवत्स्मृति नसेल तर तो जन्मांतराला जातो ! संसारांत पुनः पडतो ! प्रारब्धकर्म संपलें तर ही स्मृति भगवद्भक्ताला मात्र होते. इतरांस होत नाहीं. नुसतें ज्ञान अगर नुसतें कर्म उपयोगी नाहीं. प्रारब्ध संपलें नसलें तर पुनः जन्मास यावें लागतें, तसेंच प्रारब्ध संपूनही व ज्ञान असूनही भगवत्स्मरण झालें नाहीं तर पुनः जन्म घ्यावा लागतो; हें सिद्ध करण्यास या द्वैताचार्यांनीं वराहपुराण व गरुडपुराणाचे आधार व श्रुतिस्मृतींचें आधारांचा आभास दाखविणारीं वचनें दिलीं आहेत. त्यांतच सांख्य, योग, वेदांत वगैरे दर्शनें लोकांस मोह पाडण्यासाठीं भगवंताच्या आज्ञेनें शंकरानें निर्माण केलीं असें वराहपुराणांतील श्लोक अवतीर्ण करून म्हटलें आहे ! शेवटीं श्रीविष्णु देवता सशरीर आहे असें सिद्ध करण्यासाठींही बरेच वेंचे घेतले आहेत. सारांश सगुण मूर्तीची उपासना केली तरच मोक्ष मिळतो असें द्वितियाध्यायाचें सार काढलें आहे ! या अध्यायाच्या उपसंहारांत द्वैत व उपासना मार्गांचा विचार करूं. **राघवेंद्रयतींचा** अर्थ वरील अर्थाहून फारसा भिन्न नाहीं.

ज्ञानेश्वरांचा 'स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि' चा अर्थ पहाः—जे चिद्रूपीं मिळतां । देहांतीची व्याकुलता । आड ठाको न सके चित्ता । प्राज्ञा जया (ज्या ब्रह्म स्थितीनें) ॥ सारांश ब्रह्मस्वरूपी झाल्यावर अंतकाळच्या वेदनाही कष्ट देण्यास असमर्थ होतात.

पंडितांचा अर्थ आचार्यांसारखाच आहे. उपसंहारः—हा अध्याय दुसरा। ज्यांत संक्षेप सारा। अठरा अध्यायांच्या सारा। वदे श्रीकृष्ण॥

रंगनाथस्वामींनीं या द्वितीयाध्यायाचे माहात्म्यपर एक गोष्ट सांगून आपली 'चित्सदानंदलहरी' नामक टीका या अध्यायापुरती समाप्त केली आहे.

मधुसूदनीकारांनीं या काण्डत्रितयात्मक गीताशास्त्रांतील प्रत्येक कांडाची व प्रत्येक अध्यायाची संगति दाखविली आहे ती अशी. प्रथम काण्डांत म्हणजे पहिल्या सहा अध्यायांमध्यें कर्मत्याग मार्गानें विशुद्ध आत्मा जो 'त्वं' पदार्थ त्याचें सोपपत्तिक निरूपण केलें आहे. (दुसऱ्या व तिसऱ्या काण्डांतील विषयांचा विचार सातव्या व तेराव्या अध्यायाचे वेळीं करूं.)

पहिल्या षडध्यायींतील पहिला अध्याय उपोद्घातरूप आहे. दुसऱ्या अध्यायांत सर्व गीताशास्त्राचें सार सूत्ररूपानें वर्णिलें आहे तें असें:—'**योगस्थः कुरु कर्माणि**' (एकनिष्ठ चित्त करून कर्में कर) या ४८ व्या श्लोकांत चित्तशुद्धि उत्पन्न करणाऱ्या निष्कामकर्मनिष्ठेचें सूत्र आहे. म्हणजे या ४८ व्या श्लोकरूपी सूत्रावर निष्काम कर्मनिष्ठेचें सोपपत्तिक व्याख्यान तिसऱ्या व चवथ्या अध्यायांत आहे. तिसऱ्या अध्यायांत सामान्य स्वरूप आहे व चवथ्या अध्यायांत सत्त्वशुद्धिजनक निष्काम कर्मनिष्ठेचें विशेष स्वरूप आहे. '**विहाय कामान्यः सर्वान्**' (तिन्ही प्रकारच्या कामनांचा त्याग करून) या ७१ व्या श्लोकांत चित्तशुद्धि झालेल्या मुमुक्षूची शमदमादि साधनपूर्वक सर्वकर्मसंन्यासनिष्ठेचा पांचव्या व सहाव्या अध्यायांत सामान्य विशेष रूपानें प्रपंच केला आहे. याप्रमाणें पहिल्या कांडांतील तिसऱ्या चवथ्या व पांचव्या सहाव्या अध्यायांची सूत्रमालिका सांगितली. बाकीचा विचार पुढें करूं. याप्रमाणें 'तूं विशुद्धात्मा कोण आहेस' तुझा प्रपंच कसा नष्ट होईल, मुमुक्षु असशील तर निष्काम कर्माची व कर्म संन्यासाची कशी अपेक्षा आहे, निष्काम कर्म काय तें करून त्याही कर्माचा सर्वस्वी त्याग करणारा सोपाधिक आत्मा जो जीव त्याला मोक्षपदाची प्राप्ती करून घ्यावयाची

असल्यास आपण कोण आहों याची ओळख पटली पाहिजे, विषय मी नव्हे बुद्धीपासून तों इंद्रियांपर्यंत अनेक मानसिक वृत्तींपैकीं कोणतीही किंवा सर्व मी नव्हें अशी समजूत दृढ करण्यासाठीं प्रथमकांडाची योजना आहे. सारांश 'तत् त्वं असि' या महावाक्यांतील त्वं पदार्थाची उपपत्ति पहिल्या कांडांत केली आहे असा मधुसूदनीकार यांचा व बहुतेक सर्व अद्वैतवादी तत्त्वज्ञांचा अभिप्राय आहे.

माझ्या अल्प समजुतीप्रमाणें पहिल्या सहा अध्यायांत गीताशास्त्राच्या प्रकटन समयीं जे अनेक मोक्षमार्ग प्रचलित होते त्यांपैकीं सांख्य, योग, कर्म, उपासना वगैरे मार्गांचें परीक्षण व एकवाक्यता अथवा समीकरण आणि तत्त्वनिश्चय हे पहिल्या षडध्यायीचें कार्य आहे. असो; जेथें जेथें प्रचलित मार्गाचें परीक्षण आहेसें वाटतें तेथें तेथें मी नामनिर्देश करण्यास सुरुवात केलीच आहे. हा निर्देश होणें परमेश्वरी अनुभवावरच प्रायशः अवलंबून आहे. मानवी साधारण बुद्धि बिचारी किती धडपड करील!

८१, ६८.८

अथ तृतीयोऽध्यायः ।

शास्त्रस्य प्रवृत्तिनिवृत्तिविषयभूते द्वे बुद्धी भगवता निर्दिष्टे सांख्ये बुद्धिर्योगे बुद्धिरिति च । तत्र "प्रजहाति यदा कामान्" इत्यारभ्याऽध्यायपरिसमाप्तेः सांख्य-बुद्ध्याश्रितानां संन्यासं कर्तव्यमुक्त्वा तेषां तन्निष्ठतयैव च कृतार्थतोक्ता—"एषा ब्राह्मी स्थितिः" इति । अर्जुनाय च—"कर्मण्येवाधिकारस्ते" "मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि" इति कर्मैव कर्तव्यमुक्तवान्योगबुद्धिमाश्रित्य, न तत एव श्रेयःप्राप्तिमुक्तवान् ।

या गीताशास्त्रामध्यें दुसऱ्या अध्यायांत सांख्यबुद्धि व योगबुद्धि अथवा ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग, किंवा संन्यास आणि संसार, ह्या दोन मार्गांत उपयोगी पडणाऱ्या दोन सांख्यबुद्धि व योगबुद्धि भगवंतांनीं अर्जुनास सांगितल्या. 'सर्व इच्छा सोडून देऊन' [पहा अ० २ श्लो० ५५] येथपासून आरंभ करून थेट अध्याय समाप्त होईपर्यंत असें सांगितलें कीं सांख्यबुद्धीचा आश्रय करणारे ज्ञानी आहेत त्यांनींच संन्यास करणें योग्य आहे व संन्यास आणि परमार्थज्ञान ह्यांच्या योगानेंच ज्ञानी पुरुषांचा परमार्थ सिद्ध होतो. [पहा अ० २ श्लोक ७२] ही ज्ञानी पुरुषाची गोष्ट झाली. अर्जुनास मात्र 'तुझा कर्मच करण्याचा अधिकार आहे, कर्मत्याग करण्याचा नाहीं. [अ० २ श्लो० ४७] असें सांगितलें, सारांश योगबुद्धीचा* आश्रय करून तुला कर्म केलें पाहिजे इतकेंच सांगितलें आहे; कर्मापासून मोक्ष मिळेल असें सांगितलें नाहीं. [अ० २ श्लोक ४९]

---

* निर्विकारमनानें निष्काम कर्म करून तेंही परमेश्वरास अर्पण करावयाची जी बुद्धि तिला योगबुद्धि ह्मणतात.

तदेतदालक्ष्य पर्याकुलीभूतबुद्धिरर्जुन उवाच । कथं भक्ताय श्रेयोर्थिने यत्साक्षाच्छ्रेयःसाधनं सांख्यबुद्धिनिष्ठां श्रावयित्वा मां कर्मणि दृष्टानेकानर्थयुक्ते पारम्पर्येणाप्यनैकान्तिकश्रेयःप्राप्तिफले नियुञ्ज्यादिति युक्तः पर्याकुलीभावोऽर्जुनस्य । तदनुरूपश्च प्रश्नो ज्यायसी चेदित्यादिः । प्रश्नापाकरणवाक्यं च भगवतोक्तं यथोक्तविभागविषये शास्त्रे ।

आपल्यास मुक्तीचा मार्ग सांगितला नाहीं हें पाहून अर्जुनास चुटपुट आणि तळमळ लागली. अर्जुन ह्मणतोः ' देवा ! मी आपला भक्त आहे व मोक्षार्थी आहे हें खरेंना ? आपण मला सांख्यबुद्धीपासून साक्षात् उत्पन्न होणारें मोक्षाचें साधन तेंही सांगितलें ना ? पण शेवटीं आपण मला कर्म करावयास लावितां हें काय ? या कर्मापासून महा अनर्थ ओढवतात, असें सर्व लोकांप्रमाणें आपणही ह्मणतांना ? कर्मापासून चित्तशुद्धि, चित्तशुद्धीनें ज्ञान आणि ज्ञानानें मोक्ष इतका कर्मापासून मोक्षाचा पल्ला लांब आहे. त्यांतही कर्म केलें तर परंपरेनें कां होईना, पण मोक्ष मिळेल असें खास असतें तरी हरकत नव्हती. पण तसाही प्रकार नाहीं ! महाराज! मज दीनावर आपण अवकृपेची गदा कां घालितां बरें ? ' हा अर्जुनाला झालेला विषाद् त्याच्या दृष्टीनें खरा आहे व त्याच धोरणावर त्यानें ' कर्मापेक्षां बुद्धि थोर आहे असें जर आपल्यास विदित आहे ' वगैरे प्रश्न केला तो योग्यच आहे. त्या प्रश्नाचें निराकरण भगवंतांनीं केलें आहे तेंही गीताशास्त्रांत सांख्यनिष्ठा व त्यामुळें कृतार्थता ह्मणजे मोक्षप्राप्ति व कर्मनिष्ठा व तिच्या योगें चित्तशुद्धि (मोक्षप्राप्ति साक्षात् नाहीं.) असें जें दोन विभाग उपनिषदनुसार केलें आहेत, त्यास अनुसरूनच आहे.

केचित्त्वर्जुनस्य प्रश्नार्थमन्यथा कल्पयित्वा तत्प्रतिकूलं भगवतः प्रतिवचनं वर्णयन्ति, यथा चाऽऽत्मना संबन्धग्रन्थे गीतार्थो निरूपितस्तत्प्रतिकूलं चेह पुनः प्रश्नप्रतिवचनयोरर्थं निरूपयन्ति । कथं तत्र संबन्धग्रन्थे तावत्स-

वर्णाश्रमिणां ज्ञानकर्मणोः समुच्चयो गीताशास्त्रे निरूपितोऽर्थ इत्युक्तं पुनर्विशेषितं च ।यावज्जीवश्रुतिचोदितानि कर्माणि परित्यज्य केवलादेव ज्ञानान्मोक्षः प्राप्यत इत्येतदेकान्तेनैव प्रतिषिद्धमितीह त्वाश्रमविकल्पं दर्शयता यावज्जीवश्रुतिचोदितानामेव कर्मणां परित्याग उक्तः, तत्कथमीदृशं विरुद्धमर्थमर्जुनाय ब्रूयाद्भगवान्, श्रोता वा कथं विरुद्धमर्थमवधारयेत् ।

कांहीं वृत्तिकार तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकाचा अर्थ भलताच करून श्रीकृष्णांनीं जें उत्तर दिलें आहे त्याचाही प्रश्नाच्या उलट अर्थ करितात !

शिष्य—तो कसा ?

गुरु—ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं एकाच पुरुषाला साध्य असलीं पाहिजेत असा अर्जुनाचे प्रश्नाचा अर्थ करितात आणि भगवंताचें उत्तर ' ज्ञान आणि कर्म ' यांचा समुच्चय होणें शक्य नाहीं असा करून प्रश्न व उत्तर यांमध्यें आपणच विरोध दाखवितात ! इतकेंच करून हे वृत्तिकार राहते तरी कमी अनर्थाचें होतें. पण आमचे वृत्तिकार याच्याही पलीकडे जाऊन सबंध ग्रंथांतच एकंदरीनें विरोध आहे असा प्रकार उत्पन्न करितात !

शिष्य—तो काय ?

गुरु—अरे ! या वृत्तिकारांनीं गीतेचें सार ह्मणून जें प्रथमारंभीं व्याख्यान दिलें आहे त्यांत निरूपण केलें आहे त्याच्या उलट, ह्मणजे आपल्या सिद्धांताच्या उलट तिसऱ्या अध्यायांतील पहिल्या तीन चार श्लोकांचा यांनीं अर्थ केला आहे !

शिष्य—नाहीं, मी समजलों नाहीं.

गुरु—ह्मणजे असेंः प्रथम जी त्यानीं प्रस्तावना लिहिली तींत ते म्हणतात कीं या गीताशास्त्रामध्यें ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं यथाविधि झालीं तरच मोक्षप्राप्ति होईल—मग मनुष्य कोणत्याही आश्र-

मांतील असो. ज्ञान कर्माचा समुच्चय झाल्याविना ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी यांपैकीं कोणाचाही पुरुषार्थ सिद्ध होत नाहीं असा गीताशास्त्राचा मथितार्थ आहे हा यांचा सामान्य सिद्धांत आहे; पुनः विशेष आग्रहानें ते असें सांगतात कीं " 'यावज्जीव' या श्रुतीनें सांगितलेलीं कर्में न करितांही केवळ ज्ञानानें मात्र मोक्ष मिळतो " या मताचें तर गीताशास्त्रांत उत्कृष्ट खंडन आहे; आणि हेच आग्रही वृत्तिकार येथें ह्मणजे तिसऱ्या अध्यायांत मात्र निरनिराळे आश्रम दाखविणाऱ्या भगवंतांनीं 'यावज्जीव' या श्रुतीनें सांगितलेलीं कर्में मात्र ज्ञाननिष्ठांनीं सोडावीं, असें म्हणतात! कां? प्रथमच्या उपोद्घातांत गीताशास्त्रांत समुच्चयच सांगितला आहे, त्याला श्रुतीचें प्रमाण आहे वगैरे ठाम सिद्धांत सांगून तिसऱ्याच अध्यायांत ज्ञाननिष्ठांनीं कर्मत्याग करावा असा भगवद्वाक्यांचा अर्थ करणाऱ्या वृत्तिकारांच्या असंबद्ध वृत्तींमधील विरोध समजला कीं नाहीं?

शिष्य—विरोध समजला. पण भगवन्! मूळांतच विरोध असेल तर ह्या बिचाऱ्याचा काय बरें दोष? भगवंतांनीं सांगितलें त्याचप्रमाणें ह्यांनीं भाष्यें लिहिलीं असावीं.

गुरु—खुळा कुठला! भगवान् कधीं असंबद्ध प्रलाप करितील काय? सर्वज्ञ आणि सर्वांचें व विशेषतः अर्जुनाचें परम कल्याण करणारे भगवान विरोधी भाषणें करितील अशी कल्पना तरी तुझ्या डोक्यांत कोठून शिरली? खुळ्या! भगवंताचा अभिप्राय समजला नाहीं ह्मणून मात्र या बिचाऱ्या वृत्तिकारांची उलटी सुलटी धांदल झाली आहे झालें!

शिष्य—महाराज! भगवान विरुद्ध बोलणार नाहींत हें खरें; पण ऐकणाराच भगवंताच्या बोलण्याचा खरा अभिप्राय समजला असेलच असें कशावरून? ऐकणाराच भलतें समजला असेल तर त्याला वृत्तिकारांनीं काय करावें?

गुरु—अरे! श्रोता अर्जुन होता, अर्जुन बरें! अर्जुनाची बुद्धि प्रसिद्धच आहे. तो भगवंताच्या बोलण्याकडे सावधान चित्तानें लक्ष्य

देऊन बसला होता. त्याच्या मनांत रे! विरुद्ध अर्थ कसा येईल? तात्पर्य वृत्तीकारांना हें गीताशास्त्र समजलें नाहीं हें उघड झालें.

तत्रैतत्स्याद्गृहस्थानामेव श्रौतकर्मपरित्यागेन केवलादेव ज्ञानान्मोक्षः प्रतिषिध्यते न त्वाश्रमान्तराणामित्येतदपि पूर्वोत्तरविरुद्धमेव। कथं, सर्वाश्रमिणां ज्ञानकर्मणोः समुच्चयो गीताशास्त्रे निश्चितोऽर्थ इति प्रतिज्ञायेह कथं तद्विरुद्धं केवलादेव ज्ञानान्मोक्षं ब्रूयादाश्रमान्तराणाम्।

शिष्य—गुरुजी! मला वाटतें, वृत्तीकारांचा अभिप्राय असा असेल कीं फक्त गृहस्थांस मात्र श्रौतकर्में केल्याशिवाय नुसत्या ज्ञानानें मोक्ष मिळणें अशक्य आहे पण इतर आश्रमांतील पुरुषांस नुसत्या ज्ञानानें मोक्ष मिळणें संभवतें.

गुरु—तरी पण विरोधपरिहार होत नाहींच.

शिष्य—कां बरें?

गुरु—कां बरें काय? गीताशास्त्रांत चारी आश्रमांतील पुरुषांनीं ज्ञानकर्माचा समुच्चय केला पाहिजेच असा सिद्धांत दीर्घ कठरवानें सांगून येथें मात्र भगवंतांनीं गृहस्थांशिवाय इतरांस नुसत्या ज्ञानानें मोक्ष मिळेल ह्मणून सांगितलें काय? बेटंचा! हा विरोध नव्हे तर काय?

शिष्य—गुरुजी! अर्थ निश्चित व्हावा म्हणून मी शंका काढीत आहे. क्षमा असावी. महाराज! वृत्तिकारांचा अभिप्राय असा असावाः श्रौतकर्में अत्यंत महत्त्वाचीं म्हणून श्रौतकर्माशिवाय नुसत्या ज्ञानानें गृहस्थांस मोक्ष मिळावयाचा नाहीं.

अथ मतं श्रौतकर्मापेक्षयैतद्वचनं केवलादेव ज्ञानाच्छ्रौतकर्मरहिताद्गृहस्थानां मोक्षः प्रतिषिध्यत इति।

तत्र गृहस्थानां विद्यमानमपि स्मार्तं कर्माविद्यमानवदुपेक्ष्य ज्ञानादेव केवलादित्युच्यत इति। एतदपि विरुद्धम्। कथं, गृहस्थस्यैव स्मार्तकर्मणा समुच्चिताज्ज्ञाना-

न्मोक्षः प्रतिषिध्यते न त्वाश्रमान्तराणामिति कथं विवेकिभिः शक्यमवधारयितुम् ।

शिष्य—म्हणजे सारांश असा कीं केवळ ज्ञान याचा अर्थ श्रौतकर्मरहित ज्ञान असा केला व या श्रौतकर्मशून्य ज्ञानानें मात्र गृहस्थांस मोक्ष मिळणार नाहीं असें ठरविलें. केवलज्ञान यांत स्मार्तकर्मांचा ही आह्मी अंतर्भाव करितों. आतां गृहस्थांसही स्मार्तकर्म नाहीं असें नाहीं, पण तें अल्प असतें ह्मणून नाहींच असें समजून श्रौतकर्मशून्य ज्ञानानें मोक्ष मिळत नाहीं असें म्हटलें. तात्पर्य श्रौतकर्मांशिवाय केवळज्ञानानें म्हणजे स्मार्तकर्मसहित ब्रह्मज्ञानानें मात्र गृहस्थांस मोक्ष मिळणार नाहीं; इतर आश्रमांतील लोकांस मिळेल.

गुरु—अरे! तूं तरी बरींच लांब लांब व्याख्यानें झोडूं लागलास! काय म्हणतो आहेस तें पूर्ण ऐकण्यासाठीं मी तुला मध्यें थांबविलें नाहीं. असो; आपण जो हा प्रपंच केला आहेत याला कांहीं युक्ति, आधार, कांहीं विवेक असें कांहीं असावें कीं नाहीं ? केवलज्ञान याचा अर्थ स्मार्तकर्मसहित ब्रह्मज्ञान असा केलास त्याला कांहीं आधार ? बरें तेंही असो; पण गृहस्थाला तेवढा स्मार्तकर्मसहित ब्रह्मज्ञानानें मोक्ष नाहीं, बाकींच्या आश्रम्यांना आहे, यांत गृहस्थांनींच काय तुझें घोडें मारलें होतें कीं त्या बिचाऱ्यांवर श्रौतकर्मांची धोंड आणून टाकिलीस! वेड्या! युक्तीला रुचेल तें बोलावें हा नियम तरी ध्यानांत ठेवून बोलत जा. केवळ कर्ममार्गाचें हवें तसें समर्थन करून तें गृहस्थाच्या माथीं मारिलें म्हणजे वेदोक्त वचनें बोललास असें नाहीं होत बरें ! वेड्या हें तुझें बोलणें शहाण्या माणसांस क्षणभर तरी पसंत पडेल ?

किंच यदि मोक्षसाधनत्वेन स्मार्तानि कर्माण्यूर्ध्वरेतसां समुच्चीयन्ते तथा गृहस्थस्यापीष्यतां स्मार्तैरेव समुच्चयो न श्रौतैः । अथ श्रौतैः स्मार्तैश्च गृहस्थस्यैव समुच्चयो मोक्षायोर्ध्वरेतसां तु स्मार्तकर्ममात्रसमुच्चिताज्ज्ञानान्मोक्ष इति । तत्रैवं सति गृहस्थस्याऽऽयासबाहु-

त्याच्छ्रौतं स्मार्तं च बहुदुःखरूपं कर्म शिरस्यारोपितं स्यात्।

गुरु—पुनः असें कीं स्मार्तकर्में करित असतांही ब्रह्मज्ञान करून घेऊन गृहस्थांशिवाय बाकी सर्व ब्रह्मचारी वगैरे लोक मुक्त होऊं शकतात, तसाच नियम गृहस्थांस लागू करून त्यांची ही सुटका इतर लोकांप्रमाणेंच कां करून टाकीत नाहीं ?

शिष्य—भगवन्! तसें होणें शक्य नाहीं, कारण मग 'यावज्जीव' श्रुतीशीं विरोध येतो. म्हणून गृहस्थांस मोक्ष मिळविणें असेल तर त्यांनीं श्रौतस्मार्तकर्में करीत असतां ब्रह्मज्ञान संपादन केलें पाहिजे व ज्ञान झाल्यावरही श्रौतस्मार्तकर्में चालविलीं पाहिजेत. बाकीच्या ब्रह्मचारी वगैरे लोकांस मात्र स्मार्तकर्मासहित ब्रह्मज्ञानानें मोक्ष मिळेल.

गुरु—पण असें करण्यानें गृहस्थांच्या मात्र डोक्यांवर कर्माच्या अनेक यातायातींमुळें अनंत कष्ट देणारें श्रौतस्मार्तादिकांचें ओझें विनाकारण लादलें जातें त्याची काय वाट ?

अथ गृहस्थस्यैवाऽऽयासबाहुल्यकारणान्मोक्षः स्यान्नाऽऽश्रमान्तराणां श्रौतनित्यकर्मरहितत्वादिति। तदप्यसत्, सर्वोपनिषत्स्वितिहासपुराणयोगशास्त्रेषु च ज्ञानाङ्गत्वेन मुमुक्षोः सर्वकर्मसंन्यासविधानादाश्रमविकल्पसमुच्चयविधानाच्च श्रुतिस्मृत्योः।

शिष्य—महाराज ! हें पुष्कळसें आयास गृहस्थांस मात्र सोसावें लागतात म्हणून मोक्षसुख त्यांनाच कायतें मिळणार ! इतरांस नाहीं, कारण श्रौतानें सांगितलेलीं नित्यकर्में ते करीत नाहींत! असें समजलें तर.

गुरु—आतां मात्र कमाल केलीस. एक क्षणाच्या पूर्वीं इतर आश्रमांतील लोकांच्या मोक्षाची तूं व्यवस्था केलीस, आणि आतां असें बोलतोस ! शिवाय तुझीही वाचाळता व्यर्थ आहे. कारण सर्व उपनिषदें, भारतासारखें इतिहास, सर्व अठरान् अठरा पुराणें, योग वगैरे सर्व ठिकाणीं मुमुक्षूला केवळ ज्ञानानें मोक्ष मिळतो असें अनंत

वेळां सांगितलें आहे. तेथेंच त्यानें सर्व कर्मांचा त्याग केला पाहिजे असेंही सांगितलें आहे. शिवाय असेंही सांगितलें आहे कीं ब्रह्मचारी असतांनाच संसार नकोसा झाल्यास मुमुक्षूनें संन्यास घ्यावा. सारांश ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रास्थ्य अगर संन्यास अशा मार्गानें क्रमाक्रमानें जावें किंवा वाटेल त्या खऱ्या मुमुक्षूनें वाटेल तेव्हां वाटेल त्या आश्रमांत असतां कर्मत्याग करून संन्यास घ्यावा. सारांश गृहस्थाश्रम अवश्य आहे, श्रौतस्मार्तकर्में अवश्य आहेत असें सांगण्याचा कोणच्याच श्रुतिस्मृतीचा हेतु नाहीं.

सिद्धस्तर्हि सर्वाश्रमिणां ज्ञानकर्मणोः समुच्चयः। न, मुमुक्षोः सर्वकर्मसंन्यासविधानात् "व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति। तस्मात्संन्यासमेषां तपसामतिरिक्तमाहुः। न्यास एवात्यरेचयत्" इति। "न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः" इति च। "ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत्" इत्याद्याः।

"त्यज धर्ममधर्मं च उभे सत्यानृते त्यज।
उभे सत्यानृते त्यक्त्वा येन त्यजसि तत्त्यज ।
संसारमेव निःसारं दृष्ट्वा सारदिदृक्षया।
प्रव्रजन्त्यकृतोद्वाहाः परं वैराग्यमाश्रिताः"
इति बृहस्पतिः।

"कर्मणा बध्यते जन्तुर्विद्यया च विमुच्यते।
तस्मात्कर्म न कुर्वन्ति यतयः पारदर्शिनः"
इति शुकानुशासनम्।

इहापि—"सर्वकर्माणि मनसा संन्यस्य" इत्यादि। मोक्षस्य चाकार्यत्वान्मुमुक्षोः कर्मानर्थक्यम्।

शिष्य—तर मग ब्रह्मचारी वगैरे सर्व आश्रमांतील लोकांस ज्ञान आणि कर्म दोन्हीं अवश्य आहेत असें ठरलें. कारण श्रुतिस्मृती आपल्यास मान्य आहेत आणि श्रुतिस्मृतींनींच नित्य व नैमित्तिक कर्में सर्वांसही सांगितलीं आहेत!

गुरु—नाहीं; तूं चुकतोस. मुमुक्षूनें यच्चावत सर्व कर्मांचा संन्यास करावा असें स्पष्ट सांगितलें आहे. 'आशाशून्य झाल्यानंतर संन्यासाश्रमास योग्य असें भिक्षाटन ते लोक करितात. सत्य, यम, नियम, न्यास वगैरे अल्प फल देणाऱ्या तपश्चर्येपेक्षां संन्यासाचें फल अतीशय मोठें आहे असें सांगितलें आहे. ज्ञानद्वारा न्यास करणें हें सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे.' 'कर्म करून मोक्ष मिळाला नाहीं, प्रजोत्पादन करून मिळाला नाहीं, किंवा संपत्ति मिळवूनही मोक्ष मिळाला नाहीं, तर सर्व प्रकारचा त्याग केला, तेव्हां त्यांस मोक्ष मिळाला.' 'ब्रह्मचर्यामध्यें सुद्धां संन्यास घ्यावा' ह्या सर्व श्रुतींवरून तुला कळेल कीं मुमुक्षूला कोणतेंही कर्म करण्याची आवश्यकता नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यानें कोणतेंही कर्म करूं नये असा सर्वांचा अभिप्राय आहे. आणखी 'संसाराला उत्पन्न करणारे धर्म, अधर्म यांचा त्याग कर; सत्य, असत्य या उभयतांचा त्याग कर; आणि या सत्यासत्याचा त्याग केल्यावर ज्या अहंकाराच्या योगानें हा त्याग केलास त्या अहंकाराचाही त्याग कर.' तसेंच 'अनुभवपूर्वक विवेकदृष्टीनें संसार हा दुःखमूलक व दुःखफलक आहे असें पाहून अत्यंत विरक्त झालेले लोक लग्न न करितां एकदम संन्यास ग्रहण करितात' असें **बृहस्पति** सांगते झाले. आणि 'कर्माच्या योगानें प्राणी बद्ध होतो व ज्ञानाच्या योगानें मुक्त होतो. म्हणून परब्रह्माकडे ज्यांची दृष्टि लागली आहे, ते संन्यासी कर्मच करीत नाहींत. असें **शुकानुशासन** आहे. येथें **गीताशास्त्रामध्येंही** 'सर्व कर्में मनानें त्याज्य करून' [अ० ५ श्लोक १३] असेंच सांगितलें आहे. पुनः, मोक्षाला कर्मांचा कांहींच उपयोग नसल्यामुळें, उलट, कर्म केलें असतां, मोक्षनाश होण्याचा संभव असल्यामुळें मुमुक्षूला कर्म व कर्ममार्ग व्यर्थच आहेत.

नित्यानि प्रत्यवायप्रतिहारार्थमनुष्ठेयानीति चेत्, न, असंन्यासिविषयत्वात्प्रत्यवायप्राप्तेः। न ह्यग्निकार्याद्यकरणात्संन्यासिनः प्रत्यवायः कल्पयितुं शक्यो यथा

ब्रह्मचारिणामसंन्यासिनामपि कार्मिणाम् । न तावन्नित्यानां कर्मणामभावादेव भावरूपस्य प्रत्यवायस्योक्तिः कल्पयितुं शक्या "कथमसतः सज्जायेत" इत्यसतः सज्जन्मासंभवश्रुतेः ।

पूर्व०—येथपर्यंत आपले सिद्धांत कबूल आहेत. पण आपल्यास येवढेंच विचारावयाचें कीं नित्य कर्में केलींच पाहिजेत; नाहीं तर नरकप्राप्ति होते; असें स्मृति म्हणत आहेत त्याची काय वाट ?

सिद्धां०—अरे हीं कर्में केलीं नाहींत तर प्रत्यवाय कोणाला ? ज्याला तीं कर्में करावयास सांगितलीं आहेत त्यानें चुकविलीं तर त्याला दंड होईल; कां भलत्यालाही होईल ? कर्म करणें हा विषय असंन्यासी म्हणजे ब्रह्मचारी, गृहस्थ वगैरेंचा आहे. त्यांनीं हीं कर्में नाहीं केलीं तर त्यांना दंड होणें योग्य होईल. ज्यानें सर्वच कर्म टाकिलें व वासना नष्ट केली त्याला तुझी बिचारी स्मृति काय करणार ? पहाः होम, अध्ययन वगैरे संन्याशानें केलें नाहीं तर त्यानें केलेल्या पापाचा दंड करणारा कोणीं आहे अशी कल्पना सुद्धां करणें शक्य नाहीं. ब्रह्मचारी असून म्हणजे कर्ममार्गांत राहात असून त्यानें जर नित्य कर्म केलें नाहीं तर त्याला पाप लागेल. आणखी; नित्य अशीं जीं कर्में नाहींत तर, म्हणजे त्यांचा अभावच असेल तर त्या अभावापासून भावरूपी पापाची कशी उत्पत्ति होणार ? 'अभावापासून भाव, असतापासून सत्, कसें उत्पन्न होईल ? अशा अर्थाची एक श्रुतीच असें म्हणतेनां ?—सारांश देहाभिमान व कर्माभिमान असेल त्याला कर्म आहे. कर्मसंन्यास करणाऱ्याला कर्म करावयास सांगणें म्हणजे निरोगी पुरुषास औषधाची योजना करण्यासारखें अप्रयोजक होईल !

यदि विहिताकरणादसंभाव्यमपि प्रत्यवायं ब्रूयाद्वेदस्तदाऽनर्थकरो वेदोऽप्रमाणमित्युक्तं स्यात्, विहितस्य करणाकरणयोर्दुःखमात्रफलत्वात् । तथा च कारकं शास्त्रं

न ज्ञापकमित्यनुपपन्नार्थं कल्पितं स्यात्। न चैतदिष्टम्। तस्मान्न संन्यासिनां कर्माण्यतो ज्ञानकर्मणोः समुच्चयानुपपत्तिः । " ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिः " इत्यर्जुनस्य प्रश्नानुपपत्तेश्च ।

पूर्व०—पण वेदांमध्यें सांगितलें आहेना कीं विहित कर्में केलीं नाहींत तर पाप लागेल म्हणून ?

सिद्धां०—वेद असें म्हणत असतील तर ते अनर्थवाची आहेत, अप्रमाण आहेत, त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवूं नये, कारण ते असल्या असंभावी गोष्टींचें कथन करितात; असें आम्हीं बेधडक म्हणूं. असें पहा कीं वेदानें सांगितल्याप्रमाणें कर्म केलें तर जन्ममरण चुकत नाहीं, कर्म न केलें तर पाप लागतें; एवंच कर्म करा कीं नका करूं आपलें दुःख तुमच्यापुढें दत्त म्हणून उभें आहे, असें सांगणाऱ्या वेदाला कोण प्रमाण मानील ? पण वेदाचा खरा तात्पर्यार्थ तुम्हाला कळला आहे कोठें ?

पूर्व०—आमचाच अर्थ खरा आहे. पुनः, आमच्या वेदांमध्यें असें विलक्षण सामर्थ्य आहे कीं ज्या योगें असतापासून ते सत् उत्पन्न करूं शकतात म्हणजे कर्म केलें नाहीं तर त्यापासून पापाची उत्पत्ति करूं शकतात !

सिद्धां०—खुळा आहेस तूं ! अरे ! कोणतेंही शास्त्र म्हटलें म्हणजे त्याला नवीन गोष्टी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसतें. फक्त वस्तुस्थिति अशी अशी आहे असें मात्र शास्त्रें सांगतात. याच्या उलट कल्पना करणें म्हणजे ' सूर्य काळा ढुस्स आहे ' अशा विजातीय कल्पनेप्रमाणें असमंजस होय. अपौरुषेयवेदांच्या ठिकाणीं अशा तऱ्हेचा अर्थातच असमंजसत्वाचा आरोप करणें तुम्हांला व आम्हांस इष्ट नाहीं. असो; सारांश हा कीं वासनाशून्य संन्याशानें कर्म करावें असें कोणत्याही पद्धतीनें ठरवितां येणार नाहीं, कारण तसें करणें अशक्यच होय. म्हणून ज्ञान आणि कर्म यांचाही समु-

च्चय होणें अशक्य व अनिष्टच होय. पुनः ' कर्मापेक्षां बुद्धि (ज्ञान) श्रेष्ठ आहे असें जर तुझें मत असेल तर ' वगैरे अर्जुनाच्या प्रश्नाची वाट कशी लावावयाची ? ज्ञान आणि कर्म एक काळींच करून मोक्ष मिळीव असें भगवंतांनीं सांगितलें असतें तर अर्जुनानें हा असला प्रश्न कशाला विचारला असता ?

यदि हि भगवता द्वितीयेऽध्याये ज्ञानं कर्म च समुच्चयेन त्वयाऽनुष्ठेयमित्युक्तं स्यात्ततोऽर्जुनस्य प्रश्नोऽनुपपन्नो ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिरिति । अर्जुनाय चेद्बुद्धिकर्मणी त्वयाऽनुष्ठेये इत्युक्ते या कर्मणो ज्यायसी बुद्धिः साऽप्युक्तैवेति " तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव " इति प्रश्नो न कथंचनोपपद्यते । न चार्जुनस्यैव ज्यायसी बुद्धिर्नानुष्ठेयेति भगवतोक्तं पूर्वमिति कल्पयितुं युक्तं येन ज्यायसी चेदिति प्रश्नः स्यात् ।

सिद्धा०—जर दुसऱ्या अध्यायामध्यें भगवंतांनीं ' ज्ञान आणि कर्मांचा समुच्चय केलास तरच तुला मोक्षाचा मार्ग सांपडेल ' असें सांगितलें असेल तर 'आपल्या म्हणण्याप्रमाणें कर्मापेक्षां बुद्धि, (ज्ञान) श्रेष्ठ असेल तर ' वगैरे अर्जुनाच्या प्रश्नाची व्यवस्था लावितां येत नाहीं, तो व्यर्थ व असमंजस प्रश्न होतो. पुनः ' तुला दोन्हीं ज्ञान आणि कर्म यांचा आश्रय केला पाहिजे ' असें भगवंतांनीं सांगितलें असें समजावयाचें तर कर्मापेक्षां श्रेष्ठ जें ज्ञान तेंही अर्जुनास सांगितलेंच असलें पाहिजे. असें सर्व धरून चाललें तरी ' हे केशवा ! मला या घोर आणि हिंसामूलक कर्मामध्यें कां ढकलितोस ? ' या उपहासपूर्वक प्रश्नाचा उलगडा होत नाहीं तो नाहींच. आतां जर असें म्हणशील कीं ' बुद्धिच श्रेष्ठ, पण तिचा आश्रय तूं करूं नको. ' असें भगवंतांनीं अर्जुनास पूर्वींच सांगितलें आहे; तर तसेंही म्हणतां येत नाहीं. असें गृहीत धरिलें तर 'जर मोठी असेल तर' वगैरे प्रश्नाचा उलगडा होतो; पण भगवंतांनीं असें सांगितलें आहे, हें म्हणणेंच असमंजसपणाचें आहे.

यदि पुनरेकस्य पुरुषस्य ज्ञानकर्मणोर्विरोधाद्युगपदनुष्ठानं न संभवतीति भिन्नपुरुषानुष्ठेयत्वं भगवता पूर्वमुक्तं स्यात्ततोऽयं प्रश्न उपपन्नो ज्यायसी चेदित्यादिः। अविवेकतः प्रश्नकल्पनायामपि भिन्नपुरुषानुष्ठेयत्वेन भगवतः प्रतिवचनं नोपपद्यते। न चाज्ञाननिमित्तं भगवत्प्रतिवचनं कल्प्यम्। अस्माच्च भिन्नपुरुषानुष्ठेयत्वेन ज्ञानकर्मनिष्ठयोर्भगवतः प्रतिवचनदर्शनाज्ज्ञानकर्मणोः समुच्चयानुपपत्तिः। तस्मात्केवलादेव ज्ञानान्मोक्ष इत्येषोऽर्थो निश्चितो गीतासु सर्वोपनिषत्सु च। ज्ञानकर्मणोरेकं वद निश्चित्येति चैकविषयैव प्रार्थनाऽनुपपन्नोभयोः समुच्चयसंभवे। कुरु कर्मैव तस्मात्त्वमिति च ज्ञाननिष्ठासंभवमर्जुनस्यावधारणेन दर्शयिष्यति।

सिद्धां०—वरील मूर्खपणाची कल्पना टाकून देऊन जर आपण असें समजलों कीं अभेद मानणारें ज्ञान व भेद मानणारें कर्म हीं दोन्हीं परस्पर विरुद्ध साधनें एकाच पुरुषाच्या हातून होणें असंभवनीय आहे असें समजून भगवंतांनीं 'ज्ञानाची व कर्माची आराधना निरनिराळ्या माणसांनीं निरनिराळ्या पद्धतीनें केली पाहिजे,' असें सांगितलें आहे, असें आपण समजलों तर मात्र आपला समज खरा ठरून अर्जुनाचा प्रश्नही सार्थ आणि समंजस होतो. ज्ञानानें मोक्ष मिळतो, कर्मानें चित्त शुद्ध करून ज्ञानमार्गानें गेलें असतां मोक्ष मिळतो असें भगवंतांनीं सांगितलें आहे असें ध्यानांत ठेविलें तरच अर्जुनाच्या प्रश्नाचा गीताशास्त्रास अनुकूल असा उलगडा समंजस रीतीनें करितां येतो.

शिष्य—पण ज्ञान व कर्माचा समुच्चय झालाच पाहिजे असें ऐकूनही अर्जुनानें वेड्यासारखा प्रश्न कशावरून नसेल विचारला?

सिद्धां०—ठीक आहे. पण वेड्या भगवंताचें उत्तर काय आहे पाहिलें-सना? निरनिराळ्या पुरुषांनीं ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग यांचें अवलं-

बन केलें पाहिजे असेंच भगवंताचें उत्तर आहेना ? समुच्चय असावा हें भगवंतांस इष्ट असतें तर हें येथील उत्तर त्यांचें त्यांनाच विरोधी झालें असतें.

शिष्य—केला नसेल कशावरून भगवंतांनीं बोलण्यामध्यें विरोध ?

सिद्धांत—विरोधानें सर्वज्ञ भगवंतांच्या अंगीं अज्ञानाचा आरोप येतो ! व हा आरोप करणं कालत्रयींही संभवत नाहीं. सारांश कोणी ज्ञाननिष्ठेनें मोक्षप्राप्ति करून घ्यावी व कोणी कर्मनिष्ठेनें चित्तशुद्धि करून घेऊन मग मोक्षप्राप्ति करून घ्यावी हें भगवंतांनीं स्पष्ट सांगितलें आहे, त्यावरून ज्ञानकर्माचा समुच्चय होऊं शकत नाहीं असेंच स्पष्ट दिसतें. म्हणून सिद्धांत हा कीं केवळ शुद्ध असें अभेदस्वरूपी आत्मज्ञान झालें तरच मोक्ष मिळेल; हाच अर्थ निश्चित करून गीताशास्त्रामध्यें ग्रथित केला आहे. उपनिषदांचाही हाच सिद्धांत आहे. समुच्चय शक्यच असता तर ‘ दोहींपैकीं मी काय करूं तें एक ठरवून मला सांग. ’ [अ० ३ श्लोक २] असें अर्जुन म्हणताचना ! पण अर्जुन असें म्हणत आहे यांवरून समुच्चय शक्य नाहीं असें सिद्ध झालें.

पूर्व०—गीताशास्त्रांत समुच्चय नाहीं अशी माझी पूर्ण खात्री झाली महाराज !

सिद्धां०—आणि चवथ्या अध्यायाच्या पंधराव्या श्लोकांत ‘ म्हणून तूं कर्मच कर ’ असें जें अर्जुनास निश्चयानें सांगितलें आहे, त्याचा अर्थच हा कीं ज्ञाननिष्ठा अर्जुनाच्या हातून होणें शक्य नाहीं असें भगवंतास दाखवावयाचें होतें. सारांश कसेंही जरी पाहिलें तरी ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय गीताशास्त्रांत अगर इतर कोणत्याही शास्त्रांत होणें शक्यच नाहीं.

—ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय होतो कीं नाहीं म्हणजे यज्ञयागादि कर्म आणि ब्रह्मचिंतन हीं एका कालीं असूं शकतील कीं नाहीं याबद्दलचा हा सर्व वाद आहे. ज्ञानकाळीं कर्म असणें शक्य नाहीं व कर्म करीत असतां ब्रह्मज्ञान असणें शक्य नाहीं असें आचार्यांचें मत आहे. उपनिषदांत, गीतेंत वगैरे प्रायशः आचार्य म्हणतात तसेंच

सांगितलेलें आहे. युक्ति ही हेंच सांगेल. 'मीच ब्रह्म' 'ब्रह्म' 'कांहीं बोलतां न येणें' अशी निर्विषय स्थिति झाल्यावर 'मला अमुक पाहिजे, मी तमुक करीन' अशी साहंकार वासनामय स्थिति राहणार कशी? अपूर्णता आहे असें वाटत असलें म्हणजे किंवा अभेद नाहीं असें ध्यान असलें म्हणजे वासनापूर्वक कर्म होतें. पूर्ण स्थितींत साहंकार कर्म नसतें; आणि अर्थातच अपूर्ण स्थितींत ज्ञान नसतें. एवंच युक्तीला व स्वतःच्या अनुभवालाही आचार्यांचें म्हणणेंच सयुक्तिक दिसतें.—

अर्जुन उवाच—

ज्यायसी चेत्कर्मणस्ते
मता बुद्धिर्जनार्दन ॥
तत्किं कर्मणि घोरे मां
नियोजयसि केशव ॥ १ ॥

जनार्दन (आपल्या इच्छा सफल व्हाव्या म्हणून मनुष्यें ज्याची प्रार्थना करितात त्या तूं परमेश्वरा!) **कर्मणः** (कर्मापेक्षां) **ते** (तुला) **मता** (संमत असलेलें) **बुद्धिः** (ज्ञान) **ज्यायसी चेत्** (श्रेष्ठ असेल, श्रेष्ठ आहे) **केशव** (सर्वेश्वरा! दयाघन केशवा!) **तत्किं** (तर काय म्हणून) **मां** (मला) **घोरे कर्मणि** (ज्यांत क्रूरत्वाचीं कर्में करावीं लागणार अशा कर्मांत) **नियोजयसि** (युक्त करितोस, घालतोस?). सारांश हे अभीष्ट देणाऱ्या परमेश्वरा! जर आपल्या मतानें कर्मापेक्षां ज्ञान हेंच अत्यंत श्रेष्ठ आहे, तर हे दयाघना! मला आपण कर्मामध्यें आणि त्यांतही कामक्रोधादिकांचें उत्थापन करणाऱ्या निघृण कर्मांमध्यें-युद्धामध्यें—मला कां ढकलितां? मला हें घोर युद्ध करण्याचा का उपदेश करितां?—

ज्यायसी श्रेयसी चेद्यदि कर्मणः सकाशात्ते तव मताऽभिप्रेता बुद्धिर्ज्ञानं हे जनार्दन यदि बुद्धिकर्मणी

समुच्चिते इष्टे तदेकं श्रेयःसाधनमिति कर्मणो ज्यायसी बुद्धिरिति कर्मणोऽतिरिक्तकरणं बुद्धेरनुपपन्नमर्जुनेन कृतं स्यान्न हि तदेव तस्मात्फलतोऽतिरिक्तं स्यात्, तथा कर्मणः श्रेयस्करी भगवतोक्ता बुद्धिरश्रेयस्करं च कर्म कुर्विति मां प्रतिपादयति तत्किं नु कारणमिति भगवत उपालम्भमिव कुर्वंस्तत्किं कस्मात्कर्मणि घोरे क्रूरे हिंसालक्षणे मां नियोजयसि केशवेति च यदाह तच्च नोपपद्यते। अथ स्मार्तेनैव कर्मणा समुच्चयः सर्वेषां भगवतोक्तोऽर्जुनेन चावधारितश्चेत्तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसीत्यादि कथं युक्तं वचनम् ॥ १ ॥

हे जनार्दना ! कर्मापेक्षां आत्मज्ञान हें अत्यंत श्रेष्ठ आहे असें जर आपलें मत आहे, कर्मापेक्षां ज्ञानच श्रेष्ठत्वानें आपल्यास जास्त वाटत आहे.—

पूर्व०—गुरुजी ! अंमळ थांबा मला समुच्चय कां असूं नये हें चांगलें समजलें नाहींसें वाटतें.

गुरु—अरे ! हो, तेंच स्पष्टतर करण्यासाठीं आचार्य पुनः काय म्हणतात तें ऐकः जर ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं एकत्र असावीं असा भगवंताचा आशय असता व ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा ह्या दोन्ही एकाच पुरुषानें चालवाव्या असा भगवंताचा आशय आहे असें अर्जुन समजला असतां तर ' मोक्षमार्गाचें एकच साधन सांगा ' (श्लोक २ अध्या. ३) असें व ' कर्मापेक्षां बुद्धि श्रेष्ठ आहे ' असें याच श्लोकांत म्हणून बुद्धीचेंच श्रेष्ठत्व अर्जुनानें दाखविलें आहे तें उपपन्न होत नाहीं. त्यानें जें मागणें केलें तें वेड्यासारखें केलें आहे असें आपल्यास म्हणावें लागेल.

पू०—भगवन् यांत वेड्यासारखें काय झालें ?

गुरु—वेडेपणा नव्हे तर काय ? ज्ञान आणि कर्म यां दोहींवांचून मोक्ष मिळावयाचा नाहीं असा सिद्धांत समजावयाचा आणि

कर्मापेक्षां ज्ञान मोठें आहे असें म्हणावयाचें हा वेडेपणा नव्हे ?— नाहीं समजलास अजून ? अरे हळद आणि चुना यांचा संयोग केला असतां मात्र रवा होतो, तांबडा रंग होतो, असा धडा घोकावयाचा आणि 'मला रवा करावयाचा आहे, हळकुंड, नाहीं तर चुना द्या, किंवा चुनाच चांगला आहे, तेवढाच द्या' असें म्हणून नुसत्या चुन्यानें तांबडा रंग करूं पहावयाचें हा वडेपणा नव्हे काय ?— सारांश संयोगानें उत्पन्न होणाऱ्या फलापेक्षां संयोगास उपयोगी पडणारे पदार्थ मोठे असणें शक्य नाहीं, म्हणजे ज्ञान आणि कर्म यांच्या साहचर्यानें मात्र उत्पन्न होणाऱ्या मोक्षरूपी फलापेक्षां एकटें ज्ञानच श्रेष्ठ आहे असें जें तुझें म्हणणें आहे तें मूर्खत्वदर्शक होतें. सारांश समुच्चयच खरा आहे असें धरल्यास अर्जुनाचा प्रश्न वेडेपणाचा होतो.

पू०—महाराज! येवढ्यानेंच काय झालें आहे ?

गुरु—थांब, थांब. 'दयाघन केशवा! मला, आपल्या भक्ताला व मित्राला, आपण युद्धासारखें क्रूर कर्म करावयास कां सांगतां ?' असा अर्जुनानें जो प्रश्न विचारला आहे तो असा विचार करूनच विचारला आहे कीं भगवंतांनीं कर्मापेक्षां ज्ञानाची मातब्बरी जास्त ठरविली व मोक्ष न देणारे असें जें नीच कर्म तें करावयास मला सांगतात हा काय चमत्कार आहे ? सारांश उपालंभपूर्वक हा प्रश्न आहे. भगवंतास जिव्हाळीं लागणारा हा प्रश्न आहे. आतां समुच्चयच जर इष्ट असेल तर हा अर्जुनाचा छद्मी प्रश्न योग्य झाला असता काय ? तसेंच आणखी असें पहा कीं श्रौतकर्में सोडून दिलीं व स्मार्तकर्में व ज्ञान हीं एकत्र झालीं तरच मोक्ष मिळेल असें भगवान बोलले व अर्जुन समजला असें तुझें म्हणणें असेल तर 'घोर कर्म करावयाला कां सांगतोस ?' असा अर्जुनाचा स्मृतिविहित कर्माविषयीचा निंदासूचक प्रश्न सयुक्तिक आहे असें कसें बरें म्हणतां येईल ? सारांश समुच्चय सर्वथा इष्ट नाहीं.

मधुसूदनीकार, द्विवेदी, पर्वते, चतरजीः हे टीकाकार

आचार्यांप्रमाणेंच अर्थ करितात. पण ते असा एक विशेष काढतात कीं दुसऱ्या अध्यायामध्यें कर्म आणि बुद्धि यांचा विचार झाला आहे त्यांत कर्म हें ज्ञानाचें एक साधन आहे, व ज्ञान हेंच कायतें एकच साध्य आहे असा स्पष्ट उल्लेख झाला नाहीं; आणि ज्ञानानें मोक्ष मिळतो व कर्मानें संसार पाठीमागें लागतो, तसेंच निष्काम कर्म केलें म्हणजे इष्ट कार्य होतें असें मात्र सांगितलें आहे. यावरून सहज साध्य जें ज्ञान तें न सांगतां कष्टसाध्य आणि प्रायः दुःखपर्यवसायी कर्म करावयास, भगवान, युद्धपराङ्मुख जो मी त्या मला, सांगतात हें ऐकून अर्जुन विव्हळ झाला व त्यानें प्रस्तुतचा प्रश्न विचारला. तात्पर्य ज्ञान आणि कर्म हे मार्ग अधिकाराप्रमाणें अनुसरावयाचे आहेत, ही गोष्ट अर्जुन विसरला! **वामन**पंडितही असेंच म्हणतातः—वाटेल त्यानें वाटेल तो मार्ग पत्करावा अशी अर्जुनाची भ्रामक समजूत होती. निष्काम कर्म केलें तर मात्र चित्तशुद्धि होऊन ज्ञानमार्ग सांपडतो हें मुख्य तत्त्व बिचारा अर्जुन विसरला! असो; यावरून ज्ञान आणि कर्म हीं एकदम साध्य नाहींत, किंवा नुसत्या कर्मानें मोक्ष मिळत नाहीं, चित्तशुद्धि करणारें कर्म केल्यावांचून ज्ञान मिळत नाहीं, व ज्ञान झाल्यावर कर्म नाहीं, ह्या गोष्टी वाचकमुमुक्षूंच्या हृदयांत पूर्णपणें बिंबाव्या असाच अर्जुनाच्या प्रश्नाचा इत्यर्थ घेऊन आपण तात्पर्य समजून घ्यावें. बुद्धि, चैतन्य, अहंप्रत्ययज्ञान असा 'बुद्धि' शब्दाचा गीताशास्त्रांत सर्वत्र अर्थ आहे असें **चतरजी** म्हणतात.

श्रीधरः—मोक्ष देते म्हणून बुद्धि मोठी आहे. ज्ञानाची स्तुति व कर्माचीही स्तुति ऐकल्यामुळें अर्जुन घोटाळला असें **प्रपाकार** म्हणतात. **शंकराः**—"विरक्तः प्रव्रजेद्धीमान्सरक्तस्तु गृहे वसेत्। प्रवृत्तिलक्षणं कर्म ज्ञानं संन्यासलक्षणम्" (वैराग्य झालें त्यानें संन्यास घ्यावा आणि संसारप्रीति ज्याला आहे त्यानें घरीं बसावें. कर्म करण्याची इच्छा असणाऱ्यानें कर्म करावें, संसाराला विटून कर्म टाकून दिलें त्यानें ज्ञानार्जन करावें. सारांश ज्याचे मनोविकार प्रबल आहेत त्यानें कर्म करावें व ज्याचे विकार वासनेसकट मृत झाले

त्यानें संन्यास घ्यावा हा मथितार्थ आहे.) प्राण गेल्यानंतर देहाला होणाऱ्या सुखदुःखाची जशी जीवाला खबर नसते, त्याप्रमाणें प्राण असतांनाही ज्याला सुखदुःखाची खबर लागत नाहीं त्यानें संन्यास घ्यावा ह्या अर्थी **शंकरानंदांनीं** दिलेला श्लोक वैराग्याचा उत्कृष्ट परीक्षक आहे. अनधिकाऱ्यांनीं कर्म करावें व ज्ञान आणि कर्म यांमधील विशेष स्पष्टतर व्हावा म्हणून तिसऱ्या अध्यायाची योजना आहे असें हे स्वामी म्हणतात.

रामानुजः–' तिसऱ्यापासून सहाव्या अध्यायाच्या शेवटपर्यंत प्रपंचाचें, कर्माचें साधनत्व आणि प्रत्यगात्म्याचें दर्शन यांचा विचार केलेला आहे.' अर्जुनाच्या प्रश्नाची मीमांसा पहाः ज्ञाननिष्ठा हें जर आत्मावलोकनाचें साधन आहे, कर्मनिष्ठेनें जर ज्ञाननिष्ठा उत्पन्न होते, मनाची, इंद्रियांची उपरति करण्याचें कर्म करूनच जर ज्ञाननिष्ठा मिळवावयाची आहे, व आत्मावलोकन साध्य करून घ्यावयाचें आहे तर 'मला **कर्मनिवृत्तिपूर्वक** ज्ञाननिष्ठा करायला सांगायचें सोडून देऊन आत्मावलोकनाचा संभव नाहींसा करणारें घोर कर्म करावयास आपण मला कां सांगतां ? '

मध्वादिद्वैतवाद्यांचाही रामानुजांप्रमाणेंच अर्थ व प्रश्नमीमांसा आहेत. " 'मेलास तर स्वर्ग मिळेल' वगैरे फलदायी कर्म करावयास सांगून मला मोक्षापासून दूर कां ढकलिता ? मला यतिधर्म सांगा, कर्म आणि त्यांतूनही घोर कर्म करावयास सांगूं नका "

ज्ञानेश्वरः–....तें म्या निकें परिसिलें । कृपानिधी ॥ तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां । ऐसें मत तुझें श्रीअनंता । निश्चित जरी ॥ (कर्ताही नाहीं आणि कर्मही नाहीं असें जर तुझें मत आहे) तरी मातें केवीं श्रीहरी । म्हणसी ' पार्था ! संग्राम करी ! ' । इथें (ह्या) लाजसी ना (लाज वाटत नाहीं !) महा घोरीं । कर्मी सुतां (घालितांना ?) ॥ अशाच अर्थाच्या पुढें २ ओव्या आहेत.

पंडितः—कर्म नीच, ज्ञान थोर, । तथापि माझें कर्म (नशीब, प्राक्तन) अत्यंत घोर । कां करूं सांगसी कर्म क्रूर ? । जनार्दना ! ॥

....अगत्य स्वधर्मे तरावें। म्हणूनि हें घोर कर्मही करावें। तरी त्याहूनि कोटिगुण वैभवें। तूंच म्हणसी ज्ञान थोर ! ॥ त्या ज्ञानाचा आश्रय। करीन ऐसा हा निश्चय। धरूनि, म्हणतों ज्ञान अद्वय। तरेन त्यानें मी आजि ॥ येथें अर्जुनानें 'केशव' असें भगवंतास म्हटलें आहे, त्याचा इतकाच अर्थ कीं नित्य कर्मे केलीं नाहींत तर जो सामान्य देवतांचा कोप होतो त्याला निवारण्याचें सामर्थ्य भगवंतास आहे.

व्यामिश्रेणेव वाक्येन
बुद्धिं मोहयसीव मे ॥
तदेकं वद निश्चित्य
येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥

व्यामिश्रेण इव (अनिश्चित्, अस्पष्ट, घोटाळ्याचें असें, वाटणाऱ्या) **वाक्येन** (वाक्यानें) **मे** (माझी) **बुद्धिं** (बुद्धि, अंतःकरण) **मोहयसि इव** (मोहूनच टाकित आहेस जणु कांहीं !) **तत्** (म्हणून) **निश्चित्य** (निश्चय करून, ठरवून) **एकं वद** (एकच गोष्ट मला सांग) **येन** (जिच्या योगानें) **अहं** (मी) **श्रेयः** (मोक्षाला) **आप्नुयाम्** (मिळवीन.) सारांश हे भगवंता ! आपल्या अस्पष्टशा भासणाऱ्या वाक्यांनीं, शब्दांनीं, माझ्या अंतःकरणाचा घोटाळा होऊन गेलेला आहे. म्हणून आपणास विनंति करितों कीं आपण निश्चयात्मक अशा शब्दांनीं मला एकच मार्ग असा सांगावा कीं ज्याच्या योगानें माझें उत्तम कल्याण होईल, (पहा श्लो. ३१ अ. १) मला मोक्ष मिळेल.—

व्यामिश्रेणेति। व्यामिश्रेणेव यद्यपि विविक्ताभिधायी भगवांस्तथाऽपि मम मन्दबुद्धेर्व्यामिश्रमिव भगवद्वाक्यं प्रतिभाति। तेन मम बुद्धिं मोहयसीव, मम बुद्धि-व्यामो-

हापनयाय हि प्रवृत्तस्त्वं तु कथं मोहयस्यतो ब्रवीमि बुद्धिं मोहयसीव मे ममेति। त्वं तु भिन्नकर्तृकयोर्ज्ञानकर्मणोरेक-पुरुषानुष्ठानासंभवं यदि मन्यसे तत्रैवं सति तत्तयोरेकं बुद्धिं कर्म वेदमेवार्जुनस्य योग्यं बुद्धिशक्त्यवस्थानुरूप-मिति निश्चित्य वद ब्रूहि येन ज्ञानेन कर्मणा वाऽ-न्यतरेण श्रेयोऽहमाप्नुयां प्राप्नुयाम्। यदि हि कर्मनि-ष्ठायां गुणभूतमपि ज्ञानं भगवतोक्तं स्यात्तत्कथं तयोरेकं वदेत्येकविषयैवार्जुनस्य शुश्रूषा स्यात्। न हि भगवतो-क्तमन्यतरदेव ज्ञानकर्मणोर्वक्ष्यामि नैव द्वयमिति। येनो-भयप्राप्त्यसंभवमात्मनो मन्यमान एकमेव प्रार्थयेत् ॥२॥

श्रीकृष्णा! आपण आपल्याकडून अर्थ स्पष्ट होईल व मला कळेल असें बोलतां, तसेंच आतांही बोललां असाल, पण माझी ग्राहकशक्ति अति अल्प असल्यामुळें, मी मंदबुद्धीचा असल्यामुळें, आपलें बोलणें मला अस्पष्ट व घोटाळ्यांत घालणारें आहे, असा भास होतो. 'तूं कर्मच कर,' असें आपण म्हणतां [पहा अ. २ श्लोक ४७] व 'ज्ञानमार्गाला शरण जा' [अ. २ श्लो. ४९] असेंही आपणच सांगतां. या अशा परस्परविरोधी वाक्यांनीं माझ्या अंतः-करणाचा घोटाळा झाल्यासारखें झालें आहे. मला काय करावें तें सुचेना हें पाहून माझा भ्रम दूर करण्यासाठीं आपण मला उपदेश करण्यास सुरुवात केली आहे, आणि मला तर भ्रम पडत आहे! म्हणून म्हणतों, आपण मला भ्रांति घालण्यासाठींच जणूं काय बोलत आहांत असें मला वाटतें. असो; आतां जर आपल्यास असें वाटत असेल कीं निरनिराळ्या पुरुषांनीं करावयास योग्य अशीं ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं एकाच पुरुषाच्या हातून एककालींच होणें शक्य नाहीं, तर त्या दोहोंपैकीं एक, ज्ञान किंवा कर्म, जें काय मला योग्य असेल, माझ्या बुद्धीला, शक्तीला व अवस्थेला या सर्वांना योग्य असेल, तें एक निश्चित करून मला सांगावें. माझें ज्ञान किती, माझें

सामर्थ्य काय, माझी परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे ह्या सगळ्यांचा विचार करून मला करावयास योग्य असें ज्ञान किंवा कर्म काय असेल तें ठरवावें व मला सांगावें. मग तें ज्ञान असो, किंवा कर्म असो. माझा इष्टहेतु साध्य झाला, मला साक्षात् किंवा परंपरेनें मोक्ष मिळाला म्हणजे झालें, मग तो कोणत्याही साधनानें मिळो.

शिष्य—गुरुमहाराज ! अर्जुनानें ज्ञान आणि कर्म यांच्या समुच्चयालाच एक कशावरून नाहीं म्हटलें ?

गुरु—आतां मात्र तूं झोंप घ्यायला लागलास आँ ! अरे ! 'कर्मापेक्षां ज्ञान श्रेष्ठ असेल तर' असें अर्जुनानें आतांच विचारलें आहेना ? आतां कदाचित् कल्पनेचे तारे तोडून विचारशील कीं कदाचित् कर्मनिष्ठेमध्यें अंतर्भूत होणारें, कर्मनिष्ठेला गौणत्वानें असणारें ज्ञानच भगवान् कशावरून नाहीं बोलले ? तर बाबा ! कर्मामध्यें ज्ञानाचा समावेश होत नाहीं असें 'कर्म **किंवा** ज्ञान, यांपैकीं कोणतें तरी **एक** सांगा' या विनंतीवरूनच स्पष्ट होत नाहीं काय ? कर्मांतच ज्ञानाचा अंतर्भाव होत असता तर 'त्यां उभयतांतले **एक** मला ऐकूं दे' असें अर्जुनानें कशाला म्हटलें असतें ?

शिष्य—'एकच विचार' असें भगवंताच्या मुद्रेवरून अर्जुनानें ताडिलें असेल !

गुरु—तूं माझ्यापाशींच शंका काढीत आहेस म्हणून बरें आहे. असो; ज्ञान व कर्म या जोडीपैकीं एक सांगेन, दोन्ही सांगणार नाहीं, असें भगवान केव्हांही साक्षात् बोलले नाहींत आणि शिवाय अर्जुनावर त्यांचें प्रेम अत्यंत तेव्हां मिळण्यासारखा मार्ग एक किंवा दोन्हीं त्याला सांगण्यास भगवंतांनीं मागें पुढें पाहिलें नसतें. सारांश दोन्हीं मार्ग सांगावयाची भगवंताची तयारी होती. तेव्हां 'दोन्ही मार्गांचें खरें ज्ञान संपादन करण्याचा संभव नाहीं म्हणून आपण एकच मागूं या' असें समजून अर्जुनानें एक मार्ग मला सांगा असें म्हटलें ही कल्पनाही संभवत नाहीं. सारांश ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग हे निरनिराळे स्वतंत्र मार्ग आहेत, त्यांचे अधिकारी निराळे

असतात, तेव्हां अधिकार ठरवून मला कोणता तो एक मार्ग सांगा अशी अर्जुनाची प्रार्थना आहे. येथें समुच्चय किंवा प्रधानगौण हा प्रश्नच नाहीं.

मधु०, द्विवेदी, श्रीधर, प्रपा० शंकरा०, पर्वते वगैरे अद्वैतवादी आचार्यांप्रमाणेंच अर्थ करितात.

मधुसूदनीकारांनीं स्पष्ट म्हटलें आहे.

" भाष्यकारमतसारदर्शिना ग्रन्थमात्रमिह योज्यते मया ॥
आशयो भगवतः प्रकाश्यते केवलं स्ववचसो विशुद्धये " ॥

' भाष्यकार जे आचार्य त्यांच्या मताचें तात्पर्य पाहूनच मी हा ग्रंथ विशद करण्यास सुरुवात केली आहे. भगवंतांचा आशय जो मी सांगत आहे, त्यांत कांहीं मी स्वतः विशेष उत्पन्न करून सांगत आहे, असें नाहीं, तर केवळ वाणीची शुद्धता व्हावी म्हणून हा माझा प्रयत्न आहे. आचार्यांपेक्षां कोणी जास्त अर्थ काढील याची शंकाच नको हा भाव !

वल्ल०—मोहयसि ' इव ' (जसें कांहीं) हा शब्द घालण्याचा हेतु इतकाच कीं साक्षात् भगवान समोर उभे असतां ' भ्रांति झाल्यासारखें वाटतें ' असें अर्जुनास म्हणावयाचें आहे. भ्रांतिनाशकासमक्ष भ्रांति होणें हा भयंकर विरोध अगर मोठा चमत्कार होय ! ' एकं '= मोक्ष देणारें, भक्तिप्रतिपादक. ' दोहोंतून एक ' असा आचार्यांनीं अर्थ केला आहे तो यांस संमत नाहीं.

रामा०—मोक्ष देणाऱ्या ज्ञाननिष्ठेशीं अत्यंत विरुद्ध व विकारांस प्रज्वलित करणारें कर्म करावयास आपण मला सांगत आहां ! ' एकं = ' अमिश्ररूप, शुद्ध, केवळ ज्ञान, किंवा केवळ कर्म.

मध्व वगैरे राघवेंद्रयतिसह द्वैतवादीः—एकदा कर्माची स्तुति व एकदा ज्ञानाची स्तुति ऐकून माझ्या मनाचा घोंटाळा झाला आहे. तसेंच ज्ञानानें मोक्ष मिळतो व कर्मानेंही मिळतो असें असेल तर युद्धासारख्या कामक्रोधादि विकारांस जागृत करणाऱ्या क्रूर कर्मांमध्यें मला, आपल्या मित्राला, आपल्या निःसीम भक्ताला हे भगवन्

आपण कां ढकलीत आहांत ? कामक्रोधांस वश झालेले प्राणी नरकवासच भोगतात ना ? असो; ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं सारख्याच योग्यतेचीं आहेत, असा अर्जुनाचा समज झाला आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांचें या श्लोकावरील व्याख्यान फारच मधुर आहे, म्हणून त्यांतील बराच भाग सहृदय वाचकासाठीं येथें घेतों. देवानें मोह घातला आहे असें वाटून अर्जुन म्हणतोः—वैद्य पथ्य वारूनि (सांगून) जाये । मग जरी आपणचि विष सूये (तो वैद्य विष घालील !) । तरी योगिया कैसेनि जिये ? (कसा जिवंत राहील ?) । सांगे मज ॥ जैसें आंधळें सुईजे आव्हांटा (आड वाटेला घालवावें) । कां माजवण (माजविणारा कैफ) दीजे मर्कटा । तैसा उपदेश गोमटा । वोढवला (प्राप्त झाला) आम्हा ! ॥ मला मोह झाला म्हणून तुला उपदेश विचारला आणिः—तंव तुझी एकेक नवाई (नवल, मजा) । एथ उपदेशामाजी गोवाई (गुंतागुंत, गोंधळ,) । तरी अनुसरलिया (शरण आलेल्या भक्ताला) काई । ऐसें कीजे ? ॥ .... म्हणोनि आइके देवा ! । हा भावार्थ आतां न बोलावा । मज विवेक सांगावा । मऱ्हाटाज़ी ! (मराठी भाषेंत, स्पष्ट भाषेंत मला आपण खरा विचार सांगावा. ज्ञानेश्वराचे वेळीं तरी संस्कृत भाषा पंडितांच्या मात्र सेवेस खाशी लागली होती व सामान्य जनास उपदेश करावयाचा असल्यास तो मराठी भाषेंत करावा लागे हें स्पष्ट दिसत आहे.) असो; .... मीं अत्यंत जड असे । परि ऐसाही निकें (चांगलें) परियेसें । श्रीकृष्णा ! बोलावें तुवां ऐसें । एक निष्ठ ॥ देखें रोगातें जिणावें (जिंकावें) । औषध तरी देयावें । परि तें अतिरुच्य (रुचकर) व्हावें । मधुर जैसें ॥ तैसें सकळार्थ भरित । तत्त्व सांगावें तरी उचित । परी बोधे माझे चित्त । जयापरी (ज्यानें माझ्या मंद बुद्धीवर ही प्रकाश पडेल !) ॥ .... पुढें परमेश्वराची स्तुति केली आहे तीही वाचण्यासारखी आहे.

पंडित म्हणतातः—जरी माता घाली बाळासि विष । आणि विषरूप होय पीयूष । तरी मोहकत्व दोष लागे तुज ! ॥ सूर्य मंडळी

धारा। जरी घडे अंधकारा। तरी या दोषाचा वारा। लागे तुज ॥ कीं या स्थावर जंगमा। जाळूं लागे चंद्रमा। तरी हा दोष पुरुषोत्तमा!। लागे तुज ॥ २ ॥

प्रश्नानुरूपमेव प्रतिवचनम्—

अर्जुनानें प्रश्न केला त्याचेंच योग्य उत्तर भगवान देतातः—

श्रीभगवानुवाच—

> लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा
> पुरा प्रोक्ता मयाऽनघ।
> ज्ञानयोगेन सांख्यानां
> कर्मयोगेण योगिनाम् ॥ ३ ॥

श्री भगवान म्हणालेः—

अनघ (निष्पापी अर्जुना ! कोणताही सदुपदेश घेण्यास योग्य असणाऱ्या अर्जुना !) **मया** (सर्वज्ञ जो मी त्यानें, मी,) **अस्मिन् लोके** (ह्या लोकांमध्येंच) **द्विविधा** (दोन प्रकारची) **निष्ठा** (भक्ति, दोन प्रकारचे मार्ग) **पुरा** (सृष्टीच्या प्रारंभींच) **प्रोक्ता** (स्पष्ट करून सांगितल्या आहेत.) **सांख्यानां** (वेदांतवाक्यांवरून ज्याचें ज्ञान निश्चित झालें आहे अशा लोकांचा मार्ग.) **ज्ञानयोगेन** (ज्ञान हेंच परब्रह्माशीं ज्या योगानें सलग्न होतें तो योग. त्यानें–) **योगिनाम्** (शुद्धांतःकरण करणाऱ्या योग्यांचा–मार्ग) **कर्मयोगेण** (कर्म हेंच अंतःकरणशुद्धीसाठीं योजिलें जातें ज्यानें असा हा दोन प्रकारचा मार्ग आहे. सारांश सृष्टीच्या आरंभींच मीं असें स्पष्ट करून सांगितलें आहे कीं ह्या लोकांतील मुमुक्षूंस मोक्ष मिळविणें असेल तर दोन प्रकारांपैकीं एका निष्ठेचा आश्रय केला पाहिजे. ज्या निर्मळ चित्ताच्या लोकांस वेदांतमहावाक्यांच्या

श्रवण, मनन, निदिध्यासानें ब्रह्मस्वरूपाचें आकलन झालें आहे त्यांनीं ज्ञानमार्गानें जावें व ज्या लोकांचें अंतःकरण निर्विषय झालें नाहीं, त्यांनीं कर्मयोगाचा अवलंब करावा. ज्ञान व कर्म एक नाहींत, एका योग्यतेचे नाहींत हें सांगण्याचा येथें उद्देश आहे.

श्रीभगवानुवाच—लोकेऽस्मिन्निति । लोकेऽस्मिञ्शास्त्रानुष्ठानाधिकृतानां त्रैवार्णिकानां द्विविधा द्विप्रकारा निष्ठा स्थितिरनुष्ठेयतात्पर्यं पुरा पूर्वं सर्गादौ प्रजाः सृष्ट्वा तासामभ्युदयनिःश्रेयसप्राप्तिसाधनं वेदार्थसंप्रदायमाविष्कुर्वता प्रोक्ता मया सर्वज्ञेनेश्वरेण हेऽनघापाप ।

श्रीभगवान म्हणतातः—हे पापशून्य अर्जुना! ह्या लोकांत शास्त्रप्रमाणें कर्म किंवा ज्ञानसंपादन करण्याचा ज्यांस अधिकार आहे असे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य लोकांनीं आपापल्या योग्यतेनुसार दोन प्रकारांनीं पुरुषार्थ साध्य करून घेण्याचें साधन करावें असें मीं सांगितलें आहे.

अर्जुन—केव्हां सांगितलें हें आपण?

भगवान—अरे! ज्या वेळेला ही त्रिविध सृष्टि उत्पन्न करून तेथें प्रजा निर्माण केली, त्याच वेळेस सर्वज्ञ व सर्वसत्ताधीश असा जो वेदरूपी ईश्वर त्या मी ह्या साक्षात् मोक्ष देणाऱ्या व परंपरेनें मोक्ष देणाऱ्या मार्गाचें स्पष्टीकरण करून सांगितलें आहे. ज्या प्रजा उत्पन्न केल्या त्याचें ऐहिक व पारलौकिक कल्याण व्हावें एतदर्थ निर्माण केलेलें उत्कृष्ट साधन जो वेदप्रणीत संप्रदाय तो प्रकट करितांनाच योग्यतेनुसार दोन प्रकारची निष्ठा ती सांगितली आहे बरें!

तत्र का सा द्विविधा निष्ठेत्याह—तत्र ज्ञानयोगेन ज्ञानमेव योगस्तेन सांख्यानामात्मानात्मविषयविवेकज्ञानवतां ब्रह्मचर्याश्रमादेव कृतसंन्यासानां वेदांतविज्ञानसुनिश्चितार्थानां परमहंसपरिव्राजकानां ब्रह्मण्येवावस्थितानां निष्ठा प्रोक्ता । कर्मयोगेण कर्मैव योगः कर्मयोगस्तेन कर्मयोगेण

योगिनां कर्मिणां निष्ठा प्रोक्तेत्यर्थः । यदि चैकेन पुरुषेणैकस्मै पुरुषार्थाय ज्ञानं कर्म च समुच्चित्यानुष्ठेयं भगवतेष्ठमुक्तं वक्ष्यमाणं वा गीतासु वेदेषु चोक्तं कथमिहार्जुनायोपसन्नाय प्रियाय विशिष्टभिन्नपुरुषकर्तृके एव ज्ञानकर्मनिष्ठे ब्रूयात् ।

अर्जुन—भगवन्! हे दोन प्रकार कोणते ?

भगवान—ऐकः ज्यांनीं आत्मा कोणता व अनात्मक काय आहे. याबद्दल विचार करून तारतम्यानें कायमचे सिद्धांत ज्ञानपूर्वक ठरवून ठेविले आहेत, ज्यांनीं ब्रह्मचर्याश्रमापासूनच विषयाचा त्याग करून संन्यासाश्रम ग्रहण केला आहे, ज्यांनीं वेदांतांतील महावाक्यांचा अर्थ स्वानुभवपूर्वक सिद्ध केला आहे, ज्यांनीं परमहंस परिव्राजकांची दीक्षा घेतली आहे, सारांश जे ब्रह्मामध्येंच राहतात, ब्रह्ममयच जे बनून गेले आहेत, त्यांच्यासाठीं ज्ञानयोग [ज्ञान हाच योग, ज्ञान म्हणजेच ब्रह्मज्ञान होय असें ज्यानें समजतें तो योग] स्पष्टतऱ्हेनें सांगितला आहे, व ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें नाहीं, ज्यांची वासना नष्ट झाली नाहीं, परंतु ज्यांस मोक्ष हवासा वाटत आहे, त्यांच्यासाठीं कर्मयोग (कर्म हाच योग, ज्याच्या योगानें अंतःकरणशुद्धि होऊन मन निर्विषय व वासनाशून्य होतें, तो निष्काम असा श्रौत स्मार्तविधि करण्याचा योग) सांगितला आहे. समजलास ? शुद्धांतःकरण ज्याचें झालें त्याला ज्ञानयोग आणि चित्त शुद्ध झालें नाहीं त्याला कर्मयोग असा हा भेद आहे ज्ञानयोग आणि कर्मयोग एका योग्यतेचे नाहींत आणि म्हणून ' मला कर्म करायला न सांगतां ज्ञानमार्गच सांगा ' अशी तुझी विनंति व्यर्थ आहे. तुझें चित्त अद्यापि वासनाशून्य झालें नाहीं, मी कर्ता, भोक्ता वगैरे विकार अद्यापि नष्ट झाले नाहींत, म्हणून तुला तुझ्या वर्णास व आश्रमास योग्य असा कर्मयोग तुला केला पाहिजे. निष्काम कर्म करून ' चित्तशुद्धि झाली ' गुरुकृपेनें वेदांत श्रवणानें व ईश्वरी अनुग्रहानें

तूं ज्ञानी झालास म्हणजे मग तूं ज्ञानमार्गाला योग्य होशील. ज्ञान व कर्म एकाच योग्यतेचीं आहेत असें समजलास ही तुझी चुकी होय.

पूर्वः—गुरुजी ! पण भगवंतास ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय इष्ट नव्हता असें कशावरून ? आचार्यांनीं आपल्या मतास अनुकूल असा अर्थ केला आहे हें ठीक आहे, पण भगवंतांचाही हाच आशय होता असें कोठें आहे ?

सिद्धां—अरे ! भल्या गृहस्था ! पुरुषार्थ सिद्धी होण्यासाठीं, मोक्ष मिळवावयाला ज्ञान व कर्म ह्यां दोन्हींचें अनुष्ठान केलें पाहिजे असा जर भगवंतांचा आशय असता, जर कोठें गीताशास्त्रांत त्यांस असें सांगावयाचें असतें, किंवा उपनिषदांत कोठें असें सांगितलेलें असतें, तर भल्या चिकित्सका ! त्यांनीं आपल्या भगिनीचा पति, आपल्याजवळ नेहमीं राहणारा, आपला उत्तम स्नेही जो अर्जुन त्याला एका शब्दानें तरी ' निरनिराळ्या अधिकाराच्या पुरुषांनीं करावयास योग्य असें ज्ञानसहित कर्म म्हणजे कर्मसहित ज्ञान हेंच तूं कर ' असें सांगते कीं नाहीं ? अर्जुनासारख्या एकनिष्ठ भक्ताला व निष्कपट स्नेह्याला जर समुच्चय सांगितला नाहीं, तर तो इष्ट नाहीं, साध्य नाहीं व संभवनीय नाहीं असाच भगवंतांचा व श्रुतींचा अभिप्राय असला पाहिजे.

यदि पुनरर्जुनो ज्ञानं कर्म च द्वयं श्रुत्वा स्वयमेवा-नुष्ठास्यत्यन्येषां तु भिन्नपुरुषानुष्ठेयतां वक्ष्यामीति मतं भगवतः कल्प्येत तदा रागद्वेषवानप्रमाणभूतो भगवा-न्कल्पितः स्यात् । तच्चायुक्तम् । तस्मात्कयाऽपि युक्त्या न समुच्चयो ज्ञानकर्मणोः । यदर्जुनेनोक्तं कर्मणो ज्या-यस्त्वं बुद्धेस्तच्च स्थितमनिराकरणात् । तस्याश्च ज्ञान-निष्ठायाः संन्यासिनामेवानुष्ठेयत्वं भिन्नपुरुषानुष्ठेयत्वव-चनाच्च भगवत एवमेवानुमतमिति गम्यते ॥ ३ ॥

पूर्व०—मला वाटतें कीं भगवंतांनीं ज्ञान व कर्म हीं वेगळालीं

आहेत असें जें येथें सांगितल्यासारखें दिसतें,—व तीं वेगळीं नाहींत असें कोठेंही प्रमाणभूत ग्रंथांत सांगितलें नाहीं,—याचें तात्पर्य इतकेंच कीं **इतर लोकांनीं** ज्ञान आणि कर्म हीं निरनिराळीं आहेत असें समजावें; बाकी आपला स्नेही अर्जुन जवळच होता, त्याला मात्र एकांतांत ' ज्ञानकर्मांचा समुच्चय तूं मात्र स्वतः कर ' असें सांगितलें असावें. खरें कीं नाहीं गुरुमहाराज !

सिद्धा०—अगदीं विचार केल्याखेरीज तूं बोलतो आहेस हें ! तूं म्हणतोस अशी जर क्षणमात्र कल्पना केली तर ' हा माझा, तो माझा नव्हे ' असला पक्षपाती व क्रोधलोभविकारदर्शी परमेश्वर संसारांत पडला असें म्हणावें लागेलना ? असल्या कपटपटु परमेश्वराचें वाक्य केव्हांही प्रमाणभूत व्हावयाचें नाहीं. ' हा माझा लाडका, ' ' तो नाहीं, ' असें परमेश्वराच्या बोलण्यांत येणें व कृतींत निघणें शक्यच नाहीं. म्हणून तुझी शंका व्यर्थ आहे. तात्पर्य कोणतीही युक्ति लढविलीस तरी ज्ञान आणि कर्म हीं एके ठिकाणीं असूं शकणार नाहींत. आतां ' बुद्धि ही कर्मापेक्षां श्रेष्ठ आहे, ' असें अर्जुन म्हणाला तें म्हणणें तसेंच राहिलें आहे; त्याचें खंडन भगवंतांनीं केलें नाहीं हें खरें. पण ज्ञानाचे व कर्माचे अधिकारी निरनिराळे असतात असें सांगितलें आहे यावरून ज्ञानमार्गाचा अवलंब संन्याशांनींच करावा असें भगवंतांचें मत दिसतें. म्हणून अर्जुनानें आपल्या मनाशींच गांठ घातली असेल कीं भगवंतानें आपल्यास कर्ममार्गच सांगितला आहे.

मधु० व **श्रीधर, पर्वते, द्विवेदी** व **चतरजी** यांचा हाच अभिप्राय आहे. मोक्षास मार्ग एकच आणि तो ज्ञानमार्ग होय. कर्ममार्गानें ज्ञानाची तयारी होते म्हणून ज्ञान व कर्म हीं एका योग्यतेचीं नाहींत. ज्ञान हें प्रधान आहे. कर्म गौण होय; म्हणून ' ज्ञान संपादूं कां कर्म करूं ? ' असा विकल्पमूलक प्रश्न योग्य नाहीं. कर्मानें चित्त कसें शुद्ध होतें तें ४ तें १६ श्लोकांत सांगितलें आहे. कर्म आणि उपासना हीं ज्ञानाचीं साधनें होत. **प्रपा०**—' लोक '=मुमुक्षु.

शंकरा० "तमेवैकं विजानथ" "नानुध्यायाद्बहूञ्शब्दान्वाचो विग्लापनं हि तत्" (त्या एकट्याला ब्रह्माला, जाणा, पुष्कळसे शब्द उत्पन्न करून घटपटादि खटपट योग्य नाहीं. फार शब्द बोलणें म्हणजे वाणीस व्यर्थ शिणविणें होय.) योगी = गृहस्थाश्रमी. यांचे कर्म पहाः '**अहरहः स्नात्वा संध्यामुपासीत**' (प्रत्यहीं स्नान करून संध्यावंदन करावें) '**वसन्ते ब्राह्मणोऽग्नीनादधीत**' (वसंत ऋतूंमध्यें ब्राह्मणानें अग्निप्रतिष्ठापन करावें) '**सत्यं वद, धर्मं चर**' (खरें बोल, धर्मानुसार वाग) वगैरे कर्म मंत्र सांगतात.

रामा०—'लोके' = निरनिराळ्या प्रकारचे अधिकारी असतात अशा सृष्टीमध्यें. 'पुरा' = मागच्या अध्यायांत. 'प्रोक्ता' = स्पष्टपणानें कथन केलें आहे. निष्कामकर्मानें परमेश्वराचें आराधन करून चित्तशुद्धि संपादन केलेले सत्पुरुष मात्र ज्ञानमार्गास अधिकारी होतात. तूं वासनापूर्ण आहेस म्हणून कर्माधिकारीच आहेस. 'सांख्य' = आत्मा हाच ज्याच्या बुद्धीचा विषय आहे असे. योगी = विषयांनीं व्याकुल होते ज्यांचें मन असे संसारी. म्हणून मागील अध्यायांत विरोध नाहीं. ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं सारख्याच योग्यतेचीं आहेत म्हणून मी वाटेल तो मार्ग स्वीकारीन असें तूं समजलास ही तुझी चुकी होय.

द्वैतवादी—'ज्ञानयोग = जेथें ज्ञानच पुष्कळ असून कर्म हें फारच अल्प असतें. सनकादिक ज्ञानी ईश्वरभक्ति कारितात; यावरून ज्ञानी पुरुषासही कर्म अवश्य आहे हें सिद्ध होतें! कर्मयोगांत कर्म पुष्कळ आणि ज्ञान अल्प असतें. जनक, प्रियव्रत वगैरे कर्ममार्गांत राहूनही ज्ञानी झाले! सारांश ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय असल्याशिवाय मोक्ष नाहीं. तात्पर्य कर्माचा क्षय कधींही होत नाहीं.'—जोंपर्यंत भेदबुद्धि कायम आहे, तोंपर्यंत कर्मक्षय होत नाहीं हें ह्मणणें ठीकच आहे; पण अभेदभाव होऊन पूर्णत्व प्राप्त झाल्यावर कर्म उरतें हा आग्रह होय. पूर्णज्ञान झाल्यावर नैष्कर्म्य असतें हा वेदांतीसिद्धांत कायमचा आहे.

ज्ञानेश्वरः—हे मार्ग (कर्म व ज्ञान योग) तरी दोन्ही । पर एकवटती निदानीं । जैशी सिद्धसाध्य भोजनीं । तृप्ति एक ॥ कां पूर्वापर (पूर्ववाहिनी व पश्चिमवाहिनी) सरिता । भिन्न दिसती वाहता । मग सिंधु मिळणी ऐक्यता । पावती शेखीं ॥ तैसीं दोन्हींही मतें । सुचिति (सांगति) एका कारणातें । परि उपास्ति (उपासना, निष्ठा, योग) ते, योग्यते । आधीन असे ॥ देखे उत्प्लवनासरिसा (उडाल्या बरोबर) । पक्षी फळासि झोंबे जैसा । सांगे नर केवि तैसा । पावे वेगें ? ॥ एकदम फळाशीं जाऊन झगटणारा पक्षी व हळु-हळू पण निश्चयानें चालून शेवटीं फलास्वाद घेणारा मनुष्य या दृष्टां-तानें ज्ञानेश्वरांनीं सांख्य आणि कर्म यांतील विशेष किती चातुर्यानें प्रकट केला आहे हा !

रंगनाथांचे ' ज्ञान्यास कर्म नको ' यावरील एक दोन दृष्टांत पहाः—........नेत्र असतां घटपटादि दिसे । त्यांसि कां वळसे स्नाना-दिकांचे ? ॥ घट प्रकाशावया कारणें । एक शुद्ध नेत्रचि पाहिजे सर्व गुणें । परि नेत्र आणि शौच, स्नान, होम करणें ! । तरीच पाहणें घटास स्वयें ? ॥ अहो ! निद्रा लागावया कारणें । हिंडणें नलगे गा ! रानोरानें । तैसें ब्रह्मसुख निर्व्यापारपणें । तेथ कर्म करणें । कर्म काह्यां (कशाला ?) ॥

डेविस् साहेब सांख्यशब्दानें ' कपिल सांख्य, प्रधानकारणवादी सांख्यमत ' समजतात हें अर्थातच भ्रमात्मक आहे. ॥ ३ ॥

मां च बन्धकारणे कर्मण्येव नियोजयसीति विषण्णमनसमर्जुनं कर्म नाऽऽरभ इत्येवं मन्वानमालक्ष्याऽऽह भगवान्—न कर्मणामनारम्भादिति । अथ वा ज्ञानकर्मनिष्ठयोः परस्परविरोधादेकेन पुरुषेण युगपदनुष्ठातुमशक्यत्वे सतीतरेतरानपेक्षयोरेव पुरुषार्थहेतुत्वे प्राप्ते कर्मनिष्ठाया ज्ञाननिष्ठाप्राप्तिहेतुत्वेन पुरुषार्थहेतुत्वं न स्वातन्त्र्येण, ज्ञाननिष्ठा तु कर्मनिष्ठोपायलब्धात्मिका सती स्वातन्त्र्येण पुरुषार्थहेतुरन्यानपेक्षेत्येतमर्थं प्रदर्शयिष्यन्नाह भगवान्—

अर्जुन—आणि परमेश्वरा ! मला मात्र आपण या नीच व बंध उत्पन्न करणाऱ्या श्रमदायक कर्मामध्यें गुंतवून टाकित आहांत ! हर ! हर !! काय माझें दुर्दैव हें ? असो; मी कर्मच करावयाचा नाहीं म्हणजे झालें !

भगवा०—हा खुळ्या अर्जुना ! अरे असें खिन्न व्हायला काय झालें ? माझें म्हणणें तुला अद्यापि समजलें नाहीं, म्हणून तूं असा बावरल्यासारखा झाला आहेस 'कर्माला आरंभ केल्याखेरीज नैष्कर्म्य सिद्धि होत नाहीं ' ह्या श्लोकांत मी जें तत्त्व सांगणार आहे तें नीट समजून घे. त्याचप्रमाणें तुला पुनः एकवार सांगतों कीं ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा हे दोन्ही मार्ग परस्पर विरोधी आहेत. 'मीं दोन्ही मार्गांचा एकदम अवलंब करीन ' असें एखाद्या पुरुषानें म्हटलें तर त्याला तसें करितां यावयाचें नाहीं. ज्या कोणाला पुरुषार्थाचा म्हणजे मोक्षाचा लाभ करून घ्यावयाचा असेल त्यानें ज्ञानामध्यें कर्माची किंवा कर्मामध्यें ज्ञानाची भेसळ न करितां स्वतःच्या योग्यतेनुसार अनुरूप मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

अर्जुन—म्हणजे ज्ञानमार्गानें मुक्ति मिळते व कर्ममार्गानेंही मिळते, असें झालें. आतां कर्ममार्ग जास्त दगदगीचा व ज्ञानहीन आहे म्हणून सहज साध्य होणारा जो ज्ञानमार्ग त्याचेंच मी अवलंबन करितों म्हणजे झालें.

भगवा०—अद्यापि तुला उमज पडला नाहीं. कर्मनिष्ठा हा एक मुक्ति मिळविण्याचा मार्ग आहे, याचा अर्थ असा कीं निर्मळ मनानें व निर्लोभ बुद्धीनें कर्मयोग यथासांग परमेश्वर कृपेनें सिद्धीस गेला असतां ज्ञानमार्गाचा लाभ होतो. कर्ममार्गाला मुक्ति देण्याचें स्वतंत्र सामर्थ्य नाहीं. ज्ञानमार्ग सांपडून देणारा कर्ममार्ग आहे कर्ममार्ग संपला व तो यथासांग सिद्ध झाला म्हणजे ज्ञानमार्गाची प्राप्ति होते. सारांश ज्ञानमार्गानें मात्र मोक्ष मिळतो, अन्यमार्गानें मिळत नाहीं. ज्ञानमार्गाची प्राप्ति कर्मानें होते. मोक्ष देण्यास एकटा ज्ञानमार्गच काय तो समर्थ आहे. ज्ञानमार्ग हा मुख्य पुरुषार्थ आहे.

कर्म हें एक साधन आहे. त्यानें ज्ञानमार्ग सिद्ध झाला म्हणजे मोक्ष मिळतो. एवंच नुसत्या कर्मानें मोक्ष मिळत नाहीं, ज्ञान व कर्म यांचा समुच्चय होणें शक्य नाहीं; ज्ञानानें मोक्ष मिळतो, पण तें ज्ञान योग्य कर्माचरणानें मात्र आपल्यास प्राप्त होतें. दोरीचें ज्ञान झाल्यावर ज्याप्रमाणें सर्पाचे ज्ञानाची आवश्यकता नसते, त्याप्रमाणेंच पूर्ण ज्ञान झाल्यावर कर्मांची अपेक्षा राहत नाहीं हें नीट समजण्यासाठीं पुढील श्लोकाचें रहस्य पूर्णपणें अवगत करून घेः—

न कर्मणामनारम्भा-
न्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ॥
न च संन्यसनादेव
सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥

कर्मणां (कर्मांच्या) **अनारम्भात्** (अनारंभानें, कर्में करण्याला आरंभच केला नाहीं तर) **नैष्कर्म्यं** (कर्मशून्यता) **पुरुषः न अश्नुते** (पुरुषाला मिळत नाहीं). सारांश अनधिकारीमनुष्यानें कर्मच करावयाचें तेवढें सोडून दिलें म्हणजे तो कर्मशून्य होतो, असें नाहीं च (आणि) **संन्यसनात् एव** (कर्मत्याग तेवढा नुसता केला म्हणजेच) **सिद्धिं** (इष्टकार्याची, मोक्षाची, प्राप्ति) **न समधिगच्छति** (होते असें ही नाहीं.)—सारांश नुसता कर्मत्याग केला म्हणजे मुक्ति मिळते असेंही नाहीं.

न कर्मणामनारम्भादप्रारम्भात्कर्मणां क्रियाणां यज्ञादीनामिह जन्मनि जन्मान्तरे वाऽनुष्ठितानामुपात्तदुरितक्षयहेतुत्वेन सत्त्वशुद्धिकारणानां तत्कारणत्वेन च ज्ञानोत्पत्तिद्वारेण ज्ञाननिष्ठाहेतूनां
" ज्ञानमुत्पद्यते पुंसां क्षयात्पापस्य कर्मणः ।
यथाऽऽदर्शतलप्रख्ये पश्यत्यात्मानमात्मनि "

इत्यादिस्मरणादनारम्भादननुष्ठानान्नैष्कर्म्यं निष्कर्मभावं कर्मशून्यतां ज्ञानयोगेन निष्ठां निष्क्रियात्मस्वरूपेणैवावस्थानमिति यावत्, पुरुषो नाश्नुते न प्राप्नोतीत्यर्थः ।

स्नानसंध्या, यज्ञयागादिक नित्य व नैमित्तिक कर्मोला आरंभ झाल्याखेरीज कर्मशून्यता प्राप्त व्हावयाची नाहीं.

शिष्य—महाराज ! एका जन्मामध्यें हीं सर्व कर्में कशीं होणार ?

गुरुजी—अरे ! ह्या किंवा पूर्वजन्मीं सुद्धां केलेलीं सत्कर्में आपल्या हातून जीं काय पातकें झालीं असतील त्यांचा नाश करण्यास समर्थ होतात. सत्कर्में परमेश्वर चरणीं अर्पण केल्यानें पापवासना व फलाशा ह्या दोन्हीं अमंगलांचा नाश होत असतो; व चित्त निर्मळ होतें. चित्तशुद्धि झाली तरच—अन्यथा नाहीं— ज्ञानमार्गाचा शोध लागून ज्ञानही प्राप्त होतें. सारांश ज्ञानमार्गाचा लाभ करून देणाऱ्या चित्तशुद्धीची उत्पत्ति, पापक्षय करणाऱ्या परमेश्वरार्पितसत्कर्माचरणानें होते. समजलास ? म्हटलें आहे:—" पापमूलक कर्मांचा नाश झाल्यानंतर मात्र ज्ञानाचा उदय होतो. उघड आहे कीं आरसा स्वच्छ झाल्यानंतर मात्र ज्याप्रमाणें आपलें स्वरूप यथास्थित रीतीनें आपल्यास दृग्गोचर होतें, त्याचप्रमाणें कर्मरूपी उपाधिशून्य झालेल्या आत्मारामास मात्र आपल्या स्वरूपाचें म्हणजे ब्रह्माचें ज्ञान होतें, अथवा ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार होऊन अद्वैतज्ञान होतें. " अशा अनेक स्मृति आणखी सांगतां येतील असो; तेव्हां जन्मजन्मांतरींच्या पापांचा क्षय झाला पाहिजे. हा क्षय परमेश्वरार्पित सत्कर्मांनीं मात्र व्हावयाचा आहे. एवंच कर्म करूनच नैष्कर्म्य मिळवून घ्यावयाचें आहे.

कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं नाश्नुत इति वचनात्तद्विपर्ययात्तेषामारम्भान्नैष्कर्म्यमश्नुत इति गम्यते । कस्मात्पुनः कारणात्कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं नाश्नुत इति । उच्यते, कर्मारम्भस्यैव नैष्कर्म्योपायत्वात् । न ह्युपायमन्तरेणोपे-

यप्राप्तिरस्ति । कर्मयोगोपायत्वं च नैष्कर्म्यलक्षणस्य ज्ञानयोगस्य श्रुताविह च प्रतिपादनात् । श्रुतौ तावत्प्रकृतस्याऽऽत्मलोकस्य वेद्यस्य वेदनोपायत्वेन "तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन" इत्यादिना कर्मयोगस्य ज्ञानयोगोपायत्वं प्रतिपादितम् ।

इहापि च–"संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः"
"योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये"
"यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्"
इत्यादि प्रतिपादयिष्यति ।

शिष्य—गुरुजी ! कर्म करून नैष्कर्म्य संपादावयाचें हें विरोधात्मक आहे.

गुरुजी—यांत परमार्थदृष्टीनें विरोध नाहीं. आपण जें काय करतों, आपल्या हातून जें काय होतें, तें सर्व परमेश्वरच करित असतो, असा निश्चय होऊन अहंकारबुद्धि सर्वथा नष्ट झाली व भोग भोगणाराही मी नव्हे तेव्हां मला कर्मफलाची आशा करण्याचें कारण नाहीं, असें निर्लोभ मन झालें म्हणजे आपल्या हातून झालेलीं कर्में नैष्कर्म्य स्वरूपींच होतात. ही नैष्कर्म्यसिद्धि, म्हणजे ज्ञाननिष्ठा किंवा निष्क्रिय असें जें आपलें शुद्ध स्वरूप त्याची प्राप्ति होय. पण ही प्राप्ति कर्तव्यकर्म न केल्यानें होत नाहीं; तर चित्तशोधक नित्य नैमित्तिक कर्तव्यकर्मांच्या निर्लोभ आचरणानें मात्र प्राप्त होते. अतएव तुझ्यासारख्या मलिनचित्ताच्या पुरुषानें कर्मच करावयाचें टाकून दिलें तर त्यास मोक्ष मिळण्याला अवश्य लागणारें नैष्कर्म्य साध्य व्हावयाचें नाहीं.

शिष्य—भगवन् ! 'कर्माला आरंभ करून तीं सिद्धीस नेल्याशिवाय नैष्कर्म्य स्थिति प्राप्त व्हावयाची नाहीं' याचा अर्थ कर्माचरणानें नैष्कर्म्यसिद्धि होते, असाचना ?

गुरुजी—होय हाच आहे अर्थ. मग तुझें म्हणणें काय आहे ?

शिष्य—म्हणणें मिळून इतकेंच कीं हा विषय सरळ रीतीनें सांगावयाचें सोडून देऊन भगवंतांनीं इतका द्राविडी प्राणायाम कशाला केला ? कर्मानें नैष्कर्म्य प्राप्त होतें, असें कां सांगितलें नाहीं ? कर्माचरणाशिवाय नैष्कर्म्य प्राप्त होत नाहीं असें वेड्यावांकड्या पद्धतीनें कां सांगितलें ?

गुरुजी—याचा हेतु इतकाच आहे कीं '**फलेच्छारहित कर्माचरणाशिवाय** नैष्कर्म्य मिळविण्याला **दुसरा मार्गच नाहीं**' हें स्पष्ट रीतीनें अर्जुनास कळावें. कर्म करावें किंवा दुसरें कांहीं करावें असा विकल्प अर्जुनाच्या मनांत कदाचित् उत्पन्न होईल, त्याचा समूळ बिमोड करण्यासाठीं हा आवश्यक द्राविडी प्राणायाम भगवंतांनीं केला आहे. कर्म हाच एक उपाय कर्मशून्यता प्राप्त करून देणारा आहे. आणि या उपायाची आराधना केल्याखेरीज उपेय वस्तु (इष्ट गोष्ट) मिळावयाची नाहीं. समजलास ? कर्मशून्यता हें लक्षण ज्या ज्ञाननिष्ठेचें ती निष्ठा कर्माशिवाय लब्ध व्हावयाची नाहीं, असा सिद्धांत उपनिषदामध्यें व या गीताशास्त्रांत इतर ठिकाणीं, अनेक वेळीं प्रकट केला आहे. जाणून घेण्याच्या गोष्टींमध्यें अत्यंत व सर्वांशी प्रमुख जो आत्मलोक अथवा मोक्ष तो जाणून घेण्यास यज्ञयागादिक नित्यनैमित्तिक कर्तव्यांचें सम्यगाचरण हाच आहे असें ब्रह्मविचार करितांना श्रुतीनें सांगितलें आहे. ' वेदांचें पठन करून व तदनुसार यज्ञाचें आचरण करून ब्रह्मजिज्ञासु लोक ब्रह्म जाणण्याचा प्रयत्न करितात.' असें श्रुति म्हणते. यावरून ज्ञानयोग साध्य करून घेण्याला कर्म साधन आहे. असाच अर्थ निष्पन्न होतो. ' कर्माचरण केल्याशिवाय म्हणजे योगमार्गानें गेल्याशिवाय संन्यासाचा अधिकार प्राप्त होणें अत्यंत कष्टप्रद आहे ' (अ० ५ श्लो. ६.) ' चित्तशुद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं योगी लोक विहित कर्माचें आचरण करितात. ' (अ० ५ श्लो. ११) ' बुद्धिमान लोकांचें चित्त पावन करण्यास यज्ञ, दान व तपाचरण हीं साधनें आहेत. (अ० १८ श्लोक ५.) या प्रमाणें गीताशास्त्रांतही भगवान प्रतिपादन करितील.

ननु च-' अभयं सर्वभूतेभ्यो दत्त्वा नैष्कर्म्यमाचरेत्' इत्यादौ कर्तव्यकर्मसंन्यासादपि नैष्कर्म्यप्राप्तिं दर्शयति लोके च कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यमिति प्रसिद्धतरमतश्च नैष्कर्म्यार्थिनः किं कर्मारम्भेणेति प्राप्तमत आह—न च संन्यसनादेवेति। नापि संन्यसनादेव केवलात्कर्मपरित्यागमात्रादेव ज्ञानरहितात्सिद्धिं नैष्कर्म्यलक्षणां ज्ञानयोगेन निष्ठां समधिगच्छति न प्राप्नोति॥४॥

शिष्य—महाराज! 'सर्व भूतांस अभयप्रदान देऊन आपण निष्कर्म व्हावें' या व असल्या अर्थाच्या अनेक वाक्यांवरून 'कर्तव्यकर्मांचा त्याग केला तरी सुद्धां नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त होते' असेंच सिद्ध होतें. ह्याचप्रमाणें व्यवहारांतही असेंच प्रसिद्ध आहे कीं कर्म सोडलें म्हणजे कर्मशून्यता प्राप्त होते. तेव्हां गुरुजी! नैष्कर्म्य मागणारा जो अर्जुन त्याला भगवंतांनीं 'कर्मारंभ केल्याविना गति नाहीं' असें सांगितलें याचा अर्थ काय?

गुरुजी—ठीकच आहे. या तुझ्या सारख्यांच्या शंकेचें निवारण व्हावें म्हणूनच भगवान श्लोकाच्या उत्तरार्धांत सांगतात कीं, केवळ कर्मत्याग केला म्हणजेच (म्हणजे ज्ञानशून्य असून नुसता कर्मत्याग केला तर) नैष्कर्म्य (निष्क्रियित्व) हेंच आहे लक्षण जिचें अशी ज्ञाननिष्ठा प्राप्त होत नाहीं. सारांश चित्त शुद्ध करणाऱ्या कर्माला आरंभच केला नाहीं, किंवा कर्तव्यकर्म करावयाचेंच सोडून दिलें तर जेथें निष्क्रिय अशा स्वरूपानें राहतां येते अशा मोक्षस्थितीचा लाभ होत नाहीं.

अद्वैतवादी टीकाकारांचा हाच अभिप्राय आहे. ज्ञान उत्पन्न होईपर्यंत वर्णाश्रमास उचित अशा धर्माचें प्रत्येकानें पालन केलें पाहिजे. देहाभिमान आहे तोंपर्यंत कर्म केलेंच पाहिजे. खरें ज्ञान व्हावयास वैराग्य असलें पाहिजे. अहंता नष्ट झाल्याशिवाय वैराग्य नाहीं. नित्यकर्में करून तीं परमेश्वरार्पण केल्याशिवाय अहंता नष्ट होत नाहीं. म्हणून कर्म, निर्लोभ कर्म, परमेश्वरार्पण बुद्धीनें मनुष्याच्या हातून झालेंच पाहिजे.

शंकरानंद मात्र 'संन्यास' या शब्दानें ब्रह्माचे ठायीं आरोपित केलेल्या नामरूपाचा त्याग असें समजतात. 'ब्रह्माशीं आपलें तादात्म्यच आहे असें समजून ज्ञानी पुरुष ज्ञाननिष्ठ होतो. हें तादात्म्य अनुभवसिद्ध झाल्यावर मात्र खरें वैराग्य बाणतें' असें **चतरजी** म्हणतात.

रामानुजाचार्यः—'सर्व इंद्रियांची त्यांच्या त्यांच्या व्यापारापासून निवृत्ति होणें, म्हणजे डोळ्यांनीं विषय पहावयाचा नाहीं, कानांनीं ऐकावयाचा नाहीं, अशी सर्व इंद्रियांची स्वव्यापारापासून निवृत्ति होणें यालाच नैष्कर्म्य म्हणतात. हें फार कठिण आहे. देहप्रारब्धानें प्राप्त झालेलें कर्म निष्काममनानें ईश्वरास समर्पण केलें तर चित्तशुद्धि व भक्ति उत्पन्न होतात आणि शेवटीं ईश्वरीअनुग्रह होऊन अनंतजन्मीचीं पातकें नष्ट होतात. म्हणून कर्मत्याग योग्य नाहीं.

द्वैतवादीः—कर्मच केलें नाहीं म्हणजे मुक्ति मिळते असें असतें तर पर्वतादिकांस ही मुक्ति मिळाली असती. पण असा प्रकार नाहीं. शिवाय पूर्वजन्मींच्या कर्मानें तुला पुनः देह प्राप्त झाला आहे, म्हणून कर्मफलाच्या बीजाचें शून्यत्व नाहीं. देहपातापर्यंत कर्म केलेंच पाहिजे. सारांश नुसतें कर्माकरण व्यर्थ आहे. 'ईश्वरज्ञानपूर्वक कर्माकरण झालें तरच संन्यास योग्य आहे' असें **ब्रह्मपुराणांत** सांगितलें आहे. संसारांतून सुटावयाचें असल्यास आशा पिशाचिकेचा त्याग केला पाहिजे व परमेश्वराचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे. शिवाय संन्यास म्हणजे कर्म परित्याग नव्हे, तर काम्य कर्माचा परित्याग होय असें भगवानच सांगणार आहेत. (पहा अ० १८ श्लोक २) नुसत्या वैराग्यानें मोक्ष नाहीं. त्याला चित्त समाधान आणि भगवत्संतोष हीं आवश्यक आहेत. अतएव जप, ध्यान, उपासना यांचा त्याग अनर्थकारी आहे. सारांश कर्म केलेंच पाहिजे. प्रत्येक कर्म बद्धक आहे असें म्हणशील तर तसें नाहीं (अ. ३ श्लो. ९ पहा.)

सरकारः—भक्तीशिवाय मुक्ति नाहीं.

वल्लभाचार्यः—नुसत्या कर्माचा त्याग केला म्हणजे पुरुषार्थ साध्य होतो असें नाहीं. स्वरूपज्ञान होणें अवश्य आहे.

ज्ञानेश्वरः—नातरी तृप्ति इच्छिजे। तरी कैसेनि पाक न कीजे!। कीं सिद्ध हीन सेविजे?। केवि सांगे॥ जंव निरार्तता (निरिच्छ-पणा) नाहीं। तंव व्यापार असें पाही। मग संतुष्टीच्या ठायीं। कुंठे सहजी॥

गीताव्याख्याकारः—येथ उचित कर्म उबगावें। आणि निज-हितासि मुकावें। आळसें पीयूष नेघावें। मग वर पडे व्हावें मरणासीं!॥

भीमसेनः—' कर्म '= अग्निहोत्रादिक व अध्ययन, अध्यापन, उपदेश वगैरे सर्व सत्कर्में सुख मिळावयासाठीं कर्म केलेंच पाहिजे. कर्म केलें पाहिजे व तें फलप्राप्तीपर्यंत सोडतां उपयोगी नाहीं. ॥ ४ ॥

कस्मात्पुनः कारणात्कर्मसंन्यासमात्रादेव ज्ञानरहिता-त्सिद्धिं नैष्कर्म्यलक्षणां पुरुषो नाधिगच्छतीति हेत्वाका-ङ्क्षायामाह—

शिष्यः—भगवन्! नैष्कर्म्य नामक जी मोक्षसिद्धि तो ज्ञान-शून्य पुरुषानें नुसता कर्म संन्यासच केला तर त्याला कां प्राप्त होऊं नये? कर्मसंन्यास केला म्हणजे नैष्कर्म्य प्राप्त होऊन मोक्ष मिळावा असें कां नाहीं?

गुरुजीः—कां नाहीं तें ऐकः—

न हि कश्चित्क्षणमपि
जातु तिष्ठत्यकर्मकृत्॥
कार्यते ह्यवशः कर्म
सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥ ५॥

हि (कारण) **कश्चित् क्षणं अपि जातु** (कोणताही प्राणी किंवा पदार्थ एक क्षणभर सुद्धां) **अकर्मकृत्** (कर्म न करणारा असा) **न तिष्ठति** (असत नाहीं)–सारांश कर्म करित नाहीं, असा कोणाचा एक क्षणही जात नाहीं.—**हि** (कारण हें प्रसि-

 अवशः(सन

च्छच आहे कीं) अवशः (परतंत्र असल्याकारणानें) सर्वः (सर्व, पदार्थ मात्र) प्रकृतिजैः गुणैः (प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या सत्त्व, रज, तम, या गुणांच्या प्राबल्यामुळें) कर्म कार्यते (कर्म करविला जातो.)—सारांश नित्य चंचलस्वरूपानें राहणाऱ्या प्रकृतीच्या तीन गुणांमुळें प्रत्येक पदार्थमात्रास कर्म करणें भागच पडत आहे. एवंच प्रत्येका करवीं कर्म होतच असतें; तेव्हां ' मी त्याचा त्याग करीन ' असा अभिमान धरणें मौर्ख्यसूचक आहे.—

न हीति । न हि यस्मात्क्षणमपि कालं जातु कदाचित्कश्चित्तिष्ठत्यकर्मकृत्सन् । कस्मात्कार्यते हि यस्मादवश एव कर्म सर्वः प्राणी प्रकृतिजैः प्रकृतितो जातैः सत्त्वरजस्तमोभिर्गुणैः । अज्ञ इति वाक्यशेषः, यतो वक्ष्यति–' गुणैर्यो न विचाल्यते ' इति । सांख्यानां पृथक्करणादज्ञानामेव हि कर्मयोगो न ज्ञानिनाम् । ज्ञानिनां तु गुणैरचाल्यमानानां स्वतश्चलनाभावात्कर्मयोगो नोपपद्यते । तथा च व्याख्यातं वेदाविनाशिनमित्यत्र ॥ ५ ॥

कारण उघडच आहे कीं ' एक क्षणभर तरी मी कर्मशून्य राहिलों आहें ' असें वाटण्याची किंवा असण्याची स्थिति कोणास केव्हांही प्राप्त होणें संभवनीय नाहीं. कारण प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सत्त्वरजादिक गुण कोणाही प्राण्यास एक क्षणभर निष्कर्माच्या स्थितींत बसूं देणार नाहींत; कर्म करावयास लावतीलच.

शिष्य—मग ज्ञानी, अज्ञानी, असा भेदाभेद मोडलाच म्हणावयाचा! संन्यास कोणालाच साध्य नाहीं तर मग!

गुरु—हा खुळ्या! अरे येथें सर्व म्हणजे सर्व अज्ञ लोक असा अर्थ घ्यावयाचा. कारण ' प्रकृतीच्या गुणामुळें ज्याचा चेतोभंग होत नाहीं ' असें पुढें सांगणार आहेत. शिवाय सांख्य आणि योगी असे निरनिराळे विभाग केले आहेत त्यावरून अज्ञानी पुरुषांस मात्र कर्म आहे, ज्ञान्यांस नाहीं, असें स्पष्टच होतें. कारण ज्ञानी

पुरुष स्वतः कर्म करीत नाहींत व प्रकृतीचे गुणही त्यास कर्म करण्यास लावूं शकत नाहींत; आणि म्हणून त्यास कर्मयोग सांगणें अप्रयोजक होईल. दुसऱ्या अध्यायाच्या २१ व्या श्लोकांत 'ज्ञानी पुरुषाला कर्म नाहीं' हा विषय स्पष्ट केलाच आहे. 'मी करितों' हा अभिमान आणि 'मला पाहिजे' ही आशा नष्ट झाली म्हणजे संन्यास योग्य होतो. देहपातापर्यंत ज्ञानी पुरुषाच्या हातून कर्म होतें, पण तें होत आहे अशी त्याच्या निरभिमानी आत्मारामास खबर नसते.

अद्वैतवाद्यांत ऐकमत्य आहे. **श्रीधर** व **मधुसूदनीकार** 'गुण' = रागद्वेष असाही अर्थ करितात. '**सांख्ये प्रकीर्तितस्त्यागस्त्यागोऽपि मनसैव हि**' ज्ञानमार्गामध्यें सांगितलेला कर्मत्याग म्हणजे मनानें केलेला विषयत्याग होय) असें एक समर्थक वाक्य **प्रो० द्विवेदी** देतात. **प्रपाकार** विचारतातः कर्म होतेंच तर आपण शुद्ध सुख देणारें सत्कर्म तरी कां करूं नये?'

रामानुजः—शुद्ध पूर्वजन्मार्जित पापपुण्यामुळें प्राप्त झालेल्या देहाकडून कर्म होणारच. म्हणून सात्त्विकवृत्ति उत्पन्न होईल असें कर्म करावें. व ज्ञान संपादन करावें. ज्ञानी पुरुषाला सात्त्विकवृत्तीचा अवलंब सुद्धां इष्ट नाहीं. अहंता व वासना नष्ट करणें हा सात्त्विकवृत्तीचा अर्थ असेल तर ठीकच आहे.

द्वैतवादीः—'प्राणी पराधीन आहेत म्हणून व ते ईश्वराचे दास आहेत म्हणून ईश्वराचे आज्ञेनुसार मनुष्यानें कर्म केलेंच पाहिजे. 'अः = ब्रह्म = विष्णु; त्याला जे वश ते अवश होते!' सारांश विष्णूच्या प्रेरणेमुळें अगर प्रकृतीच्या प्रेरणेमुळें प्राण्यास कसलें तरी कर्म करावेंच लागतें.

चतरजीः—प्रकृति = गुणसमुदाय. आत्मा हा निर्गुण आहे. यात्र निर्गुण आत्म्यावर प्रकृतीचा म्हणजे गुणांचा आरोप करणें ही माया होय. ही माया जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत विकारजन्यकर्म करणें हें मनुष्याच्या पाठीमागेंच लागलें आहे.

भीमसेनः प्रकृतिज = देह उत्पन्न झाला त्यावेळींच प्राप्त झालेल्या गुणांनीं.

ज्ञानेश्वरांचें व्याख्यान अति सुंदर आहे. ते विचारतातः देखे विहित कर्म जेतुलें (जितकें) । तें सगळें जरी वोसंडिलें (टाकिलें)। तरी स्वभाव काय निमालें ?। इंद्रियांचें ॥ सांगावें श्रवणीं ऐकावें ठेलें ?। कीं नेत्रीचें तेज गेलें ? । हें नासारंध्र बुझाले ? । परिमळ नेघे ? । नातरि प्राणापान गति । कीं निर्विकल्प झाली मति ? । कीं क्षुधा तृषादि आर्ति (इच्छा) । खुंटलिया ? । हे स्वप्नावबोध ठेलें ? । कीं चरण चालों विसरले ? । हें असो; काय निमाले ? । जन्ममृत्यु ? ॥ हें न ठकेचि (राहत नाहीं) जरी कांहीं । तरी सांडिलें तें कायी (काय)?। म्हणोनि कर्मत्याग नाहीं । प्रकृतिमंता ॥....देखे रथीं आरूरिजे । मग जरी निश्चळ बैसिजे । तरी चळ होउनि हिंडिजे ! । परतंत्रा ॥.... सारांश—म्हणवूनि संग जंव प्रकृतीचा । तंव त्याग न घडे कर्माचा । ऐसियाही (असें असतांही) करूं म्हणती तयांचा । आग्रहचि उरे !॥ सारांश कर्मत्याग म्हणजे अहंकार व वासना यांचाच नाश होय.

पंडित—अर्जुना ! जरी संन्यासी । डोई बोडोनि झालासी । तरी कैसा कर्म टाकिसी ? । क्षण एकही ॥ लंगोटीही टाकणें । आणि नग्न होउनि असणें । तेंही नव्हे काय करणें । अगा कर्म ॥ प्रकृतीची संगति आहे, तोंपर्यंत कर्म टाकणें म्हणजे,—भूचर टाकुनि भूमि । म्हणे पळोन जाईन मी । पळतां पुढें रिकामी । भूमीच दिसे ! ॥ यासारखें मिथ्या होय. आतां स्तब्ध बसलें असतां कर्म नाहीं असें जरी घटकाभर धरलें तरी—प्रकृतीचे तिन्ही गुण । विषय, इंद्रियें, अंतःकरण । सर्वां अवशा स्ववशपणें । कर्में करविती ॥

रंगनाथ ज्ञानेश्वराचेच पट्ट शिष्य दिसतात.

गीताव्याख्याकारः—येथ 'करीन' 'न करीन' हा आग्रहो । हाच बाधक सर्वथा हो । अज्ञानकृत व्यामोहो । तो हा मूर्तिमंत जाण ॥ ९ ॥

यस्त्वनात्मज्ञश्चोदितं कर्म नाऽऽरभत इति तदसदेवेत्याह—

जो अज्ञानी पुरुष विहित कर्म करित नाहीं हें त्याचें करणें चांगलें नाहीं.—तो लुच्चाच होय.—

कर्मेन्द्रियाणि संयम्य
य आस्ते मनसा स्मरन् ॥
इन्द्रियार्थान्विमूढात्मा
मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

कर्मेन्द्रियाणि संयम्य (कर्मेंद्रियांचें संयमन करून) **यः विमूढात्मा** जो मूर्ख मनुष्य, ज्याचें आत्मस्वरूपी ज्ञान मोहित झालें असा जो पुरुष) **इन्द्रियार्थान्** (इंद्रियांचे निरनिराळे विषय) **मनसा स्मरन् आस्ते** (मनानें चिंतन करित राहतो)-सारांश इंद्रियांस मात्र बांधून टाकून निरनिराळ्या इंद्रियांच्या विषयांचें ध्यान करित बसतो !-**सः** (तो पुरुष) **मिथ्याचारः** (ढोंगी आहे, लुच्चा आहे, पापी आहे,)-असें-**उच्यते** (म्हणतात.) बाहेरून मात्र इंद्रियाचें दमन करून मनानें विषयाचे चिंतन करणारा पुरुष ढोंगी, भोंदु होय.-

कर्मेन्द्रियाणीति । कर्मेन्द्रियाणि हस्तादीनि संयम्य संहृत्य य आस्ते तिष्ठति मनसा स्मरंश्चिन्तयन्निन्द्रियार्थान्विषयान्विमूढात्मा विमूढान्तःकरणो मिथ्याचारो मृषाचारः पापाचारः स उच्यते ॥ ६ ॥

हस्तपादादिक जीं आपलीं कर्मेंद्रियें आहेत त्यांस मात्र विषयापासून परावृत्त करून घेऊन जो अज्ञानी पुरुष स्वतःच्या अज्ञानामुळें त्या त्या विषयांचें चिंतन मनानें करित राहतो त्याला ढोंगी, पापकर्मा असें म्हणावें. सारांश वासना नष्ट झाली नसतां जो बाहेरून इंद्रियाचें मात्र दमन करितो, तो टिळाटोपी करणाऱ्या सफेत साधुप्रमाणें लुच्चा होय. वासना हें मूळ आहे. वासनानाश झाला असतां मात्र खरा विषयनाश होऊन आत्मस्वरूपी लीन होण्यास

सांपडतें. एवंच मनोजयाव्यतिरिक्त केवळ विषयत्याग, किंवा कर्मत्याग व्यर्थच होय. अद्वैतवाद्यांत एकवाक्यता आहे. **श्रीधर, मधुसूदन, द्विवेदी, पर्वते** वगैरेंनीं भोंदूंचा यथास्थित समाचार घेतला आहे. वासनानाशाशिवाय नुसता कर्मनाश उपयोगी नाहीं हें सांगणारा चवथा श्लोक अर्थांतच अप्रस्तुत नाहीं. ' **त्वं पदार्थविवेकाय संन्यासः सर्वकर्मणां** ' अर्थ स्प च आहे. द्वैतवादी व रामानुज वगैरे सर्व सरळ अर्थाचेंच पोषण करितात.

पंडितः—' जैसे बकाचें ध्यान । मासेच आठवी मन । तैसे हे दांभिकजन । मिथ्याचार ॥ ६ ॥

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्याऽऽरभतेऽर्जुन ॥
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

अर्जुन (अर्जुना !) **यः तु** (परंतु जो) **मनसा** (मनाच्या योगानें) **इन्द्रियाणि** (ज्ञान व कर्म यांचीं इंद्रियें) **नियम्य** (नियमित करून) **असक्तः** (संगरहित होत्साता) **कर्मेन्द्रियैः** (हस्तपादादिकांच्या योगानें) **कर्मयोगं** (कर्ममार्गास) **आरभते** (आरंभ करितो, श्रुतिस्मृति विहित कर्में करावयास लागतो) **सः** (तो) **विशिष्यते** (श्रेष्ठ आहे.)—सारांश मनानें सर्व इंद्रियांचें आकलन करून जो अनात्मज्ञ परंतु अनासक्त पुरुष कर्मयोगाचें अनुष्ठान कर्मेंद्रियद्वारां करितो तो पुरुष खरोखरच श्रेष्ठ होय.

यस्त्विति । यस्तु पुनः कर्मण्यधिकृतोऽज्ञो बुद्धीन्द्रियाणि मनसा नियम्याऽऽरभतेऽर्जुन कर्मेन्द्रियैर्वाक्पाण्यादिभिः । किमारभत इत्याह–कर्मयोगमसक्तः सन्स विशिष्यत इतरस्मान्मिथ्याचारात् ॥ ७ ॥

परंतु जो अज्ञानी आहे व म्हणून कर्म करण्याला अधिकारी आहे, त्या मनुष्यानें जर आपल्या ज्ञानेंद्रियांचें आकलन विवेकयुक्त मनानें केलें व आपली वाणी, हस्तपाद, इत्यादिकांच्या करवीं कर्म करण्याला, रागद्वेषरहित निष्कामबुद्धीनें व श्रद्धायुक्त होत्साता, आरंभ केला तर तो पुरुष वरील पापी व ढोंगी पुरुषापेक्षां विशेष श्रेष्ठ होतो.

मधु०—नियम्य=विषयांपासून पराङ्मुख करून. हे टीकाकार या दोन श्लोकांमधील विशेष व्यक्त करितात तो पहाः एक अज्ञानी पुरुष आपल्या मनानें इंद्रियनिग्रह करून विषयासक्त न होतां कर्मयोग करितो आणि चित्तशुद्धी संपादून सुखी होतो आणि दुसरा अज्ञानी कर्मसंन्यास करितो पण विषयचिंतनांत मग्न होऊन दुःखांत पडतो! विषयवासना टाकिली म्हणजे सुख आणि नुसता विषयत्यागच केला तर दुःख होतें! एवंच चित्तशुद्धीसाठीं अज्ञानी मनुष्यास कर्म अवश्य आहे.

प्रपा०—मनसा=आत्मदृष्टीनें. **श्रीधर**-नियम्य=इंद्रियांस ईश्वरपर करून.

रामानु०—मनसा=आत्मावलोकन करून. हे आचार्य म्हणतात कीं हा कर्मयोगाचें अनुष्ठान करणारा पुरुष पापमग्न होण्याचा संभवच नाहीं आणि म्हणून हा ज्ञानीपुरुषापेक्षांही श्रेष्ठ आहे! अद्वैतवाद्यांशिवाय बाकी सर्वांची कर्मयोगावर केवढी भिस्त आहे ती पहा. ज्याचें मनन कीर्तन वगैरे सर्व आत्मपर झालें, ज्याला आत्म्याव्यतिरिक्त कांहीं कर्तव्य उरलें नाहीं व ब्रह्माशीं जो एकरूप होऊन समरस झाला, त्याला कर्मांची, उपासनेची, जरूरी उरत नाहीं हें तत्त्व अद्वैतविरोधी आचार्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं. असो; याचा विचार दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं केलाच आहे.

द्वैतवादीः—'कर्मयोगः=' वर्णाश्रमोचित कर्म. येथें कर्मयोग सर्व वर्णांस व सर्व आश्रमांस सांगितला आहे कारण 'कर्मयोगी हा श्रेष्ठ आहे' असा सर्वगामी सिद्धांत सांगितला आहे व कर्मसंन्या-

साचा निषेध स्पष्ट केला आहे. यावरून यज्ञयागादिक कर्मे कोणासच टाकितां यावयाचीं नाहींत; हा या मताचा सारांश आहे. भगवंतांनीं मनोनिग्रह करावयास सांगितला आहे, 'कर्म करूं नको' असें सांगितलें नाहीं. मनोनिग्रहानें संसार सुटतो व मनोनिग्रह नसेल तर संसार उत्पन्न होतो, असें भगवंतांचें म्हणणें आहे.—असो हे सर्व वादी तिसऱ्या श्लोकांतील विभागरचना विसरून वरील सारांश काढण्यास प्रवृत्त होतात भगवंतांचा इत्यर्थ असा आहे: काय ? तर मनोनिग्रह अवश्य आहे. कोणाला ? अज्ञानी व मलिन चित्त असेल त्याला! ज्याचें मन, बुद्धि वगैरे इंद्रियांसकट नष्ट होऊन आत्मस्वरूपीं झालीं, त्याला कर्माची उठाठेव सांगणें म्हणजे महासागरास ओढ्याचें स्वरूप घेण्यास सांगण्यासारखेंच होय! मनच नाहीं तेथें निग्रह कसला असणार ?

ज्ञानेश्वरः—जो अंतरीं दृढ । परमात्मरूपीं गूढ । बाह्य तरी रूढ । लौकिक जैसा (बाहेरून मात्र रूढीप्रमाणें वागतो) ॥ जो इंद्रिया आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥....तो कामनामालें न घेणें (आकळला जात नाहीं) मोहमळें न लिंपे । जैसें जळीं जळ न शिंपे ॥ (भिजत नाहीं ?) पद्मपत्र ॥ तैसा संसर्गामाजीं (संसारामध्यें) असे । सकळांसारिखा दिसे । जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥....ऐशा चिन्हीं चिन्हित । देखसी तोचि मुक्त । आशापाशरहित । ओळख पां ॥ हा अर्थ निराळा आहे. पंडितांनीं अर्जुन शब्दावर कोटी केली आहे, पण ती विषयास निरूपयोगी म्हणून घेतली नाहीं. ॥ ७ ॥

यत एवमतः—

कर्माला अधिकारी असणाऱ्यानें कर्मयोग करावा असें सांगितलें आहे म्हणूनः—

नियतं कुरु कर्म त्वं

कर्म ज्यायो ह्यकर्मणः ॥

शरीरयात्राऽपि च ते
न प्रसिध्येदकर्मणः ॥ ८ ॥

त्वं (त्वां) **नियतं** (नित्य, श्रुतिस्मृत्युक्त, अवश्य असें) **कर्म** (कर्म) **कुरु** (करावें) **हि** (कारण) **अकर्मणः** (कर्मशून्यतेपेक्षां) –तुला– **कर्म** (कर्म करणें हें) **ज्यायः** (अत्यंत श्रेष्ठ आहे). **च** (आणि) **अकर्मणः ते** (कर्म न करणारा जो तूं त्या तुझी) **शरीरयात्राऽपि** (शरीरयात्रासुद्धां) **न प्रसिध्येत्** (सिद्धीला जाणार नाहीं). सारांश अर्जुना! जोंपर्यंत तुझ्या चित्ताची शुद्धि झाली नाहीं, तोंपर्यंत श्रुतिस्मृतींनीं सांगितलेले नित्य म्हणजे संध्यावंदन, युद्ध वगैरे कर्म तुला केलेंच पाहिजे. तूं हें कर्म करावेंस. कारण अज्ञानदशेंतील कर्मशून्यतेपेक्षां, नित्यकर्माचें अनुष्ठान अनेक प्रकारांनीं श्रेष्ठ आहे. शिवाय तूं जर युद्धादि नित्यकर्म करावयाचेंच नाहीं असा निश्चय केलास तर ज्या शरीराच्या द्वारानें तुला ज्ञान प्राप्त होणार, तें शरीरही अवश्यकालपर्यंत धड राहणार नाहीं.

नियतमिति । नियतं नित्यं यो यस्मिकर्मण्यधिकृतः फलाय चाश्रुतं तन्नियतं कर्म तत्कुरु त्वं हेऽर्जुन यतः कर्म ज्यायोऽधिकतरं फलतो हि यस्मादकर्मणोऽकरणादनारम्भात् । कथं, शरीरयात्रा शरीरस्थितिरपि च ते तव न प्रसिध्येत्प्रसिद्धिं न गच्छेदकर्मणोऽकरणात् । अतो दृष्टः कर्माकर्मणोर्विशेषो लोके ॥ ८ ॥

अर्जुना! तूं नित्यकर्म कर. नित्यकर्म म्हणजे ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें पुरुषाला वेदशास्त्रानें सांगितलेलें कर्म होय. ह्या नित्यकर्माला फळाची प्राप्ति नसते. म्हणजे हें कर्म केलें असतां कोणतीही फलप्राप्ति व्हावयाची नाहीं. सारांश नित्य म्हणजे आवश्यक कर्तव्यकर्म होय. हें कर्तव्यकर्म चित्तशुद्धीसाठीं तुला केलेंच पाहिजे. कारण उघडच

आहे कीं ज्ञानमार्ग अनुसरण्याचा अधिकार ज्याला प्राप्त झाला नाहीं, त्यानें कर्म टाकून देऊन कर्मशून्य होऊन बसण्यापेक्षां, चित्तशुद्ध करणारें नित्यकर्म करणें हजार वाटांनीं श्रेष्ठ आहे, लाभदायक आहे.

शिष्य—गुरुजी! हें कसें? निष्कामबुद्धीनें नित्यकर्म करावें असें म्हणून पुनः त्याच कर्तव्यकर्माचें अनुष्ठान लाभदायक आहे असें सांगतां हें काय?

गुरु—अरे! आपण कर्तव्य करावयाचें तें निष्कामबुद्धीनेंच करीत असतों. पण या निष्काम कर्मानुष्ठानाचा साहजिक परिणाम असा घडतो कीं आपले कामक्रोधादिक मनोविकार व मनोवासना नष्ट होऊन चित्तशुद्धि होते व ज्ञानयोगाचा अधिकार प्राप्त होतो. निष्काम कर्म करणें म्हणजेच कामक्रोधादिकांचा नाश करणें होय. शिवाय दुसरें असें पहा कीं अज्ञानी मनुष्यानें 'मी कोणतेंही कर्म करणार नाहीं आणि त्यांतल्या त्यांत वेदशास्त्रोक्त व चित्त शुद्ध करणारें कर्म तर करणारच नाहीं' असा हट्ट धरिला तर परिणाम असा होईल कीं ज्या शरीर, मन, बुद्धि इत्यादिकांच्या साहाय्यानें जीव कायम राहून व चित्तशुद्धि होऊन मोक्षाचा मार्ग सांपडणार, तें शरीरही नष्ट होऊन हा जीव पुनः पतित होणार! चित्तशुद्धि न झाल्या कारणानें संसारांत म्हणून अज्ञानदशेमध्यें, कर्म केलें असतां व कर्म केलें नाहीं तर, काय काय भिन्न भिन्न परिणाम होतात ते ध्यानांत ठेवून तदनुसार योग्य तें वर्तन ठेव. वासनाशून्य होऊन कर्म कर असें तुला सांगितलेंच आहे.

मधु०—नियतं = आपल्या इंद्रियांचें आकलन करून. पर्वते म्हणतातः 'क्षत्रियाच्या मनाची चित्तशुद्धि झाली तरी त्याला कर्मसंन्यास करण्याचा अधिकार नाहीं!' ब्राह्मण क्षत्रियादिकांच्या लक्षणांवरून पाहिलें तर ज्याच्या मनाची शुद्धि झाली तो क्षत्रिय न राहतां ब्राह्मणच होतो असा भगवंतांच्या म्हणण्याचा आशय दिसतो. मग 'क्षत्रिय' शब्दाचा आलीकडील अर्थ घेऊन क्षत्रियकुलांत जन्म पावलेल्या मनुष्याला संन्यासविधीचा अधिकार कौरव-

पांडवांच्या वेळींही नव्हता असें विद्वान पर्वते शास्त्री यांनीं कां विधान करावें बरें? उपनिषदांत तर कित्येक क्षत्रिय गुरूंनीं ब्राह्मणास उपदेश केला आहे! असो; ज्या वेळीं ज्या कोणालाही खरें व कायमचें वैराग्य प्राप्त होईल त्यावेळीं त्या पुरुषानें संन्यास घ्यावा असें श्रुतिवाक्य निराबाध आहे हें खरें.

प्रपा०—संसार देणारें सकाम कर्म कर किंवा ज्ञानप्राप्ति करून देणारें निष्काम कर्म कर. पण कर्म कर. अज्ञानदशेंत निष्कर्म होऊं नको. ह्या अज्ञानी परंतु **मानवी** स्थितींत कर्म केलें नाहींस तर हा श्रेष्ठ मनुष्यधर्म तुला प्राप्त झाला आहे हाही नाहींसा होऊन तुला पशुपक्ष्यादिकांत जन्म प्राप्त होईल.

शंकरा०—मूर्खानें संन्यास घेतला तर त्याला हजारो अडचणी उत्पन्न होतात. ह्या लोकांत आपली चांगली चलती चालेल म्हणून कर्म करणारे लोक अत्यंत मूढ होत, नव्हे! कृतघ्न होत! कारण विषयांची काळजी करितां करितां त्यांस आत्मारामाचें विस्मरण होतें व ज्या आत्मनिष्ठेनें मोक्ष मिळून संसार संपावयाचा, त्या आत्म्यास (येथें जीवास) हे कृतघ्न लोक संसाराच्या अनंत यातनांमध्यें ढकलून देतात!

चतरजीः—मोक्ष मिळविणें हा जो मुख्य पुरुषार्थ तो साध्य करून घेण्यासाठीं ही शरीरयात्रा आहे. नुसतें मेलें म्हणजे मोक्ष मिळत नाहीं.

रामा०ः—नियतं=प्रकृतीच्या संसर्गानें उत्पन्न होणारें अनादिवासनारूपकर्म. अकर्मणः=ज्ञाननिष्ठेपेक्षां. ‘ज्ञाननिष्ठा दुःसाध्य आहे म्हणून आत्मज्ञान हें कर्मयोगापेक्षां गौण होय! ज्ञाननिष्ठ पुरुषानेंही शास्त्रोक्त कर्म केलेंच पाहिजे, कारण कर्म केलें नाहीं तर शरीरयात्रा चालणार नाहीं व इष्ट हेतुही सिद्ध होणार नाहीं!’ खऱ्या ज्ञाननिष्ठ पुरुषाला शरीराची काय काळजी असते व ब्रह्मपर झालेल्या पुरुषाला कोणता हेतु साध्य करून घ्यावयाचा असतो हें **रामानुजाचार्यांसच** विदित असावें! कृपा करून हे आचार्य इतकें कबूल करितात कीं

निरभिमानबुद्धीनें कर्म केलें असतां तें कर्म निष्कर्मतुल्यच होतें. तरीही पण ज्ञानयोगापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ आहे असें म्हणावयाचें तें हे आचार्य म्हणतातच! कर्मठाच्या दृष्टीनें हें म्हणणें अज्ञानजन्य प्रपंचांत मात्र खरें आहे, ज्ञानदृष्टीनें नाहीं.

मध्वमतानुयायी—नियतं = स्वधर्मास, वर्णास व आश्रमास उचित असें कर्म.

वल्लभः—नियतं=माझी सेवा ज्यांत आहे असें. हे आचार्य म्हणतातः 'कर्मत्याग करणाऱ्या ज्ञानी पुरुषाच्या नैष्कर्म्यापेक्षां भगवदुपासनारूप कर्म हें श्रेष्ठ आहे. दुसऱ्या ओळींतील शब्दांचा अर्थ असा आहे कीं उपासनाशून्य जो ज्ञानमार्ग त्यांत सांगितलेल्या कर्मशून्यत्वानें शरीरधारणाही होणें नाहीं.' सेवा भक्ति, उपासना, हे पंथ चांगले आहेत हें खरें; पण जो खरा ज्ञानी झाला व ज्याला कांहीं मिळवावयाचें राहिलें नाहीं, त्याला उपासनेचा उपयोग नाहीं हें भक्तिमार्ग प्रतिपादकांच्या लक्ष्यांत येत नाहीं! अज्ञानस्थितींत कर्म, उपासना वगैरे मार्ग आहेत. यांच्यायोगें ज्ञान होतें. हें ज्ञान झालें व अभ्यासानें अनुभव आला म्हणजे कर्माची व उपासनेची मातब्बरी संपली. सर्व घर सिद्ध झाल्यावर मग परांच्याचा काय उपयोग?

मराठी टीकाकार कांहीं विशेष सांगत नाहींत. ॥ ८ ॥

यच्च मन्यसे बन्धार्थत्वात्कर्म न कर्तव्यमिति तदप्यसत्, कथम्—

शिष्य—महाराज! 'कर्मानें जीव बद्ध होतो.' असें स्मृति उघड रीतीनें सांगत असतांना व कर्मानें दुसरें कर्म उत्पन्न होतें हें माहित असतां भगवंतांनीं अर्जुनाला कर्म करावयास सांगितलें हें कसें? बद्ध करणारें कर्म करावयास सांगूं नये.

गुरुजी—छेः छेः तसें नव्हे. अज्ञानी पुरुषाला कोणतीं कर्में बद्धक होतात व कोणतीं होत नाहींत, याविषयीं भगवान सांगतात तें प्रथम ऐकः—

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र
लोकोऽयं कर्मबन्धनः ॥
तदर्थं कर्म कौन्तेय
मुक्तसङ्गः समाचर ॥ ९ ॥

यज्ञार्थात् (यज्ञाप्रीत्यर्थ केलेल्या) **कर्मणः** (कर्मांहून) **अन्यत्र** (भिन्न प्रकारच्या कर्मांनीं) **अयं लोकः** (हा लोक, ह्या मृत्युलोकचे पुरुष) **कर्मबन्धनः** (कर्मांनीं बद्ध होतात.) **कौन्तेय** (हे कुन्तिपुत्रा अर्जुना !) **मुक्तसङ्गः** (वासनाशून्य होऊन) **तदर्थं** (यज्ञाच्या प्रीतीसाठीं) **कर्म** (कर्म) **समाचर** (उत्कृष्ट तऱ्हेनें कर.) सारांश यज्ञाप्रीत्यर्थ केलेल्या कर्मांशिवाय इतर कर्में बद्धक होतात व मनुष्यास जन्ममरणाच्या फेऱ्यांत घालितात. म्हणून यज्ञप्रीत्यर्थ जीं काय कर्में आहेत त्यांचें निष्काम बुद्धीनें व आसक्तिविरहित अनुष्ठान कर. असें केलेंस तर तुला कर्मांनेंही बंधन प्राप्त होणार नाहीं, इतकेंच नव्हे! तर हींच कर्में मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविण्यास कारण होतील !

यज्ञार्थादिति । "यज्ञो वै विष्णुः" इति श्रुतेर्यज्ञ ईश्वरस्तदर्थं यत्क्रियते तद्यज्ञार्थं कर्म, तस्मात्कर्मणोऽन्यत्रान्येन कर्मणा लोकोऽयमधिकृतः कर्मकृत्कर्मबन्धनः कर्म बन्धनं यस्य सोऽयं कर्मबन्धनो लोको न तु यज्ञार्थादतस्तदर्थं यज्ञार्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः कर्मफलसङ्गवर्जितः सन्समाचर निर्वर्तय ॥ ९ ॥

शिष्य—गुरुजी! आपण श्लोकाचा अर्थ सांगितला तो ठीकच आहे. पण यज्ञ म्हणजे एक कर्मच आहे, त्याच्यासाठीं दुसरें कर्म करावयास सांगणें योग्य नव्हे. कर्मासाठीं केलेलें कर्म बद्धक होत नाहीं असें सांगण्याचा हेतु आहे काय?

गुरुजी—अरे यज्ञ म्हणजे विष्णु, ईश्वर, सर्वव्यापी परमेश्वर, बरें! श्रुतिच म्हणते कीं यज्ञ म्हणजे विष्णु होय. त्याच्या अनुग्रहासाठीं जें कर्म करावयाचें त्याला 'यज्ञार्थ कर्म' असें म्हणावें. असो; तेव्हां ईश्वराप्रीत्यर्थ केलेल्या कर्मांशिवाय बाकी जीं अनेक कर्में कर्माधिकारी मनुष्याच्या हातून होत असतात त्यांच्यायोगानें ह्या मृत्युलोकांतील मनुष्यांस त्याचेंच कर्म त्यांस बंधनप्रद होतें! ईश्वराप्रीत्यर्थ केलेलीं कर्में मात्र बद्धक होत नाहींत; म्हणून कर्मापासून होणाऱ्या फलावरील आसक्ति टाकून देऊन तूं विष्णुप्रीत्यर्थ कर्माचें अनुष्ठान श्रद्धापूर्वक, चांगल्या रीतीनें शेवटास जाईल असें, कर, हा भगवंताचा भावार्थ आहे.

श्रीधर व प्पाकार म्हणतातः या श्लोकांत 'केव्हांच कोणीही कर्म करूं नये' असें म्हणणाऱ्या कपिलसांख्यमताचें येथें खंडन आहे.' **शंकरा०**–'सकाम कर्माचा येथें निषेध केला आहे.' बाकी सर्वत्र एकवाक्यता आहे. **द्विवेदी**:–यज्ञ=परब्रह्मरूपयज्ञ. हे म्हणतातः मनुष्याचें जीवित हा एक यज्ञ आहे व ज्या ज्या नियमानुसार ही सृष्टि चालत आहे त्या त्या नियमाचें फळ मिळणें हाही एक यज्ञच होय. सारांश सर्व जगत्, विश्व ब्रह्मरूप आहे व विश्वाची स्वतःसिद्ध प्रवृत्तिही ब्रह्ममयच आहे. तेव्हां ब्रह्मामध्यें दुःखाचा व पापाचा अंश सुद्धां मिळणें अघटित असतां विश्वामध्येंच कर्म करणाऱ्या जीवांना बंधन कां होतें? याचें उत्तर इतकेंच कीं विश्वाच्या स्वतःसिद्ध प्रवृत्तीस जीं तत्त्वें कारणीभूत होतात त्या तत्त्वाच्या सूक्ष्म स्वरूपास देवतात्वाचा आरोप करून त्या त्या देवतांच्या प्रीत्यर्थ जीं कर्में होतात तीं बद्धक होत नाहींत; इतकेंच नव्हे पण त्या त्या देवता विशेष प्रसंगीं मनुष्यांचें साहाय्य करितात; हें साहाय्य मिळतें म्हणून आपण देवतांचे ऋणी आहोंत. हें ऋण फेडण्यासाठीं केलेलीं कर्में अर्थातच बद्धक होत नाहींत. बाकींची होतात हें सांगावयास नकोच. सारांश परब्रह्माची अथवा कोणत्याही प्रतिनिधीदेवतेची निष्कामबुद्धीनें उपासना करणें हें साधकाला प्रतिबंधक न होता मोक्षदायकच

होतें चतरजी-' मीं कर्म केलें ' हा अभिमान व ' या कर्माचें फळ काय होईल ' ही वासना, यांचा त्याग करून परमेशानुग्रहासाठीं केलेलें कर्म बद्धक नाहीं.

रामा०--यज्ञाचा रूढ अर्थच घेऊन यज्ञासाठीं द्रव्य व साहित्य मिळविणें हें कर्म ईश्वरास संतोषदायक होतें, असें म्हणतात. स्वार्थी कर्म बंधनशील आहे हें म्हणणें सयुक्तिकच होय.

मध्वादि द्वैतवादी. यः = यातः (प्राप्त झालेला) ज्ञः = विष्णुः येन, ज्याच्या योगानें विष्णु प्राप्त होतो तो यज्ञ होय ! अन्यत्र=अवैष्णव कर्म. ' कर्मानें जीव बद्ध होतो ' या शंकेचें उत्तर म्हणून हा श्लोक आहे असें हेंही म्हणतात.

ज्ञानेश्वरः—स्वधर्म जो बापा । तोचि यज्ञ जाण पां । म्हणोनि वर्तता तेथ, पापा । संसार नाहीं ॥ हा यज्ञ शब्दाचा अर्थ चिंतनीय आहे.

पंडितांनीं यज्ञ=विष्णु=सगुण ब्रह्म असा अर्थ करून आपलीं नित्य म्हणजे निष्काम कर्में विष्णूंस–इतर देवतांस नव्हें ! अर्पण केलीं तर बंध उत्पन्न होत नाहीं असा अर्थ केला आहे. आपलीं कर्में सगुणासच कां अर्पावीं निर्गुणास कां अर्पूं नयेत यावर यांचें बरेच मोठें व्याख्यान आहे तें वाचण्याची शिफारस करणें हेंच काय तें येथें शक्य आहे.

रंगनाथस्वामींचा सकाम कर्म कसें बद्धक होतें यावरील दृष्टांत पहाः—जैसें सत्पात्रीं दिधलिया धन । तरी तें देतसे परलोकस्थान । तेंची वेश्याभोगार्थ वेचितां जाण । नरक दारुण तेंची देत ! ॥ स्रक्-चंदनधूपदीपादि उपचार । ईश्वरीं करितां होय मोक्ष साचार । तेंचि आपणासि करितां अनाचार । व्यर्थ उपचार जाण वाया ॥ ९ ॥

इतश्चाधिकृतेन कर्म कर्तव्यम्—

म्हणून कर्माधिकारी जो आहे त्यानें कर्म केलेंच पाहिजे. आणखी सांगतातः—

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा
पुरोवाच प्रजापतिः ॥
अनेन प्रसविष्यध्व-
मेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

पुरा (सृष्टीचे आरंभीं) **सहयज्ञाः** (यज्ञा साहित) **प्रजाः** (मनुष्यें) **सृष्ट्वा** (उत्पन्न करून) **प्रजापतिः** (सृष्टिकर्ता ब्रह्मदेव) **उवाच** (–त्या लोकांप्रत–बोलता झाला.):–**अनेन** (ह्या यज्ञाच्या साहाय्यानें) **प्रसविष्यध्वं** (प्रजोत्पादन करून प्रजावृद्धि करा.) **एष** (हा यज्ञ) **वः** (तुम्हांस) **इष्टकामधुक्** (इच्छित मनोरथ पूर्ण करणारा) **अस्तु** (होवो).—सारांश सृष्टिनिर्माणकर्त्या ब्रह्मदेवानें सर्गाचे आरंभीं यज्ञयाग व प्रजा यांची बरोबरच उत्पत्ति करून लोकांस सांगितलें. " अरे ! तुम्ही यज्ञयाग करून प्रजावृद्धि करा. हा यज्ञ तुमच्या इच्छित कामना पूर्ण करणारी कामधेनूच होईल.–(तेराव्या श्लोकापर्यंत ब्रह्मदेवाचें बोलणें आहे.)

सहेति । सहयज्ञा यज्ञसहिताः प्रजास्त्रयो वर्णास्ताः सृष्ट्वोत्पाद्य पुरा सर्गादावुवाचोक्तवान्प्रजापतिः प्रजानां स्रष्टा, अनेन यज्ञेन प्रसविष्यध्वं प्रसवो वृद्धिरुत्पत्तिस्तां कुरुध्वम् । एष यज्ञो वो युष्माकमस्तु भवत्विष्टकामधुगिष्टानभिप्रेतान्कामान्फलविशेषान्दोग्धीतीष्टकामधुक् ॥ १० ॥

सर्गाचे आरंभीं प्रजा म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णांची यज्ञकर्मासहित उत्पत्ति केल्यानंतर प्रजांची उत्पत्ति करणारा ब्रह्मदेव त्यांप्रत बोलता झालाः "हा जो यज्ञ आहे याच्या साहाय्यानें प्रजावृद्धि करण्याचें काम चालू ठेवा."

शिष्य—यज्ञयाग केल्यानें प्रजावृद्धि कशी होणार गुरुजी ?

गुरुजी—होय होय, सांगतों ऐकः ब्रह्मदेव म्हणालेः "हें यज्ञ-कर्म केलें असतां तुमचे जे इच्छित मनोरथ असतील, ज्या कांहीं तुमच्या इष्ट वासना असतील, त्या पूर्ण करणारी ही यज्ञक्रिया एक कामधेनूच होईल.

मधु०—यज्ञ = शास्त्रोक्त कर्मांचा कलाप, सर्व नित्य व नैमित्तिक कर्मांचा संग्रह. हे स्वामी म्हणतातः—'ह्या शास्त्रोक्त कर्मानें उत्पन्न होणाऱ्या फलाची वासना मात्र बाळगावयाची नाहीं, आणि कर्म मात्र करावयाचें.'

श्रीधर व **पर्वते**—येथें काम्य कर्माची प्रशंसा केली आहे ती अप्रस्तुत आहेशी वाटेल, पण ती केवळ सन्मार्गाकडे मनुष्याच्या चित्ताची प्रवृत्ति व्हावी म्हणून केली आहे.

द्विवेदी—सद्गुणमंडित पुरुषांच्या सर्व इच्छा येथें पूर्ण होतात असें या श्लोकानें सांगितलें.

प्रपा०—कर्मबद्ध लोकांची गति येथें वर्णन केली आहे. सहयज्ञाः = यज्ञ करण्यास अधिकार असणारे लोक; असा एक अर्थ करितात.

शंकरा०—नैष्कर्म्य, दांभिकत्व, निवृत्ति आणि शरीरयात्रा सिद्ध होण्यासाठीं कर्म करण्याची आवश्यकता सांगून ब्रह्मदेव या संबंधानें काय ह्मणाले तें येथून तीन श्लोकांनीं सांगतात अशी प्रस्तावना करितात. **प्रजाः** = ब्राह्मण. **प्रसविष्यध्वम्** = यज्ञद्रव्यांनीं यज्ञ करून देवांची कृपा होईल असें करा. निष्कामबुद्धीनें यज्ञ केला तर मोक्ष व सकामबुद्धीनें केला तर स्वर्ग अशीं फळें आहेत.

ह्या अद्वैतवादी टीकाकारांची या श्लोकांत किंबहुना या अध्यायांत कशी धांदल उडाली आहे, हें तज्ज्ञांस सहज कळेल. कर्म करण्याचा मात्र अधिकार असणाऱ्या लोकांस हें सांगावयाचें आहे हें लक्ष्यांत न राहिल्यामुळें 'येथें कर्मफल कां सांगितलें?' या प्रश्नाचा उलगडा करण्याकडे आचार्यांशिवाय बाकींच्या टीकाकारांचें लक्ष्य वेधलें आहे. आचार्यांनीं ग्रंथाच्या आरंभींच सांगून ठेविलें आहे कीं सृष्टिकर्त्यानें प्रथमतः

मरीची आदिकरून प्रजापति उत्पन्न करून व त्यांस वेदोक्त अशा प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करून त्यांच्या करवीं प्रवृत्तिमार्ग, कर्ममार्ग, सकामकर्म मार्ग सुरू केला. (पहा आचार्यांचा उपोद्घात, अध्याय १.) अशी स्पष्ट वस्तुस्थिति असतां व हीच स्थिति सर्गारंभीं युक्त असते हें सिद्ध असतांही येथील श्लोकांवर व्याख्यान करितांना फलाच्या ग्राह्याग्राह्यत्वाविषयीं शंका घेऊन समाधान करित बसणें ह्मणजे हल्लींच्या शाळांत जाणारीं पोरें प्रथमतः कां खाऊ मागतात याची मीमांसा एखाद्या विद्याधर पंडितानें करण्यासारखेंच असमंजस होय! शिवाय प्रजाः याचा अर्थ आचार्यांसुद्धां सगळ्यांनीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असा केला आहे! **शंकरानंदांनीं** मात्र नुसता 'ब्राह्मण' असा केला आहे! आतां ब्राह्मणादि चारी वर्णांची अठराव्या अध्यायांत लक्षणें सांगितलीं आहेत, त्याप्रमाणें अर्थ केल्यास अर्थातच गीताशास्त्र हें केवळ आर्यभूमीसच सांगितलें असें नाहीं तर यच्चयावत् सृष्टींतील लोकांस सांगितलें आहे असें सिद्ध होतें. हल्लींचा अगर आचार्यांच्यावेळचा ब्राह्मणादि शब्दांचा अर्थ घेऊन गीताशास्त्राचा अर्थ लावणें म्हणजे नित्य व निरामय, शुद्ध आणि निर्विकार अशा गीताशास्त्राला संकुचित करणें होय. असो; '**यज्ञासहित प्रजा उत्पन्न करून**' असे जे मूळ श्लोकांत शब्द आहेत त्यावरून केवळ यजन याजनच ज्या वेळीं प्रबलत्वानें प्रचलित होतें त्या वेळीं गीताशास्त्र प्रकट झालें असें सिद्ध होतें. या यज्ञयागादिकांच्या काळाची मर्यादा ठरविणें कठिण आहे; तथापि ज्या अर्थी विभूतियोगांत मार्गशीर्ष महिन्यास प्राधान्य दिलें आहे, नक्षत्रामध्यें चंद्राला प्राधान्य दिलें आहे, त्यावरून सूर्यचंद्राशिवाय इतर ग्रह ठाऊक नव्हते, मार्गशीर्ष महिन्यापासून वर्षारंभ मोजण्याची पद्धति होती, वार वगैरेचीही माहिती नव्हती अशा काळीं म्हणजे शकाचे पूर्वी निदान १६०० वर्षें तरी पूर्वी गीताशास्त्राची उत्पत्ति झाली असावी असें दिसतें; असो याचा विस्तार बाराव्या अध्यायाच्या शेवटीं करूं.

रामानुः—प्रजापतिः=नारायण. '**पतिर्विश्वस्येत्यादि**' (विश्वाचा

पति आहे वगैरे श्रुति आहे.) प्रजाः=जड वस्तूच्या संसर्गानें सर्वथा विषयवश झालेले लोक. यज्ञ हेंच परमेश्वराचा अनुग्रह संपादन करणारें साधन आहे. काम=परमपुरुषार्थ, मोक्ष.

द्वैतवादीः—"हे सर्व, १० ते १३, श्लोक अर्थवादरूप आहेत. इष्टकामधुक्=धर्मादि पुरुषार्थदायक प्रसविष्यध्वं=आपआपले इष्ट पुरुषार्थ साध्य करून घ्या. सारांश यज्ञयागादिक कर्मे केलीं असतां मोक्ष नामक पुरुषार्थ मिळेल असें यांचें म्हणणें आहे. सगुणब्रह्माचें दर्शन होणें, समीप राहणें, हाच मोक्ष आहे. मोक्षस्थितींतही स्वभान नाहींसें होत नाहीं, दृश्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी कायम राहते." असें यांचें मत आहे. तेव्हां अर्थातच यज्ञयागादि उपासनामार्गानेंच यांस मोक्ष मिळणार असें वाटतें.

ज्ञानेश्वरः—तुम्हा वर्ण विशेष वशें (जातिपरत्वें) । आम्हीं हा स्वधर्म विहिला (नेमिला) असे । यातें उपासा, मग आपैसें (आपोआप) । पुरती काम ॥ तुम्ही व्रत नियम न करावे । शरीरातें न पिडावें । दूर केंही (कोठेंही) न वंचावें (जावे) । तीर्थांसी गा ! ॥ योगादिकें साधनें । साकांक्ष (कामनिक) आराधनें । मंत्र, यंत्र, विधानें । झणी करा (टाकून द्या) ॥ देवतांतरा (इतर देवतांस) न भजावें । ....॥ अहेतुकें चित्तें । अनुष्ठा पां यातें (मी सांगितलेल्या कर्ममार्गास) । पतिव्रता पतीतें । जीयापरी ॥

पंडितः—तो कृष्ण ह्मणे अगा किरीटी ! । ब्रह्मा निर्मितां प्रजांच्या कोटी । यज्ञही निर्मी त्या सांगाते ॥ उपजतांचि बाळ मुग्ध । मातेच्या स्तनीं उपजे दुग्ध । हा मायागुण स्निग्ध । अनादि ॥ दृष्टांत खासा आहे कीं नाहीं ? हे श्लोक कामुक लोकांची व्यवस्था लावण्यासाठीं सांगितले आहेत असा पंडितांचा अभिप्राय आहे.

रंगनाथस्वामीः—ज्ञानेश्वरांचेंच अनुकरण करितात. ॥ १० ॥

कथम्—

शिष्य—महाराज ! यज्ञ ही कामधेनु कशी बरें ? देव-

तांचा प्रसाद झाल्यावांचून स्वर्गादि लोक मिळत नाहींत व खरें ज्ञान झाल्यावांचून मोक्ष मिळत नाहीं असें आपणच म्हणतां आणि येथें तर यज्ञालाच कामधेनु म्हणतां हें कसें ?

गुरु—सांगतों, श्रवण करः—

देवान्भावयतानेन
ते देवा भावयन्तु वः ॥
परस्परं भावयन्तः
श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

ब्रह्मदेव म्हणतातः—**अनेन** (ह्या यज्ञाच्या साहाय्यानें) **देवान्** (इंद्र वगैरे देवतांस) **भावयत** (संतुष्ट करा). **ते देवाः** (ते देव) **वः** (तुमचें) **भावयन्तु** (वृष्टि वगैरे करून, सुख वृद्धिंगत करोत.) **परस्परं भावयन्तः** (तुम्ही परस्पर एकमेकांस संतोष होईल असें करा)–आणि–**परं** (उत्तम प्रकारचें) **श्रेयः** (कल्याण) **अवाप्स्यथ** (प्राप्त करून घ्या)–सारांश या यज्ञकर्मानें देवता संतुष्ट होतील व पर्जन्यवृष्टि वगैरे करून तुमचें कल्याण करतील. याप्रमाणें तुम्ही एकमेकांस संतुष्ट करून अतिश्रेष्ठ प्रकारचें कल्याण प्राप्त करून घ्या, व विश्वचक्र कायम ठेवा.

देवानिति । देवानिन्द्रादीन्भावयत वर्धयतानेन यज्ञेन ते देवा भावयन्त्वाप्याययन्तु वृष्ट्यादिना वो युष्मानेवं परस्परमन्योन्यं भावयन्तः श्रेयः परमपि ज्ञानप्राप्तिक्रमेणावाप्स्यथ स्वर्गं वा परं श्रेयोऽवाप्स्यथ ॥ ११ ॥

ह्या तुमच्या देवयज्ञ, पितृयज्ञ, ऋषियज्ञ वगैरे श्रौतस्मार्त यज्ञयागादिकांनीं इंद्रादि देव प्रसन्न होऊन पर्जन्यवृष्टि वगैरे तुमचें सुख वृद्धिंगत होईल असें करतील. याप्रमाणें परस्परांनीं परस्परांस प्रसन्न करून घेतलें म्हणजे क्रमाक्रमानें मोक्ष नामक उत्तम पुरुषार्थ सुद्धां साध्य होईल, किंवा निदान स्वर्गसुख, सांराश इष्टफल, मिळेल.

शिष्य—कर्मानें मोक्ष मिळेल? वाहवा! वाहवा!

गुरु—शाबास! खरा जिज्ञासु आहेस तूं. असो; पुरुषानें निष्काम कर्म केलें तर चित्त निर्मळ होऊन ज्ञान मिळूं शकतेंना? तेव्हां ज्ञान प्राप्त होऊन मनन, निदिध्यास व अभ्यास इत्यादिकांच्या योगानें व ईश्वरी कृपेनें ज्ञानी मनुष्याला मोक्ष नाहीं का मिळावयाचा? नैष्कर्म्यसिद्धि करणारे कर्मानें चित्तशुद्धि होतें, मग ज्ञान होतें, मग अनुभव येऊन मोक्ष मिळतो. आला क्रम लक्ष्यांत? कर्मठांच्या मताप्रमाणें सकाम कर्म केलें म्हणजे स्वर्गादि सुखें मिळतात.

शंकरानंद ह्मणतात कीं हें बोलणें मनुष्यास मात्र अनुलक्षून आहे.

रामानुजः—'**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता**' (मीच सर्व यज्ञांचा भोक्ता आहे) या वाक्यावरून देवता म्हणजे विष्णूच होय.

ज्ञानेश्वराचा 'श्रेय' शब्दाचा अर्थः—तेथ तुम्ही जें करूं म्हणाल। तें अपैसे सिद्धि जाईल। वांच्छित ही पुरेल। मानसीचें॥ वाचा सिद्धि पावाल। आज्ञापक होआल। म्हणिये (चाकर; आज्ञा) तुमते मागतील। महाऋद्धि॥ जैसें ऋतुपतीचें (वसंताचें) द्वार। वनश्री सेवी निरंतर। वोळगे (धारण करिते) फळभार। लावण्येसीं॥

पंडित व रंगनाथ यांनींही हा श्लोक काम्यकर्मपरच लाविला आहे.

कर्मठांच्या मताचें येथें परीक्षण चाललें आहे, म्हणून हे सर्व श्लोक केवळ प्रवृत्तिमार्गास उपयोगी पडणाऱ्या सकाम कर्मालाच अनुलक्षून लावावे हें बरें. ॥ ११ ॥

किंच—

आणखी ऐहिक सुखाच्या संबंधानें ह्या देवता काय करितात तें ऐकः—

इष्टान्भोगान्हि वो देवा
दास्यन्ते यज्ञभाविताः ॥

तैर्दत्तानप्रदायैभ्यो
यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

हि (प्रसिद्धच आहे कीं) **यज्ञभाविताः देवाः** (यज्ञांतील हविर्भागानें संतुष्ट झालेल्या देवता) **वः** (तुम्हाला) **इष्टान् भोगान्** (प्रियकर व सुखकारक असें विषयसुख) **दास्यन्ते** (देतील). **तैः दत्तान्** (त्या त्या देवतांनीं आपल्यास जे काय सुखकारक पदार्थ दिले असतील त्यांबद्दल) **एभ्यः** (त्या देवतांस) **अप्रदाय** (आपण उलट कांहीं एक न देतां) **यः भुङ्क्ते** (जो देवदत्त विषयसुखाचा उपभोग घेतो) **सः** (तो पुरुष) **स्तेनः एव** (केवळ चोरच होय. आपण कांहीं झीज न सोसतां दुसऱ्याच्या वस्तूंचा उपभोग घेणारा तो चोरच होय!) सारांश यज्ञयागादिकांनीं संतुष्ट झालेल्या देवता ऐहिकसुखाचीही समृद्धि करितात. असो; पण कित्येक लोक असे शठ असतात कीं देवतांच्या अनुग्रहानें जीं काय सुखें आपल्यास मिळतात त्याबद्दल देवतांचे आभार मानीत नाहींत व देवतांस अग्निद्वारां हविर्भाग द्यावयाचे ते देत नाहींत ! अशा लोकांस चोर म्हणूं नये तर काय म्हणावें ?

इष्टान्भोगानिति। इष्टानभिप्रेतान्भोगान्हि वो युष्मभ्यं देवा दास्यन्ते वितरिष्यन्ति स्त्रीपशुपुत्रादीन्यज्ञभाविता यज्ञैर्वर्धितास्तोषिता इत्यर्थः । तैर्देवैर्दत्तान्भोगानप्रदायादत्त्वाऽऽनृण्यमकृत्वेत्यर्थः, एभ्यो देवोभ्यो यो भुङ्क्ते स्वदेहेन्द्रियाण्येव तर्पयति स्तेन एव तस्कर एव स देवादिस्वापहारी ॥ १२ ॥

अनेक प्रकारच्या यज्ञयागादिकांनीं पुष्ट आणि म्हणून संतुष्ट झालेल्या देवता केवळ स्वर्गादि सुखेंच देतात असें नाहीं, तर स्त्री, पशु, पुत्र इत्यादि सारांश स्त्री, संतती आणि संपत्ति असे तिन्ही सकार देवतांकडून याजकांस प्राप्त होतात. परंतु कांहीं उन्मत्त लोक

देवांनीं दिलेल्या या ऐहिक सुखाबद्दल आपण त्यांचें ऋणी आहोंत, असें समजत नाहींत व देवतांचे ऋणांतून आपल्यास मुक्तही करून घेत नाहींत.

शिष्य—देवतांच्या ऋणांतून कसें मुक्त व्हावयाचें ?

गुरु—अरे ! यज्ञांत हविर्भाग देऊन ! असो; हे लोक आपण घेतलेल्या ऋणाची काळजी न करतां स्वतःचा देह व इंद्रियें यांसच संतुष्ट करित बसतात ! अशा लोकांना चोरच म्हटलें पाहिजे. देवतादिकांच्या भागाचा अपहार करणारे लोक चोर आहेत. सारांश देवऋण, पितृऋण व ऋषीऋण न फेडणारे सारे उन्मत्त लोक चोरच आहेत.

रामानुजः—इष्ट = मोक्ष. देवतांस प्रसन्न करून घेतलें असतां पुढें उपयोगीं पडतील अशीं सुखें मिळतात. कांहीं विशिष्ट कारणासाठीं दिलेल्या वस्तूचा जो दुरुपयोग करितो तो चोरच होय. बाकी सर्वत्र एकवाक्यता आहे.

ज्ञानेश्वरांचें या श्लोकावरील व्याख्यान वाचनीय आहे. स्वधर्माप्रमाणें आचरण केलें नाहीं तर असतील तीं सुखें नष्ट होऊन कल्पांतपर्यंत दुःखें भोगावीं लागतात. स्वधर्म म्हणजे अग्निद्वारा यज्ञ, देवतार्चन, अतिथीभोजन, गुरुभक्ति, ज्ञातीचा संतोष, वगैरे होय. यांपैकीं आपल्या येथें आजमित्तीस काय शिलक आहे ?—असो; उन्मत्ताची गति काय होते पहाः—तया मग अपावो थोर आहे । जेणें तें हातिचें सकळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ! ॥ जैसें गतायुशरीरीं । चैतन्य वास न करी । कां निर्दैवाच्या घरीं । न राहे लक्ष्मी । तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ तैसी निजवृत्ती जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आइका प्रजा हो फुडे । विरंची म्हणे ॥ म्हणवूनी स्वधर्म जो सांडील । तयातें काळ दंडील । चोर म्हणूनि हरील । सर्वस्व तयाचें ॥ पुढें यमयातना कशा होतात हें सांगितलें आहे. कर्मठांनीं हें व्याख्यान अवश्य वाचून विचारांत घ्यावें.

पंडित देवांचा भाग न देणाऱ्या चोरासंबंधें म्हणतातः—तेव्हां अपराध लागे थोर। जो ऐसा, तो देवांचा चोर। ते न दिसती, परी हा समोर। त्या देवांस सर्वत्र ॥ राजद्रव्य चोरी। त्यास राजा मारी। मग देव ऐसेपरी। करिती त्यावरी शासन ॥

रंगनाथी ह्मणजे ज्ञानेश्वरीची हुबेहुब नकल आहे असें येथें तरी दिसतें.

चतरजी—आपल्यास सद्वस्तु मिळतात त्या देवतांकडून मिळतात; त्यांपैकीं विशिष्ट भाग देवतांस यज्ञमार्गानें परत करावा असा सृष्टिकर्त्याचा नियम आहे. ॥ १२ ॥

ये पुनः—

परंतु जे कर्माधिकारी लोकः—

यज्ञशिष्टाशिनः सन्तो
मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ॥
भुञ्जते ते त्वघं पापा
ये पचन्त्यात्मकारणात् ॥१३॥

यज्ञशिष्टाशिनः (यज्ञांतील हविर्भाग देवतांस समर्पण पूर्ण श्रद्धेनें करून बाकींच्या पदार्थांचें सेवन करितात)—ते—**सन्तः**(थोर, श्रेष्ठ, साधु पुरुष आहेत)—आणि ते—**सर्वकिल्बिषैः** (सर्व पूर्वकृत व अज्ञानकृत पापांपासून) **मुच्यन्ते** (मोकळे होतात) **तु** (परंतु) **ये** (जे लोक) **आत्मकारणात्** (आपल्या स्वतःच्या जड अशा देह इंद्रियें, मन व बुद्धि यांच्यासाठीं-मात्र) **पचन्ति** (अन्न अथवा सर्व प्रकारचे उपभोग निर्माण करितात) **ते** (ते लोक) **अघं भुञ्जते** (पापरूपी वस्तूंचाच उपभोग घेतात.) सारांश देवतादिकांचे भाग त्यांस श्रद्धापूर्वक अर्पण करून व याप्रमाणें तिन्ही ऋणांतून मुक्त होऊन नंतर विषयोपभोग घेतात त्यांचीं सर्वही पापें नष्ट होतात.

पण जे लोक केवळ देहेंद्रियादिक जड पदार्थांस चिकटून राहणाऱ्या स्वार्थासाठीं मात्र विषय निर्माण करून त्यांचा वासनातृप्तीसाठीं उपभोग घेतात, ते लोक मूर्तिमंत पापाचे सेवन करणारे मूर्ख होत. ' सन्तः ' याचा अर्थ असणारे असाही होईल.

यज्ञेति । देवयज्ञादीन्निर्वर्त्य तच्छिष्टमशनममृताख्यमशितुं शीलं येषां ते यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः सर्व पापैश्चुल्ल्यादिपञ्चसूनाकृतैः प्रमादकृतहिंसादिजनितैश्चान्यैः । ये त्वात्मंभरयो भुञ्जते ते त्वघं पापं स्वयमपि पापा ये पचन्ति पाकं निर्वर्तयन्त्यात्मकारणादात्महेतोः ॥ १३ ॥

देवयज्ञ, पितृयज्ञ, मनुष्ययज्ञ, भूतयज्ञ वगैरे सर्व श्रौतस्मार्तविहित यज्ञ श्रद्धापूर्वक करून यज्ञावशिष्ट राहिलेला जो अमृत नांवाचा भाग तो मात्र सेवन करण्याचें ज्याचें व्रत आहे ते साधुपुरुष सर्व पापांपासून मुक्त होतात.

शिष्य—हीं सर्व पापें म्हणजे कोणतीं ?

गुरु—हीं पापें म्हणजे दळण, कांडण वगैरे करितांना जीं पांच प्रकारचीं हिंसारूप पातकें अज्ञानवशात् आपल्या हातून घडत असतात, तसेंच जाणून बुजून अथवा चुकून आपले हातून हिंसा झाली असतां तज्जन्य जीं पातकें उत्पन्न होत असतात त्या सर्वांचें क्षालन होत असतें. समजलास ? **कर्मठांचे हे सिद्धांत आहेत,** आतां मागील श्लोकांत सांगितलेले चोर कीं जे देवऋण, पितृऋण वगैरे चटसारी ऋणें गुंडाळून ठेवून केवळ स्वोदरपोषणासाठीं म्हणजे ज्या देहांत त्यांची वसति आहे व ज्या इंद्रियें, मन आणि बुद्धि इत्यादिकांच्या योगें त्यांस विषयज्ञान होतें त्या शरीराचें, इंद्रियांचें मनाचें, व बुद्धीचें मात्र विषयसेवनानें पोषण करावें अशासाठीं—जे लोक—विषय निर्माण करून त्यांचा उपभोग घेतात ते लोक त्या त्या विषयांचें सेवन करित नाहींत, तर त्या त्या विषयमिषानें मूर्तिमंत पापपुरुषाचा,

कलि पुरुषाचीच सेवा करित असतात, व शेवटीं **'यथा बीजं तथाऽङ्कुरः'** या न्यायानें आपणच पापपुरुष होऊन बसतात! [पहा मनु. ३।११८]

मधु०—

**" मोघमन्नं विन्दतेऽप्रचेताः सत्यं ब्रवीमि वध इत्स तस्य ।
नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी ॥ "**

(मूर्खाचा विषयोपभोग व्यर्थ होय. हा उपभोग म्हणजे स्वतःचा वधच होय ! कारण जो दिवसा सूर्याला वैश्वदेवरूपानें हविर्भाग देत नाहीं, किंवा रात्रीं अग्नीचें संतर्पण करित नाहीं, तो विषयलंपट पुरुष पापमूर्तीच होतो.)

द्विवेदी—' या असल्या पापी पुरुषांस कधींही मोक्ष मिळणार नाहीं.'

प्रपा०—' न स पाप्मनो व्यावर्तते, ' (तो पापापासून मुक्त होत नाहीं.) **शतपथब्राह्मण.**

शंकरा०—हा श्लोक कर्मपर लावून ज्ञानपर लावितात; " पापविमोचन झाल्यावर चित्तशुद्धि, मग ज्ञान, मग मुक्ति असा क्रम येथें आहे व **'एका क्रिया द्व्यर्थकरी बभूव'** (यज्ञयागादिकांनीं पर्जन्य वगैरे पडून सुबत्ता होते व चित्तशुद्धि होऊन मोक्ष मिळतो; असा स्वार्थ व परमार्थ साधतो, अथवा कामांत काम व रामांत राम होतें. " असें म्हणतात. पण चित्तशुद्धि होण्यास निष्कामकर्म पाहिजे हा भाग हे स्वामी विसरले नसतील तर वरील अर्थ संभवेल. भगवंतांनी ह्या श्लोकांत कर्ममार्गाचें परीक्षण चालविलें आहे असें मागें एक दोन वेळ सांगितलें आहे तें वाचक विसरले नसतीलच !

चरतजीः—' यज्ञ याचा अर्थ सर्व प्रकारचीं कर्तव्यकर्में असा करून म्हणतात. केवळ कर्तव्यकर्मच करणारा व कर्तव्यापासून यदृच्छेनें उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखांचें समत्वबुद्धीनें सेवन करणारा पुरुष पापातीतच असतो.

वल्लभ—परमेश्वरासाठीं निर्माण झालेले पदार्थांचा जो स्वोपभोगाकडे अपव्यय करितो तो पापी होय. किल्बिषैः = भगवद्भजनाच्या आड येणारीं कृत्यें.

रामा०—पूर्वजन्मकृत व ह्या जन्मीचीं पापें नष्ट होतात. आत्म्याचे सम्यग्ज्ञान होण्याला पापें प्रतिबंधक आहेत. पापसेवन करितात; म्हणजे ज्यापासून पापनिष्पत्ति होते त्याचें सेवन करितात.

द्वैतवादी—यज्ञ = विष्णु. विष्णूस वैश्वदेव वगैरे रूपानें समर्पण करून शिल्लक राहिलेले विषय ईश्वरानें दिले असें समजून उपभोग घेणारे पुरुष थोर आहेत त्याचीं सर्व, म्हणजे संसाराला उत्पन्न करणारीं सर्व, पातकें नष्ट होतात.

"कर्मणा निरपेक्षेण विष्णवे चार्पितेन च।
सम्यग्ज्ञानं भवेत्पुंसां देवतातृप्तिपूर्वकम्"॥

निरपेक्षबुद्धीनें कर्म करून ते विष्णुनामक परमेश्वरास समर्पण केलें असतां त्याचा म्हणजे परमेश्वराचा अनुग्रह होऊन सम्यग्ज्ञान प्राप्त होतें.

ज्ञानेश्वरांचें व्याख्यान वाचनीय आहे. एक दोन दृष्टांत मात्र येथें घेणें शक्य आहे! स्वधर्मानें हवन करून अवशिष्ट पदार्थांचा उपभोग कसा कामीं पडतो पहाः-तें (हुतशेष) आपलें घरीं। कुटुंबेसीं भोजन करी। कीं भोग्यचि तें निवारी॥ कल्मषातें!। तें यज्ञावशिष्ट भोगी। म्हणोनि सांडिजेतो अघीं। जयापरी महारोगी। अमृत सेवनीं॥ कीं तत्त्वनिष्ठ जैसा। नागवे (सांपडत नाहीं) भ्रांति लेशा। तो शेष भोगी तैसा। नाकळे (सांपडत नाहीं) दोषा॥ म्हणोनि स्वधर्में जें अर्जें (संपादिलें जातें)। तें स्वधर्मेंचि विनियोगिजे। मग उरे तें भोगिजे। स्वधर्मेंसीं॥....हें संपत्ति जात (पदार्थ मात्र) आघवें (सर्व)। हवनद्रव्य मानावें। मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुषा॥....हें (अन्न) न म्हणावें साधारण। अन्न ब्रह्मरूप जाण। हें जीवन हेतु कारण। विश्वा यया॥

पंडित म्हणतातः—यज्ञ केले नाहींत तर पर्जन्यवृष्टि होत नाहीं. आवर्षणामुळें जीवादिकांची झालेली हिंसा यज्ञ न करणारांच्या माथीं पडते! पंचसूनादोष निवारण होतात पण त्यानें स्वर्ग मिळत नाहीं, असें यांचें मत आहे. दया असेल तरच हीं पातकें नष्ट होतात.

दया नसतां प्रायश्चित्त घेतलें तर 'पिशाचाचे हातीं कोलीत' दिल्याप्रमाणें 'प्रायश्चित्तें पापें.जळतीं' म्हणून मनुष्यें पुनः पुनः पापें करितातच ! सारांश आचार्यांसकट सर्व भाष्य व टीकाकारांस पंडितांनीं टोमणा मारिला आहे तो वाचण्यासारखा आहे. ॥ १३ ॥

इतश्चाधिकृतेन कर्म कर्तव्यम् । जगच्चक्रप्रवृत्तिहेतुर्हि कर्म । कथमिति, उच्यते—

याप्रमाणें जो अधिकारी आहे, कर्म करण्याचाच ज्याचा अधिकार आहे, त्यानें कर्म करावें; अथवा त्याला कर्मच केलें पाहिजे.

शिष्य—स्वतःच्या कल्याणासाठीं किंवा स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं कर्म कोणीं करावें व तें कां करावें हें मला समजलें. कर्म करण्याचा येवढाच हेतु आहे काय ?

गुरु—नाहीं. लोककल्याणासाठीं व जगाची रहाटी चालविण्यासाठींही कर्म केलें पाहिजे. कर्म हें जगाच्या सुस्थितीचें कारण आहे, कसें म्हणशील तर सांगतों ऐकः—

अन्नाद्भवन्ति भूतानि
पर्जन्यादन्नसंभवः ॥
यज्ञाद्भवति पर्जन्यो
यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

अन्नात् (अन्नापासून) **भूतानि** (सचेतन वस्तु वृक्ष सृष्टीसुद्धां प्राणी मात्र) **भवन्ति** (उत्पन्न होतात.) **पर्जन्यात्** (पर्जन्यापासून) **अन्नसंभवः** (अन्नाची उत्पत्ति होते.) **यज्ञात्** (यज्ञयागादिकांच्या योगानें) **पर्जन्यः** (पाऊस) **भवति** (उत्पन्न होतो, पडतो)—आणि—**यज्ञः** (यज्ञयागादिक हे) **कर्मसमुद्भवः** (कर्मापासून उत्पन्न होतात.)—सारांश कर्माच्या योगानें यज्ञयाग सिद्ध

होतात, यज्ञामुळें पर्जन्यवृष्टि होते, वृष्टीपासून अन्न निर्माण होतें आणि अन्नापासून प्राणीमात्राचें संरक्षण व प्रजावृद्धि होते.–पुनः प्रजा कर्म करितात. यज्ञयाग होतात–असें जगाचें रहाटगाडगें कर्मानें सुव्यवस्थित चालतें —

अन्नाद्भवन्तीति । अन्नाद्भुक्ताल्लोहितरेतःपरिणतात्प्रत्यक्षं भवन्ति जायन्ते भूतानि, पर्जन्याद्वृष्टेरन्नस्य संभवोऽन्नसंभवः, यज्ञाद्भवति पर्जन्यः—

" अग्नौ प्रास्ताऽऽहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते ।
आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजाः " इति स्मृतेः ।

यज्ञोऽपूर्वं स च यज्ञः कर्मसमुद्भव ऋत्विग्यजमानयोश्च व्यापारः कर्म ततः समुद्भवो यस्य यज्ञस्यापूर्वस्य स यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

शिष्य—गुरुजी ! अन्नापासून प्राणी जगतात हें समजतें; पण अन्नापासून प्राणी निर्माण होतात हें मात्र समजत नाहीं.

गुरु—हा वेड्या ! ईश्वराच्या वरीं असाच कांहीं चमत्कार आहे कीं जें काय आपण खातों, त्यापासून मानवी प्राण्याचें शरीर संरक्षण करणारीं रक्त, मांस, अस्थि, मज्जा इत्यादि उत्पन्न होतात इतकेंच नाहीं तर अन्नरसापासून संतती उत्पन्न करणारें शुक्र शोणितही निर्माण होऊन त्यापासून प्रजावृद्धिही होते ! सारांश यावरून कर्मठांनीं ध्यावयाचें शिक्षण इतकेंच कीं आपण योग्य रीतीनें उपभुक्त अन्नाचे जर जीवित संरक्षण व प्रजावृद्धि असे सत्परिणाम होतात, तर उपभोगास अवश्य असें कर्म करितांनाही आपण आपल्यास व दुसऱ्यास उपयोगी पडेल असें सत्कर्मही केलें पाहिजे. असो;–हें अन्न पर्जन्याच्या सुवेळीं झालेल्या वृष्टीपासून उत्पन्न होतें, व पर्जन्याचा उद्भव यज्ञयागादिक कर्मांपासून होतो.

शिष्य—भगवन् ! बाकीचें सर्व लक्ष्यांत आलें, पण यज्ञयागादि कर्म आणि पर्जन्यवृष्टि यांचा मात्र कार्यकारणसंबंध समजला नाहीं.

गुरु—बरोबरच आहे. तुझ्यासारख्या प्रत्यक्षवाद्याला प्रत्यक्ष प्रमाण सांगितल्याखेरीज हा संबंध लक्ष्यांत येणार नाहीं. स्मृतिकारांनीं म्हटलें आहे: ' अग्निमध्यें अगर त्या देवतेच्याद्वारानें विधिपूर्वक समर्पण केलेली आहुति सूर्य देवतेस प्रसन्न करून येते; सूर्यापासून पर्जन्यवृष्टि होते; वृष्टीपासून अन्न व अन्नापासून प्रजा, असा उत्पत्ति नियम आहे. '

आलीकडील अनुभवजन्य शोधांवरूनही असेंच ठरलें आहे कीं अत्यंत उष्णता उत्पन्न झाली म्हणजे सूर्यकिरणद्वारा पृथ्वीवरील पाण्याची वाफ होऊन ती आकाशांत वायुरूपानें जाते आणि तेथें मेघरूपानें परिणत होऊन पुनः पृथ्वीवर पर्जन्यरूपानें अवतीर्ण होतें. वरील स्मृतिकारांनीं दिलेला सिद्धांत व अलीकडील अनुभव, तसेंच साभ्र आकाशांतून तोफा वगैरे उडविल्या असतां पर्जन्य पडेल ही कल्पना, हीं सर्व एकार्थक नाहींत असें कोण म्हणेल? फार तर पूर्वकालीन लोकांच्या देवतांस महाभूतांचें स्वरूप दिलें म्हणजे झालें! कर्मानें सर्व गोष्टी साध्य आहेत हा प्राचीन व अर्वाचीन सिद्धांत सामान्यतः अबाधितच राहतो. असो;—यज्ञ हें अपूर्व, अलौकिक फल देणारें कर्म आहे. कारण यज्ञ हा कर्मापासून, ऋत्विगादि याज्ञिक व यजमान यांनीं श्रद्धापूर्वक केलेल्या कर्मापासूनच, उत्पन्न होतोना? आतां समजला कर्म आणि पर्जन्यवृष्टि यांमधील अन्योन्य कार्यकारण संबंध? सारांश प्राण्यास संरक्षण करणारें व त्यांची वृद्धि होण्यास कारणीभूत होणारें कर्म यावरून किती प्रबल आहे ते पहा.—

मधु०—द्विवेदी, पर्वते—अष्टाध्यायी कांड व जनकयाज्ञवल्क्य-संवादरूपी षट्प्रश्नी वाचनीय आहे, असें म्हणतात.

प्रपा०—भवन्ति = होतात, राहतात व वाढतात. ' **अन्नादेव हीमानि भूतानि जायन्ते वर्धन्ते** ' अर्थ स्पष्ट आहे. यज्ञ = पर्जन्येष्टि.

रामानुज विशेष सांगत नाहींत. यज्ञापासून पर्जन्य होतो हें मात्र शास्त्रानें समजतें; बाकीचीं सर्व प्रमाणसिद्ध आहेत.

द्वैतवाद्यांचें मत व **ज्ञानेश्वरांचें** मत सोळाव्या श्लोकाच्या शेवटीं सांगतों. ॥ १४ ॥

तद्य—

पुनः तें कर्मही

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि
ब्रह्माक्षरसमुद्भवम् ॥
तस्मात्सर्वगतं ब्रह्म
नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

कर्म (यज्ञयागास उत्पन्न करणारें कर्म) **ब्रह्मोद्भवं** (शब्दब्रह्मापासून, वेदापासून, उत्पन्न झालें आहे)-असें-**विद्धि** (जाण)-आणि-**ब्रह्म** (तो वेद) **अक्षरसमुद्भवं** (ज्याचा कधींही नाश होत नाहीं अशा अविनाशी तत्त्वापासून उत्पन्न झाला आहे हें ध्यानांत ठेव.) **तस्मात्** (ह्मणून) **सर्वगतं ब्रह्म** (सर्वांस व्यापून टाकणारें हें शब्दब्रह्म अगर हें वेदत्रय) **नित्यं** (सदोदित) **यज्ञे** (यज्ञाचें ठायीं) **प्रतिष्ठितम्** (रममाण झालेलें आहे.) सारांश कर्म वेदापासून व वेदत्रय हें त्या अविनाशी परमात्म्यापासून निर्माण झालें आहे. ह्मणून सर्वव्यापी वेद हे सदोदित यज्ञयागामध्यें गुंतून राहिलेले आहेत.

कर्मेति । कर्म ब्रह्मोद्भवं ब्रह्म वेदः स उद्भवः कारणं यस्य तत्कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि जानीहि, ब्रह्म पुनर्वेदाख्यमक्षरसमुद्भवम्, अक्षरं ब्रह्म परमात्मा समुद्भवो यस्य तदक्षरसमुद्भवं ब्रह्म वेद इत्यर्थः । यस्मात्साक्षात्परमात्माख्यादक्षरात्पुरुषनिश्वासवत्समुद्भूतं ब्रह्म तस्मात्सर्वार्थप्रकाशकत्वात्सर्वगतम् । सर्वगतमपि सन्नित्यं सदा यज्ञविधिप्रधानत्वाद्यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

शिष्य—गुरुजी ! कर्माचें जनन कसें झालें ?

गुरु—कर्माचें जनन शब्दब्रह्मापासून, वेदापासून, झालें असें ध्यानांत धर. पुनः हें 'वेद' नांवाचें ब्रह्म अविनाशी अशा पर-

ब्रह्माचें स्वरूप असणारा जो परमात्मा, त्यापासून उत्पन्न झालें आहे. बरें ! सारांश ज्या अर्थी अविनाशी अशा परमात्म्याच्या निःश्वासापासून वेदाची प्रत्यक्ष उत्पत्ति आहे, त्या अर्थी तो वेद सर्व पदार्थांवर उजेड पाडणारा, सर्व प्रश्नांचा उलगडा करणारा, तात्पर्य सर्वव्यापी आहे हें सांगावयास नकोच. असो; हें ब्रह्म सर्वव्यापी आहे तरी, यज्ञकर्म हें सर्व कर्मांत प्रधान, श्रेष्ठ, आहे; म्हणून हें ब्रह्म यज्ञाचे ठिकाणीं सदैव साक्षित्वानें असतें.

श्रीधर—दुसऱ्या ओळींतील ' ब्रह्माचा ' अर्थ परब्रह्म असा घेतात. पण हें न्याय्य नाहीं असें **धनपति** म्हणतात.

मधु० ' ब्रह्मोद्भवं = ब्रह्म, शब्दब्रह्म आहे प्रमाण ज्याचें असें कर्म. ' वेदालाही प्रामाण्य आलें तें अक्षर असें जें शुद्ध ब्रह्म, त्यापासून आलें आहे, म्हणून वेद हें अपूर्व साधन आहे. यज्ञ तेथें वेद व वेद तेथें ब्रह्म असें साहचर्य आहे. निष्पापी अशा परमात्म्याच्या निश्वासापासून सहजवृत्तीनें वेद निर्माण झाले म्हणून वेद अपौरुषेय आहेत व ते तसे आहेत म्हणून त्यांत भ्रम, प्रमाद अपाटव, विप्रलिप्सा (ठकविणें) वगैरे दोष नाहींत.'

प्रपाकार व **चतरजी** असेंच म्हणतात. देवांस सुद्धां सर्वगत ब्रह्माची प्राप्ति यज्ञमार्गानें होते हा यांनीं विशेष काढिला आहे. ' **यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः** ' अर्थ उघड आहे.

सर्वगामी प्रकाशाला आपलें पूर्णस्वरूप प्रकट करण्यास पारदर्शक पदार्थच विशेष उपयोगी पडतात; अतएव वेदामध्यें ब्रह्माचें अस्तित्व सौकर्यानें प्रकट होतें असें **चतरजी** म्हणतात.

शंकरा०ः—सर्व वर्णाश्रमांची कर्तव्यकर्में वेदाच्या अध्ययनानें समजतात असें ' यज्ञे प्रतिष्ठितम् ' यानें सुचविलें !

रामानुज—' ब्रह्म ' = प्रकृति. सारांश कर्म हें प्रकृतीचा परिणाम जें शरीर व नामरूपादि अन्न, त्यापासून उत्पन्न होतें. ' अक्षर ' = जीवात्मा. अन्नपानादिकांच्या योगानें तृप्त झालेला जो जीवात्मा त्याचें अधिष्ठान जें शरीर तें सर्व कर्म करण्यास समर्थ आहे.' असा अर्थ हे आचार्य कां करितात हें समजत नाहीं. कर्मठाला तरी हा अर्थ संमत होणार नाहीं.

डेव्हिस साहेब 'ब्रह्मदेव' असा ब्रह्माचा अर्थ करून 'वेद' "या आचार्यकृत-अर्थी ब्रह्मशब्दाचा उपयोग गीताकारानें कोठें केला नाहीं." असें म्हणतात. पण या बिचाऱ्या विदेशियास काय ठाऊक कीं गीताशास्त्रकार येथें कर्मठांच्या सिद्धां०

तांचें परीक्षण करीत असतां त्यांच्या म्हणण्याचा अनुवाद करीत आहेत, व स्वमत सांगत नाहींत हें ! ॥ १५ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं
नानुवर्तयतीह यः ॥
अघायुरिन्द्रियारामो
मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

एवं (याप्रमाणें) **प्रवर्तितं चक्रं** (अनादिकालापासून चालत असलेल्या जगचक्रानुसार) **यः न अनुवर्तयति** (जो कर्मठ आपलें वर्तन ठेवीत नाहीं, या विश्वनियमानुसार जो कर्माधिकारी आपलें कर्तव्य करीत नाहीं)-तो-**अघायुः** (पापजन्मा, पापामध्येंच आपलें जीवितसर्वस्व खर्च करणारा)-व-**इन्द्रियारामः सः** (आपल्या इंद्रियांस मात्र तुष्ट करणारा तो- स्वार्थी मूर्ख पुरुष-) **पार्थ** (हे पार्था !) **मोघं** (व्यर्थ) **जीवति** (जगतो). सारांश इहलोकीं व परलोकीं कल्याणदायक होणारें व जगाचें चक्र व्यवस्थित रीतीनें चालविणारें जें कर्म, तें जो वर सांगितल्याप्रमाणें चालवित नाहीं, सारांश जो कर्मठ सृष्टिनियमाविरुद्ध चालतो, तो शुद्ध पापमूर्ती आणि केवळ आपल्या इंद्रियांचा, क्षणोक्षणीं उत्पन्न होणाऱ्या विकारांचा, बंदा गुलामच होय ! अर्जुना ! याप्रमाणें विश्वनियमाविरुद्ध कर्म करणाऱ्या पुरुषाचें ऐहिक व पारमार्थिक सार्थक न झाल्यामुळें असला कर्माधिकारी पुरुष ' आला, आला व्यर्थ जन्मासि आला ! गेला गेला, बापुडा व्यर्थ गेला ' याप्रमाणें व्यर्थ जन्मास आला असें ह्मणावयाचें दुसरें काय ?

एवमिति । एवमित्थमीश्वरेण वेदयज्ञपूर्वकं जगच्चक्रं प्रवर्तितं नानुवर्तयतीह लोके यः कर्मण्यधिकृतः सन्नघायुरघं पापमायुर्जीवनं यस्य सोऽघायुः पापजीवन इति यावत्, इन्द्रियाराम इन्द्रियैराराम आरमणमाक्रीडा विषयेषु यस्य स इन्द्रियारामो मोघं वृथा हे पार्थ स जीवति

तस्मादज्ञेनाधिकृतेन कर्तव्यमेव कर्मेति प्रकरणार्थः। प्रागात्मज्ञाननिष्ठायोग्यताप्राप्तेस्तादर्थ्येन कर्मयोगानुष्ठानमधिकृतेनानात्मज्ञेन कर्तव्यमेवेत्येतत् 'न कर्मणामनारम्भात्' इत्यत आरभ्य 'शरीरयात्राऽपि च ते न प्रसिध्येदकर्मणः' इत्येवमन्तेन प्रतिपाद्य 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र' इत्यादिना 'मोघं पार्थ स जीवति' इत्येवमन्तेनापि ग्रन्थेन प्रासङ्गिकमधिकृतस्यानात्मविदः कर्मानुष्ठाने बहुकारणमुक्तं तदकरणे च दोषसंकीर्तनं कृतम् ॥ १६ ॥

याप्रमाणें वेदांनीं सांगितलेलीं यज्ञयागादिक कर्मै करून ईश्वरनिर्मित जगाचें, विश्वाचें, चक्र सुरळीत चाललें आहे तसेंच, जो चालवित नाहीं, विश्वाच्या नियमाप्रमाणें चालत नाहीं, तो पापी होय; त्याची शरीरयात्रा पापमूलक होय; तो केवळ इंद्रियाकरवीं विषयांचा उपभोग घेण्याकरितां अथवा उपभोग तरी कसला ? एकीकडून विषय घेऊन दुसरीकडून टाकण्याकरितांच केवळ जन्मास आला नव्हे काय? —'नळी फुंकिली सोनारें । इकडून तिकडे गेलें वारें' या न्यायानें नळीप्रमाणेंच स्वतःच्या जन्माचा कोणताही उपयोग न करून घेणारा प्राणी तो होय.–तो व्यर्थ जन्मास आला. सारांश त्याचा जन्म व्यर्थ गेला हा प्रकरणार्थ आहे.

शिष्य—महाराज ! असें आहे म्हणून प्रत्येकानें कर्म केलेंच पाहिजे असें ईश्वराज्ञेनेंच ठरलें. सगळ्यांनींच कर्मनिष्ठ बनलें पाहिजे. आतां ज्ञाननिष्ठेला अवकाशच नाहीं ! अतएव ईश्वरप्रणीत वेदवाक्यांवरून ज्ञानमार्ग खोटा ठरला. व—

गुरु—थांब, थांब, अमळ सावकाश बोल व स्मरणशक्तीला थिजवून टाकूं नकोस ! कर्माला अधिकारी असणाऱ्या अज्ञान्यासाठीं हें प्रकरण सुरूं केलें आहे असें आरंभीं व आतांच श्लोकाचा अर्थ करितांना सांगितलें ना ? प्रवृत्तिमार्गांत राहणाऱ्या अज्ञ पुरुषानें

अवश्यमेव कर्म केलें पाहिजे असा हा तात्पर्यार्थ आहे. ज्ञानी पुरुषाचें प्रकरणच प्रस्तुत नाहीं. कर्माला मात्र अधिकारी असून जो कर्म करीत नाहीं तो व्यर्थजन्मा होतो असा अभिप्राय आहे. जोंपर्यंत आत्मज्ञानानें मुक्ति मिळविण्याची योग्यता प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत ज्ञानमार्गास अनधिकारी अशा अविद्वान पुरुषानें सकामत्वानें अगर निष्कामत्वानें विहित कर्म केलेंच पाहिजे. सकाम कर्म केल्यास स्वतःचे व प्रसंगोपात्त जगाचें कल्याण होईल व स्वर्गलोकीं सुखही मिळेल, पण जन्म मरण सुटणार नाहीं ; सारांश कामुक पुरुष अनादि जन्ममरणात्मक संसारांत पडेल व जगाची रहाटी चालवील. पण विषयाचा, जगाचा खरा कंटाळा येऊन ज्यानें, चित्त निर्मळ व एकाग्र होण्यासाठीं, निष्काम कर्म करण्यास आरंभ केला त्याची चित्तशुद्धि सत्वरच होऊन तो ज्ञानमार्गास योग्य होतो, लोकहित करितो व अनुकूल प्रसंग प्राप्त झाल्यावर मुक्त होतो. याप्रमाणें अज्ञ पुरुषानें विहित कर्म केलेंच पाहिजे असें ठरलें. पण अज्ञ असूनही जो कर्मच करीत नाहीं किंवा विहित कर्म करीत नाहीं तो पापजन्मा होऊन जन्ममरणांतून सुटण्याच्या आशेंतून प्रायः मुक्तच होतो ! असो ; तेव्हां 'अशा अज्ञ पुरुषानें धर्मोक्त कर्म करावें.' हा विषय 'कर्माचा आरंभच न केल्यानें' या चवथ्या श्लोकापासून तों 'कर्म केलें नाहींस तर शरीरयात्राही सिद्धीस जाणार नाहीं' या आठव्या श्लोकापर्यंत प्रतिपादन केला आहे. तथापि पुनः या विषयाच्या दृढीकरणार्थ पुष्कळशी प्रमाणें दाखविण्याच्या, व कर्म केलें नाहीं तर कोणते दोष उत्पन्न होतात त्याचें संकीर्तन करण्याच्या, हेतूनें 'यज्ञाशिवाय इतर कर्में करणाऱ्या' या नवव्या श्लोकापासून तों 'तो व्यर्थ जगतो' या सोळाव्या श्लोकापर्यंत आत्मज्ञान नसणाऱ्या आणि म्हणून कर्माधिकारी असणाऱ्या पुरुषानें कर्तव्य कर्म केलेंच पाहिजे असें साहजिक रीतीनें सांगितलें आहे, ओघास आलें म्हणून सांगितलें आहे.

अद्वैतटीकाकारांत ऐकमत्यच आहे. 'परब्रह्म, वेद, कर्मबुद्धि, कर्म, यज्ञ, पर्जन्य, अन्न, जीव, कर्मबुद्धि हें चक्र जो कर्मठ चालवीत नाहीं तो पापी होय. कर्मठानें मुक्तीसाठीं व लोकहितासाठीं कर्म केलेंच पाहिजे.

रामानुज हे कर्मठ व ज्ञानी या उभयतांनींही कर्म केलेंच पाहिजे असें या श्लोकानें ठरवितात. हे ज्ञानकर्मवादी आचार्य तिसरा श्लोक कसा विसरतात न कळे! कर्म न करणाऱ्या कर्माधिकाऱ्याचें आयुष्य पापमूलक, पापपरिणामी होतें, त्यास आत्मावलोकन करितां येत नाहीं, तो केवळ इंद्रियारामी (विषयलंपट) होतो, आत्मारामी होत नाहीं, हे विचार योग्यच आहेत.

द्वैतवादी. श्लोक १४ तें १५:—'यज्ञामध्यें समर्पण केलेल्या हविर्भागांनीं पर्जन्याभिमानी देवता, प्रसन्न होऊन अग्नीच्या व वायूच्या साहाय्यानें पर्जन्यवृष्टि करितात. यज्ञ हें कर्म परमेश्वरनिर्मित आहे **'स एष साधु कर्म कारयति,'** (तोच ईश्वर मानवाकरवीं सत्कर्म करवितो.) परमेश्वर ह्या अक्षरनामक वेदांनीं प्रतीत होतो. **'यश्छन्दसामृषभो विश्वरूपः'** सारांश परमेश्वरच सर्व प्राण्यांस कर्म करण्याला प्रवृत्त करितो! आणि जो पुरुष या परमेश्वरप्रेरणेनुरूप सत्कर्म करीत नाहीं, यज्ञयागादिक कर्मे करून जगच्चक्र व्यवस्थित रीतीनें चालविण्यास साहाय्य होत नाहीं, तो पाप करण्यासाठींच जन्मला, दुष्ट इंद्रियांच्या संगतीनें अचेतन विषयांमध्येंच रममाण होण्यासाठीं निर्माण झाला असें म्हणावें. पूर्वजन्मांतील सत्कृत्यांनीं ज्याला मनुष्यजन्म लाधला त्यानें जर पापकर्म करण्यामध्येंच आयुष्यव्यय केला तर तो अचेतनभूतांपेक्षांही दुर्दैवी होय. असो; ईश्वरनिर्मितचक्र जर आपण सुरळीत चालविलें तर केवळ ईश्वराच्या अनंत वैभवासही भर घालण्याचें श्रेय आपल्यास मिळतें इतकेंच नव्हे, तर तें तसें करणें पुण्यजनक होऊन स्वतःचीही मोक्षसिद्धि होते. पापी माणसें मात्र जगाच्या विघाताला कारण होतात. अतएव प्रत्येक वर्णांतील व प्रत्येक आश्रमांतील ज्ञानी व अज्ञानी लोकांनीं कायिक, वाचिक, अगर मानसिक कर्म केलेंच पाहिजे!

ज्ञानेश्वर आचार्यांप्रमाणेंच व्याख्या करितात. कर्माधिकारी असून कर्म न करणाऱ्या संबंधें म्हणतातः—...**जो कुकर्मे इंद्रियांसि। उपेगा** (इंद्रियांच्या उपयोगाला) **गेला॥ तें जन्मकर्म सकळ। अर्जुना! अति निष्फळ। जैसें कीं अभ्रपटळ। अकाळींचें!॥ कां गळां स्तन अजेचे** (शेळीचे)**। तैसेंच जियालें** (जीवित) **देखें तयाचें। जया अनुष्ठान स्वधर्माचें। घडेचि ना!॥**

सर्वगत ब्रह्म यज्ञांतच कसें प्रगट होतें याविषयीं **पंडितांचे** दृष्टांत (गाईच्या सर्वांगांत दुग्ध असून ते स्तनांतच प्रादुर्भूत होतें; किंवा काष्टामध्यें अग्नि असूनही तो मंथन केल्याशिवाय प्रकट होत नाहीं वगैरे) मनोहर आहेत.

येथपर्यंत कर्ममार्गमहिमा व कर्ममार्गाचें परीक्षण झालें. यांत काय काय सांगितलें आहे, व नुसत्या कर्ममार्गानें मोक्ष मिळतो ह्याचें

खंडन कसें केलें आहे याचा थोडक्यांत विचार करून पुढच्या मार्गक्रमणास लागतों.

भगवंतांनीं अर्जुनास ज्ञान व कर्ममार्गांचा उपदेश केला त्यावरून अर्जुनानें आपला असा मिथ्या समज करून घेतला कीं मुख्य पुरुषार्थ जो मोक्ष तो साधण्याला ज्ञान व कर्म हीं दोन्हीं साधनें आहेत; आणि ज्ञानापेक्षां कर्मांत भानगडी फार, तो मार्गही कमी योग्यतेचा, शिवाय आपल्या हातून घोरसंग्राम होऊन त्यांत कुलवध होणार व महापातकांचे मात्र आपल्यास धनी व्हावें लागणार, तेव्हां कर्माच्या खटपटींत पडण्यापेक्षां कर्मास आरंभच केला नाहीं किंवा कर्माचा आयत्या वेळीं त्यागच केला म्हणजे ह्या सर्व भानगडी नाहींशा होऊन फुकाचा मोक्ष आपल्या हस्तगत होईल ! ही पार्थाची मिथ्या समजूत नाहींशी करण्यासाठीं व ज्ञानमार्गाची योग्यता प्राप्त होण्यास कांहीं विशेष अधिकार यावे लागतात हें सिद्ध करण्यासाठीं, भगवान तिसऱ्या अध्यायाचा उपक्रम करून ज्ञानमार्ग म्हणजे नुसता आळशी, नास्तिक, मंदवृत्तीच्या व कर्तव्यपराङ्मुख लोकांच्या तामसीवृत्तीनें शोधून काढलेला मार्ग आहे ह्या दुर्मताचेंही खंडन करण्यासाठीं म्हणतातः–" अर्जुना ! ज्ञानमार्गानें जाणारास चित्तशुद्धीची व ज्ञानाची आवश्यकता आहे. हें साध्य झालें नसेल त्यानें कर्ममार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. भलत्यानें भलता मार्ग स्वीकारल्यास इष्टकार्य सफल होणार नाहीं. अर्जुना ! कोणत्याही कर्माला आरंभच केला नाहीं, किंवा देहप्रारब्धानें, समाजप्रारब्धानें, अगर विश्वांतील परिस्थितीनें प्राप्त झालेलें कर्तव्यच आपण केलें नाहीं म्हणजे ज्ञानमार्ग साध्य होतो, ही जी तूं आपली समजूत करून घेतली आहेस ती भ्रामक होय. कारण ज्याला म्हणून जन्म प्राप्त झाला त्यानें ' मी कोणतेंच कर्म करणार अगर करविणार नाहीं ' असें म्हटलें तर एक क्षणभरही चालावयाचें नाहीं. प्रकृतीचा, विश्वचक्रांत सांपडलेल्या वस्तूंचा, धर्मच चलनवलन, कार्य प्रतिकार्य, करण्याचा आहे. स्वस्थ बसलें, जीव दिला, तरी तें तें कर्म होतेंच होतें. या विश्वांत स्थिर

असें एका ब्रह्मावांचून कांहीं नाहीं. तेव्हां अज्ञानी जीवानें कर्म टाकून देईन ' असें म्हटलें तर चालावयाचें नाहीं. ' मी इंद्रियव्यापारच करणार नाहीं ' असें अज्ञानी मनुष्य म्हणाला तर चित्तशुद्ध न झालेल्या त्या पुरुषाच्या हातून मानसिककार्य होतें, तो विषयाचें चिंतन करीत बसतो, तें तरी कर्मच! आणि हेंही जन्ममरणांत घालणारें कर्म होतें. मद्यमांसादिकांस स्पर्श केला नाहीं, किंवा प्रत्यक्ष व्यभिचार केला नाहीं, आणि मद्यमांसाचें अगर सुंदर परस्त्रियांचें नुसतें चिंतनच केलें तरीही अभक्ष्यभक्षणाचा व व्यभिचाराचा पूर्ण दोष या चिंतकाचें माथीं पडून पुनः वासना वाढते व तदनुसार कर्म होतेंच! यापेक्षां मनाला आळा घालून विहित कर्मे राजरोस करणारा पुरुष श्रेष्ठ होय. म्हणून अर्जुना! जोंपर्यंत तुझ्या वासनेचा क्षय झाला नाहीं, कुलसुखाची व धर्माधर्माची स्वर्गादिसुखाची तुझी आशा नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत तुला देहधारण केलेंच पाहिजे व तें करण्यासाठीं श्रुति, स्मृति, आचार, व्यवहार इत्यादिकांच्या अनुरोधानें तुला सत्कर्म केलेंच पाहिजे. हें सत्कर्म कोणते म्हणशील तर ज्याच्या योगानें स्वार्थबुद्धि दिवसानुदिवस कमी होत जाते तें होय. आपल्याशिवाय जे इतर लोक त्यांचा, पूर्वकालीन ऋषींचा व देवतांचा संतोष जेणेंकरून होईल अशीं यज्ञयागादिक कर्मे तुला अवश्य आहेत. हीं कर्मे मुमुक्षूंस बद्धक होत नाहींत, कारण यांच्या योगानें स्वतःच्या उपभोगाची वासना व अहंकार हीं नष्ट होत जातात. हीं नष्ट झालीं व नित्यानित्यविवेक जागृत होऊन आपल्या स्वस्वरूपांत जाऊन मिळण्याची तीव्र इच्छा झाली म्हणजे तो पुरुष ज्ञानाला अधिकारी होतो. " याप्रमाणें भगवंतांनीं ज्ञानमार्गाविरुद्ध येणारे आक्षेपांचें व स्वतःच्या अज्ञानानें किंवा लोकांस व आपणांस फसविण्याच्या दुष्ट हेतूनें ज्ञानमार्गाचा अपव्यय करणाऱ्या दुष्ट भोंदूंचें निराकरण केलें. नंतर ज्ञानमार्गास वस्तुतः साधन असणारा परंतु कर्मठांच्या अभिमानातिरेकानें मात्र मुख्यत्व पावलेला जो कर्ममार्ग त्याच्या प्रतिपादकांचें म्हणणें सांगून एक शब्दांतच कर्ममार्गाची योग्यता एका दृष्टीनें मात्र ठरविली आहे. दुसऱ्या दृष्टीचा

विचार पुढें करूं. कर्माची आवश्यकता सांगितल्यावर अर्थात कर्मठांच्या म्हणण्याचा विचार करणें जरूरच प्राप्त झालें. कर्मठ म्हणतातः– " विश्वाची उत्पत्ति झाली, तेव्हांच यज्ञयागादिकांची उत्पत्ति होऊन जीवानें सत्कर्म करावें, आणि सत्कर्मांच्या योगानें जीवास येथें, ह्या जन्मीं अगर अन्य जन्मीं किंवा स्वर्गलोकांत सुख मिळावें, अशी योजना सृष्टिकर्त्यानें प्रथमपासूनच अस्तित्वांत आणिली आहे. येथें व अन्यत्र सुख, विषयसुख मिळवावें हाच आमचा मोक्ष होय! यज्ञयागादिकांनीं देवतांची अगर देवतारूपी महाभूतांची आराधना केली असतां ते प्रसन्न होऊन कर्मकर्त्यास सुख, विषयसुख अथवा मोक्ष देतात. कर्म करणें व त्याचा उपभोग घेणें व तोही उपभोग देवतादत्त म्हणून त्याचा स्वीकार करून पुनः कर्म करणें हेंच जीवांचें कर्तव्य आहे, यासच मोक्ष म्हणावें. (पहा अ० ३ श्लोक १० ते १४.) अपौरुषेय अथवा अनादिसिद्ध वेदांनीं हा मार्ग सांगितला आहे व तोच अनुसरणें श्रेयस्कर आहे. जे लोक पितर, ऋषि, देवता वगैरेंस प्रसन्न करणारीं कर्में न करितां केवळ स्वतःचें म्हणजे स्वतःच्या इंद्रियांचें विषयसुख कसें वाढेल याची चिंतनिका करून तदनुसार कर्म करितात ते स्वतः चोर, पापी व व्यर्थजन्मी होतात, इतकेंच नव्हे, तर ते विश्वनियामकप्रणीत सद्व्यवस्थेच्या आड येऊन इतर लोकांसही तापदायक होतात. अतएव या दैविकदृष्टीनें कर्म केलेंच पाहिजे. ' दैविकदृष्टीनें कर्म करणारा पुरुष हळूहळूं निर्मळ होत जातो हा प्रकार निराळा; पण केवळ कर्ममार्गच म्हटला तर तो मोक्षद नाहीं असें ' सृष्ट्वा, ' (उत्पन्न करून) ' **इष्टकामधुक्** ' (इष्ट मनोरथ सिद्धीस नेणारा) ' **परस्परं भावयन्तः** ' (एकमेकांस सुख देणारे होत्साते,) ' **इष्टान् भोगान्** ' (इष्ट असे विषयभोग,) इत्यादि शब्दांनीं व ' कर्मापासून परंपरेनें जीवदशा व जीवापासून कर्म ' ही जी परिणाममाला सांगितली आहे त्यावरून, '**पुनरपि जननं पुनरपि मरणं**' हा या पंथाचा पुरुषार्थ आहे, विकारविरहित स्वरूपस्थिति ही नव्हे असें सुचविलें आहे. अहंकार व वासना जागृत ठेवणारा व आत्म्यास जन्ममरण आहे असें प्रतिपादन कर-

णारा निवळ कर्ममार्ग आपल्यास संमत नाहीं, ज्ञान उत्पन्न करणारें तें एक साधन मात्र आहे, असें याच अध्यायाच्या सतराव्या, अठराव्या व एकोणिसाव्या श्लोकांवरूनही सिद्ध होणार आहे.

असो; तेव्हां अधिकार प्राप्त न झालेल्या पुरुषानें संन्यास करणें जितकें अप्रशस्त आहे, तितकेंच कर्मानें मात्र मोक्ष मिळेल असें म्हणणें अप्रशस्त होय. ज्ञान आणि कर्म एकाकालीं संभवत नाहींत हें मागेंच सांगितलें आहे. सारांश ज्ञान होण्याला निर्मळ मनाची, विषयविरहित मनाची, जी आवश्यकता आहे, ती कर्मानें (काम्य कर्मानें नव्हे, निष्काम कर्मानें) साध्य व्हावयाची आहे, म्हणून अर्जुनासारख्या अज्ञानी पुरुषानें कर्मच केलें पाहिजे हें येथें दैविकदृष्टीनें, अपौरुषेय धर्मपुस्तकाच्या दृष्टीनें सिद्ध झालें. चांगलें कर्म कोणतें त्याचा विचार विसाव्या श्लोकापासून पस्तिसाव्या श्लोकापर्यंत यथासांग केला आहे. "Life is action and action is life" (जीवित म्हणजे कर्म आणि कर्म म्हणजे जीवित) असें ख्रिस्तानुयायी म्हणतात व कर्मानें मात्र मोक्ष आहे असाही एक त्यांचा एकपक्षी सिद्धांत आहे त्याचें परीक्षण पस्तिसाव्या श्लोकानंतर करूं, असें सांगून हें कर्मविषयक परीक्षण संपवितों. ॥ १६ ॥

एवं स्थिते किमेवं प्रवर्तितं चक्रं सर्वेणानुवर्तनीयमाहोस्वित्पूर्वोक्तकर्मयोगानुष्ठानोपायप्राप्यामनात्मविदा ज्ञानयोगेनैव निष्ठामात्मविद्भिः सांख्यैरनुष्ठेयामप्राप्तेनैवेत्येवमर्थमर्जुनस्य प्रश्नमाशङ्क्य स्वयमेव वा शास्त्रार्थस्य विवेकप्रतिपत्त्यर्थमेतं वै तमात्मानं विदित्वा निवृत्तमिथ्याज्ञानाः सन्तो ब्राह्मणा मिथ्याज्ञानवद्भिरवश्यं कर्तव्येभ्यः पुत्रैषणादिभ्यो व्युत्थायाथ भिक्षाचर्यं शरीरस्थितिमात्रप्रयुक्तं चरन्ति, न तेषामात्मज्ञाननिष्ठाव्यतिरेकेणान्यत्कार्यमस्तीत्येवं श्रुत्यर्थमिह गीताशास्त्रे प्रतिपिपादयिषितमाविष्कुर्वन्नाह भगवान्—

शिष्य—गुरु महाराज ! हें जें आतांपर्यंत आपण कर्ममार्गानें सृष्टीच्या नियमचक्राचें स्तोत्र गाइलें त्यावरून प्रत्येक मनुष्यानें आपण सांगितलेली नियममाला अंगीकृत करून त्याप्रमाणें वर्तन केलेंच पाहिजे असें सिद्ध झालें! अर्थातच ' ज्ञानयोगेन सांख्यानां ' (सांख्यांस ज्ञानमार्गानें पुरुषार्थ साध्य होतो) वगैरे भगवंतांनीं जें प्रथमतः व्याख्यान दिलें तें व्यर्थच झालें म्हणावयाचें! उघडच आहे. कर्ममार्गाला खंडित करूं पाहणाऱ्या व जीवित हें कर्ममूलक व कर्मप्रधान असतांही कर्मत्याग करूं पाहणाऱ्या व ज्ञानी म्हणवून घेणाऱ्या आलस्यग्रस्त पुरुषांची अशीच फजिती–

गुरु—थांब, थांब! पुनः लागलास जिव्हा लांब करून शब्दांचे तारे तोडायला! काय जबरदस्त कर्मतृष्णा आहे तुझी! असो; तुझ्या सारखाच प्रश्न अर्जुन करील हें सर्वसाक्षी व परमेश्वररूपी श्रीकृष्णास केव्हांच कळून चुकलें होतें. या प्रश्नाचें समाधान करण्यासाठींच पुढील दोन तीन श्लोकांची योजना भगवंतांनीं केली आहे.

शिष्य—किंवा गुरुजी! आपण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें असेंही म्हणतां येईल कीं निष्कामकर्मयोगाचें अनुष्ठान केल्यानें मात्र अज्ञानी म्हणजे आत्मतत्त्व न समजलेल्या पुरुषास प्राप्त होणारी जी सांख्यनिष्ठा अगर जो ज्ञानमार्ग आहे व ज्याचें अनुष्ठान आत्मज्ञान झालेले सांख्ययोगी लोकांस मात्र शक्य आहे त्या ज्ञानमार्गाला न पोहोंचलेल्या अज्ञानी लोकांनीं मात्र कर्मयोगाच्या साहाय्यानें हा ज्ञानमार्ग साध्य करून घ्यावा, म्हणजे ज्ञानमार्गाच्या प्राप्तीसाठीं आत्मज्ञान न समजलेल्या अज्ञानी लोकांना ज्ञान व्हावें एतदर्थच हा आतांच सांगितलेला कर्ममार्ग अनुसरावा. सारांश सर्वांनीं हा कर्ममार्ग अनुसरावा असा भगवंताचा उद्देश आहे, किंवा ज्ञान न झालेल्या वासनायुक्त पुरुषांचा वासनाक्षय होऊन त्यांस ज्ञानमार्ग सांपडावा एतदर्थ कर्मयोग आचरावा असा त्यांचा उद्देश आहे?

गुरु—आतां तूं अंमळमा शुद्धीवर आल्यासारखा दिसतोस. असो; असें कांहीं तरी अर्जुन विचारील असें भगवंतांस विदितच होतें

म्हणूनच त्यांनीं पुढील श्लोक अवतीर्ण केले आहेत. शिवाय अज्ञानी पुरुषानें कर्ममार्गाचें अनुसरण करावें असें अनेक वेळीं विस्तारानें सांगितल्यानंतर अर्जुनासारख्या चाणाक्ष पुरुषास वरील सारखी शंका येऊं नये असें धूर्त श्रोते म्हणतील व संन्यासपूर्वक ज्ञानमार्गाची निष्ठा केली तरच मोक्षप्राप्ति होणार, अन्यमार्गानें नाहीं, असा सिद्धांत करावयाचा आहे तो अपूर्वच आहे, याला प्रेरणापूर्वक झालेल्या उपनिषदादि ज्ञानमार्ग प्रदिपादन करणाऱ्या ग्रंथाचा आधार नाहीं अशी ही शंका श्रोते लोक कदाचित् घेतील त्या व ह्या शंकांचें निवारण करण्यासाठींही पुढील श्लोकाचा अवतार आहे. "त्या नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त अशा परब्रह्माचें ज्ञान झाल्यानंतर, मिथ्याज्ञानाचा लेश सुद्धां बाकी राहिला नाहीं असें ब्रह्मज्ञानी पुरुष काय करितात तें पहाः संसारांत असणारे आणि म्हणून मायेच्या, अज्ञानाच्या, भोंवऱ्यांत सांपडलेले जे देहाभिमानी व कर्माभिमानी मूढ लोक आहेत ते 'मला पुत्र पाहिजे, वित्त पाहिजे, भार्या पाहिजे' अशा वासनांनीं युक्त होत्साते कर्म करावयास लागतात. ज्ञानी लोक मात्र ह्या कर्मांचा सर्वथा त्याग करून देहप्रारब्धानें* प्राप्त झालेल्या कर्माचा, देह कायम राहील व इतरांस ज्ञानमार्ग दाखवितां येईल, इतकाच, अंगिकार करितात. बाकींच्या सर्व कर्मांचा त्याग करून ते लोक आत्मज्ञानाव्यतिरिक्त दुसरें कांहीं एक करीत नाहींत." ही जी श्रुति आहे त्या श्रुतीचाच अर्थ गीताशास्त्रामध्यें सांगितला आहे, अपूर्व असें कांहीं सांगितलें नाहीं हें श्रोतृवृंदास स्पष्टपणें कळावें एतदर्थ ही पुढील श्लोकांची योजना आहे; समजलास! यांतच कोणीं कर्म करावें, आणि कोणीं करूं नये याचा उलगडा झाला. आतां भगवान काय म्हणतात तें ऐक :—

---

* कर्मांचा उपभोगाशिवाय नाश होत नाहीं, असा हिंदुतत्त्वज्ञानाचा सिद्धांत आहे व हा सिद्धांत 'कारण उत्पन्न झालें असतां तें कार्यामध्यें परिणत झालेंच पाहिजे.' या आधुनिक अनुभवजन्य सिद्धांताचें समर्थनच करितो. असो; देह प्राप्त होतो, तो पूर्वकर्मांनें होतो; व ज्या कर्मांनें हा देह उत्पन्न झाला व अमुक भोग भोगल्याशिवाय त्याचा पात व्हावयाचा नाहीं, असें ठरलें; तें कर्म संपल्याशिवाय मोक्ष नाहीं असें अद्वैताचें तात्त्विक म्हणणें आहे. यावरून आत्महत्या करणें वगैरे अपकृत्यें पुनः संसारांतच घालणारीं आहेत हें उघडच आहे.

यस्त्वात्मरतिरेव स्या-
दात्मतृप्तश्च मानवः ॥
आत्मन्येव च संतुष्ट-
स्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

तु (परंतु) यः आत्मरतिः एव स्यात् (जो आत्मारामावर मात्र अत्यंत प्रीति करणारा असेल) च (आणि)—जो—मानवः (पुरुष) आत्मतृप्तः (आत्मचिंतनामध्येंच समाधान पावला असेल) च (आणि) आत्मनि एव संतुष्टः (आत्मलाभामध्येंच आनंदित झाला असेल) तस्य (त्याचें) कार्यं न विद्यते (करावयाचें असें कर्तव्य असत नाहीं.) सारांश ज्याच्या प्रीतीचा सर्व ओघ आत्म्यावर वळून तेथेंच लीन झाला, आत्मलाभ झाल्यामुळें ज्याला समाधान प्राप्त झालें आहे व ह्या लाभानें सर्व पुरुषार्थ साध्य झाल्यामुळें ज्याला आनंदाचा सर्व निधीच सांपडला आहे त्याला करावयाचें असें कांहींच नसतें.

यस्त्विति। यस्तु सांख्य आत्मज्ञाननिष्ठ आत्मरतिरात्मन्येव रतिर्न विषयेषु यस्य स आत्मरतिरेव स्याद्भवेदात्मतृप्तश्चाऽऽत्मनैव तृप्तो नान्नरसादिना मानवो मनुष्यः संन्यास्यात्मन्येव च संतुष्टः। संतोषो हि बाह्यार्थलाभे सर्वस्य भवति तमनपेक्ष्याऽऽत्मन्येव च संतुष्टः सर्वतो वीततृष्ण इत्येतत्। य ईदृश आत्मवित्तस्य कार्यं करणीयं न विद्यते नास्तीत्यर्थः ॥ १७ ॥

परंतु, अर्जुना! जो आत्मज्ञानी झाला, ज्याची विषयावरील भक्ती व वासना यांचा समूळ उच्छेद होऊन ज्याचें आत्मारामावरच निःसीम प्रेम बसलें, अन्नरसामध्यें म्हणजे खाण्यापिण्यामध्येंच ज्याचें

समाधान होत नाहीं, समाधानासाठीं जो आत्मचिंतनांत मात्र सदैव निमग्न असतो, (हत्ती, घोडे, पैसा, स्त्री, कीर्ति, अधिकार इत्यादि मिळालीं असतां आनंदानें नाचूं उडूं लागणारे सामान्य लोक असतात.) सामान्य लोकांस जो विषयानंद होत असतो त्याला लाथ मारून व सर्वत्र वासनाशून्य अथवा विरक्त होऊन जो नित्य, शुद्ध, अशा आत्मानंदांत विलीन होतो, सारांश जो सर्वथा आत्मज्ञानी झाला असेल, त्याला करावयाचें अगर मिळवावयाचें असें कांहींच उरत नाहीं. तात्पर्य त्याच्यासाठीं वर सांगितलेला कर्ममार्ग नाहीं. **ज्ञान्यास कर्म नाहीं व अज्ञान्यास आहे हा फलितार्थ होय.**

मधु०—'आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेव ब्रह्मविदां वरिष्ठः' ही श्रुति वरील अर्थ समर्थन करून असला सत्पुरुष सर्व ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ आहे, असें सांगते. **पर्वते** यांनीं आत्मा सुखरूप कसा यावर विस्तृत व्याख्यान या श्लोकावर टीका करतांना लिहिलें आहे; तें भाविकमुमुक्षूंनीं अवश्य वाचावें. **प्रपा०, श्रीधर, द्विवेदी** आचार्यानुसारेंच अर्थ करितात. **शंकरानंदांनीं** या श्लोकावर विस्तृत व्याख्यान लिहून 'अपरोक्ष ज्ञान्यास स्वतःसाठीं अगर इतरांसाठीं कर्म करण्याची आवश्यकता नाहीं,' कारण तो ज्ञानी स्वानुभवानें सर्वच ब्रह्म पाहतो म्हणजे दुसरे सर्वही प्राणी त्यास मुक्त झालेले दिसतात, व स्वतः तर तो मुक्तच असतो, अतएव त्याला स्वहित अगर परहित असें कोणतेंच साधावयाचें नसतें, म्हणून त्याला कर्म असणें संभवत नाहीं, असा विशेष आग्रहाचा अर्थ केला आहे, जोंपर्यंत शरीर आहे तोंपर्यंत **शंकरानंद** म्हणतात त्याप्रमाणें केवळ निष्क्रिय स्थिति होणें दुर्घट आहे हें पांचव्या श्लोकांत भगवंतांनीं सांगितलें आहे. देह दिसतो आहे तोंपर्यंत देहदृष्टीनें, इंद्रियदृष्टीनें, मन, बुद्धि, अहंकार इत्यादि दृष्टींनीं, सारांश सर्व अपूर्णदृष्टींनीं जगताचें भान होऊन भेदभाव दिसणारच व तो भेद नाहींसा करण्यासाठीं क्रिया करावी लागणार आहे. शुद्ध ब्रह्मदृष्टि झाल्यावर मात्र कर्म नाहीं हें सत्य आहे; पण शुद्ध ब्रह्मदृष्टि देहपात होईतोंपर्यंत साध्य व्हावयाची नाहीं असें मला वाटतें. तथापि जीवन्मुक्ताची स्थिति गीताशास्त्रांत व इतर ठिकाणीं वर्णन केली आहे; म्हणजे जीवन्मुक्त मनुष्यें असूं शकतात असें झालें. तेव्हां जीवन्मुक्ताचें, ब्रह्मनिष्ठाचें लक्षण, असें समजावयाचें कीं विचार-दृष्टीनें त्यांनीं भेदबुद्धीचा नाश केला व अहंभाव म्हणजे स्वार्थबुद्धि हिचाही सर्वथैव त्याग केला; त्यांचा स्वार्थ संपला हें खरें पण यावरून ब्रह्मादिस्थावरांत सर्व विश्वापैकीं प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या दृष्टीनें मुक्त झालें अशी त्याची

कल्पना होणें कठिण-नव्हे-असंभवनीयच आहे. सांगश मला असें वाटतें कीं ब्रह्मनिष्ठांचें सर्व कर्तव्य संपलें; याचा अर्थ हा कीं, स्वतःच्या हिताचें, स्वार्थाचें, त्यांचें सर्व कर्तव्य संपलें; मला स्वतःला उपभोग पाहिजे अशा अर्थाचें त्यांचें कर्म संपलें. तात्पर्य स्वतःच्या दृष्टीनें तो मुक्तच झाला. पण त्याच्यासारखें आत्मज्ञान ज्यांस झालें नाहीं, त्याच्यासारखी पूर्णदृष्टि ज्यांची झाली नाहीं, तेही लोक मुक्त झालें असें त्यानें म्हणणें म्हणजे 'माझ्यासारखाच दूधभात हल्लींच्या दुष्काळांतही सर्वांनीं खावा' असा हुकूम सोडणाऱ्या राजाप्रमाणेंच होय! सारांश त्याचें स्वतःचें कर्म संपलें तरी त्याचें सामाजिक कर्तव्य संपत नाहीं. समाजच ब्रह्म आहे असें त्याची ज्ञानदृष्टि त्यास सांगेल हें खरें, पण नेत्र, कर्ण इत्यादि इंद्रियें त्याला तसें सांगणार नाहींत; आणि म्हणून स्वकर्मांचा संन्यास केल्यानंतर त्यानें समाजाचा उद्धार करण्याचें व्रत निष्कामबुद्धीनें घेतलेंच पाहिजे. परमेश्वरांनींही हेंच केलें आहे. येथें मायेचा अंश थोडासा शिलक राहतो, पण ही शिलक देहप्रारब्धानें प्राप्त झाली आहे व असल्या पुरुषास मायाच वश असते, तो तिला वश असत नाहीं म्हणून तो अलिप्तही राहतो. असो; याचा विचार आणखी एकदां करूं.

चतरजी—'एका दीपास प्रकाशासाठीं जशी अन्य दीपाची आवश्यकता नसते, तशीच कृतकृत्य झालेल्या ब्रह्मनिष्ठास सुखापेक्षेनें इतर वस्तूंचीही आवश्यकता नसते.

रामानुजास वरीलच अर्थ मान्य आहे, मात्र ते म्हणतात कीं, जो साधनांशिवायच सम्यग्ज्ञानी झाला त्यासच हा श्लोक लागू आहे.

द्वैतवादी आचार्यांस व त्यांच्या अनुयायांस निदान येथें तरी कबूल करणें भाग पडलें आहे कीं निर्विकल्पसमाधी अगर असंप्रज्ञातसमाधि दृढ झाल्या कारणानें परमात्मा जो श्रीभगवान विष्णु त्याच्याच ठिकाणीं निःसीम प्रेम, तेथेंच तृप्ति, समाधान, आणि तेथेंच परमानंद ज्याला उत्पन्न होऊं लागला, त्या अपरोक्ष ज्ञानी पुरुषाला कर्तव्य उरत नाहीं! येथें ही परमात्म्याहून आत्मा भिन्न असतो असा भाव आणला आहेच, तथापि अशा ज्ञान्याचें श्रौतस्मार्त वगैरे कर्म द्वैतवाद्यांच्या मतें नष्ट झालें ही थोडकी गोष्ट नव्हे! उपासना नष्ट होत नाहीं हा यांचा सिद्धांत येथेंही आहेच.

ज्ञानेश्वर—**देखे असतेनी देहधर्मे। तेथें तोचि एक न लिंपे कर्मे। जो अखंडीत रमे। आपण पै** (आपल्याशीं)॥

वामनपंडित—ज्ञानी झाला, परंतु थोडीशी जर कां विषयाकांक्षा असली तर त्यावर कडाका पहाः-**स्वपतीची आवडी। इतर पुरुषांचीही कांहीं गोडी। तरी त्या नारीची खोडी। व्यभिचारिणी म्हणावीच॥...**

अर्जुना! पुरुषसृष्टि। पतिव्रता न देखे काय दृष्टि?। परी विषयबुद्धीतें उष्टी। दृष्टी न करी कदापि॥ यावरून पंडितांचा भाव लक्ष्यांत येईल. अर्थातच अशा आत्मज्ञाचें स्वोपकारक कर्म संपलें. तोच खरा मानव होय. बाकींचे सर्व पशूच होत!

रंगनाथ ह्मणतात 'रति, तृप्ति, संतुष्टता' हीं अद्वैती आत्मज्ञास नसतात, फक्त साधारण मनुष्यांस आत्मसुख कसें असतें हें दर्शविण्यासाठीं यांचा आरोप आहे. **मधुसूदनीकारांचे** हे अनुयायी आहेत.

गीताव्याख्यानकार*:-ज्याणें विवेक वैराग्य बळें। प्रवृत्तीतें मागें लोटलें। मग येवोनि ठाणें घातलें। मोक्षपदीं॥ तेथें स्वानंदेंच धाला। स्वसुखेंच तो संतोषला। मग पुढें काय तयाला। उरलें असें?॥ १७॥

किंच—

आणखी:—

नैव तस्य कृतेनार्थो
नाकृतेनेह कश्चन॥
न चास्य सर्वभूतेषु
कश्चिदर्थव्यपाश्रयः॥ १८॥

इह (ह्या दृश्य विश्वांत) **तस्य** (त्याला) **कृतेन** (कांहीं कर्म केलें तरी) **अर्थः न** (कोणताही लाभ नाहीं)–आणि–**अकृतेन** (कांहीं केलें नाहीं म्हणून) **कश्चन न** (कोणताही हानिदायक–लाभ–नाहीं.) **च** (आणि) **अस्य** (ह्याला, ह्या ज्ञानी पुरुषाला–) **सर्वभूतेषु** (ह्या चराचर भूत मात्रामध्यें) **कश्चित् अर्थव्यपाश्रयः** (ज्याच्यावर स्वकीय लाभ अगर हानि अवलंबून आहे, असा पदार्थ-

---

* ह्या व्याख्यानकारांचें नांव माहित नाहीं. हे बहुधा **गोपाळशिष्य** असावे. पदें, अन्वय, अर्थ असा क्रम धरून शेवटीं ओव्या घातल्या आहेत. ह्या पुस्तकाची लेखी प्रत मला रा. रा. वासुदेव लक्ष्मण भावे, बी. एस्. सी. ठाणेकर यांच्या अनुग्रहानें मिळाली.

ही नाहीं.)—सारांश त्या कृतार्थ पुरुषाला कोणत्याही लौकिक अगर शास्त्रीय कर्तव्याची अपेक्षा नाहीं, किंवा कर्तव्य केलें नाहीं म्हणून त्याची हानिही होत नाहीं; शिवाय या चराचर विश्वामध्यें असा कोणताही पदार्थ नाहीं किंवा पुरुष नाहीं कीं ज्याच्यावर अवलंबून राहून त्याला कांहीं तरी मिळवावयाचें आहे. तात्पर्य त्यानें कांहीं केलें अगर केलें नाहीं तरी त्याला लाभहानि नाहीं. शिवाय असें कोणतेंही लाभदायक कर्तव्य त्याला उरत नाहीं, कीं ज्याच्यासाठीं त्यानें दुसऱ्यावर—पुरुषावर अगर देवतेवर—अवलंबून असलें पाहिजे. अर्थातच त्याच्या हातून जर कांहीं झालें तर तें सर्वथा स्वार्थशून्य असल्यामुळें इतरांस उपकारकारकच होतें. त्याला मात्र त्याची खबर नसते. मागील श्लोकाचें समर्थन हा श्लोक करितो असें बऱ्याच टीकाकारांचें म्हणणें आहे.

नैवेति। नैव तस्य परमात्मरतेः कृतेन कर्मणाऽर्थः प्रयोजनमस्ति। अस्तु तर्ह्यकृतेनाकरणेन प्रत्यवायाख्योऽनर्थो नाकृतेनेह लोके कश्चन कश्चिदपि प्रत्यवायप्राप्तिरूप आत्महानिलक्षणो वा नैवास्ति। न चास्य सर्वभूतेषु ब्रह्मादिस्थावरान्तेषु भूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः प्रयोजननिमित्तक्रियासाध्यो व्यपाश्रयो व्यपाश्रयणम्। कंचिद्भूतविशेषमाश्रित्य न साध्यः कश्चिदर्थोऽस्ति। येन तदर्था क्रियाऽनुष्ठेया स्यात्। न त्वमेतस्मिन्सर्वतः संप्लुतोदकस्थानीये सम्यग्दर्शने वर्तसे ॥ १८ ॥

याप्रमाणें परब्रह्मामध्यें लीन होऊन परब्रह्मस्वरूपी झालेल्या अहंकारशून्य व पूर्णानंदमग्न ज्ञाननिष्ठ पुरुषाला कोणत्याही लौकिक अगर वर्णाश्रमानुरूप शास्त्रीय कर्तव्याचें कारण उरत नाहीं. कारण त्याला कांहीं मिळवावयाचें राहिलेलें नसतें. स्वर्ग-लोक-सुख अगर योगलब्ध-ऐश्वर्याचें सुख हीं ब्रह्मसुखापुढें निस्तेजच होतात.

शिष्य—पण, गुरुजी! स्नानसंध्यादि शास्त्रीय व लौकिक नित्य कर्में त्यानें केलीं नाहींत, तर त्यास पाप नाहीं लागावयाचें? निदान जें स्वरूप त्यास प्राप्त झालें आहे तें कायम ठेवण्यासाठीं तरी त्याला कर्म केलें पाहिजे?

गुरु—नाहीं. स्वर्ग वगैरे देणारीं कर्में अगर ऋण फेडणारीं कर्में त्यानें केलीं नाहींत ह्मणून त्यास पापही लागावयाचें नाहीं.—आत्मलोकीं जाऊन राहिलेल्या मनुष्यास स्वर्गादिकांची काय पर्वा आहे किंवा ऋण तरी कसलें राहावयाचें आहे? शिवाय ज्ञानानें आत्मलोकास गेलेल्या मनुष्यानें संसार उत्पन्न करणारें कर्म केलें नाहीं ह्मणून तो स्वस्वरूपामधून कसा च्युत होईल? अशी शंका घेणें म्हणजे कौमुदीवरील **शेखरापर्यंत** ग्रंथ ह्मटलेल्या वैय्याकरणानें 'रामो हरिः' ची संथा नित्य घेतली नाहीं तर त्याचें व्याकरणज्ञान लुप्त होईल, अशी शंका घेण्याप्रमाणेंच अज्ञानदर्शक होय!—असो; हें स्वतःवरच अवलंबून असणाऱ्या कर्माकर्माविषयीं झालें. आतां दुसऱ्याचें साहाय्य घेऊन त्याला कांहीं अर्थसिद्धि करून घ्यावयाची असेल अशी शंका घेशील तर सांगतों कीं या दृश्यमात्र असणाऱ्या सर्व चेतनाचेतनात्मक विश्वामध्यें ब्रह्मदेवापासून तों थेट गवताच्या काडीपर्यंत अशी कोणतीही वस्तु नाहीं, किंवा कोणताही पुरुष नाहीं कीं दैवत नाहीं, कीं ज्याच्या आश्रयानें कर्म केलें असतां ज्ञानी पुरुषास आणखी कांहीं मिळवावयाचें आहे.—सारांश पदार्थांचा आश्रय केला असतां कांहीं जास्त ज्ञान मिळेल अगर जास्त उपभोग मिळतील म्हणून कर्म केलें पाहिजे, किंवा एक किंवा अनेक पुरुषांचा, फार काय परमेश्वराचाही, आश्रय करून कांहीं विशिष्ट कर्म केलें असतां कीर्ति अगर सत्ता अगर ऐश्वर्य वाढून आत्मज्ञानांत अगर आत्मानंदांत विशेष भर पडेल असें ज्ञानी पुरुषास कांहींच उरलेलें नसतें. सारांश अशा ज्ञानी पुरुषाला स्वतःसाठीं* करावयाचें असें कोणतेंच कर्म राहत नाहीं.

---

* आधुनिक वेदांत्यांस ह्या आचार्यांच्या व्याख्यानाचा अर्थ संमत होईल कीं नाहीं याची वानवा आहे. अज्ञानी लोकांसाठीं—कोणत्याही प्रकारानें स्वतःसाठीं नव्हे,—कर्म केलें अगर अज्ञान्यांकडून करविलें तर स्वार्थशून्य ज्ञानी पुरुषांचा उद्धार होईल हें भगवंतास व आचार्यांस संमत होतें असा मला या श्लोकांतून व भाष्यांतून अर्थ काढावयाचा आहे. ह्या अर्थ संमत नसता तर भगवंतांनीं २२, २३, २४, या श्लोकांचा अवतार केला नसता व आचार्यांनींही ज्ञानमार्गाचें मठ स्थापिले नसते. असो याचा विस्तार पुढें करूं.

शिष्य—मग लोकांसाठीं कर्म करावें असें निष्पन्न होईल ?

गुरु—होय. होईल. पण याचा विचार बाविसाव्या श्लोकांत सांगेन.

शिष्य—तें असो; पण भगवंताची ज्ञानवाक्यें सर्वथा कर्णरूपी होऊन ऐकणाऱ्या ज्ञानी व एकचित्त अर्जुनाला तरी कर्माची आवश्यकता कोठें राहते ?

गुरु—कोठें राहतें, तें पुढील श्लोकांतच पहाः–अ० २ श्लोक ४६ मध्यें 'सर्वत्र ज्ञानमय झालेल्या जळसागराचें वगैरे' जें सांगितलें आहे तें ब्रह्मज्ञान, ती पूर्णदृष्टि अर्जुनास अवगत झाली नव्हती म्हणून अर्जुनास कर्तव्यकर्म करणें अवश्यच होतें.

मधु०–'**परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेनेति**' (हे सर्व स्वर्ग, मृत्यु, पाताळ इत्यादि लोक कर्मानें मात्र प्राप्त होणारे असें पाहून ब्रह्मनिष्ठ पुरुष स्वर्गादि भुवनांचा तिरस्कार करूं लागतो, कारण नित्य असा जो मोक्ष तो केलेल्या, नवीन उत्पन्न झालेल्या म्हणजे अनित्य, कर्मानें प्राप्त व्हावयाचा नाहीं अशी त्याची खातरी असते) ही व '**नैनं कृताकृते तपतः**' (याला विधेय किंवा निषिद्ध कर्में बाध करूं शकत नाहींत) तसेंच 'देवांचाही हा पुरुष आत्मा होऊन बसतो म्हणून इंद्रादिक देव अगर पितर वगैरे कोणीही या पुरुषाला त्रास देऊं शकत नाहींत, अगर ब्रह्माकडे जाण्याला प्रतिबंध करूं शकत नाहींत.' वगैरे श्रुतींच्या समर्थनानें ज्ञानी पुरुषास कर्तव्य उरत नाहीं असें सिद्ध करितात. **मधुसूदनीकार** योगवासिष्ठामधून एक श्लोक उद्धृत करून त्यावरून ज्ञानाच्या सात भूमिका आहेत व सातव्या भूमिकेंत गेलेला व तुरीयावस्थेंत असणारा ज्ञानी पुरुष स्वहित अथवा परहित यांस ओलांडून ब्रह्म होऊन बसतो व त्याच्या देहधर्माची व्यवस्था इतरांस करावी लागते असें सांगतात. सारांश पूर्ण ब्रह्मनिष्ठ पुरुष स्वतःच्या संबंधानें नाहीं सारखाच होतो असें यांचें मत दिसतें. याच अवस्थेचें वर्णन श्रीमद्भागवतांत आहे त्याचा तात्पर्यार्थ हा आहे कीं 'स्वस्वरूपीं रममाण झालेल्या ब्रह्मनिष्ठाला स्वतःच्या देहाचेंही भान नसतें. दारू पिऊन उन्मत्त झालेल्या पुरुषास जशी स्वतःच्या वस्त्राची खबर नसते, तद्वतच शरीरसंबंधें ज्ञानी पुरुषाची स्थिति असते.' प्रो० **द्विवेदींचा** व **पर्वते** यांचा हाच अभिप्राय दिसतो.

श्रीधर आचार्यानुचारी आहेत. **शंकरानंद** हे कर्मामध्यें उपासनेचाही अंतर्भाव करून ब्रह्मनिष्ठाच्या संबंधें उपासनेचाही निषेध करितात. '**ज्ञानामृतने**

तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः । नैवास्ति किंचित्कर्तव्यमस्ति चेन्न स तत्त्ववित्' अर्थ उघड आहे. 'आपल्यास कांहीं कर्तव्य आहे असें वाटणारा पुरुष तत्त्ववेत्ता नव्हे.' हें चिंतनीय आहे.

प्रपाकार—'तदेतदृचाऽभ्युक्तमेष नित्यो महिमा ब्राह्मणस्य न कर्मणा वर्धते नो कनीयान्' (ऋग्वेदामध्यें ब्रह्मज्ञ पुरुषाचा महिमा शाश्वत असतो, कर्मानें लहान किंवा मोठा होत नाहीं असें सांगितलें आहे. बृहदा०.) ऋग्वेदांतील ऋचा देऊन त्यावर असणारें रावणभाष्यही प्रपाकारांनीं दिलें आहे, तें रावणकृत आहे म्हणून व ब्रह्मविचार ऋग्वेदकाळींही होता असें त्या भाष्यावरून दिसत आहे म्हणून हा प्रसंग चित्ताकर्षक होय. वाचकांनीं हें अवश्य वाचावें, इतकें सांगणें मात्र येथें शक्य आहे. सायणभाष्यापूर्वी रावणभाष्य प्रचलित होतें, प्रपाकार सायणापूर्वी, दोनशें वर्षें अगोदर, होते, तेव्हां त्यांनीं रावणभाष्याचा उल्लेख करणें नीटच आहे. या रावणभाष्याचा कोणी शोध लावील काय?

द्वैतवाद्यांचा येथें मतभेद नाहीं.

मराठी टीकाकारांत ऐक्यच आहे. रंगनाथांचा दृष्टांत—'इंद्रासी रंकाचे डोहाळे ! । किंवा गरुड म्हणे धन्य हे काऊळे ! । असो हें; ब्रह्मवेत्ता कर्मासि नातळे । मानी अमंगळे स्वर्गादिका ॥ हृदयंगम आहे.

गीताव्याख्याकार—'हा तंव प्रकृती वेगळा । तत्साक्षित्वें निराळा । मग कर्मभाग झाला न झाला । तेणें यासी काय गुंती ? ॥ ॥ १८ ॥

तत एवम्—

असें आहे म्हणून :—

तस्मादसक्तः सततं
कार्यं कर्म समाचर ॥
असक्तो ह्याचरन्कर्म
परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥

तस्मात् (म्हणून) सततं (सर्वदां, ज्ञानप्राप्ति होईतोंपर्यंत) कार्यं कर्म (श्रुतिस्मृति इत्यादिकांनीं सांगितलेलें कर्तव्यकर्म) असक्तः (वासनाशून्य होऊन) समाचर (चांगल्या तऱ्हेनें,

शास्त्रोक्त मार्गानें आचरण कर); हि (कारण उघडच आहे कीं) **असक्तः पूरुषः** (वासनाशून्य असणारा .पुरुष) **कर्म आचरन्** (विहित कर्मांचें आचरण करीत असेल तर निर्मळ मनाचा होऊन) **परं आप्नोति** (शेवटीं मोक्षाप्रत, श्रेष्ठपुरुषार्थाप्रत मिळवितो). सारांश तुला जें शास्त्रोक्त कर्तव्य करावयाचें आहे तें निर्लोभ मनानें यथासांग कर. कारण स्पष्ट आहे कीं जे लोक निर्लोभ मनानें आपआपलीं कर्तव्यें करितात, ते लोक निर्मळ मनाचे होऊन शेवटीं अत्यंत श्रेष्ठ पुरुषार्थ जो मोक्ष त्यास मिळवितात, ज्ञानस्वरूपी, ब्रह्मस्वरूपी होतात.

तस्मादिति । तस्मादसक्तः सङ्गवर्जितः सततं सर्वदा कार्यं कर्तव्यं नित्यं कर्म समाचर निर्वर्तय । असक्तो हि यस्मात्समाचरन्नीश्वरार्थं कर्म कुर्वन्परं मोक्षमाप्नोति पुरुषः सत्त्वशुद्धिद्वारेणेत्यर्थः ॥ १९ ॥

म्हणून अर्जुना! सर्व प्रकारची आसक्ति, विषयवासना, सोडून देऊन तुझें जें शास्त्रोक्त नित्य, अवश्य व नैमित्तिक कर्तव्य आहे तें तूं यथाविधि व ज्ञानप्राप्ति होईपर्यंत करीत रहा. कारण निर्लोभमनानें, परमेश्वरास अर्पण करण्याच्या हेतूनें, जे अज्ञ लोक आपआपलीं कर्तव्यें करितात, ते लोक वासनाशून्य तर होतातच पण शेवटीं ब्रह्मप्राप्तीही करून घेतात. तेथें कर्मानें मोक्ष मिळतो असें नाहीं, तर निष्कामकर्मानें चित्तशुद्धि, नंतर ज्ञान आणि शेवटीं मोक्ष अशी उत्तरोत्तर परंपरा आहे.

मधु० प्रपा० द्विवे० पर्वते व **चतरजी** हे आचार्यांनुसारी आहेत. **शंकरा०**— ' **धर्मेण पापमपनुदति** ' (धर्माचरणानें पापक्षय होतो.) व पुढें ज्ञानप्राप्ति होऊन ' **ज्ञानादेव तु कैवल्यं** ' (ज्ञानानेंच मोक्ष मिळतो) असे आधार देतात.

रामा०—जो स्वतःसिद्धतेनेंच मुक्त झाला नाहीं तो ज्ञानी असेल तरी त्यास देहयात्रेसाठीं कर्म केलेंच पाहिजे. कर्मानेंच त्यास मोक्ष मिळणार ! असें म्हणतात.

द्वैतवादी—मुक्तानें स्वेच्छापूर्वक कर्म करण्यास प्रत्यवाय नाहीं. अपरोक्ष ज्ञान्याशिवाय इतरांनीं संगविरहित विष्णूपासना केल्यानें मात्र मुक्ति (सांनिध्यता) मिळेल.

मराठी टीकाकारांची एकवाक्यता आहे. 'क्षत्रियास संन्यास नाहीं म्हणून कर्म करूनच त्यांनी मुक्त व्हावें असा पुढील श्लोकाचा भावार्थ **रंगनाथ** सुचवितात ॥ १९ ॥

यस्माच्च—

आणखी एक कारण, पुनः ऐतिहासिक अनुभव, ऐकः—

कर्मणैव हि संसिद्धि-
मास्थिता जनकादयः ॥
लोकसंग्रहमेवापि
संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

हि (अनुभवही असेंच दाखवितो कीं) **जनकादयः** (जनकादिक क्षात्रकुलोत्पन्न ज्ञानी) **कर्मणा एव** (कर्माच्या साहाय्यानेंच) **संसिद्धिं** (मोक्षनामक श्रेष्ठ पुरुषार्थाची सिद्धि) **आस्थिताः** (मिळविते झाले.) **अपि** (निदान) **लोकसंग्रहं एव** (लोकांची कर्तव्यकर्मा कडेच प्रवृत्ति असावी) **संपश्यन्** (हें पाहून, हें ध्यानांत ठेवून तरी) **कर्तुं अर्हसि** (आपलें कर्तव्य करण्यास तूं योग्य आहेस.)– सारांश जनकादि प्रभृति क्षात्रकुलोत्पन्न ज्ञानी पुरुषांनीं आपलें आपलें कर्तव्य केलें म्हणूनच ते मोक्षनामक सिद्धिप्रत प्राप्त झाले, हें तुला इतिहासज्ञानावरून अवगतच आहे. शिवाय अज्ञानी लोकांनीं कर्तव्यें करावीं उन्मत्त अगर उच्छृंखल होऊं नये एतदर्थ तरी तुला आपलें क्षात्रकर्तव्य केलें पाहिजे. तात्पर्य तुला कर्म केलेंच पाहिजे. (१) अज्ञानी असशील तर चित्तशुद्धिसाठीं कर्म केलें पाहिजे व (२) ज्ञानी असशील तर लोककल्याण करावयाचें आहे, हें लक्ष्यांत ठेवून कर्म केलें पाहिजे.–

कर्मणैवेति । कर्मणैव हि यस्मात्पूर्वे क्षत्रिया विद्वांसः संसिद्धिं मोक्षं गन्तुमास्थिताः प्रवृत्ता जनकादयो जनकाश्वपतिप्रभृतयः । यदि ते प्राप्तसम्यग्दर्शनास्ततो लोक-

संग्रहार्थं प्रारब्धकर्मत्वात्कर्मणा सहैवासंन्यस्यैव कर्मसंसिद्धिमास्थिता इत्यर्थः । अथाप्राप्तसम्यग्दर्शना जनकादयस्तदा कर्मणा सत्त्वशुद्धिसाधनभूतेन क्रमेण संसिद्धिमास्थिता इति व्याख्येयः श्लोकः । अथ मन्यसे पूर्वैरपि जनकादिभिरप्यजानद्भिरेव कर्तव्यं कर्म कृतं तावता नावश्यमन्येन कर्तव्यं सम्यग्दर्शनवता कृतार्थेनेति तथाऽपि प्रारब्धकर्मायत्तस्त्वं लोकसंग्रहमेवापि लोकस्योन्मार्गप्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रहमेवापि प्रयोजनं संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

शिष्य—गुरुजी! अर्जुनास ज्ञान झालें नव्हतें म्हणून त्यास चित्तशोधक कर्ममार्ग सांगितला तो सयुक्तिक आहे. पण ज्ञान्यासही कर्म करावें लागतें अशा विषयीं अनुभवाचा ऐतिहासिक दाखला आहे काय?

गुरु—अरे हो! तुला ठाऊक नाहीं काय? जनक, अश्वपती वगैरे क्षत्रिय ब्रह्मज्ञानी कर्म करूनच, कर्ममार्गानेंच, मोक्षासिद्धि मिळविते झाले!

शिष्य—वाहवा! आपण बरेच वेळ मला सांगितलें आहे कीं, मोक्ष मिळतो तो कर्मत्याग करून, आणि आतां सांगतां कीं कर्म करून जनकादिकांनीं मोक्ष मिळविला! ह्या विरोधाचा परिहार होणें आतां मात्र कठिणच दिसतें.

गुरु—हा वेड्या! हा विरोध तुझ्या डोक्यांत कल्पनेनें, अज्ञानानें, मात्र उत्पन्न केला आहे. असें पहाः जनकादिक राजे जर पूर्णज्ञानी होते, त्यांस ब्रह्मसाक्षात्कार होऊन ते स्वस्वरूपीं लीन झाले होते, असें धरलेंस तर त्यांच्या मुक्तीचा असा उलगडा करावा लागेल कीं ते राजे पूर्णज्ञानी होते, तथापि ज्या पूर्वकर्मानें त्यांस देह प्राप्त झाला, तें कर्म देहधारण करूनच संपत नसल्यामुळें 'इतर लोकांस अधर्मानें जाऊं द्यावयाचें नाहीं' या हेतूनें, परार्थ दृष्टीनें त्यांस कर्म करावें लागलें, त्यांस कर्माचा त्याग करितां येईना, तथापि ज्ञानमाहात्म्यानें

त्यांस मुक्ति मिळाली. सारांश त्यांस पूर्ण ज्ञान झालें असलें तरी लोकसंग्रहार्थ कर्म करावें असें त्यांचें देहप्रारब्धच होतें असें म्हटलें पाहिजे म्हणून त्यांस कर्मसंन्यास करितां आला नसेल; तात्पर्य कर्म करून स्वतः जरी कांहीं मिळवावयाचें अगर रक्षण करावयाचें नव्हतें तरी अज्ञानी लोकांच्या चित्तशुद्धीसाठीं जनकादिकांस कर्म करावें लागलें असें समजलें पाहिजे. (२) आतां त्यांस पूर्णज्ञान झालें नव्हतें असा अर्थ घेतला तर क्रम उघडच आहे कीं कर्म करून त्यांनीं चित्तशुद्धता संपादन केली व पुढें गुरूपदेशानें व ईश्वरानुग्रहानें त्यांस ज्ञान होऊन ते मोक्षाप्रत गेले. कोणताही अर्थ घेतला तरी जनकादिकांच्या कर्माचा व मोक्षाचा उलगडा होतो. असो, ' आतां जनकादिक राजे अज्ञानी होते म्हणून त्यांस कर्तव्यकर्म अवश्य होतें व तें त्यांनीं केलें; जो ज्ञानी आहे, ब्रह्मसाक्षात्कार होऊन जो कृतार्थ झाला आहे, त्याला कर्म करण्याचें कारण नाहीं आणि म्हणून मलाही कारण नाहीं ' असें अर्जुन म्हणेल असें वाटल्यावरून भगवान म्हणतातः ' तूं ज्ञानी नाहींस, पण घटकाभर तुला ज्ञान झालें आहे, असें गृहित धरिलें तरी ज्या पूर्वकर्मानें तुला हा देह प्राप्त झाला आहे, त्या कर्माच्या नाशासाठीं तुला आपलें श्रुतिस्मृत्युक्त कर्तव्य केलेंच पाहिजे. तूं क्षत्रिय आहेस तेव्हां तुझें कर्तव्य म्हणजे प्रजाजनांनीं उन्मत्त होऊं नये व त्यास अधर्माचरण करूं देऊं नये, त्यांच्या उन्मार्गप्रवृत्तीचें निवारण करावें, सारांश लोकांची चित्तशुद्धि होऊन त्यांनीं मुक्त व्हावें एतदर्थ तुला कर्म केलेंच पाहिजे.' सारांश पूर्ण ज्ञान झालेलें असेल तर इतर लोकांच्या उद्धारासाठीं स्वार्थशून्य बुद्धीनें कर्म केलें पाहिजे, ज्ञान झालें नसेल तर स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं कर्म केलें पाहिजे, एवंच कर्म केलें पाहिजे, असा भगवंतांचा व आचार्यांचा अभिप्राय स्पष्ट दिसत आहे. सांसारिक पुरुषांचें कर्म **स्वतःचे** उपभोग वाढवून इंद्रियांचें समाधान करण्यासाठीं होत असते व ज्ञानी पुरुषाचें कर्म स्वतःस व इतरांस त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें विषयसुखापासून निवृत्त करून

आत्मसुखाचा अहंकारशून्यत्वानें अनुभव घेण्यासाठीं व घेवविण्यासाठीं होत असतें. अहंकार वाढविणारा तो अज्ञानी व अहंकार नष्ट करणारा तो ज्ञानी असा उभयतांत विशेष आहे. असो; याचा विचार पुढें करूं.

मधु०—क्षत्रियास कर्मसंन्यास करण्याचा अधिकार नाहीं असें सुचवितात! व श्रुतिस्मृतींचे आधारही दाखवितात!' **स्वाराज्यकामो राजा राजसूयेन यजेत** ' (स्वाराज्याविषयीं इच्छा करणाऱ्या राजानें राजसूययज्ञ करावा). ह्याचा, व ह्या जात्यभिमानपर टीकेचा मागें एकदा विचार केलाच आहे. **पर्वते** यांनीं **मधुसूदनीकारांचें** अनुकरण केलें आहे. **द्विवेदींचा** अभिप्राय सर्व वर्णांस संन्यासाचा अधिकार, वासना नष्ट झाल्यावर आहे, असा आहे; हें विचार सरणीस योग्यच आहे व असाच श्रुतिकारांचा व भगवंतांचा अभिप्राय असला पाहिजे. **शंकरा०** व **प्रपा०** आचार्यांनुसारी आहेत.

---

* १३ व्या अंकाच्या ३९२ पृष्ठापुढें वरील मजकूर वाचून नंतर १४ वा अंक वाचण्यास सुरुवात करावी. चुकून वरील मजकूर छापण्याचा राहिला होता.

द्वैतवादी हे आचार्यांप्रमाणेंच अर्थ करितात हें आश्चर्य होय. 'मुक्तानें कर्म करावयाचें तें स्वतःस आनंदातिशय होण्यासाठीं किंवा लोकसंग्रहासाठीं होय. '**अज्ञानां ज्ञानदं कर्म ज्ञानिनां लोकसंग्रहात्**' अर्थ स्पष्टच आहे.

ज्ञाने०—मार्गीं अंधासरिसा। पुढें देखणा (डोळस) **ही चाले जैसा। अज्ञाना प्रकटावा धर्म तैसा। आचरोनी॥ हा गा ऐसें जरी न कीजे। तरी अज्ञाना काय उमजे?। तिहीं कवणें परी जाणिजे?। मार्गीतें या॥** इतर मराठीटीकाकार विशेष सांगत नाहींत. ॥ २० ॥

लोकसंग्रहं कः कर्तुमर्हति कथं चेत्युच्यते—

शिष्य—गुरुजी! ब्रह्मज्ञान होऊन जो कृतार्थ झाला त्याला लोकसंग्रहासाठीं, लोकांनीं मर्यादेला अनुसरून वागावें हें करण्यासाठीं, तरी कर्म करण्याची का आवश्यकता असावी? तसेंच त्यानें हें लोकसंग्रहाचें काम करावें तरी कसें? व लोक तरी श्रेष्ठ पुरुषाचें अनुकरण कां करितात?

गुरुजी—उत्तम प्रश्न विचारलेस. सांगतों ऐकः—

यद्यदाचरति श्रेष्ठ-
स्तत्तदेवेतरो जनः॥
स यत्प्रमाणं कुरुते
लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

श्रेष्ठः (श्रेष्ठ, विद्वान, पुरुष) **यत् यत् आचरति** (जें जें कांहीं आचरण करितो) **तत् तत् एव** (तें-तेंच-आचरण) **इतरः जनः** (इतर, सामान्य जन करितात.) **सः** (तो श्रेष्ठ पुरुष) **यत् प्रमाणं कुरुते** (जें प्रमाण धरून चालतो, ज्या कित्त्याचा, नमुन्याचा अंगीकार करितो)-तोच कित्ता वळवून-**लोकः** (सामान्यजन) **तत् अनुवर्तते** (त्याच मार्गाचें अनुसरण करून चालतात.)-सारांश शिष्टलोकांचें जसें वर्तन असतें, ते जो कित्ता वळवितात, तेंच वर्तन व तोच कित्ता, सामान्य लोक अंगीकृत करून त्याप्रमाणें चालतात.

जुन्या व नव्या पद्धतीला श्रेष्ठ मानणाऱ्या लोकाग्रणींवर केवढी थोरली जबाबदारी ही! ह्या लोकनायकांनीं आपलें वर्तन किती चोख व किती दूरवर विचार करून चालविलें पाहिजे?

यद्यादिति । यद्यत्कर्माऽऽचरति येषु येषु श्रेष्ठः प्रधानस्तत्तदेव कर्माऽऽचरतीतरोऽन्यो जनस्तदनुगतः । किंच स श्रेष्ठो यत्प्रमाणं कुरुते लौकिकं वैदिकं वा लोकस्तदनुवर्तते तदेव प्रमाणी करोतीत्यर्थः ॥ २१ ॥

श्रेष्ठ पुरुष, प्रधान पुरुष, जीं जीं कर्में करीत असतात, तीं तीं सर्व कर्में अन्य लोक, त्या श्रेष्ठ पुरुषाचे अनुयायी, आपल्या आचरणांत आणीत असतात. इतकेंच नव्हे तर आणखी असें पहा कीं, तो श्रेष्ठ पुरुष व्यवहारामध्यें अगर धार्मिक कृत्यामध्यें जे ग्रंथ, जीं वचनें, प्रमाणभूत धरून चालतो, ते ग्रंथ व तीं वचनें सप्रमाण आहेत असें स्वबुद्धीनेंही ग्रहण करून सामान्य लोक त्याचप्रमाणें चालतात. सारांश इतर सामान्य लोकांस विचार करण्याची फुरसत अथवा ऐपत नसल्यामुळें सर्वांनीं श्रेष्ठ मानलेल्या महापुरुषाप्रमाणेंच सामान्य लोकांचें वर्तन होत असतें. आईबाप, शिक्षक, पुराणिक, हरिदास, आचार्य, लोकनायक व राजे ह्या सर्वांनीं प्रस्तुत श्लोकाचीं अनेक पारायणें करून व त्यांतील रहस्य समजून घेऊन, ते स्वतः कृतार्थ असले तरी, त्यांनीं याप्रमाणें वर्तन ठेविल्यास पुनः सत्ययुगाचा उद्भव होणार नाहीं असें कोण म्हणेल? आपले विचार, आपले उच्चार व आपले आचार या त्रयीवर समाजाची केवढी भिस्त असते व समाजाचें बरें वाईट होणें कसें सर्वस्वी अवलंबून असतें हें मातापितरांनीं व शिक्षकांनीं अवश्य समजून घ्यावें.

धनपति म्हणतातः येथें केवळ धार्मिकच नव्हेत तर व्यावहारिक कर्मांचाही अंतर्भाव केला पाहिजे.

अद्वैतवाद्यांत सर्वत्र एकवाक्यता आहे.

रामा०—'ज्ञानी पुरुषानें कर्म न केल्यामुळें जर त्याचे अनुयायी, जे अज्ञानी लोक हे, कर्माभावानें नाश पावले तर त्या लोकनाशाचें पातक ज्ञान्याच्या माथीं बसते. श्रेष्ठ तो होय कीं जो हें सर्व जाणतो व धर्मोक्त आचरण करितो.'

द्वैतवाद्यांचाही अर्थ आचार्यांप्रमाणेंच आहे. 'यत्प्रमाणं' या शब्दांत प्रमाणग्रंथांचा व आचार्यांचा समावेश करितात.

ज्ञाने०—येथ वडील जे जे करिती। तया नाम धर्म ठेविती।... हें वाक्य आमची ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध मंडळी लक्ष्यांत घेतील काय?

रंग०—परी स्वतंत्रपणें कोणी नाचरती। परस्परें देखोविखीच (पाहून मात्र) **सर्व वर्तती। या लागी तूं तरी राजा श्रेष्ठ सर्वार्थी। या लोकाप्रती देखीं दाखवी** (उदाहरण घालून दे)॥

गीताव्याख्या०—या कर्मी तयां (ज्ञानी लोकांस) **चाड नसे। परी हृदयीं दयाळुत्व असे। 'जे हे अज्ञानजन जैसे तैसे। सोई लागोत ऐसेनें तरी'॥ २१॥**

यद्यत्र ते लोकसंग्रहकर्तव्यतायां विप्रतिपत्तिस्तर्हि मां किं न पश्यसि—

शिष्य—महाराज! लोकांस धर्माच्या आळ्यांत ठेवणें, सारांश लोकसंग्रह करणें हें ज्ञानी पुरुषाचें, कर्मसंन्यास करण्याची योग्यता प्राप्त झालेल्या ब्रह्मज्ञाचें, कर्तव्य आहे असा कांहीं ऐतिहासिक दाखला आहे? मला तर निष्कामी पुरुषानें कर्म करणें विरोधात्मक दिसतें.

गुरु—हो! तुझ्यासारख्या स्वार्थैकतत्पर पुरुषाला विरोध दिसवयाचाच! भोग मिळावे तरी **स्वतःस**, मुक्ति मिळण्याचा योग आला कीं कर्म संपलें **स्वतःचें**, असें मानणाऱ्या स्वार्थनिष्ठांनीं भगवंताचें उदाहरण ध्यानांत ठेवावें. ऐक:—

न मे पार्थास्ति कर्तव्यं
त्रिषु लोकेषु किंचन॥
नानवाप्तमवाप्तव्यं
वर्त एव च कर्मणि॥ २२॥

भगवान ह्मणतात:—**पार्थ** (अर्जुना!) माझेंच उदाहरण पहासना! पहा:—**त्रिषु लोकेषु** (तिन्ही लोकांमध्यें, सर्व ब्रह्मांडामध्यें)

मे (मला) **किंचन कर्तव्यं** (कोणतेंही कर्तव्य) **न अस्ति** (असत नाहीं.) **अनवाप्तं** (कांहीं न मिळालेलें) **अवाप्तव्यं न** (मिळवावयाचें आहे, असें नाहीं.)–तथापि–**कर्मणि** (कर्मामध्यें) **वर्ते एव च** (मी वागतोंच आहें!). सारांश संपूर्ण त्रैलोक्यामध्यें मला कांहीं करावयाचें आहे, किंवा कांहीं न मिळालेलें मिळवावयाचें आहे, असा मुळींच प्रकार नसून, सर्व प्रकारांनीं मी स्वतः पूर्ण असून ही, मी सदैव कर्म करीत असतों, हें कां पहात नाहींस.

न म इति । न मे मम पार्थ नास्ति न विद्यते कर्तव्यं त्रिष्वपि लोकेषु किंचन किंचिदपि । कस्मात्–नानवाप्तमप्राप्तमवाप्तव्यं प्रापणीयं तथाऽपि वर्त एव च कर्मण्यहम् ॥ २२ ॥

अर्जुना! भूर्भुवस्वर्लोकांत अगर मनुष्य, पितृ, देवलोकांत अथवा सर्व ब्रह्मांडामध्यें असें कांहींएकही नाहीं कीं ज्याच्यासंबंधानें मला कांहीं कर्तव्य करावयाचें आहे.

शिष्य—असें कशावरून?

गुरु—अरे! एखादी अलभ्य किंवा अलब्ध वस्तु प्राप्त करून घ्यावयाची असेल तर कर्म करावयाचें कीं नाहीं? भगवंतास काय मिळवावयाचें असणार? भगवान म्हणतातः 'मला कांहीं मिळवावयाचें नाहीं, मी पूर्णच आहें; तथापि अर्जुना! मी कर्मामध्यें वागत असतों, कर्म करीतच असतों, तें केवळ लोकहितासाठींच होय. आणि तुला तर अद्यापि साध्य करून घ्यावयाचें असें पुष्कळच आहे; तेव्हां मी कर्म करणार नाहीं हा तुझा हट्ट अविवेकाचाच होय. स्वतःसाठीं, निदान इतरांसाठीं, तुला कर्म केलेंच पाहिजे.

येथेंही अद्वैतवादी व द्वैतवादी आचार्यानुसारीच आहेत.

रामा०—'त्रिषु लोकेषु' = तिन्ही लोकांत (देव, मनुष्यादि रूपें घेऊन स्वच्छंदानें संचार करणारा जो मी त्याला तिन्ही लोकांत कर्तव्य नाहीं.)

पंडितांनीं 'मनुष्य' शब्दावर बरेंच व्याख्यान लिहून 'परमेश्वराचा मार्ग अनुसरतात तेच मनुष्य, बाकीचे पशूंपेक्षांही नीच' असा तात्पर्यार्थ आणिला

आहे. "पशु पडे अंधकूपीं । निघणें असाध्यचि तथापि । चरफडी निघावया, हे पापी । गृहांधकूपीं सुखमानिती! ॥ पशु पशुत्वापासुनी । सुटे, हे चौऱ्यांशीं लक्षयोनी । प्राप्त होती नरक भोगुनी, । ऐसीं कर्मे आचरती!" ॥

गीताव्याख्याकारांचा दृष्टांत पहाः–तृषीस भूक लागे । कीं अमृत कांहीं गोह (ड?) मागें । न घडे; तेवी मज नलगे । कर्तव्य या प्रपंची ॥२२॥

यदि ह्यहं न वर्तेय
जातु कर्मण्यतन्द्रितः ॥
मम वर्त्मानुवर्तन्ते
मनुष्याः पार्थ सर्वशः ॥२३॥

हि (कारण असें पहा कीं) यदि जातु (जर कदाचित्) अतन्द्रितः (आलस्यशून्य, निरालस, होत्साता) कर्मणि न वर्तेय (कर्ममार्गाचें मीं अनुसरण केलें नाहीं; कांहींच केलें नाहीं)–तर–पार्थ (अर्जुना!) सर्वशः (सर्व प्रकारांनीं) मनुष्याः (सामान्य जन, प्राकृत आणि विचारशून्य लोक) मम वर्त्म (माझाच मार्ग, मी घालून दिलेला मार्गच) अनुवर्तन्ते (अनुसरण करतील.)–सारांश आळस टाकून देऊन, उद्योगपूर्वक मी कर्मच करावयाचें जर कदाचित् सोडून दिलें, तर आतांच सांगितल्याप्रमाणें सामान्य लोक माझेंच सर्वथा अनुकरण करतील यांत शंका नाहीं.—तात्पर्य मला, सर्वेश्वराला लोकसंग्रह करून तरी काय कर्तव्य आहे असें म्हणशील तर काय अनर्थ होतील तें सांगण्यासाठीं हें तुला सांगितलें आहे.

यदि पुनरहं न वर्तेय जातु कदाचित्कर्मण्यतन्द्रितोऽनलसः सन्मम श्रेष्ठस्य सतो वर्त्म मार्गमनुवर्तन्ते मनुष्या हे पार्थ सर्वशः सर्वप्रकारैः ॥ २३ ॥

शिष्य—लोकसंग्रहाची तरी परमेश्वरास कशाला हवी अपेक्षा?

गुरु–कशाला हवी तें ऐक:–'हे पार्था!' भगवान म्हणतात; 'जर कदाचित् आलस्याचा त्याग न करितां आळसानें माझें कर्मच करावयाचें मीं टाकून दिलें तर सर्वांत श्रेष्ठ असा जो मी सर्वज्ञ पुरुषोत्तम, त्या माझेंच अनुकरण कर्माधिकारी मनुष्यमात्र सर्वथा करूं लागतील; सारांश '**अश्रेष्ठः श्रेष्ठानुसारी**' या न्यायानें 'सर्वज्ञ भगवानच कर्म करीत नाहीं, आपण तरी कशाला करावें' असें म्हणून सर्व अज्ञानी लोक वागूं लागतील; तसें होऊं नये म्हणून मी कर्म करितों. हें परमेश्वराचें कर्म कोणतें तें चवथ्या अध्यायांत स्पष्ट होईल.

अद्वैत व द्वैतसिद्धांत्यांत सर्वत्र एकवाक्यता आहे.

चत०—'मनुष्याच्या प्रत्येक कर्माचा परिणाम कर्त्यावर होतो. परमेश्वर मात्र निर्लेपपणानें कर्म करितो.' ॥ २३ ॥

तथा च को दोष इत्याह—

शिष्य—न करिनात बापडे लोक कर्म! त्यांत काय दोष आहे?

गुरु—हा वेड्या! काय अनर्थ होईल तें पहा :—

उत्सीदेयुरिमे लोका
न कुर्यां कर्म चेदहम् ॥
संकरस्य च कर्ता स्या-
मुपहन्यामिमाः प्रजाः ॥२४॥

अहं (म्या) **कर्म न कुर्यां चेत्** (जर कर्मच केलें नाहीं)–तर–**इमे लोकाः** (हे सर्व लोक, हीं सर्व भुवनें) **उत्सीदेयुः** (नाश पावतील, नष्ट होऊन जातील) **च** (आणि) **संकरस्य** (वर्णसंकर) **कर्ता स्याम्** (म्यां उत्पन्न केला असें होईल)–आणि–**इमाः प्रजाः** (हे सर्व लोक, हे सर्व जीव) **उपहन्याम्** (नष्ट होतील, यांच्या नाशाला मी कारण होईन.) सारांश जर मीं कर्म केलें नाहीं तर सर्व ब्रह्मांडाचा नाश, वर्णसंकर आणि जीवमात्राचा नाश मीं केला असें

होईल. कर्म केलें नाहीं तरी, अकर्मापासूनही, कर्म कसें उत्पन्न होतें, अकर्मक वर्तन सकर्मक कसें होतें तें पहा!—

उदिति। उत्सीदेयुर्विनश्येयुरिमे सर्वे लोका लोकस्थितिनिमित्तस्य कर्मणोऽभावात्, न कुर्यां कर्म चेदहम्, किंच संकरस्य च कर्ता स्याम्। तेन कारणेनोपहन्यामिमाः प्रजाः प्रजानामनुग्रहाय प्रवृत्त उपहतिमुपहननं कुर्यामित्यर्थः। ममेश्वरस्याननुरूपमापद्येत ॥ २४ ॥

मींच जर कर्म केलें नाहीं, सर्व प्रजांची सुस्थिति कायम करणारें कर्म मींच जर केलें नाहीं, सारांश विश्वाची स्थिति कायम ठेवून सुस्थिति करणारे कर्माचा जर अभाव झाला, तर हें सर्व विश्व नष्ट होईल, आणि सर्वत्र वर्णसंकर आणि जातीसंकर होईल.

शिष्य—झाला तर झाला!

गुरु—असें म्हणून कसें चालेल? देवता रुष्ट होऊन अन्न मिळणार नाहीं, पुढें वर्णसंकर होईल! बाबा! श्रेष्ठ कर्म सोडल्यामुळें ब्राह्मणाचे सर्व शूद्र झाले, जातीसंकर झाला, मनुष्यांचे पशु होऊन तेही वृक्षादिकांची स्थिति पावले वृक्षादिकांनींही स्थावराचें, अचेतनाचें, स्वरूप धारण केलें; सारांश सर्वत्र जर हे विश्व जड, प्रकृतिमय होऊन गेले तर सर्व पदार्थमात्रावर अनुग्रह करून त्यास चैतन्यस्वरूपी, आत्मस्वरूपी करणारा जो मी, त्यानेंच सर्वांस अज्ञानस्वरूपी जडावस्थेंत नेलें असें होईल.

शिष्य—हा अनर्थ तर खराच, पण त्यांत ईश्वराचें काय नुकसान आहे?

गुरु—नुकसान? सर्व दयाघन परमेश्वराला, सर्वांचा उद्धार करणाऱ्या परमेश्वराला, ही जड स्थिति उत्पन्न करणें योग्य होईल असें तुला वाटतें! कधीं वाटणार नाहीं. सारांश कोणताही स्वार्थ नसतां दुसऱ्या जीवाची विषय-तृष्णा नष्ट करून त्यांस स्वस्वरूपाकडे नेणें हें प्रत्येक श्रेष्ठ पुरुषाचें कर्तव्यच आहे.

मधु०—२१ पासून २४ पर्यंतच्या श्लोकांची व्यवस्था आणखी एका प्रकारे लावितात ती अशी : ' लोकसंग्रहार्थ कर्म करावें येवढेंच नाहीं, तर जसा लोककल्याणकारी ईश्वर आपलें वर्तन ठेवितो, तसेंच इतरांनींही ठेविलें पाहिजे. ' असें सांगण्यासाठीं या श्लोकांची योजना आहे. **शंकरानंद, पर्वते, द्विवेदी** आचार्यानुसारी आहेत. **प्रभाकर** म्हणतातः मार्गभ्रष्ट झालेल्या दीन प्रवाशांस व्याघ्रचोरादिकांनीं उपद्रव देऊं नये म्हणून जसा मार्गदर्शक असावा लागतो, तद्वतच ज्ञान्याचें कर्म होय. कर्म न करितांही दुष्कर्म कसें उत्पन्न होतें याचें हें उत्तम उदाहरण आहे;—

रामा०—' ईश्वर कर्म करितो ' यावरून ज्ञान्यानें ही कर्म केलें पाहिजे असें ठरलें. ' लोकसंग्रहासाठीं मात्र ज्ञान्यानें स्वहितशून्य वृत्ती ठेवून कर्म करावें ' असें आपण आतांच ठरविलें आहे. स्वतःस मोक्ष मिळविण्यासाठीं हें कर्म नाहीं; इतरांस मोक्ष देण्यासाठीं आहे.

द्वैतवादीही सरळच अर्थ करितात.

ज्ञाने०--**आम्ही पूर्ण काम होउनी। जरी आत्मस्थिति राहुनी** (आत्मस्थिति राहूं नि असा पाठ असेल काय ?) **। तरी प्रजा हे कैसेनि। निस्तरेल ?** (पार पडेल !) ॥

पंडि०—भलत्यानें भलत्याचें कर्म करणें यास संकर म्हणतात.

रंगनाथ व **गी**ताव्याख्याकार यांसही, अलिप्तपणें लोकसंग्रहासाठीं मात्र ज्ञान्यानें कर्म करावें, हाच अर्थ संमत आहे. ॥ २४ ॥

यदि पुनरहमिव त्वं कृतार्थबुद्धिरात्मविदन्यो वा तस्याप्यात्मनः कर्तव्याभावेऽपि परानुग्रह एव कर्तव्य इति—

शिष्य—भगवान कर्म कां करितात, याची मीमांसा झाली; पण अर्जुनानें अभिमानपूर्वक कर्म करावें, युद्ध करावें हें कसें ठरतें?

गुरु—ऐकः-भगवान म्हणतातः माझ्याप्रमाणेंच जरी तूं किंवा दुसरा कोणी कृतकृत्य झालेला असला, ब्रह्मज्ञ झालेला असला व **स्वतःसंबंधें** त्याचें कर्तव्य संपलें असलें, तथापि ' हें विश्व आहे ' असें जोंपर्यंत अपूर्ण दृष्टीनें भास आहे-आणि तें तसें अज्ञाननाशापर्यंत असणारच.-तोंपर्यंत इतरांवर अनुग्रह करण्यासाठीं त्याला निराभिमान बुद्धीनें कर्म केलेंच पाहिजे कसें तें ऐक :—

सक्ताः कर्मण्यविद्वांसो
यथा कुर्वन्ति भारत ॥
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्त-
श्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

भारत (श्रेष्ठ अशा भरतकुलामध्यें उत्पन्न झालेल्या अर्जुना !) **यथा** (ज्याप्रमाणें) **कर्मणि सक्ताः अविद्वांसः** (काम्यकर्मामध्येंच गुंग झालेले आणि म्हणून अज्ञानी लोक) **कुर्वन्ति** (काम्य कर्में करितात) **तथा** (त्याप्रमाणें) **लोकसंग्रहं चिकीर्षुः** (लोकसंग्रह करूं इच्छिणाऱ्या) **विद्वान्** (आत्मज्ञान झालेल्या ज्ञज्ञानें) **असक्तः** (फलाकांक्षा न ठेवितां) **कुर्यात्** (कर्म करावें) सारांश अज्ञानानें फलासक्त झालेले सामान्य लोक काम्य कर्में करितात, त्याच प्रमाणें परंतु फलविषयीं इच्छा न ठेवितां, विद्वान व लोककल्याणेच्छुपुरुषानें कर्म करावें.

सक्ता इति । सक्ताः कर्मण्यस्य कर्मणः फलं मम भविष्यतीति केचिदविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत, कुर्याद्विद्वानात्मवित्तथाऽसक्तः सन् । तद्वत्किमर्थं करोति तच्छृणु—चिकीर्षुः कर्तुमिच्छुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

मीं केलेल्या कर्माचें फल मला मिळालेंच पाहिजे असा अभिमान व अशी वासना धरून जे कर्म करितात, ते अज्ञानी होत. हे लोक कर्म करितात, तसेंच विद्वानानेंही कर्म करावें; मात्र मी कर्म करणारा व मला ह्या कर्माचें फल मिळेल वगैरे अभिमानाचा व वासनेचा त्याग करावा.

शिष्य—मग कर्म करा तरी कशाला ?

गुरु—फिरून आपलेंच ! कर्तृत्वाभिमान सोडून देऊन वासनाविरहित कर्म करावयाचें तें लोकसंग्रहासाठींच बरें ? स्वार्थ बुद्धीचा

सर्वस्वी त्याग व परोपकारप्रीत्यर्थ अलिप्तपणें कर्माचें आचरण हा मार्ग, हजारों वर्षांपासून स्वार्थबुद्धीनें कर्म करणाऱ्या सामान्य लोकांस, समजून द्यावा व इतरांसही आपल्या सारखेंच पूर्ण ज्ञान व्हावें एतदर्थ भगवंतांनीं ही मीमांसा चालविली आहे समजलास ?

मधु०—' भारत ' याचा अर्थ सर्व ज्ञानाला योग्य असा जो तूं, असा करितात ! बाकी अर्थ एकच आहे. **द्वि**वेदी, **शं**करानंद, **प्र**पाकार व **पर्व**तेही असाच अर्थ करितात.

वेदोक्त कर्मांचा अभिमान बाळगणारे **भी**मशर्मानामक एक टीकाकार आहेत, ते दुसऱ्या ओळींतील ' असक्त ' शब्दांतील ' अ ' कार काढून टाकून अर्थ करितात कीं ' विद्वानानेंही सक्त राहून, प्रीतिपूर्वक कर्म करावें; उदासीन वृत्तीनें कर्म करूं नये; कारण उदासीनवृत्तीनें केलेलें कर्म इतर अज्ञान्यांसही औदासीन्य धारण करावयास लावितें. सारांश पुनः अधर्मप्रचार होतो.' ही ओढताण कर्मठच करूं जाणत ! कारण, प्रयोजन नसतांना किंवा कर्मानुराग नसला तर कर्म होणेंच शक्य नाहीं, कर्मामध्यें आसक्त झाल्याविना कर्म होणेंच शक्य नाहीं असा प्राचीन व अर्वाचीन कर्मवादी लोकांचा सिद्धांत आहे. हा सिद्धांत मानसशास्त्रास व अनुभवास विरुद्ध आहे. पुष्कळ कर्में अशीं आहेत कीं तीं अनासक्त होऊन केलीं तरच उत्कृष्ट बठतात; पण हा मानसशास्त्राचा विषय आहे व तो समग्र येथें देणें शक्य नाहीं. उपनिषदें, **ब्र**ह्मसूत्रें, **बे**न, **सि**ज्विक, **स्पे**न्सर इत्यादि ग्रंथांतूनच हा समजून घेतला पाहिजे. गाणें ऐकणारा मनुष्य बहारीचें गाणें चाललें असतां ' मला येथें सुख झालें, तेथें सुख झालें ' अशी मानसिकमीमांसा आसक्तीनें करीत बसेल तर त्यास खरा आनंद होणार नाहीं. सारांश अहंभाव टाकून दिल्याखेरीज खरें सुख नाहीं.

रामा०—' अज्ञानी लोक आत्मज्ञानासाठीं कर्मयोगाचें अभिमानपूर्वक अनुष्ठान करितात.' हा अर्थ गीताशास्त्रास संमत असणें दुर्घटच होय. सामान्य मनुष्यें देहेंद्रियरूपी आत्म्याच्या उपयोगासाठीं मात्र अहंबुद्धीनें कर्म करितात, हें भगवंतांस दाखवावयाचें आहे.

द्वैतवाद्यांचा अर्थ सरळ असून ज्ञानी व अज्ञानी या उभयतांत कर्माविषयीं व कर्मफलाविषयीं अभिमानशून्यता व अभिमान असणें हीं अनुक्रमें असतात, हा दोघांमध्यें विशेष आहे असें म्हणतात तें नीटच आहे.

मराठी टीकाकार विशेष कांहीं सांगत नाहींत. **वा**मनपंडित थोडें विपथांत गेल्यासारखे दिसतात; पण त्याचा विचार पुढील श्लोकांत करूं. ॥ २५ ॥

एवं लोकसंग्रहं चिकीर्षोर्न ममाऽऽत्मविदः कर्तव्यमस्त्यन्यस्य वा लोकसंग्रहं मुक्त्वा ततस्तस्याऽऽत्मविद इदमुपदिश्यते—

असो; याप्रमाणें लोकसंग्रहच करूं इच्छिणारा व सर्वदां आत्मज्ञानामध्यें रममाण असणारा जो मी या मला अगर दुसऱ्या ब्रह्मज्ञ पुरुषाला लोकसंग्रहाव्यतिरिक्त दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं, हें सिद्ध झालें. आतां आत्मज्ञ पुरुषानें वागावें कसें त्याचा विचार सांगतों:—

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् ॥
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

कर्मसङ्गिनां अज्ञानां (कर्मामध्यें सक्त होऊन मी कर्ता, मी भोक्ता इत्यादि अज्ञानास वश झालेल्या लोकांचा) **बुद्धिभेदं** (बुद्धिभेद; कर्तृत्व, भोक्तृत्व, बुद्धीचा भेद) **न जनयेत्** (उत्पन्न करूं नये)–आणि–**युक्तः समाचरन्** (श्रुति, स्मृति, आचार इत्यादिकांस संमत असेल तें कर्म निरभिमान, निरभिलाष, बुद्धीनें करून) **सर्वकर्माणि** (सर्व प्रकारचीं योग्य कर्में) **जोषयेत्** (त्या अज्ञानी लोकांकडून करवावीं.)–सारांश अज्ञानी लोकांचें अज्ञान कायम आहे तोंपर्यंत त्यांच्या बुद्धीला भ्रंश होऊन कर्मावरील त्यांची श्रद्धा उडेल असा त्यांस उपदेश करूं नये; तर आपण स्वतः शिष्टविहित कर्माचें आचरण निरभिमानपणानें करून आपल्या अनुयायांकडून हीं सत्कर्में करवावीं.—

नेति। बुद्धेर्भेदो बुद्धिभेदो मयेदं कर्तव्यं भोक्तव्यं चास्य कर्मणः फलमितिनिश्चितरूपाया बुद्धेर्भेदनं चालनं बुद्धिभेदस्तं न जनयेन्नोत्पादयेदज्ञानामविवेकिनां कर्म-

सङ्गिनां कर्मण्यासक्तानामासङ्गवताम् । किं तु कुर्याज्जोषयेत्कारयेत्सर्वकर्माणि विद्वान्स्वयं तदेवाविदुषां कर्म युक्तोऽभियुक्तः समाचरन् ॥ २६ ॥

'मला हें कर्म करावयाचें आहे,' 'मला या कर्माचें फळ भोगावयाचें आहे' याप्रमाणें आत्मा कर्ता आहे, भोक्ता आहे, वगैरे निर्विकार आत्म्यासंबंधानें ज्यांची बुद्धि निश्चित झाली आहे, ते लोक अज्ञानी होत, तेच लोक अविवेकी होत; कारण सारासार विचार न करितां, त्यांनीं आत्म्यावर कर्तृत्वाचा, भोक्तृत्वाचा, व 'हें माझें,' 'हा मी' वगैरे अनेक मिथ्यारोप आत्म्यावर नित्यानित्यविवेकशून्य बुद्धीनें केले आहेत. अर्थात कर्म करणें हेंच आपलें मुख्य व एकच कर्तव्य होय व फलाकांक्षा करणें व फळ मिळविणें हाच मोक्ष होय असा त्यांच्या बुद्धीनें ग्रह घेतलेला असतो. असो; तेव्हां याप्रकारें ज्यांची बुद्धि निश्चित झाली आहे, त्यांच्या बुद्धीचा भंग, त्यांचें अज्ञान (कर्तृत्व भोक्तृत्व बुद्धि), कायम आहे, तोंपर्यंत करूं नये.

शिष्य—महाराज! ज्ञानी पुरुष कर्म करावयाचा नाहींच. तो तें करीनासा झाला ह्मणजे त्याचें उदाहरण पाहून त्याचे अनुयायीही कर्म सोडून देणारच. सारांश याप्रमाणें कर्मावर अश्रद्धा उत्पन्न झाली ह्मणजे बुद्धिभेद व्हावयाचाच; नव्हे काय ?

गुरु—'आतुरसंन्यासी' म्हणतात तें यालाच! आपणास ज्ञान झाल्याबरोबर इतरांसही ज्ञान झालें, असें समजून जे लोक एकदम कर्मत्याग करितात व याचा परिणाम आपल्या पुत्रपौत्रादिकांवर, स्नेह्यांवर, सारांश आपल्या अनुयायी वर्गावर काय–परिणाम–होईल याचा जे लोक विचार करीत नाहींत, त्यांची निंदा भगवंतांनीं परोक्षरीतीनें करून लोकनायकांनीं कसें वागावें याचें दिग्दर्शन ते करितात तें ऐकः आपले अज्ञानी अनुयायांचें अज्ञान कायम आहे तोंपर्यंत अज्ञानी लोक जें विहित कर्म फलाकांक्षेनें करितात तेंच कर्म आपण 'निरभिलाषरीतीनें करून आपल्या स्नेह्यांकरावींही आनंदानें तें कर्म

आत्मनिष्ठ पुरुषानें करावें. अर्थातच अज्ञानी लोकांची आपल्यावर येणेंकरून श्रद्धा बसेल; नंतर त्यास नित्यानित्यविवेक शिकवून त्यांस मोक्षपंथास क्रमाक्रमानें व त्यांची शक्ति पाहून लावावें. अज्ञान-निवृत्ति झाली नाहीं तोंच ब्रह्मोपदेश केला तर कर्मावर अश्रद्धा उत्पन्न होईल व वासनानाश न झाल्यामुळें ज्ञानही होणार नाहीं आणि 'इतो भ्रष्ट, ततो भ्रष्ट' अशी स्थिति होईल!

सर्वत्र एकवाक्यता आहे. शंकरानंद मात्र '**कर्मसङ्गिनां**' (कर्मासक्तलोकांचा) संबंध बुद्धिभेदाकडे न घेतां '**सर्वकर्माणि**' इकडे घेऊन कर्माधिकाऱ्यांचीं सर्व कर्मै विद्वानानें करावीं" असा एक अर्थ सुचवितात. आचार्याप्रमाणें त्यांनीं सरळ अर्थ केला आहेच.

रामा०—पूर्वजन्मार्जित अज्ञानाच्या योगानें ज्ञानप्राप्तीचा मार्ग ज्यांस समजणार नाहीं, त्यांचा बुद्धिभेद करूं नये. म्हणजे कर्माशिवाय दुसरा कांहीं मार्ग आत्मदर्शनास उपयोगीं आहे, असा त्यांचा ग्रह करूं नये. पण यासाठीं हे आचार्य उपाय सांगतात तो मात्र ज्ञानसंमत होणार नाहीं. ते म्हणतातः 'ज्ञान्यानेंही कर्मयोगच आत्मदर्शनाचें साधन आहे अशी **बुद्धिपूर्वक श्रद्धा** धारण करून ज्ञान्यानें कर्मयोगाचेंच आचरण करावें.' ज्ञानेश्वर, रंगनाथ, गीताव्याख्याकार व ! **वामन** पंडित ह्मणतातः श्रद्धा नसेल तरी कर्मावर आपली श्रद्धा आहे, असें लोकांस **भासवून** इष्टकार्य म्हणजे लोकसंग्रह करावा! सारांश रामानुजांचा मार्ग ज्ञान्यानें अज्ञानी व्हावें असा आहे आणि पंडितांचा मार्ग ज्ञान्यानें लोकांस फसवावें असा आहे! यांत पंडितांच्या ह्मणण्याला जरी भारतांत व आधुनिक सुखवादी लोकांच्या ग्रंथांतून आधार सांपडतील तरी सात्त्विक दृष्टीनें ह्या मार्ग निंद्य आणि गर्हणीय होय. तसेंच रामानुजाप्रमाणें ज्याला आत्मसाक्षात्काराचें ज्ञान झालें त्याची कर्मावर श्रद्धा बसेल अशी अपेक्षा करणें केवळ दुर्घटच होय! भगवंतांचा मार्ग न्यायास व ज्ञानास अनुसरूनच आहे; तो असा कीं ज्ञानी लोकांनीं **अलिप्तपणानें लोकसंग्रह करण्यासाठीं मात्र**—स्वतःच्या हितासाठीं यत्किंचितही नव्हे—कर्म करावें. अर्थात लोकसंग्रहासाठीं हें कर्म आहे असें अज्ञानी लोकांच्या दृष्टीस पडल्यावर कांहीं वेळानें तरी 'विषयोपभोग घेऊन देहेंद्रियरूपी आत्म्याचें हित' करावयाची त्यांची निष्ठा कमी होत जाऊन ते लोक निवृत्तिमार्गाकडे वळतील यांत शंका नाहीं. 'लोकहित करितों' असें ह्मणणाऱ्या लोकनायकांवर जर निःसीम श्रद्धा बसते, तर लोकांचें खरें हित साधणाऱ्या आचार्य, रामदास प्रभृति लोकनायकांवर केवढी जबरदस्त निष्ठा बसेल बरें!

द्वैत०—'युक्त' याचा अर्थ 'परमेश्वरचरणीं चित्त ठेवून' असा करितात.

सतराव्या व अठराव्या श्लोकांत आत्मज्ञानी पुरुषाला कर्म अगर उपासना करण्याचें कारण नाहीं असें सांगून एकोणिसाव्या श्लोकांत अर्जुनास, तो अज्ञानी होता म्हणून, निष्कामकर्म करावयास सांगितलें व निष्कामकर्म कोणींही म्हणजे ज्ञानी अगर अज्ञानी मनुष्यानें केलें असतां अनुक्रमें लोककल्याणकारक किंवा चित्तशुद्धिमूलक होतें; जनकादिक ज्ञानी पुरुषांनीं लोककल्याणासाठीं कर्म केलें तरी त्यांच्या अद्वैतज्ञानाच्या जोरामुळें त्यांचें कर्म बद्धक झालें नाहीं, मी परमेश्वरही असेंच निष्कामकर्म लोकहितबुद्धीनेंच करितों, मला कर्म केलेंच पाहिजे, नाहीं केलें तर सर्व जगांची व्यवस्था मोडून अनवस्था प्राप्त होईल; कारण सामान्य मनुष्यें श्रेष्ठ व शिष्ट पुरुषांचें अनुकरण करीत असतात; अतएव लोकसंग्रहासाठीं ज्ञानीपुरुषानेंही कर्म करावें व तें अशा रीतीनें करावें कीं तें कर्म आपणा स्वतःस बद्धक न होतां सामान्य लोकांची विहितकर्मांवर श्रद्धा बसेल व शेवटीं त्यांचे चित्त शुद्ध करील; असा विषय विसाव्या श्लोकापासून तों २६ व्या श्लोकापर्यंत आणिला आहे.

ज्ञानी पुरुषांनीं कर्म करण्याचेंच टाकून दिलें तर सर्वत्र औदासीन्य माजून अव्यवस्था होईल अशी भीति स्थूलबुद्धीच्या द्वैतवादी व अद्वैतविद्वेषी लोकांस असते तिचा निरास करावा व 'आपण आतां मुक्त झालों, आतां आपल्यास कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं' असें 'स्वार्थापुरतें रामायण' ऐकणाऱ्या व समाजाविषयीं उदासीन असणाऱ्या अर्धवट वेदांत्यांचीही येथें कानउघाडणी करावी, या हेतूनें वरील श्लोकांचा अवतार आहे. आपण सुटलों म्हणजे सर्व विश्व मुक्त झालें असें कांहीं वेदान्ती समजतात. असो; प्रकृतीशीं आत्म्याचा मायिक संबंध आहे, असें जोंपर्यंत वाटत आहे, तोंपर्यंत आपल्यास स्वतःकरितां, निदान लोकांकरितां तरी कर्म केलें पाहिजे. सारांश जीवदृष्टीनें वर्तन चाललें आहे तोंपर्यंत स्वतःस व इतर जीवांस संसारांतून काढील असें कर्म आपण निर्लोभ

मनानें केलें पाहिजे. स्वतःच्या अतिलोभामुळें, आलस्य किंवा अज्ञान किंवा औदासीन्य यांपैकीं एकाद्या राक्षसानें पछाडलें असल्यामुळें, जर ज्ञानी म्हणवून घेणाऱ्या पुरुषानें कर्मच केलें नाहीं, उन्मत्त वृत्ति ठेविली, तर त्याचे सर्व अज्ञानी अनुयायी विहितकर्माच्या अभावीं दुष्कर्म करितात, बुडतात आणि ज्ञानाचा टेंभा मिरविणाऱ्या पुरुषानें आपलें कर्तव्य आपल्यास कळत असूनही त्यानें तें केलें नाहीं म्हणून त्या ज्ञानोन्मत्त पुरुषालाही बुडवितात! अयोग्य मनुष्यास अयोग्य कर्म करावयास लावण्याचा हा परिणाम होय. ह्या असल्या विपथ-गामी, ज्ञानमत्त व शाब्दिकजाल उत्पन्न करणाऱ्या तर्कभांडांचा समाचार भगवंतांनीं परोक्षरीतीनें येथें घेतला आहे. स्वतःस पूर्ण करावयाच त्याचप्रमाणें इतरांसही पूर्णत्व द्यावयाचें ही ज्ञानी पुरुषाचीं कर्तव्यें आहेत. **‘आपणा सारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तयां लागी।’** ह्या तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीला अनुरूपच ज्ञानी पुरुषाचें कर्तव्य असलें पाहिजे. हा विचार सुटला म्हणूनच अद्वैतज्ञान-रूपी अमृतकलशांत अद्वैती म्हणून मिरविणाऱ्या ज्ञानभोंदूंनीं आपल्या अर्धवट ज्ञानानें आलस्य व औदासीन्यरूपी विष कालविलेलें आहे. श्रीकृष्ण, श्रीरामचंद्र, जनक, सनकसनंदन, नारद, वसिष्ठ, वामदेव, व्यास, गौडपाद, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम इत्यादि पूर्ण ज्ञानी महापुरुषांनीं कर्म केलें तें केवळ लोकोद्धारा-साठीं केलें व लोकांची आपल्यावर पूर्ण श्रद्धा बसेल इतक्या निस्पृहतेनें केलें, हा सर्व ऐतिहासिक भाग विसरून जाऊन ‘मी ब्रह्म झालों’ ‘आतां मला कांहीं कर्तव्य उरलें नाहीं’ असें म्हणणाऱ्या वेदांती शठांनीं वेदांतमार्गाचें जेवढें नुकसान केलें आहे, तेवढ्याचें वर्णन प्रत्यक्ष सहस्रवदन शेषाच्या अखंड जिव्हांनींही अनंतकालांत सुद्धां करवणार नाहीं. सत्कर्मावर श्रद्धा ठेवून अधि-कारानुरूप वासना नष्ट करणारें कर्म प्राकृत मनुष्याच्या हातून कर-विण्याची अक्कल आमच्या आधुनिक वेदांत्यांतून नाहींशी झाली म्हणून परमार्थ साध्य करून देणारें संसाराचें जें एक उत्कृष्ट स्वरूप त्यांस आम्हीं आंचवलों आणि संसार केवळ दुःखमय आहे असें

वाटविणाऱ्या निर्घृणकाळाच्या जबडयांत जाऊन आडकलों आहों! असो; तेव्हां अमृत म्हणून विषाचे पेले पाजणाऱ्या व्यक्तिघातक व समाजविघातक शत्रूंच्या दुष्ट मतांचा यथास्थित समाचार घेऊन ज्ञानी पुरुषाला समाजाचा उद्धार करणें आहे, तो त्यानें कोणत्या मार्गानें करावा हें पंचवीस व सव्वीस श्लोकांत उत्तम रीतीनें सांगितलें आहे. स्वकर्तव्याची कोणत्याही तऱ्हेनें हानि करूं न देतां प्रत्येकाची कर्तव्यसीमा वाढवून ज्याच्या त्याच्या अधिकारानुसार वासनेचा नाश करावयाचा हा लोकहिताचा व्यावहारिक, धार्मिक आणि तात्त्विक असा सोज्ज्वल मार्ग आहे. युरोपियन लोकांतही लोकहिताचें तत्त्व अवतीर्ण झालें आहे व त्यास धर्माचेंही पाठबळ आहे हें खरें; पण ब्रह्मज्ञानाची खरी ओळख त्यांस न झाल्यामुळें त्यांच्या सात्त्विकंमन्य व्यवहाराचें व धर्माचें पर्यवसान पुनः जीवास वासनारूपी संसारामध्यें ढकलिवणारें आहे आणि ह्मणूनच ह्यांतील साधुपुरुषांचें वर्तन रामदास, तुकाराम इत्यादिक साध्या भोळ्या संतांपेक्षांही कमी योग्यतेचें आहे, असें तात्त्विक दृष्टीनें ठरतें. सर्व चराचर विश्वास ज्ञानरूप आणि आनंदरूप, तात्पर्य एकरूप, करून आपपरभेद नष्ट करावयाचा हें आमच्या तात्त्विक व म्हणूनच अद्वैती सिद्धांतांचें पर्यवसान आहे व या अखंड काळाच्या ओघांत निराबाधपणानें चालणाऱ्या महासिद्धांतांस आधुनिक, अनुभवसिद्ध अशा विश्वगामी उत्क्रांतितत्त्वाचें उत्कृष्ट पाठबळ आहे. युरोपियन धार्मिक तत्त्वज्ञान अद्यापि भिन्न भावास वश आहे तें इतकें कीं 'ही सर्व सृष्टि मानवी प्राण्याकरितां मात्र आहे, कारण त्यासच आत्मा आहे, इतर प्राण्यास नाहीं,' म्हणून स्वोन्नतिसाठीं मानवी प्राण्यानें इतर जीवांचा, श्रेष्ठ कोटींतील मनुष्यानें इतर माणसांचा संहार करण्यास प्रत्यवाय नाहीं! असलीं एकदेशीय संकोचित तत्त्वें **मार्टिनो** सारख्या महाचतुर लेखकांच्या ग्रंथांतून झळकतात! असो; हा अन्यविषय आहे. तात्पर्य इतकेंच आहे कीं लोकांचें जेणेंकरून पारमार्थिक कल्याण होईल व तें तें कल्याण प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणें समजावून देऊन श्रद्धेनें व एकनिष्ठेनें—मारून मुटकून किंवा फसवून नव्हे—साध्य होईल असें

होऊन वर्तणारा पुरुष खरोखर लोकनायक होय. त्यानेंच आपल्या व इतरांच्या जन्माचें सार्थक्य यथाशक्ति केलें. तोच वंद्य होय. तोच परमेश्वराचा अंश होय. असो; परमेश्वरा! आपआपला अभिमान सोडून व 'मी समजतों त्यापेक्षां आणखीही सत्यान्वेषणाचे व सात्त्विकवर्तनाचे मार्ग आहेत, सत्याचा मक्ता मींच घेतला नाहीं' असा निश्चय होऊन खरें सात्त्विक कर्म करण्याची प्रेरणा वरील भगवद्वाक्यांवरून तरी आमच्यामध्यें अवतीर्ण होईल काय? ॥ २६ ॥

अविद्वानज्ञः कथं कर्मसु सज्जत इत्याह—

शिष्य—महाराज! अज्ञानी मनुष्य तरी कर्मामध्यें कसा लिप्त होतो?

गुरु—पहा कसा होतो तें :—

प्रकृतेः क्रियमाणानि
गुणैः कर्माणि सर्वशः ॥
अहंकारविमूढात्मा
कर्ताऽहमिति मन्यते ॥ २७ ॥

सर्वशः (सर्वथा, सर्व प्रकारांनीं) **प्रकृतेः गुणैः** (प्रकृतीच्या, मूळ अविद्येच्या, सत्त्व, रज तमादि चंचल स्वभावी गुणांनीं) **क्रियमाणानि** (केलीं जाणारीं, होणारीं) **कर्माणि** (कर्मे जीं असतात त्यांचा) **कर्ता** (करणारा) **अहं इति** (मी आहे, असें) **अहंकारविमूढात्मा** (अहंकारानें मोहग्रस्त होऊन जीवस्वरूप प्राप्त झालें आहे आत्म्यास ज्याच्या असा अज्ञानी पुरुष) **मन्यते** (मानितो.)-सारांश प्रकृतीच्या अंगभूत असलेल्या गुणांनींच सर्वथा होत असलेलीं सर्व कार्यें 'मी करीत आहें' असें अहंकारास वश होऊन गेलेल्या अज्ञानी पुरुषास वाटतें. अर्थातच तो कर्मासक्त होतो.—

प्रकृतेरिति । प्रकृतेः प्रकृतिः प्रधानं सत्त्वरजस्तमसां गुणानां साम्यावस्था तस्याः प्रकृतेर्गुणैर्विकारैः कार्यकरणरूपैः क्रियमाणानि कर्माणि लौकिकानि शास्त्रीयाणि

च सर्वशः सर्वप्रकारैरहंकारविमूढात्मा कार्यकरणसंघातात्मप्रत्ययोऽहंकारस्तेन विविधं नानाविधं मूढ आत्माऽन्तःकरणं यस्य सोऽयं कार्यकरणधर्मा कार्यकरणाभिमान्यविद्यया कर्माण्यात्मनि मन्यमानस्तत्तत्कर्मणामहं कर्तेति मन्यते ॥ २७ ॥

शिष्य--गुरुजी! प्रकृति म्हणजे काय?

गुरु—वाहवा! अद्यापपर्यंत तुला प्रकृति म्हणजे काय हें ठाऊक नाहीं! अरे! प्रकृति म्हणजे कापिलसांख्याचें प्रधान, अथवा सत्त्व, रज, तम या गुणांची साम्यावस्था होय. समजलास?

शिष्य—भगवन्! कृपा करा, माझ्या अंतःकरणांत कांहींएक प्रकाश पडला नाहीं.

गुरु—बरें ऐकः—व्यवहारदृष्टीनें पाहूं लागलें म्हणजे ही सृष्टि आपल्यास दिसते, अशीच मूळपासून नाहीं, हा परिणाम आहे, ही उत्क्रांति आहे, असें सृष्टिशोधकांच्या, कपिलादि महा मुनींच्या लक्षांत येऊन या परिणामाचा, या उत्क्रांतीचा उगम कोठें आहे असा जेव्हां त्यांनीं शोध केला, तेव्हां विचार दृष्टच्या त्यांच्या लक्षांत आले कीं पृथ्वी जल वगैरे पंचमहाभूतें, तसेंच आपलीं पंच कर्म व पंच ज्ञान अशीं दहा इंद्रियें, तसेंच पंच सूक्ष्मभूतें, आपली बुद्धि, आपला अहंकार, आपलें मन, हीं सर्व प्रकृतीच्या व्यक्त स्वरूपापासून उत्पन्न झालीं आहेत. सारांश व्यक्त म्हणजे नामरूपाप्रत आलेल्या एका तत्त्वापासून मानव प्राण्यासुद्धां सर्व सृष्टि निर्माण झाली. हें व्यक्त तत्त्व मूळप्रकृतीपासून उत्पन्न झालें. ह्या मूळप्रकृतीलाच प्रधान, अव्यक्त, असें ह्मणतात. या अव्यक्ताचे अंगभूत सत्त्व, रज आणि तम असे तीन गुण आहेत. हे तिन्ही गुण सारखे असले म्हणजे, साम्यावस्थेंत असले ह्मणजे प्रधान शांत अथवा अव्यक्तस्वरूपी असतें; आणि गुणांमध्यें चलबिचल झाली म्हणजे प्रकृतीस व्यक्तत्व येऊन सृष्टीस आरंभ होतो. हें अव्यक्त व व्यक्त स्वरूप पाहणारा पुरुष किंवा आत्मा हें पंचविसावें तत्त्व होय. असो; तेव्हां व्याव-

हारिकदृष्टीनें व आत्मदृष्टीनें पाहिलें म्हणजे सृष्टींत जी घडामोड होत आहे ती सर्व प्रकृतीच्या योगानें, प्रकृतीच्या गुणांनीं, इंद्रियादिकरवीं, होत आहे; प्रकृति कारण व कर्म हें कार्य आहे, यांत आत्म्याचा बिलकूल संबंध नाहीं; कर्म लौकिक असो वा शास्त्रीय असो, तें सर्व प्रकृतिगुणांनीं होत आहे, तें अनात्मक आहे; असा खरा प्रकार ज्ञानी लोकांस समजतो; पण अज्ञानी लोकांस हें समजत नाहीं. त्यांस वाटतें कीं हीं सर्व कृत्यें आपणच करणारे आहोंत व आपल्यांसच फल मिळतें. अहंकाराच्या अभिमानानें, सारांश अविद्येमुळें, आत्माच कर्ता व भोक्ता आहे असें 'मी कर्ता,' मी फल भोगणारा,' 'मला कर्म केलें पाहिजे, मला फल भोगिलें पाहिजे,'–असें–म्हणणारा पुरुष मिथ्या अभिमानाला वश झाला असल्यामुळें, सदैव म्हणतो कीं हीं सर्व कर्में आत्म्याचे द्वारां होत आहेत! असें अज्ञान कां झालें म्हणशील तर त्याचें मुख्य कारण हें कीं 'माझाच आत्मा कर्माचें कारण आहे व कर्माचें फल भोगणारा आहे' या मिथ्या अहंकाररूपी ज्ञानाभासानें मनुष्याचा शुद्ध आत्मा अनेक प्रकारें मोहग्रस्त होतो. सारांश अविद्येमुळें, अहंकाराच्या अभिमानामुळें, अज्ञानी मनुष्य कर्मामध्यें लिप्त होतो. झालेंना आतां समाधान? ही अज्ञानी मनुष्यांची स्थिति झाली.

मधु०—'ज्ञानी व अज्ञानी दोघेही कर्म करितात पण त्यांत भेद आहे तो २७ व २८ श्लोकांत व्यक्त केला आहे.' आत्मस्वरूपाचें ज्ञान होण्यास असमर्थ आहे अंतःकरण ज्याचें तो विमूढात्मा असें मधुसूदन शंकर ह्मणतात. इंद्रियें प्रकृतीचे गुणच आहेत त्यांच्याठायीं आत्मबुद्धि धरितो व कर्म करितो तोही विमूढच असें प्रभाकार, शंकरानंद व पर्वते म्हणतात. द्विवेदी, हेंच म्हणतात. रामानुज म्हणतातः अनात्मिकावर आत्म्याचा आरोप करणें हेंच मूर्खत्वाचें लक्षण होय.

द्वैतवादी.—'प्रकृति' शब्दानें 'स्वतंत्र ईश्वर, ईश्वराधीन जीव, जडप्रकृति आणि देहेंद्रियें' असा अर्थ समजतात आणि कर्म होतें तें ईश्वर, परतंत्रजीव, जड वस्तु आणि इंद्रियें वगैरे या सर्वांच्या करवीं होतें, जीवाच्या एकट्याच्या हातून कांहीं होत नाहीं, असें असूनही 'मीच कर्ता' असा अभिमान ज्याला असतो तो मूर्ख होय असें म्हणतात.

ज्ञानेश्वरांची सरळ व्याख्या पहा :—**'तैसीं शुभाशुभ कर्में। जियें निपजती प्रकृतिधर्में,। तियें मूर्ख मतिभ्रमें। मी कर्ता ह्मणे!॥**

गीताव्या०--नसते घेइजे आपुल्या माथां । हें काय शहाणपण पार्था ! । आणि तेणेंची (आपलें नसतांही आपलें ह्मणून उसनें घेतलेले कर्मीनें) मानिजे श्लाघ्यता । तरी काय अज्ञाना पार असे ? ॥ ही अज्ञानी मनुष्याची 'विकत श्राद्ध घेऊन सव्यअपसव्य करीत बसण्याची' पद्धति होय ! ॥ २७ ॥

यः पुनर्विद्वान्—

परंतु जो विद्वान आहे तो—

तत्त्ववित्तु महाबाहो
गुणकर्मविभागयोः ॥
गुणा गुणेषु वर्तन्त
इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

महाबाहो (आजानुबाहु अर्जुना !) तु (परंतु) गुणकर्मविभागयोः (गुणापासून आत्मा निराळा आहे व कर्मापासूनही निराळा आहे असें गुणकर्मविभागांचें) तत्त्ववित् (रहस्य जाणणारा, गुणकर्मा‌ऽव्यतिरिक्त आत्मा आहे असें तत्त्व जाणणारा विद्वान्) न सज्जते (गुणामध्यें किंवा कर्मामध्यें लिप्त होत नाहीं) —काय समजून ?—गुणाः (नेत्र, कर्ण इत्यादि व हस्त पाद इत्यादि इंद्रियें) गुणेषु (रस, रूप वगैरे व सुख दुःख वगैरे विषयांमध्यें) वर्तन्ते (वर्तत असतात, कर्म करितात) इति मत्वा (असें समजून)—सारांश गुणकर्मांहून आत्मा भिन्न आहे व प्रकृतिजन्य इंद्रियें प्रकृतिजन्य विषयांमध्यें गुंतून पडतात, आत्म्याचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं असें खरें तत्त्व समजून कर्मामध्यें विद्वान् पुरुष लिप्त होत नाहीं :—

तत्त्वविदिति । तत्त्ववित्तु महाबाहो कस्य तत्त्वविद्गुणकर्मविभागयोर्गुणविभागस्य कर्मविभागस्य च तत्त्वविदित्यर्थः । गुणाः करणात्मका गुणेषु विषयात्मकेषु वर्तन्ते नाऽऽत्मेति मत्वा न सज्जते सक्तिं न करोति ॥२८॥

आतां विद्वान जो आहे तो काय करितो—

शिष्य—महराज ! विद्वान कोण बरें ?

गुरु—अरे! गुणांपासून आत्मा निराळा आहे व कर्मापासून आत्मा निराळा आहे असें खरें रहस्य जाणणारा तो खरा विद्वान किंवा तत्त्ववेत्ता होय. असो; हा विद्वान खरें तत्त्व समजतो कीं कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें म्हणजे विषयग्रहण करण्याचीं साधनें, गुणामध्यें म्हणजे विषयामध्यें, गुंतून पडतात; ह्याप्रमाणें त्यांच्या हातून, इंद्रियांकरवीं, कर्म होतें, यांत आत्म्याचा कांहीं एक संबंध नाहीं. अशा प्रकारें आत्मज्ञान झालेला पुरुष अर्थातच कर्मांमध्यें अहंकाराभिमानानें गुंतून पडत नाहीं. इंद्रियांचें कर्म जें विषय ते उत्पन्न करून विषयोपभोग घेणें हें काम इंद्रियें करितात, आत्मारामाचा तेथें संबंध नाहीं असें समजल्यावर अर्थातच अभिमान नष्ट होतो.

मधु०—'गुणकर्मविभागयोः' = गुण म्हणजे देह, इंद्रियें व अंतःकरण; कर्म म्हणजे या देहेंद्रियांचे व्यापार; सारांश अनात्मक असे देहेंद्रियादिक व त्यांचे व्यापार तें गुणकर्म होय. विभाग म्हणजे सर्व जडाहून भिन्न असणारा आत्मा; तेव्हां गुणकर्म आणि आत्मा यांचें तत्त्व जाणणारा तो याथात्म्यज्ञानी होय. असा अर्थ करून आचार्यांच्या अर्थांत समंजसत्व नाहीं असें म्हणतात. तात्पर्य एकच आहे, पण समास सोडविण्याचे मार्ग भिन्न आहेत. मधुसूदनीकारांच्या मतें आचार्यकृत समासविग्रहानें विभाग शब्द निरर्थक होतो. धनपती म्हणतात: मधुसुदनीकारांचा प्रयोग व्याकरणदृष्ट्या शुद्ध नाहीं! असो; व्याकरणाच्या या खटपटींत आपण कशाला पडावें ! 'अर्थेरितात्पर्यं' या न्यायानें आपण अर्थाकडे लक्ष द्यावें. विभाग म्हणजे आत्मा हा अर्थ अप्रसिद्ध होय. पर्वते व द्विवेदी मधुसूदनीकारांचे अनुयायी आहेत. शंकरानंद व प्रभाकार हे आचार्यानुवादी आहेत. दृश्यामध्यें गुणाचा भाग किती, कर्मांचा भाग किती हें जो जाणतो तोही तत्त्ववेत्ता होय, असा एका पंडितानें अर्थ काढिला आहे !

द्वैत०—'गुणविभाग' म्हणजे ईश्वर, जड प्रकृति, जीव इत्यादिकांचे गुण व परस्परांतील भेद' आणि कर्मविभाग म्हणजे ईश्वराचें स्वतंत्र कर्म, प्रकृतीचे विकार आणि जीवाचे पराधीन कर्म व त्या परस्परांतील भेद' होत. हें जाणणारा तो तत्त्ववेत्ता होय. द्वैत्यांचा मुख्य पुरुषार्थ जो ईश्वर त्यासही त्याचे भक्त कर्म करावयास लावितात हें आश्चर्य होय !

ज्ञाने० व पंडि०—ज्ञानी पुरुष केवळ साक्षीरूपानें असतो. 'गाई चरती

तृण । दोन्ही नव्हे द्रष्टा आपण ।' हा पंडितांचा दृष्टांत किती समर्पक आहे ! रंगनाथांचेही दीप व आकाशाचे दृष्टांत चांगले आहेत.

गीताव्याख्याकारांची कोटी पहा:—जरी स्वरूपीं (आत्म्यामध्यें) कर्तृत्व असतें । तरी नेत्रेंवीणही पहाणें घडतें ॥ हस्तेवीण अरतें परतें । होतें (झालें असतें) देणें घेणें ! ॥......म्हणोनि निर्धार । आत्मा अकर्ता स्वयें ॥ २८ ॥

ये पुनः—

पुनः जे—

प्रकृतेर्गुणसंमूढाः
सज्जन्ते गुणकर्मसु ॥
तानकृत्स्नविदो मन्दा-
न्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

प्रकृतेः (प्रकृतीच्या, अविद्येच्या) **गुणसंमूढाः** (गुणांनीं, इंद्रियांनीं किंवा विषयांनीं पूर्ण मोहित झालेले अज्ञ लोक) **गुणकर्मसु** (इंद्रियांचीं विषयोपभोगरूपी कर्में, त्यांत) **सज्जन्ते** (मग्न होऊन जातात) **अकृत्स्नविदः** (पूर्ण ज्ञान न झालेल्या) **मन्दान्** (–व–मंद बुद्धीच्या) **तान्** (त्या–लोकांस) **कृत्स्नवित्** (पूर्ण दृष्टीच्या आत्मज्ञानें) **न विचालयेत्** (चाळवूं नये, त्यांचा बुद्धि भेद करूं नये.)–सारांश विषयाला लुब्ध झालेले लोक इंद्रियांच्या कर्मांत निमग्न होतात अशा मठ्ठ बुद्धीच्या अज्ञानी लोकांची कर्मश्रद्धा ज्ञानी पुरुषानें नाहींशी करूं नये.—

प्रकृतेरिति। प्रकृतेर्गुणैः सम्यङ्मूढाः संमोहिताः सन्तः सज्जन्ते गुणानां कर्मसु गुणकर्मसु वयं कर्म कुर्मः फलायेति, तान्कर्मसङ्गिनोऽकृत्स्नविदः कर्मफलमात्रदर्शिनो मन्दान्मन्दप्रज्ञान्कृत्स्नविदात्मवित्स्वयं न विचालयेद्बुद्धिभेदकरणमेव चालनं तन्न कुर्यादित्यर्थः ॥ २९ ॥

प्रकृतीच्या मोहक गुणांनीं ह्मणजे मनोहर विषयांनीं ज्यांची प्रकृतिमय बुद्धि भ्रष्ट झाली असे लोक प्रकृतीचेच गुण जीं इंद्रियें त्या इंद्रियांच्या कर्मामध्यें गुंग होऊन जातात, म्हणजे इंद्रियांकरवीं होणारीं कर्मे आत्माच करितो, असा खोटा अभिमान धरून 'आम्ही आत्मस्वरूपानें कर्म करितो व तें कर्म फल मिळावें एतदर्थ करितों'! असें बडबडावयास लागून कर्मासक्त होतात. असल्या, कर्म व कर्मफल येथपर्यंतच ज्यांची दृष्टि चालते, याच्या पलीकडे जात नाहीं, अशा, अर्धवट विचारी, अनात्मज्ञ अथवा मंदबुद्धीच्या लोकांस गूढ व गहन विचार सांगून पूर्ण दृष्टीच्या ज्ञानी मनुष्यानें त्यांच्या कर्मश्रद्धेंत चळवळ करूं नये. त्यांच्या बुद्धींत भेद उत्पन्न करणें, त्यांची निश्चित बुद्धि अनिश्चित करणें, यालाच चळवळ ह्मणावयाचें. असो; तेंव्हां अभिमान आहे तोंपर्यंत अज्ञानास ब्रह्मोपदेश केला तर इष्ट फल न मिळतां अनर्थ मात्र उत्पन्न होतील असें सांगण्याचा भाव आहे.—

मधु०—ज्याला आत्मज्ञान झालें आहे तो पूर्णज्ञानी व बाकीचे अपूर्णज्ञानी असाही भाव येथें सुचविला आहे. द्वैतांत ज्ञानसमाप्ति होत नाहीं. घट समजला तर पट समजत नाहीं, दोन्ही समजलें तरी रज्जु समजत नाहीं, असें द्वैतभान असल्यानें ज्ञान अपूर्णच राहतें. **पर्वते** व **द्विवेदीः** 'इंद्रियांस आत्मा म्हणणारे किंवा आत्म्यासच इंद्रियें आहेत असें म्हणणारे ते अज्ञानी होत; मोह यानांच होतो.' येथें ज्ञान्यानें लोकसंग्रहासाठीं उद्योग करावा तो कसा ह्या विषयाची परिसमाप्ति झाली. **शंकरानंद** व **श्रीधरः**–' कामना ठेवून कर्म करूं नये, मिळणारें फल असत् म्हणजे अनित्य आहे,' वगैरे उपदेश कर्मासक्तांस करूं नये; असें म्हणतात. **प्रपाकारः**–'अकृत्स्नविद्' = एक एक इंद्रियांची उपासना करणारे, एकदेशी आणि म्हणून अज्ञानी. ह्या अर्थसमर्थनार्थ शातपथी श्रुति देतात.

रामानुजाचार्य हे या श्लोकांतूनही असा निष्कर्ष काढितात कीं भगवंतास ज्ञानयोगापेक्षां कर्मयोगच श्रेष्ठ आहे असें प्रकट करावयाचें आहे! अर्थ सरळच आहे.

द्वैतवादी गुण शब्दाचे व प्रकृति शब्दाचे अनेक अर्थ घेतात. '**शब्दाद्या इन्द्रियाद्याश्च सत्त्वाद्याश्च शुभानि च। अप्रधानानि च गुणा निगद्यन्ते निरुक्तगैः॥**' (गुण = (१) शब्दादि विषय. (२) ज्ञानेंद्रियें, (३) चांगलें

तें, (४) जें प्रधान मुख्य नव्हे ते; असे अनेक अर्थ आहेत). प्रकृति = ईश्वर, जडवस्तु, देहेंद्रियें असे भिन्न अर्थ मार्गे दिलेच आहेत. असो; 'तेव्हां स्वतंत्र ईश्वर इच्छामात्रें करून प्रवर्तविणारा, सर्वस्वी अचेतन प्रकृति आणि सत्त्वरजादि गुण यांच्या करवीं सर्व कर्में होत असतां 'मीच कर्माचा स्वतंत्र अधिकारी' असें जो ह्मणतो तो अज्ञानी होय. प्रवर्तक ईश्वर आहे, इंद्रियें विषयाकडे जाणारीं आहेत, जीवांचें कर्म विष्णुभक्ति हेंच आहे असें जाणून निरभिमानपूर्वक, निर्लोभमनानें, जो वागतो तो ज्ञानी होय.' बाकीचा अर्थ सरळ आहे.

मराठीटीकाकार विशेष सांगत नाहींत. प्रकृतीचे सत्व, रज आणि तम हे तीन गुण पुरुषामध्यें अनुक्रमें मन, इंद्रियें आणि देह येथें असतात, व यां तिन्ही ठिकाणीं अज्ञान्यांची अहंबुद्धि असते असें पंडित म्हणतात. चतरजी: येथपर्यंत इतकें ठरलें कीं ब्रह्मज्ञान्याशिवाय इतर सर्वांनीं कर्म केलेंच पाहिजे, कारण त्यांची वासना नष्ट झालेली नसते. विद्वानाची वासना नष्ट झाली असते म्हणून त्यास कर्म नको; लोकसंग्रहासाठीं मात्र त्यांनीं कर्म केल्यास हरकत नाहीं. ॥ २९ ॥

कथं पुनः कर्मण्यधिकृतेनाज्ञेन मुमुक्षुणा कर्म कर्तव्य-मित्युच्यते—

शिष्य—गुरुमहाराज! तर मग जो अज्ञानी आहे, म्हणजे कर्मच करण्याचा ज्याला अधिकार आहे, त्याला मोक्ष मिळण्याची आशाच खुंटली ह्मणावयाची!

गुरु—कां रे बाबा?

शिष्य—कारण कर्मानें मोक्ष मिळत नाहीं असें आपण सिद्ध केलें आहे, व आतां अज्ञाला कर्माशिवाय दुसरा अधिकारच नाहीं असें आपण सांगतां, तेव्हां कर्म करणाऱ्या अज्ञाला नैष्कर्म्यानें प्राप्त होणारा मोक्ष साध्य होणेंच नाहीं असें नाहीं कां ठरलें?

गुरु—अरे! तूं बराच तर्कटी आहेस! असो; सर्व दयाघन प्रभूनें या अज्ञास सज्ञान करण्यासाठींच मार्ग ठेविला आहे तो सांगतो ऐक:—

मयि सर्वाणि कर्माणि
संन्यस्याध्यात्मचेतसा ॥

निराशीर्निर्ममो भूत्वा

युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

अध्यात्मचेतसा (परमात्मा आणि आपला जीव यामध्यें परस्पर कोणता संबंध आहे याच विचारामध्यें गुंतविलेल्या मनाच्या साहाय्यानें) **सर्वाणि कर्माणि** (यच्चयावत् सर्व कर्मे) **मयि** (माझ्याठायीं, परमेश्वराचे ठायीं) **संन्यस्य** (ठेवून)–व–**निराशीः** (आशाशून्य, वासनाशून्य)–व–**निर्ममः** (ममत्वशून्य) **भूत्वा** (होत्साता) **विगतज्वरः** (निश्चित झालेला जो तूं)–त्या त्वां– **युध्यस्व** (युद्ध करावें)–सारांश परमेश्वरचरणीं लक्ष्य ठेवून परमेश्वराजवळ आपलीं सर्व कर्में ठेव; आणि वासना व ममत्व यांचा त्याग करून निश्चितपणानें युद्ध करण्याची, श्रुतिस्मृतिविहित कर्म करण्याची, तयारी कर; तात्पर्य युद्धास सज्ज हो.–

मयीति । मयि वासुदेवे परमेश्वरे सर्वज्ञे सर्वात्मनि सर्वाणि कर्माणि संन्यस्य निक्षिप्याध्यात्मचेतसा विवेकबुद्ध्याऽहं कर्तेश्वराय भृत्यवत्करोमीत्यनया बुद्ध्या । किंच निराशीस्त्यक्ताशीर्निर्ममो ममभावश्च निर्गतो यस्य तव स त्वं निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरो विगतसंतापो विगतशोकः सन्नित्यर्थः ॥ ३० ॥

सर्वांवर सत्ता चालविणारा, सर्वज्ञानी आणि सर्वांच्या अंतर्यामीं राहून सर्वांस आत्मत्व देणारा व सर्वांचें नियमन करणारा जो मी वासुदेव नामक परमेश्वर त्या माझेठायीं आपलें प्रत्येक कर्म अर्पण करीत जा, मला अर्पण करीत जा–मग तें कर्म व्यावहारिक असो वा धार्मिक असो–म्हणजे—

शिष्य—पण कृत्यें परमेश्वराला कशीं अर्पण करावयाचीं ?

गुरु—तेंच सांगतों ऐक :—अर्जुनास हा उपदेश केला आहे, म्हणजे अर्जुनास प्रतिनिधी करून प्रत्येक अज्ञानी कर्माधिकाऱ्यास

हा उपदेश केला आहे, असें समजावें. असो; भगवान म्हणतातः तूं सेवक आहेस आणि मी तुझा स्वामी आहें, अशा विवेकबुद्धीनें अथवा वेदांत श्रवणानें जसा इमानी सेवक आपलें जीवितसर्वस्व व मनःसर्वस्व यजमानास अर्पण करून त्याच्यासाठीं मात्र कर्म करीत असतो तसें परमेश्वराधीन सर्व आहे असें समजून सर्व कर्म मला अर्पण करीत जा. ह्याचप्रमाणें स्वतःविषयीं जय, सुख, इत्यादि विषयक वासना असते व 'हे माझें, तें माझें' अशी ममता असते त्या दोहींचाही निर्वंश करून युद्ध करावयास लाग. ह्या युद्धकर्मानें मला शोक होईल, संताप होईल अशी यत्किंचितही भीति मनांत बाळगूं नको. सारांश 'परमेश्वरच सर्व कर्ता, करविता, भूतभविष्यवर्तमान जाणणारा आणि जीवमात्रांचा उद्धार करणारा आहे' हें तत्त्व लक्ष्यांत बाळगून श्रुतिस्मृतिविहित कर्म मी करावयास सांगतों म्हणून तें करण्यास आरंभ कर. अज्ञानी कर्माधिकाऱ्याला निवृत्तिपंथाकडे नेण्याचा हाच पहिला धडा आहे.

श्रीधर, प्रपा० व मधु० आचार्यानुसारीच आहेत. 'केवळ निर्ममत्व व विगतज्वरत्व हें अर्जुनास युद्धसंबंधानें सांगितलें आहे, सर्वांस हें येवढें लागू नाहीं, बाकी सर्व आहे' असें म्हणतात. **पर्वते व द्विवेदी** आचार्यानुसारी **आहेत. द्विवेदींनीं** 'परब्रह्मच सर्वत्र एकरसत्वानें भरलेलें आहे, कर्ता करविताही आभासमात्रेंकरून परमेश्वररूपानें तेंच आहे तेव्हां सर्व कर्म त्याला, परमेश्वराला, समर्पण कर' असें **शंकरानंदमताला** अनुसरून जास्त सांगितलें आहे. येणेंकरून चित्तपरिपाक, ज्ञान आणि मोक्षसिद्धि होईल असें **शंकरानंद** म्हणतात.

भीम०—'मित्रबुद्धीनें मला सर्व कर्में अर्पण कर.'

रामा०—'**अन्तः प्रविष्टः शास्ता जनानां सर्वात्मा**' (अंतर्यामी राहून सर्व जनांचें नियमन करणारा सर्वात्मा) '**अन्तः प्रविष्टं कर्तारमेतं य आत्मनि तिष्ठन्नात्मनोऽन्तरोयमात्मानं वेद**' (सर्वांच्या अंतर्यामीं असून सर्वकर्ता व सर्व करविता, आत्म्याच्या आंत वास करणारा, जो परमात्मा त्यास ज्यानें जाणिलें) अशा अनेक श्रुति परमेश्वरच सर्व आहे असें दाखविण्यासाठीं देतात. आत्मा हा कर्ता, आत्मा हेंच कारण आणि आत्म्यासाठीं हें सर्व आराधनादिक कर्म करावयाचें असें आत्मबुद्धीनें कर्म केलें म्हणजे अर्थातच ममत्वशून्यता, निरभिलाष, शोकशून्यत्व प्राप्त होऊन आत्मज्ञानानें मोक्ष मिळतो. आत्म्यामध्यें जें चित्त तें अध्यात्मचेतस होय.

द्वैत०—' भ्रांतीनें जीवावर आरोपिलेलीं सर्व कर्मे परमेश्वरच करितो असें समजून भक्तिपूर्वक मला माझें कर्तृत्व अर्पण कर. कोणतेंही विहित कर्म ईश्वरी-प्रेरणेनें केलें तरी ती हरीची पूजा आहे असें जाण. ' अध्यात्म ' = सर्वांहून अति श्रेष्ठ जो आत्मा = परमात्मा.

पंडितांनीं या श्लोकांत केवळ निर्गुणोपासकांवर, केवळ अद्वैतसिद्धांत्यावर बराच मोठा कोरडा ओढिला आहे. निर्गुणाची उपासना सगुण उपासनेशिवाय साध्य नाहीं असें सुज्ञ वेदांती म्हणतात. सगुण उपासनेनें चित्त स्थिर झालें म्हणजे निर्गुण उपासना आपोआपच उत्पन्न होते. सगुणउपासना हें शुद्धज्ञानाचें साधन आहे, हा सिद्धांत विसरून केवळ शाब्दिकज्ञानाच्या जोरावरच वितंडवाद करून जे उपासनेचा अगर कर्माचा उपहास करितात, ते पंडितंमन्य व वेदांताभिमानी लोक पंडितांच्या वाग्बाणास गोचर होतात हें नीटच आहे. ॥ ३० ॥

यदेतन्मतं कर्म कर्तव्यमिति सप्रमाणमुक्तं तत्तथा—

हें जें मीं आपलें प्रमाणसिद्ध मत ' कर्म केलेंच पाहिजे व तें परमेश्वरार्पण बुद्धीनें केलें पाहिजे असें सांगितलें,' त्या मताप्रमाणें जे लोक वागतात त्यांस फलप्राप्ति काय होते ती पहाः—

ये मे मतमिदं नित्य-
मनुतिष्ठन्ति मानवाः ॥
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो
मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

इदं मे मतं (ह्याप्रकारचें हें माझें मत) **ये श्रद्धावन्तः अनसूयन्तः मानवाः अनुतिष्ठन्ति** (विश्वास ठेवून व निर्मत्सरबुद्धीनें जें मनुष्य चालवितात, ह्या मताप्रमाणें जे लोक चालतात) **ते अपि** (ते सुद्धां) **कर्मभिः** (कर्मांपासून, कर्मबंधापासून) **मुच्यन्ते** (मुक्त होतात.) सारांश मीं सांगितलेल्या ह्या मतावर विश्वास ठेवून निर्मत्सरबुद्धीनें जे लोक आचरण करितात, ते लोक सुद्धां चित्तशुद्धि होऊन ज्ञान झाल्यामुळें सर्व कर्मबन्धापासून मुक्त होतात.

ये म इति । ये मे मदीयमिदं मतमनुतिष्ठन्त्यनुवर्तन्ते

मानवा मनुष्याः श्रद्धावन्तः श्रद्दधाना अनसूयन्तोऽसूयां च मयि गुरौ वासुदेवेऽकुर्वन्तो मुच्यन्ते तेऽप्येवंभूताः कर्मभिर्धर्माधर्माख्यैः ॥ ३१ ॥

गुरु—वत्सा! भगवान या मताची फलश्रुति सांगावी या उद्देशानें म्हणतातः "अर्जुना! जे जे म्हणून पुरुष पूर्ण भक्तिभावानें आणि मत्सरशून्यबुद्धीनें मीं प्रतिपादन केलेल्या या मताप्रमाणें आचरण करतील, ज्यांच्या मनामध्यें म्यां वासुदेवानें हें मत कां सांगितलें अथवा वासुदेवासच सर्व कर्में कां अर्पण करावीं असें किल्बिषही येणार नाहीं, ते सर्व लोक कर्माधिकारी असूनही, धर्मविहित व धर्मनिषिद्ध कर्में करीत असतांही त्यांस सात्त्विक ज्ञान होऊन त्या ज्ञानानें मुक्त होतील."

शिष्य—भगवन्! येथें 'मत्सर' शब्द कां बरें?

गुरु—अरे शहाणपणाचा अभिमान जळतो आहेना प्रत्येक ठिकाणीं? दृष्ट गोष्टींतही जर ऐकमत्य होत नाहीं, तर अदृष्ट गोष्टींत कोठून येणार? तेव्हां प्रत्येक मनुष्यास स्वतःच्या ज्ञानाची घमेंडी असावयाची आणि म्हणूनच 'हा कोण हें मत प्रतिपादन करणार?' असें काकवत् च्छिद्रान्वेषण करून म्हणणारे दोषैकदृष्टि असावयाचेच! तेव्हां त्यांस अनुलक्षून भगवंतांनीं 'असूयाशून्यत्व' या अर्थाचा शब्द घातला आहे.

प्रपाकार आचार्यानुवादी आहेत.

मधु०—"नित्य' = (१) अनादि, (२) आवश्यक, (३) सर्वदा असे तीन अर्थ देतात. तिन्ही येथें युक्त होतात श्रद्धा = गुरूनीं केलेल्या उपदेशावर पूर्ण विश्वास; आपल्यास अनुभव नाहीं तरी गुरूनीं हें सांगितलें आहे म्हणून तसेंच असलें पाहिजे असा जो विश्वास ती श्रद्धा. संकट प्राप्त झालें असतां किंवा दुःखोत्पादक कर्म करण्याचा प्रसंग आला असतां 'ईश्वर करुणा पूर्ण नाहीं, कारण त्यानें आह्मांस दुःखांत घातलें' ही जी संशयमूलक द्वेषबुद्धि तिलाही असूया म्हणतात.

शंकरा०—येथपर्यंत अज्ञान्यास **चित्तशुद्धी**साठीं व ज्ञान्यांस **लोकसंग्रहा**साठीं कर्मयोग कसा अवश्य आहे हें सांगितलें. आतां ह्या श्लोकांत फलश्रुति

सांगतात. यांचा व **श्रीधराचा** अर्थ सरळ आहे. 'अपि' शब्दानें 'जन्मापासून ही मुक्त होतात' असा ध्वनि काढितात.

पर्वते व **द्विवेदी मधुसूदनीकारांचें** अनुयायी आहेत. **चतरजीः** अदृश्य आणि तर्कागोचर वस्तूच्या संबंधानें साक्षात्कार झालेल्या गुरूवर विश्वास ठेविला पाहिजे. हा विश्वास ह्मणजे श्रद्धा होय.

रामा०—अर्थ सरळ करितात. 'अपि' शब्दावरून असें अनुमान करितात कीं, ज्यांचा ह्या उपनिषत्सारभूत गीताशास्त्रावर विश्वास आहे, द्वेषबुद्धि नाहीं, त्यांसही वर सांगितल्याप्रमाणें कर्म करण्याची बुद्धि होऊन ते ज्ञानमार्गानें मुक्त होतील.

द्वैत०—श्रद्धा = आस्तिक्यबुद्धि. 'कर्माशिवाय ज्ञान नाहीं आणि ज्ञान-साक्षात्कार (परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन) याशिवाय मोक्ष नाहीं' असें म्हणतात-तसें दिसतें.

ज्ञाने०—'श्रद्धायुक्त लोकांनीं वर सांगितलेलें कर्म केलें तरी ते कर्म-शून्यच असतात.' पंडितः 'श्रद्धा' = भक्ति. 'असूया' = पक्षपाताच्या योगानें उत्पन्न झालेला द्वेष. 'जगांत विषमता व नैर्घृण्य (दयाशून्यता) दिसतात, त्याचें निराकरण पांचव्या अध्यायांत केलें आहे.' ॥ ३१ ॥

ये त्वेतदभ्यसूयन्तो
नानुतिष्ठन्ति मे मतम् ॥
सर्वज्ञानविमूढांस्ता-
न्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

तु (परंतु) **एतत् अभ्यसूयन्तः** (ह्या मताचें मत्सरदृष्टीनें अवलोकन करणारे-लोक-) **मे मतं** (माझें मत) **न अनुतिष्ठन्ति** (ग्रहण करून त्याप्रमाणें वर्तन ठेवणार नाहींत) **सर्वज्ञानविमूढान् तान्** (ज्ञानपूर्ण जें ब्रह्म तें प्राप्त करून घेण्याच्या साधनाविषयीं मोहित होऊन पुनः पुनः संसारांत पडणारे त्या लोकांविषयीं–असें–) **विद्धि** (समज–कीं)–ते–**अचेतसः नष्टान्** (विवेकशून्य लोक 'मुक्ती' नामक पुरुषार्थाला मुकलेले आहेत)–सारांश अज्ञानानें, अहंकारानें व मत्सरबुद्धीनें मोहित होऊन या सर्वोपयोगी

शुद्ध मताचें अनुसरण जे लोक दोषदृष्टि असल्यामुळें करणार नाहींत ते विवेकशून्य लोक पुरुषार्थाला मुकले, सारांश नाहींसे झाले असें समज.—

ये त्विति । ये तु तद्विपरिता एतन्मम मतमभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति नानुवर्तन्ते मे मतं सर्वेषु ज्ञानेषु विविधं मूढास्ते, सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टान्नाशं गतानचेतसोऽविवेकिनः ॥ ३२ ॥

परंतु वर सांगितलेल्या श्रद्धावंत लोकांहून निराळे असणारे व निर्दोष मत असलें तरी त्यांत दोष उत्पन्न करणारे जे मत्सरी लोक मोक्षमार्गास नेणाऱ्या या माझ्या मताप्रमाणें वागणार नाहींत, त्यांना सर्व ज्ञानांविषयीं, व सर्वांत श्रेष्ठ जें मोक्षज्ञान त्यांविषयीं अनेक प्रकारचे मोह प्राप्त होतात.

शिष्य—अनेक प्रकारचे मोह कोणते ?

गुरु—अरे ! श्रुतिस्मृतिसिद्ध जें भगवंताचें मत आहे तें टाकून दिलें म्हणजे (१) कोणता ग्रंथ अगर कोणते ग्रंथ प्रमाणभूत मानावे याविषयीं मोह, (२) कोणती गोष्ट सिद्ध करावयाची याविषयीं मोह, (३) कोणत्या मार्गानें सिद्ध करावयाची याविषयीं मोह असे नानाप्रकारचे मोह उत्पन्न होतात. असो; या नानाविध मोहांमुळें व विवेकशून्य झाले असल्यामुळें (चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें समजण्याची अक्कल नसल्यामुळें) त्या लोकांचा सर्वस्वी नाशच झाला, ज्ञानस्वरूपी मोक्ष मिळण्याऐवजीं त्यांस जडस्वरूपी प्रकृतित्व प्राप्त झालें, असें समज; सारांश ते अचेतनच झाले असें समज.

मधु० श्रीधर व पर्वते आचार्यांसारखाच अर्थ करितात. 'अचेतस्'=दुष्ट. 'नष्ट' = सर्व पुरुषार्थभ्रष्ट.

प्रपा०—'अचेतस्' भ्रांतिमान्.

शंकरा०—निष्कर्मरूपी कर्ममार्ग अत्यंत कष्टदायक आहे व त्याचें फलही दिसत नाहीं असें समजून अज्ञानी असतांही एकदम संन्यासमार्गाचें अवलंबन करणारे पुरुष सर्व पुरुषार्थभ्रष्ट होतात. सारांश अधिकारानुरूप वर्तन न करणारे व ईश्वरप्रणीतमार्गाचें अनुसरण न करणारे लोक नष्टप्रायच होत.'

द्विवे०--जो ज्ञानी नसून कर्मयोगाची वरील उत्कृष्ट व्यवस्था मान्य करीत नाहीं तो भ्रष्टच झाला.

रामानुजांचा व द्वैतवादी यांचा अर्थ सरळ आहे.

ज्ञानेश्वर अज्ञानी नष्टांविषयीं म्हणतातः-**जे मोहमदिरा** (मोहरूपी दारू तिनें) **भुलले । विषय विषें धारलें** (ग्यापिले) **। अज्ञानपंकीं बुडाले । निभ्रांत मानी ॥ देखें शवाच्या हातीं दिधलें । जैसें कां रत्न वायां गेलें । नातरी जात्यंधा, पाहिलें । प्रमाण नोहे! ॥ कां चंद्राचा उदय जैसा। उपयोगा न वचे** (येत नाहीं) **वायसा । मूर्खा, विवेक हा तैसा, । रुचेल ना ॥**

पंडितांनीं शब्दानें मात्र वेदांताचें अवडंबर घालणाऱ्यांची व जैमिनीआदि काम्य कर्मानेंच पुरुषार्थ साध्य होतो असें म्हणणाऱ्या कर्मठांची यथेच्छ निंदा योग्य रीतीनें केली आहे. ॥ ३२ ॥

कस्मात्पुनः कारणात्त्वदीयं मतं नानुतिष्ठन्ति परधर्माननुतिष्ठन्ति स्वधर्मं च नानुवर्तन्ते त्वत्प्रतिकूलाः कथं न बिभ्यति त्वच्छासनातिक्रमदोषात्, तत्राऽऽह---

शिष्य—गुरुमहाराज! असलें हें मोक्षदांनी मत तिरस्कृत करून आपल्यास योग्य अशा धर्माची, मोक्षमार्गाची, अवहेलना करून व आपला नाश करण्याकडे व परधर्माचा अंगिकार करण्याकडे लोकांची आपल्यास अयोग्य अशी घातुक प्रवृत्ति कां व्हावी बरें? मनुष्यास स्वभावतःच प्राप्त झालेली विवेकबुद्धि या लोकांचे ठायींच कां लुप्त व्हावी? श्रीकृष्णासारख्या सर्व दयाघन प्रभूच्या विरुद्ध त्यांनीं कां जावें? ईश्वराच्या आज्ञेचे आपण उल्लंघन करून पापमार्ग स्वीकारल्यास आपल्याला शिक्षा होईल अशी भीति त्यांस कां वाटूं नये? सारांश आपलें हित म्हणून किंवा अन्य मार्गानें गेल्यास आपल्यास दंड होईल या भीतीनें तरी लोकांनीं परमेश्वरी मताचा कां अंगीकार करूं नये.

गुरु--उत्तम प्रश्न विचारलास? अर्जुनासही हीच शंका आली होती. असो; समाधान ऐक—

सदृशं चेष्टते स्वस्याः
प्रकृतेर्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यान्ति भूतानि
निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

ज्ञानवान् अपि (ज्या पुरुषाला विवेक आहे असा पुरुष सुद्धां) **स्वस्याः प्रकृतेः सदृशं** (आपल्या स्वतःच्या प्रकृतीप्रमाणें) **चेष्टते** (वर्तन करितो.) **भूतानि** (भूतमात्र यच्चयावत् वस्तु) **प्रकृतिं यान्ति** (प्रकृतीच्या अनुरोधानें वागतात.) **निग्रहः** (–येथें–निग्रह) **किं करिष्यति** (काय करील ?)·सारांश जन्मतः जो स्वभाव प्राप्त झाला तदनुसार ज्ञानी पुरुषासही वागावें लागतें; मग इतर प्राणी व सर्व वस्तुजात, आपआपल्या गुणधर्मांप्रमाणें वागतात यांत काय आश्चर्य आहे ? आपण कितीही निरोध केला तरी तो व्यर्थच होय. तात्पर्य कुमार्गीनें जाण्याची जी प्रवृत्ति असते ती स्वाभाविकच असते.

सदृशमिति । सदृशमनुरूपं चेष्टते कस्याः स्वस्याः स्वकीयायाः प्रकृतेः, प्रकृतिर्नाम पूर्वकृतधर्माधर्मादिसंस्कारो वर्तमानजन्मादावभिव्यक्तः सा प्रकृतिस्तस्याः सदृशमेव सर्वो जन्तुर्ज्ञानवानपि किं पुनर्मूर्खः । तस्मात्प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति मम वाऽन्यस्य वा ॥ ३३ ॥

गुरु—वत्सा! सर्व प्राणीचसे काय पण ज्ञानी सुद्धां तदनुसार वर्तन करीत असतो.

शिष्य—कशाच्या अनुसारानें ?

गुरु—अरे आपल्या प्रकृतीच्या !

शिष्य—महाराज! प्रकृति ती कोण आणखी ?

गुरु—प्रकृति म्हणजे पूर्वजन्मीं किंवा पूर्वजांनीं पापपुण्यात्मक

जीं कांहीं कृत्यें केलीं असतील अगर ज्ञान प्राप्त होण्याची खटपट केली असेल त्यांचे संस्कार जीवाच्या प्रस्तुत जन्मांत कांहींएक अपूर्व योजनेनें प्रकट होतात. त्यांसच प्रकृति किंवा स्वभाव म्हणावें. जन्मतःच हा स्वभाव प्राप्त होतो; आणि सर्व प्राणीमात्र आपआपल्या स्वभावानुसार वर्तन करीत असतात. अगदीं उत्तम ज्ञानी, गुणदोष समजणारा असला तरी त्यास सुद्धां आपल्या स्वभावाचें अतिक्रमण-अपूर्व मार्गाशिवाय करितां येत नाहीं, मग सामान्य जनांची अथवा मूर्खांची गोष्ट कशाला पाहिजे? म्हणून भगवान म्हणतात कीं 'कळत असून किंवा कळण्याची ऐपत असूनही केव्हां केव्हां प्राणी आपल्या विवेकबुद्धीनें सांगितलेल्या सन्मार्गास झुगारून देऊन दुर्मार्गाचें अनुसरण करितातः हा सर्व प्रकृतीचा अथवा पूर्वलब्ध संस्काराचा खेळ आहे. येथें मी किंवा आणखी कोणीं कडकशासनाचे नियम केले तर त्याचा कांहीं कायमचा उपयोग होत नाहीं.' समजलास? 'स्वभावाला औषध नाहीं' ह्याचा तरी अर्थ हाच होय.

अद्वैतवादी टीकाकारांत सर्वत्र ऐकमत्य आहे. "**तं विद्याकर्मणी समन्वारभेते पूर्वप्रज्ञा च**" (पूर्वसंस्कार, ज्ञान आणि कर्म हीं कार्याला प्रवृत्त करितात) ही श्रुति मधुसूदनीकार देतात. प्रारब्ध संपेपर्यंत ज्ञान्यास कर्म करावें लागतें तें यासाठींच.

रामा०—कर्मयोग सोपा, प्रमादराहित्यानें होणारा आहे, ज्ञानयोग अवघड आहे तेथें चुक्या होण्याचा संभव, शिवाय प्रकृतीचा संबंध असणारेच सर्व प्राणि आहेत, ह्मणून निरपेक्षबुद्धीनें ज्ञान्यानें व सकाम अगर निष्कामत्वानें अज्ञान्यानें कर्म करावें असा या व पुढील श्लोकांचा भावार्थ आहे व पुढें ज्ञानयोगांत चुक्या होण्याचा कसा संभव आहे हें भगवंतांनीं सांगितलें आहे. प्रकृति व तज्जन्य वासना अनादि आहेत, म्हणून कर्म केलेंच पाहिजे व ज्ञानी पुरुषानें तें भगवंतास अर्पण केलें पाहिजे असें म्हणतात.

द्वैतवाद्यांचाही प्रारब्धाची सत्ता अप्रतिहत आहे असा अर्थ आहे.

पंडितांचा अर्थ असाच आहे. ज्ञानीपुरुषास इंद्रियें, मन वगैरे जड आहेत असें कळतें तरी भोगल्याशिवाय प्रारब्ध संपावयाचें नाहीं असें समजून त्या त्या काळपर्यंत तो इतरांसारखाच वागतो!

गीताव्याख्याकार म्हणतात कीं पूर्वलब्धसंस्काराप्रमाणें ज्ञान्यासही ह्या जन्मीं

वागलें पाहिजे. मात्र ह्या मानवजन्मीं पशूपेक्षां आपल्यास विशेष ज्ञान आहे ह्मणून ह्या जन्मांत मात्र पुढें भोग उत्पन्न होतील असें कर्म करूं नये. ॥ ३३ ॥

यदि सर्वो जन्तुरात्मनः प्रकृतिसदृशमेव चेष्टते न च प्रकृतिशून्यः कश्चिदस्ति ततः पुरुषकारस्य विषयानुपपत्तेः शास्त्रानर्थक्यप्राप्ताविदमुच्यते—

शिष्य—महाराज! आतां मात्र मी जबरदस्त शंका घेणार बरें? प्रभो! जर प्रत्येक प्राणी आपआपल्या स्वभावानुसार वर्तन करितो, आणि पूर्वसंस्कारशून्य असा जर कोणीही जन्मासच येत नाहीं, सारांश ज्ञानी अज्ञानी, मनुष्य, पशुपक्षी इत्यादि सर्व चौऱ्यांशी लक्ष योनींतील जंतू जर प्रकृतीच्या स्वाधीनच झालेले आहेत, तर दयानिधे! पुरुषाच्या प्रयत्नास शून्यत्वच आलें, म्हणजे प्राक्तनाप्रमाणेंच सर्व व्हावयाचें असें ठरून प्रयत्नाचें वैफल्यच होणार! अर्थातच 'अमुक करावें' 'तमुक करूं नये' 'ज्ञान संपादन करावें,' वगैरे सर्व विधिशास्त्रें व्यर्थच होत. 'अमुक व्हावयाचेंच आहे,' असें ठरल्यावर 'तें कर, किंवा करूं नको,' असे विधिनिषेधात्मक नियम करण्याचें स्वारस्य तें काय राहिलें? सारांश पूर्वी ठरल्याप्रमाणेंच जर सर्व आचरण व्हावयाचें आहे, तर पुरुषप्रयत्न व्यर्थच झाला! क्षमा करा मला जी शंका आली ती निवेदन केली आहे.

गुरु—शाबास! तूं बराच कुशाग्रबुद्धीचा आहेस. हा आक्षेप मनांत आणूनच पुढील श्लोकाची योजना केली आहे.

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे
रागद्वेषौ व्यवस्थितौ ॥
तयोर्न वशमागच्छे-
त्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ३४ ॥

इन्द्रियस्य अर्थे (इंद्रियांचे जे जे विषय त्या संबंधानें) इन्द्रियस्य

(इंद्रियांचे) **रागद्वेषौ** (लोभद्वेष हे) **व्यवस्थितौ** (ठरलेले आहेत.) **तयोः** (त्या रागद्वेषांच्या) **वशं न आगच्छेत्** (आपण स्वाधीन होऊं नये) **हि** (कारण) **तौ** (तें जोडपें) **अस्य** (ह्या पुरुषाचे) **परिपन्थिनौ** (मार्ग रोध करणारे आहेत.)–सारांश शब्दस्पर्शादि जे इंद्रियांचे विषय त्यांच्या ठिकाणीं कर्णत्वचादि इंद्रियांचा लोभ अगर द्वेष उत्पन्न होतो. पुरुषानें ह्या काम क्रोधांच्या स्वाधीन होऊं नये, कारण ते मनुष्याचे शत्रु आहेत.

इन्द्रियस्येति । इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे सर्वेन्द्रियाणामर्थे शब्दादिविषय इष्टे रागोऽनिष्टे द्वेष इत्येवं प्रतीन्द्रियार्थे रागद्वेषाववश्यंभाविनौ । तत्रायं पुरुषकारस्य शास्त्रार्थस्य च विषय उच्यते । शास्त्रार्थे प्रवृत्तः पूर्वमेव रागद्वेषयोर्वशं नाऽऽगच्छेत् । या हि पुरुषस्य प्रकृतिः सा रागद्वेषपुरःसरैव स्वकार्ये पुरुषं प्रवर्तयति तदा स्वधर्मपरित्यागः परधर्मानुष्ठानं च भवति । यदा पुना रागद्वेषौ तत्प्रतिपक्षेण नियमयति तदा शास्त्रदृष्टिरेव पुरुषो भवति न प्रकृतिवशः । तस्मात्तयो रागद्वेषयोर्वशं न गच्छेत् । यतस्तौ ह्यस्य पुरुषस्य परिपन्थिनौ श्रेयोमार्गस्य विघ्नकर्तारौ तस्कराविवेत्यर्थः ॥ ३४ ॥

आपलीं कर्ण नेत्र इत्यादि जीं सर्व इंद्रियें आहेत, त्यांचे शब्द रूप इत्यादि विषय आहेत. या इंद्रियांस अनुकूल असा विषय प्राप्त झाला ह्मणजे हीं त्या विषयावर लोभ करितात, प्रतिकूल विषय प्राप्त झाला असतां त्याचा तिरस्कार करितात, क्रुद्ध होतात. याप्रमाणें इष्ट, अनिष्ट जसा विषय येईल, तदनुसार काम किंवा क्रोध (व त्यांचेच अनुषंगी लोभ मोह, व मद मत्सर) हे अवश्य उत्पन्न व्हावयाचेच. समजलास ?

शिष्यः—पण माझ्या शंकेचें निवारण–

गुरुः—अरे होय ? इतका उतावळेपणा कां ? ऐक लक्ष्य देऊनः

रागद्वेषांची उत्पत्ति बाह्य विषयांच्या अनुकूलतेवर व प्रतिकूलतेवर अवलंबून आहे, म्हणजे अनुकूल विषय असला म्हणजे हर्ष व प्रतिकुल विषय असला म्हणजे द्वेष, असे हे हर्षद्वेष उत्पन्न होतात. पण इंद्रियांचे जे बाह्य विषय ते नसले म्हणजे रागद्वेषांचा उद्भव होत नाहीं. झालें? तेव्हां शास्त्राकडे विचारदृष्टि वळवून तदनुसार वर्तन करावयाचें असा ज्याचा निश्चय ठरला त्यानें इंद्रियांच्या आवडीनावडीप्रमाणें उत्पन्न होणाऱ्या कामक्रोधांच्या स्वाधीन, ह्या आपल्या शास्त्रविहित आचरण करणाऱ्या पुरुषानें, होऊं नये; धर्माचरण करीत असतां प्रयत्न करून त्यानें रागद्वेषांचा निर्वंश करावा. आहे येथें पुरुष प्रयत्नाचा उपयोग?

शिष्यः—नाहीं, महाराज! मला नीटसें समजलें नाहीं.

गुरुः—नीटच आहे; विषयकाठिण्यामुळें तुला समजत नाहीं, हें बरोबर आहे. हें पहा पूर्वसंस्कारांनीं उत्पन्न झालेला जो स्वभाव तो पुरुषाला प्रकृतीच्या राज्यांतील कोणतेंतरी कार्य करण्यास प्रवृत्त करितो, तें कशाच्या जोरावर करितो?

शिष्यः—रागद्वेषाच्या जोरावर. म्हणजे विषयानुराग किंवा विषयद्वेष असला तरच व्यवहारांतील सर्व कृत्यें करण्यास स्वभावानुसार प्राणी प्रवृत्त होतो.

गुरु—बरोबर समजलास! कार्य करण्यास प्रवृत्त होणें हें रागद्वेष पुरःसर होत असतें. आणि रागद्वेष उत्पन्न होतात ते इंद्रियांनीं म्हणजे सर्व कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें (मन, बुद्धि, वासना यांसकट सर्व) यांनीं ग्रहण केलेल्या किंवा ग्रहण करण्यासारख्या विषयांसंबंधानें होतात हें आतांच सांगितलें आहे. होयना? बरें तर; या पूर्वसंस्कारजन्य रागद्वेषांमुळें पुरुष आपला स्वधर्म सोडून देतात व परधर्माचा अंगीकार करितात म्हणजे विवेकदृष्टी सोडून देऊन जें करावयाचें तें करीत नाहींत आणि करूं नये तें करितात. समजतें आहेना नीट? आतां विषयग्रहण करण्याच्या आधींच म्हणजे रागद्वेष उत्पन्न होण्याच्या पूर्वींच, विवेकदृष्टि धारण करून अथवा आपण कोण,

आपला खरा पुरुषार्थ काय हें रागद्वेषशून्य व प्रकृतीस अगोचर अशा आत्मज्ञान दृष्टीनें ठरवून जेव्हां पुरुष वर्तन करावयास लागतो, तेव्हां तो प्रथम काय करील?

शिष्य—विषयाकडे प्रवृत्ति करायास लावणारे जे रागद्वेष त्यांचें नियमन करील.

गुरु—शाबास! येथें पुरुष प्रयत्नाची आवश्यकता उत्पन्न झाली कीं नाहीं? अर्थात झाली आणि ती ज्ञानदृष्टीनें किंवा विधिनिषेध शास्त्रांच्या दृष्टीनें झाली. ठीक आहे? तेव्हां असा ज्ञानदृष्टीनें किंवा रागद्वेषशून्यदृष्टीनें प्रवृत्त होणारा पुरुष अर्थातच प्रकृतीला वश न होतां ज्ञानमार्गानें किंवा कर्ममार्गानें ठरविलेला जो मार्ग, त्या मार्गानेंच प्रवृत्त होईल. ह्मणून भगवंतांनीं सांगितलें आहे कीं रागद्वेषांच्या स्वाधीन न होणें म्हणजे पुरुष प्रयत्नाचें सार्थक्य करणें होय. रागद्वेषांत वश न होणें हें आपल्या स्वाधीन आहे. रागद्वेषांच्या स्वाधीन होऊं नये, कारण मोक्षमार्गाचा प्रतिरोध करणारे हे दुष्ट चोर आहेत. मार्गांत जसें वाटपाडे असतात व पांथस्थांस इष्ट वाटेनें जाऊं देत नाहींत, तसेंच हे कामक्रोध मोक्षमार्गाला विघ्नकरणारे चोर आहेत. असो; याप्रमाणें प्रकृतीला वश झालेला प्राणीही विवेकदृष्टिपूर्वक स्वप्रत्ययानें, प्रकृतीच्या बाहेर कसा पडूं शकतो हें सांगितलें. सारांश ज्ञानमार्ग किंवा निष्काम उपासनापूर्वक ज्ञानमार्ग यांचें अनुसरण करण्याचें स्वातंत्र्य व सामर्थ्य मनुष्यास आहे. हें झालें म्हणजे प्रकृतीच्या विकारानुसार प्रवृत्ति होणें स्तब्ध होतें.

मधुसूदनीकार, प्रभाकार, श्रीधर, शंकरानंद, पर्वते वगैरेंनीं असाच अर्थ केला आहे. आत्म्यास जें इष्ट तें प्रकृतीस अनिष्ट आणि आत्म्यास अनिष्ट तें प्रकृतीस इष्ट हा विवेक ईश्वरभजनानें, निष्काम कर्माचरणानें व **'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यः'** इत्यादि श्रुतिवाक्यांनीं आणि शेवटीं ईश्वरी अनुग्रहानें सिद्ध होऊन स्वधर्माप्रमाणें आचरण करण्यास मनुष्याला स्वातंत्र्य येतें असें ह्मणतात. नदीच्या महापुरांत उडी टाकण्यापूर्वीं जसा सावध मनुष्य नौकेचा आश्रय करितो, तद्वतच हें होय. द्विवेदी, चतरजीही हाच अर्थ आधुनिक पद्धतीनें प्रतिपादन करितात.

रामानुज रागद्वेषांस प्रबल होऊं देऊं नये असें म्हणतात.

द्वैतवादीही आचार्यांसारखाच अर्थ करितातः '**संस्कारो बलवानेव ब्रह्माद्या अपि यद्वशाः। तथाऽपि ह्यन्यथाकर्तुं शक्येतातिप्रयत्नतः**' ॥ (पूर्व संस्कार फार बळवंत असतात, ब्रह्मदेवादि सर्वांस त्यांलाच वश व्हावें लागतें, तथापि अति प्रयत्नानें ह्या संस्कारांसही अन्यथा करितां येतें.) ऑगस्टाइन नामक ख्रिश्चियन तत्त्ववेत्याप्रमाणें द्वैतवाद्यांनीं परमेश्वरी अनुग्रहावर भिस्त ठेविली नाहीं, ह्या ख्रिस्तभक्तांवरही त्यांचा विशेष होय. ज्ञान होण्यास व मोक्ष मिळण्यास भगवदनुग्रह पाहिजे हें खरें, पण तो अनुग्रह पुरुषप्रयत्नांशिवाय साध्य होत नाहीं.

ज्ञानेश्वरांचें व्याख्यान अतिमधुर आहेः इंद्रियांच्या लाडासंबंधें म्हणतातः **हां गा ! सर्पेंसीं खेळों येईल ? । कीं व्याघ्र संसर्ग सिद्धी जाईल ? । सांगे हालाहल** (जालीम विष) **जिरेल । सेविलिया कांई ? ॥ देखें खेळतां अग्नी लागला । मग तो न सांवरे जैसा उधवला** (भडकलेला)। **तैसा इंद्रियां लळा दीधला । भला नोहे ॥...म्हणोनि केवळ देहभरण । ते जाणे उघडी नागवण । म्हणोनि येथें अंतःकरण । देयावेना ॥** इंद्रियांच्या संगतिसंबंधानें म्हणतातः...**परि तो सेव चोराचा** (सावासारख्या चोराचा) **सांगात । जैसा नावेक** (क्षणभर स्वस्थ) **जंव नगराचा प्रांत । सांडिजेना ॥ बापा ! विषयाची मधुरता । ज्ञणी आवडी उपजे चित्ता । तो परिणाम विचारितां । प्राण हरी ॥ देखे इंद्रियीं काम असे । तो लावी सुखदुरासे** (सुखाप्रमाणें वाटणाऱ्या दुराशेला) **। जैसा गळीं मीन** (मासा) **आमिषें । भुलविजे गा ! ॥** आणखी पुष्कळ आहे, पण विस्तारभयास्तव हात आंखडितों !

पंडितांनीं या व 'मयि सर्वाणि कर्माणि' या श्लोकाचा संबंध उत्तम बसवून दिला आहे. पूर्वसंस्कारामुळें भोग भोगण्याचें जरी आलें, तरी ज्ञान्यानें भोगविषयांत रागद्वेष धरूं नये. रागद्वेष हे आपल्या, पुरुषप्रयत्नाच्या, स्वाधीन आहेत, पूर्वसंस्कारांनीं उत्पन्न होणारे परिणाम आपल्या स्वाधीन नाहींत; तेव्हां आपण रागद्वेषांच्या स्वाधीन न होतां परमेश्वरास प्रिय त्या गोष्टी मात्र परमेश्वरास अर्पण करण्याच्या बुद्धीनें कराव्या. सारांश कामक्रोध वर्ज करावे. हेच मोक्षमार्गामध्यें आडविणारे चोर आहेत.

मधुसूदनीकारांस अनुसरणारे रंगनाथस्वामी म्हणतात कीं, विषयभोग हे प्रारब्धाधीन आहेत. पण तेथें रागद्वेष उत्पन्न होणें न होणें हें पुरुषाधीन आहेत. पुरुषाचे ज्ञानास शास्त्रदृष्टीचा व गुरूपदेशाचा संस्कार झाला म्हणजे रागद्वेषांची निवृत्ति होते; व विहितकर्माचें ठिकाणीं मात्र आवड उत्पन्न होते. सारांश शास्त्राची व गुरुची आवश्यकता येवढ्यासाठींच आहे कीं तीं विषयाचे ठायीं ज्ञानी

पुरुषास रागद्वेष होऊं देत नाहींत. हीं नसतीं तर ज्ञानी, अज्ञानी, पशुपक्षी यांत कांहींच विशेष न राहून सर्वच प्रकृतिमय झाले असते !

गीताव्याख्याकार म्हणतात कीं शास्त्रें पुरुषाचे डोळे उघडतात. स्वधर्माप्रमाणें आचरण करण्याची आवश्यकता उत्पन्न होते ती यामुळेंच होय.॥ ३४ ॥

तत्र रागद्वेषप्रयुक्तो मन्यते शास्त्रार्थमप्यन्यथा परधर्मोऽपि धर्मत्वादनुष्ठेय एवेति तदसत्—

आतां इतका विस्तार करून सांगितला आहे तथापि 'माझें तेंच खरें !' असें म्हणणारा कोणी पुरुष अभिमानानें किंवा द्वेषानें प्रेरित होऊन जर म्हणूं लागेल कीं 'शास्त्राचा अर्थ हे लोक करितात, तसा तो नाहीं, किंवा शास्त्राचा जो विषय आहेसा भासवितात, तसाही तो नाहीं. त्याचप्रमाणें परधर्म तरी धर्मच आहे म्हणून परधर्माप्रमाणें वागण्यासही प्रत्यवाय नसावा, स्वधर्माप्रमाणेंच परधर्मावर भक्ति ठेवूनही वागावें.' तर हें त्याचें रागद्वेषमूलक म्हणणें खोटें आहे, हें सिद्ध करण्यासाठीं सांगतातः—

श्रेयान्स्वधर्मो विगुणः
परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वधर्मे निधनं श्रेयः
परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

स्वधर्मः (आपला स्वतःचा धर्म) **विगुणः** (वैगुण्ययुक्त आहे तरी) **स्वनुष्ठितात् परधर्मात्** (उत्कृष्ट रीतीनें संपादन केलेल्या परधर्मापेक्षां) **श्रेयान्** (जास्त लाभदायक असतो, श्रेष्ठ असतो)–**स्वधर्मे** (आपल्या धर्मामध्यें) **निधनं श्रेयः** (मरण प्राप्त झालें तरी तें उत्तम होय.) **परधर्मः भयावहः** (परकीय धर्म भय उत्पन्न करणारा आहे.)–सारांश दुसऱ्याच्या धर्माप्रमाणें आपण उत्तम आचरण केलें तरी त्यापेक्षां स्वधर्मांतील कसें बसें आचरण विशेष लाभ-

दायक होतें. स्वधर्म आचरणांत मरण प्राप्त झालें तरी तें उत्तम होय. कारण परधर्मानें अनेक भीतिजनक संकटें उत्पन्न होतात.

श्रेयानिति । श्रेयान्प्रशस्यतरः स्वो धर्मः स्वधर्मो विगुणोऽपि विगतगुणोऽप्यनुष्ठीयमानः परधर्मात्स्वनुष्ठितात्साद्गुण्येन संपादितादपि । स्वधर्मे स्थितस्य निधनं मरणमपि श्रेयः परधर्मे स्थितस्य जीवितात्, कस्मात्परधर्मो भयावहः नरकादिलक्षणं भयमावहति यतः ॥ ३५ ॥

आपल्या धर्मामध्यें जें कर्तव्यकर्म म्हणून सांगितलें आहे तें यथास्थित रीतीनें झालें नाहीं तरी स्वकर्तव्य करणें हें परकीय धर्मांतील कर्तव्यांचें उत्कृष्ट रीतीनें, सर्वगुणपूर्वक, आचरण करण्यापेक्षां, विशेष लाभदायक, विशेष गुणकारी आहे. स्वधर्मानें कर्तव्य करीत असतां त्यांत मरण आलें तरी तें परकीय कर्तव्याचरण करून जिवंत राहण्यापेक्षां श्रेयस्कर आहे. कारण परधर्मांतील कर्तव्य हें भीति उत्पन्न करणारें आहे, परकीय कर्तव्याचें उत्तम अनुष्ठान केलें तरी स्वतःचें कर्तव्य नष्ट झालें म्हणून व कदाचित् परधर्मांतील कर्तव्यामध्येंही चुक्या होण्याचा संभव असल्यामुळें नरकादि महानीच स्थिति प्राप्त होण्याचा संभव आहे.

मधु० श्रीधर, शंकरा०—राग द्वेषपूर्वक विषयाची आराधना केली असतां जशी पुरुषार्थ हानि होते, त्याचप्रमाणें आपलें कर्तव्य आपणास आवडत नाहीं व इतर कर्तव्य आवडतें म्हणून परधर्माचें अनुष्ठान सांगोपांग केलें तरी तें अधर्मासच कारण होतें. कर्तव्याकर्तव्यांचा विचार पुरुषांची योग्यता पाहूनच सांगितलेला आहे. एतद्विरुद्ध जाणें म्हणजे रागद्वेषांचा अंगीकार करून धर्माचरण करणें होय; आणि हें तर निषिद्ध आहे. सात्विक धर्म जरी चांगला असला तथापि स्वपुरुषार्थ तत्पर राजस प्रकृतीच्या क्षत्रिय पुरुषानें त्याचा अंगिकार करणें युक्त नव्हे, अनर्थोत्पादी आहे. कारण राजस पुरुषाची बुद्धि परिपक्क झालेली नसते. 'सौभाग्य, सौंदर्य इत्यादि गुणांनीं युक्त अशा परमातेपेक्षां कुरूप, दरिद्रि असलेली स्वमाताच जशी जास्त कल्याणप्रद होते, तद्वत अहिंसाजनक परधर्मापेक्षां स्वतःच्या प्रकृतीस (व ज्यामुळें प्रकृति तशी बनली तशा माता पितर, कुळ, जाती, देश व पूर्व संस्कार इत्यादिकांस) अनुकूल अशा हिंसाजनक स्वधर्माचें अनुष्ठान श्रेयस्कर होतें.' हें प्रपाकारांचें सदृष्टांत म्हणणें सयुक्तिकच आहे.

प्रो० द्विवेदी यांनीं रामानुजाप्रमाणेंच या श्लोकाचें उत्कृष्ट विवरण केलें आहे, त्याचा तात्पर्यार्थ मात्र गुर्जरभाषानभिज्ञ लोकांसाठीं येथें देणें शक्य आहेः योग्यता व अधिकार पाहून धर्मानें निरनिराळे मोक्षमार्ग सांगितले आहेत. अधिकार पाहून धर्मकर्म केलें असतां हळुहळू—या जन्मीं नाहीं तर पुढील जन्मीं तरी—कार्यसिद्धि होते ह्मणजे मोक्ष मिळतो. अधिकार नसतां श्रेष्ठ मार्गानें जाणें ह्मणजे घोडयावर बसतां न येणाऱ्या मनुष्यानें—घोडयावरील स्वार इष्ट ग्रामास लवकर पोंचतो म्हणून—खंद्या घोडयावर बसून तो भरधाव पिटाळण्यासारखें अप्रयोजक, असमंजस आणि अनर्थोत्पादि आहे. येथें स्वधर्म ह्मणजे शैव, वैष्णव, बौद्ध, मुसलमानी, ख्रिस्ती, सारांश आपल्यास वंशपरंपरेनें प्राप्त झालेला संप्रदायच असा अर्थ घेणें असमंजस होय. आपल्या अधिकारानुरूप व स्वतःच्या योग्यतेप्रमाणें कर्म, उपासना, ज्ञान यांपैकीं कोणता तो मार्ग स्वीकारावा. येथें अभिमान धरणें हें जितकें मौर्ख्यदर्शक आहे तितकेंच अधिकाराशिवाय भलतेंच कर्म करावयास लागणें हेंही होय.' आचार्यांचा हाच अर्थ आहे. द्वैतवाद्यांनीं सरळ अर्थ केला आहे.

ज्ञाने०—दुसऱ्याच्या चांगल्या घराच्या व परकीय सुंदर वनितेचा दृष्टांत देऊन पुनः ह्मणतात.

...हां गा साकर आणि दूध । हे गौल्यें (गोडीनें) कीर (खरोखर) प्रसिद्ध । परी कृमी दोषें (जंत झालेल्या मनुष्यानें) । घेणें (घ्यावे) कैचीं ?॥

पंडित, रंगनाथ, गीताव्याख्याकार कांहीं विशेष सांगत नाहींत; मात्र शेवटचे दोघेजण प्रो. द्विवेदींच्या वाग्बाणास विषय होतात.

मागच्या श्लोकावलींत लोकांचें खरें कल्याण करणाऱ्या सत्पुरुषानें कोणता मार्ग स्वीकृत करावा हें सांगून सर्व जनसमूहाची प्रवृत्ति, निवृत्तिमार्गाकडे सुखरूपपणानें कशी वळवावी याचाही विचार प्रत्येक मनुष्याच्या अधिकारानुरूप कथन केला. त्याच विषयाचा आणखी थोडा विचार करून २७ ते २९ मध्यें ज्ञानी व अज्ञानी, किंवा पूर्णाधिकारी व मन्दाधिकारी लोकांमध्यें तारतम्यभाव सांगतातः आत्म्याशिवाय भासमान मात्र होणारें सर्व विश्व हें मायानिर्मित आहे म्हणजे बुद्धि, अहंकार, मन, सर्व इंद्रियें व त्यांचे विषय, हें सर्व अनादि परंतु सांत असणाऱ्या व अज्ञानामुळें मात्र सत्स्वरूपानें भासमान होणाऱ्या, मायेचें कृत्य आहे, यांत आत्म्याचा अथवा खऱ्या पुरुषार्थसिद्धीचा कोणताही संबंध नाहीं, हें सर्व दृश्यमान विश्व नष्ट

झालेंसें दिसलें तरी आत्म्याच्या नित्य व निर्विकार स्वरूपामध्यें बालाग्रही अंतर पडणार नाहीं; हें ख्रिस्त भक्तांसही शिरसा वंद्य होणारें (पहा मार्टिनोकृत धर्म-पुस्तक) तत्त्व, ज्ञानी पुरुषास विदित असतें असा सिद्धांत या भरत खंडामध्यें तीन हजार वर्षांपूर्वींच भगवंतांनीं प्रकट केला. हा सिद्धांत समजून त्याप्रमाणें आचरण करणारा तो ज्ञानी होय. मायेच्या मोहजालांत अडकल्यामुळें, व सर्व पुरुषार्थाची सिद्धि या मायामय म्हणून नश्वर आणि प्रायः अनीश्वर विश्वांतच साध्य होणार असा अज्ञानी पुरुषाचा समज असल्यामुळें, जगांत माझ्या संबंधानें जें काय होत आहे त्याचा कर्ता व भोक्ता मीच आहें असा निश्चय ठरतो; व पुढें बुद्धि, मन व विकार वगैरे अनात्मक शत्रूंच्या व विशेषतः बुद्धीस व मनासही स्वस्वाधीन करून घेणाऱ्या विषयलोलुप विकारांच्या सर्वथा स्वाधीन होतो. खऱ्या सुखापेक्षां भासमान दुःखाची संख्या व सामर्थ्य हीं आपल्या अज्ञानामुळें जास्तच आहेत असा अनुभव संसारांत येत गेल्यामुळें अर्थातच दुःखांचाही कर्ता व भोक्ता मीच आहें असें अज्ञानी पुरुषास वाटतें. एवंच तो दुःखमयच होतो. सारांश येथील दिसणारीं सर्व सुखें दुःखजन्य व दुःखपरिणामी आहेत असा प्रत्यय नित्य येत असतांही वासनेच्या व आशेच्या जाळ्यांत गुंतून मोहग्रस्त झाल्यामुळें माझें या जगांत कल्याणच होईल असा समज होतो हेंही अज्ञानच होय. असो; तेव्हां या अज्ञानजन्य गुणकर्मामध्येंच घोंटाळून त्यांतच सुख मानणाऱ्या मनुष्यास एकदम परमार्थाच्या, श्रेष्ठ पुरुषार्थाच्या, मार्गाला नेण्याचा प्रयत्न केल्यास अर्थातच तो निष्फळच--नव्हें !--दुष्फलप्रदच--होईल ! खरेंच आहे; बैलांनीं ओढणाऱ्या गाडीला जर कोणी दुधखुळ्या माणसानें वाफेचा संस्कार देऊन आगगाडीप्रमाणें माझा गाडा चालवीन, असा दुराग्रह धरिला तर तो नेमलेल्या गांवास तर जाणार नाहींच पण भलताच प्रसंग गुदरून सर्व गाड्याचा चुराडा होईल व स्वतःचाही तो हातपाय मोडून घेईल ! याकरितां मनुष्याची योग्यता पाहून त्या त्या मानानें त्यास सन्मार्गाचा उपदेश करावा हा लोककल्याणकारी पुरुषाचा खरा मार्ग

होय. या मार्गाचा पहिला 'ओनामा' म्हणजे सर्वकर्त्या परमेश्वराच्या चरणीं आपआपलीं सर्व कर्में निस्पृह व निर्लोभ मनानें समर्पण करणें हा आहे. हा निवृत्तिमार्गाचा श्रीगणेशा फारसा अवघडही नाहीं. पहाः दुःख भोगण्याचा प्रसंग, आपणच अहंकार धरून केलेल्या कर्मानें प्राप्त झाला असतां ज्याप्रमाणें 'परमेश्वराची मर्जी!' असें म्हणून भोग भोगीत असतांही परमेश्वराकडे कर्तृत्व देऊन आपण मोकळे होऊं पाहतों, त्याचप्रमाणें सुखाच्या कर्तृत्वाची वांटणी करीत असतां परमेश्वरावरच सर्व कर्तृत्वाचा हवाला टाकावयाचा आहे. हा पहिला धडा होय. नंतर पूर्ण भाक्ति, पुढें आत्मचिंतन, या पुढें आशाशून्यत्व आणि शेवटीं 'माझेपणाचा नाश' असा क्रम आहे. हा मार्ग कंठित असतांना देहप्रारब्धानें प्राप्त झालेलीं अधिकारानुरूप विहित कर्में मनुष्यानें केलींच पाहिजेत. याप्रमाणें प्रापंचिक परमार्थ अथवा पारमार्थिक प्रपंच सिद्ध करण्याचा हा मार्ग आहे. प्रवृत्तीमधून निवृत्तिकडे जाण्याला किंवा कर्म करितां करितां ज्ञान संपादन करण्यांला याशिवाय दुसरा मार्ग निघणें शक्यच नाहीं. विश्वांतील चमत्काराची ओळख करून घेऊन जीवांची जीवयात्रा सुलभ करण्यास व त्यांस स्वस्वरूपाकडे नेण्यास याशिवाय दुसरें साधन सांपडणें अशक्य आहे. जीवयात्रा जितकी दुःसाध्य तितका परमार्थाकडे ओढा कमी हा प्राकृत लोकांच्या संबंधानें खरा सिद्धांत आहे. म्हणून परमार्थज्ञान वाढवावयाचें असें ज्या मनुष्यास खरोखर वाटतें व त्याप्रमाणें आचरण करण्यासही जो तयार होतो त्या मनुष्यानें सामान्य लोकांच्या अन्न पाण्याची चांगली सोय लागेल, ते आपआपले व्यवहार शास्त्रशुद्ध मार्गानें यथाशक्ति करीत जातील, अहंकारवृत्ति लुप्त होऊन सात्त्विक वृत्ति त्यांच्या अंगांत भक्तिपूर्वक खिळून राहील अशा मार्गानेंच त्यांस —त्यांचें अज्ञान हळूहळू कमी करून—नेलें पाहिजे. जगणें अगर जगविणें हाच पुरुषार्थ नसून आपला सर्व विश्वसंसार ब्रह्ममय होऊन जाईल असें आपल्या मनांत बाणेल तरच जीवांची खरी सुधारणा होणार आहे. असो; तेव्हां भगवान ३१ व ३२ श्लोकांत स्पष्टपणानें सांगतात कीं वर सांगितलेल्या मार्गानें, श्रद्धापूर्वक व निरहंकारी

सात्त्विकभावासहित, जे जाऊं लागतील, ते स्वतःही कर्मपाशांतून सुटतील व दुसऱ्यासही सोडवितील. अभिमानमदानें उन्मत्त झाल्यामुळें 'माझ्याशिवाय इतर सर्व लोक गाईचे बाप आहेत; मी प्रतिपादन करितों, त्यापेक्षां इतर सर्व सिद्धांत, सर्व मतें व सर्व समजुती कवडी मोलाच्या आहेत, मी वागतों त्याहून इतर मार्ग दुःखमूलक आहेत,' अशी अहंकारत्रयी ज्या अभिमत्त पुरुषाच्या अंगांत पूर्णपणें भिनून गेली, तो व त्याचे अनुयायी आपल्यास व आपल्याबरोबर इतर भोळ्या लोकांसही गाडयाबरोबर नळ्याला यात्रा या न्यायानें दुःखरूपी अगाध नरकांत नेऊन ढकलितात! सात्त्विक मार्ग एकदां सुटला ह्मणजे '**भवति विनिपातः शतमुखः**' (हजारों दिशांनीं पतन प्राप्त होतें) असें भगवंतानीं सांगितलें आहे. तसेंच आलीकडच्या १९ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं सुधारणेच्या शिखरास जाऊन जगद्वंद्य झालेल्या लोकांच्या लोकनायकांमध्येंही जें तत्त्व पूर्ण बाणलें नाहीं, म्हणजे भेणेंभावानें, दपटशहा दिल्यानें कार्यसिद्धि होत नाहीं, भक्तिभावानें मात्र कार्य होतें, असें अद्यापिही समजलें नाहीं, तें तत्त्व श्रीकृष्णांनीं ३३ व्या श्लोकांत प्रकट करून पूर्वकर्मानुसार जीवांचा स्वभाव घटतो, दंडानें हा बदलायाचा नाहीं, प्रेमरूपी वज्राभेदी रज्जूनेंच सात्त्विकमार्गाकडे लोक वळतील, इत्यादि कालाबाधित व स्थलाबाधित सिद्धांत प्रकट केले आहेत.

'पूर्वकर्मानें जर वर्तमानस्थिति सिद्ध होते, तर पुरुषास वर्तनस्वातंत्र्य नाहीं, तो केवळ निमित्तमात्रच असून ईश्वराचा किंवा तन्निर्मित विश्वपरिस्थितीचा अनन्य दास (बंदा गुलाम) आहे; एवंच त्याला कांहीं करणें नको, नशीबावर हवाला देऊन त्यानें स्वस्थ असावें;' अशी घातुक कल्पना अज्ञानी मनुष्याच्या मनांत उत्पन्न होण्याचा संभव आहे तिचें निवारण करण्यासाठीं भगवान ३४ व्या श्लोकांत सांगतात कीं 'विषयकल्पना उत्पन्न होण्याच्या पूर्वीं किंवा ते विषय आपल्यास प्रत्यक्ष होण्यापूर्वीं व प्रत्यक्ष झाले असतां विषयाला लंपट होणें किंवा त्यापासून निवृत्त होणें या दोन्ही गोष्टी मनुष्याच्या स्वाधीन आहेत.' पुरुष स्वतंत्र आहे कीं नाहीं यावर यूरपखंडांतील तत्त्ववे-

त्यामध्यें आज दोन हजार वर्षेंपर्यंत भयंकर रण माजलेलें आहे व अद्यापपर्यंतही या प्रश्नाचा धडसा निकाल झाला नाहीं आहे. पण आमच्या इकडे भगवंतांनीं याचा निकाल केव्हांच करून टाकिला आहे. आम्हीं मात्र आमच्या अज्ञानजन्य दैवदुर्विलासानें या चिंतामणीस उकिरडयावर फेंकून दिलें आहे! सच्चिदानंदस्वरूपी आत्मा स्वतंत्रच आहे. जीवास मात्र अज्ञानी दशेंत स्वातंत्र्य नसतें व तो प्रकृति नाचवील तसा नाचत असतो; आणि पुनः हें समजतो कीं जें काय करितो आहे, तें मी स्वतंत्रपणानेंच करीत आहे! स्वतंत्र असतांही पारतंत्र्य स्वीकारणें व परतंत्रता स्वीकारल्यानंतर आपण स्वतंत्र आहों असें समजणें ह्यापेक्षां जास्त बालीशत्व कोठें तरी पहावयास सांपडेल काय? असो आत्मा स्वतंत्र आहे; प्रकृतीचा संसर्ग झाला असतां अज्ञानानें पारतंत्र्य येतें आणि ह्या पारतंत्र्यांत आपण स्वतंत्रच आहों या मूर्खत्वाच्या समजुतीमुळें प्रकृतीच्या अवास्तविक दास्याची सांखळी दुप्पट जोरदार होते. शोपेनहार नामक जर्मन तत्त्ववेत्त्यानेंही हें मत खरें आहे असें प्रसिद्धपणें म्हटलें आहे. सारांश आत्मज्ञानपूर्वक व्यवहार कोणत्याही मनुष्यानें केव्हांही केला तरी तो स्वतंत्रपणानें होतो; अज्ञान असलें म्हणजे मात्र सर्वस्वी प्रकृतीच्या आधीन आपण होतों; एतावता मुमुक्षूला केव्हांही स्वातंत्र्यच आहे, असा भगवंतांनीं सर्वगामी सिद्धांत प्रकट करून ३५ व्या श्लोकांत आपल्यास आपल्या पूर्वकर्मानें उत्पन्न झालेल्या सात्त्विक, राजस अगर तामसी गुणांन्वयेंच आपण परमार्थाकडे वळावें, इसापनीतींतील 'कुत्रा, गाढव आणि धनी' या गोष्टींतील गर्दभाप्रमाणें आपण वागूं नये; अर्थात दुसऱ्यास जें हितकर तें आपल्यास पथ्यकरच होईल असा नियम नाहीं, म्हणून सात्त्विकानें सात्त्विकधर्माचा व राजसानें रजात्मक धर्माचा अवलंब करावा हाच खरा पक्ष आहे असें सांगितलें आहे.

कांहीं लोक 'हिंदुधर्म' 'शैवधर्म' 'उपासनापंथ' इत्यादि अनेक अर्थ 'धर्म' शब्दाचे करितात हा असमंजस प्रकार होय. भगवंतांनीं गीताशास्त्र केवळ हिंदुलोकांकरितां, त्यांतूनही

वैष्णव लोकांकरितां किंवा कलियुगाकरितां सांगितलें आहे असें नाहीं. सर्व जीवांसाठीं गीताशास्त्राचा अवतार आहे व सात्त्विकधर्म सर्व जगभर प्रसृत व्हावा असा त्याचा उद्देश आहे; योग्यताही तशीच आहे; तेव्हां अशा सर्वत्र व सर्वदा अनुग्रह करण्यास समर्थ असणाऱ्या भगवान्निर्मित गीताशास्त्रासारख्या सर्वांसच गुरुस्थानीं असणाऱ्या अनंतमोली ग्रंथाला काळ, स्थळ व प्रसंग यांच्या शृंखला अडकविणें अत्यंत अप्रयोजक होय. सर्व जगास प्रकाश देणाऱ्या सूर्यदेवतेसंबंधानें 'हा हिंदूंचा सूर्य, हा मुसलमानांचा सूर्य, हा विलायती लोकांचा सूर्य' असे प्रलाप करणें जितकें गैरसमजुतीचें, तितकेंच वरील अज्ञानी लोकांचें म्हणणें होय. शुद्ध सात्त्विक मार्ग अधिकारानुरूप प्रकट करणाऱ्या निर्मळ शास्त्रांत आपण अहंकाररूपी माती आपल्या अभिमानानें कालवीत आहोंत. हिंदुस्थानांत या शास्त्राचा उदय झाला म्हणून हा हिंदुलोकांचा मात्र धर्म असें म्हणणें म्हणजे छापण्याची कला प्रथमतः यूरपखंडांत प्रकट झाली म्हणून छापण्याचे कलेवर आमचेंच स्वामित्व आहे असें बडबडण्यासारखें होय. असो; तेव्हां अभिमान सोडून व अज्ञानाचा त्याग करून आपल्या गुणास योग्य अशा मार्गानें सात्त्विक गुण उत्पन्न करण्याचा क्रम अनुसरावा, कोणावर जबरी करूं नये, प्रत्येकाच्या मनामध्यें हळुहळू भक्ति उत्पन्न करतील असे संस्कार देऊन जीवांचें कल्याण करावें हा भगवंतांचा खरा मार्ग आहे. या मार्गानें जातील ते तरतील, जे जाणार नाहींत, त्यांस पुनः कर्मपाशाची उजळणी करावी लागेल, असा विषय या श्लोकावलींत आला आहे. मुमुक्षुवाचक याचा विचार करोत. ॥ ३९ ॥

अर्जुन उवाचः–

यद्यप्यनर्थमूलं ध्यायतो विषयान्पुंसो रागद्वेषौ ह्यस्य परिपन्थिनाविति चोक्तं विक्षिप्तमनवधारितं च तदुक्तं तत्संक्षिप्तं निश्चितं चेदमेवेति ज्ञातुमिच्छन्नर्जुन उवाच ज्ञाते हि तस्मिंस्तदुच्छेदाय यत्नं कुर्यामिति—

अर्जुनः—भगवंता! जरी आपण 'विषयाचें ध्यान करणाऱ्या पुरुषाचे' (पहा श्लोक ६२ अध्याय २) व. 'लोभ आणि क्रोध हे जीवाचे शत्रु आहेत' वगैरे रागद्वेषाविषयीं दोनदां उल्लेख केला तथापि आतां एकदां, मग एकदां, असा विस्कळित रीतीनें पुष्कळ कारणांचा उल्लेख आला म्हणून माझे लक्ष्यांत तो उपदेश चांगला राहिला नाहीं. म्हणून कृपा करून या प्राणिमात्राच्या मुख्य शत्रूंचें एके ठिकाणीं व निश्चित असें वर्णन ऐकण्याची माझी इच्छा आहे. आपण कृपा करून सांगाल तर ह्या दुष्ट शत्रूंचा उच्छेद करण्याविषयीं मी प्रयत्न करून पाहीन. मला समजेल असें सांगण्याची विनंति करण्याचें कारण नाहींच!

अथ केन प्रयुक्तोऽयं
पापं चरति पूरुषः ॥
अनिच्छन्नपि वार्ष्णेय
बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

वार्ष्णेय (वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णा!) **अथ** (तर मग) **केन प्रयुक्तः** (कोणा-दुष्टाच्या-प्रेरणेला वश) **बलात् इव नियोजितः** (बळवंत होऊन जसा कांहीं सामर्थ्याच्या स्वाधीन होऊन) **अयं पूरुषः** (हा मनुष्यप्राणी) **अनिच्छन्** अपि आणि-(स्वतःची इच्छा नसतांनाही) **पापं चरति** (पापकर्में करितो!) सारांश इच्छा नसतांही पापाचरण करण्याची जी मनुष्यास बळकट प्रेरणा होते ती कशामुळें बरें? भगवन् हें मला सांगावें.—

अथेति। अथ केन हेतुभूतेन प्रयुक्तः सन्राज्ञेव भृत्योऽयं पापं कर्म चरत्याचरति पूरुषः स्वयमनिच्छन्नपि हे वार्ष्णेय वृष्णिकुलप्रसूत बलादिव नियोजितो राज्ञेवेत्युक्तो दृष्टान्तः ॥ ३६ ॥

श्रीवृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णा! वाईट आज्ञा असेल तेव्हां इच्छा

नसतांही राजाची आज्ञा जशी शिरसा वंद्य करून प्रजाजन राजाज्ञा पाळण्यास भेणेंभावानें. प्रवृत्त होतात, तसा मानवी प्राणी इच्छा नसूनही पाप करण्यास प्रवृत्त होतो, गुलामासारखा बिनतक्रार पापकर्म करण्यास तयार होतो, हें काय आहे? कोणाचा असा वरपगडा असतो कीं ज्याच्यामुळें मानवप्राणी कुमार्गास प्रवृत्त होतो? इच्छा नसूनही अनिष्ट गोष्ट समंजस मनुष्यानें करावी हें आश्चर्य आहे.

शंक० 'अथ' यानें निराळ्या प्रश्नाचा प्रस्ताव केला. 'वार्ष्णेय'= ब्रह्मवेत्त्यांवर ब्रह्मानंदाचा वर्षाव करणारा! मधु०, व रंगनाथ ह्मणतातः— वृष्णिकुलांतच, भगवंता! तुझा व माझा जन्म आहे व म्हणून तुझी माझी मैत्री आहे! बाकी सर्वत्र ऐकात्म्य आहे. ॥ ३६ ॥

श्रीभगवानुवाचः—

शृणु त्वं तं वैरिणं सर्वानर्थकरं यं त्वं पृच्छसि—

श्रीकृष्ण—सर्व अनर्थांचें उत्पत्तिस्थान जो मानवीशत्रु तो कोण आहे तो सांगतों ऐकः—

शिष्यः—महाराज! श्रीकृष्णास भगवान कां म्हणतात?

"ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः।
वैराग्यस्याथ मोक्षस्य षण्णां भग इतीङ्गना" ॥

ऐश्वर्यादिषट्कं यस्मिन्वासुदेवे नित्यमप्रतीबद्धत्वेन सामस्त्येन च वर्तते।

"उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम्।
वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति"

उपत्त्यादिविषयं च विज्ञानं यस्य स वासुदेवो वाच्यो भगवानिति ॥

गुरुः—ऐक कां म्हणतात तेंः—सर्व ऐश्वर्य, सर्व धर्म, सर्व कीर्ति सर्व संपत्ति, पूर्ण वैराग्य आणि मोक्ष या सहांस 'भग' अशी संज्ञा आहे. समजलास? आतां हें ऐश्वर्य वगैरे सहा ही गुण वासुदेव

नामक परमपुरुषाचे ठायीं नित्य, अखंड आणि पूर्ण अशा स्वरूपानें असतात म्हणून त्यास भगवान असें ह्मटलें. भगवान शब्दाची दुसरी एक व्युत्पत्ति आहे तीही ऐकून ठेवः—सर्व भूतमात्राची उत्पत्ति व विलय, पदार्थमात्र आले कोठून व जाणार कोठें, हें सर्व ज्यास विदित असते, तसेंच ज्याला ब्रह्मज्ञान (पूर्ण दृष्टीचें ज्ञान) आणि दृश्यज्ञान (अपूर्ण दृष्टीचें ज्ञान) हेंही विदित असतें त्याला भगवान असें म्हणावें. आतां उत्पत्ति, स्थिति वगैरे सर्वज्ञान आणि विज्ञान वासुदेवास होतें म्हणून त्यास भगवान असें ह्मटलें आहे. आलें तुझ्या लक्ष्यांत? असो भगवान काय म्हणतात तें ऐकः—

काम एष क्रोध एष
रजोगुणसमुद्भवः ॥
महाशनो महापाप्मा
विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

एषः कामः (हा शत्रु कामरूपी आहे) **एषः क्रोधः** (हा क्रोधरूपी आहे.)-हा—**रजोगुणसमुद्भवः** (रज नामक प्रकृतीचा एक गुण आहे त्याच्यापासून ह्याची उत्पत्ति आहे.)—हा—**महाशनः** (मोठा खादाड आहे.) **महापाप्मा** (मोठा पापी आहे). **इह** (या संसारामध्यें) **एनं** (ह्याला) **वैरिणं** (जीवाचा दीर्घद्वेषी शत्रु—असें—) **विद्धि** (जाण).—सारांश रजोगुणापासून उत्पन्न झालेला हा काम, हा क्रोध (कामक्रोधरूपी शत्रु) आहे. ह्याची तृप्ति कधीं होत नाहीं, म्हणून हा पापप्रवर्तक आहे. सर्व प्राण्यांचा मुख्य शत्रु हाच आहे. अशी खुणगांठ बांधून ठेव.—

काम इति । काम एष सर्वलोकशत्रुर्यन्निमित्ता सर्वानर्थप्राप्तिः प्राणिनां स एष कामः प्रतिहतः केनचित्क्रोधत्वेन परिणमते । अतः क्रोधोऽप्येष एव । रजोगुणसमुद्भवो रजश्च तद्गुणश्च स रजोगुणः स समुद्भवो यस्य स

कामो रजोगुणसमुद्भवो रजोगुणस्य वा समुद्भवः। कामो ह्युद्भूतो रजः प्रवर्तयन्पुरुषं प्रवर्तयति। तृष्णया ह्यहं-कारित इति दुःखितानां रजःकार्ये सेवादौ प्रवृत्तानां प्रलापः श्रूयते। महाशनो महदशनमस्येति महाशनोऽत एव महापाप्मा। कामेन हि प्रेरितो जन्तुः पापं करोति, अतो विद्ध्येनं काममिह संसारे वैरिणम् ॥ ३७ ॥

सर्व प्राणीमात्राचें अकल्याण करणारा व सर्व अनर्थजातीचें बीज असणारा हा काम, ही तृष्णा, वासना, आहे बरें ?

शिष्य—क्रोध नाहीं का मनुष्यांचा शत्रु ?

गुरु—क्रोधचसा काय पण आणखी लोभ मोह वगैरे सहा प्राणी-मात्राचे शत्रु आहेत. पण हे सर्व कामाचेच अवतार आहेत. इच्छा किंवा वासना यांच्या आड कोणीं आलें, तृष्णाविघात झाला कीं हे कामाजीपंतच क्रोधाचें स्वरूप धारण करितात; म्हणून काम हाच क्रोध असें समज. भगवंतांनीं एकवचनी शब्दांची योजना केली आहे ती येवढ्याचसाठीं कीं प्राणीमात्राच्या प्रवृत्तींतील सर्व व्यवहार व विशेषतः पापमूलक व्यवहार या कामापासून उत्पन्न होतो हें मुमुक्षूंस समजावें.—ह्या पापाचें मूळ, उत्पत्तिस्थान, रज आणि त्याचे गुण आहेत. राजसगुणामुळें इच्छा उत्पन्न होते. मायेच्या घरचा विचित्र खेळ कसा आहे पहाः—या कामापासून, अनावर तृष्णेपासून, रजोगुणाचा उद्भव होतो ! म्हणजे वासना उत्पन्न झाली असतां पुरुषाच्या, प्राण्यांच्या, मनांत रजोगुणांचें प्राबल्य होऊन तो प्राणी कर्म करण्यास प्रवृत्त होतो ! गुलामाच्या सेवेसारखीं नीच कर्में करावयास लागलेलीं दुर्दैवी मनुष्यें ‘ आमची वासना अनावर, म्हणून आम्हीं करूं नये तें करीत आहों ’ असा आक्रोश करितात तें नित्य आपल्या कानावर येतेंच कीं नाहीं ?— सारांश रजोगुण हा कामाचा पिता आणि काम हा रजोगुणाचा उत्पादक असा झालाच कीं नाहीं खेळ खंडोबा ?—असो; हा काम, किंवा ही वासना कधींही तृप्त होणें नाहीं. वासना पूर्ण करायला गेलें कीं ती वाढलीच म्हणून समज. खावयास घातलेला अग्नी जसा वाढतो तशीच

कामाचीही गति आहे! ह्याची खळी म्हणून कधीं भरावयाचीच नाहीं. हा अर्थातच दुष्ट कर्मांचा प्रवर्तक होतो व याच्या नादीं लागलेले प्राणी पापकर्मे करितात यांत काय आश्चर्य आहे? म्हणून भगवान म्हणतातः बा अर्जुना! संसारामध्यें याच्या सारखा दुष्ट शत्रु हाच, याची सर दुसऱ्या कोणाला यावयाची नाहीं–सारांश यांच्या शिवाय दुसरा शत्रुच नाहीं असें समज.

मधु० श्रीधर–'**काममयोऽयं पुरुषः**' (पुरुष उत्पन्न झाला, अथवा ब्रह्मापासून, पूर्णापासून सुटला, तो कामाच्या म्हणजे इच्छेच्याच योगानें होय)' अशा अर्थाच्या अनेक श्रुतींचें सार भगवंतांनीं या श्लोकांत आणून व हा काम रजोगुणात्मक आहे, तेव्हां सात्त्विक वृत्तीनें मात्र याचा निरास होईल असें सांगून भगवान पापप्रवर्तक अशा मुख्य कारणाचा निर्देश करितात. सामदामादिकांनीं याचा नाश होणें नाहीं हेंही महाशन इत्यादि विशेषणांनीं सांगितलें आहे. बाकी सर्वांचा सर्वत्र आचार्यानुवाद आहे.

रामानुज व द्वैतवादी यांत व **आ**चार्यमतांत विरोध नाहीं.

भीम०—कामामुळें विवेकशून्यत्व येतें व मनुष्य पाप करितो; म्हणून कामाचा त्याग करून धार्मिक स्वकर्म करावें.

ज्ञानेश्वरांनीं येथें फारच मनोहर विस्तार केला आहे: काम क्रोधासंबंधें म्हणतातः–हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचें वाघ। भजन मार्गींचे मांग। मारक (मारेकरी) जे॥ हे देहदुर्गींचे धोंड। इंद्रियग्रामीचें कोंड (गांवकुसुं)। यांचे व्यामोहादिक (अज्ञानादिक) बंड (दळवाड?, सैन्य?)। जगावरी॥....धायपण (दाईपणा) ययांचे। अविद्या (अविद्येनें) केलें॥....महापाप्मासंबंधें कवीराज म्हणतातः—जेणें सत्याचा भोकसा काढिला। मग असत्य तृणकुटा (गवताचा सांगडा) भरिला। तो दंभ रूढविला। जगीं इहीं॥ साध्वी शांती नागविली॥ मग माया मांगी शृंगारिली। तिये करवीं विटाळिलीं। साधुवृंदें॥ इहीं विवेकाची त्राय (आश्रयस्थान) फोडिली। वैराग्याची साल काढिली। जितया मान मोडिली। उपशमाची॥ इहीं संतोषवन खांडिलें। धैर्यदुर्ग

पाडिले । आनंदरोप सांडिलें । उपडूनिया ॥ इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं (तोडिलीं) । सुखाची लिपीही (नांव सुद्धां) पुसिली । जिव्हारी आगी सुदिली (घातली) । तापत्रयाची ॥....हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । न बोलतां कवळिती । प्राणीयांतें ॥ हे शस्त्रेंवीण साधिती (मारितात) दोरेंवीण बांधिती । ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेऊनि ॥ हे चिखलेंवीण रोविती । पाशेंवीण गोविती । हे कवणाजोगे न होती (यांस उपमाच नाहीं !) । आंतुवटपणें (अंतरवर्ति असल्याकारणानें, बळकटपणें,) ॥ आहे कीं नाहीं **ज्ञानाचें ऐश्वर्य** येथें?

पंडितांनीं कामनाशाची एकं खाशी तोड काढिली आहे तीही कीं, मनुष्यास जन्माबरोबरच प्राप्त होणाऱ्या कामाची योजना परमेश्वरभक्तीकडे करून या कामरूपी कुऱ्हाडीनेंच विषयवनाचें खंडन करावें ! ईश्वरास अर्पण न केलेलीं सकाम कर्में ह्या व पुढील जन्मीं बद्धक होतात व ज्ञान झालें असलें तरी तीं भोग भोगण्यास लावितात.

रंगनाथ व व्याख्याकार ज्ञानेश्वरांचे मार्गानेंच गेले आहेत. ॥ ३७ ॥

कथं वैरीति दृष्टान्तैः प्रत्याययति—

शिष्य—आपण इतकें निग्रहानें सांगत आहां, तेव्हां हा खरोखरच मोठा शत्रु असेल; पण मला त्याचें शत्रुत्व नीटसें समजलें नाहीं.

गुरु—नीटच आहे तुझा प्रश्न. ऐक—ह्या पुढील ३८ व्या श्लोकांत भगवंतांनीं दिलेल्या दृष्टांतांनीं तरी तुझी समजूत पडेलः—

धूमेनाऽऽव्रियते वह्नि-
र्यथाऽऽदर्शो मलेन च ॥
यथोल्बेनाऽऽवृतो गर्भ-
स्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

यथा (ज्याप्रमाणें) **धूमेन वह्निः आव्रियते** (धुराच्या योगानें अग्नी झांकला जातो) **च** (आणि) **मलेन** (धुराळ्यानें) **आदर्शः**

(आरसा)-बराच निरुपयोगीं होतो-किंवा-**यथा** (ज्याप्रमाणें) **उल्बेन** (चर्मानें) **गर्भः** (गर्भ) **आवृतः** (आच्छादिला जातो) **तथा** (त्याप्रमाणें) **तेन** (कामानें) **इदं** (हे-ज्ञान-) **आवृतम्** (आच्छादून टाकिलें असतें.)-सारांश धुराच्या योगानें तेजस्वी अग्नीचें दाहकत्व कमी होतें, किंवा धुराळ्यानें मळीन झालेल्या स्वच्छ आरशाचा पारदर्शकपणा बराच कमी होतो, किंवा वारेनें ज्याप्रमाणें उदरांतील गर्भ सर्वच्या सर्व झांकून जातो, तद्वतच या कामानें ज्ञानास लोपवून टाकिलें आहे.-

धूमेनेति । धूमेन सहजेनाऽऽव्रियते वह्निः प्रकाशात्मकोऽप्रकाशात्मकेन यथा वाऽऽदर्शो मलेन च यथोल्बेन गर्भवेष्टनेन जरायुणाऽऽवृत आच्छादितो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

अग्नीबरोबरच उत्पन्न होणाऱ्या तमोमय धुरानें जसें प्रकाशवंत अग्नीचे स्वरूपांत हीनत्व येतें, किंवा केरकचऱ्यानें अगर धुरळ्यानें स्वच्छ आरसा स्वरूप दाखविण्याच्या कामीं बराच निरुपयोगी होतो, किंवा गर्भाच्या सभोंवार असणाऱ्या वारेनें जसा गर्भ सर्वस्वी आच्छादून टाकलेला असतो, त्याचप्रमाणें या दुष्ट कामानें ज्ञानास आच्छादून टाकिलें आहे.

मधु० द्विवेदी, पर्वते ही मंडळी या श्लोकांतील दृष्टांतांची अशी व्यवस्था लावितात: शरीर उत्पन्न होण्याच्या अगोदर व अंतःकरण वृत्ति जन्मण्याच्या अगोदर सूक्ष्मरूपानें असणारा काम, शरीरारंभक कर्मानें शरीर व अंतःकरण प्राप्त झाल्यावर, स्थूलरूप धारण करितो. यास दृष्टांत धुराचा. धूर अग्नीबरोबरच निर्माण होऊन अग्नीचें स्वरूप आच्छादितो तरी त्याची दाहकशक्ति कमी करीत नाहीं. असो; आतां कामास स्थूलतर स्वरूप प्राप्त झालें म्हणजे मळ चढलेला आरसा जसा प्रतिबिंब धारण करीत नाहीं तथापि प्रतिबिंब धारण शक्तीला सर्वथा आंचवत नाहीं, तशी ज्ञानाची स्थिति असते. कामाचें स्थूलतम स्वरूप म्हणजे ज्ञानाचें संपूर्ण आवरण होय. यास गर्भाचा व गर्भासभोंवतालच्या कातड्याचा दृष्टांत

योग्यच आहे. सारांश कामाच्या या तीन स्वरूपामुळें एकस्वरूपी ज्ञानासही मानवी म्हणजे अपूर्ण दृष्टीनें वैचित्र्य येतें.

शंकरानंद अचेतनाचा चेतनावर कसा लेप चढतो हें दाखवितात. श्रीधर, प्रपाकार, व रामानुजाचार्य यांचा अर्थ सरळ आहे.

द्वैतवादी ' अग्नी म्हणजे परमेश्वर, आदर्श म्हणजे अंतःकरण, गर्भ म्हणजे जीव असें रूपक कल्पून अग्नि स्वयंप्रकाश असतो तरी तो जीवास कामामुळें दिसत नाहीं, अंतःकरण परमेश्वरास पाहत नाहीं व शास्त्राभ्यासानेंहीं जीवास ज्ञान होत नांहीं असे भेद सुचवितात. '

पंडित-' काम ' = प्रारब्धामुळें उत्पन्न झालेली वासना असा अर्थ करून शमदमादिक फुंकाऱ्यानें अग्नि पेटवून धूर नष्ट करावा, आरसा घांसून स्वच्छ करावा असें म्हणतात. गर्भास गर्भनाळ जसें आवश्य आहे, तसेंच जीवाबरोबर कर्म येणें सहज आहे. जन्म झाल्याबरोबर जसें नाळ छेदितात तसेंच भोग भोगून प्रारब्ध नष्ट करावें व नवीन कर्म परमेश्वरास समर्पण करावें. ॥ ३८ ॥

किं पुनस्तदिदंशब्दवाच्यं यत्कामेनाऽऽवृतमित्युच्यते—

शिष्यः—भगवन् ! वरील श्लोकांत ' हें ' या अर्थी शब्द आहे त्याचा आचार्यांनीं व आपण ज्ञान असा अर्थ केला तो कशावरून ?

गुरुः—ऐक त्याचें प्रमाणः—

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ॥
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥

कौन्तेय (कुंतीपुत्रा !) **ज्ञानिनः** (ज्ञानी लोकांचा) **नित्यवैरिणा** (रात्रंदिवस द्वेष करणाऱ्या) **एतेन कामरूपेण** (ह्या काम म्हणजे इच्छा हेंच आहे स्वरूप ज्याचें अशा)–शत्रूनें–**ज्ञानं** (ज्ञान) **आवृतं** (झांकून टाकिलें आहे.)-हा कसा आहे ? **दुष्पूरेण** (तृप्त होण्यास अत्यंत कठिण) **च** (आणि)–म्हणून–**अनलेन** (अलं=पुर्तेपणा, तो ज्याला नाहीं तो अनल म्हणजे असंतुष्ट आहे.)—सारांश

ज्ञानी लोकांचा नित्य शत्रू इच्छास्वरूपी, अतृप्त आणि असंतुष्ट असा आहे. अशा या शत्रूनें ज्ञान झांकून टाकिलें आहे–म्हणून पापाचरणाकडे मनुष्यें व प्राणी प्रवृत्त होतात.

आवृतमिति । आवृतमेतेन ज्ञानं ज्ञानिनो नित्यवैरिणा । ज्ञानी हि जानात्यनेनाहमनर्थे प्रयुक्तः पूर्वमेवेति । दुःखी च भवति नित्यमेव । अतोऽसौ ज्ञानिनो नित्यवैरी न तु मूर्खस्य । स हि कामं तृष्णाकाले मित्रमिव पश्यंस्तत्कार्ये दुःखे प्राप्ते जानाति तृष्णयाऽहं दुःखित्वमापादित इति न पूर्वमेवातो ज्ञानिन एव नित्यवैरी । किंरूपेण कामरूपेण काम इच्छैव रूपमस्येति कामरूपस्तेन दुष्पूरेण दुःखेन पूरणमस्येति दुष्पूरस्तेनानलेन नास्यालं पर्याप्तिर्विद्यत इत्यनलस्तेन ॥ ३९ ॥

हा काम जो आहे तो ज्ञानी लोकांचा हाडवैरी आहे. कारण ज्ञानी पुरुषाला पूर्वीपासूनच ठाऊक असतें कीं ह्या कामानें, या इच्छेनें, मला अनर्थांत, अनात्मक म्हणून मिथ्या संसारांत, ढकलून दिलें आहे; हें त्याला ठाऊक असतें म्हणून तो सदैव दुःखी असून कामास आपला हाडवैरी समजतो. मूर्खाची गोष्ट तशी नाहीं. मनांत इच्छा उत्पन्न झाली कीं मूर्खास मोठा आनंद होऊन काम हा आपला खरा मित्र आहे असें त्या अज्ञान्यास वाटूं लागतें. झालें; पुढें या कामाच्या नादीं लागून फसला, दुःखांत पडला, म्हणजे मग पश्चात्तापानें डोळे उघडून म्हणायला लागतो कीं 'मला या वासनेनें दुःखांत नेऊन ढकलिलें!' या बिचाऱ्याला कामाची कुटिलता पूर्वींच समजत नाहीं. सारांश तो नेहमीं कामास शत्रुत्वानें लेखित नाहीं, ज्ञानी पुरुष मात्र तसें लेखित असतो.

शिष्यः—याचें स्वरूप तरी कसलें आहे?

गुरुः—अरे! इच्छा हेंच याचें स्वरूप होय. या इच्छेची किंवा कामाची कधीं संतोषवृत्ति म्हणून असावयाची नाहीं. कधीं तृप्ति झाली

असें वाटेल तर संतोष किंवा समाधान उत्पन्न होईल कीं नाहीं? 'अलं'=पुरे असें हा कधीं म्हणावयाचा नाहीं म्हणून यास अनल असें म्हटलें आहे.-अनल म्हणजे अग्नी हा अर्थ तुला विदितच आहे. अग्नीचा संतोष कधीं झाला आहे असें तूं ऐकिलें आहेस?

मधु०, श्रीधर—आचार्यानुगामी आहेत. '**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति। हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्तते॥**' (कामाची शांति उपभोगानें न होतां उलट तो तूप ओतलें जाणाऱ्या अग्नीप्रमाणें वृद्धिंगतच होतो.) म्हणून त्याचे ठिकाणीं सर्वांनीं दोषदृष्टिच ठेवावी. **मधुसू० द्विवेदीः रंगनाथः** 'ज्ञान' = अंतःकरण.

प्रपा०—शतपथांतील एक श्रुति देतात. 'काम हा दुःख देणारा आहे' हाच अर्थ आहे. **शंकरा०** 'कामरूपेण' = (काम = विषय हें प्रकट करण्याचें स्वरूप आहे ज्याचें असा काम, इच्छा).

रामा०—विषयमोहाच्या रूपानें हा ज्ञान्यांचा वैरी आहे.

द्वैत०—'दुष्पूरेण' = ज्याची तृप्ति करण्यासाठीं अत्यंत कष्ट भोगावे लागतात; तृप्ति झाली तरी पुनः कामोद्भव आहेच हें अनल शब्दानें सुचविलें. ज्ञान म्हणजे शास्त्रानें उत्पन्न झालेलें ज्ञान, पूर्ण साक्षात्काराचें नव्हे.

पंडितांचें व रंगनाथांचेंही व्याख्यानें पंडितत्वास योग्य अशींच आहेत. ॥ ३९ ॥

किमधिष्ठानः पुनः कामो ज्ञानस्याऽऽवरणत्वेन वैरी सर्वस्येत्यपेक्षायामाह ज्ञाते हि शत्रोरधिष्ठाने सुखेन शत्रुनिबर्हणं कर्तुं शक्यत इति—

शिष्य—गुरुजी! ज्ञानावरही आवरण घालणारा, सर्व प्राणिमात्रांचा वैरी, जो हा काम याचें राहण्याचें ठिकाण तरी कोणतें?

गुरु—कां रे? असें कां विचारतोस?

शिष्य—अशा साठीं कीं या अनर्थकारी शत्रूचें स्थान समजलें म्हणजे त्याचें उच्चाटन किंवा हनन करण्यास सोयीचें पडेल. नव्हे!

गुरु—होय, होय. शाबास ! भगवंतांनींही हीच शंका अर्जुन घेईल ह्मणून त्यानें विचारावयाच्या आधींच तुझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे.

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ॥
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥४०॥

इन्द्रियाणि मनः बुद्धिः (सर्व इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं) **अस्य** (या शत्रूंची) **अधिष्ठानं उच्यते** (राहण्याची जागा आहे, असें म्हटलें आहे) **एतैः** (ह्यांच्या साहाय्यानें) **एषः** (हा काम) **ज्ञानं आवृत्य** (ज्ञानाला झांकून टाकितो–आणि–) **देहिनं** (देही जो जीव त्याला) **विमोहयति** (अनेक प्रकारच्या मोहांत घालितो) सारांश आपली आश्रयस्थानें जीं मन बुद्धिसह इंद्रियें, यांस वश करून घेऊन ह्यांच्या साहाय्यानें हा काम जीवाला भुरळ पाडितो.

इन्द्रियाणीति । इन्द्रियाणि मनो बुद्धिश्चास्य कामस्याधिष्ठानमाश्रय उच्यते, एतैरिन्द्रियादिभिराश्रयैर्विमोहयति विविधं मोहयत्येष कामो ज्ञानमावृत्याऽऽच्छाद्य देहिनं शरीरिणम् ॥ ४० ॥

ह्या कामरूपी शत्रूचें आश्रयस्थान, निवासस्थान, कोणतें म्हणून विचारशील तर ऐकः आपलीं सर्व इंद्रियें, आपलेंच संकल्पविकल्पात्मक मन, आणि विषयाचा निश्चय करणारी आपलीच बुद्धि हीं सर्व या कामाचीं वसतिस्थानें आहेत. असो; या घरभेद्या व विषयव्यापारकरणाऱ्या इंद्रियगणाच्या साहाय्यानें हा काम ज्ञानास आच्छादित करितो; ज्ञानास निःसत्त्व करितो आणि मग देहाभिमानी जीवाला हा नानाप्रकारें मोह घालून त्याचा नाश करितो. ज्ञानच निःसत्त्व झाल्यावर जीवाचा नाश होतो, हें नीटच आहे.

'यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टेत तामाहुः परमां गतिम्' ॥ (जेव्हां पंचज्ञानेंद्रियें, यांचें फल

व व्यापार मनासकट बंद होतील, बुद्धिही आपला व्यापार बंद ठेवील, तेव्हां मोक्षमार्ग मिळालाच म्हणावयाचा.) ह्या समर्थक श्लोकानें मूळ श्लोकाचा अर्थ दृढ होतो. विषयज्ञान होण्यास विषय, इंद्रियें, मन आणि बुद्धि यांची अत्यंत अवश्यकता आहे, याशिवाय दृश्यज्ञान म्हणजे विषयज्ञान होणें नाहीं असा सिद्धांत गेल्या शतकांत प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कॉंट यानें काढिला त्याचा भगवद्वाक्याशीं किती तंतोतंत मेळ बसतो तो पहा !

अद्वैतवादी आचार्यानुगामी आहेत.

रामानुजा०—हे 'देहिनं =' देह धारण करणारे ज्ञानी व अज्ञानी या सर्वांचा अंतर्भाव करितात.

द्वैतवादी सरळ अर्थच करितात. राघवेंद्रयति मात्र 'उत्पन्न होणारें ज्ञान प्रतिबद्ध करून किंवा झालेल्या ज्ञानाला कार्य करण्यास असमर्थ करून प्राण्यास मोहांत घालितो' असा व 'ज्ञान स्वयंभु नाहीं, उत्पन्न होतें.' या अर्थाचा प्रस्तव करणारा भांडखोर अर्थ करितात.

पंडितही देही शब्दांत ज्ञानी व अज्ञानी यांचा अंतर्भाव करून ज्ञानी लोकांस मोह होतो तो केवळ भोगकाळीं त्यांची ब्रह्मैक्यात्मबुद्धि नष्ट होते म्हणून होतो; असें म्हणतात.

इच्छा उत्पन्न झाल्यावर इंद्रियें विषयांचें दर्शन घेतात, किंबा इंद्रियांनीं विषयग्रहण केल्यावर काम उत्पन्न होतो हा एक मजेचा प्रश्न रंगनाथांनीं काढिला आहे.

व्याख्याकारः—'त्रिगुणात्मक माया असतांना तिची रजावर व तमावर इतकी भक्ति कां, व सत्त्वावर मुळींच कां नाहीं? याचें कारण इतकेंच कीं रजानें व तमानें प्रपंच वाढतो, सत्त्वानें प्रपंचाचा नाश होतो म्हणून मायेचे आवडते गुण रज आणि तम होत. ॥ ४० ॥

यत एवम्—

हीं कामाची आश्रयस्थानें आहेत म्हणूनः—

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ
नियम्य भरतर्षभ ॥
पाप्मानं प्रजहिह्येनं
ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

तस्मात् (ह्मणून) **आदौ** (प्रथमतः) **इन्द्रियाणि नियम्य** (इंन्द्रियांचें संयमन करून, इंद्रियें स्वाधीन करून घेऊन) **भरतर्षभ** (भरतकुलांतील पुंगवा ! श्रेष्ठ पुरुषा ! अर्जुना ?) **ज्ञानविज्ञाननाशनं** (ज्ञानाचा व विज्ञान ह्मणजे स्वानुभव त्याचा, नाश करणाऱ्या) **एनं** (ह्या) **पाप्मानं** (पापप्रवर्तक दुष्टशत्रूस) **प्रजहिहि** (सर्वथा टाकून दे)– सारांश, अर्जुना ! प्रथमतः तूं आपलीं इंद्रियें आपल्या स्वाधीन करून घे आणि नंतर म्हणजे कामाचीं आश्रयस्थानें काबीज करून घेतल्यानंतर या दुष्ट, व ज्ञान आणि स्वानुभव यांचा नाश करणाऱ्या, महाशत्रूस हद्दपार करून टाक. त्याचें पुनः नांव ऐकावयास येणार नाहीं, इतका लांब त्यास झुगारून दे.—

तस्मादिति । तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ पूर्वं नियम्य वशीकृत्य भरतर्षभ पाप्मानं पापाचारं कामं प्रजहिहि परित्यज एनं प्रकृतं वैरिणं ज्ञानविज्ञाननाशनं ज्ञानं शास्त्रत आचार्यतश्चाऽऽत्मादीनामवबोधः, विज्ञानं विशेषतस्तदनुभवस्तयोर्ज्ञानविज्ञानयोः श्रेयःप्राप्तिहेतोर्नाशनं प्रजहिह्यात्मनः परित्यजेत्यर्थः ॥ ४१ ॥

म्हणून हे भरतकुलश्रेष्ठा ! प्रथम तुला या इंद्रियांचें दमन केलें पाहिजे. हीं आपल्या स्वाधीन करून घेतलींस म्हणजे कामाचा आश्रय नाहींसा होईल; त्याला राहण्याला ठिकाणच मिळणार नाहीं. म्हणून मोह होण्याच्या पूर्वींच, प्रथमतःच इंद्रियांस वश करून घे. नंतर या कामाला दूर टाकून दे; सर्वथा त्याचा त्याग कर. हा महा दुष्ट आहे. हा शत्रू मोठा अनर्थ करणारा आहे.

शिष्य—अनर्थ कसला?

गुरु—अरे! ज्ञानविज्ञानाचा नाश करणें हा काय लहान अनर्थ आहे? या विश्वांत तसा दुसरा अनर्थ होणें शक्यच नाहीं.

शिष्य—भगवन्! ज्ञानविज्ञान तें काय?

गुरु—वत्सा! वेदांतशास्त्राच्या अर्थपूर्वक पठणानें व गुरूचा अनुग्रह होऊन त्यांनीं वरदहस्त मस्तकीं ठेविला म्हणजे आत्म्याचें जें परोक्षज्ञान होतें त्यास ज्ञान म्हणतात. आणि गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें व वेदांतपठणाच्या मननिदिध्यासानें जें अपरोक्ष ज्ञान होतें, जो स्वानुभव होतो, ब्रह्म आणि आत्मा एकच असें जें स्वानुभवाचें विशेष ज्ञान होतें त्यास विज्ञान म्हणतात. समजलें? या ज्ञानविज्ञानाचा, व मुक्ति देणाऱ्या कारणांचा नाश करणारा जो शत्रू काम त्याला झुगारून दे. 'त्याचा नाश कर कारण तो ज्ञानविज्ञानांचा नाश करितो हें प्रसिद्धच आहे,' असाही कोणी अर्थ करितात.—

मधु०, श्रीधर, शंकरानंद, द्विवेदी, पर्वते, ज्ञानेश्वर, पंडित, रंगनाथ—'येथें इंद्रिय शब्दानें सर्व इंद्रियें, मन व बुद्धि, यांचा संग्रह करावा, किंवा मन व बुद्धि, इत्यादिकांचे व्यापार इंद्रियांशिवाय होत नाहींत, म्हणून इंद्रियांचें दमन केलें म्हणजे अर्थात् मन व बुद्धि यांचेंही दमन होतें.' (पहा श्लोक ६।७ अध्या. ३.) असा अर्थ करितात.

प्रपाकार:—सरळ अर्थ करितात.

द्विवेदी म्हणतात कीं, 'येथें ब्रह्मज्ञानाचाही नाश करणारा काम आहे, असें सांगितलें आहे; तें केवळ कामाचें शत्रुत्व पूर्णत्वानें प्रकट व्हावें एतदर्थ सांगितलें आहे; वस्तुतः ब्रह्मज्ञानाचा नाश करण्याचें सामर्थ्य कामामध्यें नाहीं.'

रामानुज:—'सर्व इंद्रियांचा उपशम करून, त्यांस स्तब्ध करून, ज्ञानयोगास आरंभ केला असतां ज्याअर्थी काम हा अनेक विषय पुढें आणून पुरुषास आत्मज्ञानविमुख करितो, त्याअर्थी प्रकृतीच्या संसर्गांत राहणाऱ्या अर्जुना! कर्मयोगामध्येंच राहून तूं इंद्रियांचें नियमन कर

आणि मग ज्ञानाचे पाठीमागें लाग. सारांश कर्मयोगासह ज्ञानयोग साधण्यासाठीं तूं इंद्रियदमन कर.'

द्वैतवादींपैकीं राघवेंद्रयति म्हणतातः–' तूं इंद्रियांस विषयांकडे जाऊं देऊं नको, दिलें तरी विषयांचा व मनोबुद्धीचा संगम होऊं देऊं नको, संगम झाला तरी मनोबुद्धीमध्यें क्षोभ उत्पन्न होईल, असें करूं नको.'

गीताव्याख्याकारः—'इतर विषयांकडे इंद्रियांस जाऊं न देतां परमेश्वरार्पण बुद्धीनें स्वधर्माचरण कर म्हणजे क्रमाक्रमानें इंद्रियांचा उपशम होईल.' परमेश्वरार्पण बुद्धीनें तरी स्वधर्म आचरावा. यांत इच्छा-'थोडी कां होईना'पण-आहेच. तिचा उपशम ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावरच होतो. ॥४१॥

इन्द्रियाण्यादौ नियम्य कामं शत्रुं जहिहीत्युक्तं तत्र किमाश्रयः कामं जह्यादित्युच्यते—

शिष्य—इंद्रियादिकांचा प्रथमतः निग्रह करून काम नांवाच्या शत्रूस सोडून दे किंवा मारून टाक असें सांगितलें; त्यास कोणाचा आश्रय घेऊन, कोणाचें साहाय्य घेऊन, या कामाला हद्दपार करावें बरें?–प्रपाकार व श्रीधर म्हणतातः–' इंद्रियें, मन, बुद्धि हीं कामाकडचींच आहेत; म्हणून त्यांपेक्षां निराळ्या बलवत्तर वस्तूचा आश्रय हवा आहे. '

गुरु—भगवान सांगतात तें ऐकः—

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ॥
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥४२॥

इन्द्रियाणि (इंद्रियें, सर्व इंद्रियें) **पराणि** (श्रेष्ठ–आहेत असें–) **आहुः** (म्हणतात) **इन्द्रियेभ्यः** (त्या इंद्रियांपेक्षां) **मनः परम्** (मन हें श्रेष्ठ आहे) **तु** (परंतु) **मनसः परा बुद्धिः** (या मनापेक्षांही बुद्धि श्रेष्ठ आहे)–आणि–**यः** (जो) **बुद्धेः परतः** (बुद्धिपेक्षांही श्रेष्ठ आहे) **सः** (तो–आश्रयाला घे–). सारांश रूप, रस गंध इत्यादि विषयांपेक्षा इंद्रियें श्रेष्ठ आहेत, त्यांच्यापेक्षां मन श्रेष्ठ आहे, मनापेक्षां

बुद्धि श्रेष्ठ आहे. पण बुद्धिपेक्षां जो श्रेष्ठ आहे, सारांश श्रेष्ठतम आहे त्याचा आश्रय करून कामाला सोडून दे म्हणजे मारून टाक.—

इन्द्रियाणीति। इन्द्रियाणि श्रोत्रादीनि पञ्च देहं स्थूलं बाह्यं परिच्छिन्नं चापेक्ष्य सौक्ष्म्यान्तरस्थत्वव्यापित्वाद्यपेक्ष्य पराणि प्रकृष्टान्याहुः पण्डिताः। तथेन्द्रियेभ्यः परं मनः संकल्पविकल्पात्मकम्। तथा मनसस्तु परा बुद्धिर्निश्चयात्मिका। तथा यः सर्वदृश्येभ्यो बुद्ध्यन्तेभ्योऽभ्यन्तरोऽयं देहिनमिन्द्रियादिभिराश्रयैर्युक्तः कामो ज्ञानावरणद्वारेण मोहयतीत्युक्तं स बुद्धेर्द्रष्टा परमात्मा॥ ४२॥

विद्वान पंडित असें म्हणतात कीं इंद्रियें हीं देहापेक्षां श्रेष्ठ आहेत.

शिष्य—कां बरे ?

गुरु—स्पष्टच आहे. देह स्थूल आहे, बाह्य म्हणजे नेहमीं विषयरूपानें राहणारा आहे आणि शिवाय 'अमुक एक जागा व्यापणारा' असा परिच्छिन्न म्हणजे मर्यादित आहे. पण इंद्रियें म्हणजे कर्ण, नेत्रादि पांच इंद्रियें हीं सूक्ष्म आहेत, आंत राहणारीं म्हणजे विषयांस पाहणारीं आहेत आणि शिवाय सर्व विषयांस व्यापणारीं अशीं आहेत. तेव्हां स्थूलापेक्षां सूक्ष्म श्रेष्ठ, विषयापेक्षां विषयद्रष्टा श्रेष्ठ व परिच्छिन्न आणि व्यापिलेल्यापेक्षां अनंत व व्यापक श्रेष्ठ म्हणून सर्वथा ज्ञानाचीं साधनें जीं इंद्रियें हीं, जड जे विषय त्यापेक्षां श्रेष्ठ आहेत हें म्हणणें सयुक्तिक व शास्त्रानुकूलच आहे. आतां इंद्रियें विषयग्रहण करितात; मात्र तो विषय काय आहे ह्याचा विचार करण्याचें अगर त्याच्या संबंधानें काल व आकाश यांचा निश्चय करावयाचें काम मनाकडे आहे. विषयग्रहण होत असतांनाच मन काय करितें तें ऐकः तो विषय अमुक असावा, अमुक नसावा, असा विचार करण्यास व असे संशय घेण्यास तें मन सुरुवात करितें. म्हणून विषयज्ञान ठरविण्याच्या तयारीला लागणारें जें मन तें विषयग्राहकांपेक्षां श्रेष्ठ असलेंच पाहिजे. समजतें आहेना ? आणि पुनः बुद्धि जी आहे ती, हा विषय अमुकच आहे

असें निश्चयानें ठरविते-किंवा त्या विषयासंबंधानें सिद्धांत सांगूं लागते-ह्मणून ती बुद्धि संकल्प करणाऱ्या मनापेक्षां श्रेष्ठ आहे. शिवाय मनाला पाहणारी किंवा मनाचें काम पाहणारी बुद्धिच आहे: ह्मणून ती श्रेष्ठ होय. तसेंच आत्मदृष्टीनें पाहिलें असतां मन जसें इंद्रियांच्या आलीकडचें आहे, तशीच बुद्धिही मनाच्याही आली-कडची आहे. आतां बुद्धीचा द्रष्टा व विषयापासून तों थेट बुद्धिपर्यंत आणि बुद्धिमुद्धां सर्व विषयांचा ह्मणजे दृश्यांचा जो द्रष्टा आत्मा तो या सर्वांच्या आलीकडे असला पाहिजे आणि तोच सर्वांत श्रेष्ठ असला पाहिजे. हा सर्वांचा द्रष्टा जो आत्मा त्यासच देही ह्मणतात. यालाच कामाख्य शत्रू मोह पाडितो.

शिष्य—तो कसा?

गुरु—अरे मागें सांगितलें ना? इंद्रियें, मन, बुद्धि यांचा आश्रय घेऊन हा काम जो आहे तो उपाधिविशिष्ट आत्म्यास म्हणजे जीवास स्वस्वरूपाचा विसर पाडून,-ज्ञानावरच एक आपण निर्माण केलेलें झांकण घालून-जीवास मोह घालितो. असें विसरतोस कसा? असो; म्हणूनच उपाधिशून्य जें परब्रह्म त्याच्या स्वरूपीं म्हणजे स्वस्वरूपीं सर्वदां ज्ञान्यानें लीन असावें.

मधु:--कठोपनिषदांत "**इन्द्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः॥ मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान्परः ॥**" असा मंत्र आहे. प्रकृत श्लोकाप्रमाणेंच त्याचा अर्थ आहे. फक्त अर्थापेक्षां, विषयापेक्षां, इंद्रियें श्रेष्ठ आहेत, असें म्हणण्याच्या ऐवजीं इंद्रियांपेक्षां, अर्थ, विषय, श्रेष्ठ आहेत, असें जें म्हटलें आहे, तें तेथें परब्रह्माचें श्रेष्ठतमत्व वर्णन करण्यापुरतेंच आहे, इंद्रियाचें श्रेष्ठत्व किंवा अश्रेष्ठत्व स्थापण्यासाठीं नाहीं. येथें इंद्रियांचें श्रेष्ठत्वाचाच विचार कर्तव्य आहे, म्हणून भगवंतानीं ह्या मार्गानें प्रस्ताव केला आहे तस्मात् विरोध नाहीं असें सुचवितात. द्रष्टृत्व या नात्यानें येथें विषयचर्चा आहे.' बुद्धीच्या आलीकडचा जो, तो परमात्माच आहे हें पुढील श्लोकानें सिद्ध होतेंच आहे तथापि हाच अर्थ सिद्ध करण्यासाठीं हे स्वामी वायुपुराण व इतर श्रुतींचे

वगैरे आधार देतात. आत्मज्ञाची तृष्णा कशी नाहींशी होते हें अध्याय २ श्लोक ५९ यांत सांगितलेंच आहे.

शंकरानंद, प्रपाकार, श्रीधर व पर्वते आचार्यांप्रमाणेंच अर्थ करितात.

रामानुजाचार्यः—'इंद्रियें विषयाभिमुख झालीं तर आत्मज्ञान होत नाहीं, इंद्रियनिग्रह केला तरी मन विषयांत गुंतलेले असेल तर आत्मज्ञान होत नाहीं, मनोजय केला तथापि बुद्धीनें विपरीत निश्चय केला म्हणजे आत्मज्ञान होत नाहीं आणि बुद्धि सुनिश्चित झाली असली तरी 'सः' म्हणजे तो काम जन्म पावला असल्यास वरील सर्व नियंत्रण व्यर्थ होईल; आणि हा काम, बुद्धि, मन इत्यादिकांस पुनः विषयांत गोंवून टाकील, व ज्ञान होऊं देणार नाहीं. सारांश काम हा बुद्धीपेक्षांही जास्त बळवान् आहे. 'सः' = काम, परमात्मा नव्हे!' असा त्यांचा अर्थ आहे. हा अर्थ **काठक** मंत्राविरुद्ध आहे म्हणून त्याज्य आहे, शिवाय कामाचा नाश कसा करावयाचा हें प्रकरण सुरू असतां कामच सर्वांहून बलवत्तर आहे, म्हणून अजिंक्य आहे, असें भगवंतांनीं सांगणें ह्मणजे 'मूले कुठारः' या वाक्याप्रमाणेंच होणार आहे. शिवाय बुद्धि, मन, इंद्रियें व विषय यांचा अवरोध केला असतां, कामाचीं सर्व ठिकाणें बंद केलीं असतां, कामाचें बल कोठें राहील? 'मला हें हवें' यांतून 'हें' हे म्हणजे विषय काढून घेतला व विषयग्रहण प्रत्यक्ष किंवा परोक्ष-रीतीनें ग्रहण करणाऱ्या सर्व वेशी बंद केल्या म्हणजे इच्छेला उत्पन्न होण्याचा अवसर तरी कोठें राहिला? सारांश अनुभव, युक्ति आणि श्रुति यांच्या विरुद्ध अर्थ भगवान् सांगतील तरी कसे? व श्रोता ऐकून तरी कसा घेईल? अर्थात हा अर्थ प्रकरणविरुद्ध, श्रुतिविरुद्ध, युक्ति-विरुद्ध व अनुभवविरुद्ध आहे म्हणून त्याज्य होय. **वल्लभाचार्य**ही 'सः' म्हणजे काम म्हणतात तेंही अग्राह्यच होय.

द्वैतवाद्यांचा अर्थ आचार्यांप्रमाणें आहे. इंद्रियादिकांनीं त्यांच्या अधिष्ठानीं असणाऱ्या देवतांही घ्याव्या असें सांगून म्हणतात; 'बुद्धीपेक्षांच आत्मा श्रेष्ठ आहे असें नाहीं तर अव्यक्तापेक्षां, मूलप्रकृतीपेक्षांही परमात्मा श्रेष्ठ

आहे. तो परमात्मा विष्णु होय. तो बुद्धीला गोचर नाहीं इतकें समजूनच मुक्ति मिळावयाची नाहीं, तर अपौरुषेय वेद वगैरे ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या गुणांचें ज्यांस ज्ञान झालें तो मुक्त होतो ' हा विशेष आहे.

पंडितांचें या श्लोकावरील व्याख्यान उत्तम आहे व त्यांनीं श्रुतिस्मृतींत म्हणजे कठोपनिषदांत व भगवद्गीतेंत दिसणाऱ्या विरोधाचे परिहरण उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे इतकेंच येथें सांगणें शक्य आहे. ॥४२॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा
संस्तभ्याऽऽत्मानमात्मना ॥
जहि शत्रुं महाबाहो
कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥

इति श्रीमहाभारते श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

एवं (याप्रमाणें) **आत्मानं** (आत्म्याला, स्वस्वरूपाला) **बुद्धेः परं मत्वा** (बुद्धीपेक्षां आलीकडचा, श्रेष्ठ, आहे असें जाणून)– आणि–**आत्मना** (आपल्या संस्कारपूर्ण अंतःकरणानें) **संस्तभ्य** (स्वस्वरूपाचे ठिकाणीं ठेवून) **महाबाहो** (हे आजानुबाहू, पराक्रमी अर्जुना!) **कामरूपं** (इच्छा हेंच स्वरूप आहे अशा किंवा वाटेल तें स्वरूप धारण करून मोह पडणाऱ्या) **दुरासदं** (सांपडण्यास कठिण अशा) **शत्रुं** (शत्रूला) **जहि** (मारून टाक)–सारांश आत्मा हा बुद्धीपेक्षांही श्रेष्ठ आहे असा निश्चय करून व स्वस्वरूपींच आपलें चित्त कायम ठेवून या इच्छारूपी आणि म्हणून दुर्धर्ष काम नांवाच्या शत्रूला मारून टाक.

याप्रमाणें कर्मयोग नामक तृतीय अध्यायाचें मूळ संपलें.

एवमिति । एवं बुद्धेः परमात्मनं बुद्ध्वा ज्ञात्वा संस्तम्य सम्यक्स्तम्भनं कृत्वा स्वेनैवाऽऽत्मना संस्कृतेन मनसा सम्यक्समाधायेत्यर्थः । जह्येनं शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदं दुःखेनाऽऽसद आसादनं प्राप्तिर्यस्य तं दुरासदं दुर्विज्ञेयानेकविशेषामिति ॥ ४३ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ श्रीमद्भगवद्गीताभाष्ये कर्मप्रशंसायोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

याप्रमाणें आत्मा हा बुद्धीच्याही आलीकडचा म्हणजे सर्वांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे—सर्व साक्षी आहे व निर्विकार आहे—असें जाणून व त्याचप्रमाणें आपलें-सद्वस्तूच्या शुद्ध विचारांनीं सुसंस्कृत झालेलें जें निर्विकार मन त्याच्या योगानें आत्म्याचें नियमन करून, ह्या दुष्ट शत्रूला मारून टाक.

शिष्य—महाराज! मनापेक्षांही श्रेष्ठ जो आत्मा त्याला मनानें नियमन करावयाचें कसें ?

गुरु—हा वेड्या ! अरे! विषयाचें ज्ञान मनानेंच होतेंना ? तेव्हां निर्विषय असें जें मन झालें, सारांश विषयग्रहणच ज्यानें केलें नाहीं, करण्याचें सोडून दिलें, सर्वत्र पूर्णदृष्टीनें पाहूं लागल्यामुळें ज्याची दृश्यदृष्टि किंवा अपूर्णदृष्टिच नष्ट झाली, त्या मनानेंच आत्मा नियमित करावयाचा म्हणजे स्वस्वरूपाशिवाय भासमान होणाऱ्या अपूर्णदृश्याकडे आत्म्यास जाऊंच द्यावयाचें नाहीं. नाहीं समजलें! अरे! मन हें जें आत्म्याचें विषयग्रहणरूपी साधन तेंच बंद केलें म्हणजे आत्म्याचें नियमन झालेंना? सारांश पूर्ण जो आत्मा यास पूर्णाचेंच ज्ञान होऊं द्यावयाचें, अपूर्णाचें ज्ञान होऊं द्यावयाचें नाहीं. असो; याप्रमाणें आत्म्याचें स्वरूप जाणून व आत्म्याचें नियमन करून कामरूपी जो शत्रू त्यास हद्दपार कर. आत्मप्रदेशांतून कामास हाकलून द्यावयाचें म्हणजे त्यास मारूनच टाकावयाचें. 'मला हवें' हा काम होय.

' मीच एक आहें, मी पूर्ण आहें ' हें ज्ञान व हा अनुभव ह्मणजे ब्रह्मसाक्षात्कार व ब्रह्मस्थितिही प्राप्त झाली, ' मला कांहीं नको, कारण माझ्या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. ' असा अनुभव असला म्हणजे दृश्याच्या लाभाविषयीं इच्छा उत्पन्न करणारा काम मेलाच कीं नाहीं ! असो; भगवान् ह्मणतातः—अर्जुना ! हा काम इच्छारूपी (मूर्तिमंत इच्छाच) किंवा हवें तेव्हां वाटेल तें मोहकस्वरूप धारण करणारा आहे, आणि ह्मणून तो चपळवृत्तीचा आहे. सारांश अनंत आणि अनिर्वचनीय गुण त्याच्या अंगांत असल्यामुळें तो सांपडण्यास, त्याचें आकलन होण्यास, फार कठिण जातें. परंतु तूंही पराक्रमी आहेस, तेव्हां नीट व सांगितलेल्या मार्गानें, विचार केलास तर तुलाही तो सांपडेल यांत शंका नाहीं. ॥ ४३ ॥

याप्रमाणें कर्मयोगनामक तृतीयाध्यायाचें भाष्य व त्याचा अर्थ हीं संपलीं.

मधु,० श्रीधर, प्रपाकार, शंकरानंद, पर्वते, द्वैतवादी व रंगनाथ-- ' आत्मानं ' = मन. ' आत्मना ' = आत्मनिश्चय झालेल्या बुद्धीनें ' संस्तभ्य ' = स्थिर करून सारांश निश्चित झालेल्या बुद्धीनें मन आत्मस्वरूपीं स्थिर करून ' असा पहिल्या अर्धाचा अर्थ करितात.

प्रपाकारांनीं आचार्यांच्या अर्थसमर्थनासाठीं बृहदारण्यकांतील व सामवेदांतील असे दोन उतारे दिले आहेत. अध्यायाचें तात्पर्य असें देतातः-

' यज्ञाद्यं वर्णधर्मोचितमपि नियतं कर्म शर्मप्रदं स्या-
न्न त्याज्यं, कार्यमेतद्द्विगुणमपि यतोऽकर्मणः कर्म शस्तम् ।
जीवन्मर्त्यः कदाचित्करचरणयुतो नैव तिष्ठत्यकर्मा
तस्माच्छ्रेयान्स्वधर्मो यदुपतिगदितश्चित्तशुद्ध्यै तृतीये' ॥

(यज्ञादिक वर्णधर्मास उचित असणारे कर्म कल्याणप्रद आहे म्हणून तें टाकूं नये, उलट द्विगुणित भक्तीनें करावें; कारण कर्मशून्य होण्यापेक्षां अज्ञानी पुरुषानें कर्मठ होणें चांगलें आहे. शिवाय हस्तपादयुक्त असा जो शरीरी प्राणी तो कर्म केल्यावांचून राहणें शक्यच नाहीं. म्हणून स्वधर्म श्रेयस्कर आहे. तो तृतीय अध्यायांत भगवंतांनीं सांगितला आहे व तो आचरिला असतां चित्तशुद्धि होऊन ज्ञानयोग्यता प्राप्त होते.)

शंकरा० व रंगनाथ–' येथें कर्मयोगाचें अनुष्ठान अज्ञानी मुमुक्षूनें अवश्य करावें व संसाराचा अभिमान उत्पन्न करणाऱ्या कामावर सत्कर्मानें चित्तशुद्धि झालेल्या मुमुक्षूनें ज्ञाननिष्ठापूर्वक जय मिळवावा. कामनाश झाल्याबरोबर, अज्ञानध्वंस होतांक्षणी, ' मीच सर्व आहें ' असें ज्ञान होऊन मोक्ष मिळतो. सारांश ज्ञाननिष्ठेच्या अंगभूत कर्मनिष्ठा आहे. कर्मनिष्ठेनें चित्तशुद्धि होऊन ज्ञाननिष्ठेचें अनुष्ठान करण्यास अधिकार मिळतो असें या अध्यायाचें तात्पर्य आहे.

भीमशर्मा—' या अध्यायाचें 'कर्म केलें तरच कल्याण होतें,' असें तात्पर्य आहे.

द्विवेदीः—' आत्मज्ञानाचा साक्षात्कार झाल्यावर इंद्रियें, व मन बुद्धि यांच्या योगानें कांहीं विकार होत नाहीं. '

रामानुजः—' याप्रमाणें बुद्धीहून श्रेष्ठ जो काम तो ज्ञानविरोधी आहे असें जाणून व बुद्धीच्या योगानें आपलें मन कर्मयोगामध्यें ठेवून, या दुरासद शत्रूचा नाश कर.' आहे कीं नाहीं मजा ? बुद्धीला वश करून तिच्यापेक्षां बळवंत असणाऱ्या कामाला मारण्याचें काम बिचाऱ्या बुद्धीवर घालणें म्हणजे पिंजऱ्यांत कोंडलेल्या अजापुत्रानें स्वैर विहार करणाऱ्या पंचाननास मारणें होय !

ज्ञानेश्वरः—हे (पापी काम व क्रोध) अंतरीहून जरी फिटले । तरी निभ्रांत जाण निवटले (मेले) । जैसे रश्मीवीण (किरणांशिवाय) उरलें । मृगजळ नाहीं ॥ तैसे रागद्वेष जरी निमाले । तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपलें । आपणची ॥

पंडितांचें तात्पर्यः—....येथें कर्मकलापाचा (कर्मसमुदायाचा) पसारा । नबाधी, निष्काम, परमेश्वरा । अर्पिता, हा अर्थ येथें सिद्ध झाला ॥

रंगनाथ म्हणतातः—बुद्धीचा जो प्रेरक आत्मा आन्तर । तयाचा कैसा करावा साक्षात्कार । तरि बुद्धिमार्गी जें ज्ञान निरंतर । जेणें साचार निश्चय कीजे ॥ ज्याचा निश्चय करिजे तया पदार्थातें । आणि सांडूनिया निश्चयात्मक वृत्तीतें । दोनी टाकलिया केवळ उरे ज्ञप्ति ते । जाण निश्चितें आत्मस्वरूप ॥

☞ या अध्यायाचा उपसंहार चवथ्या अध्ययाच्या शेवटीं देऊं.

श्रीमद्भगवद्गीता.

प्रथम

षडध्यायी–भाग दुसरा.

अध्याय ४ ते ६.

चिंतामण गंगाधर भानु.

किंमत ३ रुपये.

अथ चतुर्थोऽध्यायः ।

श्रीभगवानुवाच—

योऽयं योगोऽध्यायद्वयेनोक्तो ज्ञाननिष्ठालक्षणः ससंन्यासः कर्मयोगोपायो यस्मिन्वेदार्थः परिसमाप्तः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च गीतासु च सर्वास्वयमेव योगो विवक्षितोभगवताऽतः परिसमाप्तं वेदार्थं मन्वानस्तं वंशकथनेन स्तौति श्रीभगवान्—

याप्रमाणें भगवंतांनीं दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायांमध्यें जो योग सांगितला आहे तो समजलासना नीट ?

शिष्य—होय, समजलों. महाराज ! या योगाचें लक्षण म्हणजे ज्ञानमार्गाचें, ब्रह्मज्ञानाचें, अनुष्ठान करून शेवटीं मोक्ष मिळवावयाचा अथवा अपूर्ण दृष्टीनें उत्पन्न होणारें जें अज्ञान, त्याचा नाश करून आपलें स्वरूप ओळखावयाचें; हेंच ना या योगाचें लक्षण आहे ? हाच ना तात्पर्यार्थ ?

गुरु— अजून सर्व तात्पर्यार्थ नाहीं सांगितलास. वत्सा ! या ज्ञानयोगाची प्राप्ति करून घ्यावयची असल्यास अज्ञानी पुरुषानें प्रथम विहित कर्में करावयास हवीं, नंतर निष्काम कर्म करावयास पाहिजे. निष्काम कर्म खरे भावानें झालें म्हणजे चित्त निर्मळ होतें. हें झाल्यावर कर्मसंन्यास करावयाचा म्हणजे अहंकाराचा सर्वथैव नाश करून शरीर आहे तोंपर्यंत उदासीनपणानें कर्म करावयाचें व लोकसंग्रहासाठीं, असें कर्म स्वतः करावयाचें व लोकांकडून करावायाचें कीं ज्याच्या योगानें आपलें चित्त मलीन न होतां लोकांच्या अंतःकरणाची शुद्धि होईल. समजलास ? तेव्हां ज्ञानयोगामध्यें कर्म कसें असावें, व कर्मसंन्यास कसा करावा, सारांश प्रवृत्तिमार्ग, कसा चालवावा व निवृत्ति-

मार्गाकडे लोकमताचा ओघ कसा वळवावा याचा विचार केलेला असून पुनः ब्रह्मात्मैक्यता कशी होते याचाही विचार असतो. ज्ञान हा खरा पुरुषार्थ व कर्म हें त्याचें साधन आहे. हेंच सर्व वेदांतग्रंथांचें तात्पर्य आहे. गीताशास्त्रामध्यें सर्वत्र हाच पुरुषार्थ सांगावयाचा याच पुरुषार्थाचें रहस्य समजावून द्यावयाचें असा भगवंतांचा निश्चय आहे. असो; वेदांताचें तात्पर्य आपण अर्जुनास सांगितलें, आतां कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं, असें समजून ह्या वेदांताची प्रकटता कशी झाली व परंपरेनें त्याची काय स्थिति झाली हेंही अर्जुनास कळावें व येणेंप्रमाणें विषयाची मीमांसा, सिद्धांत व उगम सांगून व्याख्यानाची परिसमाप्ति करावी एदर्थत भगवान म्हणाले कीं—

शिष्य—महाराज! पण वेदांत कोठून प्रकट झाला हें सांगण्याचें काय कारण?

गुरु—कोणत्याही पदार्थाचें खरें स्वरूप कळून घेणें असेल व त्याचें प्रामाण्य ठरवावयाचें असेल तर ह्याचा उगम अगर प्रकटनकाल व परंपरा हीं अवश्य पाहावीं लागतात. उत्पत्तिज्ञानाव्यतिरिक्त झालेलें ज्ञान अपूर्ण राहतें. सध्यां इतकेंच ध्यानांत ठेव.

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ॥
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥१॥

इमं (हा) **अव्ययं** (कधींही विकार न पावणाऱ्या) **योगं** (योगमार्गाला, **अहं** (मीं)–प्रथम–**विवस्वते प्रोक्तवान्** (विवस्वताला, सूर्याला सांगितला). **विवस्वान् मनवे प्राह** (सूर्यानें आपला पुत्र जो मनू त्याला सांगितला)–आणि–**मनुः इक्ष्वाकवे अब्रवीत्** (मनूनें इक्ष्वाकु राजाला सांगितला.)–सारांश मीं प्रथम सूर्याला, त्यानें मनूला व मनूनें इक्ष्वाकुला हा योगमार्ग सांगितला, अशी याची परंपरा आहे.

इममध्यायद्वयेनोक्तं योगं विवस्वत आदित्याय सर्गादौ प्रोक्तवानहं जगतपरिपालयितॄणां क्षत्रियाणां बलाधानाय। तेन योगबलेन युक्ताः समर्था भवन्ति ब्रह्म परिरक्षितुम्।

ब्रह्मक्षत्रे परिपालिते जगत्परिपालयितुमलम् । अव्ययमव्ययफलत्वात् । न ह्यस्य सम्यग्दर्शननिष्ठालक्षणस्य मोक्षाख्यं फलं व्येति । स च विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवे स्वपुत्राया ऽऽदिराजायाब्रवीत् ॥ १ ॥

जगाचें धर्ममार्गानें रक्षण करणारे क्षत्रियांस स्वकर्तव्य करण्याचें सामर्थ्य यावें व ह्या प्राप्त झालेल्या बलानें त्यांनीं ब्रह्मसंरक्षण करण्याची योग्यता मिळवावी एतदर्थ हा तुला दोन अध्यायांमध्यें कथन केलेला योगमार्ग, प्रथमतः सृष्टि उत्पन्न केली त्यावेळीं, मीं क्षत्रियकुलाच्या बीजस्वरूपी सर्वप्रकाशक आदित्यास स्पष्ट करून सांगितला. आर्थातच क्षत्रियांस सामर्थ्य येऊन त्यांनीं ब्रह्मसंरक्षण केलें व ब्रह्मज्ञानानें क्षत्रिय स्वकर्तव्यामध्यें तत्पर राहून सुखी झाले. सारांश ब्रह्मक्षत्रियांची स्थिति चांगली राहिली ह्मणजे सर्व सृष्टीची व्यवस्था उत्तम चालते, असो; सृष्टीची व्यवस्था सुरळीत चालविण्यास कारणीभूत होणाऱ्या ह्या अनादिवेदजन्य ज्ञानयोगाचें फलही विकारशून्य आहे म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराचें अनुष्ठान करणें हेंच लक्षण ज्या ज्ञानयोगाचें आहे त्याचें मोक्ष नावांचें फल सर्वदां एकरस असल्यामुळें कधींही नाहींसें होत नाहीं. ब्रह्मसाक्षात्कार म्हणजेच जर मोक्ष तर ब्रह्मज्ञानाचा व मोक्षाचा कधींही विरह होणार नाहीं हें उघड आहे. हें मीं सूर्यास सांगितलेलें ब्रह्मज्ञान त्यानें श्राद्धदेवास, मनूस, आपल्या मुलास विदित केलें व मनूनेंही आपल्या मुलास म्हणजे इक्ष्वाकूस समजावून दिलें. मनु हा मनुष्य सृष्टींतील पहिला पुरुष आणि इक्ष्वाकू हा पहिला राजा ह्या गोष्टी तुला माहितच आहेत.

मधु,०श्रीधर, शंकरानंद, प्रपाकार, पर्वते व द्विवदीः—आचार्यानुसारी आहेत. ' सांप्रत वैवस्वत मनु आहे म्हणून वैवस्वत मनूचा निर्देश आहे बाकी उपदेश सर्व मन्वंतरांत सारखाच असावयाचा. ' असें मधुसूदनीकार म्हणतात. प्रपाकार श्रीधरः ह्या अध्यायांत ' त्वंपदाचा (बाह्य विषयाचा) प्रपंच केला आहे. व ब्रह्मार्पण कर्म केलें तरच आपलें कर्म मोक्षदायी होतें असें सांगितलें आहे. द्विवेदीः ' ज्ञानयोग

व कर्मयोग हे फलदृष्ट्या एकच; निष्काम कर्मानेंच ज्ञान होतें; हें सांगून कर्मयोगाची अनेक रीतींनें प्रशंसा करण्यासाठीं हा अध्याय आहे. तिसरा हेतु हा आहे कीं कर्ममार्गानेंच ज्ञान साध्य होतें हें अर्जुनास कळवावें.'

रामानु०–तिसऱ्या अध्यायांत अज्ञान्यानें कर्मच करावें, ज्ञान्यानें-ही निष्कामकर्म अकर्तृकत्वभावानें करावें, सारांश कर्मयोगच श्रेष्ठ आहे असें सांगितलें. येथें हाच योग अनादि आहे, हाच ज्ञानयोगाप्रत नेतो असें सांगावयाचें असून सर्व जगाचा उद्धार करणाऱ्या कर्म-योगाचे भिन्न प्रकार व त्याचें ज्ञानयोगांत पर्यवसान व परमेश्वराची अवतारकारणें वगैरे विषय यावयाचे आहेत. अर्थ सरळ आहे.

द्वैतवादीः–या अध्यायांत कर्म योगाचा विस्तार, बुद्धीस अगोचर असणाऱ्या हरीचें माहात्म्य, त्याचें अलौकिक कर्म व ज्ञान यांचा विचार आहे. कर्मयोगाविषयीं आवड व्हावी म्हणून परंपरा सांगितली.

श्रीकृष्णाचें अर्जुनावर केवढें प्रेम होतें यांचे दिग्दर्शन ज्ञानेश्वरांनीं चवथ्या अध्यायांच्या उपोद्घातांत केलें आहे, तें अवश्य वाचावें.

एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ॥
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥

एवं (याप्रमाणें) **परम्पराप्राप्तं** (परंपरेनें, पितापुत्रपरंपरेनें प्राप्त झालेल्या) **इमं** (ह्या योगास) **राजर्षयः** (क्षात्रिय असूनही ऋषींची योग्यता असणारे पुण्यश्लोक राजे) **विदुः** (मिळविते झाले)–परंतु– **सः योगः** (हा योगमार्ग) **इह** (या मृत्युलोकाचे ठायीं) **परंतप** (शत्रूंस ताप देणाऱ्या अर्जुना!) **महता कालेन** (पुष्कळ काळ लोटून गेल्यामुळें **नष्टः** (नष्ट झाला.)–सारांश, पूर्वकालीन अनेक राजर्षींना हा योग परंपरेनें प्राप्त झाला होता. पण पुढें पुष्कळ काल गेल्यावर व गेल्यामुळें हा योगमार्ग आतां मृत्युलोकांतून गेल्यासारखाच झाला आहे. सारांश त्याचें ज्ञान मानवजातींतून अस्तंगत झालें आहे.—

एवमिति। एवं क्षत्रियपरम्पराप्राप्तमिमं राजर्षयो राजानश्च त ऋषयश्च राजर्षयो विदुरिमं योगम् । स योगः कालेनेह महता दीर्घेण नष्टो विच्छिन्नसंप्रदायः संवृत्तो हे परंतप, आत्मनो विपक्षभूतः पर उच्यन्ते तान्शौर्यतेजोगभस्तिभिर्भानुरिव तापयतीति परंतपः शत्रुतापन इत्यर्थः ॥२॥

याप्रमाणें पित्यापासून पुत्रास, गुरुपासून शिष्यास, अशा परंपरेनें हा कर्मनिष्ठेनें मात्र अज्ञान्यांस साध्य होणारा ज्ञानयोग पूर्वींचे –निमि वगैरे–राजर्षि जाणत असत हे •राजे ऐश्वर्यसंपन्न असतांही सूक्ष्मार्थ जाणणारे, ब्रह्म जाणणारे, असत; म्हणून यांस राजर्षि म्हटलें आहे. पुढें बराच काल लोटल्यावर ही परंपरा मोडली; हा संप्रदाय नष्ट झाला.

शिष्य—महाराज! सर्व शक्तिमान परमेश्वरानें हा ज्ञानयोग प्रकट केला असतांही तो मंदतेज व्हावा, पूर्वसंप्रदाय नष्ट व्हावा हें युक्तीस जुळत नाहीं.

गुरु—मागील व्याख्यानांत ज्ञानविज्ञानाशीं शत्रुत्वानें राहणारा जो काम त्याचें सामर्थ्य विसरलास वाटतें? अरे! आत्म्याची सुटका करून घेण्याकडे बुद्ध्यादि साधनांचा उपयोग करून घ्यावयाचा, किंवा प्रकृतीचें मूळस्वरूप शोधून काढण्याकडे त्यांचा विनियोग करावयाचा, तें सर्व सुटून बुद्ध्यादिकांचें अधिष्ठान जो प्रारब्धप्राप्त देह त्यास सुख देणें व त्याच्या दुःखांची निवृत्ति करावयाची हाच पुरुषार्थ आहे असें कामप्रेरित बुद्धीला व मनाला आणि तदनुषंगानें इंद्रियांस वाटूं लागलें म्हणजे शुद्ध ज्ञानमार्ग सामर्थ्यशून्य होतो. ज्ञानस्वरूपी आपण आहोंत हें विसरून देहस्वरूपी आपण आहोंत असें कामाच्या फुसलावणीनें वाटूं लागलें म्हणजे अज्ञान शिरलेंच असें समजावें. उपभोगाची इच्छा प्रबल होण्यासाठीं कामानें विषयांमध्यें सुखरूपी मधाचें एक बोट लावून ठेविलेलें आहे! तिकडे स्वतंत्र आत्म्याची आज्ञानें योजना केली म्हणजे मुख्य पुरुषार्थ एका बाजूस राहून भलतीकडे म्हणजे प्रकृतीकडे सर्व ज्ञानेंद्रियें सेवातत्पर होतात आणि अनर्थमूलक अधर्म पसरतो. याच वेळीं धर्मोपदेशकही विद्यमान नसतात.

परमेश्वर सर्व शक्तिमान आहे हें खरें, पण मनुष्यानें आपल्या परमेश्वरदत्त स्वातंत्र्याचा भलतीकडे उपयोग करण्यास आरंभ केला तर परिणाम भलताच होतो. आतां असें प्राप्त झालेलें स्वातंत्र्यच दुरुपयोगांत आणण्याचें सामर्थ्य जीवास कां प्राप्त झालें, किंवा परमेश्वरानें असें भलतीकडे जाऊं पाहणारें स्वातंत्र्य कां दिलें हा गहन प्रश्न आहे. याचा विचार सध्यांच तुला समजणार नाहीं. पुढें एखादे प्रसंगीं त्याचा विचार करूं. आतां येवढेंच ध्यानांत ठेव कीं, कामाच्या तडाक्यांत अपण सांपडलों म्हणजे आपली दिशाभुल होते. असो; व्यवहारदृष्टीनें हा विचार आहे. वास्तविक पाहिलें असतां ब्रह्माला या व्यावहारिक धर्माधर्मानें कांहींच होत नाहीं. समजलास? याप्रमाणें संप्रदाय नष्ट झाला आहे त्याची हकीकत सांगून भगवान म्हणतातः हे परंतपा, हे स्वशौर्याच्या प्रखर किरणांनीं सूर्याप्रमाणें स्वशत्रूंस (कामक्रोध वगैरेस सुद्धां) ताप देणाऱ्या अर्जुना! आज मित्तीला ज्ञानयोगाचा संप्रदाय अज्ञानी व्यवहारामुळें अगदीं नष्टप्रायच झाला आहे.

मधु०, रंगनाथ—'त्वां उर्वशीचा धिक्कार करून आपलें जितेंद्रियत्व प्रकट केलेंस ह्मणून तूं अधिकारी आहेस.' अर्थामध्यें सर्वत्र ऐक्य आहे. 'राजर्षि' शब्दांत ब्राह्मणादिकांचाही अंतर्भाव होतो असें शंकरानंद, पर्वते व द्विवेदी म्हणतात.

रामानु०-श्रोत्यांच्या बुद्धिमांद्यामुळें ज्ञानयोगाचा संप्रदाय नष्ट होतो.

द्वैतवादी सरळच अर्थ करितात.

ज्ञानेश्वरः—**जे प्राणिया कामीं भर। देहावरीचि आदर। म्हणोनि पडिला विसर। आत्मबोधाचा॥ अव्हांटलिया** (आडवाटेस गेल्यास) **आस्था, बुद्धि। विषयसुखचि परमावधि। जीव तैसा उपाधि। आवडे लोकां** (विषयसुख व उपाधी यांवरच आपल्या जीवाइतकी किंबहुना त्यांहून जास्ती प्रीति करितात.)॥ **येऱ्हवी तरी खवणे यांच्या** (दिगंबर लोकांच्या, क्षपणकांच्या) **गांवीं। पाटावें काय करावीं?। सांगें, जात्यंधा रवी। काय**

आधी (आहे ?) ॥ कां बहिऱ्याच्या आस्थानीं (सभेंत)। कवण गीतातें मानीं ?। कीं कोल्हेया (चोराला ?) चांदणीं । आवडी उपजे ? ॥ .... तैसी वैराग्याची शींव न देखती । जे विवेकाची भाषा नेणती । ते मूर्ख केंवी पावती ?। मज ईश्वरातें ॥ ज्ञानेश्वरांचे दृष्टांतांच्या मासल्यासाठीं हा उतारा घेतला आहे. रंगनाथ बरेच ठिकाणीं हुबेहूब ज्ञानेश्वरांच्या दृष्टांतांची नक्कलच करीत असतात, त्यावरून ' कीं कोल्हया चंदनीं ' असाही एक पाठ असावा असें वाटतें.

दुर्बलानजितेन्द्रियान्प्राप्य नष्टं योगमिममुपलभ्य लोकं चापुरुषार्थसंबन्धिनम्—

याप्रमाणें दुर्बल व इंद्रियांस न जिंकणारे लोक फार झाले ह्मणून हा योग नष्ट झाला असें समजून व हे सर्व लोक आपल्या मुख्य पुरुषार्थास, स्वस्वरूपास जाऊन मिळावयाचें, प्रकृतीच्या आधीन न होतां परब्रह्माची ओळख करून घेऊन मोक्षप्राप्ति करून घ्यावयाची, या मुख्य पुरुषार्थास विसरले आहेत, आंचवले आहेत, असें पाहून:—

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ॥
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्॥ ३॥

सः एव अयं (तोच हा) **पुरातनः योगः** (अनादि व गुरुपरंपरागत योग) **अद्य** (आज) **मया ते प्रोक्तः** (मीं तुला सांगितला आहे)–कारण–**मे भक्तः असि** (तूं माझा अनन्य भक्त आहेस) **च** (आणि) **सखा इति** (स्नेही आहेस-ह्मणून-) **हि** (हें स्पष्टच आहे कीं) **एतत्** (हें) **उत्तमं रहस्यं** (न प्रकट करण्यासारखें अति उत्तम रहस्य आहे.)–सारांश जो पूर्वींपासून, अनादिकालापासून विद्यमान आहे तो योग, तू माझा परम भक्त, खरा स्नेही आहेस, म्हणून मीं तुला आज सांगितला. हा मंत्र भलत्यासच प्रगट करण्यासारखा नाहीं. तूं माझा भक्त व स्नेही म्हणूनच तुला सांगितला.—

स एवायमिति । स एवायं मया ते तुभ्यमद्येदानीं योगः प्रोक्तः पुरातनो भक्तोऽसि मे सखा चासीति । रहस्यं हि यस्मादेतदुत्तमं योगो ज्ञानमित्यर्थः ॥ ३ ॥

तूं माझा परम भक्त आहेस, माझा मित्र आहेस म्हणूनच मीं तुला हा अनादिसिद्धयोग आज स्पष्टपणें व विस्तृतत्वानें प्रकट केला आहे. हा ज्ञानयोग अति उत्तम आहे. याचें ज्ञान असणें श्रेयस्कर आहे; तथापि अधिकारशून्यास सांगण्यासारखा हा योग नाहीं, तूं माझा खरा मित्र, सहचर आणि माझ्यावर निष्कपट भक्ति करणारा म्हणून तुला हा योग सांगितला आहे.–तुला सांगण्याचा दुसरा हेतु हा आहे कीं तुझ्या निमित्तानें तरी संसारसागरांत घोंटाळणाऱ्या अज्ञानी व कर्तृत्व-भोक्तृत्वपूर्णबुद्धीनें इकडे तिकडे भटकणाऱ्या लोकांस हा योग कळवावा. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत अनुकंपा उत्पन्न झाली आहे व ते तरावे अशी इच्छा आहे.—शंकरानंदांनीं हा हेतु स्पष्ट सांगितला आहे व आचार्यांनीं मूळ उपोद्घातांतच याचा निर्देश केला आहे.

मधु०–'माझ्या इतकेंच तुझें वय आहे ह्मणून तूं माझा सखा आहेस. **प्रपा०**–'तु माझा मित्र ह्मणून तुझ्यावर माझी विशेष भक्ति आहे.' **पर्वते**–ज्याची भक्ति नाहीं, श्रद्धा नाहीं, त्यांस विद्या सांगितली तर ती निर्वीर्य होते.' **द्विवेदी**–तुझे माझे विचार एकच प्रकारचे आहेत. शिवाय अज्ञानी पुरुषांच्या बुद्धीचा भेद करूं नये असें सांगितलें आहे, पण तूं अधिकारी, माझा परम मित्र व अनन्यभक्त म्हणून तुला हा योग सांगितला.' **रामानुज** विशेष सांगत नाहींत.

द्वैताभिमानी नेहमीं ह्या योगाचें ज्ञान व त्याप्रमाणें अनुष्ठान असावें, असें म्हणत असतात. पण येवढ्यानें, सकाम अगर निष्काम कर्मानें, मात्र मोक्ष सिद्ध होतो अगर ज्ञान व कर्म यांचा एककालीं समुच्चय होतो, असें होत नाहीं.

ज्ञानेश्वर—हें जीवाचें निजगुज। परी केंवी राखो (सांगितल्या शिवाय कसें ठेवूं ?) **तुज। जे पढियेसी** (आवडतोस) **तूं मज।**

म्हणोनिया ॥ प्रेमाचा पुतळा । भक्तिचा जिव्हाळा । मैत्रियेची चित्कळा (जीव) । धनुर्धरा! ॥ कवित्वाच्या स्फुर्तीची बहार आहे कीं नाहीं?

श्रीकृष्ण हा परमेश्वर नव्हे अशी अर्जुनास खरोखरच शंका प्राप्त झाली असा पुष्कळ टीका व व्याख्याकारांचा अभिप्राय आहे.

भगवता विप्रतिषिद्धमुक्तमिति मा भूत्कस्यचिद्बुद्धिरिति परिहारार्थं चोद्यमिव कुर्वन्—

शिष्य—गुरुजी! ईश्वरासारखे अनादित्वानें न राहणाऱ्या या श्रीकृष्णाचें हें बोलणें असमंजस दिसतें.

गुरु—कां रे बाबा?

शिष्य—कृष्णाचें जन्म सूर्याच्या पाठीमागून किती तरी शतकांनीं झालेले आणि त्यांनीं सूर्याला हें रहस्य सांगावयाचें—

गुरु—पुरे पुरे! असले तुझ्यासारखे मानवी बुद्धीचे लोक कांहीं तरी अशी वेडगळ शंका काढतील असें समजून तूं काढलेला आक्षेप अर्जुनानें ही पुढें आणिला आहे. हेतु हा कीं तुझ्यासारख्यांस योग्य उत्तर मिळावें. ऐक अर्जुन काय म्हणतो तें:—

अर्जुन उवाच—

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ॥
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति॥४॥

अर्जुन म्हणालाः **अपरं** (मागाहून, आलीकडचा) **भवतः जन्म** (तुझा जन्म आहे) **विवस्तः परं जन्म** (–आणि–सूर्याचा जन्म तर फार अगोदरचा आहे) **त्वं आदौ प्रोक्तवान् इति** (तूंच प्रथमतः हा योग सांगितलास असें) **एतत्** (हें) **कथं** (कसें) **विजानीयाम्** (मी जाणूं?)–सारांश विवस्वानाचा जन्म झाल्यानंतर अनेक शतकांनीं तुझा जन्म जर झाला आहे, तर तूंच प्रथमतः हा योग सूर्यास सांगितलास असें कसें समजावें?

अपरमिति । अपरमर्वाग्वसुदेवगृहे भवतो परं पूर्वं सर्गादौ जन्मोत्पत्तिर्विवस्वत आदित्यस्य तत्कथमेतद्विजानीयामविरुद्धार्थतया यस्त्वमेवाऽऽदौ प्रोक्तवानिमं योगं स एव त्वमिदानीं मह्यं प्रोक्तवानसीति ॥ ४ ॥

श्रीकृष्णा! वसुदेवाच्या गृहीं आपला जन्म होऊन फारशीं वर्षें लोटलीं नाहींत. म्हणजे आपला जन्म फार आलीकडचा; आणि सूर्याची उत्पत्ति तर सृष्टि उत्पन्न झाली त्याच वेळेस झाली! तेव्हां हें आपलें वरवर तरी असंबद्ध दिसणारें बोलणें मला कसें समजावें? ज्या वेळीं आपला जन्मही नाहीं अशा वेळीं आदित्याला हा योग प्रथम आपणच सांगितला तोच आतांही मला आपण सांगत आहांत हें कसें समजावें!—सारांश हा योग प्रथमतः प्रकट करणें आपल्यास असंभवनीय दिसतें. ज्यानें हा योग प्रथम प्रकट केला तो मला आतां सांगत नाहीं हें खास आहे. आणि आपण तर याच्या उलट बोलतां! म्हणून आपलें बोलणें विसंगत दिसतें.

मधु रंगनाथः—श्रीकृष्णाच्या शरीरांस अनुलक्षून हा प्रश्न आहे. प्रकृत शरीर सृष्टीच्या उत्पत्तीपासून आहे म्हणावें तर वसुदेवगृहीं कृष्णाचा जन्म झाला ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. जन्मांतरीं सांगून त्याचें स्मरण आज आहे असें म्हणावें तर मनुष्यास पूर्वजन्मीचें स्मरण नसतें. एवंच विरोधच आहे शिवाय आदित्य हा देव व तूं मनुष्य, तेव्हां सज्ञानास अज्ञानें उपदेश करणें असंभवनीयच होय.

श्रीधर प्रपाकार, पर्वते, द्विवेदी व ज्ञानेश्वर, आचार्यानुसारी आहेत. शंकरानंद इतकेंच जास्त म्हणतात कीं, गीताशास्त्र केवळ मनुष्यानें प्रकट केलें नाहीं, परमेश्वरानें प्रकट केलें आहे व म्हणून विश्वासार्ह आहे, असें इतर लोकांस कळविण्यासाठीं हा प्रश्न आहे.

रामानु०—अर्जुनास ठाऊक होतें कीं श्रीकृष्ण हा परमात्मा आहे; पण येथें त्यानें अज्ञानमिषानें विचारलें त्याचा हेतु इतकाच कीं पूर्ण, सर्वज्ञ व सर्वेश्वर अशा परमात्म्याच्या अवताराचें रहस्य सर्वांस कळावें.

द्वैतवादी–पूज्य परमेश्वर आणि पूजक जीव यांमधील भेद स्पष्ट करून तो सप्रमाण ठरविण्यासाठीं हा प्रश्न आहेः

पंडितः–, देवहूतीस कपिल मुनींनीं उपदेश केला ' यावरून वडिलांस त्यांचीं मुलें उपदेश करूं शकतील हें खरें, पण तुझ्या जन्माच्या अगोदरच जे सूर्यवंशीय राजे मेले व ज्यांस सूर्यानें उपदेश केला त्यांच्या पूर्वजास, सूर्यास त्वां उपदेश केला हें कसें संभवेल? असा प्रश्नाचा अर्थ करावा.

या वासुदेवेऽनीश्वरासर्वज्ञाशङ्का मूर्खाणां तां परिहरञ्श्री-भगवानुवाच यदर्थो ह्यर्जुनस्य प्रश्नः—

गुरुः—असो; याप्रमाणें जी तुझी शंका होती आणि हजारो अविचारी पुरुषांस जी शंका येण्याचा संभव आहे, म्हणजे श्रीभगवान वासुदेव हा परमेश्वर नव्हे अशी जी शंका येण्याचा संभव आहे तिचा परिहार करण्यासाठीं श्रीभगवान म्हणतातः—

शिष्य— महाराज ! कृपा करा, श्रीकृष्ण हे ईश्वरावतार नाहींत असें माझें म्हणणें नव्हतें व अर्जुनाचेंही म्हणणें तसें नसावें असें वाटतें. केवळ कालवैपरीत्य दिसतें, भगवंताच्या आधीं सवित्याचा जन्म झाला असें—

गुरु—समजलें, समजलें, तुझ्या शंकेचा अर्थच श्रीकृष्णाचें परमैश्वर्य नष्ट करणारा आहे. असो; ऐक आतांः—

श्रीभगवानुवाच--

बहूनि मे व्यतीतानि
जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि
न त्वं वेत्थ परंतप॥ ५ ॥

श्रीभगवान म्हणतातः—अर्जुन (अर्जुना!) बहूनि (पुष्कळ) मे

(माझे) **जन्मानि** (जन्म) **व्यतीतानि** (आजपर्यंत होऊन गेले आहेत) **तव च** (तसेंच तुझेही पुष्कळ जन्म झाले आहेत.) **तानि सर्वाणि अहं वेद** (ते सर्व मला ठाऊक आहेत.) **परंतप** (शत्रुंजया अर्जुना!) **त्वं न वेत्थ** (तुला मात्र, त्याचें स्मरण नाहीं.) सारांश अर्जुना! तुझे व माझे आजपर्यंत बहुत अवतार या मृत्युलोकीं होऊन गेले आहेत. मला त्या सर्वांचें स्मरण आहे. तूं मात्र मायावशत्वानें सर्व विसरून गेलास.—

बहूनीति । बहूनि मे मम व्यतीतान्यतिक्रान्तानि जन्मानि तव च हेऽर्जुन तान्यहं वेद जाने सर्वाणि न त्वं वेत्थ जानीषे धर्माधर्मादिप्रतिबद्धज्ञानशक्तित्वात् । अहं पुनर्नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावत्वादनावरणज्ञानशक्तिरिति वेदाहं हे परंतप ॥ ५ ॥

अर्जुना! माझें व तुझें या कर्मभूमीवर अनेक वेळां येणें जाणें झालेलें आहे

अर्जुन—याला प्रमाण काय? प्रत्यक्ष, अनुमानादि प्रमाणांवरून तर असें सिद्ध होत नाहीं.

श्रीकृष्ण—ठीकच आहे. माझे ज्ञानावर अज्ञानाचा पडदा येण्याचा संभवच नाहीं, म्हणून मला यथावत सर्व गोष्टींचें, माझ्या लीलावताराचे व इतरांच्या मायाजनित जन्मांचें प्रत्यक्षवत् स्मरण आहे. तुझ्या ज्ञानावर म्हणजे स्वस्वरूपस्थितीवर अज्ञानाचें झांकण पडलेलें आहे म्हणून तुला स्वतःच्यासुद्धां जन्माचें भान नाहीं.

अर्जुन—मलाच कां अज्ञानानें असा त्रास द्यावा?

श्रीकृष्ण—योग्यच आहे पर म्हणजे दुसरें आहेत, शत्रु आहेत, अशी मिथ्या कल्पना करून त्यांचा नाश करण्याला प्रवृत्त होणाऱ्या अर्जुना! धर्माप्रमाणें न वागणें, अधर्म करणें, शिवाय मला कर्म करावयाचें आहे, व फल भोगावयाचें आहे, मला अमुक शत्रु आहे, माझा अमुक मित्र आहे, सारांश स्वस्वरूप विसरून तूं कर्मांच्या व उपभोगाच्या भानगडींत पडला आहेस म्हणून तुला ह्या अज्ञानानें व विस्मर-

णानें घेरिलें आहे. पण माझी स्थिति नेहमींच 'नित्य शुद्ध (निर्मळ), बुद्ध (ज्ञानस्वरूपी आणि मुक्त, निर्लेप) असल्यामुळें म्हणजे मी सच्चिदानंद स्वरूपी आहे म्हणून, ज्ञानस्वरूपी जो मी त्याच्यापुढें अज्ञानाचें कांहीं चालत नाहीं, तें अज्ञान मला बद्ध करूं शकत नाहीं; म्हणून मला स्मरण आहे. सारांश, अवताराच्या संबंधानें जरी तुझ्या माझ्यांत सारखेपणा आहे, तरी तुझा जन्म उपभोगास मात्र युक्त असें कर्म करून शुद्ध आत्म्यावर मिथ्यारोप करण्यासाठीं, सारांश अज्ञान उत्पन्न करणारा आहे व माझा जन्म निर्लेप राहून दुसऱ्यासही निर्लेप करण्यासाठीं आहे हा विशेष आहे. मला स्मरण आहे तुला नाहीं याचें हेंच इंगित होय.

मधु०, रंगनाथ—'अर्जुननिमित्तानें येथें सर्व जीवांचा उल्लेख आहे. अर्जुनाला स्मरण नाहीं व भ्रांति आहे याचें कारण माया होय. अज्ञानाचा पडदा आणणें व मिथ्याप्रत्यय उत्पन्न करणें हीं मायेचीं कार्यें आहेत व तीं देहेंद्रियें हाच आत्मा होय या अज्ञानानें उत्पन्न होतात. ईश्वराला अज्ञानाचा स्पर्श होणेंच संभवनीय नाहीं म्हणून त्यास पूर्व अवतारांचें स्मरण असतें. भगवंतांनीं सूर्यास उपदेश केला तो पूर्वावतारीं होय. त्याचें स्मरण त्यास अर्थात असलेंच पाहिजे.

श्रीधर, प्रपाकार, शंकरानंद ज्ञानेश्वर, पंडित, गीताव्याख्याकार हे आचार्यानुवादी आहेत. '**न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपः**' (सर्वज्ञ जो परमात्मा याच्या ज्ञानाचा कधींही लोप होत नाहीं).

रामानुजाचार्य:—'या श्लोकावरूनच जन्म सत्य आहे, मायाकृत म्हणून भ्रांतिवंत नाहीं; हें भगवन्मुखानेंच ठरतें. सारांश परब्रह्माला जन्ममरण नाहीं असें म्हणणारे वेदांती अपसिद्धांति आहेत असें ठरतें.' परब्रह्माला जन्ममरण नाहीं, परमेश्वर लोकसंग्रहासाठीं अवतार घेतो असें पूर्णज्ञान न झालेल्या लोकांस वाटतें. अज्ञान आहे तोंपर्यंत परमेश्वर आहेच. अज्ञान नाश झाला म्हणजे परमेश्वर व आपण एकरूपच होतो. असो; अज्ञानी लोकांस निवृत्तिमार्ग कळावा या उद्देशानें अज्ञानी लोकांच्या भाषेनेंच त्या मार्गाचें उद्घाटन श्रीकृष्ण परमात्मा

करित आहेत. वस्तुतः जीवब्रह्मांत भिन्नभाव असणें किंवा जन्ममरण असणें शक्यच नाहीं याविषयीं प्रो० द्विवेदी यांनीं उत्तम स्पष्टीकरण केलें आहे तें वाचण्याविषयीं विनंति करण्यापलीकडे जास्त लिहिणें अशक्य आहे. द्वैतवादी म्हणतात कीं, 'माझें व तुझें जन्म या शब्दांनींच परमेश्वर व जीव यांमधील वास्तविक भेद स्पष्ट होत आहे!' ॥५॥

कथं तर्हि तव नित्येश्वरस्य धर्माधर्माभावेऽपि जन्मे त्युच्यते—

अर्जुन—श्रीकृष्णा! आपण जर सर्वांचें आदिकारण आहां, अनादि आहां, अनंत आहां, सर्वकर्तृत्व आपल्याकडे आहे, व धर्माधर्माचा संबंध जर आपल्यास कांहीं नाहीं, तर आपल्याला जन्ममरण असणें संभवनीय नाहीं; त्यांतून अनेक जन्म तर अत्यंतच असंभवनीय, तेव्हां हें कसें तें कृपा करून मला सांगावें.

श्रीकृष्ण—ऐक कसें तें.—

अजोऽपि सन्नव्ययात्मा
भूतानामीश्वरोऽपि सन् ॥
प्रकृतिं स्वामधिष्ठाय
संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥

अजः अपि सन् (मी स्वतः जन्मरहित आहे तथापि)–**तसेंच–अव्ययात्मा** (मीं आत्मस्वरूपानें ज्ञानपूर्ण आहे, माझ्या ज्ञानाला रतिभर सुद्धां कधीं कमीपणा येत नाहीं, तथापि) **भूतानां** (सर्व स्थावर जंगम पदार्थांचा)—**ईश्वरः अपि सन** (नियामक आहे, कर्ता करविता मीच आहें, तथापि) **स्वां** (माझ्या) **प्रकृतिं** (त्रिगुणात्मक मायेला) **अधिष्ठाय** (वश करून घेऊन) **आत्ममायया** (तिच्याच सहाय्यानें) **संभवामि** (मी जन्म घेतों.)–सारांश, जरी मी नित्य आहे, जन्मरहित आहे,

निर्विकार आहे, सर्वांचा नियामक आहे, तथापि स्वतःच्या मायेला वश करून घेऊन तिच्या साहाय्यानें मी अवतार धारण करितों.

अजोऽपीति । अजोऽपि जन्मरहितोऽपि संस्तथाऽव्ययात्माऽक्षीणज्ञानशक्तिस्वभावोऽपि संस्तथा भूतानां ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तानामीश्वर ईशनशीलोऽपि स प्रकृतिं स्वां मम वैष्णवीं मायां त्रिगुणात्मिकां यस्या वशे सर्वं जगद्वर्तते यया मोहितं सत्स्वमात्मानं वासुदेवं न जानाति तां प्रकृतिं स्वामधिष्ठाय वशीकृत्य संभवामि देहवानिव भवामि जात इवाऽऽत्ममाययाऽऽत्मनो मायया न परमार्थतो लोकवत् ॥ ६ ॥

मी जरी अज म्हणजे जन्मरहित, अनादि आहें, माझ्या ज्ञानशक्तीला जरी केव्हांही कोणताही विकार उत्पन्न होत नाहीं, म्हणजे मी निर्विकार जरी आहे, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष ब्रह्मदेवापासून तों थेट अगदीं क्षुल्लक काडीपर्यंत, सारांश विकार पावणाऱ्या यच्चयावत सर्व चराचरवस्तूंचें नियमन करणारा व त्यांचा प्रवर्तक जरी मी आहें—

शिष्य—भगवन् ! भगवंतांनीं आपले गुण सांगितले आहेत त्यावरून, धर्माधर्मांचे ते संस्थापक आहेत म्हणून, त्यांस जन्ममरण नाहीं असें स्पष्ट होतें आणि गीताशास्त्राचा व पुराणग्रंथांचा तर असा डंका वाजतो आहे कीं कृष्णाचें जन्म वसुदेवाच्या गृहीं झाले ! तेव्हां या परस्पर विरोधी वाक्यांची संगति आपण कशी लावणार ?

गुरु—अरे ! आम्ही कसली व्यवस्था लावतों ? भगवंतांनींच ती लावून ठेविली आहे. भगवान् म्हणतातः असा जरी मी जन्ममरणातीत–कर्मातीत–आणि मायातीत आहे, तथापि सत्त्वरजतम ह्या गुणत्रयांनीं घडलेली जी माझी वैष्णवी माया आहे, जिच्या स्वाधीन हें सर्व चराचर विश्व आहे आणि ज्या मायेच्या मोहक स्वरूपाला भुलून गेल्यामुळें प्राकृत लोकांस वासुदेवरूपी स्वस्वरूपाचें विस्मरण झालें आहे अशा त्या सर्वप्रवर्तक मायेचा मी साक्षी व स्वामी आहें व चुंबक जसा लोहाचें आकर्षण करितो त्याचप्रमाणें माझ्या सानि-

घ्यानें जड असणाऱ्या मायेला कर्तुंअकर्तुं शक्ति प्राप्त झाली आहे. असो; या लोकमायेलाच मी वश करून घेतों आणि देहवंत झाल्यासारखा व जन्म घेणाऱ्या प्राण्यासारखा होतों. अर्थातच हा माझा देह, जन्म वगैरे सर्व मिथ्या, आभासरूपी आहेत. लोकांस जसें वाटतें कीं आपण खरे जन्मास आलों; आपण कर्ते, भोक्ते, खरोखर आहों! ही त्यांची भ्रांति होय. मला कधींही अशी भ्रांति नसते कारण भ्रांति उत्पन्न करणारी व प्राकृत लोकांस कर्म करावयास लावणारी माया तीच माझी दासी आहे! असा जन्म घेतला तरी सर्वज्ञत्वादि माझे अनंत गुण मला सोडून जात नाहींत.—

मधु०—सर्वज्ञ परमेश्वराला देहाची (स्थूल, सूक्ष्म अगर कारणरूपी) अवस्था येणें शक्य नाहीं, देह प्राप्त झालाच तर परमेश्वर सर्वज्ञाता होणें शक्य नाहीं, या दोन्ही शंकांचें निवारण आचार्यमार्गानुसारच करितात. व निर्मळ आणि स्वच्छ सत्त्वगुणात्मक देहाचा मात्र अंगीकार परमेश्वर लोकानुग्रहासाठीं करितात, असें सुचवितात. 'आकाशामध्यें तो ओतप्रोत भरलेला आहे' या श्रुतीनें ईश्वराचें नित्यत्व आणि सर्व-व्यापित्व सिद्ध करितात. 'नित्य, विभु, सच्चिदानंदघन, परिपूर्ण, निर्गुण, हेच परमेश्वराचे गुण देहरूपी आहेत असें मायेच्या योगानें आपल्यास वाटतें.' असाही कोणी अर्थ करितात. तात्पर्य एकच आहे. नित्य, निर्गुण व निर्विकारी परमेश्वर हा देहवंत आहे असे द्वैती लोकांचे म्हणण्याचा उल्लेख करून 'त्यांनीं खुशाल बडबडावें, आम्हीं त्यांचें खंडन करित बसत नाहीं' असें शेवटीं सांगतात.

प्रपा०, शंकरा०, द्विवेदी आचार्यानुसारी आहेत. श्लोकसमर्थनार्थ अनेक श्रुति देतात. 'मायासुद्धां ईश्वराहून भिन्न नाहीं' असें शंकरानंद म्हणतात. प्रो० द्विवेदींनीं जीवात्म्याचें ऐक्य चांगलें स्थापित केलें आहे. तसेंच प्रकृतीचे दोन विभाग करून शुद्धसत्त्व प्रकृतीमध्यें जो ब्रह्माचा प्रकाशरूपी अंश तो परमेश्वर आणि शुद्धसत्वप्रकृति म्हणजे माया; व अशुद्धसत्व प्रकृतीमध्यें जो ब्रह्माचा प्रकाशरूपी अंश तो प्राज्ञ (जीव) आणि अशुद्धसत्व प्रकृति म्हणजे अविद्या असें निश्चित

केलें आहे. यावरून प्रकृतीच्या भेदानें, उपाधिभेदानें, ईश्वर आणि जीवामध्यें भेद झाला आहे. वस्तूंत भेद नसूनही हा भेद आहेसा दिसतो हीच माया व हेंच अज्ञान ! ‘माया’= ज्ञान असें विशिष्टाद्वैतीयांचें म्हणणें व ‘माया’= कृपा असें शुद्धाद्वैतीयांचें म्हणणें स्वकपोलकल्पितच होय, कारण माया शब्दाचे हे यौगिक अगर रूढ अर्थ नव्हेत. पर्वते मधुसूदनीकारांचें अनुकरण करून बराच मनोरंजक विस्तार करितात.

रामानुजाचार्य०——“ परमेश्वर अमृत आहे, हिरण्मय आहे, सत्यसंकल्प, सर्वकर्मा, सर्वकाम, अनंत गुणांनीं युक्त आहे आणि म्हणूनच तो देहवान् आहे. तेंच ब्रह्म होय. माया = ज्ञान = संकल्प.” याचा विचार वर केलाच आहे.

द्वैतवादींनीं परमेश्वरास (म्हणजे त्यांच्या ब्रह्मास) गुण व आत्मरूपी देह हीं दिलीं आहेत! ईश्वर=ब्रह्मदेव, शंकर, लक्ष्मी, शेष, यापेक्षां श्रेष्ठ जो तो. अनादित्व, नित्यत्व, मायास्वामित्व इत्यादि गुणांवरून जीव व परमेश्वर हे मूलतः भिन्न आहेत असें यांचें म्हणणें आहे. प्रकृति=प्राकृत=प्रकृतिज=सामान्य मनुष्यें. या मनुष्यांत (वसुदेव देवकीच्या उदरीं) स्वेच्छेनें प्रवेश करून जन्म घेतल्यासारखें भासविलें.

ज्ञानेश्वर—यांचा अर्थ सरळ आहे. द्वैतनिषेधावर एकच ओवीः—

किं एकची दिसें दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें । येऱ्हवी काय वस्तुविचारें । दुसरें आहे ? ॥

पंडित— मधुसूदनीकारांप्रमाणेंच अर्थ करितात. ॥ ६ ॥

तच्च जन्म कदा किमर्थं चेत्युच्यते—

शिष्य—अशा सर्वज्ञानी, सर्वशक्ति परमेश्वराला जन्म कां व केव्हां घ्यावा लागतो ?

गुरु—भगवानच ह्याचें उत्तर देत आहेत. ऐकः—हें ऐकलेंस म्हणजे तिसऱ्या अध्यायांत सांगितलेल्या ज्ञानी पुरुषाच्या व भगवंताच्या कर्माचा उलगडा होईल. सावधान ऐस—

यदा यदा हि धर्मस्य
ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य
तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥

भारत (हे भरत श्रेष्ठा! अर्जुना!) **हि** (माझ्या जन्माचें कारण व काल असा आहे कीं) **यदा यदा** (जेव्हां जेव्हां) **धर्मस्य** (धर्माची) **ग्लानिः भवति** (ग्लानता होते, धर्माची अवनति होते, धर्म क्षीण होतो)–व–**अधर्मस्य** (अधर्माचा) **अभ्युत्थानं** (उदय होतो)–तेव्हां–**आत्मानं** (स्वतःला) **अहं** (मी) **सृजामि** (उत्पन्न करून घेतो.)–सारांश ज्या ज्या वेळीं धर्मास क्षीणता येते, धर्म बुडतो व अधर्माचा उदय होतो अथवा सर्वत्र अधर्म पसरतो तेव्हां मला आतांच सांगितल्याप्रमाणें जन्म घेणें, अवतार घेणेंच, येतें.

यदेति यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्हानिर्वर्णाश्रमादिलक्षणस्य प्राणिनामभ्युदयनिःश्रेयससाधनस्य भवति भारत अभ्युत्थानमुद्भवोऽधर्मस्य तदाऽऽत्मानंसृजाम्यहं मायया ॥ ७ ॥

ज्या ज्या वेळीं धर्माची हानि होते, म्हणजे ब्राह्मण, क्षत्रियादि गुणकर्मपरत्वें चार वर्णांतील आणि ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य वगैरे चारही आश्रमांतील व्यवस्था ठरविणें हेंच आहे स्वरूप ज्याचें अशा धर्माचा क्षय होतो, सारांश जीवमात्रांचे ऐहिक आणि पारत्रिक कल्याण करणाऱ्या व प्राण्यास संसारचक्रामधून सोडविणाऱ्या धर्मरूपी साधनास सामर्थ्यशून्यत्व प्राण्यांच्या अज्ञानामुळें प्राप्त होते–तात्पर्य महान् अनर्थ ओढवतो, इतकेंच नव्हे–तर जेव्हांजेव्हां संसारांत ढकलून सदैव दुःख, शोक आणि संताप देणाऱ्या अधर्माची प्रवृत्ति होते तेव्हां तेव्हां–मीं आपल्या मायेस वश करून घेऊन अवतार धारण करित असतो. समजलास? अर्जुना!

मधु०—भा = ज्ञान आणि त्याचें ठायीं रत तो भारत होय! प्रपा०, श्रीधर–शंकरा०, द्विवेदी, पर्वते यांचा अर्थ आचार्याप्रमाणेंच आहे. प्रपा० 'माया'=इच्छा स्वइच्छेनें मी जन्म घेतों.' शंकरा० 'ज्या वेळीं अधर्माची उत्पत्ति धूमकेतुप्रमाणें अशुभकारी होते, तेव्हां धर्मानुसार वागणारांस क्षेम व अधर्मीयांस शासन करण्यासाठीं मीं देह धारण करितो. द्विवेदीः धर्म = विश्वनियमरूपी जे अनादि चक्र त्यास अनुसरून वेद, वेदांत वगैरे ग्रंथांत सांगितलेले नियम. ह्या व पुढील श्लोकांवरून सर्व विश्वांत उत्पन्न होणारे महापुरुष अगर अवतारी पुरुष हे सर्व भगवंताचेच अंश आहेत असें सिद्ध होतें. पण याचा विचार पुढें करूं.

रामानुज व द्वैतवादी यांचाही अर्थ सरळ आहे.

मराठीमंडळ कांहीं विशेष सांगत नाहीं.

किमर्थम्—

शिष्य—भगवंतास हा इतका खटाटोप कशाला करावा लागतो?

गुरु—सांगतात तें ऐकः—

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥८॥

साधूनां (सात्त्विक वृत्तीनें आपलें व इतरांचें खरें कल्याण करणाऱ्या सत्पुरुषांचें) **परित्राणाय** (संरक्षण करण्यासाठीं) **च** (आणि) **दुष्कृतां विनाशाय** (आपलें व तसेंच दुसऱ्यांचें अहित करण्यासाठीं तयार असणाऱ्या दुष्ट लोकांचा निःपात करण्यासाठीं)–सारांश–**धर्मसंस्थापनार्थाय** (प्राणीमात्रांस नीट व्यवस्थेंत ठेवून व्यवहार आणि परमार्थ सिद्ध करणाऱ्या धर्माचा जीर्णोद्धार करण्यासाठीं)–मी–**युगे युगे** (प्रत्येक युगामध्यें) **संभवामि** (अवतार घेतों.)-सारांश साधूंचें रक्षण, दुष्टांचें शासन आणि धर्माचें स्थापन हीं कृत्यें करण्यासाठीं मी अवतार घेतों.—

परित्राणायेति। परित्राणाय परिरक्षणाय साधूनां सन्मार्गस्थानां विनाशाय च दुष्कृतां पापकारिणाम्। किंच धर्मसंस्थापनार्थाय धर्मस्य सम्यक्स्थापनं तदर्थं संभवामि युगे युगे प्रतियुगम्॥८॥

शिष्य—भगवंताची अधर्मावर फार भक्ति आहे असें दिसतें.

गुरु—तें रे का?

शिष्य—कारण ते अधर्मांचा अभ्युदय झाला म्हणजे जन्म घेतात!

गुरु—हा वेड्या! अरे! भगवंताचा अवतार कशासाठीं आहे तें ऐक ना? सन्मार्गानें, सात्विकमार्गानें, स्वतःस व दुसऱ्यांस पवित्र करणाऱ्या साधूंचें सर्वतोपरी संरक्षण करावें, पाप करून इतरांसह स्वतःस दुःखामध्यें लोटणाऱ्या व लोटूं पाहणाऱ्या दुष्ट लोकांचें निर्दलन करावें हींच माझ्या अवतारांचीं कारणें व फलें आहेत असें नाहीं, तर सर्व सृष्टीची व्यवस्था लावण्यासाठीं निर्माण केलेला जो धर्म त्याचीही पुनः प्राणप्रतिष्ठा यथासांग व यथाविधि करावी एतदर्थही मी या दृश्यसृष्टींत जन्म घेत असतो.

प्रपा०, श्रीधर—**'स सेतुर्विधरणमेषां लोकानां संभेदाय'** (वर्णव्यवस्थेमध्यें पृथ्वीवरील लोकांचा घोंटाळा होऊं नये म्हणून तो परमेश्वर सेतुरूपानें, संरक्षकरूपानें असतो.) दुष्टांचा नाश करणें यांत परमेश्वराचें क्रूरत्व सिद्ध होत नाहीं. मुलाचें हित व्हावें म्हणून सन्मार्गवर्ती आईबाप जसें खोडकर मुलांस ताडन करितात, तद्वतच दुष्टांस शासन करून त्यांस ताळ्यावर आणण्याचा हा प्रकार आहे. शंकरानंदः—ईश्वरावर दृढ निष्ठा ठेविली असतां भक्तांचें संरक्षण निश्चयानें होतें असें या श्लोकांत सुचविलें आहे असें म्हणतात. द्विवेदीः—हे श्लोक अर्थातच व्यावहारिक आहेत.

द्वैतवादी—अवतार न घेतां ही भगवंतास साधुसंरक्षण, दुष्टनिर्दलन व धर्मसंस्थापन करितां येतील. तथापि तो अवतार घेतो याचें कारण त्याचें लीलाप्रियत्व होय.

ज्ञानेश्वरः—दैत्यांची कुळें नाशी। साधूंचा मान गिवशीं (आच्छादन करून छत्र धरितों)। धर्माशी नीतीसी। शेंस भरीं (मळवट भरितों, लग्न लावितों)॥ 'मी' अविवेकाची काजळी। फेडूनि, विवेकदीप उजळीं। तै योगियां पाहे दिवाळी। निरंतर॥ स्वसुखें विश्व कोंदे। धर्मचि जगीं नांदे। भक्तां निघती दोंदें। सात्त्विकांची॥ तैं पापाचा अचळ (पर्वत) फिटे। पुण्याची पहाट फुटे। जैं मूर्ति माझी प्रगटे। पंडुकुमरा॥ ८॥

तत्—

हें

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः॥
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन॥९॥

मे जन्म कर्म च दिव्यं (माझें अघटित जन्म आणि अलौकिक लोकरक्षणादिकर्म) एवं (या प्रकारचें आहे असें) यः तत्त्वतः वेत्ति (जो परमार्थतः जाणतो) सः (तो) अर्जुन (हे अर्जुना!) देहं त्यक्त्वा (देह सोडून गेल्यावर) पुनः (पुनश्च) जन्म (संसारांत, जन्माला) न एति (येत नाहीं.) मां एति (तो पुरुष माझ्या लोकाला म्हणजे ब्रह्मलोकाला येतो–मुक्त होतो–)–सारांश माझे जन्म व कर्म हीं दोन्हीं अलौकिक आहेत, (जन्म मीच होऊन घेतलेला व कर्महि लोकांचा उद्धार करण्याचें, एवंच हीं दोन्हीं असाधारण आहेत) असें ज्याला ज्ञान होतें त्याचा देहपात झाल्यावर तो पुनः जन्ममरणाच्या चक्रांत सांपडत नाहीं, तो मलाच येऊन मिळतो, मोक्ष पावतो.—

जन्मेति। जन्म मायारूपं, कर्म च साधुपरित्राणादि, मे मम दिव्यमप्राकृतमैश्वरमेवं यथोक्तं यो वेत्ति तत्त्वतस्तत्त्वेन यथावत्त्यक्त्वा देहमिमं पुनर्जन्म पुनरुत्पत्तिं नैति न प्राप्नोति मामेत्यागच्छति स मुच्यते हेऽर्जुन॥ ९॥

अर्जुना! माझें जन्म मायेला वश करून घेऊन, स्वतंत्रतेनें झालेले आहे. जीवांच्या जन्माप्रमाणें पूर्वकर्मांच्या उपभोगासाठीं झालेले नव्हे; व माझें कर्मही सात्त्विक धर्म वाढवून संतसंरक्षण करण्याचें आहे—सारांश मला खरोखर पाहतां जन्म नसून माझें सर्व कर्मही धर्मसंरक्षणासाठीं व अज्ञानी लोकांचें मायारूपी अज्ञान दवडण्यासाठीं मात्र आहे; एकंदरीत हा सर्व प्रकार असाधारण, अमानुष आणि प्रकृतीहून अनंतपटीनें श्रेष्ठ आहे. ब्रह्मच सत्य आहे; बाकी सर्व मिथ्या आहे असें ज्याला माझें कर्म पाहून खरोखर आणि परमार्थस्वरूपानें, अनुभवपूर्वक ज्ञान झालें त्याचा येथील प्रारब्धयोग संपल्यामुळें तो पुनः या संसारचक्रामध्यें येऊन पडत नाहीं. उघडच आहे, विश्वाची सर्व घडामोड चालविणारा जो मी हिरण्यगर्भरूपी सूत्रात्मा त्यालाही वास्तविक जन्म नाहीं व त्याचें कर्मही अज्ञान-नाशनार्थच आहे असें ज्ञान होऊन जो एकच ब्रह्म सर्वत्र पाहूं लागला तो मुक्तीसच जाणार! अज्ञान नष्ट झाल्यामुळें जन्म-मरणाचें कारणच नष्ट झालें.—

अद्वैतीटीकाकारांमध्यें ऐकमत्य आहे.

रामानुज—'माझा अश्रय करून स्वभक्तीनें माझें प्रेम संपादन करून घेतो व माझ्या लोकांत येऊन मुक्त होतो.' ही सलोकता मुक्ति होय.

द्वैतवादी—परमेश्वराचें जन्म व कर्म इतकेंच समजून उपयोगी नाहीं; शमदमादि गुण आले पाहिजेत. एवं साधनसंपन्न पुरुषालाच परमेश्वरगुणांचें ज्ञान होतें व तोच मुक्त होतो.

मराठीमंडल कांहीं विशेष सांगत नाहीं. पंडितांचा विस्तार वाचण्या-सारखा आहे.

येथपर्यंत पहिल्या ९ श्लोकांचें विवेचन झालें त्यांत (१–३) श्लोकांत कर्मरूपी साधनानें चित्तशुद्धिद्वारा प्राप्त होणाऱ्या ज्ञानमार्गाची परंपरा सांगून त्या ज्ञानमार्गाचें अनादित्व सिद्ध केलें. नंतर श्रीकृष्ण हा केवळ प्राकृत मनुष्य आहे, अशी स्वतः अर्जुनास शंका नव्हती, तथापि लोकांचें अज्ञान दवडण्यासाठीं तसली शंका अर्जुनानें घेतली आहे आणि त्या शंकेचें निवारण करून अवतारप्रयोजन हा

विषय (५–९) श्लोकांत आणिला आहे. येथें म्हणजे या श्लोकांचें व्याख्यान करितांना निरनिराळ्या संप्रदायवाल्या लोकांनीं (१) जीव-ब्रह्मभेद नित्य व वास्तविक आहे, (२) ब्रह्म हें स्वतःच्या ज्ञान-मूलक इच्छेनें ब्रह्मांड निर्माण करितें (३) ब्रह्मरूपी परमेश्वर आपली लीला या विश्वरूपी नाटकानें दाखवित आहे, असें केवलाद्वैतमार्गास बाधक होईल या रीतीनें भिन्न भिन्न व्याख्यान केलें आहे. (१) हे पूर्णद्वैती होत. 'तुझा जन्म' 'माझा जन्म' 'मी निर्विकार' 'तूं विकारी' वगैरे शब्दांवरून हे लोक द्वैतमत स्थापित करूं पाहतात. पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. अज्ञानी व अविद्येच्या आधीन असणाऱ्या अर्जुनरूपी जीवाच्या संबंधानें वरील शब्दांचा उपयोग केला आहे. वास्तविक शुद्ध ब्रह्मांत 'माझा' 'तुझा' असा भेदच नाहीं. अविद्येमुळें हा भेद झाला व हा भेद समूळ नष्ट करणें म्हणजेच मोक्ष मिळविणें होय. पूर्ण, एकच असणारे, व अद्वितीय ब्रह्म, ज्ञानी असणें किंवा कृपाशील असणें संभवत नाहीं. कारण ज्ञानी होण्याला व कृपा करण्याला ज्ञात्याशिवाय व अनुकंपका-शिवाय अन्य वस्तूची, विषयाची व दीन प्राण्यांची अपेक्षा उत्पन्न होते, आणि पूर्ण, अद्वितीय, ब्रह्मांत तर दुसरी वस्तु असणें संभव-नीयच नाहीं. जीवास जीवदशा प्राप्त झाली ती केवळ पूर्वकर्मानें, सारांश अज्ञानानें प्राप्त झाली आहे; हें अज्ञान व हा अज्ञानमूलक जन्मभेद समूळ नष्ट करण्यासाठीं शुद्ध धर्मांचा अवतार असतो व प्रत्येक धर्माचा असावा. आतां जे द्वैतवादी धर्म आहेत त्यांच्या मतानें हा जीवशिव भेद कायमचा आहे. पण हें खरें असणें संभवनीय नाहीं. कारण धर्माचा ओनामा ज्या सन्मार्गामध्यें, ज्या सदाचारामध्यें, ज्या नीतीमध्यें, प्रथम प्रकट होतो, तेथें मुख्य गोष्ट स्वार्थत्यागाची असते, म्हणजे प्रत्येक सत्क्रियेच्या मुळाशीं स्वार्थत्याग असतो. हा स्वार्थ-त्याग जेथें पूर्णत्वास जातो, तेथें विषय, अहंकार, बुद्धि, व मन यांस-हित सर्व ज्ञान आणि कर्म व त्यांचीं इंद्रियें यांचा, सारांश जीवाचाही त्याग झाला पाहिजे; तात्पर्य सर्व उपाधींचा, सर्व सांत वस्तूंचा, सर्व सांत ज्ञानाचा व सर्व सांत आनंदाचा त्याग झाला पाहिजे. हा अंत झाल्या-

वर अर्थातच सर्वत्र अनंतवस्तु म्हणजे ब्रह्मवस्तु कायम राहते; म्हणजे यच्चयावत सर्व भेद मोडून जातात, व गेले पाहिजेत. वेदांतधर्म इतर सर्व धर्मांपेक्षां श्रेष्ठ आहे अशी माझी स्वतःची खातरी झाली आहे, तिला जीं अनेक कारणें आहेत त्यांत संपूर्ण स्वार्थत्यागाचें व्रत प्रतिपादन करणारा वेदांतधर्म मात्र कायतो आहे, हें मुख्य कारण आहे. असो; हा विषय अमळसा निराळा आहे म्हणून याचा सांगोपांग ऊहापोह करण्याचा विचार अन्यत्र करूं. आज इतकेंच सांगावयाचें कीं, जीवाशिवामध्यें भेद कायम ठेवणें म्हणजे अहंकारासहित वासना कायम ठेवणें आहे. ही दुक्कल जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत पूर्णत्व नाहीं म्हणजे मोक्ष नाहीं. सारांश द्वैतमत ज्ञानदृष्टीला कधींही संमत होणार नाहीं.

(२) ब्रह्माला इच्छा उत्पन्न होणें असंभवनीयच होय. जें स्वतःसिद्ध पूर्ण आहे, अनंत आहे, सर्वव्यापी आहे, (हीं विशेषणें तरी व्यवहारांत म्हणून बोलावयाचीं; वस्तुतः ब्रह्म निर्गुणच आहे, !) तेथें इच्छेचा प्रादुर्भाव होतो, असें म्हणणें म्हणजे ब्रह्माच्या पूर्णत्वाला, अनंतत्वाला व सर्वव्यापित्वाला हरताळ लावण्यासारखेंच आहे. जें ब्रह्मांड आपल्यास दिसत आहे तें वस्तुतः ब्रह्माव्यातीरिक्त नाहीं. तें ब्रह्मच आहे. पण ज्या अवस्थेंत आपण आज आहोंत, त्या अवस्थेंत सर्वत्र एकस्वरूप पाहण्याचें सामर्थ्य आपल्यास प्राप्त झालेलें नाहीं. विचारदृष्टीनें तें मिळूं शकतें. हें सामर्थ्य मिळालें अगर अज्ञान नष्ट झालें म्हणजे ब्रह्मांडाची उत्पत्तिच झाली नाहीं व त्याचा लयही व्हावयाचा नाहीं, सर्व एकच ब्रह्म आहे, हें ज्ञान स्थिर होतें. आणि नंतर ब्रह्मांडांची उत्पत्ति, स्थिति व लय आणि ह्या अवस्था उत्पन्न करतोसा दिसणारा परमेश्वर, हीं सर्व एकरूप, नित्य, निर्गुण व निर्विकार अशीं आहेत असें समजतें. सारांश येथें जन्ममरण वगैरे कोणतेही विकार नाहींत; एकच ब्रह्म समरसानें घनदाट आहे, तेथें इच्छा नाहीं व उत्पत्तिही नाहीं. हा खरा प्रकार होय. पण जोंपर्यंत पाठीमागील अज्ञानजन्य कर्मानें उत्पन्न झालेलें अज्ञान पारमार्थिक म्हणजे निष्काम कर्मानें नष्ट झालें नाहीं, तोंपर्यंत मात्र विश्वव्य-

वस्था आपल्या ध्यानांत यावी म्हणून आपण विश्वाची उत्पत्ति, स्थिति इत्यादि गोष्टींचा व त्यांच्या कारणांचा विचार करावा. पण हा पूर्णत्वाचा विचार नव्हे, आपण मानवी कल्पनेनें ठरवितों तो सिद्धांत नव्हे, असें ध्यानांत ठेवून आपण विश्वव्यवस्थेचे नियम आपल्या समजुतीसाठीं ठरवावे. पण हे नियम कालभंगुर व ज्ञानभंगुर आहेत हें विसरूं नये. तिसऱ्या संप्रदायवाल्यांसही हेंच उत्तर होय. सारांश वेदांतप्रतिपादित अद्वैत सिद्धांतांचा स्वीकार केल्याविना गीता, उपनिषदें, ब्रह्मसूत्रें या ग्रंथांची, ईश्वराची, या अघटित व अनिर्वचनीय स्वरूपानें भासमान होणाऱ्या विश्वाची, आपल्या व्यवहाराची, आपल्या नीतीची, सारांश सर्व ज्ञानाची व सर्व कर्मांची नीट, युक्तिसिद्ध व अनुभवशुद्ध अशी समंजस व्यवस्था जिज्ञासु व मुमुक्षु लोकांस पारमार्थिक दृष्टीनें लावतां येणें शक्य नाहीं, असा माझा समज आहे व हा समज गीताशास्त्राच्या मूलवाचनानें व आचार्यकृत अद्वितीय भाष्याच्या श्रद्धामूलक परिशीलनानें उत्पन्न झाला आहे. अशा तऱ्हेचा प्रगामी समज माझ्या सहाध्यायी गीताभक्तांमध्यें उत्पन्न होईल तर संसारांतील सर्व तापत्रयादिकांचा निरास होईल, यांत संदेह नाहीं. ॥९॥

नैष मोक्षमार्ग इदानीं प्रवृत्तः किं तर्हि पूर्वमपि—

शिष्य—हा मोक्षमार्ग श्रीकृष्णांनीं सांगितला त्याच्या आधींच्या लोकांची काय वाट ? हा धर्म प्रकट होण्यापूर्वीचे सर्व लोक (ज्ञानी, अज्ञानी, सगळे सरसकट) तर जन्ममरणाच्या भोंवऱ्यांत सांपडले ! द्वापारयुगाच्या पलीकडील लोकांचें केवढें दुर्भाग्य कीं ते श्रीकृष्णाच्या अगोदर जन्मास आले ! परमेश्वराच्या घरीं कोण हा अन्याय कीं केवळ अमुक वेळीं जन्मला तरच मनुष्य मुक्त व्हावयाचा, नाहीं तर अनंतकालपर्यंत विश्वकारागृहांतील जन्ममरणरूपी शृंखला त्याच्या पायांत अडकावयाची! हर ! हर!

गुरु—वाहवा ! वाहवा ! अरे बराच पटाईत झाला आहेस तूं ! पण ईश्वराचे कर्तृत्वापुढें तुझ्या पटाईतगिरीची कसली वार्ता ?

तूं समजतोस त्यापेक्षां जगन्नाथाच्या घरची व्यवस्था फार निराळी आहे, बरें ?—हा मोक्षमार्ग अनादिकालापासून प्रकट झाला आहे. ऐक—

वीतरागभयक्रोधा
मन्मया मामुपाश्रिताः ॥
बहवो ज्ञानतपसा
पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

वीतरागभयक्रोधाः (गेले आहेत, नष्ट झाले आहेत, काम, क्रोध, आदि षड्रिपू ज्यांचे) **मन्मयाः** (माझ्याशीं जे अभिन्न झाले, उपासनेनें व ज्ञानानें एकस्वरूपी झाले) **मां** (मला) **उपाश्रिताः** (आश्रयस्थान समजून, ज्ञानस्वरूपी जो मी तेथेंच रममाण झाले)—असे—**बहवः** (पुष्कळ) **ज्ञानतपसा** (ज्ञानरूपी तपाचरणानें) **पूताः** (पवित्र झालेले)—व—**मद्भावं आगताः** (माझ्या स्वरूपाप्रत आलेले)—आहेत: सारांश ज्यांनीं आपल्या कामक्रोध, भय इत्यादि सहा शत्रूंस ठार केले, उपासनेच्या व ज्ञानाच्या साहाय्यानें माझें चिंतनच रात्रंदिवस केल्यामुळें व मीच आश्रयस्थान आहें असें तत्व समजून जे मत्स्वरूपी बनले असे अनेक लोक निर्मळ होत्साते ब्रह्मज्ञाननामक तपश्चर्या करून मोक्षाप्रत पावलेले आहेत.—

वीतरागेति । वीतरागभयक्रोधा रागश्च भयं च क्रोधश्च वीता विगता येभ्यस्ते वीतरागभयक्रोधा मन्मया ब्रह्मविद ईश्वराभेददर्शिनो मामेव परमेश्वरमुपाश्रिताः केवलज्ञाननिष्ठा इत्यर्थः । बहवोऽनेके ज्ञानतपसा ज्ञानमेव च परमात्मविषयं तपस्तेन ज्ञानतपसा पूताः परां शुद्धिं गताः सन्तो मद्भावमीश्वरभावं मोक्षमागताः समनुप्राप्ताः । इतरतपोनिरपेक्षज्ञाननिष्ठा इत्यस्य लिङ्गं ज्ञानतपसेति विशेषणम् ॥ १० ॥

ज्यांच्यापासून, विवेकसंपन्न पुरुषांपासून काम, क्रोध, भय वगैरे मानवी शत्रूंनीं पळ काढल्यामुळें जे शुद्धसत्त्व झाले आहेत, जे मन्मय झाले म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन 'ईश्वर आणि आपण निराळे' नाहीं असें तात्त्विकबुद्धीनें मानावयास व अनुभवावयास लागले आहेत, जे केवळ माझीच म्हणजे ज्ञानस्वरूपाचीच प्रेमपूर्वक उपासना अभेदबुद्धीनें करितात, असे आजपर्यंत, प्रत्येक युगामध्यें, अनेक लोक मुक्त झाले आहेत बरें? त्यांची तपश्चर्या म्हणजे अखंड परमात्म्याचें ज्ञानस्वरूपानें श्रवणमननपूर्वक सदैव चिंतन होय. या चिंतनानें अर्थातच त्यांच्यामधील सर्व मकारचें अज्ञान नष्ट होऊन त्यांचें चित्त शुद्ध झाले व ते माझ्या सच्चिदानंदघन ईश्वरी स्वरूपाला म्हणजे मोक्षाला माझ्या अनुग्रहानें प्राप्त झाले आहेत. सारांश हा ज्ञानमार्ग आजकालचा नसून तो अनादि आहे व त्याच्या साहाय्यानें अनेक लोक आजपर्यंत सर्वथा मुक्त झाले आहेत. **आचार्य** म्हणतातः 'येथें **ज्ञानतपसा** (ज्ञान हेंच तप, त्या तपानें) असें जें विशेषण घातलें आहे त्याची योजना येवढ्याचसाठीं आहे कीं, इतर ज्या तपाश्चर्या आहेत त्यांशिवाय करून केवळ ज्ञाननिष्ठेनें मात्र मोक्षप्राप्ति होते असें भगवंतांस दाखवावयाचें आहे.

मधु० व रंगनाथ ज्ञानपर अर्थ करून पुनः भक्तिपर अर्थही करितात. प्रपाकारांचा व शंकरानंदांचा व द्विवेदी यांचा अर्थ सरळ आहे. श्रीधर, व पर्वते–'माझे जन्म व कर्म हीं दिव्य आहेत असें समजल्यावर शमदमादि साधनांनीं व एकनिष्ठभक्तीनें माझा अनुग्रह होऊन ज्ञानप्राप्ति होते व मग ते सायुज्य मुक्तीप्रत जातात. परमार्थतः जीवशिव एकच होत; ज्या अज्ञानानें भेद उत्पन्न केला, तें नष्ट झाल्यावर भेदबुद्धि नष्ट होऊन पुनः ऐक्य होतें याचेंच नांव मोक्ष होय.'

द्वैतवादीः 'मन्मयाः' मीच सर्व देवांत श्रेष्ठ आहें असें ज्यांस ज्ञान झालें आहे ते लोक. (१) 'मद्भावं'= माझ्या ठिकाणीं अस्तित्व ही सायुज्यमुक्ति, (२) माझ्या भावासारखा भाव म्हणजे स्वरूप, ही सरूपतामुक्ति (३) माझ्याजवळ राहणें, ही समीपता मुक्ति आणि

(४) माझ्या लोकांत अस्तित्व, म्हणजे सलोकता मुक्ति अशा चार मुक्तींपैकीं ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें प्रत्येक मनुष्य मुक्त होतो!

ज्ञानेश्वरांची मुक्ति पहा—**सांगे पितळेचि गंधिकाळिक** (गंज, कीट) । **जैं फिरली होय निःशंक । तैं सुवर्ण काई आणिक । जोडूं जाइजे ?** ॥ पितळेचे सर्व दोष काढून टाकिले असतां तेंच सोनें होईल; ही कल्पना किती सुंदर आहे?

पंडित–' मन्मय ' = **सर्व भूतें आपणांत । मृगजल जैसें किरणांत । जे या माझ्या अनुभवांत । ते मन्मय म्हणावे ॥** ईश्वराचें दिव्य जन्मकर्म समजलें म्हणजे विश्वात्मबोध होतो व तो बोध झाला म्हणजे राग, द्वेष भय हीं सर्व नष्ट होतात. आणि शेवटीं पुरुष माझ्यामध्यें लीन होतात. हाच अर्थ आहे याचें समर्थनार्थ **' येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि '** (ज्याच्या योगानें सर्वपदार्थमात्र आपल्यामध्यें व माझ्यामध्यें पाहतो.) हा श्लोक (अ० ४ श्लोक ३५) देतात भक्तीच्या योगानें शाब्दिक ब्रह्मज्ञानास अनुभवाचें कसें स्वरूप येतें तें पंडितांनीं मोठ्या कौशल्यानें दाखविलें आहे. ॥ १० ॥

तव तर्हि रागद्वेषौस्तः, येन केभ्यश्चिदेवाऽऽत्मभावं प्रयच्छसि न सर्वेभ्य इत्युच्यते—

शिष्य—गुरुजी! परमेश्वर सर्वांनाच मोक्ष देत नाहीं, तर जे ज्ञानरूपी तपश्चर्या करितात त्यांस मोक्ष देतो, हें समजलें; पण यावरून परमेश्वरही ज्ञानी भक्तांवर मात्र प्रेम आणि अज्ञानी लोकांसंबधें द्वेष यांनीं युक्त असतो; सारांश आम्हां मानवी प्राण्यांप्रमाणेंच परमेश्वरासही काम, क्रोध, प्रीति, द्वेष यांनीं आपल्या स्वाधीन ठेविलें आहेच आणि म्हणून तो कोणास आनंदस्वरूपी मोक्ष आणि कोणास सुखदुःखरूपी कर्माकर्मोपभोग देतो! सर्वांसच मोक्ष देत नाहीं. एवंच परमेश्वराच्या घरींही पक्षपात, अन्याय वगैरे गोष्टी आहेतच.

गुरु—उत्तम शंका काढलीस याचें उत्तर भगवान कसें देतात, तें ऐकून मग तुझ्या शंकेकडे वळूं—

ये यथा मां प्रपद्यन्ते
तांस्तथैव भजाम्यहम् ॥
मम वर्त्मानुवर्तन्ते
मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥

पार्थ (पार्था! अर्जुना!) **ये यथा मां प्रपद्यन्ते** (जे ज्या मार्गानें माझ्याकडे येतात) **तान् तथैव अहं भजामि** (त्यांस त्याच मार्गानें मी तृप्त करितों, त्यांच्या इच्छा पूर्ण करितों.) **सर्वशः** (सर्व प्रकारें) **मनुष्याः** (मनुष्य प्राणी) **मम वर्त्म** (माझाच मार्ग) **अनुवर्तन्ते** (अनुसरित असतात.) सारांश कोणत्याही मार्गानें मनुष्यांनीं माझें कर्मरूपी आराधन केलें तरी त्यांस त्यांच्या त्यांच्या सकाम अगर निष्काम भक्त्यनुसार मी फळही त्याच मार्गानें देतों. एवंच सर्व लोक माझ्याच मार्गानें जात असतात.

ये यथेति । ये यथा येन प्रकारेण येन प्रयोजनेन यत्फलार्थितया मां प्रपद्यन्ते तांस्तथैव तत्फलदानेन भजाम्यनुगृह्णाम्यहमित्येतत् । तेषां मोक्षं प्रत्यनर्थित्वात् । न ह्येकस्य मुमुक्षुत्वं फलार्थित्वं च युगपत्संभवति । अतो ये फलार्थिनस्तान्फलप्रदानेन, ये यथोक्तकारिणस्त्वफलार्थिनो मुमुक्षवश्च तान्ज्ञानप्रदानेन, ये ज्ञानिनः संन्यासिनो मुमुक्षवश्च तान्मोक्षप्रदानेन, तथाऽऽर्तानार्तिहरणेनेत्येवं यथा प्रपद्यन्ते ये तांस्तथैव भजामीत्यर्थः । न पुना रागद्वेषनिमित्तं मोहनिमित्तं वा कंचिद्भजामि । सर्वथाऽपि सर्वावस्थस्य ममेश्वरस्य वर्त्म मार्गमनुवर्तन्ते मनुष्याः । यत्फलार्थितया यस्मिन्कर्मण्यधिकृता ये प्रयतन्ते ते मनुष्या उच्यन्ते हे पार्थ सर्वशः सर्वप्रकारैः ॥ ११ ॥

अर्जुना! जे ज्या मार्गानें, जो हेतु मनांत धरून, ज्या फलाच्या आशेनें, माझी आराधना करितात, त्या मार्गानें, तोच हेतु समजून

त्या त्या आराधकांस इष्ट तेंच फल मी देत असतों, त्यांच्यावर त्यांना इष्ट असाच अनुग्रह करित असतो. समजलास? अनेक भक्तांस मोक्ष नकोच असतो, तेव्हां तो त्यांस मीं देत नाहीं.

अर्जुन—भगवंता! सर्वांस आपण मोक्षच कां देत नाहीं?

श्रीकृष्ण—कां देत नाहीं? त्यांस तो नकोच असतो. कशावरून ह्मणशील तर सांगतों ऐकः एकाच पुरुषास एकाच वेळीं 'आपल्यास सुखदुःखाविरहित मोक्ष मिळावा,' व 'आपल्यास आपण केलेल्या कर्माचें फल मिळावें, कर्मांचा उपभोग आपल्यास मिळावा,' अशी इच्छा होणें संभवतच नाहीं. फल नको आणि फल हवें, असें एकाच वेळीं वाटणें विरोधात्मक म्हणून असंभवनीय व अशक्य आहे! म्हणून जे लोक फल मिळावें अशी इच्छा करितात, त्यांस त्यांचें कर्मफल देऊन संतुष्ट करितों; जे विहित कर्म करितात पण फलाची आशा न धरितां मुमुक्षु असतात, त्यांस चित्तशुद्धि व नंतर ज्ञान देऊन मी त्यांचें समाधान करितों; ज्यांस नित्य, अनित्य वगैरे विवेकानें स्वरूपज्ञान समजलें आहे व म्हणून ज्यांनीं चित्त-शुद्धिपूर्वक सर्व कर्मांचा त्याग केला आहे, व स्वरूपज्ञान झालें असल्यमुळें जे मोक्षास अधिकारी झाले आहेत त्यांस स्वस्वरूपाचा साक्षात्कार देऊन मोक्ष देतों; तसेंच आपलें ऐहिक दुःख निवारण व्हावें म्हणूनच जे माझी आराधना करितात, त्यांचें दुःख हरण करितों; सारांश जे जशी माझी आराधना करितात, त्याचप्रमाणें मींही त्यांस त्यांच्या त्यांच्या इच्छेनुसार फल देत असतों; म्हणजे माझी कोणावर भक्ति आहे, किंवा मला कोणाचा द्वेष आहे, अथवा मला केव्हां मोह उत्पन्न होतो असा बिलकुल प्रकार नाहीं. जो जें मागतों तें मी त्यास देतों. येथें रागद्वेष, पक्षपात अगर मोह वगैरे विकारांस थाराच नाहीं.

शिष्य—एकूण ज्याची जशी वांच्छा असते व तत्सिद्ध्यर्थ तो जें कर्म करितो, त्या वांच्छेनुसार व कर्मानुसार प्रत्येक मनुष्यास फळ मिळतें; असेंच समजावयाचेंना?

गुरु—तसें फल ईश्वर देतो असें समजावयाचें. भगवान म्हणतात: परमेश्वर सर्वत्र सारखा भरलेला आहे, तेव्हां .कोणताही मनुष्य जें जें कर्म करितो अगर जें ज्ञान मिळवितो अगर जी भक्ति करितो, ती सर्व माझीच आराधना होते व त्या कर्मानुसार व ज्ञानानुसार, म्हणजे आराधनेनुसार फलही मीच देतों. समजलास ?

शिष्य—असो; मनुष्याची मात्र काळजी ईश्वरास आहे असें दिसतें.

गुरु—असें रे ! कां ? बाबा ? प्रारब्धानें आपल्यास जो अधिकार प्राप्त झाला त्याप्रमाणें मात्र कर्म करून योग्य तें फल मिळावें अशी जे इच्छा करितात ते सर्व मनुष्यच होत. सारांश ह्या विश्वामध्यें जी वडामोड चालली आहे ती माझीच आराधना असून त्याप्रमाणें फलही मीच देतों ! असें भगवद्वाक्यांचें तात्पर्य आहे.

मधु०–शंकर, श्रीधर, पर्वते, आचार्यानुसारी आहेत. प्रपा० मनुष्यांच्या बुद्धीचाही प्रेरक मीच आहें व प्रत्येकाचे योग्यतेप्रमाणें मी त्यांस बुद्धि देतों व तदनुसार फलही मीच देतों.

'चांगलें व वाईट ओळखण्याची बुद्धि पूर्वकर्मानुसार होते, पण चांगलेंच करावें, वाईट करूं नये हा विवेक प्रत्येक मनुष्यास स्वतंत्रतेनें आहे. असें युरोपियन धार्मिक नीतिवेत्त्यांचें म्हणणें आहे. याचा विचार पुढें करूं.

प्रो० द्विवेदी ब्रह्मपर अर्थ करून शुद्ध भक्तिमार्गाचे प्रतिपादक वल्लभ व विशिष्टाद्वैती रामानुज यांचें खंडण .करितात. " वल्लभ 'ये'=जे भक्त. हा अर्थ येथें निवत नाहीं. रामानुज 'ज्या स्वरूपानें माझे कोणी भक्त आराधन करितात, त्यांस मी त्याच रूपानें दृश्य होतों. 'वर्त्म'=स्वभाव. सर्वथा=सर्व इंद्रियें करून.' असा एकदेशी अर्थ करणें व शब्दाचे अर्थ फिरवून आपल्या मताचें पुष्टीकरण करणें हें योग्य नाहीं. हा श्लोक केवळ भक्तिपरच नाहीं तर प्रत्येक मनुष्याच्या प्रत्येक कर्माचा अंतर्भाव होईल अशा प्रकारचा आहे. आपलें कल्याण इच्छिणारे लोक आपल्या बुद्ध्यनुसार 'चांगलें म्हणून जें कर्म करि-

तात, त्या कर्माकर्माप्रमाणेंच मी फल देतों, असा सर्वसाधारण अर्थ केला तरच ' सर्व लोक माझ्याच मार्गानें जात असतात.' याची व्यवस्था लागेल. असो; हाही विचार पुढें करूं.

द्वैतवादी यांचाही अर्थ सरळच आहे.

पंडित—....' जे माझ्या मार्गीं तेची सफळ। मनुष्य ऐसा भावार्थ ॥ हा भगवंताचा आशय नाहीं. कांहीं करो, मनुष्यमात्र माझाच मार्ग अनुसरतो हाच अर्थ घेतला पाहिजे. ॥ ११ ॥

यदि तवेश्वरस्य रागादिदोषाभावात्सर्वप्राणिष्वनुजिघृक्षायां तुल्यायां सर्वफलप्रदानसमर्थे च त्वयि सति वासुदेवः सर्वमिति ज्ञानेनैव मुमुक्षवः सन्तः कस्मात्त्वामेव सर्वे न प्रतिपद्यन्त इति शृणु तत्र कारणम्—

शिष्य—भगवन्! अहाहा! असें जर आहे, परमेश्वर जर रागद्वेषादिविकारशून्य आहे, सर्व प्राण्यांवर त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप कर्म व वासनानुसार फल देऊन अनुग्रह करण्यास जर तो महाकारुणिक परमेश्वर तत्पर आहे, व हें जर प्रसिद्ध आहे तर, गुरुजी! 'हें सर्व विश्व अंतर्बाह्यस्वरूपानें वासुदेवच, परब्रह्मच आहे' असें ज्ञान करून घेऊन व सुखदुःखविरहित जो मोक्ष तो प्राप्त व्हावा अशी इच्छा धारण करून प्रत्येक प्राणी ह्या विकारशून्य परब्रह्माचें निर्विकार चित्तानें कां हो आराधन करित नाहीं ?

गुरु—बरोबर आहे. अर्जुनासही हीच शंका येईल असें समजून भगवान म्हणतात :—

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं
यजन्त इह देवताः ॥
क्षिप्रं हि मानुषे लोके
सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥

कर्मणां सिद्धिं काङ्क्षन्तः (आपल्या कर्माचें फल मिळावें कर्मांत यश मिळावें अशी इच्छा धारण करणारे) **इह** (येथें) **देवताः यजन्ते** (देवतांचें भजनपूजन करितात.) **हि** (कारण) **मानुषे लोके** (या मनुष्य लोकांत) **कर्मजा सिद्धिः** (कर्माचा शेवट म्हणजे फल) **क्षिप्रं भवति** (लवकर सिद्ध होतें)–सारांश आपल्या कर्माची फलोत्पात्ति व्हावी म्हणून मनुष्यें इंद्रचंद्रादिक देवतांचें आराधन करितात. कारण ह्या मनुष्यलोकांत कर्माचें फल फार लवकर सिद्ध होतें.—

काङ्क्षन्त इति काङ्क्षन्तोऽभीप्सन्तः कर्मणां सिद्धिफलनिष्पत्तिं प्रार्थयन्तो यजन्त इहास्मिँल्लोके देवता इन्द्राग्न्याद्याः "अथ योऽन्यां देवतामुपास्ते न्योऽसावन्योऽहमस्मीति न सवेद यथा पशुरेवं स देवानाम्" इति श्रुतेः। तेषां हि भिन्नदेवतायाजिनां फलाकाङ्क्षिणा क्षिप्रं शीघ्रं यस्मान्मानुषे लोके, मनुष्यलोके हि शास्त्राधिकारः। क्षिप्रं हि मानुषे लोक इति विशेषणादन्येष्वपि कर्मफलसिद्धिं दर्शयति भगवान्। मानुषे लोके वर्णाश्रमादिकर्माणीति शेषः, तेषां वर्णाश्रमाद्यधिकारिकर्मणां फलसिद्धिः क्षिप्रं भवति कर्मजा कर्मणो जाता ॥ १२ ॥

आपलें कर्म सिद्धीस जावें म्हणजे कर्माचें फल आपल्यास मिळावें अशी ज्यांची इच्छा असते, अशी जे नित्य प्रार्थना करित असतात, तेच लोक ह्या लोकीं इंद्र, अग्नि आदिकरून देवतांचे यजन, भजन, पूजन करित असतात. बृहदारण्यक उपनिषदांत म्हटलें आहेः " 'मी निराळा आणि देवता निराळी' अशी भावना धरून जो स्वस्वरूपाहून भिन्न अशा देवतेची उपासना करित असतो, तो अज्ञानी होय, त्याला खरें रहस्य कळलें नाहीं. तो देवतांचा पशुच होय! आपल्या उपयोगी जसें अश्व, वृषभ, पडतात, तसा तो देवतांच्याही उपयोगी पडतो!" सारांश तो

मनुष्य आपल्या आशा नामक देवतेचा बैल होतो! असो; तेव्हां स्वस्वरूपाहून भिन्न देवतांची पूजा अर्चा करणाऱ्या व फलाची आकांक्षा धरणाऱ्या लोकांस या मनुष्यलोकांत, कर्माची फलसिद्धि लवकर प्राप्त होते. कारण आपलें काम करणाऱ्या आपल्यास हविर्भाग देणाऱ्या, मनुष्यांस सामान्य देवता फार लवकर लवकर ह्या मनुष्यलोकांत प्रसन्न होतात.

शिष्य—मनुष्य लोक असें कां म्हटलें?

गुरु—कारण येथें प्रकट झालेल्या शास्त्राप्रमाणें कर्म करण्याचा अधिकार मनुष्यलोकांत मात्र आहे. जेथे जे नियम देशकालानुसार प्रकट होतात, त्याप्रमाणें वर्तन करण्यास तेथल्याच लोकांस अधिकार असतो व असावा हें स्पष्टच आहे. ब्रह्मज्ञान्यास मात्र देश, काळ, वर्तमान इत्यादि नाहीं; ब्रह्म हें सर्वगत, नित्य आणि निर्विकार आहे हें मागें अनेक वेळां सांगितलेंच आहे. असो; आतां—

शिष्य—पण भगवन्! 'मनुष्यलोकीं लवकर,' हें विशेषण कशाला?

गुरु—अरे! यावरून भगवान असें सुचवितात कीं अज्ञ लोकांस अन्य लोकींही कर्मं करावें लागतें व कर्माची फलसिद्धिही होते. सारांश जीव कोणत्याही भुवनांत वास करो, तो अज्ञानी असेल तर त्याच्या पाठीमागें कर्म व जन्ममरण हीं लागलींच आहेत. लवकर किंवा उशिरा कर्माचें फल हें उत्पन्न झालेंच पाहिजे; किंवा आलीकडील मताप्रमाणें, उत्पन्न झालेल्या कारणापासून कार्यनिष्पत्ति व्हावयाचीच. मनुष्यलोकांत मात्र ती फलसिद्धि लवकर होते. कारण वर्ण, आश्रम व तदनुसार कर्म व फलसिद्धि ही व्यवस्था मनुष्य लोकींच आहे; आणि म्हणून लवकर म्हणजे येथील कर्माची सिद्धि याच लोकीच्या जन्मांत होते; व त्यामुळें ज्ञाननिष्ठा धारण करून मोक्ष मिळविण्याच्या श्रमाच्या भानगडींत ज्ञानी मनुष्य पडत नाहीं. 'तुरुत दान, महापुण्य' हा सामान्य न्यायच तो अनुसरतो. सारांश कर्माचें फल येथें लवकर मिळतें म्हणून मनुष्य लोक सामान्यतः क्षुद्र देवतांची भक्ति

करितात. आणि क्षुद्र देवतांच्या रूपानें मी कर्मकर्त्यास फल ही इहलोकीं देतों. ज्ञान, हें लवकरच साध्य नाहीं म्हणून त्याचें फलही लवकर मिळत नाहीं.

शंकरा०–' कर्मणां सिद्धिः=चित्तशुद्धि असा एकदेशी अर्थ घेतात, तो अर्थातच समंत होणें शक्य नाहीं.

द्विवेदींचा अर्थ आचार्यानुसारच आहे. **आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥** (आकाशांतून पडलेलें सर्व पाणी स्व-रूपानें समुद्राप्रत जातें, त्याचप्रमाणें कोणत्याही देवतेस केलेला नमस्कार परब्रह्म' जो केशव त्यास मिळतो.)

रामा०—'सकाम कर्मांची सिद्धि लवकर होते' कारण ह्या लोकीं पुत्र, धन, अन्न वगैरे कर्मफलरूपी पदार्थ देवताप्रसादानें मिळविणें फारसें कठिण नाहीं. निष्कामकर्मयोग हाच ज्ञानमार्ग असा यांचा आग्रह पूर्वीपासून प्रसिद्धच आहे. निष्काम कर्मयोग चित्तशुद्धीचें साधन आहे, असें वेदांतीं म्हणतात.

द्वैतवादी––सर्व यज्ञांचा भोक्ताही हरीच आहे ह्मणून फलही लवकर मिळतें. मागील श्लोकांत सर्व कर्तृत्व व ह्या श्लोकांत सर्व भोक्तृत्व परमेश्वराला आहे असें ठरवून मनुष्यास मोकळें करण्याची ही द्वैतवाद्यांची खाशी युक्ति आहे!

ज्ञानेश्वर—**जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तेवाचुनि आन न निपजे। का पाहिजे तेच देखिजे** (जे आपण पाहतों तेंच दिसतें) **दर्पणामाजी॥ ना तरी कडेया तळवटी** (डोंगराच्या कड्याखालीं) **जैसा आपुलाचि बोल किरीटी ।। पडिसाद** (पडशब्द) **होऊनि निमित्तयोगें॥ १२ ॥**

मानुष एव लोके वर्णाश्रमादिकर्माधिकारो नान्येषु लोकेष्विति नियमः किंनिमित्त इति, अथवा वर्णाश्रमादिप्रविभागोपेता मनुष्या मम वर्त्मानुवर्तन्ते सर्वश इत्युक्तं कस्मात्पुनः कारणान्नियमेन तवैव वर्त्मानुवर्तन्ते नान्यस्येत्युच्यते—

शिष्यः—महाराज! मनुष्य लोकींच वर्णाश्रमानुसार कर्म करण्याचा अधिकार असावा, इतर लोकीं नसावा याचें कारण काय बरें? शिवाय, पूर्वी वर्णाश्रमांत वागणाऱ्या मनुष्यासंबंधी असा विषय आला आहे कीं मनुष्यें सर्व प्रकारें मी घालून दिलेल्या कर्मानुसार जात असतात. [श्लो० ११ अ० ४] तर मला असें विचारावयाचें आहे कीं, परमेश्वराचाच मार्ग हे भिन्न वर्ण व भिन्न आश्रमस्थ नियमानें अनुसरतात, इतरांचा मार्ग स्वीकृत करीत नाहीं याचें तरी कारण काय? शिवाय उच्च, नीच असा विषम भाग व सकाम निष्काम कर्म असाही भाग, आलाच कीं नाहीं!

गुरु—या दोन्ही शंकांचें भगवान निवारण करित आहेत. ऐकः—

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं
गुणकर्मविभागशः ॥
तस्य कर्तारमपि मां
विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥

चातुर्वर्ण्यं (चारही वर्ण) गुणकर्मविभागशः (गुणकर्मांच्या विभागानुसार) मया सृष्टं (म्याच उत्पन्न केलें आहेत.) तस्य कर्तारं अपि (त्याचा मी कर्ता आहें तरी) मां अकर्तारं अव्ययं विद्धि (मी निष्क्रिय व निर्विकार आहे, असें जाण.)—

चातुर्वर्ण्यमिति। चातुर्वर्ण्यं चत्वार एव वर्णाश्चातुर्वर्ण्यं मयेश्वरेण सृष्टमुत्पादितं "ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्" इत्यादिश्रुतेः, गुणकर्मविभागशो गुणविभागशः कर्मविभागशश्च गुणाः सत्त्वरजस्तमांसि। तत्र सात्त्विकस्य सत्त्वप्रधानस्य ब्राह्मणस्य शमो दमस्तप इत्यादीनि कर्माणि। सत्त्वोपसर्जनरजःप्रधानस्य क्षत्रियस्य शौर्यतेजःप्रभृतीनि कर्माणि। तमउपसर्जनरजःप्रधानस्य वैश्यस्य कृष्यादीनि कर्माणि। रजउपसर्जनतमःप्रधानस्य शूद्रस्य शुश्रूषैव कर्मेत्येवं गुणकर्मविभागशश्चातुर्वर्ण्यं मया सृष्टमित्यर्थः। तदिदं चातुर्वर्ण्यं

नान्येषु लोकेष्वतो मानुषे लोक इति विशेषणम् । हन्त तर्हि चातुर्वर्ण्यसर्गादेः कर्मणः कर्तृत्वात्तत्फलेन युज्यसेऽतो न त्वं नित्यमुक्तो नित्येश्वर इति । उच्यते । यद्यपि मायासंव्यवहारेण तस्य कर्मणः कर्तारमपि सन्तं मां परमार्थतो विद्ध्यकर्तारमत एवाव्ययमसंसारिणं च मां विद्धि ॥ १३ ॥

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे जे चार वर्ण आहेत ते, सर्वकर्ता जो मी, ईश्वर, त्यानेंच निर्माण केले आहेत.

शिष्य—कशावरून ?

गुरु—अरे! नित्य पठन करतोसना पुरुषसूक्ताचें तूं? त्यांत 'ब्राह्मण हा त्याचें तोंड असता झाला' इत्यादि वेदमंत्र आहे तो व त्याचा अर्थ विसरलास कीं काय ?

शिष्य—होय होय! आठवली ती ऋचा व तिचा अर्थ. बरें ही चातुर्वर्ण्याची व्यवस्था तरी कोणत्या तत्त्वावर झाली आहे?

गुरु—ऐकः ज्याचे जसे गुण असतील त्यास त्याच्या गुणानुरूप कर्म करावयास सांगावयाचें हें तें तत्त्व आहे. आतां गुण तीन प्रकारचे आहेत; सत्त्व, रज आणि तम हे ते तीन गुण होत.

शिष्य—पण वर्णव्यवस्था कशी?

गुरु—कोण उतावळा रे तूं? असो; ब्राह्मण त्याला म्हणावयाचें कीं ज्यामध्यें सत्त्व गुणाचा अंश रजतमांपेक्षां जास्त असतो; म्हणून ब्राह्मणांस शम, दम, तप इत्यादि कर्में करावयास सांगितलीं आहेत. जेथें सत्व गुण कमी होऊन राजस गुण जास्त वाढलेला असतो त्याला क्षत्रिय म्हणावें; त्यानें शौर्य दाखवावें, तेज प्रकट करावें, इत्यादि कर्में करण्यास सांगितलें आहे. सात्विक गुणांचा बहुतेक नष्टांश होऊन तमोगुणाचा उद्भव झाला पण रजोगुणच प्रबल आहे त्या पुरुषाला वैश्य म्हणावें. त्यानें शेतकी करावी, वाण्याचा धंदा करावा व गोपालन करावें, असें ठरविलें आहे. आणि सात्विक अंश नाहींच, रजोगुणही हीनसत्व होऊन तमोगुण जेथें बळवंत होतो त्या मनुष्यास शूद्र म्हणावें. शूद्रानें

तीन्ही वर्णांची सेवा करावी असें ठरविलें आहे. याप्रमाणें पूर्वकर्मानुरूप गुण, गुणानुरूप कर्म व त्याप्रमाणें वर्णव्यवस्था आहे. सर्गाचे आरंभींच या मनुष्यलोकांत ही व्यवस्था निर्माण केली आहे. संसार म्हणजे मायेची घडामोड अनादिच आहे. सारांश ही वर्णव्यवस्था अनादि आहे. इतर लोकीं गुणभेद नाहीं म्हणून, एकाच गुणाचे सर्व प्राणी असल्यामुळें, तेथें वर्णभिन्नता व कर्मभिन्नता नाहीं. आतां दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, ईश्वरानेंच वर्ण व आश्रम यांची व्यवस्था केल्यामुळें सर्व प्राणी ईश्वरानें घालून दिलेल्या मार्गानें जातात. इतर कोणी कर्ताच नाहीं तर त्याच्या मार्गानें जाणार कसे?

शिष्य—हें मात्र चमत्कारिक झालें.

गुरु—काय बाबा?

शिष्य—तें असें कीं चातुर्वर्ण्य उत्पन्न करण्याचें कर्म केल्यामुळें, आणि कर्माचें फल मिळावयाचेंच असा विश्वगामी नियम असल्यामुळें, परमेश्वरासही फलभोक्तृत्व आलें म्हणजे तो फलानें विकारवंत झाला, सारांश त्याचें नित्यत्व, त्याचें, निर्लेपत्व व त्याची स्वतंत्रता हीं सर्व नाहींशी झालीं! ज्याला विकार होतो, तें नाशवंत, मलिन आणि परस्वाधीन असतें हें प्रसिद्धच आहे!

गुरु—तूं याच अध्यायांतील सहावा श्लोक व त्याचें रहस्य पार विसरलास! बाबा! परमेश्वराच्या हातून व्यवहार मात्र होतोसा दिसतो पण तो सर्व मायेचा आहे; मायासंवलित ईश्वर कर्म करतोसा दिसतो खरा पण वास्तविक पाहिलें असतां तो कर्म करितच नाहीं, म्हणून तो अव्यय आहे, निर्विकारी आहे; तात्पर्य जन्ममरणादि कोणताही विकार अगर कर्तृत्व, भोक्तृत्व त्याला नाहीं. समजलास? गुणाप्रमाणें जीवानें कर्म करावें व तदनुसार फल भोगावें ही व्यवस्था मायेच्या आश्रयानें झाली आहे. अहंकारशून्य परमेश्वर केवळ साक्षीरूपानें मात्र आहे, व तो साक्षी आहे म्हणून त्याच्या सत्तेनें माया ही व्यवस्थित रीतीनें सृष्टीची व्यवस्था लावित आहे.

मधु०, श्रीधर, शंकरा०, पर्वते, द्विवेदी—आचार्यानुसारी आहेत.

प्रपा०–विराट्रूपानें चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें. पर्वते–म्हणतातः परमेश्वर सृष्टि उत्पन्न करितो ते स्वसुखासाठीं, किंवा परदुःखासाठीं, किंवा लीला दाखविण्यासाठींही करीत नाहीं. तर अनादि संसारामध्यें पूर्वकाळीं उत्पन्न झालेल्या कर्माचें फळ उत्पन्न होण्याची व्यवस्था मात्र ईशसत्तेनें होत असते. द्विवेदी–प्राणीमात्रांत निरनिराळ्या उपासना अथवा कर्म उत्पन्न होण्याचें कारण चातुर्वर्ण्य हें आहे. 'चातुर्वर्ण्य' ह्याचा कर्ता परब्रह्म नाहीं, तें कर्मानुसार व गुणानुसार स्वतःसिद्धच आहे असें शब्दसिद्धीवरून दाखवितात.

रामानुजाचार्य—येथें परमेश्वराच्या अकर्तृत्वासंबंधानें एक अक्षरही लिहीत नाहींत!

द्वैतवादी—मला क्रियेचा अभिमान नाहीं म्हणून किंवा माझा कर्ता–माझ्याशिवाय दुसरा कर्ता–दुसरा कोणीं नाहीं म्हणून मी अकर्ता आहे! जीवाहून माझें कर्म फार भिन्न आहे म्हणून मी अकर्ता आहे!

ब्रह्म स्वतः निष्क्रिय आहे व मायेला स्वतंत्र सत्ता नाहीं, पण कर्तृत्व आहे आणि ब्रह्मावर क्रियेचा आरोप मात्र आहे; त्याला पंडितांचा दृष्टांतः **जीभेवीण आत्मा न बोले। परी त्याच्या सत्तेनें ती जीभ हाले। शब्द शब्द जे जे निघाले। ते आत्मसत्तेनें॥ आत्मा अबोलणा स्वयें। परी तोचि बोलतो म्हणावा निश्चयें। कीं त्या वांचूनि इंद्रियें। अवघी वृथा॥** पुढें पंडितांचा विस्तार व विषयाचा उपसंहार वाचण्यासारखा आहे.

गीताव्याख्याकारः–**सूर्याचपासून होय मृगजळ। परि सूर्य नेणें ते अळुमाळ। तेवीं माझी प्रकृति हे केवळ। परि मी नातळे तयेते॥ १३॥**

येषां तु कर्मणां कर्तारं मां मन्यसे परमार्थतस्तेषामकर्तैवाहं यतः—

'ज्या कर्मांचा कर्ता आहे, असें तूं समजतोस तीं कर्में वास्तविकरीत्या माझ्या हातून होतच नाहींत. मी सर्वदा अकर्ताच आहें.' असें सांगण्यासाठीं भगवान म्हणतातः म्हणून—

न मां कर्माणि लिम्पन्ति
न मे कर्मफले स्पृहा ॥
इति मां योऽभिजानाति
कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥

मां (मला) **कर्माणि** (कर्में) **न लिम्पन्ति** (विकार उत्पन्न करीत नाहीं)–व–**मे** (मला) **कर्मफले** (कर्मफलाचें ठायीं) **स्पृहा न** (आकांक्षा ही नाहीं). सारांश मी अकर्ता आहे म्हणून मला कर्मापासून विकारही होत नाहीं व मला कर्मफलाची अपेक्षाही नसते.–**इति** (याप्रमाणें) **यः** (जो ज्ञानी पुरुष) **मां अभिजानाति** (माझें खरें स्वरूप जाणतो) **सः** (तो) **कर्मभिः** (कर्मांच्या योगानें) **न बध्यते** (बद्ध होत नाहीं.)-सारांश, याप्रमाणें जो माझें खरें स्वरूप जाणतो त्याला हीं कर्में बद्ध करूं शकत नाहींत.

नेति । न मां तानि कर्माणि लिम्पन्ति देहाद्यारम्भकत्वेनाहंकाराभावात् । न च तेषां कर्मणां फलेषु मे स्पृहा तृष्णा । येषां तु संसारिणामहं कर्तेत्यभिमानः कर्मसु स्पृहा तत्फलेषु च, तान्कर्माणि लिम्पन्तीति युक्तं तदभावान्न मां कर्माणि लिपन्तीत्येवं योऽन्योऽपि मामात्मत्वेनाभिजानाति नाहं कर्ता न मे कर्मफले स्पृहेति स कर्मभिर्न बध्यते । तस्यापि न देहाद्यारम्भकाणि कर्माणि भवन्तीत्यर्थः ॥ १४ ॥

मला देहच नाहीं म्हणून अहंकारही नाहीं, मी कर्ता आहें असें ज्ञानही नाहीं. अर्थातच मला कर्मांचा यत्किंचित् स्पर्श होत नाहीं, व मी पूर्णकाम आहें म्हणून माझ्या सत्तेनें झालेल्या कर्मांची मला फलापेक्षाही नसते, या या कर्मांचें फल मिळावें अशी कामनाही मला कधीं उत्पन्न होत नाहीं. ज्या संसारी लोकांस, कर्तृत्वाचा

अभिमान असतो, कर्म करावयाची हौस असते व कर्मफल आपल्यास मिळावें अशी आशा असते, त्यांस कर्मापासून विकृति प्राप्त होते हें नीट आहे; पण मला जर अभिमान नाहीं व हौस अगर आशा नाहीं, तर मला कर्म अगर त्याचें फल यांनीं विकृति कां व्हावी? अर्थात होऊं नये व होत नाहीं. याप्रमाणें ज्या कोणा तत्वज्ञानी मनुष्यास 'मी परमेश्वर कर्ता नाहीं व कर्मफलाचा भोक्ताही नाहीं' असें ज्ञान होतें तोही अहंकारशून्य होऊन कर्म व त्याचा परिणाम यांपासून बद्ध होत नाहीं. कारण, वास्तविक ज्ञान म्हणजे आत्मा कर्ता, भोक्ता नाहीं, असें ज्ञान त्यांस झाल्यामुळें देह, इंद्रियें इत्यादिकडून उत्पन्न होणारीं कर्मे त्यांच्या हातून होत नाहींत. एवंच ते मुक्त होतात. अर्थातच वैषम्य, क्रूरत्व इत्यादि दोष परमात्म्याचे नसून अज्ञानानें उत्पन्न झालेल्या इच्छेनुसार कर्मानें व कर्मफलानें उत्पन्न होतात.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरानंद, पर्वते, द्विवेदी, रामानुजाचार्य आचार्यानुवादी आहेत. '**आप्तकामस्य का स्पृहा**' (पूर्ण काम जो आहे त्याला इच्छा कसली असणार?) प्रपा०—सूर्यामुळें विश्वव्यवहार चालतात, तरी सूर्याला त्यांचा गंधही नसतो. शंकरा०—इच्छा होणें हा बुद्धीचा धर्म आहे व त्या बुद्धीचा साक्षी परमात्मा आहे, तेव्हां त्या परमात्म्याच्या सत्तेनें वागणाऱ्या बुद्धीच्या इच्छाजन्य कर्मानें परमात्मा कसा लिप्त होणार? **द्विवेदी** यांचे व्याख्यान वाचनीय आहे.

द्वैतवादी:—"मला **इच्छा आहे**, परंतु मला आग्रह, अभिनिवेश नाहीं; फलप्राप्तीपर्यंत माझ्या मनाला विक्षेप चंचलता उत्पन्न होत नाहीं, म्हणून मी निर्लेप असतो. जीव आणि ईश्वर यांचा भेद '**जो मला** जाणतो' यांतील '**जो**' व '**मला**' शब्दानें दाखविला आहे असें द्वैतवादी ठरवितात." हें आग्रहाचेंच प्रदर्शन आहे! ॥ १४ ॥

नाहं कर्ता न मे कर्मफले स्पृहेति—

मी कर्ता नाहीं व कर्मफलाविषयीं मला स्पृहा नाहीं हें—

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ॥
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

एवं ज्ञात्वा (याप्रमाणें ज्ञान संपादन करून) **पूर्वैः मुमुक्षुभिः अपि** (पूर्व काळच्या मुमुक्षु लोकांनीं सुद्धां) **कर्म कृतं** (कर्म, विहित कर्माचें आचरण, केलें आहे) **तस्मात्** (म्हणून) **त्वं कर्म एव कुरु** (तूं कर्मच कर.) **पूर्वैः** (प्राचीन मुमुक्षूंनीं) **पूर्वतरं कृतं** (त्यांच्या पूर्वीं झालेल्या श्रेष्ठ पुरुषांनीं जें कर्म केलें, तेंच कर्म केलें.) सारांश, याप्रमाणें मी कर्ता नाहीं व भोक्ताही नाहीं असें समजून अलिप्तपणानें पूर्वींच्या लोकांनीं कर्म केलें व ते मोक्षपदवीस गेले. म्हणून अर्जुना ! तूंही कर्मच कर. कारण तुझ्यापेक्षां ज्यांस विशेष ज्ञान अशा लोकांनीं त्यांनःही प्राचीन असणाऱ्या सत्पुरुषांनीं जें कर्म केलें, तें त्यांनीं केलें. म्हणजे ही अनादिसिद्ध प्रवृत्ति आहे. पाठीमागील दाखला पाहून पुढील पिढी, पाठीमागील पिढ्यांचें अनुकरण सत्कृत्यांमध्यें करीत असते.

एवमिति । एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरप्यतिक्रान्तैर्मुमुक्षुभिः, कुरु तेन कर्मैव त्वं न तूष्णीमासनं नापि संन्यासः कर्तव्यस्तस्मात्त्वं पूर्वैरप्यनुष्ठितत्वाद्यद्यनात्मज्ञस्त्वं तदाऽऽत्मशुद्ध्यर्थं तत्त्वविच्चेल्लोकसंग्रहार्थं पूर्वैर्जनकादिभिः पूर्वतरं कृतं नाधुनातनं कृतं निर्वर्तितम् ॥ १५ ॥

याप्रमाणें परमेश्वराचें अकर्तृत्व व अभोक्तृत्व जाणून व त्याचप्रमाणें आत्माही कर्तृत्वभोक्तृत्वशून्य आहे असें जाणून पूर्वीं होऊन गेलेल्या मोक्षेच्छू लोकांनीं कर्म केलें आहे. म्हणून ममत्व व फलेच्छा सोडून तूंही कर्मच कर. उगीच स्वस्थ बसूं नको. किंवा कर्मसंन्यासही करूं नको. कारण आपल्यापूर्वीं जे शहाणे होऊन गेले आहेत त्यांनींही कर्मच केलें आहे. अर्जुना ! जर तुला आत्मज्ञान झालें नसेल (व तें झालें नाहीं हें मला माहित आहे.) तर अंतःकरणशुद्धीसाठीं कर्म कर. बरें तुला परमार्थज्ञान झालें असेल तर तूं लोकसंग्रहासाठीं कर्म कर; एवंच कर्म कर. पूर्वकालीन ययाति, जनकादिक राजांनीं सत्कर्मामध्यें आपल्या पूर्वजांचें अनुकरण करून पूर्वजांनीं जो सत्कर्माचा कित्ता घालून दिला होता तो त्यांनीं वळविला; म्हणून त्यांचें वर्तन सप्रमाण आहे.

श्रीधर, पर्वते, द्विवेदी, मधु० प्रपा०—आचार्यवादी आहेत. व 'आत्माही निर्लेप आहे असें जाणून' इतका अर्थ, मधुसूदनीकार श्रीधर व शंकरानंद काढितात तो नीटच आहे. प्रपा०—'हा परंपरागत शिष्टाचारही सप्रमाण आहे,' श्रीधर—याप्रमाणें ईश्वरावर विषमतेचा व क्रूरतेचा असे आलेले आरोप निराकृत करून निष्कामकर्मयोगाचे व्याख्यानास सुरुवात करितात, शंकरा०—' मुमुक्षुभिः= (मुक्त झालेले व दुसऱ्यास मुक्त करण्याचा प्रयत्न करणारे, हा विशेष अर्थ देतात, पर्वते श्रीधरस्वामींचें अनुकरण करून ह्मणतात कीं, पूर्वतर म्हणजे अनादि वेदोक्त कर्म होय; व तें चित्त-शुद्धीसाठीं केलें पाहिजे. निष्काम कर्म पूर्वींच्या, अनादिकालीन सत्पुरुषाप्रमाणें केलेंस तर तुला सहजच कैवल्य प्राप्त होईल.

रामा०—' याप्रमाणें मला जाणून.' बाकी एकत्वच आहे.

द्वैतवादी—' तूं ज्ञानी असलास तरी अधिक मोक्ष, वरिष्ठ प्रतीचा मोक्ष मिळावा म्हणून तूं कर्म कर.

ज्ञानेश्वर—पेरितां बीजें जैशीं दग्धलीं (भाजलेलीं)। नुगव-तीचि पेरिलीं। तैसी कर्मेंचि परि तया झाली। मोक्ष हेतु (मोक्ष देणारीं)॥

गीताव्याख्याकार—मुमुक्षु = ज्ञानप्राप्तीसाठीं चित्तशुद्धि करून व फलेच्छेचा त्याग करून कर्म करणारे ते. ॥ १५ ॥

तत्र कर्म चेत्कर्तव्यं त्वद्वचनादेव करोम्यहं किं विशेषितेन पूर्वैः पूर्वतरं कृतमित्युच्यते, यस्मान्महद्वैषम्यं कर्मणि। कथम्—

अर्जुन.—भगवंता? आतां कर्मच जर करावयाचें आहे व तें मला केलेंच पाहिजे असें असेल तर आपण सांगतां इतकेंच मला पुरें आहे. आपली आज्ञा शिरसावंद्य करूनच मी कर्म करण्यास आरंभ केला असता. मग पूर्वींच्या लोकांनीं पूर्वतरकालांत सांगितल्याप्रमाणें वर्तन केलें तसें तूंही कर असें मुद्दाम सांगण्याचें प्रयोजन काय?

श्रीकृष्ण—सांगण्याचें कारण इतकेंच कीं कर्माकर्मांमध्यें अत्यंत भिन्न प्रकार आहेत; आणि परंपरागत धर्मज्ञानानेंच ते कळतील असें नाहीं, तर त्याचा तात्त्विक विचारही केला पाहिजे.

अर्जुन–हें कसें ?

श्रीकृष्ण–सांगतों ऐकः–

किं कर्म किमकर्मेति
कवयोऽप्यत्र मोहिताः ॥
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि
यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥

किं कर्म (कर्म म्हणजे काय ?) **किं अकर्म** (कर्मशून्यता म्हणजे काय ?) **इति** (असें विचारशील–तर–) **अत्र** (येथें) **कवयः अपि** (मोठमोठे बुद्धिकुशल लोकसुद्धां) **मोहिताः** (मोह पावले आहेत, गोंधळून गेले आहेत.) **तत्** (म्हणून) **ते** (तुला) **कर्म प्रवक्ष्यामि** (कर्म म्हणजे काय तें सांगतों;) **यत् ज्ञात्वा** (जें हें तत्व समजल्यानंतर) **अशुभात्** (अमंगलापासून, पापापासून,) **मोक्ष्यसे** (तूं मुक्त होशील.)–सारांश कर्म कोणतें व अकर्म कोणतें या विषयांत मोठमोठ्या नामांकित विद्वानांची सुद्धां मति लटपटून गेली आहे, मग बाकीच्यांची कथा काय ? म्हणून प्रथमतः तुला कर्म म्हणजे काय याचें तत्व सांगतों. हें तत्व तूं समजून घेतलेंस म्हणजे तूं अमंगल असणारें जें दुःख त्यापासून मुक्त होशील.—

किं कर्मेति । किं कर्म किं चाकर्मेति कवयो मेधाविनोऽप्यत्रास्मिन्कर्मादिविषये मोहिता मोहं गता अतस्ते तुभ्यमहं कर्माकर्म च प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा विदित्वा कर्मादि मोक्ष्यसेऽशुभात्संसारात् ॥ १६ ॥

अरे ! कर्म म्हणजे काय, अकर्म कसलें असतें, इत्यादि विषयांचा निकाल करितांना मोठ्या मोठ्या विद्वान्, चतुरस्र, कुशाग्र, बुद्धीच्या लोकांची सुद्धां धांदल उडून गेलेली आहे ! समजलास ? म्हणून तुला कर्म व अकर्म याविषयीं उत्पन्न होणाऱ्या सर्व संशयाचा उच्छेद

करणारी तात्विक मीमांसा कथन करितों. ही समजली म्हणजे पूर्वीच्या लोकांनीं पूर्वतर संप्रदायानुरूप कर्म केलें असा विशेष प्रपंच मी कां केला त्याचें रहस्य तुला कळेल; अर्थातच हें तत्व समजून तूं तदनुसार वर्तन करूं लागलास म्हणजे तूं या अशुभ व दुःखदायी जन्ममरणापासून मुक्त होशील.

अद्वैतवाद्यांत ऐकमत्य आहे. **प्रपाकारः** 'कर्म=वेदानें सांगितलेलें कर्म; 'अकर्म' = कर्माची समाप्ति, परिपूर्ति करणारें तें नैष्कर्म्य, असे कर्माकर्माचे अर्थ करितात. आचार्यांचाच अर्थ व्यापक आहे म्हणून तो प्रशस्ततर होय. **शंकरानंदः 'तं विदित्वा न लिप्यते कर्मणा पातकेन'** (त्या परमात्म्याचें ज्ञान झालें म्हणजे कर्म हे जात्या बद्धक आहे, तरी तें विद्वानास स्पर्श करित नाहीं.) वगैरे सांगण्याकरितां ह्या श्लोकाची योजना आहे. 'कर्म'=(१) श्रुतिस्मृतिविहित कर्म. (२) चलनवलन, इत्यादि कर्मशब्दाचे अनेक अर्थ देऊन ज्ञानी पुरुषांतही या विषयासंबंधानें घोंटाळा कसा होतो, तें दाखवितात. **द्विवेदींनींही** असेच अनेक अर्थ दिले आहेत; कर्माकर्माची मीमांसा कळली तर कर्म करित असूनही तूं मुक्त होशील असा शंकरानंदाप्रमाणें हेही अर्थ करितात.

रामा० 'कर्म'=मुमुक्षूनें करावयास योग्य तें; 'अकर्म'= कर्त्याला स्वस्वरूपाचें ज्ञान! म्हणजे कर्म व कर्मज्ञान या दोहींचें ज्ञान होऊन दोन्हीं एककालीं असतील तर मोक्ष मिळेल असें म्हणतात. कर्म व ज्ञान हीं दोन्ही एककालीं असूं शकत नाहींत; असें आपलें ठरलेलेंच आहे.

द्वैतवादी दुसऱ्या ओळींतील कर्म शब्दांत कर्मशून्यता व निषिद्ध कर्म यांचाही अंतर्भाव करितात तो नीटच आहे. प्राधान्येंकरून **करावयास** सांगावयाचें आहे म्हणून कर्म शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे.

चतरजी---कर्म=सत्कर्म. **भीमसेनः** कर्माचें प्रसंगानुसार निरनिराळे परिणाम होत असल्यामुळें कर्मशब्दाच्या खऱ्यास्वरूपाविषयीं ज्ञानी लोकांत मतभेद आहे.

ज्ञानेश्वराचा दृष्टांतः--' **जैसें कां कुडें** (खोटें) **नाणें । खऱ्याचेनि-**

सारखेपणें। डोळयाचेचि देखणें (नुसतें डोळ्यानींच पाहिलें तर)। संशयीं घाली ॥

वामन पंडित-पूर्वार्धीं अकळ (न कळण्यासारखें) कर्म अकर्म। म्हणूनि उत्तरार्धीं म्हणतों तें कर्म। तुज सांगेन याचें वर्म।....॥१६॥

न चैतत्त्वया मन्तव्यं, कर्म नाम देहादिचेष्टा लोकप्रसिद्धमकर्म तदक्रिया तूष्णींमासनं किं तत्र बोद्धव्यमिति। कस्मादुच्यते—

शिष्य—कर्म, अकर्म; यांत तें काय फारसें समजून घ्यावयाचें आहे? अहो! देहाकडून आपण ज्या गमनभोजनादिक क्रिया करवितों किंवा त्याकडून होतात, तें कर्म आणि देहास स्वस्थ बसविलें, कांहीं हालचाल करविली नाहीं, तो स्वस्थ असला, म्हणजे त्याचें नांव अकर्म! यांत हो गुरुजी! इतकें समजून तें काय सांगायचें आहे? एखाद्या लहान पोरालासुद्धां कर्म म्हणजे काय तें समजतें!

गुरु—अरे! हा विषय तूं समजतोस इतका सोपा नाहीं.

शिष्य—म्हणजे?

गुरु—भगवान् म्हणतात तें अगोदर निमूटपणें ऐकून घेः—

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः॥
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः॥१७॥

हि (कारण) **कर्मणः अपि** (कर्माच्या, विहित कर्माच्या संबंधानें सुद्धां) **बोद्धव्यं** (सत्य, तत्वज्ञान, समजून घेतलें पाहिजे) **च** (आणि) **विकर्मणः बोद्धव्यं** (निषिद्ध कर्माच्या संबंधानें तात्विकज्ञान करून घेतलें पाहिजे) **च** (आणि,—त्याचप्रमाणें) **अकर्मणः बोद्धव्यं** (कर्मशून्यतेचें रहस्यही अवगत करून घेतलें पाहिजे.) कारण-**कर्मणः गतिः गहना** (कर्माची गति, कर्माचें खरें स्वरूप, आकलन करण्याचें काम अति दुष्कर आहे, कर्माचें रहस्य अत्यंत गूढ आहे.)—सारांश कर्म म्हणजे काय, दुष्कर्म म्हणजे काय, तसेंच

निष्कर्म म्हणजे काय ह्या सर्व गोष्टी मुमुक्षूनें समजून घेतल्याच पाहिजेत. अर्जुना! कर्माचें रहस्य हें फार गूढ आहे. वरवर पाहणाऱ्या मनुष्याच्या बुद्धीस गोचर होण्यासारखा हा विषय नाहीं.—

कर्मण इति । कर्मणः शास्त्रविहितस्य हि यस्मादप्यस्ति बोद्धव्यं बोद्धव्यं चास्त्येव विकर्मणः प्रतिषिद्धस्य तथाऽकर्मणश्च तूर्णींभावस्य बोद्धव्यमस्तीति त्रिष्वप्यध्याहारः कर्तव्यो यस्माद्गहना विषमा दुर्ज्ञाना, कर्मण इत्युपलक्षणार्थं कर्मादीनां कर्माकर्मविकर्मणां गतिर्याथात्म्यं तत्त्वमित्यर्थः ॥ १७ ॥

कारण, अर्जुना! शास्त्रानें सांगितलेल्या, तसेंच शास्त्रानें निषिद्ध केलेल्या, त्याचप्रमाणें उदासीनत्वानें, अभावरूपानें, असणाऱ्या, कर्माचें खरें रहस्य समजून घेतलेंच पाहिजे असा हा विषय आहे. या तीनही गोष्टींमध्यें ' यथार्थज्ञान करून घेतलेंच पाहिजे असा हा विषय आहे ' हे शब्द अध्याहृत घेतलेच पाहिजेत; आणि हे अध्याहृत आहेत म्हणून माझ्या सांगण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. सारांश एकंदरीनें पाहतां हा कर्मांचा म्हणजे सत्कर्म, दुष्कर्म आणि निष्कर्म या सर्वांचा विषय, यांची व्यवस्था, प्रायः प्राकृत बुद्धीच्या लोकांस अगोचरच आहे. कर्माचें खरें स्वरूप, कर्माचें तत्व, समजणें प्रायः दुष्करच होय.

शिष्य—मूळ श्लोकांत तर ' कर्म असाच शब्द आहे, आणि आपण तर कर्म, अकर्म, दुष्कर्म वगैरे सर्वांचा संग्रह करितां हें काय?

गुरु—अरें! ही लक्षणा आहे.—बाजारांत तांदुळाची गाडी रेटली आहे, असें म्हणण्यांत जसा आपण अनेक गाड्यांचा व त्याचप्रमाणें ओझीं वाहून नेणाऱ्या सर्व वाहनांचा अंतर्भाव करितो, तसाच येथें लक्षणेनें कर्मसर्वस्वाचा अंतर्भाव केलेला आहे. समजलें?

अद्वैतवाद्यांत पूर्ण ऐक्यमत्य आहे. प्रपाकारः—' विकर्म '=विनश्वर आहे फल ज्याचें असें संसार उत्पन्न करणारे कर्म. हे टीकाकार ' वेदविहित अनुष्ठानाकडे सात्विक मनासह सर्व ज्ञानकर्मेंद्रियांची प्रवृत्ति '

तिला कर्म असें म्हणतात व त्या कर्माचे विकर्म आणि अकर्म असे दोन विभाग करितात. विनश्वरफल म्हणजे स्वर्गादि सुख वगैरे अनित्य सुख देणारें तें कर्म आणि संन्यासवृत्तीनें मोक्षसुखाची प्राप्ति करून देणारें तें अकर्म होय असें म्हणतात. विकर्म व अकर्म यांचा मार्ग एकच; फक्त फलाची आशा ठेवून कर्म केलें म्हणजे विकर्म होतें, तेंच निर्लोभमनानें केलें तर अकर्म होतें.

द्विवेदी—'कर्म'=जी जी क्रिया आपण करितों ती होय. कर्म=फल उत्पन्न करणाऱ्या कारणांचा समूह. त्याचें तत्व, रहस्य, समजून घेतलें पाहिजे.

रामा०—अनेक प्रकारच्या भिन्न हेतूमुळें भिन्नत्व आलें आहे ज्यास तें विकर्म. 'अकर्म'=ज्ञान. नित्य, नैमित्तिक व काम्य असा कर्माचा त्रिविध भेद होतो, तो टाकून दुसऱ्या अध्यायाच्या ४१ व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें केवळ मोक्षप्राप्तीचाच इष्ट हेतू मनांत ठेवून कर्म करावें असें समजलें पाहिजे.

द्वैतवादी—'विकर्म'=निषिद्धकर्म. यांनीं 'कर्मण:' वगैरे पदांचा कारणाच्या जोरावर पदच्छेद करून 'कर्म न:' 'विकर्म न:' 'अकर्म न:' अशी पदयोजना आणिली आहे, आणि परमेश्वरानें 'अर्जुना! कर्म हें 'न:'=माझ्या ताब्यांत आहे, विकर्म व अकर्म माझ्या स्वाधीन आहेत व म्हणून तीं सर्व मानवांस समजत नाहींत.' असें सांगितलें; हा अर्थ काढितात. परमेश्वरानें स्वत:स 'न:' (आमच्या) असें पद कां योजिलें याची ही व्यवस्था कशीबशी लाविली आहे. असो; हें कां पांडित्याचें प्रदर्शन किंवा द्वैताचा अतिरिक्त अभिमान? काय असावें हें?

चतरजी—कर्म, अकर्म, विकर्म यांचें **खरें रहस्य** समजून घेणें हेंच नीतिमीमांसेचें अति उज्ज्वल स्वरूप होय.

ज्ञानेश्वर—**तरी कर्म म्हणिजे स्वभावें। जेणें विश्वाकार संभवें। तें सम्यक् आधीं जाणावें। लागे येथ ॥** वर्णाश्रमास उचित कर्म त्यास विकर्म व निषिद्ध कर्मास अकर्म असें ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे

पंडित:—'ईश्वरास जीं कर्में अर्पण केलीं जात नाहींत तीं सर्व

बद्धक होतात' असें सांगून, वेदनिषिद्धकर्मास विकर्म असें म्हणतात....
गहन म्हणिजे खोल कीं जे बुडती । ते भूमिका न पावती सुटकेची ॥

गीताव्याख्याकारांनीं या श्लोकावर बरीच मोठी टीका केली आहे व त्यांत कर्माचें स्वरूप म्हणजे कर्म उत्पन्न झालें कोठें, त्याचें अधिष्ठान कोणतें व कर्माचें प्रयोजन काय असावें याचा विचार केला आहे.

भीमसेनासुद्धां सर्व टीकाकारांचा कटाक्ष 'कर्मतत्व' जाणून घेण्याकडे आहे. ब्रह्मविचारांत नीतीच्या मीमांसेला जरी स्थळ मिळणें शक्य नाहीं, तथापि येथें कर्मयोगाचा विचार सुरू आहे म्हणून इतकेंच सुचवावयाचें कीं फलानुरूप व वासनेनुरूप कर्माची किंमत ठरते असें जे पाश्चात्य नीतिकोविदांचें म्हणणें आहे, त्याच्याही पुढें जाऊन 'सत्कर्म म्हणजे नैष्कर्म्यसिद्धि करणारें तेंच कर्म होय कीं जें अहंकार व वासनाविरहित असतें, व ज्याच्या योगानें चित्तशुद्धि होऊन पुढें गुरुप्रसादानें ज्ञान प्राप्त करून घेण्याची योग्यता येते व शेवटीं पूर्णत्व बाणून मोक्ष मिळतो.' अशा सर्वमाननीय तत्वांचा ज्यांनीं व्यूह सिद्ध केला त्याचें वर्णन काय करावें?

किं पुनस्तत्त्वं कर्मादेर्यद्बोद्धव्यं वक्ष्यामीति प्रतिज्ञातमुच्यते–

शिष्य—भगवन्! कर्माचें तत्व काय आहे तें कृपा करून सांगता काय? भगवंतांनींही कर्मतत्व समजून घ्यावें असें सांगितलें आहे व आपणच स्वतः तें तत्व श्रीकृष्ण परमात्मा सांगणार होते; तर माझ्यावर अनुग्रह करून तें तत्व सांगावें.

गुरु—ऐक भगवान काय म्हणतात तें:—

कर्मण्यकर्म यः पश्ये-
दकर्मणि च कर्म यः ॥
स बुद्धिमान्मनुष्येषु
स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

यः (जो पुरुष) **कर्मणि** (कर्मामध्यें) **अकर्म** (कर्मशून्यता) **पश्येत्** (पाहतो) **च** (आणि) **अकर्मणि कर्म** (कर्मशून्यतेमध्यें कर्म पाहतो) **सः** (तो) **मनुष्येषु बुद्धिमान्** (मानव जातीमध्यें अत्यंत बुद्धिमान होय.) **सः युक्तः** (तोच आत्मनिमग्न असतो)—आणि तोच—**कृत्स्नकर्मकृत्** (सर्व कर्में संपादणारा असतो.) सारांश, जो पुरुष कर्मास कर्मशून्यतेच्या दृष्टीनें पाहतो व कर्मशून्यतेस कर्माच्या दृष्टीनें पाहतो, तोच शाहणा, तोच आत्मज्ञानी आणि तोच सर्व कर्मांचा संपादक होतो.

कर्मणीति । कर्मणि कर्म क्रियत इति व्यापारमात्रं तस्मिन्कर्मण्यकर्म कर्माभावं यः पश्येदकर्मणि च कर्माभावे कर्तृतन्त्रत्वात्प्रवृत्तिनिवृत्त्योर्वस्त्वप्राप्यैव हि सर्व एव क्रियाकारकादिव्यवहारोऽविद्याभूमावेव कर्म यः पश्येत्पश्यति स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तो योगी कृत्स्नकर्मकृत्समस्तकर्मकृच्च स इति स्तूयते कर्माकर्मणोरितरेतरदर्शी । ननु किमिदं विरुद्धमुच्यते कर्मण्यकर्म यः पश्येदित्यकर्मणि च कर्मेति । न हि कर्माकर्म स्यादकर्म वा कर्म तत्र विरुद्धं कथं पश्येद्द्रष्टा ॥

जो कांहीं आपल्या हातून व्यापार म्हणून होतो, जी म्हणून क्रिया घडते त्या क्रियेमध्यें जो पुरुष कर्माचा अभाव पाहतो, कर्म होतच नाहीं असें ज्यास दिसतें व जेथें कर्माचा अभाव आहे तेथें जो कर्म आहे असें समजतो, सारांश—

शिष्य—भगवन् क्षमा करा, विषयाच्या काठिण्यामुळें म्हणा किंवा माझ्या मंदबुद्धीमुळें म्हणा, पण मला पहिल्या ओळींचा अर्थ बिलकुल समजला नाहीं. शब्द मी ऐकिले, व लक्ष्य देऊन ऐकिले, पण मला कांहींएक अर्थबोध झाला नाहीं.

गुरु—होय, तुझ्या मुद्रेवरून मलाही असेंच वाटलें खरें. अरे! मोठमोठ्या मी मी म्हणविणाऱ्या पंडितांसही जो विषय गहन आहे व जो ईश्वरी अनुग्रहच झाला तर पूर्णपणानें उमजतो, तो विषय

कठिण आहे हें तर उघड आहे. असो; मी काय सांगतों इकडे नीट लक्ष्य दे, व मी जो प्रश्न विचारीन त्यांचीं नीट उत्तरें दे. हें बघ: ज्याला आपण कर्म म्हणून म्हणतों तें काय आहे?

शिष्य—आपल्याला एखादी वस्तु मिळावयाची आहे ती मिळे-पर्यंत आपल्या हातून जो योग्य व्यापार घडतो तें कर्म होय.

गुरु—ठीक आहे. कर्म करणें हें कर्त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे म्हणजे वस्तु प्राप्त झाली नसेल तर आपण कर्म करावयाचें व प्राप्त झाली असेल तर आपण कर्म करावयाचें नाहीं, असाच तुझ्या म्हणण्याचा अर्थ ना?

शिष्य—होय भगवन्!

गुरु—तर मग प्रवृत्तीमध्यें म्हणजे फल मिळण्यासाठीं कर्म करित असतांना व निवृत्तीमध्यें म्हणजे फल मिळविलें म्हणून कर्म थांबविलें असतां, कर्त्याला 'मी कर्म करित होतों,' 'मी कर्म करण्याचें थांबलों,' असेंच वाटत असतें कीं नाहीं?

शिष्य—होय.

गुरु—तर मग 'मी कर्म करितों' व 'मी कर्म करित नाहीं,' या दोन्ही अनुभवांची स्थिति कर्ममूलकच आहे कीं नाहीं?

शिष्य—मला प्रश्नच समजला नाहीं.

गुरु—'मला वस्तु मिळाली नाहीं, म्हणून मी कर्म करितों' व मला वस्तु मिळाली म्हणून मी कर्म करित नाहीं,' या दोन्ही सकर्मक व अकर्मक वाक्यांमध्यें, मला व मी आणि कर्म हें तीन शब्द प्रमुख आहेत. 'मी वस्तूहून निराळा आहे' असें कर्म करण्याच्या स्थितींत मला वाटतें व 'मी वस्तूहून निराळा होतो पण, आतां मी वस्तूहून निराळा नाहीं' असें मला अकर्माच्या स्थितींत वाटतें, ह्या दोन्ही स्थितींत, भेद दाखविणारा 'मीपणा' व त्याचें ज्ञान म्हणजे अहंप्रत्यय हीं कायमच असतात म्हणजे अज्ञान कायम असतें म्हणून त्या अज्ञानाच्या स्थितींत कर्म, कर्ता, फल इत्यादि सर्व व्यवहार आलेच. सारांश मनुष्य कर्म करो अथवा नकरो, जोंपर्यंत 'मी कर्म करितों' किंवा 'मीं कर्म

करित नाहीं, ' असा अभिमान कायम असतो, तोंपर्यंत त्या त्या पुरुषानें कर्म केलें नाहीं तरी अभिमानरूपी अनुभवाचें कर्म त्याच्या हातून होतच असतें. तेव्हां अभिमानामुळें अकर्मस्थितींत कर्म होतें असें जो पाहतो व वस्तुप्राप्तीसाठीं कर्म होत असतां कर्म होत नाहीं असें जो पाहतो, तोच मनुष्य शाहणा होय, त्याच मनुष्याला आत्मस्थिति स्वस्वरूपानें समजली आणि तोच सर्व कर्मांचा संपादक झाला. समजलास ? येथें कर्मास अकर्म समजणाऱ्या व अकर्मास कर्म समजणाऱ्या पुरुषाची स्तुति केलेली आहे.

शिष्य—आपण पुष्कळ खटपट करून सांगितलें पण कर्म हें अकर्म कसें होतें व अकर्मास कर्माचें स्वरूप कसें येतें, त्याचप्रमाणें ज्ञानी पुरुषास कर्म हें अकर्म कसें दिसतें व अकर्म हें कर्म कसें दिसतें वगैरे विरोधात्मक वाक्यांचा समन्वय माझ्या लक्ष्यांत नाहीं आला !

नन्वकर्मैव परमार्थतः सत्कर्मवदवभासते मूढदृष्टेर्लोकस्य तथा कर्मैवाकर्मवत्तत्र यथाभूतदर्शनार्थमाह भगवान्कर्मण्यकर्म यः पश्येदित्यादि । अतो न विरुद्धम् । बुद्धिमत्त्वाद्युपपत्तेश्च बोद्धव्यमिति च यथाभूतदर्शनमुच्यते । न च विपरीतज्ञानादशुभान्मोक्षणं स्याद्यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभादिति चोक्तम् । तस्मात्कर्माकर्मणी विपर्ययेण गृहीते प्राणिभिस्तद्विपर्ययग्रहणनिवृत्त्यर्थं भगवतो वचनं ' कर्मण्यकर्म यः ' इत्यादि । न चात्र कर्माधिकरणकर्मास्ति कुण्डे बदराणीव नाप्यकर्माधिकरणं कर्मास्ति कर्माभावत्वादकर्मणः । अतो विपरीतगृहीते एव कर्माकर्मणी लौकिकैर्यथा मृगतृष्णिकायामुदकं शुक्तिकायां वा रजतम् ।

गुरु—अरे ! असें पहाः ब्रह्म स्वतः निष्क्रिय आहे कीं, नाहीं ?

शिष्य—होय आहे; मागेंच आपण मला ब्रह्म हें कांहीं करित नाहीं व करवित नाहीं असें सांगितलें आहे.

गुरु—बरें; त्या ब्रह्माच्या ठिकाणीं स्वतःच्या अज्ञानानें कोणत्या

तरी देवतेचा आरोप करून सर्व-कर्ता-करविता-रूपानें ब्रह्मच सक्रिय आहे, असें सामान्य लोक व आत्मज्ञान न झालेले परंतु विद्वान म्हणवून घेणारे लोक सुद्धां समजतात कीं नाहीं?

शिष्य—होय समजतात.

गुरु—त्याचप्रमाणें कर्ममूलक जें द्वैत (मी निराळा, परमेश्वर निराळा, व परमेश्वराच्या अनुग्रहासाठीं मला उपासना केली पाहिजे असें जेथें वाटतें, तें द्वैत) तें **कायम** असतांही परमेश्वरांतच तें द्वैत लीन होत आहे म्हणून कर्ममूलक द्वैतही कर्मशून्य आहे, असें द्वैतवादी व कांहीं विशिष्टाद्वैतवादी वगैरे मानतात कीं नाहीं? सारांश अकर्मक असें जें ब्रह्म त्याचें ठायीं कर्माचा आरोप व सकर्मक जें द्वैत त्यावर अकर्माचा आरोप, हे आपण अज्ञ लोक व्यवहारांत नेहमीं करित असतों, म्हणजे ज्याला तूं विरोध असें समजतोस तसलाच व्यवहार आपण रात्रंदिवस करितच आहोंत कीं नाहीं?

शिष्य—होय, परमार्थदृष्टीनें पाहिलें असतां आपला व्यवहार विरोधात्मकच होतो.

गुरु—त्या विरोधात्मकव्यवहाराचें उदाहरण घेऊन भगवान म्हणतात कीं, कर्माला जो अकर्म किंवा अकर्माला कर्म समजतो तोच शहाणा होय; येथें जसें आहे तसेंच समजून घ्यावें म्हणजे खरी वस्तु-स्थिति समजून घ्यावी म्हणून भगवंतांनीं या श्लोकाचें येथें अवतरण केलें आहे. 'ज्याला तूं रुपें म्हणून समजत होतास तो हा शिंपल्याचा तुकडा पहा' असें ज्याप्रमाणें आपण व्यवहारांत म्हणतों त्याचप्रमाणें 'ज्याला तुम्ही कर्म समजतां तें, कर्म नसून वस्तुतः तो कर्माभाव आहे व ज्याला तुम्हीं कर्माभाव समजतां तो खरा कर्माभाव नसून तें कर्मच आहे' असें स्पष्टपणानें सांगण्याचा भगवंतांचा हेतु आहे.

शिष्य—हा भाग मला समजला. पण अशा पुरुषाला ज्ञानी, योगी व सर्वकर्मकर्ता असें म्हटलें आहे. आतां ब्रह्मव्यतिरिक्त दुसरें जें काय आहे असें दिसतें तें सर्व मायामय आहे; तेव्हां हें मायामय विश्व बाह्यस्वरूपानें मात्र जाणणाऱ्याला 'तोच खरा ज्ञानी,'

'तोच खरा योगी' व 'तोच खरा कर्मठ' असें भगवंतांनीं कसें म्हटलें असावें?

गुरु—हा खुळ्या! अरे! जो ब्रह्माशीं एकरूप होऊन राहिला त्याच्यासंबंधानें हीं विशेषणें लाविलीं आहेत. 'बोध होणें' याचा सर्वत्र सम्यग्दर्शन होणें असाच अर्थ घेतलेला आहे. त्यावरून व मागील श्लोकांत 'जाणून घ्यावें' असा प्रयोग आहे त्यावरून वस्तुस्थितीचाच बोध होतो; आणि वस्तु आहे तशी पाहणें यांत अर्थातच विरोध असणें शक्य नाहीं. शिवाय सर्व विश्वाचा उद्धार करण्यासाठीं अर्जुनाला निमित्तकरून ज्या गीताशास्त्राचा अवतार भगवंतांनीं केला आहे त्यांत विरोधात्मक सिद्धांत ते कसे आणतील? 'मिथ्या ज्ञान अमंगल असून मोक्षापासून परावृत्त करणारें असतें.' असें असतां भगवान विपरीत ज्ञानाचा उल्लेख करणार नाहींत. सोळाव्या श्लोकांतच 'हें कर्माकर्मतत्व तुला सांगतों. तें समजून घेतलेंस म्हणजे तूं अमंगल मायेच्या चक्रापासून मुक्त होशील' अशा अर्थाचें वाक्य प्रथम आणून नंतर कर्ममीमांसेला आरंभ केला आहे त्यावरूनही तूं कल्पिलेल्या विरोधाचा परिहार होतो. तस्मात् कर्माकर्मांवर ज्या अज्ञानाच्या योगानें आपण विपरीत आरोप करितों, तें अज्ञान नाहींसें होऊन सम्यग्ज्ञान व्हावें यासाठींच 'कर्माचे ठायीं अकर्म व अकर्माचें ठायीं कर्म पाहतो' या सिद्धांताचीं योजना केलेली आहे. येथें विरोध नाहीं. शिवाय एखाद्या पेल्यामध्यें ज्याप्रमाणें आपण बदरीचीं फळें ठेवितों तसाही येथें प्रकार नाहीं. कारण अकर्म ह्मणजे कर्माचा अभावच, कर्मशून्यताच, असल्यामुळें कर्म अकर्माचें ठायीं किंवा अकर्म कर्माचें ठायीं वस्तुस्थितीनें असण्याचा संभवच नाहीं. जें मुळींच नाहीं तें एकाद्या वस्तूंत राहतें असें ह्मणणें किंवा त्यांत एखादी वस्तु राहते असें ह्मणणें अज्ञानजन्यच होय. एवंच ज्याप्रमाणें मृगजलाचें ठिकाणीं जल आहे, किंवा शिंपल्याचे ठिकाणीं रुपें आहे, हे अज्ञानजन्य मिथ्याभास अज्ञानी लोकांस होतात, त्याचप्रमाणें कर्मावर अकर्माचा व अकर्मावर कर्माचा, या दोन्ही आरोपांची व्यवस्था व्हावयाची. सारांश हे आरोप मिथ्याच

आहेत. ह्या आरोपांचें निरसन व्हावें व कर्म, व अकर्म ह्मणजे काय हें कळावें ह्मणून भगवंतांनीं ही मीमांसा चालविली आहे. समजलें ?

ननु कर्मैव सर्वेषां न कचिद्व्यभिचरति। तन्न, नौस्थस्य नावि गच्छन्त्यां तटस्थेष्वगतिषु नगेषु प्रतिकूलगतिदर्शनाद्दूरेषु चक्षुषाऽसंनिकृष्टेषु गच्छत्सु गत्यभावदर्शनात्। एवमिहाप्यकर्मण्यहं करोमीति कर्मदर्शनं कर्मणि चाकर्मदर्शनं विपरीतदर्शनं येन तन्निराकरणार्थमुच्यते कर्मण्यकर्म यः पश्येदित्यादि। तदेतदुक्तप्रतिवचनमप्यसकृदत्यन्तविपरीतदर्शनभाविततया मोमुह्यमानो लोकः श्रुतमप्यसकृत्तत्वं विस्मृत्य मिथ्याप्रसङ्गमवतार्यावतार्य चोदयतीति पुनः पुनरुत्तरमाह भगवान्दुर्विज्ञेयत्वं चाऽऽलक्ष्य वस्तुनः। अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयं न जायते म्रियत इत्यादिनाऽऽत्मनि कर्माभावः श्रुतिस्मृतिन्यायप्रसिद्ध उक्तो वक्ष्यमाणश्च। तस्मिन्नात्मनि कर्माभावेऽकर्मणि कर्मविपरीतदर्शनमत्यन्तनिरूढम्।

शिष्य—महाराज! क्षमा असावी. भगवन्! कर्मावर अकर्माचा आरोप होतो हें कसें ? मला समजत नाहीं. मला तर वाटतें कीं जेथें जेथें म्हणून कर्म घडतं आहे, विकार उत्पन्न होत आहे, हालचाल चालली आहे, तेथें तें कर्मच आहे असें सर्वांस ज्ञान होईल. तात्पर्य कर्म तें कर्मच राहील व अकर्म तें अकर्मच राहील.

गुरु—वत्सा! तुझ्या शंका ह्मणजे मृत झालेल्या शतमुखीरावणाच्या रक्तापासून उत्पन्न होणारे अनंत राक्षसच होत! विरोध नाहीं असें तूंच मघाशीं म्हणालास आणि आतां पुनः 'कर्म ते कर्मच राहणार असें ह्मणतोस! तुझी जिज्ञासावृत्ति चांगली आहे व तुला विषय समजून घ्यावा अशी माझी इच्छा आहे म्हणूनच मी तुझ्या याही शंकेकडे वळतो. अरे, अद्यापि तूं विश्वचमत्कार पाहिले नाहींस म्हणून असें बडबडतोस! पण ध्यानांत ठेव कीं खऱ्या शंका काढायला कधींही भिऊं नये, अँ! असो; तूं पुष्कळदां नावेमध्यें बसला असशीलच. आतां नावेमध्यें बसल्यावर—व

अग्नि, विद्युत्, इत्यादिकांच्या साहाय्यानें ती नौका फारच झपाट्यानें चालत असेल तर—किनाऱ्यावर असणारीं झाडें किंवा पर्वत वगैरे चालत नसतांही आपल्यास उलट दिशेनें चालल्यासारखे दिसतात असें पाहिलें आहेस कीं नाहीं ! त्याचप्रमाणें अति अंतरावर चालत असल्यामुळें लांबच्या पाहणारास स्पष्ट न दिसणारे पुरुष, किंवा प्राणी, स्तब्धच उभे राहिले आहेत असाच दृक्प्रत्यय होतोना ? बाळ ! असाच प्रकार कर्माकर्मासंबंधानें घडतो बरें ! कोणतेंही कर्म स्वतः करित नसतांना आपण कर्म करित आहोंत असा भास ज्या अज्ञानानें होतो आणि हें सर्व मायासंघटित दृश्य विश्व एकसारखें कर्म करित असतांही तें स्वस्थ आहे, कर्मशून्य आहे असा मिथ्याभास ज्या अज्ञानाचे योगानें होतो, त्याचें निराकरण करण्यासाठीं 'कर्माचें ठायीं जो अकर्म पाहतो' वगैरे सांगितलें आहे. सारांश आत्मा कर्तृत्व-भोक्तृत्व-शून्य असतांही तो कर्ता व भोक्ता आहे हें अज्ञान व हे त्रिगुणात्मक दृश्य विश्व नित्यचंचल असतांही तें जड आहे, कर्तृत्वशून्य आहे हें अज्ञान, या दोहींचा निरास करून 'कर्म करितो' असें दिसणारा आत्मा निश्चल व निर्विकारी आहे आणि निश्चलस्वरूपानें कर्तृत्वशून्य दिसणारें दृश्यविश्वच वस्तुतः हा सर्व खटाटोप करित आहे या ज्ञानाचा उपदेश करावा म्हणून भगवंतांनीं ह्या श्लोकाचा अवतार केला आहे.

शिष्य—महाराज ! 'आत्मा अकर्ता आहे' हें तत्व सांगावयाचें तरी किती वेळ ! माझे तर कान किटले हें ऐकतां ! दुसऱ्या अध्यायातील २० व्या श्लोकांत, २१ व्या श्लोकांत हाच विषय आहे. आणखी किती वेळ याची पुनरावृत्ति व्हावयाची आहे भगवान जाणें !

गुरु— 'चोराच्या उलट्या आरोळ्या' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. 'आत्मा' अथवा पुरुष कर्ता आहे अशा अर्थाचा शंकासुर तूं आतांच उत्पन्न केला होतास कीं ! असो; तुझ्या सारखे मायापाशांत सांपडलेले अनंत प्राणी अज्ञानसागरांत बुडालेले आहेत; आणि अज्ञान-मूलक प्रचंड लाटांच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें त्या लाटाच त्यांस आणखी खालीं दडपीत आहेत; मिथ्याज्ञान जास्तच दुणावत आहे,

व लोक जास्तच संसारमोहग्रस्त होत आहेत. तेव्हां त्यांना जरी एखाद्या ज्ञानी पानबुड्यानें वर काढून आत्मज्ञानाचें अमृत पाजिलें, तथापि पूर्वजन्य संस्कारांच्या दृढ परिचयानें पुनः पुनः ते लोक सत्य सिद्धांत विसरून जातात व पुनः पुनः अज्ञानरूप उन्मत्तकारी वारुणीचें आकंठ प्राशन करून पुनः पुनः आत्मज्ञानाच्या प्रखर सिद्धांतसूर्यावर उन्माददर्शक अपसिद्धांतांचें ग्रहण उत्पन्न करितात व वेडे वेडे प्रश्न विचारूं लागतात! अर्थांतच भगवंतांसही तितक्या वेळीं उत्तर द्यावें लागतें. अतएव मुख्य सिद्धांतांचा वारंवार अवतार करावा लागतो. शिवाय ब्रह्मज्ञान हें लेकरांच्या गोष्टी नव्हेत कीं एकदां सांगितलें कीं सर्वांस चटदिशीं समजेल. साप चावलेल्या मनुष्यास जसें वरचेवर जागें करावें लागतें, त्याचप्रमाणें मायेनें वेडावलेल्या लोकांसही तेच तेच सिद्धांत सांगून त्यांस शुद्धीवर आणावें लागतें. सारांश पांडित्याचें प्रदर्शन करावें म्हणून ही पुनरावृत्ति नाहीं, तर अत्यंत कठिण विषय सुगम व्हावा म्हणून वारंवार सिद्धांत सांगून त्यांस शुद्धीवर आणावें लागतें. सारांश पांडित्याचें प्रदर्शन करावें म्हणून ही पुनरावृत्ति नाहीं. समजलास? विसाव्या व पंचविसाव्या श्लोकांत सांगितलेल्या तत्वांचा पुढें अनेक वेळीं पुनरुच्चार व्हावयाचा आहे. आत्मारामाचे ठायीं कर्माचा लेशसुद्धां नाहीं असें श्रुति, स्मृति व युक्ति हीं म्हणतात. तेव्हां सर्व प्रामाणिक प्रमाणास संमत जो सिद्धांत आहे तो विसरून जाऊन पुनः पुनः आत्म्याचे ठिकाणीं जो कर्माचा आरोप सार्वत्रिक होतो त्याचें यथास्थित खंडन व्हावें म्हणून पुनरावृत्ति केली आहे.

यतः—' किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ' देहाद्याश्रयं कर्माऽऽत्मन्यध्यारोप्याहं कर्ता ममैतत्कर्म मयाऽस्य फलं भोक्तव्यमिति च । तथाऽहं तूष्णीं भवामि येनाहं निरायासोऽकर्मा सुखी स्यामिति कार्यकरणाश्रयव्यापारोपरमं तत्कृतं च सुखित्वमात्मन्यध्यारोप्य न करोमि किंचित्तूष्णीं सुखमासमित्यभिमन्यते लोकः । तत्रेदं लोकस्य विपरीतदर्शनापन-

यनायाऽऽह भगवान्कर्मण्यकर्म यः पश्येदित्यादि । अत्र च कर्म कर्मैव सत्कार्यकरणाश्रयं कर्मरहितेऽविक्रिय आत्मनि सर्वैरध्यस्तं यतः पण्डितोऽप्यहं करोमीति मन्यते । अत आत्मसमवेततया सर्व लोकप्रसिद्धे कर्मणि नदीकूलस्थेष्विव वृक्षेषु गतिः प्रातिलोम्येनाकर्म कर्माभावं यथाभूतं गत्यभावमिव वृक्षेषु यः पश्येदकर्मणि च कार्यकरणव्यापारोपरमे कर्मवदात्मन्यध्यारोपिते तूष्णीमकुर्वन्सुखमास इत्यहंकाराभिसंधिहेतुत्वात्तस्मिन्नकर्मणि च कर्म यः पश्येत् । य एवं कर्माकर्मविभागज्ञः स बुद्धिमान्पण्डितो मनुष्येषु स युक्तो योगी कृत्स्नकर्मकृच्च सोऽशुभान्मोक्षितः कृतकृत्यो भवतीत्यर्थः ।

शिष्य—महाराज! सर्व लोकांना माझ्यासारखीच अशी भ्रांति पडते?

गुरु—यांत काय संशय! इतकेंच नव्हे, तर मोठमोठाले जाडे पंडित सुद्धां 'कर्म म्हणजे काय, अकर्म कसलें असतें?' वगैरे प्रश्नांच्या वेळीं लटपटून जातात आणि बुद्धि, मन, देह वगैरेंकडून होणारें कर्म निश्चल व निर्विकारी आत्म्यावर लादून 'या कर्माचा मी कर्ता,' 'हें माझें कर्म आहे,' 'याचें फल मलाच मिळालें पाहिजे' असा कंठशोषही करितात! त्यांतल्या त्यांतही ज्यांनीं वेदांत विषयांचीं चार दोन पानें चाळलीं आहेत, असे पंडितंमन्य लोक 'मी आतां स्वस्थ म्हणजे कर्मशून्य होतों, म्हणजे, माझे आयास नष्ट होतील, व मला सुख मिळेल.' असें म्हणून 'विषयांची, बुद्धिसकट मन व इंद्रियांची प्रवृत्ति मीं म्हणजे आत्म्यानें बंद केली, आतां आत्म्यास सुख मिळेल,' असे बिचाऱ्या आत्म्यावर आरोप करित असतात आणि 'आतां मीं कांहीं करणार नाहीं, स्वस्थ सुखाचा उपभोग घेत मी पडेन.' असा खुळ्यासारखा अभिमान बाळगतात! ह्मणून आत्म्यावर कर्माचा आरोप करणें, किंवा मी निष्कर्मी आहे असा

अभिमान बाळगणें, ह्या ज्या अज्ञानी लोकांच्या सामान्य व भ्रामक समजुती, त्या नाहींशा कराव्या एतदर्थ हा श्लोक आहे.

शिष्य—तर हा घोटाळा होतो तरी कसा ?

गुरु—कर्माचें आश्रयस्थान हा आपला प्रकृत्तिनिर्मित देह आहे. मन व बुद्धि तशींच इंद्रियें यांचाही अंतर्भाव देहांतच होतो. असो; कर्म या नात्यानें कर्म करणारी ही देहप्रभृति चौकडी आहे. आपण मात्र त्या त्या कर्माचा आरोप अविकारी आत्म्यावर करित असतो. पंडित ह्मणवून घेणाऱ्यांची सुद्धां हीच स्थिती! ह्मणून कर्माचा व आत्म्याचा विपरीत संबंध जुगवून आत्माच कर्म करितो असें सर्व समजतात, तेथें आत्मा कांहीं करित नाहीं असें जो समजतो व—

शिष्य—गुरुजी! गुरुजी! नदीतीरावर निश्चलत्वानें राहणारे वृक्ष किंवा पर्वत, नावेंतून पूर्वेकडे जाणाऱ्या सामान्य मनुष्यास पश्चिमेकडे जात आहेत असें दिसतें, तो खरा प्रकार नसून वस्तुतः ते निश्चलच आहेत अशी वस्तुस्थिति शहाणा मनुष्य पाहतो त्याचप्रमाणेंचना ?

गुरु—शाबास! बरोबर समजलास! तसेंच '**मी** आपला देह व्यापारशून्य केला असतां म्हणजे **आत्म्याच्या** साहाय्यानें निर्व्यापार झालों असतां, **मी** निर्व्यापार झालों, **मी** स्वस्थ आहें, आतां मी सुखी आहें,' असा अहंकार उत्पन्न झाल्यामुळें 'कांहीं करीत नाहीं, असें समजणारा अभिमानग्रस्त आत्मा' निष्क्रिय आहे असें दिसत असतांनाही जो वस्तुस्थिति ओळखित, नाहीं, म्हणजे अभिमानास वश झाला म्हणून स्वस्थसा दिसणारा आत्माही कर्ता आहे कर्म करीत आहे, असें ज्यास समजतें, तो—

शिष्य—म्हणजे चालणाऱ्या परंतु दूर असल्यामुळें स्तब्धशा दिसणाऱ्या पुरुषाप्रमाणें सकर्मक आहे असेंच ना ?

गुरु—होय, असो; तेव्हां याप्रमाणें कर्म व अकर्म यांचीं लक्षणें जाणून व विशेष ओळखून वस्तुस्थिति जो समजतो, तोच मनुष्य खरा बुद्धिमान्, तोच खरा पंडित, त्यानें योग साध्य केला, त्यालाच सर्व कर्मे

केल्याचें श्रेय येणार आणि तोच या अमंगलमायेच्या चक्रांतून सुटून जाऊन मोक्षाला जाणार अथवा कृतकृत्य होणार बरें! तो मुक्तच आहे, पण व्यावहारिक भाषेनें सांगणें अवश्य ह्मणून या तऱ्हेनें सांगितलें.

अयं श्लोकोऽन्यथा व्याख्यातः कैश्चित्, कथं, नित्यानां किल कर्मणामीश्वरार्थेऽनुष्ठीयमानानां तत्फलाभावादकर्माणि तान्युच्यन्ते गौण्या वृत्त्या । तेषां चाकरणमकर्म तच्च प्रत्यवायफलत्वात्कर्मोच्यते गौण्यैव वृत्त्या । तत्र नित्ये कर्मण्यकर्म यः पश्येत्फलाभावाद्यथा धेनुरपि गौरगौरुच्यते क्षीराख्यं फलं न प्रयच्छतीति तद्वत् । तथा नित्याकरणे त्वकर्मणि कर्म यः पश्येन्नरकादिप्रत्यवायफलं प्रयच्छतीति । नैतद्युक्तं व्याख्यानमेवंज्ञानादशुभान्मोक्षानुपपत्तेर्यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभादिति भगवतोक्तं वचनं बाध्येत । कथं, नित्यानामनुष्ठानादशुभात्स्यान्नाम मोक्षणं न तु तेषां फलाभावज्ञानात् । न हि नित्यानां फलाभावज्ञानमशुभमुक्तिफलत्वेन चोदितं नित्यकर्मज्ञानं वा । न च भगवतैवेहोक्तम् ।

शिष्य—भगवन्! माझ्या मनांत कांहीं आलें आहे, तें बोलूं?

गुरु—हँ! खुशाल बोल.

शिष्य—ह्मणजे या श्लोकाचा अर्थ निराळ्याच तऱ्हेनें लावावा, असें माझ्या मनांत येत आहे. पण—

गुरु—पणबिण नको, स्वच्छ मनानें सांग काय वाटतें आहे तुला तें.

शिष्य—आपण जीं आवश्यक अशीं स्नानसंध्यावंदनादि कर्मे करितों, तीं जर आपण परमेश्वराला अर्पण केलीं तर अर्थातच तीं कर्त्याच्या स्वतःच्या संबंधानें फलशून्य होतात. तेव्हां हीं कर्मे फलशून्य म्हणजे कर्मशून्य आहेत, अकर्मकच आहेत असें लाक्षणिक रीतीनें समजावें. आतां आपल्यास आवश्यक रीतीनें करावयास

लागणारीं जीं हीं नित्य कर्में हीं जर आपण केलीं नाहींत तर त्या ह्या न करण्यापासून पाप उत्पन्न होतें, सारांश या अकरणापासून कर्म उत्पन्न होतें, तेव्हां त्यास लक्षणेनें कर्म असें ह्मणावें. सारांश दुग्ध-नामक फल न देणाऱ्या गाईस ज्याप्रमाणें 'ती गाय नव्हे' असें आपण ह्मणतों त्याचप्रमाणें परमेश्वरार्पित आणि ह्मणून फल न देणाऱ्या नित्य कर्मास अकर्म असें ह्मणावें व नरक वगैरे दुःखदायक फल देणारें जें नित्य कर्माचें अकरण (न करणें) त्यास कर्म म्हणावें, अर्थात नित्य कर्मास अकर्म म्हणावयाचें व नित्य कर्म केलें नाहीं तर त्यास कर्म ह्मणावयाचें, असा माझा अर्थ आहे व असा अर्थ कांहीं पंडितांनीं केलाही आहे.

गुरुजी—ते पंडितही चुकले आणि त्यांचाच भाऊ तो तूंही चुकत आहेस. कारण असें पहा कीं, 'हें कर्माकर्माचें योग्य **ज्ञान** तुला झालें तर अर्जुना! 'तूं अमंगल मायाचक्रांतून सुटशील' असें जें भगवंताचें वचन आहे त्याला बाध येतो. नित्यकर्म हें अकर्म आणि नित्य कर्माचें अकरण हें कर्म, असें ज्ञान तुझ्या या लांबलचक व्याख्यानानें झालें तरी त्यापासून मोक्षप्राप्ती कशी होणार ? आत्मा कर्तृत्वभोक्तृत्वशून्य आहे, असें ज्ञान झाल्याखेरीज मोक्ष नाहीं; तुझ्या पांडित्यप्रदर्शनांत ह्या आवश्यक ज्ञानाला कोठें जागा नाहीं, तेव्हां अर्थात या तुझ्या ज्ञानानें मोक्ष नाहीं. सारांश भगवंताच्या बोलण्यास हरताळ लावावयाचा नसेल तर तुझें भाष्य सफाई चुकलें.

शिष्य–असें कसें ? '**धर्मेण पापमपनुदति**' (धर्माचरणानें पापक्षय होतो) अशी श्रुति आहेना ?

गुरुजी–अरे होय ! म्हणजे नित्यकर्मांचें **अनुष्ठान** परमेश्वरप्रीत्यर्थ केलें असतां कदाचित् पापापासून आपण दूर होऊं, मायाचक्रांतून सुटूं; हें गृहीत घेतलें तरी पण नित्यकर्म फलशून्य आहे, असें नुसतें ज्ञानच करून घेतलें तर पापक्षय होईल काय ? कधींही होणार नाहीं. पापक्षय होण्याला कर्माचें अनुष्ठानच केलें पाहिजे. शिवाय 'नित्यकर्माला फलप्राप्ति नाहीं' असें ज्ञान झालें किंवा 'नित्यकर्म

केलें नाहीं तर कर्म उत्पन्न होतें ' याचें ज्ञान असलें म्हणजे दुःखाची निवृत्ति होते, पापक्षय होतो असें कोठेंही सांगितलें नाहीं. भगवंतांनींही असा सिद्धांत सांगितला नाहीं. कर्म व अकर्म यांचें खरें स्वरूप समजलें व ब्रह्म व आत्मा एकच आहेत असें ज्ञान झालें, तर मोक्ष मिळेल असा त्यांचा सिद्धांत आहे व तो ब्रह्मपर अर्थ लावल्यानें मात्र सिद्ध होत आहे.

एतेनाकर्मणि कर्मदर्शनं प्रत्युक्तम् । न ह्यकर्माणि कर्मेति दर्शनं कर्तव्यतयेह चोद्यते, नित्यस्य तु कर्तव्यतामात्रम् । न चाकरणान्नित्यस्य प्रत्यवायो भवतीति विज्ञानात्किंचित्फलं स्यात् । नापि नित्याकरणं ज्ञेयत्वेन चोदितम् । नापि कर्माकर्मेति मिथ्यादर्शनादशुभान्मोक्षणं बुद्धिमत्त्वं युक्तता कृत्स्नकर्मकृत्त्वादि च फलमुपपद्यते स्तुतिर्वा । मिथ्याज्ञानमेव हि साक्षादशुभरूपं कुतोऽन्यस्मादशुभान्मोक्षणं, न हि तमस्तमसो निवर्तकं भवति ।

मागें सांगितलेल्या न्यायानेंच नित्यकर्म केलें नाहीं, तर कर्म उत्पन्न होतें ' ह्याचीही व्यवस्था लागते म्हणजे हेंही सांगण्याचा भगवंताचा उद्देश नव्हता असें सिद्ध होतें. कारण या गीताशास्त्रांत असेंही सांगितलें नाहीं कीं, नित्यकर्माचें अकरण हें कर्मोत्पादक आहे असें समजून मात्र घ्यावें. नित्यकर्में आपण केलीं पाहिजेत असें सांगितलें आहे पण नित्यकर्माचें अकरण कर्मोत्पादी आहे तें समजून घेतलें पाहिजे असें येथें सांगितलें नाहीं. शिवाय नित्यकर्म केलें नाहीं तर अनेक प्रकारचीं मोक्षापहारीं विघ्नें निर्माण होतात, असें ज्ञान झालें तर फलप्राप्ति काय होणार ?

शिष्य—काय म्हणजे परंपरेनें मोक्ष मिळणार, निदान नित्यकर्में करण्याची स्फूर्ति होणार.

गुरु—हा विचार ठीक आहे; पण ' अकर्म हें वस्तुतः कर्म आहे ' हें कळलें तर ' मोक्ष मिळेल ' असें भगवंतांनीं सांगितलें आहे त्याचा व तुझ्या या नित्यकर्माच्या अभावीं कर्म उत्पन्न होतें, याचा काय

संबंध? कांहीं नाहीं. तसेंच नित्यकर्माचें अकरण पापजनक आहे हें समजून घ्यावें, असेंही येथें सांगितलें नाहीं.

शिष्य–पण कर्म हें अकर्म आहे व अकर्म हें कर्म आहे, असें ज्ञान झालें म्हणजे मोक्ष मिळतो असे सांगितलें आहे व तसें ज्ञान कर्मठांस होत आहे तेव्हां त्यांचाच अर्थ खरा असावा.

गुरु—होय! जेव्हां आपण पाहतों या सूर्यापासून अंधकाराची उत्पत्ति होईल तेव्हां तुझा अर्थही खरा होईल. खुळ्या! वास्तविक रीतीनें जें कर्म आहे, जेथें क्रिया होते, कांहीं तरी विकार उत्पन्न होतो, तेथें क्रिया होत नाहीं, विकार होत नाहीं, तें कर्म नव्हे' असें मिथ्या, अवास्तविक, ज्ञान झालें तर कधीं तरी या ज्ञानशून्य ज्ञानाभासानें मोक्ष मिळेल काय? असल्या अज्ञानी मनुष्याला भगवान कधीं तरी बुद्धिवंत असें विशेषण देतील काय? असल्या खोट्या ज्ञानानें कधीं आत्मारामीं चित्त संलग्न होऊन तद्रूप होईल काय? आणि असला ज्ञानपूज्य पंडितंमन्य केव्हां तरी कृतार्थ, कृतकृत्य, होईल काय? असें होणेंच नाहीं, समजलास? तात्पर्य हें लक्ष्यांत ठेव कीं कर्म होतें तें देहाकडून होतें, आत्मारामाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं, तो **अकर्ता** आहे, आणि '**माझा** आत्मा निश्चल आहे, **मी** आतां सुख भोगीन,' हें अहंममतापूर्वक आत्म्याचें स्वरूप समजणें हें **कर्मच** आहे असें ज्यास ज्ञान होतें व अनुभव येतो, त्या पुरुषाला मात्र सर्व विशेषणें योग्य होतात व त्याची स्तुति भगवंतांनीं केली ती यथार्थही आहे. समजलास? वेड्या! खोटें ज्ञान हेंच जात्या अमंगळस्वरूपीं आहे, तर तें दुसऱ्या अमंगळाचा विनाश करून आपल्यास सर्वतोपरी शुद्धस्वरूपीं करील अशी वेडी कल्पना तुझ्या डोक्यांत शिरली तरी कशी! बेट्या! अंधकारानें अंधकाराचा नाश केला असें कधीं ऐकलें आहेस?

ननु कर्मणि यदकर्मदर्शनमकर्माणि वा कर्मदर्शनं न तन्मिथ्याज्ञानं किं तर्हि गौणं फलभावाभावनिमित्तम्। न कर्माकर्मविज्ञानादपि गौणात्फलस्याश्रवणात्। नापि श्रुतहान्यश्रुतपरिकल्पनया कश्चिद्विशेषो लभ्यते। स्वशब्देनापि शक्यं वक्तुं

नित्यकर्मणां फलं नास्त्यकरणाच्च तेषां नरकपातः स्यादिति तत्र व्याजेन परव्यामोहरूपेण कर्मण्यकर्म यः पश्येदित्यादिना किम्। तत्रैवं व्याचक्षाणेन भगवतोक्तं वाक्यं लोकव्यामोहार्थमिति व्यक्तं कल्पितं स्यात्। न चैतच्छद्मरूपेण वाक्येन रक्षणीयं वस्तु, नापि शब्दान्तरेण पुनः पुनरुच्यमानं सुबोधं स्यादित्येवं वक्तुं युक्तम्। कर्मण्येवाधिकारस्त इत्यत्र हि स्फुटतर उक्तोऽर्थो न पुनर्वक्तव्यो भवति। सर्वत्र च प्रशस्तं बोद्धव्यं च कर्तव्यमेव न निष्प्रयोजनं बोद्धव्यमित्युच्यते।

शिष्य—कृपा करून रागावू नये, भगवन्! आपण ह्मणतां तशी वस्तुस्थिति आहे असें मला वाटत नाहीं. 'हें घे रुपें' असें एकाद्यानें शिंपल्याचा तुकडा घेऊन दुसऱ्यास तो देण्यास आरंभ केला तर आपण म्हणतां तें अज्ञान उपपन्न होईल. या कर्माकर्माच्या मीमांसेंत कर्मास अकर्म किंवा अकर्मास कर्म असें मी अज्ञानानें म्हणत नाहीं. कर्माला अकर्म म्हणण्याला, आलंकारिक पद्धतीनें ह्मणण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं असें माझें म्हणणें आहे. फल मिळत नाहीं ह्मणून केलेलें कर्मही अकर्मतुल्य आहे व फल मिळतें ह्मणून अकर्मही कर्मतुल्य आहे असें भगवंतांनीं आलंकारिक भाषणानें सांगितलें आहे, असें मला वाटतें.

गुरु—नाहीं. येथें अलंकार नाहीं. शिवाय तूं म्हणतोस तसल्या आलंकारिक पद्धतीनें कर्म व अकर्म याचें ज्ञान झालें तर 'कांहीं फल मिळेल' असें श्रुतीनें कोठेंही सांगितलें नाहीं. आलंकारिक अर्थ घेऊन नित्य कर्माचें आचरण करावें' असें सांगण्याचा भगवंताचा हेतूही नाहीं. कर्म म्हणजे काय? अकर्म म्हणजे काय? यांचें ज्ञान करून घ्यावें असें भगवंतास सांगावयाचें आहे. तेव्हां मूळग्रंथांत स्पष्ट शब्दांनीं सांगितलेलें ज्ञानाचें फल जो मोक्ष तो सोडून देऊन, जें कर्माचें अनुष्ठान कधींच सांगितलें नाहीं व शब्दावरून जें स्पष्ट होत नाहीं, त्याची फुकट कल्पना करावयाची, सारांश उघड दिसणारा अर्थ सोडून देऊन भलताच व अप्रस्तुत अर्थ स्वीकृत करावयाचा यापासून लभ्यांश तरी कांहीं आहे? मुख्यार्थ सिद्ध होत असतां आलंकारिक अर्थ करणें असमंजस होय.

शिष्य---पण गौणार्थ कां करूं नये?

गूरु---अरे! मुख्य अर्थ स्पष्ट, समंजस व सुसंबद्ध असतां दुसराच अप्रस्तुत अर्थ ओढून काढून तंडत बसतोस याला काय म्हणावें? शिवाय नित्य कर्मांचें आचरण फलशून्य असतें व तीं कर्में केलीं नाहींत तर मनुष्य नरकास जातो. 'असें स्पष्ट शब्दांनीं भगवंतास सांगतां येत नव्हतें कीं काय? आणि सांगतां येत नव्हतें ह्मणून आलंकारिक शब्दांनीं व दुसऱ्यास मोह पडेल, लोक बुचकळ्यांत पडतील अशा अस्पष्ट शब्दांनीं भगवंतांनीं आपला कर्मानुष्ठानाचा गुप्त अर्थ प्रकट केला होय? मुख्यशब्दांनीं प्रकट करितां येणारा अर्थ 'अकर्म=फलशून्यता' व कर्म=पापनिष्पत्ति ' अशा आलंकारिक द्राविडीप्राणायामानें भगवंतांनीं प्रकट करून लोकांस बुचकळ्यांत पाडण्याची तयारी केली आहे, असें ह्मणतांना तुझी जिव्हां चळली कशी नाहीं? तुझ्या कर्मठ समजुतीप्रमाणें भगवान बोलले अशी कल्पना केली तर भतवंताचा उद्देश लोकांस मोहाच्या जाळ्यांत अडकवावें असा आहे हें स्पष्ट होईल.

शिष्य--भलत्यासलत्याच्या हातीं हें रहस्य लागूं नये ह्मणून त्यांनीं अशी आलंकारिक शब्दयोजना केली असावी.

गुरु--वेड्या! ' प्रत्येकानें आपापलें नित्य कर्तव्य अवश्य करावें, नाहीं तर पापाची जोड होईल. ' हा सिद्धांत सांगण्याला कपटयोजना कशाला रे! पाहिजे? गुप्त रहस्य सर्वतोमुखीं झालें असतां कांहीं अनर्थ उत्पन्न होईल अशी भीति असती तर तुझ्या मताप्रमाणें रहस्य रक्षण करण्याकारितां लपंडाव योग्य होता. या सिद्धांतापासून तसली कांहीं भीति स्वप्नांतसुद्धां उत्पन्न होण्याचा संभव नाहीं, तेव्हां येथें मोहकारी शब्दयोजना आहे, असें समजणें अत्यंत असमंजस होय?

शिष्य—एकच सिद्धांत भिन्न तऱ्हेनें व भिन्न भिन्न शब्दांनीं सांगितला असतां तो विशेष सुगम होतो असा अनुभव आहेना?

गुरु—होय आहे. पण 'तुझा अधिकार कर्म करण्याचा मात्र आहे, फलाकडे दृष्टि ठेवण्याचा नाहीं.' असें दुसऱ्या अध्यायाच्या ४७ वे श्लोकांत अत्यंत उघड, अत्यंत सुगम, अत्यंत स्पष्ट शब्दांनीं सांगि-

तल्यावर ह्या सहज समजणाऱ्या सिद्धांताची फोड करण्याची कोठें गरज राहीली! सारांश येथें आलंकारिक भाषण लोकांस घोटाळ्यांत घालणारें म्हणून असमंजस व ' स्पष्टीकरणार्थ भाषण ' अनावश्यक होय. कोठेंही पाहिलेंस, धर्मग्रंथांत पहा किंवा व्यवहरांत पहा, तरी तुला असें दिसेल कीं जें कांहीं इष्ट असेल तें जाणावें, किंवा आपलें कर्तव्य जें काय असेल तें जाणावें, असाच उपदेश केलेला आहे. कारण नसतांना, उगीच, ' कावळ्याचे दांत किती आहेत तें पहा, ' अशी आज्ञा केल्याचें तुला शास्त्रांत किंवा सद्व्यवहारांत कोठेंही दिसावयाचें नाहीं. कर्म असतांना त्याला अकर्म म्हणणें हें जाणणें इष्टही नाहीं, किंवा कर्मांत करावयासही कांहीं सांगितलें नाहीं, म्हणून तें जाणावें असें सांगण्याचेंही प्रयोजन नाहीं.

न च मिथ्याज्ञानं बोद्धव्यं भवति तत्प्रत्युपख्यापितं वा वस्त्वाभासम् । नापि नित्यानामकरणादभावात्प्रत्यवायभावोत्पत्तिर्नासतो विद्यते भाव इति वचनात्कथमसतः सज्जायेतेति च दर्शितम् । असतः सज्जन्मप्रतिषेधादसतः सदुत्पत्तिं ब्रुवताऽसदेव सद्भवेत्सच्चासद्भवेदित्युक्तं स्यात् । तच्चायुक्तं सर्वप्रमाणविरोधात् । न च निष्फलं विदध्यात्कर्म शास्त्रं दुःखस्वरूपत्वाद्दुःखस्य च बुद्धिपूर्वकतया कार्यत्वानुपपत्तेः । तदकरणे च नरकपाताभ्युपगमेऽनर्थायैवोभयथाऽपि करणेऽकरणे च शास्त्रं निष्फलं कल्पितं स्यात् । स्वाभ्युपगमविरोधश्च नित्यं निष्फलं कर्मेत्यभ्युपगम्य मोक्षफलायेति ब्रुवतः । तस्माद्यथाश्रुत एवार्थः कर्मण्यकर्म य इत्यादेः । तथा च व्याख्यातोऽस्माभिः श्लोकः ॥ १८ ॥

तुझ्या मताप्रमाणें आलंकारिक अर्थाचा विचार झाला. ह्याचप्रमाणें मिथ्याज्ञान किंवा त्यापासून उत्पन्न होणाऱ्या आभासरूपी वस्तु, यांतही ' समजून घ्या ' असें सांगण्याचें कारण नाहीं. जें मुळींच मिथ्या तें किंवा त्यापासून उत्पन्न झाल्यासारखे दिसणारे पदार्थ मुळींच नस-

त्यामुळें ते समजून तरी घ्यावयाचें कसें ? अध्यात्मशास्त्रांत कर्म हेंच जर मिथ्या आहे तर तें कशाला समजून घ्यावयाचें ?

शिष्य—पण महाराज ! हेंच ' मिथ्या ' असणारें कर्म केलें नाहीं, तर नरकाची भीति आहेना ?

गुरु—दुसऱ्या अध्यायाच्या १६ व्या श्लोकांत केलेलें यथास्थित विवरण विसरलास वाटतें इतक्यांत ! ब्रह्मज्ञाला नित्य कर्माचें अकरण हें जात्या अभावस्वरूपी. तेव्हां त्याच्या पासून भावरूपी नरक किंवा दुसरे प्रत्यवाय कसे उत्पन्न होऊं शकतील ? ' असतापासून सत् कसें होईल, व सताचें असत् कसें होईल ' वगैरेचा विचार त्याच श्लोकांत सविस्तर केला आहे. तेव्हां असतापासून सत् कधींही उत्पन्न व्हावयाचें नाहीं, शून्यापासून कधींही संख्या निर्माण व्हावयाच्या नाहींत, असें भगवंतांनीं स्पष्ट सांगतलें असतांही येथें तेच भगवान ' असतापासून सत् उत्पन्न होतें ' असें म्यणतील तर ' असतच सत् होऊं शकतें व सत् असत् होऊं शकतें ' असें म्हणण्यासारखें होऊन तें म्हणणें अयोग्य, अयुक्तिक, असंबद्ध व विरोधात्मक होईल. एवंच असताचें सत् किंवा सताचें असत् होणें शक्य नाहीं, शिवाय आत्मदृष्टीनें, निरहंकारतेनें पाहिलें असतां, दुःख हेंच आहे ज्याचें स्वरूप व परिणाम, असें कर्म करण्यास शास्त्र कधींही सांगणार नाहीं, किंवा शास्त्रानें विहित असलें, तथापि तें कोणी करणारही नाहीं. कारण दुःख उत्पन्न होईल असें कृत्य करण्यास जाणून बुजून कोणी तयारच व्हावयाचा नाहीं. सारांश दुःखस्वरूपी कर्म करण्यास सांगणें किंवा कोणी करील अशी आशा करणें व्यर्थ होय.

शिष्य—नित्य कर्म केलें नाहीं तर नरकामध्यें जाण्याची भीति आहेना ? पुढें कांहीं अनिष्ट होऊं नये म्हणून आज होणारें दुःख भोगण्यास कांहीं हरकत नाहीं.

गुरु—तात्पर्य ज्याला तुम्ही फलशून्य म्हणतां असें नित्य कर्म केलें तर तें करितांनाच दुःख होत असतें, न केलें तर नरकामध्यें

जाण्याची भीति असते! सारांश दोन्हीकडूनही अनर्थप्राप्तीच होते. असें दोन्हीकडूनही 'दुःख देणारें कर्म करावयास लावणारें शास्त्र व्यर्थच झालें म्हणावयाचें; कारण सर्वतोपरी दुःख देणाऱ्या शास्त्राला जुमानील कोण?

शिष्य—दुःख होत असलें, किंवा दुसरें तिसरें कांहीं नसलें तरी हें नित्यकर्म मोक्षाचें साधन होत असतें म्हणून नित्यकर्म केलेंच पाहिजे.

गुरुजी—हँ! असा शुद्धीवर ये बाबा! आतां मोक्षाचें साधनच आहे म्हणून नित्यकर्म अवश्य करावें, सारांश मोक्ष उत्पन्न करून देणें हें नित्यकर्माचरणाचें फल आहे तेव्हां नित्यकर्म करावें, असेंच ना तुझें म्हणणें?

शिष्य—होय असेंच.

गुरुजी—म्हणजे नित्यकर्म फलद्रुप झालें ना? आठवण कर बरें, पहिल्यांदा तूं काय म्हणलास तें. परमेश्वरार्पित नित्यकर्म फलवंत होत नाहीं म्हणून तेंच 'अकर्म' असें समजूं या. हीच तुझी प्रतिज्ञा होती, नव्हे? बाबा! शब्दाचा अर्थ भलता करूं लागले. म्हणजे सर्व पांडित्य असंबद्ध, असमंजस आणि अप्रबुद्ध होत असतें, हें ध्यानांत ठेव. असो; आचार्य म्हणतातः शब्दापासून सहजगतीनें जो अर्थ निष्पन्न होईल असाच या श्लोकाचा अर्थ करावा. आम्ही जो अर्थ केला आहे तोच शब्दनिष्ठ अर्थ आहे व त्या शब्दनिष्ठ अर्थानुसारच आम्ही व्याख्यानही केलें आहे.

मधुसूदनीकार—आचार्यानुसारी आहेत. 'अहंकार शून्य व वासना शून्य कर्म तें अकर्म आणि साहंकार आणि वासनासहित असणारें अकर्म कर्म होतें असा दोहोंमध्यें विशेष आहे.' दुसरा असा अर्थ करितातः 'सर्वच ब्रह्ममय झाल्यानें ज्याला कर्मही ब्रह्म (अकर्म) दिसूं लागलें व त्या ब्रह्मावर आरोपित केलेलें कर्म भ्रांतिमय आहे असें ज्याला वाटूं लागलें, तो बुद्धिमान् होय.

श्रीधरांनीं केलेले व्याख्यानाचें खंडन आचार्यांनीं श्रीधर स्वामींच्या अगोदरच कैक शतकें केलें आहे! हें खंडन आचार्यांच्या या श्लोका-

वरील भाष्याच्या उत्तरार्धात सांपडेल. स्वामींनीं दुसरा अर्थ आचार्यमतानुसारच केला आहे.

प्रपा०—'वेदविहित कर्म तें अकर्म आहे आणि वेदप्रतिषिद्ध अकर्म तें कर्म आहे असें जो पहातो, तो बुद्धिमान् वगैरे.' शंकरानंद आचार्यांचा अर्थ घेऊन मधुसूदनीकारांचाही घेतात आणि दुसऱ्या अर्थाच्या साहाय्यानें 'कर्मतत्वाचें ज्ञान झालें असतां मोक्ष कसा मिळेल; आत्मज्ञानानें मात्र मोक्ष मिळतो' या शंकेचें समाधान करून सर्वच ब्रह्म पाहणारा मनुष्य बुद्धिवंत, विद्यावंत, व योगवंत असें ठरवितात.

पर्वते—श्रीधरस्वामीचें अनुकरण करून पुनः आचार्यांच्या अर्थास धरून टीका करतात.

द्विवेदीः—आचार्यांचे अनुयायी आहेत. 'कर्म'=नित्यकर्म असा अर्थ करणाऱ्या श्रीधरस्वामी पर्वते, वगैरेस हे पंडित विचारतात कीं सर्व प्रकारच्या कर्मांची मीमांसा चालली असतां भगवान केवळ नित्यकर्माविषयींच बोलतील काय?'

चतरजी—परमात्मा नित्य, बुद्ध, शुद्ध आणि मुक्त आहे म्हणून तो निष्कर्म आहे. आत्मा हाच परमात्मा असा दृढ निश्चय झाला व तसा अनुभव आला म्हणजे आत्म्याचें कर्तव्य संपतें. सारांश कर्म करणें हा प्रकृतीचा धर्म आहे. 'मी कार्य करित नाहीं' अशा प्रकारचें भान असणें हें एक कर्मच आहे! तेव्हां आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसरें कोणतेंही भान नसणें म्हणजे परमात्मस्वरूपाशीं तादात्म्य पावणें होय. हा श्लोक नीतिपर नाहीं, तादात्म्यपर आहे. कर्माचा व आत्मस्वरूपाचा कांहींएक संबंध नाहीं हें येथें सांगावयाचें आहे.

रामा०—आत्मस्वरूपाचें ज्ञान झाल्यामुळें ज्याला सर्व कर्म ज्ञानाकारच भासतें आणि सर्व ज्ञान कर्मामध्यें अंतर्भूत असल्यामुळें तें ज्ञान कर्माकार भासतें तोच शहाणा होय.

द्वैतवादी—'परमात्मा जो विष्णु त्याचें मी प्रतिबिंब आहें, मला स्वातंत्र्य नाहीं; म्हणून मी जें काय कर्म करितों, तें अकर्मच होय; कारण परमेश्वरानें तें कर्म केलें आहे. तसेंच मी निजलों असतां,

कर्म करित नसतांनाही कर्म म्हणजे ईश्वराची उत्पत्तिस्थितिलयाची व्यवस्था चाललेलीच असते. सारांश 'माझें असें कांहींएक कर्म नसून परमेश्वरच सर्व कर्ताकरविता आहे.' असें जो पाहतो व ईश्वरनियमानुसारें स्वकर्म करितो, तोच शहाणा होय. यावरून धर्मशास्त्राप्रमाणें कर्म करणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य होय. अथवा कर्म म्हणजे जीव आणि अकर्म म्हणजे परमेश्वर असें समजून जीवाकडे कर्तृत्व नाहीं, परमेश्वराकडे आहे, असें जो पाहतो, तोच बुद्धिमान होय.

ज्ञानेश्वर—जो सकळ कर्मी वर्तता। देखे आपुली नैष्कर्म्यता। कर्मसंगें निराशता (निरिच्छपणा) **फळाचिया। .... जैसा कां जळापाशीं उभा ठाके। तो जरी आपणपें जळामाजी देखे। तरी तो निभ्रांत वोळखे। म्हणे मी वेगळा आहे॥ अथवा नावे** (नौकेंत) **रुन** (हीं ?) **जो रिघे। तो थडियेचे रुख** (वृक्ष) **जातां देखे वेगें। तेचि साचोकारें** (खरें) **पाहो जों लागे। तों रुख म्हणे अचळ!॥ .... आणि उदो** (उदय) **अस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चालतां सूर्याचें चालणें!। तैसें नैष्कर्म्यतत्व जाणें। कर्मीच असतां॥** आणखीही सुंदर दृष्टांत आहेत, पण विस्ताराचें भय वाटून घेतले नाहींत. सूर्य चालत नसून चालतो आहेसा दिसतो, हा सिद्धांत गॅलिलियोचे पूर्वीं सुमारें तीनशें वर्षें आपल्या इकडे प्रचलित होतांना?

पंडितांनीं व रंगनाथांनीं 'ज्ञानपूर्वक ईश्वरार्पण केलें असतां शास्त्रोक्त निष्काम व निरहंकार कर्मास कर्मशून्यत्व येतें' असा या श्लोकाचा अर्थ करून ज्ञानी पुरुषानें वेदोक्तकर्माचें आचरण केलें पाहिजे असें ध्वनित केलें आहे.

गीताव्याख्याकारः—**पार्था! मीपण सांडितां। कर्ता कर्म एकात्मता। तेथें अकर्म शब्दाची वार्ता। उरली कोठें?**

भीमशर्मा—लाभ झाला असतां हानि होईल असें जो जाणतो तोच शहाणा होय. ॥ १८ ॥

तदेतत्कर्मण्यकर्मादिदर्शनं स्तूयते—

या मिथ्याकर्माला कर्मशून्यदृष्टीनें, ब्रह्मदृष्टीनें, पाहणारांची स्तुति करितात.

यस्य सर्वे समारम्भाः
कामसंकल्पवर्जिताः ॥
ज्ञानाग्निदग्धकर्माणं
तमाहुः पण्डितं बुधाः ॥ १९ ॥

यस्य (ज्या पुरुषाचीं) **सर्वे समारम्भाः** (सर्व कर्मे) **कामसंकल्पवर्जिताः** (अहंकार आणि आशा–वासना–इहींकरून वर्जित असतात) **ज्ञानाग्निदग्धकर्माणं** (ज्ञानरूपी अग्नीकरवीं दग्ध झालीं आहेत, भस्म झालीं आहेत, कर्में ज्या पुरुषाची) **तं** (त्या पुरुषाला) **पण्डितं** (पंडित असें) **बुधाः** (शहाणे लोक) **आहुः** (म्हणतात.)–सारांश जो पुरुष निरहंकारतेनें व निर्लोभमनानें सर्व कर्में करितो आणि ज्ञानस्वरूपी अग्नीच्या योगानें आपल्या कर्माचें भस्मही करून टाकितो त्यालाच बुद्धिवंत लोक पंडित असें म्हणतात.

यस्येति । यस्य यथोक्तदर्शिनः सर्वे यावन्तः समारम्भाः कर्माणि समारभ्यन्त इति समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः कामैस्तत्कारणैश्च संकल्पैर्वर्जिता मुधैव चेष्टामात्रा अनुष्ठीयन्ते प्रवृत्तेन चेल्लोकसंग्रहार्थं निवृत्तेन चेज्जीवनमात्रार्थं तं ज्ञानाग्निदग्धकर्माणं कर्मादावकर्मादिदर्शनं ज्ञानं तदेवाग्निस्तेन ज्ञानाग्निना दग्धानि शुभाशुभलक्षणानि कर्माणि यस्य तमाहुः परमार्थतः पण्डितं बुधा ब्रह्मविदः ॥ १९ ॥

गुरु—वत्सा ! पाठीमागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें ज्याची दृष्टि झाली आहे व ज्याची सर्व कांहीं कर्में आशाविरहित असतात, व त्या आशेला उत्पन्न करणारा जो अहंकार, त्या अहंकाराविरहित असतात, सारांश आकाशांत फेकलेला धोंडा ज्याप्रमाणें अहंता व

वासना नसूनही इकडून तिकडे जातांना आपल्यास दिसतो तद्वत् ज्याचीं सर्व कर्मे चेष्टारूपानें, चलनवलनरूपानें, मात्र होतात, त्या—

शिष्य—गुरुजी! जडवस्तुप्रमाणें ज्ञानी पुरुष हालूं चालूं लागला, दगडाचें वर्तन जसें इष्ट हेतु मनांत धरून होत नसतें, कारण त्या दगडाला मनच नसतें, सारांश दगडाप्रमाणें याची स्थिति झाली; तर तो दगडच, जडच, चेतनाशून्यच, तात्पर्य ज्ञानशून्यच झाला म्हणावयाचा!

गुरु—अरे! तूं विसराळू होत चाललास अँ! अहंकार अगर वासना सोडून देऊन केवळ लोकहितांसाठीं शुद्धमनानें वर्तन करणारे पुरुषांविषयीं तिसऱ्या अध्यायाच्या विसाव्या श्लोकांत विस्तार केला आहेना? या पुरुषाची कर्माकडे प्रवृत्ति होते ती साहंकार नसून केवळ परोपकाराच्या हेतूनें होत असते. तसेंच प्रवृत्ति सर्वथैव सोडून देऊन निवृत्तिकडे जरी तो वळलेला असता तरी पूर्वकर्मांच्या योगानें त्याला जो देह प्राप्त झाला त्या देहाचे भोग संपेपर्यंत देह जिवंत मात्र ठेवण्यापुरतीं कर्में त्याच्याहातून होत असतात. सारांश त्याचीं सर्व कर्मे वासनाशून्य व अहंकारशून्य असतात व ज्यानें 'ब्रह्माचे ठिकाणीं कर्म नाहीं, आपण ब्रह्मच, तेव्हां येथें कर्म ही नाहीं व 'मी, माझेपणा' नाहीं, ' असा निश्चय केला व ह्या निश्चितज्ञानापासून होणाऱ्या अग्नीनें आपलीं सर्व मंगळ, अमंगळ, कर्में व कर्मवासना उत्पन्न करणारा अहंकार, हीं सर्व जाळून भस्म केलीं आहेत त्याला मात्र ब्रह्मवेत्ते लोक पंडित असें म्हणतात. इतर लोक आडनावाचे मात्र पंडित होत. याला आत्मज्ञान झालें असतें ह्मणून हा मात्र खरा पंडित होय.

मधु०, द्विवेदी व चतरजी—काम म्हणजे फलाशा व संकल्प म्हणजे कर्तृत्वाभिमान ह्या दोहोंचा ज्यानें ज्ञानविज्ञानपूर्वक त्याग केला आहे अशा आत्मज्ञ पुरुषाचा व्यवहार अलिप्त कसा असतो हें २४ श्लोकापर्यंत सांगितलें आहे. ह्या पुरुषाचें कर्म लोकसंग्रहार्थ व जीवसंरक्षणापुरतें मात्र प्रारब्धयोगानें होत असतें. परंतु ह्या पुरुषास सद्वस्तूचें ज्ञान झालें असतें म्हणून कर्म, अकर्म, विकर्म इत्यादिकांची ज्ञानपूर्वक विचक्षणा करून तो निष्काम व वासनाशून्य पुरुष कर्मलिप्तच राहतो. हाच खरा पंडित होय.

श्रीधर, प्रपा०, पर्वते—शास्त्रोक्त अशा निष्काम कर्माचरणानें ज्याची चित्तशुद्धि झाली व ज्यास सद्वस्तूचें ज्ञान झालें व कर्में निष्कर्म (फळ-रहित) झालीं त्यास पंडित ह्मणावें. मुक्त झाल्यावर अर्थातच सकाम कर्म अगर कर्मवासना शून्यत्वास पावतात. भाजलेलें बीं जसें उगवत नाहीं, तशीं ज्ञान्याचीं कर्में फलप्रद होत नाहींत.

रामा०—समारंभाः=लौकिक नित्य व नैमित्तिक सकाम कर्में. 'संकल्प'= प्रकृति व तिचे सत्वादिगुण हे आपणच आहों असें जें अनुसंधान तो संकल्प होय. सारांश कर्मीतच संकल्पाविरहित आत्मानुसंधान ठेवणाऱ्या पुरुषास ज्ञान होतें.

द्वैतवादी—नुसता कर्तृत्वाभिमान किंवा फलवासना टाकून उपयोगी नाहीं; कर्मावरील आसक्ति (स्नेह) टाकून द्यावयास पाहिजे. शिवाय हरीस काय ते स्वातंत्र्य आहे, जीवास नाहीं हें ज्ञान झालें पाहिजे. असें वैभव ज्या पुरुषास प्राप्त झालें तोच ज्ञानी होय.

शंकरा०—कमलपत्राला जसा जलसंसर्ग होत नाहीं, त्याप्रमाणें जो कर्मासक्त होत नाहीं तो पंडीत होय. त्याचें कर्म शरीरयात्रेपुरतें मात्र होत असतें आणि तेंही कामसंकल्पशून्य असतें. आत्मारामाचा व कर्माचा संबंध सुतरां नाहीं असा ज्याचा अनुभवपूर्वक निश्चय झाला तो आत्मज्ञानी जीवन्मुक्तच होय. '**यद्यद्धि कुरुते जन्तुस्तत्तत्कामविचेष्टितम्**' (सकामत्वानें पुरुष कर्मप्रवृत्त होतो). या पुरुषाचा तर काम शून्यत्वास पावला तेव्हां याचें आचरण केवळ क्षुधातृषा इत्यादि तात्कालिक वासनाप्रमाणें देहयात्रेंपुरतें मात्र होत असतें. स्वार्थ अगर परार्थ यांची यास गरज नाहीं.

पंडित—'या श्लोकांत निर्गुणोपासना सांगितली आहे. ज्ञानी पुरुष निर्गुणोपासक झाला ह्मणजे त्याचे सर्व आवश्यकही व्यवहार (जेवण-खाण इत्यादि) सहजगतीनें, वासनाशून्यत्वानें, होत असतात. प्रारब्धामुळें तो देहांत राहतो, पण आपण देही आहोंत असेंही त्यास भान नसतें. सारांश हा अजगरवृत्ति असतो.' पंडितास निर्गुणोपासक फारसे आवडत नव्हते.

रंगनाथ—मधुसू० आधारें ह्मणतात; पूर्व कर्मातें भस्म करितु। पुढिलातें ज्ञानें न लिंपुतु। ऐसा ज्ञानाग्नि प्रबळोनि करितु। जाण

निश्चितु धनुर्धरा ॥ सारांश ज्ञानाग्नीनें पूर्व कर्मे जळतात, पुढें कर्म होत नाहीं. वर्तमानकाळच्या कर्माचा प्रपंच २०व्या श्लोकांत आहे.

गीताव्याख्याकार–तोच पंडित होय कीं ज्यानें **'नेच्छूनि फळा नाशवंता । तेणें ईश्वरचि घेतला उखिता (?) । कर्म अपूर्ण, नैष्कर्म्यता । पावला तत्प्रसादें ॥'**

भीमशर्मा—जीव आहे तोंपर्यंत कर्म व्हावयाचेंच; म्हणून ज्ञानी पुरुष परोपकाराचें कर्म मात्र अभिमानशून्यत्वानें करितो. वासना व अभिमान नसतात म्हणून तीं परोपकारक कर्मे त्यास बंधक होत नाहींत. ॥ १९ ॥

यस्त्वकर्मादिदर्शी सोऽकर्मादिदर्शनादेव निष्कर्मा संन्यासी जीवनमात्रार्थचेष्टः सन्कर्मणि न प्रवर्तते यद्यपि प्राग्विवेकतः प्रवृत्तः । यस्तु प्रारब्धकर्मा सन्नुत्तरकालमुत्पन्नात्मसम्यग्दर्शनः स्यात्स कर्मणि प्रयोजनमपश्यन्साधनं कर्म परित्यजत्येव । स कुतश्चिन्निमित्तात्कर्मपरित्यागासंभवे सति कर्मणि तत्फले च सङ्गरहिततया स्वप्रयोजनाभावाल्लोकसंग्रहार्थं पूर्ववत्कर्मणि प्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति ज्ञानाग्निदग्धकर्मत्वात्तदीयं कर्माकर्मैव संपद्यत इत्येतमर्थं दर्शयिष्यन्नाह—

गुरु—याप्रमाणें ज्याला अकर्म असें जें ब्रह्म त्याचा साक्षात्कार होऊन सर्व कर्मात्मक दृश्य विश्व ब्रह्मरूपच झालें, तो त्या ब्रह्मसाक्षात्कारामुळेंच निष्कर्म, कर्मशून्य, संन्यासी होतो. जीवन चालण्यास अत्यंत आवश्यक ज्या क्रिया म्हणजे क्षुधा तृषादि लागणें, रक्ताभिसरण होणें, वगैरे ज्या क्रिया आहेत त्या मात्र त्याच्या हातून निरिच्छापूर्वक होत असतात. इच्छापूर्वक कर्म करण्याची त्याची प्रवृत्तिच नष्ट होते. आत्मज्ञान होण्यापूर्वी जरी त्याची कर्माकडे प्रवृत्ति असली, तथापि स्वस्वरूपाची ओळख झाल्यावर त्याचा देहाभिमान नष्ट होऊन तो अकर्मच होतो. पूर्वकर्मामुळें देहप्राप्ति होऊन कर्म करावयास लागलेल्या पुरुषाला जर गुरूच्या प्रसादानें, ईश्वराच्या

अनुग्रहानें व स्वतःच्या अभ्यासानें आत्मसाक्षात्कार होऊन जीवन्मुक्तच झाला, तर तो पुढें कर्माच्या संबंधानें अत्यंत उदासीन होतो आणि वास्तविक रीतीनें कर्माचा त्यागच करितो; कारण कर्म करण्याचें कारणच नष्ट झाल्यामुळें, साधन जें कर्म त्याचा अर्थांतच साध्य वस्तु मिळाल्यामुळें नाश होतो; सारांश तो सर्व कर्माचा परित्याग करितो.

शिष्य—आतां मात्र विरोधात्मक सिद्धांत येऊं लागले बरें! सर्व कर्माचा त्याग करणारा पुरुष जिवंत असतो तोंपर्यंत त्याचे देह जिवंत ठेवण्याचें कर्म संपत नाहीं, हा अनुभविक सिद्धांत आपणच सांगतां; शिवाय लोकसंग्रहासाठीं ज्ञानीमनुष्यानें कर्म करावें असेंही पण आपणच सांगतां आणि आतां ब्रह्मसाक्षात्कार झालेला पुरुष कर्मत्याग करितो असेंही सांगतां तेव्हां ही आहे तरी काय भानगड? मला वाटतें कीं कर्म, मग तें कोणतेंही असो, दुःखासच कारण होतें, सर्व कर्म अज्ञानापासून आहे, अशी वेदांत्यांनीं आपली समजूत करून घेऊन कर्माचा, व कर्मठांचा निव्वळ आग्रहानें पाडाव करावयाचा, इतक्याच मतलबानें त्यांनीं व आपणही कर्माविरुद्ध झोड उठिवली आहे. महाराज! ज्ञानमार्गाच्या आड जाण्याचा माझा हेतु नाहीं, पण कर्ममार्गाचा विनाकारण तिरस्कार करणें मला योग्य दिसत नाहीं.

गुरु—वाहवा! वाहवा! अज्ञानामुळें तुझा हा निष्पक्षपातीपणा अनाठायीं जातो आहेरे! जें कर्म एकदां प्राण्याच्या अथवा पदार्थाच्या करवीं झालें, त्याचें फल उत्पन्न झालेंच पाहिजे, हा सर्वगामी सिद्धांत तुला अनेक वेळ सांगितला आहे. देह उत्पन्न करण्याला प्रथम कर्मच कारण होतें. कर्म वासनेपासून आणि वासना अहंकारापासून आणि अहंकार अज्ञानापासून किंवा मायेपासून अशी ही परंपरा आहे. सारांश मायेनें उत्पन्न केलेल्या अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या अहंकारानें वासना निर्माण होते व ती कर्म करविते. कर्म उत्पन्न झालें, मग तें कायिक असो, वाचिक असो वा, मानसिक असो, कीं तें फलद्रूप झालेंच पाहिजे. हें फल म्हणजे देह आणि देहाकरवीं होणारी

हालचाल होय. समजलास? तेव्हां प्राप्त झालेल्या देहामध्यें कर्म करण्याचें जें सामर्थ्य उत्पन्न झालेलें असतें, तें सर्वांशीं नष्ट झाल्याच्या अगोदरच आपण निव्वळ अज्ञानानें किंवा आळसानें कर्मत्याग केला तरी अन्यमार्गानें आपल्या हातून वर्तमानकाळीं किंवा भविष्यकाळीं कर्म होतेंच होतें. तेव्हां या पूर्वकर्माचा नाश करण्यासाठीं देहाच्या हातून निर्लोभपूर्वक कर्म करवून घ्यावयाचें असतें, आणि म्हणूनच ज्ञानी पुरुषासही एकदम कर्मत्याग करवत नाहीं. स्वतःचा कारभार आटपला असला तरी व्यवहारांत वागत असतांना, अनेक लोकांच्या अनंत यातना पाहून जेव्हां आपलें पूर्णत्वानें ब्रह्मय न झालेलें मन कळवळतें, तेव्हां त्या लोकांच्या यातना कमी होण्यासाठीं, क्रमाक्रमानें पटेल असा ज्ञानमार्गाचा उपदेश त्यांस अशाच पद्धतीनें कर्म करवून करावा लागतो व असा उपदेश स्वतःच्या निष्काम कर्मानें दृढ करविला म्हणजे सामान्य जनांवर आपल्या उपदेशाचा ठसा बसतो व इष्टकार्य होतें. हा प्रकार स्वहिताची अथवा लोकहिताची वासना नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत चालतो. समजलास? जेव्हां नाक, कान, डोळे इत्यादि इंद्रियांसही अद्वैताचें सम्यग्दर्शन होईल, 'राममय वृत्ति झाली, आतां काय उणें?' अशी आत्मवृत्ति झाली म्हणजे सर्व दृश्य विश्व ब्रह्मय दिसूं लागून साक्षात्काराचा अनुभव होतो. अर्थातच या वेळीं सर्व कर्मांचा त्याग होतो. तीं सर्व कर्में ज्ञानाग्नीनें दग्ध होतात. समजलास? साक्षात्कार झाला नाहीं, तोंपर्यंत देहप्रारब्ध, समाजप्रारब्ध, विश्वप्रारब्ध इत्यादिकांचा विचार. पण एकदां कां सर्व ब्रह्मय झालें म्हणजे सर्व बंध तुटून हा विज्ञानी पुरुष मुक्त होतो. जोंपर्यंत ज्ञानच मात्र आहे, तोंपर्यंत वेदांती पुरुषाचें कर्म सुटत नाहीं. मात्र ब्रह्माकडे त्याचा लय असल्यामुळें त्याचीं वासनाशून्य व अहंकारशून्य कर्में त्यास बद्धक होत नाहींत. समजलें?

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं

नित्यतृप्तो निराश्रयः ॥

कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि
नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥

कर्मफलासङ्गं त्यक्त्वा (कर्माचा अभिमान व कर्मफलाची वासना दोन्हीं सोडून देऊन) **नित्यतृप्तः निराश्रयः** (सदैव संतुष्ट व कोणत्याही दृश्य आश्रयाची अपेक्षा न ठेवणारा–होतो–) **कर्मणि अभिप्रवृत्तः अपि** (–आणि–तो कर्म करित असतो, तथापि) **सः न किंचित् एव करोति** (तो कांहीं एक मुद्दां करित नाहीं.) सारांश कर्म करण्याचा अभिमान व कर्मफलाची वासना या उभयतांचाही त्यानें त्याग केलेला असल्यामुळें हा आत्मज्ञ पुरुष सदैव शुद्धानंदांत निमग्न असतो; तसेंच देवतादिकांनीं आपल्यास सुख द्यावें म्हणून त्यांची आराधना करावयाची, त्यांचा आश्रय धरावयाचा हा जो सामान्य नियम आहे, त्याचीही त्यास आवश्यकता नसते. हा आत्मज्ञ पुरुष जरी देहप्रारब्धाचें किंवा समाजप्रारब्धाचें कर्म करित असला, तथापि त्याची वासना व अहंकार नष्ट झाल्यामुळें त्याचीं सर्व कर्में त्यास बद्धक न होतां इतरांस मात्र उपकारक होतात. तात्पर्य ह्या पुरुषाला नैष्कर्म्य प्राप्त होतें.

त्यक्त्वेति । त्यक्त्वा कर्मस्वभिमानं फलासङ्गं च यथोक्तेन ज्ञानेन नित्यतृप्तो निराकाङ्क्षो विषयेष्वित्यर्थः । निराश्रय आश्रयरहितः । आश्रयो नाम यदाश्रित्य पुरुषार्थं सिसाधयिषति दृष्टादृष्टेष्टफलसाधनाश्रयरहित इत्यर्थः । विदुषा क्रियमाणं कर्म परमार्थतोऽकर्मैव तस्य निष्क्रियात्मदर्शनसंपन्नत्वात् । तेनैवंभूतेन प्रयोजनाभावात्ससाधनं कर्म परित्यक्तव्यमेवेति प्राप्ते ततो निर्गमासंभवाल्लोकसंग्रहचिकीर्षया शिष्टविगर्हणापरिजिहीर्षया वा पूर्ववत्कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि निष्क्रियात्मदर्शनसंपन्नत्वान्नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥

स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान झाल्यामुळें ज्याची विषयवासना नष्ट झाली,

ज्याला सदैव समाधानवृत्ति प्राप्त झाली तो पुरुष कर्माविषयीं अभिमान ह्मणजे मी कर्ता आहें हा अभिमान सोडून देतो व त्याचप्रमाणें कर्मफलाची आसक्ति ह्मणजे मी भोक्ता आहें व असावें ही इच्छा, या दोन्ही गोष्टी; हा ज्ञानी पुरुष सोडून देतो. तसेंच हा पुरुष निराश्रित होतो; म्हणजे कोणत्या तरी वस्तूचा अगर देवतेचा आश्रय धरून त्या त्या वस्तूच्या अगर देवतेच्या सहाय्यानें आपला इष्ट हेतु साध्य करून घ्यावा, ही असली इच्छाही हा पुरुष नष्ट करून टाकितो; सारांश दृश्य अगर अदृश्य फलांची अगर तीं फलें साध्य करून देणाऱ्या साधनांची याला गरजच उरत नाहीं.

शिष्य—ह्मणजे 'शास्त्रोक्त कर्मांची अगर उपासनेची याला गरज उरत नाहीं' असेंचना?

गुरु—होय, असेंच. तथापि तो ज्ञान झाल्याबरोबर लागलीच कर्मत्याग करितो, असें मात्र समजावयाचें नाहीं. कर्म स्वार्थपर ह्मणजे स्वतःचे उपभोग वाढविणारें असतें असाच अर्थ नव्हे. स्वतःचा उपभोग एक रेसानें वाढावा अशी आकांक्षा बिलकुल न ठेवितां, लोकांचे उपभोग वाढतील व पुढें लोकांचें ज्ञान वृद्धिंगत होऊन त्यांची उपभोगांची इच्छा सात्विक भावानें कमी होत जाईल व शेवटीं त्यांस परमात्म्याचें व परब्रह्माचें, अशीं यथार्थ ज्ञानें होतील, आत्मज्ञान होईल, असा परोपकारक सद्धेतु धरून केलेलीं कर्में परमार्थतः कर्मशून्यच असतात; कारण त्यांत स्वार्थबुद्धि नसते व शिवाय निष्क्रिय जें ब्रह्म तें ध्यानांत ठेवून हीं कर्में झालेलीं असतात. सारांश आत्मज्ञान झालेल्या पुरुषाचें कर्म हें कर्मच नव्हे. प्रयोजन नसतांना कर्म करूं नये, सामान्यतः कर्म होत नाहीं, हा अज्ञानी माणसांचा प्रकार झाला; पण यावरून ज्ञानी पुरुषानें कर्म करितांच उपयोगी नाहीं, केलें तर तें त्यास बाधेल, असा मात्र अर्थ घ्यावयाचा नाहीं. त्यानें कर्म केलें तरी हरकत नाहीं असा तात्पर्यार्थ आहे. स्वतःस राजपद मिळून स्वतःच्या सर्व उपभोगविषयक इच्छा नष्ट झाल्या तरी दारिद्र्यपंकांत व अज्ञानतिमिरांत तळमळत असणाऱ्या हजारों लोकांकडे पाहून तो राजा जसा लोक-

कल्याणासाठीं उत्साहानें कर्म करितो, इतकेंच नव्हे; कर्म केल्याशिवाय त्याला जसें चैनच पडत नाहीं, आपण स्वतःच्या दृष्टीनें किंवा लोकदृष्टीनें कर्तव्यमुक्त झालों, असें वाटत नाहीं, त्याचप्रमाणें आत्मज्ञान झालेल्या पुरुषाच्या कर्माची गोष्ट आहे. ज्ञान होण्यापूर्वी जसें तो कर्म करित होता, तसें आतांहीं करण्यास त्याला हरकत नाहीं. पूर्वी तो देहदृष्टीनें कर्म करित होता, आतां तो आत्मदृष्टीनें कर्म करितो हा भेद आपण विसरतों म्हणून ज्ञानी पुरुषाच्या कर्माची मीमांसा आपल्यास करितां येत नाहीं. सारांश निष्क्रिय ब्रह्माची आळख झालेल्या ज्ञानी पुरुषानें केलेलें कर्म स्वतःच्या संबंधानें फलद्रूप म्हणजे बद्धक न होतां इतरांस मात्र तारक होत असतें.

मधु०, प्रपा०, श्रीधर, पत्रेते आचार्यानुसारी आहेत. कर्माभिमान व फलाकांक्षा ह्यांचा त्याग करून पूर्ण समाधान व अद्वैतदृष्टि झालेल्या पुरुषानें केलेलें कर्म बंधक होत नाहीं. निराश्रय म्हणजे येथील योगक्षेमासाठीं ज्याला देहादिकांचा आश्रय नको असतो. शंकरा० नित्यतृप्तः = ब्रह्मस्वरूपाच्या साक्षात्कारानें समाधान पावलेला. कर्माचें फल जेथें मिळतें तो देह म्हणजे कर्मफल त्याचा संग सोडून देऊन तो सदैव ब्रह्मानंदांत निमग्न असतो. द्विवेदी--आपलें कर्तव्य करणें त्यांतच ज्ञानी पुरुषास आनंद असतो. फलाविषयीं आशा व कर्माविषयीं कर्तृत्वाभिमान धरला तर कर्मापासून सुखदुःखाची उत्पत्ति होणार. पण ज्यानें वासना व अभिमान या उभयतांचाही त्याग केला त्याला फलापासून किंवा विपरीत फलापासून सुख दुःख होणें शक्यच नाहीं. मात्र कर्मफल आणि ब्रह्म यांमध्यें कांहीं एक संबंध नाहीं अशी त्याची खातरी झाली पाहिजे.

चतरजी—‘ नित्यतृप्तः ’ = शरीर व मन यांस समतोल ठेवणारा निराश्रयः = कर्माचें फल अमुक होईल असें भान नसणारा.

रामा०—ज्ञानी पुरुषाचें कर्म ज्ञानाभ्यासच वृद्धिंगत करतें.

द्वैत—जो नित्य तृप्त आहे व (ज्याला दुसऱ्या कशाचाही आश्रय नाहीं असा जो परमेश्वर आहे.) त्याच्यासारखाच मी आहें, असा ज्याचा

निश्चय होतो त्याचें कर्म बद्धक होत नाहीं. कारण त्याची कर्मावरील व कर्मफलावरील भक्तीच नष्ट झाली असते.

पंडितांनीं 'विषयसुख हेंच कर्मफळ असें समजून ज्ञानी पुरुष कर्मफलाची आशा नष्ट करितो.' असा अर्थ केला आहे तो ठीकच आहे. जिज्ञासु दशेंत कर्मफलाचा त्याग आणि ज्ञानदशेंत विषयापासून होणाऱ्या सुखाचा त्याग, असा पंडितांचा क्रम आहे.

रंगनाथ. ज्ञान्याला कर्म बद्धक होणें शक्य नाहीं. कारण—

नाना गगनसुमनें तोडावया। वंध्यापुत्र प्रवर्तला उपाया। तैसीं इंद्रियें प्रवर्तलीं कर्म करावया। लोक देखावया अति विस्मित ! ॥ २० ॥

यः पुनः पूर्वोक्तविपरीतः प्रागेव कर्मारम्भाद्ब्रह्मणि सर्वान्तरे प्रत्यगात्मनि निष्क्रिये संजातात्मदर्शनः स दृष्टादृष्टेष्टविषयाशीर्विवर्जिततया दृष्टादृष्टार्थे कर्मणि प्रयोजनमपश्यन्ससाधनं कर्म संन्यस्य शरीरयात्रामात्रचेष्टो यतिर्ज्ञाननिष्ठो मुच्यत इत्येतमर्थं दर्शयितुमाह—

आतां कर्म सुरू करण्याच्या अगोदरच ज्याला सर्वांच्या अंतर्बाह्य व्यापून राहणाऱ्या निष्क्रिय अशा आत्मवस्तूची ओळख झाली, सारांश अमुक एक दिसणारें अगर कल्पनेंत येणारें फल आपल्यास हवें, असली इच्छाच सबीज दग्ध झाली व त्यामुळें दृष्ट किंवा अदृष्ट कर्म करण्याचें कारणच उरलें नाहीं तो पुरुष साधनरूपी कर्माचा संन्यास म्हणजे त्याग करितो; प्रारब्धानें प्राप्त झालेल्या देहाचें संरक्षण होण्यास अवश्य लागणाऱ्या चेष्टा मात्र त्याचीं इंद्रियें वगैरे करितात, स्वतः तो उदासीनच असतो. हा पुरुष खरा संन्यासी होय. यालाच खरें आत्मज्ञान झालें. अर्थातच हा मुक्त होतो तें कसें तें सांगतात.—

शिष्य—मागच्या श्लोकांत कर्म करावयास लागल्यावर ज्ञान झालें व या श्लोकांत कर्मापूर्वी ज्ञान झालें हाचना विशेष?

गुरु—होय; ऐक आतां—

निराशीर्यतचित्तात्मा
त्यक्तसर्वपरिग्रहः ॥
शारीरं केवलं कर्म
कुर्वन्नाऽऽप्नोति किल्बिषम् ॥२१॥

निराशीः (जो आशाशून्य झाला आहे) **यतचित्तात्मा** (ज्यानें आपलें मन व शरीर यांचा शमदम उत्कृष्ट प्रकारचा केला आहे)—व—**त्यक्तसर्वपरिग्रहः** (ज्यानें साहित्यास लागणाऱ्या सर्व वस्तूंचा, उपकरणांचा, समूळ, त्याग केला आहे)—व—**केवलं शारीरं कर्म कुर्वन्** (जो केवळ शरीर जिवंत ठेवण्यापुरतें मात्र कर्म करितो) —त्याला—**किल्बिषं** (पापाचा संपर्क) **न आप्नोति** (मिळत नाहीं) सारांश निस्पृही, आत्मसंयमी, सर्वसंगपरित्यक्त पुरुषानें, प्रारब्धवशात् प्राप्त झालेल्या देहाचा भोग संपेपर्यंत त्या देहास जिवंत मात्र ठेवण्यासाठीं केलेलें कर्म, त्या पुरुषाला बद्धक होत नाहीं, कर्म केलें म्हणून तो पुनः पापरूपी संसारांत पडत नाहीं.—

निरिति । निराशीर्निर्गता आशिषो यस्मात्स निराशीः, यतचित्तात्मा चित्तमन्तःकरणमात्मा बाह्यः कार्यकरणसंघातस्तावुभावपि यतौ संयतौ येन स यतचित्तात्मा, त्यक्तसर्वपरिग्रहस्त्यक्तः सर्वः परिग्रहो येन स त्यक्तसर्वपरिग्रहः शारीरं शरीरस्थितिमात्रप्रयोजनं केवलं तत्राप्यभिमानवर्जितं कर्म कुर्वन्नाऽऽप्नोति न प्राप्नोति किल्बिषमनिष्टरूपं पापं धर्मं च । धर्मोऽपि मुमुक्षोः किल्बिषमेव बन्धापादकत्वात् । किंच शारीरं केवलं कर्मेत्यत्र किं शरीरनिर्वर्त्यं शारीरं कर्माभिप्रेतमाहोस्विच्छरीरस्थितिमात्रप्रयोजनं शारीरं कर्मेति । किंचातो यदि शरीरनिर्वर्त्यं शारीरं कर्म यदि वा शरीरस्थितिमात्रप्रयोजनं शारीरमिति । उच्यते—यदा शरीरनिर्वर्त्यं कर्म शारीरमभिप्रेतं स्यात्तदा

दृष्टादृष्टप्रयोजनं कर्म प्रतिषिद्धमपि शरीरेण कुर्वाणोऽऽप्नोति किल्बिषमिति ब्रुवतो विरुद्धाभिधानं प्रसज्येत ।

ज्याची सर्वप्रकारची आशा अस्तंगत झाली, त्यालाच निस्पृही असें ह्मणावें. तसेंच ज्यानें आपलें अंतःकरण व कर्म करण्याचीं साधनें ज्यांत आहेत, असा आपला अहंकार, मन, बुद्धि, इंद्रियें यांनीं विशिष्ट असलेला आपला देह (यालाच बाह्य आत्मा असें म्हणतात.) या दोहोंचेंही संयमन केलें आहे त्यालाच आत्मसंयमी म्हणावें. त्याचप्रमाणें ज्यानें उपभोग मिळण्यास साधनभूत असणाऱ्या सर्व उपकरणांचा ह्मणजे विषयांचा त्याग केला आहे, त्यालाच संन्यासी म्हणावें. असो; तेव्हां निस्पृही व आत्मसंयमी संन्याशानें जरी आपल्यास पूर्वकर्मानें प्राप्त झालेल्या देहास जिवंत ठेवण्याइतकें मात्र कर्म अभिमानशून्यत्वानें केलें तरी त्याला अमंगल कर्मफल प्राप्त होत नाहीं. ह्मणजे कर्मानें उत्पन्न होणारें पुण्य किंवा पाप या दोहींचाही संपर्क त्यास लागत नाहीं.

शिष्य—काय पुण्याचा संचय सुद्धां तो करित नाहीं?

गुरु—नाहीं. कारण पुण्यकृत्य करण्याचा अभिमान असणें हेंही बद्धकत्वाचेंच लक्षण आहे. सारांश सर्व प्रकारचा अभिमान त्यानें सोडून दिल्यामुळें पापपुण्याविषयीं तो स्वतः उदासीनच असतो, आणि जरी त्याच्या हातून स्वतःस व स्वेतरांस तारक अशीं कर्में सहजरीतीनें होत असतात, तथापि त्या ज्ञानी पुरुषाला त्यांची खबरही नसते. तात्पर्य शरीरनिर्वाहाचीं कर्में त्याकडून होत असतात, पण तो मात्र त्यांच्याविषयीं उदासीन असतो.

शिष्य—गुरुजी! हीं कर्में शरीराकडून होतात असें समजावयाचें किंवा शरीराच्या पोषणासाठीं हीं कर्में तो करितो असें समजावयाचें? जो विषयांच्या संबंधानें पूर्ण उदासीन झाला त्यानें शरीराकडून कर्में केलीं काय किंवा शरीराच्या पोषणासाठीं मानसिक वृत्तीनें कर्में केलीं काय, तात्पर्यांत कांहीं बाध उत्पन्न होत नाहीं. जो ब्रह्मचिंतनांत निमग्न झाला, ज्यानें सर्व शारीरीक व मानसिक विषयांचा सर्वथैव त्याग केला व अभिमान

नाहींसा केला, त्याच्या शरीराकडे अगर मनाकडे तें तें कर्तृत्व गेल्यामुळें तीं तीं कर्मे त्यास बद्धक होणें शक्यच नाहीं. 'मी करितों, किंवा मी करित नाहीं' असा अभिमान घातक आहे. हा अभिमान ज्ञानपूर्वक सुटला म्हणजे मोक्षसिद्धि झाली. मग तो कर्म शरीरानें करो वा मनानें करो त्यास कोठेंही बाध येत नाहीं, असेंचना समजावयाचें?

गुरु—अरे! शरीराकडून होणारीं कर्में असा शारीरिक कर्माचा अर्थ केला तर 'दृश्य किंवा अदृश्य फल मिळवून देणारीं कर्में कीं ज्यांचा निषेध वेदशास्त्रांनीं केला आहे अशीं कर्में शरीराकडून झालीं असतांही त्या कर्त्याला पाप लागत नाहीं.' असा अर्थ होऊन पापकर्मांचें पाप त्यास लागत नाहीं! अशा दुष्ट सिद्धांताचें आपण स्वीकरण केलें असें होईल. सारांश पहिला अर्थ श्रुतीस, युक्तीस व अनुभवास विरुद्ध आहे.

शास्त्रीयं च कर्म दृष्टादृष्टप्रयोजनं शरीरेण कुर्वन्नाऽऽप्नोति किल्बिषमित्यपि ब्रुवतोऽप्राप्तप्रतिषेधप्रसङ्गः । शारीरं कर्म कुर्वन्निति विशेषणात्केवलशब्दप्रयोगाच्च वाङ्मनसनिर्वर्त्यं कर्म विधिप्रतिषेधविषयं धर्माधर्मशब्दवाच्यं कुर्वन्प्राप्नोति किल्बिषमित्युक्तं स्यात् । तत्रापि वाङ्मनसाभ्यां विहितानुष्ठानपक्षे किल्बिषप्राप्तिवचनं विरुद्धमापद्येत । प्रतिषिद्धसेवापक्षेऽपि भूतार्थानुवादमात्रमनर्थकं स्यात् । यदा तु शरीरस्थितिमात्रप्रयोजनं शारीरं कर्माभिप्रेतं भवेत्तदा दृष्टादृष्टप्रयोजनं कर्म विधिप्रतिषेधगम्यं शरीरवाङ्मनसनिर्वर्त्यमन्यदकुर्वंस्तैरेव शरीरादिभिः शरीरस्थितिमात्रप्रयोजनं केवलशब्दप्रयोगादहं करोमीत्यभिमानवर्जितः शरीरादिचेष्टामात्रं लोकदृष्ट्या कुर्वन्नाऽऽप्नोति किल्बिषम् । एवंभूतस्य पापशब्दवाच्यकिल्बिषप्राप्त्यसंभवात्किल्बिषं संसारं नाऽऽप्नोति ज्ञानाग्निदग्धसर्वकर्मत्वादप्रतिबन्धेन मुच्यत एवेति पूर्वोक्तसम्यग्दर्शनफलानुवाद एवैषः । एवं शारीरं केवलं कर्मेत्यस्यार्थस्य परिग्रहे निरवद्यं भवति ॥ २१ ॥

आतां तूं असें म्हणशील कीं प्रथम पंक्तीचा अर्थ असा करावा: 'दृश्य व अदृश्य फल देणारें शास्त्रविहित कर्म शरीराकरवीं केलें असतांही त्यास तें कर्म बद्धक होत नाहीं.' पण मी अशी प्रतिपृच्छा करितों कीं हा निषेध येथें सांगण्याचें प्रयोजन काय? शारीरिक कर्मांचाच येथें प्रतिषेध करण्याचें कारण दिसत नाहीं.

शिष्य—महाराज! कारण हें कीं ह्मणजे 'शारीर' असें विशेषण भगवंतांनीं घातलें आहे व 'केवल' या शब्दाचा उपयोग केला आहे त्याचें रहस्य हें आहे कीं या विशेषणद्वयाच्या योगानें 'मन व वाणी, यांच्या करवीं होणारीं विधियुक्त व निषिद्ध अथवा धर्मप्रद व अधर्मप्रद कर्में कर्त्यास बद्धक होतात हें मुमुक्षूंस समजावें. माझ्या बोलण्याचा अर्थ हा कीं वाचिक व मानसिक कर्में बद्धक होतात, व शारीरिक होत नाहींत असें भगवंतांस सांगावयाचें आहे.

गुरु—ठीक आहे! पण याचा अर्थ असा होतो कीं वाचिक व मानसिक शास्त्रीय कर्में सात्विकभावानें केलीं तरी तीं पापमूलक व तापदायक होतात! म्हणजे मनानें किंवा वाणीनें आत्मध्यान किंवा आत्म्याचा जप मुमुक्षूनें केला तरी त्यास पाप लागतें! असा अर्थ करणें तुला इष्ट आहे काय?

शिष्य—तसें नव्हे. निषिद्ध कर्में त्यानें वाणी व मनानें केलीं तर तीं त्यास बद्धक होतात, असा अर्थ.

गुरु—बेट्या! पापमूलक कर्में पापप्रद होतात, असा लहान पोरास सुद्धां सहज समजणारा अर्थ सांगण्याचा मुद्दा काय? 'पाणीं पाणीं आहे,' असें सांगण्यासारखाच हा प्रकार अर्थशून्य होणार!

शिष्य—महाराज! मी दुसरा एक अर्थ सुचविला होता त्याचें काय?

गुरु—अरे! होय, तिकडेच मी वळतों आतां. 'केवल शारीर' कर्म याचा अर्थ शरीर जिवंत ठेवण्यापुरतें मात्र कर्म असा अर्थ केला म्हणजे तात्पर्य असें निघतें कीं दृष्ट, अदृष्ट फल देणारीं व शास्त्राच्या साहाय्यानें 'विहित कोणतीं व अविहित कोणतीं' असें समजलीं जाणारीं सर्व कर्में—

शिष्य—महाराज! मला कांहीं समजलें नाहीं.

गुरु—अरे! करावें काय, आणि करूं नये काय, हें सर्व आपल्यास शास्त्राच्या साहाय्यानें समजतेंना?

शिष्य—होय.

गुरु—बरें; आतां हीं सर्व कर्में काया, वाचा किंवा मन यांजकडून होताततना?

शिष्य—होय.

गुरु—आणि ह्या कर्मांचें फल कर्त्यास येथें किंवा अन्यत्र मिळावयाचें असतेंना?

शिष्य—होय.

गुरु—तर मग शास्त्रगम्य व दृष्टादृष्टफल देणारीं व इतर सर्व कर्मांचा शरीर, वाणी व मन यांजकडून त्याग करवून त्यांच्याकडून केवळ शरीर मात्र जिवंत ठेवण्यापुरतीं कर्में अभिमानशून्यत्वानें—

शिष्य—अभिमानशून्यत्वानें म्हणजे?

गुरु—म्हणजे 'मी करितों' असा अभिमान सोडून देऊन, सारांश सर्व प्रकारचा अभिमान सुटून गेला असल्यामुळें शरीर जिवंत मात्र ठेवण्यास लागणारीं अवश्य कर्में शरीर वगैरेकडून झालीं असतां त्या उदासीन अगर निमित्तमात्र झालेल्या कर्त्यास पाप लागत नाहीं. 'तो कर्म करितो' असें लोकदृष्टीनें जरी दिसतें, तथापि कर्तृत्वाचा अभिमान व फळाची आशा नसल्यामुळें तीं शरीर जिवंत मात्र ठेवण्यापुरतीं कर्में या ज्ञानी मनुष्याला मोहांत घालूं शकत नाहींत.

शिष्य—मुळांत किल्बिष शब्द आहे त्याचा अर्थ मोह घ्यावयाचा तर?

गुरु—होय. पाप असा अर्थ घेणें इष्टच नाहीं. कारण असल्या पुरुषाच्या हातून पापकर्मच होत नसल्यामुळें त्यास पाप लागत नाहीं हें सांगणें व्यर्थ होतें. ज्ञानी मुमुक्षूचें देह जिवंत मात्र ठेवण्याचें कर्म त्यास मोहांत म्हणजे संसारांत घालूं शकत नाहीं. ज्ञानरूपी अग्नीच्या ज्वाळेनें कर्म, कर्माभिमान व कर्मफळाशा ह्यांचें भस्मच

होतें. अर्थातच मोक्षाच्या मार्गांतील सर्व अडचणी नष्ट होतात. सारांश आत्मस्वरूपाचें ज्ञान व साक्षात्कार हीं झालीं असतां जीव मुक्त होतो असें पूर्वीं सांगितलें आहे त्याचाच हा पुनः अनुवाद केला आहे. याप्रमाणें अर्थ केला म्हणजे शास्त्राच्या, युक्तीच्या व अनुभवाच्या विरुद्ध कांहीं सांगितलें असें न होतां सर्व सुसंगत होतें. शरीर जिवंत मात्र ठेवण्यापुरतें कोणतेंही कर्म ज्ञान्यास बाधत नाहीं हा तात्पर्यार्थ होय व हाच निर्दोष आहे.

मधु०—कोणतेंही कर्म बद्धक होत नाहीं तर शारीरिक कर्म अर्थातच होणार नाहीं, असें सांगण्यासाठीं ह्या श्लोकाचा अवतार आहे. बाकी यांचा व प्रपाकारांचा सर्व अर्थ आचार्यांप्रमाणेंच आहे. श्रीधरः 'शरीराकडून मात्र होणारें कर्म' असा 'शारीर' शब्दाचा अर्थ करितात. पर्वतेः ज्यानें संसाराचा संन्यास करून योगलभ्य ऐश्वर्याचाही त्याग केला व शमदमादिकांनीं आपल्यास प्रारब्धयोगानें प्राप्त झालेली प्रकृति आपल्या स्वाधीन ज्यानें ठेविली त्यानें सर्व शास्त्रोक्त कर्मांचा त्याग करून केवळ शरीर निर्वाहापुरतीं मात्र कर्में केलीं तरी नित्यकर्तव्य न केल्याचें पातक लागत नाहीं.' द्विवेदीः जो आशाशून्य झाला म्हणजे ज्याचें चित्त व जीव निर्मळ झाले, योगाभ्यासानें जो आत्मसंयमी झाला, व ज्याचा आपपर भाव नष्ट झाला त्या पुरुषानें प्रारब्ध योगें प्राप्त झालेल्या शरीराकरवीं कर्म सहज रीतीनें घडवून आणिलें तर 'त्यास पातक लागत नाहीं, इतकेंच नव्हे तर मी शारीरिक कर्माचा त्याग केला आहे असा अभिमान धरून शारीरिक कर्म सोडिलें तर तो उलट या अभिमानामुळें पाशांत मात्र सांपडतो.

रामा०—'ज्ञाननिष्ठारहित केवळ शारीरिक कर्म केलें तरी आशाशून्य, आत्मसंयमी, ममत्वरहित मनुष्यास आत्मज्ञान होतें' असा या श्लोकाचा अर्थ करितात; सारांश कर्मानें मोक्ष मिळेल असें ह्मणतात! अर्थातच ज्ञानाशिवाय ज्ञानप्राप्ति होईल हें असंभवनीयच आहे.

द्वैतवादी——बुद्धि व मन यांचें संयमन केल्यामुळें जो फलाशाशून्य व अभिमानरहित झाला तो सकर्म असला तरी अकर्मच होतो.'

पंडितः—मातीच्या भिंती । मातीनेंच लिंपती । कर्में झाले ते देह वर्तती । कर्मेंचि करूनी ॥ क्षुधादि बाधेनें विकळ । होतां चित्तीं होय डळमळ । तेव्हां चित्तशुद्ध जरी केवळ । स्थिर नव्हे स्वस्वरूपी ॥ या कारणें ज्ञानी । विषयवासना टाकूनी । शरीर निर्वाह करितां त्या, कर्में करूनी । पावत नसे किल्बिषातें ॥ हा संन्याशाचा कर्मविधि होय.

गीताव्याख्याकारः—तया विहितकर्म लोपें । नलिंपती जाण पापें । जें तीं स्वयें स्वरूपें । सर्व होऊनि ठेला ॥ समुद्रें बुडवावें लवणा । तें लवण आंगावलें समुद्रपणा । मग सांग काय कवणा । बुडवावें कवणें ? ॥

भीम०—' असा ज्ञानी पुरुष शरीरनिर्वाहासाठीं भिक्षाटनादि कर्में करित असतां पंचसूनादि पातकें करिता झाला तरी तीं पातकें त्यास लागत नाहींत;' हा केवळ संकुचित अर्थ होय. ॥ २१ ॥

त्यक्तसर्वपरिग्रहस्य यतेरन्नादेः शरीरस्थितिहेतोः परिग्रहस्याभावाद्याचनादिना शरीरस्थितौ कर्तव्यतायां प्राप्तायाम् 'अयाचितमसंक्लृप्तमुपपन्नं यदृच्छया' इत्यादिना वचनेनानुज्ञातं यतेः शरीरस्थितिहेतोरन्नादेः प्राप्तिद्वारमाविष्कुर्वन्नाह—

गुरु—सर्व संसाराचा व उपकरणांचा त्याग केला आहे अशा यतीनें, आपलें शरीर जिवंत ठेवण्यास कारणीभूत जीं अन्न, आच्छादनादिक साधनें आहेत त्या सर्वांचा त्याग केला आहे अशा यतीनें, पूर्वकर्मानें प्राप्त झालेल्या व प्रारब्धकर्माचा उपभोग पूर्ण होईपर्यंत टिकणाऱ्या शरीरासाठीं मात्र कर्म केलें पाहिजे; असा प्रसंग आल्यामुळें मुमुक्षुसंन्याशानें अन्न, आच्छादनादिकांची प्राप्ति शिक्षण, सेवा, कृषिकर्म वगैरेंच्या साहाय्यानें कशी करून घ्यावी याविषयीं सांगतात तें ऐक. पण त्याच्या अगोदर श्रुति काय म्हणते तें पहा: ' न मागतां प्राप्त झालेलें, अगोदर कांहींएक न ठरवितां कोणत्या तरी पांच सात घरीं

भिक्षा मागून मिळविलेलें किंवा सहज रीतीनें प्राप्त झालेलें, मात्र अन्न आच्छादन यतीनें स्वीकृत करावें. त्यांच्याच अनुरोधानें सांगतात.–

यदृच्छालाभसंतुष्टो
द्वंद्वातीतो विमत्सरः ॥
समः सिद्धावसिद्धौ च
कृत्वाऽपि न निबध्यते ॥ २२ ॥

यदृच्छालाभसंतुष्टः (सहज रीतीनें प्राप्त झालेल्या पदार्थांतच संतोष मानणारा) **द्वंद्वातीतः** (शीतोष्णादि द्वंद्वांच्या पलीकडे गेलेला) **विमत्सरः** (मत्सरशून्य) **सिद्धौ असिद्धौ च समः** (कांहीं मिळालें किंवा मिळालें नाहीं, तरी समत्वानें राहणारा, हर्षविषाद होऊं न देणारा) **कृत्वा अपि** (कर्म करून ही) **न निबध्यते** (कर्मपाशांत, संसारांत सांपडत नाहीं.) सारांश सहज रीतीनें मिळेल त्यांत संतोष मानणारा वारा, थंडी, ऊन, सुखदुःख इत्यादिकांस न जुमानणारा, माझ्यापेक्षां दुसरा मोठा आहे असा मत्सर ज्याच्या मनांतून नष्ट झाला, खावयास मिळो वा न मिळो, संतान वाढो वा न वाढो, ज्याच्या आत्मस्थितींत यत्किंचित्‌ही भंग होत नाहीं, असा जो संन्यासी आहे, त्यानें कर्म केलें, तरी तो बंधांत सांपडत नाहीं.

यदृच्छेति । यदृच्छालाभसंतुष्टोऽप्रार्थितोपनतो लाभो यदृच्छालाभस्तेन संतुष्टः संजातालंप्रत्ययो द्वंद्वातीतो द्वंद्वैः शीतोष्णादिभिर्हन्यमानोऽप्यविषण्णचित्तो द्वंद्वातीत उच्यते । विमत्सरो विगतमत्सरो निर्वैरबुद्धिः समस्तुल्यो यदृच्छालाभस्य सिद्धावसिद्धौ च । य एवंभूतो यतिरन्नादेः शरीरस्थितिहेतोर्लाभालाभयोः समो हर्षविषादवर्जितः कर्मादावकर्मादिदर्शी यथाभूतात्मदर्शननिष्ठः शरीरस्थितिमात्रप्रयोजने भिक्षाटनादिकर्मणि शरीरादिनिर्वर्त्ये नैव किंचित्करोम्यहं 'गुणा गुणेषु वर्तन्ते' इत्येवं सदा संपरिचक्षाण आत्मनः कर्तृत्वाभावं पश्य-

नैव किंचिद्भिक्षाटनादिकं कर्म करोति। लोकव्यवहारसामान्यदर्शनेन तु लौकिकैरारोपितकर्तृत्वे भिक्षाटनादौ कर्मणि कर्ता भवति। स्वानुभवेन तु शास्त्रप्रमाणादिजनितेनाकर्तैव। स एवं पराध्यारोपितकर्तृत्वं शरीरस्थितिमात्रप्रयोजनं भिक्षाटनादिकं कर्म कृत्वाऽपि न निबध्यते बन्धहेतोः कर्मणः सहेतुकस्य ज्ञानाग्निना दग्धत्वादित्युक्तानुवाद एवैषः ॥ २२ ॥

कोणाजवळ कांहींएक मागितल्याशिवाय सहज रीतीनें जें मिळतें त्यांतच 'हें आपल्यास पुरें, जास्त नको.' असें पाहून संतोष मानणारा व समाधान पावणारा, शीतोष्णादिकांच्या कडक प्रसंगांमध्यें सांपडला असतांही कोणत्याही प्रकाराचा विषाद न मानणारा, सारांश प्रसंगास वश न होणारा, त्याचप्रमाणें समाधिस्थ असल्यामुळें ज्याच्या मनामधून दुसरा कांहीं बोलला तरी कायिक, वाचिक व मानासिक हर्षविषाद उत्पन्न होत नाहींत व आपण मोठें व्हावें अशी ज्याची वांच्छा नष्ट झाली, अन्नाच्छादनादिक कांहीं मिळालें तरी व न मिळालें तरी आनंद किंवा दुःख न मानणारा, सारांश शरीरास जिवंत ठेवणारें अन्नाच्छादन मिळो वा न मिळो, समत्व बुद्धीनें असणारा आणि सद्वस्तु जें आत्मस्वरूप त्यामध्येंच एकाग्रतेनें लीन होऊन 'कर्मास अकर्म मानणारा' (पहा श्लोक १८ अ० ४) जो यति आहे त्यानें शरीराच्या निर्वाहासाठीं मात्र भिक्षाटन अगर इतर कर्म शरीरमन इत्यादिकांकरवीं करविलें; सारांश 'मी स्वतः कांहीं करित नाहीं, विषय जाणणारीं शरीर, इंद्रियें मन वगैरे स्वविषयांसाठीं कर्म करित आहेत, मी अलिप्तच आहे' (पहा श्लोक २८ अ० ३) असा ज्याचा ज्ञानविज्ञानपूर्वक सिद्धांत ठरला आहे, या सिद्धांताचे रात्रंदिवस मनन करून आत्मा अकर्ता आहे असें जो उमजतो, तो भिक्षाटनादिक कर्म करितो खरा, पण कोणाच्या दृष्टीनें? भिक्षाटन वगैरे केलें असतां कर्म होतें असा त्याच्या भिक्षाटनादिकांवर आरोप करणाऱ्या सामान्य म्हणजे अज्ञानी लोकांच्या दृष्टीनें मात्र तो कर्ता होतो. त्याच्या स्वतःच्या दृष्टीनें पाहिलें तर तो अकर्ताच असतो; कारण त्याची दृष्टि श्रुतिस्मृत्यादिक प्रमाणग्रंथांच्या आधारानें व स्वतःच्या अनु-

भवानें ब्रह्ममय झाली असल्यामुळें 'कर्म नाहीं' 'आत्मा कर्ता नाहीं' अशी त्याची खातरी झालेली असते. एवंच तात्पर्यार्थ काय निघाला कीं दुसऱ्यांनीं मात्र कर्तृत्व आरोपित केलें जातें अशीं व शरीर जिवंत ठेवण्यास मात्र उपयोगीं अशीं जीं भिक्षाटनादिक कृत्यें आहेत, तीं करून सुद्धां तो बांधला जात नाहीं. 'कर्म बद्धक होतें' हा सिद्धांत येथें लागू पडत नाहीं, कारण त्याचा अभिमान व वासना हीं भस्म झालेलीं असतात. ज्ञानरूपी पावकानें त्याचा अहंकार भस्मच केलेला असतो, म्हणून खऱ्या मुमुक्षूचें कर्म त्याला बद्धक होत नाहीं. पाठीमागील सिद्धांताचेंच याही श्लोकांत समर्थन आहे.

मधु०—'यदृच्छा' = न मागतां प्राप्त झालेलें, तत्काळ तयार केलेलें व धर्मविहित असें अन्न प्राप्त ज्यायोगानें त्यास यदृच्छा म्हणतात. प्रपाकार, श्रीधर, पर्वते, चतरजी आचार्यानुवादी आहेत. द्विवेदीः जास्त म्हणतात कीं, अर्थसिद्धि झाली असतां जो उन्मत्त होत नाहीं व न झाली तर जो मत्सरयुक्त होत नाहीं, तो पूर्वोक्त गुणांनीं युक्त असणारा पुरुष निष्काम कर्मामध्यें गुंग झालेला असला तरी संन्यासीच होय. निरभिमानपणानें व निर्वासनापूर्वक जो कर्म करितो तोच खरा संन्यासी होय. 'मीं कर्मसंन्यास केला असें म्हणणारा व समजणारा पुरुष काषाय वस्त्र परिधान करणारा असला तरी तो गृहस्थच, संसारी पुरुषच, होय. सारांश अहंता व वासना नष्ट केली, म्हणजे चित्तशुद्धि होते, संन्यास सिद्ध होतो व तो पुरुष ज्ञानास योग्य होतो. शंकरानंद विस्तारानें हाच अर्थ सांगतात.

रामा०—वरील गुणांनीं युक्त अशा पुरुषानें कर्मच मात्र केलें, ज्ञान संपादन मुळींच केलें नाहीं, तरी त्याला संसार प्राप्त होत नाहीं असें म्हणतात. अर्थातच हें म्हणणें युक्तिसिद्ध नाहीं.

द्वैत०—वासना व अहंकार हीं शून्य झालीं म्हणजे कर्म बंधक होत नाहीं.

पंडित म्हणतात कीं, 'यदृच्छेनें प्राप्त झालेल्या वस्तूंपासून ज्ञानी पुरुषाला संतोष होतो त्याचें कारण हें आहेः 'कीं तृषा अथवा

क्षुधा । जेव्हां अंतरीं करिती बाधा । चित्त तेव्हां सर्वात्मबोधा । न झोंबे उत्साहें करुनी ॥ त्या क्षुधादिकांचा वळसा । निवारे जैसा तैसा । यदृच्छालाभ होतां तैसा । संतुष्ट होतो ॥ कीं भलती तृषा क्षुधा । याणें शमतां चित्ताची बाधा । दुरी होता, त्या नित्यात्मबोधा । स्पर्शोनि असेल उत्साहें ॥ सारांश कर्मफलाचा असंग व कर्तृत्वाविषयीं अभिमानशून्यता हीं मिळविलीं म्हणजे वरील गुण प्राप्त होतात; पुढें ज्ञान होतें; आणि ज्ञान झाल्यावर प्रारब्धवशानें कर्म होत असलें तरी तें बद्धक होत नाहीं. रंगनाथाचा हाच आशय आहे. ॥ २२ ॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गमित्यनेन श्लोकेन यः प्रारब्धकर्मा सन्यदा निष्क्रियब्रह्मात्मदर्शनसंपन्नः स्यात्तदा तस्याऽऽत्मनः कर्तृकर्मप्रयोजनाभावदर्शिनः कर्मपरित्यागे प्राप्ते कुतश्चिन्निमित्तात्तदसंभवे सति पूर्ववत्तस्मिन्कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति स इति कर्माभावः प्रदर्शितः । यस्यैव कर्माभावो दर्शितस्तस्यैव—

गुरु—'कर्मफलाचा अभिलाष टाकून देऊन' या २० व्या श्लोकांत काय सांगितलें बरें ?

शिष्य—तेथें सांगितलें कीं पूर्वकर्मामुळें देह प्राप्त होऊन जो कर्म करावयास लागला, परंतु ज्याला पुढें लवकरच आत्मस्वरूपाची ओळख होऊन ब्रह्म हें निष्क्रिय व निश्चल आहे असें कळल्यामुळें व आत्म्याच्या ठिकाणीं कर्तृत्वाचा, कर्म करण्याचा किंवा कर्म होण्याचा व त्याचप्रमाणें कोणताही हेतु असण्याचा, असंभवच असल्यामुळें कर्मत्याग करण्याची पाळी आली, त्या पुरुषाला कांहींएक निमित्तानें कर्म करण्याचा प्रसंग येऊन ठेपला, व तो कर्म करित राहिला तरी त्याच्या हातून होणारें कर्म नैष्कर्म्यतुल्यच होतें.

गुरु—शाबास! बरोबर समजलास! अशा पुरुषाच्या कर्माविषयीं सांगतातः—

गतसङ्गस्य मुक्तस्य
ज्ञानावस्थितचेतसः ॥
यज्ञायाऽऽचरतः कर्म
समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

गतसङ्गस्य (ज्याची विषयावरील सर्व आसक्ति नाहींशी झाली) **मुक्तस्य** (जो केवळ मुक्तच झाला), **ज्ञानावस्थितचेतसः** (ज्याचें अंतःकरण स्वस्वरूपाचें ठायींच दृढ होऊन बसलें)–आणि–**यज्ञाय आचरतः** (जो सर्व कर्म यज्ञयागासाठीं मात्र करितो)–त्याचें–**समग्रं कर्म** (सर्व कर्म; सबीज, सफल आणि समूळ सर्व कर्म) **प्रविलीयते** (नाहींसें होतें.)–सारांश विषयावरील आसक्ति शून्य होऊन जो मुक्त झाला, ज्याचें चित्तसर्वस्व ब्रह्मानुभवामध्यें लीन होऊन गेलें आणि ज्याचीं सर्व कर्मे केवळ लोकोपकारासाठीं मात्र होत असतात, त्यानें केलेलीं कर्मे फलशून्य होतात, अर्थात तीं कर्मे त्यास बद्धक होत नाहींत.—

गतसङ्गस्य सर्वतो निवृत्तासक्तेर्मुक्तस्य निवृत्तधर्माधर्मादिबन्धनस्य ज्ञानावस्थितचेतसो ज्ञान एवावस्थितं चेतो यस्य सोऽयं ज्ञानावस्थितचेतास्तस्य यज्ञाय यज्ञनिवृत्त्यर्थमाचरतो निर्वर्तयतः कर्म समग्रं सहाग्रेण फलेन वर्तत इति समग्रं कर्म तत्समग्रं प्रविलियते विनश्यतीत्यर्थः ॥ १३ ॥

सर्व प्रकारच्या विषयांपासून जो विरक्त झाला आहे, परब्रह्माचें ज्ञान झाल्यामुळें धर्म, अधर्म वगैरेचीं बंधनें तुटून गेलीं आहेत, निर्विकल्प परब्रह्मस्वरूपी ज्ञानाचे ठायीं ज्याचें चित्त रममाण होऊन राहिलें आहे त्यानें यज्ञासाठीं अथवा 'यज्ञ म्हणजे विष्णु' तेव्हां सर्वव्यापक जो परमेश्वर त्याला संतोष व्हावा म्हणून जें निष्काम कर्माचें आचरण होतें, सारांश सर्वव्यापी परमेश्वर मात्र तुष्ट व्हावा,

यापेक्षां जास्त कांहीं ज्याला मागावयाचें नाहीं, म्हणून जें निष्कामकर्म होतें तें सर्व कर्म फलामकट शून्यच होतें.

शिष्य—होय, म्हणजे ज्याची वासनाच नष्ट झाली, म्हणून त्याचें कर्म करणें तें स्वार्थशून्य होत असतें; अशा पुरुषाला फलाची आशा नसणें सहजच आहे. सारांश पूर्णज्ञान झाल्यावर लोककल्याणासाठीं जर ज्ञानी पुरुषास कर्म करावें लागलें तर तें कर्म ज्ञानमार्गास बद्धक होत नाहीं.

गुरु—बरोबर! यावरून मोक्ष मिळविण्याला ज्ञान व कर्म हीं दोन्हीं पाहिजेत, असा नाहीं बरें अर्थ! वरील ज्ञानी पुरुष विज्ञान झाल्याबरोबरच मुक्त होतो. त्याचें जें कर्म होतें तें स्वतःच्या मोक्षासाठीं नसतें, तर दुसऱ्यास ज्ञान होऊन त्यांनीं कर्मापासून निवृत्त व्हावें यासाठीं असतें.

मधु०—२१ व २२ श्लोक यतिसंबंधें झाले; आतां गृहस्थांचें यज्ञादिक कर्म बाधक होतें कीं काय, ह्या प्रश्नाचें निराकरण प्रस्तुत श्लोकांत करितात; हा श्लोक २० व्या श्लोकाचा विस्तार होय. आचार्यासारखाच अर्थ आहे. 'समग्रं='फलासहित. 'प्रविलीयते='कारणासहित. फलोत्पादी कर्माचा नाश होतो. प्रपा०—' समग्रं' = वासनेसहित. श्रीधर०-आचार्यानुगामी आहेत. शंकरानंदांनीं लोकसंग्रहार्थ होणाऱ्या कर्माविषयीं, शंका काढून असें सिद्ध केलें आहे कीं ज्ञानी पुरुषास लोकसंग्रहार्थ केलेलें कर्म बाधक होत नाहीं.

चतरजी—मुक्त=अहंभावशून्य. यज्ञाशिवाय, लोकसंग्रहाशिवाय, परमेश्वरप्रीतीशिवाय, दुसऱ्या प्रकारचें कर्म करणें ज्ञानी पुरुषाला शक्यच नाहीं.

पर्वते—कर्म म्हणजे क्रियमाण अथवा नवीन होणारें कर्म. हें नाशाप्रत पावतें. द्विवेदी ज्ञानी पुरुषाचें कर्म यज्ञात्मकच असतें.

रामा०-प्राचीन कर्म नष्ट होतें, संचित कर्म नष्ट होतें, असें म्हणतात. 'आत्म्याशिवाय ज्याचा इतर वस्तुविषयक संग नाहींसा झाला आहे.' असा गतसंग याचा अर्थ करितात. हा अर्थ अद्वैत-

विरोधी आहे. ब्रह्म झालेल्या पुरुषास आत्म्याचा संग असतो असें म्हणणें विसंगत आहे.

द्वैतवादी---अर्थ सरळ आहे.

ज्ञानेश्वरः---कर्मविलय कसा होतो तें सांगतातः– **अकाळींचीं अभ्रें जैशीं। ऊर्मींविण** (वृष्टिवांचून) **आकाशीं। हारपती आ-पैशी** (आपोआप) **। उदयलीं सातीं** (उगवल्याबरोबर) **॥ तैसीं विधिविधानें विहितें। जरी आचरे तो समस्ते। तरी तिथें ऐक्यभावें ऐक्यातें। पावतीचिगा ॥**

पंडितांनीं---निर्गुणोपासक व सगुणोपासक यांविषयीं बराच विस्तार केला आहे, त्याचा विचार पुढील श्लोकांचें व्याख्यान आटपल्यावर करूं.

गीताव्याख्याकार– ' यज्ञ '= स्वधर्म. हा आचरण करावयाचा तो लोकसंग्रहाप्रीत्यर्थच होय.

टामसन---' मुक्तस्य ' या स्थानीं ' युक्तस्य ' असा पाठ घेतात. हा पाठ असमंजस आहे. ज्ञानानें एकत्व प्राप्त होऊन जो निःसंग झाला तो मुक्तच होता. शिवाय हा पाठ एक दोन प्रतींशिवाय कोठेंही आढळत नाहीं. ॥ २३ ॥

कस्मात्पुनः कारणात्क्रियमाणं कर्म स्वकार्यारम्भमकुर्वत्समग्रं प्रविलीयत इत्युच्यते यतः—

शिष्य—पण गुरुजी! ' नाभुक्तं क्षीयते कर्म ' (फल उत्पन्न होऊन तें भोगिल्याशिवाय कर्माचा नाश होत नाहीं) अशी जी स्मृति आहे तिचा परिहार कसा करावयाचा? कर्म करावयास लागलें म्हणजे त्याचें फल निर्माण व्हावयाचेंच; तें आरंभिलेलें कर्म समग्र नाहींसें होतें असें म्हणण्यास आधार काय?

गुरु—आलास पुनः ' पहिले पाढे पढे पंचावन् ' वर! कसें होतें तें सांगतातः—

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ॥
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥२४॥

ब्रह्म अर्पणं (ज्या उपकरणांच्या साहाय्यानें यज्ञ करितात तीं साधनें ब्रह्मच) **ब्रह्म हविः** (जी आपण यज्ञांत आहुति टाकितों ती ब्रह्मच) **ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्** (ब्रह्मस्वरूपी अग्नीमध्यें ब्रह्मरूपी पुरुषानेंच ती ब्रह्मस्वरूपी आहुति ब्रह्मस्वरूपी उपकरणांनीं दिलेली असते म्हणून) **ब्रह्मकर्मसमाधिना तेन** (ब्रह्मस्वरूपाचें चिंतन करावयाचें हीच ज्याच्या कर्माची समाधि आहे त्यानें) **ब्रह्मैव गन्तव्यं** (ब्रह्मपदाला जावें हेंच योग्य आहे) सारांश ज्याच्या स्थैर्य पावलेल्या बुद्धीला कर्ता, कर्म, करण आणि क्रिया हीं सर्वच अविशेषानें, भेदशून्य होऊन ब्रह्म झालीं त्याला त्या ब्रह्मस्वरूपीं (अकर्मक) कर्माचें फल ब्रह्मच होणें हेंच योग्य होय.

ब्रह्मेति । ब्रह्मार्पणं येन करणेन ब्रह्मविद्धविरग्नावर्पयति तद्ब्रह्मैवेति पश्यति तस्याऽऽत्मव्यतिरेकेणाभावं पश्यति यथा-शुक्तिकायां रजताभावं पश्यति तदुच्यते ब्रह्मैवार्पणमिति । यथा यद्रजतं तच्छुक्तिकैवेति । ब्रह्म अर्पणमित्यसमस्ते पदे यदर्पणबुद्ध्या गृह्यते लोके तदस्य ब्रह्मविदो ब्रह्मैवेत्यर्थः ।

ज्या उपकरणांच्या साहाय्यानें, हात, पळी वगैरेंच्या साहाय्यानें, अग्नीमध्यें आहुतींचा अर्पणविधि करावयाचा तीं ब्रह्मच आहेत, आत्म्याहून तीं निराळीं नाहींत. असें जो पाहतो, त्याला,—सारांश ज्ञान झाल्यावर शिंपल्याचे ठायीं ज्याप्रमाणें रुप्याचा होणारा आभास नष्टच होतो, तसेंच पूर्ण ब्रह्मज्ञान झाल्यावर हात, पळी वगैरे यज्ञाची आयुधेंही—त्याला ब्रह्ममयच दिसतात, जें रजत् (रुपें) म्हणून वाटत होतें तें स्वस्वरूपानें रुपें नसून तो शिंपलाच आहे असें त्याला समजतें, त्याचप्रमाणें उपकरणें हीं उपकरणें नसून ब्रह्मच आहेत असा त्याचा निश्चय होतो.

शिष्य—ब्रह्माला अर्पण करणें असा 'ब्रह्मार्पण' हा शब्द सामासिक आहे असें समजून त्याचा अर्थ केला तर?

गुरु—अरे येथें समास इष्ट नाहीं. 'ब्रह्म हविः' वगैरे शब्द समासांत नाहींत तेव्हां येथेंही समास करणें योग्य नाहीं. तात्पर्य हें आहे कीं हीं

उपकरणें आहेत, असें ज्यांस व्यवहारांत समजतात, तीं उपकरणें नसून ब्रह्मवेत्त्याच्या दृष्टीनें तीं ब्रह्म असतात.

ब्रह्महविस्तथा यद्धविर्बुध्या गृह्यमाणं तद्ब्रह्मैवास्य । तथा ब्रह्माग्नाविति समस्तं पदम् । अग्निरपि ब्रह्मैव यत्र हूयते ब्रह्मणा कर्त्रा ब्रह्मैव कर्तेत्यर्थः । यत्तेन हुतं हवनक्रिया तद्ब्रह्मैव । यत्तेन गन्तव्यं फलं तदपि ब्रह्मैव । ब्रह्मकर्मसमाधिना ब्रह्मैव गन्तव्यम् । एवं लोकसंग्रहं चिकीर्षुणाऽपि क्रियमाणं कर्म परमार्थतोऽकर्म ब्रह्मबुद्ध्युपमृदितत्वात् । एवं सति निवृत्तकर्मणोऽपि सर्वकर्मसंन्यासिनः सम्यग्दर्शनस्तुत्यर्थं यज्ञत्वसंपादनं ज्ञानस्य सुतरामुपपद्यते यदर्पणाद्यधियज्ञे प्रसिद्धं तदस्याध्यात्मं ब्रह्मैव परमार्थदर्शिन इति । अन्यथा सर्वस्य ब्रह्मत्वेऽर्पणादीनामेव विशेषतो ब्रह्मत्वाभिधानमनर्थकं स्यात् । तस्माद्ब्रह्मैवेदं सर्वमित्यभिजानतो विदुषः सर्वकर्माभावः । कारकबुद्ध्यभावाच्च । न हि कारकबुद्धिरहितं यज्ञाख्यं कर्म दृष्टम् । सर्वमेवाग्निहोत्रादिकं कर्म शब्दसमर्पितदेवताविशेषसंप्रदानादिकारकबुद्धिमत्कर्त्रभिमानफलाभिसंधिमच्च दृष्टं नोपमृदितक्रियाकारकफलभेदबुद्धिमत्कर्तृत्वाभिमानफलाभिसंधिरहितं वा । इदं तु ब्रह्मबुद्ध्युपमृदितार्पणादिकारकक्रियाफलभेदबुद्धि कर्मातोऽकर्मैव तत् ॥

तसेंच ज्याला अज्ञानी लोक आहुति असें समजतात तेंही त्याला ब्रह्मच होतें. याचप्रमाणें जेथें आपण आहुति अर्पण करितों, तो अग्नि ब्रह्म व हवनकर्ता तोही ब्रह्म; त्या आहुति देणाराची जी क्रिया ती ब्रह्म आणि या ब्रह्मस्वरूपी परंतु व्यावहारिक लोकांस मात्र भासणाऱ्या कर्माचें फलही अर्थातच त्या ब्रह्मनिष्ठ ज्ञानी पुरुषाला ब्रह्मपदप्राप्ति हें होतें. मोक्ष हा शेवटचा पुरुषार्थ मिळणें हीच त्याच्या कर्माची गति, फल होय. वत्सा! याप्रमाणें ब्रह्मज्ञान झाल्यानंतर ज्यांचें कर्म संपतें, जे सर्व कर्माचा

त्याग ज्ञानपूर्वक करितात, परंतु सामान्य जनांस ज्ञानमार्गाचा क्रमाक्रमानें व अधिकारानुरूप उपदेश करून त्यांचा उद्धार करण्यासाठीं मात्र जे ज्ञानी पुरुष कर्म करितात, त्यांस तें कर्म अफलप्रद, अकर्मक होतें; कारण त्यांचा स्वतःचा कर्माभिमान आणि फलवांच्छा हीं स्वस्वरूपरूपी ज्ञानाच्या प्रखर ज्वालेनें केव्हांच भस्म होऊन गेलेलीं असतात. हा खरा व वास्तविक प्रकार असल्यामुळें ब्रह्मज्ञानाला यज्ञाचें जें रूपक भगवंतांनीं योजिलें आहे व सर्व कर्मांचा त्याग करणारे ब्रह्मज्ञानीसुद्धां यज्ञादिक कर्में करितात हें सांगितलें आहे तें सर्व आत्मज्ञानाचें महत्त्व अज्ञ लोकांच्या दृष्टीनें वाढावें एतदर्थच आहे व हे रूपक येथें उत्कृष्ट तऱ्हेनें शोभत असून स्वतः मुक्त झालेल्या मनुष्यानें लोकसंग्रहार्थ, लोकांचा उद्धार करण्याच्या बुद्धीनें, कर्म केलें असतां कर्त्यास तें बाधक होत नाहीं, एवढेंच नव्हें, तर या निष्पाप, निर्लोभ, निर्मळ व निरहंकार बुद्धीनें केलेल्या कर्मांचा उपयोग ब्रह्मज्ञानाची महती वाढविण्याकडेच होतो असेंही प्रकट केलें आहे सारांश अर्पण वगैरे जें सर्व खऱ्या यज्ञामध्यें प्रसिद्ध आहे, तें या ज्ञानी पुरुषाला ज्ञानरूपी होऊन एकंदर सर्वत्र ब्रह्मदर्शनाचेंच फल उत्पन्न करितें. त्याचा यज्ञ म्हणजे सामान्य लोकांनीं केलेला सहेतुक यज्ञ नव्हे, तर निष्फळ ब्रह्मयज्ञ असतो. याप्रमाणें या रूपकाची सार्थकता होते.

शिष्य—हें रूपकच आहे हें कशावरून ? हा कर्मठाचाच यज्ञ असावा.

गुरु—नाहीं. तूं म्हणतोस तसा अर्थ घेतला तर 'ज्याचा निश्चय सर्वच ब्रह्म आहे,' असा झाला आहे, त्याला कर्ता, कर्म, करण, क्रिया हीं ब्रह्मच आहेत असें बुद्धया सांगावयाचें प्रयोजन काय ? कर्मठांचा हा यज्ञ नव्हे, कारण येथें अभिमान व वासना यांचा अभाव आहे. म्हणून येथें कर्मांचा अभाव आहे. सर्व ब्रह्म आहे, कर्ता, कर्म, करण, क्रिया, वगैरे सर्वच ब्रह्म असा ज्याला साक्षात्कार झाला, तो अभिमानानें अगर वांच्छा धरून कर्म करित नाहीं, म्हणून ज्ञानी

पुरुषानें लोकहितार्थ मात्र कर्म केलें तर तें अकर्मच होतें. सारांश तो कर्म करित नाहीं; कारण 'मी कर्ता, हें कर्म, हीं उपकरणें' वगैरे अभिमान व ज्ञान तेथें नसतात. कर्मठांचा जो यज्ञ आहे तो कर्तृत्वाभिमान, कर्मफलवांच्छा, इत्यादि शिवाय होत नाहीं. आपण जें काय करितों तें कर्म, ज्या देवतांच्या नामांचा उच्चार करून (इंद्राला हा हविर्भाग असो, हा अग्नीला असो, हा वरुणाला असो; वगैरे) त्यांस हा हवि असो, असें जें आपण अर्पण करितो तो संप्रदानविधि 'मी अर्पण करितों,' हा कर्तृत्वाचा अभिमान आणि 'मला फळ मिळावें' ही आशा व 'मिळेल' हा निश्चय इत्यादि गोष्टींनीं युक्त असा कर्मठांचा यज्ञ असतो. क्रिया, कर्म, कर्ता, करण, फळ इत्यादिकां-मधील भेदबुद्धीचा, कर्तृत्वाभिमानाचा व फलवासनेचा नाश जेथें झालेला नसतो त्यासच कर्मठांचा यज्ञ असें ह्मणावयाचें. ज्ञानी पुरु-षाचें तसें नाहीं. ब्रह्मज्ञान व ब्रह्मानुभव यांच्यायोगानें क्रिया, कारक वगैरे सर्व प्रकारची द्वैतबुद्धी अगर भेदबुद्धी अस्तंगत झालेली असली, निःशेष झालेली असली ह्मणजे ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रहार्थ किंवा स्वतःचे शरीर जिवंत मात्र ठेवण्यासाठीं केलेलें कर्म अकर्मच होतें.

तथा च दर्शितं—'कर्मण्यकर्म यः पश्येत्' 'कर्मण्यभि-प्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः' 'गुणा गुणेषु वर्तन्ते' नैव किंचित्करोमीति' 'युक्तो मन्येत तत्त्ववित्' इत्यादिभिः। तथा च दर्शयंस्तत्र तत्र क्रियाकारणफलभेदबुद्ध्युपमर्दं करोति दृष्टा च काम्याग्निहोत्रादौ कामोपमर्देन काम्याग्नि-होत्रादिहानिः। यथा मतिपूर्वकादीनां कर्मणां कार्यविशेष-स्याऽऽरम्भकत्वं दृष्टं तथेहापि ब्रह्मबुद्ध्युपमृदितार्पणा-दिकारकक्रियाफलभेदबुद्धेर्बाह्यचेष्टामात्रेण कर्मापि विदुषोऽ-कर्म संपद्यते। अत उक्तं समग्रं प्रविलीयत इति। अत्र केचिदाहुर्यद्ब्रह्म तदर्पणादीनि। ब्रह्मैव किलार्पणादिना पञ्च-विधेन कारकात्मना व्यवस्थितं सत्तदेव कर्म करोति। तत्र नार्पणादिबुद्धिर्निवर्तते किंत्वर्पणादिषु ब्रह्मबुद्धिरा-

धीयते । यथा प्रतिमादौ विष्ण्वादिबुद्धिर्यथा वा नामादौ ब्रह्मबुद्धिरिति । सत्यमेवपि स्याद्यदि ज्ञानयज्ञस्तुत्यर्थं प्रकरणं न स्यात् । अत्र तु सम्यग्दर्शनं ज्ञातयज्ञशब्दितमनेकान्यज्ञशब्दितान्क्रियाविशेषानुपन्यस्य 'श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः' इति ज्ञानं स्तौति । अत्र च समर्थमिदं वचनं ब्रह्मार्पणमित्यादि ज्ञानस्य यज्ञत्वसंपादनेऽन्यथा सर्वस्य ब्रह्मत्वेऽर्पणादीनामेव विशेषतो ब्रह्मत्वाभिधानमनर्थकं स्यात् । ये त्वर्पणादिषु प्रतिमायां विष्णुदृष्टिवद्ब्रह्मदृष्टिः क्षिप्यते नामादिष्विव चेति ब्रुवते न तेषां ब्रह्मविद्योक्तेह विवक्षिता स्यादर्पणादिविषयत्वाज्ज्ञानस्य । न च दृष्टिसंपादनज्ञानेन मोक्षफलं प्राप्यते 'ब्रह्मैव तेन गन्तव्यम्' इति चोच्यते। विरुद्धं च सम्यग्दर्शनमन्तरेण मोक्षफलं प्राप्यत इति । प्रकृतविरोधश्च । सम्यग्दर्शनं च प्रकृतं 'कर्मण्यकर्म यः पश्येत्' इत्यत्रान्ते च सम्यग्दर्शनं तस्यैवोपसंहारात् । श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः' 'ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिम्' इत्यादिना सम्यग्दर्शनस्तुतिमेव कुर्वन्नुपक्षीणोऽध्यायः । तत्राकस्मादर्पणादौ ब्रह्मदृष्टिरप्रकरणे प्रतिमायामिव विष्णुदृष्टिरुच्यत इत्यनुपपन्नम् । तस्माद्यथाव्याख्यातार्थ एवायं श्लोकः ॥ २४ ॥

वरीलप्रमाणेंच 'कर्माला जो अकर्म स्वरूपानें पाहतो' (पहा श्लोक १८ अ. ४) 'कर्माकडे प्रवृत्ति झालेली असते तथापि तो कांहीं करित नाहीं.' (पहा श्लोक २० अ. ४) 'इंद्रियें वगैरे आपआपल्या विषयाकडे जातात' (पहा श्लोक २८ अ. ३) 'मी स्वतः कांहींएक करित नाहीं, असें ब्रह्मज्ञानी व ब्रह्मनिष्ठ पुरुष मानितो' (पहा श्लोक ८ अ. ५) वगैरे श्लोकांत मुख्य सिद्धांताचें प्रणयन केलें आहे. ह्या ठिकठिकाणीं प्रतिपादन केलेल्या सिद्धांतप्रणयनानें क्रिया, कर्तृत्व, कर्म इत्यादि विषयक भेदबुद्धीचा व भेदज्ञानाचा नाशच

केलेला आहे. अरे! काम्य म्हणजे फलेच्छा ठेवून आरंभिलेल्या अग्निहोत्रास आरंभ केल्यानंतर जर इच्छाच नष्ट झाली तर त्या अग्निहोत्रादिकांचें काम्यत्व नष्ट होतें असें मागेंच आपण पाहिलें आहेना? याचप्रमाणें बुद्धिपुरःसर, फल मिळावें या इच्छेनें, कर्तृत्वाचा अभिमान धरून केलेल्या, किंवा सहज गतीनें परंतु कर्तृत्वाभिमान व वासना यांनीं पूर्ण अशा प्रत्येक कर्माचा परिणाम म्हणजे कार्य उत्पन्न होतें व तें कर्तृत्वाचा अभिमान धरणाऱ्यास बाधक होतें हेंही आपण पाहिलेंच आहे. त्याच सिद्धांताचा अनुवाद करून भगवान येथें सांगतात कीं, ब्रह्मज्ञानाच्या योगानें अर्पण वगैरे क्रिया, कर्तृत्वाचा अभिमान, फलाची वासना वगैरे चटसाऱ्या भेदबुद्धि कायम ठेवणाऱ्या गोष्टींचा नाश झालेला असल्याकारणानें विद्वानानें कर्म केलें तरी तें निव्वळ चलनवलनात्मक, चेष्टारूपी होतें; आणि भेदबुद्धि अस्तंगत झाली असते म्हणून तें कर्म अकर्मस्वरूपीच होतें. म्हणून भगवान म्हणतातः ' त्या सर्व कर्मांचा नाश होतो ' (पहा श्लोक २३ अ. ४.)

शिष्य—म्हणजे असेंना म्हणण्याचा आपला भाव कीं, ब्रह्म म्हणजेच अर्पणाचीं साधनें वगैरे आहे? अथवा ब्रह्म हेंच कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अधिकरण होऊन तें आपणच कर्म करितें. येथें अर्पणबुद्धि (पळी वगैरे आहे ही बुद्धि) नाहींशी होते असें नाहीं, तर त्या पळीवरच ब्रह्मबुद्धीचा विचारपूर्वक आरोप आपण करितों. जसें प्रतिमा किंवा मूर्ति करवून त्यांवर जसा आपण विष्णु वगैरे देवतांचा आरोप करितों, किंवा देवता—नामाचे ठिकाणीं ब्रह्मबुद्धीचा आरोप करितो, तसाच पळीवरही आपण ब्रह्माचा आरोप करितों व ब्रह्म करित आहे असें म्हणतों! असाचना आपला अर्थ?

गुरुजी—होय तूं म्हणतोस तसाही शब्दार्थ करण्याला हरकत नसती, तर आम्हीं खुशाल तुझाही अर्थ स्वीकृत केला असता. पण हें प्रकरण ज्ञानयज्ञाचें आहे हीच मोठी हरकत आहे! सम्यग्दर्शन होणें, आत्मस्वरूपाचें ज्ञान होणें, यालाच भगवंतांनीं ज्ञानयज्ञ असें नांव दिलें आहे. आणि यज्ञ शब्दानें व्यक्त होणाऱ्या अनेक क्रियांचा उपन्यास करून ' द्रव्यपूर्ण यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. ' असें

सांगून ज्ञानाची स्तुति केली आहे. शिवाय 'पळी हें ब्रह्म आहे' इत्यादि, असे मूळ श्लोकांत शब्द आहेत, ते ज्ञानाला यज्ञस्वरूप देण्याला, ज्ञानास अलंकारानें यज्ञ करण्याला समर्थ आहेत, म्हणजे त्या शब्दांनींच ज्ञान हा एक यज्ञ आहे असा अर्थ करण्याला समर्थ आहेत. समजलें ? आतां तुझ्या म्हणण्याप्रमाणें अर्थ केल्यास एक अनर्थ होतो.

शिष्य—तो काय ?

गुरु—तो असा कीं जेथें 'सर्वच ब्रह्म आहे;' असें ज्ञान झालें तेथें पळी ब्रह्म आहे, दर्वी ब्रह्म आहे, कर्ता ब्रह्म आहे असें विशेषत्वानें सांगण्यांत श्लोकाचें स्वारस्य नाहींसें होतें.–पृथ्वीवर सूर्य उगवतो, असें विधान केल्यावर हिंदुस्थानावर सूर्य उगवतो, इंग्लंडावर उगवतो, किंवा अमेरिकेवर उगवतो, हें सांगणें व्यर्थच होय ! भगवान् व्यर्थ असें कधीं बोलणार नाहींत. आतां नामावर ब्रह्माचा आरोप किंवा प्रतिमावर विष्णूचा आरोप करितों त्याप्रमाणेंच दर्वीवर ब्रह्माचा आरोप केलेला आहे, असें म्हटलें तर तूं म्हणतोस तें ज्ञान येथें सांगावयाचें नाहीं, तें तेथें विवक्षित नाहीं. तुझ्या म्हणण्यानें पळी, दर्वी वगैरे ज्ञानाचे विषय होतील आणि हें भिन्न विषय तर इष्ट नाहीं. पळीवर ब्रह्माचा आरोप करण्यानें कधींही मोक्ष मिळणार नाहीं; आणि आपल्यास तर मोक्ष मिळावयाचा आहे. 'त्याला ब्रह्माचा लाभ होईल' असेंही भगवंतांनीं सांगितलें आहे. शिवाय, मूळ सिद्धांताशीं या अर्थाचा विरोध येतो ह्मणजे नुसता आरोप केला असतां मोक्ष मिळतो असें तुझ्या म्हणण्यानें होतें. पण सम्यग्दर्शन, खरें ज्ञान, झाल्याविना मोक्ष नाहीं, असा वेदांतशास्त्रांचा मुख्य सिद्धांत आहे. शेवटीं तुझें म्हणणें प्रकृतविषयास बाधक होतें. सम्यग्दर्शन हें प्रस्तुतचें प्रकरण आहे. 'कर्मास अकर्म स्वरूपानें जो पाहतों' वगैरे श्लोक सम्यग्दर्शनासंबंधी आहेत. अध्यायाच्या शेवटीं ही सम्यग्दर्शनाचाच विषय आहे. 'द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे' हा (श्लोक ३३ अ० ४) व 'ज्ञान प्राप्त झाल्यावर अतिश्रेष्ठ शांति, चित्ताचें समाधान, त्यास मिळते' (श्लोक ३९ अ० ४) वगैरे श्लोकांत या प्रकरणाचा उपसंहार झाला आहे.

सम्यग्दर्शनाची स्तुति सर्व अध्यायभर यथास्थित केल्यामुळें या अध्यायास सम्यग्दर्शनी अध्याय असें ह्मणावें लागतें. सारांश सम्यग्दर्शनाची स्तुति करितां करितां अध्याय थकून गेला आहे! तेव्हां सर्वत्र सम्यग्दर्शनाचा विषय असतां मध्येंच एकाएकी, पळीवर ब्रह्मस्वरूपाचा आरोप करणें हें अप्रस्तुत होईल. प्रतिमा व विष्णु हा दृष्टांत दिला आहे तोही अप्रस्तुत आणि ह्मणून अयोग्य आहे. सारांश, आम्ही जो अर्थ केला आहे, तोच खरा आहे.

मधु०–सर्वत्र आचार्यानुवाद आहे. ब्रह्मदृष्टि झालेल्या ज्ञानी पुरुषांचें अद्वैतज्ञानपूर्वक होत असणारें कर्म फलप्रद कां होत नाहीं? त्या प्रश्नास प्रस्तुत श्लोकांत उत्तर दिलें आहे. वार्तिककार म्हणतातः–

“ कारकव्यवहारे हि शुद्धं वस्तु न वीक्ष्यते।
शुद्धे वस्तुनि सिद्धेत्तत्कारकव्यापृतिः कुतः ”

(कर्ता, कर्म वगैरे दृष्टीनें व्यवहार होत असतां ब्रह्मज्ञान होत नाहीं. पण एकदां ब्रह्मज्ञानाचा अनुभव येऊन ब्रह्ममयच सर्व झालें म्हणजे कर्ता, कर्म, कार्य अशी दृष्टीच उरत नाहीं.) प्रपाकार, श्रीधर चतरजी, पर्वते, द्विवेदी हे सर्व आचार्यानुवाद करितात. येथें अर्थातच कालस्थलाची उपाधि नष्ट झाली. म्हणजे ब्रह्म कालाबाधित व स्थलाबाधित आहे असें सिद्ध झालें.

शंकरा०–या श्लोकाचें तात्पर्य सांगतातः लोकहितासाठीं प्रवृत्त होणारा विद्वान जो असतो त्याचें कर्म व कर्मसाधनें ब्रह्मदृष्टीनें दग्ध होतात. ह्यानें केलेलें कर्म लोकहितात्मक होतें. म्हणून ब्रह्मदृष्टि पुरुषांनीं ब्रह्मज्ञानपूर्वकच व्यवहार करावा व तसा ते करितात हा.

रामानुज–‘ जें जें कांहीं आपण करितों तें परब्रह्मात्मकच आहे असें अनुसंधान ठेवून केलेलें मुमुक्षूंचें कर्म ज्ञानमयच होतें, त्याच योगानें आत्मसाक्षात्कार होतो. **येथें ज्ञाननिष्ठा असण्याचें कांहीं कारण नाहीं.** ’ हा अर्थ आग्रहाचा होय. मीं कर्ता व मला फळ मिळावयाचें ह्या दोन्ही उपाधि सुटल्या म्हणजे परमेश्वरार्पण बुद्धीनें केलेलें कर्म चित्तशुद्धि करितें व पुढें ‘ मी ब्रह्म आहें ’ असा गुरूपदेशावरून साक्षात्कार होतो. सारांश ज्ञान अवश्य आहे. (श्लो. ३३, अध्या. ४ पहा.)

द्वैत०—'त्वदधीनं यतः सर्वमतः सर्वो भवानिति' असा पद्मपुराणांतील आधार घेऊन 'परमेश्वराधीन सर्व आहे म्हणून सर्व परमेश्वर आहे' असा प्रस्तुत श्लोकाचा अर्थ करितात. 'सर्व कर्ता करविता, कर्म, फल इत्यादि सर्व परमेश्वर आहे, मी स्वतंत्र नाहीं,' हें जें ज्ञान त्यास ब्रह्मज्ञान म्हणतात.

पंडितांचें व्याख्यान वाचनीय आहे. सगुण उपासनेनें निर्गुणाकडे जावें असा मथितार्थ आहे. ॥

दहाव्या श्लोकापासून तों २४ व्या श्लोकांपर्यंत अनेक विषय आले आहेत. त्यांचा सांगोपांग विस्तार चवथ्या अध्यायाच्या उपसंहारसमयीं मी करणार आहेंच. आतां केवळ दिग्दर्शनासाठीं मात्र कांहीं गोष्टी सांगून ठेवितों.

दहाव्या श्लोकांत चित्त निर्मळ करणारें कर्म, एकनिष्ठता उत्पन्न करणारी भगवंताची उपासना व द्वैताभाव करणारे ज्ञान, अद्वैत ज्ञान अशीं तादात्म्य, सायुज्य, नामक मोक्षाची सोपान परंपरा सांगितली. प्रथम कर्म, नंतर उपासना आणि नंतर ज्ञान असा हा मोक्षाचा जिना आहे. हा मोक्षाचा एकच वर्त्म म्हणजे मार्ग आहे. पुढच्या श्लोकांत सर्व विश्वसंमत असा न्याय सांगितला कीं 'जो ज्याप्रमाणें माझी आराधना करित असेल, ज्या मार्गाचा आश्रय धरून माझ्याकडे येण्याचा प्रयत्न करित असेल त्याच्या त्या त्या आराधनेप्रमाणें व मार्गानुसार मीही त्यास फल देत असतो.' ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें व प्रयत्नाप्रमाणें प्रत्येकास फल मिळावें असें विचाराअंतीं निःष्पक्षपातीं मनुष्यास कबूल करावें लागेल; व याप्रमाणेंच विश्वव्यवस्थेंत हें फल तत्क्षणीं किंवा कालांतरानें बिनचुक मिळत असतें हा अनुभव प्रत्येकास येत असतो; म्हणून भगवंताचें म्हणणें महानास्तिकापासून तों थेट परोक्ष ब्रह्मज्ञान झालेल्या योग्यापर्यंत आणि साळ्याभोळ्या पोरासोरापासून तों स्पेन्सरप्रभृति महाशास्त्र्यांपर्यंत सर्वांस समजण्यासारखें व संमत होण्यासारखें आहे. कर्माप्रमाणें फळ हा सर्वगामी सिद्धांत सर्व परिस्थितीमध्यें अबाधित आहे. असो; आतां हा सिद्धांत जर खरा आहे व प्रत्येक जीवास परमावधीचें सुख जर हवें असतें, तर प्रत्येक जीव भगवंतांनीं

सांगितलेले तीनही मजले क्रमाक्रमानें कां आक्रमण करित नाहींत असा प्रश्न येतो, त्याचे उत्तरादाखल, सामान्यतः लोक कर्माचरण कोणत्या हेतूस्तव करितात त्याची मीमांसा करण्यासाठीं आणि कर्मापासून नैष्कर्म्य उत्पन्न करून चित्तशुद्धि कशी करून घ्यावी एतदर्थ बाराव्या श्लोकापासून तों २४ व्या श्लोकापर्यंतचा पुढील विषयावतार आहे. हा सामान्यच नियम आहे कीं निष्काम कर्म करून उपासनामार्गानें अद्वैतज्ञानाची प्राप्ति कालांतरानें, केव्हां केव्हां तर जन्मांतरांनीं सुद्धां करून घ्यावयाची एवढें बुद्धिसामर्थ्य, धैर्यसामर्थ्य व शांतिसामर्थ्य प्राकृत जीवांमध्यें नसल्यामुळें 'तुरुतदान महापुण्य' या न्यायानें ही सर्व मंडळी लवकर प्रसन्न होणाऱ्या क्षुद्र देवतांचें आराधन करून इष्टफलाची म्हणजे सुख देणाऱ्या वस्तूंची प्राप्ति करून घेतात; किंवा सकाम उपासनेवरच संतुष्ट राहतात. हे सुख कायमचें नाहीं असें त्यांस ठाऊकही नसतें आणि ठाऊक असलें तरी ह्या ज्ञानाचा त्या अधीर पुरुषांस कांहीं उपयोगही तात्काल होत नाहीं. कारण त्यांची बुद्धि व वासना ह्या त्यांच्या पूर्वकर्मानें नियमित झालेल्या असतात. भगवान म्हणतातः 'ज्याच्या त्याच्या गुणांप्रमाणें व कर्मांप्रमाणें जन्म देण्याचें काम माझ्याकडेच असतें म्हणून पूर्वकर्म आणि वर्तमान जन्म यांमध्यें विरोध येण्याचा संभवच नाहीं; गुणकर्म चांगलें आणि जन्म वाईट किंवा जन्म चांगला आणि पूर्वकर्म वाईट असा विसंवाद होणें संभवनीय नाहीं. असो; तेव्हां सकाम कर्मे करणारे प्राकृतजन अद्वैतज्ञानाकडे कां जात नाहींत याचें कारण सांगितलें. यावरून पूर्वकर्मानें सर्व जीव बद्ध झाले आहेत, त्यांस विचारस्वातंत्र्य बिलकूल नाहीं, असें मात्र समजूं नये. प्रत्यक्ष परमेश्वरही लोकसंग्रहार्थ कर्म निष्कामत्वानें करीत आहे, असें ज्ञान जर यांस झालें तर या लोकांसही त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें निष्काम कर्म करण्याची प्रेरणा होऊन ते निष्कामत्वानें विहित कर्म करूं लागतील आणि नंतर ज्ञानप्राप्ति गुरुद्वारां करून घेऊन उपासना व निदिध्यासन या योगांनीं साक्षात्कार पावून मुक्त होतील. सारांश निष्कामकर्म ही ज्ञानाची पहिली पायरी आहे व ही पायरी

योगमार्गानें जे जे मुमुक्षू चढले ते ते सर्व योग्यता प्राप्त झाल्यावर मोक्षालाच गेले.

आतां कर्म म्हणजे काय कीं जें समजलें असतां मोक्षमार्गांत प्रवेश होतो त्याची मीमांसा भगवंतांनीं व भगवद्रहस्य ज्या महापुरुषामध्यें पूर्णपणें बाणलें होतें त्या विश्ववंद्य आचार्यांनीं १७ ते २४ श्लोकांमध्यें व भाष्यामध्यें उत्कृष्ट तऱ्हेनें केली आहे. ह्या मीमांसेवर आक्षेप घेणें म्हणजे सूर्य अंधेर कां प्रगट करित नाहींत असा बालिश तर्कवाद काढण्यासारखेंच होय. शिवाय १८ व्या श्लोकावरील भाष्य इतकें विस्तृत आहे कीं कर्मासंबंधें येथें कांहीं लिहिण्याचें कारणच राहिलें नाहीं. आठरा तें चोवीस श्लोकांचें तात्पर्य एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे ' यज्ञासाठीं निराभिमानपूर्वक व निःसंगपूर्वक योग्य कर्म संतुष्ट मनानें केलें असतां तें कर्म कर्त्यास बंधक होत नाहीं.' यज्ञ म्हणजे **विषयाचा त्याग** होय. स्वार्थत्याग करून परार्थ साधावयाचा म्हणजे लोकहिताचें कर्म निष्काममनानें करावयाचें, आपल्यास संपत्ति मिळेल, कीर्ति वाढेल, वजन बसेल असली वासना ठेवून कर्म करावयाचें नाहीं, आणि शेवटीं नित्य कोणतें व अनित्य कोणतें यांमध्यें विवेक करून नित्य असा जो परमार्थ तो साध्य होईल असें कर्म म्हणजे उपासना, गुरुसेवा, इत्यादि निष्कामत्वानें करावयाच्या, हें सर्व म्हणजे यज्ञ होय. या यज्ञासाठीं केलेलें कर्म बद्धक होत नाहीं. सकाम कर्म बद्धक आहे म्हणजे सुखदुःख देणारें आहे. ज्याला निःसीम व निर्मळ आणि म्हणून नित्य सुख हवें आहे, सारांश ज्याला सुखरूपच व्हावयाचें आहे त्याला यज्ञासारखें म्हणजे स्वार्थत्यागासारखें साधनच नाहीं. असो; विषायत्यागाचा हा विषय झाला. येथून पुढें मानसिक यज्ञ सुरू व्हावयाचा आहे म्हणजे अहंकार व वासना यांचा त्याग कसा करावयाचा हा विषय सुरु होणार आहे. ॥ २४ ॥

तत्राधुना सम्यग्दर्शनस्य यज्ञत्वं संपाद्य तत्स्तुत्यर्थमन्येऽपि यज्ञा उपक्षिप्यन्ते—

याप्रमाणें सम्यग्दर्शनास यज्ञाचें स्वरूप देऊन तें वास्तविक आहे, असें सिद्ध केल्यानंतर त्याचीच स्तुति करण्यासाठीं इतर १२ प्रका-

रच्या यज्ञाचा उपक्षेप पुढील श्लोकांत करितात, अवतार करितात. मुमुक्षूंनीं अधिकारानुसार कोणता तो यज्ञ करून चित्तशुद्धि करून घ्यावी.

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ॥

ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

अपरे योगिनः (दुसरे कर्मठ) **दैवं एव यज्ञं** (देवतासंबंधीं यज्ञाची मात्र) **पर्युपासते** (उपासना करितात.) **अपरे** (तिसरे) **यज्ञेनैव** (यज्ञाच्या साहाय्यानें) **ब्रह्माग्नौ** (ब्रह्मरूपी अग्नीमध्यें) **यज्ञं** (यज्ञाचा) **जुह्वति** (होम करितात.) सारांश कांहीं कर्मठ लोक देवतादिकांचा संतोष होऊन आपल्यास सुख मिळावें, या आशेनें यज्ञाची उपासना करितात. पण याच्या उलट; कांहीं ज्ञानी यज्ञस्वरूपी जो आत्मा त्याच्या साहाय्यानें स्वतःच्या आत्म्याचा, ब्रह्मस्वरूपी अग्नीमध्यें, लय करितात.——

दैवमेवेत्यादिना। दैवमेव देवा इज्यन्ते येन यज्ञेनासौ दैवो यज्ञस्तमेवापरे यज्ञं योगिनः कर्मिणः पर्युपासते कुर्वन्तीत्यर्थः। ब्रह्माग्नौ "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म" "विज्ञानमानन्दं ब्रह्म" "यत्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म" "य आत्मा सर्वान्तरः" इत्यादिवचनोक्तमशनायादिसर्वसंसारधर्मवर्जितं नेति नेतीतिनिरस्ताशेषविशेषं ब्रह्मशब्देनोच्यते। ब्रह्म च तदग्निश्च स होमाधिकरणत्वविवक्षया ब्रह्माग्निस्तस्मिन्ब्रह्माग्नावपरेऽन्ये ब्रह्मविदो यज्ञं यज्ञशब्दवाच्य आत्माऽऽत्मनामसु यज्ञशब्दस्य पाठात्तमात्मानं यज्ञं परमार्थतः परमेव ब्रह्म सन्तं बुद्ध्याद्युपाधिसंयुक्तमध्यस्तसर्वोपाधिधर्मकमाहुतिरूपं यज्ञेनैवाऽऽत्मनैवोक्तलक्षणे नोपजुह्वति प्रक्षिपन्ति। सोपाधिकस्याऽऽत्मनो निरुपाधिकेन परब्रह्मस्वरूपेणैव यद्दर्शनं स तस्मिन्होमस्तं कुर्वन्ति ब्रह्मात्मैकत्वदर्शननिष्ठाः संन्यासिन इत्यर्थः। सोऽयं सम्यग्दर्शि-

नलक्षणो यज्ञो दैवयज्ञादिषु यज्ञेषूपक्षिप्यते ब्रह्मार्पणमित्यादि-श्लोकैः ' श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ' इत्या-दिना स्तुत्यर्थम् ॥ २५ ॥

ज्यामध्यें इंद्र, अग्नि इत्यादि देवांचे हविर्भाग दिले जातात, सारांश जेथें देवांची दर्शपूर्णमास, ज्योतिष्टोमादिरूपानें आराधना होते असे देवयज्ञ मात्र कित्येक योगी करितात. दुसरे योगी काय करितात पहा:—' सत्यत्व (सत्ता), ज्ञान, आनंद हीं तिन्हीं ब्रह्मच होत, ' (तैत्ति० २।१।१) ' स्वस्वरूपाचा अनुभव आणि निर्मलानंद हें ब्रह्मच आहे (बृहदा० ३।७।२४) ' ब्रह्म हें साक्षात् ज्ञानस्वरूपी आहे ' (बृह० ३।४।१) ' ब्रह्म हें सर्वांच्या अंतर्यामीं राहणारा आत्मा आहे ' (बृह० ३।४।१) या वचनांनीं व्यक्त होणारें, व खाणें, पिणें वगैरे जे दृश्यविश्वाचे धर्म आहेत ते सर्व जेथें अस्त पावतात, असें, जेथें भेदबुद्धीचा सर्वस्वी अभाव होतो, ज्याच्या संबंधानें सर्व उपनिषदें ' तें हें नव्हे,' ' तें हें नव्हे ' असें म्हणत आहेत, असें, हें ब्रह्म आहे. हें ब्रह्म हाच कोणी एक अग्नि,—कारण होमाला कांहीं तरी आधार पाहिजेच असतो, असो;—तेव्हां त्या अग्नीमध्यें हे दुसरे ब्रह्मवेत्ते लोक आहुति टाकितात. कसल्या? तर यज्ञ शब्दानें प्रकट होणारा जो आत्मा (आत्म्याचीं जीं नांवें यास्काचार्यांनीं दिलीं आहेत, त्यांत यज्ञ हा शब्द आहे.) त्या आत्मस्वरूपी यज्ञामध्यें अथवा वास्तविक रीतीनें बोलावयाचें असल्यास परब्रह्मस्वरूपामध्यें हे लोक बुद्धि, ज्ञान, दया इत्यादि उपाधींचा होम करितात. आत्म्यावर ज्या अनेक उपाधींचा आरोप अज्ञानानें होत असतो त्या सर्व उपाधींची आहुति ब्रह्मरूपी अग्नींत स्वस्वरूपज्ञानानें टाकितात. सारांश सोपाधिक म्हणजे विषय, शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार इत्यादि उपाधींनीं ग्रासल्यासारखा दिसणारा जो आत्मा तो उपाधिग्रस्त नसून निराळा आहे, स्वतंत्र आहे, विकारशून्य आहे, या भासणाऱ्या उपाधि सद्वस्तु नाहींत, परंतु विचारदृष्टीनें मात्र तें सर्व ब्रह्मच आहे असें जें साक्षात्-ज्ञान हाच एक होमाग्नि होय. या होमाग्नींत उपाधींची आहुति देतात?

शिष्य—कोण ते?

गुरु—ब्रह्म आणि आत्मा हे एकच आहेत असें ज्ञानविज्ञान ज्यांस झालें आहे, व तें ज्ञानविज्ञान स्थिर झालें आहे असे संन्यासी पूर्वोक्त आहुति देतात. असो; हा जो यज्ञ आहे यालाच सम्यग्दर्शनज्ञान किंवा ज्ञानयज्ञ म्हणावें. कारण ज्ञान हें त्याचें लक्षण, चिन्ह आहे.

शिष्य—मग ह्या ज्ञानयज्ञाची गोष्ट कर्मयज्ञामध्यें कशाला?

गुरु—महत्व सांगण्यासाठीं! चोवीसाव्या व तेहतीसाव्या श्लोकांत ज्ञानयज्ञाची गणना केली आहे ती केवळ ज्ञानयज्ञाची महति सांगण्यासाठीं केली आहे.

मधु०, प्रपा०, श्रीधर, चतरजी, पर्व०, द्विवे०, शंकर० आचार्यानुसारी आहेत. **शंकरा०**—दैवादि यज्ञ चित्तशुद्धीसाठीं आहेत. संन्यासी मात्र सोपाधिक आत्मा व सोपाधिक परब्रह्म (ईश्वर) यांचा ज्ञानाग्नींत होम करितात.

रामा०—' यज्ञेन = ' ' हवि, पळी, इत्यादि यज्ञसाधनें त्यांनीं, ' असा अर्थ करितात. ज्ञानयज्ञांची स्तुति चालली असतां तेथें कर्मसाधनें घेऊन तीं पुनः ब्रह्मकार्यें म्हणून ब्रह्मच आहेत असा हा अप्रस्तुत अर्थ त्याज्य होय.

द्वैत०—' दैवयज्ञं ' = विष्णुप्रीत्यर्थ केलेला यज्ञ म्हणजे (संन्याशाला सुद्धां कर्ममार्ग आहे बाँ!) तशीच उपासना! संन्याशांनीं केलेली! यज्ञ = विष्णु. अपरे = वनांत राहणारे. लोक विष्णूची पंचमहायज्ञांनीं आराधना करितात; किंवा हरीनें प्रेरणा केल्यावरून वानप्रस्थ लोक यज्ञ म्हणजे द्रव्यत्याग अगर युद्धादिकर्मत्याग करितात.

ज्ञाने० योग = दैवास्तव पाळण (यज्ञादिकाचें) **। जो चिंतीना देहभरण । तो महायोगी जाण । दैवयोगें ॥**

गीताव्या०—' यज्ञेन यज्ञं ' = ' कर्मानेंच कर्माचा दाह करितात ' निष्कामत्वानें कर्म करून प्रारब्ध व संचित कर्माचा दाह करितात, असा अर्थ सुचवितात.

पंडितांच्या मतें या पुढील श्लोक ज्ञानयज्ञाचा विस्तार करणारा आहे. २९

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये
संयमाग्निषु जुह्वति ।
शब्दादीन्विषयानन्य
इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

अन्ये (दुसरे कांहीं) **श्रोत्रादीनि इन्द्रियाणि** (कान, डोळे, वगैरेंचा) **संयमाग्निषु** (आत्मसंयमनरूपी अग्नीमध्यें) **जुह्वति** (होम करितात.) **अन्ये** (दुसरे) **शब्दादीन् विषयान्** (शब्द-स्पर्श इत्यादि विषयांचा) **इन्द्रियाग्निषु** (इंद्रिय स्वरूपी अग्नीमध्यें) **जुह्वति** (होम करितात.) सारांश कांहीं लोक आपल्या इंद्रियांचें दमन करितात, किंवा आत्मसंयमनरूपी अग्निकुंडांत इंद्रियांचा होम करितात व दुसरे कांहीं लोक इंद्रियाग्नीमध्यें सर्व विषयांचा होम करितात. पहिले लोक आत्मसंयमन करितात व दुसरे इंद्रियनिग्रह करितात.—

श्रोत्रादीनीति । श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये योगिनः संयमाग्निषु प्रतीन्द्रियसंयमो भिद्यत इति बहुवचनं संयमा एवाग्नयस्तेषु जुह्वतीन्द्रियसंयममेव कुर्वन्तीत्यर्थः । शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति । इन्द्रियाण्येवाग्नयस्तेष्विन्द्रियाग्निषु जुह्वति श्रोत्रादिभिरविरुद्धविषयग्रहणं होमं मन्यन्ते ॥ २६ ॥

कांहीं योगी कान, डोळे, हस्तपाद, इत्यादि प्रत्येक इंद्रियाचें दमन हेंच एक अग्निकुंड त्यांत म्हणजे इंद्रियें आहेत तितक्या अग्निकुंडांत आपल्या अनेक इंद्रियांचें सर्वथा दमन करितात; म्हणजे त्यांस स्वस्वविषयांपासून परावृत्त करितात. तसेंच दुसरे योगी प्रत्येक इंद्रिय हेंच अग्निकुंड असें करून त्या त्या अग्निकुंडांत विषयांचा होम करितात; म्हणजे अविहित विषयांचा अंगिकार केला नाहीं म्हणजे हाच एक होम आहे असें ते समजतात.

मधु०—‘संयम’ = ‘ध्यान, धारणा आणि समाधि,’ असा अर्थ करितात. योगविचार पुढें यावयाचा आहे, म्हणून येथें विस्तार करित

नाहीं. मधु० म्हणतात कीं धारणा, ध्यान, समाधि यांच्या सिद्ध्यर्थ सर्व इंद्रियांचा सर्व बाह्यविषयांपासून प्रत्याहार करितात, इंद्रियांस विषयांपासून परावृत्त करितात. हें परावर्तन म्हणजे एक यज्ञच होय. हा समाधिकालीं सिद्ध होतो. ज्यावेळीं समाधि नसते त्यावेळीं हे लोक विषयोपभोग घेतात, तो लोभद्वेषशून्य असतो. हा विषयोपभोग हाही एक यज्ञच आहे.

श्रीधर–ब्रह्मचारी आत्मसंयमन करितात आणि गृहस्थ हे अनासक्त होत्साते भोग घेतात.

चतरजी–इंद्रियें म्हणजे ज्ञानाचीं अगर कर्माचीं साधनें असा अर्थ नव्हे, तर ज्या शक्तीमुळें आपल्यास ज्ञान होतें व कर्म करितां येतें त्या या शक्ति होत. या सर्व शक्ति एकवट करून त्यांस मनामध्यें संलग्न करणें याचें नांव संयमन होय. असें संयमन जे करितात, ते एक यज्ञच करितात. शास्त्रविहित विषयांचा मात्र उपभोग घेणें हा दुसरा यज्ञ होय.

शंकरा०–आचार्यानुसारी आहेत.

पर्वते, द्विवेदी, ज्ञानेश्वर, रंगनाथ यांनीं मधुसूदनीकारांप्रमाणेंच योगमार्गाचा या श्लोकाच्या टीकेंत विस्तार केला आहे. ह्याचा विचार पुढेंच करूं.

रामानुज, द्वैतवादी–अर्थ सरळ आहे. हरिपूजेकडे चित्त योजणें हें इंद्रियसंयमन व हरिभक्तिपूर्वक विहितविषयोपभोग हा गृहस्थाचा यज्ञ होय, असें द्वैतवादी म्हणतात.

वल्लभ–इंद्रियांस भगवद्दर्शन, भगवत्कथाश्रवण, भगवत्पूजन इत्यादि करण्यास लावितात.

पंडित–सामान्यतः आचार्यानुवादच करितात. ॥ २६ ॥

किंच—

आणखी—

सर्वाणीन्द्रियकर्माणि

प्राणकर्माणि चापरे ॥

आत्मसंयमयोगाग्नौ
जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

सर्वाणि इन्द्रियकर्माणि (इंद्रियांचे सर्व व्यापार) **च** (आणि) **प्राणकर्माणि** (जीवनशक्तींचे व्यापार)–हे–**अपरे** (कांहीं कर्मठ) **ज्ञानदीपिते** (ज्ञानानें प्रज्वलित झालेल्या अशा) **आत्मसंयमयोगाग्नौ** (आत्म्यामध्यें संयम झाला आहे अशा मनाच्या एकाग्रतारूपी अग्नीमध्यें) **जुह्वति** (होमून टाकितात.)–सारांश दुसरे कांहीं योगी एक यज्ञ करितात, तो असा: आपल्या अनेक इंद्रियांचे व प्राणशक्तींचे सर्व व्यापारांस आत्मस्वरूपीं लीन झालेल्या व तादात्म्य पावलेल्या व म्हणून शुद्ध झालेल्या अंतःकरणरूपी अग्नीमध्यें नाळून टाकितात.

सर्वाणीति । सर्वाणीन्द्रियकर्माणीन्द्रियाणां कर्माणीन्द्रियकर्माणि तथा प्राणकर्माणि प्राणो वायुराध्यात्मिकस्तत्कर्माण्याकुञ्चनप्रसारणादीनि तानि चापर आत्मसंयमयोगाग्नावात्मनि संयम आत्मसंयमः स एव योगाग्निस्तस्मिन्नात्मसंयमयोगाग्नौ जुह्वति प्रक्षिपन्ति ज्ञानदीपिते स्नेहेनेव प्रदीपिते विवेकविज्ञानेनोज्ज्वलभावमापादिते प्रविलापयन्तीत्यर्थः ॥ २७ ॥

दुसरे कांहीं योगी आपल्या सर्व इंद्रियांचे यच्चावत सर्व व्यापार व अंतर्गत, सर्व शरीरभर, खेळणारा जो वायु त्याचे आकुंचन, प्रसरण इत्यादि व्यापार या सर्वांस हे योगी आत्मसंयम हाच एक योगाग्नि तो पेटवून त्यांत या सर्व व्यापारांस होमून टाकितात. सारांश तैलप्रपूरित (तेलानें भरलेला) दिवा जसा प्रज्वलित होऊन मोठा प्रकाश देतो, त्याचप्रमाणें ज्ञानसंचयानें ज्याला उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें आहे, असा जो योगाग्नि त्यांत ह्या सर्व व्यापारांचा होम करितात; अर्थात त्यांस नष्ट करून टाकितात.

मधु०,–रंगनाथ, पर्वते, द्विवेदी हे येथेंही विस्तार करितात. 'कारणाशिवाय कार्य नसतें' या न्यायानें व्यष्टि, समष्टि, पंचमहाभूतें (पृथ्वी,

आप, तेज, इत्यादि), अहंकार, महत्तत्व, माया, अज्ञान इत्यादि उत्तरोत्तर कारणांचा लय चैतन्यामध्यें करावयाचा त्यास लयपूर्वक समाधि (सबीज समाधि) म्हणतात; येथें ब्रह्मज्ञान झालेलें नसेल तर पुनः प्रपंच उत्पन्न होतो. पण ब्रह्मज्ञान, अद्वैतज्ञान, झालें असेल तर जो समाधि होतो त्यास अबाधपूर्वक समाधि (निर्बीज समाधि) म्हणतात. तेव्हां मन, बुद्धि, इत्यादि ज्ञानेंद्रियें व हस्तपादादि कर्मेंद्रियें या सर्वांचे व्यापार व प्राण, अपान इत्यादि पंचप्राण वायूंचे सर्व व्यापार व तीं तीं ज्ञान आणि कर्म यांचीं इंद्रियें ह्यांच्या योगानें उत्पन्न होणारें जें लिंगशरीर व जें हिरण्याख्य कारणशरीर अशीं प्राप्त होतात, त्या सर्वांचा होम ब्रह्मात्मैक्य ज्ञानरूपी असंप्रज्ञात समाधीमध्यें, ह्या अग्नीमध्यें वेदान्ती लोक करितात. सारांश निर्विकल्प समाधीमध्यें लीन होतात.

प्रपा०–शंकर, श्रीधर, पर्वते ' आत्मसंयम ' = " मनःसंयमन; हाच योग म्हणजे ध्यानाची एकाग्रता. ' ही एकाग्रता ब्रह्मसाक्षात्कारानें प्रज्वलित करून ह्या होमकुंडांत सर्व कर्मांची आहुति देतात. " हे टीकाकार पंच उपप्राण (नाग, कूर्म, कृकर, देवदत्त, धनंजय; यांचीं अनुक्रमें उद्गार, पापण्यांचें हालणें, क्षुधा लागणें, जांभई येणें व मेल्यावरही सर्वव्यापी असणें, अशीं कार्यें आहेत.)–हे पंच उपप्राणही येथें घेतात.

पर्वते–२६ श्लोकांत इंद्रियचिंतक योगी सांगितले, या श्लोकांत बुद्धिचिंतक सांगितले आहेत.

चतर०–ब्रह्मध्यानांत निमग्न झाल्यावर सर्व विचारांचा व कर्मांचा जो अस्त तीच अग्नीमध्यें आहुति होय.

रामा०–मनाच्या योगानें इंद्रियांची कर्मप्रवृत्ति विद्वान लोक निवारितात.

द्वैत०–ज्ञानी हे भगवत्पूजेमध्यें सर्व इंद्रियांची योजना करितात.

ज्ञानेश्वरांचें व्याख्यान सुरेख आहे. समरस (ऐक्यपणाची) वृत्ति झाल्यावर, विषय, मन, वासना, कर्म इत्यादिकांची आहुति कशी होते हें यज्ञरूपकानें स्पष्ट व सुंदर रीतीनें ज्ञानेश्वरांनीं दाखविलें आहे.

पंढित–चित्तचैतन्यांचा मात्र जो योग तो आत्मसंयमयोग होय.

ऐसा आत्मसंयम जेथवा । न स्फुरती प्राण इंद्रियें तेथवा । तीं या आत्मसंयमाग्नींत तेव्हां । होमिलीं म्हणावीं ॥ कीं रज-तम-वृत्ति । ज्या निमित्तें स्फुरतीं । चिदग्नींत जाली आहुति । तयांची ही ॥ आहुति अग्नींत होमिली । ते अग्नींत अग्निरूपचि देखिली । अनुभव स्थितींत लेखिली । ब्रह्मी तथापि ॥ हेचि अवस्था उन्मनी । मन ब्रह्मचि झालें म्हणूनि । हेचि शुद्ध तुर्या सज्जनीं । लेखिली अवस्था ॥ या तुर्यावस्थेंत सर्व ज्ञान आणि कर्म यांचा लयच होतो, अथवा सर्व ब्रह्ममय होऊन जातें हा ध्यानयोग होय. ॥ २७ ॥

येणेंप्रमाणें वरील तीन श्लोकांत पांच यज्ञ सांगितले. आतां आणखी सहाप्रकारचे यज्ञ सांगतात.

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा
योगयज्ञास्तथाऽपरे ॥
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च
यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

अपरे (दुसरे कोणी) **द्रव्ययज्ञाः** (द्रव्यरूपानें यज्ञ करणारे) **तपोयज्ञाः** (तपाश्चर्य रूपानें यज्ञ करणारे) **योगयज्ञाः** (एकाग्र-चित्त करून योग वगैरेनीं यज्ञ करणारे)—असतात तसेंच—**च** (आणि) **स्वाध्यायज्ञानयज्ञाः** (वेदांचें अथवा उत्तमोत्तम ग्रंथांचें अध्ययन करणारे व ज्ञान मिळविणारे, व ह्या रूपानें यज्ञ करणारे असतात.) **संशितव्रताः यतयः** (हे सर्व यती असून यांचें व्रत फार कडकडीत असते.) सारांश भगवंतांनीं येथें हे अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत, व आणखीही पुढें सांगणार आहेत.

द्रव्येति । द्रव्ययज्ञास्तीर्थेषु द्रव्यविनियोगं यज्ञबुद्ध्या कुर्वन्ति ये ते द्रव्ययज्ञाः, तपोयज्ञा ये तपस्विनस्ते तपोयज्ञाः, । योगयज्ञाः प्राणायामप्रत्याहारादिलक्षणो योगो यज्ञो येषां

ते योगयज्ञास्तथाऽपरे स्वाध्याययज्ञाश्च स्वाध्यायो यथाविधि ऋगाद्यभ्यासो यज्ञो येषां ते स्वाध्याययज्ञा ज्ञानयज्ञा ज्ञानं शास्त्रार्थपरिज्ञानं यज्ञो येषां ते ज्ञानयज्ञाश्च यतयो यतन-शीलाः संशितव्रताः सम्यक्शितानि तनूकृतानि तीक्ष्णीकृतानि व्रतानि येषां ते संशितव्रताः ॥ २८ ॥

पवित्र स्थानांचे ठिकाणीं जाऊन तेथें यज्ञबुद्धीनें द्रव्याचा विनि-योग, व्यय, करणारे, पवित्र स्थळीं कृच्छ्र, चांद्रायणादि तपश्चर्या यज्ञबुद्धीनें करणारे, (३) यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्य-हार, धारणा, ध्यान आणि समाधि अशा योगांतील आठ साधनांचा अवलंब यज्ञबुद्धीनें करणारे, (४) त्याचप्रमाणें दुसरे कोणी ऋग्वे-दादि पवित्र ग्रंथांचें अध्ययन यज्ञबुद्धीनें करणारे, (५) पूर्व व उत्तर मीमांसादि शास्त्रांपासून मिळणारें ज्ञान हाच यज्ञ असें सम-जणारे, व (६) ह्याचप्रमाणें सर्व प्रकारचा मनोनिग्रह करून नीति-पूर्वक उग्र व कडकडीत व्रतें, नियम इत्यादि करणारे असे अनेक प्रकारचे यज्ञ करणारे लोक आहेत.

मधु०–द्रव्य यज्ञ दोन प्रकारचा आहे, (१) वापी, तडाग, देवा-लय बहिर्वेदी (नदीचे घाट) इत्यादि बांधणें, व अन्नसंतर्पण करणें, ह्यांस **पूर्त** म्हणतात व (२) शरणांगताचें रक्षण, अहिंसा, इत्यादिकांस **दत्त** ह्मणतात. **स्वाध्याय** म्हणजे मोक्षशास्त्राचें अध्ययन होय.

प्रपा०–पर्वते यतींचा संबंध सर्वत्र घेऊन एकंदर पांचच प्रकारचे यज्ञ येथें सांगितले आहेत असें म्हणतात.

द्विवेदी व शंकरा०–आचार्यानुसारी आहेत. येथें सहा यज्ञ आहेत असें म्हणतात. यांनीं आचार्यांप्रमाणेंच अर्थ केला आहे.

रामा०–'न्यायानें द्रव्य मिळवून दान, याग, होम, यांमध्यें म्हणजे देवतार्चनामध्यें विनियोग करणें' म्हणजे द्रव्ययज्ञ होय. पुण्य तीर्थास जाऊन तेथें निष्ठापूर्वक राहणें यास योगयज्ञ म्हणावें.

द्वैतवादी हे सर्व यज्ञ ईश्वरभजनपर लावितात.

ज्ञाने०–हे पांच यज्ञ सांगून म्हणतातः हे अर्जुना ! सकळ कुवाडे (कठिण) । जे अनुष्ठितां अति सांकडें (कष्टदायक) । परी जितेंद्रियांसीचि घडे । योग्यता वशें ॥ ते प्रवीण तेथ भले । आणि योगसमृद्धि आयिले । म्हणोनि आपणपां (आपल्याच ठायीं) तिहीं केलें । आत्महवन ॥

पंडित–तपोयज्ञ = ब्रह्मचिंतन. योग = हटयोग व ब्रह्मज्ञान. या दोहोंशिवाय मुक्ति नाहीं ! स्वाध्यायज्ञानयज्ञ = वेदांच्या अर्थाचें वेदांतपर ज्ञान हाच एक यज्ञ.

डेव्हिस–स्वाध्यायज्ञान = परब्रह्माचें ज्ञान.

गीताव्या०–तपोयज्ञ = परब्रह्मचिंतन व परोपकार. ज्ञानयज्ञ=तेजाळूनि अविद्याइंधन । मोहपशूचें केलें हवन । अहंममता शीतवून । पूर्णाहुति केली ॥ ज्ञानगंगे अवभृतस्नान । करूनि पावले समाधान । यापरी ज्ञानयजन । करिती एक ॥ २८ ॥

किंच—

आणखी—

अपाने जुह्वति प्राणं
प्राणेऽपानं तथाऽपरे ॥
प्राणापानगती रुद्ध्वा
प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

कांहीं लोक–अपाने (अपान वायूमध्यें) प्राणं (प्राणवायूचें) जुह्वति (अर्पण करितात.) अपरे (दुसरे कांहीं) प्राणे अपानं जुह्वति (प्राणवायूमध्यें अपान वायूस नेऊन सोडितात.)–आणि प्राणापानगती रुद्ध्वा (प्राण आणि अपान यांच्या गतींचा रोध करून) प्राणायामपरायणाः (सर्व प्राण वायूंचा नियम करण्यामध्यें तत्पर असतात; निपुण असतात.) सारांश कांहीं लोक अपान वायूमध्यें प्राणवायु नेऊन सोडितात. असें करणें याला पूरक विधि-

म्हणावें; कांहीं प्राणामध्यें अपानास पोहोंचवितात. या कृतीस रेचक विधि म्हणावें. व दुसरे प्राण व अपान म्हणजे खालीं जाणारा व वर जाणारा या दोन्ही वायूंचा निरोध करून, सर्व प्राणांचें चलन वलन बंद करून, प्राणायाम करितात. या विधीस कुंभक म्हणावें. याप्रमाणें पूरक रेचक, व कुंभक करणारे लोकांचा निर्देश केला.

अपान इति । अपानेऽपानवृत्तौ जुह्वति प्रक्षिपन्ति प्राणं प्राणवृत्तिं पूरकाख्यं प्राणायामं कुर्वन्तीत्यर्थः । प्राणेऽपानं तथाऽपरे जुह्वति रेचकाख्यं च प्राणायामं कुर्वन्तीत्येतत्, प्राणापानगती मुखनासिकाभ्यां वायोर्निर्गमनं प्राणस्य गतिस्तद्विपर्ययेणाधोगमनमपानस्य ते प्राणापानगती एते रुद्ध्वा निरुद्ध्य प्राणायामपरायणाः प्राणायामतत्पराः कुम्भकाख्यं प्राणायामं कुर्वन्तीत्यर्थः ॥ २९ ॥

ज्याची गति नेहमीं वर जाण्याची आहे अशा प्राणवायूच्या स्वाभाविक वृत्तीचा निरोध करून त्यास अपानामध्यें ढकलावयाचा हा पूरक नांवाचा प्राणायाम होय. असा प्राणायाम कित्येक करितात. खालीं जाण्याची नेहमींची गति अपानवायूच्या त्या साहजिक गतीचा अविरोध करून अपानास प्राणामध्यें ढकलून देण्याच्या क्रियेस रेचकविधि म्हणतात. असा दुसरे कांहीं प्राणायाम करितात. नंतर आणखी एक योगविधि आहे त्याचें नांव कुंभक होय. येथें नासिकामधून अगर तोंडामधून बाहेर जाणारा जो वायु त्याची गति व अधोमार्गानें शरीराच्या बाहेर जाणारा जो वायु त्याची गति. सारांश या दोन्हीं वायूंच्या गतींचा निरोध करून प्राणांचे नियमन करणें यास कुंभक म्हणतात. ह्या प्रकारचा प्राणायामही कित्येक लोक करितात.

मधु०—आचार्यानुवादी आहेत. रेचक, पूरक, कुंभक यांचा विस्तार करितात.

प्रपा०—वरील अर्थ सांगतात. प्राणायाम हेंच ज्यांचे अंत्य साधन आहे असे ते प्राणायामपरायण होत. अथर्ववल्लीमध्यें श्रुति आहे. **“आत्मा देवानां भुवनस्य गर्भो यथावशं चरति एष देवः । घोषा**

इदं यस्य शृण्वीत रूपं तस्मै वाताय हविषा विधेम " अनाहत ध्वनि हेंच ज्याचें रूप श्रवणाचे विषय होते, जो देवांचा अंतर्यामी आहे, जो या सर्व विश्वाचें बीज आहे, तो वायु आपल्यास वश होईल असें करूं; असें होण्यासाठीं, हा वायु वश होण्यासाठीं, आपण यथोचित द्रव्यें अर्पण करून या वायूची उपासना करूं या. प्राणायाम साध्य झाल्यावर काहीं गंभीर ध्वनि ऐकण्यास येतात, त्यांस अनाहत ध्वनि म्हणतात.

इतर सर्वत्र ऐकमत्य आहे. शंकरानंद मात्र प्राणांमध्यें अपान व अपानांत प्राण योजिले असतां पाप दग्ध होतें असें म्हणतात.

द्वैतवादी म्हणतात कीं प्राणायाम करित असतां हरिचिंतन असावें.

मराठीमंडळ विशेष कांहीं सांगत नाहीं.

सरकार—यालाच अभ्यासयोग असें म्हणावें. ॥ २९ ॥

किंच—

आणखी—

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ॥
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपित कल्मषाः॥३०॥

अपरे (दुसरे कांहीं) नियताहाराः (नियमित केला आहे, अल्प केला आहे, आहार ज्यांनीं असे, उपवास करणारे) प्राणेषु (प्राण वायूमध्येंच) प्राणान् (प्राण वायूंचा) जुह्वति (होम करितात.) सर्वे अपि एते यज्ञविदः (हे सर्वही लोक यज्ञाचें रहस्य जाणणारे आहेत)-आणि-यज्ञक्षपितकल्मषाः (यज्ञ केल्या-मुळें ज्यांनीं आपल्या पापांचा नाश केला आहे, असे आहेत) सारांश वर २४ व्या श्लोकापासून सांगितलेले सर्व प्रकारचे याज्ञिक यज्ञाचें रहस्य जाणतात आणि यज्ञाच्या योगानें आपल्या सर्व पातकांचा नाश करून टाकितात.

अपर इति। अपरे नियताहारा नियतः परिमित आहारो येषां ते नियताहाराः सन्तः प्राणान्वायुभेदान्प्राणेष्वेव जुह्वति।

यस्य यस्य वायोर्जयः क्रियत इतरान्वायुभेदांस्तस्मिञ्जुह्वति ते तत्र प्रविष्टा इव भवन्ति। सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषा यज्ञैर्यथोक्तैः क्षपितो नाशितः कल्मषो येषां ते यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

नियत, नियमित केला आहे, अल्पांशावर नेला आहे आहार ज्यांनीं असे उपास करणारे लोकही याज्ञिकच आहेत. ते कोणत्या तरी एका वायून स्वाधीन करून घेऊन व इतर जे अनेक वायु आहेत व जे जिंकलेले नाहींत, त्यांचा निरोध करून, त्यांस त्या प्रथम जिंकलेल्या वायूमध्यें नेऊन सोडितात. सारांश ते सर्व वायु एका वायूमध्यें जाऊन मिसळतात.

हे सर्व २४ व्या श्लोकापासून सांगितलेले यजमान यज्ञस्वरूपाचें रहस्य जाणणारे आहेत. या सर्वांनीं वरील कोणत्या तरी यज्ञाच्या सामर्थ्यानें आपलीं सर्व पापें भस्म करून टाकिलेलीं असतात.

मधु०–' आहार, नियम, इत्यादि योगसाधनांनीं कांहीं लोक कुंभकानें अंतर्बाह्य वायूंचा निरोध करून त्यांत ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें (-व प्राण) यांचा होम करितात. असा या श्लोकाचा अर्थ करितात. यज्ञविदः = यज्ञ जाणणारे व करणारे. या स्वामींनीं योगाचा पुष्कळ विस्तार केला आहे, त्याचा पुढें विचार करूं.

प्रपा०– नियमित आहारामुळें जीर्ण होणाऱ्या इंद्रियांमध्यें विषयांचा व इंद्रियवृत्तींचा लय करितात; ह्याचें पाप नष्ट होतें. याचें कारण त्यांच्या मनाचा वेग नाहींसा होत जातो.

श्रीधर—**द्वौ भागौ पूरयेदन्नैस्तोयेनैकं प्रपूरयेत्** (दोन भाग अन्न आणि एक भाग पाणी असा जो क्रम त्यास नियताहार ह्मणावें) यांनींही एक विशेष यौगिक अर्थ दिला आहे.

चतरजी—याप्रमाणें सर्व प्राणवृत्तींचे हे लोक स्वामी होऊन बसतात.

पर्वते—मन, चित्त, व अहंकार हे जे प्राण त्यांत कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें यांचा लय करितात. संकल्प विकल्प करणें हा मनाचा धर्म आहे. यांत श्रवण, दर्शनादिकांचा लय करावयाचा. नंतर स्मरण हा

ज्या चित्ताचा धर्म आहे त्यांत मनाचा लय; तसेंच अहंकारांत स्मरणात्मक चित्ताचा लय करावयाचा. याप्रमाणें विषय, इंद्रियें, संकल्प विकल्पात्मक मन व स्मरण या सर्वांचा लय झाला म्हणजे अहंकार नाहींसाच होतो, कारण अभिमान ठेवण्यास त्या अहंकाराला विषयच उरत नाहीं. हा यांचा विशेष अर्थ आहे.

द्विवेदी–प्राणांमध्यें प्राणांचा लय करणें यास महाकुंभक म्हणतात. सर्व श्लोकाचें तात्पर्य ते असें देतातः समष्टि व व्यष्टि हे यज्ञ होत. समष्टि व व्यष्टि एकच आहेत असें ज्ञान होणें तो महायज्ञ. सारांश विश्व हा यज्ञ आहे, ज्ञान यज्ञ आहे, कर्म यज्ञ आहे. ज्याला यज्ञरहस्य समजलें तो धर्मज्ञ होय आणि त्याचीं सर्व पापें दग्ध होतात.

शंकरा०–दूध वगैरे अल्पाहार करून बस्तीधौति इत्यादि साधनांनीं अंतर्वायूचें शोधन करितात.

रामा०–सृष्टिबरोबरच जे यज्ञ निर्माण केले (अ. ३ श्लो. १०) ते हे होत. यांच्यासह नित्यनैमित्तिक कर्म झालें म्हणजे जीव पापशून्य होतो.

द्वैत०–अल्पाशन करणारे लोक प्राणामध्यें प्राणांची आहुति देतात. वाक् आणि मन ह्यांचे नियमन करून तीं दोन्हीं आत्मज्ञानांत नेऊन दग्ध करणें म्हणजे प्राणांत प्राणांचा होम करणें होय.

पापाचें दहन झाल्यावर काय होतें तें ज्ञानेश्वर सांगतातः–जया अविद्याजात जाळितां । जें (ब्रह्म) उरलें निजस्वभावता । जेथ अग्नि आणि होता । उरेचिना । जेथ यजितयाचा काम पुरे (संपतो, पूर्ण होतो) । यज्ञींचें विधान सरे । मागुतें जेथोनि ओसरे (नाहींसें होतें) । क्रियाजात (सर्व कर्म) ॥

इंग्रजी ग्रंथकार–अल्पाहार करून प्राणशक्ति कमी करणारा पुरुष स्वप्राणत्याग करितो असें वामन पंडितांप्रमाणेंच ह्मणतात. खाण्यापिण्याचा संकोच करणें ह्मणजे इंद्रियांची शक्ति क्षीण करणें होय, असें पंडित म्हणतात.

वल्लभ–कल्मष = ईश्वराचें स्मरणांत व्यत्यय आणणारीं, ईश्वराचें स्मरण होऊं न देणारीं, पापें. ॥ ३० ॥

एवं यथोक्तान्यज्ञान्निर्वर्त्य–

याप्रमाणें वर सांगितल्याप्रमाणें यज्ञ केल्यानंतर–

यज्ञशिष्टामृतभुजो
यान्ति ब्रह्म सनातनम् ॥
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य
कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

यज्ञशिष्टामृतभुजः (निष्काम बुद्धीनें केलेल्या यज्ञामध्यें राहिलेला जो अवशिष्ट अमृतरूपी भाग त्याचें सेवन करणारे) **सनातनं ब्रह्म यान्ति**) सदैव असणाऱ्या नित्य ब्रह्माकडे जातात. ब्रह्म प्राप्त करून घे-तात.) **अयज्ञस्य अयं लोकः न आस्ति** (जो वर सांगितल्यापैकीं एकही करित नाहीं त्याला हा मृत्युलोक, जो प्राणीमात्रास गोचर आहे तो सुद्धां साध्य होत नाहीं .) **कुरुसत्तम** (कुरुकुलश्रेष्ठा!) **कुतः अन्यः** (अन्य लोकाची मग वार्ता तरी कशाला पाहिजे?) सारांश, निष्काम यज्ञामध्यें अवशिष्ट राहिलेला जो अमृतरूपी भाग त्याचें जे सेवन करितात, ते ब्रह्मपदाला जातात. अर्जुना ! फार काय सांगावें? पशु कृमि, कीटक यांसही साध्य होणारा हा मृत्युलोक, जो पुरुष यज्ञ करित नाहीं, त्यास साध्य होत नाहीं; मग इतर स्वर्गादि लोकांची गोष्ट कशाला पाहिजे?

यज्ञशिष्टामृतभुजो यज्ञानां शिष्टं यज्ञशिष्टं यज्ञशिष्टं च तदमृतं च यज्ञशिष्टामृतं तद्भुञ्जत इति यज्ञशिष्टामृतभुजो यथोक्तान्यज्ञान्कृत्वा तच्छिष्टेन कालेन यथाविधि चोदितमन्नममृताख्यं भुञ्जत इति यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति गच्छन्ति ब्रह्म सनातनं चिरंतनं मुमुक्षवश्चेत्कालातिक्रमापेक्षयेति सामर्थ्याद्गम्यते । नायं लोकः सर्वप्राणिसाधारणोऽप्यस्ति यथोक्तानां यज्ञानामेकोऽपि यज्ञो यस्य नास्ति सोऽयज्ञस्तस्य कुतोऽन्यो विशिष्टसाधनसाध्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

यज्ञ करून अवशिष्ट राहिलेला जो अमृतरूपी भाग त्याचें सेवन करणाऱ्या लोकांस यज्ञशिष्टामृतभुक् म्हणावें. सारांश याप्रमाणें यज्ञ करून शिलक राहिलेला जो वेळ त्या वेळेमध्यें जे लोक विहित अन्न हेंच कोणी अमृत, त्याचें सेवन जे वरील याज्ञिक करितात, त्या अमृतपी लोकांस मोक्ष मिळविण्याची इच्छा असेल तर ते लोक चिरंतन, नित्य असणारें जें ब्रह्मपद त्या पदाप्रत ज्ञानप्राप्तीनंतर जातात.

शिष्य–महाराज! 'मुमक्षु असतील तर' असें पद मुळांत कोठें आहे? नुसता यज्ञ केला असतां मोक्ष मिळतो, हें मत आचार्यांस संमत नाहीं म्हणून हें 'जर' त्यांनीं ढकलून दिलें आहे!

गुरु—हा खुळ्या! काळ दाखविणारा '**यान्ति**' (जातात) हा शब्द कां व्यर्थ घातला आहे? नाहीं. या शब्दावरूनच कालावधीची अपेक्षा आहे, असें सिद्ध होतें. नुसतें अमृत प्यालें असतां तात्काल मोक्ष मिळावा, पण तसें येथें विवक्षित नाहीं. सारांश नुसत्या यज्ञानें मोक्ष नाहीं, ज्ञान झाल्यावर मात्र मोक्ष आहे. असो; जो पुरुष यज्ञ केल्याशिवाय राहतो, त्या पुरुषाला पशुपक्ष्यांस सहज रीतीनें मिळणारा जो हा अल्पसुखी मृत्युलोक तो सुद्धां साध्य होत नाहीं, मग इतर लोकांची, सूर्य, चंद्र ब्रह्म इत्यादि लोकांची वार्ता तरी कशाला पाहिजे? पार्था! इतर लोक साध्य करून घेण्याला कांहीं तरी विशेष साधनें करावीं लागतात तसें या पुरुषाच्या संबंधानें कांहीं नसतें, ह्मणून त्याचा सर्वस्वी नाश होतो; सारांश जो स्वार्थत्यागरूपानें कोणताच यज्ञ करित नाहीं त्याची ह्या लोकाची यात्राही सफळ होत नाहीं ह्मणजे त्यास शारीरिक व मानसिक, सामाजिक व धार्मिक सुखें मिळत नाहींत, आणि तो अधमास्थितीला जातो.

मधु०–श्रीधर, शंकरा०, पर्वते, आचार्यानुसारी आहेत.

प्रपा०, शंकरा०, पर्वते–यज्ञ करून शिलक राहिलेला आणि म्हणूनच अमृतरूपी सोमरस जे पितात किंवा यज्ञ केल्यानें चित्तास होणाऱ्या समाधानरूपी अमृताचें, ज्ञानजन्य आत्मसुखाचें, जे लोक प्राशन करितात, ते मुक्त होतात.

चतरजी—अत्यंत श्रेष्ठ जो कुरु त्याच्या कुलांत सर्ववरिष्ठ असणाऱ्या पार्था! तुला कोणताही यज्ञ करण्याचें सामर्थ्य आहे.

शंकरा०—'लोक' ='देह, मानव देह, मोक्षयोग्य मानवदेह' असा अर्थ केला आहे.

वल्ल०—'यज्ञशिष्टामृत = ईशस्मरण, '**यस्य स्मृत्या च नामोक्त्या**' इत्यादि मंत्र देतात.

द्विवेदी०—यज्ञस्वरूपानें सर्व करावें व यदृच्छेनें मिळेल त्यावर गुजरण करावी असें जो करितो तोच ज्ञानप्राप्तीनंतर कैवल्यपदाला जातो. यज्ञशून्याला चंद्र–सूर्य–लोक मिळावयाचें नाहींत, तेव्हां अखंड ब्रह्माचें नित्य सुख त्या बिचाऱ्याला कसलें लाधणार? (पहा मनु ३।२८९).

रामा०—यज्ञांतून शेष राहिलेल्या अमृतरूपी अन्नावरच जे आपला चरितार्थ चालवितात ते यज्ञशिष्टामृतभुक् होत. सारांश कर्मयोगी मात्र ब्रह्माप्रत जातात! अयज्ञाचा यज्ञशून्याचा येथें धर्म, अर्थ व काम या तिहींतून एकही पुरुषार्थ साध्य होत नाहीं, मग मोक्षाची वार्ता कशाला! प्राकृत लोक ह्मणजे जेथें धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ सिद्ध होतात, तो मृत्युलोक होय.

ज्ञानेश्वर०—**ऐसें अनादिसिद्ध चोखट** (शुद्ध)। **जें ज्ञान यज्ञावशिष्ट। तें सेविती ब्रह्मनिष्ठ। ब्रह्माहं मंत्रें॥ ....ह्मणोनि ब्रह्म जाहले। अनायासें॥ येरा विरक्ति माळ न घालिची। जया संयमाग्नीची सेवा न घडेची। जे योगयाग न करितीचि। जन्मले सांते** (जन्मापासून)॥

पंडित एक व्यासवाक्य देतातः—**द्वावेवाप्सु प्रवेष्टव्यौ कण्ठे बद्ध्वा दृढां शिलाम्। धनवन्तमदातारं दरिद्रं चातपस्विनम्॥** (दानशून्य श्रीमंत आणि तपःशून्य दरिद्रि ह्या दोघांच्याही गळ्याला मोठा धोंडा घट्ट बांधून यांना खोल पाण्यांत बुडवावें कारण यांचें जन्म निरर्थक आहे. सारांश १२ यज्ञांतील एकही यज्ञ जो करित नाहीं तो अधमाधम होय.

गीताव्याख्याकार—'कल्वशिष्ट'=नैष्कर्म्य. 'मग येर जो वृथा-पुष्ट। नरदेह धरूनि धारिष्ट। येकाही यज्ञासी नीट। नव्हेचि जो ॥ तया इह लोकींच विरुद्ध पडे। तया पारत्रिक कैचें घडे ?। तेव्हां वाट निरयाकडे। जावयाची नेमस्त ॥ ३१ ॥

ज्ञानस्तुति करण्यासाठीं वरील सर्व यज्ञांचा उपसंहार करितात.

एवं बहुविधा यज्ञा
वितता ब्रह्मणो मुखे ॥
कर्मजान्विद्धि तान्सर्वा-
नेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

एवं (याप्रमाणें) **बहुविधाः यज्ञाः** (अनेकप्रकारचे यज्ञ) **ब्रह्मणः मुखे वितताः** (वेदरूपी ब्रह्माच्या मुखांत पसरले आहेत; सारांश हे सर्व वेदामध्यें सांगितलेले आहेत) **तान् सर्वान् कर्मजान् विद्धि** (हे सर्व यज्ञ कर्मापासून उत्पन्न झाले आहेत असें जाण.) **एवं ज्ञात्वा** (याप्रकारचें ज्ञान तुला झाल्यानंतर) **विमोक्ष्यसे** (तूं मुक्त होशील.) सारांश वर सांगितलेली ही सर्व यज्ञमालिका वेदांमध्यें प्रणीत केली आहे. अर्जुना! हे सर्व यज्ञ कर्मापासून उत्पन्न झाले आहेत; असें नीट समजून घे. हें समजून तुझी चित्तशुद्धि झाली व तुला ज्ञान झालें तरच तूं मोक्षाप्रत जाशील, कर्मबंधापासून सुटशील.—

एवमिति। एवं यथोक्ता बहुविधा बहुप्रकारा यज्ञा वितता विस्तीर्णा ब्रह्मणो वेदस्य मुखे द्वारे वेदद्वारेणावगम्यमाना ब्रह्मणो मुखे वितता उच्यते, तद्यथा वाचि हि प्राणं जुहुम इत्यादयः। कर्मजान्कायिकवाचिकमानसकर्मोद्भवान्विद्धि तान्सर्वाननात्मजान्। निर्व्यापारो ह्यात्मा अत एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसेऽशुभात्। न मद्व्यापारा इमे निर्व्यापारोऽहमुदासीन इत्येवं ज्ञात्वाऽस्मात्सम्यग्दर्शनान्मोक्ष्यसे संसारबन्धनादित्यर्थः॥३२॥

असो; याप्रमाणें हा वेळपर्यंत ज्या अनेक यज्ञाचें विवरण केलें आहे, ते सर्व यज्ञ वेदमार्गानें समजण्यासारखे आहेत. वेदांमध्येंच हे सर्व यज्ञकांड सांगितलेलें आहे. 'वाणीमध्यें प्राणाचा होम करूं या' अशा तऱ्हेचीं अनेक वाक्यें वेदांमध्यें सांपडतील; म्हणून या यज्ञांस वेदमुखामध्यें पसरले आहेत असें म्हटलें आहे. अर्जुना ! हे सर्व यज्ञ, शारीरिक, शाब्दिक किंवा मानसिक यांपैकीं कोणत्या तरी व्यापाराच्या साहाय्यानें उत्पन्न होतात. सारांश यांची उत्पत्ति आत्म्यापासून नाहीं. प्रकृतीपासून आहे. कारण उघडच आहे कीं आत्मा हा स्वतः निष्काम असल्यामुळें त्यापासून कांहीं उत्पन्न होणें शक्यच नाहीं. हे सर्व यज्ञ अनात्मक आहेत असें तूं जाणशील तर अमंगलरूपी संसारापासून सुटशील. 'यज्ञ करणें हें आत्मस्वरूपी जो मी त्या मला संभवनीय नाहीं, मी निष्क्रिय व उदासीन आहे' असें वास्तविक ज्ञान तुला झालें तर मात्र तूं संसारबंधनापासून मुक्त होशील.

मधु०, प्रपा०, शंकरा०, व चतरजी आचार्यानुसारी आहेत. ब्रह्ममुखांतून निघालेल्या वेदाचा आधार घेऊन वरील यज्ञमालिका कथन केली आहे. यज्ञानें मोक्ष मिळावयाचा नाहीं; चित्तशुद्धि होईल; ज्ञानानें मात्र मोक्ष आहे. यज्ञ हें केवळ ज्ञानाचें एक साधन आहे.

द्विवेदी०—'मी सर्वज्ञ, सर्वद्रष्टा, सर्वकर्ता, अकर्मा, कर्मालिप्त आहे; म्हणून मला कर्मगंधही—कर्म करित असतां—स्पर्श करित नाहीं; मी कर्माविगळा आहे, सर्वगामी व नित्य आहे' असें ज्ञान अबाधित राहून जो यज्ञादि सत्कर्म करितो तो सर्वदां मुक्तच आहे.

रामानु०—'याप्रमाणें जाणून ह्मणजे याप्रमाणें नित्यनैमित्तिक कर्म व यज्ञयागादि करून तूं मोक्षास जाशील' असा अर्थ करितात. हा अर्थ अद्वैतमतानें खरा नाहीं. ज्ञान याचा अर्थ कर्म करणें योग्य नाहीं. खालच्या श्लोकांत, पुनः ज्ञान झाल्यावर सर्व प्रकारच्या कर्मांची समाप्ति सांगितली आहे.

द्वैतवादी—'ब्रह्मणः=' 'हरीच्या.' "मी सर्व यज्ञाचा भोक्ता आहे' असे भगवानच म्हणणार आहेत. सारांश हरी ही आराध्यदेवता आहे.

सर्व यज्ञ कर्मापासून उद्भवलेले आहेत, वस्तुतः कर्मरूपच आहेत; युद्ध करणें हेंही एक क्षत्रियाचें विहित कर्मच आहे. म्हणून त्याचा त्याग करण्याचें कारण नाहीं. मोक्षासाठीं कांहीं केलें तरी तें कर्मच होणार, युद्ध हें विहितकर्म आहे, म्हणून तुला तें केलेंच पाहिजे. सर्व यज्ञ कर्मरूपी आहेत हें जाणून तूं कर्म केलेंस तरच तूं मुक्त होशील." वरील अर्थही त्याज्य होय. कर्मानें मुक्ति नाहीं, मुक्तीचें साधन जी चित्तशुद्धि ती मात्र सत्कर्माच्या निष्काम आचरणानें साध्य होते; हे सिद्धांत गीतावाचकांस आतां दृढपरिचयाचें झालें असतील.

डेविस व टामसन—'ब्रह्मासमक्ष हे यज्ञ केले जातात,' हाच खरा अर्थ आहे असें म्हणतात; हा अर्थ करण्याचें स्वारस्य काय हें समजणें कठिण आहे. शिवाय वेद हे ब्रह्मदेवाचें मुख आहे, अथवा चार वेद ब्रह्मदेवाच्या चतुर्मुखापासून निघाले ही आख्यायिका अत्यंत प्राचीन आहे. सारांश, सर्व यज्ञ वेदामध्यें सांगितले आहेत, हाच खरा अर्थ होय. ॥३२॥

ब्रह्मार्पणमित्यादिश्लोकेन सम्यग्दर्शनस्य यज्ञत्वं संपादितं यज्ञाश्चानेक उपदिष्टास्तैः सिद्धपुरुषार्थप्रयोजनैर्ज्ञानं स्तूयते। कथम्—

गुरुजी—या अध्यायाच्या २४ व्या श्लोकांत आत्मस्वरूपज्ञानाला यज्ञाचें रूपक योजिलें आहे. पुढें अनेक यज्ञांचा नामनिर्देश केला; व हे निरनिराळे यज्ञ धर्म, अर्थ काम वगैरे सामान्य पुरुषांचे पुरुषार्थ साध्य करितात असें सांगितलें. आतां या यज्ञांच्या तारतम्यानें ज्ञानाची स्तुति करितात. कशी तें ऐकः—

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञा-
ज्ज्ञानयज्ञः परंतप ॥
सर्वं कर्माखिलं पार्थ
ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

द्रव्यमयात् यज्ञात् (द्रव्यमय यज्ञांपेक्षां) **ज्ञानयज्ञः** (ज्ञानस्वरूपी यज्ञ) **परंतप** (हे शूर अर्जुना!) **श्रेयान्** (श्रेष्ठ आहे). **सर्वं अखिलं कर्म** (सर्व, यच्चावत सर्व कर्म) **ज्ञाने** (ज्ञानामध्यें) **परिसमाप्यते** (अंतर्भूत होतें.)–सारांश इतर सर्व साध्यसाधनरूपी यज्ञांपेक्षां ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. अर्जुना! ज्ञानामध्यें सर्व कर्मांची परिसमाप्ति होते. ज्ञान झाल्यावर सर्व कर्म केल्याचें आपोआप श्रेय येतें. सारांश, ज्ञानांत सर्व कर्मांचा अंतर्भाव होतो.–

श्रेयानिति । श्रेयान्द्रव्यमयाद्द्रव्यसाधनसाध्याद्यज्ञाज्ज्ञानयज्ञो हे परंतप । द्रव्यमयो हि यज्ञः फलस्याऽऽरम्भको ज्ञानयज्ञो न फलारम्भकोऽतः श्रेयान्प्रशस्यतरः । कथं यतः सर्वं कर्म समस्तमखिलमप्रतिबद्धं पार्थ ज्ञाने मोक्षसाधने सर्वतः संप्लुतोदकस्थानीये परिसमाप्यतेऽन्तर्भवतीत्यर्थः । "यथा कृताय विजितायाधरेयाः संयन्त्येवमेनं सर्वं तदभिसमेति यत्किंचित्प्रजाः साधु कुर्वन्ति यस्तद्वेद यत्स वेद" इति श्रुतेः ॥ ३३ ॥

द्रव्याच्या, उपकरणांच्या साहाय्यानें सिद्ध होणाऱ्या सर्व यज्ञांपेक्षां, हे शत्रूस पीडा देणाऱ्या शूर अर्जुना! ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. कारण उपकरणाच्या, द्रव्यांच्या द्वारें सिद्ध होणारे सकल यज्ञ कांहींतरी फळ उत्पन्न करणारे आहेत, ज्ञानयज्ञ मात्र फलाचा आरंभक नाहीं, त्यापासून कांहींएक फल उत्पन्न होत नाहीं व विकार उत्पन्न होत नाहीं. ज्ञान झालें म्हणजेच मोक्ष मिळतो, ज्ञान हेंच मोक्षस्वरूप आहे. सारांश ज्ञानापासून निराळें असें फल उत्पन्न होत नाहीं. कसें म्हणशील तर ऐकः–सर्व कर्म,–येथें कोणताही अपवाद नाहीं.– ज्ञानांत अंतर्भूत होते, मोक्षस्वरूपी जें ज्ञान त्यांत यच्चावत कर्मे येतात. अथवा ज्ञान झालें म्हणजे सर्व कर्मांचा अंत होतो, सारांश कर्मापासून, विहित कर्मापासून मिळणारा जो आनंद होतो, तो ज्ञान झालें असतां मिळतो इतकेंच नाहीं, तर आणखी एक निरतिशय सुख मिळत असतें.

शिष्य-म्हणजे गोड्या महासागरांत गेलें असतां लहान उदक संचयांचीं सर्व कार्यें एकदम होतात, त्याचप्रमाणेंना ?

गुरु-अगदीं बरोबर! एकांत स्नान, एकांत पान, एकीकडे स्नान-संध्या वगैरे एक एक गोष्ट मात्र साध्य करणाऱ्या सरोवरादिकांची सर्व कामें जसा एकटा क्षीरसमुद्र करितो, व शिवाय आणखी अनंत कामें करितो, त्याचप्रमाणें निरनिराळ्या कर्मांपासून होणारीं सर्वसुखें ज्ञानापासून मिळतात, इतकेंच नाहीं, तर कर्मांपासून होणाऱ्या दुःखांचा नाश झाल्यामुळें ज्ञानापासून कांहीं एक विचित्र, अपूर्व, शुद्ध आणि अनंत असा आनंद मिळत असतो. वत्सा! द्यूतामध्यें मोठें 'कृत' नांवाचें दान पडलें असतां द्युत जिंकणाऱ्या पुरुषाला ज्याप्रमाणें 'त्रेता, द्वापार, कली' इत्यादि इतर कमी दानांपासून मिळणारे सर्व लाभ प्राप्त होतात, त्याचप्रमाणें इतर लोक कष्टप्रद सत्कर्मे करून जें कांहीं फळ मिळवितात, त्यांतील नाशवतपणा जाऊन निवळ शुद्धसुख ज्ञानी पुरुषास, ज्ञानानें साध्य होतें. हें जो जाणतो, तोच ज्ञानी होय" अशी छांदोग्य श्रुति सांगत आहे हेंही प्रस्तुत प्रकरणास विशेष उपयोगी आहे.

शिष्य-येथें दुसऱ्या पुरुषांची निष्काम कर्मे तेवढीं घ्यावयाचींना!

गुरु-छेः! सर्व कर्में, सकाम, निष्काम, सुष्ट, दुष्ट, सर्व कर्में घ्यावयाचीं. ज्ञान हें सर्व सुखाचें आगर आहे,' हा सिद्धांत येथें स्पष्ट करावयाचा आहे. 'सर्व' 'अखिल' वगैरे शब्दांवरून सर्व कर्में घेतलींच पाहिजेत.

मधु०—ज्ञानयज्ञाशिवाय इतर सर्व श्रौत यज्ञ संसार उत्पन्न करणारे आहेत म्हणून त्यांत कमीपणा आहे. ब्रह्म व आत्मा हे एकच आहेत, असा साक्षात्कार झाला ह्मणजे सर्व कर्म संपतें. द्रव्ययज्ञ हें उपलक्षण आहे ह्मणून सर्व यज्ञाचा त्यांत अंतर्भाव होतो.

प्रपा०—अखिल कर्म= ज्ञानजनक कर्म= निष्काम कर्म. खिलकर्म= सकामकर्म, पापोत्पादि कर्म.

श्रीधर व पर्वतेः-आत्मज्ञान हें मनानें मात्र होतें, मन आत्मस्वरू-

पाचें बिंब प्रकट करतें, मनाला ज्ञान उत्पन्न करितां येत नाहीं. म्हणून ज्ञान हें कर्मापेक्षां श्रेष्ठ आहे. अखिलं = फलसहित. '**सर्वं तदभिसमेति यत्किंचित्प्रजाः साधु कुर्वन्ति**' (प्रजा जें कांहीं सत्कर्म करितात त्याचा फलासह ज्ञानांत अंतर्भाव होतो.)

शंकरा०—यज्ञयाग अगर उपासना इत्यादि कर्म निःशेषत्वानें संपतें, निर्मूल होतें, किंवा विद्वानास सर्व कर्माचें फल प्राप्त होतें; असें अर्थ करितात.

चतरजी—आचार्यनुयायी आहेत. सर्वज्ञत्व प्राप्त झालें ह्मणजे अर्थांतच सर्व कर्मांचा अंत होतो. ज्ञान नसतें तोंपर्यंत कर्माचें माहात्म्य असतें हा व्यावहारिकही अनुभव आहेच.

रामा०—येथें कर्मापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे. असें कबूल करतात. सारांश कर्म करित असतां आत्मज्ञान असेल तर मुक्ति आहे.

प्रो० द्विवेदी म्हणतात: "ज्ञानाचें अनुसंधान ठेवूनें यदृच्छेनें प्राप्त झालेलें कर्म अभिमान-व-वासनाविरहित रूपानें झालें तर तें कर्म बद्धक होत नाहीं." हा भेद लक्ष्यांत ठेवणें इष्ट आहे. म्हणजे ज्ञान व कर्म हीं दोन्हीं अवश्य पाहिजेत.

द्वैतवादी—हरीचें ज्ञान झालें ह्मणजे सर्व कर्म सफल होतें.

ज्ञानेश्वर—**ते द्रव्यादियाग कीर** (निश्चयानें) **होती** (चांगले आहेत) **। परि ज्ञान यज्ञाची सरी न पावती । जैसी तारातेज संपत्ती । दिनकरापाशी ॥.... जेथें प्रवृत्ति पांगुळ झाली । तर्काची दृष्टि गेली । जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंग ॥ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचे बोलकेपण ठेलें** (स्तब्ध झालें) **। जयामाजीं सांपडलें । ज्ञेय दिसें ॥ जेथ वैराग्याचा पांग** (दारिद्र्य) **फिटे । विवेकाचाही सोस तुटे । जेथ न पाहतां सहज भेटे । आपणपें ॥**

पंडित—**अगा! आज्यादिक हविर्द्रव्य । ब्रह्मत्वें न जाणतीं दिव्य । बाह्य दृष्टीच यज्ञ कर्तव्य । ते द्रव्यमय यज्ञ बोलावे ॥**

गीताव्याख्याकार—द्रव्य=पंचभूतापासून उत्पन्न झालेले पदार्थ.

"जे तत्त्वज्ञानाच्या पाठीमागें लागतात व शरीराचा संबंध नष्ट करितात, सारांश जे केवळ ज्ञानैकभक्त आहेत, तेच ईश्वरपदवीस जातात" (प्लेटोकृत फिडो.)

वल्लभ—द्रव्यमय यज्ञ हा अपूर्ण यज्ञ आहे.

पंचविसाव्या श्लोकापासून तेहतिसाव्या श्लोकापर्यंतच्या नऊ श्लोकांमध्यें ब्रह्मज्ञानरूपी यज्ञाशिवाय आणखी १२ प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. कोणी योगी इंद्र, चंद्रादि देवतांस तुष्ट करण्यासाठीं म्हणजे पुढें आपल्यास सुख मिळावें एतदर्थ वेदोक्त यज्ञांचा समारंभ करितात. हे सकाम याज्ञिक होत. कोणी शम व दम या साधनांनीं इंद्रियांस व विषयास स्ववश करितात. कोणी सर्वकर्मेंद्रियांचा व प्राणकर्मांचा होम करितात; ह्मणजे बुद्धिपूर्वक व सहज गतीनें होणाऱ्या कर्मांचा निरोध करितात. याप्रमाणें मनोवृत्तींचा निरोध करणारे चार प्रकारचे योगी व सकामत्वानें यज्ञकर्म करणारे याज्ञिक असे पांच प्रकारचे लोक झाले. या सर्वांस असें वाटत असतें कीं सकामत्वानें कां होईना, पण विषयांचा व मनोवृत्तींचा त्याग केला असतां आपला पुरुषार्थ साध्य होईल, म्हणजे मोक्ष मिळेल. हा भ्रम आहे हें सांगावयास नकोच. कर्म करणें व तेंहीं अहंकार व वासना ही दुक्कल कायम ठेवून करणें हें मोक्षदायक तर व्हावयाचें नाहींच, पण चित्तशुद्धि करणारें सुद्धां होणारें नव्हे. या सर्वांनीं ही चित्तशुद्ध होईल, पण केव्हां? निष्कामत्वानें यज्ञयाग सुरू होतील व ईश्वरचरणीं लक्ष ठेवून निष्कामत्वानें मनोवृत्ति शांत होतील तेव्हां! असो; या नंतर लोकसंग्रहासाठी द्रव्याचा व्यय करणार, समाजावर येणाऱ्या आरिष्टांची शांती व्हावी एतदर्थ तपश्चर्या करणारे, त्याचप्रमाणें लोकांचें कल्याण व्हावें त्यांचें अध्ययन वाढावें, त्यांचें ज्ञान वृद्धिंगत व्हावें, त्यांचें आचरण नीतिशुद्ध असावें, यासाठीं योग, स्वाध्याय, ज्ञान व व्रत इत्यादिकांचा अंगीकार करणारे योगी श्रेष्ठ आहेत हें खरें, पण यांची वासना अद्यापि समूळ नष्ट झालेली नसते म्हणून यांनीं जरी स्वतःच्या उपयोगास पडणाऱ्या फलांचा त्याग केला तथापि कर्तृत्वाचा अभिमान विगलित झाला नाहीं व वासनेचाही समूळ उच्छेद झाला नाहीं ह्मणून यांचा पुरुषार्थ साध्य होणें नाहीं. हे वरिष्ट प्रतीचे लोक खरे, निष्कामत्वानें कर्म झालें तर यांचीं पापमूलक वासना नष्ट होते हेंही खरें, पण येथें सर्वव्यापि सर्वसाक्षी

व सर्वशुद्ध ईश्वराचें ध्यान नाहीं म्हणून यांस ईश्वरत्वही मिळणें नाहीं व ब्रह्मपदाला जाणें शक्यही नाहीं.

आतां कांहीं योगी असें समजतात कीं रेचक, कुंभक, पूरक इत्यादि योगसाधनांचा व शेवटीं महाकुंभकाचा लाभ झाला असतां मुक्ति मिळेल. या महाकुंभकांत प्राणरूपी आग्नीनेंच प्राणापानादिक वांयूचा होम करावयाचा असतो. असो; याप्रमाणें सर्व प्राणवृत्ति जरी स्वाधीन झाल्या तथापि ईश्वरज्ञान व ब्रह्मज्ञान झालेलें नसतें म्हणून यांत मोक्ष मिळणें शक्य नाहीं.

असो; हे वरील यज्ञ निष्कामत्वानें व निरहंकारानें केले असतां एक उत्कृष्ट कार्य होतें; तें हें कीं पूर्वसंचित पापाचा, व पापकारणांचा या यज्ञांनीं नाश होतो. व जीवास ब्रह्मज्ञान संपादन करण्याची योग्यता येते. हे सर्व यज्ञमार्ग वेदांत सांगितलेले आहेत व हे सर्व कर्मापासून उत्पन्न झालेले आहेत, तथापि नैष्कर्म्याची सिद्धि करणारे आहेत. पण जीवानें येथेंच थांबतां उपयोगी नाहीं. म्हणचे स्वतःचें वर्तमानकालीन अगर भविष्यकालीन उपभोग वाढविणाऱ्या सुखाचा त्याग केला किंवा इतरांचें सुख वाढविण्यासाठीं अहर्निश प्रयत्न केले, यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार यांचा अंगीकार करून किंवा महाकुंभक म्हणजे महाप्राणायाम साध्य करून ठेवून मनोवृत्ति स्वच्छ केल्या, तथापि कार्यसिद्धि होत नाहीं. तर मग करावयाचें तरी काय ? मुमुक्षुनें असें केलें पाहिजे कीं यज्ञाव्यतिरिक्त निष्काम, निष्कर्म, अविकृत असें जें ब्रह्म आहे तेंच मी आहें अशी भावना धरून वेदांताचे पठण, मनन व निदध्यास केल्याशिवाय आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार व्हावयाचा नाहीं. ह्मणूनच भगवान ३३ व्या श्लोकांत म्हणतात कीं, सर्व यज्ञांमध्यें ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. हा यज्ञ साध्य झाला म्हणजे कर्म संपलें व जीव ब्रह्मत्व पावला असें समजावें.

आतां जो कोणी वरील द्वादशयज्ञांपैकीं एकही यज्ञ करणार नाहीं म्हणजे ज्याला स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या सुखाची मुळींच चाड नाहीं त्याची ऐहिक यात्रासुद्धां सफळ होत नाहीं, मग दुसऱ्या पुरु-

षार्थाची गोष्ट कशाला हवी? यापुढें ब्रह्मज्ञान संपादनाचे मार्ग सांगावयाचे आहेत.

तदेतद्विशिष्टं ज्ञानं तर्हि केन प्राप्यत इत्युच्यते—

शिष्य—तर मग हें कर्माहून श्रेष्ठ व सर्व सुखाचें अगर असें जें ज्ञान तें कोणास प्राप्त होतें बरें?

गुरु—तेंच सांगतातः—

तद्विद्धि प्रणिपातेन
परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं
ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया (नमस्कार करून नम्रवृत्तीनें, विनयशीलतेनें; तसेंच योग्य शंकांचे प्रश्न करून व सेवा करून, सारांश विनयवंत होऊन, चौकसबुद्धीनें आणि गुरूची मर्जी प्रसन्न होईल अशी सेवा करून) **तत्** (तें ज्ञान) **विद्धि** (जाणून घे) **तत्त्वदर्शिनः ज्ञानिनः** (तत्त्व समजलें आहे ज्यांस, सद्वस्तूचें यथार्थ ज्ञान झालें आहे ज्यांस असें विद्वान लोक) **ते** (तुला) **ज्ञानं उपदेक्ष्यन्ति** (ज्ञानाचा उपदेश करितील) सारांश साधक बुद्धीनें, शिष्य भावानें तूं सत्पुरुषाजवळ गेलास आणि नम्रबुद्धीनें योग्य त्या शंका चौकसबुद्धीनें काढून प्रश्न विचारलेस, गुरूची भक्तिपूर्वक सेवा केलीस म्हणजे सद्वस्तु ओळखणारे ब्रह्मज्ञ गुरु प्रसन्न होऊन तुला या मोक्षदायक ज्ञानाचा उपदेश करतील.—'विद्धि'चा अर्थ 'मिळीव' असा मधुसूदनीकारांनीं केला आहे, तो धनपतीच्या मतें योग्य नाहीं. मुख्यार्थ संभवत असला म्हणजे गौण अर्थ घेऊं नये असा न्याय आहे.

तद्विद्धीति। तद्विद्धि विजानीहि येन विधिना प्राप्यत इत्याचार्यानभिगम्य प्रणिपातेन प्रकर्षेण नीचैः पतनं प्रणिपातो

दीर्घनमस्कारस्तेन कथं बन्धः कथं मोक्षः का विद्या का चाविद्येति परिप्रश्नेन सेवया गुरुशुश्रूषयैवमादिना प्रश्रयेणाऽऽवर्जिता आचार्या उपदेक्ष्यन्ति कथयिष्यन्ति ते ज्ञानं यथोक्तविशेषणं ज्ञानिनो ज्ञानवन्तोऽपि केचिद्यथावत्तत्त्वदर्शनशीला अपरे नातो विशिनष्टि तत्त्वदर्शिन इति। ये सम्यग्दर्शिनस्तैरुपदिष्टं ज्ञानं कार्यक्षमं भवति नेतरदिति भगवतो मतम् ॥ ३४ ॥

कोणत्या मार्गानें गेले असतां तुला तें ज्ञान प्राप्त होईल तें सांगतों. प्रथम ब्रह्मज्ञ गुरूजवळ जाऊन त्यास शिरसाष्टांग नमस्कार अति नम्रबुद्धीनें घालवा; नंतर हळुहळू बंध कसा प्राप्त होतो, प्राणी संसारांतून कसा सुटतो, विद्या म्हणजे काय, अविद्या म्हणजे काय, मी कोण आहें, वगैरे योग्य प्रश्न शिष्यबुद्धीनें विचारावे, वादबुद्धीनें विचारूं नयेत; ह्याचप्रमाणें गुरूची सेवा अनन्यभावानें करावी. अशा नम्रवृत्तीनें आचार्य प्रसन्न होतो व तो ज्ञानाचा, कर्मापेक्षां अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या ज्ञानाचा, उपदेश अधिकार पाहून क्रमाक्रमानें करितो.

शिष्य—मग हें सोपें काम झालें! वेदांत पठण करणारे व वेदांत सांगणारे अनेक लोक आहेत; सारांश असे गुरुजी वाटतील तितके भेटतील, तेव्हां त्यांची सेवा केली कीं ज्ञान मिळालेंच म्हणून समजावें!

गुरु—वत्सा! नाहींरे नाहीं! व्यर्थ भराभर पाठांतर करणारे हजारो गुरुजी भेटतील, पण सद्वस्तूचें यथार्थ ज्ञान होऊन खरा साक्षात्कार झाला आहे, असा एखादाच वेदांती मिळावयाचा. अशा सम्यग्ज्ञान झालेल्या पुरुषानें केलेला उपदेश सार्थ होतो, म्हणजे उपदेश पूर्णपणें ठसल्याबरोबर मायेनें उत्पन्न केलेल्या अज्ञानाचा नाश होतो. अज्ञान गेलें म्हणजे पूर्वीच्या पूर्ण स्वरूपाचा, मुक्तीचा, अनुभव होतो. समजलास? नुसतें शब्दपांडित्य करण्यांत पटाईत झालेल्या वादप्रिय किंवा भोंदु लोकांच्या उपदेशापासून अज्ञान नष्ट होणें नाहीं. सारांश तत्वदर्शी सद्गुरूवांचून सोय नाहीं, आणि सद्गुरू फारच दुर्मिळ, म्हणून ब्रह्मज्ञानाचा मार्ग तूं समजतोस तसा सोपा नाहीं.

मधु०, श्रीधर०, शंकरा०, प्रणिपात = दीर्घ नमस्कार. **भक्तिश्रद्धापूर्वक नम्रता प्रकट केली** म्हणजे पद, वाक्य, न्याय, प्रमाण, यांत निष्णात असलेले ब्रह्मसाक्षात्कारी सद्गुरु प्रसन्न होतात व ज्ञानोपदेश करितात. अनेकवचनी प्रयोग बहुमानार्थी आहे. अनेक गुरु असा अर्थ येथें नाहीं. ' ब्रह्मसाक्षात्कारी व ज्ञानी सद्गुरूजवळ कृतांजली होऊन जावें ' (मुंडक; २।१२). ही सर्वप्रसिद्ध श्रुतिही आहेच.

सरकार–गुरुमुख हवें. (पहा अ० १३ श्लोक २९ व अ० १७ श्लो० १४). गुरु म्हणजे चालका बोलका ज्ञानसमुद्रच होय ! गुरूपासून शुद्ध व सात्विक ज्ञान शिकावयाचें असतें.

प्रपा०–तत्वदर्शी=अपरोक्षसाक्षात्कार ज्यांस झाला आहे ते.

चतरजी–नित्य सेवा केली असतां शिष्याची गुरुस्वभावाशीं एकतानता होते.

द्विवेदी–विराग, विवेक, शमदमादिसंपन्नता, मुमुक्षुत्व व समंजसता आणि ग्राहकपणा हे गुण शिष्याचे आंगीं असणें अवश्य आहे. उपदेश झाल्यावर श्रवण, मनन, निदिध्यास इत्यादि अभ्यास करणारा शिष्य हवा. नमस्कार = कायिक अर्पण; प्रश्न = वाचिक अर्पण; सेवा = मानसिक अर्पण होय. ज्ञानविज्ञान देईल तो गुरु करावा.

रामा०–मी सांगितलेलें कर्म करित राहून सद्गुरूकडे ज्ञानोपदेशासाठीं जा.

द्वैतवादी–तत्–हें ज्ञान अधिक योग्यतेचें आहे म्हणून. 'श्रीकृष्ण आपणच ज्ञानविज्ञान सांगणार आहेत, तथापि गुरूकडे जा असें त्यांनीं स्पष्टबोधार्थ सागितलें.'

ज्ञाने०–**तेंही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधिलें । संकल्पा नये** (पुनः संकल्प म्हणून उत्पन्नच होत नाहीं.) ॥

पंडितांनीं गुरूच्या अधिकाराविषयीं पुष्कळच विस्तार केला आहे. गीताव्याख्याकार– .... **आणि आत्मानुभवें । निश्चित ब्रह्मचि**

झाले ॥ तथापि लोकानुग्रहापुरते । देहवृत्तीवरी येती ते । शरणागतवत्सल म्हणोनि तूर्ते । उपदेशिती निजज्ञान ॥ ३४ ॥

तथा च सतीदमपि समर्थं वचनम्—

सद्गुरूकडून उपदेश झाला व अज्ञान नष्ट झालें ह्मणजे पुढील, ३५ व्या श्लोकांत, सांगितलेला अर्थभागही खरा होतो—

यज्ज्ञात्वा न पुनर्मोह-
मेवं यास्यसि पाण्डव ॥
येन भूतान्यशेषेण
द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

यज्ज्ञात्वा (हें सद्वस्तूचें ज्ञान झाल्यावर) **पाण्डव** (अर्जुना !) **एवं** (आतांच्याप्रमाणें) **मोहं पुनः न यास्यसि** (पुनः मोहचक्रांत तूं अडकला जाणार नाहींस, मोहांत पडणार नाहींस); **येन** (जें ज्ञान मिळविल्याच्या योगानें) **आत्मनि अशेषेण भूतानि द्रक्ष्यसि** (सर्व पदार्थ, चटसारे, झाडून, सर्व पदार्थ, आत्मस्वरूपामध्यें पाहशील) **अथो मयि** (आणि मी जो परमेश्वर, त्यामध्येंच सर्व पदार्थ बघशील)—सारांश गुरूकृपेनें तत्वज्ञान झालें ह्मणजे ' हा मी ' ' हें माझें' असा जो मोह तुला प्राप्त झाला आहे, तसा मोह पुनः कधीं होणार नाहीं. तसेंच ब्रह्मज्ञानाचा अनुभव तुला आला ह्मणजे सर्व पदार्थ आपणच आहोंत, आपण, व परमेश्वर हे उभयतांही ह्या दृश्य व अदृश्य विश्वचक्रांत अंतर्बाह्य भरलेले आहों, विश्व व विश्वांतील पदार्थ तेच आपण व आपण ते तेच पदार्थ अशी अद्वैत स्थिति प्राप्त झाल्यामुळें पुनः दुःखशोकाचें कारणच राहणार नाहीं— येथें 'अथो ' ह्मणजे नंतर 'असा' अर्थ नाहीं, तर आणि असाच आहे.

यदिति । यज्ज्ञात्वा यज्ज्ञानं तैरुपदिष्टमधिगम्य प्राप्य पुनर्भूयो मोहमेवं यदेदानीं मोहं गतोऽसि पुनरेवं न यास्यसि हे पाण्डव । किंच येन ज्ञानेन भूतान्यशेषेण ब्रह्मादीनि स्तम्ब-

पर्यन्तानि द्रक्ष्यसि साक्षादात्मनि प्रत्यगात्मनि मत्संस्थानीमानि भूतानीति, अथो अपि मयि वासुदेवे परमेश्वरे चेमानीति क्षेत्रज्ञेश्वरैकत्वं सर्वोपनिषत्प्रसिद्धं द्रक्ष्यसीत्यर्थः ॥ ३५ ॥

अर्जुना! आतां जसा तुला ' हे माझे आजोबा, हे गुरु, हे भाऊबंद, हा मी, ' इत्यादि मोह अज्ञानामुळें प्राप्त झालेला आहे, तसा मोह तुला पुनः कधींही प्राप्त व्हावयाचा नाहीं. कारण सद्गुरूनें पाजलेल्या तत्त्वज्ञानामृताचा महिमाच असा आहे. हें नुसतें ' ज्ञानस्वरूपी-आत्मा आहे, ' येवढेंच ज्ञान नव्हे तर, सर्वच ब्रह्म आहें.' असें सांगणारें हें ज्ञान आहे. त्याचप्रमाणें उपदेश पूर्णपणें ठसल्याबरोबर ब्रह्मदेवापासून तों गवताच्या काडीपर्यंत सर्व पदार्थ तूं आपल्या आत्मस्वरूपामध्यें, ब्रह्मामध्यें, पहावयास लागशील. सर्व पदार्थ ही आत्मस्वरूपी आहेत, असें तुला दिसावयास लागेल; सर्वत्र एकच अद्वितीय ब्रह्म आहे, असें तुला वास्तविक ज्ञान होईल. त्याचप्रमाणें सर्वव्यापी जो मी वासुदेव, परमात्मा, परमेश्वर, त्या माझ्यामध्येंच हें सर्व विश्व आहे, जीव व परमेश्वर यांचेंही पूर्ण ऐक्य किंवा तादात्म्य आहे, असें जें सर्व उपनिषदें प्रसिद्धपणानें सांगतात, जें तादात्म्य उपनिषदांमध्यें प्रसिद्ध आहे, तेंही तुला प्रत्यक्ष होईल. सारांश जीव व शिव एकच, विश्व आणि विश्वज्ञाता एकच, असें सर्वत्र अद्वैत ज्ञान तुला प्राप्त होईल.

मधु०– ज्ञात्वा=मिळवून. आई, बाप, बंधु, इत्यादि जे सर्व भेद त्यांचें सुखदुःख तुला कळून हीं सर्वच आपण आहोंत, सर्वच परमेश्वर आहे, सर्व ब्रह्म आहे असा साक्षात्कार तुला प्राप्त होईल. सारांश अज्ञाननाश झाल्यावर अज्ञानकृत जी भेदबुद्धि तीही नष्ट होईल.

प्रपा०– व्यष्टिरूप ज्ञान, व्यक्तिरूप, भेदमूलक, ज्ञान नष्ट होऊन समष्टिज्ञान तुला प्राप्त होईल.

शंकरा० श्रीधर०–अथो = नंतर असा अर्थ करितात. ' सर्व आपणच आहोंत असें ज्ञान झाल्यावर सर्व पदार्थ परमेश्वरस्वरूपामध्यें आहेत असें ज्ञान होईल ' असा यांचा अर्थ आहे. ब्रह्मज्ञान झालें म्हणजे आधीं, मग,

असा भेद राहणें शक्य नाहीं. 'विश्व आपण व परमेश्वर आपण,' हें ज्ञान समकालीनच असतें. पर्वते यांस आचार्यांचा अर्थ मान्य आहे. '**नान्योऽतोऽस्ति श्रोत द्रष्टा मन्ता** (विचार करणारा) **विज्ञाता**' ही श्रुति देतात, तिचा अर्थ स्पष्टच आहे.

रामा०—" प्रकृतीनें भेद उत्पन्न होतो. ही प्रकृति काढून टाकिली ह्मणजे सर्वत्र **साम्य** (सारखेपणा, तादात्म्य ह्मणजे एकरूपता नव्हे!) तुला दिसूं लागेल; व माझ्यामध्यें (परमेश्वरामध्यें) सर्व भूतमात्र आहे असें पाहूं लागशील; कारण **माझ्यासारखेंच त्यांचें स्वरूप असेल**, सारांश साम्यावस्था प्राप्त होईल. " या आचार्यांचा हा अर्थ त्यांच्या सिद्धांतानुसार आहे पण त्यांचें सिद्धांतच अपूर्ण आहेत. शिवाय अथो या अव्ययानें परमेश्वरास **तादात्म्य** सांगावयाचें आहे, साम्यावस्था सांगावयाची नाहीं, हें स्पष्ट आहे. तसेंच '**सर्वभूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति**' या गीतावाक्यानेंच साम्यवादाचें खंडन होत आहे. **द्विवेदींनीं** हें खंडन उत्तम तऱ्हेनें केलें आहे.

द्वैतवादी०—'माझ्या आधारानें सर्व विश्व चाललें आहे, असें तुला समजेल; किंवा माझें ज्ञान तुला झाल्यावर सर्व भूतांचें ज्ञान तुला होईल.

वल्लभ०—'मी सर्व विश्वाच्या अंतर्यामीं आहे व विश्वसर्वस्व माझ्यामध्यें आहे असें श्रद्धापूर्वक जाण.

ज्ञानेश्वर—**जयाचेनि** (ज्या गुरूच्या) **वाक्य उजिवडे** (उजेडानें) । **जाहाले चित्त निधडे** (धैर्यवंत) । **ब्रह्माचेनि पाडे** (योग्यतेनें) । **निःशंक होय** ॥

रंगनाथ—'**मज आत्मत्वें साक्षात्केलिया । सर्वही अज्ञान नासे गा धनंजया! । तत्कार्य भूतें ही जाती लया । मग एकलया** (एकटा) **तूंचि होसी** ॥

पंडित ह्मणतात कीं पहिल्या अर्थात व्यतिरेक आहे ह्मणजे 'मी विषय नाहीं, मी देह, इंद्रियें, विषय, मन, बुद्धि, चित्त, (स्मरणशक्ति)

अहंकार या सर्वांहून निराळा आहे. ' असें जें ज्ञान तें व्यतिरेकज्ञान होय; आणि ' आत्मस्वरूपानें मीच सर्व आहें, सर्वत्र आत्मा आहे ' हें अन्वयज्ञान होय. दुसऱ्या पंक्तींत अन्वय आहे. आत्मसत्तेवांचून सर्व वस्तु जड आहेत, असाही वाद यांनीं उपस्थित केला आहे. व्याख्यान वाचनयोग्य आहे.

गीताव्याख्याकार—सर्व एकच ब्रह्मरूप झाल्यावर वध्यवधकभाव (मरणें, मारणें इत्यादि संबंध) अर्थातच नष्ट होतो.

डेव्हिस व टामसन—' माझ्यापासूनच सर्व प्राणी निघाले आहेत असें तुला समजेल ! ॥ ३५ ॥

किंचैतस्य ज्ञानस्य माहात्म्यम्—

हें ज्ञान मिळालें असतां काय होतें, या ज्ञानाचें माहात्म्य केवढें आहे असें म्हणशील तर तें ऐकः—

अपि चेदसि पापेभ्यः
सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥
सर्वं ज्ञानप्लवेनैव
वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

सर्वेभ्यः पापेभ्यः पापकृत्तमः (सर्व पापी लोकांपेक्षांही नीचत्वानें अत्यंत पापी असणारा) **अपि चेत् असि** (जरी तूं कदाचित्-असलास)—तरी—**सर्व वृजिनं** (तो सर्व पापसमुद्र) **ज्ञानप्लवेन एव** (तत्वज्ञानरूपी नौकेनें मात्र) **संतरिष्यसि** (तरून जाशील)—सारांश तूं जरी महापापी असलास तरी—तुझ्यावर परमेश्वरी अनुग्रह किंवा गुरुकृपा होऊन जर तुला ज्ञान प्राप्त झालें तर—तूं पापसमुद्राला तरून जाशील. ह्या तरण्याला एकच नौका आहे; आणि ती तत्वज्ञानरूपी नौका होय.

अपीति। अपि चेदसि पापेभ्यः पापकृद्भ्यः सर्वेभ्योऽतिशयेन पापकृत्पापकृत्तमः सर्वं ज्ञानप्लवेनैव ज्ञानमेव प्लवं कृत्वा वृजिनं वृजिनार्णवं पापं संतरिष्यसि धर्मोऽपीह मुमुक्षोः पापमुच्यते ॥ ३६ ॥

अरे ! अर्जुना ! विश्वामध्यें जे महाघोर पापकर्ते होऊन गेले, त्यासर्वांचीं सर्व पातकें व पातकवासना तुझ्यामध्यें एकवट झाल्या असल्या तरी हरकत नाहीं ; कारण या ज्ञानाचा महिमाच विलक्षण आहे. पहा कीं, हा सर्व पापस्वरूपी महासागर तरून जाण्याला एक तत्वज्ञानाची मात्र नौका समर्थ होते. सारांश हें ज्ञान तुला झालें तर तूं पापविन्मुक्त होऊन शुद्ध होशील.

शिष्य– म्हणजे, पाप नाहींसें होऊन पुण्य तेवढें त्याच्या गांठीं राहील व तो ज्ञानी पुण्याईनें किंवा आपल्या पुण्यकर्मांनीं मुक्त झाला असें होईल. असाचना भगवन् ! अर्थ ?

गुरु– काय तुझ्या मनावर कर्मवासनेचा दृढ संस्कार आहे हा ? अरे! पुण्य, पुण्यकर्म, किंवा पुण्यकर्मवासना हीं सर्व मुमुक्षूच्या दृष्टीनें पापेंच होत; कारण हीं प्राण्यास कर्मबंधांत घालितात. आणि मुमुक्षूला तर कर्मचक्र मोडावयाचें आहे. तेव्हां पाप शब्दामध्यें सर्व कर्में असाच अर्थ येतो असें समज.

मधु०–मुमुक्षुपुरुष पापी नसतोच; पण घटकाभर तो अघोर पापकर्मा आहे असें घेतलें तरी तो पापपुण्यरूपी सर्व कर्मापासून आत्मज्ञानाच्या साहाय्यानें मुक्त होतो.

प्रपा०–पापपुण्यात्मक कर्म अज्ञानामुळें होत असतें; तें अज्ञानच नष्ट झाल्यावर पापपुण्यही नष्ट होतें.

शंकरा०–'मी कूटस्थ, असंग, ज्ञानस्वरूपी, निष्क्रिय आहें;' असें ज्ञान होणें हेंच पापसमुद्र तरून जाण्याला उत्कृष्ट नौकासाधन आहे.

चतरजी, व पंडित–'निष्कामशून्यत्वानें केलेलें सर्व कर्म पापात्मक, बंधात्मक आहे.' बाकी सर्वत्र ऐकमत्य आहे. पापसमुद्र तरून जातो ह्मणजे पाप नष्ट करितो, असा द्वैतवादी अर्थ करतात.

वल्लभ–'लहानशा ज्ञाननौकेनें मोठा पापसमुद्र तरून जातां येतें, यावरून लघुकारणें महत्कार्यें कशीं करतात, हें स्पष्ट होतें.' हें अनुमान वादग्रस्त आहे.

ज्ञानेश्वर–जरी कल्मषाचा अगर । तूं भ्रांतीचा सागर । व्यामोहाचा डोंगर । आह्मासीं ॥ तऱ्ही ज्ञानशक्तीचेनि पाडें । हें अवघेंची बा थोकडें (थोडें) । ऐसें सामर्थ्य असें चोखडें (चांगलें) । ज्ञानी इयें (या ज्ञानांत.) ॥ वल्लभाचार्य व ज्ञानेश्वर या उभयतांमधील विरोध पहा !

रंगनाथ–'किं तेन न कृतं पापं चौरणाऽऽत्मापहारिणा । योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते॥' जो कीं आत्मयाचाचि चोरिता । आत्मा नाहींच ऐसें जो ह्मणता; । कां सच्चिदानंद अकर्ता, अभोक्ता । असतां; कर्ता, भोक्ता ह्मणे ! ॥ तेणें काय एक पाप नाहीं केलें !....॥ ह्या पापास आत्मज्ञान नष्ट करितें. 'देहात्मबुद्धिजं पापं न तद्गोवधकोटिभिः' (देह हाच आत्मा आहे अशी समजूत करून घेतली असतां जें पातक होतें, तें कोट गाई मारून संपादिलेल्या पापापेक्षां जास्त अघोर आहे.)

गीताव्याख्याकार–पार्था ! सूर्योदयकाळें (सकाळीं) । अंधकारस्वभावेंच पळे । तेथें काई सूर्यासी बळें। झुंजणें लागे तमासी ? । तेवी स्वभावेंचि ज्ञानोदयें । नुमिजे पापसमुदाये ॥ ज्ञान हें पूर्वपापांचा नाश करितें असें **टामसन** व **डेव्हिस** ह्मणतात तें अपूर्ण आहे. ज्ञानानें पूर्वपापें नष्ट होतात हें खरें, पण मूळवासना व अहंकार हीं उभयतांही नष्ट होतात, हें समजून घेणें अगत्याचें आहे. बीजच दग्ध झाल्यावर वृक्ष उगवण्याची भीति कशाला ? ॥ ३६ ॥

ज्ञानं कथं नाशयति पापमिति सदृष्टान्तमुच्यते—

ज्ञान हें पापाचा नाश करण्यास कसें समर्थ होतें याच्या स्पष्टीकरणार्थ एक दृष्टांत देतात:—

यथैधांसि समिद्धोऽग्नि-
र्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ॥
ज्ञानाग्निः सर्व कर्माणि
भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥

अर्जुन (अर्जुना!) **यथा** (ज्याप्रमाणें) **समिद्धः अग्निः** (पूर्णपणानें पेटलेला अग्नि) **एधांसि** (लांकडें) **भस्मसात् कुरुते** (भस्म करून टाकितो) **तथा** (त्याप्रमाणें) **ज्ञानाग्निः** (ज्ञानस्वरूपी अग्नि हा) **सर्व कर्माणि भस्मसात्कुरुते** (सर्व कर्मांचें भस्म करितो)—सारांश झगझगित पेटलेल्या विस्तवामध्यें ज्याप्रमाणें सर्व लांकडें भस्म होऊन जातात, निःशेष होतात, त्याचप्रमाणें ज्ञानरूपी अग्नि एकदां पेटला ह्मणजे त्यांत सर्व कर्मांची राखरांगोळी होऊन जाऊन तीं कर्में निःशेष होतात. वासना व अहंकार जळून गेल्यावर पापें भस्म होतात, यांत काय आश्चर्य आहे ?

यथेति । यथैधांसि काष्ठानि समिद्धः सम्यगिद्धो दीप्तोऽग्निर्भस्मसाद्भस्मीभावं कुरुतेऽर्जुन ज्ञानमेवाग्निर्ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा निर्बीजी करोतीत्यर्थः । न हि साक्षादेव ज्ञानाग्निः कर्माणीन्धनवद्भस्मी कर्तुं शक्नोति, तस्मात्सम्यग्दर्शनं सर्वकर्मणां निर्बीजत्वे कारणमित्यभिप्रायः । सामर्थ्याद्येन कर्मणा शरीरमारब्धं तत्प्रवृत्तफलत्वादुपभोगेनैव क्षीयतेऽतो यान्यप्रवृत्तफलानि ज्ञानोत्पत्तेः प्राक्कृतानि ज्ञानसहभावीनि चातीतानेकजन्मकृतानि च तान्येव सर्वाणि भस्मसात्कुरुते ॥ ३७ ॥

उत्कृष्टतऱ्हेनें प्रदीप्त झालेला हुताशन ज्याप्रमाणें सर्व काष्ठांचें भस्म करून टाकितो, त्याचप्रमाणें, अर्जुना! ज्ञानरूपी अग्नि एकदां प्रज्वलित झाला ह्मणजे तो सर्व कर्मांचें भस्म करितो, सारांश ज्ञानाग्नि

पेटला ह्मणजे कर्मवासना व अहंकार हीं दग्ध होऊन जातात, तेव्हां अर्थातच कर्मही नाहींसें होतें.

शिष्य—महाराज ! ज्ञान निष्क्रिय आहे. तें पापाचा क्षय कसा करील ? क्षय करणें ही क्रियाच होय.

गुरु—ह्मणजे ज्ञान हें स्वतः प्रत्यक्ष नाश करितें, किंवा अग्नि काष्टें जाळितो, तसें ज्ञान हें पापाचें भस्म साक्षात् करितें, असें नाहीं समजावयाचें; तर ब्रह्मसाक्षात्कार होऊन अद्वैतवृत्ति झाली म्हणजे अहंकार व वासना हीं आपोआपच नाहींशीं होतात. अहंकार व वासना नष्ट झालीं ह्मणजे कर्म होत नाहीं; सारांश कर्माचें भस्म होतें. बीजच नाहींसें झाल्यावर झाडें कसलीं येणार ? असो; आता ज्या पूर्वकर्माच्या योगानें आपल्यास देह प्राप्त झाला व ज्या कर्माचें फल उत्पन्न होण्यास देहोत्पत्तीनेंच आरंभ होतो, तें फल देहाचा उपभोग घेतल्यावांचून संपावयाचें नाहीं.

शिष्य— महाराज ! मला कांहीं समजलें नाहीं.

गुरु— अरे! आपल्यास हा देह प्राप्त होतो, तो पूर्वकर्मानेंच होतोना ? बरें, आतां पूर्वकर्माचें फल उत्पन्न होण्यास आरंभ होतो, तो आपल्यास देह मिळाला म्हणजे होतो. देह प्राप्त होणें म्हणजेच पूर्वकर्माचें फल उत्पन्न होण्याचा प्रारंभ होणें होय. समजलें? आतां ज्या कर्माचें फल होण्यास आरंभ झाला, तें कर्म आपलें सर्व फल उत्पन्न केल्याशिवाय व त्याचा उपभोग घेवविल्याशिवाय संपत नाहीं.

शिष्य—म्हणजे ?

गुरु— अरे! धोंड्यास वर फेकतांना आपण जी गति देतों, ती गति कोणत्या तरी कारणानें संपल्याशिवाय, जसा तो धोंडा आपली सहजस्थिति घेत नाहीं, किंवा एकदां सुटलेला धोंडा जसा गति संपविल्याशिवाय मध्येंच थांबवितां येत नाहीं, त्याचप्रमाणें कर्माचें फल, शरीरें उत्पन्न करून तीं कांहीं कालपर्यंत ठेवावीं, असें असतें. तो काल म्हणजे पूर्वकर्माचें सामर्थ्य नष्ट होण्याचा काल प्राप्त झाल्याशिवाय देह सुटावयाचा नाहीं. सारांश जें कर्म फलद्रूप हो-

ण्यास आरंभ झाला, जें कारण कार्य करण्यास प्रवृत्त झालें, तें कर्म किंवा त्या कर्माचें सामर्थ्य नष्ट होईल, तेव्हां फल नष्ट होईल. समजलें? तेव्हां या देहांत जरी ज्ञान झालें तरी ज्या कर्मानें हा देह उत्पन्न झाला तें कर्म संपल्याशिवाय–उपभोगानें कर्माचा क्षय होतो–देह त्यागितां येत नाहीं. तसेंच ज्ञानकालीं त्या देहांत होणाऱ्या कर्माचें फल देह जिवंत मात्र ठेवण्यामध्यें होत असतें, सारांश तें कर्म नष्ट होत नाहीं. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर या ज्ञानी पुरुषाचें कर्म उदासीनपणानें होत असल्यामुळें तें कर्म कर्त्यास मुळींच बद्धक होत नाहीं. असो; आतां देहप्रारब्धाशिवाय जीं इतर कर्में आहेत, व जीं अजून फलद्रूप व्हावयास लागलीं नाहींत, तीं ज्ञान झाल्यापूर्वीचीं असोत, ज्ञान होत असतां झालेलीं असोत, किंवा पूर्वीच्या अनंत जन्मामध्यें केलेलीं असोत, तीं सर्व-पुनः सांगतो–ज्यांचें फल होण्यास आरंभ झाला नाहीं, जीं फलद्रूप होऊं लागलीं नाहींत,-तीं सर्व कर्में ज्ञानाच्या योगानें भस्म होतात.

शिष्य—हें शेवटलें मला नाहीं समजलें. कर्माचें फल झालेंच पाहिजे असा सिद्धांत आहे.

गुरु—मग त्या सिद्धांताच्या विरुद्ध कोण बोलतें आहे? अरे! या आपल्या मठाच्या छपरावर एखादा धोंडा नेऊन ठेविला तर त्या धोंड्याला खालीं जमिनीवर पडण्याचें सामर्थ्य आहे कीं नाहीं?

शिष्य–होय आहे.

गुरु–पण तें सामर्थ्य अव्यक्त आहे, प्रकट झालेलें नाहीं आणि कोणी एखाद्यानें मुद्दाम त्या धोंड्याला हलविल्याशिवाय, किंवा वारा, पाऊस, वानरें वगैरे प्राणी आल्याशिवाय, किंवा भूकंप झाल्याशिवाय, त्या मठशिखरावरील धोंड्याला खालीं येण्याची प्रकटगति प्रलयकालापर्यंत सुद्धां यावयाची नाहीं; होयना? झालें तर मग. जीं कर्में फलप्रद झालीं नाहींत, अव्यक्त स्थितीमध्येंच राहिलीं, त्या कर्मास फलद्रूप करणारीं जीं अहंकार व वासना हीं साधनें, तींच नष्ट झालीं म्हणजे तीं कर्में फलाच्या संबंधानें नष्टच झालींना? किंवा दुसरें असें समज कीं ज्ञान

उत्पन्न होण्याला अवश्य साधनें ह्मणजे विषयांचा वीट, मोक्षाची इच्छा, गुरूचा उपदेश, परमेश्वरी कृपा इत्यादि साधनचतुष्टय उत्पन्न करूनच तीं पूर्व कर्में फलप्रद होऊन नष्ट होतात. समजलें? एवंच ज्ञानाग्नीच्या योगानें सर्व कर्मांचा, अफलद्रूप झालेल्या सर्व कर्मांचा क्षय होतो, फलद्रूप झालेलें, देह प्राप्त करून दिलेलें कर्म देहपातानंतर नष्ट होतें. सारांश सर्व कर्में ज्ञानानें भस्म होतात.

मधु०–**भिद्यते हृदयग्रन्थिः**' वगैरे सर्व प्रसिद्ध श्रुति या श्लोकाच्या समर्थनार्थ देतात, व पुष्कळ वेदांत सूत्रांचा आधार दाखवितात. इतर सर्व संस्कृत अद्वैती व बाकीचे टीकाकार आचार्यानुगामी आहेत.

द्विवेदी–पिंड व ब्रह्मांड एकच आहे असें ज्ञान होऊन वासना व अहंकार नष्ट झालीं ह्मणजे लिंगदेहाचा नाश होतो, सारांश भोक्ताच नष्ट होतो. तो नष्ट झाला म्हणजे कर्म नष्ट झालेंच.

ज्ञानेश्वर–**सांगे भुवनत्रयाची काजळी। जे गगनामाजी उधवली** (उधळली) ॥ **तिये प्रळयींचे वाहटुळी। काय अभ्र पुरे ?** ॥ **कीं पवनाचेनि कोपें। पाणियेंचि जो पळिपे** (पाण्यालाच जो भस्म करितो) ।**तो प्रळयानळ दडपे। तृणकाष्ठें काई ?**॥

पंडित म्हणतात कीं ३६ व्या श्लोकानें कर्माचा लोप होत नाहीं व ३७ व्यानें संचित पाप भस्म होतें असें सांगितलें.

यत एवमतः—

न हि ज्ञानेन सदृशं
पवित्रमिह विद्यते ॥
तत्स्वयं योगसंसिद्धः
कालेनाऽऽत्मनि विन्दति ॥ ३८ ॥

हि (कारण) **इह** (ह्या लोकीं) **ज्ञानेन सदृशं** (ज्ञानासारखें) **पवित्रं** (पूज्य, शुद्ध, वंदनीय) **न विद्यते** (असत नाहीं.) **योग-**

संसिद्धः (योगाभ्यासानें, आत्मनिष्ठेनें कृतार्थ झालेला मुमुक्षू) **तत्** **स्वयं** (तें ज्ञान स्वतःच) **कालेन** (कांहीं कालानंतर) **आत्मनि** (आत्म स्वरूपामध्यें) **विन्दति** (मिळवितो). सारांश ज्ञानासारखी दुसरी पवित्र वस्तु येथें कोणतीही नाहीं. ज्याची आत्मनिष्ठा दृढ झाली आहे व ज्याचा अभ्यास अखंड चालला आहे त्या पुरुषाला कांहीं कालानंतर तें ज्ञान आत्मस्वरूपामध्येंच सांपडतें. आत्मस्वरूपाचा दृढ परिचय झाला म्हणजे त्या योगी पुरुषाला स्वतःच ज्ञान अवगत होतें.

न हीति । न हि ज्ञानेन सदृशं तुल्यं पवित्रं पावनं शुद्धिकरमिह विद्यते तज्ज्ञानं स्वयमेव योगसंसिद्धो योगेन कर्मयोगेण समाधियोगेन च संसिद्धः संस्कृतो योग्यतामापन्नो मुमुक्षुः कालेन महताऽऽत्मनि विन्दति लभत इत्यर्थः ॥ ३८ ॥

ज्ञानासारखी पवित्र, शुद्ध करणारी, निर्मळ करणारी, दुसरी वस्तुच या विश्वांत नाहीं. अर्थात हें ज्ञान संपादन करून घेण्यापेक्षां दुसरें पुण्यशील कर्मच नाहीं. असो; तें ज्ञान स्वतःच, आपोआप उत्पन्न होतें. केव्हां म्हणशील तर सांगतों: शास्त्रशुद्ध कर्माच्या निष्काम आचरणानें व एकाग्र मन करून आत्मस्वरूपाशिवाय करून इतर वस्तूंवरील चित्त काढून घेतल्यामुळें शुद्ध, निर्मळ, असें मन झालें आहे ज्याचें, अशा मोक्ष मार्गानें जाण्यास अधिकार प्राप्त झालेल्या मुमुक्षूला दृढ अभ्यासानंतर कांहीं काळानें आत्मस्वरूपामध्येंच ज्ञानाचा लाभ होतो.

शिष्य—खालची ओळ मला बिलकुल समजली नाहीं.

गुरुजी—अरे ! हे विषय तुच्छ आहेत असें समजून निष्काम बुद्धीनें विहित कर्मे करणारा पुरुष प्रथम शुद्धसत्वाचा होतो. आतां विषयाचा त्याग केला, परंतु आत्मस्वरूप समजलें नाहीं, म्हणून प्रथम सर्व विश्वव्यापक परमेश्वराचें प्रथमतः मूर्तीच्या साहाय्यानें व नंतर परमेश्वर हें ज्ञानस्वरूप आहे, तो करुणाघन आहे, तो आनंदाची

मूर्ति आहे, अशा स्वरूपानें ध्यान करूं लागतो. इतकी त्याची तयारी झाली आणि परमेश्वराशिवाय अन्य विषय त्याच्या लक्ष्यांत येईनासा झाला म्हणजे त्याची बुद्धि संस्कृत होते, शुद्ध होते व अज्ञेयाचें चिंतन करावयाची योग्यता त्याला प्राप्त होते. समजलास ? आतां ज्ञान हें इतर साधनांनीं समजण्यासारखें नाहीं. इतर साधनांस म्हणजे इंद्रियें मन, बुद्धि इत्यादिकांस तें अज्ञेय आहे. तव्हां तें अज्ञेय ज्ञान स्वतःच या मुमुक्षूच्या अंतःकरणांत पुष्कळ दृढाभ्यासानें अवतीर्ण होऊन त्याला साक्षात्कार होतो. समजलें ? ठीक आहे.

मधु०—आत्मज्ञान झाल्यावर पापोदय होण्याचें कारणच नष्ट होतें म्हणून ज्ञानासारखी दुसरी पवित्र वस्तुच नाहीं. आतां हें ज्ञान लवकर, एकदम, होण्यासारखें नाहीं. त्यास दृढाभ्यास पाहिजे. निष्कामकर्मयोगानें चित्तशुद्धि झाल्यावर, व गुरूपदेशानें योग्यमार्ग समजल्यावर दृढाभ्यासानें स्वतःच्याच चित्तांत तें ज्ञान प्रकट होतें. दुसऱ्या मनुष्यानें सांगून हें ज्ञान मिळावयाचें नाहीं. सर्व विद्याप्राप्तीचा हाच मार्ग आहे. **साक्रेटिस** नामक तत्ववेत्यानें ह्याच भगवन्निर्मित मार्गाचें अवलंबन केलें. सारांश चित्तावर योग्यसंस्कार व्हावा व ज्ञानानें पारमार्थिक दृष्टि व्हावी अशी इच्छा असेल तर प्रत्येकानें स्वतः सयुक्तिक उद्योग केला पाहिजे. '**तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येरा गबाळाचें काम नाहीं.**' आमची शिक्षकमंडळी व आमचे विद्यार्थी ह्या सिद्धांताच्या परिशीलनानें तरी घोकंपट्टीचा अव्हेर करतील काय ? '**मनसैवानुद्रष्टव्यमेतत्**' (हें मनानें मात्र समजून घेतलें पाहिजे.) ही श्रुति **प्रपा**कार देतात. पवित्रं = शुद्ध करणारें, शोधक. **पंचाशीति** ग्रंथांत म्हटलें आहे: 'राहु स्वतः अदृश्य आहे, तथापि चंद्रबिंबांत राहून प्रकट होतो; त्याचप्रमाणें विशुद्ध आत्मा संस्कृत अंतःकरणामध्यें स्वयमेव प्रकट होतो

प्रपा० **श्रीधर, पर्वते, द्विवेदी, चतरजी**,—इह= तप, योग इत्यादि ऐहिक साधनामध्यें. कर्मयोगानें चित्तशुद्धि झाल्याविना व ऐक्यभावनाझाल्याविना आत्मज्ञान प्रकट होत नाहीं.

शंकरा—पूर्वसंचित कर्मांचा, सर्व पापवासनेचा नाश ज्ञान करतें.

रामा०—सर्व पवित्र करणारें ज्ञान, निष्काम व विहित कर्म केलें असतां, आपोआप प्राप्त होतें. ऐक्यज्ञानाचा प्रश्न ह्यांनीं काढिला नाहीं.

द्वैतवादी—परमेश्वरी प्रसाद झाला असतां ज्ञानलाभ होतो.

ज्ञानेश्वर—**या** (ज्ञानाच्या) **महातेजाचेनि कसें** (कसोटीनें) **। जरी चोखाळ** (शुद्ध) **प्रतिबिंब दिसे । कां गिंवसिलें गिवसें । आकाश हे** (आकाशाला कंवटाळूं पाहणें म्हणजे जसें मौर्ख्यदर्शक आहे, तसेंच ज्ञानाचीं प्रतिबिंबें मात्र असणारीं जीं इतर साधनें, तीं ज्ञानाचीं बरोबरी करतील असें अनुमान काढणें होय.) सारांश अमृताला जशी अमृताचीच उपमा साजते, इतराची नाहीं; तशीच ज्ञानाची गोष्ट आहे. ज्ञानासारखें पवित्र ज्ञानच होय.

पंडित—**अगा ! हस्तीस धुतलें जळीं । तो पाण्यांतही चाचपे धुळी ! । तीरास येतां कवळीं । धुळी शुंडाग्रे करुनि ! ॥ ऐसें शुद्धि निमित्त । केलें जरी कर्म प्रायश्चित्त । तथापि पापीं प्रवर्ते चित्त । पुनः पुन्हा ॥ ज्ञान कर्माचीं मुळेंचि तोडी । सोडवी चित्ताच्या अनादी खोडी । लावूनि ब्रह्मसुखामृताची गोडी । कंटाळा आणी विषयकांजीचा ॥** दृष्टांत उत्तम आहे. पंडितांनीं आणखी 'ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान' ही त्रिपुटी चित्ताच्यायोगानें एक कशी होते, हें उत्तम तऱ्हेनें दाखविलें आहे. 'कर्मयोगानें चित्तशुद्धि झाल्याबरोबर, आत्मज्ञान होतें' असें म्हणणाऱ्या लोकांचेंही यथामति खंडन केलें आहे.

व्याख्याकार—या क्रममार्गास **पिपीलिका मार्ग** म्हणतात. **विहंगम मार्ग** पुढील श्लोकांत आहे.

टामसन—गुरुपदेशाव्यतिरिक्तही ज्ञान मिळूं शकतें, असें म्हणतात, हें अयोग्य आहे. ॥ ३८ ॥

येनेकान्तेन ज्ञानप्राप्तिर्भवति स उपाय उपदिश्यते—

गुरु—आतां ज्ञानप्राप्ति हटकून व्हावयाचीच असें जें साधन आहे, तें साधन अगर तो उपाय सांगतातः—

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं
तत्परः संयतेन्द्रियः ॥
ज्ञानं लब्ध्वा परांशान्ति
मचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥

श्रद्धावान् (ज्याच्या अंतःकरणांत भाव, भक्ति आहे तो पुरुष) **ज्ञानं लभते** (ज्ञान प्राप्ति करून घेतो.)–पण तो–**तत्परः** (जेथून ज्ञान मिळणार त्या गुरूंच्या ठायीं सप्रेम निष्ठा आणि गुरूपासून जें प्राप्त होणार त्यावरही अव्यभिचारिणी निष्ठा धारण करणारा असला पाहिजे.)–व–**संयतेन्द्रियः** (वश करून घेतलीं आहेत इंद्रियें ज्यानें, असा मात्र पाहिजे.)–असा तो पुरुष–**ज्ञानं लब्ध्वा** (ज्ञान प्राप्ति करून घेऊन) **अचिरेण** (लवकरच) **परां शांन्ति** (अत्यंत शेवटचें असें समाधान) **अधिगच्छति** (प्राप्त करून घेतो.)–सारांश श्रद्धावान्, तत्पर आणि आत्मसंयमी पुरुषास मात्र ज्ञान मिळतें. हें ज्ञान प्राप्त झालें म्हणजे जेथें केव्हांही चलबिचल नाहीं, अशा प्रकारचें समाधान त्या ज्ञानी पुरुषास लवकरच मिळतें; सारांश तो मुक्त लवकरच होतो.

श्रद्धावानिति । श्रद्धावाञ्श्रद्धालुर्लभते ज्ञानम् । श्रद्धालुत्वेऽपि भवति कश्चिन्मन्दप्रस्थानोऽत आह तत्परो गुरूपासनादावभियुक्तो ज्ञानलब्ध्युपाये श्रद्धावांस्तत्परोऽप्यजितेन्द्रियः स्यादित्यत आह संयतेन्द्रियः संयतानि विषयेभ्यो निवर्तितानि यस्येन्द्रियाणि स संयतेन्द्रियः । य एवंभूतः श्रद्धावांस्तत्परः संयतेन्द्रियश्च सोऽवश्यं ज्ञानं लभते । प्रणिपातादिस्तु बाह्यो नैकान्तिकोऽपि भवति मायावित्वादिसंभवान्न तु तच्छ्रद्धावत्त्वादावित्येकान्ततो ज्ञानलब्ध्युपायः । किं पुनर्ज्ञानलाभात्स्यादित्युच्यते ज्ञानं लब्ध्वा परां मोक्षाख्यां शान्तिमुपरतिमचिरेण क्षिप्रमेवाधिगच्छति । सम्यग्दर्शनात्क्षिप्रं मोक्षो भवतीति सर्वशास्त्रन्यायप्रसिद्धः सुनिश्चितोऽर्थः ॥ ३९ ॥

श्रद्धालु पुरुषास, भाविक पुरुषास, ज्ञान प्राप्ति होते. आतां भाविक पुरुष आळशी असला तरी त्याला ज्ञान प्राप्ति होते असें नाहीं. त्या पुरुषानें आपल्या वेदांत विज्ञानी गुरूची एक निष्ठेनें सेवा करून तत्परता दाखिवली पाहिजे व जे जे ज्ञान प्राप्तीचे उपाय आपले सद्गुरु सांगतील त्या त्या उपायांवर त्याची पूर्ण निष्ठा असली पाहिजे. असाही एकनिष्ठ, उद्योगी भाविक मिळेल, पण त्यानें इंद्रियांचें दमन केलें नसेल किंवा मनोजय केला नसेल तर हा भाविक पुरुष कुच कामाचा होईल. म्हणून विषयांपासून ज्यानें आपलीं सर्व इंद्रियें व मन यांस पराङ्मुख केलें अशा प्रकारचा तो भाविक पुरुष पाहिजे. याप्रमाणें शुद्ध भावाचा, उद्योगी व जितेंद्रिय असा जो पुरुष ज्ञान मिळविण्याची इच्छा करील, त्याला गुरुद्वारा ज्ञान अवश्य प्राप्त होईल.

शिष्य—गुरूंची यथाशास्त्र सेवा करणारा असला म्हणजे झालें, श्रद्धालुच कशाला हवा ?

गुरुजी—अशासाठीं कीं, गुरुजींस नमस्कार करणारा, त्यांची सेवा यथासांग करणारा शिष्य कपटी असण्याचा संभव आहे. बाहेरून प्रेमभाव दाखविणारे परंतु आंतून गळे कापणारे लोक थोडे असतात काय ? असो तेव्हां नुसतीच गुरुसेवा सांगितली तर ज्ञानप्राप्तीचा संभव नाहीं, म्हणून शुद्धभावाची, गुरुजींनीं सांगितलें तेंच खरें असें निश्चित मनानें मानण्याची, अपेक्षा आहे. शुद्धभाव, योग्य उद्योग आणि जितेंद्रियता इतक्या गोष्टी साध्य झाल्या म्हणजे मुमुक्षूस ज्ञानप्राप्ति होतेंच होते. आतां इतक्या सायासानें मिळालेल्या ज्ञानापासून फलप्राप्ति काय असा वेडगळ प्रश्न कोणी केलाच तर त्याला भगवान् उत्तर देतात कीं असलें पवित्र आत्मज्ञान यथास्थित समजल्यावर लवकरच त्याला मुक्ति प्राप्त होते. ह्या मुक्तस्थितींत सर्वत्र अद्वैत असल्यामुळें अत्यंत शुद्ध अशा प्रकारची शांति मिळते अथवा तो पुरुष प्रत्यक्ष शांतीच होऊन बसतो. सम्यग्दर्शन झाल्याबरोबर, निदान झाल्यानंतर लवकरच हा ज्ञानी पुरुष मुक्त होतो असें सर्व वेदांत ग्रंथांत व स्मृतींत सांगितलें आहे. शिवाय हा सिद्धांत युक्तीस व अनुभवास धरूनच आहे.

मधु,० प्रपा०, श्रीधर, ज्ञानेश्वर, रंगनाथ, आचार्यानुसारी आहेत. श्रद्धा इत्यादि अंतरंग साधनें होत. दीप लावल्यावर जसा अंधकाराचा नाश होतो, तसा ज्ञानानें अज्ञानाचा नाश होतो.

द्विवेदी–तीन प्रकारची श्रद्धा सांगतात. (१) शास्त्रावर, (२) सद्गुरुवर आणि (३) आत्मज्ञानावर अशा तीन श्रद्धा होत. व्यवहारांतही ही तीन प्रकारची श्रद्धा असेल तरच कार्यभाग सिद्ध होतो. तत्परता म्हणजे आपल्या कर्तव्यांत एकचित्तानें निमग्न होणें हें होय. प्राण गेला तरी बेहेत्तर, पण कार्यसिद्धि साधावयाची या निश्चयानें काम करणें ती कर्तव्यतत्परता होय. 'कीटकाचें भ्रमर होणें' ही खरी तत्परता होय. इंद्रियांस आत्मवश करणें हेंच त्यांचें नियमन आहे.

चतरजी–श्रद्धेला पुढें काय होईल याचा सारासार विचार नसतो. श्रद्धा असली म्हणजे कार्य व्हावयाचेंच.

द्वैत०–प्रारब्धभोग संपतांक्षणींच वरील श्रद्धावान्, तत्पर, व आत्मसंयमी पुरुषाला आनंदरूप शांति मिळते. 'मत्परः' असा यांचा पाठ असावा. मत्पर = मी जो भगवान याचें ठायीं एकनिष्ठ; तोच तत्पर होय. ॥ ३९ ॥

अत्र संशयो न कर्तव्यः पापिष्ठो हि संशयः, कथम् उच्यते—

हा वर जो सिद्धांत सांगितला आहे याच्या सत्यतेविषयीं संशय घेण्याचें कारण नाहीं. अशा सर्वशास्त्रसंमत, युक्तिसिद्ध, अनुभवपूर्ण, सिद्धांतासंबंधें शंका घेऊन वितंडवाद करणारे संशयी पुरुष पापी स्वभावाचेच असतात. संशय हा महा अनर्थकारी आहे हेंच ह्या श्लोकांत सांगितलें आहे.

अज्ञश्चाश्रद्दधानश्च
संशयात्मा विनश्यति ॥
नायं लोकोऽस्ति न परो
न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

अज्ञः च अश्रद्दधानः च संशयात्मा (जो अज्ञानी आहे, ज्याची कशावरही श्रद्धा नाहीं व जो प्रत्येक वस्तूविषयीं वितंड शंका घेतो)–तो–**विनश्यति** (नाश पावतो) **संशयात्मनः** (जो सदैव शंकाकुल असतो, ज्याला कोणतीही गोष्ट खरी आहे असें वाटत नाहीं, त्याला) **अयं लोकः न अस्ति; न परः; न सुखं** (हा ही लोक मिळत नाहीं; परलोक तर अर्थांतच मिळत नाहीं; सारांश त्याला कोठेंही कसल्याही प्रकारचें सुख मिळत नाहीं.) याप्रमाणें संशयी पुरुषाची काय स्थिती होते ती पहा.

अज्ञश्चेति । अज्ञश्चानात्मज्ञोऽश्रद्दधानश्च संशयात्मा च विनश्यति । अज्ञाश्रद्दधानौ यद्यपि विनश्यतस्तथाऽपि न तथा यथा संशयात्मा, संशयात्मा तु पापिष्ठः सर्वेषाम् । कथं नायं साधारणोऽपि लोकोऽस्ति तथा न परो लोको न सुखं तत्रापि संशयोपपत्तेः संशयात्मनः संशयचित्तस्य तस्मात्संशयो न कर्तव्यः ॥ ४० ॥

जो अज्ञानी आहे, ज्याला आत्मज्ञान झालें नाहीं, ज्याला श्रद्धा, आस्तिक्यबुद्धीच, नाहीं व जो नेहमीं शंकेखोर असतो, सारांश ज्या पुरुषाची कोणत्याही शास्त्र, युक्ति किंवा अनुभवसिद्ध सिद्धांतांवर निष्ठा बसत नाहीं त्या पुरुषाचा सर्वोपरी घात होतो. आतां आत्मज्ञान समजलें नाहीं असे व समजूत पटली नाहीं, तोंपर्यंत श्रद्धा न ठेवणारे, पुरुषांचा नाश होतो हें खरें; पण संशयग्रस्त पुरुषांचा जसा नाश होतो तसा दुसऱ्या कोणाचाही होत नाहीं. सगळ्यांत अति पापी पुरुष ह्मटला ह्मणजे संशयपीडित पुरुष होय. कारण प्रत्येक गोष्टींत तो संशय घेणारा असल्यामुळें त्याला इहलोकीं सुख मिळत नाहीं. उघडच आहे, प्रत्यक्ष बायकोनें तयार केलेल्या अन्नांत किंवा दिलेल्या विड्यांत विष असेल असा संशय घेणाऱ्या पुरुषाला इहलोकीं कसलें सुख मिळणार किंवा त्याचा संसार तरी सुखाचा कसला असणार? परलोकाविषयीं अनंत शंका घेण्यास जागा असल्यामुळें अर्थांतच परलोकची गोष्टच राहिली; सुख तर नष्ट झालेलेंच असतें; कारण 'सुख हेंच

सुख आहे कशावरून?' अशी दीर्घशंका हे राजश्री काढणार! सारांश संशयी पुरुषाचें याप्रमाणें सर्वस्वी नुकसान होतें. म्हणून योग्य कारणाशिवाय, किंवा भलतीच, शंका घेऊं नये. विश्वास पटण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत त्यावर आपण विश्वास ठेविलाच पाहिजे. समजलेंना? बरें तर पुढें चला.

मधु०—अश्रद्धा=नास्तिक्यबुद्धि. प्रपा०, श्रीधरः—अज्ञ असला तरी अश्रद्धालु उपयोगी नाहीं; आणि श्रद्धाशून्य असला तरी संशययुक्त मनाचा पुरुष असणें इष्ट नाहीं. अज्ञानी आहे ह्मणून हा लोक नाहीं, श्रद्धाशून्य असला ह्मणजे परलोक मिळत नाहीं; आणि संशयी असला तर त्याला सुखही नाहीं आणि विश्रांतीही नाहीं!

शंकरा०—ज्ञान झालें तरच मोक्ष मिळतो अशा अर्थाचीं अनेक श्रुतिस्मृतींमधून बरींच वाक्यें देतात. ज्याला शमदमादि साधनें साध्य झालीं नाहींत, जो गुरूपदेशानें पवित्र झाला नाहीं, तो अज्ञ होय. श्रद्धा पाहिजे.

पर्वते, द्विवेदी व चतरजी आचार्यानुसारी आहेत. ज्ञान=विवेक असें द्विवेदी ह्मणतात.

रामा०—देहातिरिक्त आत्मा आहे असें ज्ञान असून शास्त्रविहित कर्में सिद्ध होऊन पुरुषार्थ साध्य होण्याला आपलें मन संशयविरहित झालें पाहिजे. सारांश पूर्ण श्रद्धा पाहिजे.

द्वैतवादी—आचार्यप्रमाणेंच अर्थ करितात.

ज्ञानेश्वर—अज्ञ म्हणजे काय?=**शून्य जैसें गृह। कां चैतन्यवीण देह। तैसें जीवित तें समोह। ज्ञानहीन॥** .... (संशयात्मनो न सुखं) **जया काळज्वर आंगीं बाणें। ते शीतोष्णें जैसीं नेणे। आगी आणि चांदणे। सरिसेंचि मानी!॥ तैसें साच आणि लटिकें। विरुद्ध आणि निकें** (चांगलें अनकूल) **। संशयी तो नोळखे। हिताहित॥ हा रात्री दिवस पाही। जैसा जात्यंधा ठाऊकें** (ठाऊक) **नाहीं। तैसें संशयी असतां, कांहीं। मना नये॥**

गीताव्याख्याकार—ऐसिया संशययुक्तासी। ज्ञानाची गोष्ट काइसी ?। मद्यपाना आणि सावधतेसी। कांहीं संबंध असे ?॥ भूतसंचार झाला जया। तया विचार कैचा धनंजया ?। तेवीं आतुडला जो संशया। तो तद्वत् जाणे॥

पंडितांनीं भोंदूंची निंदा केली आहे ती वृद्धानुयायी व आधुनिक मार्गी या उभयतांनींही वाचण्यासारखी आहे. या श्लोकाचा विस्तार मुमुक्षूंनीं अवश्य वाचावा.

'श्रद्धा व अश्रद्धा या शब्दद्वयावरून गीताकारावर ख्रिस्ती धर्माची छाया पडली होती, असें स्पष्ट दिसतें.' असा **डा. लारिंजर** यांनीं तर्क काढिला आहे ! ख्रिस्ती धर्माशिवाय इतर कोठेंही उज्जल धर्मतत्वें सांपडावयाचीं नाहींत, सांपडलींच कदाचित् तर तीं ख्रिस्तप्रणीत धर्मांतूनच घेतलीं असलीं पाहिजेत, असा मनाचा ग्रह करून ज्यांनीं इतर धर्मांचें परीक्षण करण्याचें अघोर साहस करण्यास हात घातला, त्यांचे विचार किती निर्मळ असतील, हें सांगण्याची जरूरी नाहीं. ख्रिस्तोदयापूर्वी अनेक शतकें विद्यमान असणाऱ्या छांदोग्य, बृहदारण्यक इत्यादि उपनिषदांमधून श्रद्धा शब्द अनेक वेळ आला आहे, हेंच लारिंझर साहेबांस उत्कृष्ट उत्तर आहे. श्रद्धेशिवाय कार्यभाग होत नाहीं हें हिंदूसच काय पण ख्रिस्तप्रणीत धर्माचा जन्मही झाला नव्हता तेव्हां प्रकट झालेल्या बुद्ध धर्मांतील लोकांस व स्थानिक धर्माचा अवलंब करणाऱ्या ग्रीक व रोमन लोकांस कळून चुकलें होतें. जीजस खाइस्ट या महापुरुषानें भक्तिमार्गाचें प्रोत्साहन केलें हें खरें, पण भक्तिमार्गच त्यांनीं शोधून काढला असें म्हणणें अत्यंत धाष्टर्याचें आणि म्हणून असमंजस होय. ॥ ४० ॥

तस्मात्—

योगसंन्यस्तकर्माणं

ज्ञानसंछिन्नसंशयम् ॥

आत्मवन्तं न कर्माणि
निबध्नन्ति धनंजय ॥ ४१ ॥

धनंजय (हे अर्जुना !) **योगसंन्यस्तकर्माणं** (आत्मनिष्ठेच्या दृढसामर्थ्यानें ज्यानें सर्व अहंकारजन्य कर्मांचा त्याग केला आहे) **ज्ञानसंछिन्नसंशयं** (आत्मज्ञानाच्या दृढतर परिचयानें ज्यानें सर्व संशयांचा उच्छेद केला आहे)—व जो—**आत्मवन्तं** (जितेंद्रिय झाल्यामुळें आत्मपरच झाला आहे)—त्याला— **कर्माणि न निबध्नन्ति** (कर्मांपासून कोणताही उपसर्ग लागत नाहीं.)—सारांश अहंकारवर्जित भाविक पुरुष आत्मस्वरूपीं लीन झाल्यावरही जरी तो कर्म करितच राहिला तरी त्याला तें कर्म बद्धक होत नाहीं.—

योगेति। योगसंन्यस्तकर्माणं परमार्थदर्शनलक्षणेन योगेन संन्यस्तानि कर्माणि येन परमार्थदर्शिना धर्माधर्माख्याणि तं योगसंन्यस्तकर्माणम्। कथं योगसंन्यस्तकर्मेत्याह ज्ञानेनाऽऽत्मेश्वरैकत्वदर्शनलक्षणेन संछिनः संशयो यस्य स ज्ञानसंछिन्नसंशयः। य एवं योगसंन्यस्तकर्मा तमात्मवन्तमप्रमत्तं गुणचेष्टारूपेण दृष्टानि कर्माणि न निबध्नन्त्यनिष्टादिरूपं फलं नाऽऽरभन्ते हे धनंजय॥ ४१॥

हे पार्था ! सर्व धनावर व विषयांवर जय मिळविणाऱ्या अर्जुना ! आत्मस्वरूप प्राप्त व्हावें असा ज्या निष्ठेचा हेतु आहे ती निष्ठा दृढ झाल्यामुळें स्वरूपाचें विज्ञान झालेल्या ज्या पुरुषानें सर्व कर्मांचा (शास्त्रविहित अगर शास्त्रनिषिद्ध कर्मांचा) त्याग केला आहे ह्मणजे ज्यानें अहंकार व वासना यांचा सर्वस्वी त्याग केला आहे; आत्मज्ञान झाल्यामुळें आपण आणि परमेश्वर एकच आहों असा निश्चय होऊन गेला व त्या कारणानें ज्याचे सर्व संशयांचा उच्छेद झाला आहे; (परमेश्वरी स्वरूप व आपलें स्वरूप हीं एकच आहेत, असा साक्षात्कार झाल्यानंतर संशय येणार तरी कसला व कोठून? त्या बिचाऱ्या संशयी

मनालाही आत्मस्वरूपच प्राप्त झालेलें असतें !) व जो शमदमादि संपन्न असून आत्मतत्पर असल्यामुळें इंद्रियादिकांचा पूर्ण स्वामी व प्रवर्तक असतो; त्या पुरुषाच्या ज्ञानेंद्रियाकरवीं अगर कर्मेंद्रियाकरवीं अहंकारशून्य कर्में ह्मणजे गुण, चेष्टा वगैरे जर कांहीं झालीं किंवा लोकसंग्राहक कर्में झालीं तर त्यांचें फल उत्पन्न होण्याचा संभवच नसल्यामुळें तीं कर्में त्याला बद्धक होत नाहींत. असलीं कर्में अहंकारशून्य कर्मठाला संसारांत ढकलीत नाहींत. तो अभिमानशून्य व फलेच्छाशून्य असल्यामुळें इंद्रियाचीं कर्में इंद्रियें करित आहेत, माझा त्यांत कांहीं संबंधच नाहीं असें जाणून–तो–सुखरूपच असतो.

मधु०, प्रपा०, रंगनाथ, श्रीधर, व्याख्याकार, पंडित—'भगवंताच्या आराधनेनें (भगवान् व आपण एकच आहोंत अशी) समत्वबुद्धि होऊन सर्व कर्में परमेश्वरार्पण ज्यानें केलीं आहेत' असाही एक अर्थ सुचवितात. आत्मवंत=सावधान. शंकरा०–पर्वते, द्विवेदी, चतरजी आचार्यानुसारी आहेत.

चतरजी—निष्काम सत्कर्म आणि ब्रह्मात्मैक्यज्ञान हीं साध्य झालीं म्हणजे निश्चय व श्रद्धा उत्पन्न होतात.

रामा०—अशा पुरुषास मागील कर्में बद्धक होत नाहींत.

द्वैतवादी—आत्मवंतं = परमात्मा जो हरी त्याचा निःसीम भक्त जो त्याला.

यस्मात्कर्मयोगानुष्ठानादशुद्धिक्षयहेतुकज्ञानसंछिन्नसंशयो न निबध्यते कर्मभिर्ज्ञानाग्निदग्धकर्मत्वादेव यस्माच्च ज्ञानकर्मानुष्ठानविषये संशयवान्विनश्यति—

गुरु—निष्काम कर्म करून चित्तशुद्धि झाल्यावर संचित कर्मजन्य पापाचा क्षय करण्याचें उत्कृष्ट साधन जें आत्मस्वरूप ज्ञान, त्याच्या योगानें छिन्न झाले आहेत संशय ज्याचे असा पुरुष कर्माचें अनुष्ठान करण्यास लागला असतां त्या कर्मांच्या योगानें ज्याअर्थी तो बद्ध होत नाहीं, (कारण ज्ञानस्वरूपी प्रज्वलित

अग्नीच्या सामर्थ्यानें त्याचीं सर्व कर्में व कर्मवासना दग्ध होऊन जातात.) व ज्याअर्थीं ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा कराव्या कीं नाहीं असा संशय घेणारा पुरुष नष्ट होतो त्याअर्थीं—

तस्मादज्ञानसंभूतं
हृत्स्थं ज्ञानासिनाऽऽत्मनः ॥
छित्त्वैनं संशयं योग-
मातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥

इति श्रीमहाभारते श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

तस्मात् (म्हणून) **अज्ञानसंभूतं** (अज्ञानाच्या योगानें उत्पन्न झालेला) **हृत्स्थं** (हृदयांत वास करणारा, तुझ्या मनांत असलेला) **आत्मनः संशयं** (आत्मस्वरूपाविषयीं जो संशय आहे तो) **छित्वा** (तोडून टाकून) **योगं आतिष्ठ** (कर्मयोग, शास्त्रविहित कर्में, करण्यास आरंभ कर). **भारत** (हे भरतकुलोत्पन्न शूर अर्जुना !) **उत्तिष्ठ** (ऊठ).–सारांश आत्म्याच्या सद्रूपाविषयीं तुझ्या मनांत जो संशय स्वतःच्या अज्ञानानें बाणला आहे तो आत्मज्ञान हीच कोणी एक तरवार, त्या तरवारीनें छाटून टाक आणि स्वजातीस विहित जें कर्म तें निष्कामबुद्धीनें कर. अर्जुना ! ऊठ, युद्धाची तयारी कर.

याप्रमाणें ज्ञानकर्मसंन्यासयोग नामक चतुर्थ अध्यायाचें मूळ संपलें.

तस्मादिति । तस्मात्पापिष्ठमज्ञानसंभूतमज्ञानादविवेकाज्जातं हृत्स्थं हृदि बुद्धौ स्थितं ज्ञानासिना शोकमोहादिदोषहरं सम्यग्दर्शनं ज्ञानं तदेवासिः खड्गस्तेन ज्ञानासिनाऽऽत्मनः स्वस्याऽऽ-

त्मविषयत्वात्संशयस्य । नहि परस्य संशयः परेण च्छेत्तव्यतां प्राप्तो येन स्वस्येति विशिष्यतेऽत आत्मविषयोऽपि स्वस्यैव भवति । छित्त्वैनं संशयं स्वविनाशहेतुभूतं योगं सम्यग्दर्शनोपायकर्मानुष्ठानमातिष्ठ कुर्वित्यर्थः । उत्तिष्ठेदानीं युद्धाय भारतेति ॥ ४२ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ श्रीमद्भगवद्गीताभाष्ये ब्रह्मयज्ञप्रशंसा नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

ह्मणून अत्यंत अमंगल, अज्ञानापासून उत्पन्न झालेला, सारासार विचार न केल्यामुळें प्रमत्त झालेला जो मनांतील संशय आहे तो तोडून टाक. सर्व प्रकारचे शोक, मोह इत्यादि जे अवगुण आहेत त्यांचा नाश करणारें, आत्मस्वरूपाची ओळख व पुढें साक्षात्कार करून देणारें, जें ज्ञान हीच एक तरवार आहे, खड्ग आहे, त्याच्या योगानें अज्ञानवृक्ष समूळ छाटून टाक. ‘ मी कोण आहें ’ याच्या विषयीं जो संशय तुझ्या मनांत आहे तो नष्ट करून टाक.

शिष्य—स्वतःच्या अंतःकरणांतील संशय तोडून टाक असा कां नाहीं अर्थ व्हावयाचा ?

गुरु—तसा अर्थ केला तर ‘ स्वतःचें ’ हें पद नको. कारण रामाच्या मनांत आलेला संशय गोविंदाच्या ज्ञानानें नाहींसा होत नाहीं ! तूं केलेल्या अर्थामध्यें ‘ हृत्स्थं ’ याचें ’ स्वारस्य रहात नाहीं. ह्मणून स्वतःच्या आत्मस्वरूपाच्या संबंधानें निर्माण झालेला संशय असा अर्थ केला. असो; याप्रमाणें आपल्या नाशास कारण होणारा जो संशयवृक्ष त्यास तूं स्वतःच समूळ तोडून टाक आणि पुढें ब्रह्मज्ञान होईल अशा योगाचें उत्कृष्ट साधन जें निष्कामकर्मयोगाचें अनुष्ठान तें करावयास लाग. युद्ध करणें हें क्षत्रियाचें कर्तव्य आहे. हें तूं निष्कामत्वानें कर. ऊठ, अर्जुना! ऊठ.

याप्रमाणें ज्ञानकर्मसंन्यासयोगनामक चतुर्थाध्यायाचें भाष्य व त्याचा अर्थ हीं संपलीं.

मधुसूदनीकारांचा उपसंहार–"**स्वस्यानीशत्वबाधेन भक्तिश्रद्धे दृढीकृते। धीहेतुः कर्मनिष्ठा च हरिणेहोपसंहृता** " (परमात्म्याचें ईशत्व स्थापन करून (जीवस्वरूप खंडित करून) भगवंतांनीं भक्ति व श्रद्धा दृढ होईल, असा विषय आणला आहे आणि नंतर आत्मज्ञानाचें साधन जी निष्काम कर्मनिष्ठा तिचें विवेचन या अध्यायांत केलें आहे.

प्रपाकारांचा उपसंहारः–"**बाह्यं कर्माऽऽगमोक्तं द्विविधमपि विनश्यत्फलं तद्विकर्म। स्याच्चाकर्म यत्स्यादमृतफलमतः कर्म नैष्कर्म्ययोस्तु॥ अन्योन्यं साहचर्यं भवति तदखिलं मामिहोद्दिश्य कार्यं। तद्वै ब्रह्मार्पणं स्याद्विविधयजनतः प्राह पार्थं चतुर्थे** "–॥ (वेदानें प्रणीत केलेलें कर्म (मग तें विकर्म असो वा अकर्म असो.) सकाम बुद्धीनें केलें असतां, अगर व्यावहारिक कर्मही त्याच बुद्धीनें केलें असतां उभयतांही फलप्रद होतात, हें खरें; पण त्यांचें फल विनाशी, कालभंगुर, आहे. परंतु निष्काम बुद्धीनें व ज्ञानपूर्वक केलेलें कर्म अमृतरूपी फल म्हणजे मोक्ष देतें. भगवंताला उद्देशून केलेलें सर्व विहित कर्म व निष्काम कर्म हीं दोन्हीं एकच आहेत. अनेक मानसिक यज्ञद्वारां भगवंतास अर्पण केलेलें कर्म, कर्मवासना, व कर्मफल हीं सर्व ब्रह्मार्पणच होतात. हा विषय या अध्यायांत भगवंतांनीं पार्थास सांगितला आहे.)

श्रीधर स्वामींचा उपसंहारः–**पुमवस्थादिभेदेन कर्मज्ञानमयी द्विधा। निष्ठोक्ता येन तं वंदे शौरिं संशयसंछिदम्** ॥ (पुरुषाचे अवस्थाभेद कल्पून अधिकाराप्रमाणें प्रत्येक मुमुक्षूनें कर्मनिष्ठा अथवा ज्ञाननिष्ठा यांपैकीं उक्त तो मार्ग क्रमाक्रमानें अनुसरावा असा उपदेश करणारा व सर्व संशयांचें निरसन करणारा जो शौरि (श्रीकृष्ण) त्यास मी वंदन करितों.) असाच चतरजींचाही उपसंहार आहे.

रामानुज व वल्लभ—मीं सांगितलेलें जें आत्मज्ञान तेंच खड्ग आहे असें समजून संशयास नाहींसें कर आणि मत्प्रणीत कर्मयोग आचरण्यास लाग.

द्वैतवादी--परमेश्वर मात्र स्वतंत्र आहे, जीव स्वतंत्र नाहीं, असें ज्ञान करून घेऊन आपले संशय नष्ट करून टाक.

ज्ञानेश्वरांनीं गीतेचें श्रवण केलें असतां काय फल मिळतें हें मोठ्या चातुर्यानें सांगितलें आहे तें ज्ञानभक्तांनीं अवश्य वाचावें.

पंडितः-**कर्मयोगाचें लक्षण । दोन्हीं अध्यायीं कमलेक्षण । बोलिला कीं निष्काम ईश्वरार्पण । तोचि कर्मयोग ॥** ज्ञान झालें असतांही सगुण उपासना करावी, असें येथेंही पंडित आग्रहानें सांगत आहेत. " **सधर्मः समर्थः पुमर्थश्चतुर्थः । कृतार्थोऽयमध्याय एवं चतुर्थः ॥ यथार्थः सदर्थः सतां भूसुराणां । प्रियः किं कदर्थो गिरा वा सुराणाम् ॥** (ज्याच्यायोगानें चवथा पुरुषार्थ म्हणजे मोक्ष साध्य होतो तोच उत्तम सामर्थ्यशील धर्म होय. हा धर्म चवथ्या अध्यायांत सांगितला आहे म्हणून तो कृतार्थ आहे. साधु व ब्राह्मण यांस वास्तविक व चांगला अर्थच प्रिय होतो. उघडच आहे कीं वाईट अर्थ अगर वाईट शब्द कधीं तरी देवांस प्रिय होतील काय ?). पंडितांचें यमकरचनाकौशल्य दाखविण्यासाठीं वरील श्लोक घेतला आहे.

व्याख्याकार म्हणतातः-**जों निर्विकल्प नाहीं समाधी । तों काय कर्मं सुटतीं ? ॥ अगा लोक संग्रहाकारणें । सज्ञानेंही कर्म करणें । जों उन्मन न कीजे मनें । तो काय करणें राहतीं उणी ? ॥**

इति श्रीमद्० ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः

अथ पञ्चमोऽध्यायः।

आतां येथून पांचव्या अध्यायास आरंभ झाला.

'कर्मण्यकर्म यः पश्येत्' इत्यारभ्य 'स युक्तः कृत्स्नकर्मकृत्' 'ज्ञानाग्निदग्धकर्माणं' 'शारीरं केवलं कर्म कुर्वन्' 'यदृच्छालाभसंतुष्टः' 'ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः' कर्मजान्विद्धि तान्सर्वान्' 'सर्वं कर्माखिलं पार्थ' 'ज्ञानाग्निः सर्वकर्माणि' 'योगसंन्यस्तकर्माणम्' इत्यन्तैर्वचनैः सर्वकर्मसंन्यासमवोचद्भगवान्, 'छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठ' इत्यनेन वचनेन योगं च कर्मानुष्ठानलक्षणमनुतिष्ठेत्युक्तवान्। तयोरुभयोश्च कर्मानुष्ठानकर्मसंन्यासयोः स्थितिगतिवत्परस्परविरोधादेकेन सह कर्तुमशक्यत्वात्कालभेदेन चानुष्ठानविधानाभावादर्थादेतयोरन्यतरकर्तव्यताप्राप्तौ सत्यां यत्प्रशस्यतरमेतयोः कर्मानुष्ठानकर्मसंन्यासयोस्तत्कर्तव्यं नेतरदित्येवं मन्यमानः प्रशस्यतरबुभुत्सयाऽर्जुन उवाच संन्यासं कर्मणां कृष्णेत्यादिना।

शिष्य—'कर्मामध्यें जो अकर्म पाहतो' (अ. ४ श्लोक १८) या श्लोकास आरंभ करून 'तोच योगी व तोच सर्व कर्मांचा कर्ता' 'ज्ञानरूपी अग्नीच्यायोगानें ज्यानें सर्व कर्मांचें भस्म केलें आहे' 'शरीर मात्र जिवंत ठेवण्याचें कर्म इंद्रियां करवीं करणारा' 'यदृच्छेनें मिळेल त्यामध्येंच संतोष मानणारा' 'ज्याची ब्रह्म हीच पळी, ब्रह्म हीच आहुति' 'ज्ञानयज्ञाशिवाय बाकीचे सर्व यज्ञ अहंकारयुक्त कर्मापासून झालेले आहेत' सर्व प्रकारचे कर्मांची समाप्ति एका ज्ञानांत विलीन होते,' 'ज्ञानरूपी अग्नि सर्व कर्मांचा नाश करितो' 'आत्मनिष्ठा दृढ झाल्यामुळें सर्व कर्मांचा ज्यानें त्याग केला आहे,' येथपर्यंतच्या

सर्व श्लोकांमध्यें भगवंतांनीं कर्माचा त्याग करावा, कर्मसंन्यास करावा, असें वारंवार सांगितलें आहे; आणि शेवटच्या श्लोकामध्यें तर ' याप्रमाणें सर्व संशयांचा उच्छेद करून कर्मयोग करावयास लाग ' असें सांगितलें आहे, म्हणजे कर्मनिष्ठाच तुला केली पाहिजे असें सांगितलें आहे! यावरून भगवंताच्या बोलण्यांतच विरोध आहे असें दिसतें. कर्म करावयास सांगणें व कर्म करूं नको म्हणून सांगणें यांत महदंतर आहे; नव्हे? तीं विधानें, तेज आणि अंधःकार याप्रमाणें परस्पर विरुद्धच आहेत. जो पदार्थ स्थिर आहे, तोच पदार्थ चलन करित आहे या वाक्यांत जसें पूर्ण वैधर्म्य आहे, तसेंच वरील प्रकरणांत आहे. तेव्हां हा प्रकार आहे तरी काय?

गुरु—अरे! तुझ्यासारखीच शंका अर्जुनासही आली होती. त्यानेंही पाहिलें कीं " कर्म करणें आणि कर्मत्याग करणें हीं दोन्हीं एकाच पुरुषास एकाच वेळीं साध्य होणें कठिण, असंभवनीय आहे, एकदां कर्म करावें आणि नंतर कर्माचा त्याग करावा, अशा विरोधात्मक आज्ञाही भगवंतासारख्या सर्वज्ञ पुरुषोत्तमांनीं गीताशास्त्रांत सांगणें शक्य नाहीं; तेव्हां अर्थांतच एक कर्मयोग तरी करावा, किंवा कर्मसंन्यास तरी करावा, या दोहींतील कोणती तरी एक गोष्ट करावी, असा भगवंताचा अभिप्राय असावा. ते परस्पर विरोधी भाषण करणार नाहींत. सारांश कर्म अगर कर्मसंन्यास या दोहींतील चांगलें असेल तें घ्यावें व दुसऱ्याचा त्याग करावा. " ही अर्जुनाची समजूत झाली. म्हणून कर्मानुष्ठान किंवा कर्मसंन्यास या दोहोंत कोणतें श्रेष्ठ आहे, कोणतें घ्यावें, अशी इच्छा धारण करणारा अर्जुन विचारतो; ' हे भगवंता! आपण कर्मांचा संन्यास सांगून योगही सांगतां; इत्यादि.

ननु चाऽऽत्मविदो ज्ञानयोगेन निष्ठां प्रतिपिपादयिषन्पूर्वोदाहृतैर्वचनैर्भगवान्सर्वकर्मसंन्यासमवोचन्न त्वनात्मज्ञस्यातश्च कर्मानुष्ठानकर्मसंन्यासयोर्भिन्नपुरुषविषयत्वादन्यतरस्य प्रशस्यतरत्वबुभुत्सया प्रश्नोऽनुपपन्नः। सत्यमेव त्वदभिप्रायेण प्रश्नो नोपपद्यते, प्रष्टुः स्वाभिप्रायेण पुनः प्रश्नो युज्यत एवेति

वदामः। कथं, पूर्वोदाहृतैर्वचनैर्भगवता कर्मसंन्यासस्य कर्तव्यतया विवक्षितत्वात्प्राधान्यमन्तरेण च कर्तारं तस्य कर्तव्यत्वासंभवात्। अनात्मविदपि कर्ता पक्षे प्राप्तोऽनूद्यत एव न पुनरात्मवित्कर्तृकत्वमेव संन्यासस्य विवक्षितमिति। एवं मन्वानस्यार्जुनस्य कर्मानुष्ठानकर्मसंन्यासयोरविद्वत्पुरुषकर्तृकत्वमप्यस्तीति पूर्वोक्तेन प्रकारेण तयोः परस्परविरोधादन्यतरस्य कर्तव्यत्वे प्राप्ते प्रशस्यतरं च कर्तव्यं नेतरदिति प्रशस्यतरविविदिषया प्रश्नो नानुपपन्नः। प्रतिवचनवाक्यार्थनिरूपणेनापि प्रष्टुरभिप्राय एवमेवेति गम्यते।

शिष्य—गुरुजी! मला वाटतें कीं अर्जुन आतां जो प्रश्न करित आहे तो अत्यंत अयोग्य व अत्यंत अप्रस्तुत आहे.

गुरु—कांरे बाबा?

शिष्य—म्हणजे असें: भगवंतांनीं अनेक उदाहरणें दाखवून असें सिद्ध करावयाचा घाट घातला 'आहे कीं' सर्व कर्मसंन्यास जो करायाचा तो आत्मज्ञानी पुरुषानेंच करावा, कारण त्यास ज्ञाननिष्ठ व्हावयाचें असतें. गुरुजी! आत्मवेत्त्यानें संन्यास करावा, आत्मा कळला नाहीं त्या प्राकृत पुरुषानें कर्मसंन्यास करूं नये असा भगवंतांचा अभिप्राय आहे व हाच अभिप्राय आचार्यांनीं व आपण विशद करून दाखविला आहे. आतां कर्मसंन्यास आत्मवेत्त्यानें करावा आणि कर्मानुष्ठान प्राकृत पुरुषानें करावें असे निरनिराळे कर्ते असल्यामुळें कर्मसंन्यास चांगला किंवा कर्मानुष्ठान चांगलें, असा स्वतःचा अधिकार समजणाऱ्या पुरुषाला हा संशय येणें योग्य नाहीं. आत्मवेत्त्याला कर्माशीं संबंध ठेवावयाचा नाहीं, प्राकृत पुरुषाला कर्मसंन्यास साध्यच नाहीं तेव्हां दोहोंतून चांगलें कोणतें असा प्रश्न अप्रस्तुत व असमंजस होय. माझा भाव समजलाच असाल आपण?

गुरुजी—होय. तुझ्या म्हणण्याप्रमाणें अर्जुनाचा प्रश्न निरर्थक होतो खरा. पण अर्जुनाचा जो अभिप्राय आहे त्यावरून त्याचा प्रश्न समंजस आहे असें आम्ही ह्मणतों.

शिष्य—काय? अर्जुनाचा काय अभिप्राय आहे?

गुरुजी—पूर्वी, मागील अध्यायांत, भगवंतांनीं जीं वचनें, जीं उदाहरणें दिलीं आहेत, त्या सर्वांत कर्माचा संन्यास करावा असें प्राधान्यत्वानें सांगितलें आहे. कर्माचा संन्यासच करावयास कोणी नसेल तर कर्मसंन्यास होणें ही असंभवनीय आहे. सारांश **कर्मत्याग** करावयालाही **कर्त्याची आवश्यकता आहे**, ह्मणजे तें एक कर्मच झालें! असा अर्जुनाचा अभिप्राय आहे. पुनः तो समजतो कीं जो प्राकृत पुरुष आहे त्यालाही 'कर्मसंन्यास करितां येईल व त्याप्रमाणें भगवंतांनीं म्हटलें ही आहे, कीं कर्मसंन्यास करणें हें केवळ ब्रह्मवेत्त्याचेंच कर्तव्य आहे असें नाहीं.' सारांश कर्मसंन्यास हें एक कर्मच आहे आणि कर्मनिष्ठ पुरुषालाही कर्मसंन्यास करितां येतो, हा अर्जुनाचा अभिप्राय आहे. एवंच प्राकृत पुरुषानें कर्मसंन्यास करणें चांगलें, किंवा कर्मानुष्ठान करणें चांगलें, हा प्रश्न उभा राहतोच; कारण प्राकृत पुरुषाला कर्म करण्याचा व कर्मत्याग करायाचा असे दोन्ही अधिकार आहेत. सारांश हे दोन्ही अधिकार प्राप्त झाले असतां व हे दोन्ही परस्पर विरोधी अधिकार एकाच पुरुषास एकदम वहिवाटण्याचा प्रसंग आल्यास दोन्ही होणें संभवनीय नसल्यामुळें, या दोहोंमध्यें कर्मानुष्ठान चांगलें किंवा कर्म संन्यास चांगला. (चांगलें तेंच आपण घ्यावयाचें दुसरें घ्यावयाचें नाहीं,) हा अर्जुनाचा तारतम्याचा प्रश्न योग्यच आहे. भगवंतांनीं जें उत्तर दिलें आहे त्यावरूनही अर्जुनाचा हाच अभिप्राय होता असें स्पष्ट दिसतें.

कथं संन्यासकर्मयोगौ निःश्रेयसकरौ तयोस्तु कर्मयोगो विशिष्यत इति प्रतिवचनमेतन्निरूप्यं किमनेनाऽऽत्मवित्कर्तृकयोः संन्यासकर्मयोगयोर्निःश्रेयसकरत्वं प्रयोजनमुक्त्वा तयोरेव कुतश्चिद्विशेषात्कर्मसंन्यासात्कर्मयोगस्य विशिष्टत्वमुच्यत आहोस्विदनात्मवित्कर्तृकयोः संन्यासकर्मयोगयोस्तदुभयमुच्यत इति । किंचातो यद्यात्मवित्कर्तृकयोः संन्यासकर्मयोगयोर्निःश्रेयसकरत्वं तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगस्य विशिष्टत्व-

मुच्यते यदि वाऽवानात्मवित्कर्तृकयोः संन्यासकर्मयोगयोस्त-दुभयमुच्यत इति। अत्रोच्यते,-आत्मवित्कर्तृकयोः संन्यासकर्म-योगयोरसंभवात्तयोर्निःश्रेयसकरत्ववचनं तदीयाच्च कर्मसं-न्यासात्कर्मयोगस्य विशिष्टत्वाभिधानमित्येतदुभयमनुपपन्नम्। यद्यनात्मविदः कर्मसंन्यासस्तत्प्रतिकूलश्च कर्मानुष्ठानलक्षणः कर्मयोगः संभवेतां तदा तयोर्निःश्रेयसकरत्वोक्तिः कर्मयो-गस्य च कर्मसंन्यासाद्विशिष्टत्वाभिधानमित्येतदुभयमुपप-द्यते, आत्मविदस्तु संन्यासकर्मयोगयोरसंभवात्तयोर्निःश्रेय-सकरत्वाभिधानं कर्मसंन्यासाच्च कर्मयोगो विशिष्यत इति चानु-पपन्नम्। अत्राऽऽह, किमात्मविदः संन्यासकर्मयोगयोरप्यसंभव आहोस्विदन्यतरस्यासंभवो यदा चान्यतरस्यासंभवस्तदा किं कर्मसंन्यासस्योत कर्मयोगस्येत्यसंभवे कारणं च वक्तव्यमिति।

शिष्य—कसें आहे भगवंताचें उत्तर?

गुरु—ते ह्मणतातच ना? कीं "संन्यास आणि योग हे दोन्ही मुक्तिपंथाचे साहाय्यकारी आहेत, पण केवळ संन्यासापेक्षां निष्काम कर्म-योग श्रेष्ठ आहे, ह्मणून?"

शिष्य—दयानिधे! मला प्रथमतः आपल्या वाक्याचा अर्थ स्पष्ट करून घेऊं द्या. 'आत्मवेत्त्या पुरुषानें केलेला कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोन्ही मोक्षदानी आहेत; तथापि कांहीं एक विशेष कारणामुळें संन्यासापेक्षां कर्मयोगाची श्रेष्ठता वर्णन केली आहे असें आपल्या म्हणण्याचें तात्पर्य समजावयाचें किंवा अज्ञानी, आत्मज्ञानशून्य, पुरुषानें केलेला कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोन्ही मोक्षास कारण होतात; पण त्यांतल्या त्यांत कांहीं गुप्त कार-णामुळें कर्मयोगाला प्राधान्य दिलें आहे,' असा अर्थ करावयाचा? पुनश्च, संन्यास व योग या उभयतांपासूनही जर सर्वांस मोक्ष प्राप्ति होते तर संन्यासापेक्षां योगमार्ग श्रेष्ठ कां? शिवाय; कोणीही हा संन्यास किंवा योग केला असतां तो मुक्त होतो हेंही सांगावें.

गुरु—अद्यापि कीं काय, भगवंतांच्या, आचार्यांच्या व माझ्या ह्मणण्याचें तात्पर्य तुला कळलें नाहीं. आतां प्रथमतः—

शिष्य—कृपा करा. माझा उतावीळपणा अनावर आहे हें खरें; पण भगवन्! आपण माझें सर्व कोड पूर्ण करितां ह्मणून मी आपल्यास वाटेल तेव्हां वाटेल तसल्या शंका विचारितों. शिष्यवत्सल गुरुजी! प्रथम मला हें समजलें पाहिजे: 'आत्मज्ञानी पुरुषानें केलेला कर्म-संन्यास व कर्मयोग हे दोन्ही मोक्षप्रद होतात, पण कर्मयोग श्रेष्ठ आहे;' असें आत्मज्ञानी पुरुषाचें संबंधानें म्हटलें तर ह्यांत दोष उत्पन्न होतो? मीं हा अर्थ केला तेव्हां मघाशीं आपण कपाळाला आठ्या घातल्या हें पाहिलें मी. किंवा, अज्ञानी पुरुषानें केलेले कर्मसंन्यास व कर्मयोग हे मोक्षदायक आहेत, पण कर्मयोग श्रेष्ठ आहे,' असें अज्ञानी पुरुषाचे संबंधानें म्हटलें तर तें कसें सुसंगत आहे? हें प्रथम सांगावें.

गुरु—वत्सा! तुला कितीदां सांगावें कीं आत्मवेत्ते पुरुष कांहीं करित नाहींत व कांहीं करण्याची इच्छाही करित नाहींत ह्मणून? ब्रह्मज्ञान ज्याला झालें, जो निष्क्रिय ब्रह्म झाला, त्याच्या हातून कर्मत्याग तरी कसा होणार किंवा कर्मयोग तरी कसला होणार? त्याला संन्यास व योग हे दोन्ही साध्य नाहींत. तेव्हां त्या दोन्हींकडूनही मुक्ति मिळण्याचा संभव ब्रह्मज्ञाला आहे, किंवा ब्रह्मज्ञाच्या दृष्टीनें संन्यासापेक्षां योगच चांगला आहे, हीं दोन्हीं प्रश्नात्मक विधानें अनर्थकच होत. 'वंध्या-पुत्र काळा असेल तर बुद्धिवंत निपजेल' या वाक्याचा अर्थच होत नाहीं, कारण वंध्येला पुत्र होणेंच शक्य नाहीं; सारांश आत्मवेत्त्याला संन्यासही शक्य नाहीं व कर्म करणें शक्य नाहीं; तेव्हां त्यांचीं फलें काय व ब्रह्मज्ञदृष्टीनें संन्यास श्रेष्ठ कीं योग श्रेष्ठ हे प्रश्नच अर्थशून्य आहेत, ह्मणून तुझा पहिला अर्थ चुकला.

शिष्य—ठीक आहे. याचप्रमाणें याच न्यायानें जो अज्ञानी आहे, त्याला तरी कर्माचा त्याग करणें व शास्त्रविहित कर्म करणें अशा परस्पर विरुद्ध दोन वृत्ति संभवतात काय? अर्थातच नाहीं. तेव्हां कर्मयोग व कर्मत्याग मुक्ति देणारे आहेत हें अज्ञान्याला सांगणें व त्यागापेक्षां योग श्रेष्ठ आहे, म्हणून कर्म कर असें म्हणणेंही, असंभवनीय आहे.

गुरुजी—तूं ह्मणतोस तसा प्रकार नाहीं. कर्मकरूनही ह्मणजे कर्मयोगाचें आचरण करूनही कर्मसंन्यास करण्याचें ह्मणजे केलेलें कर्मास शून्यत्व देण्याचें सामर्थ्य निष्कामकर्मयोग्यास आहे ह्मणून कर्मत्याग व कर्मयोग हे दोन्ही परमार्थदृष्टीनें मोक्षास नेणारे आहेत, हा सिद्धांत युक्त आहे; व त्यांतही कर्मयोग्यास कर्मयोग श्रेष्ठ आहे असें जें सांगितलें आहे, तेंही बरोबर आहे. **अज्ञानी कर्मयोग्यासाठीं हें प्रकरण उपस्थित केलें आहे.** समजलास? संन्यास म्हणजे काय व योग म्हणजे काय, कर्म म्हणजे काय, अकर्म कसें असतें वगैरेचा विचार चवथ्या अध्यायाच्या १८ व्या श्लोकांत केला आहे व या अध्यायांतही आणखी करूं. सारांश योग व त्याग हे दोन्ही कर्मयोग्यास अवश्य आहेत व ह्मणून साध्यही आहेत "I ought, therefore I can." (मला आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे, आणि ह्मणून तें मला साध्य आहे) असें प्रसिद्ध तत्ववेत्ता 'कांट' ह्मणतो तेंही तुला विदित असावें. तात्पर्य येथें कांहीं एक दोष नाहीं. आतां आत्मवेत्ता झाला, ज्याला सर्वच ब्रह्ममय झालें, ज्याचें कर्मच संपलें, त्या पुरुषाला कर्म करणें जितकें अशक्य, तितकेंच कर्मत्याग करणेंही अशक्यच आहे. कर्मच नाहीं, तेव्हां आत्मवेत्ता त्याग करील कशाचा? शिवाय **त्याग करणें** हें तरी एक कर्मच आहे! समजलास? म्हणून अज्ञानी पुरुषाला विज्ञानकालापर्यंत मात्र कर्मयोग व कर्मत्याग हे उभयतांही आपआपल्या पद्धतीनें मोक्षास नेणारे मार्ग आहेत, पण त्यांतही कर्मयोग विशेष चांगला आहे, असें ह्मणणें सुप्रयोजकच आहे.

शिष्य—शंका अशी कीं आत्मवेत्त्याला योग व त्याग, अशक्य आहेत, असें ह्मटलें त्यांत त्याच्या हातून योग व त्याग हे दोन्ही घडणें शक्य नाहीं असें समजावयाचें किंवा दोहोंपैकीं एक गोष्ट मात्र संभवत नाहीं असें ह्मणावयाचें? आतां एकच गोष्ट संभवत नसेल तर ती कोणती? कर्मयोग कीं कर्मत्याग? हें सर्व मला सयुक्तिक रीतीनें समजावून द्यावें. अर्थातच कर्मत्याग किंवा कर्मयोग संभवत नसेल तर तो कां संभवत नाहीं याचें कारणही आपण सांगतीलच!

गुरु—सांगतो ऐकः—

अत्रोच्यते, आत्मविदो निवृत्तमिथ्याज्ञानत्वाद्विपर्ययज्ञानमूलस्य कर्मयोगस्यासंभवः स्याज्जन्मादिसर्वविक्रियारहितत्वेन निष्क्रियमात्मानमात्मत्वेन यो वेत्ति तस्याऽऽत्मविदः सम्यग्दर्शनेनापास्तमिथ्याज्ञानस्य निष्क्रियात्मस्वरूपावस्थानलक्षणं सर्वकर्मसंन्यासमुक्त्वा तद्विपरितस्य मिथ्याज्ञानमूलककर्तृत्वाभिमानपुरःसरस्य सक्रियात्मस्वरूपावस्थानरूपस्य कर्मयोगस्येह शास्त्रे तत्र तत्राऽऽत्मस्वरूपनिरूपणप्रदेशेषु सम्यग्ज्ञानमिथ्याज्ञानतत्कार्यविरोधादभावः प्रतिपाद्यते यस्मात्तस्मादात्मविदो निवृत्तमिथ्याज्ञानस्य विपर्ययज्ञानमूलः कर्मयोगो न संभवतीति युक्तमुक्तं स्यात् । केषु केषु पुनरात्मस्वरूपनिरूपणप्रदेशेष्वात्मविदः कर्माभावः प्रतिपाद्यत इति। अत्रोच्यते,–'अविनाशि तु तद्विद्धि' इति प्रकृत्य ' य एनं वेत्ति हन्तारम् ' ' वेदाविनाशिनं नित्यम् ' इत्यादौ तत्र तत्राऽऽत्मविदः कर्माभाव उच्यते ।

गुरुजी–आत्मज्ञानी कोणास म्हणावें ?

शिष्य—ज्याचें सर्व मिथ्याज्ञान अस्तंगत झालें आहे. आत्मा हेंच ब्रह्म आहे व ब्रह्म हें स्वतः निष्क्रिय आहे, निर्विकार आहे (म्हणजे जन्ममरण इत्यादि सहा विकार त्यास असत नाहींत). सारांश आपणच ब्रह्म आहोंत व आपल्यास कोणताही विकार होणें शक्य नाहीं असा ज्याचा ठाम निश्चय झाला॰ त्याला मी आत्मवेत्ता असें समजतों.

गुरुजी—अति उत्तम! इतका प्रकार तुला समजला हें मोठेंच झालें ! आतां वत्सा ! तुझ्याच तोंडानें निकाल झाला म्हणून बरें झालें. अरे ! आत्मा निष्क्रिय आहे, विकारशून्य आहे व तोच आत्मा आपण आहों असें ज्याला अनुभवासहित ज्ञान झालें तो पुरुष कधीं तरी कर्माकडे प्रवृत्त होईल काय ? होणार नाहीं; कारण प्रत्येक कर्माची प्रवृत्ति मिथ्याज्ञानापासून होत असते. ‘मी पूर्ण नाहीं, म्हणून

कांहीं तरी करून पूर्ण व्हावें' अशी इच्छा होते ती आत्मज्ञान झाल्यावर होणें शक्यच नाहीं. सारांश 'मी आत्मस्वरूपानें पूर्ण, नित्य, सर्वगामी, विश्वव्यापी व ज्ञानपूर्वक आनंदी आहे,' असा निश्चय झालेला पुरुष खरा ज्ञानी असतो, म्हणजे त्याचें मिथ्याज्ञान, भेदज्ञान, अस्तंगत झालेलें असतें. त्याची स्थिति ह्मणजे पूर्ण, शांत, क्रियाशून्य, विकारशून्य, असें ब्रह्मस्वरूप होऊन असणें ही होय. त्यानें सर्व कर्मांचा त्याग केला व करावा असें आपण, **प्राकृत पुरुष** म्हणतों. वस्तुतः त्या आत्मानंदी पुरुषाला त्या त्यागाची खबरही नसते. समजलें? सारांश तो पुरुष योग अगर त्याग या विरहितच असतो. आतां ज्याची भेददृष्टि कायम आहे, 'मी, माझें' 'तूं, तुझें' वगैरे भिन्नभाव व अभिमान ज्यांचा नष्ट झाला नाहीं, 'मला हें हवे, तें हवें,' अशी अज्ञानजन्य वासना ज्याची अस्ताला गेली नाहीं, 'आत्मा कर्ता व भोक्ता आहे' अशी ज्याची आत्मसंबंधानें समजूत कायम व दृढ आहे, त्या अज्ञानी प्राकृत पुरुषासाठीं कर्मयोग सांगितला आहे. या गीताशास्त्रांत जेथें जेथें ह्मणून आत्मस्वरूपाचें निरूपण करण्याचा प्रसंग आला आहे, तेथें तेथें परमार्थज्ञान ह्मणजे काय, मिथ्याज्ञान ह्मणजे काय, वास्तविक ज्ञानाचें फल काय, मिथ्याज्ञानाचें फल काय, या उभयतांत विरोध कसा आहे, वगैरे यथास्थित रीतीनें सांगून आत्मज्ञानी पुरुषाला कर्मयोग असणें संभवतच नाहीं असेंही सांगितलें आहे. असा जर खरा प्रकार आहे, तर मिथ्याज्ञान अस्तंगत झालें आहे अशा ब्रह्मज्ञ पुरुषाला अज्ञानजन्य कर्मयोग संभवत नाहीं, असा अर्थ करणें हेंच योग्य आहे. आत्मवेत्त्याची व कर्मयोगाची किंवा **'मी कर्मत्याग करितों'** अशा वृत्तीची सांगड घालणें शक्य नाहीं. पाठीमागील व पुढील संबंध लक्ष्यांत ठेवून अर्थ करणें हें न्याय्य आहे आणि ह्या शास्त्रांतील वचनानुसारच आह्मींही अर्थ केला आहे.

शिष्य––आत्मस्वरूपाचें यथास्थित निरूपण करण्याच्या कोणत्या कोणत्या ठिकाणीं ज्ञानी पुरुषास कर्मयोग अशक्य आहे असें सांगितलें आहे, तें माझ्या लक्ष्यांत नाही राहिलें; भगवन्!

गुरु––वाहवारे विसराळू! अरें! दुसऱ्या अध्यायांतील १७व्या

श्लोकाचा अवतार करून व 'तें अविनाशी आहे' हें जाण असें सांगून, तेथून १८,१९,२०,२१,२२,२३,२४,२९ श्लोकांतील व शिवाय इतर ठिकाणीं, पण मुख्यतः १९व्या व २१व्या श्लोकांतील रहस्य पार विसरून गेलास वाटतें ? 'आत्मा कर्ता आहे, भोक्ता आहे, असें जो समजतो, त्याला समजत नाहीं' 'आत्मतत्व नित्य, अज, अव्यय आहे असें ज्याला समजलें, तो कर्म करित नाहीं' या १९व्या व २१ श्लोकांत विस्तारानें सांगितलेलें रहस्य तूं इतक्यांत विसरलास? असो; येथें व अन्यत्र ही आत्मवेत्त्याला कर्माभाव, कर्मशून्यता मात्र संभवनीय आहे असें कंठरवानें सांगितलें आहे. झालेला विषय विसरणें हें विद्यानिष्ठ तरुणास लांच्छनास्पदच होय.

ननु च कर्मयोगोऽप्यात्मस्वरूपनिरूपणप्रदेशेषु तत्र तत्र प्रतिपाद्यत एव तद्यथा 'तस्माद्युध्यस्व भारत' 'स्वधर्ममपि चावेक्ष्य' 'कर्मण्येवाधिकारस्ते' इत्यादावतश्च कथमात्मविदः कर्मयोगस्यासंभवः स्यादिति। अत्रोच्यते सम्यग्ज्ञानमिथ्याज्ञानतत्कार्यविरोधात्। 'ज्ञानयोगेन सांख्यानाम्' इत्यनेन सांख्यानामात्मतत्त्वविदामनात्मवित्कर्तृककर्मयोगनिष्ठातो निष्क्रियात्मस्वरूपावस्थानलक्षणाया ज्ञानयोगनिष्ठायाः पृथक्करणात्कृत्यत्वेनाऽऽत्मविदः प्रयोजनान्तराभावात् 'तस्य कार्यं न विद्यते' कर्तव्यान्तराभाववचनाच्च 'न कर्मणामनारम्भात्' 'संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः' इत्यादिना चाऽऽत्मज्ञानाङ्गत्वेन कर्मयोगस्य विधानात् 'योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते' इत्यनेन चोत्पन्नसम्यग्दर्शनस्य कर्मयोगाभाववचनात्। 'शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाऽऽप्नोति किल्बिषम्' इति च शरीरस्थितिकारणातिरिक्तस्य कर्मणो निवारणात् 'नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्' इत्यनेन च शरीरस्थितिमात्रप्रयुक्तेष्वपि दर्शनश्रवणादिकर्मस्वात्मयाथात्म्यविदः करोमीति प्रत्ययस्य समाहितचेतस्तया सदाऽकर्तव्यत्वोपदेशादात्मतत्त्वविदः सम्य-

ग्दर्शनविरुद्धो मिथ्याज्ञानहेतुकः कर्मयोगः स्वप्नेऽपि न संभावयितुं शक्यते यस्मात्तस्मादनात्मवित्कर्तृकयोरेव संन्यासकर्मयोगयोर्निःश्रेयसकरत्ववचनं तदीयाच्च कर्मसंन्यासात्पूर्वोक्तात्मवित्कर्तृकसर्वकर्मसंन्यासविलक्षणात्सत्येव कर्तृत्वविज्ञाने कर्मैकदेशविषयाद्यमनियमादिसहितत्वेन च दुरनुष्ठेयत्वात्सुकरत्वेन च कर्मयोगस्य विशिष्टत्वाभिधानमित्येवं प्रतिवचनवाक्यार्थनिरूपणेनापि पूर्वोक्तः प्रष्टुरभिप्रायो निश्चीयत इति स्थितम् ।

शिष्य—महाराज! आत्मस्वरूपाचें आविष्करण चाललें असतां कर्मयोग आचरला पाहिजे असेंही पण सांगितलें आहे. दुसऱ्या अध्यायांतील १८ वाच श्लोक घ्या. तेथें 'युद्ध कर, अर्जुना! युद्ध कर' असें सांगितलें आहे. पुनः दुसऱ्या अध्यायाचा ३१ वा श्लोक पहा, ४७ वा श्लोक पहा, त्यांतही 'स्वधर्म जाणून घेऊन युद्ध कर' 'कर्म करण्याचा मात्र तुझा अधिकार आहे' वगैरे आत्मनिरूपणाच्या वेळींच 'कर्म कर' म्हणून सांगितलें आहे; तेव्हां आत्मवेत्त्याला कर्म होणें शक्यच नाहीं, असें आपण म्हणतां; हें कसें?

गुरु—ध्यान ठेऊन ऐक आतां आँ! (१) वास्तविक ज्ञान म्हणजे वस्तूचें यथार्थ दर्शन आणि मिथ्याज्ञान यांमध्यें व यांपासून उत्पन्न होणाऱ्या फलांमध्यें अत्यंत विरोध आहे; ब्रह्मज्ञान झालें असतां कर्म संपते व शोकमोहात्मक संसार नष्ट होतो. ब्रह्मज्ञान नसलें म्हणजे कर्म करावें लागतें व शोकमोहात्मक संसार गळ्यांत पडतो. याप्रमाणें उभयतांत विरोध आहे म्हणूच ज्ञानी पुरुषास कर्माचा असंभव आहे. (२) तिसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकांत ज्ञानी व कर्मी आणि ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांचें जें पृथक्करण केलें आहे त्यांत काय सांगितलें आहे? सांख्यांस म्हणजे ब्रह्मज्ञ लोकांस निष्क्रिय, निर्विकार अशा शांत व आनंदी स्वरूपांत लीन होतां येतें अशा प्रकारची ज्ञाननिष्ठा सांगितली आहे. त्याचप्रमाणें जे ज्ञानी नाहींत, ज्यांची भेदबुद्धि, अहंकार व वासना हीं जिवंत आहेत, त्यांस 'मी कर्ता आहें' 'मला हें हवें' अशा प्रकारचीं लक्षणें आहेत ज्या संसाराची, त्यांत पडावें लागतें. तेव्हां

त्याला कर्मयोग म्हणतात. असो; तेव्हां या तिसऱ्या श्लोकांत ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांचें स्पष्ट असें पृथक्करण केलें आहे, ज्ञान्यांचा मार्ग निराळा व कर्माचा मार्ग निराळा असें स्पष्ट सांगितलें आहे, म्हणून ज्ञानी पुरुषास कर्मयोग सांगणें असंभवनीय आहे. (३) आत्मवेत्त्या पुरुषास परमार्थ ज्ञान झालेलें असतें म्हणून तो कृतार्थ, कृतकृत्य झालेला असतो; अतएव कर्म करण्याची प्रवृत्ति करण्याचें कारणच उरत नाहीं; म्हणून ब्रह्मज्ञासाठीं कर्मयोग सांगतां यावयाचा नाहीं. (४) तिसऱ्या अध्यायांतील १७ व्या श्लोकांत 'करावयाचें असें त्याला कांहीं एक नसतें' असें स्पष्ट सांगितलें आहे यावरून त्यास दुसरें कांहीं कर्तव्यच उरत नाहीं हेंही सिद्ध होतें. (५) आत्मज्ञान करून घेण्याची इच्छा करणारा जो मुमुक्षु आहे त्यानें अज्ञानाचा नाश करण्यासाठीं कर्मयोगाचा अवलंब करावा असें 'केवळ कर्माला आरंभच केला नाहीं म्हणजे नैष्कर्म्यसिद्धि होत नाहीं' (अ० ३ श्लोक ४) 'कर्मयोगाचें यथासांग आचरण केल्याशिवाय संन्यास सिद्ध होत नाहीं' (अ० ५ श्लोक ६) इत्यादि स्थळीं सांगितलें आहे, त्याचा असा इत्यर्थ काढावयाचा कीं जोंपर्यंत ज्ञान नाहीं, तोंपर्यंत कर्म आहे, ज्ञान झाल्यावर कर्म असणें शक्य नाहीं. ह्मणून आत्मवेत्त्यास कर्म करणें शक्य नाहीं. (६) अध्याय सहा श्लोक ३ मध्यें स्पष्ट शब्दांनीं असें सांगणार आहेत कीं, ज्याला योगसिद्धी प्राप्त झाली त्यानें शमाचें, कर्मशून्यत्वाचें मात्र अवलंबन केलें पाहिजे. हें स्पष्टवचन पांचवें कारणांत सांगितलेला सिद्धांत दृढ करितें व वस्तुज्ञान झालेल्या पुरुषास कर्माचा अभावच असतो असें स्वशब्दांनीं सांगतें. (७) 'शरीर मात्र सजीव ठेवण्याचें कर्म केलें तर तें ज्ञानी पुरुषाला बाधक होत नाहीं.' (अ०४ श्लोक २१) असें सांगितलें आहे. त्यावरून असा बोध होतो कीं शरीरयष्टी कायम ठेवणाऱ्या कर्माशिवाय इतर कर्में ज्ञानी पुरुषांस वर्ज्य आहेत. यावरूनही आह्मी ह्मणतों तोच अर्थ दृढ होतो. (८) 'मीं कांहीं करित नाहीं.' असें आत्मवेत्ता निश्चित करितो" (अ०५ श्लोक ८) यांत सांगतील कीं शरीर जिवंत ठेवण्यासाठीं मात्र केलेलीं कर्में सुद्धां (पाहणें, ऐकणें, स्पर्श करणें वगैरे) त्या ज्ञानी पुरु-

षाच्या गांवीं नसतात. मीं पाहतों,' 'मीं ऐकतों,' वगैरे भान अस्तंगतच झालेलें असतें; कारण त्याचें सर्व चित्त ब्रह्मामध्यें लीन होऊन ब्रह्माशीं समरस झालेलें असतें. उपदेशही सदैवं "मी करितों, हा अहंप्रत्यय टाकून दे" असाच आहे.

शिष्य—ज्ञान्यालाही 'अहंप्रत्यय टाकून दे,' असा उपदेश करून त्याकडून कर्मसंन्यास करवावा लागतो तर मग!

गुरु—हा खुळ्या! जोंपर्यंत विज्ञान झालें नाहीं, 'मी, ही अहंकारवृत्ति कायम आहे, तोंपर्यंतच हा उपदेश! ज्ञान झाल्यावर उपदेश करणार कोण? करणार कोणाला? आणि उपदेश तरी करावयाचा कसला? असो; तेव्हां यावरून ही आत्मवेत्त्यास कर्म असणें, किंवा सांगणें अशक्य आहे असेंच होतें. या सर्व ८ कारणांवरून तुला स्पष्ट दिसून येईल कीं मिथ्या, भ्रम उत्पन्न करणाऱ्या, ज्ञानापासून उत्पन्न होणारें जें कर्म किंवा जो कर्मयोग आहे व जो योग पूर्ण ज्ञानाच्या अत्यंत विरुद्ध आहे, असा तो कर्मयोग, वस्तुज्ञान झालेल्या आत्मवेत्त्या पंडितानें आचरावा, असें स्वप्नांत सुद्धां कोणी समंजस पुरुष ह्मणणार नाहीं. ब्रह्म आणि कर्म यांमध्यें प्रकाश आणि अंधःकार यांच्या इतका पूर्ण विरोध आहे. ब्रह्मज्ञाला कर्मयोग सांगणें व सकाम कर्मठाला कर्मत्याग सांगणें म्हणजे अंधळ्यानें रोज आपल्या डोळ्यांनीं गीता वाचावी असें सांगण्यासारखें मूर्खत्वदर्शक होय! अशी जर वस्तुस्थिति आहे व युक्तिदृष्टीनेंही ती तशीच ठरत आहे तर कर्मयोग करावा व कर्मत्याग करावा, आणि मुक्त होण्याच्या इच्छेनें प्रवृत्त झाले त्या पुरुषानें कर्मयोगापासून आरंभ करावा, प्रथमतः तोच विशेष गुणकारी आहे असें जें सांगितलें आहे तें केवळ अनात्मज्ञ, आत्मज्ञान झालें नाहीं अशा पुरुषांस मात्र सांगितलें आहे. कर्मयोग व कर्मत्याग हे उभयतांही मोक्षमार्गाचे साह्यकारी आहेत असें म्हटलें आहे तेंही अनात्मज्ञाच्या संबंधानेंच म्हटलें आहे.

शिष्य–भगवन्! आतां एक शंका मात्र या प्रकरणांत राहिली. तीही कीं या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकांत ' कर्मयोग हा कर्मत्यागापेक्षां श्रेष्ठ आहे, ' असें म्हटलें आहे तें कां?

गुरु—स्पष्टच आहे. अज्ञानी पुरुषानें कर्मसंन्यास केला तरी 'हा संन्यास मीं केला,' असें त्याचें भान किंवा अहंप्रत्यय नष्ट होत नाहीं. 'हें मी अमुक केलें' असें जोंपर्यंत भान आहे तोंपर्यंत खरा कर्मसंन्यास सिद्धच होत नाहीं. 'मी कर्मत्याग करितों' असें ह्मणणें किंवा मानणें हें एक प्रकारचें कर्मच आहे, होय कीं नाहीं? तेव्हां हा असला कसला कर्मसंन्यास कीं ज्यांत कर्माचा अंतर्भाव होत आहे? सारांश ह्या अज्ञानजन्य कर्मसंन्यासामध्यें व आत्मज्ञाचें सर्व कर्म अस्तंगत झाल्यामुळें तो शांत व सुखरूप स्थितींत असतो असा खरा कर्मसंन्यास यांमध्यें कोणतेंच साम्य नाहीं. शिवाय वर सांगितलेला अज्ञानजन्य कर्मसंन्याससुद्धां साध्य होणें दुष्कर आहे. यम, नियमादि अनेक व्रतें कडक रीतीनें पाळल्याशिवाय हा कमी योग्यतेचा संन्यासही सिद्ध होत नाहीं. सारांश जो मुळीं खरा संन्यासच नव्हे व जो साध्य होण्यास अनेक अडचणी आहेत, त्या या बेगडी कर्मसंन्यासापेक्षां निष्काम कर्मयोगाची योग्यता विशेष आहे कारण कर्मयोग आचरणें प्रायः सुलभतर आहे व यथाविधि केलेल्या कर्मांनें चित्तशुद्धि होऊन भगवत्प्रसाद होतो व शेवटीं ज्ञान होऊन ब्रह्मरूपही मिळतें. याप्रमाणें भगवंतांनीं सांगितलेल्या तत्वाचें रहस्य थोडक्यांत सांगितलें यावरून ही अर्जुनाचे प्रश्नाचा भाव आम्ही म्हणतों तसाच आहे हें सिद्ध झालें.

'ज्यायसी चेत्कर्मणस्ते' इत्यत्र ज्ञानकर्मणोः सहासंभवे 'यच्छ्रेय एतयोस्तन्मे ब्रुहि' इत्येवं पृष्टोऽर्जुनेन भगवान्सांख्यानां संन्यासिनां ज्ञानयोगेन निष्ठा पुनः कर्मयोगेण योगिनां निष्ठा प्रोक्तेति निर्णयं चकार। न च संन्यसनादेव केवलात्सिद्धिं समधिगच्छतीति वचनाज्ज्ञानसहितस्य सिद्धिसाधनत्वमिष्टं कर्मयोगस्य च विधानात्। ज्ञानरहितः संन्यासः श्रेयान्कि वा कर्मयोगः श्रेयानित्येतयोर्विशेषबुभुत्सया—

गुरु—'कर्मापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे' (पहा श्लोक १ अ० ३) या श्लोकांत अर्जुनानें काय विचारलें आहे?

शिष्य—ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं एकाच मनुष्यास असंभवनीय

आहेत असें जेव्हां अर्जुनास कळलें तेव्हां ज्ञानमार्ग अथवा कर्ममार्ग यांपैकीं ज्याच्या योगानें मला मोक्ष मिळेल तो मार्ग मला दाखीव असें म्हणाला.

गुरु—मग, भगवंतांनीं काय उत्तर दिलें?

शिष्य—त्यांनीं सांगितलें कीं ज्ञानमार्ग हा सांख्याचा व कर्ममार्ग कर्मठांचा, असे दोन निरनिराळे व निरनिराळ्या योग्यतेचे मार्ग आहेत. असाच निकाल भगवंतांनीं दिला. तसेंच 'नुसता कर्मसंन्यास केला तर मुक्ति मिळत नाहीं' यावरून तो संन्यास ज्ञानपूर्वक आणि ज्ञानसहित झाला पाहिजे असें भगवंताचें मत प्रकट झालें. शिवाय ज्ञान होईपर्यंत निष्काम कर्म केलें पाहिजे असें सांगितलें आहे. आतां पुढें कोणता विषय?

गुरु—आतां ज्ञानशून्य कर्मसंन्यास व कर्मयोग यांतील विशेष अर्जुन विचारितो?

अर्जुन उवाच—

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ॥
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥

कृष्ण (श्रीकृष्णा!) **कर्मणां संन्यासं** (कर्मसंन्यास, कर्म त्याग याला) **च** (आणि) **योगं शंससि** (कर्मयोग याला, दोघांसही चांगलें ह्मणतोस!) **एतयोः यत् श्रेयः** (या दोहोंपैकीं जें काय ज्यास्त कल्याणकारक, मुक्तिदायक असेल) **तत् एकं सुनिश्चितं ब्रूहि** (तेंच एक, चांगला निश्चय करून स्पष्ट भाषेनें मला सांग).—सारांश कर्मसंन्यास करावा म्हणतां व कर्मयोग करावा असेंही ह्मणतां, कर्मत्यागाची व कर्मयोगाची, उभयतांची ही प्रसंशा करितां. यामुळें माझा घोटाळा झाला आहे; करितां कृपा करून या मुक्ति देणाऱ्या दोहोंपैकीं जो श्रेष्ठ मार्ग असेल तो ठरवा आणि श्रीकृष्णा! मला स्पष्ट भाषेनें सांगा. त्यांत पुनः संशय येईल असें कांहीं ठेऊं नका.

संन्यासं परित्यागं कर्मणां शास्त्रीयाणामनुष्ठानविशेषाणां शंससि कथयसीत्येतत्। पुनर्योगं च तेषामेवानुष्ठानमवश्य-कर्तव्यत्वं शंसस्यतो मे कतरच्छ्रेय इति संशयः किं कर्मा-नुष्ठानं श्रेयः किंवा तद्धानमिति प्रशस्यतरं चानुष्ठेयमतश्च यच्छ्रेयः कर्मसंन्यासकर्मानुष्ठानयोर्यदनुष्ठानाच्छ्रेयोवाप्तिर्मम स्यादिति मन्यसे तदेकमन्यतरत्सहैकपुरुषानुष्ठेयत्वासंभवान्मे ब्रूहि सुनिश्चितमभिप्रेतं तवेति ॥ १ ॥

अर्जुन म्हणतोः भगवंता! शास्त्रानें सांगितलेली नित्यनैमित्तिक व व्यावहारिक कर्में आहेत, त्या सर्वांचा त्याग करावा, कर्मसंन्यास करावा, असें आपण म्हणाला आणि तीं सर्व शास्त्रविहित कर्में केलींच पाहिजेत असेंही आपणच सांगितलें; या परस्पर विरोधी वाक्यांनीं माझ्या मनाचा गोंधळ उडवून दिला आहे आणि पुनः कर्मयोग श्रेष्ठ किंवा कर्मत्याग श्रेष्ठ हा संशय कायम आहे तो आहेच, कर्मानुष्ठान करावयाचें कीं कर्मसंन्यास करावयाचा याचा मला अजून उमज पडत नाहीं. म्हणून भगवंता! पुनः एकदां विनंति करितों कीं, कर्मयोग व कर्मत्याग यांच्यापैकीं जास्त योग्यतेचें कोणतें, व यांच्या पैकीं कोणाचें अनुष्ठान, कोणाचा अवलंब केला असतां मला मोक्ष मिळेल, हें मला निःसंशय समजेल अशा रीतीनें आपण सांगा. आपलें ठाम झालेलें मत मला कळूं द्या.

शिष्य—'दोहींचें अनुष्ठान एकदम करूं का?' असें कां नाहीं अर्जुनानें विचारिलें?

गुरु—अर्जुन तुझ्यासारखा खुळा नव्हता म्हणून! वेड्या! ज्या कर्माचें अनुष्ठान करावयाचें, त्याच कर्माचा त्याग करावयाचा असें एकाच वेळीं होणें कर्त्यास संभवेल काय? 'मी अग्निहोत्राचें हवन करितों,' असें कर्तृत्व धारण करून ह्मणणारा मनुष्य, 'मी या अग्नि-होत्राचा त्याग करितों' असें त्याचवेळीं म्हणूं शकणार नाहीं. कर्तृ-त्वबुद्धि आणि वासना हीं कायम आहेत तोंपर्यंत एकाच पुरुषाला त्याग आणि योग करिता यावयाचे नाहींत हें अर्जुनास माहित होतें.—

मधु०, **शंकरा०**, **पर्वते**, **द्विवेदी**, **चतरजी**, **गीताव्याख्याकार** म्हणतात: अज्ञान आहे व विरक्ति उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंत कर्म करावें; त्याच अज्ञानी पुरुषाला वैराग्य प्राप्त झालें तर संन्यासग्रहण करून ज्ञानप्राप्तिसाठीं श्रवण मनन इत्यादि करावें अशा अज्ञ पुरुषाच्या अनेक स्थिति मनांत आणून 'अज्ञानी पुरुषानें कर्म केव्हां करावें, व कर्मत्याग केव्हां करावा' ह्याचा निर्णय करण्यासाठीं पांचव्या व सहाव्या अध्यायांचा अवतार केला आहे." यांचा व प्रपाकारांचा अर्थ आचार्याप्रमाणेंच आहे. कृष्ण=पापाचें आकर्षण करणारा सदानंदरूपी परमात्मा.

श्रीधर—अर्जुनाचा संशय या अध्यायांत दूर करून जितेंद्रिय संन्यासी मात्र मुक्त होतो असें या अध्यायाचें पर्यवसान आणिलें आहे.

रामा०—या अध्यायांत सांगतील कीं कर्मयोग हा ज्ञानापेक्षां श्रेष्ठ आहे; कारण तो लवकरच साध्य होतो; व कर्मयोगांतच 'मी अकर्ता आहे' असें ज्ञान करून ध्यावें असेंही सांगितलें आहे." पुनः हे आचार्य म्हतणात: दुसऱ्या अध्यायांत 'कर्मयोग करून ज्ञान मिळवावें' व तिसऱ्या व चवथ्या अध्यायांत 'ज्ञान प्राप्त झालें तरी कर्म करावें' असें सांगितलें तेव्हां ज्ञानयोग श्रेष्ठ किंवा कर्मयोग श्रेष्ठ असा विषय व त्याचा निर्णय या अध्यायांत आहे.

द्वैत०—या अध्यायांत कर्मयोगच आहे. "**यतः कर्षसि देवेश नियम्य सकलं जगत्। अतो वदन्ति मुनयः कृष्णं त्वां ब्रह्मवादिनः॥**" (तूं सर्वांचें नियमन करून त्यांचें आकर्षण करितोस म्हणून तुला ब्रह्मवादि मुनि कृष्ण म्हणतात) हा कूर्मपुराणांतील श्लोक आहे. ज्ञानशून्य गृहस्थाश्रम चांगला किंवा ज्ञानपूर्ण संन्यासाश्रम चांगला याचा निर्णय या अध्यायांत आहे.

पंडितांनीं या अध्यायाचा उद्देश असा काढिला आहे **मी त्यास बोलिलों कर्मत्याग। कीं एक ज्याचा ज्ञानयोग। हा** (अर्जुन) **जिज्ञासु यास कर्मयोग। बोलिलों॥**

संन्यास व कर्मयोग हे एकच आहेत असें या अध्यायांत सांगावयाचें आहे असें इंग्रजी भाषांतरकार म्हणतात. ॥ १ ॥

स्वाभिप्रायमाचक्षाणो निर्णयाय—

अर्जुनाच्या शंकेचें निरसन व आपलें स्वमत सांगतांना भगवान ह्मणतातः––

श्रीभगवानुवाच––

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ॥
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥२॥

संन्यासः कर्मयोगः च (कर्मसंन्यास आणि कर्मयोग) **उभौ निःश्रेयसकरौ** (हे उभयतांही मोक्ष देणारे, शेवटचा पुरुषार्थ साध्य करून देणारे आहेत.) **तु तयोः** (परंतु त्या दोहोंतील) **कर्मयोगः** (कर्मयोग सांगितला आहे तो) **कर्मसंन्यासात्** (कर्मत्यागापेक्षां) **विशिष्यते** (ज्यास्त मोलवान् आहे).- सारांश कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोन्ही मुक्तीस नेणारे आहेत. या दोहोंकडूनही परमपुरुषार्थ साध्य करून घेतां येईल. पण त्यांतल्या त्यांतही कर्मयोगाचें माहात्म्य विशेष आहे.

संन्यासः कर्मणां परित्यागः कर्मयोगश्च तेषामनुष्ठानं तावुभावपि निःश्रेयसकरौ निःश्रेयसं मोक्षं कुर्वाते ज्ञानोत्पत्तिहेतुत्वेनोभौ यद्यपि निःश्रेयसकरौ तथाऽपि तयोस्तु निःश्रेयसहेत्वोः कर्मसंन्यासात्केवलात्कर्मयोगो विशिष्यत इति कर्मयोगं स्तौति॥२॥

सर्व कर्मांचा त्याग करावयाचा, किंवा सर्व कर्मांचें विधिपूर्वक पालन करावयाचें, असें जें कर्मत्याग व कर्मयोग नामक दोन मार्ग आहेत, ते दोन्हीही क्रमशः मोक्ष मिळवून देण्यास समर्थ आहेत. का—

शिष्य—गुरुजी ! थांबा; आतां दिलेली गोळी मात्र मला गिळवत नाहीं. कर्मसंन्यासानें मोक्ष मिळतो हें मी कबूल करीन, पण कर्मांचें अनुष्ठान केलें म्हणजे संसारांत पडण्याच्या ऐवजीं मनुष्य मोक्षपदवीस जातो हें मात्र विलक्षण आहे ! भगवंतांनीं असें म्हणावें, आचार्यांनीं त्याचेंच अनुकरण करावें आणि आपणही तोच—

गुरु—पुष्कळ झालें! तुझ्यासारखा उतावळा तूंच आहेस! नीट सगळें होऊं देत जा व तें नीट ऐकून घेत जा. कर्मसंन्यासानें मोक्ष मिळतो. म्हणजे 'मला कांहीं कर्तव्य नाहीं, मी पूर्ण आहें सबब मला (आत्म्याला) कर्म नको, शिवाय आत्मा कर्ताही नाहीं' असें ज्ञान पूर्णपणानें बाणण्यासाठीं कर्मसंन्यास करावयाचा आहे. अशा बुद्धीनें टाकलेलीं जीं कर्में त्यास कर्मसंन्यास म्हणावयाचें. हा चित्तशुद्ध झालेल्या पुरुषास सांगावयाचा. यानें ज्ञान, स्वस्वरूपाचें ज्ञान उत्पन्न होतें. आतां तुझ्यासारख्यास कर्मयोग म्हणजे निष्काम कर्मयोगच योग्य होय. 'मायेच्या योगानें सर्व कर्में होत आहेत, मी कर्ता नाहीं, मला फल नको' अशा बुद्धीनें केलेलीं कर्में बद्धक होत नाहींत. श्लोक ४१ अ० ४ येथेंही असें सांगितलेंच आहे. यानेंही चित्तशुद्धि होऊन ज्ञान होतें. सारांश ज्ञानसंपादनाचीं हीं दोन साधनें आहेत. यादोहींकडूनही मोक्षप्राप्ति होईल पण त्यांतल्यात्यांतही ज्ञानशून्य कर्मसंन्यासापेक्षां निष्काम कर्मयोग विशेष चांगला आहे. उगीच कर्म टाकलें म्हणजे तें संन्यासाचें फल देत नाहीं, तें एक कर्मच होतें. आणि सकाम कर्म तर बद्धकच आहे म्हणून ज्ञानशून्य संन्यासापेक्षां अज्ञानी पुरुषास निष्काम कर्मयोग श्रेयस्कर आहे.

मधु०, प्रपा०, श्रीधर, पर्वते, पंडित, व्याख्याकार—कर्मयोगानें ज्ञानसंपादनाचा अधिकार प्राप्त होतो. शंकरानंदांनीं संन्यास शब्दाचे अनेक अर्थ दिले आहेत. तात्पर्य एकच असून तेंही आचार्यप्रणीतच आहे. द्विवेदी म्हणतातः खरा कर्मसंन्यास कोणास साध्य होत नाहीं. मानसिक संन्यास म्हणजे वासना आणि अहंकार यांचा संन्यास करावयाचा व आपण संन्यास केला आहे हेंही भान टाकून द्यावयाचें. हाच खरा संन्यास आहे. हा संन्यास झाल्यावर कर्म कर्मशून्य होतें; आणि असलें निष्कर्म कर्म करावें हें विशेष होय. मला स्वतःला आचार्यांचा पक्ष उत्तम दिसतो. चतरजींचा अर्थ आचार्यानुगतच आहे. निष्कामत्वानें विहित कर्म व व्यावहारिक कर्तव्यें करून परमेश्वर कृपेनें अहंकार नष्ट झाला म्हणजे ज्ञानसंपादनाचा अधिकार येतो.

रामानुज—' ज्ञानी पुरुषानेंही तुलना केल्यास त्याला ज्ञानयोगा-

पेक्षां कर्मयोग श्रेयस्कर आहे असें दिसेल.' हें दिसणें यांच्या विशिष्टाद्वैतास योग्यच आहे. जीवाचें कर्म कधींही संपत नाहीं असें यांचें मत आहे. ज्ञान झाल्यावर, सर्वत्र अद्वैत झाल्यावर कर्म उरत नाहीं हा सिद्धांत या आचार्यांस संमत नाहीं, कारण जीव हा केव्हांही अहंकारशून्य व वासनाशून्य होईल असें यांस वाटत नाहीं.

द्वैतवादी--ज्ञान आणि कर्म हीं दोन्हीं एककालीं एका पुरुषानें चालविलीं तरच मोक्ष होतो! कामक्रोधांचा त्याग करून कर्म करणें म्हणजे ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय होतो, असें आहे. आतां कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ सांगितला याचा अर्थ इतकाच कीं 'कामक्रोधांचा त्याग करून कर्म करण्यापेक्षां सर्वच कर्म परमेश्वरार्पण बुद्धीनें केलेलें श्रेष्ठ होतें.' या समुच्चयाचा विचार १० वे श्लोकाचे वेळीं करूं.

ज्ञानेश्वर—**तरी, जाणा नेणा** (जाणण्यास व नेणण्यास) **सकळा। हा कर्मयोग कीर** (खरोखर) **भांजळा** (सुलभ)। **जैसी नाव स्त्रियाबाळा। तोय तरणी ॥** रंगनाथांचेंही हेच शब्द आहेत!

वल्लभ--कर्मयोग = कर्मफल त्यागनिष्ठा.

योगवासिष्ठ--**उभाभ्यामेव पक्षाभ्यां यथा खे पक्षिणां गतिः। तथैव ज्ञानकर्माभ्यां जायते परमं पदम् ॥** (दोन्ही पक्षांच्या साहाय्यानें पक्षी जसें गगनांत भ्रमण करितात, तद्वतच ज्ञानकर्मांनें मोक्षपदाला जातां येतें.) ॥ २ ॥

कस्मादित्याह—

शिष्य—असें कशावरून?

गुरु--एकः—

ज्ञेयः स नित्यसंन्यासी
यो न द्वेष्टि न काङ्क्षति ॥
निर्द्वंद्वो हि महाबाहो
सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥ ३ ॥

यः न द्वेष्टि (कोणाचा द्वेष करित नाहीं) **न काङ्क्षति** (व कोणाचा अभिलाषही धरित नाहीं) **सः नित्यसंन्यासी ज्ञेयः** (त्याला नित्य संन्यासी असें म्हणावें.)–सारांश ज्यानें कामक्रोधादिकांचा त्याग केला, ज्याला शत्रु नाहीं, मित्र नाहीं, ज्याला आवडनिवड अशी कांहींच नाहीं, तो मनुष्य खरा संन्यासी होय–**महाबाहो** (आजानुबाहु अर्जुना!) **हि** (कारण) **निर्द्वन्द्वः** (ज्याची भेदबुद्धि नष्ट झाली, ज्याला सुखदुःख, शीतोष्ण इत्यादिकांपासून हर्षशोक होईनासे झाले)–तो पुरुष–**सुखं** (सुखानें, सौकर्यानें) **बन्धात् प्रमुच्यते** (बद्ध करणारें जें कर्म, जो संसार, त्यापासून मुक्त होतो). सारांश ज्याची अभेद बुद्धि झाली तो मुक्तच असतो.—

ज्ञेय इति। ज्ञेयो ज्ञातव्यः स कर्मयोगी नित्यसंन्यासीति यो न द्वेष्टि किंचिन्न काङ्क्षति दुःखसुखे तत्साधने चैवंविधो यः कर्मणि वर्तमानोऽपि स नित्यसंन्यासीति ज्ञातव्य इत्यर्थः। निर्द्वंद्वो द्वंद्ववर्जितो हि यस्मान्महाबाहो सुखं बन्धादनायासेन प्रमुच्यते ॥ ३ ॥

अर्जुना! अरे आजानुबाहू अर्जुना! जर कोणी पुरुष कर्म करितच राहिला म्हणजे कर्मयोगी असला, पण त्यानें जर द्वेषाचा व स्नेहाचा, आवडनिवडीचा, सुखदुःखाचा व सुख देणाऱ्या वस्तूंचा त्याग केलेला असला तर, तो पुरुष कर्मांत गढून गेलेला असेल, पक्का कर्मयोगी असेल तरी, त्यास संन्यासी, खरा संन्यासी असें म्हणावें. जो पुरुष अभेद दृष्टि झाला, तो कर्म करणारा असला तथापि सुखानें, अनायासानें, कर्मचक्रांतून सुटला पाहिजे असा न्यायच आहे. सारांश अहंकार व वासना यांनीं बद्ध होऊन सामान्य लोक कर्म करितात. हा अहंकार व ही वासना ज्याची सुटली तो कर्मानें बद्ध होणें शक्य नाहीं. एवंच अहंकार व वासना हींच कायतीं बद्धक आहेत. ही जोडी सुटली म्हणजे ज्ञान होऊन हा संन्यासी मुक्त होतो. कर्म हें जात्या संसारीं जीवाच्या पायांत असलेल्या शृंखळा दृढ करणारें जरी आहे, तथापि निर्लोभ मनानें व परमेश्वरार्पण बुद्धीनें केलेलें कर्म

शृंखलातुल्य न होतां प्रायश्चित्त स्वरूपीं होऊन शुद्ध चित्ताच्या पुरुषास ज्ञानाचा अधिकार देतें.

अद्वैतवादी संस्कृत ग्रंथकारांत एकवाक्यता आहे. पर्वते मात्र 'निर्द्वंद्वः '=कर्म न करणारा ज्ञानी, संन्यासी, असा प्रकरणास विरुद्ध अर्थ घेऊन विस्तार करितात.

रामानुज—' आत्मानुभवानें तृप्त झालेला पुरुष आत्मलाभाशिवाय दुसरी कोणतीही वासना धरित नाहीं.' येथें पुनः वासना आहेच; पण तिचा कधीं नष्टांश होईल असें या आचार्यांस वाटतच नाहीं! 'कोणतीही इच्छा करित नाहीं,' असे स्पष्ट शब्द असतांही या आचार्यांनीं वासना शिलक ठेवली आहे, यावरून रामानुजाचार्यांचा आग्रह स्पष्ट होतो. 'कर्मयोगानेंच मुक्त होतो,' हें यांचें म्हणणें आहेच !

द्वैतवादी—ज्याचा रागद्वेष नष्टच आहे तो संन्यासी होय. यतीचाच आश्रम घेण्याचें कारण नाहीं.

ज्ञानेश्वर—**तरी गेलियाची से** (आठवण) **न करी । न पवता चाड** (इच्छा) **न धरी । जो सुनिश्चय अंतरीं । मेरु जैसा ॥ आणि मी, माझें, ऐशी आठवण । विसरलें जयाचें अंतकरण । पार्था ! तो संन्यासी जाण । निरंतर ॥ जो मनें ऐसा जाहला । संगीं** (संसारानें) **तोचि सांडिला । म्हणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ आतां गृहादिक आघवें । तें कांहीं नलगे त्यजावें । जें घेतें झालें स्वभावें । निःसंग म्हणवुनि** (विषयाचें ग्रहण करणारें जें अंतःकरण आहे, तेंच निःसंग झालें म्हणजे कांहीं एक टाकून देण्याची आवश्यकता नाहीं.) ॥

'वासना जिवंत असतांना घेतलेल्या संन्यासापेक्षां निष्काम गृहस्थाश्रम जास्त हितकर आहे.' असें पंडित म्हणतात तें नीटच आहे. निष्काम कर्म करित असतांही तें परमेश्वरास अर्पण केलें नाहीं तर तें कर्म बद्धक होतें हें पंडितांनीं तिसऱ्या अध्यायांत सांगितलेंच आहे. व्याख्याकारही असेंच म्हणतात. ॥ ३ ॥

संन्यासकर्मयोगयोर्भिन्नपुरुषानुष्ठेययोर्विरुद्धयोः फलेऽपि वि-
रोधो युक्तो न तूभयोर्निःश्रेयसकरत्वमेवेति प्राप्त इदमुच्यते—

शिष्य—भगवन्! क्षमा करा, अजून माझ्या मस्तकांत प्रकाश पडला नाहीं. महाराज! संन्यास आणि योगमार्ग हे जर परस्पर भिन्न आहेत, हे जर एकाच पुरुषाला कधीं संभवत नाहींत, तर यांच्या पासून उत्पन्न होणाऱ्या फलांचेंहीं स्वरूप भिन्न असलें पाहिजे. आणि आपण तर आतांच प्रतिपादन केलें आहे कीं उभयतांच्याही योगानें मुक्ति मिळेल म्हणून! पूर्वेकडून जाणारा व पश्चिमेकडून जाणारा असे दोघे पुरुष एकाच गांवीं भेटतील असें म्हणण्यासारखाच वरील प्रकार होय.

गुरु—पृथ्वी वाटोळी आहे, तेव्हां ते पुरुष एकास्थलीं आलेच पाहिजेत! असो; मुख्य शंकेविषयींचें उत्तर ऐक :—

सांख्ययोगौ पृथग्बालाः
प्रवदन्ति न पण्डिताः ॥
एकमप्यास्थितः सम्य-
गुभयोर्विन्दते फलम् ॥ ४ ॥

सांख्ययोगौ पृथक् (सांख्य म्हणजे ज्ञानमार्ग आणि योग म्हणजे कर्ममार्ग हे दोन्ही परस्पर विरोधी आहेत, भिन्न आहेत असें) **बालाः प्रवदन्ति, न पण्डिताः** (अज्ञानी पुरुष म्हणतात, शहाणे पुरुष म्हणत नाहींत) **एकं अपि सम्यक् आस्थितः** (या दोहों-पैकीं कोणत्याही मार्गाचें ज्ञानपूर्वक अवलंबन केलें)–तरी–**उभयोः फलं विन्दते** (उभयतांचेंही फल मिळतें.)–सारांश परमार्थतः ज्ञान-मार्ग आणि कर्ममार्ग हे भिन्न नाहींत. यांच्या पैकीं कोणाएकांचेंही चांगलें अनुष्ठान केलें तर उभयमार्गांचें फल मिळतें.

सांख्ययोगाविति । सांख्ययोगौ पृथग्विरुद्धभिन्नफलौ बालाः प्रवदन्ति न पण्डिताः । पण्डितास्तु ज्ञानिन एकं फल-

मविरुद्धमिच्छन्ति। कथमेकमपि सांख्ययोगयोः सम्यगास्थितः सम्यगनुष्ठितवानित्यर्थः। उभयोर्विन्दते फलमुभयोस्तदेव हि निःश्रेयसं फलमतो न फले विरोधोऽस्ति। ननु संन्यासकर्मयोगशब्देन प्रस्तुत्य सांख्ययोगयोः फलैकत्वं कथमिह प्रकृतं ब्रवीति। नैष दोषो यद्यप्यर्जुनेन संन्यासं कर्मयोगं च केवलमभिप्रेत्य प्रश्नः कृतो भगवांस्तु तदपरित्यागेनैव स्वाभिप्रेतं च विशेषं संयोज्य शब्दांतरवाच्यतया प्रतिवचनं ददौ सांख्ययोगाविति। तावेव संन्यासकर्मयोगौ ज्ञानतदुपायसमबुद्धित्वादिसंयुक्तौ सांख्ययोगशब्दवाच्याविति भगवतो मतमतो नाप्रकृतप्रक्रियेति ॥ ४ ॥

सांख्य योगांची फलें परस्परविरुद्ध आहेत, ज्ञानमार्गाचें फल निराळें, कर्ममार्गाचें निराळें, असें केवळ अर्धवट लोक मात्र म्हणतात. ज्ञानी पुरुष असें कधींही म्हणत नाहींत. मात्र ज्ञानाचें अथवा कर्माचें अनुष्ठान योग्य रीतीनें झालें पाहिजे. मग अधिकारानुरूप कोणतेंही अनुष्ठान केलें तरी उभयतांपासून शेवटीं प्राप्त होणारें फल जो मोक्ष, तें फळ मिळतें. सारांश फलामध्यें विरोध नाहीं. ज्ञानपूर्वक सांख्य मार्गाचें अवलंबन व निष्कामतापूर्वक कर्मयोगाचें अनुष्ठान या दोहींचें फळ एकच म्हणजे मोक्ष देणारें ज्ञान होतें. सारांश, सर्व त्याग करून ज्ञान मिळविलें काय किंवा कर्तृत्व भोक्तृत्वाचा त्याग करून कर्म केलें काय, फल एकच आहे.

शिष्य — पण गुरुजी! अर्जुनानें प्रश्न विचारला संन्यास आणि योग संबंधी, आणि भगवान सांगत आहेत सांख्य व कर्म यांची समफलता. हें काय प्रकरणास अनुसरून आहे म्हणतां आपण?

गुरु — यांत तुझें काय गांठोडें बुडालें? अर्जुनानें तूं म्हणतोस तसा प्रश्न केला खरा, पण भगवंतांनीं त्याच प्रश्नाला धरून आपला अभिप्राय स्पष्टतर करण्यासाठीं सांख्य व योग असे दुसरे शब्द योजून उत्तर दिलें आहे; आणि त्या उत्तरानेंच कर्मसंन्यास व कर्मयोग

यांस अनुक्रमें सांख्य आणि योग असे शब्द योजावें असें सुचविलें आहे. समजलात? स्वस्वरूपाचें ज्ञान व तें ज्ञान मिळविण्याचें साधन जी समबुद्धि वगैरे या उभयतांसह जर कर्मसंन्यास अगर कर्मयोगांचें अनुष्ठान होत असेल त्या संन्यासास ज्ञान म्हणावें व कर्मानुष्ठानास योग म्हणावें, असें भगवन्मत प्रकट झालें आहे. सारांश येथें प्रकरणास अप्रस्तुत असा नवीन विषय भगवंतांनीं काढला नाहीं.

मधुसूदनीकारप्रमुख सर्व अद्वैतवादी आचार्यवादी आहेत. 'कर्मसंन्यास व कर्मयोग हे स्वरूपतः जरी भिन्न आहेत तथापि त्यांचें फल एकच आहे आणि तें फल म्हणजे वेदांतज्ञान होण्याचा अधिकार होय. अधिकारानुरूप संन्यास व योग ह्यांपैकीं एकाचें अवलंबन करावें; फलसिद्धि एकच आहे.' असा सर्वांचा अभिप्राय आहे.

रामानुजाचार्य—" 'कर्म योगानें ज्ञानयोग मात्र साध्य होतो, ज्ञानयोगानें मात्र कैवल्य मिळतें, मोक्ष मिळतो,' असें म्हणणारे अद्वैती लोक पंडित नाहींत" हा प्रस्तुत श्लोकाचा निष्कर्ष काढितात. "ज्ञानयोगानें किंवा कर्मयोगानेंही आत्मानुभव होतो," असें या आचार्यांचें म्हणणें आहे. हें अवास्तविकच आहे. कर्मसंन्यासानें चित्त शुद्धि होते, किंवा ईश्वरार्पित कर्मानें चित्तशुद्धि होते व नंतर आत्मा व परमात्मा एकच आहेत असें समजण्याचा अधिकार प्राप्त होतो, असें भगवंतांस दाखवावयाचें आहे. एकट्या कर्म योगानें ब्रह्मज्ञान मिळतें हा सिद्धांत नव्हे; हें मत आहे. कर्म योगानें चित्तशुद्धि मात्र होते. सगुणब्रह्माचें, ईश्वराचें, ज्ञान निष्काम कर्म योगानें होईल. पण वेदांती लोकांची मजल येथें, ईश्वरापाशीं संपत नाहीं. ईश्वर आणि आपण वस्तुतः एकच आहों, सर्व ब्रह्म आहे, असें तादात्म्यज्ञान संपादन करून नित्यसुखरूपी होण्याची त्यांची तयारी आहे. म्हणून सगुणब्रह्मापर्यंत, ईश्वरापर्यंत, स्वर्गापर्यंत, किंवा इहलोकींचीं दृश्य व अदृश्य सुखें यापर्यंत न थांबतां, ते थेट मूळ स्वरूपाशीं तादात्म्य पावण्याची खटपट करितात व वेद, उपनिषदें, गीता इत्यादिकांच्या श्रवणाप्रमाणें त्यांचे श्रम फलप्रद होतात हें समजणें इष्ट आहे.

द्वैतवादी यांचा अभिप्राय शब्दतः **आचार्याप्रमाणेंच आहे.** निष्काम कर्म करून ते ईश्वरार्पण केलें असतां हरीचें ज्ञान होतें, तसेंच संन्यासानेंही होतें. पण शेवटचें फल म्हणजे हरीच्या लोकीं वास्तव्य आणि तेथेंही हरिभजन हें होय !

धनप०:–"सांख्या सम्यगात्मबुद्धिस्तां वहति ज्ञानांतरंगसाधनतया इति संन्यासः" अंतर्ज्ञानानें सद्बुद्धि धारण करणें याचेंच नांव संन्यास होय.

ज्ञानेश्वर........**येरवी दीपाप्रति काइ** (निरनिराळे) **प्रकाश आहाति ?** (एका दीपापासून निरनिराळे प्रकाश उत्पन्न होतात काय ? नाहीं.) ॥

पंडितांचा दृष्टांत समर्पक आहे: **एकाच वाराणसीशीं । मार्ग दोनी जैं असती । जे काशीस न जाती । त्यास ते देश वेगळे वेगळे सहजची । तैसी आत्मजिज्ञासा नसे जयास । हीं दोन्ही शास्त्रें सहजचि तयास । वेगळीं वाटतीं अज्ञानियास । तो बाल ॥ काशीस जो जाय । त्यास कोण** (कोणताही) **मार्ग तरी झाला काय! । दोन्ही मार्गीं चालती पाय । आणि पावणें काशी तेंचि ॥** वरील टीकेचें पठण आमचे धर्माभिमानी हिंदु आणि आमचे ख्रिस्ती बंधु समंजसबुद्धीनें करतील तर पुष्कळ गोष्टींचा निकाल ताबडतोब होईल. ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप त्यानें आपल्या गुणकर्मास योग्य अथवा स्वधर्म, स्वीकारावा हें तत्त्व जर सर्व धर्मवादकांच्या मनांत बाणेल तर सर्वत्र एकच धर्म होईल यांत शंका नाहीं. हा धर्म अद्वैत धर्म होय. सारांश उपनिषत्प्रणीत व गीताप्रणीत धर्माचें उत्कृष्ट परिशीलन होऊन अधिकाराप्रमाणें मुमुक्षूस उपदेश करावा असें तत्व ज्या दिवशीं प्रकट होईल, तो सत्ययुगांतील सुदिन होय. ॥ ४ ॥

एकस्यापि सम्यगनुष्ठानात्कथमुभयोः फलं विन्दत इत्युच्यते—

शिष्य—नुसतें एकाचेंच सम्यक् अनुष्ठान केलें, एकच मार्ग चांगल्या रीतीनें पार पडला तर उभयतांचें फल मिळतें असें आपण म्हणाला तें कसें ?

गुरु—ऐक कसें तें—

> यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं
> तद्योगैरपि गम्यते ॥
> एकं सांख्यं च योगं च
> यः पश्यति स पश्यति ॥५॥

यत् स्थानं सांख्यैः प्राप्यते (सांख्यांस, ज्ञानी लोकांस जें पद प्राप्त होतें) **तत् योगैः अपि गम्यते** (तें योगी लोकांकडूनही मिळविलें जातें,–सारांश योग्यांसही तेंच पद प्राप्त होतें) **सांख्यं च योगं च एकं** (सांख्य आणि योग हे परमार्थतः एकच आहेत)–असें-**यः पश्यति** (जो पाहतो) **सः पश्यति** (तोच खरें पाहतो; त्यालाच खरें ज्ञान झालें असें समजावें.)–सारांश सांख्य आणि योग या मार्गांचें यथास्थित अनुष्ठान केलें असतां सांख्याला किंवा योग्याला शेवटीं एकच फल मिळतें. एवंच, सांख्य व योग हे वस्तुतः एकच आहेत असें ज्याला समजतें तोच विद्वान होय.

यदिति । यत्सांख्यैर्ज्ञाननिष्ठैः संन्यासिभिः प्राप्यते स्थानं मोक्षाख्यं तद्योगैरपि ज्ञानप्राप्त्युपायत्वेनेश्वरे समर्प्य कर्माण्यात्मनः फलमनभिसंधायानुतिष्ठन्ति ये ते योगिनस्तैरपि परमार्थज्ञानसंन्यासप्राप्तिद्वारेण गम्यत इत्यभिप्रायोऽत एकं सांख्यं योगं च यः पश्यति फलैकत्वात्स सम्यक्पश्यतीत्यर्थः ॥ ५ ॥

ज्ञाननिष्ठ, आत्मनिष्ठ, असे जे संन्यासी त्यांस ‘मोक्ष’ नांवाचें अखंड पद प्राप्त होतें. हेंच पद योग्यासही मिळतें. कसें? तर ऐकः आपण जीं कांहीं कर्तव्यकर्में करितों, त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या फलांवर वासना न ठेवितां तीं सर्व कर्में, कर्मफलें, व अहंकार आणि वासना हीं सर्व परमेश्वराच्या चरणीं जर समर्पण केलीं तर हींच अहंकारशून्य निष्काम कर्में ज्ञानप्राप्तीचें अत्युत्तम साधन होतात. असें अनुष्ठान

करणाऱ्या योग्यास मात्र ज्ञान होईल. हें ज्ञान झालें म्हणजे त्यांच्या हातून घडलेल्या सर्व कर्मांचें भस्म होऊन, सारांश संन्यासी होऊन, ते योगी निर्लेपच होतात आणि परम पदाला जातात. समजलास? या प्रमाणें फलदृष्टीनें सांख्य आणि योग हे एकच आहेत असें जो समजतो त्यालाच वास्तविक ज्ञान झालें असें म्हणावें:–पूर्वकर्मानुसार एकास लवकर ज्ञान होतें व दुसरा येथें कर्म करून पुढें ज्ञानास अधिकारी होतो.

अद्वैतवादी आचार्यांनुसारी आहेत.

रामा०—" सांख्य किंवा केवळ कर्मयोग ह्यांतून कोणत्याही एका मार्गानें गेलें तरी मोक्ष मिळेल असें म्हणतात. " कर्मानें चित्तशुद्धि होऊन ज्ञान संपादनाचा अधिकार येतो व ज्ञान झाल्यावर मोक्ष मिळतो, हें अद्वैतमत वरचेवर सांगितलेंच आहे.

द्वैतवादी—आचार्यांसारखाच अर्थ करितात. तथापि त्यांचीं अनुमानें मूल सिद्धांतास बाधक आहेत. फलामध्यें एकत्व आहे म्हणून साधनांमध्यें एकत्व कल्पून व अधिकाराप्रमाणें संन्यास किंवा कर्म ह्यांपैकीं एक कोणता तरी मार्ग स्वीकारावा, हा जो सरळ मार्ग तो सोडून देऊन विरक्त संन्याशानें कर्म केलें, किंवा अनुरक्त गृहस्थानें संन्यास घेतला तरी कार्यसिद्धि होईल असें म्हणतात! खरें ज्ञान असल्याशिवाय निष्काम कर्म होणार नाहीं व निष्कामकर्म केल्याखेरीज खरें ज्ञान होणार, नाहीं, असा जरी ज्ञान आणि कर्म यांचा अन्योन्य संबंध आहे, तथापि कर्मसंन्यास व कर्मयोग एका जीवाच्या हातून होणें अशक्य आहे. असो; याचा विचार १० वे श्लोकाचे वेळीं करूं.

ज्ञानेश्वरः—**देखें आकाशा आणि अवकाशा। भेद नाहीं जैसा। तैसें ऐक्य योगसंन्यासा। वोळखे जो॥ तयासींच जगीं पाहलें** (या लोकींच त्यास उजाडून म्हणजे आत्मज्ञान होऊन तो मुक्त झाला) **आपणपें** (आत्मस्वरूप) **तेणेंचि देखिलें। जया सांख्ययोग जाणवले। भेदेंविण॥ ५॥**

एवं तर्हि योगात्संन्यास एव विशिष्यते कथं तर्हीदमुक्तं तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यत इति शृणु तत्र कार-

णम् । त्वया पृष्टं केवलं कर्मसंन्यासं कर्मयोगं चाभिप्रेत्य तयो रन्यतरः कः श्रेयान् । तदनुरूपं प्रतिवचनं मयोक्तं कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यत इति ज्ञानमनपेक्ष्य । ज्ञानापेक्षस्तु संन्यासः सांख्यमिति मयाऽभिप्रेतः । परमार्थयोगश्च स एव । यस्तु कर्मयोगो वैदिकः स तादर्थ्याद्योगः संन्यास इति चोपचर्यते । कथं तादर्थ्यमित्युच्यते—

शिष्य—महाराज! यावरून असें सिद्ध होतें कीं, संन्यास केला काय किंवा योग केला काय, शेंवटीं कर्मसंन्यासच जर उत्पन्न होतो, तर मग योगापेक्षां संन्यासच श्रेष्ठ आहे; हें उघड आहे. कर्म करून त्याचा संन्यास केला काय किंवा कर्म टाकूनच संन्यास केला काय, फलश्रुति एकच आहे कीं संन्यास श्रेष्ठ आहे; आणि भगवंतांनीं तर दुसऱ्या श्लोकांत सांगितलें कीं कर्मयोग श्रेष्ठ आहे! तेव्हां हा गोंधळ मला तरी उकलत नाहीं.

गुरु—ठीकच आहे; तुला भगवंताचा अभिप्राय अद्यापि कळलाच नाहीं! त्यांनीं अर्जुनास सांगितलें:—“ बा! अर्जुना! केवळ संन्यास म्हणजे ज्ञानशून्य संन्यास श्रेष्ठ आहे, किंवा निष्काम कर्मयोग श्रेष्ठ आहे असें विचारलेंस तेव्हां मीं म्हटलें कीं निष्काम कर्मयोगच श्रेष्ठ आहे. ज्ञानाचा विचार केला नाहीं, ज्ञान एकीकडे ठेविलें तर कर्मयोगच श्रेष्ठ ठरतो. आतां सांख्य म्हणजे ज्ञानपूर्वक संन्यास होय; व तोच खरा योग आहे. ज्ञानसहित संन्यास व निष्काम कर्मयोग हे दोन्हीं एकच आहेत.” समजलास! कारण दोन्हींमध्यें अहंकाराचा व वासनेचा क्षय झाला असतो. आतां अज्ञानवश असतांना जीं आपण धार्मिक कर्में करितों, तीं ईश्वरार्पण होऊं लागलीं तर चित्त शुद्ध होऊन पुढें ज्ञान होण्याचा संभव आहे म्हणून त्या वैदिक कर्माचरणासही कर्मयोग, संन्यास असें लक्षणेनें म्हटलें; कसें तर ऐकः—

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ॥
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥६॥

महाबाहो (आजानु बाहु अर्जुना !) **तु** (परंतु) **अयोगतः संन्यासः आप्तुं दुःखं** (योगाभ्यासाशिवाय खरा संन्यास सिद्ध होणें कठिण आहे.) **योगयुक्तः मुनिः** (पण कर्मयोग निष्कामत्वानें अनुसरणारा ज्ञानी पुरुष) **न चिरेण** (लवकरच) **ब्रह्म अधिगच्छति** (ब्रह्मपद मिळवितो.) -सारांश, कर्मयोग केल्याविना तुझ्यासारख्या अज्ञानी मनुष्याचा संन्यास कधींही सफल व्हावयाचा नाहीं. अज्ञानी पुरुषांनीं कर्मयोगच आचरला पाहिजे; व तो योग निष्कामत्वानें केला तर त्या कर्मठांसही ज्ञान उत्पन्न होऊन त्यांस सुखानें मुक्तिपदाकडे जातां येईल.

संन्यासस्तु पारमार्थिको दुःखमाप्तुं प्राप्तुमयोगतो योगेन विना । योगयुक्तो वैदिकेन कर्मयोगेणेश्वरसमर्पितरूपेण फलनिरपेक्षेण युक्तो मुनिर्मननादीश्वरस्वरूपस्य मुनिर्ब्रह्म परमात्मज्ञानलक्षणत्वात्प्रकृतः संन्यासो ब्रह्मोच्यते "न्यास इति ब्रह्मा ब्रह्मा हि परः" इति श्रुतेः । ब्रह्म परमार्थसंन्यासं परमार्थज्ञाननिष्ठालक्षणं न चिरेण क्षिप्रमेवाधिगच्छति प्राप्नोत्यतो मयोक्तं कर्मयोगो विशिष्यत इति ॥ ६ ॥

अर्जुना ! निष्काम बुद्धीनें योगाचें अनुष्ठान केल्याशिवाय खरा, मोक्ष मिळवून देणारा, संन्यास सिद्ध होणें महासंकटाचें आहे.

शिष्य— ह्याची थोडी जास्त समजूत पाहिजे.

गुरु— वत्सा ! आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें प्राणी पूर्वजन्मीं अनेक कर्में करतात व दुसरा जन्म घेऊन त्यांचें फल उपभोगितात, असें आहे. अलीकडील शास्त्रीय समजुतीप्रमाणें आपल्या लाखो पिढ्यांतील वाडवडिलांनीं कर्म केलें असतें, त्यांचा सर्व परिणाम आपल्यास भोगावा लागतो असें आहे. दोन्ही पक्षांत एकवाक्यता ही आहे कीं पूर्वकर्मानें आपल्यास जन्म प्राप्त झाला आहे. कर्माचा उपभोग घेतल्याशिवाय तें कर्म संपत नाहीं; म्हणून एकाएकी कर्माचा त्याग करितां येणें संभवनीय नाहीं. त्या कर्माला शून्यवत् करणारें दुसरें कर्म आपण विरुद्ध दिशेनें म्हणजे 'मी कर्ता नव्हें, मी भोक्ता नव्हें.' अशा बुद्धीनें, करावयास लागलें पाहिजे. ही बुद्धी साधुसंगतीनें अगर

ईश्वरीप्रसादानें उत्पन्न होते व ह्या बुद्धयनुसार निष्काम कर्माचरण झालें म्हणजे पाठीमागील कर्मांचा क्षय होतो. सारांश केव्हांही कर्म संन्यास करावयाचा असल्यास त्याच्या आधीं निष्कामकर्म योग झालाच पाहिजे, त्याशिवाय खरा संन्यास सिद्ध व्हावयाचा नाहीं. समजलें ? आतां जें काय आपण वैदिकादि विहितकर्म करितों तें वांच्छाशून्य भक्तीनें ईश्वरास समर्पण केलें तर खऱ्या योग्याचें स्वरूप प्राप्त होतें आणि स्वरूपाचें चिंतन अहर्निश होऊं लागलें म्हणजे मुनित्व मिळतें. अशा मुनीला लवकरच ब्रह्मपद मिळविण्याचा अधिकार प्राप्त होतो. संन्यासाचें लक्षण काय तर परमात्म्याचें वास्तविक ज्ञान; आणि हें ज्ञान होणें म्हणजेच ब्रह्मज्ञान होय. सारांश ज्ञानपूर्वक संन्यास म्हणजे ब्रह्मस्थिति होय. कारण उभयतांमध्यें ही शुद्ध, बुद्ध, नित्य, मुक्त ब्रह्माचें ज्ञानच सर्वत्वानें असतें. श्रुतींत तरी हेंच म्हटलें आहे; सर्व त्याग हेंच ब्रह्म आहे. ब्रह्म हेंच सर्व श्रेष्ठ आहे, याचा अर्थही आम्ही म्हणतों तसाच आहे. म्हणून संन्यासाचा विषय प्रस्तूत असतांही भगवंतांनीं ' ब्रह्म मिळेल ' असें सांगितलें. ब्रह्म मिळेल म्हणजे संन्यास साध्य होईल. असो; तेव्हां **निष्काम बुद्धीनें कर्म करून तें परमेशास अर्पण करणारा व परमेशाचें खरें स्वरूप ध्यानांत आणणारा पुरुष** लवकरच ब्रह्मपदाला जातो म्हणजे त्याचा ज्ञानपूर्वक संन्यास सिद्ध होतो. समजलें आतां अज्ञानी पुरुषास कर्मयोगच श्रेष्ठ कां आहे तो ?

अद्वैतवाद्यांत ऐक्य आहे.

रामानुजाचार्यांनीं ' कर्मयोगानें आत्मलाभ होतो ' असें नेहमीं प्रमाणें म्हटलें आहेच !

द्वैतवाद्यांची खटपट ' ज्ञान व कर्म एकाकालींच असलीं पाहिजेत ' हें सिद्ध करण्यासाठीं आहे. ' कर्मानंतर ज्ञान ' असा अद्वैतवाद्यांचा क्रम आहे.

पंडितः—**कीं कर्मयोग आणि संन्यास हें साधनद्वय । दोही वीण ब्रह्म साधेना ॥ एक दोहीं मधुनि । धरावें हें अर्जुनाचें मनीं । परी तैसें न घडे म्हणोनि । श्रीकृष्णभाव ॥** पंडित

थोडे द्वैतांत शिरल्यासारखा भास होतो; पण हा विषय जिज्ञासूंनीं स्वतः तेथेंच वाचावा हें बरें!

वल्लभ—संन्यासामध्यें परमेश्वराशीं वियोग असतो व कर्मयोगांत परमेश्वर चिंतन सदैव होत असून परमेश्वर संयोग असतो, म्हणून योगा-शिवाय, भक्तिपूर्वक आराधनेशिवाय, ब्रह्मप्राप्ति नाहीं.' ॥ ६ ॥

यदा पुनरयं सम्यग्दर्शनप्राप्त्युपायत्वेन—

शिष्य—म्हणजे असाचना अर्थ कीं अद्वैतदृष्टीनें ज्ञानमार्ग, सांख्यमार्ग, कर्मसंन्यासाचा मार्ग, श्रेष्ठ आहे; सकाम कर्माचरण अगदीं कमी पायरीचें आहे; आणि हा ज्ञानमार्ग सिद्ध होण्यास कर्मयोगाचाच अंगीकार केला पाहिजे. एवंच कोणाही पुरुषा-नें अहंकाराचा व वासनेचा त्याग केला व ईश्वराचें ध्यान करून निष्काम कर्माचें अनुष्ठान केलें असतां तें कर्म निष्फल म्हणजे संन्यासतुल्य, सारांश संन्यासच होतें आणि तो पुरुष ब्रह्माधि-कारी होतो. सारांश ज्ञान झाल्यावर संन्यास श्रेष्ठ, व त्याच्या आधीं निष्कामकर्मयोग श्रेष्ठ; आणि उभयतांचें फल ब्रह्मप्राप्ति! मला समजलें असें आपणांस वाटतें काय? संन्यास हें फळ आ-णि निष्कामकर्मयोग हें साधन आहे.

गुरु—उत्तम! असा हा योगी जेव्हां परमार्थज्ञानप्राप्तीस उत्तम उपाय जो योग त्याच्यासह—

योगयुक्तो विशुद्धात्मा
विजितात्मा जितेन्द्रियः॥
सर्वभूतात्मभूतात्मा
कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

योगयुक्तः (निष्काम कर्मनिष्ठा आहे ज्याची असा) **वि-शुद्धात्मा** (त्या कर्मयोगामुळें अहंकारशून्य व वासनाशून्य झाली आहे आत्मवृत्ति ज्याची) **विजितात्मा जितेन्द्रियः** (सर्व

इंद्रियादिकांचें योग्य दमन केलें आहे ज्यानें व सर्व शरीर स्वाधीन . झालें आहे ज्याचा असा) **सर्वभूतात्मभूतात्मा** (पदार्थमात्रांच्या अंतर्यामी जो नित्य आत्मा भरलेला आहे, तो·च आपण आहोंत अशी ज्याची खातरी झाली आहे, सारांश सर्वांभूतीं ज्यांस परमेश्वर व ब्रह्म हीं अनुक्रमें दिसूं लागलीं आहेत)–अशा पुरुषानें–**कुर्वन् अपि** (कर्म केलें तरी) **न लिप्यते** (तो कर्मबंधामध्यें सांपडत नाहीं. कर्म करूनही तो निर्लेपच राहतो.) सारांश ईशचरणीं सर्व निष्ठा, शुद्धांतःकरण, शरीर व इंद्रियादिक सर्व स्वाधीन व सर्व भूतांत आपणच ब्रह्मस्वरुपानें भरलों आहों, असा निश्चय हीं सर्व ज्या साधकापाशीं असतील त्या पुरुषानें कर्म केलें तरी त्या कर्माचा संपर्क त्या पुरुषाला लागत नाहीं.

योगेन युक्तो योगयुक्तो विशुद्धात्मा विशुद्धसत्त्वो विजितात्मा विजितदेहो जितेन्द्रियश्च सर्वभूतात्मभूतात्मा सर्वेषां ब्रह्मादीनां स्तम्बपर्यन्तानां भूतानामात्मभूत आत्मा प्रत्यक्चेतनो यस्य स सर्वभूतात्मभूतात्मा सम्यग्दर्शीत्यर्थः । स तत्रैवंवर्तमानो लोकसंग्रहाय कर्म कुर्वन्नपि न लिप्यते न कर्मभिर्बध्यत इत्यर्थः ॥७॥

याप्रमाणें मागें सांगितलेला निष्कामयोगी निर्मळ चित्त झाला, वासना व अहंकार ही द्वयी नष्ट झाली, त्याच्या स्वाधीन देह व इंद्रियें हीं पूर्णपणानें आलीं, सारांश जो देहांतून व इंद्रियांतून पलीकडे गेला, ज्याला असें वाटूं लागलें कीं या अनंत विश्वांत जे अनंत पदार्थ भरलेसे दिसत आहेत ते सर्व, अगदीं ब्रह्मदेवापासून तों थेट यःकश्चित् गवताच्याकाडीपर्यंत, आत्मस्वरूपी आहेत, मीही ब्रह्मस्वरूपीच आहे, तेव्हां मीच ब्रह्मस्वरूपानें सर्वत्र भरलों आहे, सारांश एवंगुणविशिष्ट जो योगी आहे, जो ब्रह्मज्ञ आहे, त्याच्या हातून लोककल्याणाचीं कामें झालीं तथापि त्यापासून त्याला कांहींच बाध उत्पन्न होत नाहीं.–

मधु०-कायदण्ड, वाग्दण्ड, व मनोदण्ड हे ज्यास साध्य झाले म्हणजे आचार, उच्चार व विचार ही त्रयी ज्याच्या स्वाधीन झाली तोच

त्रिदंडी संन्यासी होय. हे स्वामी म्हणतातः दुसऱ्याच्या दृष्टीनेंही तो लिप्त होत नाहीं. स्वतःची तर आत्मदृष्टि झाल्यामुळें स्वतः आपण कांहीं कर्म करित आहों ही वार्ताही त्याला नसते.

प्रपा०, मधु०, श्रीधर—या श्लोकांतील पहिलें विशेषण दुसऱ्या, पुढें येणाऱ्या, विशेषणाचें कारण आहे; म्हणजे योगयुक्त झाला म्हणजे शुद्ध देही होतो, इत्यादि, असा कार्यकारण क्रम योजिला आहे.

शंकरा०, पर्वते, ह्या श्लोकाचा अर्थ जीवन्मुक्तपर लावितात. देहाकडून झालेल्या कोणत्याही कृत्याबद्दल पूर्ण ज्ञानी जबाबदार नाहीं.'

चतरजीः–ज्यांचें चित्त शुद्ध आहे, त्यांसच ईशसाक्षात्कार होतो. (पहा माथ्यु) विषयनिवृत्ति झाल्याशिवाय चित्तशुद्धि नाहीं. (पहा. १ कारिंथियन्स).

रामा०–हे आचार्य सर्व अर्थ आचार्यांप्रमाणें करून शेवटीं मात्र म्हणतात; 'म्हणून कर्मयोगच श्रेष्ठ आहे; कारण तो सुकर आहे व शीघ्र फलप्रद आहे.' कां आहे कीं नाहीं कर्मयोगाचा हा आग्रह?

द्वैतवादी—'सर्व भूतात्मभूतात्मा=' सर्व चराचर वस्तूंचा उत्पादक नियामक आणि संहार कर्ता जो परमेश्वर तोच **माझा स्वामी** आहे असें ज्यास्त ज्ञान झालें आहे तो ज्ञानी होय. किंवा सर्व भूतमात्र परमेश्वरामध्यें भरलेलें आहे असें पाहणारा तो ज्ञानी होय.

ज्ञानेश्वरः—**जैसें समुद्रीं लवण न पडे। तंव वेगळें अल्प आवडे** (वाटतें) **। मग होय सिंधूचि येवढें। मिळे तेव्हां!॥ तैसें संकल्पोनि** (संकल्पापासून) **काढिलें। जयाचें मन चैतन्य जाहलें। तेणें एकदेशियें,** (*व्यक्तिरूपानें*) **परि** *व्यापिलें। लोकत्रय!॥* **आतां कर्ता, कर्म, करावें। हें खुंटलें तया स्वभावें। आणि करी जरी आघवें। तरी अकर्ता तो॥**

पंडित—**कीं आपल्या देहासहित। सर्व भूतीं देखे स्वात्मत्व निश्चित। त्यास त्याच्या कर्मासहित। प्रपंच अवघा निजात्मचि॥** हे पंडित भूत=देह; आत्मा=जीवः भूत=पंचमहाभूतें; आत्मा=चैतन्य; असे अर्थ करितात. ॥ ७ ॥

न चासौ परमार्थतः करोत्यतः—

हा असला योगी पुरुष वास्तविक पाहिलें असतां कांहींच करित नाहीं कारण:—

नैव किंचित्करोमीति
युक्तो मन्येत तत्त्ववित् ॥ ८ ॥

न एव किंचित्करोमि इति (मी स्वतः कांहींच करित नाहीं असें) **तत्त्ववित् युक्तः** (ज्याला खरें स्वरूपाचें ज्ञानतत्व समजलें आहे असा निष्काम कर्मयोगी) **मन्येत** (समजतो). सारांश आत्मस्वरूपानें आपण कांहींच करित नाहीं. असा ब्रह्मयोग्याचा निश्चय झालेला असतो.

नैव किंचित्करोमीति युक्तः समाहितः सन्मन्येत चिन्तये-त्तत्त्वविदात्मनो याथात्म्यं तत्त्वं वेत्तीति तत्त्ववित्परमार्थदर्शी-त्यर्थः ॥ ८ ॥

स्वस्वरूपसमाधीनें आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान झालें आहे, परम पुरुषार्थ म्हणजे ब्रह्मज्ञान ज्यास झालें आहे असा आत्मनिष्ठ योगी असा निश्चय करून ठेवितो कीं आत्मस्वरूप निर्विकार व अव्यय अ-सल्यामुळें तें कांहीं करित नाहीं. तेंच आत्मस्वरूप आपण आहोंत; तेव्हां आपल्याकडूनही कर्तृत्व नाहींसेंच झालें. सारांश, देह इंद्रियें इत्यादिंकडून कर्म होतें, आत्म्याचा त्यांत संबंध नाहीं, असें मानून तो कर्माच्या कर्तृत्वाविषयीं अगर कर्मफलाविषयीं उदासीन राहतो. अर्थातच तो संन्यासी होतो.

मधु० प्रपा०, **श्रीधर**, पर्वते, **चतरजी** हे अगोदर कर्मयोगानें सत्वशुद्धि होऊन तत्वज्ञान झालेला; असा 'युक्तः तत्ववित्' यांचा अर्थ करितात.

शंकरा०—आचार्यानुसारी आहेत.

द्विवेदी—'मी असंग, कूटस्थ, सर्वसाक्षी, ब्रह्म आहे, ब्रह्माला प्रवृत्ति नाहीं व निवृत्ति नाहीं, मी अकर्ता आहे असे जो मानितो तो तत्ववेत्ता होय.'

रामा०—आचार्यपक्षीच आहेत.

द्वैतवादी—ईश्वराच्या इच्छेनें सर्व इंद्रियें आपआपलीं कर्में करित आहेत, मी परतंत्र आहे म्हणून माझ्या हातून कांहीं होणें शक्य नाहीं. असें तत्ववेत्ता समजतो.' भगवंताचा हा आशय नाहीं हें पूर्वपार संबंधानें स्पष्ट होत आहे. कर्म करणें बद्धक केव्हां होत नाहीं हा प्रश्न आहे व त्याचें उत्तर 'इंद्रियें कर्में करितात, मीं करित नाहीं' असेंच 'सर्व ब्रह्म आहे' अशा ज्ञात्यानें दिलें पाहिजे.

ज्ञानेश्वरः-जे पार्था! तया देहीं। 'मी' ऐसा आठवू नाहीं। तरी कर्तृत्व कैचें काई?। उरे सांगे॥

पंडितः-अर्जुना! तत्व कळलें ज्याला। आत्मा अकर्ता कळलें त्याला। मी कर्ता ऐसा अहंकार ज्याला। आत्मरज्जू कळतां मृषा सर्प॥ मीपणातें अवलंबुनि। मी कर्ता म्हणोनि। बुद्धि म्हणे सचेतन होऊनि। आत्मसत्तेनें॥ जडा मीपणा नसे सत्ता। दिसे चैतन्यास कर्तृता। जीवात्मयास बद्धता। ऐसी, कुसंगें बुद्धीच्या॥ वाटे भोंवतें (फिरते) मेदिनी। परि भोंवंडी आपल्याच नयनीं। ते भूमि अचळ म्हणोनी। कळे. भोवंडी जातां नेत्राची॥ तैसा जातां अहंकार। बुद्धीस आत्मा दिसे निर्विकार। तेव्हां अकर्तृत्व निर्धार। होय, तो म्हणावा तत्वज्ञ॥

व्याख्याकार म्हणतातः-दीप जसा सर्वसाक्षी असतो पण स्वतः कांहींच करित नाहीं, त्याचप्रमाणें ज्ञानी पुरुषाची स्थिति होय.॥ ८॥

कदा कथं वा तत्त्वमवधारयन्मन्येतेत्युच्यते—

शिष्य—कोणतें तत्वाचा अंगीकार करून तो केव्हां व कसें मीं मुळींच कर्ता नव्हे असें म्हणतो?

गुरु—ऐकः—

पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्र-
न्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन्॥
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि॥
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन्॥९॥

पश्यन् शृण्वन् स्पृशन् जिघ्रन् अश्नन् गच्छन् स्वपन् श्वसन्, प्रलपन् विसृजन् गृह्णन् उन्मिषन्, निमिषन् अपि (पहात, ऐकत, स्पर्श करित, वास घेत, रुचि घेत, जात, झोंप घेत, श्वासोच्छ्वास करित, बोलत, टाकित, घेत, डोळे उघडीत किंवा मिटित, असतांही, वर सांगितल्यापैकीं, सारांश, कोणतेंही कार्य करित असतां) **इन्द्रियाणि** (आपली सर्व इंद्रियें) **इन्द्रियार्थेषु वर्तन्ते** (आपआपले जे विषय आहेत, त्यांमध्यें, त्यासंबंधानें कर्म करितात) **इति** (याप्रमाणें) **धारयन्** (निश्चय करीत होत्साता)–तो आत्मदृष्टीनें कर्मकर्तृत्व आणि कर्मफल यांविषयीं उदासीन राहतो. इंद्रियें विषयाचे ठायीं रममाण होतात, माझा त्यांत संबंध नाहीं, असे योगी मानितो.

मन्येतेति पूर्वेण संबन्धः । यस्यैवं तत्त्वविदः सर्वकार्यकरणचेष्टासु कर्मस्वकर्मैव पश्यतः सम्यग्दर्शिनस्तस्य सर्वकर्मसंन्यास एवाधिकारः कर्मणोऽभावदर्शनात् । नहि मृगतृष्णिकायामुदकबुद्ध्या पानाय प्रवृत्त उदकाभावज्ञानेऽपि तत्रैव पानप्रयोजनाय प्रवर्तते ॥ ९ ॥

याप्रमाणें मूळ श्लोकांत सांगितलेल्या व त्यांवरून ध्वनित होणाऱ्या बाकीच्या सर्व क्रिया माझ्याकडून होत नाहींत, इंद्रियें मात्र आपआपल्या विषयांमध्यें व्यापार करित असतात, असा, तत्ववेत्ता, योगी, आपल्या मनाचा निश्चय करून ठेवितो. याप्रमाणें ज्याची स्थिति आहे म्हणजे सर्व प्रकारचीं देहादिक, इंद्रियादिक व बुद्धिजन्य कर्में आत्मदृष्टीनें कर्मशून्य आहेत असें जो पाहतो, सारांश आत्मज्ञान झाल्यामुळें जो कृतकृत्य झाला व आत्मदृष्ट्या ज्याला कांहीं करावयाचें असें उरलें नाहीं, त्याच पुरुषाला कर्मसंन्यास करण्याचा मात्र अधिकार पोहोंचतो. कारण कर्म हें अभावरूपी आहे, व्यवहारदृष्टीनें ज्याला कर्म म्हणतात, तें कर्म नसून त्याचा अभाव आहे असें त्याला निश्चितपणें समजलें आहे. अशा पुरुषास कर्मसंन्यासाचा अधिकार आहे. उघडच आहे कीं कडक उन्हाच्या झळ्यांनीं तापलेल्या मनु-

ष्यास मृगजळ दिसतें व आपली तहान शमविण्याच्या दृष्टीनें तो तिकडे जाऊं लागतो. थोडासा पुढें गेल्यावर हें मृगजळ आहे, ही भ्रामक जागा आहे असें त्यास समजतें. हें यथार्थ ज्ञान झाल्याबरोबर अर्थातच तो मृगजळाकडे जाण्याचें थांबतो. तिकडे जात नाहीं. सारांश हें ज्ञान झाल्यावर त्याची भ्रामक मृगजळाकडे जाण्याची प्रवृत्ति होत नाहीं.

शिष्य—महाराज! हें ठीक आहे. व्यवहारिक कर्म व्यर्थ आहे असें कळल्यावर शहाणा मनुष्य त्या संसारांत घालणाऱ्या कर्माकडे वळणार नाहीं. पण कर्म करण्याची इच्छा कशी नष्ट होणार? प्रस्तुत उदाहरणांतही त्या संतप्त मनुष्याचें तृषाशमन झालें नाहीं.

गुरु—हा दृष्टांत केवळ संसार व तदनुषंगी सर्व कर्में भ्रामक आहेत हें दाखविण्यापुरताच आहे असो; कर्म संपल्यावर इच्छा कोठून होईल? तथापि याचा विचार पुढील श्लोकीं करूं—

मधु०, प्रपा०, श्रीधर, चतरजी, पर्वते— प्रथम कर्म करून ह्या कर्मयोगानें शुद्ध चित्त झाल्यावर तत्ववेत्ता जो आहे तो ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें प्राणापान इत्यादि वायु व अंतःकरणचतुष्टय या सर्वांकडून होणारीं कर्में आत्म्याची नव्हेत असें मानितो; सारांश कर्तृत्वाभिमानशून्य होतो.

शंकरा०—'मी असंग, कूटस्थ व पूर्ण असल्यामुळें केवळ साक्षी मात्र आहे, कर्माचा माझा संबंध नाहीं.' असें मानणारा तो योगी होय.

चतरजी—अहंकारभाव नष्ट झाल्यावर अनंत आत्म्याचा सांत कर्मांशीं अगर कर्मफलांशीं संबंध राहत नाहीं.

द्विवेदी—अपरोक्षानुभूतीच्या आधारें असें दाखवितात कीं ब्रह्मवार्तेमध्यें कुशल परंतु वृत्तिहीन असें लोक पापी होत. 'इंद्रियें इंद्रियांचें भोग भोगतात, तेथें माझें काय आहे?' असें म्हणून अथवा इंद्रियें निराळीं व आत्मा निराळा असा द्वैतभाव उराशीं बाळगून, जे अनाचार करितात त्यांस वेदांतदृष्टि समजली नाहीं. सर्व भूतांचें आत्मत्व संपादन करून, आत्मा, इंद्रियें, विषय इत्यादि भेदच जेथें समूळ नष्ट झाला तो खरा ब्रह्मानंदी होय.

रामा०—स्वस्वरूपाचें ज्ञान झालेला असा जो मी त्या माझा कर्मांशीं कांहीं संबंध नाहीं, कर्तृत्व मजकडे नाहीं, असें तत्वज्ञ मानितो.

द्वैत०--परमेश्वराकडे सर्व कर्तृत्व असल्यामुळें माझा कोणत्याही कर्माशीं कर्तृत्वसंबंध नाहीं असें मानितो. युक्तः=कर्मयोग करणारा.

ज्ञानेश्वर--जो पार्था ! तया देही । मी ऐसा आठऊ नाहीं । तरी कर्तृत्व कैचे काई ॥ उरे सांगे? ॥....तो कर्ता नव्हेचि पाहि । प्रतीति बळें ॥ जै भ्रांति सेजे सुतला (जेव्हां मायेच्या अंथरुणावर जीव निजलेला असतो, सारांश भ्रांतीनें मी कर्ता मी भोक्ता असें मानितो)। तैं स्वप्नसुखे भूतला (तेव्हांच त्याला सुखदुःखाचा भास म्हणजे स्वाप्निक अनुभव येतो) । मग ज्ञानोदयीं चेईला (पण पुढें ज्ञानाचा उदय झाला म्हणजे तो जागा होतो आणि कर्तृत्व-भोक्तृत्वशून्य होतो) म्हणोनिया ॥

पंडित—युक्त= चित्त चैतन्यस्वरूपीं योजे । ऐसें तत्वज्ञें आधीं केलें पाहिजे । ज्याणें ऐसें केलें त्यास म्हणिजे । युक्त म्हणोनि ॥.... आपण नव्हे इंद्रिय । कीं कांहीं घेऊं विषय । आपण असतों कर्मेंद्रियसमुदाय । तरी प्राप्त होते कर्तृत्व मजलागीं ॥

वल्लभ-- तत्त्ववित्=भगवंताचें इंगित जाणणारा. हा ईश्वराज्ञेनें आपण कर्म करित आहों असें मानून सर्व कर्में ईश्वरोपासनाबुद्धीनें करितो. ॥९॥

यस्तु पुनरतत्त्ववित्प्रवृत्तश्च कर्मयोगे--

आतां जो तत्ववेत्ता नाहीं व म्हणून जो कर्मामध्यें प्रवृत्त झाला आहे त्याची नैष्कर्म्यसिद्धि कशी तें सांगतात—

ब्रह्मण्याधाय कर्माणि
सङ्गं त्यक्त्वा करोति यः ॥
लिप्यते न स पापेन
पद्मपत्रमिवाम्भसा ॥ १० ॥

सङ्गं त्यक्त्वा (सर्वप्रकारची आसक्ती सोडून देऊन) कर्माणि ब्रह्मणि आधाय (आणि सर्व कर्में ब्रह्माला समर्पण करून) यः करोति (जो कर्म करितो) सः (तो) अम्भसा पद्मपत्रं इव पापेन

न लिप्यते (कमलपत्राला जसा त्यावर पडलेलेल्या पाण्याचा संस्पर्श मुळींच होत नाही, तसाच वरील कर्मठालाही पापाचा गंध सुद्धां लागत नाहीं.)-सारांश, कर्मफलाची आसक्ति न धरितां सर्व कर्मे ईश्वरांस समर्पण करणारा पुरुष जें कांहीं कर्म निरहंकारवृतीनें करितो, तें या कर्त्याला बद्धक होत नाहीं. कमलपत्रावरील मोत्याप्रमाणें चमकणाऱ्या जलबिंदूचा स्पर्श त्या पत्राला जसा मुळींच नसतो, तसेंच शुद्ध मनानें व भक्तिपुरःसर ब्रह्मार्पण करणाऱ्या पुरुषाचीं कर्में त्याला स्पर्श करित नाहींत, त्याला बद्धक होत नाहींत.

ब्रह्मणीश्वर आधाय निक्षिप्य तदर्थं करोमीति भृत्य इव स्वाम्यर्थं सर्वाणि कर्माणि मोक्षेऽपि फले सङ्गं त्यक्त्वा करोति यः सर्वकर्माणि, लिप्यते न स पापेन न संबध्यते पद्मपत्रमिवाम्भसोदकेन ॥ १० ॥

एकनिष्ठ सेवक जसा स्वामीसाठीं, आपल्या यजमानासाठीं, सर्व कर्में करितो व सर्व कर्मांचें श्रेय यजमानास अर्पण करितो, त्याचप्रमाणें 'परमेश्वराच्या प्रेरणेनुरूप मी परमेश्वरासाठीं मात्र कर्म करित आहे, सर्व दुःखपरिहार करणारा मोक्ष मिळाला तरी तो मला नको, माझ्या धन्यास, ईश्वरास तो मिळूंदे' अशी मात्र इच्छा ठेवून स्वतः-विषयीं जो पराकाष्ठेचा निस्पृह असतो, आणि अशा वृत्तीनें लौकिक व वैदिक कर्म करितो, त्याला पापपुण्याचा कांहींच संबंध असत नाहीं. कमळाच्या पानावरील जळबिंदूच्या कडून कमळपत्राला जसा कसलाही धक्का देववत नाहीं, त्याचप्रमाणें त्या निस्पृह पुरुषाला केलेल्या कर्मांकडून यत्किंचित ही बाध होत नाहीं. मात्र त्याचें चित्त शुद्ध होत जातें. स्फटिकांतील प्रतिबिंबाचा लेप त्या शुद्ध व तेजस्वी स्फटिकाला होत नाहीं, हें सर्वश्रुतच आहे.

मधु०, प्रपा०, श्रीधर, चतरजी, शंकरा०, द्विवेदी, पर्वते—आचार्यांनुसारी आहेत. (ईश्वरास सर्व कर्में समर्पण कर म्हणजे तुझी बुद्धि स्थिर होईल. पहा संतवाक्यें, बायबल) पाप व पुण्य हीं दोन्हीं जन्ममरण देणारीं आहेत म्हणून यांचा त्याग केला पाहिजे. ब्रह्म व आत्मा एकच होत.

रामानुजा० ब्रह्म=प्रकृति. इंद्रियें हीं प्रकृतीचे परिणाम आहेत, तेव्हां सर्व कर्मे प्रकृतीचीं आहेत असें जो समजतो त्याला कर्मबंध प्राप्त होत नाहीं. येथें भक्तीचें रहस्यसर्वस्व सांगण्याचा प्रसंग असतां ब्रह्म म्हणजे प्रकृति असा अर्थ हे आचार्य कां करितात, न कळे!

द्वैतवादींचा अभिप्राय आचार्यांप्रमाणेंच आहे.

मराठी मंडळ कांहीं विशेष सांगत नाहीं.

सर्व कर्मे परमेश्वरास अर्पण करून निःसंग व्हावयाचें, सुख दुःखाची, फारतर काय, पण मोक्षाचीही आशा नष्ट करून टाकावयाची ही ब्रह्मभक्तियोगाची परमावधि होय.

वरील श्लोकावलींत कर्मसंन्यास व कर्मयोग या दोन पंथांमध्यें विरोध भासमान होतो तो वास्तविक नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे. 'मी कर्ता व मी भोक्ता' या दोन वृत्तींचा त्याग करून कर्म केलें म्हणजे तें कर्म संन्यासात्मकच होतें. सारांश निष्काम कर्मयोग म्हणजे कर्मसंन्यास होय. ह्या निष्काम कर्मयोगानें किंवा कर्मसंन्यासानें चित्त शुद्धि होते. पुढें ज्ञान, अनुग्रह अनुभव, मुक्ति इत्यादि पायऱ्या आहेत. एवंच संन्यास (सांख्य) आणि कर्म (योग) हे वस्तुतः एकच, यांचे फल एकच असें जो समजतो तो सुज्ञ होय; तसेंच अज्ञानी पुरुषाला कर्मयोगच योग्य आहे [पहा श्लोक २ व ६] आणि सकाम कर्म करितां करितांच निष्काम कर्माचा परिचय होऊन कर्मसंन्यास जितक्या सौकर्यानें साध्य होतो, तितका एकदम सर्व कर्मांचा त्याग केल्यानें होत नाहीं. निष्काम कर्मयोग्यांचें कर्म ३, ७, ८, ९, १० श्लोकांमध्यें सांगितलें आहे तें सर्वांनीं अवश्य वाचण्यासारखें आहे. ज्याची इच्छा नष्ट झाली, ज्याचा द्वेष दग्ध झाला, ज्याची बुद्धि अद्वैत झाली, म्हणजे ज्याचें चित्त शुद्ध झालें, देह पवित्र झाला, इंद्रियें पांक झालीं आणि हें भिन्न दिसणारें विश्व एकमय झालें, सारांश आत्मा कर्ता आहे व भोक्ता आहे हें अज्ञान नष्ट झालें, त्या पुरुषाकडून कर्तव्यबुद्धीनें होणारें सात्विक कर्म बद्धक होत नाहीं म्हणजे संसारांतील भेदबुद्धि वृद्धिंगत करणारें होत नाहीं; तर तें अद्वैत उत्पन्न करण्याकडे विनियुक्त होतें. कर्तव्य स्वरूपानें होणारें निष्काम कर्म परब्रह्मास समर्पण करून जो

वागतो त्याला अहंकाराचा म्हणजे पापपुण्याचा स्पर्श होत नाहीं. अहंकारशून्य व वासनाशून्य कर्मांचा महिमा द्वैतवाद्यांस कळणें प्रायशः कठिणच होय. परंतु जी निष्कामता कुटुंबव्यवहारांत दृग्गोचर होते, समाजांत कधीं काळीं व्यक्त होते हीच सर्वत्र प्रकट झाली, स्वार्थत्याग पूर्णत्वास येऊन भेदभाव उत्पन्न करणाऱ्या चित्तवृत्तींचा क्षय झाला, तर या मुमुक्षूंसही खरें ज्ञान होऊन नित्य निर्लेप, निर्विकारी सुखाचा अनुभव येथेंही येईल. ॥१०॥

केवलं सत्वशुद्धिमात्रफलमेव तस्य कर्मणः स्यात्, यस्मात्—

शिष्य—भगवन्? मग त्याची सर्व कर्में निष्फलच होतात कीं काय?

गुरु—नाहीं. अजून एक कार्य म्हणजे अहंकाराचा नाश व्हावयाचा आहे ना? असो; वासना नष्ट झालेल्या पुरुषाचा अहंकारही नष्ट झाला म्हणजे त्याची ईश्वरार्पित कर्मांनीं चित्त शुद्धि होते. अहंकार नष्ट होणें हें या कर्माचें फळ होय. कारण—

कायेन मनसा बुद्ध्या
केवलैरिन्द्रियैरपि ॥
योगिनः कर्म कुर्वन्ति
सङ्गं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ॥११॥

आत्मशुद्धये (अंतःकरणाच्या शुद्धतेसाठीं) **सङ्गं त्यक्त्वा** (सर्व प्रकारची आसक्ति सोडून देऊन) **योगिनः** (निष्काम कर्मयोगी) **कायेन मनसा बुद्ध्या केवलैः इन्द्रियैः अपि** (नुसत्या शरीरानें, नुसत्या मनानें व नुसत्या इंद्रियांनीं) **कर्म कुर्वन्ति** (कर्म करितात.) —सारांश चित्ताची शुद्धि खरोखर व्हावी एतदर्थ योगी लोक कर्मावरील आसक्ति, कर्मफलाचा अभिलाष सोडून देतात आणि जीं काय कर्में करितात, तीं केवळ शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें यांकडून जीं कर्में होतात, तेवढींच करितात. तात्पर्य शरीर, इंद्रियें इत्यादिकांस त्यांच्या आत्म्याचें साहाय्य नसतें. 'मी हें कर्म करित आहे,' मला

याचें फल मिळालें पाहिजे वगैरे कर्तृत्व-भोक्तृत्व-अभिमान व वासना नष्ट झाल्यामुळें त्यांची चित्तशुद्धि होते. कर्म होतें. तें अनात्मक शरीर इंद्रियादींकडून होतें. अर्थात् हाही एक प्रकारचा संन्यासच आहे.—

कायेन देहेन मनसा बुद्ध्या च केवलैर्ममत्ववर्जितैरीश्वरायैव कर्म करोमि मम न फलायेति ममत्वबुद्धिशून्यैरिन्द्रियैरपि, केवलशब्दः कायादिभिरपि प्रत्येकं संबध्यते सर्वव्यापारेषु ममतावर्जनाय, योगिनः कर्मिणः कर्म कुर्वन्ति सङ्गं फलविषयमात्मशुद्धये सत्त्वशुद्धय इत्यर्थः। तस्मात्तत्रैव तवाधिकार इति कुरु कर्मैव ॥ ११ ॥

'हें कर्म माझें आहे' असा ममत्वाचा अभिमान सोडून 'ईश्वरासाठीं मात्र माझ्या हातून कर्म होत आहे, मला त्या कर्माचें फल नको, ईश्वरासच तें असावें.' याप्रमाणें ममत्वाची वृत्ति विकारशून्य करून निष्काम कर्मयोगी नुसत्या शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें (अर्थात येथें हीं सर्व कर्मसाधनें ममत्वशून्य आहेत) यांच्या करवीं शास्त्रविहित कर्म करितो; अशा प्रकारें 'केवल' शब्द सर्वत्र घ्यावा. याप्रमाणें—

शिष्य—दयानिधे! नुसतें शरीर, नुसतें मन हें कांहीं मला समजलें नाहीं.

गुरु—पाय लंगडा असेल तर 'मी लंगडा आहें,' डोळे नसतील तर 'मी अंधळा आहें,' स्मरण शक्ति चांगली नसेल तर 'माझी स्मरणशक्ति चांगली नाहीं,' इत्यादि आरोप आपण आत्म्यावर करितोंना? आत्मा काय लंगडा असूं शकेल, कां अंधळा असेल, का अज्ञानी असेल? यांपैकीं कोणताही किंवा इतर कोणताही विकार आत्म्यास असणें शक्य नाहीं; असें असतांनाही वरील प्रकारचे आरोप आपण आत्म्यावर लादित असतों. आत्मा लंगडा नसतांही तो लंगडा आहे असें वाटणें हें आपलें अज्ञान होय. आतां व्यवहारांतही ज्ञानेंद्रियांकरवीं, कर्मेंद्रियांकरवीं, मन, बुद्धि वगैरेंकडून जीं कर्में होतात, तीं मी करितों असें अज्ञानी पुरुषांस वाटतें. समजलें? आतां 'मी कर्ता नाहीं' असा निश्चय होऊन सर्व कर्मांतून व

कर्म करण्याचीं देहादि साधनें यांतून मीपणा काढून घेतला म्हणजे तीं सर्व कर्मे व कर्मसाधनें ममताशून्य झालीं कीं नाहीं ? असो यांप्रमाणें ममत्व काढून घेऊन योगी लोक कर्मावरील आसक्ति टाकितात आणि आत्मशुद्धिसाठीं मात्र, आत्मस्वरूपाशीं कर्तृत्व, कर्मत्व, यांचा बिलकूल संबंध नाहीं हा निश्चय दृढ करण्यासाठीं मात्र, प्रथमतः, कर्म करितात. 'अर्जुना'! भगवान म्हणतात : 'तुझाही असलाच अधिकार आहे म्हणून चित्तशुद्धीसाठीं मात्र कर्म कर.

मधु०, प्रपा०, शंकरा०, श्रीधर, चतरजी, द्विवेदी, पर्वते आचार्यांचा अर्थ दृढ करितात. विषयसुखास मनुष्य लोभावला म्हणजे परमेश्वरी कृपेला आंचवतो आणि परमेश्वरी कृपेस तो पात्र झाला म्हणजे विषय-मोहांतून मुक्त होतो. [कॉरिंथिअन्स पहा.]

रामा०---प्राचीन कर्मामुळें आत्म्यास जो बंध झालेला असतो, त्याच्या नाशासाठीं योगीलोक संगशून्य कर्म करितात.

द्वैतवादी–असा निष्कर्ष काढितात कीं ८ ते ११ श्लोकांत संन्यास व कर्म यांचा संयोग अवश्य आहे, असें सांगितलें आहे! अज्ञानी मुमुक्षुसाठीं ही चर्चा चालली आहे हा मुख्य मुद्दा हे द्वैतवादी अजीबात विसरले!

ज्ञानेश्वरः--- केवळ शब्दाचा उपयोग दाखवितातः **देखें बुद्धीचा भाष (वार्ता) नेणिजे। मनाचा अंकूर नुदैजे। ऐसा व्यापार तो बोलिजे। शारीरगा॥** असो; केवळ देह, केवळ मन असें धरून या निवृत्तिदासांनीं केवळ शारीरिक, केवळ मानसिक, केवळ बुद्धियुक्त कर्मांची मीमांसा करण्यासाठीं या श्लोकाची फोड केली आहे. आचार्यांचा अर्थच सयुक्तिक दिसतो.

पंडित-- देहानें स्नानसंध्यादिक, मनानें भगवद्ध्यान, व अद्वयाची ज्ञानसिद्धि परमेश्वर प्रसादानें मात्र होईल असा बुद्धीनें निश्चय, अशीं सत्कर्में करून जे योगी.... **या वेगळी इंद्रियें ही करुनि। कर्मे करितीं ती केवळ म्हणुनि। इंद्रियास केवळ शब्द लावुनि। बोलेल या भावें॥ कीं रजोगुणाचीं इंद्रियें। तीं सहज वासना-**

मयें। त्यांत निष्काम भगवदर्पण निश्चयें। प्रवर्तती तीं केवळें ह्मणावीं ॥ सारांश वासनाशून्य इंद्रियें तीं केवळ होत. हा विचार मानसिक शास्त्रास मान्य होणार नाहीं.

गीताव्या०. भागवतांतील श्लोक देतात: **"दानं स्वधर्मो नियमो यमश्च श्रुतं च तीर्थानि च सद्व्रतानि। सर्वे मनोनिग्रहलक्षणान्ताः परो हि योगे मनसः समाधिः ॥** (दान, स्वधर्माचरण, यम नियम, वेदांतश्रवण तीर्थाटण, सद्व्रतें हीं सर्व मनोनिग्रहाचीं साधनें आहेत. मनाच्या समाधीचा योग या पलीकडचा आहे.)

रंगनाथ ज्ञानेश्वराचा अर्थ खोडून टाकतात.

इंग्रजी ग्रंथकारास 'केवळ' शब्दाचें देखील स्वारस्य समजलें नाहींसें दिसतें. ॥ ११ ॥

यस्माच्च—

शिवाय, ज्याअर्थी—

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा
शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ॥
अयुक्तः कामकारेण
फले सक्तो निबध्यते ॥ १२ ॥

कर्मफलं त्यक्त्वा युक्तः (कर्मफलाचा त्याग करून आत्मनिष्ठ पुरुष जो आहे तो) **नैष्ठिकीं शान्तिं आप्नोति** (ज्ञान निष्ठेनें प्राप्त होणाऱ्या शुद्ध शांतीचा लाभ करून घेतो.)–पण–**फले सक्तः** (फलावर इच्छा ठेवीत होत्साता). **अयुक्तः** (ज्यानें बुद्धि स्थिर केली नाहीं तो) **कामकारेण** (कोणत्या तरी इच्छेच्या योगानें प्रवृत्त झाल्यामुळें) **निबध्यते** (बांधला जातो, बद्ध होतो.)–सारांश आत्मनिष्ठ पुरुष कर्मफलाचा त्याग करून मोक्ष नामक शांति मिळवितो आणि ज्याची बुद्धि स्थिर झाली नाहीं व ज्याची कर्मफलावर आसक्ति कायम

आहे त्याला कोणत्या तरी इच्छेच्या योगानें कर्मप्रवृत्ति होते व तो संसारांत पडतो.–प्रथमतः कर्तृत्वाभिमान सारखाच असतो तथापि एक सर्व फलें ईश्वरास अर्पितो व दुसरा स्वतःकडे फलाचा विनियोग करितो, म्हणून पहिला मोक्षास पात्र होतो व दुसरा संसारमग्न होतो!—

युक्त ईश्वराय कर्माणि न मम फलायेत्येवं समाहितः सन्कर्मफलं त्यक्त्वा परित्यज्य शान्तिं मोक्षाख्यामाप्नोति नैष्ठिकीं निष्ठायां भवां सत्त्वशुद्धिज्ञानप्राप्तिसर्वकर्मसंन्यासज्ञाननिष्ठाक्रमेणेति वाक्यशेषः। यस्तु पुनरयुक्तोऽसमाहितः कामकारेण करणं कारः कामस्य कारः कामकारस्तेन कामकारेण कामप्रेरितयेत्यर्थः। मम फलायेदं करोमि कर्मेत्येवं फले सक्तो निबध्यतेऽतस्त्वं युक्तो भवेत्यर्थः ॥ १२

'सर्व कर्में म्हणून जीं काय मी करित आहें यांचें फल ईश्वरास असावें' असें समजून जो निष्काम बुद्धीनें व शांत चित्तानें कर्म करितो तो अर्थातच सर्व कर्मांचा त्याग करितो आणि आत्मचिंतनाच्या एकनिष्ठत्वानें जी शांति मिळावयाची ती प्राप्त करून घेतो, म्हणजे मुक्त होतो.

शिष्य—काय कर्मानें मनुष्य मुक्त होतो ?

गुरु—नव्हें; निष्काम कर्म केल्यानें चित्तशुद्धि प्राप्त करून घेऊन तो ज्ञानाला अधिकारी होतो, ईश्वरी प्रसादानें नित्य व अनित्य यांच्या विवेकाची ज्ञानप्राप्ति झाल्यावर तो कर्मसंन्यास साध्य करून घेतो, पुढें श्रवण, मनन, निदिध्यासानें ज्ञाननिष्ठ होतो आणि शेवटीं मुक्त होतो असा हा क्रम मुक्तीचा पंथ आहे. समजलास ? हाच वाक्याचा अर्थ आहे. परंतु ज्याचें चित्त स्थिर झालें नाहीं, ज्याचा अहंकार व वासना हीं कायम असल्यामुळें '**मला** अमुक फल **मिळालें** पाहिजे म्हणून मी हें कर्म करित आहें' अशा कोणत्या तरी बहिर्मुख इच्छेनें प्रेरित झाल्यामुळें जो कर्म करित राहतो व फलासक्त असतो तो संसारांत पडतो. कर्म करावें, देह प्राप्त करून घ्यावा, त्या देहांत

कर्म करावें, फिरून देह घ्यावा अशा चक्रांत तो सांपडतो. असला पुरुष या स्थितींत मुक्त होणें नाहीं. म्हणून तूं चित्त स्थिर करून निष्काम हो आणि निष्काम कर्म कर.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरा०, चतरजी, द्विवेदी, पर्वते आचार्यानुसारी आहेत. शंकरानंद असेंही म्हणतात कीं लाभालाभाविषयीं उदासीन राहून जो ईश्वरप्रीत्यर्थ कर्म करितो त्यास निष्कामकर्मानें उत्पन्न होणारी शांति मिळते. निर्मळ चित्तानें जर कर्में परमेश्वरास अर्पण केलीं तरच त्याची कृपा होते. ढोंग करणारा आपल्यास फसवितो, ईश्वरास फसवूं शकत नाहीं. ल्युक व माथ्यु यांचें 'शुभवर्तमान'

द्विवेदी--विवेक वैराग्य इत्यादि सत्वगुणांचा उदय होणें ती निष्ठा व ज्या पुरुषाला सत्वगुण पूर्ण साध्य झाले तो नैष्ठिक होय. पर्वते १० व्या श्लोकांतील योग येथें पुनः सांगितलें आहे असें म्हणतात.

रामानुज--युक्त=आत्मव्यतिरिक्त जीं फलें त्याविषयीं उदासीन. प्रकृतीचीं फलें प्रकृतीस अर्पण करावीं हा यांचा अर्थ आहेच.

द्वैतवादी--मोक्ष मिळविण्यास सर्वकाळीं ज्ञान व कर्म यांची अपेक्षा आहे असें म्हणतात.

ज्ञानेश्वरः—तरी आत्मयोगें आथिला (युक्त झाला)। कर्मफळाशीं विटला। तो घर रिघोनि वरिला। शांती जगीं (त्याच्या घरीं शांति देवी चालत येते.)॥ येर कर्मबंधें किरीटी!। अभिलाषाचिया गांठी (गाठीनें)। कळासला (बद्ध झाला) खुंटी। फळ भोगाच्या॥

पंडितांचें तात्पर्यः-ग्रंथ येथवरी आला। तेणें निर्णय इतका झाला। कीं कर्तृत्व नाहीं ज्ञानीयाला। स्वअकर्तृत्व कळलें जयासी॥ जयास नाहीं ज्ञान। त्यांत दोन प्रकारचें जन। जिज्ञासु एक ते जरी ज्ञानहीन। कर्में समर्पिती ईश्वरीं॥ जिज्ञासु ऐसे ते निष्काम। फलबंध पावति जे सकाम। परी दोघांसहीं अकर्तृत्व वर्म। ठाउकें नसें॥ अकर्तृत्व जाणती ते ज्ञानी।

ते वर्णिले दो प्रकारें करुनी । एक सर्वही ब्रह्म म्हणोनी । पाहती स्वकर्मासहित ॥ एक दर्शन श्रवणादि काळीं । इंद्रियें स्वविषयीं वर्तती ऐसे न्यहाळीं । कर्तृत्व आपणावरुनि टाळी । अकर्तृत्व पाही आपुलें ॥ ....आत्मा असेचि अकर्ता । जरी वाटला कर्ता । तरी कर्तृत्वाची वार्ता । नलगे तयासी ॥ आतां बुद्धीस अकर्तृत्व त्याचें कळे । तेव्हां अकर्तृत्व त्यास फळे । परी जों बुद्धि तन्मयत्वीं न वळे । तों तो ज्ञानी न म्हणवे अकर्ता॥ वळली तथापि त्या बुद्धिवांचूनी । कर्म न घडे इंद्रियवर्गेंचि करूनी। बुद्धीस अकर्तृत्व यास्तरूनी । लागलें तेव्हां कैसा अकर्ता ? ॥ ही शंका निवारण करण्यासाठीं पुढील श्लोक आहे. शंका उत्तम आहे सबब हा मोठा उतारा घेतला आहे.

अज्ञान्यांस कर्मयोगच श्रेयस्कर आहे' असा भावार्थ **रंगनाथ** करितात.

वल्लभ— भगवंताचा संतोष उत्पन्न करणारी शांती म्हणजे '**नैष्ठिकी शांति.**' ईश्वरास फलाचें अर्पण करणें हाच कर्मसंन्यास होय. 'कर्में करित असतांही मुक्तीचा मार्ग साध्य होतो तो कर्मफलें ईश्वरास अर्पण करून अहंकारासहीत वासनेचा त्याग केला असतां होतो, असें **गीताव्याख्याकार** म्हणतात. ॥ १२ ॥

यस्तु परमार्थदर्शी सः

परंतु ज्याला सम्यक्ज्ञान होऊन ब्रह्मसाक्षात्कार झाला आहे तो तर-

सर्वकर्माणि मनसा
संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ॥
नवद्वारे पुरे देही
नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्य (सर्व काम्य कर्मांचा मनानें त्याग करून) **नवद्वारे पुरे** (नऊ दरवाजे आहेत ज्या देह नामक नग-

रीला त्या नगरीमध्यें) **वशी** (देही, आत्मसंयमन करणारा आत्मनिष्ठ पुरुष) **न एव कुर्वन् न कारयन्** (कांहीएक न करितां व कांहीएक न करवितां) **सुखी आस्ते** (सुखामध्यें असतो)—सारांश सर्व काम्यकर्मांचा मनानें त्याग करून आत्मनिष्ठ व आत्मसंयमी पुरुष, नऊ दरवाजे आहेत ज्या देहाला त्या देह नामक नगरीमध्यें, सुखानें राहतो. तो स्वतः संकल्पपूर्वक कांहीं करित नाहीं किंवा दुसऱ्याकडूनही कांहीं करवीत नाहीं. तात्पर्य कर्तृत्व व भोक्तृत्व वृत्तींचा त्याग करून आत्मचिंतनामध्यें रममाण होत्साता तो पुरुष देहामध्येंही सुखरूप राहतो.—

सर्वाणि कर्माणि सर्वकर्माणि संन्यस्य परित्यज्य नित्यं नैमित्यिकं काम्यं प्रतिषिद्धं च सर्वकर्माणि तानि मनसा विवेक बुद्ध्या कर्मादावकर्मसंदर्शनेन संत्यज्येत्यर्थः । आस्ते तिष्ठति सुखं त्यक्तवानात्मनः कायचेष्टो निरायासः प्रसन्नचित्त आत्मनोऽन्यत्र निवृत्तिबाह्यसर्वप्रयोजन इति सुखमास्त इत्युच्यते । वशी जितेन्द्रिय इत्यर्थः । क्व कथमास्त इत्याह—नवद्वारे पुरे सप्त शीर्षण्यान्यात्मन उपलब्धिद्वाराण्यर्वाग्द्वे मूत्रपुरिषविसर्गा एतैर्द्वारैर्नवद्वारं पुरमुच्यते शरीरं पुरमिव पुरमात्मनैकस्वामिकं तदर्थप्रयोजनैश्चेन्द्रियमनोबुद्धिविषयैरनेकफलविज्ञानस्योत्पादकैः पौरैरिवाधिष्ठितं तस्मिन्नवद्वारे पुरे देही सर्वं कर्म संन्यस्याऽऽस्ते । किं विशेषणेन सर्वो हि देही संन्यस्य संन्यासी वा देह एवाऽऽस्ते, तत्रानर्थकं विशेषणमिति। उच्यते-यस्त्वज्ञो देही देहेन्द्रियसंघातमात्रात्मदर्शी स सर्वो गेहे भूमावासेन वाऽऽस इति मन्यते । न हि देहमात्रात्मदर्शिनो गेह इव देह आस इति प्रत्ययः संभवति। देहादिसंघातव्यतिरिक्तात्मदर्शिनस्तु देह आस इति प्रत्यय उपपद्यते । परकर्मणां च परस्मिन्नात्मन्यविद्ययाऽध्यारोपितानां विद्यया विवेकज्ञानेन मनसा संन्यास उपपद्यते । उत्पन्नविवेक-

ज्ञानस्य सर्वकर्मसंन्यासिनोऽपि गेह इव देह एव नवद्वारे पुरे आसनं प्रारब्धफलकर्मसंस्कारशेषानुवृत्त्या देहविशेषविज्ञानोत्पत्तेर्देह एवाऽऽस्त इत्यस्येवं विशेषणफले विद्वदविद्वत्प्रत्ययभेदोपक्षयत्वात्। यद्यपि कार्यकरणकर्माण्यविद्ययाऽऽत्मन्यध्यारोपितानि संन्यस्याऽऽस्त इत्युक्तं तथाऽप्यात्मसमवायि तु कर्तृत्वं कारयितृत्वं च स्यादित्याशङ्क्याऽऽह-नैव कुर्वन्स्वयं न कार्यकरणानि कारयन्क्रियासु प्रवर्तयन्। किं यत्तत्कर्तृत्वं कारयितृत्वं च देहिनः स्वात्मसमवायि सत्संन्यासान्न भवति यथा गच्छतो गतिर्गमनव्यापारपरित्यागे न स्यात्तद्वत्, किंवा स्वत एवाऽऽत्मनो नास्तीति। अत्रोच्यते नास्त्यात्मनः स्वतः कर्तृत्वं कारयितृत्वं च। उक्तं हि-'अविकार्योऽयमुच्यते' 'शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते' इति। "ध्यायतीव लेलायतीव इति च श्रुतेः ॥ १३ ॥

गुरु—समजलासना? योग्याचें कर्म कसें असतें तें?

शिष्य—भगवन्! सर्व कर्मफलांचा त्याग करून सर्वांनीं कर्म करावें असें आपण ठरविलें, तेव्हां '**कर्मसंन्यास** करा' असा वेदांताचा आग्रह आहे, तो फुकटच होय. कारण फलावर असक्ति न ठेवितां कर्म केलें म्हणजे इष्ट कार्य होतें व कर्मसंन्यास करण्याला अवकाशही राहत नाहीं.

गुरु—तूं चूकतोस. जो कर्मयोगी असेल त्यानें चित्तशुद्धि संपादन करण्यासाठीं कर्मफलत्याग करावा असें सांगितलें. पण ज्याला आत्मज्ञान झालें आहे, तो सर्व प्रकारचीं म्हणजे नित्य, नैमित्तिक, काम्य, प्रतिषिद्ध वगैरे **सर्व कर्मांचा** त्याग मनानें म्हणजे चवथ्या अध्यायाच्या १८व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें 'कर्म हेंही अकर्मच आहे' असें विचारानें जाणून, तो सर्व कर्मांचा त्याग करितो. सारांश तो कर्म करितो, पण कर्म करितांना, आधीं, किंवा नंतर 'आपण कर्म करित आहोंत' हें भान त्यास नसतें. याप्रमाणें वाणी, मन किंवा शरीर या सर्व कार्यकारी

साधनांच्या चेष्टा टाकून देऊन तो श्रमविरहित होत्साता प्रसन्न-मनानें राहतो.

शिष्य—प्रसन्न म्हणजे ?

गुरू—बाहेरील सर्व कार्यकारणांचा त्याग केल्यामुळें, अर्थात् सर्व सुख दुःख उत्पन्न करणाऱ्या उपाधींचा त्याग केल्यामुळें, त्याची आत्मवृत्ती स्वच्छ, निर्मळ आणि प्रसन्न अशी असते. तसेंच त्याच्या इंद्रियांसही बाह्यविषय नसतो, म्हणून तीं आत्मस्थितींतच लीन होतात, म्हणजे तीं सर्व ' अनावर ' इंद्रियें त्याच्या सर्वस्वी स्वाधीन असतात. हा असा ब्रह्म झालेला जीवन्मुक्त पुरुष राहतो तरी कोठें ? असें विचारशील तर सांगतातः या आत्मनिष्ठ पुरुषास कांहीं पूर्वार्जित कर्मामुळें जो देह प्राप्त होतो, त्या देहनामक नगरींत तो राहतो. या देह नगरीच्या मस्तक नामक बालेकिल्याला सात दरवाजे आहेत, त्या दरवाज्यांमधून बाह्यविषयांचा ज्ञानप्रकाश पडतो, सारांश या सात द्वारांनीं बाह्यविषयांचें ज्ञान होतें.

शिष्य—ही सप्त द्वारें कोणतीं ?

गुरु—अरे ! तुला ठाऊक नाहींत काय ? दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, व एक जिव्हा अशीं सात द्वारें आहेत. शिवाय मुत्रपुरीषोत्सर्ग करण्याची, मळ टाकण्याचीं, दोन द्वारें खालीं आहेत तीं निराळींच. याप्रमाणें नऊ दरवाजे झाले. या नवद्वारी देहनगरीचा स्वामी आत्मा आहे. तसेंच या नगरीमध्यें इंद्रियें मन, बुद्धि आणि विषय (विषयवासना ?) असे अनेक नागरिक राहतात. हे नागरिक आत्माराम नामक जो राजा, त्याच्या प्रीत्यर्थ आपआपलीं कामें यथास्थित करितात व अनेक प्रकारचें फलज्ञान उत्पन्न करून आत्मारामाची सेवा करण्यांत तत्पर राहतात. अशी ही रमणीय नगरी पूर्वोक्त नागरिकांनीं गजबजलेली आहे. हिचा स्वामी आत्मा आहे हें मागें सांगितलेंच. या नवद्वारी नगरीमध्यें आत्मनृपति सर्व कर्मांचा संन्यास करून सुखरूप राहतो.

शिष्य—सद्गुरो ! मग यांत विशेष तें काय ? प्रत्येक प्राणी, मग

तो संन्यासी असो वा नसो, देहामध्येंच वास करितो; मग संन्यासी या देहनगरींत राहतो" हें म्हणण्याचें स्वारस्य तें काय? हें विशेषण मला वाटतें उगीच, पादपूरणार्थ घातलें आहे!

गुरु—विद्वान टीकाकारच कीं नाहीं तूं! वेड्या! या विशेषणाचें हृद्गत तुला कळलें नाहीं अद्यापि. जो अज्ञानवश प्राणी असतो, म्हणजे देह, इंद्रियें मन, बुद्धि, अहंकार इत्यादि सर्व मिळून आत्मा आहे असें मानितो, देहेंद्रियांपलीकडे आत्मा आहे असें यथार्थ ज्ञान ज्यास झालें नाहीं, तो अज्ञ पुरुष (सर्व अज्ञ लोक असें येथें समजावयाचें) काय समजतो बरें? तो म्हणतो 'मी घरांत बसलों, भुईवर बसलों, आसनावर बसलों;' म्हणजे 'माझा देह, इंद्रियें, मन, बुद्धि ह्या रूपानें मी घरांत बसलों आहें.' यांच्या पलीकडे आत्मा म्हणून एक निराळें, स्वतंत्र व सर्वव्यापि तत्व आहे हें त्यास ठाऊक नसतें म्हणून घरांत बसल्याप्रमाणेंच आत्मा शरीरांत बसला आहे, शरीर हा आत्मा नव्हे, शरीरांत आत्मा बिऱ्हाड करून, अगर पाहुण्यासारखा चार दिवस राहतो, अशी त्याची, सामान्य पुरुषाची, कल्पना नसते. पण देहादिकांव्यतिरिक्त आत्मा आहे असें जाणणारा तत्ववेत्ता देह हें आत्म्याचें राहण्याचें मात्र ठिकाण आहे असें भानदृष्टींत मानितो. हें त्याचें मानणें हा त्याचा सिद्धांत, खरा आहे. तेव्हां देह म्हणजे आत्मा नव्हे असें मानणाऱ्या पंडितास हें तत्व समजलें असतें कीं देहेंद्रियांदिकांचीं कर्में आत्मारामावर निरर्थक लादलीं जातात हें केवळ अज्ञानाचें फळ आहे. असा विवेक त्यास आत्मविद्येच्या योगानें झाल्यावर तो सर्व कर्मांचा त्याग करितो हें सयुक्तिकच झालें; म्हणजे मी आत्मा आहें; आत्मा निष्क्रिय असतो, म्हणून मीही निष्क्रियच आहे.' असा त्याचा निश्चय होतो. आतां हा निश्चय झालेला असून सर्व कर्मांचा त्यानें विवेकबुद्धीनें संन्यास केलेला असला तरी देहनगरी हें घर आहे, असें समजून त्यास देहांत वास करावा लागतो, तो केवळ पूर्वकर्मांच्या संस्कारांचें फल, ह्या जन्मांत उत्पन्न होऊन तें सर्व, उपभुक्त झालेलें नसतें म्हणून हा देहवास त्याला प्राप्त झाला असतो. देहामध्यें मी राहत आहे हें विशेषज्ञान सुद्धां देहांतच असतें. म्हणून या विशेषणाच्या सामर्थ्यानें विद्वान कोण व अवि-

ह्नान कोण याचा निर्णय होत आहे. त्यांचें ज्ञान कसें भिन्न असतें हें येथें समजतें.

शिष्य—बरें. आतां असें विचारावयाचें: कार्य, कारण व कर्म यांचा आरोप आत्म्यावर अज्ञानामुळें केला जातो. म्हणून आत्मज्ञ सर्व कर्मांचा त्याग करितो हें जरी युक्त आहे, तथापि आत्म्यामध्येंच स्वभावतः कर्तृत्व व भोक्तृत्व सामर्थ्य असतेंच कीं नाहीं? आतां आपण म्हणाल कीं 'तो कांहीं करित नाहीं व करवित नाहीं' या शब्दांनीं कर्तृत्व भोक्तृत्वाचा निकाल झालाच आहे. पण मी असें विचारतों कीं हें कर्तृत्व भोक्तृत्व आत्म्यामध्यें स्वभावतः असूनही त्यांचा त्याग केल्यामुळें प्रगट होत नाहीं? किंवा आत्म्यामध्यें हें कर्तृत्व भोक्तृत्व सामर्थ्यच नाहीं? रामाला चालण्याचें सामर्थ्य असूनही त्यानें न चालण्याचा निश्चय केला आहे म्हणून तो चालत नाहीं किंवा त्याला पायच नाहींत?

गुरु—अरे! आत्म्याला करण्याचें अगर करविण्याचें सामर्थ्यच नाहीं. (पहा अ० २ श्लो० २९ व अ० १३ श्लो० ११) 'हा ध्यान करितोसा, हा हालतोसा दिसतो' असें श्रुतीही म्हणते.

मधु०—येथें शुद्धचित्त झालेल्या ब्रह्मज्ञ पुरुषाचा संन्यास साहजिक रीतीनें कसा होतो, हें सांगितलें आहे. 'सुखं:'=अनायासानें. 'वशी'= आत्मसंयमी. बाकी सर्व आचार्यांचेंच अनुकरण आहे. प्रपाकार, श्रीधर, म्हणतात: अहंकार नाहीं म्हणून ज्ञानी पुरुष कर्म करित नाहीं; चित्तांत मळ नाहीं म्हणून तो कर्म करवितही नाहीं. शंकरानंदांनीं या श्लोकाच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ व्याख्यान लिहिलें आहें; पण तें सर्व आचार्यांच्या भाष्यास अनुसरूनच आहे सबब येथें देत नाहीं. एकच गोष्ट सांगावयाची ती ही कीं "**नित्यनैमित्तिकैरेवं कुर्वाणो दुरितक्षयम्। ज्ञानं च विमलीकुर्वन्नभ्यासेन च वासयेत्। अभ्यासात्पक्वविज्ञानः कैवल्यं भजते नरः**" ॥ हा क्रममार्ग उत्तम आहे. (नित्य व नैमित्तिक कर्में निष्कामबुद्धीनें पूर्वींचीं केलीं असतां पापें व वर्तमानकालीन वासना व अहंकार, या सर्वांचा क्षय होतो पुढें ज्ञानयोग्यता प्राप्त होऊन गुरुप्रसादानें व ईश्वरानुग्रहानें नित्य वस्तूचें ज्ञान होतें.

चित्ताच्या दृढिकरणार्थ अभ्यास केल्यावर सर्व, अंतर्बाह्य, निष्कल, निष्क्रिय व शुद्ध, बुद्ध, नित्य व मुक्त असा आत्मा आहे असा साक्षात्कार होतो आणि मग तत्काल मुक्ति मिळते.) **पर्वते** म्हणतातः व्यवहारांत सुद्धां हा ज्ञानी पुरुष कांहीं करित नाहीं. **द्विवेदीः** या श्लोकांत **मानसिक** संन्यासाचें प्राधान्य वर्णिलें आहे. **चतरजीः**— ज्याला कर्माचें भान नाहीं, व जो सुखरूप असतो, तो वशी होय. मुक्त झाल्यावर तो देहत्याग करित नाहीं, कारण त्याग करणें हें कर्मच होईल! शिवाय तो देहनष्ट झाला तर जगत् निरात्मक व महापुरुष-शून्य होईल! (पहा रोम्स्स. जो आत्मज्ञ झाला, त्याला विषयबाधा होत नाहीं.)

रामानुजः—'आत्मस्वरूपाचे ठायीं कर्तृत्व नाहीं, केवळ पूर्वकर्मामुळें प्राप्त झालेल्या देहाचें हें कर्म आहे, असें जाणून हा ज्ञानी पुरुष सर्व कर्में देहाचें ठिकाणीं **अर्पण करितो;** आपण कांहीं एक न करितां देहाकडूनच कर्में करवून सुखरूप असतो.' 'संन्यस्य'=ठेवणें, हा अर्थ बराबर नाहीं. संन्यस्य=त्याग करून असाच अर्थ घेतला पाहिजे.

द्वैतवादीः–मनसा=आपण स्वतंत्र आहों या अभिमानाचा त्याग करून. सारांश ज्ञानीपुरुष कर्म करितो, पण तें ईश्वराकरवीं होत आहे, आपण निमित्त मात्र आहों, असें त्याचें अनुसंधान असतें.

ज्ञानेश्वर—म्हणतात कीं हा कर्म करितो, पण फळाचा त्याग करितो. **पंडित व गीताव्याख्याकारः**–सर्व कर्म, इंद्रियें, त्यांचे विषय व मन हीं आत्मस्वरूपाहून भिन्न आहेत, असा बुद्धीचा निश्चय करून ती बुद्धि जो अंतःकरणामध्यें व चित्तामध्यें लीन करून निरंतर आत्मध्यानतत्पर असतो तो ज्ञानी पुरुष होय. 'मनसा'=मनासह. नानें कर्माचा त्याग नव्हे तर मनासकट सर्व कर्मांचा त्याग असा ांचा अर्थ आहे. **वल्लभ**–भगवंताला जो वश तो वशी. **देह**=भगवंताच्यासाठीं देहाभिमान धरणारा. ॥ १३ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि

लोकस्य सृजति प्रभुः ॥

न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

प्रभुः (परमेश्वर; एकच ज्याचें स्वरूप आहे असें ब्रह्म) **लोकस्य** (प्राकृत लोकांचें) **न कर्तृत्वं सृजति, न कर्माणि सृजति** (कर्तृत्व म्हणजे कर्तृत्वाचा अभिमान व करावयाचें तें कर्तव्यकर्म हीं दोन्ही उत्पन्न करित नाहीं.)–तसेंच–**न कर्मफलसंयोगं** (केलेल्या कर्माचें फल कर्त्यास मिळावें हा योग, तोही आत्मारामाकडून उत्पन्न होत नाहीं.) **तु** (परंतु) **स्वभावः प्रवर्तते** (स्वभाव म्हणजे माया जी आहे, तिच्याकडून कर्तृत्व इत्यादि होत असतात.)-सारांश, नित्य, शुद्ध, निर्विकार असें जें आत्मतत्व आहे, तें कोणास ही कर्तृत्वाचा अभिमान उत्पन्न करित नाहीं, कर्म करण्यास सांगत नाहीं, किंवा कर्म केल्यानंतर सहज रीतीनें उत्पन्न होणारें जें फल तेंही मिळवून देत नाहीं. हा सर्व मायेचा खेळ आहे. कर्तृत्व, कर्मत्व आणि फलदातृत्व व भोक्तृत्व हीं सर्व मायेपासून उत्पन्न होतात,—

न कर्तृत्वमिति। न कर्तृत्वं स्वतः कुर्विति नापि कर्माणि रथघटप्रासादादीनीप्सिततमानि लोकस्य सृजत्युत्पादयति प्रभुरात्मा नापि रथादि कृतवतस्तत्फलेन संयोगं न कर्मफलसंयोगम्। यदि किंचिदपि स्वतो न करोति न कारयति च देही कस्तर्हि कुर्वन्कारयंश्च प्रवर्तत इत्युच्यते स्वभावस्तु स्वो भावः स्वभावोऽविद्यालक्षणा प्रकृतिर्माया प्रवर्तते दैवी हीत्यादिना वक्ष्यमाणा ॥ १४ ॥

शिष्य—भगवन्! हें सर्व कर्म जर आत्म्यापासून उत्पन्न होतें, कर्तुं, अकर्तुं, अन्यथा कर्तुं हें सामर्थ्य परमेश्वरास मात्र आहे असें जर आपण म्हणतों, तर आत्मज्ञानी पुरुष करित नाहीं, करवित नाहीं, भोगित नाहीं, असें म्हणण्याचें स्वारस्य काय आहे, हें मला समजत नाहीं.

गुरु—बालका! अरे! स्वतः निष्क्रिय आणि पूर्ण असणारा

जो आत्मा आहे तो रे! या भानगडींत कशाला पडेल? 'अमुक एक गोष्ट कर' असें सांगून कर्तृत्वाचा अभिमान उत्पन्न करणें हें आत्मा करित नाहीं, किंवा सामान्य लोकांस इष्ट वाटणाऱ्या गोष्टी म्हणजे रथ, घागरी, (भांडीं वगैरे), घरें इत्यादि ज्या वस्तु आहेत, त्याही आत्मा उत्पन्न करित नाहीं, म्हणजे भोग्य वस्तु ही आत्मारामाकडून उत्पन्न होत नाहींत, सारांश त्याच्या हातून कर्म होत नाहीं. ह्याच प्रमाणें जें काय गाड्या करणें वगैरे कर्म होत असतें त्याच्या कर्त्याचा व त्या त्या कर्माच्या फलाचा संयोग करणें, फलोपभोग घेणें, हेंही पण आत्म्याकडे नाहीं. सारांश कर्तृत्व, त्याचा अभिमान, कर्म व कर्मफलाचा उपभोग यांपैकीं कोणत्याही वस्तूचा आत्म्यास गंध लागत नाहीं.

शिष्य—असा जर आत्मा अकर्ता, अभोक्ता, अनादि, अनंत आहे, तर या विश्वांत जी एवढी थोरली अवाढव्य घडामोड चाललेली आहे व सुखदुःखांच्या राशीच्याराशी नित्य उत्पन्न होत आहेत, या सर्वांचा कर्ता, करविता तरी कोण आहे? देहामध्यें वास करणारा जो सर्वगामी आत्मा तो जर हें कांहीं करित नाहीं, तर मग हें काय सर्व स्वयंसिद्ध चाललेलें आहे? असें असेल तर वेदांती, आत्मज्ञानी, हे उत्तम प्रकारचे नास्तिक बनले म्हणावयाचे!

गुरु—हा खुळ्या! ही जी घडामोड तुला दिसते आहे व सुखदुःखाचा अनुभव येतोसा वाटतो आहे, तें सर्व जर खरें असेल तर कर्ता, करविता वगैरे गोष्टींचा खल करावयाचा नव्हे काय? आत्मस्वरूपामध्यें जर मुळींच हालचाल नाहीं, तें जर स्वतःच पूर्ण आहे, तर ह्या दृश्य विश्वाची, मिथ्या असणाऱ्या व्यवहाराची पंचाईत ज्ञानी पुरुष, आत्मा, कशाला करील? असो तेव्हां ही जी घडामोड तुला दिसते आहे, ही सर्व मायेच्या खेळाची लटपट आहे. परमेश्वरावर या सर्व घडामोडीचा आपण आरोप मात्र करितो. अहंकार व वासना हीं जीं अज्ञानाचीं लक्षणें आहेत, त्यांच्यायोगानें, सारांश अज्ञानकृत भ्रांतीमुळें, हा व्यवहार उत्पन्न झाला आहे. हा भ्रांतिकृत चमत्कार आहे. ह्या मायेच्या अघटित

घटनास्वरूपाचें वर्णन आपण सातव्या अध्यायांत वाचूं. समजलास ? आतां अहंकार व वासना उत्पन्न झाल्यामुळें व्यवहार उत्पन्न झाला व त्या व्यवहाराचा साक्षी व नियामक मात्र असणारा परमेश्वरही अहंकार व वासना या जोडीबरोबर उत्पन्न झाला आहे व परमार्थ म्हणजे निष्क्रिय होऊन ज्ञान संपादन करण्याचा जो मार्ग आहे, तो या सर्वज्ञ परमेश्वराच्या अनुग्रहानें मात्र एकनिष्ठ भक्तांस साध्य होतो, असें जाणते वेदांती म्हणतात. तेव्हां त्यांच्यावर नास्तिक वादाचा आरोप करणें म्हणजे उजेडावर अंधेर उत्पन्न करण्याचा आरोप करण्यासारखेंच मिथ्या होय.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकर, पर्वते, द्विवेदी, चतरजी, रंगनाथः— आचार्यवादी आहेत. संन्यास घेतल्यावर तर कर्म होतच नाहीं. "**समानः सन्नात्मा लोकाननुसंचरति ध्यायतीव लेलायतीव**' (ध्यान इत्यादि करतोसा दिसणारा आत्मा समबुद्धि असून सर्वत्र संचार करितो अथवा सर्वत्र भरलेला असतो.) **पर्वतेः** 'प्रभु' = सर्वप्रकाशक. लोक=सर्व विषय. सूर्यप्रकाशांत जसे सर्व पदार्थ आपआपलें व्यवहार करण्यास प्रवृत्त होतात, पण आपण सूर्यावर त्यांचे कर्मांचा आरोप करित नाहीं, तद्वतच आत्मसत्तेमुळें व्यवहार करणारी जी प्रकृति तिच्या कर्माची मीमांसा होय. 'स्वभाव' = दैवी माया, असें **चतरजी** म्हणतात. 'ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार परमेश्वरसाक्षीरूपानें (परमेश्वर साक्षी-मात्र राहून) जो तो कर्म करित असतो.' असें **गोस्वामी** म्हणतात. **गीताव्याख्याकारांचा** हाच अभिप्राय आहे.

रामानुजः—प्रभु अकर्म आहे. प्रकृतीमुळें, पूर्वसंचित पापपुण्यानुसार, कर्म होतें.

द्वैतवादीः—प्रभु म्हणजे जीव स्वतः कांहीं करित नाहीं, करवित नाहीं, भोग घेत अगर घेववीत नाहीं; तर स्वभाव म्हणजे स्वतंत्र ईश्वर जीवास कर्म करावयास व भोग भोगावयास लावितो.'! अर्थात् जीव परतंत्र म्हणजे ईश्वराधीन आहे असें ज्ञान ज्यास होतें तो ज्ञानी होय असा द्वैतमताचा कटाक्ष आहे. ईश्वर आणि जीव निराळे

आहेत, असें म्हणणाऱ्यांच्या दृष्टीनें वरील अर्थ सयुक्तिक असेल, पण सिद्धांतमतास हा अर्थ असंमत होतो.

ज्ञानेश्वरः—जैसा का सर्वेश्वर । पाहिजे तंव (पहावा तर) निर्व्यापार । परि तोचि रची विस्तार । त्रिभुवनाचा ॥ आणि कर्ता ऐसें म्हणिपे । तरी कवणें कर्मी न शिंपे । .... ॥....॥जगाच्या जीवीं आहे । परी कवणाचा कहीं नोहे । जगचि होय जाय । तो शुद्धी ही नेणे ॥

पंडितांनीं नास्तिक वादाचें उत्तम खंडन केलें आहे.

टामसनसाहेब हे मानवी स्वातंत्र्याचा प्रश्न काढितात, त्याचा विचार मागें केलाच आहे. स्वभाव = सत्वादिगुणात्मक प्रकृति असे डेव्हिस म्हणतात, तेंही वावगें नाहीं.

परमार्थतस्तु—

वस्तुतःच जर पाहिलें तर—

नाऽऽदत्ते कस्यचित्पापं
न चैव सुकृतं विभुः ॥
अज्ञानेनाऽऽवृतं ज्ञानं
तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ १५ ॥

विभुः (सर्वगामी ब्रह्म) कस्यचित् पापं न आदत्ते (कोणत्याही पुरुषाच्या पापाचा स्वीकार करित नाहीं.) सुकृतं न च एव (आणि कोणाच्याही पुण्याचा, सत्कर्माचा, अंगीकार करित नाहीं.) अज्ञानेन ज्ञानं आवृतं (अज्ञानाच्या योगानें ज्ञानावर मोठें थोरलें झांकण उत्पन्न झालें आहे) तेन (म्हणून) जन्तवः मुह्यन्ति (प्राण्यांस मोह उत्पन्न होतो.)–सारांश परब्रह्माला कोणाच्याही पापाचा किंवा पुण्याचा गंध सुद्धां लागत नाहीं. केवळ ज्ञानरूप वस्तु काय आहे हें पूर्वकर्मानें प्राप्त झालेल्या देहप्रारब्धानें, सारांश

अज्ञानानें, आपल्यास समजेनासें झालें आहे, अज्ञानामुळें ज्ञान लोपून गेलें आहे म्हणून प्राण्यास 'मी पुण्य करितों,' 'मी सुख भोगितों,' 'मी म्हणजे माझा आत्मा कर्म करितो व सुख दुःख भोगितो' असा मोह उत्पन्न होतो. वस्तुतः आत्मा कांहीं करित नाहीं व भोगीतही नाहीं.

नाऽऽदत्ते न च गृह्णाति भक्तस्यापि कस्यचित्पापं न चैवाऽऽदत्ते सुकृतं भक्तैः प्रयुक्तं विभुः । किमर्थं तर्हि भक्तैः पूजादिलक्षणं यागदानहोमादिकं च सुकृतं प्रयुज्यत इत्याह-- अज्ञानेनाऽऽवृतं ज्ञानं विवेकविज्ञानं तेन मुह्यन्ति करोमि कारयामि भोक्ष्ये भोजयामीत्येवं मोहं गच्छन्त्यविवेकिनः संसारिणो जन्तवः ॥ १५ ॥

शिष्य--महाराज! सर्वगामी परब्रह्म किंवा त्याचें उत्कृष्ट प्रतिबिंब जो विश्वगामी परमेश्वर हा वस्तुतः कांहीं करित नाहीं, तो अविक्रिय आहे असेंही आपण म्हणतां व अनुग्रह करण्यास व अनुशासन करण्यास तोच समर्थ आहे असें आपणच सांगतां तेव्हां येथें आमच्यासारख्यांनीं समजावें तरी काय? येथें माझी मति तर गुंग होऊन गेली!

गुरु---ठीकच आहे. कर्तृत्व, भोक्तृत्व, इत्यादिकांचा तुझा अभिमान अद्यापि जिवंत आहे म्हणून तूं गुंगलास! बाबा! परब्रह्म किंवा परमेश्वर ह्यापैकीं कोणीही-हीं दोन्हीं वस्तुतः एकच आहेत. फक्त तुझ्या समजुतीसाठीं द्वैताची भाषा योजिली आहे.-कोणीही आपल्या अगदीं निःसीम भक्तांनीं केलेल्या पापपुण्याचे किंवा सुखदुःखाचे विभागी होत नाहीं; पापपुण्याचा किंवा सुखदुःखांचा संस्पर्शच त्यांस होत नाहीं. ज्यानें कर्म केलें असेल म्हणजे 'मीं कर्म केलें' असा अभिमान ज्यास असेल, तोच अज्ञानी पुरुष सुखदुःखाचा मालक असतो.

शिष्य---तर मग यज्ञयाग, दान, होमहवन, पूजा, उपासना वगैरे सत्कर्मे करण्याची तरी काय गरज? ईश्वराचा अनुग्रह होईल व आपल्या दुःखाचा उपशम होईल म्हणून तर पूजाअर्चा, भजन, कीर्तन वगैरे

करावयाचें. त्याचा जर कांहींच उपयोग नाहीं तर हा सगळा खटाटोप तरी कशाला ?

गुरु——हेंच तर अज्ञान आहे व हेंच सर्वत्र मिरवत आहे! ' मी कर्ता, मी करविता, मी भोक्ता, मी भोगविता ' अशा प्रकारचा अभिमान व ' मला सुख मिळेल, माझें दुःख कमी होईल ' ही वासना, यांच्या योगानें तर ज्ञानाचा उजेड मालवून गेला आहे. **' मला सुख मिळावें म्हणून मी सत्कर्म करितों '** हा वासनायुक्त अहंकार जवळ ठेवून जें कर्म अज्ञानी पुरुष करितो, तें सर्व सकाम कर्म होतें. त्यापासून पुरुषार्थ मिळवून देणारें ज्ञान तर उत्पन्न होत नाहींच, पण उलट जन्ममृत्युरूपी संसार मात्र गळ्यांत पडतो ! सारांश अज्ञानानें केलेल्या सत्कृत्याचा अगर दुष्कृत्याचा वांटा परमेश्वरही घेत नाहीं व पूर्णकाम आणि निर्विकारी परब्रह्मास तर त्याची खबरही नसते. हें कर्म ज्याच्या अज्ञानामुळें उत्पन्न होतें, तोच अज्ञानी पुरुष ' आपण केलेल्या कर्मांचें फळ भोगीत आहों ' असें मानितों. वस्तुतः परब्रह्मास, आत्म्यास कांहींच संबंध नसतो, अज्ञानी पुरुष मात्र देहेंद्रियांस होणारें सुखदुःख आत्म्यासच होत आहे असें मानितो. समजलास ? सकाम व साभिमान लौकिक व वैदिक कर्म होत आहे तोंवर विश्वनियमानें प्राप्त होणारें सुखदुःख भोगिलेंच पाहिजे. हेंच कर्म निष्काम होऊं लागलें म्हणजे गुरूच्या व परमेश्वराच्या अनुग्रहानें वस्तुज्ञान उत्पन्न होतें व पुढें अज्ञानजन्य कर्म संपतें. हाच संन्यास होय. पूजा वगैरे निष्काम बुद्धीनें केली तर चित्तशुद्धि होण्याचा लाभ होतो, अभिमान नष्ट होतो, वासना अस्तंगत होते, आणि पुढें ज्ञानप्राप्ति होते अथवा परब्रह्म स्वरूपप्राप्त होऊन सायुज्यमुक्ति मिळते.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरा०, पर्वते, द्विवेदी, चतरजी, रामानुज, ज्ञानेश्वर, रंगनाथ, वामन—**' एष एव साधु कर्म कारयति '** (हा आत्माच सत्कर्म करवितो) अशा श्रुति केवळ अज्ञानी आणि वास्तविक स्वरूपाचें मिथ्याज्ञान असणाऱ्या लोकांसाठीं आहेत. श्रीधर, गीताव्याख्याकार, वामन इत्यादि—' ज्ञान '=ईश्वर समस्वरूपी आहे हा सिद्धांत. दंड हा निग्रहरूपानें अनुग्रहच आहे हें या स्वामींचें वाक्य

व सुधारणा करण्यासाठीं शिक्षा द्यावयाची हा या शतकांतील बेंथम-प्रणीत सिद्धांत हे किती जवळ जवळ आहेत हें चाणाक्ष वाचकांस सांगावयास संकोच. शंकरानंदः—ईश्वरार्पित कर्मानें चित्तशुद्धि होते. पर्वते यांचें व्याख्यान वाचण्यासारखें आहे.

द्विवेदी—पापपुण्याचा भाग जीवाकडे स्वतंत्रतेनें येत नाहीं. प्रकृतीचें कर्म आत्म्यास बद्धक होत नाहीं, असें गोस्वामी म्हणतात.

वल्लभः—ईश्वर स्वेच्छेनें मात्र फलदानसमर्थ आहेः जगाचे नियम त्याला लागू नाहींत. (मिल्टनकृत सॉम्सन पहा.) विभुः = अनियम्य जो परमेश्वर तो. ॥ १५ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ॥

तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

तु (पण) **आत्मनः ज्ञानेन** (आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें) **येषां तत् अज्ञानं नाशितं** (ज्यांचें अभिमानजन्य व वासनाजन्य अज्ञान नष्ट झालें आहे) **तेषां** (त्या आत्मज्ञानी पुरुषाचें, पुरुषांस) **आदित्यवत् तत् ज्ञानं** (सूर्याप्रमाणें तेजःपुंज असणारें आत्मज्ञान) **परम्** (तें अत्यंत श्रेष्ठ जें परब्रह्म) **प्रकाशयति** (प्रकाशित होतें).–सारांश आत्मज्ञानाचा परिचय झाल्यामुळें ज्यांच्या मनांतील अज्ञानजन्य तम नाहींसें झालें, त्यांस भास्कराप्रमाणें दैदीप्यमान असें जें आत्मज्ञान तें, वरील आत्मज्ञ पुरुषांस परब्रह्माचें दर्शन देतें; या ज्ञानानें परब्रह्मावर उजेड पडून आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. हें ज्ञान म्हणजेच परब्रह्मज्ञान होय.–

ज्ञानेनेति । ज्ञानेन तु येनाज्ञानेनाऽऽवृता मुह्यन्ति जन्तवस्तदज्ञानं येषां जन्तूनां विवेकज्ञानेनाऽऽत्मविषयेण नाशितमात्मनो भवति तेषामादित्यवद्यथाऽऽदित्यः समस्तं रूपजातमवभासयति तद्वज्ज्ञानं ज्ञेयं वस्तु सर्वं प्रकाशयति तत्परं परमार्थतत्त्वम् ॥ १६ ॥

शिष्य—भगवन्! असें जर आहे म्हणजे सर्व विश्वच जर अज्ञानरूपी अंधकारानें गच्च भरून गेलें आहे तर मुक्तीच्या वार्ता तरी आपण कशाला बोलाव्या! सर्वत्र जन्ममरणरूपी चक्रांत सांपडलेलें हें विश्व व त्या विश्वांतील प्राणी कण्हत आहेत म्हणावयाचें!

गुरू—नाहीं. अनेक भाविक व निष्काम लोकांस गुरूच्या प्रसादानें व ईश्वरानुग्रहानें आत्मस्वरूपाचें विवेकदृष्टीनें ज्ञान होऊन श्रवणमननादिकांनीं त्यांचे ज्ञानचक्षू उघडतात. हे उघडल्यावर अर्थातच सर्व विश्वास मोह पाडणाऱ्या मायेनें उत्पन्न केलेल्या अज्ञानांधकाराचा नाश होतो. आत्मज्ञानाचा प्रकाश सूर्याप्रमाणेंच तेजस्वी आहे. सूर्य जसा सर्वपदार्थांवर व स्वतःवरही उजेड पाडून ते सर्वच दृश्य करितो, तद्वतच आत्मज्ञान हें अत्यंत श्रेष्ठ असें जें अखंड आनंदमय परब्रह्मस्वरूप, तें प्रकट करितें. सारांश वेदांताच्या एकनिष्ठ अभ्यासानें प्राप्त झालेल्या आत्मज्ञानास गुरूकृपेची व परमेश्वराच्या अनुकंपेची भर पडली तर लवकरच साक्षात्कार होतो म्हणजे मुक्ति मिळतें.

मधु० व द्विवेदी—अज्ञान ही वस्तु **आहे,** तथापि नाशवंत वस्तु आहे, असा वाद उत्पन्न करितात. बृहदारण्यकांतील **यो देवानां प्रत्यबुध्यत** इत्यादि श्रुति घेऊन अज्ञान ह्मणजे ज्ञानशून्यता नव्हे, तर कांहीं अनिर्वचनीय वस्तु आहे तिचा नाश कर्तव्य आहे. जो पुरुष या अज्ञानाचा नाश करितो **तो मात्र मुक्त होतो.** रंगनाथः **जयास होईल आत्मविषयकज्ञानें। तयाचें अज्ञान नाशत ॥** प्रपा० ज्याप्रमाणें सूर्यकिरण मेघांचें स्वरूप घेऊन सूर्यास आच्छादितात, परंतु सूर्यानें केलेल्या दिवसाचें दिवसत्व नाहींसें करण्याचें सामर्थ्य त्यांस नसतें, तद्वत् आत्मविषयाचें अज्ञान आत्म्यावर झांकण टाकितें, पण प्रत्येक जीवाच्या ठायीं जो सत् चित् सुख यांचा अनुभव आहे, तो या अज्ञानानें नाहींसा होत नाहीं. सारांश कितीही अज्ञानी पुरुष असला तरी त्यास आत्मस्वरूपाचें भान अगदीं नसतें असें होत नाहीं. आणि असें आहे म्हणूनच ज्ञानानें मुक्ति मिळण्याचा संभव आहे. या अर्थाच्या समर्थनार्थ ईशावास्याचा पहिला मंत्र देतात. **श्रीधर, पर्वते, चतरजी, गोस्वामी,** आचार्यवादी आहेत. **शंकरानंदहीं** आचार्यवादीच

आहेत. ज्ञान व अज्ञान हे दोन्ही बुद्धीचे ठिकाणीं असणारे धर्म आहेत. बहिर्मुख बुद्धि असली म्हणजे अज्ञान प्रबळ असतें; अंतर्निष्ठ असली म्हणजे ज्ञान प्रबळ होऊन अज्ञानाचा नाश करितें.

वल्लभ—जसा सूर्य स्वतःस प्रकट करून सर्वांस प्रकाशित करतो तद्वत ज्ञान हें स्वतःस प्रकट करून सर्व जगास ज्ञानस्वरूप करितें.

रामा०—'तेषां' असें अनेकवचनी पद आहे म्हणून भगवंतांच्या मतें पुष्कळ आत्मे आहेत असें सिद्ध करण्याची खटपट करितात. यास उत्तर येवढेंच कीं ' आत्मवस्तु **एकच** आहे; हें **एकाचें अस्तित्व** ज्ञान ज्या जीवास नाहीं, त्या जीवांचे ठायीं अज्ञानानें भेदभाव उत्पन्न होतो. जसजसें ज्ञान वाढत जातें तसतसा भेदभाव नष्ट होतो हा अनुभव आहे; आणि पूर्ण ज्ञान झाल्यावर हा भेद सर्वतः अस्तंगत होतो. 'तेषां = त्या जीवांस, भेदबुद्धि असणाऱ्या जीवांस' हाच अर्थ इष्ट आहे.

द्वैतवादीः—स्वरूपज्ञान व वृत्तिरूप ज्ञान असे ज्ञानाचे दोन भेद करून असें म्हणतात कीं स्वरूपज्ञान अज्ञानानें झांकलेलें असतें; पण वृत्तिज्ञानानें परमेश्वरज्ञान होऊन तें परमेश्वरज्ञान अज्ञानाचा नाश करितें.

ज्ञानेश्वरः—**ऐसेंनि विवेकें उदो** (उदय) **चित्तीं । तयासि भेद कैचा त्रिजगतीं ? । देखे आपुलिया प्रतीती । जगाचि मुक्त ॥ जैसी पूर्व दिशेच्या राऊळीं । उदया येतांचि सूर्य दिवाळी । कीं येरी ही दिशा तियेचि काळीं । काळिमा नाहीं ॥** यावरच द्विवेदींचा कटाक्ष आहे. पंडितांनीं सूर्यदृष्टांतावर व्याख्यान लिहून हा मथितार्थ काढिला आहे कीं **स्वप्रकाश वस्तु साची, ते खोटी । जे प्रकाशे त्या स्वप्रकाशें ॥** म्हणजे परब्रह्मज्ञान असें करितें कीं प्रपंच हा मिथ्या आहे असें प्रकाशित करितें. स्वरूपज्ञान व वृत्तिज्ञान यांचा यांनींही अवतार केला आहे ॥ १६ ॥

तत्परं ज्ञानं प्रकाशितम्——

ज्याच्या संबंधानें श्रेष्ठज्ञान प्रकाशित झालें आहे तें-

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः॥
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः॥१७॥

तद्बुद्धयः, तदात्मानः, तन्निष्ठाः, तत्परायणाः (त्या परब्रह्मामध्येंच ज्यांची बुद्धि सर्वथैव रममाण झाली, तेंच परब्रह्म आपलाही आत्मा आहे, असा ज्यांचा निश्चय झाला, इतर सर्व व्यापार सोडून त्या परब्रह्माचे ठिकाणींच ज्यांची निष्ठा दृढ झाली, आणि परब्रह्म हाच आपला पुरुषार्थ आहे, असा ज्यांचा कृतसंकल्प झाला ते लोक) **ज्ञाननिर्धूतकल्मषाः** (आत्मज्ञानामुळें पार धुवून गेलीं आहेत पातकें व पातकवासना असे होत्साते) **पुनरावृत्तिं न गच्छन्ति** (जाण्यायेण्याच्या, पुनः परत येण्याच्या, सारांश जन्ममरणाच्या, यातायातीमध्यें शिरत नाहींत. ते मुक्त होतात. त्यांना पुनः जन्ममरण येत नाहीं. आत्मज्ञानांत रत होऊन आत्मस्वरूपी झालेले व तेथेंच समाधि लावून आत्मसाक्षात्कार करून घेणारे लोकांची पाप अगर पुण्य यांची वासनाच नष्ट झाल्यामुळें हे आत्मनिष्ठ पुरुष जन्ममरणाच्या झपाट्यांत सांपडत नाहींत.--

तस्मिन्गता बुद्धिर्येषां ते तद्बुद्धयस्तदात्मानस्तदेव परं ब्रह्माऽऽत्मा येषां ते तदात्मानस्तान्निष्ठा निष्ठाऽभिनिवेशस्तात्पर्यं सर्वाणि कर्माणि संन्यस्य ब्रह्मण्येवावस्थानं येषां ते तन्निष्ठास्तत्परायणाश्च तदेव परमयनं परा गतिर्येषां भवति ते तत्परायणाः केवलात्मरतय इत्यर्थः । येषां ज्ञानेन नाशितमात्मनोऽज्ञानं ते गच्छन्त्येवंविधा अपुनरावृत्तिमपुनर्देहसंबन्धं ज्ञाननिर्धूतकल्मषा यथोक्तेन ज्ञानेन निर्धूतो नाशितः कल्मषः पापादिसंसारकारणदोषो येषां ते ज्ञाननिर्धूतकल्मषा यतय इत्यर्थः ॥ १७ ॥

गुरु---वत्सा ! सर्व बाह्य विषयांचा त्याग करून श्रवण, मनन, निदिध्यास इत्यादिकांच्या योगानें ज्यांची बुद्धि आत्मस्वरूपामध्येंच रत झाली आणि--

शिष्य---म्हणजे परब्रह्म हें तत्व निराळें आहे असें ज्यांनीं जाणिलें; होय ना ? महाराज ! येथें आलेंच द्वैत शेवटीं !

गुरु---कोण उतावळा स्वभाव तुझा हा ! पुढचें विशेषण तर पहाः ज्यांचा असा स्वानुभवानें निश्चय झाला आहे कीं परब्रह्म म्हणजे

आपलाच आत्मा व आत्मा म्हणजे परब्रह्म, असा अद्वैतपर ज्यांचा सिद्धांत झाला, सर्व कर्मांचा त्याग करून परब्रह्म स्वरूपामध्यें सुखरूप राहून 'आपण सुखरूप आहोंत' हेंही ज्यांचें भान नष्ट झालें, सारांश जे परब्रह्मच झाले, स्वस्वरूपाप्रत जाऊन मिळाले, व ह्या स्वरूपामध्यें तादात्म्य पावणें हाच ज्यांचा अत्यंत श्रेष्ठ असा पुरुषार्थ आहे, सारांश आत्मस्वरूप प्राप्त व्हावें म्हणून जे आत्मस्वरूपीं रत होऊन तादात्म्य पावतात, दुसरें कांहीं मिळविण्याचें उद्देशानें नव्हें, तर परमात्मस्वरूप प्राप्त व्हावें म्हणून जे परब्रह्माशीं तन्मय होऊन जातात, सारांश ज्यांचें सर्व अज्ञान आत्मरूपी विज्ञानानें नाहींसें करून टाकिलें आहे, अशा प्रकारचे आत्मनिष्ठ, आत्मस्वरूपी, ज्ञानी पुरुष जन्ममरणात्मक जो देह त्याप्रत पुनः पावत नाहींत. ते मुक्तच होतात. कारण नित्य, शुद्ध, मुक्त, बुद्ध अशा आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यामुळें, ते लोक आत्मस्वरूपीच झाल्यामुळें, पापपुण्यात्मक जो जो संसार व पापपुण्यात्मक जें कर्म, तसेंच कर्तृत्वाचा अभिमान आणि फलाची वासना हीं चटसारीं जळून खाक होतात. सारांश ते खरे संन्यासी आणि जीवन्मुक्तच असतात.

प्रपाकार, श्रीधर व वल्लभ व गोस्वामी व गीताव्याख्याकारः—तत् = ईश्वर असें समजून ईश्वरपरच सर्व श्लोक लावितात. आत्मा=प्रयत्न.

मधु०, पर्वते, द्विवेदी—साक्षात्कार झाला म्हणजे आत्मव्यतिरिक्त सर्व भावना नष्ट होतात, या भावना नष्ट झाल्या म्हणजे कर्मसंन्यास होतो व आत्मस्वरूपीं लय लागतो आणि नंतर पूर्ण वैराग्य बाणून मुक्ति मिळते. शंकरानंदस्वामी आचार्यानुगामी आहेत. द्विवेदीः— 'तद्बुद्धि' = निर्विकल्पसमाधि ज्यांचे अंतःकरणास प्राप्त झाली आहे.

चतरजीः—बुद्धि = अहंप्रत्ययाभिमानी जीव. कल्मष = ईश्वराहून मी निराळा आहें अशी भेदबुद्धि.

रामानुज—सगुणब्रह्मपर हा श्लोक लावितात.

द्वैतवादी—विष्णुपर अर्थ करितात.

ज्ञानेश्वर—अद्वैतसंबंधानें दृष्टांत देतातः **परी दैव जैसें कवतिकें (कौतुकानें)। कहींचि दैन्य न देखे। कां विवेक हा नोळखे।**

भ्रांतीतें जेवीं ॥ ना तरी अंधकाराची बानी (नमुना) । जैसा सूर्य न देखें स्वप्नीं । अमृत नायके कानीं । मृत्युकथा ॥ हें असो, संताप कैसा । चंद्र न स्मरे जैसा । भूतीं भेद नेणती तैसा । ज्ञानिये ते ॥

पंडितः बुद्धि=मनन आणि निदिध्यास. 'तदात्मानः'=साक्षात्कार झाला आहे ज्यांस.

रंगनाथ–वैराग्य, श्रवणमननादि निदिध्यास व साक्षात्कार अशी मुमुक्षूची साधनपरंपरा सांगतात. ॥ १७ ॥

येषां ज्ञानेन नाशितमात्मनोऽज्ञानं ते पण्डिताः कथं तत्त्वं पश्यन्तीत्युच्यते—

शिष्य—ज्ञानसूर्यानें ज्यांच्या अंतःकरणांतील अज्ञानतम घालवून टाकिलें आहे ते ब्रह्मतत्त्वाकडे कोणत्या दृष्टीनें पाहतात ?

गुरु—सांगतों ऐकः—

विद्याविनयसंपन्ने
ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥
शुनि चैव श्वपाके च
पण्डिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे (विद्येनें, सद्वस्तूच्या ज्ञानानें चित्तवृत्ति शांत आणि मर्यादशील झालेल्या ब्रह्मवेत्याकडे) **गवि, हस्तिनि शुनि च एव श्वपाके च** (तसेंच, गाईबैल, हत्ती, कुतरा, व चांडाल या सर्वांकडे) **पण्डिताः** (पंडित, विद्वान, जे आहेत, ते) **समदर्शिनः** (एकाच दृष्टीनें बघत असतात.)–सारांश मोठा विद्वान विनयशील असा महासात्विक ब्रह्मवेत्ता ब्राह्मण असला किंवा गाई, हत्ती, कुत्रीं व महापातकी चांडाल असा कोणी जरी असला तरी या सर्वांस आत्मनिष्ठ लोक एकाच दृष्टीनें पाहतात. ज्यांस उंच नीच असें

कांहींच दिसत नाहीं. सर्वांचाही उद्धार करण्याविषयींची त्यांची अनुकंपा सारखीच जागृत असते; अथवा सर्वत्र त्यांची ब्रह्मदृष्टि असते.—

विद्याविनयसंपन्ने विद्या च विनयश्च विद्याविनयौ विनय उपशमस्ताभ्यां विद्याविनयाभ्यां संपन्नो विद्याविनयसंपन्नो विद्वान्विनीतश्च यो ब्राह्मणस्तस्मिन्ब्राह्मणे गवि हस्तिनि शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनो विद्याविनयसंपन्न उत्तमसंस्कारवति ब्राह्मणे सात्त्विके मध्यमायां च राजस्यां गवि संस्कारहीनायामत्यन्तमेव केवलतामसे हस्त्यादौ च सत्त्वादिगुणैस्तज्जैश्च संस्कारैस्तथा राजसैस्तथा तामसैश्च संस्कारैरत्यन्तमेवास्पृष्टं सममेकमविक्रियं ब्रह्म द्रष्टुं शीलं येषां ते पण्डिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

गुरु—उत्तम विद्या शिकल्यामुळें ज्याच्या वृत्तींतील उद्धटपणा नष्ट झाला आहे, किंवा साहजिकरीत्याच जो विनयशील असून पुनः विद्वानही झाला आहे, तात्पर्य विद्या आणि विनय ज्याच्या हस्तगत झालीं आहेत, असा सर्वथैव सात्त्विक ब्राह्मण म्हणजे ब्रह्मज्ञानी जीव असो किंवा गाई बैल, हत्ती, कुत्रीं, चांडाळ इत्यादि अधमाधम जातींतील राजसी व तामसी जीव असोत, कोणीही संस्कारहीन प्राणी असला तरी त्याच्या ठिकाणीं पंडितांचें, ब्रह्मनिष्ठाचें लक्ष एकसारखेंच असतें.

शिष्य—महाराज ! हा न्याय नव्हे. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणेंच सर्वांस वागविलें पाहिजे.

गुरु—तूं म्हणतोस तें ठीकच आहे. अरे ! सत्वगुणी विद्येच्या व विनयाच्या योगानें ज्याच्या अंतःकरणावर उत्कृष्ट संस्कार झाले आहेत, असा ब्राह्मण असला किंवा गाई, हत्ती वगैरे संस्कारहीन प्राणी घेतले तरी ज्या पुरुषास सर्वत्र ब्रह्म निर्विकार दिसूं लागलें, किंवा ऐकूं येऊं लागलें, तर त्या साधु संन्याशाच्या ब्रह्मरूपी अंतःकरणांत भिन्नभावाला जागा कोठून मिळणार !

शिष्य—हें कसें तें भला नीट समजलें नाहीं.

गुरु—असें पहा; पंढरीच्या वारीला आलेले एकनिष्ठ व महाभगवद्भक्त साधूंच्या दृष्टीला ज्याप्रमाणें चंद्रभागेच्या वाळवंटावर नाचणारे वारकरी 'गोपाळरूपीच' दिसतात, त्यांत जसा त्या साधूंस कोठेंही भिन्नभाव दिसत नाहीं, ते सर्वांस पांडुरंग दृष्टीनें जसे नमस्कार करितात, त्याचप्रमाणें ब्रह्मनिष्ठ पुरुषाची गोष्ट होय. महासात्विक ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण भेटला काय, किंवा जिच्या अंतःकरणावर विद्येचा संस्कार होण्याचा संभवच नसल्यामुळें जी मायेला वश झाली, परंतु स्वभावतःच सालस असल्यामुळें तिची वृत्ति राजस राहिली अशी एखादी धेनु वाटेंत आडवी आली काय, किंवा अत्यंत तमोगुणामध्येंच उत्पत्ति होऊन त्यांत वाढलेले हत्ती, कुत्रीं, इत्यादि पशु किंवा चांडाल आला काय, त्या निर्वाणीच्या ब्रह्मनिष्ठ पुरुषास या सर्व चेतन व अचेतन व्यक्तीमध्यें व्यक्तित्व दिसत नसून निर्विकार असें ब्रह्म मात्र दृष्टीस पडतें. या विश्वंभर ब्रह्मनिष्ठाला ब्राह्मणाचे सात्विक गुण अगर त्या गुणांपासून होणारे संस्कार, किंवा राजस व तामस हे गुण अगर त्या गुणांपासून निर्माण होणारे दुष्ट संस्कार यांचा बिलकुल स्पर्श होत नाहीं. कारण त्याला भेदाचें भानच नसतें. सारांश ब्रह्मनिष्ठ पुरुषास सर्वत्र सारखें व अविकृत असें ब्रह्म दिसतें. अर्थातच त्याचें वर्तन सर्वांशीं सारखेंच असतें. अशी ज्याची वृत्ति झाली, तो खरा ब्रह्मनिष्ठ होय.

शिष्य—भगवन् ! या ब्रह्मनिष्ठांचा उपयोग काय ?

गुरु—उपयोग ? अरे ! यांची सर्वत्र ब्रह्मदृष्टि झालेली असतेना ? तर मग अत्यंत श्रेष्ठ असा मोक्षनामक पुरुषार्थ, तो तर ते स्वतः साध्य करून घेतातच; आणि त्यांच्या घरीं परमार्थदृष्टीनें भिन्नभाव नसल्यामुळें, हे सत्पुरुष आपल्या विचारानें, आचारानें आणि उच्चारानें म्हणजे वाणीनें सर्व लोकांस, त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें मोक्षाचा मार्ग दाखवून त्या सर्वांस मुक्तिमार्गावर आणितात. हा काय लहानसान उपयोग झाला ?

मधु०, प्रपा०., द्विवेदी, रंगनाथः–प्रारब्धयोगानें ज्यांस देह प्राप्त झाला पण सम्यग्ज्ञान होऊन जे जीवन्मुक्त झाले त्यांचें आचरण कसें

असतें तें या श्लोकांत सांगितलें आहे. गंगोदकांत, तलावांत, दारूच्या पाण्यांत किंवा दुष्ट जलांत सूर्याचें प्रतिबिंब पडलें असतें म्हणून सूर्यबिंबास जसा या निरनिराळ्या उपाधींचा स्पर्श होत नाहीं, तसेंच ब्राह्मणांत अगर इतरत्र ब्रह्मस्वरूप प्रतिबिंबित झालें असलें तरी त्यांची दृष्टि ब्रह्माकडे असल्यामुळें त्यांस सर्वत्र ब्रह्मच दिसतें. श्रीधरस्वामी शंकरानंद, पर्वते, चतरजी, गोस्वामी, गीताव्याख्याकार हा श्लोक ज्ञानी पुरुषाप्रीत्यर्थच आहे असें म्हणतात. ब्राह्मण हे चांगले हा भेद कर्मानें होतो व गाय, हत्ती हे भेद जातीनें होतात.

रामा०—ज्ञानाकार आत्मा सर्वत्र पहातात. प्रकृतींत वैषम्य आहे, आत्म्यांत नाहीं.

द्वैतवादी—जे परोक्षज्ञानी (पंडित) सर्वत्र गुणतारतम्यविहीन असा परमेश्वर पाहतात. हें भेदशून्यज्ञान झालें ह्मणजे परमेश्वराचें अपरोक्ष ज्ञान होतें.

ज्ञानेश्वर तात्पर्य सांगतातः **एथ भेद तरी कीं देखावा । जरी अहंभाव उरला होआवा । तो आधींच** (अगोदरच) **नाहीं आघवा। आतां विषम काइ ? ॥**

पंडितांचें वैषम्य पहाः—**पाषाणाचाचि देव। देऊळ पायरिया पाषाणचि स्वयमेव । पादरक्षा पायरियावरी मानव । ठेऊन मस्तक ठेविती चरणीं देवाच्या ॥** सारांश पंडित यथायोग्य वर्तन ठेवितात म्हणजे वैषम्यबुद्धीनें वागतात! समदर्शी झाल्यावर हें वैषम्य वागणुकींत दिसतें असें म्हणणें म्हणजे भेदबुद्धि कायम असणें होय! पंडितांचा अर्थ प्रकरणास विरुद्ध आहे हें सांगणें नकोच. ॥ १८ ॥

नन्वभोज्यान्नास्ते दोषवन्तः 'समासमाभ्यां विषमसमे पूजातः' इति स्मृतेर्न ते दोषवन्तः। कथम्—

शिष्य—महाराज! माझी अजून समजूत पडत नाहीं. मला तर असें वाटतें कीं 'सब घोडे बारा टक्के' करणारे हे लोक महादोषी होत. स्मृतीही म्हणते कीं विषम असणाऱ्या मनुष्यास समत्वानें जो वागवितो, तो दोषी महापातकी होतो. असल्या नीच पुरुषांचें अन्न सुद्धां खाऊं नये!

गुरु—हा वेड्या ! त्यांना दोषाचा स्पर्श सुद्धां होणें नाहीं. कसा तो ऐक:—

इहैव तैर्जितः सर्गो
येषां साम्ये स्थितं मनः ॥
निर्दोषं हि समं ब्रह्म
तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥१९॥

येषां मनः (ज्यांचें अंतःकरण) **साम्ये स्थितं** (समअवस्थेमध्यें राहतें, अभेद दृष्टीनें राहतें) **तैः** (त्या ब्रह्मनिष्ठ पुरुषांनीं) **इह एव** (येथेंच, या मृत्युलोकीं राहून ही) **सर्गः जितः** (जन्ममरणरूपी शत्रूचा पराभव केलेला असतो.) **हि** (कारण) **ब्रह्म** (ब्रह्म जें आहे तें) **निर्दोषं** (निर्मळ, शुद्ध)–आणि–**समं** (भेदशून्य आहे.) **तस्मात्** (म्हणून) **ते ब्रह्मणि स्थिताः** (ते लोक ब्रह्मस्वरूपीं लीन होतात.)–सारांश ज्यांचे अंतःकरणांतील भेदबुद्धि सर्वथा नाहींशी झाली, ते मृत्युलोकीं राहून मृत्यूचा पराभव करितात. कारण ब्रह्म हें स्वभावतःच निर्मळ, शुद्ध, पवित्र आणि भेदशून्य असें आहे. अतएव या भेदशून्य ब्रह्मनिष्ठ पुरुषांची वृत्ति त्या निर्मळ आणि भेदशून्य ब्रह्मामध्यें लीन होऊन जाते. मग येथें दोषाला किंवा पातकाला रिघाव कोठून होणार ? उंच, नीच, माझें, तुझें, असा भेदभाव उत्पन्न होतो, तेव्हां पातकाला सुरुवात होते.—

इहैव जीवद्भिरेव तैः समदर्शीभिः पण्डितैर्जितो वशीकृतः सर्गो जन्म येषां साम्ये सर्वभूतेषु ब्रह्मणि समभावे स्थितं निश्चलीभूतं मनोऽन्तःकरणं निर्दोषम् । यद्यपि दोषवत्सु श्वपाकादिषु मूढैस्तद्दोषैर्दोषवदिव विभाव्यते तथाऽपि तद्दोषैरस्पृष्टमिति निर्दोषं दोषवर्जितं हि यस्मान्नापि स्वगुणभेदभिन्नं निर्गुणत्वाच्चैतन्यस्य, वक्ष्यति च भगवानिच्छादीनां

क्षेत्रधर्मत्वमनादित्वान्निर्गुणत्वादिति च। नाप्यन्त्या विशेषा आत्मनो भेदकाः सन्ति प्रतिशरीरं तेषां सत्त्वे प्रमाणानुपपत्तेरतः समं ब्रह्मैकं च तस्माद्ब्रह्मण्येव ते स्थितास्तस्मान्न दोषगन्धमात्रमपि तान्स्पृशति देहादिसंघातात्मदर्शनाभिमानाभावात्। देहादिसंघातात्मदर्शनाभिमानवद्विषयं तु तत्सूत्रं "समासमाभ्यां विषमसमे पूजातः" इति पूजाविषयत्वविशेषणात्। दृश्यते हि ब्रह्मवित्षडङ्गविच्चतुर्वेदविदिति पूजादानादौ गुणविशेषसंबन्धः कारणं ब्रह्म तु सर्वगुणदोषसंबन्धवर्जितमित्यतो ब्रह्मणि ते स्थिता इति युक्तम्। कर्मिविषयं च समासमाभ्यामित्यादीदं तु सर्वकर्मसंन्यासिविषयं प्रस्तुतं सर्वकर्माणि मनसेत्यारभ्याऽऽध्यायपरिसमाप्तेः ॥ १९ ॥

गुरु—वत्सा! ज्यांच्या अंतःकरणांत सर्वभूतांविषयीं सारखीच प्रीति ब्रह्मदृष्टीनें उत्पन्न झाली आणि म्हणून ज्यांचें मन निश्चळ (स्थिर) व शुद्ध झालें, सारांश ज्यांच्या ब्रह्ममय अंतःकरणांतून भेदबुद्धीचा सर्वथैव अभाव झाला, त्या ब्रह्मनिष्ठ संन्याशांनीं या मृत्यूला वश असणाऱ्या या लोकांत राहूनही जन्ममरणाचें चक्र चालविणाऱ्या मृत्यूचाच पराभव करण्याचें सामर्थ्य मिळविलेलें असतें. भेदशून्य झालेल्या सत्पुरुषापुढें बिचाऱ्या अज्ञानी पुरुषांस मात्र छळणाऱ्या मृत्यूचा पाड तो किती? तात्पर्य हे जीवन्मुक्त झाले. मृत्यूचाही जेथें मुलाजा नाहीं तेथें इतर दोषांची किंवा पातकांची कथा ती काय? आतां व्यवहारांत वागणारीं मनुष्यें सर्वथा अज्ञानी असतात; त्यांचा असा समज असतो कीं "ब्रह्म हेंच मुळीं दोषयुक्त आहे; कारण हें जें सर्व दिसत आहे तें ब्रह्म असें वेदांत सांगतो; दिसतें आहे त्यांत चांडाळ, कुत्रीं वगैरे अनेक दुष्ट, अमंगल, महापातकी प्राणी आहेत, तेव्हां अशा प्राण्यांची एकवटता करणारें जें ब्रह्म तेंही दुष्ट म्हणजे सदोषच असलें पाहिजे.' हा अर्थातच तर्कवाद आहे, व ज्यांची दृष्टि वेदांतपरिशीलनानें साफ झाली नाहीं, त्यांस हा तर्कवाद मान्य होईल. पण हा वाद सदोष आहे. पहाः—ब्रह्म हें ज्ञानरूपच आहे, म्हणजे ज्ञानाव्यतिरिक्त तेथें दुसरें कांहीं नाहीं. आनंद हाही ज्ञानरूपच आहे. सारांश ब्रह्म हें स्वस्वरू-

पाच्या ज्ञानानें मात्र ओतप्रोत, आंतून व बाहेरून भरलेलें आहे. त्यांत दुसरा तिसरा विषयच नाहीं. म्हणून तें निर्गुण म्हणजे गुण-शून्य आहे; म्हणजे ते एकस्वरूपी आहे. तेथें गुणभेद नाहीं.

शिष्य—हें नाहीं समजत, भगवन्!

गुरु—पहा कीं आपण एखादें झाड घेतलें तर तें जसें आपल्या फांद्यांपासून, पानांपासून, पुष्पफलांपासून निराळें आहे असें आपण समजतों, झाड निराळें व त्या झाडाचें गुण निराळे असें व्याव-हारिक ज्ञान आपल्यास होतें, तसा भेदभाव ब्रह्मामध्यें नाहीं. मिठाच-खडा घेतला असतां जसा तो आंत बाहेर खारटच असतो, खारटा पणापासून मीठ जसें आपणास निराळें काढितां येत नाहीं, (अर्थां-तच हा दृष्टांत एकदेशी आहे, सर्वथैव लागू पडणारा नव्हे.) तसाच ब्रह्माचा प्रकार आहे. तें आंत बाहेर एकच आहे, असें सुद्धां आप-ल्या समजुतीकरितां म्हणावयाचें; वस्तुतः ब्रह्मांत 'आंत बाहेर' असा भिन्नभावच नाहीं. सारांश तें एक व एकस्वरूपीच आहे. म्हणून असल्या सर्वथा एकस्वरूपानें असणाऱ्या ब्रह्मामध्यें दोष रे! कोठून येणार? भगवानच प्रत्यक्ष सांगतील कीं (अ० १३ श्लो. ३१) अभिमान, वासना वगैरे संसार उत्पन्न करणाऱ्या गोष्टी आहेत, त्या सुद्धां शरीराच्या संगतीमुळें आत्म्यावर अज्ञानी लोकांकडून लादल्या जातात! सारांश विषय, शरीर, इंद्रियें, मन, बुद्धी, वासना, अहंकार इत्यादि सर्वांचा उगम मायेमध्यें आहे, आत्म्याशीं यांचा अर्थाअर्थी कांहींएक संबंध नाहीं. हल्लीं जो आपल्यास संबंध आहेसा दिसतो, तो अज्ञान-जन्य मायेच्या योगानें उत्पन्न झालेला आहे समजलास? तेव्हां वासनाच नाहीं तर वासंना वगैरेंकडून उत्पन्न होणारा भिन्नभाव येथें कोठें राहिला? पुनः कपिलादिसांख्य व कांहीं कर्मठ असें म्हणतात कीं 'प्रत्येक शरीरामध्यें जो आत्मा आहे तो इतरांपासून भिन्न आहे, म्हणजे अनंत आत्मे असून ते परस्परांपासून भिन्न आहेत.' आतां आत्म्यामध्येंच असा भिन्नभाव आहे हें सिद्ध करावयास कोणतें तरी शुद्ध प्रमाण पाहिजे; पण तसें प्रमाण तरी कोठें आहे? हा विषय स्वतंत्र आहे; त्याचा विचार येथें अप्रस्तुत होय. पण सांख्यमताचें शुद्ध मनानें

परीक्षण करून ठरलेला वेदांत्यांचा सिद्धांत तुला सांगतों कीं आत्म्याची जाति नाहीं, किंवा आत्मेही पुष्कळ नाहींत. तो सर्वव्यापी आहे व तो शुद्ध असून गुणशून्य आहे. सारांश भेदभाव निर्माण होण्याला आत्मतत्वामध्यें अवकाशच नाहीं. ह्मणून ब्रम्ह हें भेदशून्य व एकच आहे. असा निश्चय वरील ब्रह्मनिष्ठ पुरुषांचा ठरतो ह्मणून ते सर्वथा ब्रह्मस्वरूपीं लीन होऊन तेथें सुखरूप राहतात. अशा पुरुषांना रे! बाबा! दोषाचा गंध स्वप्नामध्यें तरी कधीं येईल काय? अरे! देह, इंद्रियें वगैरे वरील ज्यांचा अभिमान सर्वथा नाहींसा झाला, सर्व मिथ्याज्ञान नष्ट झालें, त्यांना दोष लागेल असें म्हणणें म्हणजे विस्तवानें माझें अंग थंडगार केलें असें ह्मणण्यासारखेंच अप्रबुद्धपणाचे होय. 'खालच्या लोकांला बरोबरीनें वागविणारे, किंवा ह्याच्या उलट वर्तन करणारे लोक पातकी आहेत,' असें जें **गौतमसूत्र** तूं सांगितलेस त्या सूत्राचा भावच असा आहे कीं अशा प्रकारचें विपरीत वर्तन करणारे **व्यावहारिकलोक** देहादिकांवर अभिमान ठेवणारे असतात; 'पूजा' ह्या शब्दावरूनच सूत्रकाराचा हा अर्थ होता असें स्पष्ट दिसत आहे. हा ब्रह्मवेत्ता, किंवा चारही वेदांचें *षडंगासहित अध्ययन केलेला आहे म्हणून याची पूजा करावी, हा अध्ययन केलेला नाहीं म्हणून याची मुळींच पूजा करूं नये, किंवा यास दान द्यावें, यास नको, असा गुणविशेषांचा संबंध सांगितला आहे म्हणून येथें सूत्रकाराचा देह, इंद्रियें वगैरेवर अभिमान आहे हे स्पष्ट होत आहे. आतां ब्रह्म पहाः येथें गुणभेद नाहीं, दोषभेद नाहीं, तें निर्गुणच आहे; तेव्हां तेथें दोषाचा संबंध नाहीं. तेव्हां वरील भेदशून्यवृत्ति झालेले पुरुष ब्रह्मस्वरूपांत लीन होऊन जातात असें म्हणणें योग्यच आहे. सम, असम, उंच, नीच, वगैरे भेद पाहणें हें काम देहेंद्रियादिकांवर अभिमान बाळगणाऱ्या कर्मठांचें आहे. पण ह्यावेळीं भेदशून्यदृष्टीनें सर्व कर्माचा संन्यास अंगीकृत करण्याचा विषय चालला आहे. हें सध्यांचें प्रकरण आहे. व अध्याय संपेतोंपर्यंत हाच विषय चालणार आहे. या अध्यायाच्या १२ व्या श्लोकापासून या प्रकरणास आरंभ झाला आहे हें तुला सांगावयास नकोच!

---

* हीं सहा अंगें अशीं आहेतः—शीक्षा, छंद, व्याकरण, निरुक्त, कल्प आणि ज्योतिष.

मधु०, प्रपा०, श्रीधर, पर्वते, द्विवेदी, गोस्वामी व गीताव्याख्याकार.–आचार्यवादीच आहेत. 'असंङ्गोऽह्ययं पुरुषः' इत्यादि श्रुति समर्थनार्थ देऊन स्मृतिग्रंथ हे अज्ञानीं लोकांकरितां आहेत, असें सांगतात. प्रपा० 'समो मशकेन समो नागेन' (मशकाशीं व हत्तीशीं जो समत्व बुद्धीनें असतो.) शंकरा० 'निर्दोषं'=दुःखलेशशून्य, आनंदस्वरूप. चतरजीः–ब्रह्मच पाहणारा ब्रह्मज्ञ समत्वबुद्धीनें पाहतो. विषमबुद्धि असण्याचें त्याचें सामर्थ्यच नष्ट होतें. समबुद्धि झाली म्हणजे समक्रियाही होते. श्रीधर. सर्ग=संसार.

रामानुजः–अनेक आत्मे सारखेच आहेत, असें पाहणारा पुरुष साधकदशेंतच संसारमुक्त होतो.

द्वैतवादीः–परमेश्वर (विष्णु) हा सर्वगत, पूर्ण व ज्ञानी आहे म्हणून निर्दोष व सम आहे असें ज्यांस अपरोक्षज्ञान झालें ते मुक्त होतात.

ज्ञानेश्वरः—**जिहीं विषयसंग न सांडितां । इंद्रियांतें न दंडिता । परि भोगिली निःसंगता । कामनेविण ॥ ....जैसा जनामाजि खेचर** (समंध) **। असतचि** (असूनही) **जना नव्हे गोचर। तैसा शरीरी, परि संसार । नोळखे तयातें ॥**

पंडितः निर्दोष = सदय आणि सम हीं विशेषणें सगुणब्रह्माकडे लावून उत्तरार्धाचा भक्तिपर अर्थ करितात.

वल्लभः–'साम्य'=भगवंताच्या क्रीडारूपी लीलेमध्यें जे राहतात तेच संसार सफल करितात. त्यांनीं इच्छा केली तर त्यांस अलौकिक देह सुद्धां प्राप्त होईल. ॥ १९ ॥

यस्मान्निर्दोषं समं ब्रह्माऽऽत्मा तस्मात्—

गुरुः—ज्याअर्थी ब्रह्म म्हणजे आत्मा दोषशून्य व भेदशून्य आहे त्याअर्थी,—

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य
नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ॥

स्थिरबुद्धिरसंमूढो
ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

स्थिरबुद्धिः (ज्याच्या बुद्धीला स्थैर्य प्राप्त झालें) **असंमूढः** (जो मोहशून्य झाला) **ब्रह्मवित्** (ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला) आणि **ब्रह्मणि स्थितः** (जो ब्रह्मामध्येंच सदैव रममाण झाला) —त्यानें— **प्रियं प्राप्य न प्रहृष्येत्** (सुख देणारी वस्तु प्राप्त झाली असतां हर्षून जाऊं नये) **च** (आणि) **अप्रियं प्राप्य न उद्विजेत्** (दुःखदायक गोष्ट प्राप्त झाली असतां उद्विग्न होऊं नये.)—सारांश ब्रह्मस्वरूपीं सदैव, व स्थिर बुद्धीनें लीन होणाऱ्या ज्ञानी ब्रह्मवेत्यानें सुख प्राप्त झालें असतां हर्ष पावूं नये किंवा दुःख प्राप्त झालें असतां खिन्न होऊन बसूं नये.

शिष्यः—भगवन् ! हें सांगण्याची गरज ?

गुरुः—गरज तर ब्रह्मवेत्त्याला नाहींच. प्राकृत लोकांना ब्रह्मवेत्त्याची बुद्धि व लक्षणें कळावीं एतदर्थ ' त्यांनीं असें वागावें ' या रूपानें सांगितलें आहे.—

न प्रहृष्येन्न प्रहर्षं कुर्यात्प्रियमिष्टं प्राप्य लब्ध्वा नोद्विजेत्प्राप्यैव चाप्रियमनिष्टं लब्ध्वा देहमात्रात्मदर्शिनां हि प्रियाप्रियप्राप्ती हर्षविषादस्थाने न केवलात्मदर्शिनस्तस्य प्रियाप्रियप्राप्त्यसंभवात् । किंच सर्वभूतेष्वेकः समो निर्दोष आत्मेति स्थिरा निर्विचिकित्सा बुद्धिर्यस्य स स्थिरबुद्धिरसंमूढः संमोहवर्जितश्च स्याद्यथोक्तब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितोऽकर्मकृत्सर्वकर्मसंन्यासीत्यर्थः ॥ २० ॥

आपल्यास हवी ती वस्तु मिळाली असतां हर्ष होऊं देऊं नये आणि नको तो पदार्थ, किंवा संकट प्राप्त झालें असतां, खिन्न होऊनही बसूं नये. वास्तविकच पाहिलें तर देह हाच आत्मा आहे असें मानणाऱ्या अज्ञानी लोकांस इष्टानिष्ट वस्तु प्राप्त झाली असतां हर्षविषाद उत्पन्न होणें हें साहजिकच आहे. पण ज्याला आत्मदर्शन झालें

त्याला दुसरें प्रिय तें काय मिळणार किंवा अप्रिय तें काय प्राप्त होणार? उभयतांचाही येथें संभवच नाहीं, म्हणून त्यास हर्षविषादही व्हावयाचा नाहीं! तो ब्रह्मनिष्ठ पुरुष कसा असतो म्हणशील तर ऐकः—सर्व पदार्थांमध्यें एक, भेदशून्य व गुणदोषशून्य असा आत्मा ओतप्रोत भरलेला आहे असा त्याचा दृढ निश्चय झालेला असतो म्हणून त्याची बुद्धि शंकाविरहित झालेली असते, त्याच्या चित्तांतील मोह नाहींसा झालेला असतो, त्याला स्वस्वरूपाचें, ब्रह्माचें, यथार्थ ज्ञान वर सांगितल्याप्रमाणें झालेलें असतें आणि तो ब्रह्मस्वरूपांत लीन झालेला असतो; म्हणजे तो कर्मशून्य होतो; अथवा अभिमानापासून व वासनेपासून निर्माण होणाऱ्या सर्व कर्मांचा त्यानें संन्यास, त्याग, केलेला असतो. अशा पुरुषाला अर्थातच वैषयिक सुख किंवा वैषयिक दुःख होण्याचा संभवच नाहीं.

मधु०,प्रपा०,श्रीधर,पर्वते,गीताव्याख्याकार,गोस्वामीः—स्थिरबुद्धिः= ब्रह्माचे ठायीं श्रवणमननानें निश्चित बुद्धि झाली ज्याची. 'असंमूढः'= निदिध्यासानें विपरीत कल्पना व असंभावना ज्याच्या नष्ट झाल्या. बाकी एकच अर्थ आहे. शंकरानंदाचें विस्तृत व्याख्यान वाचण्यासारखें आहे. वासना, काम व कर्म या त्रयीचा क्षय आणि दुःखाची अनुपलब्धि (ज्ञान न होणें) आनंदाची सर्वदां अनुभूती आणि विदेहाची प्राप्ति या गोष्टी साध्य झाल्या म्हणजे मुक्त झाला. चतरजीः—असंमूढ= निर्विकार, अद्वय, पूर्ण ब्रह्मच सत्य आहे असें मानणारा.

रामानुजः—हा साधकास, कर्मयोग्यास, उपदेश आहे असें म्हणतात.

द्वैतवादीः—संन्यासाचा प्रपंच, विस्तार, करण्यासाठीं हे पुढील श्लोक आहेत. ब्रह्म स्वतंत्र आहे हें ज्ञान आणि 'मी स्वतंत्र आहें' हा अज्ञाननाश साध्य करून विष्णुध्यान करणारा तो खरा संन्यासी होय. त्याला हर्ष शोकाचें कारणच उरत नाहीं.

ज्ञानेश्वरः—**तरी मृगजळाचेनि पूरें। जैसें न लोटिजे कां गिरिवरें। तैसा शुभाशुभीं न विकरे** (विकार पावत नाहीं)। **पातलिया जो॥**

पंडितः...**कीं प्रियपदार्थ कळे परी। त्याच्या लोभें अंतरीं।**

हर्ष न पावे स्थिरबुद्धि म्हणोनि ॥ ऐसें जाणोनि ही अप्रिय । अप्रिय पावोनी ही उद्विग्न न होय. । की स्थिरबुद्धि ब्रह्मानंदमयं । भाव ज्याच्या बुद्धीचा ॥ विषय ग्राह्य, अग्राह्य आहेत असें सांगणारी बुद्धि जिवंत असते असें म्हणण्याचा पंडितांचा आशय दिसतो. साधक दशेंत ही अवस्था कांहीं वेळ असूं शकेल. पण सिद्धावस्थेंत हें ज्ञान असणें असंभवनीय होय. ॥ २० ॥

किंच ब्रह्मणि स्थितः--

आणखी ब्रह्मामध्यें लीन झालेला सत्पुरुष–

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा
विन्दत्यात्मनि यत्सुखम् ॥
स ब्रह्मयोगयुक्तात्मा
सुखमक्षयमश्नुते ॥ २१ ॥

बाह्यस्पर्शेषु (बाह्य, आत्मव्यतिरिक्त, अनात्मक जे दृश्यविषय, त्यांमध्यें) **असक्तात्मा** (ज्याचें अंतःकरण रममाण होत नाहीं) तो **आत्मनि** (आत्मस्थितीमध्यें) **यत् सुखं** (जें अद्वितीय सुख आहे) –तें–**विन्दति** (मिळवितो.)– सारांश बाह्यविषयांमध्यें रममाण न होतां आत्मस्वरूपीं लीन झालेल्या पुरुषास आत्मस्वरूपाच्या समागमानें जें सुख मिळावयाचें, तें सर्वच्या सर्व मिळतें. तसेंच. **सः ब्रह्मयोगयुक्तात्मा** (ब्रह्माशीं एकवट झाला आहे आत्मा ज्याचा असा ब्रह्मनिष्ठपुरुष) **अक्षयं सुखं** (ज्याचा कधींही नाश होत नाहीं अशा प्रकारचें सुख) **अश्नुते** (उपभोगितो)– सारांश त्या पुरुषाला शुद्ध आणि अविकृत असें सुख मिळतें.

बाह्यस्पर्शेषु बाह्याश्च ते स्पर्शाश्च बाह्यस्पर्शाः स्पृश्यन्त इति स्पर्शः शब्दादयो विषयास्तेषु बाह्यस्पर्शेष्वसक्त आत्माऽन्तःकरणं यस्य सोऽयमसक्तात्मा विषयेषु प्रीतिवर्जितः

सान्विन्दति लभत आत्मनि यत्सुखं तद्विन्दतीत्येतत् । स ब्रह्मयोगयुक्तात्मा ब्रह्मणि योगः समाधिर्ब्रह्मयोगस्तेन ब्रह्मयोगेण युक्तः संमाहितस्तस्मिन्व्यापृत आत्माऽन्तःकरणं यस्य स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते व्याप्नोति । तस्माद्बाह्यविषयप्रीतेः क्षणिकाया इन्द्रियाणि निवर्तयेदात्मन्यक्षयसुखार्थीत्यर्थः ॥ २१ ॥

आपल्या इंद्रियांवर ज्यांचा आघात झाल्यामुळें मनास, व बुद्धीस विषयज्ञान होते, वासनेस व अहंकारास जागा उत्पन्न होते अशा प्रकारचे शब्द, रूप, गंध, इत्यादि विषयांमध्यें ज्याचें अंतःकरण रममाण होत नाहीं, सारांश ज्याची विषयांवर कोणत्याही प्रकारची प्रीति किंवा आसक्ति उत्पन्न होत नाहीं, त्या विषयविरक्त पुरुषाला अत्यंत सुख होतें. आत्मनिष्ठ होऊन आत्म्याशीं तादात्म्य झालें असतां जें सुख, जो आनंद, होतो, तो या पुरुषास मिळतो. त्या पुरुषाचें अंतःकरण केवळ शुद्ध अशा आत्मस्वरूपाशीं अथवा स्वस्वरूपाशीं सर्वदा तादात्म्य पावल्यामुळें त्या ब्रह्मनिष्ठ पुरुषाला, ब्रह्माकडे ज्याच्या अंतःकरणाची सर्वथैव तंद्री लागून समाधि प्राप्त झाली आहे अशा पुरुषाला, क्षय नाहीं अशा प्रकारचा निर्मळ व स्वच्छ आनंद मिळतो. ही आनंदाची पराकाष्ठा होय. म्हणून क्षणभर मात्र सुख देणारे जे बाह्यविषय अगर बाह्यविषयप्रीति, यांकडे अक्षय्य सुख मिळवूं इच्छिणाऱ्यानें ढुंकून सुद्धां बघूं नये, सारांश या विषयांपासून पराङ्मुख व्हावें.

मधुसूदनीकार असें म्हणतातः " पाठीमागील कर्मानें विषयलोलुप झालेलें चित्त ज्याचा अनुभवच नाहीं अशा सुखाकडे कशाचें वळतें ?

" अप्यानंदः श्रुतः साक्षान्मानेनाविषयीकृतः ।
दृष्टानंदाभिलाषं स न मन्दीकर्तुमप्यलम् " इति ॥

(अपरिमित आनंद आहे असें ऐकिलें असलें तरी जो प्रत्यक्ष आनंदाचा अनुभव आहे त्याच्या पुढें अमर्याद अशा परोक्ष आनंदाची मात्रा चालत नाहीं) असा अनुभव आहे." या शंकेचें निवारण प्रस्तुतच्या श्लोकांत केलें आहे. भारतांत या शंकेचें निवारण केलें

आहे: 'या जगांत व स्वर्ग लोकांत बाह्यविषयेच्छा तृप्त झाल्यामुळें जें सुख होतें तें तृष्णाशून्य झालेल्या पुरुषाच्या समाधानाचा एक षोडशांश सुद्धां भरत' नाहीं ! शिवाय गाढनिद्रेमध्यें ब्रह्मसुखाचा अनुभव असतोच. सारांश ज्ञानी पुरुषाचें समाधिजन्य, सात्विक व उपशमात्मक ब्रह्म-सुख निरुपम आहे.

प्रपाकार, श्रीधर, शंकरानंद, पर्वते, द्विवेदी, चतरजी, गो-स्वामी व व्याख्याकार हेंच म्हणतात. भागवत एकादश स्कंधांत श्लोक आहे त्याचा अर्थः 'उद्धवा! मला ज्यानें आत्मा अर्पण केलाआहे तो सुखरूपच होतोः मग तो परमेष्ठीचें सुख, इंद्रपदाची, सार्वभौ-मत्वाची, पृथ्वीपतीची, योगाची सारांश कोणत्याही इतर सुखाची अपेक्षा धरित नाहीं.

रामानुजः—सरळ अर्थ आहे. अंतःसुख हें नित्यसमाधीच्या अक्षय्य सुखाचा प्रारंभ आहे.

द्वैतवादीः—विषयांचा त्याग, संन्यास, करून जें सुख मिळतें तें सुद्धां कालभंगुरच होय. पण ब्रह्म हेंच ध्यानाचा विषय करून, सा-रांश उपासनेनें व ध्यानानें जें सुख मिळतें तें मात्र अक्षय्य असतें.' यावर आचार्य ह्मणतील कीं " जोंपर्यंत **'मीं सुख भोगित आहे,'** असें भान आहे तोंपर्यंत तें सुख अक्षय्य नव्हे. अक्षय्यसुखाचा ठेवा सांपडण्या-साठीं 'मी सुखी आहें' हें भानही नष्ट केलें पाहिजे; सारांश सुखरूप, अद्वैत, झालें पाहिजे. "

ज्ञानेश्वरः—**सांगे कुमुददळाचेनि** (चंद्रविकासिनी कमलाचे) **ताटे । जो जेविला'चंद्रकिरणें चोखटें । तो चकोर काई वाळु-वंटे । चुंबित असे? ॥** दृष्टांत पण दृष्टांत आहे.

पंडितः—"जें सुख विषयांत आहे, तेंच आत्म्यांत आहे; विषय-सुखापासून दुःख होतें, आत्मसुखाला दुःखाचा स्पर्श नसतो, म्हणून आत्मसुख श्रेष्ठ आहे" असें म्हणतात.

डेव्हिसः—'यः सुखम्'—असा पाठ लेसनच्या आधारें सुचवितात त्यानें अर्थ स्पष्टतर होतो ॥ २१ ॥

इतश्च निर्वर्तयेत्—

या विषयांपासून मन निवृत्तच करावें, कारण—

ये हि संस्पर्शजा भोगा
दुःखयोनय एव ते ॥
आद्यन्तवन्तः कौन्तेय
न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

हि (कारण) ये संस्पर्शजाः भोगाः (बाह्य विषयांचा इंद्रियांशीं संयोग झाल्यानंतर उत्पन्न होणारे जे भोग आहेत, ते सुखाचे विषय आहेतसें आपल्यास वाटतें) ते दुःखयोनयः एव (ते दुःख देणारे मात्र आहेत, दुःखाची उत्पत्ति करणारे मात्र आहेत.)—कारण ते– आद्यन्तवन्तः (त्यांना, त्या विषयांना व भोगांना प्रारंभ आहे व शेवट आहे, सारांश ते अनादि नाहींत व अनंतही नाहींत.)—कौन्तेय (हे पार्था !) तेषु बुधः न रमते (त्या विषयामध्यें शहाणा पुरुष जो आहे तो रममाण होत नाहीं.) सारांश विषयसुख काळनियमित आहे, म्हणून त्यामध्यें शहाणा पुरुष आसक्त होत नाहीं.

ये हि यस्मात्संस्पर्शजा विषयेन्द्रियसंस्पर्शेभ्यो जाता भोगा भुक्तयो दुःखयोनय एव तेऽविद्याकृतत्वात् । दृश्यन्ते ह्याध्यात्मिकादीनि दुःखानि तन्निमित्तान्येव । यथेह लोके तथा परलोकेऽपीति गम्यत एव शब्दात् । न संसारे सुखस्य गन्धमात्रमप्यस्तीति बुद्ध्वा विषयमृगतृष्णिकाया इन्द्रियाणि निवर्तयेत न केवलं दुःखयोनय आद्यन्तवन्तश्चाऽऽदिर्विषयेन्द्रियसंयोगो भोगानामन्तश्च तद्वियोग एवात आद्यन्तवन्तोऽनित्या मध्यक्षणभावित्वादित्यर्थः । कौन्तेय न तेषु रमते बुधो भोगेषु विवेक्यवगतपरमार्थतत्त्वोऽत्यन्तमूढानामेव हि विषयेषु रतिर्दृश्यते यथा पशुप्रभृतीनाम् ॥ २२ ॥

कारण उघडच आहे कीं विषयांचा व इंद्रियांचा समागम झाल्यानंतर मात्र उपभोगास प्राप्त होणारे जे विषय आहेत ते सर्व दुःखाला कारण होतात. कायिक, मानसिक, दैविक वगैरे जीं जीं म्हणून दुःखें प्राप्त होतात तीं सर्व या बाह्यविषयांची प्राप्ति करून घेणें व त्यांचा उपभोग घेणें यांपासूनच उत्पन्न होतात. उघडच आहे अविद्येपासून म्हणजे अहंकार व वासना यांपासूनच विषयभोगास अस्तित्व प्राप्त होते. अहंकार व वासना म्हणजे मायादेवीचे प्रत्यक्ष चिरंजीव! तेव्हां ते दुःखास कारण होतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. केवळ हे भोग येथेंच दुःख देतात असें नाहीं, तर परलोकीं सुद्धां हे दुःखासच कारण होतात, असें 'मात्र' या शब्दानें सुचविलें आहे.

शिष्य– सद्गुरो! मला हें नीटसें समजलें नाहीं.

गुरु–हा विषय अमळसा कठिणच आहे. याचा पुढें स्वतंत्रतेनें विचार करूं. आतां इतकेंच सांगून ठेवितों कीं भोगाचा कोणताही विषय घेतला तरी तो नेहमीं सुखच देतो किंवा दुःखच देतो असें नाहीं. साखरच पहाः सर्व स्थळीं, सर्व काळीं, साखर गोडच लागते असा नेम नाहीं. ज्या साखरेसाठीं आपण मुंगळ्यासारखी धडपड करीत असतों, तीच साखर ताप आल्यानंतर, किंवा साखर खाऊन वीट आल्यानंतर कडू लागते, किंवा वांति उत्पन्न करिते. तसेंच साखर जास्त खाल्ली म्हणजे विकार उत्पन्न होतात. साखर मिळविण्यासाठीं हाडाचीं काडें करावीं लागतात हा भाग निराळाच! एवंच भोग म्हणून जितके आहेत, ते नियमानें सुख देतीलच असा नियम नाहीं; मग ते भोग ह्या लोकचे असोत किंवा परलोकचे असोत. शिवाय सुख व्हावयाचें तें पुष्कळ अंशानें आपल्या स्वतःच्या मनावर अवलंबून असतें. ज्या भोगानें काल सुख झालेसें वाटलें, किंवा आमल्यास स्नेह्यास सुख झालेसें आपल्यास दिसलें, ते भोग आज किंवा आपल्यास, सुखच देतील असा सिद्धांत करणें धोक्याचें आहे. शेवटीं हीं सर्व विषयसुखें क्षणभंगुर आहेत. या सर्वांवरून 'सुख पाहतां जवापाडे दुःख पर्वता येवढें' असें संसाराविषयीं म्हटलें आहे व संसारांत खऱ्या सुखाचा गंधसुद्धां नाहीं, असें जें म्हणतात

ते परमार्थ दृष्टीनें खरें आहे असें म्हटलें पाहिजे, हें उघड होतें. शहाण्या मनुष्यास हें समजावें व त्यानें आपलें चित्त विषयसुखाच्या मृगजलापासून पराङ्मुख करावें हें नटिच होय. आतांच सांगितलें कीं विषयसुखाची प्राप्ति म्हणजे दुःखाला पाठविलेलें आमंत्रणच होय. तसेंच ह्या दुःखमूलक सुखाला प्रारंभ आहे व शेवट आहे म्हणजे तो सुखाचें पांघरूण घेतलेला सुखाभास अनित्य आहे, कायमचा नाहीं. विषयांचा व इंद्रियांचा संयोग झाला म्हणजे उपभोग सुरू होतो व या उभयतांचा वियोग झाला म्हणजे तो भोग संपतो म्हणजे उपभोग, हा प्रारंभ होण्यापूर्वीं नसतो आणि संपल्यावरही नसतो! अर्थात हा क्षणिक आहे आणि सुख होणें हें विषयाच्या व मनाच्या तसेंच शरीराच्या व प्रसंगाच्या स्थितीवर अवलंबून आहे अशा क्षणभंगुर व अनिश्चयात्मक विषयसुखांमध्यें शहाणे लोक, विवेकी पुरुष, परमार्थतत्त्व कळलें आहे असे पंडित, आसक्त होत नाहींत. अविचारी, मूर्ख व अज्ञानी लोक मात्र याच विषयसुखाला लुब्ध होतात, अर्थातच हे लोक पशु होत. पशु मात्र विषयभोगापासून सुख होईल असें समजतात व फसतात.

मधु०, द्विवेदी, विष्णुपुराणांतील श्लोक देतातः—'**यावन्तः कुरुते जन्तुः संबन्धान्मनसः प्रियान् । तावंतोऽस्य निखन्यन्ते हृदये शोकशंकवः ॥**' (मनाला प्रिय वाटणाऱ्या जितक्या बाह्य विषयांचा स्वीकार प्राणी करितो, तितके शंकू म्हणजे खिळे तो अपल्या हृदयास टोंचण्यासाठीं उत्पन्न करितो!) शिवाय विषयसुखाची दुःखमूलकता व दुःखपर्यवसायिता स्पष्टपणें सिद्ध करितात; 'आणि 'विषयसंन्यास झाल्याविना आत्मसुख नाहीं आणि आत्मसुखाशिवाय विषयसंन्यास नाहीं; तर जीवानें काय करावें,' या शंकेचें निवारण करितात, कीं विषयसुख हें दुष्ट आहे असें मुमुक्षूनें समजावें.

प्पा०, श्रीधर, शंकरानंद, चतरजी, रामानुजाचार्य, द्वैतवादी गोस्वामी डॉमसन डेव्हिस व्याख्याकार वगैरे सर्व आचार्यवादी आहेत.

श्रीधरः—सद्यः सुख सुद्धां स्पर्धा, असूया इत्यादिकांनीं व्याप्त असतें.

वल्लभः–बुधः=सर्वरसज्ञ, विषयरसास विटून जाऊन आत्मरसाचा आस्वाद घेणारा.

ज्ञानेश्वरः—जींहीं आपणपें नाहिं देखिलें । तेची इहीं इंद्रियार्थीं रंजले । जैसे रंक का आळूकेले (भुकेले)। तुषातें (कोंड्याला) सेवी ॥ ना तरी मृगें तृष्णापीडितें । संभ्रमें विसरोनी जळातें ।.... विषयसुखांसंबंधें म्हणतातः–.... हें बोलणेंचि सारिखें (योग्य) नोहे । तरी विद्युत् स्फुरणें (विजेच्या चमकण्यानें) कां न पाहे। जगामाजी ॥ सांगे वात वर्ष आतप धरे (वारा, पाऊस ऊन यांचें निवारण करणारें) । ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे (असें अभ्रच्छायेनें, ढगानेंच जर काम होईल) । तरी त्रिमाळिकें धवळारें (तीन मजली चुनेगची घरें) । करावी कां ?॥ .... सारांश- -सांगपा सर्प फणीची साउली । ते शीतल होईल केतुली (केवढीशी) ?। मूषकासी ॥ .... शेवटीं अज्ञानी लोक ज आहेतः ते अंतर (रहस्य) नेणती बापुडे । ह्मणोनि अगत्य सेवणें घडे । सांगे पूयपंकीचे किडे । काय चिळस घेती ? ॥ एकंदरींत ज्ञानेश्वरांचें भाष्य अगत्य वाचण्यासारखें आहे. ॥ २२ ॥

अयं च श्रेयोमार्गप्रतिपक्षी कष्टतमो दोषः सर्वानर्थप्राप्तिहेतुर्दुर्निवार्यश्चेति तत्परिहारे यत्नाधिक्यं कर्तव्यमित्याह भगवान्--

सारांश, जीवाचा परम पुरुषार्थ जो मोक्ष, त्या मोक्षाचा शत्रु, दोषस्वरूपी, अत्यंत कष्ट व दुःख देणारा, सर्व प्रकारचीं संकटें निर्माण होण्यास कारण होणारा जो हा मायाजन्य संसार किंवा अहंकार आणि वासना ही दुकल, सामान्य मनुष्यास प्रायः अनिवारच होय! तेव्हां या संसाराचा या दुकलीचा जेणेंकरून नाश होईल असें केलें पाहिजे, म्हणजे आपलें प्रयत्नसर्वस्व खर्च केलें पाहिजे. यासाठीं भगवान म्हणतात :—

शक्नोतीहैव यः सोढुं
प्राक्शरीरविमोक्षणात् ॥

कामक्रोधोद्भवं वेगं

स युक्तः स सुखी नरः ॥२३॥

प्राक् शरीरविमोक्षणात् (आपला देहपात होण्यापूर्वींच) **कामक्रोधोद्भवं वेगं** (काम आणि क्रोध या जीवशत्रूंचें सामर्थ्य, या सहा शत्रूंचा हल्ला) **यः इह एव सोढुं शक्नोति** (जो पुरुष या मृत्युलोकीं—हा हल्ला—सहन करण्यास समर्थ असतो) **स युक्तः** (तोच आत्मनिष्ठ पुरुष होय) **स नरः सुखी** (तोच पुरुष सुखी होय.) सारांश देह सजीव आहे, देहपात झाला नाहीं, तात्पर्य काम क्रोध उत्पन्न होण्याचा संभव आहे, अशा वेळीं या मृत्युलोकांतच, ज्या पुरुषाला काम क्रोधादिकांचा मारा सहन करण्याची शक्ति प्राप्त झाली तो पुरुष खरा आत्मनिष्ठ होय, त्या पुरुषाला मात्र खरें सुख होतें.

शक्नोत्युत्सहत इहैव जीवन्नेव यः सोढुं प्रसहितुं प्राक्पूर्वं शरीरविमोक्षणादा मरणात् । मरणसीमाकरणं जीवतोऽवश्यंभावी हि कामक्रोधोद्भवो वेगोऽनन्तनिमित्तवान्हि स इति । यावन्मरणं तावन्न विश्रम्भणीय इत्यर्थः । काम इन्द्रियगोचरप्राप्ते इष्टे विषये श्रूयमाणे स्मर्यमाणे वाऽनुभूते सुखहेतौ या गर्धिस्तृष्णा स कामः क्रोधश्चाऽऽत्मनः प्रतिकूलेषु दुःखहेतुषु दृश्यमानेषु श्रूयमाणेषु स्मर्यमाणेषु वा यो द्वेषः स क्रोधस्तौ कामक्रोधावुद्भवो यस्य वेगस्य स कामक्रोधोद्भवो वेगः, रोमांचनहृष्टनेत्रवदनादिलिङ्गोऽन्तःकरणप्रक्षोभरूपः कामोद्भवो वेगो गात्रप्रकम्पप्रस्वेदसंदष्टौष्ठपुटरक्तनेत्रादिलिङ्गः क्रोधोद्भवो वेगस्तं कामक्रोधोद्भवं वेगं य उत्सहते प्रसहते सोढुं प्रसहितुं स युक्तो योगी सुखी चेहलोके नरः ॥ २३ ॥

गुरु— भगवान म्हणतातः ' अर्जुना ! देहत्याग होईतोंपर्यंत, जीव आहे तोंपर्यंत, जिवंत असतांना, जो पुरुष कामक्रोधांचा, अर्थात् कामक्रोधादि षड्रिपूंचा मारा सहन करण्यास जो समर्थ असतो, हा

मारा आला असतां चित्ताचा भंग न होऊं देण्याचा उत्साह ज्याचा कायम असतो, तोच पुरुष योगी होय, त्याच पुरुषाला सुखाचा श्रेष्ठ कंद सांपडला असें म्हणावें. ' शिष्या ! समजलेंना !

शिष्य– दयानिधे ! मला एक दोन गोष्टी समजल्या नाहींत प्रथम आमरणांत असें कां म्हटलें ?

गुरु–अरे हा शब्द इतक्या करितां योजिला: 'मरण येईपर्यंत' हा शब्द अशाकरितां घातला आहे कीं, येथें किंवा अन्यत्र प्राणी जिवंत आहे तोंपर्यंत मात्र काम क्रोध इत्यादिकांची उत्पत्ति अवश्य व्हावयाचीच. कारण काम क्रोध उत्पन्न होण्याला एकच कारण असतें असें नाहीं, हजारों, अनंत, कारणें आहेत कीं ज्यांच्या योगानें आपल्या अंतःकरणांत काम उत्पन्न होतो, किंवा क्रोध होतो. तेव्हां अनंत कारणांपैकीं कोणत्या तरी कारणामुळें लोभ किंवा राग उत्पन्न व्हावयाचाच. हा कामक्रोधाचा सपाटा सहन करण्याचा प्रसंग अर्थातच प्राणी जिवंत आहे, तोंपर्यंतच यावयाचा. देहपात झाल्यावर अमक्या तमक्याला राग येत नाहीं, किंवा लोभ उत्पन्न होत नाहीं असें म्हणणें व्यर्थच होय. तेव्हां जोंपर्यंत देह जिवंत आहे, जोंपर्यंत कामक्रोध उत्पन्न होण्याचा संभव आहे, तोंपर्यंत म्हणजे जिवंत असूनही जो कामक्रोधांस वश होत नाहीं, तोच खरा योगी, तोच खरा शूर व नरवीर होय. विकार उत्पन्न करणारे प्रसंग प्राप्त झाले असतांही जो विकारवश होत नाहीं, तोच खऱ्या धीराचा पुरुष होय, तोच योगाभ्यासी व तोच खरा सुखी पुरुष असतो. प्रसंग नसतांना आपण सर्वजण शूरत्वाच्या गोष्टी सांगतों, पण प्रसंग पडला म्हणजे आपल्यांपैकीं बहुतेक यः पलाय करितात म्हणून 'जिवंत असेतोंपर्यंत, कामक्रोध उत्पन्न व्हावयाचे प्रसंग कायम आहेत, तोंपर्यंत ' असे शब्द योजिले आहेत बरें ! शिवाय मरण येईपर्यंत केव्हां राग येईल, केव्हां लोभ सुटेल याचाही नियम नसतो मग आपण आजारी असूं किंवा वृद्ध झालेले असूं. म्हणून मरण येईपर्यंत या शत्रूच्या हल्ल्याकडे दुर्लक्ष करितां उपयोगी नाहीं. मला राग येणार नाहीं असें समजून कोणीही

जिवंत मनुष्यानें स्वस्थ बसतां उपयोगी नाहीं. समजलास ' आमरणांत ' हा शब्द कां घातला तें !

शिष्य–होय. आतां काम व क्रोध यांचीं लक्षणें मला कृपा करून सांगावीं.

गुरु–काम म्हणजे इच्छा किंवा आसक्ति. एखादा इष्ट व सुख देणारा विषय आपल्या इंद्रियाजवळ येऊन पोंहचला, किंवा तो विषय सुखकारक आहे असें आपण ऐकलेलें असलें;किंवा आपल्यासच पूर्वस्मरण झालें तर त्या विषयासंबंधानें जी वासना उत्पन्न होते व पुढें आसक्ति उत्पन्न होते त्याचें नांव काम किंवा इच्छा; आणि जे विषय किंवा पुरुष आपल्या अंतःकरणास प्रतिकूळ किंवा दुःखकारक आहेत असें आपण प्रत्यक्ष पाहिलें असेल किंवा ऐकिलें असेल, किंवा आपल्यासच स्मरण झालें असेल त्या विषयांविषयीं जो द्वेष उत्पन्न होतो त्याचें नांव क्रोध होय. इच्छा अगर काम उत्पन्न झाला असतां अंगावर रोमांच उत्पन्न होणें, नेत्र प्रफुल्लित होणें, मुख प्रसन्न होणें आणि मनाचा प्रक्षोभ होणें (मनाची धांदल उडून जाणें, मन प्रक्षुब्ध होणें) इत्यादि चिन्हें दृग्गोचर होतात; हीं कामाचीं लक्षणें होत. क्रोधाचीं लक्षणें पहाः सर्वांगास कंप सुटणें, घाम येणें, ओंठ चावणें, नेत्र आरक्त होणें, वगैरे क्रोध उत्पन्न झाल्याचीं लक्षणें आहेत. एवंगुणविशिष्ट जे कामक्रोध यांचा मारा दुःसह आहे. हा मारा ज्यांनीं जिवंत असे तोंपर्यंत नित्य सहन केला, ज्यांनीं आपला चेतोभंग होऊं दिला नाहीं, तेच पुरुष योगी होत, तेच खरे सुखी होत. कामक्रोधांचा विचार केला म्हणजे त्यांची बाकीची सहचर मंडळी म्हणजे लोभ, मोह इत्यादि मंडळी आलीच !

मधुः—नदीची उपमा घेऊन आचार्यांचा अर्थ सिद्ध करितात वसिष्ठ म्हणतातः **प्राणे गते यथा देहः सुखं दुःखं न विन्दति । तथा चेत्प्राणयुक्तोऽपि स कैवल्याश्रमे वसेत् ॥** (प्राण गेल्यावर देहाला नसें सुखदुःखांचें भान नसतें, तसें प्राण असतांही जर होईल तर तो प्राणी मुक्तच झाला म्हणावयाचा!).

प्रपा०, श्रीधर, शंकरा०, पर्वते, द्विवेदी, चतरजी, गोस्वामी, हे आचार्यवादी आहेत.

श्रीधरः—इह=कामक्रोध उत्पन्न होतांक्षणींच.

शंकरा०:—'प्राक् शरीरविमोक्षणात्'=ऐन तारुण्यामध्यें; गृहस्थाश्रमांत. इह =याच जन्मांत. सारांश संन्यास घेण्यापूर्वी कामक्रोधांचा जय झाला पाहिजे.

द्विवेदीः—हा व पुढील श्लोक मुमुक्षूचे अधिकार सांगतात. शरीर जिवंत आहे, तोंवर सुखदुःख असणार. हे आत्मारामाचे धर्म नाहींत.

रामानुजः—साधन दशेंत जो कामक्रोधांचा वेग सहन करितो, त्यालाच शरीरपातानंतर आत्मसुख मिळतें.' उपासना दृष्टीनें हा अर्थ ठीक आहे. पण अद्वैत दृष्टीनें जो आत्मारामच झाला त्याला सुख मिळतें असें म्हणणें योग्य नव्हे.

द्वैतवादीः—इह=या मनुष्यजन्मांत; कारण येथेंच कामक्रोध सहन करण्याची शक्ति आहे, पशुपक्षी योनींत नाहीं.

पंडितः—कामक्रोधादिकांचा विवेकरूपी भाल्यानें आपण संहार करित असतांही ते अनावर होतात; त्यावेळीं त्यांचा वेग सहन करणारा तो खरा वीर होय. तात्पर्य पापप्रवृत्तीचा घात करितांना प्रत्येक वेळीं मुमुक्षूस प्रयत्न करावा लागतो असा पंडितांचा अभिप्राय आहे. 'आपण जिवंत आहों तोंपर्यंत शत्रूंचा पराभव करावा असें व्याख्याकार ह्मणतात. ॥ २३ ॥

कथंभूतश्च ब्रह्मणि स्थितो ब्रह्म प्राप्नोतित्याह—

शिष्य– तर मग येथें सुखच नाहीं असें म्हणावयाचें कीं काय?

गुरु-नाहीं; सुख मिळण्यास कोणत्या स्थितीमध्यें राहिलें असतां कामक्रोधादिकांचें दमन करितां येऊन ब्रह्मस्वरूपांत राहतां येतें, सारांश ब्रह्मप्राप्ति होते–

शिष्य-म्हणजे कामक्रोध नष्ट झालें म्हणजे मुक्ति मिळते असेंचना?

गुरु–नाहीं. आत्मज्ञान हवें आहे तें येथें मिळून येथेंच ब्रह्म, पूर्णसुखी, कसें होतां येईल तें सांगतात—

योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथाऽन्तर्ज्योतिरेव यः ॥
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥

यः अन्तसुखः, अन्तरारामः, तथा यः अन्तर्ज्योतिः (ज्याचें सुख बाह्य विषयावर अवलंबून नसून आत्मस्वरूपांत मात्र ज्याला आनंद होतो, आत्मचिंतन हेंच ज्याचें विश्रांतीचें स्थान असतें, आत्मसाक्षात्कारानें मात्र ज्याला प्रकाश मिळतो सारांश ज्याचे सर्व व्यवहार, आत्मारामाशीं मात्र आहेत) **स योगी ब्रह्मभूतः** (तो ब्रह्माशीं ऐक्यत्व, तादात्म्य, पावलेला योगाभ्यासी आत्मनिष्ठ व परमात्मतत्ववेत्ता पुरुष) **ब्रह्मनिर्वाणं अधिगच्छति** (ब्रह्मसुख, विषयसुख अगर विषयदुःख या उभयतांनींही विरहित अशी स्वस्वरूपस्थिति, प्राप्त करून घेतो)—सारांश ज्याला अखंड सुखाचा नित्य अनुभव जिवंतपणींच घ्यावयाचा आहे त्यानें ब्रह्मामध्यें सदैव रममाण झालें पाहिजे. बाहेरच्या विषयांचा त्याग केला म्हणजे ब्रह्मज्ञान होण्याची पात्रता येते—

योऽन्तःसुखोऽन्तरात्मनि सुखं यस्य सोऽन्तःसुखस्तथाऽन्तरेवाऽऽत्मन्याराम आक्रीडा यस्य सोऽन्तरारामस्तथैवान्तरात्मैव ज्योतिः प्रकाशो यस्य सोऽन्तर्ज्योतिरेव । य ईदृशः योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मणि निवृत्तिं मोक्षमिह जीवन्नेव ब्रह्मभूतः सन्नधिगच्छति प्राप्नोति ॥ २४ ॥

ज्याला आत्मस्वरूपांत मात्र सुख प्राप्त होतें, दुसरें कोठें होत नाहीं, कारण ज्याचें सर्व विहार आत्मस्वरूपामध्यें मात्र चालतात; बाह्यविषय ज्याला शून्यच होतात कारण, ज्याला आत्मारामाकडून मात्र सर्व प्रकाश मिळतो, म्हणजे ज्याची सर्व ज्ञानप्राप्ति आत्मचिंतनामधून होते, इंद्रियमनादिकाकडून होत नाहीं; सारांश ज्यांचे आहारवि-

हार वगैरे सर्व आत्मस्वरूपामध्यें मात्र होतात, अशा प्रकारचा योगाभ्यासी जो आहे, त्याला जिवंतपणींच मुक्ति मिळून, तो जीवन्मुक्त होऊन, या मृत्युलोकींच विकारशून्य असें जें ब्रह्मसुख त्याप्रत मिळवितो. सारांश बाह्य सुखदुःखांचा व त्यांचे कारणांचा म्हणजे विषयांचा सर्वथैव त्याग करून जो केवळ परब्रह्मामध्यें सुखरूप झाला तो '**ब्रह्मैवसन्ब्रह्माप्येति**' (ब्रह्मच होऊन ब्रह्मांत लीन होतो) या न्यायानें जीवन्मुक्त व इहलोकींच निर्विकार व निरतिशय म्हणजे पराकाष्ठेचें सुख मिळवितो. समाधीमध्यें त्याला विषयभान नसतें व इतर कालीं 'सर्व विषय मिथ्या आहेत,' असा त्याचा निश्चय असतो म्हणून त्याला येथेंच द्वैतशून्य जें मुक्तिसुख तें मिळतें.

मधु०-प्रप० श्रीधर, शंकरा०, पर्वते, द्विवेदी.-आचार्यवादी आहेत.

शंकरानंदः-अन्तः,' सर्वांचे अंतर्यामी असणारा आत्मा.

रामानुजः—'आत्मगुणांनींच ज्याला सुख होतें.' पण आत्म्यास गुण आहेत कोठें? निर्गुणास सगुणत्व देणें हें योग्य नव्हे.

द्वैतवादीः—'भगवंताचें पूर्ण ज्ञान होऊन निःसीम भक्ती ज्यामध्यें बाणून गेली आहे त्या भक्तास निरंतरचें सुख मिळतें.' आचार्यांप्रमाणेंच हे अर्थ करितात मात्र द्वैतदृष्टी कायम ठेऊन अर्थ करितात. ब्रह्मभूत= ब्रह्माची बुद्धि, ज्ञान होणें. निर्वाणं=अशरीर ब्रह्म. त्याचें ज्ञान होणें म्हणजे निर्वाण संपादन करणें होय. हें ज्ञान झालें म्हणजे सुख होतें.

ज्ञानेश्वरः—**जे ऐसेनि सुखें मातले। आपणपांचि आपण राहिले। ते मीजाणें** (मी म्हणतो) **निखीळ** (सर्व) **ओंतले। समरस्याचे** (ब्रह्मानंद्राचे) ॥ **ते आनंदाचे अनुकार** (आकार)। **सुखाचे अंकुर। कीं महाबोधें विहार** (क्रीडास्थानें)। **केले जैसे। ते विवेकाचें गांव। कीं परब्रह्मीचे स्वभाव। नातरी अलंकारिले अवयव। ब्रह्मविद्येचे॥ ते सत्वाचे सात्विक। कीं चैतन्याचे आंगिक** (शरीरअवयव)। **हें बहु असो....॥....अनंत सुखाच्या डोहीं। एकसरा तळाचि घेतला जिहीं। मग थिरावुनि** (स्थिर होऊन) **तिहीं। तेचि जहाले॥**

पंडितः—अंन्तर्बाह्य ज्याची आत्मवृत्ति झाली तो अन्तराराम. बाहेर

भास आहे पण त्या भासाचें अधिष्ठान आत्मारामच आहे. अंत भास नाहीं म्हणून अंतः हा शब्द योजिला. पंडितांचा विस्तार वाचण्यासारखा आहे.

वल्लभः—अंतरारामः = भगवद्रमणकारणवान्. ॥ २४ ॥

किंच—

लभन्ते ब्रह्मनिर्वाण-
मृषयः क्षीणकल्मषाः ॥
छिन्नद्वैधा यतात्मानः
सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥

क्षीणकल्मषाः (क्षीण, नष्ट, झालीं आहेत पातकें व पापबुद्धि म्हणजे अहंकार व वासना ज्यांचीं असे) **छिन्नद्वैधाः** (उच्छेद झाला सर्व प्रकारच्या संकल्पविकल्पांचा, संशयांचा ज्यांचा असे), **यतात्मानः** (स्वाधीन करून ठेविलीं आहेत सर्व इंद्रियें, मन व बुद्धि ज्यांनीं असे)–व–**सर्वभूतहिते रताः** (यच्चावत् प्राणीमात्रांचें खरें कल्याण होण्यासाठीं अव्याहत श्रम चालले आहेत ज्यांचे असे) **ऋषयः** (ऋषी, साधु, महंत, सत्पुरुष) **ब्रह्मनिर्वाणं लभन्ते** (शुद्ध अशा मोक्षसुखाचा अनुभव घेत होत्साते तद्रूप होतात, मुक्त होतात.) –सारांश निष्काम कर्म करून, अहंकार व वासना या द्वयीचा नाश करून, वेदांत श्रवणानें सर्व प्रकारचे संशय, विकल्प उच्छेदून टाकून, ज्यांनीं उत्कृष्ट प्रकारचें आत्मसंयमन केलें आहे व जे सर्वप्राणीमात्रांच्या हित करण्यामध्यें मात्र अहर्निश रममाण झाले आहेत, अशा साधूंस मोक्षसुखाचा अनुभव घ्यावयास सांपडून मुक्ति मिळते.

लभन्ते ब्रह्मनिर्वाणं मोक्षमृषयः सम्यग्दर्शिनः संन्यासिनः क्षीणकल्मषाः क्षीणपापादिदोषाश्छिन्नद्वैधाश्छिन्नसंशया यतात्मानः संयतेन्द्रियाः सर्वभूतहिते रताः सर्वेषां भूतानां हित आनुकूल्ये रता अहिंसका इत्यर्थः ॥ २५ ॥

यथार्थ ज्ञान झाल्यामुळें ज्यांनीं निष्कामत्वानें सत्कर्में करून मात्र सर्व काम्यकर्मांचा त्याग केला आहे अशा साधूंचीं सर्व पातकें व पातकांचीं कारणें नष्ट होतात, अर्थातच ते शुद्धचित्त होतात; वेदांत ग्रंथांच्या म्हणजे उपनिषदादि ग्रंथांच्या परिशीलनानें व निदिध्यासानें त्यांचे सर्व संशय छिन्नविच्छिन्न होतात; त्यांचीं सर्व इंद्रियें, मन व बुद्धि, त्यांच्या सर्वस्वी स्वाधीन होतात आणि या लोकीं त्यांचा सर्व व्यवहार श्रेष्ठ व कनिष्ठ प्राणीमात्रांचें खरें कल्याण कसें होईल, त्या सर्वांचा उद्धार कसा होईल, प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणें कसा उपदेश देतां येईल, अशा लौकिकहितदृष्टीनें चाललेला असतो, अर्थातच ते पहिल्या प्रतीचे अहिंसक होतात. असो; अशी ज्यांची योग्यता झाली, हीं लक्षणें ज्यांस साध्य झालीं तेच ऋषी, तेच साधु, तेच महंत अगर महापुरुष होत. मोक्षाला हेच अधिकारी होतात व हेच साधु मोक्ष मिळवितात. चित्तशुद्धि, एकाग्रता, अहंकारत्याग, अद्वैतज्ञान आणि साक्षात्कार या मोक्षमार्गाच्या उत्तरोत्तर पायऱ्या होत.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरा०, पर्वते, द्विवेदी, चतरजी, ज्ञानेश्वर, रंगनाथ, गोस्वामी, व्याख्याकारः—आचार्यवादी आहेत.

शंकरानं०, पर्वतेः—आत्मचिंतनानें जे पापशून्य झाले, आत्म्याशिवाय ज्यांच्या चिंतनाला दुसरा विषयच नाहीं, सर्वच ब्रह्म आहे असें पाहूं लागल्यानें ज्यांची सर्वत्र निस्सीम प्रीति जडली, आत्मा चिद्रूप आहे कीं नाहीं, तो नित्य, देहेंद्रियांहून भिन्न, निःसंग, अकर्मक, शुद्ध, निर्लेप, अद्वितीय आहे कीं नाहीं इत्यादि सर्व संशय ज्यांचे नष्ट झाले मुक्त होतात. चतरजीः—'यतात्मानः' = विश्वाची एकतानता कायम ाचा जो नियम आहे त्यास अनुसरून ज्यांचें आचरण असतें; रुष ईश्वरी अनुग्रहाचे अवतारच होत.

रामानुज.— 'छिन्नद्वैधाः' = शीतोष्णादि द्वंद्वें ज्यांचीं नष्ट ं आहेत.

द्वैतवादीः—' छिन्नद्वैधाः = संशय विपर्यय ज्यांचे नष्ट झाले. 'यतात्मानः' = जे सर्वज्ञ झाले. (येथें द्वैतवादी 'आ' हा उपसर्ग त घेतात.) 'लभंते' याच्या मागें 'उप' हा उपसर्ग लावून 'उपलभंते'

म्हणजे 'पाहतात' असा अर्थ काढितात! द्वैतवाद सिद्ध करण्यासाठीं ही सर्व खटपट आहे, पण त्यांतही मुक्त होणाऱ्या पुरुषांस हे सर्वज्ञत्व देतात हें तरी भाग्यच समजावयाचें! एका परमेश्वराशिवाय सर्वज्ञत्व द्वैतमतानें कोणासच नसावें, तें येथें घेतलें आहे हें आश्चर्यच होय. ब्रह्मज्ञान झालें तरी मुमुक्षूचें मन निष्पाप असलें पाहिजे असें हे वादी म्हणतात. पण खरा अद्वैत सिद्धांत असा आहे कीं क्षीणकल्मष, शुद्ध, झाल्याविना ब्रह्मज्ञान होणेंच नाहीं.'

पंडितः—ज्ञान झालें म्हणजे मनुष्य निष्पाप होतो असें म्हणतात. 'सर्वभूतहिते रताः'—जगद्गुरू, जगदुद्धारक पुरुष. हे जिवंत असतांच मुक्त होतात.

वल्लभ.—अग्निकुमार, पुलिंद प्रभृति ऋषींसारखे जे ऋषी ते येथें उद्दिष्ट आहेत.

सरकार—सत्वगुणानें सर्वांचें सर्वदा मंगलच होतें. ॥ २५ ॥

किंचः—

आणखीः—

कामक्रोधवियुक्तानां
यतीनां यतचेतसाम् ॥
अभितो ब्रह्मनिर्वाणं
वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

कामक्रोधवियुक्तानां (कामक्रोध, कामना आणि द्वेष या दुष्टशत्रूंस ज्यांनीं पिटाळून लाविलें आहे, कामक्रोधांची व ज्यांची का[illegible] ही भेट होत नाहीं, असे) यतचेतसाम् (ज्यांनीं अंतःकरण आपल्या स्वाधीन ठेऊन त्याचें दमन केलें आहे, असे) विदितात्म[illegible] (ज्याना ब्रह्मपरिचय झाला आहे, असे) यतीनां (संन्या[illegible] यथार्थज्ञानी, यांच्या) अभितः (सर्व बाजूंनीं, येथें व परलोकीं,

ब्रह्मनिर्वाणं वर्तते (मोक्षसुख भरलेलें असतें.) सारांश बाह्य विषयांचा सर्वथा कामनिक त्याग केल्यामुळें ज्यांची इच्छा व द्वेष हीं नष्ट झालीं, अंतःकरण सर्वस्वी स्वाधीन होऊन ब्रह्मपदीं लीन झालें व परब्रह्माचा साक्षात् परिचय झाला असे जे खरे संन्यासी आहेत, त्यांना आंत बाहेर, येथें व अन्यत्र, ब्रह्मसुख परिपूर्णत्वानें भरलेलें असतें. सारांश या कामनिक कर्माचा त्याग झाल्यानंतर सद्गुरूच्या व परमेश्वराच्या अनुग्रहानें पुरुषास ब्रह्मज्ञान व ब्रह्मसाक्षात्कार होऊन हें सर्व दृश्य विश्व तो ब्रह्ममयच पहातो. अर्थात् तो मुक्त होतो.

कामक्रोधवियुक्तानां कामश्च क्रोधश्च कामक्रोधौ ताभ्यां वियुक्तानां यतीनां संन्यासिनां यतचेतसां संयतान्तःकरणानामभित उभयतो जीवतां मृतानां च ब्रह्मनिर्वाणं मोक्षो वर्तते विदितात्मनां विदितो ज्ञात आत्मा येषां ते विदितात्मानस्तेषां विदितात्मनां सम्यग्दर्शिनामित्यर्थः ॥ २६ ।

काम आणि क्रोध यांचें ज्यांनीं स्वःतला कायमचें सुखकारक विरहदुःख दिलें, (काम क्रोधांचा वेग ते सहन करितात इतकेंच नव्हे तर त्यांचा बीमोड करितात,) आपलें मन सर्वस्वी आपल्या स्वाधीन ठेऊन ज्यांची वृत्ति परमार्थाकडे वळली, ते संन्यासी जिवंत असोत किंवा मेलेले असोत, कर्म करोत किंवा न करोत; ते सदैव ब्रह्मसुखाचाच अनुभव घेतात व शेवटीं या लोकींच म्हणजे जिवंत असतांनाच त्यांस नित्य अशी मुक्ति मिळते. मात्र त्यांस यथार्थ ज्ञान, परब्रह्माचें ज्ञान, अनुभवसहित झालेलें असलें पाहिजे. सामान्य मनुष्यास हजारों गोष्टींचा परिचय नसल्यामुळें त्यांस त्या त्या गोष्टीविषयीं राग किंवा लोभ असत नाहीं म्हणून तो मुक्तच झाला असा अर्थ नव्हे! ब्रह्मज्ञान झाल्यामुळें ज्याचे सर्व कामनिक बाह्य व्यवहार संपले आहेत, अशा पुरुषास मात्र साक्षात्कार झाल्यावर मोक्ष मिळणार, इतरास नाहीं.

मधु०, प्रपा०, शंकरानंद, पर्वते, द्विवेदी, चतरजी, आचार्यवादी आहेत. शंकरा० कामक्रोध हे समाधीचे विघातक आहेत, यांचा नाश प्रथम केला पाहिजे. पर्वतेः ‘मोक्षसुखार्थ ज्यांनीं कर्म-

संन्यास केला आहे, ' असा अर्थ करितात; हा युक्त नव्हे असें वाटतें. कारण चित्त शुद्ध होऊन ब्रह्मज्ञान झालें ह्मणजे कर्मसंन्यास, काम्यकर्म-संन्यास अवश्यमेव, निर्हेतुकपणेंच, होतो. चतरजीः—कामक्रोध नष्ट झाले तरी ब्रह्मज्ञान अवश्य पाहिजे.

रामानुजः—' विजितात्मनां ' असा पाठ घेऊन जीवेश्वरभेद दाखवितात; पण असा पाठच उपलब्ध नाहीं. अभितः = हातांत, असा हे आचार्य व तेलंग व इंग्लिश टीकाकार अर्थ करितात.

वल्लभांच्या मतानें हाच अर्थ आहे. पण सर्वव्यापि, सर्वत्र, सर्वदा हेच अर्थ ठीक होत; द्वैतवादी आचार्यांप्रमाणेंच 'अभितः' या पदाचा अर्थ करितात. ' आपणास रक्षण करणारे ब्रह्म सर्वत्र आहे, असें ज्ञान या पुरुषांस असतें. ' असा द्वैत अर्थ होय. आपणच ब्रह्म झाल्यावर कोण-कोणाचें रक्षण करणार ?

ज्ञानेश्वर—**जिहीं विषयापासोनि हिरतलें** (हिरावून घेतलें, हरण केलें.) । **चित्त आपुलें आपण जिंतिलें । ते** (कामक्रोध) **निश्चित जेथ सुतले** (निजले) **चेतीचिंना** (ते शत्रु जागेच होत नाहींत!) ॥ **तें परब्रह्म निर्वाण । जें आत्मविदांचें कारण । तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ॥**

पंडित—आपल्या चित्ताचें संयमन केलें आहे, म्हणून कामक्रो-धांचे तडाखे सोसण्याचे सामर्थ्य ज्यांस आलें आहे, सारांश ज्यांनीं कामक्रोधांस निर्माल्यवत् केले आहे, ' असा आग्रहाचा अर्थ करितात. सामान्य अर्थ हा कीं या पुरुषांस कामक्रोध उत्पन्नच होण्याचा संभव नाहीं.

वल्लभ—यतचेतसां = भगवत्स्वरूपाचाच अनुभव आहे ज्यांच्या चित्ताला असे. ॥ २६ ॥

सम्यग्दर्शननिष्ठानां संन्यासिनां सद्योमुक्तिरुक्ता कर्मयो-गश्चेश्वरार्पितसर्वभावेनेश्वरे ब्रह्मण्याधाय क्रियमाणः सत्त्व-शुद्धिज्ञानप्राप्तिसर्वकर्मसंन्यासक्रमेण मोक्षायेति भगवान्पदे पदेऽब्रवीद्वक्ष्यति च । अथेदानीं ध्यानयोगं सम्यग्दर्शन-स्यान्तरङ्गंविस्तरेण वक्ष्यामीति तस्य सूत्रस्थानीयाञ्श्लो-कानुपदिशति स्म—

गुरु—ज्यांस ब्रह्मवस्तूचें यथार्थज्ञान झालें व तेथें मात्र निष्ठा बसल्यामुळें सर्व कामानिक कर्मांचा ज्यांनीं खरोखर त्याग केला आहे व अहंकारांस वासनेसह रजा दिली आहे असे पुरुष तात्काल मुक्त होतात असें हा वेळ पर्यंत सांगितलें. तसेंच देह, इंद्रिय, मन, बुद्धि, इत्यादिकांचे सर्व व्यापार परमात्मा जो ईश्वर त्यास समर्पण करून जे कर्मयोगी कर्मांचे आचरण करितात, त्यांचे प्रथमतः मन शुद्ध होतें, पुढें ज्ञानप्राप्ति होते आणि नंतर सर्व काम्य कर्में सुटून जाऊन ते मुक्त होतात, असा कर्मयोगानें क्रममुक्ति मिळविण्याचा विषय ही बरेच वेळ, ठिकठिकाणीं, आणिला आहे व पुढेंही भगवान हा विषय सांगतील. समजलास? आतां या पुढील अध्यायांत ध्यानयोग सांगावयाचा आहे त्याचीं सूत्रें म्हणून पुढील २।३ श्लोक अवतीर्ण केले आहेत.

शिष्य—भगवन्! ध्यान योग तो काय?

गुरु—हा विषय ६ व्या अध्यायांत विस्तारानें स्पष्ट होईलच. ध्यानयोग हें एक यथार्थ ज्ञानाचें, अंतरंग, मुख्य असें साधन, आहे. समजलास? येथें जे श्लोक आहेत ते केवळ सहाव्या अध्यायाचा प्रस्ताव करण्यासाठीं आणिलेले आहेत; ह्मणून हे सूत्ररूपी आहेत. यावरील मीमांसा पुढील अध्यायांत येईल—

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यां-
श्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः॥
प्राणापानौ समौ कृत्वा
नासाभ्यन्तरचारिणौ॥ २७॥

बाह्यान् स्पर्शान् बहिः कृत्वा (बाह्य असे जे विषय आहेत त्यांस बाहेरच ठेऊन) भ्रुवोः अन्तरे चक्षुः च आणि (दोन भिवयांच्या मध्यें, नासाग्रीं, दृष्टि ठेऊन)–व– प्राणापानौ समौ कृत्वा (प्राण वायु

व अपानवायु यांस सम करून) नासाभ्यन्तरचारिणौ (आणि हे दोन्ही वायु नाकाच्या आंतून वाहतील अशी व्यवस्था करून). सारांश सर्व विषयांचा त्याग करून नासाग्रीं ज्यांनीं दृष्टि लाविली आणि प्राणायाम यथाविधि जे करूं लागले—

स्पर्शाञ्शब्दादीन्कृत्वा बहिर्बाह्याञ्श्रोत्रादिद्वारेणान्तर्बुद्धौ प्रवेशिताः शब्दादयो विषयास्तानचिन्तयतो बाह्या बहिरेव कृत्वा भवन्ति । तानेवं बहिः कृत्वा चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः कृत्वेत्यनुषज्यते । तथा प्राणापानौ नासाभ्यन्तरचारिणौ समौ कृत्वा ॥२७॥

कान, नाक, डोळे इत्यादिकांच्या साह्यानें आंत प्रवेश करणारे जे शब्द, गंध, रूप इत्यादि विषय, त्यांचें चिंतन न करितां ज्यानें त्यांस बाहेरच ठेऊन दिले आहेत, (हा प्रत्याहार होय.) भिवयांच्या मध्यभागीं म्हणजे नासाग्रावर ज्यांची दृष्टि स्थिर झाली आहे, (ही धारणा होय) त्याचप्रमाणें प्राण व अपान वायु यांस नाकांतून चालवयास लावून ज्यानें त्यांचें वैषम्य मोडिलें आहे म्हणजे दोन्ही वायूंचा वेग सारखा केला आहे (वाक्य पुढील श्लोकांत पूर्ण होईल)—हा प्राणायाम होय.—

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरानंद, पर्वते, द्विवेदी, चतरजी, गोस्वामी, रंगनाथ हे सर्व आचार्यवादी आहेत. मधु० बाह्यान् कृत्वा = डोळे, कान इत्यादिकांच्या योगानें अंतःकरणामध्यें शिरून कामक्रोधास वश असणाऱ्या अंतःकरणाला विषयस्वरूप देणारे जे अनात्मक विषय आहेत, त्यांस परम वैराग्यानें बाहेरच ठेऊन. चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः= संपूर्णत्वानें डोळे झांकल्यास निद्रा येईल. सबंध उघडे डोळे ठेविले तर विषय दृष्टीस, पडून अनेक प्रकारचे विक्षेप उत्पन्न होतील ह्मणून डोळे अर्धवट उघडे ठेऊन समौ कृत्वा = प्राण व अपान ह्या वायूंची वर खालीं जाण्याची गति पूरकरेचकपूर्वक कुंभकानें अवरुद्ध करून. प्रपा० नासाग्री दृष्टि ठेवण्यास खेचरीमुद्रा असें योगमार्तंडांत नांव दिलें आहे. श्रीधर,: शंकरानंद, रामानुज, पंडितः—नाकांतून आंत जाणें, व बाहेर येणें हा ज्यांचा स्वभाव आहे अशा प्राण व अपान वायूंचा निरोध कुंभकानें हृदयामध्यें करून असाही एक अर्थ देतात. पर्वतेः—येथें प्राणायाम,

प्रत्याहार व धारणा हीं योगसाधनें सूत्र रूपानें सांगितलीं. द्विवेदी म्हणतातः—ब्रह्मज्ञान झालेल्या पुरुषाची सहजच अशी स्थिति असते, ह्मणजे ब्रह्मांडाचा जसा प्राण असतो, तसाच याच्या पिंडाचाही प्राण असतो.

ज्ञानेश्वरः–**सहजे तिहीं** (इडा, पिंगला व सुषुम्ना) **संधी भेटी। जेथ भ्रुपल्लवा पडे गांठी। तेथ पाठमोरी दिठी। पारुखोनिया** (माघारी वळवून) ॥ **सांडून दक्षिण वाम** (उजवें डावें) **प्राणापान सम चित्तेंसी व्योम। गोमिये** (आकाशांत जाणारे) **करिती ॥**

पंडितः 'नासाग्रीं दृष्टि ठेविली असतां जें तेज दिसूं लागतें, तेंच ब्रह्म होय,' असें म्हणणाऱ्या पाखंड्यांचें मत श्रुतिस्मृतींच्या आधारें खंडित करितात.

वल्लभः–' बहिः कृत्वा, = विषय हे प्रारब्ध कर्माचे भोग आहेत असें समजून, भ्रुवोः ' = काळ व यमरूपी भिंवया.

सरकार–या योगास अभ्यास योग म्हणतात. ॥ २७ ॥

यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ॥
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥२८॥

यतेन्द्रियमनोबुद्धिः (दमन केलें आहे इंद्रियें, मन आणि बुद्धि यांचें ज्यानें, असा) **मोक्षपरायणः** (मोक्ष नामक पुरुषार्थ आहे अत्यंत आश्रय ज्याचा, मोक्ष तत्पर जो आहे, असा) **विगतेच्छाभयक्रोधः** (नाम शेष झालीं आहेत इच्छा, भय, क्रोध ज्याचीं, असा) **यः मुनिः** (जो ध्यानतत्पर मुनि असतो) **सः** (तो) **सदा मुक्त एव** (नेहमीं मुक्तच आहे)–सारांश मागील श्लोकांत सांगितलेले गुणांसह इंद्रियादिकांचें दमन करून जो मोक्षनिष्ठ मुनि झाला आहे व ज्यानें इच्छा, भय, क्रोध यांस कायमची रजा दिली आहे; असा जो असतो तो नेहमीं मुक्तच आहे. तात्पर्य विकाररहित आत्मनिष्ठ पुरुष मुक्तच आहे.

यतेन्द्रिय इति । यतेन्द्रियमनोबुद्धिर्यतानि संयतानीन्द्रियाणि मनो बुद्धिश्च यस्य स यतेन्द्रियमनोबुद्धिर्मननान्मुनिः संन्यासी मोक्षपरायण एवं देहसंस्थानो मोक्षपरायणो मोक्ष एव परमयनं परा गतिर्यस्य सोऽयं मोक्षपरायणो मुनिर्भवेत् । विगतेच्छाभयक्रोध इच्छा च भयं च क्रोधश्चेच्छाभयक्रोधास्ते विगता यस्मात्स विगतेच्छाभयक्रोधः । य एवं वर्तते सदा संन्यासी मुक्त एव स न तस्य मोक्षोऽन्यः कर्तव्योऽस्ति॥२८॥

ज्यानें इंद्रियांचें, मनाचें व बुद्धीचें सर्वस्वी बाह्य विषयांपासून संयमन केलें आहे, जो ज्ञाननिष्ठ आहे, ज्यानें सर्व कर्मांचा त्याग केला आहे, देहांत मात्र राहून ज्यानें मोक्ष नामक अतिश्रेष्ठ पुरुषार्थाकडे आपलें मन लाविलें आहे, समाधीचा भंग करणारीं इच्छा, भय आणि क्रोध हीं सर्व बाह्यविषयांचा त्याग केल्यामुळें ज्याचीं नष्ट झालीं आहेत, असा जो संन्यासी वागतो, तो सदा, जिवंत असतांनाही, ब्रह्माचें मनन करित असल्यामुळें मुक्तच असतो. मोक्ष मिळवावयाचा आहे ह्मणून त्याला आणखी करावें लागत नाहीं. इंद्रियादिनिग्रह, कर्मत्याग, विकारशून्यता आत्मचिंतन, हीं साध्य झालीं ह्मणजे तो साधक पुरुष मुक्तच असतो.

मधु०, प्रपा०, श्रीधर, शंकरानंद, पर्वते, द्विवेदी, चतरजी, गोस्वामी, रंगनाथ. आचार्यवादी आहेत.

प्रपा० ट्टिपणिकेमधील उतारा देतातः—

'परावृत्तं चित्तं यदि भवति बाह्यव्यवहृते
रसत्यायाः सत्यं कलयति तदाऽभ्यासवशतः ॥
क्षुधार्तः संविष्टः क्षणमनुभवन्स्वाप्नमशनं
मृषा मत्वा बोधे पुनरपि च भोक्तुं प्रयतते ॥

(असत्य असा जो बाह्यव्यापार त्यापासून चित्त काढून घेऊन अभ्यास योगानें तो ब्रह्मपर मुमुक्षु सत्याचे ठायीं उन्मुख होतो. क्षुधातृषादिकांनीं उपद्रव केल्यास तच्छमनार्थ खाणें पिणें इत्यादि कर्में स्वप्नामधील ह्मणून असत्य आहेत, असें मानून पुनः तो ब्रह्मचिंतनांत मग्न होतो.)

'तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः । दिवीव चक्षु-'राततम् । तद्विप्रासो विपन्यवो जागृवांसः समिन्धते । ' यावरील **रावणभाष्यानुसारें** अर्थ पहाः (सर्वव्यापी जो भगवान विष्णु त्याचें अत्यंत पारमार्थिक असें प्रकट होण्याचें स्थान कोणतें ? तर दिवि ह्मणजे भुवयाच्या मधील स्थान होय. कारण त्रिपाद म्हणजे सत्य, ज्ञान, आणि आनंदात्मक जो सर्वव्यापी भगवान त्याचें स्थान दिवि ह्मणजे मस्तकावर असणाऱ्या भिवयामधील भाग होय' असें श्रुतीच म्हणते. त्या पदाचें दर्शन महानुभव लोक जे आहेत ते नित्य एकाग्र मनानें (डोळे विस्तृत करून) घेत असतात. ह्या परमात्मस्वरूपाचें दर्शन व्हावें म्हणून श्रेष्ठ बुद्धीचे विप्र जागृत राहतात, दृश्यप्रपंच हा स्वप्नवत् असें मानून ते नित्य परमात्मस्वरूपाचे ठायीं जागृत राहतात. आणि याप्रमाणें जागत राहून व ब्रह्मसुखाचा अनुभव घेत राहून ते सर्वदा सर्वात्मक ब्रह्मच आहे, असें पाहतात) प्रपाकार तात्पर्यार्थ काढितात कीं सुषुम्णा नामक नाडीच्या मार्गानें भुवयांच्यामध्यें दृष्टि आणून समाधीच्या स्थितींत परमात्मदर्शन घेतात आणि व्यवहारांत सकल विषय ब्रह्मम[illegible]च आहेत असें पाहतात. याचप्रमाणें प्रपाकारांनीं **सामारण्यक व शातपथी** श्रुति देऊन प्राणायामाची महती वर्णन केली आहे. असो; हें रावणभाष्य-समग्र मिळेल तर १० व्या शतकाच्या अगोदर वेदाचा अर्थ कसा करित हें समजण्याचा मार्ग सांपडेल. कोणी आर्यधर्माभिमानी याचा शोध लावील काय ?

शंकरानंद ह्मणतातः जो सदा ब्रह्मचिंतनामध्यें मात्र असतो तोच मुक्त होतो. हजारों वेळ वेदांतश्रवण केलें पण नित्याचिंतन जर नाहीं तर तेथें मुक्तस्थिति नाहीं. पर्वते यांनीं श्लोकांतील शब्दांतून सर्व योगमार्गाची पद्धति काढण्याचा प्रयत्न केला आहे- तो वाचनीय आहे.

रामानुज—साधनदशेमध्येंही हा पुरुष मुक्त होतो असें म्हणतात! साधन-दशेंतच साध्य वस्तु प्राप्त झाली तर तिला साधनदशा असें कां ह्मणावें बरें ?

द्वैतवादी—'असला पुरुष मुक्ततुल्यच होतो ! मुक्त होतो हें म्हणणें स्तुतिपर होय ! ' एक द्वैत साध्य करण्यास सर्वसंमत गीताशास्त्राची कोण ओढाताण ही !

ज्ञानेश्वर–जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूप पट (वस्त्र) फाटे । जैसें सरोवर आटे । मग प्रतिभा (प्रतिबिंब) नाहीं ॥ तैसें मन येथ मुदल जाय । मगं अहंभावादिक कें (कोठें) आहे। ह्मणोनि शरीरेंच ब्रह्म होय । अनुभवी (ब्रह्मसाक्षात्कारी) तो ॥

डेव्हिस साहेब कठोपनिषदांतील समानार्थक मंत्र देतात. (पहा कठो. अध्याय २ वल्ली ३ मंत्र १४).

गीताव्याख्याकार—उन्मळला जेव्हां संकल्पवृक्ष। तेव्हांच ब्रह्म तो स्वयें ॥ २८ ॥

एवं समाहितचित्तेन किं विज्ञेयमित्युच्यते—

याप्रमाणें ज्याच्या मनाला स्थैर्य प्राप्त झालें आहे त्यानें जाणण्याची वस्तु कोणती म्हणशील तर सांगतातः—

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ॥
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति २९॥

यज्ञतपसां भोक्तारं (सर्व यज्ञांचा व तपश्चर्येचा हवनदेवतास्वरूपानें भोक्ता) सर्वलोकमहेश्वरम् (अनंतकोटी जीं भुवनें आहेत त्या सर्वांचा महादेव) सर्वभूतानां सुहृदं (सर्व प्राणीमात्र व वस्तुमात्र यांचा खरा मित्र) मां ज्ञात्वा (असा मी परमेश्वर आहे असें जाणून) शान्तिं ऋच्छति (उत्तम प्रकारची शांति मिळवितो). सारांश, मागें सांगितलेला यति परमेश्वराचें खरें स्वरूप जाणूं लागला म्हणजे त्यास उत्तम प्रकारची शांति मिळते.—

भोक्तारं यज्ञानां तपसां च कर्तृरूपेण देवतारूपेण च सर्वलोकमहेश्वरं सर्वेषां लोकानां महान्तमीश्वरं सर्वलोकमहेश्वरं सुहृदं सर्वभूतानां सर्वप्राणिनां प्रत्युपकारनिरपेक्षतयोपकारिणं सर्वभूतानां हृदयेशयं सर्वकर्मफलाध्यक्षं सर्वप्रत्ययसाक्षिणं मां नारायणं ज्ञात्वा शान्तिं सर्वसंसारोपरतिमृच्छति प्राप्नोति ॥ २९ ॥

सर्व निष्काम यज्ञयागादिकांचा व तपश्चर्येचा कर्ता व भोक्ता सगुण परमेश्वरच आहे, परमेश्वर हाच अनंतकोटी ब्रह्मांडांचा नियामक व पालकही आहे, परमेश्वर हा एक मात्र सर्व प्राणीमात्रांचा खरा मित्र आहे

शिष्य—खरा मित्र ह्मणजे ?

गुरु—म्हणजे असेः—आपले उपकार रामभाऊ कोणत्या तरी स्वरूपानें फेडतील अशा आशेनें जो रामभाऊवर उपकार करितो, तो रामभाऊचा खरा स्नेही नव्हे. पण रामभाऊचें मात्र कल्याण व्हावें, त्यापासून पुढें आपल्यास कांहीं मिळालें नाहीं तरी चिंता नाहीं, असें समजून जो रामभाऊवर उपकार करितो तो खरा स्नेही होय. समजलास ? असा खरा स्नेही परमेश्वर आहे, तो सर्व भूतांच्या अंतर्यामी वास करणारा आहे, सर्व कर्मांचा व फलांचा अध्यक्ष, (नियामक) परमेश्वरच आहे आणि सर्व प्रकारच्या ज्ञानाचा साक्षीही तोच परमेश्वर आहे, असें परमेश्वराचें, नारायणाचें, स्वरूप जो यथार्थ रीतीनें जाणतो तो उत्कृष्ट प्रकारची शांति मिळवितो, ह्मणजे सर्व प्रकारच्या व्यावहारिकांपासून, संसारांपासून, तो मुक्त होतो.

मधु०—आचार्यवादी आहेत.

मधुः—तात्पर्य देतातः "**अनेकसाधनाभ्यासान्निष्पन्नं हरिणेरितम् । स्वस्वरूपपरिज्ञानं सर्वेषां मुक्तिसाधनम् ।**" (अनेकसाधनांच्या दृढाभ्यासानें उत्पन्न होणारें व सर्वांस मुक्तिमार्गाचें साधन होणारें व परमेश्वरानें कथन केलेलें हें स्वस्वरूपाचें ज्ञान पांचव्या अध्यायांत सांगितलें आहे.

प्रपाकार म्हणतातः इच्छाभयइत्यादिकांचें निर्मंथन करावयाच्या मोठ्या कामांत विघ्नें येण्याचा संभव आहे म्हणून परमेश्वरांनीं 'मी भक्तांचा आश्रय आहे.' असें सांगितलें.

प्रपाकार या अध्यायाचें तात्पर्य श्लोक रूपानें देतांत. तो हा.—

"**ज्ञानं संपाद्य सम्यक्क्रमविरमवतः कर्मणो या समाप्तिः**
संन्यासः कर्मयोगः स यदमलधियः कर्मकौशल्यमाभ्याम् ।
ब्रह्मण्याधीयते यत्सुकृतशतजुषः कर्म सर्वेंद्रियोत्थं
प्राणायामेन चित्तं व्रजति परपदं पञ्चमे प्रोक्तमेतत् ॥"

श्रीधरः--विकल्पशंकापोहेन येनैवं सांख्ययोगयोः। समुच्चयः क्रमेणोक्तः सर्वज्ञं नौमि तं हरिम्॥ (अर्जुनास जी शंका आली होती तिचें निरसन करून ज्या परमेश्वरानें सांख्य व योग यांचा समुच्चय क्रमाक्रमानें सांगितला त्या हरीस मी नमस्कार करितों.)

पर्वते--' मला नारायणाला जो स्वात्मभेदानें म्हणजे प्रत्यक्षतेनें जाणतो त्याला शांतिरूप कैवल्य प्राप्त होतें.

शंकरा०:--भोक्तारं = आत्मा. सुहृद = हृदयाचे ठायीं राहणारा अव्यक्तादि सर्वांपेक्षां श्रेष्ठ, सर्वांचा नियामक असा परमेश्वर. यांचा दुसरा अर्थ ओढाताणीचा आहे.

द्विवेदीः--' मी यज्ञादिकांचें अंतरंग कारण, सर्वांमध्यें असून निर्लेप, व सर्वाधार, मी सर्वांचें आनंदस्थान, सारांश सच्चिदानंद परब्रह्माचें रूप जो मी, यास जो जाणतो, त्यास साक्षात्कार होऊन कैवल्य प्राप्ति होते. एवंच सांख्य आणि योग तत्वतः एकच आहेत व ज्ञानी पुरुषाला मात्र ब्रह्मप्राप्ति आहे असें ठरतें.'

चतरजीः--' मी सर्व आहे तरी माझी शक्ति कोणास नाहीं '

या अध्यायांत अज्ञानी पुरुषास कर्मसंन्यासापेक्षां विहित कर्मयोगच श्रेष्ठ आहे असें सांगितलें. कारण निष्काम कर्मयोगानें आपलें अंतःकरण शुद्ध होऊन तें आत्मज्ञानाला राहण्यायोग्य असें पवित्रस्थान होतें. पुढें ज्ञान झाल्यावर कर्मसंन्यासच होतो हें पुनः सांगावयास नकोच. गीताव्याख्याकार हेंच म्हणतात.

रामानुजाचार्यः--' मी यज्ञतपांचा भोक्ता आहे, सर्व देवदेवांचा स्वामी आहे, व सर्व भूतांचा मित्र आहे,' असें जाणून जो कर्म करितो, माझी उपासना करितो, तो तें कर्म सुखानें करितो ! " एवंच कर्मयोगाकडे मुमुक्षु सुखानें जातात असा कां या आचार्यांच्या म्हणण्याचा भाव ?

द्वैतवादीः--ज्ञात्वा = असें ध्यानांत, मनांत, आणून, शांतिं = शांति देणारा जो विष्णु त्या प्रत.

ज्ञानेश्वरः--आम्ही मागा हन सांगितलें ।' जे देहींच

पावले । ते येणे मार्गें आले । म्हणवुनिया ॥ आणि यमनियमांचे डोंगर । अभ्यासाचे सागर । क्रमोनि हे पार । पातले ते ॥ तिहीं आपणपें करूनि निर्लेप । प्रपंचाचे घेतलें माप । साच शांतीचें चित्स्वरूप । होऊनि ठेले ॥

या श्लोकाचा विचार १८ व्या अध्यायांत ज्ञानेश्वरांनीं केला आहे.

पंडितांनीं—सुहृद् शब्दावर उत्तम व्याख्यान केलें आहे; ह्यांतील कांहीं ओव्या मात्र येथें घेतों......... तरी आत्मा आपुला अव्यय। आवडे निर्निमित्त सर्वांस ॥ न कळोनि आत्मा आपुला । तो देह म्हणूनि देह ही प्रिय वाटला । स्त्रीधनादि पाहिजे त्याला । म्हणोनि तीं ही सुहृदें वाटती ॥ पण.... तो देह होय अप्रिय निःसंदेह । त्या सुहृदा आत्मया कारणें ॥ हातास घाय लागला । तो कापूनि टाळितां वाचणें याला । तेव्हां त्या हातावरी उदार झाला । प्रिती धरूनि आत्मया सुहृदाची ॥ समग्रदेहीं दुःखसंयोग । तेव्हां आरंभितो देहत्याग ऐसा काढितां माग । सुहृद एक आत्मा आपुला ॥ मी सर्वांचा सुहृद । ह्मणोनि म्हणे गोविंद । त्याचा अर्थ ऐसा नव्हता मुकुंद । सुहृद वाटतो कवणासी? ॥ जे भेदें भजती ही तयाला । त्यांसही सुहृद आत्माच आपुला । आपल्या कल्याणाकारणें कीं या घननीळा । ते भजती ॥ आपल्या सुखा कारणें नृपती । अतीप्रीतीनें जैसें भजती । तैसी भुक्ति, मुक्ति, आपणा व्हावी ह्मणोनि प्रीति । भेदवादिया ईश्वराची ॥ एवं मुख्य सुहृद । आपला आत्मा तदर्थ मुकुंद । सुहृद वाटला, तेव्हां गोविंद । नव्हे सुहृद, कीं सुहृद आत्माच आपला ! ॥ तरी तोचि आत्मा गोविंद । तरीच मी सर्व भूतांचा सुहृद । ह्मणोनि मुक्तिप्रद गोविंद. । स्वमुखें ऐसें बोले ये स्थळीं ॥

डेव्हिस साहेबांस सगुण व निर्गुण दोन ब्रह्मांमधील विशेष, चांगल्या परिचयाचा नसल्यामुळें ब्रह्मास 'यज्ञतपांचा भोक्ता' म्हटलें आहे ते अप्रासंगीक वाटलें आहे ! परमेश्वर ही ब्रह्माची व्यक्त स्थिति आहे हें यांस समजलें नाहीं. असो; याचा विचार आपण पुढें करूं.

उपसंहार.

पांचव्या अध्यायाच्या पहिल्या दहा श्लोकांत ' सांख्य ' ' व कर्म ' हे विचारदृष्ट्या एकच आहेत, व त्यांचें फलही एकच आहे, असें सांगितलें आणि जो अज्ञानी आहे त्यानें ज्ञानयोगाचें अनुष्ठान न करितां प्रथमतः कर्मयोगच करावा असें सांगितलें. या कर्मयोगाला आरंभ केल्यानंतर सर्व कर्में परमेश्वरास अर्पण करावयाचीं, असा अभ्यास करावा. हा विषय पहिल्या दशश्लोकींत आला आहे.

यानंतरच्या १८ श्लोकांत अहंकारत्याग, वासनात्याग आणि कर्मत्याग हे विषय प्रथमतः घेऊन नंतर यच्चावत् कर्म अविद्येकडून होत असतें, अविद्या नष्ट झाली म्हणजे देदीप्यमान ज्ञानप्रकाश सर्वत्र फांकून मनाला समता येते, ब्रह्माचे ठायीं मन लीन होऊन कामक्रोधादिकांचा क्षय होतो व शेवटीं ज्ञानविज्ञानांच्या साहाय्यानें ब्रह्मनिर्वाणाची प्राप्ति होते, असे विषयांचा ऊहापोह केला आहे. शेवटच्या तीन श्लोकांत योगमार्गाचें अवतरण करून त्याचा विस्तार पुढील अध्यायांत करावयाचा आहे व कर्मयोगाला योगमार्गाची दिशा लागल्यानंतर ब्रह्मज्ञान सौकर्यानें कसें मिळतें हें तेथेंच सांगावयाचें आहे, असें ध्वनित करून अध्यायाची परिसमाप्ति केली आहे.

अहंकार, वासना, आणि कर्म यांचा त्याग.

परमेश्वरास आपलीं कर्में बुद्धिपूर्वक समर्पण करावयाचीं, नुसता ' तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ' असा निर्जीव व औपचारिक मंत्र मात्र म्हणावयाचा नाहीं, अशी एकदां मनाला संवय लाविली म्हणजे क्रमाक्रमानें ' केलें हें मींच केलें ' अशा प्रकारचा अभिमान विगलित होतो. अनेक कारणांच्या संयोगानें विवक्षित कार्य घडून येतें, मी निमित्तमात्र कारण आहे, असा मनाचा हळूहळू निश्चय होऊं लागला म्हणजे अहंकार कमी होत जातो. विषयोपभोगाचें सर्व कर्म जीवाच्या सविवेक इच्छेच्या व्यतिरिक्त होत असतें, म्हणजे मला अमुक पदार्थ सुख भोगण्यासाठीं हवा आहे, ही जी प्राण्याला किंवा मनुष्याला इच्छा होते ती इच्छा जीवाच्या

अथ षष्ठोऽध्यायः ।

श्रीभगवानुवाच—

अतीतानन्तराध्यायान्ते ध्यानयोगस्य सम्यग्दर्शनं प्रत्यन्तरङ्गस्य सूत्रभूताः श्लोकाः 'स्पर्शान्कृत्वा बहिः' इत्यादय उपदिष्टास्तेषां वृत्तिस्थानीयोऽयं षष्ठोऽध्याय आरभ्यते । तत्र ध्यानयोगस्य बहिरङ्गं कर्मेति यावद्ध्यानयोगारोहणासमर्थस्तावद्गृहस्थेनाधिकृतेन कर्तव्यं कर्मेत्यतस्तत्स्तौति । ननु किमर्थं ध्यानयोगारोहणसीमाकरणं, यावताऽनुष्ठेयमेव विहितं कर्म यावज्जीवम् । न, 'आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते' इति विशेषणादारूढस्य च शमेनैव संबन्धकरणात् । आरुरुक्षोरारूढस्य च शमः कर्म चोभयं कर्तव्यत्वेनाभिप्रेतं चेत्स्यात्तदाऽऽरुरुक्षोरारूढस्य चेति शमकर्मविषयभेदेन विशेषणं विभागकरणं चानर्थकं स्यात् ।

ब्रह्मसाक्षात्कार करून ध्यावयाचा असेल तर त्याला ध्यानयोग हें अंतःसाधन आहे, असें गेल्या म्हणजे पांचव्या अध्यायांत 'विषयांस बाहेर काढून देऊन' इत्यादि २७, २८ व २९ श्लोकांत सूत्ररूपानें सांगितलें. त्या सूत्रांवर विस्तृतरीतीनें व्याख्यान करण्यासाठीं ह्या म्हणजे सहाव्या अध्यायास आरंभ केला आहे. आतां, वत्सा! ध्यानयोगाचें बाह्यांग ह्मणजे कर्म होय. तेव्हां ज्या गृहस्थाला अद्यापि ध्यानयोगाचें अनुष्ठान करण्याचें सामर्थ्य आलें नाहीं, सारांश ध्यानयोगाचा अधिकार ज्याला प्राप्त झाला नाहीं, अशी अनधिकारी परंतु मोक्षाची इच्छा धारण करणाऱ्या पुरुषानें अधिकार

प्राप्त होईपर्यंत कर्म केलेंच पाहिजे, असें सांगण्यासाठीं विहित कर्माची भगवान स्तुति करितातः-

शिष्य--भगवन्! ' जावत्कालपर्यंत **जिवंत आहे** तोंपर्यंत श्रुतींनीं सांगितलेलीं कर्मे प्रत्येकानें केलीं पाहिजेत. ' असा सर्वसाधारण नियम असून आपण **ध्यानयोग करण्याचें** सामर्थ्य येईपर्यंतच कर्म करावें ' असें ह्मणतां हें कसें बरें? आपणास ज्ञानाच्यावेळीं कर्माचा अभाव हवा आहे, त्यासाठीं ही शास्त्रविरुद्ध मर्यादा कीं काय?

गुरु--वत्सा! तूं गीतापाठ नित्य म्हणतोस ना? याच अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकांत काय सांगितलें आहे बरें? ' योगपर्वतावर चढूं इच्छिणाऱ्या पुरुषानें इष्टसिद्धीसाठीं कर्म केलें पाहिजे. ' असें स्पष्ट तऱ्हेनें व विशेष रीतीनें सांगितलें आहेना? तसेंच '. ज्याला योग साध्य झाला त्यानें शमाचा ह्मणजे कर्मनिवृत्तीचा योगाशीं नित्यसंबंध ठेवावा ' असें सांगितलें आहे. सारांश आह्मीं जी सीमा सांगितली आहे ती भगवन्मतास अनुसरूनच आहे.

शिष्य--त्या श्लोकांत कर्म व शम हीं दोघांस सांगितलीं आहेत, म्हणजे ' योगसाधक व योगसिद्ध पुरुषांनीं कर्म केलें पाहिजे व शमयुक्त असलें पाहिजे, ' असाच मुळीं अर्थ केला तर? असाच अर्थ भगवंतांस अभिप्रेत आहे असें समजलें तर?

गुरु--वः! असें समजलें तर विश्वांतला सर्व घोटाळा तुझ्या या अर्थांत येऊन बसेल! बावा! दोघांनीं ही कर्म व शम यांचें आचरण करावें हें इष्ट असतें तर कर्म आणि शम अशीं साधनें निरनिराळ्या ठिकाणीं कां घातलीं असतीं? ह्मणजे कर्माचा एक प्रांत व शमाचा एक प्रांत असा विषयविभाग कशाला केला असता? तसेंच योगाचा अभ्यास करणारा आणि योग साध्य झालेला असे पुरुषाचे दोन अधिकारसमय उत्पन्न केले आहेत, ते कशाला केले असते? नुसतें, सर्वांनीं कर्मशमाचें आचरण करावें असें सांगितलें असतें. पण असें सांगितलें नाहीं, ह्मणून तुझा अर्थ असमंजस व अर्थशून्य होय. ध्यानयोग साध्य होईपर्यंत मात्र कर्म करावयाचें व तो योग सिद्ध

झाला ह्मणजे कर्मापासून निवृत्त होण्यास ह्मणजे स्वस्थचित्त होण्यास लागावयाचें हाच अर्थ भगवंतांस इष्ट आहे.

तत्राऽऽश्रमिणां कश्चिद्योगमारुरुक्षुर्भवत्यारूढश्च कश्चिदन्ये नाऽऽरुरुक्षवो न चाऽऽरूढास्तानपेक्ष्याऽऽरुरुक्षोरारूढस्य चेति विशेषणं विभागकरणं चोपपद्यत एवेति चेत् । न, तस्यैवेति वचनात् । पुनर्योगग्रहणाच्च योगारूढस्येति य आसीत्पूर्वं योगमारुरुक्षुस्तस्यैवाऽऽरूढस्य शम एव कर्तव्यं कारणं योगफलं प्रत्युच्यत इति । अतो न यावज्जीवं कर्तव्यत्वप्राप्तिः कस्यचिदपि कर्मणः, योगविभ्रष्टवचनाच्च । गृहस्थस्य चेत्कर्मिणो योगो विहितः षष्ठेऽध्याये स योगविभ्रष्टोऽपि कर्मगतिं कर्मफलं प्राप्नोतीति तस्य नाशाशङ्काऽनुपपन्ना स्यात् । अवश्यं हि कृतं कर्म काम्यं नित्यं वा मोक्षस्य नित्यत्वादनारभ्यत्वे स्वं फलमारभत एव ।

शिष्य--क्षमा करा. माझा ह्मणण्याचा भाव असा आहे; ब्रह्मचर्यादि जे चार आश्रम आहेत, त्यांत कांहीं लोक योगाभ्यास करण्याची इच्छा करणारे असतात, कांहीं योगी झालेले असतात. आणि बाकीचे सर्व योगाभ्यास करूं इच्छित नाहींत किंवा योगसिद्धही झालेले नाहींत. येणेंप्रमाणें मनुष्याचे तीन वर्ग झाले; तेव्हां हे तीन विभाग लक्ष्यांत ठेवून भगवंतांनीं ' योगाभ्यास करूं इच्छिणारे, व योगसिद्ध झालेले असा भेद केला आहे व त्या उभयतांसही कर्म व शम (कर्मनिवृत्ति) सांगितलीं आहेत, हें योग्यच होय. सारांश कर्म हें सर्वांस सांगितलें आहे.

गुरु--पण तुझा विभागच मुळीं वाळूच्या पायावर रचलेला आहे. कारण ' तस्यैव ' (त्या पुरुषालाच) असे शब्द असल्यामुळें ' जो योगाभ्यास करूं इच्छिणारा कर्म करण्यास मात्र अधिकारी होता, त्याच पुरुषाला योग साध्य झाल्यावर त्यानें शम करावा म्हणजे

कर्मनिवृत्ति करावा,' असें सांगितलें आहे. यावरून पुरुष दोन नसून एकच आहे हें सिद्ध झालें. (२) शिवाय योग शब्द दोन्ही स्थितींत सामान्य आहे, त्यावरून जो योग करूं इच्छित होता, **तोच योगी** योग सिद्ध झाल्यावर, योगाचें फल सिद्ध करण्यासाठीं शम करण्यास अधिकारी होतो, हा भगवदभिप्राय स्पष्ट आहे. यावरून 'जोंपर्यंत मनुष्य जिवंत आहे, तोंपर्यंत त्यानें शास्त्रोक्त कर्म केलेंच पाहिजे' हें वचन सर्वत्र लागू पडत नाहीं, असें झालें. तसेंच (३) योगापासून भ्रष्ट झालेला' असे शब्द आहेत, त्यावरून तर आम्ही म्हणतों तेंच खरें आहे, हें सिद्ध होतें. वत्सा! सकामकर्म करणाऱ्या गृहस्थानें योग करावा, हें जर सहाव्या अध्यायांत सांगावयाचें होतें, तर नित्य किंवा काम्य कर्में करणारा पुरुष योगभ्रष्ट झाला तर त्या योगभ्रष्टाचें कर्मही नष्ट होईल कीं काय, या शंकेचें कारण काय बरें? म्हणजे 'गृहस्थाश्रमी पुरुषानें केलेलें काम्य कर्म किंवा नित्य कर्म (सारांश त्याचें नित्यनैमित्तिक कर्म) हीं फलद्रूप झालींच पाहिजेत.' हा सिद्धांत जर सर्व संमत आहे तर योगभ्रष्टाचें पुढें काय होईल ही शंका येणें म्हणजे कर्म फलद्रूप होतें, या सिद्धांताविषयीं साशंक होणें होय.

शिष्य—मोक्ष देणारीं कर्में नष्ट नाहीं कां होत? त्यांचें फल नष्टच होतें कीं नाहीं?

गुरु—कर्मानें मोक्ष मिळतो हें ह्मणणें अपसिद्धांताचें आहे. मोक्ष नित्य आहे. तो कधीं उत्पन्न होत नाहीं, म्हणून कर्मानें उत्पन्न होतो किंवा मोक्ष हा कर्माचें फल आहे, असें म्हणणें असत्य आहे. तेव्हां फलाच्या नाशाविषयीं शंका आली यावरून तो योगभ्रष्ट सकाम कर्म करणारा नसावा म्हणजे कर्मसंन्यास केलेलाच तो पुरुष असला पाहिजे असें ठरतें. एवंच (१) 'तस्य' हा शब्द आहे म्हणून, (२) 'योग' शब्द सामान्य आहे म्हणून आणि शेवटीं (३) योगभ्रष्ट झालेल्या पुरुषाची काय स्थिति होईल अशी शंका येण्याचा संभव उत्पन्न झाला म्हणून, सारांश या तीन कारणांमुळें तूं म्हणतोस तसा विभाग होणें शक्य नाहीं. म्हणजे तात्पर्य असें कीं जो पुरुष योगाभ्यासाचें कर्म करित असतो, त्यानेंच योग साध्य झाल्यावर कर्मनिवृत्ति अथवा शम करावा हा अर्थ भगवंतास इष्ट आहे.

नित्यस्य च कर्मणो वेदप्रमाणावबुद्धत्वात्फलेन भवितव्यमित्यवोचामान्यथा वेदस्यानर्थार्थत्वप्रसङ्गादिति। न च कर्मणि सत्युभयविभ्रष्टवचनमर्थवत्कर्मणो विभ्रंशकरणानुपपत्तेः।

शिष्य—गुरो! नित्य कर्में (म्हणजे जीं कर्में मनुष्यानें अवश्य केलींच पाहिजेत तीं) केलीं असतां फलप्राप्ति होऊं नये. संध्यावंदन कर्म नित्य आहे. तें केलें असतां कांहीं पुण्यप्राप्ति नाहीं. पण संध्या केली नाहीं तर पाप आहे इतकेंच कायतें. असा प्रचलित समज असतां नित्य व काम्य कर्में, सर्वच, फलप्रद होतात हें आग्रहाभासाचें म्हणणें दिसतें.

गुरु—नाहीं. तसें नाहीं. नित्य कर्मानें पापोदय होत नाहीं, या रीतीनेंच तीं फलद्रूप होतात, असें मागेंच आम्हीं सांगितलें आहे. शिवाय वेद अपौरुषेय आहेत. ते मनुष्यकृत नाहींत. म्हणून वेदांत जें काय 'कर' म्हणून सांगितलें आहे, त्याचें फल अवश्य झालेंच पाहिजे. वेदांचें प्रमाण सर्वगामी आहे. कारण ते यथार्थवाची आहेत. असो; तेव्हां 'नित्यकर्में करणारा गृहस्थ योगभ्रष्ट झाला तर' ही शंका घेणारा पुरुष अपौरुषेय व यथार्थवाची वेदांचा अपमान करित आहे असें होतें; व वेदांत अनेक स्थळीं अनर्थवाचक शब्द आहेत, असें मानणारा हा शंकाग्राहक आहे असें होतें. अर्जुनास वेद मान्य होते. यावरून 'नित्य व काम्य कर्में करणाऱ्या गृहस्थास योगभ्रष्टत्व आलें तर' अशी शंकाच अर्जुनास आली नाहीं. त्याची पृच्छा अशी आहे कीं 'कर्मनिवृत्त पुरुष (गृहस्थ नव्हे) योगभ्रष्ट झाल्यास त्याचें पुढें काय होईल?' समजलास? शिवाय योगी पुरुष जर तुझ्या समजुतीप्रमाणें कर्म करणारा आहे, व कर्माचें फल जर नित्य आहे, तर 'अतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः (हें नाहीं व तें नाहीं) असा होईल, हें अर्जुनाचें म्हणणें वेड्यासारखें होईल. कारण योगभ्रष्ट झालेला पुरुष कर्मभ्रष्ट झालाच पाहिजे हें म्हणण्यास आधार नाहीं. म्हणून उभयभ्रष्ट हें पद निरर्थक होईल. एवंच योगमार्ग सिद्ध झाला

म्हणजे कर्मसंन्यास होतो; म्हणून गृहस्थ (काम्य कर्मे करणारा) योगमार्गाला अधिकारी नाहीं असें झालें.

कर्म कृतमीश्वरे संन्यस्येत्यतः कर्तरि कर्म फलं नाऽऽरभंत इति चेत्। न। ईश्वरे संन्यासस्याधिकतरफल हेतुत्वोपपत्तेः। मोक्षायैवेति चेत्स्वकर्मणां कृतानामीश्वरे न्यासो मोक्षायैव न फलान्तराय योगसहितो योगाच्च विभ्रष्ट इति, अतस्तं प्रति नाशाशङ्का युक्तैवेति चेत्। न। 'एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः' 'ब्रह्मचारिव्रते स्थितः' इति कर्मसंन्यासविधानात्। न चात्र ध्यानकाले स्त्रीसहायत्वाशङ्का येनैकाकित्वं विधीयते। न च गृहस्थस्य निराशीरपरिग्रह इत्यादिवचनमनुकूलम्। उभयविभ्रष्टप्रश्नानुपपत्तेश्च। अनाश्रित इत्यनेन कर्मिण एव संन्यासित्वं योगित्वं चोक्तं प्रतिषिद्धं न निरग्नेरक्रियस्य च संन्यासित्वं योगित्वं चेति चेत्। न ध्यानयोगं प्रति बहिरङ्गस्य सतः कर्मणः फलाकाङ्क्षा संन्यासस्तुतिपरत्वात्। न केवलं निरग्निरक्रिय एव संन्यासी योगी च किं तर्हि कर्म्यपि कर्मफलासङ्गं संन्यस्य कर्मयोगमनुतिष्ठन्सत्त्वशुद्ध्यर्थं स संन्यासी च योगी च भवतीति स्तूयते। न चैकेन वाक्येन कर्मफलासङ्गसंन्यासस्तुतिश्चतुर्थाश्रमप्रतिषेधश्चोपपद्यते। न च प्रसिद्धं निरग्नेरक्रियस्य परमार्थसंन्यासिनः, श्रुतिस्मृतिपुराणेतिहासयोगशास्त्रविहितं संन्यासित्वं योगित्वं च प्रतिषेधति भगवान्। स्ववचनविरोधाच्च।

शिष्य—महाराज! कोणत्याही आश्रमांतील 'मनुष्य जें जें काय करितो तें सर्व त्यानें ईश्वरास समर्पण केलें असतां तें त्याचें कर्म निष्फल होतें, म्हणजे तें कर्म त्यास बंद्धक होत नाहीं.' असा न्याय आहेना? "असें सर्व कर्म निष्फल झालें व तो गृहस्थाश्रमी योगभ्रष्ट झाला तर त्याची पुढें काय गति होणार." हा प्रश्न युक्तच आहे. नाहीं काय?

गुरु—नाहीं. कारण व्यवहारांतच पहा कीं मोठ्या मनुष्यास किंवा राजास आपण कांहीं वस्तु अर्पण केल्यास त्या अर्पणाच्या अनेक पट आपल्यांस लाभ मिळतो! त्याचप्रमाणें ईश्वरास कामी गृहस्थानें आपलें कर्म अर्पण केल्यास त्यास मोठाच लाभ झाला पाहिजे. एवंच इकडूनही त्याचें नित्य व काम्य कर्म फलप्रदच होतें!

शिष्य—होय. मोठें फल म्हणजे मोक्षच ना! तेव्हां आपण ईश्वरास अर्पण केलेल्या कर्माचें फल मोक्ष आणि तें त्या नित्यनैमित्तिक कर्म करणाऱ्या गृहस्थाचें कर्म योगासहित व्हावयाचें, म्हणून ईश्वरार्पित कर्मानें मोक्षच मिळावयाचा, दुसरें फल उत्पन्न व्हावयाचें नाहीं, अशी स्थिति असतांना जर हा गृहस्थ योगभ्रष्ट झाला तर त्याचा नाश होईल ही शंका बरोबरच आहे. एवंच गृहस्थही योगी असूं शकतील असें झालें. सारांश मी जो विभाग केला आणि कर्म व शम ही एका पुरुषास एकदम साध्य आहेत, असें म्हटलें तें योग्यच होय.

गुरु—नाहीं. तें अयुक्त आहे. बाबा! याच अध्यायाचे १० व १४ श्लोक पहा. त्यांत 'एकाकी' (एकटा) 'यतचित्तात्मा' (मनोजय केला आहे ज्यानें असा) 'निराशीः (आशा शून्य झालेला) 'अपरिग्रहः' (सर्वसंग सोडून दिला आहे ज्यानें असा), 'ब्रह्मचारिव्रते स्थितः' (ब्रह्मचर्याचें व्रत ज्यानें घेतलें आहे, असा) इत्यादि शब्दांवरून योग्यानें (गृहस्थानें नव्हे, कारण गृहस्थास हीं विशेषणें लागूच पडत नाहींत) कर्म संन्यास करावा असें सिद्ध होतें, कर्म करून तें ईश्वरास समर्पण करावें असें सिद्ध नाहीं होत.! वत्सां! शिवाय हीं विशेषणें तर तूं पहाः एकाकी ह्मणजे ध्यान कालीं त्यानें एकटें असावें असें आहे. म्हणजे अग्निहोत्र इत्यादि नित्यकर्म करीत असतां ज्याप्रमाणें स्त्रीच्या साहाय्याची अपेक्षा असते, त्याप्रमाणें ध्यानकालीं स्त्रीसहाय्य नको म्हणून एकाकी हें पद भगवंतांनीं योजिलें होय? 'ध्यान करावयास बसावें' असें सांगतांच 'एकटें असावें' असें होतेंना? पण असें असतांही एकाकी पद घातलें आहे त्याचा अर्थ तसाच कांहीं निराळा असला पाहिजे. (२) तसेंच

'आशाशून्यत्व व सर्वसंगपरित्याग हे शब्द विशेषणरूपानें कामुक गृहस्थास कधीं तरी लावितां येतील काय? शिवाय (३) 'उभयविभ्रष्ट' या पदाची मीमांसा तुझ्या म्हणण्यानें कांहीं सिद्धच होत नाहीं. ज्ञानाला मनुष्य आंचवेल, पण आपण केलेल्या फलाला तो सर्वथा मुकेल असें कधींही व्हावयाचें नाहीं. सारांश 'जिवंत आहे तोंपर्यंत मनुष्यानें कर्म केलेंच पाहिजे.' ह्या वेदवाक्याच्या जोरावर तूं जो गृहस्थास योगाचा अधिकार देऊं पहात आहेस व एकाच पुरुषाच्या हातून एकाच वेळीं सकाम कर्म व कर्मनिवृत्ति घडवून आणावयास पाहत आहेस, तो तुझा सर्व वृथाश्रम आहे; गंजिफाच्या साहाय्यानें तूं घर बांधित आहेस तें खास पडणार यांत शंका नाहीं, असें तुझें तुला सुद्धां कळून चुकलें असेल.

शिष्य—मला आतां इतकेंच म्हणावयाचें आहे कीं पहिल्या श्लोकांत कर्मठ मनुष्यानें मात्र संन्यास व योग हे मार्ग धरावे, जो अग्निपालन करित नाहीं, किंवा वेदोक्त कर्म करित नाहीं, त्याला संन्यास व योग हे योग्य नाहींत, असा विषय सांगितला आहे. त्यावरून काय अर्थ निष्पन्न होईल तो खरा!

गुरु—नाहीं. 'तुझा अर्थ खरा नाहीं. कारण ध्यानयोगाचें बाह्यांग जें कर्म त्या कर्माची फलाशा नष्ट करणाऱ्या पुरुषाची स्तुति पहिल्या श्लोकांत केली आहे. समजलास? ज्यानें अग्निव्रत सोडिलें किंवा विहित कर्माचा त्याग केला तोच मात्र संन्यासी अगर योगी असें नाहीं, तर स्वतःच्या चित्तशुद्धिसाठीं कर्म करणारा परंतु कर्मफलाविषयीं आशाशून्य झालेला कर्मठ सुद्धां संन्यासाला व योगाला पात्र आहे, असा स्तुतिपर हा श्लोक लावावयाचा आहे. आलें ध्यानांत? तुझा अर्थ घेतला तर एकाच वाक्यांत भगवंतांनीं कर्मफलाची आशा सोडणाऱ्या पुरुषाची स्तुति व सर्व कर्मांचा खरा संन्यास करणाऱ्या यतींची निंदा केली असा अप्रयोजक अर्थ होईल! तसेंच श्रुति, स्मृति, इतिहास (भारत इत्यादि) पुराणें, व योग शास्त्र इत्यादिकांस संमत असणारा प्रसिद्ध जो—

शिष्य—म्हणजे अग्निहोत्र व इतर नित्य नैमित्तिक कर्में यांचा

त्याग केला आहे असें जे खरे परमहंस संन्यासी असतात, त्यांचा संन्यास व त्यांचा योग, ह्यांचा प्रतिबंध भगवान करणार नाहींत असेंच आंपल्यास म्हणावयाचें ना ?

गुरु--अगदीं बरोबर ! आणखी भगवान असें ही बोलतील कदाचित् असें म्हणशील तर, भगवान आपल्या सिद्धांताविरुद्ध येथें बोलले असें होईल.

शिष्य--त्यांनीं काय कोठें म्हटलें आहे !

गुरु--श्रीगीताशास्त्रांतील दुसरा अध्याय श्लोक ७१, अध्याय पांच श्लोक १३, अध्याय बारा श्लोक १६ व १९ अध्याय चवदा व श्लोक २३ पहा.

सर्वकर्माणि मनसा संन्यस्य नैव कुर्वन्न कारयन्नास्ते मौनी संतुष्टो येन केनचिदनिकेतः स्थिरमतिर्विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः सर्वारम्भपरित्यागीति च तत्र तत्र भगवता स्ववचनानि दर्शितानि तैर्विरुध्येत चतुर्थाश्रमप्रतिषेधः । तस्मान्मुनेर्योगमारुरुक्षोः प्रतिपन्नगार्हस्थ्यस्याग्निहोत्रादि फलनिरपेक्षमनुष्ठीयमानं ध्यानयोगारोहणसाधनत्वं सत्त्वशुद्धिद्वारेण प्रतिपद्यत इति स संन्यासी च योगी चेति स्तूयते—

गुरु--'सर्व कर्मांचा मनानें त्याग करून कर्तृत्व-भोक्तृत्व-शून्य जो असतो' (अ० ९ श्लोक १३); 'जो मौनव्रती, मिळेल त्यांत संतुष्ट, घरदार नाहीं असा, व दृढनिश्चयी असतो (अ० १२ श्लो० १९); सर्व वासना सोडून देऊन जो निर्लोभमनानें संचार करितो (अ० २ श्लो० ७१); सर्व कर्मांचा ज्यानें त्याग केला (अ० १२ श्लो० १६ व अ० १४ श्लो० २५) इत्यादि ठिकाणीं ज्या खऱ्या संन्यासाची स्तुति केली आहे त्याचीच येथें निंदा केली असें होईल; म्हणजे भगवंतांनीं परस्परविरोधी सिद्धांतांचें प्रणयन केलें आहे, असें होईल. हें तर अशक्यच होय. म्हणून ह्या पहिल्या श्लोकांत गृह-

स्थाश्रमी पुरुषाची स्तुति केली आहे, असा अर्थ घ्यावयाचा. मात्र त्या गृहस्थानें अग्निहोत्रादिक सर्व कर्में निरपेक्ष बुद्धीनें केलीं पाहिजेत. निरपेक्षतेनें केलेलीं कर्में चित्तशुद्धि करितात. चित्तशुद्धि झाल्यावर त्या गृहस्थास ध्यानयोगाची धारणा करण्याचें सामर्थ्य येतें. एवंच तो मुनीच होतो. तोच खरा संन्यासी व योगी होय. अर्थात् ही स्तुति आहे.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः॥
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः॥१॥

कर्मफलं अनाश्रितः (कर्मांच्या फलावर कोणत्याही प्रकारची आशा न ठेवणारा) **यः** (जो) **कार्यं कर्म करोति** (अवश्य अशीं कर्में करितो) **सः संन्यासी योगी च** (तोच संन्यासी व योगी आहे.) **निरग्निः न** (ज्यानें अग्निकर्म सोडून दिलें तो नव्हे) **च** (आणि) **अक्रियः न** (ज्यानें विहित कर्में टाकून दिलीं तोही नव्हे.) सारांश-केलेल्या कर्मांनें आपल्यास फलप्राप्ती होईल अशी तृष्णा समूळ दग्ध झाली असूनही जो कर्माधिकारी पुरुष अवश्य अशी शास्त्रविहित कर्में निरपेक्ष बुद्धीनें करितो, तोच खरा संन्यासी व खरा योगी होय. केवळ विहित कर्मांचा त्याग मात्र ज्यानें केला आहे तो खरा संन्यासी नव्हे व खरा योगीही नव्हे.—

अनाश्रितो नाऽऽश्रितोऽनाश्रितः किं कर्मफलं कर्मणः फलं कर्मफलं यत्तदनाश्रितः कर्मफलतृष्णारहित इत्यर्थः। यो हि कर्मफलतृष्णावान्स कर्मफलमाश्रितो भवत्ययं तु तद्विपरीतोऽतोऽनाश्रितः कर्मफलमेवंभूतः सन्कार्यं कर्तव्यं नित्यं काम्यविपरीतमग्निहोत्रादिकं करोति निर्वर्तयति। यः कश्चिदीदृशः कर्मी स कर्म्यन्तरेभ्यो विशिष्यत इत्येवमर्थमाह स संन्यासी च योगी चेति। संन्यासः परित्यागः स यस्यास्ति स संन्यासी च योगी च योगश्चित्तसमाधानं स यस्यास्ति स योगी चेत्येवंगुणसंपन्नोऽ-

यं मन्तव्यो न केवलं निरग्निरक्रिय एव संन्यासी योगी चेति मन्तव्यः । निर्गता अग्नयः कर्माङ्गभूता यस्मात्स निरग्निरक्रियश्चानग्निसाधना अप्यविद्यमानाः क्रियास्तपोदानादिका यस्यासावक्रियः ॥ १ ॥

गुरु--अनाश्रित म्हणजे कर्माचें जें फल त्याविषयीं जो संकल्पशून्य, कर्मफलाचा आधार नाहीं ज्याला असा, सारांश कर्मफलाची तृष्णा ज्याला नाहीं असा जो आहे, एवंच जो निष्काम आहे त्याला अनाश्रित म्हणावें. कर्मापासून उत्पन्न होणारें फल आपल्यास मिळावें, अशी ज्याला आशा असते, तो कर्मफलाचा आश्रित होय. जो ह्या विरुद्ध आहे म्हणजे ज्याला कर्मफलाची आशा नाहीं तो अनाश्रित होय. असा जो तृष्णाशून्य पुरुष आहे त्याची तृष्णा शांत झाली असतांही तो आपल्या अधिकारास विहित असे शास्त्रोक्त कर्म करित असतो.

शिष्य—ह्मणजे अग्निहोत्रहवन इत्यादि नित्य कर्म करित असतो, असेंच ना ?

गुरु--बरोबर. पण हें सर्व काम्यकर्मांच्या विरुद्ध ह्मणजे निष्कामबुद्धीनें केलें जातें. असो; याप्रमाणें तृष्णाशून्यत्वानें शास्त्रोक्त नित्य कर्मांचें अनुष्ठान करणारा जो पुरुष आहे, तो अर्थातच इतर सामान्य कर्मठांहून श्रेष्ठ असला पाहिजे. हें सांगण्यासाठीं भगवान ह्मणतात कीं हा निष्काम पुरुषच खरा संन्यासी व खरा योगी होय.

शिष्य—महाराज! संन्यास ह्मणजे कर्मत्याग व योग ह्मणजे कर्मानुष्ठान ! तेव्हां संन्यास व योग यांचें साहचर्य एकाठायीं व एकाच वेळीं कसें होणार ?

गुरु—मागें सांगितलेलें विसरलास खास ! अरे ! संन्यास म्हणजे तृष्णेचा परित्याग आणि योग ह्मणजे चित्ताचें ब्रह्माचे ठायीं समाधान; तेव्हा तृष्णेचा त्याग व ब्रह्मैकचिंतन या गोष्टी परस्पर विरोधी आहेत कीं काय ? नाहींत. ज्यानें तृष्णात्याग केला तो संन्यासी व ज्याचें चित्त ब्रह्म ध्यानांत निमग्न झालें तो योगी होय.